महात्मा गांधी

यांचे

संकलित वाङ्मय

७

(जून–डिसेंबर १९०७)

सत्यमेव जयते

संचालक, प्रसिद्धि विभाग महाराष्ट्र राज्य–मुंबई

महात्मा गांधी

यांचे

संकलित वाङ्मय

७

(जून–डिसेंबर १९०७)

म हा त्मा गां धी

यां चे

संकलित वाङ्मय

७

(जून–डिसेंबर १९०७)

सत्यमेव जयते

सं चा ल क, प्र सि द्धि वि भा ग म हा रा ष्ट्र रा ज्य – मुं ब ई

जुलै १९६२ (आषाढ १८८४)

नवजीवन ट्रस्ट अहमदाबाद यांच्या सौजन्ययुक्त मान्यतेने
म. गांधी वाङ्मय प्रकाशन समितीकरिता
संचालक, प्रसिद्धि विभाग, महाराष्ट्र सरकार, मुंबई—१
यांनी प्रकाशित केले.

साधी बांधणी] किंमत [कापडी बांधणी

[illegible] १-८० [illegible] २—७९]

प्रस्तावना

या खंडामध्ये जून ते डिसेंबर १९०७ या सात महिन्यांचा काळ आलेला आहे, वसाहतमंत्र्याने वटहुकूम नामंजूर केल्यामुळे, त्याच्या जागी, ट्रान्सवॉलचा आशियावासी नोंदणी–कायदा ट्रान्सवॉलच्या नव्या संसदेने ता. २१ मार्चच्या एकाच बैठकीत मंजूर केला, हे आपण पूर्वी पाहिले आहे. त्याला राजेसाहेबांची संमती ता. ८ जून रोजी मिळाली व ता. १ जुलै रोजी तो अंमलात आला. या ‘ दुष्ट कायद्याविरुद्ध ’ हिंदी समाजाने ११ सप्टेंबर १९०६ रोजी जुन्या एम्पायर थिएटरमधील सार्वजनिक सभेत जो लढा सुरू केला, तो आता सविनय प्रतिकार संघाने चालविला आहे. ही संस्था याच कामासाठी खास निर्माण करण्यात आली आहे. [दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह, प्रकरण १६]

ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांची स्थिती या कायद्यानंतर कशी होईल, याची तुलना कायद्यापूर्वीच्या स्थितीशी करून गांधीजींनी जाहीर केले की, “ सारा ट्रान्सवॉल हा एक दुःखदायक कैदखाना बनेल. नव्या कायद्याने आशियावासियांना दुःखाच्या व हालांच्या ज्या अवस्थेत लोटले जाईल, त्याकडे डोळेझाक करणे हे खरोखर सत्तामदाने धुंद झालेल्यांनाच शक्य आहे. ” [प्र. १३ पाहा.] या कायद्याने हिंदी लोकांवर जो शिंतोडा उडविला आहे, तो त्या कायद्याखाली केलेल्या नियमामुळे मुळीच पुसला जात नाही. हा कायदा तिरस्कारार्ह ठरतो, तो बोटांचे ठसे घेण्यामुळे नव्हे, तर त्यातील सक्तीचे तत्त्व व हिंदी समाजाचा जाणूनबुजून उपमर्द करण्याचा त्याचा हेतु यामुळे. यामुळे हा कायदा “ आपल्या पौरुषाला अपमानास्पद व आपल्या धर्माला उपमर्दकारक ” आहे. (प्र. १६९) हे कायदे रद्द केले तर, समेट म्हणून खुषीची नोंदणी करण्याची तयारी, तडजोड म्हणून, गांधीजींनी दाखविली. ती अव्हेरिली गेली. म्हणून स्वाभिमानाला आणि गंभीरपणे व प्रामाणिकपणे केलेल्या प्रतिज्ञांना मान देण्याची जाणीव मानव–जातीला करून देणाऱ्या “ उच्चतर कायद्याला ” मान्यता देण्याशिवाय (प्र. १८७) दुसरा मार्गच उरला नाही. या उच्चतर कायद्याला मान देण्यासाठी, ट्रान्सवॉल सरकारच्या “ तिरस्कारार्ह कायद्याला ” सविनय प्रतिकार करण्याचा उपदेश गांधीजींनी केला.

इंग्रज महिलांनी मताधिकारासाठी, केवळ एक प्रभावी राजकीय शस्त्र म्हणून, सविनय प्रतिकाराचा आश्रय केला आणि त्या चळवळीचा उल्लेख गांधीजींनी, दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांमध्ये स्वाभिमान व धैर्य निर्माण करण्याच्या कामी,

कौतुकाने वारंवार केला हे खरे; पण गांधीजी सविनय प्रतिकाराकडे केवळ तेवढ्याच दृष्टीने पाहात नसत. ती कल्पना त्यांनी नैतिक व आध्यात्मिक आशयाने संपन्न केली. तिला पाठिंबा देणाऱ्या थोरोच्या "सविनय कायदेभंग" या निबंधाचा सारांश गांधीजींनी इंग्रजी व गुजराती या दोन्ही भाषांतून दिला. पण "सविनय प्रतिकार" ही संज्ञा त्यांना अपुरी व भ्रामक वाटली. ते म्हणतात, हिंदी लोकांची चळवळ ही "खरोखर प्रतिकार नव्हे, तर सामुदायिक रीत्या कष्ट सोसण्याचे धोरण आहे." (प्र. ४७) कायदेभंग केल्याने दंड होतील, तो हिंदी लोक देणार नाहीत, त्यापेक्षा ते तुरुंगात जातील. परवाने मिळाले नाहीत तर त्यांच्याशिवाय ते व्यापार चालवितील. कायदेभंगाचे परिणाम काय होतील, हे हिंदी लोकांना माहीत होते आणि ते "शांतता-पूर्ण प्रतिष्ठेने व समर्पणभावाने" (प्र. ६०) सोसण्यास ते तयार होते. गांधीजींच्या कल्पनेप्रमाणे, "सविनय प्रतिकार" हे नीतिशिक्षणाचे एक साधन होते. सत्य व न्याय यांची तत्त्वे सिद्ध करण्यासाठी मानवनिर्मित कायद्याचा भंग करणे अवश्य असेल, तर तो पूर्ण सत्यनिष्ठ राहूनच केला पाहिजे. अन्याय्य कायदा झुगारून देताना हिंदी समाजाने आपल्या खाजगी व सार्वजनिक जीवनातील अनेक स्पष्ट दोष टाकले पाहिजेत, आणि दैवी कायद्याच्या आदेशानुसार सतत वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आपल्या चळवळीला आध्यात्मिक आशय मिळवून देण्याची गांधीजींची इच्छा होती; पण "सविनय प्रतिकार" या संज्ञेमुळे, ती इच्छा झाकली गेली. हिंदी लोकांना आपली स्वतःची भाषा कौशल्याने वापरता यावयास हवी, हे स्वाभिमानाच्या दृष्टीने अवश्य आहे, असेही त्यांना वाटे. म्हणून त्या संज्ञेला योग्य हिंदी पर्याय देणाऱ्यास 'इंडियन ओपिनियन'ने बक्षीस लावले. 'सदाग्रह' असा शब्द मगनलाल गांधींनी सुचविला, तो बदलून गांधीजींनी 'सत्याग्रह' शब्द बनविला. तो समर्पक शब्द आहे. कारण गांधीजींनी पूर्ण सत्याचा जन्मभर जो शोध केला, त्याचे तो प्रतीक आहे.

आपल्या लढ्याचे परिणाम व महत्त्व यांची पूर्ण जाणीव असल्यामुळे, गांधीजी दर आठवड्याला 'इंडियन ओपिनियन' मध्ये आपले अंतःकरण ओतीत असत. त्यामुळे ते पत्र म्हणजे, "हिंदी समाजाच्या चालू इतिहासाचा खराखुरा आरसा" [दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह, प्रकरण २०] बनले. विशेषतः, गुजराती लेखांमध्ये गांधीजींनी त्या लढ्याची प्रत्येक बाजू विस्ताराने विवेचिली, आणि त्या लढ्याची कारणे व परिणाम, तंत्र व प्रक्रिया आणि यशापयशाचा संभव या सर्वांचा सविस्तर ऊहापोह केला. येशू व थोरो आणि प्राचीन हिंदी महाकाव्यातील अन्याय-निवारक वीर यांच्यापासूनच त्यांनी स्फूर्ती घेतली असे नव्हे तर, सफ्रेजेट स्त्रिया, बंडखोर खिश्चन, सिनफेनर्स व डच यांच्या चालू घडामोडींवरूनही त्यांनी स्फूर्ती मिळविली.

नोंदणी–कचेरीवरील निरोधन पद्धतशीरपणे आखले गेले. ते शांततापूर्ण असावयाचे होते, आणि क्रोधाच्या प्रदर्शनापासून ते अलिप्त राहावयाचे होते. त्याला जशी शारीरिक हिंसा, तशीच कठोर भाषाही वर्ज्य होती. आशियावासी कायद्याचे जोखड फेकून देण्याची त्यांना इच्छा असेल त्यांनी, "अज्ञानाने धमकावणी देण्याचे व दमदाटी करण्याचे" (प्र. २०३) त्याहून भयंकर असे जोखड आपल्या विरोधकांवर लादता कामा नये. निरोधन परिणामकारक झाले. परवाना–कचेरी या शहरातून त्या शहरात भटकत होती. पण बहिष्कारामुळे ती निष्क्रिय राहिली. समाजातील शें.५%पेक्षा कमी लोकांनी, "गुलामगिरीचा पट्टा" घेतला. नोंदणीची मुदत पुनः पुनः वाढविण्यात आली, तरी अधिक लोक पुढे आले नाहीत. फितूर लोकांची– "वीणावादकांची" असे त्यांना म्हणत–नावे 'इंडियन ओपिनियन' मध्ये प्रसिद्ध होत. त्या भेकडांना लाज वाटावी आणि इतरांना इशारा मिळावा, हा त्यातील हेतु होता. भयापेक्षा स्वाभिमानाला आवाहन करण्यात आले. जेव्हा काही हिंदी लोकांनी शरणागतीची योजना मांडली, तेव्हा हिंदी लोकांचा समुदाय त्या कायद्याला विरोधी आहे, हे दाखविण्यासाठी गांधीजींनी एक विराट निवेदन सादर करण्याची कल्पना काढली, आणि ४,५०० हिंदी लोकांच्या सह्यांचा अर्ज पाठविला.

ब्रिटिश इंडियन असोसिएशन, हमीदिया इस्लामिया अंजुमन व चिनी संघ यांच्या असंख्य सभांमध्ये गांधीजींनी भाषणे केली. त्यांनी युरोपियनांच्या समूहापुढे भाषणे केली, तशीच उघड्या जागेतील, हिंदी लोकांच्या सार्वजनिक सभांतही केली. लढा ऐन निकराला आला असतानाही, गांधीजींनी चळवळीचे परंपरागत मार्गही चालू ठेवले— दक्षिण आफ्रिका व हिंदुस्थान यातील सरकारकडे व सार्वजनिक संस्थांकडे पत्रे पाठविली, तशीच पत्रे दक्षिण आफ्रिका, हिंदुस्थान व इंग्लंड यांतील प्रमुख लोकांकडे पाठविली. लंडनमधील 'दक्षिण आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमिटी'मार्फत त्यांनी आपले मत मांडले आणि तेथील लोकमत तयार केले. गैरसमज दूर करण्यासाठी, विपर्यासाचे खंडन करण्यासाठी, आपल्या कार्याबद्दल सहानुभूती निर्माण करण्यासाठी, त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील वृत्तपत्रांना शांतपणे, चिकाटीने व परिश्रमपूर्वक पत्रे पाठविली, ती या खंडात दिलेली आहेत. वर्षाअखेरीस त्यांना असे लिहिता आले की, गोऱ्यांनी नियंत्रित केलेली वृत्तपत्रेही वाढत्या प्रमाणात सरकारचा धिक्कार करीत आहेत व हिंदी लोकांना यश चिंतीत आहेत. (प्र. ३३५)

या लढ्याचे उपदेश व मार्ग स्थानिक किंवा तात्पुरते महत्त्वाचे नसून सर्व ठिकाणच्या मानवाला उपकारक आहेत, याची त्यांना जाणीव होती. "रक्ताचा एक बिंदुही न सांडता, ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक मानवजातीला थक्क करून सोडतील." (प्र. ८५) ब्रिटिशांच्या मुत्सद्देगिरीची ही खरी कसोटी होती. "बलिष्ठ गोऱ्यांपासून दुबळ्या हिंदी लोकांचा बचाव साम्राज्य सरकार करणार की दुर्बल व अनाथ

लोकांना चिरडण्यासाठी जुलुमी लोकांचे हात बळकट करणार ? " (प्र. ६०) गांधीजींचा ब्रिटिश संस्थांवरील विश्वास अजून ढळला नव्हता. म्हणून त्यांनी लिहिले, "ब्रिटिश साम्राज्याच्या ज्या शोभनीय गोष्टी मला माहीत आहेत, त्यांमुळे मी त्या साम्राज्यावर प्रेम करतो. असे असल्यामुळे, आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकात मला धोक्याची बीजे, बरोबर असो वा चूक असोत, आढळून आल्याबरोबर, मी माझ्या देशबांधवांना सल्ला दिला की, अत्यंत शांततेने आणि (मी म्हणतो) खिश्चन पद्धतीने, सर्वस्व खर्चून तुम्ही या कायद्याला विरोध करा. (प्र. ३०९)"

तथापि या विनंत्यांना ट्रान्सवॉल सरकारने भीक घातली नाही. डिसेंबरमध्ये ज्या दिवशी ट्रान्सवॉलच्या प्रवेश— कायद्याला राजाची मंजुरी मिळाल्याचे गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाले, त्याच दिवशी जनरल स्मट्स यांनी गांधीजीप्रभृती पुढाऱ्यांवर खटले भरण्याचे ठरविले. या धोरणाचे गांधीजींनी स्वागत केले. कारण खरोखर त्यामुळेच "आशियावासियांच्या भावनांचा खरेपणा व सार्वजनिकपणा कसोटीस लागणार होता." (प्र. ३५१) सविनय प्रतिकारकांच्या बचावासाठी गांधीजी कोर्टात उभे राहिले. ते खटले म्हणजे त्यांच्या व्यावसायिक व सार्वजनिक जीवनाचा नवा पैलू होता. त्यांनी आपल्या वकिली चातुर्याने, प्रतिकूल कायद्यांचा उघड धिक्कार केला आणि त्यामुळे लोकमत तयार केले. त्यांनी आपल्या अशीलांना निर्दोषी म्हणून सांगण्याचा सल्ला दिला. त्यामुळे त्यांच्या मनातील विचार त्यांच्याच तोंडून न्यायाधीशांना ऐकावयास मिळाले. (प्र. ३४९) सारे अर्ज व सारी शिष्टमंडळे यांनी दिली नसेल इतकी प्रसिद्धी या खटल्यामुळे त्यांच्या चळवळीला मिळाली. एवढेच नव्हे तर, जगाच्या इतिहासात अत्यंत सुसंस्कृत असल्याचा दावा करणाऱ्या साम्राज्याच्या नागरिकांना काय हाल भोगावे लागत आहेत, याकडे त्या खटल्यांमुळे साम्राज्य सरकारला लक्ष देणे भाग पडले.

वाचकांस सूचना

या खंडात आलेले विविध अधिकाऱ्यांना लिहिलेले अर्ज व निवेदने, वृत्त-पत्राकडे पाठविलेली पत्रे व सभांमध्ये मंजूर झालेले ठराव हे गांधीजींचे मानण्याला आधार प्रथम खंडाच्या प्रस्तावनेत दिलेला आहे. विशिष्ट लेख घेण्यासाठी जी खास कारणे असतील, ती तळटीपांत दिलेली आहेत. 'इंडियन ओपिनियन'मध्ये गांधीजींनी जे लेख बिनसहीने लिहिले, ते त्यांचेच असल्याचे ओळखण्यासाठी, त्यांच्या आत्मचरित्रात्मक लेखांचा, त्यांच्या सहकाऱ्यांच्या, छगनलाल गांधींच्या व एच्. एस्. एल्. पोलक यांच्या मतांचा व अन्य उपलब्ध पुराव्यांचा आधार घेतला आहे.

इंग्रजी लेख घेताना मुळाप्रमाणे तो घेण्यासाठी कसून प्रयत्न करण्यात आला आहे. लेखनातील ज्या चुका उघड होत्या, त्या दुरुस्त करण्यात आल्या आहेत आणि मुळात संक्षेपाने दिलेले शब्द बहुधा सविस्तर दिले आहेत. नावे किंवा शब्द यांचे भिन्न भिन्न लेखन मुळाप्रमाणे ठेवले आहे.

चौकोनी कंसातील मजकूर संपादकांनी दिलेला आहे. इंग्रजीमधून घेतलेले उतारे, अवतरण-चिन्हात स्वतंत्र परिच्छेदात छापले आहेत. भाषणांचे व कोर्टातील कामकाजाचे वृत्तांत आणि गांधीजींच्या तोंडून न निघालेले शब्द—तेही अवतरण-चिन्हात छापले आहेत.

गुजरातीचे भाषांतर देताना, मुळातील मजकूर यथार्थपणे देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे, आणि त्याबरोबरच तो मजकूर वाचनीय व्हावा अशीही काळजी घेतली आहे. गांधीजींनी इंग्रजी लेखांचे जे गुजराती अनुवाद केले, त्यांचे भाषांतर करताना शक्य तेथे मूळ लेख तपासले आहेत.

ज्या घटनेची तारीख मिळू शकली, ती तारीख उजव्या हाताच्या कोपऱ्यात लिहिली आहे. मूळ लेखावर तारीख नसल्यास, तर्काने जी तारीख ठरविली, ती चौकोनी कंसात, जरूर तेथे कारणासह, दिली आहे. लेखाच्या शेवटी दिलेली तारीख व मूळ आधार प्रसिद्धीवेळचा आहे.

तळटीपात या मालेतील प्रथम खंडाचा जो संदर्भ दिला आहे, तो १९५८ च्या ऑगस्टमधील आवृत्तीचा आहे. 'आत्मकथा' किंवा 'माझे सत्याचे प्रयोग' आणि

‘ दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह ’ यांच्या भिन्न भिन्न आवृत्तीमध्ये भिन्न भिन्न पृष्ठसंख्या असल्यामुळे, त्यांतील फक्त भाग व प्रकरण दिले आहे.

साधन–सामग्रीमध्ये, एस्. एन्. या संज्ञेचा अर्थ, अहमदाबाद येथील साबरमती संग्रहालयात उपलब्ध असणारे कागदपत्र, जी. एन्. म्हणजे नवी दिल्ली येथील गांधी स्मारक निधी व संग्रहालय यांमध्ये उपलब्ध असणारे कागदपत्र, सी. डब्ल्यू. म्हणजे, ‘ कलेक्टेड वर्क्स् ऑफ महात्मा गांधी ’ यांनी मिळविलेली व व्यक्तींना पाठविलेली पत्रे. साधनसामग्रीतील संक्षेपामध्ये, सी. ओ. म्हणजे, ‘ वासाहतिक कार्यालय ’, आणि ‘ जे. ॲण्ड्. पी. ’ म्हणजे न्यायालयीन व सार्वजनिक दप्तर.

मूळ मजकुराला अवश्य ती माहिती परिशिष्टात दिलेली आहे. शेवटी, साधन-सामग्रीची सूची आणि या खंडात आलेल्या काळातील घटनांची तारीखवार नोंद दिलेली आहे.

आभार

या खंडाच्या सामग्रीसाठी आम्ही पुढील संस्थांचे ऋणी आहोत— साबरमती आश्रमाचे संरक्षण व स्मारक ट्रस्ट व संग्रहालय, गुजरात विद्यापीठाचे ग्रंथालय, आणि नवजीवन ट्रस्ट, अहमदाबाद, गांधी स्मारक निधी व संग्रहालय, नवी दिल्ली, सर्व्हेंटस् ऑफ इंडिया सोसायटी, पुणे, कलोनियल ऑफिसचे पुस्तकालय व इंडिया ऑफिसचे पुस्तकालय लंडन, फीनिक्स आश्रम दर्बान, प्रिटोरिया पुराणवस्तु संग्रहालय, प्रिटोरिया, श्री. छगनलाल गांधी, अहमदाबाद, श्री. अरुण गांधी मुंबई, आणि 'इंडियन ओपिनियन' 'रँड डेली मेल,' 'स्टार' व 'ट्रान्सवॉल लीडर' ही वृत्तपत्रे.

संशोधन व संदर्भ यांच्या सोयी मिळाल्याबद्दल आम्ही पुढील संस्थांचे आभार मानतो :—

अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे पुस्तकालय, गांधी स्मारक संग्रहालय इंडियन, कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स–पुस्तकालय, व माहिती-नभोवाणी खात्याचा संशोधन व संदर्भ विभाग, नवी दिल्ली, साबरमती संग्रहालय व गुजरात विद्यापीठाचे ग्रंथालय, अहमदाबाद, सार्वजनिक पुस्तकालय, जोहान्सबर्ग व ब्रिटिश म्युझियम पुस्तकालय, लंडन.

मराठी आवृत्तीसंबंधी

महात्मा गांधींच्या समग्र वाङ्मयाचे प्रकाशन इंग्रजी आणि हिंदी या भाषांतून करण्याची योजना भारत सरकारने हाती घेतलेली असून आतापर्यंत १८ खंड प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. महात्मा गांधींची त्यांच्या लिखाणातून दिसून येणारी विचार-प्रणाली आम जनतेच्या समोर यावी या हेतूने, या वाङ्मयाचे भाषांतर प्रादेशिक भाषांमधून व्हावे अशी सूचना भारत सरकारने राज्यसरकाराच्या विचारार्थ पाठविली. ही सूचना तेव्हाच्या मुंबई सरकारला पसंत पडली. यावर मुंबई सरकारने या वाङ्मयाचे मराठी रूपांतर करण्याचे काम अंगावर घेतले आणि १८ एप्रिल १९५९ रोजी या कामासाठी एका समितीची स्थापना केली. हल्ली समितीत खालील सभासद आहेत.

(१) मुख्य मंत्री श्री. **वसंतराव नाईक**, अध्यक्ष
(२) श्री. **शांतिलाल शहा**, उपाध्यक्ष
(३) विधान-परिषद सभापती, श्री. **वि. स. पागे**, सभासद
(४) श्री. **देवकीनंदन नारायण**, जळगांव, सभासद
(५) श्री. **रघुनाथराव धोत्रे**, बजाजवाडी, वर्धा, सभासद
(६) श्री. **सेतुमाधवराव पगडी**, चिटणीस

महाराष्ट्र राज्य सरकारतर्फे महात्मा गांधींच्या समग्र वाङ्मयापैकी प्रकाशित झालेल्या ७ व्या खंडाचा हा अनुवाद प्रसिद्ध करण्यात येत आहे. या खंडाचा अनुवाद श्री. **दा. न. शिखरे** यांनी केला आणि अनुवादाच्या तपासणीचे काम श्री. **द. कृ. गोसावी**, पुणे यांनी केले. पुढील खंडांच्या अनुवादाला सुरुवात झालेली असून ते क्रमशः प्रसिद्ध करण्यात येतील.

मुंबई
चैत्र शु. प्रतिपदा

सेतुमाधवराव पगडी
चिटणीस

अनुक्रमणिका

		पृष्ठ
प्रस्तावना		पाच
वाचकांस सूचना		नऊ
आभार		अकरा
मराठी आवृत्तीसंबंधी		तेरा
१. ज्यूरींची कसोटी	...	१
२. वीरांनी कसे वागावे !	...	३
३. १ पौंडाचे बक्षीस	...	७
४. हिंदुस्थानातील असंतोष	...	८
५. हिंदी संस्थानिक	...	१०
६. जोहान्सबर्गचे बातमीपत्र	...	१२
७. भारत-सेवक	...	१८
८. तैयबला तार	...	१९
९. पंतप्रधानांच्या सचिवांना पत्र	...	१९
१०. प्रामाणिक मत	...	२०
११. केपचा प्रवेश-कायदा	...	२१
१२. आशियावासियांच्या नोंदणीचा कायदा–भयानक विषमता	...	२२
१३. नवा आक्षेपार्ह कायदा	...	२६
१४. समितीची चूक	...	३३
१५. केपटाऊनमधील हिंदी लोक	...	३५
१६. मरहूम मि. कार्ल ब्लाइंड	...	३५
१७. हिंदु विधवा काय करू शकतात !	...	३६
१८. जोहान्सबर्गचे बातमीदार : नवा कायदा	...	३७
१९. अफगाणिस्तानातील मुसलमानांची स्थिती	...	४५
२०. स्टारला पत्र	...	४७
२१. पंतप्रधानांच्या सचिवास पत्र	...	५०
२२. छगनलाल गांधी यांना पत्र	...	५१
२३. बादशहांची मंजुरी	...	५२

२४. कायद्याचा जुलूम ... ५३
२५. ऱ्होडेशिया व ट्रान्सवॉल ... ५४
२६. मुदतबंद हिंदी मजूर ... ५५
२७. पौर्वात्यांचे शहाणपण ... ५६
२८. जोहान्सबर्गचे बातमीदार ... ५८
२९. वासाहतिक सचिवाला पत्र ... ६२
३०. नव्या कायद्यावरील बक्षिसाची कविता ... ६३
३१. नाताळ इंडियन काँग्रेस ... ६५
३२. नाताळमधील तुरुंगाचे नियम ... ६५
३३. हेजाज रेल्वे ... ६६
३४. युसफअली व स्त्री-शिक्षण ... ६७
३५. जोहान्सबर्गचे बातमीदार ... ६७
३६. महंमद पैगंबर आणि त्यांचे खलिफा ... ७१
३७. जोहान्सबर्गचे बातमीदार ... ७३
३८. "रँड डेली मेल"ला मुलाखत ... ७९
३९. लार्ड ॲम्प्थिल ... ८१
४०. अंगद–शिष्टाई ... ८३
४१. दक्षिण आफ्रिकेतील दुष्काळ ... ८४
४२. लॉर्ड ॲम्प्थिल ... ८५
४३. इंग्लंडमधील वीरांगना ... ८५
४४. हिंदुस्थान व ट्रान्सवॉल ... ८६
४५. मुलींचे शिक्षण ... ८७
४६. प्रिटोरियाच्या सभेतील भाषण ... ८७
४७. "रँड डेली मेल"ला पत्र ... ८८
४८. जोहान्सबर्गची ताजी बातमी ... ९०
४९. "स्टार"ला पत्र ... ९१
५०. आगीत तेल ओतले ... ९३
५१. मान-बिंदु ... ९४
५२. दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीचा सल्ला ... ९६
५३. कोण ही दुर्दशा ! ... ९७
५४. नाताळ, तू जागा आहेस की निद्रिस्त आहेस ? ... ९८
५५. आक्षेपार्ह कायदा ... ९९
५६. प्रिटोरिया येथील प्रचंड सभा ... १०५
५७. "रँड डेली मेल"ला मुलाखत ... १०८

५८. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... १०९
५९. "रँड डेली मेल"ला पत्र ... ११३
६०. "स्टार"ला पत्र ... ११५
६१. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ११७
६२. ट्रान्सवॉलच्या विधिमंडळाचा अर्ज ... १२१
६३. ट्रान्सवॉल प्रवेशाचे नवे बिल ... १२२
६४. छगनलाल गांधी यांना पत्र ... १२५
६५. छगनलाल गांधी यांना पत्र ... १२६
६६. हिंदी लोकांच्या सामर्थ्याचे मापन ... १२७
६७. दर्बानची कसोटी ... १२८
६८. पौर्वात्यांचे शहाणपण–ग्रंथमाला ... १२९
६९. हमीदिया इस्लामिया अंजुमनमध्ये भाषण ... १३०
७०. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... १३१
७१. वासाहतिक सचिवाला पत्र ... १३८
७२. मोठी बदनामी ... १३९
७३. ट्रान्सवॉल प्रवेश बिलावरील वादविवाद ... १४१
७४. मुदतबंद मजूर ... १४३
७५. जनरल स्मट्स यांचा हट्ट ... १४४
७६. दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीचे कार्य ... १४४
७७. लोबिटो-वे ... १४६
७८. परवाने व तिकीटे यासंबंधीचे नाताळमधील बिल ... १४७
७९. मुदतबंद हिंदी मजूर ... १४८
८०. नाताळ इंडियन काँग्रेसमधील भाषण ... १४९
८१ ट्रान्सवॉल विधान परिषदेला अर्ज ... १५२
८२. नाताळ विधानसभेस अर्ज ... १५३
८३. परवाना-कचेरीवरील बहिष्काराबाबत भित्तिपत्र ... १५४
८४. प्रिटोरियातील लढा ... १५५
८५. "मानवजातीला धक्का" ... १५६
८६. श्री. पारसी रुस्तुमजींचे औदार्य ... १५७
८७. मि. आदमजी मियाँखाँ यांचा मृत्यु ... १५८
८८. आदमजी मियाँखाँ यांचा शोचनीय मृत्यु ... १५९
८९. दैवी कायदा ... १६०
९०. अलि यांची चूक ... १६१
९१. केपमधील हिंदी लोक ... १६४

९२. धर्मावर आघात ... १६६
९३. ईस्ट लंडनला इशारा ... १६७
९४. रशियाचे उदाहरण ... १६८
९५. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... १६९
९६. वासाहतिक सचिवाला पत्र ... १७५
९७. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... १७६
९८. प्रिटोरियातील भाषण ... १८२
९९. प्रिटोरियाच्या सार्वजनिक सभेतील ठराव ... १८५
१००. "रँड डेली मेल"ला मुलाखत ... १८६
१०१. ट्रान्सवॉलमधील लढा ... १८७
१०२. नाताळच्या हिंदी लोकांतील जागृती ... १८८
१०३. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... १८९
१०४. सी. बर्ड यांना तार ... १९३
१०५. जनरल स्मट्सच्या खासगी चिटणिसास पत्र ... १९३
१०६. प्रिटोरियाच्या समितीला तार .. १९७
१०७. श्री. हॉस्केन यांचा "अटळपणा" ... १९७
१०८. श्री. अली यांचा विरोध ... १९९
१०९. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक ... २००
११०. पुढे काय ? ... २००
१११. समितीचा लढा ... २०१
११२. जनरल स्मट्स यांचे उत्तर ... २०२
११३. अलींचे पत्र ... २०२
११४. आमचे कर्तव्य ... २०३
११५. केपमधील हिंदी लोक ... २०४
११६. एस्टकोर्टाचे अपील ... २०५
११७. रॉस यांचे पत्र ... २०६
११८. दर्बानच्या कृषि-समितीचा क्षुद्रपणा ... २०७
११९. उमर हाजी आमद झवेरी ... २०७
१२०. एका पारशी स्त्रीचे धैर्य ... २०८
१२१. हमीदिया इस्लामिक सोसायटीमधील भाषण ... २०९
१२२. पीटर्सबर्गमधील हिंदी लोकांना तार ... २१०
१२३. पॉचेफस्ट्रूममधील हिंदी लोकांना तार ... २११
१२४. "रँड डेली मेल" ला पत्र ... २११
१२५. जनरल स्मट्स यांच्या खासगी चिटणिसाला पत्र ... २१३

१२६. हिंदी लोकांच्या ठरावाचा भावार्थ ... २१५
१२७. पीटर्सबर्गला धन्यवाद ... २१६
१२८. मारुतीचे शेपूट ... २१७
१२९. नाताळच्या व्यापाऱ्यांना इशारा ... २१८
१३०. विश्वासघात ! ... २१९
१३१. मोरोक्कोमधील अग्निप्रलय ... २२०
१३२. हॅगरचे नवे कृत्य ... २२०
१३३. तरुणांच्या धूम्रपानास बंदी करणारा कायदा ... २२१
१३४. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... २२२
१३५. "इंडियन ओपिनियन"ला पत्र ... २२९
१३६. "स्टार"ला पत्र ... २३०
१३७. हिंदी मुसलमानांना विनंती ... २३२
१३८. "स्टार"ला पत्र ... २३३
१३९. रँड डेली मेल ... २३४
१४०. वसाहतमंत्र्याला अर्ज ... २३५
१४१. दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीला तार ... २४२
१४२. सुचविलेली तडजोड ... २४२
१४३. मनमोकळी सहानुभूती ... २४३
१४४. वाचकांना सूचना ... २४४
१४५. दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समिती ... २४५
१४६. श्री. गांधींची सूचना ... २४५
१४७. प्रिव्ही कौन्सिलकडे आपण दाद मागू शकतो काय ? ... २४७
१४८. नाताळमध्ये दुष्ट कायदा जारी करता येईल काय ? ... २४७
१४९. खरा मित्र ... २४८
१५०. हमीदिया इस्लामिया अंजुमनचे पत्र ... २४९
१५१. एस्टकोर्टचे अपील ... २४९
१५२. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... २५०
१५३. जोहान्सबर्गचे नगरपालिकेला पत्र ... २५५
१५४. प्रवेशासंबंधी अर्ज ... २५६
१५५. केपमधील हिंदी लोक ... २५८
१५६. लेडीस्मिथमधील व्यापारी ... २५८
१५७. दादाभाईंचा वाढदिवस ... २५९
१५८. अधिक सावधगिरीची आवश्यकता ... २६०
१५९. लेडीस्मिथमधील परवाने ... २६२

१६०. हजरत महंमद पैगंबरचा जीवन-वृत्तांत बंद का झाला ?" ... २६३
१६१. केपटाऊनमधील हिंदी लोक ... २६४
१६२. शौर्य कशास म्हणावे ! ... २६५
१६३. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... २६६
१६४. जोहान्सबर्ग नगरपालिकेला पत्र ... २६८
१६५. दादाभाई नौरोजी यांना तार ... २६९
१६६. दर्बान येथील भाषण ... २७०
१६७. कॉंग्रेसच्या सभेतील भाषण ... २७०
१६८. वासाहतिक सचिवाला पत्र ... २७४
१६९. सविनय प्रतिकाराच्या कर्तव्याविषयी ... २७५
१७०. "इंडियन ओपिनियनची" पुरवणी ... २७७
१७१. सुस्वागतम् ... २७७
१७२. सविनय प्रतिकाराचे कायदे ... २७८
१७३. प्रधानमंत्र्याचे विचार ... २८०
१७४. नाताळ नगरपालिकेचा मताधिकाराचा कायदा ... २८१
१७५. डॉ. नंदी यांची पुस्तिका ... २८२
१७६. कायदेभंगाचे कर्तव्य [१] ... २८३
१७७. दर्बानमध्ये बोटांच्या ठशांचे संकट ... २८५
१७८. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... २८६
१७९. आशियावासीयांच्या नोंदणी–अधिकाऱ्याला पत्र ... २९१
१८०. 'गडसास्वडयोः' ... २९२
१८१. किती दारुण क्लेश ! ... २९३
१८२. कायद्याच्या हातातील मेणाची बाहुली ... २९४
१८३. रिच् यांचे श्रम ... २९६
१८४. हिंदी लोकांचा छळ ... २९६
१८५. कायदेभंगाचे कर्तव्य [२] ... २९७
१८६. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ३०१
१८७. डब्ल्यू. व्हा. हल्स्टेन यांना पत्र ... ३०४
१८८. ना. गो. कृ. गोखले यांना तार ... ३०५
१८९. विराट निवेदन (अर्ज) ... ३०६
१९०. विराट निवेदन (अर्ज) ... ३०८
१९१. वीनेन परवान्याचे अपील ... ३०९
१९२. ट्रान्सवॉलचा लढा ... ३१०
१९३. नाताळमधील परवान्याचा कायदा ... ३११

१९४. भारतीय सार्वजनिक पुस्तकालय ... ३१२
१९५. हिंदुस्थानचे साहाय्य ... ३१३
१९६. अंगठ्याच्या ठशाचा कायदा ... ३१४
१९७. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ३१५
१९८. पंतप्रधानांच्या सचिवास पत्र ... ३२२
१९९. जे. ए. नेसर यांना पत्र ... ३२४
२००. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ३२५
२०१. सुरेंद्रनाथ बानर्जी यांना तार ... ३३०
२०२. हिंदुस्थानचे साहाय्य ... ३३०
२०३. स्वयंसेवकांचे कर्तव्य ... ३३१
२०४. जनरल बोथा व आशियायी कायदा ... ३३२
२०५. हिंदी फेरीवाल्यांविरुद्ध मोहीम ... ३३३
२०६. आमची पुरवणी ... ३३४
२०७. स्वयंसेवकांची कर्तव्ये ... ३३५
२०८. हिंदुस्थान जागा झाला काय ? ... ३३६
२०९. " अजापुत्रम् बलिम् दद्यात् । " ... ३३६
२१०. इजिप्तमध्ये स्वराज्याची चळवळ ... ३३७
२११. जे. ए. नेसर यांना पत्र ... ३३८
२१२. " रँड डेली मेल "ला पत्र ... ३३९
२१३. हमीदिया इस्लामिया अंजुमनमध्ये भाषण ... ३४२
२१४. तुर्कस्तानच्या व्यापारी वकिलाला विनंती ... ३४३
२१५. श्री. जॉर्ज गॉडफ्रे ... ३४३
२१६. गरीब पण शूर हिंदी लोक ... ३४४
२१७. हिंदी मतदार ... ३४५
२१८. केपमधील असोसिएशन ... ३४६
२१९. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ३४७
२२०. मगनलाल गांधी यांना पत्र ... ३५२
२२१. वासाहतिक सचिवाला पत्र ... ३५३
२२२. " रँड डेली मेल " ला पत्र ... ३५५
२२३. केपमधील हिंदी लोक ... ३५७
२२४. " इंडियन ओपिनियन " विषयी ... ३५८
२२५. दक्षिण आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमिटी ... ३५९
२२६. स्मट्स यांचे भाषण ... ३६१
२२७. वायबर्ग यांचे भाषण ... ३६३

२२८. केपमधील हिंदी लोक ... ३६४
२२९. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ३६६
२३०. दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीला पत्र ... ३७३
२३१. मगनलाल गांधी यांना पत्र ... ३७४
२३२. पोलीस कमिशनरला पत्र ... ३७५
२३३. " स्टार " ला पत्र ... ३७७
२३४. श्री. रिच् यांची सेवा ... ३७९
२३५. जनरल बोथा यांचे उदाहरण ... ३७९
२३६. पीटर्सच्या खटल्याचा शोध ... ३८०
२३७. रिच् यांची सेवा ... ३८१
२३८. ट्रान्सवॉलमधील दुकाने बंद करण्याच्या वेळेविषयी निर्बंध ... ३८२
२३९. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ३८२
२४०. " स्टार " ला पत्र ... ३८९
२४१. " ट्रान्सवॉल लीडर " ला पत्र ... ३९१
२४२. मरहूम श्री. अलेक्झांडर ... ३९३
२४३. सविनय प्रतिकार करणाऱ्यांसाठी ... ३९४
२४४. राष्ट्र–पितामह ... ३९५
२४५. मेनन लोकांची विपरीत बुद्धी ... ३९६
२४६. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांचे कर्तव्य ... ३९७
२४७. " लेडीस्मिथ् " मधील हिंदी व्यापारी ... ३९८
२४८. " भारताचे पितामह " ... ३९९
२४९. मरहूम सुपरिंटेंडेंट अलेक्झांडर ... ३९९
२५०. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ४००
२५१. सर विल्यम वेडर्बर्न यांना पत्र ... ४०९
२५२. वासाहतिक सचिवास पत्र ... ४१०
२५३. " ट्रान्सवॉल लीडर " ला पत्र ... ४१२
२५४. सर विल्यम वेडर्बर्न यांना पत्र ... ४१४
२५५. स्मट्स यांची बहाद्दुरी ... ४१५
२५६. खरी मैत्री ... ४१६
२५७. ब्लूमफाँटीन येथील " फ्रेंड "
ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या सहाय्यास पुनः धावून आला ! ... ४१७
२५८. लंडनमधील मुसल्मानांची सभा ... ४२०
२५९. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ४२०
२६०. हिंदी राष्ट्रीय सभेला पत्र ... ४२६

२६१. वृत्तपत्रांना पत्र ... ४२८
२६२. श्री. लॅबिस्टर ... ४३२
२६३. ईद मुबारक ... ४३२
२६४. नवे वर्ष सुखाचे जावो ... ४३३
२६५. शहाण्याला शब्दाचा मार ... ४३४
२६६. मुदत–वाढ ... ४३५
२६७. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ४३६
२६८. "ट्रान्सवॉल लीडर" ला पत्र ... ४४६
२६९. जनरल स्मट्स यांना पत्र ... ४४६
२७०. रामसुंदर पंडित यांचा खटला ... ४४७
२७१. "ट्रान्सवॉल लीडर" ला मुलाखत ... ४४८
२७२. रामसुंदर पंडित यांचा खटला ... ४४९
२७३. सार्वजनिक सभेतील ठराव ... ४५३
२७४. ना. गो. कृ. गोखले यांना पत्र ... ४५४
२७५. निरोधकांवरील खटला ... ४५४
२७६. इंडियन ओपिनियनला पत्र ... ४५७
२७७. कॅक्स्टन् हॉलमधील सभा ... ४५८
२७८. लजपतरायांची मुक्तता, ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना धडा ... ४५९
२७९. बादशहांचा वाढदिवस ... ४६०
२८०. लंडनमधील मुसलमानांची सभा ... ४६१
२८१. हिंदी राष्ट्रीय काँग्रेसला देणग्या ... ४६२
२८२. बचावलेले मेमन ... ४६२
२८३. रामसुंदर पंडित यांचे जीवन चित्र ... ४६२
२८४. भारताच्या लालाजींनी काय केले ! ... ४६३
२८५. रामसुंदर पंडित यांचा कोर्टात चाललेला खटला ... ४६५
२८६. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ४६९
२८७. दर्बान येथील दिवाळी उत्सव ... ४७४
२८८. हमीदिया इस्लामिया अंजुमनमध्ये भाषण ... ४७५
२८९. भारताच्या व्हाईसरॉयांना पत्र ... ४७५
२९०. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना सूचना ... ४७७
२९१. मणिलाल गांधी यांना पत्र ... ४७८
२९२. ना. गो. कृ. गोखले यांना पत्र ... ४७९
२९३. 'ट्रान्सवॉल लीडर' ला पत्र ... ४८०
२९४. पंडितजींची देशसेवा ... ४८१

२९५. निरोधकांवरील खटले ... ४८२
२९६. काँग्रेसचे प्रतिनिधी ... ४८२
२९७. केपमधील हिंदी लोक जागे केव्हा होणार ? ... ४८३
२९८. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ४८४
२९९. हमीदिया अंजुमनच्या सभेतील भाषण ... ४८८
३००. गायकवाडांना अर्ज ... ४८९
३०१. हाय कमिशनरला अर्ज ... ४९०
३०२. अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या अध्यक्षास पत्र ... ४९२
३०३. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ४९३
३०४. चिनी असोसिएशनमधील भाषण ... ५०३
३०५. आम्ही प्रतिकार का करतो ? ... ५०५
३०६. कायद्याला आम्ही प्रतिकार का करतो ? ... ५०६
३०७. आमची पुरवणी ... ५१०
३०८. तिरस्कृत कायदा आणि तदनुसार केलेले निर्बंध ... ५१०
३०९. हायकमिशनरच्या खाजगी चिटणिसास पत्र ... ५१८
३१०. महम्मद इशाकचा खटला ... ५२१
३११. वासाहतिक सचिवारला पत्र ... ५२२
३१२. हाय कमिशनरला पत्र ... ५२३
३१३. रिच् यांची सेवा ... ५२४
३१४. कायद्याला मान्यता देणाऱ्यांचे काय होणार ? ... ५२५
३१५. रामसुंदर पंडित ... ५२६
३१६. नाताळसाठी स्वयंसेवक ... ५२७
३१७. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ५२८
३१८. हिंदी लोकांचा खटला ... ५३६
३१९. इंडियन ओपिनियनला पत्र ... ५३८
३२०. दिवंगत श्री. आराथून ... ५४०
३२१. फोक्सरस्टचे खटले ... ५४१
३२२. नाताळचा परवाना कायदा ... ५४२
३२३. मरहूम नवाब मोहसीन-उल-मुल्क ... ५४२
३२४. जर्मन-पूर्व आफ्रिका लाईन ... ५४३
३२५. हिंदी लोकांवर हल्ला ... ५४४
३२६. नाताळमधील परवान्यासाठी करावयाच्या अर्जाचे निर्बंध ... ५४७
३२७. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ५४८
३२८. वासाहतिक सचिवाला पत्र ... ५५६

३२९. साप्ताहिक सचिवाला पत्र ... ५५७
३३०. मध्य दक्षिण आफ्रिका रेल्वेच्या जनरल मॅनेजरला पत्र ... ५५८
३३१. अधीरता ... ५५९
३३२. रामसुंदर पंडित ... ५६०
३३३. हाजी हबीब ... ५६१
३३४. रामसुंदर पंडित ... ५६१
३३५. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ५६२
३३६. मध्य दक्षिण आफ्रिका रेल्वेच्या जनरल मॅनेजरला पत्र ... ५६७
३३७. हमीदिया इस्लामिया अंजुमनमधील भाषण ... ५६८
३३८. हमीदिया इस्लामिया अंजुमनमधील भाषण ... ५६८
३३९. डेलागोवा बेमधील हिंदी लोक ... ५७१
३४०. बेकारांसाठी काय करावे ! ... ५७२
३४१. शूर स्त्रिया ... ५७३
३४२. डेलागोवा बेमधील हिंदी लोक ... ५७४
३४३. दाऊद महम्मद यांचे अभिनंदन ... ५७५
३४४. काही इंग्रजी शब्द ... ५७६
३४५. हिंदुस्थानची अवस्था ... ५७७
३४६. अरबांचे ज्ञान ... ५७९
३४७. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ५८१
३४८. जोहान्सबर्ग येथील खटला ... ५८६
३४९. पी. के. नायडू प्रभृतींचा खटला ... ५८९
३५०. सरकारी चौकातील भाषण ... ५९४
३५१. "स्टार" ला पत्र ... ५९५
३५२. चिनी संघातील भाषण ... ५९८
३५३. रूटरला मुलाखत ... ५९९
३५४. जोहान्सबर्गचे बातमीपत्र ... ६०१
३५५. आशियावासीयांच्या रजिस्ट्रारला पत्र ... ६०८

१. ज्यूरींची कसोटी

आमचे हे वृत्तपत्र जन्माला आल्यापासून, त्याने आखले कार्यक्षेत्र, दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या प्रश्नापुरतेच, विचारपूर्वक मर्यादित ठेवले आहे. वृत्तपत्रीय दृष्टीने इतर प्रश्न कितीही इष्ट असले तरी आम्ही आमच्या मर्यादा ओळखाव्यात आणि वरिष्ठ धोरणाच्या प्रश्नांमध्ये, किंवा या देशातील हिंदी लोकांशी ज्यांचा साक्षात संबंध येत नाही, अशा प्रश्नांमध्ये आम्ही भाग घेऊ नये, असे आम्हांस वाटते.

पण प्रत्येक नियमाला अपवाद हे असतातच. सध्या चोहोकडे गाजत असलेल्या एमटोंगा[1] खटल्याकडे लोकांचे लक्ष खूपच लागलेले आहे. त्या खटल्याचा परामर्श आम्ही घेतला नाही तर आम्ही आमच्या व्यवसायाशी प्रतारणा केली असे होईल असे आम्हांस वाटते. हा खटला एतद्देशीयांसंबंधीच्या धोरणापासून मानवतेच्या पातळीपर्यंत जाऊन पोचलेला आहे, आणि त्याच्या बुडाशी जे तत्त्व आहे, ते काही प्रमाणात हिंदी लोकांनाही लागू होण्यासारखे आहे. म्हणून "नाताळ मर्क्युरी" या पत्राच्या अग्रलेखातील एक उतारा आमच्या पत्रात उद्धृत करण्यासाठी आम्ही आनंदाने जागा देतो. मर्क्युरीचा अग्रलेख अत्यंत सयुक्तिक आणि जिव्हाळ्याचा आहे. त्यात ज्यूरी पद्धतीवर–विशेषतः काळ्या-गोऱ्यांच्या एकमेकांविरुद्धच्या खटल्यातील ज्यूरी पद्धतीवर–आक्षेप घेतला आहे. नाताळच्या काही भागात एतद्देशीयांना जादा वाईट रीतीने वागविले जाते, या आरोपाचे खंडन आमच्या व्यवसायबंधूने केले आहे, आणि त्या बाबतीत आम्ही त्यांच्याशी सहमत आहोत. एमटोंगा खटल्यात न्यायाचा अपलाप झाला म्हणून हा आरोप जोराने करण्यात येत आहे. पण आमचे मत असे आहे की, नाताळमध्ये जे घडले ते, तशाच परिस्थितीमध्ये दक्षिण आफ्रिकेतील कोणत्याही प्रदेशात, किंवा दक्षिण आफ्रिकेसारखी परिस्थिती असलेल्या कोणत्याही देशात, घडणे शक्य आहे. ज्यूरीतील माणसे रागद्वेषाने व पूर्वग्रहाने पछाडलेली असण्याचा मक्ता, दुसऱ्या कोणत्याही देशापेक्षा, नाताळनेच जास्त घेतला आहे असे नाही. पण एमटोंगा खटल्यासारखी प्रकरणे दक्षिण आफ्रिकेत घडतात, या घटनेने लोकांची विवेकबुद्धी जागी झाली पाहिजे. दक्षिण आफ्रिकेच्या लौकिकाविषयी जे कोणी जागरूक

१. एमटोंगा—एक आफ्रिकन माणूस. त्याने काही गुन्हा केला असावा, या संशयाने काही लोकांनी त्याच्यावर हल्ला केला. पुढे खटल्यात ज्यूरींने त्याला दोषी ठरविले. पण त्याच्या निर्दोषीपणाची खात्री पटल्याने गव्हर्नराने त्याला तात्पुरती माफी दिली.

असतील, त्यांनी ज्यूरी पद्धतीविषयीच्या आपल्या कल्पना सुधारून घेण्याची वेळ आता आली आहे की नाही, याचा गंभीरपणे विचार करावयास हवा. दक्षिण आफ्रिकेत सुखवस्तु वर्ग असा नाही. आणि येथे सर्व राष्ट्रांचे लोक सम्मीलित झाले आहेत. अशा राष्ट्रात न्यायदानाच्या क्षेत्रात ज्यूरी पद्धती ही सर्वात हानिकारक आहे. ज्यूरी पद्धतीच्या यशाची प्राणभूत अट अशी आहे की, आरोपीची चौकशी त्याच्या बरोबरीच्या लोकांनी करावी. दक्षिण आफ्रिकेत जेव्हा काळ्या-गोऱ्यांचा प्रश्न येतो, तेव्हां अशा तऱ्हेची काही चौकशी होते असे म्हणणे म्हणजे मानवाच्या बुद्धीचा उपमर्द करणे होय.

आपल्यापुढे आलेल्या घटनांचा विचार समतोल मनाने करण्याची सवय ज्यांना नाही, अशा लोकांची मने भावनांनी क्षुब्ध झालेली असतील, तर त्यांना न्याय्य निर्णय देणे जवळ जवळ अशक्य असते. लिव्हरपूलसारख्या जुन्या व सुस्थित शहरात, एकजिनसी समाज असताना व त्याची विशिष्ट परंपराही असताना, मिसेस् हेब्रिक यांच्या खटल्याचा योग्य निकाल करण्यासाठी ख्रिस्तवासी न्यायमूर्ती स्टीफन यांच्या तोलाचा न्यायाधीश असावा लागला. दक्षिण आफ्रिकेत तर काय ? नाना राष्ट्रांचे लोक अजून एकमेकात मिसळलेले नाहीत आणि दक्षिण आफ्रिकेचे स्वतंत्र राष्ट्र उदयास येण्याचा भविष्यकाळ दूर व अंधुक आहे. अशा देशात ज्यूरीकडून काही संतोष मिळणे कसे शक्य आहे ? समता-देवीचे आम्ही अंध भक्त नाही. समतेला काही समान अधिष्ठान हवे. काळ्या-गोऱ्यांतील ज्यूरी–पद्धत नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू केला की, समतेच्या खोट्या नावाने ओरड होणे शक्य आहे. समतेची अशी भूमिका जो कोणी एतद्देशीय किंवा वर्णीय माणूस घेईल, त्याला खरी समता कळलेलीच नाही. त्यांनी किंवा त्यांच्यासाठी दुसऱ्या कोणी, कायद्याच्या दृष्टीने समानता असावी, अशी मागणी केली, तर तीच काय ती सध्या सयुक्तिक ठरेल. यूरोपच्या निरनिराळ्या भागांतून गोरे लोक दक्षिण आफ्रिकेत येतात. त्यांच्या चित्तांत साम्राज्यवादाची कल्पना जर नसेल, तर साम्राज्यशाहीच्या कर्तव्याचीही कल्पना त्यांना असणार नाही. त्याचप्रमाणे ते ज्यांना कमी दर्जाचे मानतात, अशा लोकांना न्यायाने वागविण्याची किंवा समान हक्क देण्याची कल्पनाही त्यांच्या मनास शिवत नाही. त्यांच्यामध्ये जी काही मानवता असेल, तिच्या आदेशानुसार ते वागत असतात.

युरोपियन व वर्णीय लोक यांचा संबंध असलेल्या खटल्यात ज्यूरीने चौकशी करण्याची पद्धत रद्द व्हावी म्हणून, नाताळमधील वृत्तपत्रांनी केवळ निःस्वार्थ बुद्धीने व न्याय्य हेतूने, जी मोहीम सुरू केली आहे, तिला विरोध करण्याचा विचार, कोणाही वर्णीय वा आशियावासी माणसाने, करू नये, असे आमचे मत आहे. कारण आमचा वरील युक्तिवाद वर्णीय लोकांप्रमाणे आशियावासी लोकांनाही तितकाच लागू आहे. खरोखर ज्यूरी पद्धती पूर्णपणे नष्ट करण्यात आली, तर ती फार चांगली गोष्ट होईल.

पण तिच्या चांगुलपणाविषयीचा भ्रम दीर्घकाळ चालत आलेला आहे. त्यामुळे तिचा सर्वथैव अव्हेर करण्यास लोकमत तयार होईल, अशी अपेक्षा धरता येत नाही. तसेच, केवळ गोऱ्या लोकांना ती लागू करण्याच्या बाबतीत तिच्याविरुद्ध फारसे बोलणे शक्य नाही.

वृत्तपत्रांनी हा विचार जेथे सोडला, तेथेच जर तो समाप्त झाला, तर पुढे काही निष्पन्न होणार नाही, असे आम्हांस वाटते. दक्षिण आफ्रिकेतील एतद्देशीयांच्या हितसंबंधाचे (हक्काचे, असे आम्ही म्हणत नाही) रखवालदार दक्षिण आफ्रिकेतील चर्चे आहेत असे मानले जाते—आणि ते बरोबरही आहे. सध्याचा प्रश्न नाताळमध्ये उद्भवला असला तरी दक्षिण आफ्रिकेतील सर्व सरकारांना, काळ्या गोऱ्यांच्या खटल्यातील ज्यूरी पद्धत रद्द करण्याविषयी, चर्चनी अर्ज करण्याची व एकाच वेळी त्यासाठी चळवळ करण्याची जरूरी आहे, असे आम्हांस वाटते. आणि चर्चच्या अशा चळवळींना, दक्षिण आफ्रिकेतील एतद्देशीयांनी व वर्णीय जमातींनी, फार मोठ्या प्रमाणावर पाठिंबा द्यावा, असे आमचे मत आहे.

इंडियन ओपिनियन, १–६–१९०७

२. वीरांनी कसे वागावे ?

पगला भरवा मांडो रे ! हवे नव बार लगाडो रे ! *
आज ऊठशुं काल उठशुं, लम्बावो नहि दहाड़ा;
विचार करतां विधनो मोटां, वचमां आवे आड़ा;
कुटुंब माया क्यम छोड़ाये; कुटुंबनुं क्यम थाशे;
एम फस्यो ते जनानी पेरे, रणमां शुं पछी जाशे ?
विचार करतां झालो पड़तां, शतरू छापो मारे;
बचाव करवो गभरातां ते, पछी पड़े थई भारे;
आग लागते कुवो खोदवो, पच्छम बुद्धिया थावुं;
पाणी आवे पाल बाँधवी, तेमां ते शुं फाव्युं ?
सजी कर्मने सहु जण साथे, रणमां लड़वा चालो;
शतरुनी सामे रही ऊभा धुरकावीने भालो ।

ट्रान्सवालचा नवा कायदा अद्याप गाजत-वाजत आहे. "गर्जेल ते पडेल काय", अशी एक म्हण आहे. तसेच "भुंकणारी कुत्री क्वचितच चावतात", अशी दुसरी एक म्हण आहे. पण हा नवा कायदा जितक्या जोराने गर्जत आहे, तितक्याच जोराने तो वर्षावही करील.

जनरल बोथा[1] इंग्लंडहून परत येताच हा नवा कायदा गॅझेटमध्ये जाहीर होईल. त्याला आपण तुरुंगाच्या ठरावाने[2] आव्हान दिले आहे. त्या आव्हानाचा आता आपण अधिक विचार केला पाहिजे.

या लेखाच्या शिरोभागी जे काव्य दिले आहे, त्याचा आशय आपल्याला असा आढळून येईल की, कोणतेही साहस करण्यास आपण प्रवृत्त झालो म्हणजे त्याच्या परिणामांचा विचार करण्यात काही अर्थ नाही. रणांगणावर जे कूच करतात, ते आपल्या

---

* [ऊठ ऊठ सैनिका विलंब तू करू नको
उचल पाय तू अता आजचे उद्या नको ॥

कुटुंब–प्रेम–पाश हा भग्न मी कसा करू ?।
आप्त-इष्ट त्यांजला मी कधी न विस्मरू ॥ "

विचार हा मनी उठे विघ्न-राशि कोसळे।
रणी न धाव घे कधी बद्ध जो अशामुळे ॥

विचार हा, विलंब हा करीत जीव राहिला।
घाव घालि त्यावरी शत्रु पूर्ण मातला ॥

भीति ज्यास ग्रासते रक्षणा उणाच तो।
कंप गात्रि गात्रि ज्या दीनहीन भासतो ॥

आग लागल्यावरी विहीर तेथ खोदतो।
पूर संपल्यावरी बांध घालु पाहतो ॥

अशा नरा न लाभते सिद्धि ती कधी जगी ॥
साहसीच श्री वसे वीर कीर्ति मेळवी ॥

करी धरुनि शस्त्र जो अरीपुढे उभा सदा।
करी तयासि आरती ऋद्धि–सिद्धि–संपदा ॥

१. ट्रान्सवालचे पंतप्रधान, १९०७-१९१०; दक्षिण आफ्रिकेच्या संघराज्याचे पंतप्रधान १९१०-१९१९

२. सप्टेंबर १९०६ चा सुप्रसिद्ध "चौथा ठराव," खंड-५ पाहा.

कुटुंबाचे किंवा उद्योगधंद्याचे काय होईल, याचा विचार करीत नाहीत. हिंदी लोकांनी आपला विश्वास नेहमीच फक्त परमेश्वरावर ठेवलेला आहे. त्या परमेश्वराला साक्षी ठेवून आपण शपथ घेतली, आणि नवीन कायद्याला शरण न जाण्याचा निर्धार केला. विचार करण्याची योग्य वेळ म्हणजे, तो ठराव मंजूर होण्यापूर्वीची. आणि खरे पाहता, आपण तेव्हा विचार केला होताच, पण आता विचार करण्याची वेळ निघून गेली आहे. आता आली आहे वेळ, आपल्या निर्धाराशी दृढ राहण्याची. शेख सादीने[1] गुलीस्तानमध्ये असे म्हटले आहे की, माणूस जर आपल्या भाकरीइतकाच ती भाकरी देणाऱ्या ईश्वराचा विचार करील तर त्याचे स्थान स्वर्गात देव-दूतापेक्षाही उच्च असेल, यात शंका नाही. याच मार्गाने विचार करून आपण आपल्या हाती घेतलेले काम पूर्ण केले पाहिजे. आपला चरितार्थ, आपला संसार आणि आपला धंदा यांचा विचार न करता, सर्वांचा त्राता आणि सन्मार्गदाता अशा ईश्वराचा विचार केला पाहिजे. सर्वांनी जरी आपला त्याग केला, तरी जोपर्यंत आपण आपले कर्तव्य करीत आहो, आणि सर्व भूतांच्या हृद्देशामध्ये वास्तव्य करणाऱ्या प्रभूवर श्रद्धा ठेवीत आहो, (ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति । गीता १८, ६१) तोवर तो आपला त्याग कधीही करणार नाही.

आपण आपल्या राज्यकर्त्यांचेच उदाहरण घेऊ या. जेव्हा बोअर लोकांनी बलाढ्य ब्रिटिशांशी दोन हात केले, तेव्हा मि. क्रूगर[2] यांनी आपल्या कुटुंबाचा किंवा दौलतीचा विचार केला नाही. जनरल स्मट्स्[3] हेही बेहोशपणे लढले. डॉ. क्रॉऊजनी[4] दोन वर्षे तुरुंगवास भोगला आणि जोहान्सबर्ग येथील त्यांची सारी मालमत्ता धुळीस मिळाली. मि. डी व्हिलियर्स, हे आता न्यायखात्याचे प्रमुख आहेत, पण त्यांना त्यावेळी तुरुंगात डांबलेले होते. त्यांच्या पायांत बंदुकीच्या गोळ्या घुसलेल्या होत्या. जनरल बोथा अखेरपर्यंत झुंजत राहिले. बोअर स्त्रियांनीही खूप हालअपेष्टा शांतीने व धैर्याने सोसल्या व त्यांनी आपल्या पुत्रांना व पतींना धीर दिला. याचे फल म्हणजे आता बोअर लोकांना आपल्या मालकीचे सर्वस्व मिळालेले आहे.

१. एक इराणी कवी (अंदाजे ११८४—१२९२)

२. (१८२५–१९०४), ट्रान्सवालाचे अध्यक्ष, (१८८३–१९००). खंड ४,

३. (१८७०–१९५०), वसाहत-सचीव (१९०७–१९१०); दक्षिण आफ्रिका संघराज्याचे पंतप्रधान (१९१९– १९२४)

४. जोहान्सबर्गचे सरकारी वकील; आत्मकथेत (भाग २, प्रकरण १३) गांधीजींनी त्यांचा व त्यांच्या बंधूंचा उल्लेख केला आहे.

इंग्रज लोक नेहमी कसे वागत आले आहेत, हे आपल्याला ठाऊक आहे. जॉन हॅम्डनने[1] आपल्या लोकांची हालअपेष्टांतून सुटका केली आणि तसे करताना आपला सत्यानाश करून घेतला. लॉर्ड कॉलिन कॅम्बेल[2] चीनमधून दमूनभागून नुकताच आलेला होता. पण १८५८ मध्ये हुकूम मिळताच तो पुनः चीनमध्ये गेला. एका घटकेचीही विश्रांती त्याने घेतली नाही. लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन[3] याच्या जवळच्या आठ नातलगांनी बोअर युद्धात भाग घेण्याची तयारी दाखविली. माजी पंतप्रधान लॉर्ड सॅलिस्बरी[4] यांचा मुलगा मेफेकिंगमध्ये[5] लढयात सापडला होता. लॉर्ड राबर्टस्[6] यांचा एकुलता एक मुलगा युद्धात कामास आला आणि आता लॉर्ड राबर्टस् यांना कोणी पुरुष वारस नाही.

वरील उदाहरणांशी तुलना करता, ट्रान्सवालच्या हिंदी लोकांपुढील कार्य ही किरकोळ बाब आहे. त्यांना सरकारला विरोध करावयाचा नाही, किंवा त्यावर हत्यार उगारावयाचे नाही. त्यांनी फक्त तुरुंगात जावयाचे आहे आणि थोडा त्रास सहन करावयाचा आहे, किंवा फार तर धंद्यातील तोटा सोसावयाचा आहे. हे करण्याला आपण कचरू काय? त्याहूनही अधिक धडाडी दाखविण्यास हिंदी जनता भिणार नाही, अशी आम्हांस आशा आहे. साऱ्या धर्मग्रंथांची शिकवण एकच आहे आणि ती म्हणजे, "फक्त ईश्वराचे भय धरा, म्हणजे अन्य कोणासही भिण्याचे कारण नाही."

[गुजरातीवरून]

इंडियन ओपिनियन, १–६–१९०७

१. (१५९४-१६४३). इंग्लंडमधील संसदीय हक्कांचा पुरस्कर्ता देशभक्त. खंड ५ पाहा

२. (१७९२-१८६३). क्रिमियन युद्धात भाग घेतला. (१८५३-१८५६). हिंदुस्थानात सरसेनापती (१८५७). चीनऐवजी क्रिमिया हवे आणि १८५८ ऐवजी १८५७ हवे असे दिसते.

३. भारतमंत्री (१८९५-१९०३).

४. (१८३०-१९०३). इंग्लंडचे पंतप्रधान (१८८५-८६), (१८८६-९२), (१८९५-१९०२).

५. केप प्रांतातील एक शहर, बोअर युद्धात वेढा पडलेले, (१८९९-१९०२); पाहा खंड-३,

६. (१८३२-१९१४). भारतातील सरसेनापती, (१८८५-९३), दक्षिण आफ्रिकेत सरसेनापती (१८९९-१९००) व (१९०१ ते १९०४).

३. १ पौंडाचे बक्षीस

या स्फुटाचा मथळा " एक बक्षीस " असा आहे. परंतु वाचकाने केवळ बक्षिसाचाच विचार करू नये. कारण, हिंदी लोकांच्या दृष्टीने सध्याचा काळ हा नवा कायदा व तुरुंगाचा ठराव यांचा आहे. म्हणून त्या तुरुंगाच्या ठरावाला पुष्टिदायक अशी सर्वोत्तम कविता जो कोणी हिंदी माणूस गुजराती किंवा हिंदुस्तानी (ऊर्दू किंवा हिंदी) भाषेत स्वतः रचून आमच्याकडे पाठवील, त्याला वरील बक्षीस बहाल करण्यात येईल. ज्याला कविता करण्याची सवय आहे, असा कोणताही माणूस या स्पर्धेत भाग घेण्यास चुकणार नाही, अशी आम्हांस आशा आहे. ही कविता पाठवायची ती मानासाठी आहे, बक्षिसासाठी नव्हे. या काव्यस्पर्धेच्या अटी पुढीलप्रमाणे—

(१) कविता २० ओळींहून अधिक मोठी नसावी.

(२) शब्द सोपे असावेत.

(३) राग कोणता असावा यावर बंधन नाही. पण वीररसाचे माध्यम म्हणून पोवाड्याची चाल अधिक पसंत केली जाईल.

(४) कविता स्वच्छ हस्ताक्षराने कागदाच्या एकाच बाजूवर शाईने लिहिलेली असावी.

(५) कवितेच्या शेवटी कवीचे नाव व पत्ता असावा.

(६) कवितेमध्ये प्राचीन व अर्वाचीन पराक्रमाची कृत्ये सांगितलेली असावीत. ती मुसलमानांची व हिंदूंची आणि इतरांचीही असावीत.

(७) तुरुंगाच्या ठरावावर निष्ठा ठेवण्यासाठी जी भक्कम कारणे वेळोवेळी दिलेली आहेत, ती कवितेत अंतर्भूत व्हावीत.

(८) कविता फीनिक्स येथे ता. १२ जूनच्या सकाळचे आधी किंवा आमच्या जोहान्सबर्गच्या कचेरीत (पोष्ट बॉक्स नं. ६५२२) ता. १४ जूनपर्यंत पोचावी.

आमच्या ता. २२ च्या अंकात या स्पर्धेचा निकाल जाहीर केला जाईल. तीत पुष्कळ लोक भाग घेतील अशी आम्हांला आशा आहे.

[गुजरातीवरून]

इंडियन ओपिनियन, १–६–१९०७

४. हिंदुस्थानातील असंतोष

जगाच्या सर्व भागांमध्ये खळबळ करणाऱ्या पुष्कळ गोष्टी घडत आहेत. "स्वदेश ! स्वदेश !" अशी आरोळी लोक सर्वत्र ठोकीत असल्याचे आपल्या कानी येते. इजिप्तची जनता पुकार करते, "इजिप्शियन्स्साठी इजिप्त." चिनी लोकांनी हाँगकाँगमध्ये कैक युरोपियनांची कत्तल केली आहे. नीग्रो गरजतात, "आम्हांला आमचे हक्क मिळाले पाहिजेत." इराणमध्ये स्वराज्य स्थापन झाले आहे. अफगाणिस्तान सामर्थ्यशाली बनला आहे आणि आता हिंदुस्थान.

तेथेही "हिंदी लोकांसाठी हिंदुस्थान," अशी घनगंभीर गर्जना उठल्याचे आपण ऐकतो. तिच्या सिद्धीसाठी हिंदु-मुसलमानांना जवळ आणण्याचे प्रयत्न सर्वत्र सुरू आहेत. पंजाबमध्ये एका मुसलमानाने "**हिंदु-मुस्लिम**" या नावाचे एक वर्तमानपत्र सुरू केले आहे आणि दोन्ही जमातींनी ऐक्य साधावे, असा पुरस्कार त्याने चालविला आहे. दुसऱ्या बाजूने, ब्रिटिश सत्ता नष्ट करण्यासाठी "**वंदे मातरम्**"-सारख्या पत्रांनी चळवळ चालविली आहे. "**पंजाबी**" पत्रावर खटला सुरू होताच दंगे होऊन निदर्शने झाली आणि त्यांत प्रमुख हिंदी लोकांनी भाग घेतला. त्यांपैकी काही जणांना पकडण्यात आले. त्यातील काही जणांना हद्दपार केले जाईल आणि काहींना तुरुंगात डांबले जाईल. लाला लजपतरायांसारखे[1] उच्च शिक्षण घेतलेले सद्गृहस्थ यामध्ये अडकलेले होते. अशा वेळी आपण काय करावे हा प्रश्न सहजच उभा राहातो. आपण काहीच करू शकत नाही हे खरे असले तरी, आपण या प्रश्नाकडे कोणत्या दृष्टीने पाहावे याचा विचार विवेकी माणसाने करावा.

इंग्रजांची हिंदुस्थानातून हकालपट्टी करावी काय ? ती करण्याची आपल्याला इच्छा असली, तरी ती शक्य आहे काय ? या दोन प्रश्नांना आमचे उत्तर असे की, ब्रिटिश सत्ता नाहीशी करण्याने आपली हानी होणार आहे, आणि आपल्याला ब्रिटिश सत्तेचा अंत करावयाची इच्छा असली तरी, तसे करण्याच्या स्थितीत हिंदुस्थान आज नाही. आमच्या म्हणण्याचा अर्थ असा नाही की, ब्रिटिश सत्ता अत्यंत बलाढ्य आहे आणि तिच्यापासून हिंदुस्थानाला अगणित लाभ झालेले आहेत, अथवा हिंदुस्थानाने मनात आणले तरी त्याला ब्रिटिश सत्ता दूर करता येणार नाही. पण

१. (१८६५-१९२८), हिंदी देशभक्त व हिंदी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष (१९२०) "पंजाबचे सिंह" म्हणून जनतेत प्रसिद्ध.

आम्ही असे मानतो की, हिंदुस्थानात प्रवेश करण्यामध्ये ब्रिटिशांचे हेतु काहीही असोत; आपल्याला त्यांच्यापासून पुष्कळच शिकावयाचे आहे. ते शूर व विचारी लोक आहेत आणि एकंदरीने पाहता प्रामाणिक आहेत. जेथे स्वार्थाचा प्रश्न येईल, तेथे ते अंध बनतात, पण जेथे कोठे पराक्रम दिसेल तेथे ते निर्भेळ कौतुक करतात. ते एक बलाढ्य राष्ट्र आहे, आणि त्यांच्या आधिपत्याखाली हिंदुस्थानचे संरक्षण भरपूर होत आहे म्हणून हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्तेचा लोप व्हावा हे इष्ट नाही.

मग लाला लजपतरायांसारख्या माणसांचा अव्हेर आपण करावा काय? छे, तेही शक्य नाही. चळवळ चालविणारे पंजाबचे लोक व इतर कार्यकर्ते हे शूरवीर आहेत. ते देशभक्त आहेत. देशासाठी ते हाल-अपेष्टा सहन करतात. एवढ्यापुरता त्यांच्याविषयी आपल्याला आदर वाटणे अवश्य आहे. पण ब्रिटिश सत्ता नामशेष करण्याची त्यांची इच्छा आहे, त्या बाबतीत ते चूक करीत आहेत, असे दिसते. आपले हे ध्येय साध्य करण्यासाठी, कायद्याने होईल ती शिक्षा सोसण्याचा निर्धार त्यांनी केलेला दिसतो. त्यांना दोष देण्याला आपल्याजवळ काहीच कारण नाही, कारण त्यांच्या हाल-अपेष्टांनी हिंदुस्थानचे कल्याणच होईल. ब्रिटिश राजवटीतील दोषांमुळे तिला त्यांचा विरोध आहे. त्या राजवटीमुळे हिंदुस्थान कंगाल होत चालला आहे. काही प्रमाणात ब्रिटिश राजवट हे हिंदुस्थानातील प्लेगाचे एक महत्त्वाचे कारण आहे. हिंदु-मुसलमान यांच्यातील वैमनस्य ती सत्ता वाढीस लावीत आहे. आपला इतका अधःपात झाला आहे आणि आपण भेकडांचे जीवन जगत आहोत, याचेही कारण ती सत्ताच आहे. अशा दोषांनी क्षुब्ध होऊन, काही हिंदी पुढारी सबंध ब्रिटिश राष्ट्रालाच बोल लावतात. त्यांच्या विद्रोहामुळे हे दोष काही प्रमाणात दूर होण्याची शक्यता आहे. शिवाय ते आपले देशबांधव आहेत. म्हणून त्यांच्याविषयी विपरीत भाव आपण आपल्या मनात आणता कामा नये. उलट, आपण त्यांच्या शौर्याचा गौरव केला पाहिजे.

खरोखर, दोष आपला आहे. आपण आपला दोष घालविला म्हणजे आज आपल्या अनर्थाचे मूळ असणारी ब्रिटिश सत्ता सौख्याचे मूळ बनेल. पाश्चात्त्य शिक्षण घेतल्याशिवाय व पाश्चात्त्य राष्ट्रांशी संबंध ठेवल्याशिवाय आपल्यामध्ये सार्वजनिक वृत्ती वाढीस लागण्याचा संभव नाही. जर ती वृत्ती वाढीस लागली तर आपण युद्ध न करताही ब्रिटिश लोक आपल्या मागण्या पूर्ण करतील. आणि आपली इच्छा असेल तर, हिंदुस्थान देश सोडून निघून जातील. ब्रिटिशांच्या वसाहतींना आज जो दर्जा मिळालेला आहे; तो तेथील लोक गोरे आहेत म्हणून नव्हे, तर ते शूर आहेत आणि आपले हक्क दिले गेले नाहीत तर तो आपला अपमान मानणारे आहेत. यामुळे ते एका कुटुंबाचे घटक मानले जात आहेत.

थोडक्यात सांगावयाचे तर, आमचे ब्रिटिश सत्तेशी काही भांडण नाही हिंदुस्थानात जे नेते असंतोष निर्माण करीत आहेत, त्यांच्या धैर्याबद्दल आम्हांला

अभिमान वाटला पाहिजे. त्यांच्याइतकेच धैर्य आम्हीही दाखविले पाहिजे. ब्रिटिश सत्तेचा नायनाट करण्याची इच्छा न धरता, वसाहतीतील लोकांप्रमाणे आपण तेजस्वी व समर्थ बनण्याची व आपल्याला पाहिजे ते हक्क मागण्याची-मिळविण्याची लालसा आपण चित्तात धरली पाहिजे. तसे करीत असतानाच आपण ब्रिटिश सत्तेचे चांगले गुण ओळखले पाहिजेत आणि अंगीकृत केले पाहिजेत व त्यायोगे आपण अधिक कार्यक्षम बनले पाहिजे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १-६-१९०७

५. हिंदी संस्थानिक

पैगंबरवासी बादशहा अमीर अब्दुर[1] रहमान यांनी असे म्हटले आहे :

माझ्या हिंदुस्थानच्या प्रवासात मला एक दुःखदायक दृश्य दिसले. त्याचा माझ्यावर फार परिणाम झाला. बिचाऱ्या हिंदी संस्थानिकांचे पोषाख बायकांच्या पोषाखासारखे होते. त्यांनी आपल्या केसांत हिऱ्याचे आकडे घातले होते, कानांत कुंडले, मनगटावर पोची, गळ्यात सोन्याचा कंठा आणि स्त्रिया घालतात तसे दागिने अंगभर त्यांनी परिधान केले होते. त्यांच्या सुरवारीच्या पट्ट्यांवर रत्ने जडविलेली होती. आणि त्यांच्या जवळ जवळ पायापर्यंत लोंबणाऱ्या नाड्यांमध्ये लोलक लावलेले होते. अज्ञान, आलस्य व विलास यांमध्ये ते लोळत होते. जगात काय घडत आहे किंवा जग म्हणजे काय आहे, याचा त्यांना पत्ता नव्हता. दारू व अफू सेवन करण्यात ते आपला काळ घालवीत होते. आपण पायी चालत गेलो तर आपली प्रतिष्ठा कमी होईल अशी त्यांची भावना होती.

हे चित्र बहुतांशाने सत्य आहे. अशा स्थितीत न राहणारे काही हिंदी संस्थानिक आहेत, असे म्हणता येईल. पण या वेळी आपल्याला त्यांचा विचार करावयाचा नाही. आपल्या दुर्दशेचे एक जबर कारण वर वर्णन केलेली परिस्थिती हे आहे, ही सत्यस्थिती आहे.

अशा अधम अवस्थेत राहणारे केवळ संस्थानिकच नाहीत, जनतेमध्येही अशी स्थिती पुष्कळ वेळा दृष्टीस पडते. ही आमची टीका हिंदुस्थानातील मुख्यतः हिंदूंना

१. (१८४४-१९०१), अफगाणिस्तानचे राजे (१८८१-१९०१).

ागू आहे. तथाकथित बडे लोक व त्यांचे बेटे हे, माजी अमीरांनी वर स्पष्टपणे र्णिलेल्या लक्षणांनीच, बहुधा ओळखले जातात. चैन, दागदागिने, रेशमाचे किंवा रींचे कपडे या त्यांच्या अगदी नित्याच्या वस्तु दिसतात. ज्यांना आपण " आधुनिक ाणसे " म्हणतो, ते दागिने इत्यादी घालीत नसले, तरी ते आपली लालसा अन्य र्गांनी तृप्त करून घेतात. यासाठी कोण्या एका वर्गाला नावे ठेवण्यात हशील नाही. ाचीन काळापासून चालत आलेल्या चालीरीती एकदम नाहीशा होत नाहीत.

परंतु दक्षिण आफ्रिकेतील आपण हिंदी लोकांनी असा धडा शिकला पाहिजे ी, आपल्यापैकी लहान-मोठ्या सर्वांनी अशा दोषांपासून स्वतःला अलिप्त ठेवले ाहिजे. आपल्या राष्ट्राची व आपली स्वतःची परिस्थिती इतकी असमाधानकारक ाहे की, सध्या आपण सदैव सुतकातच आहोत. प्रत्येक आठवड्याला आपले हजारो ेशबांधव प्लेगने किंवा उपासमारीने मरत असताना, आपण सुख-स्वास्थ्याचा उपभोग सा घेऊ शकू ? प्रत्येक हिंदी माणसाने आपले मन संन्याशाच्या कफनीच्या भगव्या गाने रंगविणे जरूर आहे, अशी आमची खात्री पटलेली आहे. त्याच्या बाह्य रंगात ाने, जवाहर, रेशीम इत्यादी कोणत्याही दोषाचा आविष्कार होता कामा नये.

इंग्लंडचा राजा

याच अंकात आम्ही प्रसिद्ध केलेले लंडनचे बातमीपत्र, आम्ही वर मांडलेल्या चारांना, भक्कम पाठिंबा देत आहे. बादशहा एडवर्ड यांचा नातू आता १३ वर्षांचा ाहे. आतापासून त्याला कष्टाचे शिक्षण दिले जात आहे. त्याला शाळेत इतर मुलां- रोबर शिकावे लागत आहे, आणि इतरांना मिळणारे साधे अन्नच खावे लागत आहे. ाशा राजाच्या सत्तेखालील प्रजा राजाप्रमाणेच वागत असते. अशा प्रजेची भरभराट हावी यात आश्चर्य काय ? त्या लोकांचा आपण मत्सर न करता, त्यांच्यासारखेच नले पाहिजे. त्यांचेही काही ऐषाराम असतात, छानछोकी असते, असा युक्तिवाद रण्यात काही अर्थ नाही. असा विचार आळसातून निपजतो. आपले काम पूर्ण झाले, हणजे ते ऐषाराम घेतात आणि मग त्यांची चैन त्यांना छान शोभतेही. आणि तरी- द्धा सुख-स्वास्थ्याच्या जीवनाचा त्यांचा दोष आपण गिरविता कामा नये. चांगले व ाईट यांचा निवाडा आपण हंसक्षीर-न्यायाने केला पाहिजे.

गुजरातीवरून]
डियन ओपिनियन, १-६-१९०७

६. जोहान्सबर्गचे बातमीपत्र[1]

नवा कायदा : नवे प्रश्न

या नव्या कायद्यासंबंधी अजून आमचेकडे प्रश्न येत आहेत, याचा मला आनंद वाटतो. जे जे प्रश्न आमचेकडे येतील, त्या सर्वांचा परामर्श या पत्रात घेतला जाईल.

डच नोंदणीपत्रे धारण करणाऱ्यांनी काय करावे ?

गॅझेटमधील सूचनेनुसार एका हिंदी माणसाने, आपल्या नोंदणी-पत्राच्या आधारे, परवाना–अधिकाऱ्याकडे अर्ज केला आहे. त्या बाबतीत वाकरस्ट्रूम येथून मि. महमंद दावजी पटेल यांनी पुढील प्रश्न विचारले आहेत :

(१) हा अर्ज परवाना-अधिकारी मान्य करतील, असे खात्रीने मानावे काय ?

(२) मान्य केल्यास, चौथ्या ठरावाचे उल्लंघन होईल म्हणून, अर्जदाराने तो अर्ज परत घ्यावा काय ?

(३) तो परत घेतल्यास, पोलीस त्याला पकडतील काय ?

(४) पोलिसांनी त्याला पकडले, आणि मॅजिस्ट्रेटने त्याला ट्रान्सवाल सोडण्याचा हुकूम दिला, तर त्याने काय करावे ?

(५) त्याच्यावर यामुळे खटला भरण्यात आल्यास श्री. गांधी येथे येऊन त्याचा बचाव करतील काय ?

या प्रश्नांची उत्तरे अशी : —जोपर्यंत नवीन कायदा गॅझेटमध्ये जाहीर झालेला नाही, तोपर्यंत या माणसाने किंवा त्याच्यासारख्या परिस्थितीत असलेल्या माणसाने अर्ज परत घेण्याची गरज नाही. वरील अर्जाच्या बाबतीत आताच काही करण्याची जरूरी नाही. नवा कायदा गॅझेटमध्ये प्रसिद्ध होताच अर्ज परत घ्यावा लागेल. हे प्रकरण मॅजिस्ट्रेटपुढे गेले तर सदर अर्जदार किंवा नोंदणी–पत्रे सनदशीरपणे बाळगणारे त्याच्या परिस्थितीतील दुसरे कोणीही असोत, त्यांचा बचाव श्री. गांधी करतील.

१. ही बातमीपत्रे "आमच्या जोहान्सबर्ग येथील प्रतिनिधीकडून" या नावाने इंडियन ओपिनियनमध्ये दर आठवड्यास प्रसिद्ध केली जात. पहिले बातमीपत्र ता. ३ मार्च, १९०६ रोजी प्रसिद्ध झाले. खंड ५ पाहा.

बचावाच्या स्वरूपासाठी आमची पूर्वीची बातमीपत्रे कृपया पाहावी. परवाना-कचेरीवर बहिष्कार घालणे, म्हणजे यापुढे आपल्याला त्या कचेरीशी काडीमात्र संबंध ठेवावयाचा नाही. ट्रान्सवालमधील रहिवाश्यांची जी प्रकरणे त्या कचेरीत शिल्लक असतील ती परत घेण्याची गरज नाही. कायदा गॅझेटमध्ये आल्याबरोबर तशी कृती करावी लागेल.

श्री. गांधी यांनाच तुरुंगात प्रथम घातले तर ?

'श्री. गांधी यांना सर्वांआधी तुरुंगात डांबले तर बचावासाठी आम्ही काय करावे, अशी पृच्छा एक पत्रलेखक करतात. प्रश्न ठीक आहे, पण श्री. गांधी कसा बचाव करणार आहेत, हे समजून घेतले पाहिजे. त्यांचा बचाव एवढाच असेल की, माझ्या सल्ल्याने लोकांनी तुरुंगात जाण्याचा ठाम निर्णय केलेला आहे, म्हणून मलाच प्रथम शिक्षा होणे शक्य आहे. असा बचाव करण्याची जरूर पडली नाही, आणि गांधींना प्रथम थेट तुरुंगातच नेऊन ठेवले गेले, तर त्याचा अर्थ बचावाचे काम झाले आहे. श्री. गांधी यांनी कोर्टात उपस्थित असण्याचा मुख्य हेतु आरोपींचे धैर्य टिकविणे हा आहे. श्री. गांधी आणि हिंदी लोक यांच्या सुदैवाने गांधी तुरुंगात प्रथम डांबले गेले, तरी लोकांनी भिण्याचे कारण नाही. कारागृहातही गांधी बचाव करू शकतात. तो म्हणजे "सर्व हिंदी लोकांना धैर्य प्राप्त होऊ दे" अशी ईश्वराची प्रार्थना करणे. या वेळी मी हे सांगू इच्छितो की, सर्व हिंदी लोकांनी तुरुंगाचा ठराव मान्य केला, याचे मुख्य कारण, नवा कायदा अपमानास्पद आहे, हे होय. या सर्वांचा मथितार्थ हा की, प्रत्येक हिंदी माणसाने आपल्या स्वाभिमानाचे रक्षण केले पाहिजे.

बायकामुलांचा संभाळ करण्यास पैसे कोठे आहेत ?

हा प्रश्न उपस्थित करणाऱ्या माणसाने विचारले आहे, आपल्या असोसिएशनचा निधी थोडा आहे, मग बायकामुलांची तरतूद कशी करता येईल ? अद्याप कायदा जाहीर झालेला नाही. तो जाहीर होताच, आपले पुढारी प्रत्येक गावी जातील, लोकांना परिस्थिती समजावून सांगतील आणि देणग्या मिळवतील. शिवाय, नाताळ व पूर्व लंडन यांतील नेत्यांनी आपण मदत करण्यास आनंदाने तयार असल्याचे लिहून कळविले आहे. याखेरीज, अशी योजना करण्यात आलेली आहे की, श्री. गांधी तुरुंगात गेले तर, इंडियन ओपिनियनचे संपादक श्री पोलक हे गावोगाव जातील, पैसे गोळा करतील, लोकांना प्रोत्साहन देतील आणि सर्व परिस्थिती समजावून सांगतील. काही गोऱ्या लोकांनीही आपण सहाय्य करण्यास तयार असल्याचे सूचित केले आहे.

जर्मिस्टन वस्ती

जर्मिस्टन वस्तीमध्ये काफिराप्रमाणे हिंदी लोकांना परवाने दिले जात होते. या बाबतीत स्थानिक सरकारकडे एक खलिता ब्रिटिश इंडियन असोसिएशनने पाठविला

होता. त्याचे उत्तर आले आहे; त्यात म्हटले आहे की, यापुढे असे परवाने दिले जाणार नाहीत. म्हणून वस्त्यांमध्ये राहणाऱ्या लोकांनी आता आपले परवाने फ्रेम करून घ्यावेत व पुरावा म्हणून ठेवावे. असे परवाने घेण्याबद्दल त्यांना पुनः सांगण्यात आले, तर त्यांनी तसे न करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. त्यांनी साफ नकार द्यावा.

खाण-कामगारांचा संप

परवाना-कचेरीवर बहिष्कार घालण्याची व तुरुंगात जाण्याची भाषा आपण बोलत आहोत. खाणीतील गोऱ्या मजुरांनी जादा वेतन मिळावे म्हणून संप पुकारला आहे. त्याचा परिणाम म्हणजे सुमारे दहा खाणीतील काम संपुष्टात आले. हे मजूर हाता-तोंडाची कशीबशी गाठ घालतात हे प्रत्येकाला माहीत आहे. त्यांच्यापैकी काहीजण विवाहित आहेत. पण आपल्या हक्कासाठी ते खाणीच्या बाहेर निघून गेले, आपल्या चालू मिळकतीवर त्यांनी पाणी सोडले आणि आपली कुटुंबे व त्यांच्या चरितार्थाचे उपाय यांची चिंता त्यांनी केली नाही. स्वाभिमानाला धक्का लागण्याचा प्रश्न त्यांच्यापुढे नव्हता. तरीसुद्धा, त्यांना जो आपला हक्क आहे असे वाटत होते, त्याच्यासाठी, सरकारी अधिकारी आणि गडगंज संपत्ती असणारे खाण-मालक यांच्याविरुद्ध ते कमर कसून उभे राहिले. त्यांच्या मागण्या योग्य आहेत की नाहीत, याचा विचार आताच करण्याचे कारण नाही. या वेळी आपण विचार करावयाचा तो त्यांचे तेज व त्यांचे धैर्य यांचा–आणि तोही त्यांचे अनुकरण करण्यासाठी.

पूर्व लंडनचे प्रोत्साहन व किम्बरलेचा चुकीचा दृष्टिकोन

पूर्व लंडनमधील हिंदी लोकांकडून सहानुभूतिपर एक पत्र असोसिएशनच्या अध्यक्षांकडे आले आहे. ए. जी. इस्माईल यांनी अशी आशा व्यक्त केली आहे की, कायदेभंग करून तुरुंगात जाण्याच्या बाबतीत सर्व हिंदी लोक खंबीर राहतील, त्यांना आम्ही येथून मदत पाठवू. उलट बाजूने, किम्बरले येथून एक तार आली आहे, तीत सहानुभूती दाखविली आहे, पण हिंदी जमातीला असा सल्ला दिला आहे की, तुरुंगात जाण्यासाठी पाऊल उचलण्यापूर्वी पूर्ण विचार करा. हा दृष्टिकोन चुकीचा आहे. हिंदी लोकांची ईश्वरावर श्रद्धा आहे. ईश्वराचा अनादर ते करणार नाहीत. शिवाय, सप्टेंबरमध्ये तुरुंगाचा ठराव मंजूर झाला तो पूर्ण विचारानंतर. म्हणून प्रत्येक हिंदी माणसाचे कर्तव्य हे आहे की, ट्रान्सवॉलमध्ये राहणाऱ्या आम्हा लोकांना त्याने पुरेपूर प्रोत्साहन द्यावे आणि आमच्या सत्त्वपरीक्षेच्या वेळी आमचे धैर्य अचल राहावे अशी परमेश्वराची प्रार्थना करावी.

जर्मन पूर्वआफ्रिकेतील हिंदी लोक

"स्टार" पत्राचा इंग्लंडमधील बातमीदार तारेने कळवितो की, जर्मनीमध्ये जर्मन कलोनियल सोसायटीची सभा भरली असता काही सभासद म्हणाले, जर्मन पूर्व-

आफ्रिकेतील हिंदी व्यापारी लहान युरोपियन व्यापाऱ्यांचे नुकसान करीत आहेत. हिंदी लोक काफिरांना फसवितात, बंडाला उत्तेजन हिंदी लोकांनी दिले म्हणून दक्षिण आफ्रिकेमध्ये त्यांच्यासंबंधी जसे कायदे केलेले आहेत, तसे जर्मन पूर्व-आफ्रिकेमध्येही करावेत. वरील सोसायटीच्या समितीने असे निवेदन केले आहे की, हिंदी व्यापाऱ्यांवर काही आक्षेप घेता येण्यासारखे असले तरी, त्यांचे तेथील वास्तव्य एकंदरीने हितावह ठरले आहे. हिंदी लोकांना हद्दपार करणारा कायदा करण्याचा प्रयत्न झाला तर, त्यामुळे इंग्लंडमध्ये भानगडी निर्माण होण्याचा संभव आहे. वसाहतीत प्रत्यक्ष असणाऱ्या परिस्थितीशी ज्यांचा परिचय होता, अशा दुसऱ्या काही सभासदांनी हिंदी व्यापाऱ्यांचे समर्थन केले.

खोटी साक्ष देण्याबद्दल शिक्षा

पोन्नुसामी नावाच्या धोब्याचा खटला सर विल्यम् स्मिथ यांच्यापुढे खोटी साक्ष देण्याच्या आरोपावरून चालला होता. दुसरे काही हिंदी लोक निरपराधी आहेत, हे माहीत असताना त्याने त्यांच्यावर निराधार आरोप केले होते. ज्यूरीने पोन्नुसामीला दोषी ठरविले, न्यायाधीशाने त्याला १८ महिने सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली. या खटल्यापासून खोटी साक्ष देण्यास न कचरणाऱ्या हिंदी लोकांनी बोध घ्यावा.

ठराविक वेळी दुकाने बंद करण्यासाठी चळवळ

जोहान्सबर्ग येथील टाउन कौन्सिलमध्ये ता. २२ (मे) रोजी, ठराविक वेळी दुकाने बंद करण्याच्या सूचनेवर चर्चा करण्यात आली. सभेत इतकी भिन्न भिन्न मते मांडण्यात आली की, सभासदांचे त्या प्रश्नावर एकमत होईना. म्हणून त्यांनी ठरविले की, हे सर्व प्रकरण निर्णयासाठी पार्लमेंटकडे पाठवावे. त्याच वेळी कौन्सिलची सूचनाही पार्लमेंटकडे पाठविण्यात आली. त्या सूचनेत अशी तरतूद केलेली आहे की, सर्व-सामान्यपणे दुकाने संध्याकाळी ६ वाजता बंद व्हावीत. बुधवारी दुपारी १ वाजता व शनिवारी सकाळी नऊ वाजता बंद व्हावीत. सुटीच्या दिवशी ती दिवसभर बंद असावीत. दुकाने बंद असतील त्या वेळी फेरीवाल्यांनीही आपली फेरी थांबवावी. अशा स्वरूपाचा कायदा अद्याप मंजूर झाला नाही, पण तो मंजूर होण्याच्या मार्गावर आहे असे धरून चालावे. दुकाने लवकर बंद व्हावी, असे ज्या हिंदी व्यापाऱ्याला वाटते, आणि त्याप्रमाणे जो राजीखुशीने वागत आला आहे, त्याला इतरांपेक्षा ही व्यवस्था सुखाची होईल.

जोहान्सबर्ग येथील जमिनीवरील कर

या वेळी जमिनीवरील कर १०० पौंडांमागे सव्वा पेनी ठरविण्यात आलेला आहे. तरी ता. १ जानेवारी १९०७ ते ता. ३० जून १९०७ या काळासाठी या

कराची आकारणी केली जाईल. तो ता. २४ जून १९०७ रोजी भरावयाचा आहे. त्या दिवसापर्यंत जे कोणी तो कर भरणार नाहीत, त्यांना १०० पौंडांमागे दरमहा १ पौंड व्याज द्यावे लागेल.

चिनी लोकांची सभा व तुरुंगाचा ठराव

गेल्या रविवारी चायनीज् असोसिएशनची सभा तिच्या सभागृहात भरली होती. सुमारे ३०० चिनी हजर होते. त्यांपैकी बहुतेक व्यापारी होते. श्री. एम्. क्वन् अध्यक्षस्थानी होते. श्री. गांधीही निमंत्रणावरून[1] उपस्थित होते. गांधींनी परिस्थिती समजावून सांगून म्हटले, नव्या कायद्यामुळे चिनी व हिंदी यांना एकत्र करण्यात आले आहे. या कायद्याने आशियावासी लोकांचा अपमान केला आहे. म्हणून चिनी लोकांनी तो मानू नये. प्रस्तुत बातमीपत्रात ज्या प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत, ते सारे प्रश्न सभेत विचारण्यात आले आणि त्यांना उत्तरे देण्यात आली. शेवटी निर्णय असा झाला की, प्रत्येक चिनी माणसाने आपल्या धर्मानुसार शपथ घेऊन असे जाहीर करावे की, काही झाले तरी मी नवा परवाना घेणार नाही, त्यामुळे जरूर पडेल तर, तुरुंगात जाण्यासही मी सिद्ध राहीन.

परवान्याचा खटला

लाला नावाच्या हिंदी माणसावर परवान्याच्या बाबतीत एक खटला गेले कित्येक दिवस चालू आहे. ता. २७ रोजी तो मि. वेंडरबर्गपुढे चालू झाला. सुपरिंटेंडेंट व्हर्नान् यांनी सांगितले :

लोकांकडून परवाना मागण्याचा अधिकार मला आहे. परवाना घेऊन या देशात प्रवेश करणाऱ्या लोकांच्या हक्कांची चौकशी करणे हे माझे कर्तव्यही आहे. ता. २० एप्रिल रोजी लालाला मी माझ्या कचेरीजवळ पाहिले. तो मला म्हणाला, "तुमच्याबरोबर काम करण्याची माझी इच्छा आहे. पुष्कळ लोकांना परवाने घेण्याची इच्छा आहे. त्यांची माहिती तुम्ही मला पुरविली तर आपण दोघेही खूप पैसे कमावू. प्रत्येकाकडून मी २० पौंड घेईन. आणि त्यांपैकी ८ पौंड मी तुम्हांला देईन. खोटे परवाने घेतलेले हिंदी व चिनी येथे पुष्कळ आहेत. ते परवाने तुम्ही (आपण) खरे बनविले तर मी तुम्हांला २० पौंड देईन. हा पाहा एक परवाना. त्याच्यावर तुम्ही सही करा आणि तो मंजूर करा. अशा प्रकारे तुम्ही दरमहा ४०० पौंड कमावू शकाल आणि मला २०० पौंड मिळतील. मि. हॅरिस यांनाही २०० पौंड मिळतील. जोहान्सबर्गमध्ये बेसनदशीर तक्के (फॉर्म) चालू आहेत. आणि पुष्कळ हिंदी लोक बिगरपरवाना आहेत, अशी माझी माहिती आहे." मी त्याला दुसऱ्या दिवशी येण्यास सांगितले. तो आला आणि

१. खंड ६, लेखांक ४८३ पाहा.

त्याच्याशी थोडीशी बातचीत झाल्यावर, मी घंटा वाजविली आणि त्याला अटक केली. कोर्टाकडे नेला जात असताना, लाला म्हणाला, "साहेब, द्रव्यार्जनाची एक सुवर्णसंधी तुम्ही घालविली."

शिपाई हॅरिस यानेही असाच जबाब दिला. मि. चॉमनी[1] साक्ष देताना म्हणाले : "परवान्यासाठी आलेल्या सर्व अर्जांची छाननी करणे हे माझे कर्तव्य आहे. पोलिसांचा रिपोर्ट प्रतिकूल असल्यास परवाना क्वचितच दिला जातो. या बाबतीतील माझा निर्णय अखेरचा असतो, त्यात बदल करण्याचा अधिकार गव्हर्नरला असतो. हिंदी लोकांचे अर्ज मी वसाहत–सचिवापुढे ठेवतो. लाला माझ्याकडे दोनदा आला आणि म्हणाला, "काही हिंदी लोकांजवळ खोटे परवाने आहेत." तो मला काही माहिती पुरविणार होता. म्हणून मी त्याला रेल्वेने बिनतिकिटाने येण्यास परवानगी दिली होती. पण त्याने काहीच माहिती आणली नाही."

लालाने आपल्या जबानीत सांगितले :

"एक हिंदी माणूस परवान्यासाठी मजकडे आला. मी त्याला नकार दिला. मग त्याने मला एक परवाना दाखविला. तो व्यवस्थित नव्हता. तेव्हा मी मि. चॉमनी यांच्याकडे गेलो आणि त्यांना असे सांगितले की, या माणसाला परवान्यासाठी ३० पौंड द्यावे लागत आहेत. त्या माणसाला कचेरीत घेऊन येण्याविषयी मि. चॉमनी यांनी मला सांगितले. नंतर मी मि. व्हर्नान् यांच्याकडे गेलो आणि त्यांना पैसे देऊ केले. यात माझा हेतु, मि. चॉमनी यांना माहिती पुरवावी, असा होता. खोटे परवाने कसे दिले जातात हे समजून घेण्याचा माझा इरादा होता. खोट्या परवान्यांची माहिती मी दिल्यास, मला बक्षीस मिळण्याचा संभव होता. बादशहांचा मी एक राजनिष्ठ प्रजाजन आहे. माझ्या राजनिष्ठेमुळे मला एखादी सरकारी नोकरी मिळेल, अशी मला आशा वाटत होती. पैशाचा नक्की आकडा ठरलेला नव्हता. एक हिंदी माणूस १०० पौंड देण्यास तयार आहे, असे हॅरिस म्हणाला होता. या बाबतीत माझ्या मनाचा काही निर्णय होण्यापूर्वीच मला पकडण्यात आले."

प्रिटोरियाहून आलेल्या एका पत्रासंबंधी लालाला सरकारी वकिलाने प्रश्न विचारले. त्या पत्राचे भाषांतर नीट झालेले नाही, असे लालाने उत्तर दिले. म्हणून मि. थॉमसन् यांनी एका आठवड्याची मुदत पुनः मागितली आणि खटला ता. ४ जूनपर्यंत तहकूब झाला.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १–६–१९०७

१. प्रवेश-संरक्षणाधिकारी आणि नंतर आशियाई लोकांचे नोंदणी-अधिकारी. "जोहान्सबर्गचे बातमीपत्र" पाहा लेखांक ३७.

७. भारत-सेवक

एका भारतीय विद्वानाने " इंडियन सोशिऑलॉजिस्ट " मध्ये लेख लिहून असे सुचविले आहे की, भारत-सेवकांचा एक समाज स्थापन करावा. त्यांच्या लेखाचे सार आम्ही पुढे देत आहोत :

भारत स्वतंत्र व संघटित व्हावा ही कल्पना बऱ्याच हिंदी लोकांना आता कळलेली व पटलेली आहे. पण हे साध्य सिद्ध होण्यासाठी जे नैतिक सामर्थ्य अवश्य असते, त्याची तेथे उणीव आहे. ज्यांना स्वदेशाची सेवा करण्याची इच्छा आहे, त्यांनी हे प्रथम जाणले पाहिजे की, आपले आयुष्य हे चैनीने घालविण्यासाठी व शरीराचे चोचले पुरविण्यासाठी नाही, तर आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी आहे. भारताची लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येच्या $\frac{१}{८}$ आहे. भारतीय लोकांचा उद्धार करण्याचे कार्य, " भारताच्या सेवकांचे " आहे. हे सेवक म्हणजे भारतीय जनतेचे विश्वस्त होत. त्यांनी सत्ता, संपदा व शारीरिक सुख यांचा त्याग करून, आपले जीवन भारताच्या सेवेसाठी वाहिले पाहिजे. कोणत्याही प्रकारचे भय त्यांनी जिंकले पाहिजे. अशी सेवा करणे, हा त्यांनी आपला धर्म मानला पाहिजे. अशा देशभक्तीने प्रेरित झालेली माणसे आपल्या वाणीने नव्हे, तर आपल्या करणीने जनतेमध्ये उत्साह निर्माण करू शकतील.

अशा उत्साहाशिवाय ज्ञान व शहाणपण यांचीही गरज आहे. म्हणून " भारताच्या सेवकांना " भारताच्या इतिहासाचे ज्ञान असले पाहिजे. सांप्रत भारताला कशाची गरज आहे, हे त्यांना समजले पाहिजे. त्यांनी अन्य राष्ट्रांच्या इतिहासाचेही परिशीलन केले पाहिजे.

असा उत्साह आणि असे ज्ञान माणसाच्या अंतःकरणात, त्याच्यावर कुटुंबाची जबाबदारी असल्यास, फार काळ ताजे टवटवीत राहू शकत नाही. सच्चा सेवकाने पूर्ण ब्रह्मचर्य पाळणे अवश्य आहे. जे विवाहित आहेत, पण स्वदेशाची सेवा करू इच्छितात त्यांनी आपल्या कुटुंबातील माणसांना अशाच तऱ्हेचे काम हाती घेण्यासाठी तयार करावे. हिंदी स्त्रिया अडाणी आहेत. त्यांच्यामध्ये देशभक्ती जागृत करणे अत्यंत अवश्य आहे. पण जे विवाहित नाहीत आणि वर वर्णिल्याप्रमाणे सेवा करू इच्छितात त्यांनी लग्न न करणे उत्तम. " माझे लग्न माझ्या देशाशी लागले आहे, " असे महान देशभक्त मॅझिनी[१] म्हणत असे.

१ (१८०५-७२), इटालीचे देशभक्त. पाहा, खंड ५, लेखांक ३७.

शेवटी ज्याला जनसेवा करावयाची आहे, त्याच्या अंगी श्रद्धा पाहिजे. उद्याचे जेवण मला कोठे मिळेल याची चिंता त्याने करता कामा नये. ज्याने दात दिले तो चणे दिल्याशिवाय कसा राहील ?

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १–६–१९०७

८. तैयबला तार

[जोहान्सबर्ग]
१ जून, १९०७

तैयब[1]
द्वारा : गुल
केप टाऊन

२१ तारखेच्या पत्राचे[2] उत्तर का नाही ? सत्वर उत्तर पाठवा.

—गांधी

हस्तलिखित मसुद्यावरून
एस्. एन्. ३८३९

९. पंतप्रधानांच्या सचिवांना पत्र[3]

नेक ना. पंतप्रधान यांचे सचिवास
प्रिटोरिया

महाशय,

आशियावासीयांच्या नोंदणीचा कायदा अद्याप साम्राज्य सरकार व स्थानिक सरकार यांच्या पत्रव्यवहाराचा विषय आहे, म्हणून मी पंतप्रधानांची मुलाखत घ्यावी,

१. केपटाऊनमधील एक हिंदी पुढारी.
२. हे पत्र उपलब्ध नाही.
३. ता. २२–६–१९०७ च्या ‘ इंडियन ओपिनियन ’ मध्ये उद्धृत.

असा आदेश माझ्या असोसिएशनने मला दिला आहे. हा कायदा प्रसिद्ध करण्याची गरजच राहू नये, अशी योजना मांडणे हा या मुलाखतीचा हेतु आहे. तो साध्य होवो न होवो, या कायद्याच्या बाबतीत पुढे पाऊल टाकण्याआधी जनरल बोथा यांनी माझ्या असोसिएशनच्या शिष्टमंडळासाठी भेट घेण्याचा वेळ दिला तर, माझी असोसिएशन अत्यंत कृतज्ञ राहील.

म्हणून माझ्या असोसिएशनच्या वतीने येणाऱ्या छोट्या शिष्टमंडळाला पंतप्रधान भेट देऊ शकतील काय ? आणि असल्यास, केव्हा भेट घेणे त्यांना सोयीचे होईल हे आपण कृपा करून कळवाल तर मी आपला ऋणी होईन.[1]

आपला आज्ञाधारक सेवक
इसाप् इस्माइलमियाँ
हंगामी अध्यक्ष, ब्रिटिश इंडियन असोसिएशन

पंतप्रधानांचे पुराणवस्तु संग्रहालय,
प्रिटोरिया फाईल, १४।१।१९०७

१०. प्रामाणिक मत

आमदार मि. सी. पी. रॉबिनसन् हे आपल्या मतदार संघांना काही खऱ्या गोष्टी सांगत आहेत आणि एक अप्रिय विषय योग्य प्रकारे हाताळण्यास धजत आहेत, हे पाहून आम्हांस आनंद वाटतो. त्यांचे मत असे आहे की, हिंदी अर्जदार व इतर अर्जदार यांच्यामध्ये पंक्ति-प्रपंच करण्याचे जे धोरण–विशेषतः व्यापाऱ्यांच्या चालू हक्काविषयीच्या परवान्याबाबतचे धोरण–परवाना अधिकारी अवलंबीत आहेत, ते हिंदी माणसाला अपायकारक असून निंद्य व अन्याय्य आहे. रॉबिन्सन् यांचे असेही मत आहे की, या वसाहतीला हिंदी प्रश्न सोडविण्याची इच्छा असेल, तर तिने तसे रोखठोक, प्रामाणिक व सरळ मार्गाने करावे. न्याय व समता यांच्या बाजूने सन्मानपूर्वक उभे राहिल्याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो. आमचे सर्व आमदार अशीच निधडी वृत्ती धारण करतील तर या वसाहतीतील पुष्कळसा दंभ व कपट नाहीसे होईल.

इंडियन ओपिनियन, ८–६–१९०७

१. परंतु पंतप्रधानांनी शिष्टमंडळाची भेट घेतली नाही. पाहा प्रकरण २१.

११. केपचा प्रवेश–कायदा

केपमधील प्रवेश-निर्बंध कायद्याच्या अंमलबजावणीसंबंधी मेफेकिंग येथील पत्र-लेखकाने एक भीषण कहाणी लिहून पाठविली आहे, तिच्याकडे आम्ही वाचकांचे लक्ष वेधतो. त्या आमच्या पत्रलेखकाच्या माहितीप्रमाणे, ज्या हिंदी लोकांनी आपले १०–१० वर्षांचे उद्योगधंदे सोडले व केपमधील आपली स्थावर-मिळकत मागे ठेवली व जे हिंदुस्थानाला परत गेले, त्यांनी, वास्तव्याचे प्रमाणपत्र तेथून निघण्यापूर्वी घेतलेले नसेल तर, त्यांना केपमध्ये परत येणे कठीण झालेले आहे. तसेच जे हिंदी लोक येथे कैक वर्षे राहिलेले आहेत, त्यांना येथून निघताना अशी प्रमाणपत्रे मिळविणे कठीण जाते. त्या पत्रलेखकाने पुढे असे म्हटले आहे की, जेव्हा ती प्रमाणपत्रे दिली जातात तेव्हा ती फक्त एक वर्ष मुदतीपुरतीच असतात. त्यामुळे एखादा हिंदी माणूस केप् ऑफ गुडहोप या वसाहतीतील आपल्या नव्याने स्वीकारलेल्या घरी, प्रमाणपत्रातील मुदती-नंतर एक दिवस उशीरा, आला तरी त्याच्या प्रवेशाला मनाई करण्यात येई. अशा पद्धतीचा अर्थ एकच होतो, तो म्हणजे काहीही नुकसानभरपाई न देता हिंदी लोकांची केपमधून हकालपट्टी करण्याचा हा जाणून बुजून केलेला क्रूर प्रयत्न होय. यावर उपाय मुख्यतः केपमधील हिंदी लोकांच्या हातांतच आहे. तेथील निरनिराळ्या संघटनांना आम्ही असा इशारा देतो की, हिंदी लोकांवर जे संकट कोसळण्याचे भय आहे, ते कोसळल्यामुळे केपमध्ये फारच थोडे हिंदी लोक राहिलेले आहेत, असे जर तुम्हांला पाच वर्षांनंतर आढळून आले, तर त्याला जबाबदार तुम्हीच आहात. केप टाऊनमधील हिंदी संघटनांना उद्देशून आमच्या पत्रलेखकाने अखंड लेख लिहावे असा सल्ला आम्ही त्यास देतो. त्या संघटना उदासीन असल्यासारख्या आज दिसत आहेत, त्यांना जागे करून कार्यास प्रवृत्त करीपर्यंत पत्रलेखकाने आपले कर्तव्य बजावले पाहिजे.

इंडियन ओपिनियन, ८–६–१९०७

१२. शियावासियांच्या नोंदणीचा कायदा[1] : भयानक विषमता

आशियावासियांच्या नोंदणी कायद्याला मान न झुकविण्याचा खंबीर निर्धार हिंदी लोक दाखवीत आहेत. अशा वेळी त्यांच्या विरोधाचे स्वरूप समजावून घेणे योग्य होईल. म्हणून, आज ते कोणत्या अवस्थेत आहेत व नव्या कायद्यामुळे ते कोणत्या अवस्थेत जातील हे दाखविण्यासाठी मी दोन भागांत तुलना करून ती पुढे देत आहे.

विद्यमान	नव्या कायद्यानुसार
१. मलायी लोकांना १८८५ चा ३ रा. कायदा लागू आहे.	१. त्यांना नव्या कायद्यातून वगळले आहे. पुष्कळ हिंदी लोकांच्या बायका व नातलग मलायी आहेत. ते हिंदी लोक आपल्या मलायी नातलगांना जेव्हा भेटतील तेव्हा त्यांची अवस्था काय होईल, हे वर्णन करण्यापेक्षा कल्पनेनेच जाणले पाहिजे.
२. प्रामाणिकपणे परवाना मिळवून तो बाळगणारा प्रत्येक आशियावासी माणूस ट्रान्सवॉलचा पूर्ण व कायदेशीर रहिवासी आहे.	२. हा ह्याचा हक्क हिरावला जाईल. आपल्याजवळ कायदेशीरपणे असलेला परवाना, फसवेगिरीने मिळविलेला नाही, हे सिद्ध करण्याचा बोजा त्याच्यावर टाकलेला आहे. त्याने ते सिद्ध केले तरच त्याला नोंदणीचे नवीन प्रमाणपत्र मिळण्याचा हक्क लाभेल.
३. ता. ३१ मे, १९०२ पासून केव्हाही ऑरेंजरिव्हर वसाहतीत जन्मलेल्या आशियावासी मुलाला ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश व वास्तव्य करण्याचा हक्क राहील.	३. अशा मुलाला बंदी केलेली आहे.

१. "विशेष लेख" म्हणून हा प्रसिद्ध झाला. शेवटी कायदा जसा मंजूर झाला, त्याचा मसुदा परिशिष्ट १ मध्ये पाहा.

विद्यमान	नव्या कायद्यानुसार
४. सध्याच्या परवान्यामुळे आशियावासियांना ट्रान्सवॉल व ऑरेंजरिव्हर या वसाहतीत प्रवेश व वास्तव्य करण्याचा हक्क आहे. त्या परवान्यांचा उपयोग ऑरेंजरिव्हर वसाहतीत जाण्याला काही आहे की नाही हा प्रश्न प्रस्तुत नाही.	४. परवान्यामुळे जो काही हक्क मिळणारा आहे, तो काढून घेतला जाईल.
५. ऑरेंजरिव्हर वसाहतीत वास्तव्य करणारे परवाने ज्यांच्या जवळ आहेत, त्यांना त्या परवान्यांच्या वॉलमध्ये प्रवेश करता येतो.	५. याला प्रतिबंध होईल.
६. सध्याचे परवाने बाळगणाऱ्यांच्या संमतीशिवाय ते बदलता येत नाहीत.	६. सरकारच्या लहरीप्रमाणे ते बदलले जातील.
७. आशियावासियांच्या मुलांना परवाने घेण्याची गरज नाही.	७. मूल कितीही लहान असो, त्याची ओळख पटणाऱ्या खुणा, त्याच्या पालकाच्या नोंदणी पत्रावर असणे अवश्य आहे. नाही तर पालकाला जबर दंड होईल. मूल ८ वर्षांचे झाले की, त्याच्या पालकाने रजिस्ट्रारकडे पुनः गेले पाहिजे, त्याच्या ओळखीच्या अधिक खुणा वगैरे दिल्या पाहिजेत, आणि त्या मुलासाठी नोंदणीपत्र घेतले पाहिजे.
८. ट्रान्सवॉलमध्ये सध्या राहणाऱ्या अज्ञान मुलांना परवान्याशिवाय राहता येते आणि ती मुले सज्ञान झाली तरी त्यांनी देशाबाहेर गेले पाहिजे असे नाही.	८. अशा सर्व मुलांनी, १६ वर्षांचे होताच, रजिस्ट्रारकडून नोंदणीपत्र मिळविले पाहिजे. नाही तर त्यांना हद्दपार केले जाईल. असे नोंदणीपत्र देणे–न देणे त्या रजिस्ट्रारच्या लहरीवर आहे.
९. कोणाही आशियावासी माणसाला आपल्या ओळखीच्या खुणा देण्याची गरज नाही.	९. एखादा काफीर शिपाईसुद्धा ओळखीच्या खुणा व नोंदणीपत्र दाखविण्याची मागणी करू शकेल. या ओळखीच्या खुणा सरकारी नियमानुसार

विद्यमान	नव्या कायद्यानुसार
	वेळोवेळी ठरविल्या जातील. असे नोंदणीपत्र दाखविल्यावरही तो शिपाई त्या आशियावासियाला जवळच्या पोलिस ठाण्यावर घेऊन जाऊ शकेल. तेथे त्याची तशीच चौकशी पुनः होईल. तिने त्या अधिकाऱ्याचे समाधान झाले नाही तर तो त्या आशियावासियाला रात्रभर कोठडीत कोंडून ठेवू शकेल.
१०. एखादा आशियावासी फी भरून, पण परवाना दाखल न करता, व्यापाराचा परवाना मागू शकेल.	१०. नोंदणीपत्र व नियमाने ठरविलेली ओळखीची लक्षणे दाखल केल्याशिवाय आशियावासियाला तसा परवाना मिळणार नाही. म्हणून, एखाद्या आशियावासियाच्या पेढीत भागीदार असतील तर, त्या सर्वांनी आपल्या कचेरीत हजर राहिले पाहिजे, असा आग्रह परवाना अधिकारी धरू शकेल. आणि त्यांना परवाना देण्यापूर्वी त्यांची अपमानास्पद तपासणी करू शकेल.
११. कोणाही आशियावासियाला दुसऱ्या कोणत्याही आशियावासी माणसाला आपल्या नोकरीवर ठेवता येते.	११. कोणाही आशियावासियाने १६ वर्षांखालील आशियावासियाला (स्वतः-च्या मुलालाही) बिगर परवाना या वसाहतीत आणले किंवा अशा मुलाला नोकरीस ठेवले तर त्याला भारी दंड होईल किंवा तुरुंगात पाठविले जाईल. आणि ट्रान्सवॉल्मध्ये वास्तव्य करण्याचा त्याचा स्वतःचा हक्कही रद्द होईल.
१२. सध्या रजिस्ट्रारला बरीच सत्ता आहे.	१२. रजिस्ट्रारला आशियावासियांच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर, जवळ जवळ अमर्याद सत्ता मिळेल व तो आशियावासियांचा व्यवहारतः स्वामी बनेल.

विद्यमान	नव्या कायद्यानुसार
१३. दुसऱ्याची प्रमाणपत्रे स्वतःजवळ ठेवणाऱ्या आशियावासियाला गुन्हेगार मानले जात नाही.	१३. बापाने मुलाचे प्रमाणपत्र जवळ ठेवले किंवा कोणाही आशियावासियाने अशी प्रमाणपत्रे आपल्या जवळ ठेवली तर ती टपालाने (सरकारकडे) पाठविण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे, नाहीतर त्यांना ५० पौंड दंड किंवा तो न दिल्यास तुरुंगवास मिळेल.

लक्षात घेण्यासारखे इतर मुद्दे

(१) नवा कायदा काफीर, दक्षिण आफ्रिकेतील लेकावळी प्रजा व तुर्की साम्राज्याचे खिस्ती प्रजाजन यांना लागू नाही. मात्र त्या साम्राज्यातील मुसलमान जनतेला तो लागू आहे. हिंदी लोक व त्यांचा धर्म यांचा हा बुद्धिपुरस्सर केलेला उपमर्द आहे. ते सुसंस्कृत राष्ट्राचे प्रजाजन असले तरी त्यांना गुलामाच्या दर्जास पोहोचविले आहे-- काफीर, दक्षिण आफ्रिकेतील लेकावळे व मलायी लोक यांच्याहूनही खालच्या दर्जास त्यांना नेले आहे.

(२) याने कपटाला प्रोत्साहन मिळेल. एखाद्या आशियावासी माणसाने मलायी किंवा केपमधील लेकावळे यांचे तोतये बनण्यास प्रतिबंध करणारी या कायद्यात काही तरतूद नाही, असे तो कायदा बनविणारांना वाटले असेल.

(३) निष्पाप आशियावासियांची शिकार करण्यास परवान्याच्या दलालांना यामुळे मोकळे रान मिळेल. परवाना-अधिकाऱ्यांना हे पक्के माहीत असले पाहिजे की, सर्वसाधारणपणे आशियावासी लोक अर्जाचे गुंतागुंतीचे तक्ते भरण्यास समर्थ नाहीत. कारण सरकारी खात्याचे मार्ग त्यांना माहीत नाहीत. त्यामुळे त्यांना धाकदपटशा सहज दाखविला जाईल. म्हणून, हिंदी व चिनी हे दोघे मिळून १२,००० अर्ज करतील, असे गृहीत धरल्यास, त्यांचे कमीत कमी ३६,००० पौंड हिरावून घेतले जातील. कारण प्रत्येक माणशी सरासरीने ३ पौंड फी पडेल.

असा विलक्षण कायदा आणि अशी पिळवणूक यांना मान न तुकविता आशियावासी लोक तुरुंगवास पत्करू लागले तर कोणाला आश्चर्य वाटेल ? खरोखर, ते ट्रान्सवॉलमध्ये राहात आहेत तोपर्यंत सबंध ट्रान्सवॉल हा त्यांना खडतर तुरुंग होईल. या नव्या कायद्याने आशियावासियांची जी दुःखद दुर्दशा होईल, तिच्याकडे कानाडोळा करण्यास खरोखर सत्तेचा मदच चढला पाहिजे.

इंडियन ओपिनियन, ८–६–१९०७

१३. नवा आक्षेपार्ह कायदा

बल निष्फल हिम्मतबिना,। वंश सम्प (ऐक्य) बिन व्यर्थ।
वित्त व्यर्थ विद्याबिना। अगुणे ज्ञान अनर्थ।

ता. १ सप्टेंबर, [१९०६] च्या आमच्या अंकात या कायद्याचा सारांश प्रसिद्ध केलेला आहे तरीसुद्धा आम्ही त्याचे सविस्तर भाषांतर आज येथे देत आहोत. ते वाचून लोकांना या कायद्याच्या खऱ्या स्वरूपाविषयी अचूक मत बनविता येईल. सप्टेंबरमध्ये आम्ही प्रसिद्ध केलेल्या या कायद्याच्या सारांशामध्ये व आता मंजूर झालेल्या कायद्यामध्ये काही फरक आहे व तो लक्षात घेणे अवश्य आहे. मूळच्या मसुद्यापेक्षा आता तयार झालेला कायदा अधिकच हिंदी-हित-विरोधी आहे.

(१) पुढे दिलेल्या दुरुस्त्यांसह १८८५ चा तिसरा कायदा जारी राहील.

(२) "आशियावासी" या संज्ञेचा अर्थ हिंदी, मजूर व तुर्कस्थानचे मुस्लिम प्रजाजन. मुदत-बंद मजूर म्हणून येथे आलेल्या मलायी व चिनी लोकांचा अंतर्भाव या कायद्यात नाही. (रजिस्ट्रार वगैरेंच्या व्याख्या कायद्यात दिलेल्या आहेत पण त्या येथे देत नाही.)

(३) ट्रान्सवॉलमध्ये कायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या प्रत्येक आशियावासी माणसाने आपले नाव नोंदविले पाहिजे, अशा नोंदणीला काही फी पडणार नाही.

खाली वर्णन केलेले आशियावासी लोक ट्रान्सवॉलचे कायदेशीर रहिवासी मानले जातील.

(अ) परवाना कायद्यानुसार परवाना बाळगणारा कोणताही आशियावासी, मात्र त्याने असा परवाना फसवून घेतलेला नसावा. (तात्पुरते परवाने यात धरलेले नाहीत)

(ब) ता. ३१ मे, १९०२ रोजी ट्रान्सवॉलमध्ये प्रत्यक्ष राहात असलेला कोणताही आशियावासी रहिवासी.

क) ता. ३१ मे, १९०२ नंतर ट्रान्सवॉलमध्ये जन्मलेला कोणताही आशियावासी.

(४) हा कायदा अमलात येण्याच्या दिवशी ट्रान्सवॉलचा रहिवासी असलेल्या प्रत्येक आशियावासियाने, वासाहतिक सचिवाने नेमून दिलेल्या अधिकाऱ्याकडे, विशिष्ट ठिकाणी, विशिष्ट तारखेच्या आत नोंदणीचा अर्ज केला पाहिजे. हा कायदा अमलात येण्याच्या दिवसानंतर जो कोणी आशियावासी ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश करील, त्याने या कायद्याप्रमाणे पूर्वी आपली नोंदणी केलेली नसेल तर प्रवेशानंतर ८ दिवसांच्या आत त्याने नोंदणीसाठी अर्ज केला पाहिजे.

(अ) ८ वर्षांखालील मुलाने, या कलमाप्रमाणे, अर्ज करण्याची गरज नाही.

(ब) ८ वर्षांवरील पण १६ वर्षांखालील मुलाच्या नोंदणीसाठी त्याच्या पालकाने अर्ज केला पाहिजे आणि जर तसा केला नसेल, तर त्या मुलाला १६ वर्षे पूर्ण झाल्यानंतर एक महिन्याच्या आत, त्याने स्वतः अर्ज केला पाहिजे.

(५) कायदेशीर रहिवासी असलेल्या आशियावासियांच्या अर्जाचा विचार रजिस्ट्रार करील. त्याने मंजूरी दिलेल्या अर्जाच्या प्रत्येक अर्जदाराची नोंद तो ठेवील.

जर रजिस्ट्रारने एखाद्या आशियावासियाचा अर्ज फेटाळून लावला, तर संबंधित व्यक्तीला मॅजिस्ट्रेटपुढे दाखल होण्यासाठी निदान १४ दिवसांची नोटीस तो देईल. दिलेल्या मुदतीत तो मॅजिस्ट्रेटपुढे दाखला झाला नाही किंवा दाखल होऊन, ट्रान्सवॉल-मध्ये राहण्याच्या हक्काच्या बाबतीत, तो मॅजिस्ट्रेटचे समाधान करू शकला नाही, तर त्या आशियावासियाला, तो १६ वर्षांवरील वयाचा असल्यास ट्रान्सवॉल सोडण्याचा हुकूम मॅजिस्ट्रेट देईल. उलट, तो आशियावासी ट्रान्सवॉलचा कायदेशीर रहिवासी असल्याबद्दल मॅजिस्ट्रेटची खात्री पटली तर त्याला नोंदणीपत्र देण्याचा हुकूम मॅजिस्ट्रेट रजिस्ट्रारला काढील.

(६) ८ वर्षांखालील मुलाचा पालक असलेल्या कोणाही आशियावासियाने नोंदणीचा अर्ज स्वतः केल्यास, नियमानुसार अवश्य असणारी त्या मुलाची माहिती व ओळखीच्या खुणा त्याने रजिस्ट्रारला सादर केल्या पाहिजेत. अर्जदार हा स्वतः नोंदलेला असेल तर नोंदणीपत्रावर ही माहिती लिहिली जाईल. मूल ८ वर्षांचे झाल्यानंतर, १ वर्षाच्या आत, त्याच्याशी संबंधित असलेला पालक मुलासाठी नोंदणीचा अर्ज, तो ज्या जिल्ह्यात राहातो, तेथील रेसिडेंट मॅजिस्ट्रेटच्या कचेरीत, दाखल करील.

ट्रान्सवॉलमध्ये जन्मलेल्या मुलाचा पालक जो आशियावासी असेल, त्याने ते मूल ८ वर्षांचे झाल्यानंतर १ वर्षाच्या आत त्या मुलाच्या नोंदणीसाठी अर्ज केला पाहिजे.

(अ) वर सांगितल्याप्रमाणे पालकाने अर्ज केला नाही तर व रजिस्ट्रार किंवा रेसिडेंट मॅजिस्ट्रेट यांनी सांगितले तर, पालकाने पुढे केव्हाही तसा अर्ज करावा.

(ब) पालकाने जर अर्ज केला नाही किंवा त्याने केलेला अर्ज जर नाकारण्यात आला, तर मुलाने १६ वर्षे पूर्ण झाल्यानंतर १ महिन्याच्या आत, नोंदणीचा अर्ज करावा. हा अर्ज ज्या रेसिडेंट मॅजिस्ट्रेटकडे केला जाईल तो जरूर त्या कागदपत्रांसह तो अर्ज रजिस्ट्रारकडे पाठविण्याची व्यवस्था करील. तो अर्ज नियमानुसार बरोबर आहे अशी रजिस्ट्रारची खात्री पटली, तर तो नोंदणीचे प्रमाणपत्र देईल.

(७) वर सांगितल्याप्रमाणे, जर पालकाने ८ वर्षांतील मुलाची माहिती पुरवली नसेल आणि मूल ८ वर्षांचे झाल्यानंतर त्याच्या नोंदणीसाठी अर्ज केला नसेल, तर त्या मुलास १६ वे वर्ष पूर्ण होताच १ महिन्याच्या आत त्या मुलाने अर्ज केला पाहिजे आणि रजिस्ट्रारने योग्य वाटल्यास त्याला नोंदणीचे प्रमाणपत्र दिले पाहिजे.

(८) या कायद्याप्रमाणे अवश्य तो नोंदणी-अर्ज करण्यास जो माणूस चुकेल त्याला शंभर पौंडांपर्यंत दंड, व तो न दिल्यास ३ महिनेपर्यंत साधा किंवा सश्रम तुरुंगवास, अशी शिक्षा होईल.

१६ वर्षांआतील व ट्रान्सवॉलचा कायदेशीर रहिवासी नसलेला अशा आशियावासियाला जो कोणी ट्रान्सवॉलमध्ये आणील किंवा नोकरीस ठेवील तो गुन्हेगार समजला जाईल आणि वर सांगितलेल्या शिक्षेस पात्र होईल. तसेच, त्याचे नोंदणीपत्रही रद्द होईल, आणि त्याला ट्रान्सवॉलच्या बाहेर जाण्याचा हुकूम देण्यात येईल. तो ट्रान्सवॉल सोडून गेला नाही तर, कायद्यात सांगितलेल्या दंडाला किंवा तुरुंगवासाला तो पात्र होईल.

वासाहतिक सचिवाने जाहीर केलेल्या तारखेनंतर १६ वर्षांवरील जो कोणी आशियावासी ट्रान्सवॉलमध्ये नोंदणी पत्राशिवाय आढळेल, त्याला ट्रान्सवॉलच्या बाहेर जाण्याचा हुकूम देण्यात येईल. आणि तरीही तो ट्रान्सवॉलच्या बाहेर गेला नाही तर तो दंड किंवा तुरुंगवास यांना पात्र होईल.

नोंदणीचा अर्ज करण्यास जो चुकला आहे, अशा आशियावासियाने जर चांगली व पुरेशी कारणे देऊन मॅजिस्ट्रेटचे समाधान केले, तर तसा अर्ज करण्यास मॅजिस्ट्रेट त्याला मुदत देऊ शकेल. त्या मुदतीमध्ये अर्ज करून प्रमाणपत्र मिळविण्यास जर कोणी माणूस चुकेल, तर त्याला पुनः ट्रान्सवॉल सोडण्यास बजावले जाईल. आणि त्याने तसे केले नाही तर नेहमीच्या शिक्षेस तो पात्र होईल.

(९) पोलीस-दलातील कोणताही अधिकारी किंवा वासाहतिक सचिवाने अधिकार दिलेला कोणताही माणूस, १६ वर्षांवरील आशियावासियाला आपले नोंदणीपत्र व नियमानुसार लागणारी माहिती आणि ओळखीच्या खुणा दाखविण्यास सांगू शकेल.

१६ वर्षांआतील आशियावासियाच्या बाबतीत, त्याच्या पालकांने नोंदणी-पत्र व कायद्यात सांगितलेली माहिती व ओळखीच्या खुणा दाखल केल्या पाहिजेत.

(१०) या कायद्याप्रमाणे ज्या माणसाला नोंदणीचे नवे प्रमाण-पत्र मिळाले असेल, त्याला ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश व वास्तव्य करण्याचा हक्क राहील.

(११) कायदेशीरदृष्ट्या स्वतःचे नसलेले नोंदणी-पत्र किंवा तात्पुरता परवाना, एखाद्या माणसाच्या हातात पडला, तर त्याने तो कागद रजिस्ट्रारकडे तत्काळ पोचता करावा. तसे करण्यास तो चुकला तर, ५० पौंडांपर्यंत दंड किंवा १ महिन्यापर्यंत साधा वा सक्त मजुरीचा तुरुंगवास अशा शिक्षेस तो पात्र होईल.

(१२) एखाद्या माणसाचे नोंदणी-पत्र हरवले तर त्याने नवीन नोंदणी-पत्र मिळविण्यासाठी रजिस्ट्रारकडे अर्ज करावा. नियमानुसार जरूर असणारी माहिती त्या अर्जात दिलेली असावी आणि त्यावर ५ शिलिंगांचे तिकीट लावलेले असावे.

(१३) गॅझेटमध्ये प्रसिद्ध झालेल्या तारखेनंतर, कोणाही आशियावासियाला, आपले नोंदणी-पत्र हजर केल्याशिवाय आणि नियमात सांगितलेली माहिती व ओळखीच्या खुणा पुरविल्याशिवाय रेव्हेन्यू लायसेन्स वटहुकुमाप्रमाणे किंवा नगर-पालिकेच्या क्षेत्रात चालू असलेल्या पोट-नियमाप्रमाणे, व्यापाराचा परवाना मिळणार नाही.

(१४) एखाद्या आशियावासियाच्या वयाबद्दल संशय उत्पन्न झाला, तर त्याचे जे वय, रजिस्ट्रारला दिसेल, तेच त्याचे वय, अन्यथा सिद्ध होईपर्यंत, मानले जाईल.

(१५) या कायद्याप्रमाणे जे प्रतिज्ञा-पत्र दाखल करावे लागेल, त्याला स्टॅम्प ड्यूटी लागणार नाही.

(१६) नोंदणीच्या अर्जाबाबत किंवा नोंदणीचे प्रमाणपत्र मिळविण्याबाबत जो कोणी फसवेगिरी करील, अथवा अशा कृत्यासाठी किंवा पत्रकासाठी दुसऱ्याला चिथावणी किंवा मदत देईल, अगर नोंदणीचे प्रमाणपत्र खोटे तयार करील, किंवा कायदेशीरदृष्ट्या स्वतःचे नसलेले वा खोटे प्रमाणपत्र, स्वतःचे म्हणून वापरील अथवा इतरांना तशी बनावट पत्रे वापरावयास लावील तो ५०० पौंडांपर्यंत दंड किंवा २ वर्षा-पर्यंत साधा वा सश्रम तुरुंगवास अशा शिक्षेस पात्र होईल.

(१७) वासाहतिक सचीव आपल्या पूर्ण अखत्यारात कोणाही आशिया-वासियाला मर्यादित मुदतीपुरताच परवाना देऊ शकेल. अशा परवान्यांना ९ व्या कलमातील तरतुदी लागू आहेत. हा कायदा अमलात येण्यापूर्वी दिलेल्या तात्पुरत्या परवान्यांनाही हा कायदा लागू होईल. तात्पुरता परवाना धारण करणाऱ्या माणसाला मद्य-सेवनाच्या निर्बंधातून माफी मिळेल. या कायद्याखाली न येणाऱ्या कोणाही आशिया-वासियाला अशी माफी वासाहतिक सचीव देऊ शकेल.

(१८) पुढे दिलेल्या कारणांपैकी कोणत्याही कारणासाठी गव्हर्नर वेळोवेळी नियम बनवू शकेल किंवा रद्द करू शकेल.

१. या कायद्याप्रमाणे ठेवावयाच्या नोंदणीपत्राचा नमुना ठरविणे.

२. नोंदणीसाठी करावयाचा अर्ज, त्यासाठी द्यावी लागणारी माहिती व ओळखीच्या खुणा यांची पद्धत व तक्ता तयार करणे.

३. नोंदणीच्या प्रमाण–पत्राचा नमुना ठरविणे,

४. ८ वर्षांखालील मुलाच्या पालकाने द्यावयाची माहिती व ओळखीच्या खुणा ठरविणे, ९ व्या कलमाप्रमाणे नोंदणीचे प्रमाण–पत्र ज्याने दाखल करावयास हवे अशा आशियावासियाची माहिती व खुणा ठरविणे, तसेच ज्याचे नोंदणीपत्र हरवले आहे किंवा नष्ट झाले आहे, अशा आशियावासियाने नव्या प्रमाणपत्राचा अर्ज करताना दाखल करावयाची माहिती किंवा खुणा ठरविणे, आणि व्यापाराच्या परवान्यासाठी अर्ज करणाऱ्या कोणाही आशियावासियाने द्यावयाची माहिती व खुणा ठरविणे.

५. या कायद्याच्या १७ व्या कलमाप्रमाणे देण्यात येणाऱ्या परवान्याचा नमुना ठरविणे.

(१९) या कायद्याप्रमाणे अवश्य त्या गोष्टी करण्यास जो आशियावासी चुकेल तो, किंवा त्याचा पालक, अन्यथा निर्दिष्ट केले नसेल तर, १०० पौंडांपर्यंत दंड किंवा ३ महिनेपर्यंत साधा वा सश्रम तुरुंगवास अशा शिक्षेस पात्र होईल.

(२०) चिनी लोकांसाठी असलेला नोकरीचा कायदा (लेबर इम्पोर्टेशन आर्डिनन्स्) आशियावासियांना लागू होणार नाही.

(२१) १८८५ चा (३ रा) कायदा अमलात येण्यापूर्वी ज्या आशिया-वासियाने आपल्या नावाने जमीन घेतली असेल, त्याच्या वारसाचा त्या जमिनीवर हक्क राहील.

(२२) बादशहांनी संमती देईपर्यंत, व ती संमती गॅझेटमध्ये प्रसिद्ध होईपर्यंत, हा कायदा अमलात येणार नाही.

या कायद्याचे परिणाम

हा भयानक कायदा मान्य करण्यास कोणीही हिंदी माणूस तयार नाही, हे हिंदी समाजाचे सुदैव होय. तरीही, आतापर्यंत हिंदी लोक जी दशा सहन करीत आले आहेत, त्यापेक्षा, यापुढे त्यांची दुर्दशा कशी होईल, हे आम्ही पुढे दाखवीत आहोत.

त्यामुळे ज्या हिंदी लोकांचा दृढनिश्चय झालेला आहे, त्यांचा तो दृढतर होईल, आणि ज्यांच्या चित्तात चलबिचल होत आहे, त्यांचे संशय दूर होतील व ते सर्वजण या कायद्याच्या कचाट्यातून स्वयंस्फूर्तीने बाहेर पडतील, स्वतंत्र राहतील आणि आपण वीरपुरुष असल्याचे सिद्ध करतील.

(१) हा नवा कायदा हिंदी लोकांना लागू आहे, मलायी लोकांना नाही.

(२) काफीर व केप-लेकावळे यांना हा लागू नाही.

(३) हा तुर्की-खिश्चनांना लागू नाही पण तुर्की-मुसलमानांना लागू आहे.

(४) सध्याच्या काळी आपल्या अंगठ्याचा ठसा असलेला, परवाना धारण करणारा, प्रत्येक हिंदी माणूस हा कायदेशीर रहिवासी आहे, नव्या कायद्याप्रमाणे त्याचा हा हक्क नाहीसा होतो, त्याने नव्या परवान्यासाठी अर्ज करतेवेळी पूर्वीचा खरा परवाना आपण कसा मिळविला, हे दाखविले पाहिजे.

(५) सध्याचे परवाने, ते धारण करणाऱ्याच्या संमतीशिवाय, बदलता येत नाहीत, नव्या कायद्याप्रमाणे द्यावयाचे परवाने, सरकारच्या मर्जीप्रमाणे बदलले जातील.

(६) हिंदी लोकांना सध्याच्या परवान्यांमुळे, ऑरेंजरिव्हर वसाहतीत प्रवेश व वास्तव्य करण्याचा हक्क आहे—त्याचा काही उपयोग आहे की नाही हा प्रश्न नाही- नव्या कायद्याप्रमाणे ऑरेंजरिव्हर वसाहतीचे नाव परवान्यातून वगळण्यात आले आहे.

(७) सध्या ऑरेंजरिव्हर वसाहतीत राहण्याचे परवाने धारण करणाऱ्या हिंदी लोकांना, त्या परवान्याच्या आधारे, ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश करता येतो. नव्या कायद्या-प्रमाणे, त्यांना तसे करता येणार नाही.

(८) सध्या कोणाही हिंदी माणसाला, परवाना मिळविण्यासाठी, आपल्या अंगठ्याचा ठसा किंवा सही द्यावी लागत नाही. नव्या कायद्याप्रमाणे, सरकार, आपल्या मर्जीप्रमाणे, नियम बनवून किंवा बदलून, सही किंवा अंगठ्याचा ठसा देणे, अथवा दुसरी कोणतीही गोष्ट करणे, सक्तीचे करू शकेल.

(९) सध्या फक्त परवाना—चिटणिसालाच परवाना तपासण्याचा अधिकार आहे, नव्या कायद्याप्रमाणे, प्रत्येक काफीर पोलिसाला तो अधिकार आहे.

(१०) नव्या कायद्याप्रमाणे, काफीर पोलीस (आशियावासियाला) त्याचे नाव, गाव व ओळख विचारू शकेल, आणि आपले समाधान न झाल्यास, तो त्याला पोलीस ठाण्यावर नेऊ शकेल. पोलीस—ठाण्यावरील अधिकाऱ्याचे समाधान न झाल्यास, तो त्या आशियावासियाला कोठडीत डांबू शकेल आणि दुसऱ्या दिवशी मॅजिस्ट्रेटपुढे उभे करील. विद्यमान कायद्याप्रमाणे सांप्रत असे काही होऊ शकत नाही.

(११) सध्या एका दिवसाच्या मुलाला परवाना लागत नाही, आणि त्याचे नाव व ओळख विचारण्यास कोणी धजत नाही. नव्या कायद्याप्रमाणे अशा मुलाच्या पालकाने आपल्या नोंदणी–पत्रावर त्या मुलाच्या खाणाखुणा नोंदवल्या पाहिजेत–मग ते मूल कितीही लहान असो.

(१२) सध्या ८ वर्षांवरील आशियावासी मूल स्वतंत्र असते. नव्या कायद्याप्रमाणे, वर सांगितलेली माहिती नोंदविल्यानंतरही, पालकाने रजिस्ट्रारकडे गेले पाहिजे आणि ओळखीच्या खुणा वगैरे देऊन नोंद–पत्र घेतले पाहिजे. हे करण्यास जो चुकेल तो शिक्षेस पात्र होईल.

(१३) सध्या ट्रान्सवॉलमध्ये असलेल्या आशियावासी मुलांना परवान्याशिवाय राहण्याचा हक्क आहे आणि सज्ञान झाल्यावरही त्यांनी हा देश सोडून गेले पाहिजे, असे नाही. नव्या कायद्याप्रमाणे, अशा सर्व मुलांनी रजिस्ट्रारकडून नोंदणीची प्रमाणपत्रे मिळविली नाहीत, तर त्यांना हद्दपार केले जाईल, आणि तशी प्रमाण-पत्रे देणे, हे त्या रजिस्ट्रारच्या मर्जीवर आहे.

(१४) सध्या १६ वर्षांखालील मुलाला परवान्याशिवाय आशियावासी माणूस आपल्याबरोबर आणू शकतो, नव्या कायद्याप्रमाणे, असे करणारा आशियावासी सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरतो, आणि त्याचे नोंदणीपत्रही रद्द होण्यास पात्र ठरते.

(१५) सध्या परवाना न दाखविता, व्यापाराचा परवाना आशियावासी मिळवू शकतो. नव्या कायद्याप्रमाणे, त्याला नवे नोंदणी पत्र, नाव, गाव वगैरे, आणि ओळखीच्या खुणा दाखल कराव्या लागतील. याचा अर्थ असा की, एखाद्या हिंदी दुकानात काही भागीदार असले, तर त्या सर्वांनी हजर राहिले पाहिजे अशी सक्ती परवाना–अधिकारी करू शकेल. ते हजर न राहिल्यास तो परवाना देण्याचे नाकारू शकेल.

(१६) सध्या रजिस्ट्रारची सत्ता तुलनेने मर्यादित आहे. नवा कायदा हिंदी लोकांनी मान्य केल्यास, रजिस्ट्रार हा व्यवहारतः त्यांचा स्वामी बनेल.

(१७) नव्या कायद्याप्रमाणे, प्रत्येक हिंदी माणसाने नोंदणीसाठी अर्ज करणे सक्तीचे आहे. स्वतः अर्ज करू शकतील असे हिंदी लोक विरळा. आतापर्यंत परवान्यांच्या दलालांनी खूप कमाई केली आहे, पण हिंदी लोकांनी जर या नव्या कायद्याला मान तुकविली तर त्या दलालांना मोकळे रान मिळेल आणि एखाद्या वारुळातून सापांचे थवे जसे बाहेर पडावेत तसे द्रव्याचे लोट त्यांच्या हातात धावत येतील. कमीत कमी १०००० हिंदी लोक अर्ज करतील आणि सरासरीने प्रत्येकाला ३ पौंड फी द्यावी लागेल. म्हणजे हिंदी लोकांचे ३०,००० पौंड लुबाडले जातील.

(१८) अशा जुलमी कायद्याला मान देऊन जे कोणी नोंदणी-पत्रे मिळवितील किंवा ती मिळविण्यास इतरांना भाग पाडतील, ते वरील प्रकारचे द्रव्य-शोषण करून हिंदी लोकांचे रक्त सांडतील.

अशा कायद्यामुळे ज्याचे मन क्षुब्ध होत नाही, असा एक तरी हिंदी माणूस असेल काय ? ज्या हिंदी माणसाचे रक्त उकळत नसेल, असा कोणी आहे का ? हे जाणण्याची आम्हांला फार इच्छा आहे. अशा कायद्याला कोणताही हिंदी माणूस शरण जाईल यावर आमचा विश्वास बसत नाही. हा नवा कायदा म्हणजे गुलामगिरीचे शेवटचे टोक होय. त्यामुळे कोणा हिंदी माणसाचा काही फायदा होणार असला तरी त्याला तो संमती देणार नाही–उलट सर्वस्वाने त्याचा प्रतिकार करील, अशी आम्हांला दृढ आशा आहे. मि. कॅलेनबॅक[1] यांनी जे लिहिले आहे, ते अगदी खरे आहे-- " अशा कायद्याला आपण संमती दिली तर आपण त्याला पात्र आहो. "[2] हे प्रत्येकाला पटेल. हा कायदा हिंदी लोकांचा केवळ उपमर्द करतो असे नाही; तर हिंदु व मुसलमान या दोघांच्याही धर्मावर शिंतोडे उडवितो हे ध्यानात घेतले पाहिजे. कारण, जे हिंदु व मुसलमान हिंदुस्थानातून इकडे येतात, ते साहजिकच आपापल्या धर्माप्रमाणे चालतात; परंतु तुर्कस्तानातील (हा यूरोपचा भाग समजला जातो.) मुसलमानांनाही हा खोडसाळ कायदा लागू केलेला आहे. जणु काही हिंदुस्थानातील नसलेले मुसलमान यातून वगळले, तर ट्रान्सवॉलच्या सरकारवर आकाश कोसळेल. तुर्कस्तानातील ख्रिस्ती लोकांना या कायद्याने हात लावलेला नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ८–६–१९०७

१४. समितीची चूक

'दक्षिण आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमिटीने' जनरल बोथा यांच्याशी जो पत्रव्यवहार केला, तो फार चांगला आहे, आणि त्यात प्रत्येक मुद्द्याचा विचार केलेला

१. जर्मन शिल्पकार, श्रमजीवी जीवनाच्या गांधीजींच्या प्रयोगातील सहकारी व मित्र. दक्षिण आफ्रिकेतील सविनय प्रतिकाराच्या चळवळीत अटक. " दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह " प्र. :–२३, ३३, ३४ व ३५ पाहा.

२. " जोहान्सबर्गचे बातमीपत्र " लेखांक १८ पाहा.

आहे. या समितीने इतके कार्य केले आहे आणि ते इतके चांगले केले आहे की, सर मंचरजी,[१] मि. रिच्[२] व समितीचे इतर सभासद, यांचे पुरेसे आभार आम्ही मानू शकत नाही. समितीने आपल्या पत्रव्यवहारामध्ये जी एक चूक केली आहे, ती दाखविताना आम्हांला काहीशी साशंकता वाटते. पण ती दाखविणे हे आमचे कर्तव्य आहे. त्या चुकीमुळे समितीचे महत्त्व कमी होत नाही; तिचा अर्थ एवढाच की, प्रत्येक मनुष्य चुकीस पात्र आहे. ती चूक ही की, हिंदी लोकांनी, आपल्या इच्छेनुसार, अंगठ्याच्या ठशाऐवजी आपले फोटो जोडावेत ही सूचना. फोटो जोडावेत की नाही हे हिंदी लोकांवर सोपविलेले असले, तरी अशी सूचनाही समितीने करावयास नको होती, असे आमचे मत आहे. शिवाय, समितीच्या पत्रव्यवहारावरून असा भास होतो की, अंगठ्याचे ठसे देणे हेच काय ते नव्या कायद्याला विरोध करण्याला एकमेव– किंवा सर्वांत प्रमुख–कारण आहे. वस्तुतः विरोधाच्या अनेक कारणांपैकी अंगठ्याचे ठसे हे फक्त एक कारण आहे. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नव्या कायद्याने केलेली नोंदणीची सक्ती. तिच्यामुळे हिंदी समाजाला कलंक लागत आहे, आणि तो समाज हलक्या दर्जाचा ठरत आहे.

तथापि, या चुकीमुळे काही नुकसान होण्याचा संभव नाही. बिलाविरुद्ध लढा चालू असताना, अशी चूक झाली नाही. बिलाला असे स्वरूप प्राप्त झाल्यानंतर, समितीच्या सूचनेचा प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव नाही. कारण आता हे प्रकरण हिंदी जमातीच्या हातामध्ये आहे. हिंदी जमातीला हा कायदा खरोखर नापसंत असेल, तर ती त्याला मान्यता देणार नाही–– मग त्यामुळे तिच्यावर कितीही संकटे कोसळोत– ती मान्यता न दिल्यामुळे भोगावा लागणारा तुरुंगवास ती जमात सोशील–– आणि तसे करताना त्यात सुख मानील, कारण तिच्या स्वाभिमानाचे संरक्षण त्यामुळे होईल.

नवा कायदा न जुमानण्याचा हिंदी जमातीचा निर्धार पाहून, मि. रिच म्हणतात त्याप्रमाणे, काही सभासद समितीतून बाहेरही पडतील. मि. रीज[३] यांनी तसे केलेही आहे. असे सभासद आपल्याला त्या अपमानास्पद कायद्यापुढे शरण जाण्याचा सल्ला देण्याचा संभव आहे. तरीसुद्धा आपण घाबरता कामा नये. कारण नव्या कायद्याला मान्यता न देणे, हे हिंदी जमातीला सत्कृत्य वाटत आहे, आणि सत्कृत्य करताना,

१. (१८५१–१९३३). हिंदी बॅरिस्टर, पार्लमेंटचे सदस्य, तसेच हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेसच्या ब्रिटिश कमिटीचे सभासद. पाहा खंड. २, पृष्ठ-३६१.

२. साउथ आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमेटीचे चिटणीस.

३. जे डी. रीज्, खंड. ६, लेखांक ४१८ पाहा.

आपण कोणाचेही भय बाळगण्याचे कारण नाही. ईश्वर सज्जनांचा वाली आहे, हे ध्यानी धरून ट्रान्सवालमधील हिंदी लोकांनी स्वतः निवडलेला सन्मार्ग कायम ठेवावा.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ८–६–१९०७

१५. केपटाऊनमधील हिंदी लोक

यापुढील काळात केपटाऊनमधील हिंदी लोकांची स्थिती फार वाईट होण्याचा संभव आहे, असे आम्हांस दिसते. मेफिकेंगहून आलेले एक पत्र या अंकात अन्यत्र प्रसिद्ध केले आहे, त्याकडे केपटाऊनमधील प्रत्येक हिंदी पुढाऱ्याचे लक्ष आम्ही वेधतो. केपटाऊनच्या कायद्यातील सर्वांत वाईट कलम म्हणजे जो हिंदी माणूस पासाशिवाय केपटाऊनच्या बाहेर जाईल, तो तेथे परत जाऊ शकणार नाही; असा पास एक वर्षच चालेल. शेकडो हिंदी लोकांना पास काढण्याची माहितीच नाही, आणि तो पास काढला, तरी प्रत्येकजण एका वर्षाच्या आत पासासह परत येऊ शकणार नाही. या कायद्याचा परिणाम बहुधा असा होईल की, पुढील ५ वर्षांत हिंदी लोक बाडबिस्तान्यासह केपटाऊन-मधून बाहेर पडलेले असतील. या प्रश्नाचा विचार केपटाऊनमधील हिंदी पुढारी खोलवर करतील आणि योग्य तो मार्ग आखतील, अशी आम्हांला मनापासून आशा वाटते.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ८–६–१९०७

१६. मरहूम मि. कार्ल ब्लाइंड[1]

मि. कार्ल ब्लाइंड मृत्यु पावल्याची बातमी सागरी तारेने आली आहे. हे सद्-गृहस्थ एक सुप्रसिद्ध जर्मन होते. त्यांचा जन्म १८२६ मध्ये झाला. १८४७ ते १८४९

१. जर्मन क्रांतिकारक; इंग्लंडमध्ये वास्तव्य करून राजकीय स्वातंत्र्याचा पुरस्कार यांनी केला.

पर्यंत स्वातंत्र्यासाठी व इतर लोकांच्या हक्कासाठी त्यांनी ५ वेळा तुरुंगवास सोसला. आपल्या सरकारला विरोध केल्याबद्दल त्यांना अशा प्रकारे तुरुंगवास सोसावा लागला. एकदा तर एका सार्वजनिक कार्याप्रीत्यर्थ त्यांना फाशीचीही शिक्षा झाली होती, पण ती टळली. पुढे त्यांनी पुनः ८ वर्षे तुरुंगवास सोसला. शेवटी लोकांनी आपले वजन खर्ची त्यांची मुक्तता केली. हा थोर पुरुष मॅझिनी व गॅरिबाल्डी[1] यांचा मित्र होता. त्यांनी जपानला रशियाविरुद्ध लढण्यास मदत केली. ते अत्यंत विद्वान होते. त्यांनी पुष्कळ ऐतिहासिक ग्रंथ लिहिले आहेत. हिंदुस्थानाबद्दल त्यांना प्रेम वाटत होते. दुसऱ्या माणसांची दुःखे ही स्वतःची मानून तुरुंगवास सोसणारे आणि फाशीलाही तोंड देणारे, असे विद्वान लोक आपल्याला सध्याच्या काळी फार उपयोगी पडण्यासारखे आदर्श होत.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ८-६-१९०७

१७. हिंदु विधवा काय करू शकतात ?

हिंदुस्थानात संपत्तीचा पुष्कळ अपव्यय होतो, हे कोणालाही दिसून येण्यासारखे आहे. या वाया जाणाऱ्या संपत्तीत अनेक गोष्टी येतात. खनिज पदार्थांकडे कोणी पाहात नाही. आमचा कापूस परदेशाला निर्यात केला जातो, आणि तेथून कापड आयात केले जाते. एक टाचणीसुद्धा बाहेरून यावी लागते. आमच्या भौतिक संपत्तीची जी अवस्था, तीच मानवी संपत्तीचीही. कैक बुवा व फकीर भिक्षेवर जगत असतात, पण ते स्वतःची किंवा देशाची काहीच सेवा करीत नाहीत. कारण अशा प्रकारे भीक मागण्याने त्यांनी खऱ्या संन्यासधर्माचे आचरण केले, असे होत नाही. त्याचप्रमाणे हजारो विधवा–विशेषतः हिंदु विधवा– आपले जीवन वाया घालवितात, व त्या प्रमाणात हिंदुस्थानच्या संपत्तीचा अपव्यय होतो. हा अपव्यय टाळण्यासाठी, पुण्याचे परोपकारी प्रो. कर्वे[2] यांनी आपले सारे जीवन राष्ट्राला वाहिले आहे. पोटापुरता पगार घेऊन ते फर्ग्यूसन कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम करीत आहेत, एवढेच नव्हे तर विधवांना

१. (१८०७-१८३२). इटालियन देशभक्त व स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणारे.
२. प्रो. के. कर्वे (१८६८-१९६२). पुणे महिला विद्यापीठाचे संस्थापक.

शिक्षण देण्यासाठी त्यांनी पुण्यामध्ये एक संस्था कैक वर्षे चालविली आहे. तेथे स्त्रियांना शुश्रूषा व सुईण-काम यांचे शिक्षण दिले जाते. संस्थेचे कार्य विकास पावत आहे. ते स्वतः पै न घेता ही सेवा करतात, आणि त्यामुळे इतरांकडून तसेच सहाय्य मिळवू शकतात. सौ. काशीबाई देवधर, सौ. नामजोशी, सौ. आठवले व सौ. देशपांडे या सर्वांनी इंग्रजीचे उत्तम शिक्षण घेतलेले आहे, आणि संस्थेची मोफत सेवा करीत आहेत. शिवाय कर्वे हे निधी गोळा करण्यासाठी गावोगाव हिंडत आहेत. केवळ स्वावलंबनाने, सरकारी मदतीविना, करता येण्यासारख्या कितीतरी गोष्टी असतात. कोणत्याही दृष्टीने विचार केला तरी, शिक्षण हे आपल्याला फार महत्त्वाचे आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ८-६-१९०७

१८. जोहान्सबर्गचे बातमीपत्र : नवा कायदा

हा कायदा गॅझेटमध्ये अद्याप प्रसिद्ध झालेला नाही. अजून साम्राज्य सरकार त्याचा विचार करीत आहे; अशा आशयाच्या तारा इंग्लंडहून येत आहेत. उमरावांच्या सभेत लार्ड अॅम्प्थिल्[१] यांनी जेव्हा चर्चेस सुरुवात केली, तेव्हा लॉर्ड लॅन्सडाउन[२] म्हणाले, ट्रान्सवॉलमध्ये थोडे हिंदी लोक चोरून शिरले, तर जे नुकसान होईल, त्यापेक्षा सर्व हिंदी जनतेच्या भावना दुखविणे, हे अधिक नुकसानीचे व अविचाराचे होईल. उत्तरादाखल भाषण करताना, लॉर्ड एल्जिन[३] म्हणाले, " या कायद्यावर सही करणे मलाही पसंत नाही. " याचा अर्थ असा की, हिंदी लोकांनी या कायद्याला मान्यता देऊ नये. ज्या कायद्यावर इतके जोराचे वादळ माजले आहे, आणि ज्याचा इतका धिक्कार केला जात आहे, अशा कायद्याला हिंदी जमातीने मान्यता देणे, ही अत्यंत मानहानीची गोष्ट होईल.

१. (१८६९-१९३६). मद्रासचे गव्हर्नर (१८९९-१९०६). हिंदुस्थानचे व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरल म्हणून काम केले (१९०४). पाहा " लॉर्ड ॲम्प्थिल् " ले. ४२.

२. (१८४५-१९२७). हिंदुस्थानचे व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरल (१८८८-९३). परराष्ट्र-मंत्री (१९००-१९०६).

३. वसाहत-मंत्री (१९०५-८)

ट्रान्सवॉल कायद्याचे परिणाम

या कायद्याचे परिणाम केवळ येथेच जाणवले जातील असे नाही. त्याचे परिणाम यापूर्वीच जर्मनी, पूर्व आफ्रिकेपर्यंतही जाऊन पोचले आहेत. तेथील जर्मन लोकांना हिंदी व्यापाऱ्यांचा पुरेपूर फायदा घेण्याची इच्छा आहे, पण त्याच्या मोबदल्यात त्यांचा काही फायदा करून देण्याची इच्छा नाही. काही जर्मन लोकांनी अशी भीती व्यक्त केली की, हिंदी व्यापाऱ्यांचा छळ झाला तर, ब्रिटिश सरकार कदाचित हस्तक्षेप करील. जर्मन पार्लमेंटच्या एका सदस्याने उत्तरादाखल बोलताना असा प्रश्न केला की, ट्रान्सवॉलच्या बाबतीत हस्तक्षेप न करणारे ब्रिटिश सरकार, जर्मनांच्या बाबतीत तसे कसे करील? यावरून एकच धडा घेता येण्यासारखा आहे. नव्या कायद्याला हिंदी जमातीने मान्यता दिली की, हिंदुस्थानाबाहेरील सर्व प्रदेशातील हिंदी जमातींचे आसन उद्ध्वस्त होईल, असे धरून चालण्यास हरकत नाही. त्यानंतर, हिंदुस्थानाबाहेरील देशांत तेच हिंदी लोक राहू शकतील, की जे कोणतीही प्रतिष्ठा नसली तरी केवळ मजुरी करून, आपले पोट भरतात.

गोऱ्या पुढाऱ्यांचा सल्ला

ट्रान्सवॉल पार्लमेंटच्या एका प्रमुख सभासदाशी माझी भेट झाली. तुरुंगाच्या ठरावासंबंधी मी त्याला त्याचे मत विचारले, तेव्हा त्याने तत्काळ उत्तर दिले, "तुम्ही तुरुंगात गेला तर अधिक काही करण्याची गरज नाही." आपल्या जमातीविषयी आणि आपल्या प्रतिष्ठेविषयी हिंदी लोक इतकी जागरूकता व धडाडी दाखवितील, अशी त्याची अपेक्षा नव्हती. आपण जर ऐक्य राखून तुरुंगाच्या ठरावाशी एकनिष्ठ राहिलो, तर आपल्याला शक्य ते सर्व साह्य करण्याचे अभिवचन त्या सभासदाने मला दिले; शिवाय त्याने असेही सांगितले की, इंग्लंडमधील सर्वच्या सर्व उदारमतवादी पक्ष तुमच्या मदतीस धावून येईल आणि नवा कायदा रद्द होईल. "हजारो माणसे फासावर चढविणे किंवा तुरुंगाच्या गजाआड डांबून ठेवणे हे शक्य नाही." हे महान् आंग्ल लेखक बर्क यांचे वचन त्याने उद्धृत केले.

एका गोऱ्या व्यापाऱ्याचे मत

एका गोऱ्या व्यापाऱ्याने पोक्त सल्ला देण्याची जबाबदारी स्वतःच आपल्या शिरावर घेतली आणि सांगितले की, हिंदी जमातीने या कायद्याला मान्यता द्यावी. त्याच्या पूर्वजांनी जो लढा दिला, त्याचे फळ म्हणून आता, तो सुखासमाधानात राहात आहे. त्याचा अर्थ "इतर लोकही सुखासमाधानात आहेत, असे तुम्ही आपल्यावरून समजता की काय?" असा सवाल त्याला टाकण्यात आला. त्याचा जबाब तो देऊ शकला नाही. शेवटी मी त्याला एका बड्या गिऱ्हाइकासमोर विचारले, "समजा, तुमचा गिऱ्हाईक

आपल्या जमातीसाठी सर्वस्वाचा होम करून तुरुंगात गेला, तर तो तुरुंगातून सुटून आल्यावर त्याच्याविषयी तुम्हांला अधिक आदर वाटणार नाही काय? त्याला तुम्ही अधिक सढळ साह्य करणार नाही काय?" याला त्याने उत्तर दिले, "अलबत्, तसे खास होईल. पण तुमच्या लोकांच्या अंगी इतके धैर्य आहे काय?" शेवटी, याचा अर्थ असा निघतो की, हिंदी नाणे हे सध्या बाजारात खोटे समजले जाते, आणि म्हणून हिंदी माणसाला खोट्या नाण्याचे मोल आलेले आहे.

"दी स्टार" ला पत्र

जनरल बोथा परत आलेले असल्यामुळे व या कायद्याविरुद्ध इंग्लंडमधील समितीचा लढा अद्याप चालू असल्यामुळे, श्री. गांधी यांनी "दी स्टार"ला पुढील पत्र पाठविले आहे[१] :

जनरल बोथा हे परत आले आहेत. आशियावासियांच्या नोंदणीचा कायदा अजून साम्राज्य सरकार व स्थानिक सरकार यांच्या पत्रव्यवहाराचा विषय आहे. या दोन कारणांमुळे आपल्या सौजन्याला –आणि आपल्यामार्फत या वसाहतीतील नागरिकांच्या सौजन्याला– आवाहन करण्यास मला प्रोत्साहन मिळाले आहे. आता, आशियाविरोधी पक्षाला जे पाहिजे, ते मिळालेले आहे. मग समंजस तडजोड होणे अशक्य आहे काय? तशी तडजोड झाली म्हणजे, हिंदी लोकांना गुन्हेगारासारखे वागविणारा हा नवा कायदा नाहीसा करणे, अशक्य आहे काय? अद्याप तो कायदा प्रसिद्ध झालेला नाही– आणि होण्याची गरज पण नाही. म्हणून मी असे सुचवितो की, नव्या परवान्यासाठी एक तक्ता दोघांच्या संमतीने तयार करण्यात यावा, आणि त्यास अनुसरून हिंदी व इतर आशियावासी लोक यांनी आपल्याजवळील योग्य ते कागदपत्र देऊन नव्याने आपली नोंदणी करून घ्यावी. अशा प्रकारे जर सर्व आशियावासी लोक आपापले कागदपत्र स्वेच्छेने दाखल करतील, तर कोणत्याही मानहानीला शरण जाण्याचे कारण त्यांना पडणार नाही. तथापि या वसाहतीत, असे कागदपत्र दाखल न करणारे आशियावासी लोक निघाले, तर हा कायदा तत्काळ जाहीर करता येईल, आणि एखाद्या खोट्या बिल्लाने तो त्या लोकांना लागू करता येईल. अशा प्रकारे, खरे परवाने धारण करणारे प्रामाणिक लोक हे अपराधी माणसाहून आपोआपच वेगळे पडतील.

या माझ्या सूचनेत आपल्याला काही दोष दिसतो की काय हे मला माहीत नाही. आता या कायद्याचा उद्देश, परवान्याचा चोरटा व्यापार थांबावा हा नसून, खरे आणि खुले बोलावयाचे तर, हिंदी व अन्य आशियावासी लोक यांना निष्कारण कलंक लावणे हाच आहे, असे जर आपल्याला वाटत असेल तर गोष्ट निराळी. असा उद्देश

१ गुजरातीं मजकुराशी जुळते करून घेण्यासाठी पत्राच्या मूळ मजकुरात काही बदल करण्यात आला आहे. 'दी स्टार'ला पत्र खंड ६, लेखांक ४८४ पाहा.

आहे की नाही हे सांगण्यापूर्वी आपल्याला मी लार्ड ॲम्पथिल् यांच्या पुढील वचनांची आठवण करून देतो :

" ही गोष्ट केवळ आपल्या लौकिकाची हानी करणारी आहे, असे नव्हे. हिंदी लोकांना बंधुत्वाच्या नात्याने सर्वार्थाने वागविण्यास आपण वचनबद्ध आहो. तसे वचन आपल्या बादशहांनी गंभीरपणे दिलेले आहे, आपल्या मुत्सद्द्यांनी जाहीर भाषणात दिलेले आहे आणि भारतासारख्या प्रचंड राष्ट्राच्या राज्यकारभाराची जी पद्धत आपण ठेवलेली आहे, तिचा एकूण भावार्थही तोच आहे. साम्राज्याच्या नागरिकत्वाचा अभिमान बाळगण्यास आपण त्यांना आवाहन करतो. आपण त्यांना पुनःपुनः सांगतो कीं, हिंदुस्थानात इंग्रज लोक ज्या स्थानावर असतात, तेथपर्यंत पोचण्याला तुम्हांला काहीही आडकाठी नाही. आपल्या वाणीने आणि आपल्या करणीने, आपण त्यांच्या मनावर असे बिंबवितो की, पृथ्वीच्या कोणत्याही कोनाकोपऱ्यात, ब्रिटिशांच्या निशाणाखाली, तुम्ही राहत असला, तरी तुम्हांला ब्रिटिश नागरिक म्हणून वागविले जाईल. "

लॉर्ड लॅन्स्डाऊन यांना या कायद्यामुळे स्वतः अत्यंत अपमानित झाल्यासारखे वाटते. ते असा प्रश्न करतात की, ट्रान्सवॉलमधील परिस्थितीपेक्षा अखिल हिंदी राष्ट्राच्या भावना दुखविणे, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न नाही काय ? पण मी वर जी योजना सुचविली आहे, त्यामुळे ट्रान्सवॉलच्या परिस्थितीला कोणताही धोका पोचणार नाही. नव्या कायद्याने बिगर-परवाना प्रवेशास जितका प्रतिबंध होऊ शकेल, तितका माझ्या योजनेनेही होईल.

या पत्रात केलेली सूचना जर सरकारने स्वीकारली नाही, तर त्याचा उघड अर्थ असाच होईल की, या नव्या कायद्याचा उद्देश हिंदी जमातीचा अपमान करण्यापेक्षा दुसरा कोणताही नाही. मग, लांडगा व कोकरू यांची गोष्ट येथे लागू होईल. काही झाले तरी कोकराला गट्ट करण्याचा लांडग्याचा निश्चय झालेला आहे.

कॅलनबॅकचे साहाय्य

मि. कॅलनबॅक हे जोहान्सबर्गचे एक सुप्रसिद्ध शिल्पकार आहेत. हिंदी जमातीचे धैर्य टिकविण्यासाठी व तुरुंगात जाण्याच्या ठरावाच्या बाबतीत तिला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी 'दी स्टार'ला पुढील पत्र लिहिले आहे. हे पत्र श्री. गांधी यांच्या पत्राबरोबर प्रसिद्ध झालेले आहे.[1] ते पत्र असे :

" काही कारणामुळे मी राजकारणात भाग घेत नसलो तरी ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनी तो 'तुरुंगाचा ठराव' करून आपल्या न्याय्य हक्कांचे संरक्षण करण्या-

१. गुजराती मजकुराशी जुळते करून घेण्यासाठी यात बदल केला आहे.

साठी जो लढा सुरू केला आहे, त्याच्या निरनिराळ्या अवस्था मी आस्थेने पाहात आलो आहे.

" या विषयासंबंधी वृत्तपत्रात ज्या विविध टीका आल्या आहेत त्या आणि स्टारमधील श्री. गांधींचे पत्र मी वाचले आहे. त्यामध्ये तुरुंगाच्या ठरावाची चर्चा आलेली आहे. माझे मत असे आहे की, आशियावासियांच्या नोंदणीच्या वटहुकुमाने अशा काही अटी लादल्या आहेत की, त्या कोणाही स्वाभिमानी माणसाला अपमानास्पद वाटाव्या. तशा त्या आशियावासियांना तीव्रतेने वाटल्या नाहीत, तर ते नोंदणी कायद्याला पूर्णपणे पात्र आहेत, याचा तो रोकडा पुरावा होईल. या नव्या कायद्याने जी तीव्र मानहानी होत आहे, तिची जाणीव आपल्या देशबांधवांना करून देण्यासाठी जे लोक प्रयत्न करीत आहेत, त्यांना " चढाईखोर चळवळे " म्हणून संबोधणे हे अत्यंत अप्रशस्त आहे, असे मला वाटते. माझे स्पष्ट मत असे आहे की, नव्या कायद्यामुळे जी परिस्थिती निर्माण होईल, तिचे ज्ञान असणाऱ्या हिंदी माणसांचे हे कर्तव्य आहे की, त्यांनी आपले हे ज्ञान आपल्या प्रत्येक देशबांधवाला द्यावे, आणि त्यांचा स्वाभिमान इतका वाढवावा व बळकट करावा की, त्यांच्या एकजुटीच्या प्रयत्नाने त्या अपमानास्पद अटी नाहीशा होतील. हिंदी दुकानदारांच्या स्पर्धेचे भय बाळगून प्रत्येक " गोऱ्या माणसाने " आपल्या न्यायबुद्धीची धार बोथट करून घेतली असेल, असे मला मुळीच वाटत नाही. त्यांच्यापैकी पुष्कळजण--आणि त्यांची संख्या काही लहान नसेल--हिंदी लोकांचे कौतुक करून त्यांना पूर्ण सहानुभूती दाखविल्याशिवाय राहाणार नाहीत, अशी मला खात्री वाटते. कारण हे हिंदी लोक अपमानकारक कायद्याच्या अटींना शरण न जाता तुरुंगात जातात, तेथील हालअपेष्टा सोसण्यास तयार असतात आणि त्याशिवाय आर्थिक हानीही बाजूस सारतात.

" निरनिराळ्या वंशांच्या व्यापाऱ्यांमध्ये अत्यंत तीव्र स्पर्धा चालू आहे, याकडे मी कधीच कानाडोळा केला नाही, पण त्या स्पर्धेचे वरील वर्णन युरोपियन लोक अतिशयोक्तीने करतात, असे मला आढळून आले आहे. जोहान्सबर्गच्या ब्रिटिश इंडियन असो. ने ज्या सूचना केल्या आहेत व योजना मांडल्या आहेत, त्या अत्यंत समंजसपणाच्या व न्यायाच्या आहेत, असे मला वाटते. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या प्रश्नांचे पूर्ण ज्ञान, जबाबदार सरकारी अधिकाऱ्यांना झाले असते तर सध्याची नाजूक स्थिती निर्माण झाली नसती, अशी मला खात्री वाटते.

" शेवटी, माझे जे हिंदी मित्र तुरुंगात आहेत आणि तेथील यातना सहन करण्यास सिद्ध आहेत, त्यांना भेटणे व त्यांच्या यातना कमी करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे, हे मी माझे भाग्य समजतो."

असे उदात्त पत्र लिहिल्याबद्दल मि. कॅलनबॅक धन्यवादास पात्र आहेत. त्यांच्यासारखे आणखी काही गोरे लोक पुढे आले, तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

अद्याप आपल्या कृतीस प्रारंभ झालेला नाही, तरी मि. कॅलनबॅकसारखे लोक सहानुभूती दाखविण्यास पुढे येतात, मग आपण प्रत्यक्ष कृती करावयास लागलो, तर असे पुष्कळच लोक पुढे येतील.

असोसिएशनची सभा

जनरल बोथा यांच्याकडे शिष्टमंडळ पाठविण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी एक सभा शनिवारी दुपारी ४॥ वाजता भरली होती. तिला मि. इसॉपमियाँ (हंगामी अध्यक्ष), मि. अब्दुल गनी[1], मि. कुवाडीया, नायडू, उमरजी साले, अलीभाई आकुजी पिल्ले, मुहम्मद, इमाम अब्दुल कादीर इत्यादी सज्जन उपस्थित होते. मि. हाजी हबीब[2] प्रिटोरियाहून मुद्दाम या सभेला हजर राहाण्यासाठी आले होते. काही गोष्टींचा निर्णय सभेने लावल्यावर, जनरल बोथाकडे शिष्टमंडळ पाठविण्याचा ठराव संमत झाला. हा ठराव मि. हाजी अबीब यांनी मांडला, आणि त्याला दुजोरा मि. कुवाडीया यांनी दिला. सभेने असेही ठरविले की, श्री. गांधी यांच्या 'स्टार'मधील वरील पत्रात ज्या सूचना केलेल्या आहेत, त्या सरकारने स्वीकाराव्यात म्हणून त्यांना एक अर्ज पाठवावा. त्या सूचना सरकारने फेटाळून लावल्या व कायद्यात इष्ट ते फेरफार केले नाहीत, तर हिंदी समाज हा कायदा कधीही मान्य करणार नाही आणि आपला सप्टेंबरचा ठराव कायम ठेवील, असे जनरल बोथा यांना कळविण्यात यावे, असेही सभेने निश्चित केले. वरील शिष्टमंडळात मि. इसाएमियाँ, अब्दुल गनी, हाजी हबीब, मूनलाईट व गांधी हे असावेत, असे ठरले. त्याप्रमाणे मि. इसापमियाँ यांनी जनरल बोथा यांना वेळ मागितली आहे.[3] हे पत्र 'इंडियन ओपिनियन'मध्ये प्रसिद्ध होण्यापूर्वी, हे शिष्टमंडळ जनरल बोथांना भेटून आलेले असेल.

सरकार आम्हांला तुरुंगात टाकण्याशिवाय दुसरे काय करणार ?

नवी नोंदणी-पत्रे न घेतल्याबद्दल सरकारने कोणाही हिंदी माणसावर खटला न करता या वर्षअखेरीपर्यन्त वाट पाहात स्वस्थ बसावे, म्हणजे त्या वेळी व्यापाराचे परवाने नवीन न घेतल्यामुळे हिंदी लोकांना आपला धंदा बंद करावा लागेल, अशी सूचना पुढे आली आहे. असे घडून येणे असंभवनीय आहे. कारण तसे झाल्यास, ज्यांच्याजवळ व्यापाराचे परवाने नाहीत, असे शकडो हिंदी लोक कायद्याच्या कचाटीत कधीच येणार नाहीत, व्यापाऱ्यांचे नोकर शिक्षेतून निसटतील, हा कायदा असून नसल्यासारखा होईल. पण सरकारचा हेतु जर व्यापाऱ्यांना केवळ सतावण्याचाच असेल, तर मी

१. ब्रिटिश इंडियन असोसिएशनचे अध्यक्ष, (१९०३ ते १९०७).

२. ब्रि. इं. असो. च्या प्रिटोरिया येथील समितीचे चिटणीस.

३. "पंतप्रधानांच्या निर्णयास पत्र" लेखांक ९ पाहा. तथापि हे शिष्टमंडळ जाऊ शकले नाही. लेखांक २१ पाहा.

पूर्वीच उत्तर दिलेले आहे, आणि ते हे की, एकदा का आपण तुरुंगाची भीती झाडून टाकली, म्हणजे आपल्याला कशाचीही भीती वाटण्याचे कारण नाही. सरकारने परवाने दिले नाहीत, तर त्यात त्याचेच नुकसान आहे. कारण, मग व्यापारी बिगर-परवाना आपला व्यापार चालवू शकतील, आणि नवे नोंदणी-पत्र न घेण्यात जितका धोका आहे, तितकाच बिगर–परवाना व्यापार करण्यात आहे. नवे नोंदणी–पत्र घेतले नाही तर जास्तीत जास्त काय होईल? तर तुरुंगात जावे लागेल. तसेच, बिगरपरवाना व्यापार करण्याने तुरुंगात जावे लागेल. फरक इतकाच की, बिगरपरवाना व्यापार करण्यासाठी फक्त एकाच माणसाला शिक्षा होईल, पण दुकान उघडे राहील आणि त्यात नोकर लोक काम करतील. उलट, नवे नोंदणी–पत्र जवळ नसल्यास प्रत्येकाला पकडण्यात येईल.

बिगर–परवाना व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्याची मालमत्ता लिलावाने विकता येईल काय ?

हाही प्रश्न निर्माण झाला आहे. नाताळमधील कायद्याप्रमाणे मालमत्तेचा लिलाव करता येईल, पण ट्रान्सवॉलमध्ये दंड न भरल्यास तो न भरणाऱ्यास तुरुंगात जावे लागते. दंड कोणीही भरावयाचा नाही, म्हणून व्यापाराच्या परवान्याच्या निमित्ताने सरकारला जर आमच्यावर दडपण आणावयाचे असेल, तर सर्व दुकानदार व फेरीवाले परवान्याविना व्यापार करू लागतील.

दुकाने बंद करता येतील काय ?

बिगर–परवाना व्यापार करणाऱ्या माणसाचे दुकान सरकार बंद करू शकेल काय, असा प्रश्न विचारला जातो. दुकान सक्तीने बंद करावयास लावणारा कायदा दक्षिण आफ्रिकेत कोठेही नाही. म्हणून असे काही भय नाही.

नियमांनी कोणते बदल करता येतील ?

सरकारी नियमात काही सवलती देणे जनरल बोथांना शक्य आहे काय, आणि आपण मागितलेल्या साऱ्या सवलती त्यांनी दिल्या तरी कायद्याला विरोध करणे अवश्य आहे काय, असे प्रश्न विचारण्यात येतात. पहिली गोष्ट ही की, नियमांच्या द्वारे काय मिळू शकेल हे समजून घेणे अगत्याचे आहे. या नियमांनी एवढेच ठरविता येते की, अंगठ्याचा ठसा घ्यावा, का साऱ्या बोटांचे ठसे घ्यावे, का फक्त सही झाली म्हणजे पुरे. परंतु मुलांची नोंदणी, पोलिसांची छळणूक, पोलिसांना ओळखीच्या खुणा दाखविणे, इत्यादी या कायद्यात जी जुलमी कलमे आहेत, ती केवळ नियमाने बदलता येणार नाहीत. थोडक्यात म्हणजे या कायद्याने आपल्याला जे लांछन लावलेले आहे, ते त्या कायद्यानुसार केलेल्या नियमांनी पुसले जाणार नाही. म्हणून, जनरल बोथा हे

कायदा दुरुस्त केल्याशिवाय आपल्याला पाहिजे ते सुख देऊ शकणार नाहीत; आणि कायद्यात दुरुस्ती होण्याची आशा धरणे, हे अगदी फोल आहे. जास्तीत जास्त त्यांना करता येईल ते एवढेच की, हा कायदा गॅझेटमध्ये तूर्त प्रसिद्ध न करणे. त्यामुळे दोन्ही पक्षांची प्रतिष्ठा सांभाळली जाईल. जर आपल्याला मान्य होण्याइतक्या सुधारणा या कायद्यात झाल्या, तर सरकारला तोंड दाखवावयास जागा राहणार नाही.

कुत्र्यापेक्षा नीच असे स्वतंत्र हिंदी लोक

येथे लवकरच एक प्रचंड शेतकी-प्रदर्शन भरणार आहे. प्रदर्शन–समितीने असा नियम केला आहे की, गोऱ्यांच्या नोकरीवर नसलेल्या स्वतंत्र आशियावासियांना किंवा नेटिव्हांना या प्रदर्शनात प्रवेश नाही. मात्र कुत्र्यांना मोफत प्रवेश आहे, एवढेच नव्हे तर, उत्तम जातिवंत कुत्र्यांना बक्षिसेही दिली जाणार आहेत! या गोऱ्या समितीच्या मताने, स्वतंत्र हिंदी माणूस हा त्या कुत्र्यापेक्षा नीच आहे.

परवाना-कचेरी

परवाना-कचेरीवर आपण बहिष्कार टाकला, हे फार चांगले केले, असे ठरविणारी एक घटना नुकतीच घडल्याचे दिसून येते. एका हिंदी माणसाला, तुम्हांला परवाना दिला जाईल, अशी नोटिस मिळाली. कचेरीत गेले की त्याला तो परवाना मिळावयाचा होता. म्हणून त्याला असा सल्ला देण्यात आला की, नव्या कायद्याचा उल्लेख न झाला तर परवाना घ्यावा. त्याप्रमाणे तो परवाना–कचेरीत गेला. पण मि. चॉमनी यांनी त्याला सांगितले की, नव्या कायद्याला मान्यता देण्याचे आश्वासन देशील तरच तुला परवाना मिळेल. त्या शूर हिंदी माणसाने मान्यता देण्याचे नाकारले, आणि परवाना न घेता कचेरीतून तो बाहेर पडला. परवाना–कचेरी हा हिंदी लोकांसाठी ठेवलेला एक सापळा आहे, हे प्रत्येक हिंदी माणसाने समजून घेतले पाहिजे.

हिंदी व्यापारी काय करू शकतील ?

आम्ही हिंदी लोकांविरुद्ध नाही, अशा आशयाचा अर्ज सरकारला पाठविण्यास आपण तयार असल्याचे डच लोक सांगतात, असे पुष्कळ हिंदी व्यापारी बोलतात. असे जर असेल तर अशा अर्जावर डचांच्या सह्या घेणे, हे प्रत्येक हिंदी व्यापाऱ्याचे कर्तव्य आहे. या बाबतीत फारसा गाजावाजा करण्याची गरज नाही. व्यापाऱ्यांची इच्छा असेल तर त्यांना अर्जाचे नमुने पाठविले जातील. जे सह्या मिळवू शकतील, त्यांनी असोसिएशनला लिहावे.

फेरीवाल्यांसाठी नियम

सरकारने फेरीवाल्यांचे नियम टाऊन कौन्सिलकडे परत पाठविले आहेत व परवाना–फी ५ पौंडांऐवजी ३ पौंड करावी, असे सुचविले आहे. कौन्सिलच्या समितीने

उत्तर पाठविले आहे की, ५ पौंडांची फी कायम ठेवावी, ती कमी केल्यास आर्थिक नुकसान होईल.

परवान्याचा खटला

अलीकडे परवान्याचे खटले चालू आहेत. खोटे परवाने वापरल्याबद्दल व बिगर-परवाना राहिल्याबद्दल दोन परिटांवर खटले चालू होते. त्यांनी आपल्या बचावात असे सांगितले की, एका हिंदी माणसाने आम्हांला जोहान्सबर्गला नेले व कळविले, परवाना-अधिकाऱ्याने या शहरात येऊन परवाने दिले आहेत. त्या हिंदी माणसाने त्या प्रत्येक परिटाकडून ३० पौंडांची मागणी केली. ते देण्याचे त्याने कबूल केले, ते त्या हिंदी माणसाच्या घरी गेले. तेथे गुप्तपणे बसलेला एक युरोपियन त्यांना दिसला, त्याने त्यांना परवाने दिले. प्रत्येक परिटाने ३० पौंड दिले. खोटे परवाने वापरल्याच्या आरोपातून कोर्टाने त्यांना दोषमुक्त ठरविले. कारण त्या युरोपियनाने दिलेले परवाने खोटे आहेत, हे त्यांना माहीत नव्हते. मात्र बिगरपरवाना वास्तव्य केल्याच्या आरोपावरून, सात दिवसांत ट्रान्सवॉल सोडून जाण्याचा हुकूम त्यांना देण्यात आला. हा गोरा अधिकारी कोण आहे, हे कळणे अगत्याचे आहे. कारण त्यासंबंधी शहरात पुष्कळ अफवा उठल्या आहेत.

दुसऱ्या एका हिंदी माणसावर असाच आरोप करण्यात आला. एका हिंदी माणसाच्या प्रतिज्ञा-पत्राच्या आधारे हा आरोप केलेला होता. ज्याने ते प्रतिज्ञा-पत्र दाखल केले होते, त्याने मॅजिस्ट्रेटपुढे सरकारच्या विरुद्ध साक्ष दिली, तेव्हा खोटा पुरावा दिल्याबद्दल त्याला मॅजिस्ट्रेटने शिक्षा दिली आणि आरोपीला सोडून दिले. "इच्छी परा, ते येई घरा" या म्हणीची सत्यता या खटल्यातून दिसून येते.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन ८–६–१९०७

१९. अफगाणिस्तानातील मुसलमानांची स्थिती

मि. सय्यद अली, बी. ए. यांनी लिहिलेला मुसलमानी राज्यव्यवस्थेबद्दलचा लेख आम्ही पूर्वी प्रसिद्ध केलेला आहे. त्या लेखाचा उत्तरार्ध 'इंडियन रिव्ह्यू'च्या मार्चच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे. त्याचा सारांश आम्ही पुढे संक्षेपाने देत आहोत:

तुर्कस्तान व इराण यांचा विचार आपण केला. आता आपण अफगाणिस्तानाकडे वळू. त्याने अलीकडे मोठी प्रगती केली आहे. अमीर अब्दुल रहमान सिंहासनावर बसण्यापूर्वी, अफगाणिस्तानामध्ये 'उलु' व 'मलिक' या नावाच्या संस्थांशिवाय दुसरे काही राज्यशासन म्हणून नव्हतेच. एखाद्या खेड्यातील निरनिराळ्या विभागांतून गावकरी लोक आपले प्रतिनिधी 'खेल' नावाच्या संस्थेत पाठवीत असत आणि त्यांच्यातून 'उलू'ची निवड केली जात असे. परंतु त्या काळी, लोकांची वृत्तीच अशी होती की, त्यामुळे, राज्यकारभारावर कोणीही नियंत्रण ठेवू शकत नसे. तेव्हा चोरांचे हात तोडले जात. एखादा गुलाम पळून जाऊ लागला, तर त्याचे पाय तोडले जात. निरनिराळ्या प्रांतांचा कारभार स्थानिक पुढाऱ्यांच्या व सरदारांच्या हाती असे. सरदारांच्यावर अमीर असत, पण सरदार त्या अमीरांच्या सत्तेला फारसा आदर दाखवीत नसत. पठाण हा जात्याच धाडसी प्राणी आहे. त्यामुळे अशा अंदाधुंदीच्या परिस्थितीत त्याला सुख वाटत असे. त्या काळी वर वर्णन केलेल्या शिक्षाच परिणामकारक ठरत. जनरल एल्फिन्स्टनने[1] विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना एकदा एका पठाणाने सांगितले की, "भांडण-तंटे करण्यात आम्हांला संतोष वाटतो. संकटाची भीती आम्हांला मुळीच नाही. रक्त पाहून आम्ही फिके पडत नाही. काहीही झाले तरी आम्ही आमचे स्वातंत्र्य गमावणार नाही आणि कोणा बादशहाचे अंकित होणार नाही."

अमीर अब्दुल रहमान यांनी सिंहासनावर येताच महत्त्वाचे फेरबदल केले. आपले राज्य हे रशिया व इंग्लंड यांमध्ये उभयान्वयी राज्य आहे या परिस्थितीचा त्याने जास्तीत जास्त फायदा घेतला. केव्हा ते रशियाकडे झुकत, तर केव्हा इंग्लंडकडे. ते उघडपणे कोणाशीही भांडण करीत नसत. पण शेवटी, इंग्लंडच्या बाजूस ते उभे राहिले, या त्यांच्या चातुर्याची वाहवा युरोपिअन मुत्सद्यांनी केली. त्यांनी आपल्या फायद्याच्या गोष्टी नेहमी मिळविल्या, पण, त्यांच्या मोबदल्यात दुसऱ्याच्या पदरात काही टाकले नाही. राज्याच्या अंतर्गत कारभारातही त्यांनी आपली श्रेष्ठ कार्यक्षमता दाखविली व स्थानिक पुढाऱ्यांचे सामर्थ्य मोडून काढले. नागरी कायद्यात त्यांनी सुधारणा केल्या. हिंदुस्थान सरकारकडून त्यांना १२ लाख रुपयांचा वार्षिक नजराणा मिळत असे, तो पुढे १८ लाख करण्यात आला. त्या संपत्तीचा विनियोग त्यांनी शहाणपणाने केला. त्यांनी फौज उभारली, दारू-गोळा साठविला व व्यापार वाढविला. अनावश्यक कर काढून टाकले व एक टांकसाळ उघडण्यात आली. विद्यमान राज्यकर्त्यांनी अफगाणिस्तानाची प्रतिष्ठा याहूनही वाढविली. 'दरबार इ शाही' व 'ख्वाजान-शाही' या नावाची दोन विधिमंडळे त्यांनी स्थापन केली. अशा राज्यशासनामुळे पठाणांचा स्वभावही बदलू लागला.

१. (१७७९-१८५९). मुत्सद्दी व इतिहासकार, मुंबईचे लेफ्टनंट गव्हर्नर (१८१९ ते १८२७).

हा सध्याचा प्रवाह असाच दीर्घकाळ चालू राहिला, तर लढाऊ पठाण पूर्वेकडे आपले एक सामर्थ्यशाली राज्य निर्माण करतील. तथापि हे कबूल केले पाहिजे की, अफगाणिस्तानची प्रजा राजकारणात लक्ष घालीत नाही. अमीर हबीबुल्लाखान हे बादशाहा आहेत. ते शूर असून धार्मिक आहेत. ते हिंदुस्थानात असताना आपला नमाज पढण्यास कधीच चुकले नाहीत. १९०५ चा करार ते पाळतील की नाही, हे आम्ही नक्की सांगू शकत नाही. आता अमीरांना बादशाहाचा दर्जा देण्यात आला आहे आणि ३१ तोफांची सलामी देण्यात आली आहे. इराणच्या शहाचेच अधिकार ते आता उपभोगीत आहेत.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ८-६-१९०७

२०. स्टारला पत्र[१]

पोस्ट बॉक्स् ३५५२,
[जोहान्सबर्ग]
ता. ८ जून, १९०७

संपादक,
स्टार
[जोहान्सबर्ग]
महाशय,

आशियावासियांच्या कायद्यातील दुरुस्तीच्या कायद्याला बादशहांची मंजुरी मिळाली आहे आणि ठरलेल्या दिवशी तो कायदा अंमलात येईल, अशा आशयाची गॅझेटमधील सूचना आज मी पाहिली. याचा अर्थ काय हे मला कळत नाही. परंतु मध्यंतरी थोडा काळ असल्यामुळे, या कायद्याचा व्यापारी दृष्टिकोनातून एक विचार मी जनतेपुढे मांडू इच्छितो. तसे करण्यासाठी मी माझ्या आत्मचरित्राचे ओझरते दर्शन वाचकांना घडविणे आवश्यक आहे.

१. या पत्राचा मसुदा बहुधा गांधीजींनी तयार केला असावा. ते 'इंडियन ओपिनियन'च्या १५-६-१९०७ च्या अंकात उद्धृत केले आहे.

गेली १९ वर्षे मी ट्रान्सवॉलमध्ये स्थायिक झालेलो आहे आणि सुलेमान इस्माइलमिया आणि कंपनीचा एक व्यवस्थापक भागीदार म्हणून, प्रतिनिधित्व करण्याचा मान मला मिळाला आहे. माझ्या कंपनीचे व्यवहार युरोपियन घाऊक व्यापाऱ्यांशी फार मोठ्या प्रमाणावर चालू असतात आणि त्या व्यवहारांपासून युरोपिअन व्यापारी खूप नफा मिळवीत असतात, हे मी सांगण्याची गरज नाही. जेम्सन हल्ल्याच्या[1] वेळी आमच्या कंपनीचे फार मोठे नुकसान झाले आणि तरी त्यांनी आपल्या सावकारांचे सर्व देणे चुकते केले. बोअर युद्धाच्या वेळी, अशाच दिव्यातून या कंपनीला जावे लागले आणि तरीही सावकारांचे देणे पुरेपूर चुकते झाले आणि आता, तिसऱ्यांदा, कंपनीच्या डोळ्यांपुढे सत्यानाश आ वासून उभा आहे. पूर्वीच्या दोन प्रसंगी, विनाशाचे कारण मानवी प्रयत्नाच्या आटोक्याबाहेर होते— निदान माझ्या कंपनीच्या आटोक्याबाहेर होते. आजचे कारण कंपनीने स्वतः निर्माण केल्यासारखे होईल, आणि ते का? त्याचे उत्तर सोपे आहे. आणि ते हे की, प्रत्येक समजदार हिंदी माणसाला आशियावासी कायद्याचा दुरुस्ती कायदा हे शुद्ध गुलामगिरीचे चिन्ह वाटते. मला माझ्या देशबांधवांचे जे मनोगत माहीत आहे, त्यावरून मी असे सांगू शकतो की, प्रत्येक हिंदी माणसाला त्या कायद्यामुळे, ट्रान्सवॉल हा एक तुरुंग बनेल, म्हणून या कायद्याला मान्यता न देण्याचे त्यांनी ठरविले आहे— मग अशा कायदेभंगाचे कोणतेही परिणाम झाले, तरी ते सोसण्यास ते तयार आहेत. कोणत्याही कायद्याचा अवमान करणे हे हिंदी लोकांच्या रक्तात नाही, तरीही या कायद्यामुळे त्यांच्या भावना इतक्या जोराने उसळलेल्या आहेत की, हा कायदा न मानणे हे पुण्य आहे आणि मानणे हे भेकडपणाचे पाप आहे असे ते मानतात.

एक हिंदी व्यापारी म्हणून मी आज ज्या परिस्थितीत आहे, ती माझ्यासारख्या कैक लोकांची आहे. कायद्याची अवज्ञा केल्याने, बहुतेक दृष्ट्या आपली हानी किती होईल आणि तिचा परिणाम काय होईल हे अशा सर्व हिंदी लोकांना कळत नाही, असे आपण मानता काय? पण, आपले व्यक्तिस्वातंत्र्य गमावून अपमान सहन करण्यापेक्षा असे नुकसान सोसणे चांगले, असा धडा आम्ही तुमच्या देशबांधवांच्या पायाजवळ बसून घेतला आहे. मी माझी मालमत्तेची अधिकारपत्रे रद्द समजून, बगलेत टोपी मारून, परवानाकचेरीत जाऊन, नाना निर्बंधांनी जखडलेले नवे कागदपत्र मिळण्यासाठी याचना करीत का बसावे? शिवाय तुर्की साम्राज्यातील मुस्लिमेतर प्रजाजन या कायद्याच्या जाचक जोखडातून मुक्त असताना, त्या साम्राज्यातील मुसलमान प्रजाजन मुक्त नाहीत, याबद्दल, एक मुसलमान म्हणून, मी तीव्र संताप प्रकट करतो. ही सत्यस्थिती आहे. तिचा योग्य विचार आपण व जनता यांनी करावा, अशी मागणी करण्यास मी धजतो.

१. १८९५ मध्ये. पाहा खंड २, पृ. ३६०.

हिंदी लोकांच्या दृष्टीने, ही जी घातुक परिस्थिती निर्माण झालेली आहे, ती नष्ट करण्याचा हक्क सरकारने स्वतःकडे ठेवला नसता, तर मी आपल्याला हे पत्र लिहून त्रास दिला नसता. स्वेच्छेने फेरनोंदणी करण्याची सूचना सरकारने मान्य करावी, आणि ती फसली तर, जे लोक स्वेच्छेने नोंदणी करणार नाहीत, त्यांची नोंदणी सक्तीने करण्यासाठी सरकारने एक दिवस मुक्रर करावा. हे खरे आहे की, स्वेच्छेच्या सूचनेमध्ये हिंदी अर्भकांची नोंद केली जाणार नाही. पण मला हे मोकळेपणाने सांगितले पाहिजे की, माझ्या एका दिवसाच्या मुलाच्या खाणाखुणा देण्याची योजना म्हणजे ते अर्भक अत्यंत लांच्छनास्पद कृत्यें पुढील काळात करील, असे पर्यायाने मान्य करण्यासारखे आहे. जगाचे राज्य मिळत असले तरी, मी ते कदापि मान्य करणार नाही. याबाबत मी माझ्या अनेक युरोपियन मित्रांशी चर्चा केली आहे. त्या सर्वांना वाटते की, आमची सूचना अत्यंत सयुक्तिक आहे. ट्रान्सवॉलमध्ये आपल्याला सन्मान्य जीवन लाभावे म्हणून, आम्ही चालविलेल्या लढ्याला आपण आणि त्या युरोपियन मित्रांनी पाठिंबा द्यावा, अशी माझी विनंती आहे. येशू ख्रिस्त हा जितका ख्रिश्चनांचा, तितकाच मुसलमानांचाही देवदूत आहे. त्याने कोठेसे म्हटले आहे, 'दुसऱ्यांनी तुझ्याशी जसे वागावे, असे तुला वाटत असेल, तसे तू दुसऱ्याशी वाग.' या सुभाषिताचे अनुसरण ख्रिश्चन सरकारने करावे, असे मी म्हणू का ?

आपला,
इसाप इस्माइलमिया

दि स्टार, ११-६-१९०७

२१. पंतप्रधानांच्या सचिवास पत्र

जोहान्सबर्ग
ता. १२ जून, १९०७

पंतप्रधानांचे हंगामी सचिव,
[प्रिटोरिया]

महाशय,

आपल्या या महिन्याच्या ४ तारखेच्या क्रमांक १४।१ च्या पत्राबाबत मी असे कळवू इच्छितो की, आशियावासियांच्या नोंदणी-कायद्याच्या[1] बाबतीत माझ्या असोसिएशनच्या शिष्टमंडळाची भेट घेणे पंतप्रधानांना अनावश्यक वाटले, याबद्दल मला खेद होतो.

तथापि कायद्याची अंमलबजावणी करण्याची तारीख अद्यापि जाहीर झाली नसल्यामुळे, माझी असोसिएशन सरकारला पुनः एकदा असे आदरपूर्वक सुचवीत आहे की, स्वेच्छेने फेरनोंदणी करण्याची योजना आपण मान्य करावी आणि जे स्वेच्छेने नोंदणी करणार नाहीत त्यांना हा कायदा, एखाद्या लहानशा बिलाने, पुढे-मागे लागू करावा.

आपला
इसाप इस्माइलमिया
ब्रिटिश इंडियन असोसिएशनचे हंगामी अध्यक्ष

इंडियन ओपिनियन, २२–६–१९०७

१. या कायद्याला बादशहांची संमती मिळाल्याने यापूर्वीच जाहीर झालेले असल्यामुळे, 'शिष्टमंडळाचा आता काही उपयोग होणार नाही.' असे पंतप्रधानांना वाटले.

२२. छगनलाल गांधी यांना पत्र

जोहान्सबर्ग
१२ जून १९०७

प्रिय छगनलाल,[१]

मॉंटेग्यु इस्टेटमध्ये त्यांनी जी वाढ केली आहे, त्याबद्दल आपल्याला जादा रक्कम काही मिळणार नाही.

विघ्ने ही अधिक कार्य व अधिक चैतन्य यांना प्रोत्साहक ठरतात, याचा मला आनंद वाटतो. विघ्नांचा योग्य अर्थ आपण असाच लावला पाहिजे, हे खचित. अशा लोकांना पीछेहाट नसते, की निराशा नसते. ‘ कर्तव्यबुद्धीने कार्य करणाऱ्यास यश लाभतेच ’ या अर्थाची म्हण तुम्ही उद्धृत केली आहे. आणि ती खरे आहे. मात्र ‘ यश ’ याचा भलता अर्थ न करण्याची खबरदारी आपण घेतली पाहिजे. ज्याप्रमाणे, धार्मिक नसलेल्या पुष्कळ गोष्टी चुकीने धार्मिक मानल्या जातात, त्याचप्रमाणे आपल्याला जे अपयश वाटते, ते वस्तुतः यशच असते. म्हणून वरील म्हणीतील सत्य मान्य करूनही, आपण आपले लक्ष आपल्या कार्यावरच खिळून ठेवले पाहिजे-- त्याच्या फलाकडे नव्हे.

या कायद्याची[२] तामिळ, हिंदी व उर्दू भाषांतरे ‘ इंडियन ओपिनियन ’मध्ये छापावीत आणि त्यांची स्वतंत्र पत्रकेही मला पाठवावीत. यांचा जितका प्रसार आपण करू तितके चांगले. त्या कायद्याचा धिक्कार तो स्वतःच करीत आहे. तसा त्याचा परिणाम लोकांवर होत असल्याचे मी पाहात आहे. चालू अंकाच्या ३५० प्रती तुम्ही मला पाठविल्या होत्या, पण त्यांपैकी फारच थोड्या आता शिल्लक आहेत. व्यासांनी प्रिटोरियासाठी ६० प्रती मागितल्या आहेत आणि उत्तर भागातून १५ प्रतींची मागणी आज माझ्याकडे आली आहे.

१. गांधीजींचे चुलत भाऊ खुशालचंद गांधी यांचा मुलगा. ‘इंडियन ओपिनियन’चा गुजराती विभाग आणि फिनिक्स येथील छापखाना यांचे काम हे पाहात.

२. आशियाई नोंदणी कायदा.

गुजराती टाइपासंबंधी मजजवळ काहीही उत्तर नाही. त्याबाबतीत आपण लक्ष देऊ, असे गोकुळदासाने[1] मला लिहिले होते. पण त्याने मला बहुतेक सर्व बाबतींत निराश केले आहे. तो आळशी, बेपर्वा व अंधविश्वासू बनला आहे.

आपला,
मो. क. गांधी

गांधीजींची सही असलेल्या टंकलिखित
पत्राच्या छायाचित्रावरून : एस्. एन्. ४७५४.

२३. बादशहांची मंजुरी

फार दिवस लांबणीवर पडलेली बादशहांची मंजुरी नोंदणी कायद्याला मिळाल्याचे आता गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाले आहे. जनरल बोथा यांनी लॉर्ड एल्जिन यांना असे आश्वासन दिले आहे की, हिंदी लोकांच्या भावनांचा मी विचार करीन. परंतु त्यांनी हिंदी लोकांच्या शिष्टमंडळाची भेट घेण्याचेही नाकारले आहे. हा कायदा गॅझेटमध्ये गेल्या आठवड्यात प्रसिद्ध होणार होता, म्हणून त्या भेटीचा काही उपयोग नाही, असे त्यांनी म्हटले. पण आम्हांला असे आढळून आले आहे की, गॅझेटमध्ये कायदा छापून आला असला तरी, त्याच्या अंमलबजावणीची तारीख बेमुदत लांबणीवर टाकण्यात आली आहे. ती आजही ठरेल किंवा कधीच ठरणार नाही. ब्रिटिश इंडियन असोसिएशनचे हंगामी अध्यक्ष मि. इसापमिया यांचे जे एक पत्र[2] स्टारमध्ये प्रसिद्ध झालेले आहे आणि जे आम्ही उद्धृत केले आहे ते, यामुळे अत्यंत समयोचित ठरते. मि. इसापमिया हे एक मोठे प्रतिष्ठेचे व्यापारी असून, त्यांचे फार मोठे हित-संबंध येथे गुंतलेले आहेत. तरी ते लोकांना सांगत आहेत की, या कायद्याचा अपमान मला इतक्या तीव्रतेने बोचत आहे की, त्याला मान्यता न दिल्याने सर्वस्व गमवावे लागत असले तरी त्याला माझी तयारी आहे. त्यांनी अशी एक अत्यंत सयुक्तिक सूचना केली आहे की, सरकारने तूर्त कायद्याच्या अंमलबजावणीचा दिवस ठरवू नये आणि हिंदी लोक व इतर आशियावासी लोक यांना, आपला शहाजोगपणा सिद्ध करण्यासाठी, स्वेच्छेने फेरनोंदणी करण्यास अवसर द्यावा. जर हा प्रयोग फसला, तर स्वेच्छेने फेरनोंदणी न करणाऱ्यास हा कायदा लागू करावा. ही इतकी सयुक्तिक सूचना ट्रान्सवाल सरकार मान्य करील अशी आम्हांला आशा आहे. ट्रान्सवालमधील जनतेतर्फे

१. गांधीजींची बहिण रलियात बहेन यांचा मुलगा.
२. 'स्टारला' पत्र. प्रकरण २० पाहा.

जनरल बोथा यांनी, साम्राज्यसरकारने ट्रान्सवॉलला उदारमतवादी राज्यघटना दिल्याबद्दल, अनेक वेळा गाढ कृतज्ञता व्यक्त केली आहे आणि आपल्याला एकंदर साम्राज्याविषयी आस्था असल्याचे प्रकट केले आहे. त्यांच्या मताने हिंदुस्थान हा त्या साम्राज्याचा एक विभाग असेल तर, ते अखेरच्या क्षणी हिंदी लोकांशी तडजोड करून, ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या भावना दुखाविण्याचे टाळतील, अशी आशा करण्यास जागा आहे.

इंडियन ओपिनियन, १५–६–१९०७.

२४. कायद्याचा जुलूम

जो पार उतारे औरोंको, उसकी भी नाव उतरनी है।
जो गर्क करे फिर उसको भी याँ डबकु-डबकु करनी है।
शमशीर तबर बन्दूक सनां और नश्तर तीर नहेरनी है।
याँ जैसी जैसी करनी है, फिर वैसी–वैसी भरनी है। [१]

कवी असे गात आहे. "करावे तसे भरावे" ही म्हण तर सर्व जगात प्रसिद्ध आहे. त्या म्हणीतील तत्त्व हिंदी समाजाच्या फायद्यासाठी बदलेल असे नाही. कारल्याच्या वेलीला जास्वंदीची फुले येणार नाहीत आणि पळसाच्या झाडाला आंबे लागणार नाहीत. त्याचप्रमाणे, ट्रान्सवॉलमधील हिंदी समाजाने पेरावे एक व उगवावे दुसरे, असे कधीच होणार नाही. त्या समाजाने पुरुषार्थ प्रगट केला तरच त्याला पुरुष म्हणून जगता येईल. मान घेण्यास तो समाज पात्र असेल, तर त्याला तो मिळेल. त्याने जर आपला शब्द पाळला आणि आपले अंगीकृत कार्य तडीस नेले, तर त्याचा लौकिक वाढेल. उलट, जर तो समाज स्वार्थाने वा भयाने वा दुसऱ्या काही कारणाने आपल्या प्रतिज्ञेवर पाणी सोडील, तर ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांचे हक्क धुळीस मिळतील आणि

१. ज्याची नौका लोकां पार करी
तो सहजचि की नदी उतरी ॥
रसातळासि पोचवितो।
स्वयेची की तो बुडतो ॥
खड्ग कुठारी तोफा अन् बंदूका।
शर खरतर ते जाति फुका ॥
कराल जैसे भराल तैसे।
सृष्टीचा हा दंड असे ॥

त्यांच्याबरोबर दुसरे हिंदी लोकहि चिरडले जातील हे खचित. एवढे महान कार्य ट्रान्सवॉलमधील हिंदी समाजाने आपल्या हाती घेतले आहे.

कवीने असेही सांगितले आहे की, जो इतरांना सुरक्षितपणे नदी–पार करतो, तो स्वतःही नदीच्या किनाऱ्याला जाऊन पोहोचतो, असा जगाचा म्हणा, निसर्गाचा म्हणा किंवा ईश्वराचा म्हणा, कायदा आहे. याच रीतीने जर आपण दुसऱ्यांची सेवा केली, तर आपल्या स्वतःच्याही गरजा भागविल्या जातील. स्वतःच्या चरितार्थाकडे पाहावयाचे म्हटले तर, पशु-पक्षीही ते करीत असतात. मानव व पशु यांमध्ये मुख्य फरक हाच आहे की, मानव हा परोपकारी प्राणी आहे. "पराचिया सुखे" आपण सुखी राहिलो तर सर्वच सुखी होतील. पण जेव्हा प्रत्येकजण स्वतःपुरते पाहातो, तेव्हा सर्वांचा नाश होतो. कारण, कवीने म्हटलेच आहे, 'रसातळासि पोचवितो। स्वयेची की तों बुडतो।' हा विचार महत्त्वाचा आहे. आणि तो खरा आहे, हे अल्पशा चिंतनानंतर कळून येण्यासारखे आहे. मुलाची जोपासना करताना आईला कष्ट पडतात, पण शेवटी ती सुखी होते. ज्या कुटुंबातील माणसे एकमेकांच्या दुःखाचे भार उचलतात आणि वैयक्तिक सुखाचा त्याग करतात, तेच कुटुंब स्थिर राहाते. समाजातील व्यक्ती स्वतः दुःख सोसून सर्व समाजाचे संरक्षण करते आणि त्यामुळे तिचेही संरक्षण होते. तसेच, ज्या देशातील लोक स्वदेशासाठी हाल भोगतात किंवा मृत्यु पावतात, तेच खरोखर जिवंत राहातात आणि स्वदेशाला कीर्ती मिळवून देतात. या मूलभूत कायद्याचा भंग करून, स्वतः सुखी होण्याची इच्छा धरणारा एक तरी हिंदी माणूस असेल काय ? या उदाहरणावरून, हे स्पष्टपणे सिद्ध होते की, ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनी जे काम आपल्या शिरावर घेतले आहे, ते पूर्ण करण्यासाठी आणि स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी व हिंदी समाजासाठी, ते जर येतील ती संकटे सोसतील आणि येतील त्या सर्व यातना सहन करतील, तर ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक विजयी होतील. मग त्यांच्यावरील निर्बंध तुटून पडतील आणि त्यांना इतिहासामध्ये अमर कीर्ती लाभेल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १५–६–१९०७

२५. ऱ्होडेशिया व ट्रान्सवॉल

ऱ्होडेशियाच्या विधिमंडळात असा युक्तिवाद करण्यात आला की, ट्रान्सवॉलमध्ये आशियावासियांसाठी जसा कायदा मंजूर करण्यात आला आहे, तसा ऱ्होडेशियातही मंजूर करावा आणि हिंदी लोकांची नवी आयात बंद करावी व जे पूर्वीच तेथे स्थायिक

झालेले आहेत, त्यांच्या नोंदणीची तरतूद करावी. या सूचनेवर सारे आमदार जोरजोराने बोलले. त्याचा सविस्तर वृत्तांत आमच्या इंग्रजी भागात आलेला आहे. यावरून हे दिसून येईल की, जर ट्रान्सवॉलचा कायदा कायदेबुकात कायम राहिला आणि हिंदी समाजाने तो स्वीकारला, तर ह्याचा कित्ता अन्यत्र गिरविला जाईल. ऱ्होडेशियामधील हिंदी लोकांना मदत करण्याचा एकच मार्ग आहे अन् तो म्हणजे ट्रान्सवॉलच्या हिंदी लोकांनी पाय मागे न घेणे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १५–६–१९०७.

२६. मुदतबंद हिंदी मजूर

थॉर्नव्हिल जंक्शनवर एका युरोपियनाने एका हिंदी मजुराला क्रूरपणाने मारहाण केली, त्यामुळे तो मजूर मेला. युरोपियनावर खटला भरला गेला आणि त्याला १० पौंड दंड झाला. याचा पूर्ण वृत्तांत आम्ही अन्यत्र प्रसिद्ध केला आहे. वाचकांचे रक्त तापविणारा हा खटला आहे. हिंदी माणूस प्राणास मुकला, पण युरोपियन १० पौंडांच्या दंडावर सुटला. आम्हांला समाधान वाटावे, असे त्यात काहीच नाही. पण आम्ही सूडाचा विचार करता कामा नये. ईश्वरापुढे त्या युरोपियनाला जाब द्यावा लागेल. त्याला सक्तमजुरीची शिक्षा झाली असती, तरी हिंदी माणसाचा गेलेला जीव काही परत आला नसता आणि इतर मुदतबंद मजुरांना यापुढे अशी दुर्दशा भोगावी लागली नसती असे नाही.

आपल्याला जर एखादा रोग बरा करावयाचा असेल, तर त्याचे कारण प्रथम शोधून काढले पाहिजे. त्याचप्रमाणे, या परिस्थितीचे कारण जर आपण शोधले, तर आपल्याला असे आढळून येईल की, मुदतबंद मजुरी हीच तत्त्वतः वाईट गोष्ट आहे. त्या प्रथेचा अंत झाला तर, वर वर्णन केलेला जुलूमहि आपोआपच अंत पावेल. कारण, मामुली नोकरीमध्ये माणूस असा मुदतबंद मजुराप्रमाणे बांधलेला नसतो. त्याला ती नोकरी मानवली नाही, तर ती सोडण्यास तो मोकळा असतो.

हिंदी लोकांना मुदतबंद मजूर म्हणून येथे आणण्याची पद्धत बंद झाली पाहिजे, असे मि. रॉबिन्सन यांनी आपल्या भाषणात सांगितले आहे. आमचेही मत तसेच

आहे. [नाताळ इंडियन] कॅाँग्रेसने या दिशेने पावले टाकणे अवश्य आहे. मुदतबंद मजुरीची पद्धत नष्ट करण्याची मि. रॉबिन्सन यांची व आमची कारणे एक नाहीत, पण ते महत्त्वाचे नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १५–६–१९०७

२७. पौर्वात्यांचे शहाणपण

जलालुद्दीन रूमी[1]

इंग्लंडमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या "पौर्वात्यांचे शहाणपण" [वुइज्डम ऑफ दि ईस्ट] या नावाच्या ग्रंथमालेचे दोन खंड आमच्याकडे अभिप्रायार्थ आलेले आहेत. पहिल्याचे नाव आहे, 'बुद्ध-शिक्षा' [दि वे ऑफ दि बुद्ध] आणि दुसऱ्याचे 'इराणी सूफी' [पर्शियन मिस्टिक्स]. दुसऱ्या पुस्तकात लेखकाने जलालुद्दीन रूमी यांना प्रथम स्थान दिले आहे. प्रथम सूफी पंथाची माहिती दिलेली असून, नंतर जलालुद्दीनचे चरित्र दिले आहे आणि शेवटी, त्यांच्या काही कवितांची भाषांतरे दिली आहेत. लेखकाच्या मते, सूफी म्हणजे ईश्वराचा प्रेमी. सूफी हे शुद्ध अंतःकरण व ईश्वर–प्रेम यांना सर्वांहून श्रेष्ठ मानतात.

एकदा स्मशानभूमीत जलालुद्दीन आनंदाने नाचत होता. ते पाहून कोणी त्याला विचारले, 'याचा अर्थ काय ?' तेव्हा त्या साधूने उत्तर दिले, "जेव्हा मानवी जीव देहाच्या पिंजऱ्यातील कैक वर्षांचा तुरुंगवास संपवून मुक्त होतो आणि जेथून तो आला त्या निजधामाकडे धाव घेतो, तेव्हा तो क्षण आनंदाचा नव्हे तर काय ?"

प्राचीन काळी स्त्रियासुद्धा जीवनाच्या सूफी-पंथात मोकळेपणे भाग घेत असत, असे दिसते. राबिया बिबी ही स्वतः सूफी होती. "तुम्ही दुष्टाचा द्वेष करता की नाही ?" असा प्रश्न तिला विचारला असताना तिने तत्काळ उत्तर दिले, "ईश्वरावरील माझ्या प्रेमामुळे कोणाचा द्वेष करण्यास मला वेळच उरत नाही !" सूफी पंथाप्रमाणे नीतीवर आधारलेला कोणताही धर्म खोटा मानता येत नाही. एका प्रश्नाला उत्तर

१. [१२०७–७३] इराणचे सूफी कवी.

देताना जलालुद्दीन म्हणाले, " जितके मानवाचे जीव, तितके ईश्वराच्या भक्तीचे मार्ग ! " ते अन्यत्र म्हणतात, " ईश्वराचा प्रकाश एक आहे, परंतु त्याची किरणे अनंतरंगी आहेत......आपण ईश्वराची भक्ती खऱ्या व शुद्ध अंतःकरणाने करीत असू, तर ती कोणत्याही मार्गाने केली तरी चालेल. "

सत्यज्ञानासंबंधी जलालुद्दीन म्हणतात, ' रक्ताचा डाग पाण्याने धुऊन टाकता येतो, पण अज्ञानाचा डाग ईश्वरी कृपेच्या पाण्यानेच धुतला जातो. ' तसेच, ' ईश्वराचे ज्ञान हेच सत्यज्ञान. ' ईश्वर कुठे मिळेल ? या प्रश्नाचे उत्तर कवी देतो, " मी क्रॉस पाहिला आणि खिश्चनही पाहिले, पण मला क्रॉसवर ईश्वर आढळला नाही. ईश्वराचा शोध घेण्यासाठी मी मंदिरात गेलो, पण व्यर्थ. हिरात किंवा कंदाहार यांपैकी कोठेही मला ईश्वर दिसला नाही. तो नाही सापडणार डोंगरावर किंवा गुहेत. शेवटी मी माझ्या अंतःकरणात पाहिले आणि तेथे--तेथेच मला तो आढळला. अन्यत्र कोठेही नाही--

वाचनासाठी हे एक उत्कृष्ट पुस्तक आहे. त्यातून वरच्यासारखे अनंत उतारे काढून देता येतील. या पुस्तकाची शिफारस आम्ही प्रत्येकाला करतो. त्यामुळे हिंदूंचा व मुसलमानांचा सर्वांचा सारखाच फायदा होईल. पुस्तकाची किंमत इंग्लंडमध्ये २ शिलिंग आहे. त्या संस्थेने ' शेख सादिचे[1] गुलिस्तान ' हे १ शिलिंग किंमतीचे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. तसेच ' कुराणाचे सार ' या नावाचे पुस्तक १ शिलिंग किंमतीचे आहे. ' बुद्ध-शिक्षा ' व ' झरतुष्ट्राचा उपदेश ' या पुस्तकांची किंमत प्रत्येकी २ शिलिंग आहे. आणखीही काही पुस्तके प्रकाशित होणार आहेत. आमच्या वाचकांपैकी कोणास यांपैकी एक किंवा अधिक पुस्तके पाहिजे असतील, तर त्याने वर दिलेली पुस्तकाची किंमत आणि प्रत्येक पुस्तकामागे ६ पेन्स पाठवावेत. त्यांना आम्ही ते पुस्तक मिळवून देऊ. जादा ६ पेन्स् टपालखर्चासाठी आहेत.

[गुजरातीवरून]

इंडियन ओपिनियन, १५-६-१९०७

१. ' वीरानी काय करावं ? ' लेखांक २ पाहा.

२८. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

नवा कायदा

जनरल बोथा यांनी, म्हणीत सांगितल्याप्रमाणे, डोंगर पोखरून उंदीर काढला. त्यांनी असोसिएशनला कळविले आहे की, कायद्याचा अंमल सुरू करण्याची सारी तयारी झालेली असल्याने 'शिष्टमंडळाची भेट घेऊन काही उपयोग होणार नाही. म्हणून, प्रत्येकजण गॅझेटमध्ये, कायद्याच्या अंमलबजावणीची तारीख व इतर 'तपशील, पाहण्यासाठी गर्क होऊन गेला. पण गॅझेटमध्ये तसे काहीच सापडले नाही. त्यात एवढेच आले आहे की, कायद्याला बादशाहाची मंजुरी मिळालेली आहे. यात नवे असे काहीच नाही. गॅझेटमध्ये दुसरी अशी माहिती आहे की, कायदा अंमलात केव्हा येईल, हे पुढे जाहीर होईल. याचा अर्थ काय ? त्याचा एकच अर्थ मी लावू शकतो आणि तो हा की,हिंदी समाजाच्या तुरुंगाच्या ठरावाच्या बाबतीत.आपण काय करावे व कायद्याच्या तरतुदीची पूर्तता कशी करावी या विचाराच्या चक्रात सरकार सापडले आहे. हा अर्थ बरोबर असेल वा नसेल, पण एक गोष्ट नक्की की, तुरुंगाच्या ठरावाने सरकारपुढे एक समस्या उभी केली आहे.

काही प्रश्न

अशा प्रकारे परिस्थिती अस्थिर आहे. हिंदी समाजाने आपली शस्त्रे तयार ठेवली पाहिजेत. अद्याप प्रश्न विचारले जात आहेत. हे लक्षण चांगले आहे. त्यातील एक प्रश्न असा--

इंग्लंडमधील आपल्या हितचिंतकांना तुरुंगाचा ठराव नापसंत आहे काय ?

हा प्रश्न चांगला आहे. त्याचे उत्तरही सरळ आहे. आपला स्वाभिमान आणि आपले हक्क यांचे जतन करण्याच्या कामी इंग्लंडमधील समितीचे सभासद किंवा इतर सज्जन जोपर्यंत आपल्याला मदत करीत आहेत, तोपर्यंत ते आपले हितचिंतक आहेत. त्यांच्या मतांना आपण मान दिला पाहिजे. पण जेव्हा त्यांची मते आपल्या हक्कांच्या आड येतील, तेव्हा ती मते आपल्याला बंधनकारक नाहीत. समजा, कोणी आपल्याला ख्रिस्ती होण्याची सक्ती करू लागला, तर आपण त्याला विरोध करू. आपण आतापर्यंत ज्यांना आपले हितचिंतक मानले, ते जर आपल्याला ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करण्याचा उपदेश करू लागले, तर त्यांचा तो उपदेश आपण स्वीकारू नये, हे माझे

मत प्रत्येक हिंदूला व प्रत्येक मुसलमानाला मान्य होईल, अशी मला खात्री वाटते. हा कायदासुद्धा त्याच तऱ्हेचा आहे. त्यामुळे आपण खचित भेकड बनू. भेकड बनण्याचा उपदेश आपण कधीच मानणार नाही. आपली भूमिका न्यायाची आहे आणि ईश्वर आपल्या पाठीशी आहे, एवढे पुरे. शेवटी 'सत्यमेव जयते.'

ज्यांना सूचनापत्रे मिळाली आहेत त्यांनी काय करावे ?

नाताळहून एक गृहस्थ लिहितात, ट्रान्सवॉलला जाण्याची मुभा देणारा हुकूम मला मिळाला आहे, तेव्हा मी काय करू ? हा हुकूम म्हणजे परवाना नव्हे, हे बहुतेक प्रत्येकाला माहीत आहे. अशा हुकुमाच्या आधारावर सध्या ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश करणे व्यर्थ आहे. परवाना –कचेरीशी कोणताही संबंध ठेवण्यास हिंदी समाजाच्या ठरावाने बंदी केलेली आहे. म्हणून वरील हुकुमाचा काहीच उपयोग नाही. जुने परवाने ज्यांच्याजवळ नाहीत, अशा लोकांनी ट्रान्सवॉलपासून दूर राहणे अवश्य आहे.

परवाने हरवले तर काय करावे ?

जुन्या कायद्याप्रमाणे ज्याचा परवाना हरवला, त्याला त्याची नक्कल मिळत नसे. नव्या कायद्याप्रमाणे नक्कल मिळण्याची सोय आहे. पण ती नक्कल नव्या परवान्याची असेल. म्हणून ज्याचा परवाना हरवला, त्याने काहीच करू नये. त्याने इतर परवाना-वाल्यांप्रमाणे निर्भयपणे स्वस्थ असावे.

परवाने हरवलेल्या माणसांना प्रवेश करता येईल काय ?

एका व्यक्तीने आपला परवाना गमावला आणि तशा आशयाचे प्रमाणपत्र परवाना-कचेरीकडून मिळविले. तो हिंदुस्थानाहून परत आल्यावर ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश करू शकेल काय ? होय, इतर परवानेवाल्यांप्रमाणेच तो प्रवेश करू शकेल हे त्याचे उत्तर आहे. पण त्याने हे लक्षात ठेवले पाहिजे की, शेवटी त्याला तुरुंगात जावयाचे आहे. तुरुंगाचे भय ज्यांना वाटते, त्यांनी तूर्त ट्रान्सवॉलमध्ये येऊ नये —मग त्यांच्या-जवळ परवाने असोत वा नसोत.

परवान्यासाठी मि. चॉमनींची सही मिळवावी काय ?

बॉक्स-बर्ग येथील एका माणसाने परवान्यासाठी अर्ज केला. पण परवाना–अधि-काऱ्याने त्याला मि. चामनींची सही आणावयास सांगितले. तो अधिकारी असे म्हणाला असेल, तर ते बेकायदा आहे. जोपर्यंत नवा कायदा अंमलात आला नाही, तोपर्यंत कोणीही आपला परवाना दाखविण्याची गरज नाही.—मि. चामनींची परवानगी मिळविण्यासाठी तर नाहीच नाही.

परवान्यासंबंधीच्या प्रश्नांना उत्तर देताना मला हे सांगावेसे वाटते की, काही माणसे विगरपरवाना व्यापार सध्या करीत आहेत असे एक पत्रलेखक मला कळवितात.

परवाना एकाच्या नावाने असेल, आणि व्यापार दुसऱ्याच्या नावाने चाललेला असेल, अशा माणसांची नावे त्या पत्रलेखकाने दिलेली आहेत. त्याच्या विधानाचा खरेपणा मी अजमावू शकलो नाही. पण अशा माणसांनी सावध असावे. जर पत्रलेखकाची माहिती बरोबर असेल, तर अशा लोकांनी ही दुष्ट प्रथा सोडून द्यावी, असा मी सल्ला देईन. कारण, थोड्याशा हिंदी लोकांच्या चुकांसाठी सर्व हिंदी समाजाला शासन भोगावे लागते आणि आज ना उद्या त्या अपराधी हिंदी माणसाला शिक्षा तर होतेच.

चिनी लोकांचे ऐक्य

नव्या कायद्याला मान्यता न देण्याचा जो ठराव चिनी लोकांनी मंजूर केला, त्यासंबंधी मी पूर्वी लिहिले आहे. तेवढ्यावर न थांबता त्यांनी पुढील आशयाच्या पत्रकावर सह्या केल्या आहेत. सह्या करणारे चिनी लोक नवे परवाने न घेता तुरुंगात जातील आणि जे कोणी परवाने घेतील, त्यांच्याशी अन्नपाण्याचा व्यवहार करणार नाहीत. या पत्रकावर सुमारे ९०० चिनी लोकांनी सह्या केल्या आहेत आणि आता फक्त १०० चिनी लोकांच्या सह्या मिळवावयाच्या राहिल्या आहेत. चिनी लोकांचा उत्साह भरास आलेला दिसतो.[१]

एक सूचना

अशी एक सूचना आली आहे की, दुकान चालू राहावे म्हणून, प्रत्येक दुकानातील एका माणसाने, ठरलेल्या दिवशी किंवा तुरुंगातून बाहेर आल्यानंतर, परवाना काढावा. आणि अशा रीतीने जे आपला उद्योगधंदा चालवू इच्छितील त्यांनी आपला खर्चवेच जाता, जी शिल्लक राहील, ती सर्व 'कायदा फंडास' द्यावी. दुकानदारांनी ती सूचना मान्य केली तर ते एक अत्यंत देशभक्तिपूर्ण कार्य होईल.

एका वाढप्यावरील फौजदारी खटला

प्रिटोरिया येथील एका हिंदी वाढप्याने रजिस्ट्रारच्या मुख्य कारकुनाला ५० पौंड लाच देऊ केली, म्हणून त्याच्यावर खटला चालू आहे. अधिकाऱ्यांना लाच देणाऱ्या लोकांचे पीक आताच उगवले आहे काय ? असे एक चिकित्सक विचारतात. असे प्रयत्न पूर्वी झाले नाहीत काय ? जर असतील, तर त्यांच्यावर खटले का भरले नाहीत ?

१. नंतर चिनी असोसिएशनने नव्या कायद्याचा निषेध करणारा एक अर्ज लंडनमधील चिनी वकिलातीकडे पाठविला. परिशिष्ट क्र. २ पाहा.

जोहान्सबर्गच्या रहिवाशांना सावधगिरीची सूचना

दिवे-तपासनीस म्हणून कैक लबाड लोक खाजगी घरांत प्रवेश करतात, असे पोलिस कमिशनरने एका पत्रकाने जाहीर केले आहे. नगरपालिकेने दिलेला पास दाखविल्याशिवाय अशा माणसांना कोणीही प्रवेश देऊ नये.

फेरीवाल्यांवरील निर्बंध

फेरीवाल्यांवरील निर्बंधाचा वाद अद्याप चालू आहे. ' स्टार ' पत्राचा एक लेखक म्हणतो, प्रत्येक फेरीवाल्याने प्रत्येक नगरपालिकेच्या हद्दीत व त्या हद्दीबाहेर आपला धंदा करण्यासाठी परवाना घ्यावयाचा म्हणजे काही मैलांच्या क्षेत्रात धंदा करण्यासाठी सालीना ८० पौंडांपर्यंत द्यावे लागतील. अशा शोषणाने फेरीवाले धुळीस मिळतील. दुकानदारांना फायदा व्हावा म्हणून फेरीवाल्याचे नुकसान होईल आणि त्यांच्यामुळे जनतेची जी सोय होते, ती नाहीशी होईल. हिंदी लोकांशिवाय दुसरेही लोक फेरीवाले असतात, त्या सर्वांना हे निर्बंध लागू आहेत. सर्वसामान्य फेरीवाल्यांचे संरक्षण केले म्हणजे हिंदी फेरीवाल्यांचेही संरक्षण होईल. मुद्दा हा आहे की, खास आपल्याविरुद्ध जे निर्बंध केले असतील, त्यांनाच आपण विरोध करावा.

शिक्षणाचे बिल

या महिन्यात पार्लमेंट जेव्हा पुनः भरेल, तेव्हा नवे सरकार त्याच्यापुढे शिक्षणा-विषयीचे एक बिल मांडील. गोऱ्यांकरिता असणाऱ्या शाळेत काळ्या मुलांना प्रतिबंध करावा, अशी तरतूद त्या बिलात आहे. याचा अर्थ असा की, काळ्या-गोऱ्या मुलांना शिकविण्यासाठी खाजगी शाळा काढण्याचे एखाद्याच्या मनात आले, तर त्याला तसे करता येणार नाही. सरकारची इच्छा असेल तर काळ्यांकरिता खास शाळा निघतील. ही एक नवीच गंमत आहे ! हिंदी लोकांनी नव्या कायद्याला मान्यता दिली, तर त्यांचा लाभ काय होईल, हे या शिक्षणाच्या बिलावरून सूचित होते.

मलायी वस्ती

मलायी वस्तीतील अस्वच्छ परिस्थितीविषयी 'स्टार'मध्ये एका माणसाने लिहिले आहे. तो म्हणतो, ' येथे दोष हिंदी लोकांचा नाही, नगरपालिकेचा आहे. कारण, नगर-पालिकेने गटाराची व पिण्याच्या पाण्याच्या नळांची सोय केलेली नाही. याला नगर-पालिकेचे उत्तर असे की, भुयारी गटारांची सोय केलेली आहे आणि पुष्कळ ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे नळ आहेत. लोक पैसे द्यावयास तयार असतील तर दुसरीकडेही नळ दिले जातील. नगरपालिकेच्या अधिकाऱ्याचे म्हणणे असे की, मलायी वस्तीतील रहिवाश्यांच्या सवयी घाणेरड्या नाहीत, असे सांगता येणार नाही. त्यांच्यापैकी

काही जणांवर घाण केल्याबद्दल खटले भरलेले आहेत. घाणेरडेपणाचा हा आरोप आपण नाकारू शकत नाही, हे मलाही कबूल केले पाहिजे. कैक घरे घाणेरडी असतात; खिडक्या खराब असतात, कुंपणे मोडकळीस आलेली असतात आणि संडास तर भयानक असतात. सैपाकघरे तर अत्यंत वाईट असतात. माझ्या दृष्टीने हे सारे पाप आहे. त्याचे प्रायश्चित्त आपल्याला जबर द्यावे लागले आहे आणि याहून जबर द्यावे लागेल. स्वच्छता, मोकळी हवा व प्रकाश यांचे महत्त्व लोकांना कळले तर आपले मोठे कल्याण होईल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनिअन, १५-६-१९०७

२९. वासाहतिक सचिवाला पत्र

[जोहान्सबर्ग]
१८ जून, १९०७

नामदार वासाहतिक सचिव,
प्रिटोरिया,

महाशय,

नेक नामदार पंतप्रधानांचे हंगामी सचिव मला कळवितात की, या महिन्यातील १२ तारखेचे माझे आशियावासी नोंदणी कायद्यासंबंधीचे पत्र आपल्या खात्याकडे पाठविण्यात आले आहे.

त्या पत्रातील मजकुराचा आपण अनुकूल विचार कराल, अशी माझी असोसिएशन आशा करत आहे.

आपला
इसाप इस्माइलमिया
हंगामी अध्यक्ष ब्रि. इं. असो.

इंडियन ओपिनियन, २२-६-१९०७

३०. नव्या कायद्यावरील बक्षिसाची कविता

धन्य तयांच्या माता ज्यांनी । शौर्यवीर्यभक्ति दावुनी ॥
पालन कर्तव्याचे केले । जगती त्यांचे नाव गाजले ॥ १ ॥

नेत्यावरी विश्वासूनी । तुरुंगाची वाट धरू ॥
आन न कसली आस मनाला । क्लेशाने अन्याय संहरू ॥ २ ॥

प्राणाहुनि प्यारी आहे । देशभक्ति जी प्रगटे हृदयी ॥
देव तयाचा सखा सदोदित । तळहातावरि शिर जो घेई ॥ ३ ॥

शूर वीरसे निर्भयतेने । हालअपेष्टा तुरुंग भोगा ॥
कटु फल चाखा, अंती मिळवा । विजयश्री सुखगंगा ॥ ४ ॥

जन्मा आला तो मरणार । हिंमत सोडुनि कधि जगणार ? ॥
चोर, ठक, गुलाम जीवन । धिक्कारावे मनापासुन ॥ ५ ॥

कृपासागर प्रभु बलशाली । पाठी अमुच्या उभा सदोदित ॥
बलिदानासी सज्ज सदा आम्ही । दुःखे सारी करूं उद्ध्वस्त ॥ ६ ॥

मानव आम्ही, अमुचे हक्क । मिळवू आम्ही, लाज न त्यात ॥
स्वातंत्र्याने समानतेने । जीवन फुलवू हे प्रेमाने ॥ ७ ॥

पहा, पहा त्या गोऱ्या युवती । हक्कासाठी किती भांडती ॥
जपानच्या बुटक्या नारी । तशाच करिती बहाद्दुरी ॥ ८ ॥

अकबर तैसा शूर शिकंदर । विक्रम भोज महाप्रतापी ॥
शूरांची ही भूमी सारी । भ्याडांना नच कोणि विचारी ॥ ९ ॥

रक्षक भक्षक बनतो जेव्हा । कोठे जावे जनतेने ॥
महाराज मग वदा, किति । सहन करावे आम्हि विनयाने ॥ १० ॥

अंबाराम मंगलजी ठाकर यांना बक्षीस

नव्या कायद्यावर [उत्कृष्ट कविता करणाऱ्याला] बक्षीस देण्याचे आम्ही जाहीर केले होते.[1] त्याला एकंदरीत समाधानकारक जाब मिळाला आहे. २० लोकांनी

१. " एक पौंडाचे बक्षिस " प्रकरण ३ पाहा.

स्पर्धेत भाग घेतला. त्या सर्वांनी असे कळविले आहे की, आम्ही स्पर्धेत भाग घेत आहोत, तो बक्षिसाच्या पैशावर डोळा ठेवून नव्हे, तर आमचा उत्साह आणि देश-सेवा करण्याची इच्छा व्यक्त करण्यासाठी. ही वृत्ती आणि हा उत्साह स्तुत्य आहे. तरीही आम्ही असे सांगू इच्छितो की, या बक्षिसासाठी लेखन करण्यात देशभक्ती अंतर्भूत आहे. हे बक्षीस स्वीकारण्यात कोणाला लज्जा वाटण्याचे कारण नाही—उलट, त्यात अभिमानच वाटला पाहिजे.

२० पैकी ३ स्पर्धकांच्या कविता प्रायः समान गुणांच्या होत्या. त्यांपैकी कोणाला प्रथम स्थान द्यावे, हा एक प्रश्न होता. स्पर्धेचे नियम लक्षात घेता, नाताळ सनातन धर्मसभेचे अध्यक्ष श्री. अंबाराम मंगलजी ठाकर हेच प्रथमस्थानाला योग्य असल्याचे अखेरीस ठरले आणि त्यांना आम्ही १ पौंडाची रक्कम पाठविली आहे. आम्ही श्री. अंबाराम ठाकर यांचे अभिनंदन करतो. आणि अशी आशा धरतो की, आपल्या कवितेमध्ये त्यांनी प्रकट केलेल्या उच्च ध्येयानुसार स्वतः वर्तन करून, ते इतरांना कित्ता घालून देतील आणि त्यायोगे स्वदेशाची सेवा करतील. जेव्हा भक्तीचा शौर्यात व शौर्याचा भक्तीत समावेश होतो, तेव्हा त्या दोहोंचा उत्कर्ष होतो. या दोन शस्त्रांनी सज्ज होऊन आपण आपले कर्तव्य करीत राहिलो, तर कोणत्याही विघ्नावर आपण मात करू व अखेरीस विजयी होऊ.

या २० स्पर्धकांपैकी कांहीजणांनी आपली नावेही आम्हांस कळविली नाहीत. काहींनी एकाहून अधिक कविता पाठविल्या. ज्या कविता आमच्या मताने डोळ्यांत भरण्यासारख्या आहेत, त्या दर आठवड्याला एक-एक प्रसिद्ध केल्या जातील. जेथे कवीचे नाव मिळाले असेल, तेथे ते दिले जाईल. आमच्या दृष्टीने, प्रकाशनार्ह कविता कोणत्या आणि त्यांचे कवी कोण हे जाणण्याची आमच्या वाचकांना इच्छा असेल तर त्यांनी धीर धरावा असे आम्ही सुचवितो.

हे सांगितल्यानंतर, आम्हांला असे सुचवावयाचे आहे की, कवींनी कविता करण्यासाठी अधिक श्रम घेतले असते तर, कविता याहून चांगल्या झाल्या असत्या. एकाही कवितेत विशेष काव्यगुण किंवा कला प्रकट होत नाही. जर कवींनी अधिक काळजीपूर्वक शोध केला असता, तर त्यांना अधिक चांगले शब्द व उदाहरणे सापडली असती. अधिक कष्ट करून अधिक उच्च दर्जाची कुशलता संपादन करण्याची विनंती आम्ही आमच्या वाचकांना करतो.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २२–६–१९०७

३१. नाताळ इंडियन कॉंग्रस

नाताळ इंडियन कॉंग्रेसने वर्गण्या गोळा करण्याचे काम सुरू केले आहे. पण ते काम मंदावले आहे, असे आम्हांस कळते. अद्याप त्या कॉंग्रेसला कर्ज आहे असे तिच्या चिटणिसांच्या पत्रकावरून दिसून येते. निधी गोळा करण्यात विलंब होणे नुकसानीचे आहे असे आम्हांस वाटते. आपण दिरंगाई करावी असा हा समय नव्हे. अद्याप कॉंग्रेसला परवान्याच्या कायद्याशी मोठा लढा द्यावयाचा आहे, मुदतबंद मजुरीच्या कायद्याला प्रतिकार करावयाचा आहे, आणि वेळ येईल तेव्हां, ट्रान्सवॉलच्या हिंदी लोकांना मदत करावयाची आहे. ती तिन्ही कामे महत्त्वाची आहेत. व्यापाराचे परवाने नसतील, तर व्यापाऱ्यांना त्रास सोसावा लागेल. म्हणून, स्वार्थी दृष्टीने पाहिले तरीही, कॉंग्रेसचा खजिना चांगला भरलेला असणे अवश्य आहे. १८९४ साली नमूद केलेल्या कॉंग्रेसच्या उद्देशांपैकी[1] एक असा आहे की, मुदतबंद मजुरांच्या दुःखाशी समरस होणे. थॉर्नहिल[2] येथे जे काही घडले, त्यानंतर कॉंग्रेस केवळ स्वस्थ बसू शकत नाही. या देशात तोंड उघडण्यालामुद्धा पैसा लागतो. कॉंग्रेसने ट्रान्सवॉलच्या हिंदी लोकांना लढा चालू ठेवण्याचा सल्ला दिला आहे आणि म्हणून त्यांना मदत करण्यास ती वचनबद्ध आहे. शिवाय, ट्रान्सवॉलच्या लढ्यामध्ये प्रत्येक हिंदी माणसाचा स्वार्थ गुंतलेला आहे. म्हणून, हे तिन्ही उद्देश कॉंग्रेसचे पुढारी ध्यानात घेतील आणि आपल्या कमरा कसून द्रव्यरूपाने युद्धाची शस्त्रे सत्वर सज्ज ठेवतील, अशी आम्हांस आशा वाटते. दिवसेंदिवस लांबणीवर टाकून ज्याची उपेक्षा करावी, असे हे काम नव्हे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २२–६–१९०७

३२. नाताळमधील तुरुंगाचे नियम

नाताळच्या आमदारांनी असा एक कायदा केला आहे की, त्यामुळे 'एकाला गुलाबपाणी, तर दुसऱ्याला निवडुंगाची फणी' मिळणार आहे. नाताळ सरकारच्या

१. पाहा, खंड १, प्रकरण ३७; पाने १०६–११०
२. पाहा, मुदतबंद हिंदी मजूर, प्रकरण २६.

गॅझेटवरून आम्हांला असे कळते की, नाताळमध्ये कैद्यांचे ४ वर्ग आहेत-- गोरे, वर्णीय, हिंदी आणि काफीर. गोरे किंवा वर्णीय कैदी यांच्याकडून काही काम करून घेतले, तर सरकार त्यांना काही बक्षिस देणार आहे, पण हिंदी किंवा काफीर कैद्यांनी काही काम केले, तरी त्यांना काही मिळणार नाही. शिवाय गोरे व वर्णीय कैदी यांना प्रत्येकी एक टॉवेल मिळतो. पण हिंदी व काफीर यांना तोही मिळत नाही- जणु काही त्याची त्यांना गरज नसते. अशा प्रकारे सरकारने कैद्यांमध्येही वर्ग निर्माण केले आहेत. वर्णीय कैद्यात केपचे लेकावळे, अमेरिकन निग्रो, हॉटेंटॉट वगैरेंचा समावेश होतो.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २२-६-१९०७

३३. हेजाज रेल्वे

हेजाज रेल्वेच्या[१] कारभारावर 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या पत्रलेखकाने जो हल्ला चढविला होता त्याचा सारांश आम्ही दिला आणि असे म्हटले की, त्यात उल्लेखिलेले मि. किडवाई व मि. कादिर यांच्याकडून अधिक माहिती मागविलेली आहे. मि. कादिर हिंदुस्थानाला गेलेले आहेत. मि. किडवाईंना आमचे पत्र पोचले आहे. त्यांनी दिलेले उत्तर आम्ही पुढे देत आहोत. ते स्वतः इस्लामिया अंजुमनचे[२] चिटणीस आहेत.

आपल्या पत्राबद्दल मी आभारी आहे. सध्या मी मि. रिच् यांच्याबरोबर आहे. आपण टाइम्समधील जे कात्रण पाठविले, ते त्यांनी मला दिले. त्याचे परिशीलन मी करीन आणि त्यांत तथ्य किती आहे, हे आपल्याला कळवीन. त्यात जर काही असत्य विधान असेल, तर त्याला उत्तर देण्याचा प्रयत्न मी करीन. मी काय करीत आहे, हे आपल्याला कळवीन. माझ्या धर्मबांधवांच्या अत्यंत हिताची जी गोष्ट आहे, तिच्या बाबतीत आपण जे काही करीत आहा, त्याबद्दल मी आपला कृतज्ञ आहे. हिंदुस्थानचे हिंदु व मुसलमान यांच्यापैकी कोणासंबंधीही ज्या गोष्टी घडतात, त्यांत एकमेकांनी सहाय्य करणे व त्यासाठी झटणे हे त्या दोन्ही जमातींना भूषणावह आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २२-६-१९०७

१. पाहा-खंड ६, प्रकरण ४६४
२. अखिल इस्लाम अंजुमन, लंडन.

३४. युसफअली व स्त्री-शिक्षण

हिंदुस्थानच्या सद्य:स्थितीविषयीचे मि. युसफअलीचे पुस्तक खूप वाचले जात आहे. त्यांत त्यांनी स्त्री-शिक्षणाविषयी जे विचार मांडले आहेत, ते ध्यानात घेण्यासारखे आहेत. ते म्हणतात, जोपर्यंत हिंदी स्त्रियांना योग्य शिक्षण मिळत नाही, तोपर्यंत हिंदुस्थानची स्थिती सुधारण्याचा संभव नाही. स्त्री ही मानवाची अर्धांगी मानली जाते. एखाद्याचे अर्धे शरीर काम करीनासे झाले, तर आपण त्याला अर्धांगविकार म्हणतो आणि तो झालेला माणूस कोणतेही काम करण्यास असमर्थ ठरतो. त्याचप्रमाणे, जर हिंदुस्थानातील स्त्रियांना योग्य तो उद्योग न मिळाला तर सर्व देशालाच अर्धांगाचा विकार झाला असे म्हटले पाहिजे. आणि मग इतर देशांच्या बरोबरीने हिंदुस्थान धाव मारू शकत नाही, यात आश्चर्य काय? सर्व पालकांनी आपल्या मुलींच्या बाबतीत हा विचार करावा आणि सर्व हिंदी लोकांनी हिंदुस्थानातील स्त्री-जातीसंबंधी हाच विचार करावा. मीराबाई व राबिया बिबी यांच्याशी बरोबरी करणाऱ्या हजारो स्त्रियांची आज आपल्याला फार गरज आहे.

[गुजरातीवरून]

इंडियन ओपिनियन, २२-६-१९०७

३५. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

ट्रान्सवॉल पार्लमेंट

नव्या पार्लमेंटचे दुसरे अधिवेशन ता. १४ रोजी सुरू झाले. स्थानिक सरकारने जे धोरण चालू ठेवण्याचे ठरविले आहे, त्यावर जनरल बोथा यांनी भाषण केले. त्या भाषणाकडे हिंदी समाजाने लक्ष देणे अवश्य आहे. त्यातील मुख्य मुद्दे मी पुढे देतो.

चिन्यांनी जावे

सध्याच्या मुदतबंद चिनी मजुरांना त्यांच्या कराराची मुदत संपल्यावर मायदेशी परत पाठविण्यात येईल. त्यांच्या जागी दुसरे कोणी मुदतबंद चिनी मजूर आणले जाणार नाहीत. या गतीने या वर्षाअखेरीस, ट्रान्सवॉलमधून १६००० चिनी बाहेर जातील. बाकीचे बहुधा १९०८[1] च्या अखेरीस जातील.

चिन्यांच्या जागी कोण येणार ?

चिनी गेल्यावर खाण-मजुरांची टंचाई भासू लागेल. ती दूर करण्याचा एक मार्ग म्हणजे, मिळतील तेथून काफीर आणणे आणि त्यांच्याकडून काम करवून घेणे. यासाठी पोर्तुगीज सरकारशी बोलणी चालू आहेत. दुसरा मार्ग म्हणजे खाणीत काम करण्यास, गोऱ्या मजुरांना उत्तेजन देणे आणि शेवटी सर्व ट्रान्सवॉल केवळ गोऱ्यांचा बनविणे. गोऱ्या मजुरांना कमी पगारावर काम करता यावे म्हणून, ट्रान्सवॉल जकातीच्या करारातून बाहेर पडेल, जरूर तर दुसरा करार करील. हेतु असा की, सध्या द्याव्या लागणाऱ्या जकातीत पुष्कळ कपात व्हावी आणि भाव खाली यावेत. असे झाल्याने गोऱ्यांना, इंग्लंडइतक्याच स्वस्त दराने, येथे राहाता येईल. शेतीला पुरेपूर उत्तेजन दिले जाईल. सध्या ट्रान्सवॉलला आपल्या वैभवासाठी केवळ खाणीवर विसंबून राहावे लागते, ती परिस्थिती मग बदलेल. शेतीला सहाय्य व्हावे आणि पाटबंधाऱ्यांची सोय व्हावी, म्हणून एक खास बँक उघडण्यात येईल.

ही बँक शेतकऱ्यांना कर्ज देईल. या बँकेला पैशाचा पुरवठा करण्यासाठी साम्राज्य सरकार स्थानिक सरकारला पन्नास लाख पौंडांचे कर्ज देईल.

या भाषणाचे परिणाम

या भाषणाने खाण–मालकांच्या मनात गोंधळ उडवून दिला आहे. मजूर म्हणून त्यांना फारसे काफीर मिळणार नाहीत. म्हणून, जोहान्सबर्गमधील परिस्थिती पुष्कळ वर्षे सध्यासारखीच राहील, अशी भीती आहे. पण याचा एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे हिंदी लोकांना आपले चंबूगबाळे आटोपून या देशातून निघून जावे लागेल. ट्रान्सवॉल-मध्ये मजुरांशिवाय दुसऱ्या कोणाही वर्णीय लोकांना राहू न देण्याचा ठाम निर्धार स्थानिक सरकारने केलेला दिसतो. हिंदी समाज धैर्यहीन असल्याचे आढळून आले, तर त्याची हकालपट्टी करण्यास सरकार कचरणार नाही. हिंदी समाजापुढे सध्या ' मारू किंवा मरू ' अशी परिस्थिती उभी आहे.

१ येथे मूळ प्रतीत १९०७ पडले आहे, पण तो हस्तदोष आहे, हे उघड आहे. पाहा । ' जोहान्सबर्गचे बातमीपत्र ' प्रकरण ३७.

मजूर-संरक्षक कायदा

सध्याच्या विधिमंडळात जो एक कायदा मंजूर होणार आहे, त्यामुळे माझ्या मागील टीकेला पुष्टी मिळत आहे, असे दिसते. निरनिराळ्या कारखान्यांत कामावर असलेल्या मजुरांना काम करीत असताना जर काही दुखापत झाली, तर त्यांना व त्यांच्या कुटुंबांना नुकसान-भरपाई देण्याची तरतूद करणारे एक बिल गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाले आहे. हा कायदा फक्त गोऱ्यांना लागू होणार आहे. खाणीत किंवा दुसरीकडे कोठे, एक गोरा व एक हिंदी मजूर काम करीत असले, आणि यंत्रात सापडल्यामुळे त्यांचा हात किंवा पाय कापला गेला, तर फक्त त्या गोऱ्या मजुराचा व त्याच्या कुटुंबाचा संभाळ करण्यास या कायद्याने मालक बांधलेला आहे. हिंदी मजुराचा प्रश्नच येत नाही. ईश्वराची कृपा झाली नाही, तर त्याचा सर्वनाश ठेवलेला. शिवाय संकल्पित बँक हिंदी माणसाला एक पै देईल, असेही कोणी समजता कामा नये. ती बँक खास गोऱ्या शेतकऱ्यांसाठीच आहे. जनरल बोथांच्या पराक्रमाचे अजब फळ ते आहे. त्यांच्याच जातभाईंनी ट्रान्सवॉलची भूमी बोअर लोकांच्या रक्ताने भिजविली आहे. अशी जमिनीची मशागत केल्यामुळे ते आता सोन्याचे पीक काढीत आहेत, यात काहीच आश्चर्य नाही. त्या बोअर लोकांच्या धैर्याचा एक शतांश जरी आपल्यामध्ये आला, तरी आपण ऐश्वर्याच्या राशीवर लोळत राहू.

वीनेनचे पत्र

हिंदी समाजाच्या तुरुंगात जाण्याच्या धैर्याचे जे कौतुक मि. कॅलनबॅक यांनी केले, ते पसरत आहे, असे दिसते. मि. वॉन वीनेन नावाच्या एका गोऱ्या सद्-गृहस्थाने ' स्टार 'ला एक पत्र लिहिले आहे. त्याचा सारांश पुढे दिला आहे :

" हिंदी लोकांच्या प्रश्नासंबंधी मि. कॅलनबॅक यांनी जे पत्र लिहिले, त्याला पुष्टी देण्यास कोणताही न्यायप्रेमी मनुष्य चुकणार नाही. काही थोडे हिंदी लोक ट्रान्सवॉलमध्ये शांततेने राहिले व व्यापार करू लागले, तर ट्रान्सवॉलच्या ठिकऱ्या उडतील काय ? पाश्चात्य संस्कृतीला बहर येण्याच्या फार पूर्वी जे लोक सुसंस्कृत होते, त्यांच्या वंशजांना गुन्हेगार म्हणून वागविणे आपल्याला शोभत नाही. हिंदी लोकांची नोंदणी ? जे गोरे लोक स्वतःच गुन्हेगार असतील त्यांना हिंदी लोकांच्या गळ्याभोवती असा पाश घालावेसे वाटत असावे. माझ्या दृष्टीने हिंदी लोकांचा एकच दोष दिसतो व तो म्हणजे ते उद्योगी आहेत. त्यांच्यावर आळशी गोऱ्यांनी जुलूम करावा, ही गोष्ट समजण्यासारखी आहे. तथापि, आपल्या स्वाभिमानाचा विध्वंस करणाऱ्या कायद्या-विरुद्ध हिंदी लोक बोलू लागले, म्हणून आपण त्यांना दोष द्यावा काय ? मि. कॅलनबॅक-प्रमाणे मलाही हिंदी लोकांमध्ये सन्माननीय माणसे आढळली आहेत. श्री. गांधींच्या पत्रावरून हे दिसून येते की, हिंदी लोकांची मागणी अत्यंत संयुक्तिक आहे. आपली

मागणी फेटाळली गेल्यास, अपमान सहन करण्यापेक्षा तुरुंगात जाणे बरे, हा त्यांचा विचार स्तुत्य आहे.

इसापमियाचे पत्र

मि. इसापमिया यांनी ' स्टार 'ला लिहिलेल्या पत्राचा आशय मी पुढे देतो[1] :

जनरल बोथा यांना पत्र

ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या वतीने मि. इसापमिया यांनी जनरल बोथा यांना एक पत्र[2] पाठविले आहे. त्यांनी अशी विनंती केली आहे की, ज्या अर्थी कायद्याचा अंमल सुरू झालेला नाही, त्या अर्थी हिंदी समाजाची सूचना स्वीकारण्याजोगी आहे. जनरल बोथा यांनी उत्तर दिले की, या बाबतीत वासाहतिक सचिवाकडे पत्रव्यवहार करावा. नंतर त्याच्याकडे पत्रव्यवहार करण्यात आला. त्याचे उत्तर, हे पत्र छापून येईपर्यंत, मिळालेले असेल.

गॅझेटच्या बाबतीत गोंधळ

बादशहानी कायद्याला संमती दिली, यासंबंधीच्या पत्रकाबाबत काहीं गैरसमज निर्माण झालेला दिसतो. काहींना वाटते, कायदा दोन वर्षेपर्यंत अंमलात येणार नाही. हे चूक आहे. पत्रकात इतकेच म्हटले आहे की, एखादा कायदा मंजूर झाल्यानंतर दोन वर्षांच्या आत तो रद्द करण्याचा अधिकार बादशहांना आहे. हा कायदा बादशहापुढे ठेवण्यात आला, तेव्हा त्यांनी सांगितले की, हा कायदा रद्द करण्याची माझी इच्छा नाही. याचा अर्थ असा की, दोन वर्षांच्या आत कायदा रद्द करण्याचा आपला अधिकार बादशाहाने सोडून दिला, म्हणजे हा कायदा कायमचा पक्का होऊन बसला. पण नाही. मी असे म्हणता कामा नये, बादशाहाची मंजुरी मिळाली तरी, तो कायदा जे हिंदी लोक मान्य करणार नाहीत, त्यांच्या दृष्टीने तो रद्दच आहे.

व्हेरेडॉर्पचे व्यापारी

या विषयावर इंग्लंडमध्ये मि. रिच् यांनी जो झगडा चालविला आहे, त्याचे फळ चाखण्याची वेळ आलेली आहे, असे दिसते. महानगरपालिकेने हिंदी दुकानातील मालाची तपासणी करण्यासाठी २ व्यापारी नेमले आहेत. त्यांनी वरवर चौकशी केली आहे. त्यांनी जमविलेल्या सर्व आकड्यांचा सरकार आता विचार करील. मध्यंतरी काही चमत्कारिक घडले आहे. व्हेरेडॉर्पचा वटहुकूम[3] काही गोऱ्यांना पसंत नाही. कदाचित् याचा परिणाम म्हणून आपण बचावले जाऊ.

१. येथे हे पत्र उद्धृत केलेले नाही. ' स्टारला पत्र ' लेखांक २० पाहा.
२. ' पंतप्रधानांच्या सचिवास पत्र ' प्रकरण ९ पाहा.
३. खंड ५, लेखांक ४७७ पाहा.

नव्या कायद्यात बदल होणार नाही.

सर जॉर्ज फरार[1] यांनी जनरल बोथा यांना विचारले आहे की, आपण साम्राज्य-सरकारला काही फेरबदल सुचविले आहेत असे ऐकतो, तर ते कोणते ? जनरल बोथा यांनी उत्तर दिले की, "हिंदी लोकांच्या वतीने एक शिष्टमंडळ मला भेटले. साम्राज्य-सरकारनेही काही शिफारशी केल्या. मी उत्तरादाखल असे सांगितले की, हिंदी समाजाच्या भावना दुखविल्या जाणार नाहीत, अशा रीतीने या कायद्याची अंमल-बजावणी होईल." त्यावर सर जॉर्ज यांनी विचारले, "हे माझ्या प्रश्नाचे उत्तर नव्हे. कायद्यातील कोणतीही अडचण दूर करण्याचा आपला विचार आहे काय ?" जनरल बोथा यांनी उत्तर दिले, "कोणतीही नाही."

ब्रिटिश इंडियन असोसिएशनने वासाहतसचिवाला पत्र[2] लिहिले आहे, असे मी पूर्वी म्हटले आहे. कायद्यात काही दुरुस्ती होईल अशी आशा धरणे व्यर्थ आहे, हे जनरल बोथाच्या उत्तरावरून स्पष्ट होते. पण, कायद्याचा अंमल केव्हा सुरू होईल आणि हिंदी समाजाची सूचना मान्य होईल की नाही ही गोष्ट अलाहिदा. 'परक्याच्या मदतीची आशा, देई सदा निराशा' ही म्हण ध्यानी धरून, हिंदी समाजाने ट्रान्सवॉलमधील आपली प्रतिष्ठा राखण्यासाठी सज्ज असावे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २२-६-१९०७

३६. महंमद पैगंबर आणि त्यांचे खलिफा

प्रस्तावना

आमच्या कल्पनेनुसार, वरील विषयावर या आठवड्यापासून आम्ही एक लेखमाला सुरू करीत आहो. हिंदु व मुसलमान यांच्यामध्ये ऐक्य निर्माण करावे व टिकवावे हे आमचे नेहमीचे ध्येय आहे. ते साध्य करण्याचा एक मार्ग म्हणजे, एकामध्ये जे चांगले आहे, त्याचा दुसऱ्यास परिचय करून देणे. शिवाय,

१. ट्रान्सवॉलच्या विधिमंडळाचे सरकारनियुक्त सभासद.
२. 'वसाहत-सचिवांना पत्र' लेखांक २९ पाहा.

प्रसंग येईल तेव्हा, हिंदु–मुसलमान यांनी परस्परांची सेवा निःशंकपणे करावी. हे दोन्ही उद्देश साध्य करण्याच्या हेतूने आम्ही ही लेखमाला सुरु करीत आहोत.

हिंदी समाजामध्ये शिक्षण व संस्कृती याचा प्रसार करणे हेही आमचे ध्येय आहे. ते ध्येय डोळ्यांपुढे ठेवून, आम्ही एक स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध करण्याचा विचार केलेला होता– आणि तो अजून आहे. न्यायमूर्ती अमीर अली यांच्या इस्लामवरील ग्रंथाचे भाषांतर, तसेच द. आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या यातनांचा इतिहास [देणारे दुसरे पुस्तक] प्रसिद्ध करण्याचा आमचा हेतु आहे. पण या कामी थोडा उशीर होणे शक्य आहे. कारण आमच्या वाटेत काही अडचणी आहेत, आणि त्या अद्याप दूर झालेल्या नाहीत.

तोपर्यंत, वॉशिंग्टन आयर्विंग या सुप्रसिद्ध लेखकाने लिहिलेले पैगंबराचे चरित्र दर आठवड्यास देण्याचे आम्ही योजले आहे. हे चरित्र हिंदु, मुसलमान या दोघांनी वाचण्यासारखे आहे. पुष्कळ हिंदूंना पैगंबरांच्या जीवनाची काहीच माहिती नसते. पुष्कळ मुसलमान लोकांना, इंग्रजांनी जे संशोधन केले आणि पैगंबराबद्दल जे लेखन केले, त्याची माहिती नसते. वॉशिंग्टन यांच्या या इतिहासामुळे या दोन्ही प्रकारच्या वाचकांना लाभ होण्याचा संभव आहे. आम्ही फक्त सार देऊ— संपूर्ण भाषांतर नव्हे. वॉशिंग्टन आयर्विंगचे लेखन उत्कृष्ट मानले जाते. इतर युरोपियन लेखकांप्रमाणे, त्याने इस्लामसंबंधी काही वाईट लिहिले नाही; तथापि अधूनमधून त्यांच्या काही कल्पना आमच्या वाचकांना कदाचित् मानवणार नाहीत. अशा कल्पनाही शहाण्या माणसाने समजावून घेतल्या पाहिजेत. यापुढे जी प्रकरणे येतील, ती वाचकांनी शेवट-पर्यंत वाचावी[1] अशी आमची सूचना आहे. तेव्हा वाचनाचा हेतु, मिळेल तेथून ज्ञान ग्रहण करणे आणि त्यापासून योग्य धडा घेणे, हा असावा.

वॉशिंग्टन आयर्विंग कोण होता?

या प्रश्नाचे उत्तर आता आम्ही दिले पाहिजे. अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरी १७८३ साली त्याचा जन्म झाला. तो पुष्कळ वर्षे युरोपात राहिला. अमेरिकेच्या प्रथम-श्रेणीतील लेखकांपैकी तो एक आहे. त्याने पुष्कळ पुस्तके लिहिली. त्यांपैकी एक पैगंबरासंबंधी आहे. त्याची लेखनकला उत्तम मानली जाते. त्याची पुस्तके सर्वत्र लोकप्रिय झाली आहेत. तो चारित्र्यसंपन्न लेखक होता. त्याने ज्या स्त्रीशी विवाहाचा वाङ्निश्चय केला होता, ती मृत्यु पावली, तेव्हा तिची स्मृती घोळवीत, त्याने

१. ही प्रकरणे येथे घेतलेली नाहीत. ता. ६ जुलै ते १७ ऑगस्टपर्यंतच्या ‘इंडियन ओपिनियन’च्या अंकात हे लेख क्रमाने आले आहेत. पण ६ व्या प्रकरणाचा काही भाग प्रसिद्ध झाल्या-नंतर ही लेखमाला बंद पडली. ‘महंमद पैगंबराचे चरित्र बंद का पडले?’ लेखांक १६० पाहा.

अविवाहित राहून सर्व जन्म घालविला. तो आपल्या घरी ता. २८ नोव्हेंबर १८५९ रोजी निधन पावला.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २२–६–१९०७

३७. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

नवा कायदा

[२६ जून १९०७]

ट्रान्सवॉल सरकारने अप्रशस्त उत्तर दिले आहे. मि. इसापमियांच्या पत्राला उत्तर देताना ते सरकार म्हणते : पूर्वीच्या उत्तरात कळविल्याप्रमाणे, हिंदी लोकांची सूचना ग्राह्य नाही. याचा अर्थ, सरकार या कायद्याचा अंमल करण्यास उत्सुक आहे. त्याच्या फक्त तारखेची वाट आता आपण पाहायची आहे. ही दुर्वार्ता आहे, असे मी म्हटले आहे. पण ती सुवार्ता असेही मानता येईल. शूर माणसे सुवार्ता म्हणूनच तिचा स्वीकार करतील.

नवी नेमणूक

नव्या कायद्याप्रमाणे मि. चॅमनी यांची नेमणूक रजिस्ट्रार म्हणून झाल्याचे सरकारी गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाले आहे. त्यांनी केवळ जांभया देत बसावे, अशी तरतूद हिंदी समाज करील अशी मला आशा आहे. या बातमीदाराचे नाव नोंदणीवहीत कधीच नोंदले जाणार नाही. प्रत्येक हिंदी माणसाच्या बाबतीत असेच घडावे, अशी ईश्वरापाशी माझी नित्य प्रार्थना आहे.

बाजारातील अस्पृश्यता

जोहान्सबर्गच्या बाजारातील युरोपियन लोकांना हिंदी लोकांच्या स्पर्शाने विटाळ झाल्यासारखे वाटत असावे, असे दिसते. म्हणून, नगरपालिकेने युरोपियनांकरिता एक व काळ्या लोकांकरिता एक असे स्वतंत्र विभाग ठेवण्याचा ठराव केला आहे. चिनी लोकांकडून बाहेरच्या जागेचा वापर करण्याबद्दल भाडे घेण्याचेही ठरले आहे. आपल्या देशात अस्पृश्यांचा एक वर्ग आहे आणि येथे आपण स्वतःच अस्पृश्य बनलो

आहोत. आता आपल्या गळ्याभोवती परवान्याचे पदक बांधले, म्हणजे आपला अपमान पुरेपूर होईल. पोर्ट एलिझाबेथ येथील बाजारात हिंदी लोकांवर असाच जुल्म करण्याचा प्रयत्न झाला याचे मला स्मरण होते. तेव्हा त्यांनी बाजारात जाणे बंद केले. त्याचप्रमाणे हिंदी फेरीवाले धीट बनले तर, अस्पृश्यांच्या दशेला पोचण्याचे संकट ते टाळू शकतील. पोट भरण्यासाठी हीन प्राण्याप्रमाणे येथे राहण्यापेक्षा या वसाहतीचा त्याग करणे, फार चांगले.

डच नोंदणीचा प्रश्न

लॉलिस्टेशनहून एक पत्रलेखक म्हणतात, "माझ्याजवळ डचांच्या वेळचे एक जुने नोंदणीपत्र आहे. एक डच साक्षीदारही आहे. मला अजून परवाना मिळत नाही. तर मी काय करू ?" या पत्रलेखकाने 'इंडियन ओपिनियन' वाचलेले दिसत नाही. मी यापूर्वीच सांगितले आहे की, हा कायदा अंमलात आल्यानंतर तुरुंगात जाण्याचे सुख ज्याला चाखावयाचे असेल, त्याच हिंदी माणसाने ट्रान्सवॉलमध्ये राहावे. नसल्यास, त्याने ट्रान्सवॉल सोडून जावे.

लिओनार्डचे मत

नवे परवाने न घेणाऱ्या हिंदी लोकांना सरकार सक्तीने हद्दपार करील, अशी भीती काही हिंदी लोकांना पडली आहे. चिनी लोकांनाही ती वाटते. म्हणून त्यांनी यासंबंधी मि. लिओनार्ड[१] यांचे मत मिळविले. मि. लिओनार्ड यांनी आपले मत पुढीलप्रमाणे दिले :

"मला जो प्रश्न विचारण्यात आला आहे, त्याबद्दल मला असे सांगावयाचे आहे की, वरील कायद्यात किंवा दुसऱ्या कोणत्याही कायद्यात, कायद्याच्या कलमांचा भंग करणाऱ्या व्यक्तींना सक्तीने हद्दपार करण्याची तरतूद कोठेही नाही. माझ्या माहितीप्रमाणे, कोणत्याही कायद्यान्वये अशी हद्दपारी करता येणार नाही. १९०३ च्या क्र. ५ च्या वटहुकुमाच्या ७ व ८ कलमात सांगितलेल्या शिक्षाच तेवढ्या देता येतील."

[७ व ८ कलमांनी देश सोडून न जाणाऱ्या लोकांना तुरुंगात टाकण्याचा अधिकार दिलेला आहे.] याप्रकारे हे प्रकरण येथे कायमचे मिटले असे समजावे.

अफवा

ता. १ जुलैपासून हा कायदा अंमलात येईल, अशी नोटीस निघणार असल्याची अफवा पसरली आहे. याचा अर्थ असा की, त्या तारखेपासून ज्यांना गुलामगिरीचा शिक्का पाहिजे असेल, त्यांना तो मिळेल. यापुढचा काळ खळबळीचा राहील.

१. एक बॅरिस्टर.

हिंदी बाजार

हिंदी बाजार, म्हणजे अस्पृश्यांची घरे, आता टाऊन कौन्सिलच्या ताब्यात देण्यात आली आहेत, अशी नोटीस गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाली आहे. तूर्त या नोटिशीला काही अर्थ नाही. कारण, हिंदी लोकांना वस्तीमध्ये राहण्याची सक्ती करण्याचा अधिकार कोणासही नाही. ते सर्व आता नव्या कायद्यात गुंडाळलेले आहेत. हिंदी समाजाने नवा कायदा जर रद्द केला, म्हणजे रद्द आहे असे मानले, तर वस्तीसंबंधीचे कायदे, आणि तसेच दुसरे कायदे, ' निद्रारोगाने ' पछाडले जातील.

फेरीवाल्यांवर आक्रमण

हिंदी लोकांच्या प्रवेशाला प्रतिबंध करण्यासाठी सरकारने उपाय योजावेत असे व्यापारी संघाने सरकारला कळविले आहे. त्याला उत्तर देताना, वसाहत-सचिव म्हणतात, " प्रवेश-विषयक बिल थोड्याच दिवसांत प्रसिद्ध होईल. याशिवाय, फेरीवाल्यांसाठी, जाचक निर्बंध बनविलेले असल्यामुळे हिंदी व्यापार पुष्कळसा संपुष्टात येईल." यावरून, नव्या कायद्याने ज्यांच्यावर 'चोर म्हणून शिक्का बसेल, त्यांची दशा काय होईल, हे कोणासही कळून येईल. प्रवेशविषयक बिल प्रसिद्ध झाले तर, त्याचे भाषांतर पुढील आठवड्यात देण्याचे मी योजले आहे. आपल्याभोवती चांगला वणवा पेटला आहे. ही सारी सुचिन्हे आहेत, असे मी मानतो. एखादा रोग जेव्हा विकोपास जातो, तेव्हाच तो बरा करण्याचे उपाय शोधले जातात.

कर्टिस व नवा कायदा

या नव्या कायद्यासंबंधी मि. कर्टिस[१] यांनी जे प्रयत्न केले, त्याबद्दल पॉचेफस्ट्रूमच्या संघाने आभार प्रदर्शित केले आहेत. उत्तरादाखल मि. कर्टिस म्हणतात,[२]

" आपल्या ता. ११ मेच्या पत्राबद्दल मी ' संघाचा ' फार आभारी आहे. या प्रश्नाचे आत्यंतिक महत्त्व कोणाला वाटणार नाही, असे माझ्या कल्पनेत येत नाही. माझे युरोपियनापेक्षा आशियावासियांशी व्यक्तिशः काही विशेष भांडण नाही. पण माझे असे मत बनले आहे की, एका समाजात गोरे व आशियावासी यांचे मिश्रण होणे, हे त्या दोन्ही समाजांना घातक आहे. प्रत्येक वंशाने, आपला योग्य तो देश निवडणे, त्याच्या हिताचे आहे. व्यापारी अड्चणीचा परिहार करण्यासाठी आशियाई लोकांचा येथील प्रवेश साहजिकपणेच घडून आला आहे. मुख्यतः तो अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे आणि त्याच दृष्टीने तो सोडविला पाहिजे.

१. वसाहतींचे सहाय्यक चिटणीस.

२. मूळ इंग्रजी पत्रात, गुजराती अनुवादानुसार, काही फेरबदल, केले आहेत.

" पहिला कायदा मि. विन्स्टन चर्चिल[१] यांच्या कॉमन्स सभेतील घोषणेने पूर्ण झाला, असे तुमचा संघ मानणार नाही, अशी मला आशा आहे. जोपर्यंत हा कायदा ट्रान्सवॉलमध्ये लागू केल्याची जाहीर घोषणा झालेली नाही, तोपर्यंत दडपण आणून त्याच्या नियमात असे बदल घडवून आणता येतील, की त्यामुळे त्याचा खरा परिणाम नष्ट होईल. ट्रान्सवॉलमध्ये राहण्याचा व व्यापार करण्याचा हक्क ज्यांनी मिळविलेला आहे, अशा सर्व आशियावासियांची पूर्ण नोंदणी करावी आणि तोतयेगिरी थांबविण्यासाठी बोटांच्या ठशाची पद्धत सुरू करावी, हा या कायद्याचा हेतु आहे.

" तथापि, कायदा प्रकाशित झाला म्हणजे सारे संपले, असे आपण मानण्याचे कारण नाही. तो कायदा अंमलात येतो की नाही, या प्रश्नावर पुष्कळसे अवलंबून आहे. माझ्या दृष्टीने, सरकारने शक्य ती कोणतीही गोष्ट करावयाची बाकी ठेवली नाही. जनता—विशेषतः वृत्तपत्रे—या कायद्याची यशस्वी अंमलबजावणी करण्याच्या कामी मदत करतील, अशी आशा आहे. या कायद्याचा अंमल करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठिंबा देणे, हे वृत्तपत्रांचे कर्तव्य आहे. हे काम सोपे नाही. जनतेचा पूर्ण विश्वास असल्याशिवाय, ते काम करणे त्यांना अशक्य होईल. या अधिकाऱ्यावरील जनतेच्या विश्वासाला धक्का लावण्याचा प्रयत्न कुणी केल्यास त्याकडे अत्यंत दक्षतेने लक्ष दिले जाईल, असा मला विश्वास वाटतो. त्यांना एक अत्यंत, बिकट कर्तव्य करावयाचे आहे. आणि त्या कामी त्यांना वैयक्तिक वैमनस्य ओढवून घ्यावे लागेल. त्यांच्यावर सार्वजनिक रीत्या कोणी आरोप केले, तरी त्यांना स्वतःचा बचाव करता येणार नाही. त्यांचे वर्तन बरोबर आहे की नाही याचा निवाडा त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्याशिवाय खरोखर दुसरे कोणीही देऊ शकणार नाहीत. माझे याविषयीचे स्पष्ट मत आहे की, या अधिकाऱ्यावर जे सार्वजनिक आक्षेप घेतले जातील, त्यांना काहीही किंमत देऊ नये. कारण, ते वसाहतीच्या सचिवांना कळतील आणि ते त्यांची योग्य विल्हेवाट लावतील. एका शब्दात सांगावयाचे म्हणजे, जोपर्यंत त्या अधिकाऱ्यावर त्या सचिवाचा विश्वास आहे, तोपर्यंत त्यांच्यावर जनतेनेही विश्वास ठेवावा. मी जेव्हा त्या अधिकारावर होतो, तेव्हा अत्यंत कर्तव्यदक्ष अशा अधिकाऱ्यांना बदनाम करण्याचे प्रयत्न होत आहेत की काय हे मी सतत बारकाईने पाहात असे. जनतेनेही अशा आरोपाकडे लक्ष न देणे, तिच्या हिताचे आहे. "

मि. कर्टिस यांनी, खरोखर हे एक अजब चित्र रंगविले आहे. प्रथम, त्यांनी हा कायदा मंजूर होण्यासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न केले. आता अधिकाऱ्यांना त्रास होऊ नये म्हणून ते जनतेला आगाऊ सूचना देत आहेत. अधिकाऱ्यांनी कितीही जुलूम केला

१ [१८७४–१९६५]. ब्रिटिश मुत्सद्दी व लेखक, वसाहतींचा उपचिटणीस १९०५ ते १९०८; इंग्लंडचा पंतप्रधान १९४०-४५; १९५१–५५.

तरी त्याचा विचार करण्यासाठी जनतेने शीण वेऊ नये, अशी त्यांची सूचना आहे. हिंदी समाजाच्या सुदैवाने त्या अधिकाऱ्यांची सेवा यापुढे मुळीच घ्यावी लागणार नाही. पण ती घ्यावी लागली असती, असे मानले तर, आणि एखाद्या अधिकाऱ्याने दुर्वर्तन केले तर जनतेने, जॅक्सनच्या बाबतीत केले त्याप्रमाणे, त्याला कोर्टात खेचू नये अशी सूचना मि. कर्टिस यांच्या पत्रात आहे. का ? तर, वासाहतिक सचिवाला सर्व काही माहीत आहे. सर ऑर्थर लॉली[१] यांना आपल्या अधिकाऱ्यांची माहिती केव्हा कळली ? तर एकसारख्या तक्रारी त्यांच्याकडे गेल्यावर, हे मि. कर्टिस विसरलेले दिसतात.

चिनी लोकांचा झगडा

चिनी संघाचे मि. किमिग ' स्टार 'ला लिहितात,[२]

हा लज्जास्पद वटहुकूम, आमच्या भावनांचा नीट विचार न करता, पुनः अंमलात येणार आहे, याचे आम्हांस अत्यंत आश्चर्य वाटते.

आम्ही कोण आहोत ? स्वेच्छेने फेरनोंदणी करण्यास आमचा विरोध नाही. पण गोऱ्यांचे गुलाम होण्यास आम्ही तयार नाही; हा आमचा निर्णय आम्ही पुनः जाहीर करतो. अशी वागणूक आम्ही सहन करणार नाही. या अपमानास्पद वटहुकुमाने आमची मानहानी आम्ही होऊ देणार नाही. आणि आमचे जीवन त्यांच्या इच्छेवर अवलंबून राहील, तरीसुद्धा येथील सच्चे रहिवासी म्हणून, आमच्या स्वातंत्र्याच्या हक्कासाठी आम्ही अखेरपर्यंत लढत राहू. आम्ही वेडेपणाची मागणी करीत नाही, तर शुद्ध न्याय आणि सरळ वागणूक यांचीच मागणी आम्ही करीत आहोत.

चीनमध्ये ब्रिटिश लोकांना सुस्वभावाबद्दल फार मान दिला जातो. पण तेच ब्रिटिश लोक येथे आम्हांला गुलामासारखे वागवीत आहेत, यामुळे त्यांच्या नावलौकिकाला मोठा कलंक लागेल, एवढेच नव्हे तर, आमचा व अखिल चीन देशाचा त्यांच्यावरील सर्व विश्वास पार नाहीसा होईल.

मिडलबर्गची वस्ती

मिडलबर्गच्या टाऊन कौन्सिलचे म्हणणे असे आहे की, तेथील हिन्दी लोक वस्तीबाहेर जात नाहीत आणि आपण वापरीत असलेल्या जागांचे भाडेही देत नाहीत. शिवाय त्या जागांचा वापर ते बेकायदा करीत असतात. म्हणून त्यांच्यावर खटले भरण्याचा निश्चय कौन्सिलने केलेला आहे. याचा विचार मिडलबर्गच्या वस्तीमध्ये

१. ट्रान्सवॉलचे लेफ्ट. गव्हर्नर [१९०२ ते १९०५], मद्रासचे गव्हर्नर [१९०५]; खंड ४ था, प्रकरण १४९ व खंड ५, प्रकरण १६३ पाहा.

२. गुजराती अनुवादानुसार मूळच्या इंग्लिश पत्रांत थोडे फेरफार केले आहेत.

राहणाऱ्या हिन्दी लोकांनी करावा. तें जर खरोखर भाडे देत नसतील तर ते योग्य नव्हे. आपली बाजू कोणत्याही रीतीनें चुकीची असता कामा नये.

कमिटीची चूक

आज (बुधवारी) दक्षिण आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमिटीकडून एक तार आलेली आहे. नव्या कायद्याच्या निषेधार्थ तुरुंगात जाण्याबद्दल त्या तारेत नापसंती व्यक्त केलेली आहे. यामुळे कोणताही हिंदी माणूस घाबरून जाणार नाही असा मला विश्वास वाटतो. आपल्याला समितीची मान्यता मिळाली असती तर चांगले झाले असते. पण समितीच्या नापसंतीचे कारण आपण समजू शकतो. तिचे मुख्य सभासद हे हिंदुस्थानातून निवृत्त झालेले सुप्रसिद्ध सरकारी अधिकारी आहेत. ते पुन्हा तशा अधिकारावर नेमले जाण्याचा संभव आहे. कायद्याला विरोध करण्याचा सल्ला त्यांनी दिला असता तरच नवल ! कायद्याला मान तुकवावी अशी सूचना त्यांनी केली यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. समितीचा सल्ला वकिलाच्या मताप्रमाणे आपण मानला पाहिजे. कायदा मोडण्याचा सल्ला ते कधी देणार नाहीत. परिस्थितीचे दडपण ज्याला सोसावे लागते त्यालाच तुरुंगात जाण्याचा अर्थ कळू शकेल, आणि तोच ती जबाबदारी घेऊ शकेल. या तारेचा मजकूर कळविण्यासाठी असोसिएशनची सभा भरविण्यात आली होती. तिने समितीला पुढील तार पाठविण्याचे ठरविले—

" इतर गोष्टींचा विचार बाजूस ठेवला तरी, हिंदी समाजाने या कायद्याला मान्यता देणे म्हणजे ईश्वरसाक्ष घेतलेल्या शपथेचा अवमान करणे होय. असे करण्याचा सल्ला समितीने देता कामा नये, म्हणून हिंदी लोकांविषयीची समितीची सहानुभूती यापुढेही चालू राहील अशी आशा आहे. "

अशी तार पाठविली गेली हे चांगले झाले. परंतु समिती मोडली तरीसुद्धा हिंदी समाजाने आपले अंगीकृत कार्य सोडता कामा नये. हिंदी समाजाचा खरा वाली ईश्वर हाच आहे. त्यालाच साक्षी ठेवून ठराव केला गेला. आणि त्याच्यावर श्रद्धा ठेवूनच आपण पैलतीर गाठू.

दुरुस्ती

उरलेले चिनी लोक १९०७ मध्ये निघून जातील असे मी गेल्या पत्रात म्हटले होते. त्यांतील चुकीकडे एका वाचकाने माझे लक्ष वेधले आहे. मी त्याचे आभार मानतो आणि चुकीची दुरुस्ती करतो. १९०७ ऐवजीं १९०८ पाहिजे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २९-६-१९०७

३८. “ रँड डेली मेल”ला मुलाखत[1]

[२८ जून, १९०७]

वरील घोषणेची आगाऊ सूचना मिळताच, “ मेल”च्या एका प्रतिनिधीने काल दुपारी ट्रान्सवॉल्मधील वृत्ती व कृती यांबाबत कोणते धोरण राहण्याचा संभव आहे, हे जाणून घेण्यासाठी हिंदी समाजाचे मार्गदर्शक नेते श्री. मो. क. गांधी यांची मुलाखत घेतली.

[गांधीजी] :–या कायद्याच्या अंमलबजावणीचा अंतिम परिणाम काय होईल हे सांगणे कठीण आहे. पण मी आणि माझे सहकारी यांच्यापुरते सांगावयाचे तर, संकल्पित नोंदणीला मान्यता न देण्याचा आमचा निर्धार आहे. त्यासाठी दिलेली जास्तीत जास्त शिक्षा भोगण्यास आम्ही तयार आहोत.

या आमच्या धोरणाच्या बुडाशी कोणताही राजद्रोही हेतु नाही किंवा केवळ विरोधासाठी विरोधही नाही. केवळ स्वाभिमानाच्या भावनेने प्रेरित होऊनच आम्ही हे धोरण ठरविले आहे.

याचा अर्थ असा की, कायदेभंगाची प्रचंड मोहीम सुरू होईल आणि तीत ट्रान्सवॉल्मधील हिन्दी समाजापैकी निदान निम्मे लोक भाग घेतील असा गांधींचा अंदाज आहे.

अर्थात, याचा परिणाम काय होईल हे आगाऊ सांगणे अत्यंत कठीण आहे. कारण कायद्याला अशा पद्धतीने नापसंती दाखविण्याचा मार्ग पुष्कळ वर्षे वापरात नाही. तो माझ्या देशबांधवांना नवीन आहे. तथापि, ट्रान्सवॉलच्या सर्व विभागातून माझ्याकडे जी पत्रे आली आहेत आणि “ इंडियन ओपिनियन ”ला जी पत्रे पाठविली गेली

१. तारीख १ जुलै १९०७ पासून आशियावासी कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा अमलात येईल, ही घोषणा त्या कायद्यातील नियमांसह तारीख २८–६–१९०७ च्या सरकारी गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर ही मुलाखत घेण्यात आली. तिला मथळा “ रँड डेली मेलमध्ये ” असा देण्यात आला : सोमवारपासून कायद्याची अंमलबजावणी प्रिटोरियापासून प्रारंभ, तुरुंगवास अपरिहार्य, वटहुकुमासंबंधी भारतीयांचे मत, ८००० चा कायदेभंग.

आहेत, त्यांवरून मला असे वाटते की, ट्रान्सवॉलमधील शेकडा ५० हिंदी लोक कायदेभंगाच्या बाबतीत दृढ राहातील. या कायद्याचे समर्थन करणारा एकही हिन्दी माणूस मला भेटला नाही. पुष्कळांना असे वाटते की, तुरुंगातील हाल सोसण्यापेक्षा आपण या देशाबाहेर निघून जावे. पण या कायद्याप्रमाणे नवे नोंदणी-पत्र घ्यावे असे म्हणणारा एकही माणूस मला माहीत नाही.

हिंदी लोक अत्यंत संतप्त झाले आहेत. नव्या कायद्याप्रमाणे नोंदणी करून घेण्यास नकार देणारे निदान ६००० लोक निघतील असा माझा हिशेब आहे, असे श्री. गांधी म्हणाले.

सरकारने खटले भरण्याचे धोरण चालू ठेवले तर ही माणसे तुरुंगात जातील. त्यामुळे त्यांचे फार मोठे नुकसान होईल हे निःसंशय. कारण त्यांच्यापैकी पुष्कळांची संपत्ती मोठी आहे. तथापि, स्वाभिमानाचे रक्षण करण्यासाठी सर्वस्वाची होळी करण्यास ते तयार आहेत.

देशातील कायद्यांचा आपल्याशी संबंध असला तरी ते घडविण्याच्या कामी आम्हांला काहीच मत नाही; म्हणून अशा कायद्यांविषयीची नापसंती व्यक्त करण्याचा एकच मार्ग म्हणजे त्याचा सादर इन्कार करणे हाच होय, असे आम्हांस वाटते. कायद्याचा इन्कार केल्यामुळे सरकारने जर सक्तीने नोंदणी करण्याचा हट्ट धरला तर ट्रान्सवॉलमधील हिन्दी लोकांच्या वास्तव्याचा प्रश्न (गोऱ्या) वसाहतवाल्यांच्या इच्छेनुसार सुटेल. म्हणजे अखेरीस, हिन्दी लोकांना हा देश सोडून जावे लागेल. तसे झाल्यास त्या वसाहतवाल्यांचे समाधान मी हिरावून घेऊ इच्छीत नाही. कारण ज्या साम्राज्याचा मी एक घटक आहे त्याचेच अंशभागी आपण असल्याचे ते जाहीर करतात. अर्थात त्यांच्या त्या भूमिकेशी त्यांचे वर्तन पूर्णपणे विसंगत ठरेल. सरकारला दिलेल्या कोणत्याही अभिवचनाप्रमाणे वागण्यास आपण समर्थ आहो असे हिंदी लोकांनी सिद्ध केले आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

स्वेच्छेने नोंदणी करण्याचे हिंदी लोकांनी कबूल केले आहे. परिणामाच्या दृष्टीने ते सक्तीच्या नोंदणीसारखेच आहे. हा कायदा सौम्य आहे आणि आशियावासियांच्या भावना न दुखविणारा आहे असे पुष्कळ सांगितले जाते. पण माझे म्हणणे इतकेच की, वसाहतीमधील सर्व निर्बंधकारक कायदे वाचल्यानंतर, या नोंदणी कायद्याइतका दुसरा अपमानास्पद व उपमर्दकारक कायदा मला आढळला नाही.

शेवटी श्री. गांधींनी जुन्या एम्पायर थिएटरमध्ये भरलेल्या प्रचंड सभेचा उल्लेख केला. ते म्हणाले, "वृत्तपत्रांच्या अंदाजाप्रमाणे, त्या सभेला २००० हिंदी लोक हजर होते आणि त्यांनी एकमताने अशी गंभीर घोषणा केली की, सक्तीच्या नोंदणीला

आम्ही कदापि मान्यता देणार नाही. या घोषणेचे पालन निष्ठेने केले जाईल असे मला वाटते."[1]

रँड डेली मेल, २९-६-१९०७

३९. लॉर्ड ॲम्प्थिल

लॉर्ड ॲम्प्थिल यांनीं दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या उपेक्षित प्रश्नांचा कैवार धैर्याने व निकराने घेतल्याबद्दल त्यांना त्या हिंदी लोकांची चिरंतन कृतज्ञता लाभलेली आहे. लॉर्डांच्या सभेत आशियावासियांच्या नोंदणी कायद्यावरील वादविवादास प्रारंभ करताना लॉर्डसाहेबानी जे भाषण केले त्यावरून असे दिसते की, त्यांच्या मते, ब्रिटिश प्रजाजन हा साऱ्या पृथ्वीच्या पाठीवर ब्रिटिश प्रजाजनच राहातो आणि ब्रिटिश मुत्सद्द्यांनी दिलेला शब्द एखाद्या करारासारखाच असतो. मग तो शब्द मोडल्याबद्दल संताप प्रगट करू न शकणाऱ्या मानव वंशांना दिलेला तो शब्द असेना का? लॉर्ड-साहेबांनी प्रारंभिलेले हे कार्य ते तसेच पुढे चालवितील आणि प्रथम श्रेणीचा हा प्रश्न योग्य त्या भूमिकेवर नेऊन ठेवल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहीत अशी आशा आपण करू या.

हा प्रश्न इतक्या महत्त्वाचा आहे की, ट्रान्सवॉलमध्ये चिनी मुदतबंद मजुरांची आवक नष्ट करणे किंवा साम्राज्य सरकारकडून ट्रान्सवॉलमधील शेतीच्या विकासासाठी कर्ज मिळविणे या प्रश्नांपेक्षा वरील प्रश्नाची मातब्बरी अनंत पटींनी मोठी आहे अशी कबुली सर जॉर्ज फरार यांनाही द्यावी लागली आहे. हिंदुस्थानातील वृत्तपत्रांची जी कात्रणे आमच्याकडे आली आहेत त्यांवरून असे दिसते की, दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांना बाधणाऱ्या घटनांनी हिंदी जनतेवर खोल ठसा उमटविला आहे. म्हणून अशा सर्वमान्य महत्त्वाच्या प्रश्नावर, याच्या सोडवणुकीची जबाबदारी असणारे लॉर्ड एल्जिन यांनी, योग्य तो विचार करण्याची तसदी घेतली नाही, ही कीव करण्यासारखी गोष्ट होय. या लॉर्डसाहेबांनी, बहुधा न कळत, ट्रान्सवॉल सरकारच्या आमिषाला भुलून,

१. यावर संपादकीय टिपण असे आहे की,– "गेल्या खानेसुमारीप्रमाणे, ट्रान्सवॉलमध्ये ९९८६ हिंदी लोक आहेत. त्यांमध्ये ८६४७ पुरुष आहेत. प्रिटोरियाच्या म्युनिसिपल हद्दीत, १६८१ हिंदी असून त्यांत १४४५ पुरुष आहेत. शिवाय ३१ चिनी आहेत– ते सारे पुरुष आहेत."

हिंदी लोकांच्या प्रवेशाचा प्रश्न व ट्रान्सवॉलमध्ये स्थायिक झालेल्या हिंदी लोकांच्या वागवणुकीचा प्रश्न यांची गल्लत केली आहे हे पाहून आम्हांस दुःख वाटते. आशियावासियांच्या नोंदणीचा कायदा हिंदी लोकांच्या प्रवेशावर नियंत्रण घालीत नाही हे ब्रिटिश इंडियन असो. ने निर्णायक रीतीने दाखवून दिले आहे, असे आमचे मत आहे. शांततासंरक्षक वटहुकूम रद्द करून त्या जागी नवा कायदा आला पाहिजे असे लॉर्ड सेल्बोर्न[1] यांनी म्हटले आहे, आणि त्याची योजनाही तयार होत आहे. नोंदणीकायदा मजुरांच्या प्रवेशाचा प्रश्न कोणत्याही रीतीने सोडवीत नाही पण ट्रान्सवॉलमधील हिंदी रहिवाश्यांना हलक्या दर्जाला पोहोचवितो. त्यामुळे, कोणताही माणूस अपराधी ठरेपर्यंत निरपराधी मानला पाहिजे आणि एका निरपराधी माणसाला शिक्षा होण्याऐवजी दहा अपराधी माणसे सुटली तरी चालतील, या ब्रिटिश राज्यघटनेने प्रिय मानलेल्या सिद्धान्तावर बोळा फिरविला जात आहे. हा कायदा असे गृहीत धरतो की, प्रत्येक हिंदी माणूस अपराधी आहे. तो तसा नाही,– म्हणजे त्याने ट्रान्सवॉलमध्ये सच्चेपणाने प्रवेश केला आहे–असे सिद्ध करण्याची जबाबदारी त्या कायद्याने हिंदी माणसावर टाकली आहे. काही थोड्या लबाड आशियावासी लोकांनी ट्रान्सवॉलमध्ये चोरून प्रवेश करू नये म्हणून घडविलेला हा कायदा ट्रान्सवॉलमधील अखिल आशियावासी समाजाला पाशवी पद्धतीने शासन करीत आहे. आणि शिवाय हा हेतु साध्य होण्यासही हा कायदा अपुरा पडतो. कारण नोंदणी सुरू केल्याने लबाड आशियावासियांना या देशात चोरून येण्यास व उघडकीस येईपर्यंत वास्तव्य करण्यास काहीच प्रतिबंध होणार नाही. चोरांनी चोरी करू नये म्हणून सज्जनांना तुरुंगात डांबून ठेवणारा हा कायदा आहे.

परवान्याच्या बाबतीत चोरटा व्यापार चालू आहे हे विधान लॉर्ड एल्जिन यांनी जसेच्या तसे स्वीकारले आहे. त्याचा पुरावा द्या अशी मागणी ब्रिटिश इं. असो. ने अनेकवार केली असताही तो कधीच दिला गेला नाही. आशियावासियांच्या मताला मि. चॅमनींच्या वृत्तान्ताने पूर्णपणे पुष्टी मिळत आहे हे आम्ही दाखविलेच आहे.[2] अशा प्रकारे, हा कायदा आशियावासी जमातीवर दुहेरी अन्याय करीत आहे— एक तर त्या जमातीवर केलेल्या खोट्या आरोपावर त्याची उभारणी झाली आहे आणि परिणामतः तो कायदा दंडशक्तीचा आहे. तेव्हा ट्रान्सवॉलमधील चिनी व हिंदी– या दोन्ही रहिवाश्यांनी सक्तीच्या नोंदणीला आणि या कायद्यातील सर्व गर्भितार्थाला मान्यता न देण्याचे ठरविले आहे. यात आश्चर्य काय ! जर आशियावासी लोक या कायद्याचा तिरस्कार खरोखर करीत असतील, तर त्याला मान्यता न देणे हाच एक

१. दक्षिण आफ्रिकेतील हायकमिशनर आणि ट्रान्सवाल व ऑरेंज रिव्हर वसाहत यांचे गव्हर्नर, १९०५ ते १९१०

२. पाहा, खंड सहा, प्रकरण ४२३.

सरळ मार्ग त्यांच्यापुढे आहे– मग त्यामुळे त्यांची भौतिक हानी कितीही होवो. आम्हांला असा विश्वास वाटतो की, त्यांना आपल्या लढ्यात लॉर्ड ॲम्प्थिल व त्यांचे सहकारी यांची सहानुभूती लाभेल. त्यामुळे त्यांना लौकिक किंवा श्रेय मिळणार नसले तरी दीन व अनाथ जनतेची कृतज्ञता मिळेल.

इंडियन ओपिनियन, २९-६-१९०७.

४०. अंगद–शिष्टाई[1]

श्रीरामचंद्रांनी रावणाशी युद्ध सुरू करण्यापूर्वी समेटाच्या वाटाघाटीसाठी अंगदाला रावणाकडे पाठविले होते अशी कथा आहे. त्या काळी लोकमत असे होते की, शत्रूशी युद्ध सुरू करण्यापूर्वी, त्याने केलेला अन्याय नाहीसा करण्याची सर्व संधी त्याला देण्यातच खरे सामर्थ्य आहे. शत्रूपुढे ते मान वाकवीतही असत. कारण तसे करण्यात कोणतीच अप्रतिष्ठा नाही. तसे करूनही शत्रू शुद्धीवर आला नाही तर आपण आपले शक्तिसर्वस्व खर्चून आपली इच्छा अमलात आणावी. प्राचीन काळी जगातील सर्व ठिकाणचे लोक या पद्धतीने वागत असत. आताही ही पद्धत सर्वोत्तम मानली जाते.

राम रावणाशी जसा वागला, तसा हिंदी समाज ट्रान्सवॉल सरकारशी वागला आहे. शक्य ते सर्व सौजन्य हिंदी लोकांनी दाखविले आहे. पण प्रत्येक हिंदी माणसावर नवा कायदा लादल्याशिवाय ट्रान्सवॉल सरकारला समाधान वाटणार नाही.

रामाने अंगदाला शिष्टाईसाठी पाठविले. अंगदाने कितीही प्रयत्न केले तरी रावणाची समजूत काही पटेना. अखेरीस रावणाचा पराभव झाला. कारण त्याची बाजू अन्यायाची होती. ब्रि. इं. असो. च्या मार्फत हिंदी समाजाने सरकारला जी विनंती केली होती, तिचे अंतिम उत्तर मि. स्मट्स् यांच्याकडून आलेले आहे. ते असे की, हिंदी समाजाने सुचविलेली स्वेच्छेची फेरनोंदणी सरकारला मान्य होण्यासारखी नाही. म्हणून आता कायदा अंमलात येण्याची तारीख जाहीर होण्याची आपण वाट पाहात बसले पाहिजे. कायद्याखालील नियम तयार करण्यात सरकार व्यग्र आहे, असे आपण

१. रामायणातील एक प्रसंग.

धरून चालले पाहिजे. बोटांचे ठसे घेण्याबाबत काही बदल होण्याचा संभव आहे. पण त्यामुळे हिंदी समाजाची इच्छा अंशमात्रानेही पूर्ण होणार नाही. म्हणून हिंदी समाजाने लढ्यासाठी सज्ज झाले पाहिजे. त्यासाठी त्याला विशेष काही करावे लागणार नाही. तुरुंगाच्या ठरावावर दृढनिष्ठा ठेवण्याचीच गरज आहे. या कामी हिंदी समाज पूर्णपणे सिद्ध आहे, असे दाखविणारी पत्रे आमच्याकडे आलेली आहेत. म्हणून ट्रान्सवॉल सरकारने आमची विनंती फेटाळली, ही गोष्ट आम्हांला निराशेपेक्षा आनंदाचीच वाटते. बरोबर कोण आणि चूक कोण याची आता कसोटीच लागणार आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २९-६-१९०७

४१. दक्षिण आफ्रिकेतील दुष्काळ

सांप्रत दक्षिण आफ्रिकेला अत्यंत बिकट काळातून जावे लागत आहे. दुष्काळ सर्वत्र पसरलेला आहे. गोरे व वर्णीय लोक या दोघांचीही दुर्दशा उडालेली आहे. सर्वांत जास्त अडचण व्यापारी व जमीनमालक यांची झालेली आहे. अशा वेळी, काय केले पाहिजे याचा विचार दूरदर्शी माणसाने केला पाहिजे. व्यापार आणखीही मंदावेल व जमिनीच्या किंमती अधिकच कोसळतील; हे किती दिवस चालणार ? या देशातील ही आणीबाणीची स्थिती, पाऊस नसल्यामुळे किंवा पिकांची हानी झाल्यामुळे, घडून आलेली नाही. आतापर्यंत जमीन ही संपत्तीची खाण होती. पण आता ती फायदेशीर राहिलेली नाही. शेती तोट्यात आहे असा याचा अर्थ नाही. म्हणून आमचा सल्ला असा की, या संधीचा फायदा घेऊन शक्यतो प्रत्येक हिंदी माणसाने शेतीकडे लक्ष पुरवावे. हिंदी लोक, मग ते व्यापारी असोत किंवा दुसरे कोणी असोत, शेती करू शकतील. याला फारसा पैसा लागत नाही आणि परवाने वगैरे घेण्याचा प्रश्नही उद्भवत नाही. जर हिंदी समाजाने शेतीकडे पुरेसे लक्ष दिले, तर त्यामुळे त्या समाजाचा तर फायदा होईलच, पण त्याशिवाय या देशात त्या समाजाविरुद्ध जी द्वेषभावना पसरलेली आहे, ती दूर होण्यासही मदत होईल, अशी आम्हांला खात्री वाटते. येथील जमीन पडित असल्यामुळे तिच्यात नाना तऱ्हेच्या पिकांना वाव आहे. शेतीतील माल दुर्दैवाने येथे खपला नाही, तर तो निर्यात करता येईल. डच लोक शेतीमार्फत या देशाचा उत्कर्ष करण्यासाठी ट्रान्सवॉलमध्ये प्रयत्न करीत आहेत. तसाच

प्रयत्न नाताळमध्ये चालू आहे. यापासून प्रत्येक हिंदी माणसाने धडा घ्यावा आणि शेतीकडे आपले लक्ष वळवावे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २९-६-१९०७

४२. लॉर्ड ॲम्पूथिल

दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिश इंडियन कमिटीने नव्या कायद्याविरुद्ध अजून चळवळ चालविली आहे. त्या कमिटीचे अध्यक्ष झालेले लॉर्ड ॲम्पूथिल हे निकराचे प्रयत्न करीत आहेत. त्यांनी लॉर्डांच्या सभेत केलेल्या भाषणाकडे[1] आम्ही लक्ष वेधतो. त्या भाषणावरून हे दिसून येईल की, या नव्या कायद्याच्या प्रश्नाबाबत इंग्लंडमधील लोकांच्या भावना जोराने उसळलेल्या आहेत. तेथील प्रत्येकजणाला वाटत आहे की, हिंदी समाजावर जबरदस्त जुलूम चालू आहे. ते सिद्ध करण्यासाठी हिंदी समाजाने तुरुंगाच्या ठरावाला चिकटून राहिले पाहिजे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २९-६-१९०७

४३. इंग्लंडमधील वीरांगना

इंग्लंडमधील स्त्रियांना मताधिकार प्राप्त करून घ्यावयाचा आहे.[2] त्यांच्या संस्थेचा अधिकृत वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून असे दिसते की, ती संस्था आपल्या

१. हे भाषण येथे दिलेले नाही. त्यासाठी प्रकरण ३९ पाहा.

२. पार्लमेंटच्या हक्कासाठी चाललेल्या स्त्रियांच्या सफ्रेजेट चळवळीला उद्देशून हे आहे. श्रीमती अेमेलिन् पँखर्स्ट [१८२८–१९१८] यांच्या नेतृत्वाने या चळवळीतील स्त्रियांनी निरोधन, अन्नत्याग व तुरुंगवास इत्यादी लढाऊ कार्यक्रम अमलात आणला.

कार्यावर दर आठवड्यास सुमारे १०० पौंड खर्च करते. आणि आतापर्यंत, म्हणजे गेल्या दोन वर्षांत, आपल्या भगिनींना मताचा अधिकार मिळावा म्हणून तुरुंगात गेलेल्या स्त्रियांच्या कारावासाचा एकूण काळ सहा वर्षांचा आहे. या संस्थेच्या चिटणीस असणाऱ्या महिलेने म्हटले आहे की, आमचे कार्य चालू राहण्यासाठी आणखी २०,००० पौंडांची गरज आहे. ही रक्कम गोळा करण्यासाठी प्रत्येक सभासदाने मदत करावी अशी विनंती त्या महिलेने केली आहे.

आपल्या देशबांधवांकडून आपले हक्क संपादन करण्यासाठी इंग्रज स्त्रियांना इतका पैसा खर्चावा लागत आहे आणि इतक्या हालअपेष्टा सोसाव्या लागत आहेत, तर मग हिंदी समाजाला परक्या लोकांकडून आपले हक्क मिळविण्यासाठी किती पैसा खर्च करावा लागेल व किती क्लेश सोसावे लागतील, याचे त्रैराशिक सर्व हिंदी लोकांनी मांडावे. त्यांना जर १३,००० पौंड खर्चावे लागले व १३,००० हिंदी लोकांना तुरुंगात जावे लागले तर ते प्रचंड कार्य होईल की काय याचा त्यांनी विचार करावा. आतापर्यंत हिंदी लोकांनी, सर्व मिळून, २,००० पौंडसुद्धा खर्च केले नाहीत आणि एकही हिंदी माणूस तुरुंगात गेलेला नाही. आणि तरीही आपल्याला आपले हक्क मिळावेत असे मागणे म्हणजे ती एक उघड चूकच होय.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २९–६–१९०७

४४. हिंदुस्थान व ट्रान्सवॉल

हिंदुस्थानचे डोळे सध्या ट्रान्सवॉलवर खिळलेले आहेत. मद्रास येथे १०,००० हिंदी लोकांची एक सभा भरून तीत असा ठराव झाला की, दक्षिण आफ्रिकेत हिंदी लोकांना सोसाव्या लागलेल्या यातना लक्षात घेता, त्या वसाहतींतील गोऱ्या लोकांना हिंदुस्थानात नोकऱ्या व इतर संधी मिळण्यास प्रतिबंध करावा. लाहोरच्या "ट्रिब्यून" पत्राने लिहिले आहे की, हिंदी समाजाने आपले धैर्य अखेरपर्यंत टिकवून धरले तर पुष्कळच लाभ होईल. हिंदुस्थानातील सारी वृत्तपत्रे या प्रश्नाची चर्चा करीत आहेत आणि सर्वजण सहानुभूती दाखवीत आहेत. (येथे) हिंदी लोकांवर जुलूम केल्याने त्याचा विपरीत परिणाम हिंदुस्थानात दिसून येतो, हे लॉर्ड लॅन्सडाउनसारख्या अधि-

कार्‍यांना करून चुकले आहे. या सर्व चिन्हांवरून हे स्पष्ट होते की, हिंदी समाजाला आपले सामर्थ्य सिद्ध करण्यास आता अमोल संधी आलेली आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २९-६-१९०७

४५. मुलींचे शिक्षण

काही दिवसांपूर्वी अलिगड येथे " मुस्लीम झनाना नॉर्मल गर्ल्स स्कूल " स्थापन झाले आणि ते दिवसेंदिवस वाढत आहे. या शाळेला मदत देण्यासाठी सरकारकडे विनंती करण्यात आली आहे. शाळेसाठी जमीन खरेदी करण्यात आली आहे. आणि शाळेला जोडून एक वसतिगृह सुरू करण्याचा इरादा आहे. बालोद्यानाच्या पद्धतीवर ऊर्दूमध्ये खास पुस्तके तयार करण्यात आली आहेत. शालाप्रमुख म्हणून मुसल्मान महिला उपलब्ध न झाल्याने तूर्त एका गोऱ्या स्त्रीची नेमणूक द. म. २०० रु. पगारावर केलेली आहे. आतापर्यंत या शाळेसाठी १३००० रु. गोळा झाले आहेत.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २९-६-१९०७

४६. प्रिटोरियाच्या सभेतील भाषण [1]

श्री. गांधी यांनी या कायद्याच्या परिणामांचे विवरण करून असे सांगितले की, राव व रंक अशा प्रत्येक हिंदी माणसाने स्वतंत्र बनले पाहिजे. या कायद्याला

[1] आशियावासी कायद्याच्या निर्बंधांचा निषेध करण्यासाठी हिंदी लोकांची सभा भरली असताना तीत गांधीजींनी भाषण केले, त्याचा हा संक्षिप्त वृत्तांत आहे. याशिवाय " प्रिटोरिया येथील सार्वजनिक सभा " प्रकरण ५६ पाहा.

" साम्राज्य " सरकारने संमती दिली आहे, याला काहीच अर्थ नाही. अद्याप तो कायदा हिंदी समाजाने स्वीकारावयाचा आहे.

जोपर्यंत हिंदी समाज या कायद्याला मान्यता देत नाही, तोपर्यंत तो मंजूर झाला असे मानता येत नाही. जरी काही लहानथोर हिंदी लोकांनी या कायद्याप्रमाणे गुलामगिरीचे पट्टे घेतले, तरी त्यांचा कित्ता इतर लोक गिरवणार नाहीत. जे स्वतंत्र राहातील ते अखेरीस जिंकतील.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ६–७–१९०७

४७ " रँड डेली मेल " ला पत्र[१]

जोहान्सबर्ग,
ता. १ जुलै १९०७

संपादक,

[रँड डेली मेल] यांस—

महाशय,

आशियावासी नोंदणी कायद्याला होणाऱ्या तथाकथित " सविनय प्रतिकारावर " आपण जे सौम्य व सद्भावपूर्ण टिपण लिहिले आहे, त्यावर टीका करणे कदाचित् कृतघ्नपणाचे दिसेल. हिंदी समाजाच्या सविनय प्रतिकाराला मी " तथाकथित " म्हटले, याचे कारण असे की, हा खरोखर प्रतिकार नव्हे; तर सर्व समाजाने क्लेश सोसण्याचे हे धोरण आहे. कायद्यातील निर्बंध वाचूनसुद्धा आपल्याला हे कृत्य भावनावशतेचे वाटते. माझ्या आठ वर्षांच्या मुलाला, त्याच्या आयुष्यात पुन्हा कधीही न दिसणाऱ्या अधिकाऱ्यासमोर, त्याचा काहीही गुन्हा नसताना, स्वतंत्रपणे व नंतर सामुदायिकपणे, बोटांचे ठसे देण्याच्या जुलमी प्रक्रियेतून जात असलेला पाहण्यापेक्षा, त्याचा पिता म्हणून, मी स्वतः जर बंदुकीच्या गोळीने ठार होण्याचे पसंत केले तर ती भावनावशता होईल काय ? या देशात अस्थिर जीवन जगण्याची किंमत म्हणून मी

१. हे पत्र ता. ६–७–१९०७ च्या ' इंडियन ओपिनियन'मध्ये उद्धृत केले होते.

माझ्या आईचे नाव व तशीच इतर माहिती देण्याचे नाकारले, तर ती भावनावशता होईल काय ?

टाकाने सही करणे व आंगठयाचा ठसा देणे यामध्ये काडीमात्र फरक नाही, असे लॉर्ड एल्जिन यांना आरामखुर्चीवर बसून खुशाल वाटो, पण मला माहीत आहे की, ते ज्या राष्ट्राचे नागरिक आहेत ते सर्व राष्ट्र, वैयक्तिक स्वातंत्र्यावर आघात होताच, या टोकापासून त्या टोकापर्यंत बंड करून उठेल, आणि सक्तीने सहीही घेण्याविरुद्ध आरडाओरड करणाऱ्यांत ते स्वतः पहिले राहातील. येथे सक्ती सलते, बोटांचे ठसे नव्हेत.

सरकारच्या मनात हिंदी लोकांची मानहानी करण्याची इच्छा नाही, याचा अर्थ इतकाच की, आशियावासियांशिवाय इतर लोकांची स्वातंत्र्य-भूमी असलेल्या या देशात माझ्या देशबांधवांची मानखंडना आधीच इतकी झालेली आहे की, यापुढे होणारी अधिक मानहानी त्यांना जाणवणार नाही. पण युक्तिवाद करण्याचा हा समय नाही. शूर राज्यकर्त्यांना शब्दापेक्षा कृतीचे मोल कळते. आणि म्हणून ते शौर्याला व प्रत्यक्ष कृतीलाच नमतील.

आपण म्हणता त्याप्रमाणे, प्रिटोरिया दुबळा असेल आणि सरकारला " सापाचे शहाणपण " असेल व प्रतिकाराचा भंग करण्यासाठी सरकारने सर्वात दुबळे स्थान निवडले असेल; पण ह्या कायद्याविरुद्ध आरोळी ठोकणारा मी एकटा असलो—आणि कदाचित मला मूठभर सहकारी मिळाले-- तरी सुद्धा या अपमानास्पद कायद्याचा स्वीकार करण्यात आम्ही भाग घेतला नाही असे आम्ही म्हणू शकू, पण प्रिटोरियासंबंधीचे आपले मत मला मान्य नाही. काल हिंदी लोकांची एक प्रचंड सामुदायिक सभा,[1] स्थानिक चिटणीस, मि. हाजी हबीब यांच्या जागेत, भरली असताना त्या सभेत मी एक वक्ता होतो. त्या सभेत माझ्या देशबांधवांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या जर अंतःकरणापासूनच्या असतील— आणि त्या तशा होत्या असा मला विश्वास वाटतो— तर मी आपल्याला खात्रीने सांगतो की, सक्तीच्या फेर-नोंदणीला प्रिटोरियातील एकही हिंदी माणूस मान्यता देणार नाही— मग त्याचे परिणाम काहीही होवोत.

दक्षिण आफ्रिकेच्या ब्रिटिश इंडियन कमिटीवर आपण खोटेपणाचा नसला तरी, मोठ्या अतिशयोक्तीचा आरोप फटकळ भाषेत केला आहे. त्या कमिटीने म्हटले आहे, " अत्यंत जुल्मी उपाय योजून हिंदी लोकांचा अपमान व पाणउतारा करण्यास स्थानिक सरकार उत्सुक आहे. या संशयाला ते सरकार जागा करून देत आहे. " मोठ्या अतिशयोक्तीचा किंवा खोटेपणाचा आरोप येण्याचा धोका पत्करूनही मी वरील विधानाचा

१. पाहा : " प्रिटोरियायेथील सामुदायिक सभा " प्रकरण ५६.

पुनरुच्चार करतो आणि त्याच्या पुष्ट्यर्थ, प्रिटोरियाच्या सभेत सहेतुक मानहानीचे जे ताजे उदाहरण उजेडात आले, ते आपल्याला सादर करतो. त्या सभेत एका धर्मप्रचारकाने मध्य दक्षिण आफ्रिका रेल्वेचा एक हुकूम[१] दाखविला. तेव्हा सर्व सभेमध्ये दुःखाची भावना पसरली. त्या हुकुमात असे म्हटले होतं की, रेल्वेच्या प्रवासाबाबत धर्मप्रचारकांना जी सवलत आहे, ती फक्त ख्रिस्ती व यहुदी प्रचारकांपुरतीच आहे. हा जो नवा पंक्तिप्रपंच केला जात आहे, तो आशियावासियांचा लोंढा थोपविण्यास आवश्यक उपाय आहे काय ?

आपला

रँड डेली मेल, २-७-१९०७ **मो. क. गांधी**

४८. जोहान्सबर्गची ताजी बातमी

जोहान्सबर्ग

बुधवार संध्याकाळ [३ जुलै १९०७]

नवे प्रवास-बिल[२] दाखल करण्यात आले आहे. या बिलाप्रमाणे, इंग्रजी भाषा जाणणारा माणूस, तो हिंदी नसल्यास (ट्रान्सवॉलमध्ये) प्रवेश करू शकेल. या आक्षेपार्ह कायद्यामध्ये ज्यांचा समावेश होतो, त्यांना इंग्रजी येत असो वा नसो, त्यांना प्रवेश करता येणार नाही असे दिसते. शिवाय, या बिलाच्या आधारे, सरकारला जो माणूस अनिष्ट वाटेल, त्याला ते हद्दपार करू शकेल आणि हद्दपारीचा खर्च त्याच्या मालमत्तेतून वसूल करू शकेल. खरोखर, आता हिंदी लोकांवरील जुलमाची परमावधी झाली. हे बिल मंजूर होईल की नाही हे मला माहीत नाही, पण ट्रान्सवॉल सरकारला हिंदी लोकांची हकालपट्टी करावयाची आहे, याविषयी अणुमात्र संदेह नाही. हिंदी लोकांना येथून जावयाचेच असेल तर ते सन्मानाने जातील, अपमानाने नव्हे, अशी मला आशा आहे.

आशियावासियांची भोजनगृहे

प्रत्येक हिंदी भोजनगृहाच्या मालकाने युरोपियन व्यवस्थापक नेमावा, अशी सक्ती करण्याचा विचार जोहान्सबर्गची नगरपालिका करीत आहे.

१. पाहा : "आगीत तेल ओतले," प्रकरण ५०.

२. बिलाच्या मसुद्यासाठी परिशिष्ट क्र. ३ पाहा.

व्होल्क्स्‌रस्टमधील सभा

व्होल्क्स्‌रस्ट येथे मंगळवारी एक सभा भरली. मि. कचालिया अध्यक्ष होते. श्री. गांधी, श्री. भट आणि श्री. काझी व श्री. कचालिया यांची भाषणे झाली. सर्वांनी तुरुंगाच्या ठरावाला एकनिष्ठ राहण्याचे मान्य केले. सभेतच निधी गोळा करण्यास सुरुवात झाली. २० पौंडांची अभिवचने मिळाली आणि ११ पौंड प्रत्यक्ष मिळाले.

प्रिटोरिया

प्रिटोरियातील हिंदी लोक जोरात आहेत. आतापर्यंत एकाही हिंदी माणसाने नव्या परवान्यासाठी अर्ज केलेला नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ६-७-१९०७

४९. "स्टार"ला पत्र

जोहान्सबर्ग,
४ जुलै, १९०७

संपादक,
"स्टार"
[जोहान्सबर्ग] यांस

महाशय,

आपण आपल्या वाचकांना जी नवी माहिती दिली आहे, तिच्यामुळे हिंदी समाजाला पुष्कळच आश्चर्य वाटत आहे. ती माहिती अशी की, वस्तुतः हिंदी लोकांना कोणतीच अडचण सोसावी लागत नाही, आणि बोटांचे ठसे देण्याचा प्रश्न विचारात घेण्याच्याही लायकीचा नाही. कारण, जेव्हा हिंदी शिपाई आपले निवृत्तिवेतन घेतो, तेव्हा तो आपल्या आंगठ्याचा ठसा खुशीने देतो.

काल प्रसिद्ध झालेले प्रवेशबिल, हिंदी लोकांच्या दृष्टीने निरुपद्रवी आहे असे म्हणून आपण त्याला पाठिंबा द्याल की काय, अशी आता मला शंका वाटू लागली

आहे. आशियावासी लोक अत्यंत सूक्ष्मबुद्धीचे असतात असा त्यांचा गौरव केला जातो. पण हे बिल तयार करणाऱ्यांनी जी सूक्ष्मबुद्धी दाखविली आहे, ती खरोखर त्यांच्यावर मात करणारी आहे. २ ऱ्या विभागाच्या ४ थ्या पोटविभागाचा माझा अर्थ बरोबर असेल तर, आशियावासीयांच्या नोंदणीच्या कायद्याला होणाऱ्या सविनय प्रतिकाराला ते उत्तरच आहे असे मी मानतो. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांमध्ये अद्याप प्रतिष्ठेचा जो काही अवशेष राहिला असेल त्याचे सत्त्व नाहीसे करण्यासाठी, सरकारी पद्धतीने लूट करणारी यंत्रणा उभी करण्यात आली आहे. कारण, प्रस्तुत कलमामुळे जो आशियावासी माणूस नोंदणीचे नवे प्रमाणपत्र घेणार नाही, त्याला या देशात प्रवेश करण्यास प्रतिबंध होईल. आणि अशा निषिद्ध प्रवाश्याला तुरुंगवास सोसावा लागेल व नंतर त्याला हद्दपार करण्यात येईल आणि त्याच्या हद्दपारीचा खर्च, त्याच्या या वसाहतीतील जिंदगीतून, वसूल केला जाईल. अशा प्रकारे हा कायदा अत्यंत वक्रगतीने प्रतिबंधित प्रवेशकांचा एक वर्ग तयार करीत आहे. जो माणूस ट्रान्सवॉलमध्ये घर करून राहिला आहे, पण चुकीने वा रास्तपणाने, तो आपल्याला लागू होणाऱ्या कायद्याचा निषेध आत्मक्लेशाने करीत असेल, तर त्याला आपल्या अंगीकृत देशात कायद्याचे संरक्षण न मिळण्याची शिक्षा भोगावी लागेल. शिवाय प्रस्तुत कलम केवळ आशियावासीयांच्या व अनैतिक कृत्यांविषयीच्या कायद्यांना लागू होणार आहे. याचा अर्थ असा की, आपला स्वाभिमान गुंडाळून ठेवण्यास नकार देणारे आशियावासी आणि गुंड व वेश्या या सर्वांना एकाच कोटीत घातले जाईल.

शिवाय या कायद्यातील अपमानकारकता किती बेसुमार आहे हे दाखविण्यासाठी मी जनतेचे लक्ष एका गोष्टीकडे वेधतो. ती गोष्ट म्हणजे, अत्यंत कडक कसोटीस उतरणारा एखादा हिंदी माणूस (उदा. सर मंचरजी) ट्रान्सवॉलमध्ये येऊ म्हणेल, तर त्याला स्वतःसाठी आणि आठ वर्षांवरील अज्ञान मुलासाठी नोंदणीपत्र घ्यावे लागेल आणि स्वतंत्र व सामुदायिक रीतीने बोटांचे ठसे द्यावे लागतील–नाही तर प्रतिबंधित प्रवेशक म्हणून त्याला हद्दपार व्हावे लागेल. आता असे सांगितले जाते की, या नोंदणी कायद्याचा हेतु ओळख पटविणे हाच आहे. आशियावासी कायदा न झाला तर, कोणताही माणूस, शैक्षणिक योग्यता असल्यामुळे ट्रान्सवॉलमध्ये वास्तव्य करू शकतो, मग त्याच्या ओळखीला काय अर्थ आहे? तो या वसाहतीत असो वा बाहेर असो, त्याला एखादी युरोपियन भाषा येते की नाही, याची तपासणी केव्हाही होऊ शकते. म्हणजे त्याच्या ओळखीच्या खुणा त्याच्याबरोबरच नाहीत काय?

जनरल बोथा[१] लंडनमध्ये असताना सर्व साम्राज्याच्या कल्याणाची कळकळ फार दाखवीत होते आणि त्यांनी लॉर्ड ॲम्प्थिल यांना असे आश्वासन दिले होते की,

१. पाहा : (खंड ६ पाहा), पृ. ४४७ व ४६३.

बादशहांच्या हिंदी प्रजाजनांचा अपमान करण्याचा आमचा मुळीच हेतु नाही. त्या त्यांच्या भाषणाचे काय झाले? स्वराज्य याचा अर्थ आशियावासियांचे सर्व प्रकारचे स्वातंत्र्य निरंकुशपणे हिरावून घेण्याचा परवाना, असा आहे काय? प्रोग्रेसिव्ह पार्टीच्या-तर्फे बोलताना सर जॉर्ज फरार यांनी असे सांगितले की, आशियावासियांच्या नोंदणीच्या कायद्याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. आणि तो कायदा मंजूर झाल्याने लाखो हिंदी लोकांच्या भावना ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध अकारण पेटल्या आहेत. आणि तरीही, सर जॉर्ज यांनी, अत्यंत अनुचित प्रसंगी, राजे एडवर्ड यांच्या हिंदी प्रजाजनांच्या भावना दुखविण्याचा धोका पत्करून, सरकारला साहाय्य करण्यासाठी, आशिया-वासियांच्या नोंदणी कायद्याला पाठिंबा दिला. मी ज्याकडे लक्ष वेधले आहे ते घृणास्पद कलम असलेल्या प्रवेशविषयक बिलाला प्रोग्रेसिव्ह पार्टी, आपल्या साम्राज्यशाहीची बढाई गुंडाळून, मान्यता देणार काय?

आपला,
मो. क. गांधी

"स्टार," ५–७–१९०७

५०. आगीत तेल ओतले

प्रिटोरिया येथील सार्वजनिक सभेचा वृत्तांत पाठविताना आमचा तेथील बातमी-दार लिहितो, मौलवी अहमद मुख्तियार यांनी मध्यदक्षिण आफ्रिका रेल्वेचे एक पत्र[1] दाखवून सभेत खूप खळबळ निर्माण केली. ते पत्र आम्हांला फार महत्त्वाचे वाटते. ते असे आहे:

"या महिन्याच्या २४ तारखेला तुम्ही जे पत्र पाठविले त्यात ट्रान्सवॉलमधील मुसलमान समाजाच्या धार्मिक गरजा भागविण्यासाठी धर्मोपदेशकाला द्यावयाच्या प्रवासखर्चाचा प्रश्न आहे; त्यासंबंधी मी असे सांगू इच्छितो की, मध्यदक्षिण आफ्रिका रेल्वेवर धर्मोपदेशकांना जी सवलत दिलेली आहे, ती खिस्ती व यहुदी यांच्याशिवाय इतर–धर्मीयांना दिलेली नाही; म्हणून तुम्ही मागितलेली खास सवलत मी देऊ शकत नाही."

१. पाहा : "रँड डेली मेल" ला पत्र, प्रकरण ४७.

या उत्तरावर सही आहे ती खुद्द चीफ ट्रॅफिक मॅनेजर यांची. जनरल बोथा यांनी आश्वासिलेल्या न्याय्य वागणुकीची सारी आशा या पत्राने धुळीस मिळते असे आमचे मत आहे. ब्रिटिश साम्राज्यात धार्मिक भेदभाव नाही या प्रौढीवर या पत्राने मात केली आहे. वांशिक भेदभाव, दुर्दैवाने, आपल्या आंगवळणी पडले आहेत. पण या आशियावासी कायद्याने धार्मिक भेदभाव निर्माण करून नवीन मार्ग काढला आहे–आणि त्या मार्गाने रेल्वेखाते जात आहे. ट्रान्सवॉलमध्ये राहू इच्छिणाऱ्या हिंदी लोकांना सरकारी अधिकाऱ्यांकडून आता आपण कोणती अपेक्षा धरावी, हे कळून चुकले आहे. हिंदी व मुसलमान या दोन्ही समाजांचा पाया धर्म हा आहे; आणि त्यावर कोणी आघात केल्यास ते चटकन क्षुब्ध होतात. अशा लोकांच्या धार्मिक भावनांचा अकारण उपमर्द करणारे हे ताजे उदाहरण आहे. त्याचे समर्थन लॉर्ड एल्जिन कसे करणार ?

इंडियन ओपिनियन, ६-७-१९०७

५१. मान-बिंदु

अफगाणिस्थानच्या अमीराने आपला दर्जा "हिज हायनेस" वरून "हिज मॅजेस्टी" वर नेला आहे.[1] हे सहजासहजी घडून आले नाही. ब्रिटिशांनी आपल्याला योग्य मान द्यावा हा अमीराने आपला मानबिंदु मानला. हिंदुस्थानला भेट देण्यापूर्वी त्यांनी अशी अट घातली होती की, माझा दर्जा पुरेपूर संभाळला जावा आणि सरकारने राजकीय गोष्टींचा उल्लेख करू नये. लॉर्ड कर्झन[2] यांनीही त्यांना हिन्दुस्थानास भेट देण्यासाठी बोलावले होते. पण अमीरांनी ते निमंत्रण साफ नाकारले होते. त्याचे कारण मि. मोर्ले[3] यांच्या अंदाजपत्रकावरील भाषणात उघडकीस आले आहे. काबूल येथे भाषण करताना बादशहा अमीर म्हणाले, "यावेळी हिन्दुस्थान सरकारच्या अधिकाऱ्यांनी राजकीय प्रश्नावर समंजसपणे मौन धारण केले. त्यांनी आपले वचन पाळले. म्हणून मी माझ्या इच्छेप्रमाणे त्या विषयासंबंधी बोललो, त्याचा दुरुपयोग त्यांनी

१. पाहा, खंड ६, पृ. ४७९.

२. (१८५९–१९२५). हिंदुस्थानचे व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरल, (१८९९–१९०५), पाहा : खंड ५, प्रकरण ६७.

३. (१८३८–१९२३). भारतमंत्री (१९०५–१९१०).

केला नाही. लॉर्ड मिन्टो[1] यांचे निमंत्रण सभ्य शब्दात लिहिलेले असल्यामुळे मी ते स्वीकारले. दिल्ली दरबारच्या वेळचे निमंत्रण आणि लॉर्ड मिन्टो यांनी आता दिलेले निमंत्रण यामध्ये जमीन-अस्मानाचे अंतर आहे. म्हणून मी दिल्ली दरबाराला हजर न राहाण्याचे ठरविले. असले अप्रशस्त निमंत्रण स्वीकारण्यापेक्षा मी माझ्या राज्यावर पाणी सोडून भिकारी बनणे, किंबहुना मरण पत्करणे चांगले असे मला वाटले." या सन्मानाच्या भावनेमुळेच अमीरांना मान मिळाला व लॉर्ड कर्झन पराभूत झाले.

ट्रान्सवॉलमधील हिंदी समाजाने याच दिशेने विचार करावयास हवा. आपले सर्वस्व गेले तरी वेहत्तर, आपण नव्या कायद्याला मान तुकविणार नाही अशी प्रतिज्ञा त्यांनी करणे अवश्य आहे. गॅझेटमध्ये आलेल्या पोट-नियमांचे भाषान्तर या अंकी आम्ही अन्यत्र दिले आहे. ते पोट-नियम कोणाच्याही स्वप्नात येणार नाहीत इतके कडक व जाचक आहेत. जनरल बोथा यांनी इंग्लंडमध्ये उच्चारलेली गोड भाषा पार पुसली गेली आहे, याचा आम्हांला परम संतोष आहे नवीन कायद्याची विषारी गोळी सौम्य पोट-नियमांच्या चांदीच्या वर्खातून दिली गेली असती तर काही भोळ्याभाबड्या हिंदी लोकांची दिशाभूल झाली असती. आता असा कायदा व असे पोट-नियम मान्य करणारा एकही हिंदी माणूस सापडणार नाही.

या कायद्याला मान्यता देणाऱ्या हिंदी माणसाला काय लाभ होईल, याचा आपण क्षणभर विचार करू. प्रथमतः त्याला ईश्वराचा त्याग करावा लागेल. दुसरे असे की, त्याचा सन्मान नष्ट होईल. तिसरे हे की, साऱ्या हिन्दुस्थानचे शिव्याशाप त्याला सोसावे लागतील. चौथे, त्याला पुढेमागे "वसती"मध्ये जावे लागेल आणि अखेरीस ट्रान्सवॉलमध्ये कुत्र्याचे जिणे कंठावे लागेल. कायद्याला मान्यता देऊन असे "लाभ" मिळविणारा एक तरी हिंदी माणूस असेल काय ?

आता कायद्याला मान्यता न देणाऱ्या हिंदी माणसाचे उदाहरण आपण घेऊ. तो ईश्वराला भिऊन वागणारा असेल आणि ईश्वराशी केलेला करार तो पाळील. वीर-पुरुष म्हणून त्याचा गौरव साऱ्या हिन्दुस्थानात होईल. तो जेथे जाईल ते कारागृह, राजवाडा मानला जाईल. त्याला जास्तीत जास्त जी हानी सोसावी लागेल, ती म्हणजे त्याची सर्व मालमत्ता नष्ट होईल आणि अखेरीस त्याला ट्रान्सवॉल सोडून दुसरीकडे जावे लागेल. त्याला जर ट्रान्सवॉल सोडून जावे लागले, तर तेथेही ईश्वर नाही काय ? ज्याने आपल्याला दात दिले, तो आपल्याला चणे देईलच. त्याची खुशामत करण्याची जरूर नाही. तो आपल्या कानात सदैव सांगत आहे की, "केवळ माझ्यावर विश्वास ठेव." (मामेकं शरणं व्रज) याच्या मधुर शब्दाकडे आपण लक्ष दिले नाही तर,

१. (१८४५–१९१४). हिन्दुस्थानचे व्हॉइसरॉय व गव्हर्नर जनरल (१९०५–१९१०).

कान असून आपण बहिरे ठरू. आपल्या सन्निध वास करणाऱ्या ईश्वराला आपण जर पाहात नसलो, तर डोळे असून आपण आंधळे. जर हिंदी समाज आपल्या प्रतिज्ञेवर दृढ राहील तर कोणाही हिंदी माणसाचा विनाश होणार नाही, आणि केवळ ट्रान्सवॉलमधीलच नव्हे तर, दक्षिण आफ्रिकेतील सारे हिंदी लोक स्वतंत्र होतील असे आम्ही मानतो. कारण त्यामुळे हिंदी लोकांना आपल्या सामर्थ्याचा प्रत्यय येईल आणि शूर बोअर आपल्या शौर्याची कदर करतील.

एकदा एक सिंह जन्मापासून शेळ्यांमध्ये वाढला. तो स्वतःला विसरला व स्वतःला शेळीच समजू लागला; पण सिंहांचा कळप पाहाताच, त्याला स्वत्वाची काहीशी जाणीव झाली. हे उदाहरण हिंदी सिंहाला लागू आहे. आपण दीर्घकाळ स्वतःला विसरलो आहो आणि दुर्बल बनलो आहो. आता स्वत्वाची ओळख करून घेण्याचा काळ आला आहे म्हणून–

राखी पुरो विश्वास धणीनो साचो।
जवुं जेल, जेलने–जेल एम उर राचो।[1]
[हरिवरि ठेवा भाव पुरा; तुरुंगाचा तो मार्ग स्वीकरा ॥
जाता तुरुंगाच्या वाटे, मनी आनंदची दाटे ॥]

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ६–७–१९०७

५२. दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीचा सल्ला

ट्रान्सवॉलच्या कायद्यासंबंधी समितीची जी तार आली ती आम्ही प्रसिद्ध केली आहे.[2] कमिटीच्या तारेमुळे आपण घाबरून जाण्याचे काडीमात्र कारण नाही हे मि. रिच् यांच्या पत्रावरून दिसून येईल. समितीने आपला जरी अव्हेर केला, तरी आपण तुरुंगात जाण्याचा जो निर्णय पूर्ण विचारांती केला आहे तो परत घेता येणार नाही. साहसास प्रवृत्त झालेल्या माणसाला इतर लोकांचा सल्ला काही उपयोगाचा नाही.

१. "जेल–यात्रा" नावाच्या बक्षिसाच्या कवितेतील या ओळी आहेत.
२. पाहा, "जोहान्सबर्गचे बातमीपत्र" प्रकरण ३७.

डॉ. जेमिसन यांनी ट्रान्सवॉलमध्ये (जोहान्सबर्गवर) जेव्हा हल्ला चढविला तेव्हा त्यांनी कोणाचा सल्ला घेतला नाही. तो हल्ला आता विसरला गेला आहे पण त्यांच्या शौर्याची प्रशंसा अद्याप होत आहे. आता ते जनरल बोथांचे दोस्त आहेत आणि केपचा राज्यकारभार करीत आहेत.

इंग्लंडचे पंतप्रधान[1] सर हेन्री कॅम्बेल बॅनरमन यांनी मताधिकारासाठी झगडणाऱ्या आंग्ल महिलांना असा सौम्य सल्ला दिला होता की, तुरुंगात जाण्याचा मार्ग तुम्ही सोडावा. त्या महिलांमध्ये जनरल फ्रेंच[2] यांची एक वृद्ध बहीण होती. पंतप्रधानांचा तो पोक्त सल्ला त्या वीरांगनांनी झिडकारला. मताधिकार नसल्याने स्त्रियांचे किती हाल होतात याची कल्पना सर हेन्री यांना कोठून येणार ? त्या शूर इंग्रज स्त्रिया, कोणाच्याही उपदेशाकडे लक्ष न देता, आपले हक्क मिळविण्यासाठी जर लढा चालू ठेवतात, तर ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक, समितीने किंवा दुसऱ्या बड्या लोकांनी तसा सल्ला दिला तरी, आपले असलेले हक्क व स्वतंत्रता राखण्यासाठी चाललेला आपला लढा कसा सोडून देतील?

[गुजरातीवरून]

इंडियन ओपिनियन, ६-७-१९०७

५३. कोण ही दुर्दशा !

ट्रान्सवॉलमध्ये ढग जमू लागले आहेत, मग नाताळ मागे कसा राहील ? वर्णीय लोकांवर युरोपियन लोक सतत वर्चस्व गाजवीत आहेत. आता नाताळच्या पार्लमेंटमध्ये असे बिल मांडण्यात आले आहे की, जे हिंदी जमीनमालक आपल्या जमिनी स्वतः करीत होते पण आता त्यांनी त्या दुसऱ्या हिंदी लोकांना किंवा काफिरांना खण्डाने दिलेल्या आहेत, त्यांना त्या जमिनीवर युरोपिनांच्या दुप्पट कर द्यावा लागेल. असा न्याय करण्यास फक्त दक्षिण आफ्रिकेतील युरोपियनच समर्थ आहेत ! पण पडलेल्याला लाथ मारणे हा जगाचा कायमचा नियमच आहे. म्हणून जेव्हा हिंदी लोक ताठ मान

१. इंग्लंडचे पंतप्रधान १९०५ ते १९०८.

२. पाहा, खंड ६, (खंड ६ पहा.)

करून लढ्यासाठी उभे राहातील, तेव्हाच हिंदी लोकांची गाऱ्हाणी दूर होतील. अर्थात काँग्रेसने अर्ज करणे वगैरे जरूर आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ६–७–१९०७

५४. नाताळा, तू जागा आहेस की निद्रिस्त आहेस ?

ट्रान्सवॉलमधील हिंदी माणूस नाताळमधील हिंदी माणसाच्या दारावर ठोठावत आहे आणि विचारीत आहे, “ आम्ही सर्वस्व पणास लावले आहे आणि अखेरपर्यंत लढा देणार आहोत. रणांगणावर पडलेल्या हिंदी बांधवांच्या मदतीला नाताळचे हिंदी लोक येणार की अलिप्त राहणार ? ” या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी नाताळमधील प्रत्येक हिंदी माणसाने आपल्या मनाचा निश्चय केला पाहिजे.

ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना मदत करण्याचा नाताळच्या हिंदी लोकांचा मानस असेल, तर त्यांनी आपल्या प्रतिज्ञेचा मान राखला पाहिजे. नाताळमधील हिंदी नेत्यांनी ट्रान्सवॉलच्या हिंदी लोकांना प्रोत्साहन दिले आहे हे खरे; पण ते पत्रे व तारा यांच्यामार्फत. आता त्यांनी आपला बोललेला व लिहिलेला शब्द खरा करण्याची वेळ आलेली आहे. म्हणून आम्ही नाताळमधील हिंदी लोकांना जागृत होण्याची विनंती करतो. नाही तर लोक त्यांच्याविषयी म्हणतील,

बिना टेकवाला बहु बोली बोले, पछी आपनी टेक एक्के न पाले
[फुकाचे मुखी बोलती दुर्जन, वायफळ वचन देती सर्वां ॥
वचन ते परीपूर्ण नाही होत, विश्वास तयाचा कोण धरी ॥]

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ६–७–१९०७

५५. आक्षेपार्ह कायदा

राक्षसी निर्बंध

अपेक्षित तेच घडले. नवीन कायदा १ जुलैपासून अमलात येईल असे "ट्रान्सवॉल गॅझेट" मध्ये जाहीर झाले आहे. या कायद्याप्रमाणे जे निर्बंध तयार करण्यात आले आहेत ते इतके जुलमी, इतके आक्षेपार्ह आहेत की, ते मान्य करणेही हिंदी माणसाला शक्य नाही. त्या निर्बंधाचा पूर्ण सारांश आम्ही पुढे देत आहो :[१]

१. पहिल्या कलमात पुष्कळ व्याख्या आहेत.

२. आशियावासियांची नोंद कशी ठेवावी हे यांत सांगितलेले आहे.

३. सोळा वर्षांवरील माणसांनी "ब" तक्त्यामध्ये अर्ज करावा. सोळा वर्षांखालील व ८ वर्षांखालील मुलाने "क" तक्त्यामध्ये अर्ज करावा.

४. वासाहतिक सचिवाने नेमलेल्या अधिकाऱ्यापुढे प्रत्येक प्रौढ माणसाने दाखल व्हावे आणि ब तक्त्यातील जरूर ती माहिती त्याला द्यावी. तसेच आपला परवाना त्याला दाखवावा व द्यावा. तीन पौंडांची फी भरून मिळविलेले नोंदणीपत्रही द्यावे आणि आपल्या अर्जाच्या पुष्ट्यर्थ जे जे कागदपत्र द्यावेसे वाटतील तेही द्यावेत. जेव्हा अज्ञान मुलाचा अर्ज करावयाचा असेल, तेव्हा त्याचा पिता वा पालक याने त्या मुलासह दाखल व्हावे आणि वर वर्णिलेले कागदपत्र सादर करावे व "क" तक्त्यातील माहिती पुरवावी.

वासाहतिक सचिव नेमून देईल त्या ठिकाणी नोंदणीचा प्रत्येक अर्ज केला पाहिजे.

अर्ज स्वीकारण्यासाठी नेमलेला अधिकारी, अर्ज पूर्णपणे भरून झाल्यावर, अर्जदाराला अर्जाची लेखी पावती देईल, आणि तो अर्ज नंतर रजिस्ट्रारकडे पाठवील.

५. रजिस्ट्रारने एखाद्या प्रौढ माणसाची नोंद करण्याचे नाकारले तर तो त्या नकाराची सूचना अर्जदाराला देईल आणि त्याची एक प्रत (रेसिडेंट) मॅजिस्ट्रेटकडे पाठवील.

१. हे भाषान्तर मूळ इंग्रजीतील निर्बंधाशी ताडून पाहिले आहे. पाहा परिशिष्ट ४.

६. नोंदणीचे प्रमाणपत्र " फ " तक्त्याप्रमाणे असेल.

७. प्रत्येक प्रौढ माणसाने पोलिसाला आपले नोंदणीपत्र दाखवून, जरूर तर, पुढील माहितीही द्यावी.—

(१) आपले पूर्ण नाव
(२) आपले सध्याचे निवासस्थान
(३) नोंदणीच्या अर्जाच्या वेळी असलेले आपले निवासस्थान
(४) आपले वय
(५) साक्षर असल्यास आपल्या सहीचा नमुना
(६) आपले आंगठे व बोटे यांचे ठसे

८. एखाद्या अज्ञान मुलाच्या पित्याने वा पालकाने नोंदणीपत्र दाखवून, जरूर तर पुढील माहिती द्यावी—

(१) आपले पूर्ण नाव
(२) आपले सध्याचे निवासस्थान
(३) अर्ज केला त्यावेळी अज्ञान मुलाचा जो पालक असेल त्याचे पूर्ण नाव व त्याचे त्या वेळचे निवासस्थान
(४) अशा अज्ञान मुलाचे वय
(५) अशा अज्ञान मुलाच्या आंगठ्यांचे किंवा आपल्या आंगठ्यांचे व बोटांचे ठसे

९. आठ वर्षांखालील मुलासाठी नोंदणीपत्राकरिता अर्ज केल्यावर पित्याने वा पालकाने पुढील माहिती द्यावी—

(१) त्यांची पूर्ण नावे
(२) त्यांची वये
(३) त्यांपैकी प्रत्येकाचे पालकाशी असलेले नाते
(४) प्रत्येकाची जन्म तारीख[1]
(५) प्रत्येक मुलाने ट्रान्सवालमध्ये प्रवेश केल्याची तारीख

१. मूळ इंग्रजीत " प्रत्येकाचे जन्मस्थान " असे शब्द आहेत.

१०. मूळ प्रमाणपत्र हरवल्यामुळे[1] त्याच्या नकलेसाठी अर्ज करणाऱ्या प्रत्येक आशियावासियाने पुढील माहिती पुरवावी—

(१) नोंदणीच्या प्रमाणपत्राचा क्रमांक

(२) आपले पूर्ण नाव

(३) आपले सध्याचे निवासस्थान

(४) मुलाचे प्रमाणपत्र हरवले असल्यास त्या मुलाचे पूर्ण नाव[2]

(५) आपल्या आंगठ्यांचे व बोटांचे ठसे

(६) एखाद्या अज्ञान मुलासाठी अर्ज असल्यास, पालकाच्या (उजव्या) आंगठ्याचा ठसा आणि त्या अज्ञान मुलाच्या आंगठ्यांचे व बोटांचे ठसे.

११. व्यापारासाठी किंवा दुसऱ्या कशासाठी परवाना मागण्यासाठी अर्ज केला असताना, अर्जदाराने आपले नोंदणीपत्र दाखल करून शिवाय, अधिकारी सांगेल त्याप्रमाणे आपल्या सर्व किंवा काही आंगठ्यांचे व बोटांचे ठसे द्यावेत.

१२. ट्रान्सवॉल्मधून तात्पुरते बाहेर गेलेल्या एखाद्या आशियावासी माणसासाठी व्यापाराचा परवाना मिळावा म्हणून दुसऱ्या आशियावासी माणसाने अर्ज केला असल्यास त्याने अधिकाऱ्यास पुढील माहिती द्यावी—

(१) आपले स्वतःचे नोंदणीपत्र

(२) ज्याच्यासाठी अर्ज केला त्या माणसाचे संपूर्ण नाव

(३) त्या आशियावासी माणसाचे सध्याचे निवासस्थान

(४) उजव्या आंगठ्यांचा ठसा उमटवून त्या माणसाने दिलेले मुख्त्यारपत्र अथवा इतर अधिकारपत्र.

(५) स्वतःच्या उजव्या आंगठ्याचा ठसा

१३. मर्यादित कालासाठी लागणारे परवाने "ग" तक्त्यात दिले जातील.

१. "नोंदणीच्या प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी अर्ज करावयाचा झाल्यास" असे शब्द कायद्यात आहेत.

२. मूळ इंग्रजी असे आहे, "अज्ञान मुलाचे पूर्ण नाव व वय" (अज्ञान मुलाच्या वतीने पालकाने अर्ज केला असल्यास)

"ब" तक्ता

प्रौढ माणसाने करावयाच्या अर्जाचा नमुना

पूर्ण नाव...... वंश......

जात किंवा उपजात........ वय...........उंची.........

निवासस्थान........................ व्यवसाय.........................

शारीरिक वर्णन.....................

जन्मस्थान........................

ट्रान्सवॉलमध्ये प्रथम आल्याची तारीख...

३१ मे १९०२ मध्ये कोठे होता?.......

वडिलांचे नाव..................... आईचे नाव....................

पत्नीचे नाव........................ निवासस्थान.....................

आठ वर्षांखालील मुलांची नावे, वये, त्यांचे निवासस्थान व पालकाशी नाते.........

अर्जदाराची सही

अर्ज स्वीकारणाऱ्याची सही...........
तारीख............ कार्यालय.........
उजव्या हाताचे ठसे

आंगठा	तर्जनी	मध्यमा	अनामिका	करांगुली

बरीलप्रमाणे डाव्या हाताचे वेगळे ठसे

एकत्रित ठसे

डाव्या हाताच्या चार बोटांचे ठसे	उजव्या हाताच्या चार बोटांचे ठसे

प्रौढ व्यक्तीचे ठसे घेणाऱ्याचे नाव :
तारीख :

" क " तक्ता

अज्ञान मुलासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

पालकाची माहिती

संपूर्ण नाव........................... वंश...........................
निवासस्थान ....
अज्ञान मुलाशी पालकाचे नाते...........
प्रमाणपत्राचा क्रमांक ....

अज्ञान मुलाची माहिती

पूर्ण नाव.......................... वंश..........................
जात किंवा उपजात .... वय ....
निवासस्थान .... व्यवसाय......................
३१ मे १९०२ मध्ये कोठे होता ......
वडिलांचे नाव.................... आईचे नाव.................
शारीरिक वर्णन ....
जन्मस्थान ....
ट्रान्सवॉलमध्ये आल्याची तारीख......
पालकाचा उजव्या आंगठ्याचा ठसा. पालकाची सही.................
अज्ञान मुलाची सही...........
अर्ज स्वीकारणाऱ्याची सही ......
कार्यालय ....
तारीख ....

" ब " तक्त्याप्रमाणे अज्ञान मुलाच्या उजव्या व डाव्या हाताच्या आंगठ्यांचे व बोटांचे अलग-अलग ठसे आणि उजव्या व डाव्या हाताचे ठसे घेणाऱ्या अधिकाऱ्याची सही..........................

" फ " तक्ता

नोंदणीचे प्रमाणपत्र

पूर्ण नाव..................................
वंश .... वय............उंची ....
वर्णन....................................
उजव्या आंगठ्याचा ठसा ....
रजिस्ट्रारची सही.................
तारीख ....
धारण करणाऱ्याची सही............

"ग" तक्ता[1]

तात्पुरता परवाना

सूचना

गॅझेटमध्ये असे जाहीर केले आहे की, प्रिटोरियामध्ये राहणाऱ्या आशियावासियांनी नव्या नोंदणीचे अर्ज मि. रिचर्ड टेरेन्सकोडी, ७० चर्च स्ट्रीट, यांच्याकडे ता. ३१ जुलै १९०७ च्या पूर्वी करावेत.

वरील ठिकाणी मि. कोडी सोमवार ते शुक्रवार सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत आणि शनिवारी दोन वाजेपर्यंत हजर राहतील.

नियमांचा परिणाम

पूर्वी कल्पनेत नसलेले खालील नवे मुद्दे नियमात अंतर्भूत केलेले आहेत.--

१. हिंदुस्थानात हिंदू व मुसलमान यांना आईबद्दल इतका गाढ आदर वाटतो की, तिचे नाव सांगण्याची सक्ती कोणी केली तर त्याचा शेवट खुनात होईल. आता अर्जामध्ये आईचे नाव घालावे लागेल.

२. मुलांना साऱ्या बोटांचे ठसे द्यावे लागतील असे कोणाच्या कधी स्वप्नातही आले नाही. आता ते असे १८ ठसे घेतील. परक्या माणसाने हात लावल्याबरोबर नऊ वर्षांची कोवळी मुले ओरडू लागतात हा नेहमीचा अनुभव आहे. आता त्या कोवळ्या हिन्दी मुलांचा ओबडधोबड हाताशी संबंध येणार आणि त्यांच्या बोटांचे ठसे घेतले जात असताना त्यांचे बाप स्वस्थ पाहात बसणार.

३. साऱ्या बोटांचे ठसे द्यावे लागतील, एवढेच नव्हे तर पृथक्पणे व सामुदायिकपणे असे दोनदा द्यावे लागतील.

४. मुले आणि प्रौढ यांचे ठसे घेण्याचे हुकूम पोलिसांना मिळाले आहेत.

५. जर एखादा व्यापारी बाहेरगावी गेला आणि परवान्यासाठी अर्ज त्याच्या भागीदाराने केला, तर त्या व्यापाऱ्याकडून त्याला उजव्या हाताच्या आंगठ्याच्या ठशासह मुख्त्यारपत्र आणावे लागेल. हे अत्यंत अपमानकारक आहे. अतःपर, मुख्त्यारपत्रावर हिन्दी माणसाची सही पुरेशी होणार नाही तर आंगठ्याचा ठसाही लागेल.

६. सर्व अर्ज अधिकारी तयार करतील; वकिलाने किंवा हस्तकाने तो करून चालणार नाही.

१. फ तक्त्यातील तपशिलाप्रमाणे यातीलही तपशील आहे.

या नियमामुळे खर्च वाचेल असे कोणाला सकृद्दर्शनी वाटेल. पण बारकाईने पाहिल्यास, समोर वाघ बांधून एखाद्यापुढे पंचपक्वान्नांचे ताट ठेवण्यासारखे हे आहे असे आम्हांस वाटते. अधिकाऱ्यासमोर प्रौढ हिंदी लोकही घाबरतात, मग मुलांची काय कथा?

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ६-७-१९०७

५६. प्रिटोरिया येथील प्रचंड सभा[1]

नवा कायदा प्रिटोरियामध्ये ता. १ जुलैपासून अमलात येणार आहे. म्हणून रविवार ता. ३० जून रोजी तेथे एक विराट सामुदायिक सभा भरली. जोहान्सबर्गमधील हिंदी लोक तेथे आपल्या खर्चाने मुद्दाम गेले, त्यांत हंगामी अध्यक्ष श्री. मियाँ, मौलवी-अहमद मुख्त्यार, श्री. एम्. एस. कुवाडिया, श्री. इमाम अब्दुल कादिर, श्री. उमरजी साले, श्री. मकनजी, श्री. जीनाभाई, श्री. गुलाबजीभाई, श्री. मोरारजी देसाई, श्री. गुलाब भाई पटेल, श्री. भूला, श्री. रणछोड नीछाभाई, श्री. नादिरशाह कामा, श्री. महंमद इशक, श्री. खुशाल, श्री. पीटर मूनलाईट, श्री. नायडू, श्री. ए. एस्. पिले, श्री. गांधी वगैरे होते. प्रिटोरियाच्या लोकांमध्ये मि. हाजी हबीब शिवाय तेथील मशिदीचे मौलवीसाहेब मि. हाजी कासीस जूसब, श्री. हाजी उस्मान, श्री. कचालिया, श्री. अली, श्री. हाजी इब्राहिम, श्री. गौरी-शंकर व्यास, श्री. प्रभाशंकर जोशी, श्री. मोहनलाल जोशी, श्री. उमरजी इत्यादी सुमारे चारशे हिन्दी लोक हजर होते.

जोहान्सबर्गच्या प्रतिनिधींची खाण्यापिण्याची व राहण्याची व्यवस्था मि. हाजी हबीब व मि. व्यास यांनी केली होती.

सभा बरोबर दुपारी ३ वाजता वेळेवर सुरू झाली आणि संध्याकाळी सात वाजे-पर्यंत चालली. सर्वांचे स्वागत करून मि. हाजी हबीब म्हणाले, "हा नवा कायदा पाशवी आहे. (त्यातील) निबंध जोपर्यंत प्रसिद्ध झालेले नव्हते तोपर्यंत मला अशी

१. "प्रिटोरियातील हिन्दी लोकांची प्रचंड विराट सामुदायिक सभा : आक्षेपार्ह कायद्याला जोरदार विरोध : तुरुंगवासास सारे सिद्ध" अशा शीर्षकाखाली "इंडियन ओपिनियनचा विशेष वृत्तान्त" या नावाने मूळ गुजराती रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे.

आशा वाटत होती की, ते निर्बंध समंजसपणाचे असतील तर या कायद्याचा कदाचित स्वीकार करता येईल, पण आता ते निर्बंध पाहिल्यानंतर, या कायद्याच्या स्वीकाराचा प्रश्नच उद्भवत नाही. त्याला हिंदी समाजाने एकजुटीने विरोध केला पाहिजे " असे सांगून त्यांनी मि. ईसाप मियाँ यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती केली.

मि. हाजी हबीब यांनी आपले घर समाजाच्या कामासाठी दिले याबद्दल मि. इसाप मियाँ यांनी त्यांचे आभार मानले आणि ते म्हणाले, " हा कायदा विषारी आहे, म्हणून आपण त्याला मान देऊ शकत नाही. माझे वैयक्तिक नुकसान झाले तरी समाजाच्या सेवेसाठी मी सिद्ध आहे. सर्वांनी एकजुटीने वागावे. आतापर्यंत आपण सरकारपुढे नमून वागलो. पण यापुढे असे चालणार नाही. जगात कोठेही आईचे नाव विचारीत नाहीत. फक्त " निर्णय-दिनी " आईच्या नावावरून आपली ओळख पटविली जाईल. पण आता सरकार आपल्याला आईचे नाव विचारणार आहे. अशा गुलामगिरीला हिंदी लोकांनी कदापि मान तुकवू नये."

श्री. गांधी यांनी कायद्याचा भावार्थ विशद करून सांगितला आणि ते म्हणाले, " प्रत्येक हिंदी माणसाने, मग तो श्रीमंत असो वा गरीब असो, स्वतंत्र होणे अवश्य आहे. या कायद्याला (साम्राज्य) सरकारची संमती मिळाली आहे, यामुळे काहीच फरक पडत नाही. अजून त्याला हिंदी समाजाची मान्यता मिळावयाची आहे. हिंदी समाजाची मान्यता त्याला जोपर्यंत मिळालेली नाही, तोपर्यंत हा कायदा मंजूर झाला असे म्हणता येणार नाही. एखाद्या छोट्या वा बड्या हिंदी माणसाने या कायद्यातील गुलामगिरीचा पट्टा गळ्यात अडकवून घेतला तरी त्याचा कित्ता दुसरे कोणी गिरविणार नाहीत. जे स्वतंत्र राहातील, तेच अखेरीस फत्ते पावतील."

मौलवी साहेब अहमद मुख्त्यार यांनी आवेशपूर्ण भाषण करून असे सांगितले की, " या वेळी सर्वांनी ऐक्य राखणे अवश्य आहे. धार्मिक कर्तव्याबरोबरच भौतिक कर्तव्याकडेही जे लक्ष देतील तेच खरे मुस्लीम. हजरत युसुफ आवेसलाम हे जेव्हा संकटात सापडले होते तेव्हा त्यांनी ईश्वराची प्रार्थना केली की, मला तुरुंगात पाठवावे. या जुलमी कायद्याला कोणाही हिंदी माणसाने शरण जाऊ नये. प्रत्येक ठिकाणचे लोकमत शिक्षित करण्यासाठी एक समिती नेमावी. अशी समिती नेमली गेली तर, तिच्यात काम करण्यास मी तयार आहे."

मि. नायडू तामीळमध्ये बोलले, " मी या कायद्याला मान्यता देणार नाही. मग मला मरण आले तरी बेहत्तर."

मि. उमरजी साले यांनीही भाषण करून हिंदी लोकांना ऐक्य टिकविण्यास व परवाना कचेरीवर बहिष्कार घालण्यास सांगितले.

मि. एम्. एस्. कुवाडिया यांनी पूर्वीच्या वक्त्यांना पाठिंबा दिला. मि. कामा म्हणाले, "हा कायदा इतका वाईट आहे की, त्याला कोणताही स्वाभिमानी हिंदी माणूस मान्यता देणार नाही. मी तर त्याला कधीच मान्यता देणार नाही. मग त्यामुळे माझे सर्वस्व–प्राणही– गमवावे लागले तरी चालतील."

मि. इमाम अब्दुल कादिर म्हणाले, "कोणाही हिंदी माणसाने या कायद्याचा स्वीकार केला तरी मी त्याचा स्वीकार करणार नाही. हद्दपारीपेक्षाही वाईट अशी तुरुंग-वासाची शिक्षा त्यात आहे." मौलवीसाहेबांनी ठरावाला पाठिंबा दिला आणि जाहीर केले की, "साऱ्या गावामध्ये दौरा काढण्यास मी तयार आहे."

मि. मकनजी म्हणाले, "या कायद्याने थोडी जरी सवलत मिळणार असती तरी मी तो स्वीकारला असता, पण आता माझा असा ठाम निश्चय झाला आहे की, दुसऱ्या कोणी तो स्वीकारला तरी मी त्याचा स्वीकार करणार नाही."

मि. हाजी इब्राहिम यांनीही भाषण केले आणि अखेरीस सांगितले, "या कायद्याचा स्वीकार केला जाणार नाही."

मि. नूरमहंमद आयूब म्हणाले, "हिंदी लोकांना आपल्या अंगचे पाणी दाखविण्यास ही सुवर्णसंधी आहे."

याच सुरात मि. इस्माईल जुम्मा, मनजी नथू, त्रिंबकलाल व हाजी उस्मान हाजी आबा यांनी भाषणे केली.

मि. कचालिया यांनी सांगितले, "शेकडा ९० सुरती लोक तुरुंगात जातील असे आश्वासन मी देतो."

तसेच आश्वासन मि. उमरजींनी दिले.

श्री. गौरीशंकर व्यासांनी सांगितले, "जे धर्मनिष्ठ आहेत, त्यांना सप्टेंबरची शपथ पुरेशी बंधनकारक आहे."

श्री. नीमजी आनंदजींनी 'कायद्याला कधीही मान्यता देऊ नका' असे अट्टा-हासाने सांगितले.

श्री. पिल्ले यांनीही स्फूर्तिदायक भाषण केले.

मि. गुलाबरुद्र देसाई, खुशाल छीता, गुलाम महंमद व मूसा सुलेमान म्हणाले, "परवाना कचेरीकडे जाणारा कोणी माणूस आम्हांला आढळल्यास आम्ही त्याचे मन परत फिरण्यासाठी वळवू."

मि. हाजी कासिम म्हणाले, "हा कायदा कोणत्याही परिस्थितीत हिंदी समाजाला मान्य होण्यासारखा नाही."

मौलवीसाहेब-अहमद मुख्त्यार यांनी असे दाखवून दिले की, " केवळ नमाज पढणे हेच धर्मगुरूचे काम नाही, तर जनतेच्या दुःखाशी समरस होणे हेही आहे. गोऱ्या लोकांना आपल्या धर्माचा उपमर्द करावयाचा आहे. म्हणूनच त्यांनी रेल्वेच्या भाड्यामध्ये भेदभाव ठेवला आहे. रेल्वे अधिकाऱ्यांनी आपल्याला सांगितले आहे की, रेल्वे-प्रवासासाठी सवलतीची तिकिटे मिळण्याचा हक्क ख्रिस्ती व यहुदी धर्मगुरूंना आहे, पण हिंदी मुसलमानांना नाही. अशा गुलामगिरीचा स्वीकार हिंदी समाज कधीही करणार नाही."

मि. इसापमियाँ यांनी समारोपाचे भाषण केले. मि. गुलाबरुद्र देसाई यांनी दाखविलेल्या धैर्याबद्दल त्यांनी आपली शाल त्यांना बक्षीस दिली आणि ते म्हणाले, "मी माझे स्वतःचे काम सोडून लोकसेवेला वाहून घेण्यास तयार आहे. प्रिटोरियामधील माझ्या देशबांधवांच्या शिरावर फार मोठा भार आहे, पण ते तो चांगल्या प्रकारे पेलतील अशी मला खात्री वाटते. मि. हाजी हबीब यांनी केलेल्या आतिथ्याबद्दल सर्व हिंदी समाज त्यांचा ऋणी राहील."

अशा उत्साहाच्या वातावरणात सभेचे काम संपले आणि सायंकाळी सात वाजता सभा समाप्त झाली.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ६–७–१९०७

५७. " रँड डेली मेल "ला मुलाखत

ट्रान्सवॉल सरकारच्या गॅझेटमध्ये असे जाहीर झाले आहे की, आशियावासी कायदा ता. १ जुलैपासून अमलात येईल. या नव्या कायद्यास धरून जे निर्बंध तयार केलेले आहेत ते प्रसिद्ध झाले आहेत. त्याअन्वये साऱ्या बोटांचे ठसे पृथकपणे व संयुक्तपणे घेतले जातील. " रँड डेली मेल "च्या प्रतिनिधीने श्री. गांधींची मुलाखत घेतली. हेतु हा की या निर्बंधांची प्रतिक्रिया हिन्दी लोकांकडून काय होईल ते समजून घ्यावे. त्या मुलाखतीचा पुढील वृत्तांत गेल्या महिन्याच्या २९ तारखेच्या " रँड डेली मेल " मध्ये प्रसिद्ध झाला आहे.[1]

१. पण पुढील लिहिलेला मजकूर सारांश आहे. पाहा " रँड डेली मेल "ला मुलाखत, प्रकरण ३८.

मंजूर झालेल्या आशियावासियांच्या कायद्याला मान्यता देण्यापेक्षा मी आणि माझे सहकारी कायद्यातील अंतिम शिक्षा सहन करू. या कायद्याला कोणताही स्वाभिमानी हिंदी माणूस मान्यता देणार नाही. माझ्याकडे व "इंडियन ओपिनियनच्या" संपादकाकडे जी पत्रे आली आहेत त्यावरून ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांपैकी सुमारे ५० टक्के या कायद्याला विरोध करतील. त्या कायद्याचे समर्थन करणारा एकही हिन्दी माणूस अद्यापपर्यंत मला भेटला नाही. काही म्हणतात, आम्ही हा देश सोडून जाऊ. पण नोंदणीसाठी अर्ज करण्याची नुसती भाषा उच्चारणारा एकही माणूस मला आढळला नाही. हिन्दी लोक अत्यंत संतप्त झाले आहेत. किमान ६,००० माणसे नोंदणी-अर्ज करण्याचे नाकारतील. त्यांच्यावर सरकारने खटले भरले तर ते तुरुंगात जाण्यास तयार होतील. अर्थात् तसे केल्याने त्यांचे नुकसान होईल. पण स्वाभिमानासाठी सर्वस्वाचा होम करण्यास ते सिद्ध आहेत. आम्हांला लागू होणारे कायदे तयार करण्यामध्ये आमचे मत घेतले जात नाही. म्हणून आमच्यापुढे एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे कोणत्याही कायद्याला मान्यता न देणे.

हा कायदा सौम्य आहे असे म्हटले जाते. पण मला हे सांगितले पाहिजे की, मी पुष्कळ वसाहतींमधील कायदे वाचलेले आहेत आणि एकाही वसाहतीमध्ये या कायद्या-इतका अपमानास्पद व उपमर्दकारक कायदा मला आढळला नाही. एम्पायर थिएटरमधील सभेला २,००० लोक उपस्थित होते, आणि त्यांनी एकमुखाने असा गंभीर निश्चय केला की, आपण आपली नोंदणी सक्तीने करून घ्यावयाची नाही. ही शपथ ते पाळतील असा मला विश्वास आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ६–७–१९०७

५८. जोहान्सबर्गचे वातमीपत्र

नवा कायदा

हिंदी लोक ज्यांची वाट फार दिवस पाहात होते ते निर्बंध आता प्रसिद्ध झाले आहेत. "बाप तसा बेटा, झाड तसे फळ" अशा अर्थाची एक गुजराती म्हण आहे. त्याप्रमाणे, जसा कायदा तसे निर्बंध आहेत. ज्यांना निर्बंध सौम्य असतील अशी आशा

होती त्यांची निराशा झाली. मला मात्र, हे निर्बंध कल्पनेपेक्षाही अधिक कडक आहेत याचा फार आनंद वाटतो, त्यामुळे प्रत्येक हिंदी माणूस निश्चयी बनला आहे. तुरुंगात जाण्याशिवाय आता गत्यंतर नाही, असे सारे हिन्दी लोक म्हणू लागले आहेत.

गवतातील साप

हिरव्या गवतात कधी कधी हिरवे साप दडून बसलेले असतात, अशा आशयाची एक इंग्रजी म्हण आहे. ते साप चावतात तेव्हाच त्यांचे अस्तित्व कळते. या निर्बंधांच्या बाबतीत तसेच आहे. त्यांच्यामध्ये काही साप दडून बसले आहेत, हे मला आताच कळून येत आहे. मी प्रथम ते निर्बंध जेव्हा वाचले तेव्हा त्यांचे काही भावार्थ माझ्या ध्यानी आले नाहीत. जोपर्यंत नवे परवाने—म्हणजे गुलामगिरीचे पट्टे—दिलेले नाहीत, तोपर्यंत कोणालाही प्रश्न विचारले जाणार नाहीत असे मला वाटत होते. पण पुन्हा विचार केल्यावर मला असे दिसून येते की, या निर्बंधांनी पोलिसांना दिलेल्या अधिकारामुळे ते कोणाही हिन्दी माणसाला बोटांचे ठसे देण्यास व आपला पूर्वेतिहास सांगण्यास भाग पाडतील. शिवाय, पोलिसांच्या इच्छेप्रमाणे हे पुनःपुनः करावे लागेल. या सापाची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. जर सरकारने या कलमाचा स्क्रू पिळून हिंदी लोकांवर दडपण आणण्याचे ठरविले तर हिंदी समाज कदाचित गोंधळून जाईल; पण त्यावर उपाय सोपा आहे. कोणत्याही परिस्थितीत कोणाही हिंदी माणसाने बोटांचे ठसे द्यावयाचे नाहीत. आतापर्यंत आपण अंगठ्याचे ठसे देत होतो. पण आता अंगठ्याचे ठसे देणे सक्तीचे केलेले असल्याने तेही देण्याचे आपण नाकारावे. याचा परिणाम काय होईल ? अर्थात् तुरुंगवास. तुरुंगात जाणे ही गोष्ट प्रत्येक हिंदी माणसाला आता मामुली वाटली पाहिजे. पोलिसांनी विचारलेली माहिती किंवा ओळखीच्या खुणा न देण्याला, नव्या कायद्याप्रमाणे, दंड किंवा तुरुंगवास अशा शिक्षा आहेत. दंड केव्हाही भरता कामा नये. म्हणजे फक्त तुरुंगच राहातो. मी असेही सांगतो की, फोक्सरस्टहून येणाऱ्या कोणत्याही माणसाने पोलिसांना आपल्या बोटांचे किंवा अंगठ्यांचे ठसे आता देऊ नयेत. त्याचा परिणाम म्हणून त्याला मॅजिस्ट्रेटकडे नेण्यात आले तर त्याने (आपला हक्क) सिद्ध करावा. तरीही मॅजिस्ट्रेटने त्याला तुरुंगवासाची शिक्षा दिली तर ती शिक्षा त्याने सहन करावी. शिवाय हा लढा केवळ प्रामाणिक लोकांचा आहे. आपल्या अंगठ्याचा ठसा असलेला परवाना ज्यांच्याजवळ आहे त्यांनाच वरील विचार लागू आहेत. यासाठी अंगी पुष्कळ धैर्य असावे लागते. पण ते आपल्याजवळ असले पाहिजे आणि ते आपल्याला खचित येईल.

दुसरा साप

हा केवळ एक साप झाला. दुसरा साप परवान्याच्या प्रश्नाबाबत आहे. मला वाटत होते की, परवान्याबाबत बोटांचे ठसे घेण्यास जानेवारीपासून सुरवात होईल. पण

मला आता असे दिसून येते की, ती सुरवात तत्काळ होईल. कारण, परवाना मागणाऱ्या कोणाच्याही अंगठ्याचे ठसे मागितले जातील. मुलकी अधिकाऱ्यांनाही याची कल्पना नसेल म्हणून हिंदी लोकांनी आपले परवाने यापूर्वीच घेतले असतील अशी मला आशा आहे. पण हे किती दिवस चालणार ? सरकारने बोटांच्या ठशांचा प्रश्न सर्वत्र उत्पन्न केलेला आहे. म्हणून आपण विशेष काळजी घेतली पाहिजे. मोठ्या दुकानातील एका माणसाने परवाना घेतला तर या कायद्यांची कलमे पाळल्यासारखे होईल असे मला वाटत होते; पण, विचारांती मला असे दिसून आले की, एक माणूस व्यापार चालवू शकेल, अशी आशा धरणे म्हणजे मृगजळामागे धावणे होय. म्हणून मला असे म्हणावयाचे आहे की, व्यापाऱ्यांनी जरूर तर आपला व्यापार पुढे चालविण्याची सारी आशा सोडून देणे चांगले होईल. स्वदेशासाठी व स्वाभिमानासाठी आपण आपल्या व्यापाराचा होम करण्यास सिद्ध असू, तर प्रसंग आला म्हणजे आपण घाबरणार नाही. शिवाय, आपल्या व्यापारासाठी कोणी आपल्या बोटांचे ठसे देऊन गुलाम बनावे हे योग्य दिसत नाही. एकच व सर्वोत्तम मार्ग म्हणजे ईश्वरावर पूर्ण श्रद्धा ठेवून आपल्या देशाच्या कल्याणासाठी, सर्वस्वाचा त्याग करणे हा होय. यश संपादन करण्यासाठी आपल्याला अशा निर्भेळ धैर्याची गरज आहे, हे खास.

प्रिटोरियाची संधी

गुलामगिरीचे पट्टे देण्यास प्रिटोरियामध्ये सुरवात झाली आहे; म्हणून त्याच्यावर मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. पण त्याबरोबरच आपले स्वत्व प्रकट करण्याची संधीही त्याला लाभलेली आहे. प्रिटोरिया आपल्या नावाला साजेल अशा रीतीने वागेल अशी इच्छा व ईश्वरापाशी प्रार्थना सर्व हिन्दी लोक करीत आहेत.

"डेली मेल"ची टीका

'(रँड) डेली मेल'च्या एका बातमीदाराने श्री. गांधी यांची भेट घेतली आणि त्यांच्याकडून काही माहिती मिळविली.[१] श्री. गांधींनी त्याला सांगितले की, निदान ६,००० हिंदी लोक तुरुंगात जातील हे निश्चित. देवाच्या नावाने घेतलेली शपथ हिंदी समाज कधी मोडणार नाही. हा कायदेभंग म्हणजे राजद्रोह नव्हे. हिन्दी समाज हा कायदेभंग करीत आहे तो केवळ आपली प्रतिष्ठा व स्वाभिमान यांचे संरक्षण करण्यासाठीच. या कायद्याला विरोध करून हिंदी लोक स्वतंत्र कसे होतील, हे सांगता येणार नाही, पण शूर वसाहतवाले हिंदी लोकांच्या धैर्याचे कौतुक करतील. आणि तसेही घडले नाही तरी, हिंदी समाज तुरुंगात जाऊन, ट्रान्सवॉलमध्ये गुलामगिरीच्या परिस्थितीत आपण राहणार नाही, हे दाखवून देईल आणि अखेरीस ट्रान्सवॉलचा त्यागही करील.

१. पाहा : "रँड डेली मेलला मुलाखत" प्रकरण ३८.

या मुलाखतीवर टीका करताना, " डेली मेल "ने सहानुभूती प्रकट केली आहे. पण असे म्हटले आहे की, हिंदी समाजाने हा कायदा स्वीकारावा; कारण त्यांचा अपमान करण्याचा सरकारचा हेतु नाही. बोटांचे ठसे घेण्यातील सरकारचा उद्देश हाच की, इतर हिंदी लोकांच्या प्रवेशाला प्रतिबंध करावा. " डेली मेल "चा बातमीदार पुढे असे लिहितो की, " सरकारने प्रिटोरियापासून मुद्दामच प्रारंभ केला आहे. त्याचे कारण तो प्रदेश सर्वात कचा आहे. असे असेल तर, प्रिटोरियातील हिंदी लोक नवे परवाने खात्रीने घेतील आणि त्याचा कित्ता इतर लोक सहजच गिरवितील. या आरोपाला चोख उत्तर प्रिटोरिया देईल आणि आपले धैर्य प्रकट करील अशी मला खात्री वाटते. "

" रँड डेली मेल "ला उत्तर

" डेली मेल " मधील या पत्राला श्री. गांधी यांनी पुढील उत्तर दिले आहे.[1]

" स्टार "ची टीका

" स्टार "नेही पुष्कळ टीका केली आहे. ते पत्र भयग्रस्त होऊन म्हणते की, दहा बोटांचे ठसे देण्यापेक्षा दुसरे कोणतेही गाऱ्हाणे हिंदी लोकांचे नाही. फ्रीडडॉर्पमधून नुकसानभरपाईशिवाय कोणाही हिंदी माणसाला बाहेर काढण्यात येणार नाही. ट्रामगाड्यांचा उपयोग करण्यास हिंदी लोकांना मुभा आहे आणि बोटांचे ठसे तर हिंदी शिपाई हिन्दुस्थानात देतच असतात.

हे सारे उघडउघड खोटे आहे. फ्रीडडॉर्पमधून जाताना नुकसानभरपाई मिळण्याचा प्रश्न शंकास्पद आहे. ट्रामगाड्यातून हिंदी लोकांना आताही बाहेर ढकलले जात आहे. हिंदी लोकांनी खुशीने बोटांचे ठसे देणे आणि हिंदी व्यापारी निरक्षर शिपाई आहेत असे समजून तसे ठसे सक्तीने घेणे यात काहीच फरक नाही असे फक्त " स्टार "च म्हणू शकतो.

तथापि " मेल " व " स्टार " यामध्ये आलेल्या टीकेवरून असे दिसते की, हिंदी समाजाने लढ्याची जी तयारी केली आहे तिच्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मग तो समाज खऱ्याखुऱ्या धैर्याने प्रत्यक्ष कृती करू लागला, तर त्याला काय साध्य होणार नाही ?

नाताळ काँग्रेसची सहानुभूती

नाताळ इंडियन काँग्रेसकडून अशी तार आली आहे की, हिंदी समाजाने तुरुंगाच्या ठरावावर खंबीर राहावे. आम्ही आर्थिक मदत करू. हा सहानुभूतीचा

१. " रँड डेली मेल "ला पत्र, प्रकरण ४७, याचे गुजराती भाषांतर दिलेले आहे.

आविष्कार अत्यंत उपयोगी आहे. पण वेळ अशी आली आहे की, जी काही आर्थिक मदत द्यावयाची असेल ती तत्काळ पाठविली जावी. हिंदी समाज खरोखर पुरुषार्थ दाखवील तर त्याला पैशाची पुष्कळच मदत लागेल हे खचित.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ६-७-१९०७

५९. "रँड डेली मेल"ला पत्र[१]

जोहान्सबर्ग,
ता. ६ जुलै १९०७

संपादक,
[रँड डेली मेल] यांस

महाशय,

आशियावासियांच्या प्रश्नाकडे मी पुन्हा वळत आहे, याबद्दल आपली माफी मागण्याची काही गरज आहे असे मला वाटत नाही.

"सविनय प्रतिकार" माझ्या देशबांधवांना नवा मार्ग आहे, असे मी आपल्या बातमीदाराला सांगितले नाही.[२] मी जे काही म्हणालो ते असे की, लढ्याचा परिणाम काय होईल हे अगाऊ सांगणे मला शक्य नाही. कारण असा लढा, मुख्यतः मोठ्या प्रमाणावर, आम्ही कैक पिढ्या दिलेला नाही. व्यक्तिशः मला अभिमान वाटतो तो याचा की, समाजाच्या कल्याणासाठी स्वतः क्लेश भोगण्याची शक्ती केवळ सुप्तावस्थे-मध्ये होती. आणि परिस्थितीचे दडपण येताच ती जागी होऊन चैतन्यशाली बनत आहे. निरोधन हे हिंदी मनाला मुळीच नवीन नाही. हिंदुस्थानातील जातींचे जाळे लक्षात घेतले म्हणजे या शस्त्राचा उपयोग व मोल सहज कळून येते. मात्र त्याचा वापर

१. "हिंदी निरोधन" या नावाने हे प्रसिद्ध झाले होते व ता. १३-७-१९०७ च्या "इंडियन ओपिनियन" मध्ये उद्धृत झाले होते.

२. पाहा, "रँड डेली मेलला मुलाखत" प्रकरण ३८.

योग्य तऱ्हेने व्हावयास हवा. हिन्दुस्थानात आजही सामाजिक व जातीय बहिष्कार ही अत्यंत प्रभावी शस्त्रे उपयोगात आणली जातात. क्षुद्र गोष्टीत ती उपयोजिली जातात हे दुर्दैव. आता या नोंदणी कायद्यामुळे माझ्या देशबांधवांना ते भयानक शस्त्र उच्च कार्यासाठी वापरावेसे वाटले, तर लॉर्ड एल्जिन व ट्रान्सवॉल सरकार हे दोघेही त्यांच्या कृतज्ञतेस पात्र ठरतील.

म्हणून हिंदी निरोधकांनी, 'त्यांच्या दृष्टीने' अलौकिक स्वार्थत्याग व धैर्य प्रगट करून आपल्या अज्ञानी वा दुर्बल बांधवांना कर्तव्याचा मार्ग दाखविला तर त्यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही. याबरोबरच, पूर्व व पश्चिम यांमध्ये जितके अंतर सकृद्-दर्शनी दिसून येते, तितकेच पौरस्त्य किंवा हिन्दी निरोधक, व पाश्चात्त्य निरोधक यांमध्ये दिसून येते. कोणाला भयभीत करण्याची आम्हांला इच्छा नाही. बहुसंख्या-कांच्या इच्छेला मान देण्याची सक्ती कोणावर करण्याचीही इच्छा आम्हांला नाही. पण "मुक्तिसेनेच्या" अदम्य बालिकांप्रमाणे, आम्ही आमच्या नम्र मार्गाने, आणि आम्हांला शक्य तितक्या अनुनयाच्या शक्तीने, आशियावासी नोंदणीकायद्याबाबत योग्य दृष्टिकोन काय आहे हे, ज्यांना तो माहीत नाही, अशांना आम्ही समजावून देऊ इच्छितो. आम्ही दिलेला सल्ला स्वीकारावा अथवा अपमानास्पद कायद्याला मान्यता देऊन या देशात दुःखी जीवन कंठण्यासाठी स्वतःची विक्री करून घ्यावी. या दोहोतून काय निवडावे याची मुभा त्या लोकांना आहे. मी पूर्वी म्हटल्याप्रमाणे, या कायद्याचा अर्थ काय आहे हे जर वसाहतवाल्यांना कळेल, तर त्याला मान्यता देणाऱ्या हिंदी लोकांना तेच "कुत्री" म्हणतील आणि तुच्छतेने लाथा मारतील.

हिंदुस्थानात बोटांचे ठसे घेतले जातात याबद्दल मि. हेन्री यांनी जे मत दिले आहे ते आपण उद्धृत केले आहे–अर्थात, हिंदी समाजाच्या कल्याणार्थ, असे मी मानतो. पण हिंदुस्थानात बोटांचे ठसे घेतले जातात हे कोणीही नाकारलेले नाही. त्या-पद्धतीचा येथे जो दुरुपयोग होत आहे, त्याचा निषेध करण्यास मी माझ्या देश-बांधवांसह धजत आहे.

माझ्या देशबांधवांच्या चित्तांत समंजसपणाचा उदय होईल व ते या कायद्याला मान्यता देतील अशी आशा तुम्ही करता. उलट, मी अशी आशा धरतो की, जर माझे देशबांधव या प्रसंगी जागे झाले आणि प्रतिष्ठा व स्वाभिमान सोडण्यापेक्षा सर्वस्व सोडण्यास तयार झाले तर आपण आपले मत बदलाल आणि सत्यनिष्ठ लोक म्हणून हिंदी समाजाला मान द्याल. या कायद्याला आपण मान्यता देणार नाही, अशी शपथ हिंदी लोकांनी ईश्वर-साक्ष घेतली आहे, याचे स्मरण मी आपल्याला देतो. एखाद्या न्यायमंदिरामध्ये खोटी शपथ घेतली असताना, न्यायाधीश देईल ती शिक्षा भोगल्याने त्या पापाचे क्षालन होते. पण कधीही न चुकणाऱ्या त्या न्यायाधिशांच्या न्यायाधीशा-पुढे घेतलेली शपथ मोडल्यास कोणते प्रायश्चित्त घेता येईल? आम्ही जर ईश्वरसाक्ष

घेतलेली शपथ मोडली तर मानवाच्या कोणत्याही सुसंस्कृत समाजाचे घटक होण्यास आम्ही लायक ठरणार नाही— जुन्या महारवाड्यात राहण्याचीच आमची लायकी ठरेल.

रॅंड डेली मेल, ९-७-१९०७

आपला
मो. क. गांधी

६०. "स्टार" ला पत्र

टपाल पेटी क्र. ५७
प्रिटोरिया,
७ जुलै १९०७

संपादक,
"स्टार"
[जोहान्सबर्ग], यांस;

महाशय,

आशियावासी नोंदणीच्या कायद्याला मान्यता न देण्यासाठी या वसाहतीतील हिंदी लोकांनी जो लढा सुरू केला आहे, त्यांतून "विशेष उपद्रव उत्पन्न होण्याची शक्यता नाही" असे म्हणून, आपल्या प्रिटोरियाच्या बातमीदाराने हिंदी समाजाला योग्य ते श्रेय दिले आहे. मुख्य सरकारी वकिलानेही आम्हांला असा धन्यवाद दिला आहे की, हिंदी लोक कायदा पाळणारे आहेत, त्यामुळे ते या कायद्याच्या अंमलबजावणीला विरोध करणार नाहीत अशी मला आशा आहे. फरक इतकाच की, कायदा पाळण्याच्या वृत्तीमुळे दंगे करणे व प्रतिकारासाठी शरीरसामर्थ्य वापरणे अशक्य होत असले तरी एखादा कायदा, कितीही तिरस्कारार्ह असला, तरी तो स्वीकारावा असे होत नाही. त्या वृत्तीचा आदेश असा असतो की, कायद्याने लादलेले जोखड जर आपण सहन करू शकत नसलो, तर त्या कायद्याच्या भंगाचे परिणाम शांतपणे, प्रतिष्ठितपणे व समर्पण-बुद्धीने आपण सहन केले पाहिजेत.

माझ्या देशबांधवांनी आपले धोरण बदलले नाही तर कायद्यातील शिक्षेच्या कलमांची अंमलबजावणी कडकपणे केली जाईल आणि त्यांना हद्दपार केले जाईल, अशी धमकी आपल्या बातमीदाराने दिली आहे. ही धमकी देण्याची काही गरज नव्हती. कारण कायदेभंगाच्या परिणामांचा अंदाज आम्ही आधीच करून ठेवलेला आहे. या नोंदणी कायद्याने सर्व समाजावर गुन्हेगारीचा शिक्का बसत आहे आणि गुलामगिरी सक्तीने लादली जात आहे. त्याच्या तुलनेने तुरुंगवास हा आम्हांला मुळीच भयप्रद नाही. ज्याला "आपले घर" म्हणून मानण्यास आम्हांला शिकविलेले आहे, त्या जागेत कुत्र्याचे जिणे घालविण्यापेक्षा हद्दपारी अधिक स्वागतार्ह आहे. या कायद्याचा जो जबरदस्त परिणाम आमच्यावर होईल असे आम्ही म्हणत आहो, तो तसा झाला तर आम्ही कितीही स्वार्थत्याग केला तरी तो थोडाच होईल.

ब्रिटिश साम्राज्यशाही आणि त्या साम्राज्याचे सर्व-संग्राहक स्वरूप यांचा एक नवाच अनुभव आम्हांला येत आहे. या साम्राज्याचा हात दुर्बलांना सबलांपासून वाचविण्यासाठी आहे असे मानले जाते. आता ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक हे पाहणार आहेत की, तो हात दुर्बल हिंदी लोकांचे ब्रिटिश वगैरे सबळ गोऱ्यांपासून संरक्षण करतो की दुबळ्या व असहाय्य अशा लोकांना चिरडणाऱ्या सुलतानांचे हात बळकट करतो, "सुलतान" शब्द वापरल्याबद्दल क्षमा करा. पण आमचे धर्म आणि आमच्या साऱ्या भावना झिडकारून टाकणे हे सुलतानशाहीचे लक्षण नव्हे काय? प्रवेशकांच्या नियंत्रणाचा हा प्रश्नच नाही. नोंदणीचे तत्त्व आम्ही मान्य केलेले आहे, त्याच्या पद्धतीला आमचा तीव्र विरोध आहे, पण आमचा हेतुपुरःसर अपमान करण्याचा सरकारचा इरादा आहे. तो अपमान सहन करण्यापेक्षा आपली सारी लौकिक संपदा गमावण्यास हिंदी लोक तयार झाले तर त्याबद्दल त्यांना दोष देता येईल काय? ट्रान्सवॉलमधील सारे गोरे आमच्या विरुद्ध उठले, तरी ईश्वर आमच्या पाठीशी आहे.

स्टार, ९-७-१९०७

आपला,

हाजी हबीब,

चिटणीस, ब्रिटिश इंडियन कमिटी, प्रिटोरिया

६१. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

सोमवार
[८ जुलै १९०७]

शाबास, प्रिटोरिया !

प्रिटोरियाने फारच चांगली कामगिरी केली. ज्यांच्याकडून धैर्याची फारशी अपेक्षा नव्हती त्यांनीही प्रचंड क्लेश सोसले आणि जनसेवेसाठी आपल्या उद्योगधंद्याकडे दुर्लक्ष केले. हिंदी लोकांना आता एकच चिन्ता आहे– आणि ती म्हणजे आपली प्रतिष्ठा कशी संभाळावी हीच.

स्वयंसेवकांना धन्यवाद !

स्वयंसेवक, निरोधक, किंवा पहारेकरी अथवा देशसेवक (कोणतेही नाव आपण वापरू शकतो) यांनी मोठा लौकिक संपादन केला आहे. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या इतिहासात तो अजरामर होऊन राहील. ते आपला सर्व वेळ निरोधनासाठी खर्च करतात. त्यांची नावे अशी :

मि. ए. एम. कचालिया, गौरीशंकर प्राणशंकर व्यास, गुलाम महंमद, अब्दुल रशीद, कासिम सिद्धू, खुशाल छीता, मेमन इब्राहिम नूर, गोविंद प्राग, हुसेन बीबा, महंमद वली, अर्देशर फ्रामजी, चाउल वेग, गुलाब रुद्र देसाई, मूसा सुलेमान व इब्राहीम नूर.

हे देशसेवक सबंध दिवसभर आळीपाळीने परवाना कचेरीभोवती फिरतात. तेथे जाणारा एखादा हिंदी माणूस त्यांना भेटला तर ते त्याचे मन आदबीने वळवतात व त्याला थांबवितात. तूर्त त्यांनी आपला खाजगी धंदा सोडून दिला आहे आणि मातृ-भूमीच्या सेवेला वाहून घेतले आहे. आपल्याला ज्या संकटांना तोंड द्यावे लागेल त्याची त्यांना पर्वा नाही. कोणतेही परिणाम पुढे घडून आले तरी ते सोसण्यास ते पूर्णपणे तयार आहेत. अशा देशभक्तीचे पर्यवसान अंतिम विजयात झाले तर ते मुळीच आश्चर्यजनक नाही.

त्यांच्या धैर्यापासून शिकावयाचा धडा

या स्वयंसेवकांच्या कार्याचे अनुकरण ट्रान्सवॉलमध्ये सर्वत्र व्हावयास हवे. नव्या नोंदणीसाठी अर्ज स्वीकारणारे अधिकारी लवकरच सर्वत्र नेमले जातील. सर्व ठिकाणच्या

हिंदी लोकांना, प्रिटोरियातल्याप्रमाणे, स्वयंसेवक शोधावे लागतील. पूर येण्यापूर्वी बांध घालण्याचा सल्ला मी देतो. त्यांनी स्वयंसेवक आधीच तयार ठेवावेत. शक्य असेल त्यांनी प्रिटोरियाला जावे आणि तेथील काम किती जोमाने होत आहे हे पाहावे. परवाना–कचेरीवरील बहिष्कार यशस्वी झाला तर पुढील लढा सोपा होण्याचा संभव आहे.

व्यापाऱ्यांना सूचना

या नव्या कायद्यामुळे काही व्यापाऱ्यांनी इंग्लंडहून व इतर देशांतून माल आणण्याचे थांबविले आहे असे मला कळते. हे व्यापारी अभिनंदनास पात्र आहेत. सर्वांत मोठे संकट म्हणजे तुरुंगवासाचे. ते सहन करण्यास ते तयार आहेत असे दिसते. प्रत्येक व्यापाऱ्याने आपल्या अडत्याला अशीच पत्रे वा तारा पाठविल्या तर त्याचा परिणाम पुष्कळच चांगला होईल असे मला वाटते. पहिली गोष्ट म्हणजे त्या व्यापाऱ्याला स्वतःच आपण धैर्यशाली असल्याचा प्रत्यय येईल. आणि दुसरे असे की, युरोपमधील व्यापारी चकित होतील आणि आपल्यासाठी काम करू लागतील. हे सर्व कार्य त्याच व्यापाऱ्यांच्या हातून पार पडेल की, जे देशभक्तीने प्रेरित झालेले आहेत, या आक्षेपार्ह कायद्याने आपली किती हानी होईल याची त्यांना स्पष्ट कल्पना आहे आणि त्यांची ईश्वरावर पूर्ण श्रद्धा आहे.

प्रवेशविषयक बिल

या बिलासंबंधी श्री. गांधी यांनी "स्टार"ला पुढील पत्र लिहिले आहे :[१]

फेरीवाल्यांकरिता निर्बंध

फेरीवाल्यांच्या निर्बंधाचा उल्लेख मी पूर्वी केला आहे. ते निर्बंध आता मंजूर झाले आहेत. जोहान्सबर्गच्या फेरीवाल्यांनी स्वतःला दंड होण्यापूर्वी जागे व्हावे. ते निर्बंध कोणते आहेत यासाठी या वृत्तपत्राचे जुने अंक कृपया पाहावे.

हिंदी माणसाला अटक

पॉचेफस्ट्रूमहून अशी तार आली आहे की, तेथील हाजी उमर याला लबाडी करणे व स्वतःचे दुकान जाळणे या आरोपावरून पकडण्यात आले आहे. त्याला १५०० पौंडांचा जामीन ठरविण्यात आला आहे.

१. पाहा "स्टारला पत्र" (प्रकरण ४९)

मंगळवार

आक्षेपार्ह कायद्याची अधिक माहिती

" रँड डेली मेल " व " लीडर " यांमध्ये लांबलचक लेख येऊ लागले आहेत. त्यांत असे म्हटले आहे की, प्रिटोरियातील हिंदी लोक स्वतःची नोंदणी करून देत नाहीत आणि त्याचे कारण म्हणजे जोहान्सबर्गच्या हिंदी लोकांचे दडपण. त्या पत्रांनी पुढे असेही म्हटले आहे की, जुलैच्या अखेरीस प्रत्येकजण बोटांचे ठसे देण्यासाठी परवाना कचेरीत जाईल. हा वृत्तांत म्हणजे आपली बदनामी आहे असे सिद्ध करण्याइतकी तत्त्वनिष्ठा प्रिटोरियाच्या हिंदी लोकांनी दाखविली पाहिजे. जर अखेरीस प्रिटोरियाच्या कचेरीवर आमचे लोक टोळधाडीप्रमाणे हल्ला करतील, तर आतापर्यंतचे सारे चांगले काम नाहीसे होईल.

यावरील उपाय

आता हिंदी समाजाने फार सावधगिरी बाळगली पाहिजे. मी पुष्कळ ठिकाणांहून असे ऐकतो की, पुढारी पकडले गेले की लोक घाबरून जाऊन स्वतःची नावे नोंदतील. जर असे घडले तर " मुलाला शोधायला गेली आणि नवऱ्याला गमावून बसली " या हिंदी म्हणीची साक्ष पटेल. पुढाऱ्यावर किंवा दुसऱ्या कोणावर विसंबून राहण्याची ही वेळ नव्हे. प्रत्येकाने आपल्या धैर्यावर विसंबून राहिले पाहिजे. अशा प्रसंगी वकील किंवा दुसरे कोणी उपयोगी पडणार नाहीत. सारेच जण अग्निप्रलयात सापडल्यानंतर कोण कोणाच्या मदतीस येणार ? सरकार लवकरच श्री. गांधींवर हात टाकील आणि कदाचित् इतर काही पुढाऱ्यांवरही हात टाकील असे मी ऐकतो. असे घडले तर, त्यांच्या कारागृहवासाने भयभीत न होता लोकांनी त्या घटनेचे स्वागत केले पाहिजे आणि अधिक धैर्य दाखविले पाहिजे. वस्तुस्थिती अशी आहे की, आपण स्वतंत्र मानव आहोत--मेंढरे नाहीत, आपण मदतीसाठी दुसऱ्यावर विसंबून राहणार नाही, तुरुंग ही काही भीती बाळगण्यासारखी वस्तू नव्हे, अशी आपली खात्री झाली तर आपल्या मनातील गोंधळ नाहीसा होईल. ईश्वर हीच एक आपली ढाल आहे आणि ती ढाल हाती धरून आपण युद्धाच्या धुमश्चक्रीत भाग घेण्यासाठी धावत गेले पाहिजे, हे आपण लक्षात ठेवावे.

" नोंदणीपत्र इतरांनी घेतल्यास मीही घेईन "

पुष्कळ गोरे लोक हिंदी लोकांना सल्ला देऊ लागले आहेत. ते जेव्हा विचारतात, " तुम्ही काय करणार ? " तेव्हा पुष्कळ हिंदी लोक उत्तर देतात की, " आमचे पुढारी जे करतील ते आम्ही करू. " काहीजण उत्तर देतात " दुसरे करतील तसे आम्ही करू " ही भाषा मेंढरांची आहे. ते अपाय करतील. प्रत्येकाने असे उत्तर दिले

पाहिजे की, " मला या कायद्याचा तिटकारा आहे आणि म्हणून मी त्याला कधीच मान्यता देणार नाही. शिवाय, देवाचे नाव घेऊन मी शपथ घेतलेली असल्याने, मी त्या कायद्याला मान्यता देणार नाही. मला गुलामगिरीत लोटणाऱ्या या कायद्याला मान्यता देण्यापेक्षा मी तुरुंगात जाणे पसंत करीन. " असे उत्तर जो देऊ शकणार नाही तो पैलतीराला कधीच जाऊन पोहोचणार नाही. दुसऱ्याच्या फळीचा आधार घेऊन कोणीच पोहू शकणार नाही. आपण आपल्या बाहुबलानेच पोहले पाहिजे. मी शेण खाले म्हणून वाचकही शेण खाईल काय ? मी खड्ड्यात पडतो म्हणून तो खड्ड्यात पडेल काय ? मी धर्म टाकतो म्हणून तो टाकील काय ? मी माझ्या मातेचा अपमान सहन करीन, माझ्या मुलांना चोर बनवीन आणि माझी स्वतःची व माझ्या मुलांची बोटे कापून घेईन, म्हणून वाचकही तसे करील काय ? " छे ! कधीच नाही " असेच उत्तर प्रत्येकजण देईल. याच वृत्तीने प्रत्येकाने असे उत्तर दिले पाहिजे की, " दुसरे काय करतात याची मला पर्वा नाही पण मी स्वतः या कायद्याला कधीच मान्यता देणार नाही. " अशी रोखठोक उत्तरे सर्वजण देत नाहीत आणि म्हणून वृत्तपत्रे अशी टीका करतात की, सध्या हे लोक उत्साह दाखवीत असले तरी शेवटी त्यांचे गाडे गडगडणारच. प्रत्येकाने याचा विचार करावा. भय किंवा गुप्तता यांचा हा काळ नाही. आपल्याला कोणतीच गोष्ट लपवून ठेवावयाची नाही आणि कोणत्याच गोष्टीबद्दल मौन पाळावयाचे नाही. ज्याप्रमाणे सूर्य आपली प्रभा प्रगट करतो त्याप्रमाणे आपल्याला आपले धैर्य प्रगट करावयाचे आहे.

चिनी लोकांचे बळ

गेल्या रविवारी चिनी लोकांनी एक सभा भरविली आणि मि. पोलक यांना पाचारिले. मि. पोलक यांनी सारी परिस्थिती समजावून सांगितल्यानंतर त्यांनीही आपला निश्चय पक्का केला व तो असा की, कोणीही चिनी माणूस या कायद्याला मान्यता देणार नाही आणि जर कोणी दिली, तर त्याला वाळीत टाकण्यात येईल.

आशियावासियांची भोजनगृहे

आशियावासियांच्या भोजनगृहाचा व्यवस्थापक फक्त गोरा माणूसच असला पाहिजे असा निर्बंध घालण्याचा जोहान्सबर्गच्या टाऊन कौन्सिलचा इरादा आहे. याचा अर्थ असा आहे का की, ट्रान्सवालमधील हिंदु व मुसलमान यांच्या भोजनगृहात गोरे लोक वाढण्याचे काम करतील आणि हिंदी लोक नुसते पाहात राहातील ? गुलामगिरीचा पट्टा जे अडकवून घेतील त्यांनाच हे सर्व लागू होईल. पण त्याला स्पर्श करण्याचे जे नाकारतील त्यांच्यावर कोणीही हात टाकू शकणार नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १३–७–१९०७.

६२. ट्रान्सवॉलच्या विधिमंडळाचा अर्ज

जोहान्सबर्ग,
९ जुलै, १९०७

ट्रान्सवॉलच्या विधिमंडळाचे माननीय सभापती व सदस्य यांना,

ट्रान्सवॉलच्या ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या हंगामी अध्यक्षाचा अर्ज. नम्रपणे निवेदन करतो की,

(१) सांप्रत विचाराधीन असलेल्या प्रवेश-नियंत्रण बिलाच्या बाबतीत आपल्या सभागृहाकडे मी दाद मागावी, अशी ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या कमिटीची इच्छा आहे.

(२) या बिलाचे तत्त्व वरील असोसिएशनला मान्य असले तरी, हिंदी लोकांच्या दृष्टिकोनातून पाहता त्या बिलाची काही अंगे अत्यंत आक्षेपार्ह आहेत, असे असो. चे नम्र मत आहे. ती अंगे अशी :

(अ) साहित्याने समृद्ध असलेल्या हिंदी भाषांना हे बिल मान्यता देत नाही.

(ब) ट्रान्सवॉलमध्ये पूर्वी स्थायिक झालेल्या लोकांचा हक्क हे बिल मान्य करीत नाही.(१८८६ साली दुरुस्त झालेल्या१८८५च्या तिसऱ्या कायद्याप्रमाणे, पुष्कळ हिंदी लोकांनी या देशातील वास्तव्यासाठी १८९९ पूर्वी ३ पौंड भरलेले आहेत. पण आता ते या वसाहतीबाहेर गेलेले आहेत आणि शांततासंरक्षक वटहुकुमान्वये ज्यांना परवाने मिळालेले नाहीत, त्यांना या बिलामुळे या देशात पुन्हा प्रवेश करण्यास प्रतिबंध होणार आहे. त्याला अपवाद एकच व तो म्हणजे या बिलाने नमूद केलेली शैक्षणिक पात्रता अंगी असणे.)

(क) या बिलाच्या दुसऱ्या कलमाच्या ४ थ्या पोट कलमाचा जो अर्थ वरील असोसिएशनला सांगण्यात आला आहे त्यावरून उच्च शिक्षण असलेल्या हिंदी लोकांनाही आशियावासियांच्या नोंदणी कायद्याच्या अटी पूर्ण केल्याशिवाय ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश करणे व्यवहारतः अशक्य आहे. (असो. चे नम्र मत असे आहे की, या बिलाने घालून दिलेल्या शैक्षणिक

कसोटीला जे लोक उतरतील त्यांनी या देशात येण्यासाठी ओळखीच्या अधिक खुणा देण्याची गरज पडू नये.)

(ड) या असो. ला सांगण्यात आल्याप्रमाणे, वरील ४ थ्या पोट कलमाने हिंदी लोकांना अनैतिक वटहुकुमाखाली येणाऱ्या लोकांच्या पंक्तीत बसविले आहे. हिंदी समाजाच्या दृष्टीने हे अत्यंत अपमानास्पद आहे.[1]

(ई) हे बिल आशियावासियांच्या नोंदणी कायद्याला कायमचे स्वरूप देत आहे. हे आमच्या अपेक्षेविरुद्ध आहे.

(३) ही असोसिएशन आपल्या सभागृहाचे लक्ष या गोष्टीकडे वेधू इच्छिते की, या विधिमंडळात हिंदी लोकांचा प्रतिनिधी कोणी नाही, म्हणून या सभागृहाने या बिलाचा विशेष विचार करावा अशी सादर आशा आमच्या असोसिएशनची आहे.

(४) शेवटी, या अर्जाचा योग्य तो विचार होईल व या परिस्थितीत शक्य ती दाद दिली जाईल असा विश्वास या असोसिएशनला वाटत आहे. या आपल्या न्यायाच्या व दयेच्या कृत्याबद्दल आपले अर्जदार कर्तव्यबुद्धीने सदैव कृतज्ञ राहातील.

वसाहत कचेरीचे दप्तर,
सी. ओ २९१/१२२

मूसा इस्माइल मिया
हंगामी अध्यक्ष
ब्रिटिश इंडियन असोसिएशन

६३. ट्रान्सवॉल-प्रवेशाचे नवे बिल

[ता. ११ जुलै १९०७ पूर्वी]

हे बिल अद्याप कायदा बनले नाही. पण या बिलावरून सरकारचे हेतु काय आहेत हे दिसून येते. म्हणून त्यांचा सारांश आम्ही पुढे देत आहोत.

१. प्रत्यक्ष दिलेल्या अर्जात ट्रान्सवॉल विधान सभेचे सभासद श्री. वुइल्यम होस्केन यांनी हा परिच्छेद गाळला आहे. श्री. होस्केन यांच्या मार्फतच हा अर्ज दिला होता. प्रकरण ७० "जोहान्सबर्गचे बातमीपत्र" पाहा.

(१) परवाना कायदा (शांततासंरक्षक वटहुकूम, १९०३) रद्द करण्यात येत आहे. मात्र त्यामुळे आशियावासियांच्या नोंदणी कायद्याने दिलेले कोणतेही अधिकार बाधित किंवा मर्यादित होता कामा नयेत.

(२) हे बिल अंमलात आल्यानंतर, पुढील इसम प्रतिबंधित प्रवेशक म्हणून मानले जातील.

(अ) एका युरोपियन भाषेचे तरी उत्तम ज्ञान नसलेला माणूस.

(ब) स्वतःच्या चरितार्थाचे साधन ज्याच्याजवळ नाही असा माणूस.

(क) एखादी वेश्या किंवा अनैतिक कामासाठी स्त्रिया पुरविणारा माणूस.

(ड) ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश करण्याच्या वेळी-- किंवा प्रवेश करण्याचा प्रयत्न करण्याच्या वेळी--जारी असलेल्या कायद्याप्रमाणे ज्या माणसाला हद्दपार करावे लागेल असा माणूस.

(इ) वेडे, किंवा महारोगी अथवा सांसर्गिक रोगाने ग्रस्त अशी माणसे.

(फ) साम्राज्य सरकार किंवा दुसरी एखादी सरकारी कचेरी यांनी जो माणूस अनिष्ट असल्याचे कळविले असेल तो.

(ग) सरकारच्या मताने जो माणूस या वसाहतीतील शांतता, सुव्यवस्था व चांगला राज्यकारभार यांना धोक्याचा वाटेल असा मनुष्य.

(ह) हे बिल प्रतिबंधित प्रवेशक नसलेल्या माणसाच्या बायकोला किंवा अज्ञान मुलाला, तसेच काफीर व युरोपियन मजूर यांना लागू होणार नाही.

(३) या कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता एक "प्रवेश खाते" उघडले जाईल.

(४) या कायद्याच्या अंमलबजावणीकरिता कोणत्याही वसाहतीच्या सरकारशी करार करण्याचा अधिकार गव्हर्नरला राहील.

(५) प्रतिबंधित प्रवेशक या वसाहतीत असलेला किंवा शिरताना आढळला तर तो १०० पौंड दंड किंवा ६ महिने तुरुंगवास येथपर्यंतच्या शिक्षेस पात्र होईल आणि या वसाहतीतून केव्हाही त्याला हद्दपार करता येईल.

(६) अनैतिक वटहुकूम (१९०३) जो उल्लंघील किंवा या वसाहतीतील शांतता, सुव्यवस्था व सुप्रजाशासन यांना धोक्याचा आहे असे वाटेल त्या माणसाला पकडण्यात येईल आणि या वसाहतीबाहेर घालविले जाईल.

(७) या वसाहतीत शिरण्यासाठी एखाद्या प्रतिबंधित प्रवेशकाला जो कोणी मदत करील किंवा उत्तेजन देईल, त्याला शभर पौंड दंड किंवा ६ महिने कैद येथपर्यंत शिक्षा होईल.

(८) कोणाही प्रतिबंधित प्रवेशकाला या वसाहतीत परवाना मिळण्याचा किंवा जमीनजुमला मिळविण्याचा हक्क राहणार नाही.

(९) प्रतिबंधित प्रवेशक घुसल्याचा संशय ज्याबद्दल येईल अशा कोणाही माणसास वारंटाशिवाय पकडले जाईल.

(१०) या कायद्याचे अज्ञान हा बचाव होऊ शकत नाही.

(११) या वसाहतीतून बाहेर जाण्याचा हुकूम ज्याला झाला असेल त्याने त्याच्या देशत्यागामुळे सरकारला येणारा सर्व खर्च दिला पाहिजे. तो त्या माणसाच्या मालमत्तेतून वसूल करता येईल.

(१२) एखाद्या उपाहारगृहात राहणाऱ्या प्रत्येक माणसाचे नाव, कायमचे गाव, जन्माचे ठिकाण इत्यादी माहिती त्या उपाहारगृहाच्या मालकाने ठेवली पाहिजे. ती माहिती तपासण्याचा अधिकार सरकारला राहील.

(१३) आपण प्रतिबंधित प्रवेशक नाही हे सिद्ध करण्याचा बोजा आरोपी-वर राहील.

(१४) या कायद्याच्या उल्लंघनाबद्दल जास्तीत जास्त शिक्षा देण्याचा अधिकार प्रत्येक मॅजिस्ट्रेटला राहील.

बिलाचा भावार्थ

हे बिल भयानक आहे. त्याने साम्राज्यसरकारची दिशाभूल होण्यासारखी आहे. वरवर पाहिले तर ते निरुपद्रवी दिसते. पण बारकाईने पाहिले तर ते विषारी असल्याचे आढळून येते. परवान्याशिवाय राहणाऱ्या निर्वासितांचे हक्क या बिलामुळे समूळ नाहीसे होतात. परवाने असलेले पण ट्रान्सवॉलच्या बाहेर गेलेले जे लोक या नव्या कायद्याप्रमाणे आपले परवाने बदलून घेणार नाहीत, त्यांचा येथे परत येण्याचा हक्क रद्द होईल.

सुशिक्षित हिंदी माणसाला एका हाताने एक हक्क दिलेला आहे; पण दुसऱ्या हाताने तो काढून घेतलेला आहे. कारण युरोपियन भाषेचे ज्ञान आहे म्हणून जे हिंदी लोक येथे प्रवेश करतील त्यांना या आक्षेपार्ह कायद्याप्रमाणे, प्रवेशानंतरच्या आठ दिवसांत आपल्या बोटांचे ठसे द्यावे लागतील व परवाना घ्यावा लागेल. तसे न केल्यास ते हद्दपार होतील.

या प्रकारे या बिलामुळे हिंदी लोकांचा काहीही फायदा होण्याचा संभव नाही.

हे बिल लॉर्ड एल्जिन यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविले जाईल. त्यावेळी हिंदी समाजाला इंग्लंडमध्ये लढा द्यावा लागेल. या बिलाची अधिक माहिती, हे पत्र लिहिण्याचा काल आणि बिलाच्या प्रकाशनाचा काल--म्हणजे गुरुवार ता. ११ जुलै-- या काळात उपलब्ध होईल. ती माहिती आम्ही पुढच्या अंकी प्रसिद्ध करू शकू.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १३-७-१९०७

६४. छगनलाल गांधी यांना पत्र

[जोहान्सबर्ग,
ता. ११ जुलै, १९०७ पूर्वी[1]]

[प्रिय छगनलाल,]

तुमचे पत्र मिळाले. काजीसंबंधी तुम्ही लिहिले ते कळले. मि. पोलक प्रिटोरिया-हून नुकतेच परत आले आहेत. त्यांनी तेथे उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे.

छपाईच्या कामासंबंधी मी मि. वेस्ट[2] यांना लिहिले आहे. इब्राहीम महंमदचा जो पत्ता तुमच्याजवळ आहे त्या पत्त्यावर जकातीचे फॉर्म पाठवावयाचे आहेत असे मी श्री. वेस्टना सांगितले आहे. ते आपले वर्गणीदार आहेत.

हिंदी न छापण्याचे धोरण कोत्या दृष्टीचे आहे असे मला खास वाटते. वस्तुतः आपण आपल्या भांडवलाचाही वापर करीत नाही. रामायणाचा खप खचित होईल आणि ते कार्य फार मोठ्या मोलाचे होईल असे मला वाटते. याचे कारण साधे आहे आणि ते हे की, तो सर्व ग्रंथ ज्यांना वाचता येत नाही असे हजारो लोक या संक्षिप्त आवृत्तीचा उपयोग आनंदाने करून घेतील. म्हणून एखादा चांगला माणूस मिळत असेल तर तुम्ही हा खर्च करण्यास मुळीच अनमान करू नये. येथील खर्चाचे मान पाहाता हे पुस्तक महाग विकावे लागेल हा तुमचा युक्तिवाद काहीसा सदोष आहे. जर

१. हे पत्र ११ जुलैच्या पत्रापूर्वी लिहिलेले आहे, हे उघड आहे. पुढील पत्रात गांधीजींनी रामायणाच्या मुद्रणाचा उल्लेख केला आहे.

२. 'इंडियन ओपिनियन'चे मुद्रक व फीनिक्स आश्रमाचे एक घटक. पाहा : खंड ४ (प्र.२७७), दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह प्रकरण २३ व ४७ आणि आत्मकथा भाग४, प्रकरण : १६,१८ इत्यादी.

खर्च जास्त असेल तर त्या प्रमाणात किंमतही जास्त असणार याची जाणीव आपल्याला स्पष्ट पाहिजे. म्हणून "जास्त" हा शब्द केवळ सापेक्ष आहे. आपण हिंदुस्थानात जी भगवद्गीता[1] एक आण्याला देऊ शकू, तिला येथे एक शिलिंग आपण देतो, कारण येथील खर्च तुलनेने जास्त आहेत. ज्या देशात आपण राहातो त्याच्या बाहेरील देशात स्वस्त दराने पुस्तक छापून घेण्याचा विचार जेव्हा आपण करतो, तेव्हा फार घासाघीस करण्याची आपली नेहमीची खोड आपण प्रगट करतो असे मला निश्चित वाटते. याच कारणासाठी दक्षिण आफ्रिकेतील पुस्तक[2] मुंबईमध्ये छापून घेण्याच्या कल्पनेचा धिक्कार मी मनोमन केलेला होता. ही गोष्ट मला इतक्या तीव्रतेने जाणवते की, एखादे पुस्तक लिहिण्याइतका उत्साह माझ्या अंगी संचरत नाही. तुम्ही या गोष्टीचा विचार करावा असे मी सुचवितो. आपण एखादा माणूस अधिक ठेवतो की नाही आणि एखादे पुस्तक आपण छापतो की नाही याचा विचार करू नका; तो तपशिलाचा प्रश्न राहील. पहिली गोष्ट म्हणजे आपले तत्त्व ठरविणे. ते आपण अमलात आणू शकलो किंवा तसे करण्याचे धैर्य आपल्या अंगी नसले तर आपण चिंता करण्याचे कारण नाही आणि आपल्या कार्याचा व्याप वाढविण्याचा विचार करण्याचेही कारण नाही. तुम्हांला पैशाची गरज असेल तर मला वेळीच कळवा.

आपला

कचेरीतील टंकलिखित प्रतीच्या छायाचित्रावरून,
एस्. एन्. ४६७४

६५. छगनलाल गांधींना पत्र

जोहान्सबर्ग,
११ जुलै, १९०७

प्रिय छगनलाल,

प्रागजी खंडुभाई देसाई यांचे पत्र सोबत आहे. ते जर भले गृहस्थ असतील, तर त्यांना तुम्ही ३ पौंडांवर उमेदवार म्हणून घ्यावे आणि गुजराती कामावर बसवावे;

१. मिसेस बेझंट यांच्या इंग्रजी भाषान्तरासह १९०५ साली प्रसिद्ध झालेल्या आवृत्तीस उद्देशून हे आहे. पाहा : खंड ४, पृ. ३६६.

२. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या यातनासंबंधीचे एक पुस्तक "इंडियन ओपिनियन"-ने प्रसिद्ध करावे अशी सूचना आलेली होती. पाहा : खंड ६, पृ. ४२५.

म्हणजे रामायणाचे काम चालू राहील असे मला वाटते. गुजराती खात्यात आपल्याला माणसाची उणीव आहे हे खचित; तथापि, मी केवळ सूचना मांडीत आहे. ती कदाचित अव्यवहार्य असेल. म्हणून आपल्याला योग्य वाटेल ते तुम्ही करावे.

ता. क.–मि. कोरडेस[1] कसे काय–वाटले? वगैरे गोष्टी कळवाव्या.

आपला,
मोहनदास

मूळ टंकलिखित इंग्रजी पत्राच्या छायाचित्रावरून,
या पत्रावर सही व ता. क.
गांधीजींनी गुजरातीमध्ये लिहिलेला आहे.

एस. एन्. ४७५७

६६. हिंदी लोकांच्या सामर्थ्याचे मापन

आतापर्यंत हिंदी जमातीच्या सामर्थ्याची कसोटी कधी लागलेली नाही. जणु काही ती एक झाकली मूठच होती. त्या सामर्थ्याचा अंदाज कोणी घेतलेला नाही. सध्याची समजूत अशी आहे की, हिंदी लोक भेकड आहेत आणि चैतन्यशून्य आहेत.

पण सुदैवाने आता ट्रान्सवॉलमध्ये या जमातीची शक्ती कसोटीस लागत आहे. ही संधी आपल्याला लॉर्ड एल्गिन व जनरल बोथा आणि त्यांचे दोस्त यांनी आणून दिलेली आहे. या शक्ति-मापनाच्या प्रसंगी, हिंदी जमातीने, हा लेख लिहीपर्यंत तरी, आपले श्रेष्ठत्व सिद्ध केलेले आहे. आम्ही प्रसिद्ध केलेल्या बातमीपत्रावरून असे दिसून येते की, गोऱ्या लोकांच्या मताने दुबळ्या असलेल्या प्रिटोरियाने आपण पूर्ण सामर्थ्यशाली असल्याचे एकदम दाखवून दिले आहे. तेथील एकाही हिंदी माणसाने तो आक्षेपार्ह परवाना घेतलेला नाही. एक मद्रासी माणूस परवाना कचेरीत गेला, पण जेव्हा त्याला बोटांचे ठसे देणे जरूर असल्याचे कळले, तेव्हा त्याने आपला अर्ज फेकून दिला आणि तो म्हणाला, कोणत्याही कारणासाठी मी माझ्या बोटांचे ठसे देणार नाही. नवा परवाना घेण्यापेक्षा मी माझ्या जागेचा राजीनामा देईन, असे मद्रासी

१. एक जर्मन थिऑसॉफिस्ट, गांधीजींचे भक्त, फॉनिक्स येथील शाळा काही काळ चालवीत होते. सेवाग्राम येथे १९६० मध्ये निधन पावले.

पोस्टमास्तरने सांगितले. मि. चॉमनी यांच्या पंजाबी हुजऱ्याने नवा परवाना घेण्याचे साफ नाकारले असे आमच्या कानी आले आहे. या सर्वांचा अर्थ असा की, हिंदी लोक कसोटीच्या प्रसंगी उणे पडणार नाहीत.

देव तारी, त्याला कोण मारी ? हिंदी लोक धार्मिक वृत्तीचे आहेत. त्यांची ईश्वरावर श्रद्धा आहे. ईश्वरावरील श्रद्धेने आपण जे जे कार्य हाती घेऊ त्यात तो आपल्याला सहज यश देईल. अशी आख्यायिका आहे की, नरसी मेहता[१] यांची ईश्वरावर श्रद्धा असल्यामुळे, त्यांच्या कन्येच्या पहिल्या गरोदरपणी, स्वतःजवळ एक पैही नसताना, ते धार्मिक विधी पार पाडू शकले.[२] ईश्वराच्या साहाय्याने पैगंबर महंमद मोठमोठ्या अडचणीतून पार पडले आणि त्यांनी शत्रूवर विजय मिळविला. तोच जगन्नायक येथील हिंदी जनतेला हात देईल.

चोहोकडच्या हिंदी लोकांचे डोळे आता ट्रान्सवॉलमधील आपल्या देशबांधवांकडे लागलेले आहेत. आपल्या देशबांधवांनी जे आव्हान स्वीकारले आहे, त्यात त्यांना यश मिळाल्याचे ऐकण्यास सर्वजण उत्सुक आहेत. हिंदी समाज या लढ्यातून पाठ फिरविणार नाही, असे उत्तर प्रिटोरिया देत आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १३-७-१९०७

६७. दरबानची कसोटी

प्रिटोरियाचे पराक्रम व तेथील हिंदी विरोधकांचे धैर्य, यामुळे ज्यांचे अंतःकरण आनंदाने थरारणार नाही, असा एक तरी हिंदी माणूस असेल काय ? त्यांचे अभिनंदन करणे सोपे आहे, पण खरे अभिनंदन त्यांच्यासारखे वागण्यात आहे. ट्रान्सवॉलमध्ये परवाना-कचेरीवर जसा बहिष्कार चालू आहे, तसा दरबानने सुरू करावा. दरबानहून ट्रान्सवॉलमध्ये आता एकाही हिंदी माणसाने प्रवेश करणे म्हणजे दुधात माशी पडण्या-

१. गुजरातचे संत-कवी

२. सतवांसा नावाचा हा धार्मिक संस्कार मुलांच्या पहिल्या गरोदरपणी सातव्या महिन्यात केला जातो. त्या वेळा आई-बापांनी मुलीला काही भेट द्यावयाची असते. भगवान श्रीकृष्णाने व्यापाऱ्याचे रूप धारण करून नरसीला साहाय्य केले अशी आख्यायिका आहे.

सारखे आहे. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनी आपल्या सर्व भौतिक संपत्तीचा होम करावा असा हा समय आहे. एखाद्या हिंदी माणसाला ट्रान्सवॉलमध्ये जाण्याची फार उत्सुकता असेल तर तो तेथे गेल्याने त्याचे स्वतःचे काम होईल. पण तेथील हिंदी लोकांना त्याच्या जाण्याने काही मदत होणार नाही. उलट त्यांची हानी. होईल, त्यांची शक्ती वाढणार नाही. शिवाय दरबानमधील परवाना-कचेरीत जाऊन मगच असे हिंदी लोक ट्रान्सवॉल-मध्ये प्रवेश करू शकतील. त्याचा अर्थ बहिष्काराचे कंबरडे मोडगे असा होईल. पण जर एकही हिंदी माणूस दरबानच्या परवाना-कचेरीत परवान्यासाठी गेलाच नाही, तर ती कचेरी चालू राहणार नाही. म्हणून दरबानमधील हिंदी लोकांनी प्रिटोरियाचा कित्ता गिरविणे अवश्य आहे.

ट्रान्सवॉलमधील आपल्या बांधवांना आर्थिक मदत देण्याची तयारी ‘ नाताळ इंडियन कॉंग्रेस ’ने दाखविली आहे. तेथे भरलेल्या एका सार्वजनिक सभेने तेथील हिंदी लोकांमध्ये चैतन्य निर्माण केले आहे. देणग्या गोळा करण्याचा प्रश्नही त्या कॉंग्रेसने हाती घेतला आहे, हे खरोखर गौरवास्पद आहे. पण त्याशिवाय दरबानच्या परवाना-कचेरीवर बहिष्कार घालण्याचा प्रश्न हाती घेणे जरूर आहे. त्याचे तीन मार्ग आहेत. पहिला, दरबानच्या कचेरीपुढे निरीक्षक उभे करणे व त्यांनी हिंदी लोकांना आत जाण्यास प्रतिबंध करणे. दुसरा, ट्रान्सवॉलला रेल्वेने जाणाऱ्या हिंदी लोकांवर नजर ठेवणे. जर असा एखादा हिंदी माणूस नवा परवाना घेऊन जात असेल किंवा जुना परवाना घेऊन, पण तुरुंगात जाण्याची तयारी न करता जात असेल, तर त्याला पुढे जाण्यापासून परावृत्त करणे. तिसरा, जहाजावर कोणीही हिंदी माणूस आपल्या बोटांचे ठसे देत नाही ना, हे पाहिले पाहिजे. असे केल्याने, दरबानने फार मोठे साहाय्य केले आणि आमच्या मुक्तेचा क्षण जवळ आणला असे होईल.

[गुजरातीवरून]

इंडियन ओपिनियन, १३–७-१९०७

६८. पौर्वात्यांचे शहाणपण–ग्रंथमाला [1]

हे ग्रंथ इंग्रजीमध्ये नुकतेच प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचे गुजराती भाषांतर अद्याप कोणी केले नाही. परंतु आम्ही अशा ग्रंथांचे संक्षिप्त सारांश वेळोवेळी देत जाऊ

१. नॉरवुड येथील एम. एच. उगत यांच्या ता. १९ जूनच्या पत्रास गांधीजींचे हे उत्तर आहे. पौर्वात्यांचे शहाणपण या मालेला उद्देशून [प्रकरण २७] लिहिलेले ते पत्र असे होते.– ‘ गेल्या

[टीप पुढे चालू

याच उद्देशाने आम्ही पैगंबराचे चरित्र[१] देण्यास सुरवात केली आहे. दरम्यान, ज्यांना इंग्रजी येते त्यांनी वरील ग्रंथ मागवून घ्यावेत.

संपादक,
इंडियन ओपिनियन

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १३-७-१९०७

६९. हमीदिया इस्लामिया अंजुमनमध्ये भाषण[२]

जोहान्सबर्ग,
ता. १४ जुलै १९०७

श्री. गांधी यांनी अद्ययावत् परिस्थितीचा संक्षिप्त आढावा घेतला आणि नव्या कायद्यातील अन्याय्य योजनेला प्राणपणाने विरोध करण्यास व काही झाले तरी, सक्तीची फेरनोंदणी न करण्यास त्यांनी आपल्या श्रोत्यांना पुनः एकवार प्रोत्साहन दिले.

इंडियन ओपिनियन, २०-७-१९०७

[टीप-पान १२९ वरून

महिन्याच्या पंधरा तारखेच्या आपल्या अंकात आपण पौर्वात्यांचे शहाणपण, जलालुद्दीन रूमी, कुरान शरीफनो सार, बुद्ध शिक्षा, जरथुस्त्रना शिक्षण इत्यादी पुस्तकांकडे लक्ष वेधले आहे आणि लोकांना ती विकत घेण्याचा सल्ला दिला आहे, ही चांगली गोष्ट आहे, पण आपला समाज गुजराती भाषा थोडीफार जाणतो, म्हणून हे ग्रंथ गुजरातीमध्ये उपलब्ध झाले तर त्यांचा प्रसार काही प्रमाणात होईल अशी मला आशा वाटते. या बाबतीत आपण काही खुलासा करावा.'

१. 'महंमद पैगंबर व त्याचे खलीफा,' प्रकरण ३६ पाहा.

२. हमीदिया इस्लामिया अंजुमानाच्या हिरा 'वरतीत' भरलेल्या सभेत गांधीजींनी भाषण केले. त्याचा हा संक्षिप्त सारांश.

७०. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

सोमवार [१५ जुलै १९०७]

प्रिटोरियाची प्रतिष्ठा

अद्याप प्रिटोरियाचे कार्य जोरात चालू आहे. त्याची प्रतिष्ठा कायम आहे. दुसऱ्या आठवड्यातून तो सुरक्षितपणे बाहेर आला आहे. परवाना–अधिकारी मि. कोडी यांना आणखी एका आठवड्याची 'सुट्टी' मिळाली आहे. आणि त्या बहादूर पहारेकऱ्यांनी–म्हणजे स्वयंसेवकांनी–नावलौकिक कमावला आहे. गोरे लोक चकित झाले आहेत आणि 'याचा अर्थ काय?' म्हणून आश्चर्य करीत आहेत. आतापर्यंत कोणताही अपमान गिळणारे हिंदी लोक आता आपल्या मिशांना पीळ भरून उभे राहणार काय असे गोरे विचारीत आहेत. भाजीपाला विकणाऱ्या हिंदी फेरीवाल्यांना काही इंग्रज स्त्रिया प्रश्न करतात, 'तुम्ही परवाने घेणार की नाही?' त्या शूर फेरीवाल्यांनी उत्तरादाखल एकजात जोराचा नकार दिला. ही वृत्ती अखेरपर्यंत कायम राहिली तर हिंदी लोकांची प्रतिष्ठा वाढेल आणि नव्या कायद्याच्या डोक्यावर लगुड–प्रहार होईल. याचे श्रेय प्रिटोरियातील हिंदी लोक आणि निरोधक यांना आहे, हे प्रत्येकजण कबूल करील.

गोऱ्यांचा खोडसाळपणा

मि. स्टिफन फ्रेझर यांचा एक हस्तक या देशात मुद्दाम दौरा करीत आहे आणि हिंदी लोकांना भीती उत्पन्न करण्यासारख्या गोष्टी सांगत आहे, असे माझ्या कानी आले आहे. पिट्सबर्ग येथील हिंदी लोकांना त्याने असा धाक घातला की, जर हिंदी समाजाने श्री. गांधींच्या उपदेशाप्रमाणे नव्या कायद्याला मान्यता देण्याचे नाकारले, तर त्यांचा सत्यानाश होईल आणि त्यांची मालमत्ता सरकार जप्त करील. शेवटचा क्षण जसजसा जवळ येत आहे, तसतसे विरोधी किंवा स्वार्थी गोऱ्यांकडून असे कपटाचे प्रकार अधिकाधिक होत जातील यात शंका नाही. अशा लोकांना सणसणीत उत्तर देणे हे प्रत्येक हिंदी माणसाचे कर्तव्य आहे, असे मला सांगावयाचे आहे. असला भेकड उपदेश ऐकण्यासही हिंदी लोकांना वेळ नाही सरकार मालमत्ता जप्त करील, असे म्हणणे धादांत खोटे आहे. तसे करण्याचा सरकारला काडीमात्र अधिकार नाही. सत्यानाशासंबंधी सांगावयाचे तर, मि. हाजी हबीब यांनी "स्टार" मध्ये त्यासंबंधी

पूर्वीच लिहिले आहे. त्यात त्यांनी असा मुद्दा मांडला आहे की, आमचा सर्वस्व-नाश झाला तरी आम्ही आमच्या प्रतिष्ठेचे रक्षण करू आणि आमची प्रतिज्ञा खरी केल्याची कीर्ति कमावू. म्हणून वस्तुस्थिती अशी आहे की, आपण या कायद्याला जो विरोध करीत आहो, तो श्री. गांधींच्या उपदेशामुळे नव्हे तर, आपल्याला आपल्या पुरुषार्थाचे संरक्षण करावयाचे आहे म्हणून आपल्या अंगी पुरुषार्थ असेल तर आपण मातीतून सोने काढू. पण उलट, जर आपण पुरुष असून बायकांप्रमाणे वागू, तर आपल्याजवळ जे काही असेल ते जतन करणे आपल्याला कठीण जाईल, आणि आपण जी संपत्ती साचवू, तिचा उपभोग घेण्यास आपल्याला चित्ताची शांतता राहणार नाही. इंग्लंडचा एक माजी राजा, तिसरा रिचर्ड, आपल्याच जातभाईची कत्तल करून सिंहासनावर बसला, पण तो राज्याचा उपभोग शांततेने घेऊ शकला नाही. आपल्या बांधवांच्या रक्ताने डागळलेली समशेर जेव्हा जेव्हा तो हाती घेई, तेव्हा तो भीतीने थरथरा कापे. शेवटी त्याचा अंत क्रूरपणाने व अनैसर्गिक रीतीने झाला. आपल्या बांधवांच्या अपमानाकडे दुर्लक्ष करून, साऱ्या लोकांच्या हितसंबंधावर स्वार्थोपायी निखारे ठेवील असा कोणता हिंदी माणूस असेल ? जर कोणी असेल तर त्याला रिचर्ड राजाप्रमाणे यातनांमध्ये व पश्चात्तापामध्ये मरावे लागेल. या आणीबाणीच्या काळी, हिंदी समाज, गोऱ्या चेहऱ्यांच्या पण काळ्या अंतःकरणाच्या, अशा सल्लागारांना धुडकावून लावील, अशी मला आशा वाटते.

आणखी दोन गोरे

मि. स्टिफन फ्रेझरचा हस्तक अशा प्रकारे तुच्छतेने बोललेला असला, तरी दोन दुसरे गोरे लोक समंजसपणे बोलत आहेत. ते दोघे हिंदी लोकांशी मोठा व्यापार करणारे प्रतिष्ठित व्यापारी आहेत. त्यांनी हे मान्य केले आहे की, हिंदी समाजाने आपला लौकिक टिकविण्यासाठी तुरुंगात जाण्याच्या आपल्या ठरावाला चिकटून राहिले पाहिजे आणि तसे सर्व हिंदी लोक राहिले, तर ते विजयी होतील हे निःसंशय. काही लोक असे म्हणतील की, यातील ' जर-तर ' हेच महत्त्वाचे आहे, पण ' जर-तर '-ना बागुलबुवा भेकडांनाच भेडसावतो. शूर माणसे इतरांनाही शूर समजतात. त्यांना अशी खात्री पटेल की, या वेळी हिंदी समाज आपल्या प्रतिज्ञेचे पालन पुरेपूर करील.

जोहान्सबर्गमधील सभा

हमीदिया इस्लामिया अंजुमनच्या सभागृहात गेल्या रविवारी एक फार मोठी सभा भरली. सभेस सुरुवात दुपारी २॥ वाजता होणार होती, पण त्या वेळेपूर्वी सर्व सभागृह गच्च भरून गेले होते. ज्यांना आत प्रवेश मिळाला नाही, ते बाहेर उभे होते. जर्मिस्टन येथूनही बरेच लोक आले होते. हाफिज अब्दुल सम्मद अध्यक्षस्थानी होते. मि. फॅन्सी यांनी गेल्या सभेचे वृत्त वाचल्यानंतर, श्री. गांधी यांनी नव्या आक्षेपार्ह

कायद्याविषयीची भूमिका समजावून सांगितली. त्यानंतर जर्मिस्टनचे श्री. रामसुंदर पंडित यांनी एक वक्तृत्वपूर्ण व भावनापूर्ण भाषण केले. ते म्हणाले, ' जर्मिस्टन येथील लोकांचे धैर्य उच्च प्रतीचे आहे. स्वयंसेवकही तयार आहेत आणि प्रिटोरियाने जे केले तेच नेमके जर्मिस्टन करून दाखवील; प्रिटोरियामधील स्वयंसेवकांनी उत्तम देशभक्ती प्रकट केली. ' मि. इमाम अब्दुल कादीर म्हणाले, ' प्रस्तुत कायद्याला एकही आशिया-वासी माणूस मान्यता देणार नाही. प्रिटोरियाच्या सभेत जो उत्साह त्यांनी अवलोकन केला होता, त्याचेही वर्णन त्यांनी केले. '

मि. नवाबखान यांनी सांगितले, ' कोणत्याही दर्जाचा हिंदी माणूस या कायद्याला कदापि मान तुकविणार नाही. इंग्लंडमधील स्त्रिया जर तुरुंगात जाण्याइतक्या बलवान आहेत, तर हिंदी पुरुष तुरुंगात जाण्याला किंवा दुसरी काही हानी सोसण्याला कचरतील काय ? ' मि. अब्दुल रहमान म्हणाले, ' पॉचेफस्ट्रूम येथील हिंदी समाज अत्यंत खंबीर आहे. त्यांना मि. स्टिफन फ्रेझरच्या हस्तकाने सांगितले होते की, ' तुम्ही जर या कायद्याला मान्यता देण्याचे वचन द्याल, तरच तुम्हांला उधारीने माल मिळेल.' याला माझे उत्तर असे आहे की, ' हजारो स्टिफन फ्रेझरनी उधारीने माल देण्याचे थांबविले, तरी या कायद्याची गुलामगिरी हिंदी लोकांना कधीही मान्य होणार नाही. पॉचेफस्ट्रूम येथील व्यापारी कोणतेही नुकसान सोसतील, पण या तिरस्कारार्ह कायद्याला मान देणार नाहीत. ' श्री. उमर्जी यांनी अत्यंत प्रभावी भाषण केले. भाषणाच्या प्रारंभी, ' सतिया सत नव छोड़िए ' [सत्यव्रता, सत्याचा मार्ग कधी सोडू नकोस.] ही गुजराती काव्यपंक्ती त्यांनी म्हटली. नंतर मि. शहाबउद्दीन व मि. कामा यांनी काही प्रश्न विचारले आणि मग सभा संपली. कायद्याला मान्यता देण्याची अणुमात्र इच्छा असणारा एकही माणूस त्या सभेत दिसत नव्हता. मि. पोलक यांनीही सभेत भाषण केले आणि प्रिटोरिया येथे स्वतः पाहिलेल्या स्वयंसेवकांच्या कार्याची प्रशंसा केली.

हुजऱ्यांची सभा

ट्रान्सवॉल फूटबॉल असोसिएशनच्या सभासदांची एक सभा मि. डेव्हिड अर्नेस्ट यांनी एबनेझर शाळेमध्ये बोलाविली होती. पन्नास हुजरे हजर होते. सोमवारी दुपारी ३॥ वाजता सभा भरली. श्री. गांधी यांनी कायद्याची परिस्थिती समजावून सांगितली. त्यांच्या भाषणाचा अनुवाद मि. नायडू यांनी तामीळमध्ये केला. शेवटी मि. पोलक बोलले. त्यांनी एक गोष्ट सांगितली. एके काळी असा एक विलक्षण प्राणी होता की, त्याचे डोके कापले तर त्या जागी दोन डोकी उगवत. याप्रकारे जेव्हा जेव्हा त्याचे डोके कापले गेले, तेव्हा पहिल्या डोक्यांच्या दुप्पट डोकी दिसू लागत. हे जेव्हा लोकांना कळले, तेव्हा त्यांनी त्या प्राण्याला त्रास देण्याचे सोडले. हिंदी समाजानेही अशाच प्रकारे वागले पाहिजे. आपल्याला कोणी पुढारी मिळेल म्हणून

थांबण्याची गरज नाही. प्रत्येकजण पुढारी आहे असे धरून चालले पाहिजे. एका हिंदी माणसाला सरकारने तुरुंगात टाकले किंवा हद्दपार केले, तर त्याची पुढारीपणाची जागा घेण्यासाठी आणि कारागृह किंवा हद्दपारी सहन करण्यासाठी दोन हिंदी माणसे धैर्याने पुढे आली पाहिजेत. असे घडेल तर, सरकारचा पराभव झाल्याशिवाय राहणार नाही. हुजऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, आपण प्रथम माणूस आहोत आणि मग हुजरे आहोत. म्हणून त्यांनी आपली नोकरी जाण्याची भीति न बाळगता या कायद्याला जोराने विरोध केला पाहिजे.

सरकारी दुभाष्या मि. डेव्हिड याने सांगितले की, 'सरकारने मला नोंदणी करण्यास सांगितले, तेव्हा मी साफ नकार दिला.'

नंतर श्री. गांधी यांनी सभेस प्रश्न विचारला असता, सर्वजण उभे राहिले आणि त्यांनी उत्तर दिले की, 'आमची नोकरी गेली तरीसुद्धा आम्ही नोंदणी करून घेणार नाही.' सभा ४ वा. ४५ मि. नी संपली.

जर्मिस्टनची सभा

जर्मिस्टनच्या हिंदी लोकांचे धैर्य उच्च प्रतीचे आहे. पंडित रामसुंदर महाराज हे त्यांच्या अग्रभागी आहेत. ते निर्भयपणे काम करीत आहेत आणि लोकांना प्रोत्साहन देत आहेत. त्यांनी एक विशेष सभा बोलावली. तीत असा ठराव झाला की, कोणतेही संकट येवो, आम्ही या कायद्याला मान्यता देणार नाही. या ठरावावर दोनशेपेक्षा अधिक लोकांनी सह्या केल्या. प्रिटोरियाप्रमाणे येथेही काही शूर माणसे स्वयंसेवक म्हणून काम करण्यास पुढे आली.

प्रवेश-विधेयक

प्रवेश-विधेयकाचे दुसरे वाचन समाप्त झाले. या बिलाच्या उद्देशाचे स्पष्टीकरण मि. स्मट्स यांनी केले. मि. हॉस्केन, लिंडसे, वायबर्ग,[1] नेसर व व्हाईटसाइट वगैरेंनी चर्चेत भाग घेतला. मि. हॉस्केन हे हिंदी लोकांच्या बाजूने बोलताना म्हणाले, 'हे नवे बिल फक्त रशियामध्ये शोभेल. या बिलातील काही कलमे अशी आहेत की, त्यांना ब्रिटिश राजवटीत स्थान असता कामा नये.'

असोसिएशनचा अर्ज

असोसिएशनने या बिलाविरुद्ध एक अर्ज[2] केला आहे. हा अर्ज आमच्या इंग्रजी विभागात पूर्वीच छापलेला आहे. आता त्याचा सारांश पुढे दिला आहे.

१. ट्रान्सवॉलमधील खाणींचे कमिशनर.

२. 'ट्रान्सवॉल विधि-मंडळास अर्ज' प्रकरण ६२ पाहा.

प्रवेश-नियंत्रणाच्या तत्त्वाला या असोसिएशनचा विरोध नाही, तरी या बिला-बरील आपले पुढील आक्षेप सादर दाखल करीत आहोत. [अ] या बिलाने कोणत्याही हिंदी भाषेला मान्यता दिलेली नाही. [ब] दीर्घकाळ ट्रान्सवॉलचे रहिवासी असलेल्या लोकांच्या हक्कांचे रक्षण हे बिल करीत नाही. उदा. पुष्कळ हिंदी लोकांनी ट्रान्सवॉल-मध्ये स्थायिक होण्याच्या हक्कासाठी डच सरकारला ३ पौंड भरलेले आहेत. त्यांपैकी काही जणांना परवाने मिळालेले नाहीत. त्यांना जर एखादी युरोपियन भाषा येत नसेल तर त्यांचे हक्क रद्दबातल होतील. [क] दुसऱ्या कलमाच्या चौथ्या पोटकलमाप्रमाणे, शैक्षणिक कसोटीस उतरणारे आणि अन्य तऱ्हेने निषिद्ध न ठरणारे आशियावासी लोकही या नव्या आशियावासियांच्या कायद्याच्या अमलाखाली येतील. अशा प्रकारे कायद्याचा अंमल करून काहीच साधणार नाही. कारण शैक्षणिक पात्रता असलेल्या हिंदी लोकांना दुसरी काही ओळख देण्याची गरज नाही. [ड] शिवाय, त्याच कलमाने, हिंदी जमातीला वेश्या व त्यांचे साथीदार यांच्या पंक्तीस बसविले आहे. [इ] पूर्वीच्या आश्वासनांना हरताळ फासून, हे बिल आशियावासियांच्या नोंदणी कायद्याच्या तरतुदींना पुष्टी देते.

आशियावासी जमातींचे प्रतिनिधी पार्लमेंटमध्ये कोणी नाहीत हे पार्लमेंटने ध्यानी घ्यावे, म्हणून त्या जमातीच्या अर्जाकडे त्याने विशेष लक्ष पुरवावे. त्यामुळे असो-सिएशनला अशी आशा वाटत आहे की, आपल्या अर्जाचा पूर्ण विचार होईल आणि लोकांचे दुःख निवारण होईल.

हा अर्ज मि. होस्केन यांनी सादर केला. बिलाची छाननी चिकित्सा-समिती बुधवारी करणार आहे. मी हे बातमीपत्र सोमवारी लिहीत आहे. बिलात काही फेर-बदल झाले किंवा नाही, हे हा अंक प्रसिद्ध होण्यापूर्वी सर्वांना कळेल.

तुरुंगात वृत्तपत्रे मिळतील काय ?

हा प्रश्न एका पत्रलेखकाने केला आहे. त्याचे उत्तर असे की, कोणत्या प्रकारची तुरुंगवासाची शिक्षा मिळेल, त्यावर हे अवलंबून आहे. जर ती शिक्षा सक्त-मजुरीची असेल, तर कोणतेही वृत्तपत्र दिले जाणार नाही. मात्र महिन्यातून एकदा प्रत्येक कैद्याची भेट त्याच्या मित्रांना घेता येईल. अशा मित्रांनी ' इंडियन ओपिनियन'-मध्ये आलेली माहिती ध्यानी धरून ती स्वतः कैद्याला कारागृहाच्या प्रासादात सांगावी असा माझा सल्ला आहे.

वाटाण्याच्या अक्षता दिल्या

प्रिटोरियातील काही हिंदी मित्रांना असे वाटले की, आपण जर वसाहतीच्या सरकारपुढे काही मागण्या मांडल्या आणि त्या पूर्ण झाल्या तर तुरुंगात जाण्याची आपली यातायात वाचेल. पण ईश्वराला आपली पुरेपूर सत्त्वपरीक्षा पाहावयाची

आहे. त्यामुळे त्या मागण्यांतून काही निष्पन्न झाले नाही. त्या हिंदी लोकांनी मि. स्मट्स् यांच्यापुढे पुढील मागण्या ठेवल्या—

(१) दहा बोटांचे ठसे आम्हांला द्यावे लागू नयेत.
(२) आईच्या नावाची जरूरी लागू नये.
(३) प्रौढ मुलांनाच नोंदणी अवश्य असावी—लहानांना या त्रासातून मुक्त करावे.
(४) [परवाने] तपासण्याचा अधिकार काफीर पोलिसांना नसावा.
(५) तुर्कस्तानातील खिश्चन व मुसलमान यांच्यामधील भेदभाव नष्ट करावा.
(६) परवान्यात ऑरेंजरिव्हर वसाहतीचे नाव असावे.
(७) अज्ञान मुलाचे वय निश्चित करण्याचे काम रजिस्ट्रारच्या मनःपूत निर्णयावर न सोपविता न्यायमंदिराकडे सोपवावे.
(८) व्यापाऱ्यांच्या नोकरांना प्रवेश करण्यासाठी तात्पुरते परवाने सढळ हाताने द्यावे.
(९) हा कायदा अखेरचा आहे असे आश्वासन द्यावे.

मि. स्मट्स् यांनी लांबलचक उत्तर दिले आहे. ते फार चतुराईचे आहे. गोड शब्दांनी कोणाला ठार करता येत असेल, तर तसे स्मट्स यांनी केले आहे : ‘ जर सर्व हिंदी माणसे नोंदणी करून घेतील, तर आईचे नाव देण्याची गरज रद्द करता येईल. काफीर पोलिस अंगठ्याचे ठसे मागणार नाहीत. [ह्याचा अर्थ ते परवाना मागतील.] हा कायदा अखेरचा असेल की नाही ते हिंदी जमातीवर अवलंबून आहे. त्या जमातीने या कायद्यातील तरतुदींचे पालन प्रामाणिकपणे केले, तर नव्या कायद्याची गरज बहुधा लागणार नाही ’ असे मि. स्मट्स म्हणतात.

रक्त उकळते

या उत्तराचा सारांश देताना माझे रक्त उकळते. आम्ही चांगले वागलो तर नवे निर्बंध येणार नाहीत, याचा अर्थ काय ? या आक्षेपार्ह कायद्यामुळे आम्हांला जिवंतपणीच मृत्यु येत असताना, आमच्या प्रेतांना लाथेने ठोकरण्यासाठी त्यात नव्या दुरुस्त्या केल्या जाणार काय ? मि. स्मट्स् यांनी कोणत्याही मुद्द्यावर आपले हटवादी धोरण सोडलेले नाही ते लक्षात घेतले पाहिजे. आईच्या नावाचा उल्लेख करण्याची गरज राहणार नाही, असे त्यांनी स्पष्टपणे म्हटलेले नाही. सर्व हिंदी लोकांनी नोंदणीस मान्यता दिली, तर त्या पवित्र नामाचा उल्लेख करावयाचा की नाही, हे आपल्या इच्छेवर सोपविले जाईल. काफीर पोलीस बोटांचे ठसे मागणार नाहीत, म्हणजे ते परवाने खचित मागतील. जर आपण ह्या नव्या कायद्याला मान्यता दिली, तर महाशय, आपला पास दाखवा.’ या संगीतातून आपण कधीही सुटणार नाही.

हेही बरेच झाले

रेशमाने गुंडाळलेल्या काठीने एक दणदणीत दणका आपल्याला मिळाला आहे, हेही बरेच झाले. यामुळे हिंदी समाजाचा निश्चय अधिकच दृढ होईल. क्रूर कायद्याचे नियम क्रूरच असणार, त्याप्रमाणे त्या बाबतीतील उत्तरही क्रूरच असणार. क्रूर नियमामुळे हिंदी लोक पेटले आहेत. या क्रूर उत्तराने ते अधिकच खंबीर बनतील. ईश्वराला साक्षी ठेवून आपण या कायद्याला विरोध करण्याची प्रतिज्ञा केलेली आहे. त्यात ईश्वराला साक्षी ठेवून आपण आपली हिंमत कायम राखू या.

दुरुस्ती

मि. इसापमियाँ यांनी ज्या स्वयंसेवकाला एक शाल बक्षीस दिली, त्याचे नाव देण्यात मी चूक केली, असे एका पत्रलेखकाने निदर्शनास आणले आहे, त्याबद्दल मी आभारी आहे. ती शाल गुलाम महम्मद यांना बक्षीस देण्यात आली होती. या नावाच्या चुकीसाठी मी मि. गुलाम महम्मद यांची क्षमा मागतो.

ट्रान्सवॉल प्रवेश बिल [1]

समितीने प्रवेश नोंदणी-बिलाचे दुसरे वाचन मंजूर केले आणि गुरुवारी तिसरे वाचनही मंजूर झाले.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन २०-७-१९०७

१. हे 'खास तारेने' पाठविण्यात आले होते.

७१. वासाहतिक सचिवाला पत्र

२५ व २६ कोर्ट चेंबर्स
रिसिक स्ट्रीट
जोहान्सबर्ग,
[१६ जुलै १९०७[1]]

नामदार,
वासाहतिक सचिव,
प्रिटोरिया यांस,

महाशय,

प्रवासनियंत्रण बिलासंबंधी माझ्या असोसिएशनने विधिमंडळाकडे जो अर्ज[2] दाखल केला आहे.[3] त्याकडे मी सरकारचे लक्ष वेधावे अशी माझ्या असोसिएशनच्या कमिटीची इच्छा आहे. त्या अर्जामध्ये जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत ते हिंदी समाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत, असे माझ्या असोसिएशनचे नम्र मत आहे. त्या अर्जात विनंती केल्याप्रमाणे सरकारने दाद घेतली तर बिलाचे तत्त्व शाबूत राहील असे माझ्या असो. ला वाटते.

सुशिक्षित हिंदी माणसांना नोंदणी कायद्याला मान तुकविणे भाग का पडावे याचे कारण माझ्या असोसिएशनला उकलत नाही. ट्रान्सवॉलमध्ये वास्तव्य करण्यासाठी ज्यांनी तीन पौंड भरलेले आहेत, पण शांतता संरक्षक वटहुकुमाप्रमाणे ज्यांनी परवाने घेतलेले नाहीत, अशा हिंदी लोकांना आपण स्वीकारलेल्या देशात परत येण्याचा हक्क नष्ट व्हावा, हा घोर अन्याय दिसतो.

१. 'इंडियन ओपिनियन'मध्ये छापलेल्या पत्रावर तारीख नाही, पण ट्रान्सवॉल विधिमंडळाच्या पुराणवस्तु संग्रहातील सरकारी दप्तरामध्ये ही तारीख दिलेली आहे.

२. पहा : " ट्रान्सवॉल विधिमंडळाला अर्ज " (प्रकरण ६२)

३. यातील काही शब्द मूळ प्रतीत गळले आहेत.

यामुळे, माझ्या असोसिएशनच्या मागणीचा अनुकूल विचार सरकार करील असा माझ्या असोसिएशनला विश्वास वाटत आहे.

आपला,
मुसा इस्माइलमिया,
हंगामी अध्यक्ष,
ब्रिटिश इंडियन असोसिएशन

इंडियन ओपिनियन, २०-७-१९०७

७२. मोठी बदनामी

लॉर्ड ॲम्प्थिल यांच्या सूचनेवरून विधिमंडळात ट्रान्सवॉलच्या आशियावासी बिलासंबंधीचा जो पत्रव्यवहार ठेवण्यात आला आहे, तो आता आमच्या हाती आला आहे. लॉर्ड एल्जिन यांचे लक्ष या कायद्याकडे वेधताना लॉर्ड सेल्बोर्न यांनी पुढील विधाने करण्याची मुभा घेतली :

या कायद्याच्या बाबतीत परवानगी नाकारण्याचा अधिकार बादशहांनी बजावावा असा सल्ला आपण देणार नाही, अशी माहिती आपण लवकरच आम्हांला द्याल अशी आशा आहे. तसे झाल्यास हा कायदा ताबडतोब अमलात आणता येईल. **आणि सध्या ट्रान्सवॉलमध्ये आशियावासियांची बेकायदा व अनधिकृत जी आवक भयंकर प्रमाणावर चालू आहे, तिला त्यामुळे आळा बसेल**

[अक्षरांचे जाड ठसे आमचे आहेत.]

लॉर्ड सेल्बोर्न यांनी बेकायदा आवकेसंबंधी जी घोषणा ठासून केली आहे ती आमची शुद्ध बदनामी आहे असे म्हणण्यास आम्ही कचरत नाही. यात काही मोघमपणा नाही. आशियावासियांच्या अनधिकृत लोंढ्यासंबंधी लॉर्डसाहेबांपुढे जी विधाने ठेवण्यात आली ती त्यांनी निःसंकोचपणे स्वीकारली, पण ती एकांगीच आहेत. असा काही लोंढा येत असल्याचे हिंदी लोकांनी नाकारले आहे आणि चौकशी करण्याचे आव्हान दिलेले आहे.[1] पण काहीही चौकशी झाली नाही. तरीही लॉर्ड सेल्बोर्न यांच्या

१. पाहा : खंड ५ (प्रकरण ४२६ व ४४१), खंड : ६, (प्रकरण १,२,३ व ५२)

शिरावर प्रचंड जबाबदारी असतानाही, त्यांनी नाशाबित आरोपावर आपल्या अधिकाराचे शिक्कामोर्तब उठविले आहे.

हा आरोप मूलतःच असत्य आहे. हिंदी लोकांचा असा लोंढा दळदळीतपणे चालू असता तर त्या येणाऱ्या लोकांना या वसाहतीत का राहू दिले असते? या आलेल्या लोकांची माहिती लॉर्डसाहेबांच्या बातमीदारांना असेल तरी किंवा नसेल तरी. असल्यास, त्या लोकांना न्यायमंदिरात खेचण्याची सारी यंत्रणा शांतता–संरक्षक वटहुकुमाने उभी केलेली आहे. म्हणून लॉर्ड सेल्बोर्न यांच्या बदनामीवरून हे दिसून येते की, न्यायमंदिराशिवाय अन्यत्र आशियावासियांना आपले म्हणणे दक्षिण आफ्रिकेत कोणाच्या कानी नीटपणे घालणे अशक्य नसले तरी अतिशय अवघड आहे. अशा बाबतीत त्यांना न्यायमंदिराचा मार्ग खुला नसतो. म्हणून त्यांना स्वस्थ बसून सारे हाल दातओठ खात कसेतरी सोसावे लागतात.

लॉर्ड एल्जिन यांच्या उत्तराची छाननी आपण करू लागलो म्हणजे हिंदी लोकांचे मन निराशेने सहज भरून जाते. वसाहतमंत्र्याने या बिलाला मंजुरी दिली आहे, याचे कारण ते त्याला न्यायाचे वाटते असे नव्हे, तर त्याच्या पाठीशी गोऱ्यांच्या सत्तेचे वजन आहे. याचा अर्थ असा की, वसाहतीच्या पार्लमेंटचा कोणताही कायदा एकमताने मंजूर झालेला असेल तर, त्याचे गुणावगुण काहीही असोत, साम्राज्य सरकारची संमती त्याला झटकन मिळेलच. हा सिद्धान्त जर निःशंकपणे खरा असेल, तर "सध्या आशियावासियांवर जे निर्बंध आहेत त्यांची फेरतपासणी करणे इष्ट असल्याचे साम्राज्य सरकारचे मत कायम आहे." ही लॉर्ड एल्जिनची घोषणा म्हणजे पोकळ सदिच्छा आहे. तिच्यावर हिंदी लोकांना फारसे विसंबून राहाता येणार नाही. ती सदिच्छा कधीच सफळ होणार नाही. ट्रान्सवॉलमधील आशियावासियांच्या डोळ्यांपुढे या कायद्याची भयानक वस्तुस्थिती उभी आहे. म्हणून त्या कायद्याशी मुकाबला करण्यासाठी त्यांनी आपले सर्वस्व पणाला लावलेले आहे. निर्बंधात सुधारणा करण्याची जी अभिवचने जनरल बोथांनी दिलेली आहेत, त्यांचा हिंदी लोकांवर फारसा परिणाम होणार नाही. पण जाताजाता हे सांगितले पाहिजे की, जनरलसाहेबांना आपली ती अभिवचने पूर्ण करता आली नाहीत. स्थानिक सरकारामध्ये किती द्वेषभाव पसरला आहे याचे हे एक गमक आहे. वसाहतीच्या सरकाराची जी खलबते चालतात त्यांत हिंदी लोकांच्या भावनेला काडीचीही किंमत नाही.

इंडियन ओपिनियन, २०–७–१९०७

७३. ट्रान्सवॉल प्रवेश बिलावरील वादविवाद

ट्रान्सवॉलच्या विधिमंडळात प्रवेश-प्रतिबंधक बिलाच्या दुसऱ्या वाचनाच्या वेळी जो वादविवाद झाला तो पुष्कळ दृष्टींनी डोळे उघडणारा आहे. मि. स्मटस् यांनी सभागृहात बिल मांडले ते अत्यंत घाईघाईने. हिंदी लोकांना लागू होणाऱ्या मुद्द्यांना त्यांनी फारसा स्पर्शच केला नाही. सभासद किंवा जनता यांच्या दृष्टीने ते मुद्दे फारसे लक्ष देण्यासारखे आहेत असे त्यांना वाटले नाही. आशियावासियांच्या नोंदणीचा कायदा हा ट्रान्सवॉलच्या कायदे-पुस्तकात कायमचा जाऊन बसणार ही गोष्ट गृहीत धरूनच ते चालले. तसेच हे बिल मांडताना मि. डंकन जे काय म्हणाले[1], त्याच्याविरुद्ध जाऊन मि. स्मटस् यांनी असे मानले की, प्रवेशबिल हे त्या नोंदणी कायद्याच्या ऐवजी आलेले नसून, आशियावासी जमातीपुरते, तो कायदा अधिक कडक करण्यासाठी आलेले आहे. डच सरकारला ज्या आशियावासी लोकांनी पूर्वी ३ पौंड दिले त्यांना वास्तव्याचे संरक्षण देणाऱ्या १८८५ च्या तिसऱ्या कायद्याचे उल्लंघन या बिलाने होत आहे, हे विधिमंडळाच्या सभासदांना सांगण्याची तसदी त्यांनी घेतली नाही. एखादा आशियावासी माणूस उच्च–शिक्षित असला, पण या वसाहतीत शिरताना त्याने जर आशियावासी नोंदणी कायद्याने सांगितलेले दिव्य केले नाही तर त्याला 'प्रतिबंधित प्रवेशक' ठरविणाऱ्या कलमामध्ये त्यांना काही वेडेवाकडे वाटले नाही.

या वसाहतीतून कोणाही माणसाला चौकशीविना आणि आपल्या खर्चाने बाहेर लोटण्याचा जादा अधिकार देणारे बिलातील कलम भयंकर आहे, असे नम्र मत मि. नेसर यांनी मांडताच मि. वायबर्ग यांनी मोठा चडफडाट केला. पण मि. वायबर्गचे उद्‌गार हे, स्वतःस विसरल्याने, मूर्खपणातून निघालेले आहेत एवढेच आम्ही म्हणतो. दुसऱ्या कोणी माणसाने ते काढले असते तर तो भयंकर उद्धटपणा मानला असता. त्या कलमाची चर्चा करताना व ते कलम कायम ठेवण्याविषयी सरकारला सल्ला देताना, त्यांनी हिंदुस्थानातील ताज्या घटनांचा उल्लेख केला. या वादात शिरण्याची आमची इच्छा नाही, पण मि. वायबर्गसारख्या जबाबदार मुत्सद्द्याने विधिमंडळातील आपल्या स्थानावरून द. आफ्रिकेतील जनतेला उद्देशून अत्यंत बेजबाबदारपणे बोलू नये अशी आमची अपेक्षा आहे. हिंदी प्रश्नांचा विशेष अभ्यास केल्याशिवाय त्यांना तारां-

१. पाहा : खंड ३ (प्रकरण २५८), पॅट्रिक डंकन १९०३ ते १९०६ पर्यंत वासाहतिक सचिव होते.

मधून मिळणाऱ्या सारांशावरूनच माहिती मिळणार हे उघड आहे– आणि जगालाही तशीच माहिती मिळते. हिंदी पुढाऱ्यांना हद्दपार करण्याची जी कृती सरकारी अधिकाऱ्यांनी केली, ती स्वयमेव चांगली होती किंवा तिचा परिणाम शांतताजनक झाला, असे मानण्याला त्यांना काहीच हक्क नाही– अर्थात सरकार प्रमादशील असूच शकत नाही असा यांचा विश्वास असल्यास गोष्ट निराळी. या सन्मान्य सभासदापेक्षा आम्हांला थोडीफार अधिक माहिती आहे असा दावा आम्ही कदाचित करू शकतो. तरीसुद्धा ब्रिटिश साम्राज्याच्या त्या भागामध्ये (हिंदुस्थानामध्ये) ज्या घटना घडत आहेत, त्यांची सर्व माहिती बिनचूक माहीत नसल्याने, त्यांवर भाष्य न करणे आम्ही शहाणपणाचे मानतो.

मि. वायबर्ग यांनी अधिकच मूर्खपणाचे असे विधान केले आहे की, ट्रान्सवॉल-मधील सविनय प्रतिकाराला उत्तेजन देणाऱ्या हिंदी लोकांना या देशाबाहेर घालविण्यास या कलमाने दिलेले अधिकार उपयोगी पडतील, असा निष्कर्ष हिंदुस्थानातील घडामोडींवरून काढता येतो. यावरून त्यांचा दृष्टिकोन साफ चुकलेला आहे हे दिसून येते. हिंदुस्थानातील घटनांना दंग्याचे स्वरूप आहे, आणि तो दंगा म्हणजे ब्रिटिश राजवटीविरुद्ध बंड आहे असा अर्थ करण्यात येत आहे. अशा बंडाशी ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या मोहिमेचे काडीमात्र साम्य नाही. आपली नैतिक भावना ढासळण्यापेक्षा आपण शारीरिक हाल पुष्कळ सोसावे असा हिंदी समाजाने केलेला तो एक स्वेच्छेचा प्रयोग आहे. "वाईटाचा प्रतिकार (वाईट मार्गाने) करू नका." या नाझारेथच्या प्रेषिताने (येशूने) दिलेल्या आदेशाचे पालन करण्याचा ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांचा तो एक प्रयत्न आहे.

मि. वायबर्ग यांनी सभागृहाला हिंदी लोकांविरुद्ध चेतना दिली. याचा अणुमात्र परिणाम हिंदी लोकांवर होणार नाही हे निश्चित. कोणत्याही धमकीने ते आपल्या कर्तव्यापासून च्युत होण्याचा संभव नाही. वाईटातील वाईट घडेल असे धरून ते चालले आहेत. शुद्ध हेतूने व आपल्या अब्रूला कलंक लागू न देण्याच्या निर्धाराने त्यांच्या अंगी धैर्य संचरले आहे. मि. वायबर्ग यांच्या विधानांचा परामर्श आम्ही घेत आहो याचे कारण इतकेच की, ते भ्रान्त-चित्त असले तरी प्रामाणिक गृहस्थ आहेत, असा आम्हांला विश्वास वाटतो. त्यांच्यासारख्या समतोल मनाच्या माणसाचे मतही द्वेषाच्या वातावरणाने कसे कलुषित होते, हे दाखविण्यासाठी आम्ही ही चर्चा करीत आहो. मि. वायबर्ग यांच्या भाषणाच्या बुडाशी जी सूडाची बुद्धी आहे; तिला तीव्र नापसंती व्यक्त करणारे, सर्व आमदारांमध्ये, मि. होस्केन हे एकटेच निघाले. मि. होस्केन यांनी बिनदिक्कत असे सांगितले की, हे बिल फक्त रशिया किंवा जर्मनी यांच्या प्रदेशातच जन्मास येणे शक्य आहे; ब्रिटिश प्रदेशात नव्हे. समाजातील एखाद्या विशिष्ट वर्गाला दडपून टाकण्यासाठी जे स्वैर अधिकार घेतले जातात ते,

आपल्याला कल्पना नसलेल्या लोकांवर, कसे उलटतात, हे मि. वायबर्ग यांना मुळीच माहीत नाही. त्यांना आपल्या अविचाराबद्दल प्रशांत क्षणी पश्चात्ताप झाला असेल अशी आम्हांला आशा वाटते.

इंडियन ओपिनियन, २०-७-१९०७

७४. मुदतबंद मजूर

नाताळमध्ये मुदतबंद मजूर आणण्यासाठी किती खर्च येतो, याची माहिती देणारे महत्त्वाचे पत्र इंडियन इमिग्रेशन ट्रस्ट बोर्डने मुदतबंद हिंदी लोकांच्या मालकांकडे जे पाठविले, ते आम्ही या आठवड्यात प्रसिद्ध करू शकतो. हा पत्रव्यवहार मे. इव्हॅन्स आणि बॅरिस्टर रॉबिन्सन यांनी अभ्यासण्यासारखा आहे. पूर्ण विचारांती त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, नाताळमध्ये मुदतबंद मजूर आणण्याचे बंद करावे. मि. हायगर यांना आम्ही जे ओळखतो त्यावरून त्यांना याच श्रेणीत घालता येत नाही. मुदतबंद हिंदी मजुरांची आवक थांबविण्याचा प्रयत्न करावा, या बाबतीत आम्ही त्यांच्याशी सहमत असलो तरी आमचे हेतु एकच नाहीत. हिंदी समाजाची बदनामी करण्यास जो गृहस्थ कचरत नाही आणि आपली विधाने सिद्ध करण्याचे आव्हान दिले असता तसे करण्याचे, नाही तर माफी मागण्याचे, धैर्य ज्याच्या अंगी नाही, अशा सभासदाशी हिंदी समाजाला काहीही कर्तव्य नाही. मि. रायक्रॉफ्ट यांचे पत्र युरोपियनांचा दृष्टिकोन मांडते, आणि ते असे मजूर बंद करण्याचे पूर्ण समर्थन करणारे आहे. मजुरांच्या आवकेचा खर्च सोसण्यास मालकवर्ग समर्थ नाही हे उघड आहे, मजुरांना सक्तीने परत पाठविणे हे त्यांना त्याहून अधिक त्रासदायक आहे. हिंदुस्थान सरकारने अशा धोरणाला संमती देणे म्हणजे आपले पालकत्वाचे कर्तव्य सोडून देणे होय. १९०५ साली प्रत्येक प्रौढ पुरुषाला येथे आणण्याचा खर्च ३१ पौंड १० शिलिंग ९ पेन्स होता; पण मालक वर्गाने फक्त २० पौंड दिले. हिंदी लोकांवर ३ पौंडाच्या कराचा बोजा बसल्यामुळे अधिकाधिक हिंदी लोक हिंदुस्थानाला मोफत परत जाऊ लागले आहेत. त्यामुळे तो खर्च वाढणार आहे. यावरून हे दिसून येते की, केवळ आर्थिक दृष्टीने पाहिले तरी, मुदतबंद मजूर जितक्या लवकर बंद होतील, तितके ते सर्व पक्षांना चांगले होईल.

इंडियन ओपिनियन, २०-७-१९०७

७५. जनरल स्मट्स् यांचा हट्ट

आशियावासी नोंदणीच्या कायद्याने सरकारने स्वतःला ज्या चुकीच्या भूमिकेत टाकले आहे, ती भूमिका रद्द करण्याची आणखी एक संधी प्रिटोरियातील हिंदी लोकांनी सरकारला दिली आहे. तो सारा पत्रव्यवहार लांबलचक आहे आणि या अंकी त्याला जागा देणे शक्य नाही, हे दुर्दैव होय. नोंदणी कायद्यातील अत्यंत आक्षेपार्ह कलमासंबंधी हिंदी लोकांच्या तर्फेच्या वकिलांनी फार समंजस सूचना केल्या होत्या. त्यातील प्रत्येक सूचनेला वासाहतिक सचिवाने वाटाण्याच्या अक्षता लावल्या. सरकार दुसरे काही करणेच शक्य नाही, हे आम्ही प्रांजळपणे कबूल करतो. हिंदी लोक तुरुंगाच्या ठरावाची अंमलबजावणी करण्याइतके खंबीर नाहीत, असा अर्थ त्या पत्रातून काढण्याचा हक्क सरकारला आहे असे आमचे मत आहे. म्हणून अत्यंत सयुक्तिक पत्राचा अर्थ भलताच घेतला हे उघड आहे. कायद्याला धरून त्यांनी निर्बंध मंजूर केले आणि त्या धोरणाचा पाठपुरावा त्यांनी प्रिटोरियातील हिंदी अर्जदारांना केलेल्या उत्तरात आहे. सक्तीच्या नोंदणीला मान्यता न दिल्याने जे क्लेश सोसावे लागतील, ते सोसण्याचा हिंदी समाजाचा निर्धार या पत्रव्यवहाराने दृढतर होईल, हा एक लाभच समजला पाहिजे.

इंडियन ओपिनियन, २०–७–१९०७

७६. दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीचे कार्य

दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समिती अजूनही मोठ्या परिश्रमाने कार्य करीत आहे. ट्रान्सवॉलच्या कायद्याला विरोध करू नये हा त्या समितीचा सल्ला हिंदी समाजाने झिडकारला तरी त्याचा अनिष्ट परिणाम समितीवर काही झाला नाही, हे सर विल्यम बुल व डा. रुदरफोर्ड यांनी पार्लमेंटमध्ये काही दिवसांपूर्वी विचारलेल्या प्रश्नावरून स्पष्ट होते. समितीचे कार्य चालूच आहे. आणि ते चालू राहावयासच हवे. समिती जो जो

म्हणून सल्ला देईल तो स्वीकारण्यास हिंदी समाज बांधलेला नाही. समितीचे सभासद उदार अंतःकरणाचे आहेत आणि ते आपले काम करीत आहेत.

समितीचे अध्यक्ष सर मंचरजी भावनगरी हे इतके सावध व दूरदृष्टीचे गृहस्थ आहेत की, समिती हिंदी लोकांचे कार्य सहसा सोडणार नाही. याशिवाय मि. रिच् यांनी लॉर्ड ॲम्प्थिल यांना जे पत्र पाठविले आहे, त्यावरून ते समितीपुढे हिंदी दृष्टिकोन बरोबर मांडण्यास चुकणार नाहीत, हे स्पष्ट होते.

डेलागोआ–बे

सर विल्यम बुल यांच्या प्रश्नावरून, डेलागोआ-बेच्या हिंदी लोकांना असे दिसून येईल की आपले कामही विसरले गेले नाही. 'इंडियन ओपिनियन' मध्ये आलेल्या श्री. कोठारींच्या पत्रावरून, सर विल्यम बुल यांनी तेथील हिंदी लोकांच्या हालअपेष्टांबद्दल तत्काळ तक्रार केली. समितीला डेलागोआ-बेच्या हिंदी लोकांकडून काहीही देणगी मिळालेली नाही, हे या ठिकाणी आम्हाला सांगितले पाहिजे. सध्या त्यांना विशेष हालअपेष्टा भोगाव्या लागत नसल्या, तरी त्यांनी समितीला देणगी दिली पाहिजे असे आम्हांस वाटते.

ऱ्होडेशिया

डेलागोआ-बेप्रमाणे, ऱ्होडेशियाचाही विसर पडलेला नाही. हिंदी लोकांच्या प्रश्नावरील ऱ्होडेशियाच्या कौन्सिलचे जे मत होते ते आम्ही त्याच वेळी प्रसिद्ध केले होते, हे आमच्या वाचकांना आठवत असेल. त्यातील माहिती इंग्लंडला पोहोचताच मि. रिच् यांनी तिचा उपयोग केला. आता ऱ्होडेशियामध्ये अत्यंत कडक कायदे मंजूर होण्याचा संभव नाही. विचार केला तर कोणालाही हे मान्य करावे लागेल की, ऱ्होडेशियातील असोत वा डेलागोआ-बेमधील असोत, त्या हिंदू लोकांची प्रतिष्ठा ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या लढ्यावरच खरोखर अवलंबून आहे. ते–आणि केवळ तेच–हिंदी लोकांची प्रतिष्ठा संभाळू शकतील. जर तसे घडले नाही तर समिती किंवा दुसरे कोणी काहीच मदत करू शकणार नाहीत.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २०–७–१९०७

७७. लोबिटो–बे

लोबिटो-बेमधील हिंदी लोकांची स्थिती फार वाईट आहे, असे आमच्या बातमीदाराने कळविले आहे. म्हणून आम्ही मेसर्स ग्रिफिथ यांच्या एजंटामार्फत चौकशी केली. त्याने पुढील उत्तर पाठविले :

"हे वृत्त पूर्णपणे निराधार आहे. वैद्यकीय मदत पुष्कळ आहे. मजुरांसाठी खास रुग्णालये सुसज्ज आहेत व त्यांवर खास डॉक्टर नेमलेले आहेत. तुम्हांला इष्ट वाटत असल्यास नाताळ सरकारला चौकशीसाठी तपासनीस पाठविण्यास कळवावे. वृत्त पूर्णपणे निराधार आहे. मजूर संतुष्ट आहेत. पाणीपुरवठा चांगला आहे. खाद्यसामग्री विपुल आहे."

हा वृत्तांत आमच्या बातमीदाराच्या वृत्तांताशी विसंगत आहे. आमचा बातमीदार अत्यंत दक्ष व निःस्वार्थी आहे. म्हणून त्याचे वृत्त बाजूस सारता येत नाही. दोन्ही वृत्तांत एकत्र ठेवून त्यांचा विचार करता आम्ही असा निष्कर्ष काढतो की, जेव्हा मजूर तेथे पोहोचले तेव्हा त्यांना पुष्कळ हाल सोसावे लागले. ही बातमी आमच्या बातमीदाराला लागली. आता तेथील स्थिती पूर्वीइतकी वाईट राहिलेली नाही. मजूर सुखात आहेत, तरीसुद्धा तेथे जाण्याचा धोका कोणी हिंदी माणसाने घ्यावा, अशी स्थिती अद्यापि नाही हे उघड आहे. बेंगूएला येथे पोहोचेपर्यंत पुष्कळ हाल आहेत हे खास. तेथे पोहोचल्यावरसुद्धा, सध्याच्या परिस्थितीत कोणालाही स्वतंत्र राहून कोणताही धंदा करणे शक्य नाही.

[गुजरातीवरून]

इंडियन ओपिनियन, २०-७-१९०७

७८. परवाने व तिकीटे यासंबंधीचे नाताळमधील बिल

नाताळ सरकारच्या १२ जुलैच्या गॅझेटमध्ये परवान्याच्या बाबतीत काही फेरफार करणारे बिल प्रसिद्ध झाले आहे. त्यातील महत्त्वाचे मुद्दे आम्ही पुढे देत आहो :

(१) १८९७ चा व्यापारविषयक कायदा यापुढे भोजनगृहांना लागू होईल.

(२) मॅजिस्ट्रेटनें एका जिल्ह्यासाठी दिलेला फेरीवाल्याचा परवाना दुसऱ्या जिल्ह्यात चालणार नाही.

(३) कोणताही फेरीवाला एका शेतावर बारा तासांहून अधिक काळ राहणार नाही; किंवा चार दिवसांच्या आत तेथे पुन्हा जाणार नाही.

(४) नगरपालिकेच्या परवाना फीच्या शेकडा १० टक्के किंमतीचे जादा तिकीट परवान्याला लावावे लागेल. हे १० टक्के परवानेवाल्याला द्यावे लागतील आणि ते सरकारला मिळतील.

(५) विदेशी पेढ्यांच्या अडत्यांना परवाना घ्यावा लागेल. विदेशी माल लिलावाने विकणाऱ्या लिलाववाल्यालाही परवाना घ्यावा लागेल.

(६) व्यापाराचा परवाना घेण्याच्या वेळी, ज्याच्याजवळ एजन्सी असेल त्याने ती असल्याचे परवाना-अधिकाऱ्यांना सांगितले पाहिजे.

(७) आदिवासी किंवा हिंदी लोक यांना द्यावयाच्या भाड्याच्या पावत्या स्वतंत्र पावतीपुस्तकातून दिल्या जातील आणि त्यावर निराळे क्रमांक घालून त्यांच्या स्थळप्रतीवर अंगचेच तिकीट असेल. तिकिटे चिकटवून काम भागणार नाही.

हे बिल अद्याप कायदा झालेले नाही, पण तें मंजूर होईल असे गृहीत धरून चालावे. त्यात काही फेरबदल होतील, पण किरकोळ स्वरूपाचे. हे बिल सर्वांना लागू आहे, म्हणून त्याला विरोध करणे कठीण आहे. या बिलापाठीमागील कल्पना ही आहे की, या वसाहतीपुढे आर्थिक ओढाताणीचा प्रश्न उभा असल्यामुळे, शक्य त्या सर्व मार्गांनी पैसा उभा करावा. "रागावला कुंभार आपल्या गाढवाचे कान ओढी" या गुजराती म्हणीप्रमाणे सरकारला पैशाची गरज असल्यामुळे ते आता फेरीवाल्यासारख्या गोरगरीबांना छळू लागले आहे. थोडक्यात म्हणजे सारी दक्षिण आफ्रिका आता कंगाल बनली आहे. त्यामुळे प्रत्येक सरकार सर्व बाजूंनी पैसा ओढीत आहे. परवान्याचे जे भिन्न भिन्न दर ठेवलेले आहेत ते आम्ही येथे देत नाही. हे बिल मंजूर झाल्यावर, जरूर

वाटल्यास आम्ही देऊ. वरील सर्व कलमांमध्ये भाड्याच्या पावतीसंबंधीचे कलम भयानक आहे. त्याला प्रतिकार केलाच पाहिजे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २०-७-१९०७

७९. मुदतबंद हिंदी मजूर

इंडियन इमिग्रेशन ट्रस्ट बोर्डचे चिटणीस मि. रायक्रॉफ्ट यांनी मुदतबंद हिंदी मजुरांच्या मालकांना एक पत्र पाठविले आहे, ते आम्ही आमच्या इंग्रजी विभागात संपूर्ण प्रसिद्ध करीत आहो. त्या पत्रावरून हे दिसून येईल की, मुदतबंद हिंदी मजुरांना येथे आणण्याचा खर्च मालकांना डोईजड वाटत आहे. आणि हिंदी मजुरांना कराराची मुदत संपल्यावर परत पाठवावयाचे म्हटले तर, त्यांचा खर्च पुष्कळच अधिक होईल. यावरून मि. रायक्रॉफ्ट असा निर्णय देतात की, मजुरांना सक्तीने परत पाठविण्याच्या कायद्यामुळे मालकवर्गाचे फार मोठे नुकसान होईल.

यामुळे मुदतबंद मजुरांचे मालक शृंगापत्तीत सापडले आहेत. त्यांनी मजुरांना परत जाऊ दिले तर त्यांचे कंबरडे मोडेल; त्यांनी त्यांना येथे ठेवून घेतले, पण त्या मजुरांना हिंदुस्थानला परत पाठविण्याचा कायदा पुढे झाला, तर त्यांना पुष्कळच डोईजड खर्च करावा लागेल. अशा बिकट परिस्थितीत काय करावे हा एक प्रश्नच आहे. या वादापासून हिंदी मजुरांचा फायदा काहीच होणार नाही. यापुढे मुदतबंद मजुरांची आवक होऊ नये असे म्हणणारे लोक आणि ती चालू राहावी असे म्हणणारे लोक, या दोघांनाही हिंदी लोकांच्या कल्याणाची चिन्ता नाही. हिंदी मजुरांनी आतापेक्षा कमी मजुरी घेतली तर कोणी नको म्हणणार नाही–मग कराराच्या मुदतीनंतर ते परत पाठविले गेले तरी चालेल. दोन्ही बाजूंच्या लोकांना सुख वाटेल. हिंदी समाजाच्या दृष्टीने लाभदायक अशी एकच गोष्ट आहे– आणि ती म्हणजे– मुदतबंद मजुरांची भरती करणे अजिबात थांबले पाहिजे. जर कोणी मजूर आले तर त्यांना या गुलामगिरीच्या परिस्थितीत काहीच फायदा होणार नाही. स्वतंत्र मानव म्हणून या परिस्थितीत त्यांना राहता येणार नाही. मुदतबंद मजुरांच्या यातनांमुळे समस्त हिंदी समाज क्षुब्ध झाला आहे, हे पाहून आम्हांस संतोष वाटतो. हे जागृतीचे चिन्ह आहे. आपण जर एक पाऊल पुढे टाकले आणि

त्यांची आवक बंद पाडली तर हिंदी लोकांची गुलामगिरी नष्ट होईल. आणि जे हिंदी लोक दक्षिण आफ्रिकेत पूर्वीपासून आहेत त्यांना काही सुखसोय मिळेल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २०–७–१९०७

८०. नाताळ इंडियन काँग्रेसमधील भाषण[1]

दर्बान,
ता. २० जुलै १९०७

गेल्या १३ वर्षांत जेवढे लढे झाले, त्या सर्वांत सध्याचा लढा हा अत्यंत आणीबाणीचा आहे. तेव्हा त्याचे परिणामही तितकेच महत्त्वाचे असणार. या कायद्याचा परिणाम सर्व द. आफ्रिकेमध्ये एकसारखा भोगावा लागेल. केवळ ऱ्होडेशिया व जर्मन (पूर्व) आफ्रिका यांच्यावरच त्याचे परिणाम होतील असे नाही, तर हिंदुस्थानावरही त्याचे अनिष्ट परिणाम होतीलच होतील. नाताळमधील हिंदी लोकांनी याकडे लक्ष पुरविणे विशेष अगत्याचे आहे (यावेळी, १८ मे व ६ जुलैच्या 'इंडियन ओपिनियन'-मधील काही उदाहरणे सांगितली गेली) " हिंदी नोकर ठीक आहेत, पण स्वतंत्र हिंदी माणूस आम्हांला नको आहे. "—हे गोऱ्यांचे म्हणणे आहे. शिवाय खोट्या-बरोबर खऱ्या लोकांनाही हाल भोगावे लागतात. मला एका गरीब माणसाची आठवण होते. पोरबंदरचा मि. हासिन याची वडिलोपार्जित १०० रु. ची जमीन लुबाडली गेली होती. तो मुंबईस माझ्याकडे आला, १०० रु. ची जमीन मिळविण्यासाठी ५०० रु.-वर पाणी सोडू नकोस असा सल्ला मी त्याला दिला. तेव्हा त्याने उत्तर दिले, " ती माझी वडिलोपार्जित जमीन आहे, काहीही करून ती मी परत मिळवीन. माझे खरेदीखत मी खोटे होऊ देणार नाही. " पण ट्रान्सवॉलमध्ये माणसासाठी पट्टा दिला जातो. आपल्याजवळ असलेला पट्टा काढून घेऊन सरकार आपल्या लहरीप्रमाणे दुसरा पट्टा देऊ इच्छिते. शिवाय असा पट्टा किंवा परवाना देताना सरकार हिंदी माणसाला,

1. नाताळ इंडियन काँग्रेसची सर्वसाधारण सभा शनिवारी मि. दाऊद महंमद यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. तीत गांधीजी आशियावासियांच्या कायद्याच्या भावार्थावर बोलले.

नाटकात[1] आपण पाहिल्याप्रमाणे, त्याच्या आईचे, बापाचे, बायकोचे आणि इतरांचे नाव विचारते आणि प्रथम दहा बोटांचे आणि नंतर आठ बोटांचे ठसे मागते. ते मिळाल्यानंतर, आम्हांला वाटेल तर व वाटेल तसे परवाने आम्ही देऊ असे सरकार म्हणते. अशी गुलामगिरी कोण मान्य करील ?

३ किंवा ४ पौंड कमावणारा माणूस थोड्याशा श्रमाने कोठेही पोट भरू शकेल. एवढ्या थोड्या कमाईसाठी त्याने ट्रान्सवॉलमध्ये राहून आपल्याला कमीपणा का आणावा ? शिवाय, ४०० पौंड कमावणारा माणूस पैशापेक्षा प्रतिष्ठेवर अधिक प्रेम करतो. गरीब व श्रीमंत हे एक वेळ आपले कान झाकून घेऊन आपला अपमान सहन करतील. पण, ८ किंवा १० वर्षांच्या आपल्या मुलाचा छळ ते सहन करणार नाहीत. डच लोक शूर आहेत. आणि त्यांना आपण प्रतिकार करू शकणार नाही. पण ते जर अन्याय्य हुकुमाला मान देऊन गुलाम बना असे म्हणतील, तर आपण त्यांना प्रतिकार करू. ते आपल्याला खोटे नाणे मानतात, पण आपले नाणे खरे असल्याचे सिद्ध करून दाखविण्याची संधी सध्या आलेली आहे. या कसोटीस आपण उतरलो तर जगाच्या सर्व प्रदेशातील हिंदी लोकांना त्याचा फायदा मिळेल.

सुप्रसिद्ध गोष्टीमध्ये सांगितलेल्या माकडापासून मांजरांना जितका न्याय मिळाला तितकाच हिंदुस्थानला सध्या मिळत आहे. हिंदु व मुसलमान या दोन मांजरांना एक-मेकांविरुद्ध भांडत ठेवून सरकार आपले काम साधू पाहाते, पण येथे तसे नाही. येथे दोन्ही जमातींमध्ये ऐक्य आहे आणि म्हणून आपले साहस सफल होईल. या सर्व गोष्टींचा विचार करून मी सप्टेंबरमधील सार्वजनिक सभेत तुरुंगात जाण्याचा सल्ला दिला.[2] तेथे हजर असलेल्या सर्वांनी हात वर केले आणि ईश्वराला साक्ष ठेवून तुरुंगात जाण्याची शपथ गंभीरपणे घेतली. त्यानंतर काय घडले ते सर्वांना माहीत आहे. आता जर आपण आपल्या प्रतिज्ञेचे पालन केले नाही, तर आपण ईश्वराशी प्रतारणा केल्यासारखे होईल. शिवाय, नवे कायदे एकामागून एक पसार होतील, लोक आपल्याला भित्रे म्हणतील; मग आपल्याला फक्त कुत्र्याचे जिणे जगावे लागेल.

एकदा एका गोऱ्या बाईने मला विचारले, "लाथा खाण्याची सवय असलेल्या फेरीवाल्याला मानापमानाची कल्पना काय असणार ?" मी उत्तर दिले, "एकदा त्याला हा अपमान आहे हे कळले म्हणजे तो स्वतःची नोंदणी करून घेणार नाही—मग त्यामुळे मृत्यू पत्करावा लागला तरी चालेल." त्या बाईने आपली खात्री करून घेण्यासाठी आपल्या दाराशी येणाऱ्या फेरीवाल्यांना विचारून पाहिले, तुम्ही नवी नोंदणी करून घेणार का ? तिला प्रत्येक वेळी नकारच मिळाला. त्यामुळे तिला कळून चुकले की, हिंदी लोकांच्या अंगी धैर्य उत्पन्न झाले आहे आणि म्हणून ती आता म्हणते, हिंदी लोक

१. डर्बान येथील व्हिक्टोरिया इंडियन थिएटरमध्ये १३ जुलै १९०७ रोजी झालेले प्रहसन.
२. पाहा : खंड ५ (प्रकरण ४४१).

तुरुंगात गेले तर त्यांच्या प्रकृतीची चौकशी मी करीन आणि शक्य ती सुखसोय मी त्यांना मिळवून देईन.

सारे हिंदी लोक तुरुंगात गेले तर सरकार त्यांच्यावर बोटही उगारू शकणार नाही, असे मि. होस्केन म्हणतात. यावरून आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, आपण जर आपल्या प्रतिज्ञेचे पालन केले तर आपल्यापुढे उज्ज्वल भविष्यकाल ठेवलेला आहे. सध्या आपला लौकिक केवळ गडबड करून तक्रार करण्याचा आहे. त्यामुळे प्रवेशाच्या कायद्याविरुद्ध आपण केलेला अर्ज कचऱ्याच्या टोपलीत टाकला जातो; मी या साऱ्या गोष्टी आपल्याला सांगत आहे याचे कारण इतकेच की, आपण यापासून धडा घ्यावा आणि सज्ज असावे. (नाताळमधील) तुम्ही लोक आणि (ट्रान्सवॉलमधील) आम्ही लोक हे एकच आहोत. तेव्हा तुम्ही आमच्या कष्टामध्ये सहभागी झालात तर त्यात विशेष काही नाही. केवळ शब्दांनी, म्हणजे ठराव मंजूर करून व पत्रे पाठवून, आपण आम्हांला मदत केली तर ती पुरेशी नाही. मी आपल्याकडे जी भीक मागावयास आलो आहे ती तुम्ही दिली तर ती फार मोलाची होईल. ट्रान्सवॉलमधील सारे हिंदी लोक या लढ्यात सर्वस्वाची हानी सोसण्यास तयार झाले असताना तुम्ही आर्थिक मदत देण्याच्या कामी मागे राहाता कामा नये. अशी मदत देणे म्हणजे खरोखर तुम्ही फार मोठे काम करत आहात असे नाही. तुम्ही केवळ आपल्या कर्तव्याचे पालन कराल. पुष्कळ लोक तुरुंगात गेले तर, मागे राहणाऱ्यांचा संभाळ तुम्हांला करावा लागेल. म्हणून विकट परिस्थितीला तोंड देण्याची अवश्य ती तयारी तुम्ही केली पाहिजे. मला खात्री आहे की, तुम्ही मदत कराल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २७–७–१९०७

८१. ट्रान्सवॉल विधान-परिषदेला अर्ज[१]

जोहान्सबर्ग,
ता. २२ जुलै १९०७

ट्रान्सवॉल विधान परिषदेचे

माननीय अध्यक्ष व सभासद यांस—

ट्रान्सवॉलच्या ब्रिटिश इंडियन असोसिएशनचे हंगामी अध्यक्ष या नात्याने इसाप इस्माइलमिया यांनी केलेला अर्ज—

नम्रपणे निवेदन करतो की,

(१) अर्जदार हा ट्रान्सवॉलच्या ब्रि. इं. असोसिएशनचा हंगामी अध्यक्ष आहे.

(२) या वसाहतीत प्रवेश करू पाहणाऱ्या प्रवेशकांवर नियंत्रण घालणारे व प्रतिबंधित प्रवेशकांना व इतरांना देशाबाहेर घालविण्याची आणि "प्रवेश खाते" स्थापन करून ते चालविण्याची तरतूद करणारे जे बिल आपल्या विधानपरिषदेपुढे विचारार्थ आज ना उद्या येणार आहे, त्यासंबंधी वरील असोसिएशन आपल्याकडे आदरपूर्वक दाद मागण्यासाठी येत आहे.

(अ) या बिलाने आशियावासी कायदा-दुरुस्तीचा कायदा कायम केला जाणार आहे.

(ब) हे बिल हिंदुस्थानातील प्रमुख भाषांपैकी कोणत्याही भाषेला मान्यता देत नाही.

(क) गेल्या युद्धापूर्वी ज्या हिंदी लोकांनी ट्रान्सवॉलमध्ये स्थायिक होण्याच्या हक्कासाठी ३ पौंड भरले आणि ज्या निर्वासितांना शांतता-संरक्षक वटहुकुमाप्रमाणे परवाने मिळाले नाहीत, त्यांचे हक्क या बिलाने बाजूस सारले आहेत.

(ड) बिलाच्या दुसऱ्या कलमाच्या पोटकलम 'ड' प्रमाणे, शैक्षणिक कसोटीस उतरणारे व अन्यथा प्रतिबंधित नसणारे जे हिंदी लोक त्यांनाही आशियावासी कायदा दुरुस्ती कायद्याच्या अमलाखाली हे बिल आणते.

१. याची एक प्रत एल. डब्ल्यू. रिच यांनी उपवसाहत-मंत्र्याकडे १४ आगस्ट रोजी धाडली. ती "वसाहत-मंत्र्याला अर्ज" या सोबतच पाठविली होती. प्रकरण १४०.

(शैक्षणिक पात्रता असलेल्या हिंदी लोकांना आणखी काही ओळखीच्या खुणा पटविण्याची गरज लागत नाही, असे आमचे सादर निवेदन आहे.)

(४) वर नमूद केलेले आक्षेप आपल्या सभागृहाने विचारात घेण्याजोगे आहेत असे या अर्जदार असोसिएशनचे नम्र मत आहे.

(५) या वसाहतीच्या पार्लमेंटमध्ये ज्यांना प्रतिनिधित्व नाही अशा जमातींच्या हितसंबंधांचे संरक्षण करणे हे या सभागृहाचे विशेष कर्तव्य आहे, याची आदरपूर्वक आठवण ही अर्जदार असोसिएशन करून देत आहे. ही असोसिएशन अशा एका जमातीची प्रतिनिधी आहे.

(६) म्हणून या अर्जदार असोसिएशनची सादर प्रार्थना अशी आहे की, या विधानपरिषदेने योग्य ती दाद द्यावी. त्यांच्या या कृत्याबद्दल आम्ही निरंतर ऋणी राहू.

आपला
इसाप इस्माइलमिया
हंगामी अध्यक्ष
ब्रिटिश इंडियन असोसिएशन

वसाहत-कचेरी-दप्तर
सी. ओ. २९१ । १२२

८२. नाताळ विधानसभेस अर्ज

दर्बान,
ता. २५ जुलै १९०७

नाताळच्या विधानसभेचे
माननीय अध्यक्ष व सभासद,

पीटर मॅरित्सबर्ग, यांस

नाताळ इंडियन कॉंग्रेसचे अध्यक्ष व संयुक्त चिटणीस यांचा अर्ज-
नम्रपणे निवेदन करतो की,

(१) अर्जदार हे नाताळ इंडियन कॉंग्रेसचे अध्यक्ष व संयुक्त चिटणीस म्हणून त्या संस्थेचे प्रतिनिधित्व करीत आहेत.

(२) गेल्या २५ जूनच्या सरकारी गॅझेटमध्ये जमिनीवर कर बसविण्यासंबंधी जे बिल प्रसिद्ध झाले आहे, ते आपल्या अर्जदारांनी वाचलेले आहे.

(३) त्या बिलासंबंधी दाद लावण्यासाठी अर्जदार या सभागृहाकडे येत आहेत आणि कराच्या प्रमाणाबाबत युरोपियन व हिंदी कुळांमध्ये जो पंक्तिप्रपंच या बिलाने केलेला आहे त्याचा निषेध करीत आहोत.

(४) अर्जदारांचे नम्र मत असे आहे की, या पंक्तिप्रपंचामुळे हिंदी लोकांवर निष्कारण आपत्ती येणार आहे आणि या वंशमूलक भेदभावामुळे त्यांचा उपमर्द होणार आहे.

(५) म्हणून अर्जदारांची नम्र प्रार्थना अशी आहे की, आपली विधानसभा वरील आपत्ती दूर करणारी दुरुस्ती या बिलांत करील. या न्याय्य व सदय कृत्याबद्दल आपले अर्जदार कर्तव्यबुद्धीने सदैव ऋणी राहातील.

नाताळ पुराणवस्तु–संग्रहालय,
पीटर मॅरित्सबर्ग,
विधान सभेची मते व कामकाज, १९०७

दाऊद महंमद
दादा उस्मान
एम्. सी. अंगलिया

८३. परवाना-कचेरीवरील बहिष्काराबाबत भित्ति-पत्र[1]

[प्रिटोरिया, ता. २६ जुलै १९०७ पूर्वी]

परवाना कचेरीवर बहिष्कार घाला ! बहिष्कार घाला !

तुरुंगात जाऊन आपण प्रतिकार करीत नाही, तर स्वाभिमान व सार्वजनिक हित यासाठी क्लेश भोगतो.

राजनिष्ठेसाठी राजांच्या राजाची निष्ठा अवश्य आहे.

हिंदी लोकहो, स्वतंत्र व्हा !

इंडियन ओपिनियन, २७–७–१९०७

१. सविनय प्रतिकाराच्या चळवळीत प्रिटोरियामध्ये अशा आशयाची भित्ति-पत्रके लागली होती. सरकारने ती प्रमुख स्थानांपासून काढून टाकली व ती कोणी लिहिली याचा शोध चालविला. त्यांची जबाबदारी गांधीजींनी स्वीकारली. पुढील लेख पाहा.

८४. प्रिटोरियातील लढा[1]

जोहान्सबर्ग,
शुक्रवारी दुपारी दोन वाजता
[ता. २६ जुलै १९०७]

हाती आलेल्या अगदी ताज्या बातमीवरून असे दिसते की, आतापर्यंत परवाना-कचेरीकडे नोंदणीसाठी एकही अर्ज गेलेला नाही. तथापि अफवा अशी आहे की, परवाना-अधिकाऱ्यांनी रात्री खाजगी जागेत अर्ज स्वीकारण्यास सुरुवात केली आहे.

गुरुवारी दुपारी हिंदी लोकांची एक सभा भरली होती. तीत असे सांगण्यात आले की, या कायद्याला मान्यता न देण्यासाठी लोकांचे मन वळविण्याचे सारे कायदेशीर उपाय योजिले जातील, तरी प्रत्येकाला आपल्या इच्छेप्रमाणे वागण्यास स्वातंत्र्य आहे. रात्रीच्या वेळी खासगी जागेत अर्ज देणे हे लोकांना लांछनास्पद आहे आणि ते स्वीकारणे अधिकाऱ्यांना तसेच आहे. सभेस हजर असलेले लोक तुरुंगात जाण्याच्या मुद्द्यावर खंबीर आहेत आणि अत्यंत उत्साहाने काम करीत आहेत.

बहिष्काराचा पुरस्कार करणारी भित्ति-पत्रे[2] शहरातील प्रमुख-स्थानातून सरकारने काढून घेतली आहेत. परवाना कचेरीच्या दारावर लावलेल्या भित्ति-पत्राने खूप गंमत झाली. त्याचा कर्ता कोण याची चौकशी सरकारने सुरू केली, तेव्हा श्री. गांधी यांनी त्याची सारी जबाबदारी आपल्यावर घेतली.

३१ तारखेला सार्वजनिक सभा होईल. सारे उद्योगधंदे बंद राहातील, सूचना पाठविल्या आहेत. हरताळासाठी एक वजनदार समिती नेमली आहे. पूर्वी जाहीर केल्याप्रमाणे दुकाने चार दिवस बंद ठेवावयाची नाहीत. नोंदणीची कालमर्यादा जसजशी संपत आहे, तसतशी परिस्थितीची तीव्रता क्षणाक्षणाला वाढत आहे. या महिना-अखेरीपूर्वी महत्त्वाच्या घटना घडण्याचा संभव आहे.

दर्बान येथील आमच्या हितचिंतक मित्रांकडून प्रोत्साहन व साहाय्य देणाऱ्या तारांच्या राशींच्या राशी आमच्याकडे आलेल्या आहेत.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २७–७–१९०७

१. "खास तारेने ताजी बातमी" या नावाने हे प्रसिद्ध झाले होते.
२. मागील लेख पाहा.

८५. “ मानवजातीला धक्का ”.

बलाढ्य साम्राज्याशी विषम परिस्थितीत लढा देऊन मरहूम प्रेसिडेंट क्रूगर[१] यांनी ‘ मानवजातीला चकित केले ’ असे म्हणतात. त्यांच्या ताब्यात पूर्वी असलेला देश आता ब्रिटिशांच्या अंमलाखाली नाममात्र आहे. त्या या ट्रान्सवॉलमध्ये हिंदी लोकांच्या द्वारे इतिहासाची पुनरावृत्ती होत आहे. पण ही तुलना पूर्णपणे बरोबर नाही. माजी प्रेसिडेंट रक्तपाताचे युद्ध लढले. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक रक्ताचा एकही बिंदु न सांडून मानवजातीला विस्मयाचा धक्का देतील. अनादराची भावना प्रकट न करता आम्ही असे म्हणू शकतो की, माजी प्रेसिडेंटापेक्षा हिंदी लोक अधिक कर्तबगारी दाखविणार आहेत. केवळ आपल्या प्रतिष्ठेसाठी, काहींच्या दृष्टीने केवळ एका भावनेसाठी, ते आपल्या सर्वस्वाचा होम करण्याची तयारी करीत आहेत. (बायबलातील कथेप्रमाणे) एका विधवेच्या अल्प दानासारखे त्यांचे कृत्य परम पवित्र ठरेल.

हिंदी लोकांना त्यांचे पुष्कळ मित्र सांगत असतात की, स्थानिक सरकारने, काहीही करून, आशियावासी कायदा अमलात आणण्याचा निश्चय केला आहे आणि तुम्हांला जी भयानक संकटे येतील असे वाटत होते ती सर्व तुमच्या वाट्यास येण्याचा संभव आहे. याला हिंदी लोक उत्तर देतात, आम्ही साऱ्या प्रसंगाला तोंड देण्यास तयार आहो. त्यांना तुम्ही तुरुंगात पाठविणार ? ते त्याला तयार आहेत. त्यांना सक्तीने हद्दपार करणार ? त्यालाही ते तयार आहेत. गुन्हेगारीचा शिक्का घेऊन आणि ईश्वराशी द्रोह करून येथे जिवंत राहण्यापेक्षा प्रत्यक्ष मरण पत्करणेही त्यांना बरे वाटते.

हिंदी लोकांची कदाचित दिशाभूल झाली असेल आणि त्यांचे कार्य मूलतः कदाचित बरोबर नसेलही. असे असेल तर, आम्ही वर तुलना केलेले उदाहरण देऊन ते म्हणतात, ब्रिटिश सरकारचा धिक्कार करण्यात मरहूम प्रेसिडेंट क्रूगर यांचे धोरण चुकीचे होते असे काही लोकांना वाटते. तथापि प्रत्येकजण त्यांच्या नीतिधैर्याचा गौरव करीत असतो. स्वतःला रास्त वाटणाऱ्या कार्यासाठी ते लढले हे पुरेसे आहे; पण (बायबलच्या) जुन्या करारातून स्फूर्ती घेऊन आणि त्या पवित्र ग्रंथातील शूर–वीरांचा कित्ता डोळ्यांपुढे ठेवून ते लढले. आता, प्रामाणिकपणे जीवन घालविण्यासाठी जे हिंदी लोक या देशात आले; पण ज्यांच्यासमोर नागरीक व सामाजिक विनाश आ वासून

१. (१८२५–१९०४). ट्रान्सवॉलचे अध्यक्ष, १८८३–१९००

उभा आहे, ते "नव्या करारापासून" स्फूर्ती घेऊन लढत आहेत. सर्व जगातील श्रेष्ठतम सविनय प्रतिकारक असा करुणावतार येशू हा त्यांचा आदर्श आहे. मग ट्रान्सवॉलच्या राज्यकर्त्यांनी त्यांचे ठराव फेटाळून लावले किंवा त्यांचे सार्वभौम अधिपती राजे एडवर्ड यांनी, गझनीच्या महंमदाप्रमाणे,[1] "तुमचे संरक्षण करण्यास मी असमर्थ आहे" असे जाहीर केले, तरी त्याची त्यांना काय पर्वा? येशू धिक्कारला गेला नव्हता काय? त्याच्या छळवाद्यांच्या दृष्टीने, चोर-दरोडेखोरांबरोबरचा लज्जास्पद मृत्यु पत्करण्याचे भय समोर उभे असतानाही ईश्वराची निंदा करण्याचा आदेश येशूने झिडकारला नाही काय? परंतु येशूच्या त्या रक्तांकित मस्तकावर असलेला कांट्यांचा मुकुट हा आज कोणाही सम्राटाच्या उत्तमोत्तम हिऱ्यांनी जडलेल्या मुकुटापेक्षा अधिक शोभा देत आहे. येशू तर मेला; पण ईश्वराच्या साऱ्या खऱ्या पुत्रांच्या स्मृतीमध्ये तो जीवंत आहे आणि त्याच्याबरोबर, त्या नम्र नाझारेथवासी येशूचा व त्याच्या उपदेशाचा स्वीकार करणारे चोरही, अजरामर झाले आहेत.

ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक ईश्वराशी एकनिष्ठ राहतील तर, ते आपल्या मुलांच्या, स्वदेशबांधवांच्या आठवणीत कायमचे राहतील. आणि या क्षणभंगुर मृत्युलोकाचा त्यांनी त्याग केल्यानंतर त्यांचे वंशज असे म्हणू शकतील की, "आमच्या वाडवडिलांनी "भाकरीच्या चतकोरासाठी" आमचा विश्वासघात केला नाही."

इंडियन ओपिनियन, २७-७-१९०७

८६. श्री. पारसी रुस्तुमजींचे औदार्य

मि. रुस्तुमजी[2] यांचे नाव दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या घरोघर झाले आहे. त्यांनी आम्हांला विशेष महत्त्वाचे एक पत्र पाठविले आहे. त्या गुजराती पत्राचा अनुवाद आम्ही पुढे देत आहो :

"ट्रान्सवॉलमधील आपल्या देशबांधवांच्या परिस्थितीविषयी मी माझ्या भावना वारंवार जाहीरपणे प्रकट केलेल्या असल्या तरी, आपल्या वृत्तपत्राच्या द्वारे त्या व्यक्त करण्यास आपण मला संधी द्यावी. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनी जो लढा सुरू

१. गझनीच्या सिंहासनावर ९९७ साली आल्यापासून याने हिंदुस्थानावर १७ स्वाऱ्या केल्या. पण त्याचे विजय सुस्थिर झाले नाहीत. पाहा, खंड ३ (प्रकरण २७८).

२. नाताळमधील एक प्रमुख हिंदी व्यापारी. पाहा, खंड १, कॉपी ३३४.

केलेला आहे, त्याचे फल दक्षिण आफ्रिकेतील प्रत्येक हिंदी माणसाला चाखावयास मिळेल. त्या देशाच्या बाहेर राहणाऱ्या आमच्यासारख्या लोकांना त्यांच्या शारीरिक क्लेशामध्ये भाग घेता येणार नाही. त्यांना तुरुंगातील यातनामय जीवन सोसावे लागेल; एवढेच नव्हे तर त्यांच्यापैकी पुष्कळांना आपले सर्वस्वही गमवावे लागेल. आम्ही तुरुंगात जाऊ शकत नसलो तरी सार्वजनिक कल्याणासाठी आपल्या जिंदगीचा त्याग करण्याचे त्यांचे उदात्त उदाहरण आम्ही अनुसरले पाहिजे. म्हणून, पूर्ण नम्रतेने आणि देवाचे नाव घेऊन, मी ट्रान्सवॉलमधील माझ्या देशबांधवांना कळवितो की, तुमच्या दुःखाचा वाटा उचलण्याची मला तीव्र तळमळ आहे, याची साक्ष म्हणून यापुढे, हा लढा चालू आहे तोपर्यंत, या जगातील माझी सारी मालमत्ता, ट्रान्सवॉल-मधील माझ्या देशबांधवांच्या हितार्थ, एक विश्वस्त म्हणून मी धारण करीन. ट्रान्सवॉल-मधील हिंदी लोकांना असे आर्थिक साहाय्य कर्तव्यबुद्धीने करण्यास तयार असलेले माझे मित्र दक्षिण आफ्रिकेत पुष्कळ आहेत, याविषयी मला शंका नाही. खरोखर, प्रिटोरियामुळे आमची अंतःकरणे आशेने भरून गेली आहेत. तेथील आमचे देश-बांधव ट्रान्सवॉलमधील अन्य भागात राहणाऱ्या देशबांधवांप्रमाणे आपला निश्चय तडीस नेतील असा आम्हांला विश्वास वाटतो."

या पत्रावरून साऱ्या गोष्टी स्पष्ट होतात. त्यावर आम्ही एवढाच खुलासा करू इच्छितो की, ज्यांना श्री. रुस्तुमजी यांची ओळख आहे त्यांना या अभिवचनाच्या पोटात किती अर्थ भरलेला आहे हे कळून येईल. या पत्रामुळे प्रत्येक हिंदी माणसाचे हृदय नव्या दमाने व नव्या जोमाने भरून येईल.

इंडियन ओपिनियन, २७–७–१९०७

८७. मि. आदमजी मियाँखाँ यांचा मृत्यु[१]

डर्बान येथील गुलाम हुसेन मियाँखाँ आणि कंपनी या पेढीचे मालक आणि नाताळ इंडियन काँग्रेसचे उपाध्यक्ष मि. आदमजी मियाँखाँ या महिन्याच्या २० तारखेस हिंदुस्थानामध्ये अहमदाबाद येथे मृत्यू पावले. त्या वेळी त्यांचे वय ४१ म्हणजे फारच कमी होते. गेल्या फेब्रुवारीत मि. आदमजी हिंदुस्थानला भेट देण्यास गेले

१. पुढील लेखही पाहा.

आणि दर्बानमधील त्यांच्या बंधूंना नियमित पत्रे येत असत आणि त्यांना विशेष आजार झाल्याची तक्रार नसे.

नाताळमधील हिंदी समाजाची अत्यंत महान सेवा मि. आदमजी यांनी केली आहे. त्यांच्या कल्याणासाठी सर्व बाबतींत त्यांनी खुबीने व समर्थपणे जी मदत दिली, ती यापुढे मिळणार नाही. गुजरातच्या राजधानीत जरीच्या व्यापाऱ्यांच्या सुप्रसिद्ध घराण्यात त्यांचा जन्म झाला होता. ते १८ वर्षांचे होते तेव्हा आपले वडील आणि मि. गुलाम हुसेन हे बंधु यांच्यासह ते १८८४ मध्ये दक्षिण आफ्रिकेत आले. त्यांना इंग्रजीचे ज्ञान चांगले होते, त्यामुळे हिंदी लोकांप्रमाणेच पुष्कळ अमेरिकन मित्रावरही त्यांना छाप पाडता आली; परंतु हिंदी लोकांच्या सार्वजनिक कार्याशी त्यांचा निकटचा संबंध १८९६ पर्यंत आला नाही. काँग्रेसच्या सेक्रेटरींनी आपले पद तात्पुरते सोडल्यामुळे मि. आदमजी यांची काँग्रेसचे सन्मान्य सेक्रेटरी म्हणून एकमताने निवड झाली. त्याला कारण त्यांनी केलेले कार्य आणि त्यांच्या अंगचे थोर गुण. त्या पदावर असताना त्यांना मि. अब्दुल करीम हाजी आदम जव्हेरी यांनी पुष्कळ मदत केली. काँग्रेसजवळ १०० पौंडांची शिल्लक होती. ती मि. आदमजी यांनी ११०० पौंडांवर नेली. १८९६ च्या अखेरच्या दिवसांत व १८९७ च्या आरंभी, दर्बान येथे हिंदी-विरोधी जे विख्यात निदर्शन झाले, तेव्हा हिंदी समाजापुढील बिकट प्रश्न सोडविण्याच्या कामी, मि. आदमजी यांनी धिमेपणाने, शांतपणाने व चिकाटीने पुष्कळ साहाय्य केले.

इंडियन ओपिनियन, २७–७–१९०७

८८. आदमजी मियाँखाँ यांचा शोचनीय मृत्यु

ईश्वराची लीला अगाध आहे. पांचच महिन्यांपूर्वी आमचे सुप्रसिद्ध नेते मि. आदमजी मियाँखाँ हिंदुस्थानाला परत गेले होते. ते २० दिवस आजारी होते आणि त्यामुळे त्यांच्या पाठीला फोड आले होते. अखेर ता. २३ रोजी[1] अहमदाबाद येथे त्यांचा आकस्मिक रीत्या अन्त झाल्याची बातमी आली आहे. नाताळातील व दक्षिण आफ्रिकेच्या इतर भागातील त्यांच्या कार्याची माहिती ज्यांना आहे, त्यांना या दुःखदायक बातमीमुळे हळहळ वाटल्याशिवाय राहणार नाही. दक्षिण आफ्रिकेमध्ये

१. मागील लेखात २० तारीख आहे, त्याशी हे विसंगत आहे.

असा काळ हळूहळू येत आहे की, जेव्हा देशभक्त कार्यकर्त्यांची गरज मोठ्या प्रमाणात लागेल. अशा वेळीं मि. आदमजी मियाँखाँ यांच्यासारख्या कर्तृत्ववान व विवेकी नेत्याचा अकाली मृत्यु झाल्याने जी हानी झाली आहे, ती भरून येणे कठीण. त्यांची देशभक्ती आणि त्यांच्या चारित्र्याचे इतर अमूल्य पैलू सुप्रसिद्ध आहेत. कॉंग्रेसचे हंगामी चिटणीस असताना आणि त्यानंतर सार्वजनिक कार्य करीत असताना त्यांनी जी बुद्धिमत्ता, धिमेपणा, ग्रहणशक्ती व स्वार्थत्यागाची तयारी दाखविली, ते त्यांचे चारित्र्य-गुण अनुकरणीय आहेत. ते येथून गेले तेव्हा त्यांच्या निरोप-समारंभाच्या वेळी त्यांची लोकप्रियता दिसून आली. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या हालअपेष्टांविरुद्ध मोहीम काढण्याची मनीषा हिंदुस्थानात असतानाच त्यांनी धरली होती. अशा परोपकारी सज्जन माणसाचा अन्त ४१ च्या अल्पवयात झाला यामुळे दुःख होणे स्वाभाविक आहे. त्या दिवंगत नेत्याच्या कुटुंबाचे आम्ही सांत्वन करतो आणि त्यांच्या थोर गुणांचे अनुकरण करण्यास त्यांच्या चाहत्यांना आग्रहाने सांगतो.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २७-७-१९०७.

८९. दैवी कायदा

या आक्षेपार्ह कायद्याचे बळ अजमावण्याची वेळ जवळ जवळ येत आहे. ता. १ ऑगस्ट रोजी सरकार काय करीत आहे याची वाट सारे हिंदी लोक आतुरतेने पाहात आहेत. पण खरे सांगायचे तर, आपण धीर धरून वाट पाहिली पाहिजे— काळजी करून नव्हे. या तिरस्कृत कायद्यापासून स्वतःला वाचविण्यासाठी आपण जे जे दुःख सहन करू, ते सुख मानले पाहिजे. प्रत्येक हिंदी माणसाने अशी प्रार्थना करावी, "मला तुरुंगात प्रथम जाऊ द्या, म्हणजे माझ्या बांधवांचे क्लेश वाचतील."

या तिरस्कृत कायद्याला आपण मान्यता का देऊ नये याची नाना कारणे आम्ही यापूर्वीच दिलेली आहेत. हा खुनी कायदा अव्हेरण्याने आपण दैवी कायदा पाळतो हे लक्षात घेतले पाहिजे. अन्याय्य कायदा मानणे हे पाप आहे. तसेच दैवी कायद्याचे उल्लंघन करणे हेही पाप आहे. जो दैवी कायदा पाळतो त्याला इहलोकी व परलोकी सुख मिळेल. हा दैवी कायदा कोणता? तो म्हणजे सुख भोगण्याआधी दुःख भोगावे आणि

सर्वांच्या कल्याणात स्वतःचे कल्याण मानावे. याचाच अर्थ असा की, दुसऱ्यासाठी आपण दुःख भोगावे, मृत्यु पत्करावा. याची आपण काही उदाहरणे घेऊ.

जेव्हा मातीचे एखादे ढेकूळ आपण फोडतो आणि त्याची माती होते, तेव्हा ती माती पाण्यात मिसळते व वनस्पतींना पोसते. या वनस्पती स्वतःच्या त्यागाने प्राणि-सृष्टीचे पोषण करतात, प्राणी आपल्या वंशजांसाठी स्वतःच्या सुखाचा त्याग करतात. मुलाच्या जन्माच्या वेळी माता असह्य दुःख सहन करते, पण त्या दुःखातच सुख मानते. मुलाचे संगोपन करताना आईबाप किती तरी क्लेश सोसतात! आणि जेव्हा समाज व राष्ट्र निर्माण होतात तेव्हा, माणसे सार्वजनिक कल्याणासाठी संकटे सोसत असतात. इ. स. पूर्व सहाव्या शतकात, भगवान बुद्ध यांनी रानावनात हिंडून व उन्हातान्हाची पर्वा न करता, नाना आपत्ती सोसून आत्मसाक्षात्कार करून घेतला, आणि आत्मिक सुखाचा संदेश सर्व जनतेत फैलावला. १९०० वर्षांपूर्वी, येशू ख्रिस्ताने जनतेसाठी आपले जीवन समर्पित केले आणि कैक अपमान व उपद्रव सोसले, अशी ख्रिस्ती लोकांची श्रद्धा आहे. महंमद पैगंबरांनीही पुष्कळच दुःख सोसले. त्यांच्या प्राणावर काही लोक उठले होते. पण त्याची त्यांनी पर्वा केली नाही. या महान् व पवित्र लोकांनी वर सांगितलेला दैवी कायदा पाळला आणि मानवजातीला सौख्य दिले. त्यांनी आपल्या वैयक्तिक हिताचा विचारच केला नाही. "पराविया सुखे सुख" त्यांनी संपादन केले.

राजकारणातही असेच घडते. हॅम्डन, टायलर, क्रॉमवेल इत्यादी इंग्रज, लोकांसाठी आपल्या सर्वस्वाचा होम करण्यास सिद्ध होते आणि त्यांची सर्व मालमत्ता लुटली गेली तरी त्यांनी त्याची चिंता केली नाही. त्यांच्या जीविताला धोका उत्पन्न झाला तरी त्याची पर्वा केली नाही. इंग्रज लोक अफाट साम्राज्यावर आज राज्य करीत आहेत त्याचे कारण हे आहे. ट्रान्सवॉलचे राज्यकर्ते आज सत्ता उपभोगीत आहेत, याचेही कारण त्यांनी पुष्कळ हाल भोगले; आणि हे आपण पाहिले आहे. स्वदेशासाठी मॅझिनीने हद्दपारी सोसली. आज तो आदराचा विषय बनला आहे, इटालीच्या ऐक्याचा जनक मानला जात आहे. जॉर्ज वॉशिंग्टन यांनी अनंत आपदा भोगून आज डिमणारी अमेरिका निर्माण केली. यावरूनही हेच दिसते की, सुखाचा उपभोग घेण्यापूर्वी प्रत्येकाला दुःख सोसावे लागते. सार्वजनिक कल्याणासाठी माणसांनी कष्ट सहन केले पाहिजेत; प्रत्यक्ष मृत्यूलाही तोंड दिले पाहिजे.

आपण आणखी पुढे जाऊ. आपण आपल्या प्रतिज्ञेचा भंग करणे, आणि ईश्वराने आपल्याला दिलेल्या पुरुषार्थाशी द्रोह करणे हे पाप आहे. यूसुफ आवसलाम हे व्यभिचाराच्या पापापासून अलिप्त राहण्यासाठी तुरुंगात गेले, इमाम हसन व

हुसेन[१] यांनी यजीदची[२] सत्ता मानण्याचे नाकारले. कारण तसे करण्यात अधर्म होता. आपली प्रतिष्ठा संभाळण्यासाठी ते हुतात्मे बनले. आपल्या निष्ठेसाठी भक्त प्रल्हादाने तप्त स्तंभाला कवटाळले आणि बाळ सुधन्व्याने उकळत्या कढईत बिनदिक्कत उडी घेतली. सत्यासाठी हरिश्चंद्राने स्वतःला चांडाळाला विकले; राज्य सोडले, पत्नी व पुत्र यांचा वियोग सोसला. पित्याच्या वचनासाठी रामचंद्रांनी वनवास सोसला आणि आपल्या हक्कासाठी पांडवांनी आपले राज्य सोडून १४ वर्षे रानावनात भटकण्यात घालविली.

या महान दैवी कायद्याचे पालन करण्याची संधी आता ट्रान्सवॉलमधील हिंदी समाजाला लाभलेली आहे, या विचाराने आम्ही आमच्या देशबांधवांचे अभिनंदन करतो. सर्व दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांना आपल्या प्रयत्नाने स्वातंत्र्य मिळालेले पाहण्याची संधी त्यांना मिळालेली आहे. एवढे मोठे सुख, तितकेच मोठे दुःख भोगल्याशिवाय आपल्याला कसे लाभेल? आता आपला अर्ज मानवाकडे नाही, तर प्रत्यक्ष परमेश्वराकडे आहे. तो आपली गाऱ्हाणी रात्रंदिवस ऐकतो. आपला अर्ज ऐकण्यासाठी त्याच्याशी आपल्याला वेळ ठरवून घ्यावी लागत नाही. तो सर्वांचे अर्ज एकाच वेळी ऐकतो. म्हणून आम्ही शुद्ध अंतःकरणाने ईश्वराची प्रार्थना करतो की, ऑगस्टमध्ये ट्रान्सवॉलमधील आमच्या बांधवांच्या शिरावर ज्या काही आपत्ती येतील, त्या केवळ ईश्वरावर श्रद्धा ठेवून आणि केवळ त्याचेच नामस्मरण करून सहन करण्यास त्यांनी सिद्ध असावे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २७-७-१९०७

९०. अलि यांची चूक

या आठवड्यात आलेले मि. रिच यांचे पत्र आणि त्याबरोबरच आलेले न्या. अमीर अली यांना मि. अलि यांनी लिहिलेले पत्र–या दोहोंचाही काळजीपूर्वक विचार

१. महंमद पैगंबरांची मुलगी फातिमा हिचे मुलगे.

२. खलिफा ६८० ते ६८३, हुसेनने त्यांच्या विरुद्ध बंड केले; पण करबल येथील लढाईत त्याचा पराजय होऊन तो मारला गेला.

झाला पाहिजे. ही पत्रे प्रसिद्ध करावीत की नाही, याविषयी आम्ही साशंक होतो. पण विचारांती आम्ही असे ठरविले की, देशहितार्थ आम्ही ती प्रसिद्ध केलीच पाहिजेत. काही व्यक्तींच्या मनावर त्यांचा काय परिणाम होईल, याचा विचार अशा आणी-बाणीच्या वेळी आम्ही करता कामा नये. आपण एकाच गोष्टीचा विचार करावयास हवा आणि तो म्हणजे सर्वांचे कल्याण कशाने होईल हा.

न्या. अमीरअली यांना पत्र लिहिण्यात मि. अलि यांनी घाई केली असे आमचे मत आहे. असे पत्र लिहिणे ही चूक झाली. तुरुंगात जाण्याचा लढा न देण्याविषयी समितीचे पत्र आम्हांला का आले हे आता स्पष्ट झाले. मि. अलींच्या पत्रावरून समितीला वाटले, आमच्यामध्ये मतभेद आहेत. असे मतभेद असले तर, तुरुंगात जाऊन लढा चालविण्याची कल्पना आम्ही सोडून द्यावी असाच उपदेश कोणीही माणूस अपुऱ्या माहितीवरून करील. खरोखर आमच्यामध्ये कोणतेही मतभेद नाहीत आणि म्हणून मि. अलि यांनी न्या. अमीरअली यांना पत्र लिहिण्याचे काहीही कारण नव्हते. शिवाय, जनरल बोथा यांची भेट घेण्यास कोणीही नाराज नव्हते. उलट त्यांना भेटण्यासाठी ब्रिटिश इंडियन असोसिएशनने विश्वप्रयत्न केले, तरीसुद्धा जनरल बोथा यांनी मुलाखत नाकारली. मुलाखत नाकारली म्हणून त्यांना एक अर्ज दाखल करण्यात आला आणि हिंदी समाजाच्या मागण्या पूर्ण करण्याविषयी विनविण्यात आले.

प्रत्येक हिंदी व्यापारी मुसलमान आहे आणि प्रत्येक फेरीवाला हिंदु आहे असे म्हणणे हे विषारी मत आहे, असे आम्हांस वाटते. मि. अलि यांच्या लेखणीतून असे शब्द उतरावे हे हिंदी समाजाला लांछनास्पद आहे, असे आम्ही मानतो. ट्रान्सवॉलच्या लढ्याचा संबंध हिंदु व मुसलमान या दोघांशी सारखाच आहे. दोघांचेही हक्क बुडण्याचा समय आला आहे. या लढ्यात व्यापाऱ्यांनी भाग घेतला नाही तर त्याला काही प्रतिष्ठा राहणार नाही हे विचारांती कळून येण्यासारखे आहे. माणूस जितका प्रतिष्ठित, तितकी त्याची हानी मोठी असा या घातुक कायद्याचा प्रभाव आहे. स्वाभिमानाची भावना ज्याची मोठी, त्याला हा कायदा अधिकच तिरस्कारार्ह वाटला पाहिजे. म्हणून हिंदु-मुसलमानांच्या भेदभावाचा प्रश्न मुळीच उद्भवत नाही. शिवाय दक्षिण आफ्रिके-तील हिंदी लोकांमध्ये या दोन धर्मांच्या अनुयायांचे संबंध अजिबात दुरावलेले नाहीत. सर्वसामान्यपणे सर्वजण सुखासमाधानाने व गुण्यागोविंदाने नांदत आहेत. अशा परिस्थितीत समितीला असे पत्र पाठविले जावे हे हिंदी समाजाच्या दृष्टीने फार घातुक आहे, असे आमचे मत आहे. म्हणून आम्ही हे पत्र आमच्या टीकेसह प्रसिद्ध करून, सर्व हिंदी लोकांना इशारा देतो की, आपल्या उद्धाराचा काळ समीप आला असताना, हिंदु-मुसलमानांमध्ये भेदभाव आहे अशी कल्पना कोणी करू नये किंवा तो निर्माण करण्याचे स्वप्नातही आणू नये.

या गोष्टीची चर्चा जाहीरपणे करून मि. अलि यांना दुखविण्याची आमची मुळीच इच्छा नाही. त्यांचे मत ज्यांना मान्य नसेल त्यांनी त्यांच्यावर रागावण्याचे कारण नाही. उलट, त्यांच्या चुकीबद्दल त्यांची कीव केली पाहिजे. यावरून मुख्य धडा हा शिकावयाचा की, सार्वजनिक हिताला बाधक अशी कोणतीही गोष्ट कोणत्याही परिस्थितीत आपण करणार नाही, अशी प्रतिज्ञा सार्वजनिक कार्य करणाऱ्या प्रत्येक माणसाने केली पाहिजे. मि. अलि यांनी आपली चूक दुरुस्त करावी असे आम्ही त्यांना सुचवितो.

वरील पत्रावरून आपल्याला हेही दिसून येते की, मि. अलि यांनी हे पत्र लिहिले नसते तर (तुरुंगात जाण्यापासून) आपल्याला परावृत्त करणारी तार समितीने आपल्याला कदाचित पाठविली नसती. तथापि, आपण हे स्वच्छ ध्यानी घेतले पाहिजे की, समितीचा सल्ला सध्या आपल्याला मुळीच उपयोगाचा नाही. रणांगणावर धाव घेणारे लोक घरी बसून राहणाऱ्यांचा सल्ला ऐकत नाहीत. आता आपल्याला स्वतःच्याच सामर्थ्यावर विसंबून झुंजावयाचे आहे. आपल्याला जर या आक्षेपार्ह कायद्याला मान्यता देणे पाप वाटत असेल, तर समिती किंवा दुसरे कोणी सांगतात म्हणून आपण ते पाप करू नये. आपल्याला झाडा द्यावयाचा आहे तो ईश्वराकडे— समितीकडे नव्हे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २७-७-१९०७

९१. केपमधील हिंदी लोक

केपच्या पार्लमेंटच्या नव्या निवडणुका लौकरच होण्याचा संभव आहे. तेथील काळे व तांबूस लोक आपला मताधिकार कसा वापरतील असा प्रश्न केला जातो. ही चर्चा केवळ केपमध्येच नव्हे तर दक्षिण आफ्रिकेच्या इतर भागांतही होत आहे. आम्हांला जे काही म्हणावयाचे आहे ते मुख्यतः हिंदी मतदारांसाठी आहे.

केपमधील हिंदी मतदारांनी तेथील व इतर ठिकाणच्या हिंदी समाजाची परिस्थिती सुधारण्याच्या अनेक संधी आतापर्यंत गमावल्या असे आम्हांस वाटते. मताचा अधिकार योग्य वेळी योग्य तऱ्हेने वापरला नाही तर तो असण्याचा काहीच उपयोग नाही. केपमधील स्थानिक लोक व हिंदी लोक यांना मताचे महत्त्व कळले तर ते अजूनही पुष्कळ सुधारणा घडवून आणू शकतील.

लक्षात ठेवण्यासारखी पहिली गोष्ट ही की, काफिर व आशियावासी यांची मते एकाच बाजूला पडली पाहिजेत असे नाही. त्यांनी मिळवावयाचे हक्क भिन्नभिन्न आहेत. त्यांचे लढे भिन्न प्रकारचे आहेत. उदाहरणार्थ, केप-प्रवेश-कायदा हिंदी समाजाला जाचक आहे, त्याचा काफिरांवर फारसा परिणाम होत नाही. दुसरे असे की, परवाना कायद्याचा परिणाम फक्त हिंदी लोकांना भोगावा लागत आहे. शिवाय दक्षिण आफ्रिका ही त्यांची मातृभूमी, म्हणून त्यांचा येथे आमच्यापेक्षा अधिक हक्क. पण १८५८ च्या जाहीरनाम्याच्या आधारे आणि हिंदुस्थान हे एक प्राचीन राष्ट्र असल्याने हिंदी लोक आपल्या हक्कांची मागणी अधिक जोराने करू शकतील. अशा प्रकारे एकमेकांचे लाभ निरनिराळे आहेत. म्हणून आपण कोणत्या बाजूने मत द्यावे याचा विचार हिंदी समाजाने स्वतंत्रपणे करावा.

लक्षात ठेवण्यासारखी दुसरी गोष्ट ही की, या किंवा त्या बाजूने मत देण्याची सक्ती मतदारावर मुळीच नाही. काही काही वेळा मताचा अधिकार न वापरण्याचाही फार मोठा परिणाम होतो. एकदा दर्बानमधील मूठभर हिंदी लोकांनी आपला मताधिकार न वापरण्याचा निश्चय केला होता, हे आम्हांस माहीत आहे. परिणाम असा झाला की, एका वरिष्ठ अधिकाऱ्याने त्यांना बोलावले आणि त्याने त्यांना काही अभिवचने दिली व ती पुढे पाळली गेली.

या दोन गोष्टी लक्षात ठेवून आपण केपमधील परिस्थितीचा विचार करू. केपमध्ये दोन पक्ष आहेत.-बॉंड[1] किंवा डच; प्रोग्रेसिव्ह किंवा ब्रिटिश आणि "विदेशी." सध्या हे दोन्ही पक्ष म्हणजे एकाच माळेचे मणी आहेत हे आम्हांला कबूल केले पाहिजे. एकाच कुंभाराने घडविलेली ती मडकी आहेत. त्यांच्यापैकी कोणाचेही अंतःकरण काळ्या लोकांसाठी प्रेमाने वाहात नाही. प्रोग्रेसिव्ह पक्षाने मि. ऱ्होडस्[2] यांचे अभिवचन मोडले आहे. प्रवेशविषयक कायदा व परवाना-कायदा यांमध्ये काही सुधारणा तुम्ही कराल काय? असे केपमधील हिंदी समाजाने या दोन्ही पक्षांच्या पुढाऱ्यांना लेखी विचारावे, असा सल्ला आम्ही देतो. त्याला जो पक्ष रोखठोकपणे व प्रामाणिकपणे अनुकूल उत्तर देईल त्यालाच मते द्यावीत. पण स्पष्ट उत्तर देण्यास दोन्ही पक्ष काकू करू लागले-- आणि खासगी बोलण्यात एक व जाहीर रीतीने दुसरे उत्तर देऊ लागले तर अशा कपटी लोकांना उत्तेजन देता कामा नये. त्यांना असे स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, या परिस्थितीत हिंदी लोक कोणालाच मत देणार नाहीत.

असे केल्याने हिंदी लोकांची प्रतिष्ठा वाढेल अशी खात्री आम्हांस वाटते आणि या वेळी नसले तरी पुढील वेळी या दोहोंपैकी एक पक्ष निश्चित अभिवचने देईल हे

१. आफ्रिकेतील बॉंड लोक.
२. (१८५३–१९०२). केप वसाहतीचे मुख्य मंत्री, (१८९०–९६).

खास. केपच्या हिंदी लोकांनी केवळ आपल्या समाजाच्या कल्याणाच्या दृष्टीने वागावे अशी विनंती आम्ही करतो. काही गोरे आपले मित्र आहेत म्हणून किंवा थोड्या हिंदी लोकांचा काही फायदा करून देण्याचे वचन ते देत आहेत म्हणून त्यांना आपण मत देऊ नये. आपण काय मागावे व किती मागावे याचा विचार आम्ही दुसऱ्या वेळी करू.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २७–७–१९०७

९२. धर्मावर आघात

शाळेमध्ये आम्हांला असे शिकविले जाते की, ब्रिटिशांच्या राजवटीमध्ये--

झेरे गयां ने वेर गयां, वळी कालांकेर गया करतार;
पर नातीला जातीला थी, संप करी चाले संसार।
देख बिचारी बकरीनो पण, कोई न जाता पकडे कान,
ए उपकार गणी ईश्वरनो पण, हरख हवे तू हिंदुस्थान [१]

पण आता या कवितेत बदल करून आम्ही असे म्हटले पाहिजे—

झेरे वध्यां ने वेर वध्यां, वळी कालांकेर वध्या करतार
पर नातीला जातीला थी, वेर करी चाले संसार।
देख बिचारी बकरीनो सहु, जोर करीने पकडे कान;
ऐवो ख्याल करी हिम्मत थी उपाय कर तू हिंदुस्थान ॥ [२]

नाताळ रेल्वेच्या जनरल मॅनेजरचे पत्र वाचून वरील विचार आमच्या मनात आले. त्यांनी असे लिहिले आहे की, इंग्रज किंवा युरोपियन धर्मगुरुंना रेल्वे

१. गेले सारे द्वेषभाव ते, गेले सूडाचे वारे । रक्तपिपासू सुलतानांचे नाहीं आता न उरे ॥
आयुष्याचा प्रवाह वाहे, सुखशांतीच्या पाटाने । जाताजाता मुके नांदती गाय-गोविंदाने ॥
शेळी चाले स्वैर गतीने पकडि न कोणी कान । ईश-कृपा हा मानुनि होइ हर्षित हिंदुस्थान ॥

२. उमलताती द्वेषभाव ते सुटले सूडाचे वारे । रक्तपिपासू सुलतानांचे चमचमती ते तारे ॥
आयुष्याचा प्रवाह वाहे संघर्षाच्या वाटेने । जाताजाता भांडत नडल्या पेटुनि की वैराने ॥
शेळी चाले भीत भीत ती पकडे कुणिही कान । दुःस्थिति ही तू जाणुनि, साधी उद्धारा हिंदुस्थान ॥

तिकिटाबाबत ज्या सवलती आहेत, त्या यापुढे हिंदी खिस्ती धर्मगुरूंना मिळणार नाहीत. याचा अर्थ असा की, हिंदु, मुसलमान व खिस्ती धर्मगुरू, हिंदी असतील तर, त्यांना सवलतीच्या दराने तिकीटे मिळणार नाहीत.

हे ट्रान्सवॉलच्यापुढे एक पाऊल आहे. आता युरोपियन खिश्चनांहून हिंदी खिश्चनही वेगळे काढण्यात आले आहेत हे सुचिन्ह आहे, असे आम्ही समजतो. कारण, अशाच हालांनी व अपमानांनी, आम्ही हिंदी लोक हळूहळू एकत्र येऊ आणि जीवनासाठी एकमेकांशी सहकार्य करू.

एका दृष्टीने मि. रॉसचे पत्र अगदी क्षुद्र आहे. मूठभर हिंदी खिश्चन धर्मगुरूंना सवलतीच्या दराने तिकीटे मिळाली किंवा न मिळाली काय, त्याचे महत्त्व काय? दुसऱ्या दृष्टीने पाहता ही एक गंभीर घटना आहे. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांचा सर्व बाजूंनी पाणउतारा करण्याचा जो योजनापूर्वक प्रयत्न चालू आहे, त्याचे हे पत्र म्हणजे एक उदाहरण आहे आणि म्हणून त्याला गंभीरपणे विरोध करणे अवश्य आहे. हिंदी समाज किंवा हिंदुस्थानातील धर्म यांचा उपमर्द करणे हे येथील युरोपियनांना काही विशेष वाटत नाही.

या प्रश्नाबद्दल मुस्लिम संघाचे अध्यक्ष मि. पीरन महंमद यांनी मि. रॉस यांना पत्र लिहिले आहे आणि जरूर ते उपाय योजले आहेत, हे पाहून आम्हांस आनंद वाटतो. मि. रॉस यांच्याकडून समाधानकारक उत्तर येण्याची शक्यता आहे. तसे ते आले तरी आम्ही मिटक्या माराव्या असे त्यात काही नाही.

दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या स्वातंत्र्याची किल्ली ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या हाती आहे. ते आपले वचन पाळून लढत राहिले तर मि. रॉस आणि इतर गोरे लोक अपमान करण्याचे सोडून देतील.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २७–७–१९०७

९३. ईस्ट लंडनला इशारा

ईस्ट लंडनमधील हिंदी लोकांचे एक शिष्टमंडळ केपला गेले होते. त्याच्या कामगिरीसंबंधी ब्रिटिश वृत्तपत्रांत एक तार प्रसिद्ध झाली आहे. तीत असे म्हटले

आहे की, हिंदी "कूलींचे" नियंत्रण करण्यासाठी कायदे करावेत हे हिंदी समाजाला कबूल आहे. पण प्रतिष्ठित हिंदी लोकांना खास सवलती देणारे नियम बनवावेत अशी त्यांची मागणी आहे. शिवाय, त्या तारेत असे म्हटले आहे की, काफीर लोकांना माफीची पत्रे जशी दिली जातात तशी काही हिंदी लोकांना द्यावीत.

ईस्ट लंडनमधील हिंदी लोकांनी अशी काही मागणी केली असेल असे आम्हांस वाटत नाही. आम्ही अशी चूक करण्याची वाटच आमचे शत्रु पाहात आहेत. कारण, अशा भेदभाव करणाऱ्या कायद्याची मगणी आम्ही करणे म्हणजे आम्ही आमच्या पायावर कुऱ्हाड मारून घेणे होय. सज्जन व दुर्जन यांमध्ये भेदभाव असतो--आणि तो सदैव असणारच. पण सज्जन कोण व दुर्जन कोण, उच्च कोण व नीच कोण, महान कोण व हीन कोण हे कायदा ठरवू शकत नाही. जो आज फेरीवाला आहे, तो उद्या व्यापारी बनेल, एखादा व्यापारी गरीब होईल आणि नोकरी शोधू लागेल. अशा गोष्टी नेहमी घडतात. मग "कूली" कोणास म्हणावयाचे? अशी मर्यादा कशी घालता येईल? आणि कोण घालील? "उच्च" किंवा "नीच" यांचा पट्टा गोऱ्या अधिकाऱ्याच्या हातून घेण्यासाठी कोण जाईल? मूठभर हिंदी लोकांना माफीची पत्रे देणारा भेदभाव कायदा करू शकणार नाही, अशी आम्हांला खात्री वाटते. असा कायदा मागणे म्हणजे गुलामगिरीच मागणे होय.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २७-७-१९०७

९४. रशियाचे उदाहरण

रशियाच्या झारने ड्यूमा[१], म्हणजे पार्लमेंट स्थापन केल्याचे आमच्या वाचकास माहीत आहे. इंग्लिश पत्रांनी अलीकडे अशी माहिती प्रसिद्ध केली आहे की, ड्यूमाचे बहुतेक सारे सभासद देशासाठी तुरुंगात गेलेले किंवा हद्दपारी भोगलेले असे आहेत. म्हणून त्या पार्लमेंटला "कैद्यांची सभा" असे टोपण नाव दिलेले आहे. हे तुरुंगात गेलेले व ड्यूमाच्या निवडणुकीत लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी कोणी आंगटे-

१. १९०६ साली स्थापना. मर्यादित मताधिकाराने निवडलेल्या प्रतिनिधींची सभा. ही १९१७ त रद्द करण्यात आली.

बहाद्दर किंवा शेतकरी नाहीत-तर उच्च शिक्षणाने भूषित आहेत. त्यांतील काही प्रख्यात वकील किंवा डॉक्टर आहेत. त्यांच्यापैकी एकजण, मि. गोबर नॉफ यांना तर फाशीची शिक्षा झालेली होती. दुसरे प्रतिनिधी मि. सिंबरसक यांना कैक वर्षे सैबेरियामध्ये हद्दपार केलेले होते. अशा माणसांच्या निवडणुकीमुळे रशियन राज्यकर्ते पुष्कळ वेळा नाराज होतात, पण त्यांच्या नाराजीची पर्वा ते प्रतिनिधी किंवा मतदार मुळीच करीत नाहीत. डीमिट्रिअस पर्लेशिन नावाचे एक प्रतिनिधी सरदार घराण्यातून आलेले आहेत. त्यांनी दोन वर्षे तुरुंगवास सोसला आहे. अशी पुष्कळ नावे आम्ही देऊ शकतो. पण जेवढे लिहिले आहे तेवढ्यावरून वाचकांना कल्पना येईल. शिवाय, हे लक्षात ठेवले पाहिजे की, रशियातील तुरुंग हा खरोखर अंधारकोठडीसारखा असतो. कोणतीही सवलत दिली जात नाही. शिवाय, रशिया हा अत्यंत थंड प्रदेश आहे. तेथील तुरुंगाधिकारी क्रूर असतात. हे सर्व हाल त्या शूर वीरांनी लोककल्याणार्थ सहन केले. हवामानाच्या कडकपणाला ते भीत नाहीत. आपले बादशहा खूष होतील का नाखूष होतील याची विवंचना न करता, ते आपल्याला देशहिताचे वाटणारे कार्य बेडरपणे करीत जातात. रशियातील जनता अद्याप स्वतंत्र झाली नाही, म्हणून ते धीर सोडीत नाहीत; तर आपले कर्तव्य करीत राहतात. कारण त्यांना असे वाटते की, आपल्याला नसले तरी निदान आपल्यामागून येणाऱ्या लोकांना तरी आपल्या हालअपेष्टांचे फल अखेरीस मिळेल आणि आपला देश स्वतंत्र होईल.

अशा कडव्या देशभक्तांचे उदाहरण डोळ्यांसमोर ठेवून, ईश्वराकडे लक्ष ठेवून आणि अंतःकरणात त्याचे नाव निरंतर खेळवून, ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक या दुष्ट कायद्याची वैतरणी नदी ओलांडून जातील अशी आम्हांला आशा आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २७-७-१९०७

९५. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

दुष्ट कायदा

हा अंक प्रसिद्ध झाल्यानंतर जुलै महिन्याचे फक्त चार दिवस राहतात. नवीन नोंदणी-पत्रे न घेणाऱ्या हिंदी लोकांना सरकारने अटक केली आहे, अशा आशयाची तार मी पुढील अंकासाठी फिनिक्सला पाठवीन अशी आशा आहे. ही आशा मी जशी

करीत आहे, तशीच भीती काही जणांना वाटत असेल, असे मानणे चुकीचे होणार नाही.

प्रिटोरियाला प्रार्थना

दरम्यान, मी प्रिटोरियातील आमच्या देशबांधवांना अशी प्रार्थना करतो की, स्वतःची व हिंदी समाजाची प्रतिष्ठा आतापर्यंत तुम्ही जशी संभाळली आहे तशी अखेरपर्यंत संभाळा. अखेरच्या दिवशी, परवानाकचेरीच्या नरकाला भेट देऊन आपले नाव कलंकित करणारा एकही हिंदी माणूस प्रिटोरियामध्ये नाही अशी मला खात्री वाटते. त्या कचेरीत जाण्याने कलंकाशिवाय दुसरे काही मिळणार नाही याची जाणीव सर्वांना पूर्णपणे आहे असे मी समजतो आणि म्हणून तेथे जाण्याचा विचार कोणाच्या स्वप्नातही येणार नाही अशी आशा मी बाळगतो.

पुढे काय ?

या प्रश्नाला मी अनेकवार उत्तर दिले आहे; पण ते पुनः देणे योग्य आहे असे मला वाटते, जुलैमध्ये आपण दाखविलेले धैर्य एका प्रकारचे होते, ऑगस्टमध्ये दाखवावयाचे धैर्य दुसऱ्या प्रकारचे आहे. जुलैमध्ये आपल्या घरी बसून राहण्याचे धैर्य आपल्याला दाखवावयाचे होते. ऑगस्टमध्ये आपण मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात खेचले जाऊ, तेव्हा छातीठोक उत्तर आपण दिले पाहिजे. कोर्टाचे नाव उच्चारले की, आपल्या अंतःकरणात धडकी भरते. मग आपल्याला कोर्टात उभे केल्यानंतर काय होईल ? त्या प्रसंगी धीर धरणे अधिक कठीण आहे; पण तो गुण पूर्णपणे अंगी बाणला पाहिजे.

पोलिस पकडतील

प्रथमतः, नवीन नोंदणीचा अर्ज न केल्याबद्दल, एका किंवा सर्व हिंदी लोकांना पोलिस ता. १ ऑगस्ट रोजी पकडू शकतील. त्या वेळी आपल्या प्रतिज्ञा-पालनाच्या निष्ठेची कसोटी लागेल.

जामीन देऊ नका

त्या वेळी कोणाही पकडलेल्या हिंदी माणसाने जामीन देऊ नये आणि कोणासाठी जामीन राहू नये हे लक्षात ठेवावे. तेव्हाच कारागृहाच्या राजगृहातील वास्तव्याचे पूर्ण शिक्षण आपल्याला मिळेल. अटकेच्या दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी पकडलेल्या हिंदी माणसांना मॅजिस्ट्रेटपुढे उभे करण्यात येईल.

बचावाचा प्रश्न

नव्या नोंदणीसाठी अर्ज न केल्याचा आरोप त्याच्यावर बहुधा लादला जाईल. या वेळी, त्या पकडलेल्या माणसाजवळ खरा परवाना असेल किंवा परवान्याची गरज

नसलेला अज्ञान मूल तो असेल, तर त्याच्या बचावासाठी श्री. गांधी फी-विना उभे राहातील. आणि ते व मि. ईसापमियाँ सांगतील की, नव्या कायद्याला मान्यता न देण्याचे बंधन हिंदी समाजावर, शपथेने व ठरावाने, घातलेले आहे आणि तो ठराव आरोपीने स्वीकारलेला आहे आणि जर त्यासाठी शिक्षा द्यावयाची असेल तर प्रथम ती असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना दिली जावी. त्यानंतर आरोपीच्या जबाबाची गरज असेल तर, तो असे सांगेल की, समाजाच्या ठरावाला मान देण्यासाठी मी हे कृत्य केले, एवढेच नव्हे तर हा कायदा व्यक्तिशः मला नापसंत आहे आणि म्हणून नवे नोंदणी-पत्र घेण्याचा माझा इरादा नाही. शिक्षा झाली तर मी तुरुंगात जाईन; पण दंड भरणार नाही.

बचावाचा परिणाम

अशा बचावाचा परिणाम म्हणजे मि. ईसापमियाँ व गांधी यांना कदाचित् प्रथम पकडतील आणि आरोपीला सोडून देतील; पण असे घडले नाही तर कोर्ट आरोपीला शिक्षा देईल. दंडाची शिक्षा देण्याचा कोर्टाला अधिकार आहे आणि म्हणून आरोपीला दंडाची शिक्षा होईल व तो न भरल्यास त्याला तुरुंगात जावे लागेल.

दंड भरू नका

कोणीही दंड भरता कामा नये. दंड न भरता तुरुंगात जावे हे पक्के लक्षात ठेवावे. ता. १ ऑगस्ट रोजी व त्या दिवसापासून कोणाही हिंदी माणसाने आपल्याजवळ पैसे ठेवू नयेत आणि सोने तर मुळीच ठेवू नये असे मी सुचवितो. मोह ही अत्यंत वाईट गोष्ट आहे. तुरुंगाची कल्पना अंगवळणी पडलेली नसल्याने, आरोपीच्या कानी दंडाची शिक्षा पडताच, याचे हात नकळत त्याच्या खिशात चुळबुळ करू लागतील किंवा तो आपल्या दोस्ताकडे काकुळतीच्या दृष्टीने पाहील. असे झाले तर, त्याने मनातल्या मनात ईश्वराची क्षमा मागावी, (खिशातून) आपला हात काढावा, ताठ उभे राहावे आणि घसा साफ करून असे जाहीर करावे की, मी दंड देणार नाही–तुरुंगात जाईन; त्याच वेळी त्याने हे ध्यानी आणावे की, इंग्लंडमधील लहानथोर स्त्रियांनी आपल्या हक्कासाठी तुरुंगात जाण्याचे पत्करले, पण अर्धा क्राऊनचा दंड नाकारला.

दुसरे काय करतील ?

सामान्यतः सर्व हिंदी लोकांना एकाच वेळी पकडण्यात येणार नाही असे आम्ही गृहीत धरतो. मग बाहेर राहणाऱ्यांचे कर्तव्य कोणते ? उत्तर सोपे आहे. ज्याने धैर्याने तुरुंगवास पत्करला त्या आपल्या बांधवाचे अभिनंदन त्यांनी करावे आणि त्याच्या नातलगांना साहाय्य करावे. त्यांनी स्वतः घाबरून जाऊन नोंदणीसाठी अर्ज करू नयेत. उलट, तुरुंगात जाण्याची पुढची पाळी माझी यावी अशी प्रार्थना प्रत्येकाने करावी.

श्री. गांधी यांना प्रथम पकडले तर ?

असे झाले तर काही बचाव करावयाचा नाही. श्री. गांधींच्या खटल्याच्या वेळी साऱ्या गोष्टी स्पष्ट होतील. त्यांना तुरुंगात टाकले किंवा हद्दपार केले तरी हिंदी समाज आपल्या ठरावाशी एकनिष्ठ राहण्याचे धैर्य दाखवील, तर हा सारा प्रश्न लवकर सुटेल. कोण तुरुंगात गेला किंवा हद्दपार झाला, याची पर्वा न करता, हिंदी समाज खंबीर राहिला, तरच आतापर्यंत चाललेल्या लढ्याचा उपयोग होईल.

नोंदणी-पत्रे घेतल्यास काय होईल ?

तथापि, हिंदी लोकांनी भीतीमुळे नोंदणीपत्रांसाठी अर्ज केला किंवा दंड भरला अथवा जामिनावर सुटका करून घेतली तर आतापर्यंत झुंजलेला लढा मातीस मिळेल. आपल्या अंगी खरे धैर्य नव्हते हे सिद्ध होईल. पुढाऱ्यांनी दिलेली ती केवळ चेतना होती असे समजले जाईल. आतापर्यंत जे भव्य दृश्य दिसले तो केवळ वरवरचा देखावा होता असे बोलले जाईल. सोन्याचा मुलामा निघून जाईल आणि आपण सोने नसून तांबे आहो असे दिसून येईल. आपण कुचकामी आहो असेच सिद्ध होईल.

सरकारची दुसरी हत्यारे

मी वर म्हटल्याप्रमाणे, नवे नोंदणी-पत्र न घेतल्याबद्दल आरोप करण्याशिवाय दुसरेही काही उपाय सरकार योजील. कारण सध्याची सारी नोंदणी-पत्रे व परवाने रद्द झालेले आहेत, तेव्हा परवान्याशिवाय येथे राहिल्याचा आरोप हिंदी लोकांवर करता येईल. मी पूर्वीच्या पत्रात म्हटल्याप्रमाणे, असा आरोप केला तर, पहिल्या खटल्याच्या वेळी त्या आरोपीला विशिष्ट मुदतीत देश सोडून जाण्याची सूचना देण्यात येईल. त्या मुदतीत त्याने देश सोडला नाही तर, त्याला कमीत कमी एक महिन्याची कैद होईल. या मार्गाने खटला चालला तरीही बचाव वरीलप्रमाणेच केला जाईल. अशा खटल्यात सूचना मिळाल्यानंतर कोणीही देशत्याग करू नये, तर नोटिशीची मुदत संपल्यावर स्वतःला अटक करून घ्यावी आणि तुरुंगात जावे.

व्यापाऱ्यांना भय काय ?

मोठा व्यापार असणाऱ्या लोकांनी भय बाळगण्याचे कारण नाही. एका दुकानातील साऱ्या माणसांना एकाच वेळी बहुधा पकडणार नाहीत. दुकाने लुटली जाणार नाहीत हे खचित. जास्तीत जास्त तोटा होईल तो म्हणजे दुकाने काही दिवस बंद राहातील. याहून अधिक काही घडण्याचा संभव नाही; पण व्यापाऱ्यांनी आपल्या मालाची मोजणी करून ठेवणे शहाणपणाचे आहे. असे करण्यात हेतु एकच व तो म्हणजे सावकार अधीर झाल्यास त्याचे हिशेब तत्काळ मिटविता यावेत.

असोसिएशनचे कर्तव्य

अशा वेळी, ब्रिटिश इंडियन असोसिएशन व नाताळ इंडियन काँग्रेस यांच्यासारख्या ट्रान्सवॉलमधील व इतर ठिकाणच्या सार्वजनिक संस्थांचे कर्तव्य हे आहे की, त्यांनी सहानुभूतीचे ठराव मंजूर करावे व प्रसिद्ध करावे. तसेच अटक झालेल्या लोकांच्या कुटुंबियांच्या चरितार्थासाठी त्यांनी आर्थिक मदत पाठवावी आणि स्वदेशात व परदेशात या प्रश्नाची चर्चा जाहीर रीतीने जास्तीत जास्त करावी.

"संडे टाइम्स" चा प्रश्न

या कायद्यावर टीका करताना "संडे टाइम्स" च्या संपादकाने असा प्रश्न विचारला आहे की, ज्या हिंदी लोकांनी ऑगस्ट महिन्यात नवी नोंदणी–पत्रे घेतली नाहीत, त्यांना तुरुंगात ठेवण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे? ते त्यांच्यासाठी नवे तुरुंग बांधणार आहे काय? हा प्रश्न चेष्टेने विचारलेला आहे, तरी त्यावरून, हिंदी लढ्यामुळे इंग्रज लोक किती घाबरून गेले आहेत हे स्पष्ट दिसते.

मिडलबर्गचे हिंदी लोक

मिडलबर्गच्या टाऊन–कौन्सिलने "वस्त्यातून" हिंदी लोकांची हकालपट्टी करण्याचा एक ठराव पुनः मंजूर केला आहे. त्याचा हेतु म्हणजे तसे करण्याचा अधिकार टाऊनकौन्सिलला आहे की नाही हे कळण्यासाठी हिंदी लोकांवर एक कसोटीचा खटला लादावा.

इशारा

एकाही हिंदी माणसाने नवे नोंदणी–पत्र घेतले तर, दुसऱ्यांना बाजूस राहणे कठीण जाईल असे काही लोकांना वाटते. या रीतीने जे लोक विचार करतात, त्यांना या लढ्याचे स्वरूप नीट कळलेले नाही असे म्हटले पाहिजे. त्यांच्यापैकी एकाने विहिरीत उडी टाकली किंवा दुसरी काही चुकीची गोष्ट केली, तर सारे हिंदी लोक त्याच्या पावलावर पाऊल ठेवून तसेच वागतील काय? जर नसतील तर कोणत्याही विहिरीपेक्षा अधिक भयानक असणाऱ्या दुष्ट व क्रूर कायद्याच्या बाबतीत तसे कसे करता येईल? उलटे, एकही हिंदी माणूस गुलाम होणार नाही असे गृहीत धरणे ही अपेक्षा फार मोठी आहे. इतके तेज हिंदी समाजामध्ये असते तर आज दक्षिण आफ्रिकेत किंवा अन्यत्र तो समाज इतक्या दुर्दशेत का राहिला असता? या लढ्यामध्ये प्रत्येक हिंदी माणसाने दुसऱ्यावर विसंबून न राहता, स्वतःच स्वतःचा निर्णय करावयाचा आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. कोणीही दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहू नये. नवे नोंदणी–पत्र म्हणजे काही असे पक्वान्न नव्हे की, त्याची चव एकाने घेताच इतर लोक त्यावर तावडतोब तुटून पडतील. हे तत्त्व आपल्याला जोपर्यंत कळलेले नाही तोपर्यंत आपल्याला

यश मिळणार नाही, हे आपण आपल्या मनावर पक्के ठसविले पाहिजे. भयाने, दुबळे-पणाने किंवा अज्ञानाने, जे हिंदी लोक नवी नोंदणी–पत्रे घेण्यापासून परावृत्त राहू शकणार नाहीत, त्यांना एकच मार्ग मोकळा आहे असे मी म्हणेन; आणि तो मार्ग म्हणजे स्वतःचा दुबळेपणा कबूल करणे व दुसऱ्यांना आपला कित्ता न गिरविण्याचा सल्ला देणे.

प्रिटोरियाची सभा

प्रिटोरिया येथे मंगळवारी संध्याकाळी एक खास सभा भरली होती. तिला ॲडव्होकेट श्री. रूसही हजर होते. ते म्हणाले, जनरल स्मट्स यांना आपल्या पत्राचा परिणाम काय झाला हे जाणण्याची उत्सुकता आहे. त्या पत्राला हिंदी पुढाऱ्यांनी प्रसिद्धी दिली नाही, अशी शंका जनरल स्मट्स यांना आहे. म्हणून त्या बाबतीत सभेने आपले मत प्रदर्शित केले तर चांगले होईल. श्री. गांधी यांनी मि. रूस यांना "इंडियन ओपिनियन"चा एक अंक दिला आणि सांगितले की, जनरल स्मट्स यांच्या पत्राचे सार प्रत्येक हिंदी माणसाला पूर्वीच कळविले आहे. तो अंक मि. स्मट्स यांना दाखविण्याचे अभिवचन मि. रूस यांनी दिले. श्री. गांधींशिवाय जोहान्सबर्गहून आलेले मि. ईसॉपमियाँ व मि. उमरजी साले हेही सभेस हजर होते.

श्री. गांधी यांनी मि. स्मट्स यांच्या पत्राचे भाषान्तर करून ते सभेला सांगितले आणि काहीही झाले तरी नव्या कायद्याला मान्यता देऊ नका, असा आदेश सभेला दिला.

मि. हाजी हबीब यांनी अशा आशयाचा ठराव मांडला की, मि. रूस यांच्या पत्रात केलेल्या मागण्या जनरल स्मट्स यांनी मान्य केल्या नाहीत तर या कायद्याला मान्यता मिळणार नाही. जनरल स्मट्स यांच्याशी झालेला पत्रव्यवहार प्रसिद्ध करावा या ठरावाला मि. रूस यांनी दुजोरा दिला आणि मि. आयूब बेग महंमद व मि. उमरजी यांनी पाठिंबा दिला. मि. रूस म्हणाले, हा कायदा आपण स्वीकारावा आणि मग आपल्याला ज्या काही मागण्या करावयाच्या असतील त्या सनदशीरपणे कराव्या. तरी सुद्धा मि. हाजी हबीब यांचा ठराव एकमताने मंजूर झाला.

ही सभा अशा उत्साहाने पार पडली असली तरी (परीक्षेचा) प्रत्यक्ष क्षण जसजसा जवळ येत आहे तसतशी परिस्थिती गंभीर बनत आहे. सारा समाज अखेर-पर्यंत खंबीर राहील की नाही याबद्दल संशय प्रदर्शित केला जात आहे.

अशा प्रसंगी प्रत्येक हिंदी माणसाने एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे — आणि ती म्हणजे, नवे परवाने कितीही लोकांनी घेतले तरी, ज्यांच्या अंगी हिंमत आहे, त्यांनी ते कधीच घेऊ नयेत.

स्मट्स्चा इरादा

मि. स्मट्स् यांनी असे उत्तर दिले आहे की, किनाऱ्यावर परवाना कचेरी असणे अवश्य आहे. आतापर्यंत ब्रिटिश सरकार हस्तक्षेप करीत असल्यामुळे जुने डच कायदे अंमलात आणता येत नव्हते. पण आता ब्रिटिश सरकार हस्तक्षेप करण्याचा संभव नाही. म्हणून जो कूली एकदा बाहेर जाईल तो पुनः परत येणार नाही याची खात्री करून घेण्याकरिता किनाऱ्यावर कचेरी असणे अवश्य आहे. अशी उत्तरे मिळत असतानाही हिंदी समाजाने नव्या कायद्याला मान्यता दिली, तर त्याच्यापेक्षा वाईट दुसरे काय आहे?

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २७–७–१९०७

९६. वासाहतिक सचिवाला पत्र[१]

प्रिटोरिया,
ता. २७ जुलै १९०७

ना. वासाहतिक सचिव,
प्रिटोरिया, यांस

महाशय,

आशियावासियांच्या नोंदणीचे अर्ज रात्रीच्या वेळी व खासगी दुकानांत किंवा इतर ठिकाणी अधिकारी वर्ग स्वीकारीत आहे अशी माहिती माझ्या कमिटीला मिळाल्यामुळे खेद वाटतो. आणि अशीही माहिती मिळाली आहे की, या कायद्यानुसार अर्ज करण्याची इच्छा ज्या हिंदी लोकांना आहे, त्यांना मारहाण करण्याची भीती दाखविण्यात येते, अशा आशयाची तक्रार सरकारकडे आल्यामुळे वरील मार्ग स्वीकारण्यात आला.

हिंदी समाजाच्या कोणाही जबाबदार इसमाने अशी धमकी दिल्याची माहिती माझ्या कमिटीला मुळीच नाही. या कमिटीचे कार्यक्षेत्र इतकेच आहे की, या कायद्याची

१. हे बहुधा गांधीजींनी लिहिलेले असावे.

कलमे स्वीकारल्यामुळे कोणती हानी व नाचक्की होणार आहे हे दाखविण्यासाठी जोरा प्रचार करावा.

स्वयंसेवकांनी केवळ सेवा बुद्धीने प्रचार-कार्य चालविले आहे हे कोणीही कबू करील. माझ्या कमिटीने हिंदी लोकांना जाहीरपणे निक्षून सांगितले की, जर एखाद माणसाला अर्ज करावयाचा असेल तर त्याला काही अपाय पोहोचू नये, एवढेच न तर, त्याची इच्छा असेल तर, त्याला नोंदणी कचेरीपर्यंत सुखरूप पोहोचविले जावे.

माझ्या कमिटीचे असे नम्र मत आहे की, ज्या हिंदी लोकांनी रात्रीच्या वेळ चोरून अर्ज केले त्यांनी तसे करण्याचे कारण म्हणजे, इतर हिंदी लोकांप्रमाणे त्यांनाह तसे करणे आपल्या प्रतिष्ठेला लांछनास्पद वाटत होते. आणि म्हणून आपले ते कृत्य लपवावे हा त्यांचा हेतु असावा.

कचेरीच्या वेळेव्यतिरिक्त आणि खासगी दुकानात चोरून नोंदणी करणे बेकायद नसले तरी, ती एक प्रतिष्ठितपणाची कृती आहे असे कोणीच मानणार नाही, अस माझ्या कमिटीचे नम्र मत आहे. ते काहीही असले तरी, माझी कमिटी सरकारल असे सादर आश्वासन देत आहे की, हिंदी समाजाच्या दृष्टीने हा जीवन-मरणाच लढा आहे आणि त्यात धाकदपटशा किंवा कोणत्याही प्रकारे निंद्य असणारे उपा यांचा उपयोग करण्याची हिंदी समाजाची मुळीच इच्छा नाही.

आपला,
हाजी हबीब,
सन्मान्य चिटणीस,
ब्रिटिश इंडियन कमिटी

इंडियन ओपिनियन ३-८-१९०७

९७. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

ता. २९ जुलै १९०

नवा कायदा—घोर विश्वासघात

या बातमीपत्राइतके दुसरे कोणतेच पत्र मी आतापर्यंत इतक्या दुःखाने लिहिले नसेल असे मला वाटते. ही बातमी मी प्रसिद्ध करावी की नाही हाच एक मोठा कठीण

प्रश्न आहे. तथापि, आपल्याला जर सत्यनिष्ठ व धैर्यनिष्ठ राहावयाचे असेल, तर प्रिटोरिया येथील हिंदी लोकांमध्ये जी घटना घडली, तिची दाद मी घेतलीच पाहिजे असे मला वाटते.

दक्षिण आफ्रिकेतील हिंदी समाजाच्या दृष्टीने जुलैचा शेवटचा आठवडा संस्मरणीय ठरेल. ज्या वेळी आपल्याला अशी खात्रीने आशा वाटत होती की, विजयाचा क्षण जवळ आलेला आहे, त्याच वेळी समाजामध्ये विश्वासघात झाला आणि आपला विजय शंकास्पद ठरला. बुधवार ता. २४ जुलै रोजी रात्री १० नंतर प्रिटोरियाच्या रेल्वेस्टेशनवर हा कट सहजगत्या उघडकीस आला. तेथे श्री. गांधी यांचे स्वागत करण्यासाठी मि. कचालिया, व्यास, वेग व इतर हिंदी लोक हजर होते. त्यांना कळले होते की, श्री. खमीसाच्या दुकानामध्ये काही तरी गडबड उडालेली आहे. दुकानात थोडे गोरे लोक होते आणि दुकानाजवळ गुप्त पोलिस होते. ही बातमी कळल्यावर या सज्जनांना असे वाटले की, आपण श्री. खमीसांच्या दुकानाचे दार ठोठावावे आणि जर दरवाजा उघडला व नव्या कायद्याला शरण जाण्याचा प्रयत्न चालल्याचे आढळले, तर आपण त्या लोकांचे मन वळवावे. श्री. गांधींनी दरवाजा ठोठावला आणि तसाच श्री. व्यास यांनीही. एक माणूस बाहेर आला आणि "तुम्ही कोण?" असे विचारू लागला. श्री. गांधी यांनी उत्तर दिले आणि दुकानात जाण्यास परवानगी मागितली. दरवाजा कोणीही उघडला नाही. इतक्यात एक गुप्त पोलिस आला आणि प्रश्न विचारू लागला. श्री. वेग यांनी जोराने उत्तर दिले. नंतर श्री. गांधी त्या गुप्त पोलिसाशी बोलू लागले. तेव्हा "तुम्हांला कायदा कळतो, योग्य वाटेल ते करा." असे म्हणून तो निघून गेला. थोड्या वेळाने तो दुसऱ्या दोन अधिकाऱ्यांसह तेथे आला. दरम्यान, श्री. व्यास हे श्री. हाजी हबीब यांना बोलावण्यास गेले होते. वरील लोकांपैकी प्रत्येकाला हाताने धरून, त्या गुप्त पोलिसाने त्यांना तेथून निघून जाण्यास सांगितले. ते सर्व निघून गेले. प्रत्येकाला वाटले की, श्री. खमीसांच्या दुकानामध्ये काही तरी कारस्थान शिजत असावे.

पुष्कळ हिंदी लोक रात्रभर जागे राहिले. गुरुवारी सकाळी सारा हिंदी समाज खवळून गेला. गावोगाव तारा व पत्रे पाठविण्यात आली. त्या रात्री १२ च्या ठोक्याला श्री. खमीसांच्या दुकानांमध्ये सुमारे वीस माणसांनी आपले हात व तोंड काळी करून हिंदी समाजाच्या लौकिकाला कालिमा फासला असे म्हणतात.

यात दोष कोणाचा?

हा प्रश्न प्रत्येक हिंदी माणसाच्या मनात उद्भवेल. नोंदणीसाठी ज्यांनी अर्ज केला त्यांना आपण निर्दोषी म्हणू शकत नाही असे माझे स्वतःचे मत आहे. नवा कायदा चांगला आहे आणि त्याला मान्यता देण्यात काही कमीपणा नाही, अशी जर त्यांची खात्री झाली असती, तर त्यांनी परवाना-कचेरीत, गुलामगिरीच्या पट्ट्यासाठी

अर्ज करण्याकरिता, दिवसाढवळ्या जावयाचे होते, मग त्यांना कोणी टपका दिला नसता. परंतु आपण करतो ती एक लज्जास्पद गोष्ट आहे असे त्यांना वाटत होते, म्हणून त्यांनी रात्रीच्या वेळी परवाने चोरून घेण्याचे ठरविले. याचा अर्थ त्यांना आपल्या गुन्ह्याची जाणीव होती. त्यांनी हिंदी समाजाचा गुन्हा केला आहे, असेच मानले पाहिजे. या हिंदी गुन्हेगाराइतकेच–किंवा अधिक–परवाना-अधिकारीही दोषी मानले पाहिजेत. नव्या परवान्यासाठी लोकांच्या दुकानात रात्री जाऊन अर्ज स्वीकारणे, याचा अर्थ नव्या कायद्याला लोकांनी मान्यता द्यावी, म्हणून ते प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. लोकांनी कायद्याला मान्यता दिली नाही, तर आपली अब्रू जाईल अशी भीती त्यांना वाटते. सरकारच जर या अवनतीला पोहोचले, तर लोकांना मोह व्हावा यात आश्चर्य काय ?

जखमेवर मीठ चोळले

या चोरट्या नोंदणीसाठी अशी सबब शोधून काढण्यात आली आहे की, नवे परवाने घेणाऱ्या लोकांचे हाल होतील अशी धमकी हिंदी लोकांनी दिली होती. हा आरोप निखालस खोटा आहे. नोंदणी–पत्र घेण्यातील आपली शरम झाकण्यासाठी, त्या बेइमानी लोकांनी, खोट्या सबबी शोधून, साऱ्या समाजावर खोटे आरोप केले आहेत.

हाजी हबीब यांचे पत्र

असा आरोप सहन करणे अशक्य असल्याने श्री. हाजी हबीब यांनी वासाहतिक सचिवाला पुढील पत्र पाठविले आहे[1] :

वाईटातून चांगले निघते

हिंदी समाजाचा लढा न्यायाचा असल्यामुळे, या विश्वासघातांचाही परिणाम चांगलाच दिसून आला. चोरून परवाने घेणाऱ्यांमध्ये, अब्दुल करीम जमाल नावाचा एक सालस हिंदी माणूस होता. भयाने व मोहाने त्याने परवान्यासाठी अर्ज केला, पण तो त्या विश्वासघातकी गटातला नसल्यामुळे अर्जात खोटी माहिती दिल्याच्या आरोपावरून त्याला पकडण्यात आले. १०० पौंडांच्या जामिनावर तो सुटला. आता त्याचा खटला चालावयाचा आहे. या प्रकरणामुळे साऱ्या प्रिटोरियाला धक्का बसला आहे. कारण हिंदी लोकांना असे कळून आले आहे की, नव्या कायद्याप्रमाणे परवान्यासाठी अर्ज करण्यात, परवाना दिला जाणार नाही एवढेच भय नसून, एखाद्या गुन्हेगाराप्रमाणे कैद भोगावी लागेल. श्री. अब्दुल करीम जमाल दोषी आहे की नाही हा निराळा मुद्दा

१. मूळ लेखात याखाली मूळ पत्र दिले आहे; त्यासाठी मागील लेख ९६ पाहा.

पण एखादा सालस माणूस एकाएकी कोर्टात खेचला जावा इतका हा कायदा भयानक आहे हे यावरून उघड होते. या कायद्यापासून दूर राहण्यात प्रतिष्ठा व सुरक्षितता संभाळली जाईल. हे उदाहरण सर्वांना इशारा देणारे आहे. गुलामगिरीचा पट्टा एखाद्याने मिळविला तरी त्याला ट्रान्सवॉलमध्ये राहण्याचा हक्क मिळेल अशी शाश्वती नाही.

" दया धर्मका मूल है । "

हा सुप्रसिद्ध दोहा[1] ध्यानी धरून, आपण हिंदी लोकांचा द्रोह करणाऱ्या माणसावर दया करावी. आपल्याला संताप येणे स्वाभाविक आहे, पण तो आपण आवरला पाहिजे आणि त्यांनीही ते लांच्छनास्पद कृत्य अज्ञानात केले असे मानले पाहिजे. शिवाय आपण हेही लक्षात ठेवले पाहिजे की, हा लढा चालू असताना एखाद्या हिंदी माणसाने दुसऱ्या हिंदी माणसावर अत्याचार केला किंवा त्याला काही अपाय केला तर त्यामुळे साऱ्या लढ्याचीच हानी होईल. या बाबतीत मला दुःखाने असे सांगावे लागत आहे की, श्री. खमीसाने आपल्या प्रत्येक हिंदी गिऱ्हाइकाला कळविले होते – ' सोमवार सकाळपर्यंत गुलामगिरीच्या या नव्या पट्ट्यासाठी तुम्ही अर्ज केला नाही तर माझी सारी बाकी चुकती करा; न केल्यास, तुमच्यावर मी समन्स बजावीन. ' यामुळे मोठी खळबळ माजली. पण श्री. ईसापमियाँ, अस्वात व उमर्जी यांनी श्री. खमीसाचे मन वरील सूचना परत घेण्याविषयी वळविले.

सहानुभूतिपर संदेशांचा वर्षाव

प्रिटोरियातील पुढाऱ्यांकडे एकसारख्या तारा येत आहेत. त्यांतील काहींनी या विश्वासघाताचा तीव्र धिक्कार केलेला आहे. श्री. पारशी रुस्तुमजी आणि दर्बानचे स्वयंसेवक यांनी प्रत्येक स्वयंसेवकाला अभिनंदनाच्या तारा पाठविल्या आहेत. नापितांना दुसऱ्या नापितांच्या खंबीर राहण्याविषयीच्या तारा आलेल्या आहेत. कैक सज्जनांकडून आलेल्या तारांचा वर्षाव होत आहे. क्लेअर, टोंगाट, डेलागोआ-बे, डंडी, लेडी स्मिथ, एस्टकोर्ट, केप टाउन इत्यादी ठिकाणांहून तारा आलेल्या आहेत.

आज (सोमवार) संध्याकाळपर्यंत एकाही हिंदी माणसाने परवाना-कचेरीतून परवाना घेतलेला नाही.

हमीदियांची सभा

रविवारी जोहान्सबर्ग येथील हमीदिया इस्लामिया अंजुमनच्या सभागृहात एक प्रचंड सभा मोठ्या उत्साहाने भरली. श्री. पोलक यांनी आजतागायतची परिस्थिती समजावून सांगितली. इमाम अब्दुल कादिर बवाजीर अध्यक्ष होते. मौलवी हाजी

१. तुलशीदासाचा हा दोहा आहे.

अब्दुल मुख्तियार यांनी एक प्रदीर्घ व प्रभावी भाषण केले. ज्यांनी नोंदणी-पत्र घेतले त्यांचे कृत्य धोक्याचे आहे असे म्हणून त्याचा आवेशाने धिक्कार करण्यात आला. आता बहुधा जोहान्सबर्ग जिल्ह्याची पाळी येईल आणि म्हणून स्वयंसेवकांची भरती अवश्य आहे, असे मि. पोलक यांनी सांगितले. स्वयंसेवक म्हणून नाव नोंदविण्यास तयार असलेल्यांची नावे त्यांनी मागितली. नबाबखान, जमादार यांनी आपले नाव प्रथम दिले. त्यांनी मोठे भावनापूर्ण भाषण केले. इतर नावे नोंदली गेली ती पुढील-प्रमाणे :--

महंमद हुसेन, मीर अफजुलखान काबुली, नुरुद्दीन, इमामुद्दीन, जामाशाह, साहेबदीन, मूसा महंमद, अलीभाई महंमद, ईसप दासू, अलीभाई इस्माइल, उमर हसन, मूसा आनंदजी, रानलगन, अली उमर, इस्माइल महंमदशाह, महंमद इस्माइल सुलेमान आमदसुरती.

ही नावे आल्यावर अधिक नांवांची गरज नाही असे जाहीर करण्यात आले. सभेत मोठे चैतन्य पसरले होते.

दक्षिण भारतीय लोकांची सभा

त्याच दिवशी संध्याकाळी दक्षिण भारतीय लोकांनी एक सभा भरविली. तेथेही श्री. पोलक यांनी सारी परिस्थिती समजावून सांगितली. लोक उत्साहाने व धैर्याने ओतप्रोत भरलेले आहेत. “ इतर लोक काहीही करोत, पण मी परवाना घेऊन स्वतःला कलंक लावणार नाही ” असे प्रत्येकजण म्हणत आहे. सभेत पुढील लोकांनी स्वयंसेवक म्हणून नावे नोंदविली--

श्री. पी. के. नायडू, डब्ल्यू. जे. आर. नायडू, एस. मॅथ्यूज, एस. लिंगम्, डी. एन्. नायडू, एस. कुमारस्वामी, एस्. वीरासामी, थांबी नायडू, एस्. पी. पडियाची, आर. के. नायडू, आर. दण्डपाणि, के. के. स्वामी, के. एन. दादलानी, जे. के. देसाई इत्यादि.

दर्बानमार्गे येणाऱ्यांना इशारा

व्होल्क्सरस्ट येथील बातमीदाराने कळविले आहे की, नाताळहून येणाऱ्या लोकांचे परवाने व नोंदणीपत्रे अधिकारी काढून घेतात आणि त्यांना सांगतात की, ती तुम्ही नंतर प्रिटोरियाच्या परवाना-कचेरीतून घ्या. हे उघडच अयोग्य आहे. त्यामुळे लोकांना मुद्दंड बसतो आणि परवाना-कचेरीत जाणे भाग पडते. म्हणून साऱ्या हिंदी लोकांनी ही सूचना ध्यानी घेऊन तूर्त ट्रान्सवॉलला जाण्याचे रहित करावे, हेही नव्या कायद्यामुळे अवश्य झाले आहे. यावरुन नव्या कायद्याचे सूक्ष्म परिणाम आपल्या ध्यानी येण्यासारखे आहेत.

फ्रीडडॉर्पचे हिंदी लोक

व्हेडेडॉर्पचा वटहुकूम तूर्त अंमलात येणार नाही, असे आता निश्चित झाले आहे. यामुळे हिंदी लोकांचा काही विशेष लाभ झाला आहे असे कोणी मानू नये. खरी गोष्ट ही आहे की, गोऱ्या लोकांना हा वटहुकूम पसंत नाही. त्यामुळे मिळणाऱ्या हक्कावर ते संतुष्ट नाहीत. त्यांना अधिक हक्क पाहिजेत. त्यांना पाहिजे ते देण्यास सरकारने संमती दिली आहे. म्हणून आता नवा वटहुकूम तयार केला जाईल. त्यानेही हिंदी व्यापाऱ्यांचे हक्क संरक्षिले जाणार नाहीत. तुणतुण्याचा आवाज ऐकणारा कोणी नाही. फ्रीडडॉर्पचे डच गरीब असले तरी त्यांना मताचा अधिकार आहे. ते शूर-वीर आहेत. त्यांच्यासाठी सर्व काही केले जाईल. हिंदी लोकांना मत नाही, आणि तलवार तर त्यांनी पाहिलेलीही नाही. परंतु त्यांनी जर अंगी धैर्य धरले आणि तुरुंगात जाण्याचे अग्निदिव्य केले, तर त्या अग्नीच्या ज्वालेत हा दुष्ट आशियावासी कायदा भस्मसात् होईल आणि त्यामुळे त्यांच्या गुणांची पारख सर्वांना होईल. नाही तर हिंदी लोकांचे हक्क कायमचे नष्ट होतील, याविषयी मला तर काडीमात्र शंका नाही.

कॉमन्स सभेत आशियायी कायदा

साम्राज्याच्या पार्लमेंटमध्ये ट्रान्सवॉलच्या हिंदी लोकांसंबंधी सर विल्यम बुल यांनी एक प्रश्न विचारला, अशी तार स्थानिक पत्रांत प्रसिद्ध झाली आहे. त्या प्रश्नाला उत्तर देताना श्री. चर्चिल यांनी सांगितले की, नोंदणीसाठी बोटांचे ठसे घेण्याला दुसरा पर्याय नाही असे आढळून आले आहे. लॉर्ड एल्जिन यांनी ट्रान्सवॉल सरकारच्या धोरणाविषयी खेद व्यक्त करून म्हटले की, ओळख पटविण्याच्या या पद्धतीत आक्षेपार्ह काही नाही, असा खुलासा ट्रान्सवॉलने केल्यानंतर, या प्रश्नाचा फेरविचार करावा असा आग्रह मी धरीत नाही.

लॉर्ड एल्जिन यांनी खेद प्रदर्शित केला, यावरून त्यांना हा कायदा जुलमी वाटतो हे स्पष्ट होते. म्हणून जेव्हा हिंदी लोक तुरुंगात जातील तेव्हा त्यांना त्यांची सहानुभूती मिळेल हे निश्चित.

रेल्वेवरील अडचणी

ब्रिटिश इंडियन असोसिएशनचे हंगामी चिटणीस, श्री. पोलक यांच्या सहीने, रेल्वे-अधिकाऱ्याकडे पुढील पत्र पाठविले आहे :—

" माझ्या असोसिएशनचे माजी अध्यक्ष श्री. अब्दुल गनी व श्री गुलाम महंमद यांना, तारेने बोलावणे आल्यामुळे, तातडीच्या कामासाठी, प्रिटोरियाला काल दुपारी जावयाचे होते, पण त्यांना ४–४० च्या गाडीची तिकिटे नाकारण्यात आली. या घटनेकडे मी आपले लक्ष वेधीत आहे.

"या प्रकरणाची चौकशी आपण करावी अशी माझी विनंती आहे. कारण माझी असोसिएशन ज्या हिंदी समाजाचे प्रतिनिधित्व करीत आहे, त्याच्या सार्वजनिक हक्कांवर नवीन निर्बंध घालण्याचा शासनाचा हेतु नाही, अशी खात्री माझ्या असोसिएशनला करून घ्यावयाची आहे."

रेल्वेच्या छळणुकीच्या या ताज्या उदाहरणावरून हे स्पष्ट होते की, अधिकाऱ्याचे डोळे उघडण्यासाठी कोणाही हिंदी माणसाने तुरुंगात जाण्याची संधी गमावू नये. तुरुंगात जाऊन आपले सामर्थ्य हिंदी समाजाने सिद्ध करीपर्यंत अशा सर्व अडचणी कमी होण्याऐवजी वाढतच जाण्याचा संभव आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ३–८–१९०७

९८. प्रिटोरियातील भाषण[1]

[प्रिटोरिया,
ता. ३१ जुलै १९०७]

श्री. गांधी म्हणाले, "श्री. हॉस्केन यांनी वटहुकुमाबाबत[2] पुष्कळ गोष्टींचा खुलासा केला आहे. त्यांनी हिंदी लोकांशी त्यांच्या आपत्तीच्या वेळी सहानुभूती दाखविली आणि असा सल्ला दिला की, तुमचा लढा रास्त वृत्तीतून निघालेला असला तरी तुमचा मार्ग चुकीचा आहे. तुम्ही वटहुकुमाला–म्हणजे त्याच्या बुडाशी असलेल्या सक्तीला व दहा बोटांचे ठसे देण्याला–मान्यता द्यावयास हवी. या आपल्या मतासाठी त्यांनी पुष्कळ युक्तिवाद केले. त्यांतील एक असा, जे अटळ आहे ते स्वीकारावे. हा

१. आशियावासियांच्या नोंदणी-कायद्याप्रमाणे अर्ज दाखल करण्याची शेवटची ता. ३१ जुलै होती. त्या दिवशी साऱ्या ट्रान्सवालमधील हिंदी लोकांची एक सभा प्रिटोरिया येथे भरली. तिच्यातील भाषणाचा तारेने पाठविलेला वृत्तांत ता. ३–८–१९०७ च्या 'इंडियन ओपिनियन'मध्ये आला होता. (वर दिलेला) हा विस्तृत वृत्तांत आहे.

२. जनरल बोथा यांच्या सूचनेवरून हॉस्केन सभेस हजर राहिले व त्यांनी हिंदी लोकांना सांगितले की, या कायद्याबाबत सरकारचे धोरण खंबीर राहील.

अटळपणाचा मुद्दा[१] मी प्रथम विचारात घेतो. अटळ किंवा अपरिहार्य याचा अर्थ पौरस्त्य लोकांना काय वाटतो, याची कल्पना श्री. हॉस्केन यांना, किंवा पाश्चात्त्य वंशातील कोणाही माणसाला येणे शक्य नाही, असे मी अत्यंत नम्रपणे सांगतो. हे माझे मत मी गंभीरपणाने निवेदन करतो. आशियावासियांच्या नोंदणीकायद्याच्या पाठीशी गोऱ्या लोकांच्या मताचे सामर्थ्य उभे आहे आणि म्हणून त्या कायद्यावर कोणाला मात करता येणार नाही, तर त्याला मान दिलाच पाहिजे, व ही गोष्ट अपरिहार्य आहे असे मी मानीत नाही. माझ्या दृष्टीने अपरिहार्य जे काही आहे ते म्हणजे हिंदी लोकांनी या कायद्याला विरोध करणे. कारण, या देशात त्यांना मताचा अधिकार नाही, त्यांच्या शब्दाला कार्डीमात्र किंमत नाही, त्यांचे अर्ज रद्दीच्या टोपलीत फेकले जातात. जनतेच्या विधिमंडळात त्यांच्यासाठी एका माणसाचाही आवाज फुटत नाही, फार काय, श्री. हॉस्केन यांनीहि तेथे सहानुभूतीचा एकही शब्द उच्चारला नाही. कारण तसे केल्यास कडव्या विरोधकांच्या फळीला त्यांना तोंड द्यावे लागले असते. अशा परिस्थितीत ज्या अपरिहार्य गोष्टीला आपण शरण जावयास हवे, ती म्हणजे ईश्वरेच्छा. ईश्वराचीच इच्छा जर अशी असली की, १३००० (तेरा हजार) हिंदी लोकांपैकी प्रत्येकाने सर्वस्वाचा होम करावा व या भौतिक जगात त्याला जी काही आर्थिक संपत्ती लाभली असेल तिच्यावर त्याने तुळशीपत्र ठेवावे; तर त्याने त्या अपरिहार्य परिस्थितीला शरण गेले पाहिजे. या कायद्यात अंतर्भूत असलेल्या अपमानाला व उपमर्दाला कधीही मान्यता देऊ नये. हॉस्केन यांच्याविषयी पूर्ण आदर बाळगून मी असे सांगतो की, ते जशी आपली कातडी बदलू शकत नाहीत त्याप्रमाणे या देशात राहणाऱ्या प्रत्येक हिंदी माणसाच्या जीवन-मरणाच्या प्रश्नांत ते आपणाला काही सल्लाही देऊ शकत नाहीत.

तेरा वर्षे मी या देशात राहिलो आहे व माझ्या देशबांधवांची सेवा करीत आहे. दक्षिण आफ्रिकेतील अत्यंत शांततावादी माणसांपैकी मी एक असल्याचा माझा दावा आहे. पूर्ण विचार व चिंतन केल्याशिवाय मी या धर्मयुद्धास प्रारंभ केलेला नाही— माझ्या देश-बांधवांना असा उपदेश करण्यास प्रारंभ केलेला नाही. आशियावासियांच्या कायद्याचे प्रत्येक कलम मी वाचले आहे आणि वसाहतींचे बहुतेक सारे कायदे मी अभ्यासले आहेत. त्यामुळे मी विचारपूर्वक असा निर्णय ठरविला आहे की,— आणि त्या निर्णयात आता बदल होण्याचा संभव नाही— ट्रान्सवॉलमध्ये राहणाऱ्या आशियावासी लोकांनी या कायद्याला मान्यता दिली तर त्यांच्या कपाळी गुलामगिरीचीच दशा येईल—दुसरी कसलीही नाही.

१. पाहा, 'श्री. हॉस्केन यांचा अटळपणा' लेख–१०७.

आणि हे कशामुळे ? मी जेव्हा लंडनमध्ये होतो तेव्हा श्री. हॉस्केन यांच्या देशबांधवांना एक साधे उदाहरण दिले. तेव्हा मी म्हणालो, " रस्त्यावरून जाणारा प्रत्येक माणूस रेशमी टोपी घालतो. पण समजा, उद्या लंडनमध्ये, प्रत्येक इंग्रजाने रेशमी टोपी घालण्याबद्दल सक्ती करणारा कायदा केला, तर लंडनमधील सारेच्या सारे लोक टोपी न घालता हिंडणार नाहीत काय ? " तेथील मित्रांना मी अशी स्थिती सांगितली-- अर्थात् हे उदाहरण अगदी क्षुद्र होते— केवळ टोपी घालण्याचे होते. पण इंग्रज लोकांना स्वातंत्र्याची मातब्बरी इतकी मोठी वाटते की, कोणत्याही हेतूने आपल्यावर अशी सक्ती करणारा कायदा अस्तित्वात आला तर आपल्या देशात ते त्याला प्रतिकारच करतील. आपला प्रश्न टोप्यांचा नाही, तर आपल्या कपाळावर व बाहूवर गुलामगिरीचा शिक्का बसण्याचा आहे. तसा शिक्का बसवून घेऊ नका, असे माझे सांगणे आहे.

मी माझ्या देशबांधवांना जो सल्ला दिला आहे, त्याची पूर्ण जबाबदारी मी स्वीकारीत आहे. पण त्याबरोबरच मला हे सांगावयाचे आहे की, या कायद्यामुळे होणाऱ्या अधोगतीची कल्पना जितकी मला आहे, त्यापेक्षा माझ्या देशबांधवांना अधिक आहे. कारण, या कायद्यामध्ये माझ्या देशबांधवांच्या हिताच्या पळवाटा कोणत्या आहेत हे मला माहीत आहे. मी हेही जाणतो की, अशा देशात राहावयाचे म्हणजे आपल्याला दुसऱ्यांच्या पूर्वग्रहांना तोंड द्यावे लागणार. म्हणून आतापर्यंत आम्ही काही अपमान, काही उपमर्द सहन करीत आलो आहो. पण आता पेला काटोकाट भरून वाहू लागला आहे. या कायद्यातील अधोगती सहन करून या देशात राहणे अशक्य आहे, हे आम्ही ब्रिटिश हिंदी लोकांनी ओळखले आहे. ह्या स्थितीत या देशात राहणे शक्य नाही, हे त्यांनी स्वेच्छेने व विचारपूर्वक ठरविलेले आहे. त्यांची या कायद्याबाबत जर अशी भावना नसती, तर माझी चूक मी पहिल्या प्रथम कबूल केली असती; आणि या कायद्याला मी प्रथम मान्यता दिली असती. एवढेच नव्हे तर हा वटहुकूम योग्य आहे व माझ्या हातून चूक झाली, असे मी जाहीर रीतीने कबूल केले असते.

श्री. ईसापमियाँ यांनी सद्यःस्थितीचे चित्र तुमच्यापुढे यथार्थपणे रेखाटले आहे. हा कायदा व खुशीची नोंदणी यांतील फरक त्यांनी दाखविला आहे. खुशीच्या नोंदणी-मुळे आपली स्थिती काय होईल आणि सक्तीच्या नोंदणीमुळे काय होईल याचे चित्र तुमच्या मनश्चक्षूपुढे उभे केले आहे—आणि तुम्ही स्वतःही ते चित्र उभे करू शकता. आता त्या कायद्याची सविस्तर छाननी मी करण्याची गरज नाही. पण तुमच्या समजुती-खातर मौलवींनी एक दोन गोष्टींची तुलना केली आहे. श्री. हॉस्केन यांना मौलवींची भाषा कळत नसल्यामुळे ते आपले वैयक्तिक गाऱ्हाणे संतापाने सांगत आहेत असे त्यांना वाटले. पण समाजाची सेवा करणाऱ्या लोकांपाशी असे वैयक्तिक गाऱ्हाणे काही असू शकत नाही. मौलवी जे काही म्हणाले ते हे की, हा कायदा तिरस्करणीय आहे मी नम्रपणे पण निश्चयाने सांगतो की, हा कायदा इतका तिरस्करणीय व सर्वांचा उपमर्द

करणारा आहे की, तो मुस्लीम व ख्रिस्ती यांमध्ये भेद करतो—तुर्कस्तानातील मुस्लीमांना कायद्याच्या कक्षेत आणतो. पण तेथील ख्रिस्ती व यहुदी यांना मोकळे सोडतो. तुर्कस्तानातील ख्रिस्ती किंवा यहुदी यांच्याशी तेथील मुसलमानांचे एखादे भांडण असल्याचे मला माहीत नाही. पण त्यांना हा अपमान गिळणे–ही कडू गोळी गिळणे कठीण जात आहे.

या देशात दैन्यवाणे जिणे जगण्यासाठी तुम्ही जर या साऱ्या गोष्टी मान्य केल्या, तर तुमची स्थिती सुधारेल आणि तुमचे हिरावून घेतलेले थोडेफार हक्क तरी तुम्हांला परत मिळतील असे मानण्याला आधार काय? कायद्यात किरकोळ फेरबदल थोडेफार होतील, पण तरीही मालमत्तेच्या मालकीचा हक्क काढून घेतला जाईल. स्वतंत्र वस्तीमध्ये राहावे लागेल. अशाच कितीतरी हालअपेष्टांना तोंड द्यावे लागेल. या परिस्थितीशी आपल्याला मुकाबला करावयाचा आहे. म्हणून या कायद्याला संमती देऊ नका असा सल्ला माझ्या देशबांधवांना देण्याची जबाबदारी मी घेतली आहे.

इंडियन ओपिनियन, १०–८–१९०७

९९. प्रिटोरियाच्या सार्वजनिक सभेतील ठराव[1]

[प्रिटोरिया,
३१ जुलै १९०७]

ठराव १ ला : प्रिटोरियामध्ये जमलेल्या ब्रिटिश हिंदी लोकांची ही सार्वजनिक सभा दुःखाने असे नमूद करीत आहे की, आपल्या समाजात काही हिंदी लोकांनी स्वत्वाला व स्वसंस्कृतीला विसरून, नोंदणी-पत्रासाठी आरंभी चोरटेपणाने व नंतर उघडपणे, अर्ज केले आहेत. आशियायी कायद्याच्या दुरुस्ती विधेयकाला रुकयन्मत दिल्याने येणाऱ्या अपमानाची पूर्ण कल्पना त्यांना होती.

ठराव २ रा : प्रिटोरियामध्ये जमलेल्या ब्रिटिश हिंदी लोकांची ही सार्वजनिक सभा प्रिटोरियामध्ये वास्तव्य करणाऱ्या बहुसंख्य हिंदी लोकांचे अभिनंदन करीत आहे, कारण त्यांनी आशियायी कायदा दुरुस्ती विधेयकाचा अंमल मानण्याचे नाकारले

१. हे ठराव इतर हिंदी लोकांनी मांडले व अनुमोदन दिले असले, तरी ते बहुधा गांधीजींनीच तयार केलेले होते.

आणि त्याचे जे जे गंभीर परिणाम होतील ते सोसण्यास सिद्ध झाले. अन्याय व जुलूम याविरुद्ध अशी संस्मरणीय भूमिका हिंदी समाजाला धारण करणे शक्य होण्यासाठी, या कायद्याच्या कलमांचे सत्यज्ञान हिंदी लोकांमध्ये पसरविण्यासाठी स्वयंसेवकांचे काम ज्या धडाडीच्या हिंदी लोकांनी केले त्यांचेही अभिनंदन ही सभा करीत आहे.

ठराव ३ रा : प्रिटोरिया येथे जमलेल्या ब्रिटिश हिंदी लोकांची ही सार्वजनिक सभा सरकारला अशी प्रार्थना करीत आहे की, अध्यक्षांनी आपल्या भाषणात सांगितल्याप्रमाणे, खुषीची फेरनोंदणी करण्याची हिंदी लोकांची योजना आपण मान्य करावी आणि या कायद्याच्या अमान्यतेमुळे भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांपासून हिंदी समाजाला वाचवावे. हा कायदा ज्या हेतूने करण्यात आला आहे, त्या दृष्टीने तो निरर्थक आहे असे या सभेचे नम्र मत आहे.

ठराव ४ था : प्रिटोरियामध्ये जमलेल्या ब्रिटिश हिंदी लोकांची ही सार्वजनिक सभा, पहिले तीन ठराव सरकारकडे पाठविण्याचा अधिकार, अध्यक्षांना देत आहे.

इंडियन ओपिनियन ३-८-१९०७

१००. "रँड डेली मेल"ला मुलाखत[१]

...जर सरकार खुषीच्या नोंदणीसाठी दोन महिन्यांची मुदत देण्यास तयार असेल तर बहुसंख्य हिंदी लोक या अटी मान्य करतील, तरीसुद्धा बोटांचे ठसे देण्याच्या पद्धतीबाबत अडचण राहीलच. ही अडचण म्हणजे मोठी धोंड आहे असे मला वाटते. या वटहुकुमामुळे सर्व, किंवा बहुसंख्य, हिंदी लोक जेव्हा क्लेश सोसतील, तेव्हाच हिंदी लोकांच्या मागण्या मान्य होतील असे माझे मत आहे.

"रँड डेली मेल" १-८-१९०७

१. सभा संपल्यावर गांधीजींनी एक मुलाखत दिली. तिचा हा संक्षिप्त वृत्तांत आहे.

१०१. ट्रान्सवॉलमधील लढा

जुलै महिना संपला. ट्रान्सवॉलच्या हिंदी लोकांच्या इतिहासात–कदाचित् दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या इतिहासात–तो महिना संस्मरणीय म्हणून राहील. या महत्त्वपूर्ण महिन्याचा कळस म्हणजे ३१ जुलैची सार्वजनिक सभा. ट्रान्सवॉलच्य कानाकोपऱ्यातून आलेल्या प्रतिनिधींच्या या सभेने दटहुकुमाचा धिक्कार पुनः एकदा एकमताने केला हे पाहून आम्हांस संतोष वाटतो. याचा अर्थ असा की, तुरुंगात जाण्याला सर्व ट्रान्सवॉल एकजुटीने तयार आहे. तथापि काही लोकांना सर्व दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या भवितव्याच्या या लढ्याचे महत्त्व न कळल्याने त्यांनी समाजाचा द्रोह केला. मातृभूमीशी द्रोह करण्याइतके त्यांचे वर्तन भयंकर आहे. पण अशा लोकांची संख्या अत्यंत अल्प आहे. शिवाय त्यांच्यापैकी पुष्कळ लोकांना आपल्या कृत्याबद्दल दुःख वाटत आहे. यापासून धडा घेऊन, आणि एक दोन माणसांचे खरे परवाने खोटे ठरविल्यामुळे, त्यांची जी शोचनीय अवस्था झाली ती लक्षात घेऊन, ट्रान्सवॉलमधील सर्व ठिकाणचे जे हिंदी लोक आपल्या मनात हेलकावे खात आहेत ते खंबीर बनतील अशी आम्हांला आशा आहे. प्रिटोरियाने जे केले त्याहून अधिक चांगले करण्याची पाळी आता पीटर्सबर्ग व इतर जिल्हे यांची आहे. जर तसे घडले तर या लढ्याचा परिणाम एकच होईल आणि तो म्हणजे यशःसिद्धी.

आम्ही प्रिटोरियातील आमच्या शूर मित्रांना सध्या एवढेच सांगू इच्छितो की, जुलैमध्ये तुम्ही जे तेज दाखविले, त्याच तेजाने साध्या किंवा सश्रम तुरुंगवासाला किंवा सरकारच्या इच्छेप्रमाणे कोणत्याही संकटाला धैर्याने तोंड देण्यास तुम्ही तयार असा. आता आपण युद्धाच्या ऐन धुमश्चक्रीत आहो. मागे पाहण्याचा प्रश्नच नाही. आपला लढा न्यायाचा आहे. म्हणून आपल्या पाठीशी जगन्नियंता आहे. आतापर्यंत या लढ्यात सरकार पुष्कळ वेळा खाली उतरले आहे. हे यश म्हणजे आपल्या निश्चयाचे फळ होय. आणखी काय करता येईल यावर आपण मर्यादा घालू शकत नाही. प्रिटोरियाने जे काही कार्य केले त्याबद्दल आम्ही त्याचे मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि जे लोक तुरुंगात आहेत त्यांच्या सहाय्यास ईश्वराने सदैव असावे अशी आम्ही त्याची प्रार्थना करतो.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ३–८–१९०७

१०२. नाताळच्या हिंदी लोकांतील जागृती

नाताळमधील हिंदी लोकांनी जाग्रत राहावे म्हणून आम्ही वारंवार सूचना दिल्या आहेत. आता आम्ही आनंदाने असे म्हणू शकतो की, ते निद्रिस्त नाहीत. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना शक्य त्या सर्व मार्गांनी मदत करण्यासाठी ते पराकाष्ठेचे प्रयत्न करीत आहेत. श्री. दाऊद महंमद, पारशी रुस्तमजी, दादा उस्मान, इस्माइल गोरा, डॉ. नानजी, डॉ. हीरा माणिक इ. कॉंग्रेसनेते डर्बानमध्ये निधी गोळा करण्यासाठी फार परिश्रम करीत आहेत. तसेच श्री. एम्. सी. अंगलिया, अब्दुल कादिर, पीरन महंमद यांनी श्री. तैयब मूसा यांच्यासह मॅरित्सबर्गला भेट दिली आणि दोनच दिवसांत पुष्कळ पैसा जमविला. हा कित्ता गिरवून नाताळमधील सर्व हिंदी लोकांनी आपापल्या विभागात शक्य तितका द्रव्य-निधी उभारावा. कॉंग्रेसचे पुढारी असे कार्यमग्न असताना सर्व-साधारण हिंदी लोक मागे राहिलेले नाहीत. जोहान्सबर्गला रेल्वेने जाणाऱ्या उतारूंवर तीन स्वयंसेवक नजर ठेवीत आहेतच. पण त्याशिवाय श्री. हुसेन दाऊद (श्री. दाऊद महंमद यांचे चिरंजीव), यू. एम्. शेलात, छबिलदास बी. मेहता, रुकनुद्दीन व डी. के. गुप्ते यांनी आपला सारा वेळ कॉंग्रेसच्या कार्यासाठी दिलेला आहे. गेले कित्येक दिवस येथून प्रिटोरियाला एकसारख्या तारा पाठविल्या जात आहेत आणि तेथून येणाऱ्या तारांची उत्कंठेने वाट पाहिली जात आहे. नाताळमधील हिंदी लोकांनी दाखविलेल्या सहानुभूतीवरून ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनी हे जाणले पाहिजे की, आपण आपल्या लढ्यात एकाकी नाही, तर बाहेरचे हिंदी लोक आपल्या पाठीशी निर्भयतेने उभे आहेत आणि शक्य त्या सर्व मार्गांनी साहाय्य करण्यास सिद्ध आहेत.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ३-८-१९०७

१०३. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

[ता. ५ ऑगस्ट १९०७]

पीटर्सबर्गवर संकटाची सावली

परवाना-कचेरीच्या संकटाची सावली आता पीटर्सबर्गवर पडलेली आहे. हिंदी लोक सिंह आहेत का शेळ्या आहेत. हे, हे पत्र छापून होईपर्यंत, कळून येईल. जरी मी हे पत्र सोमवारी लिहीत असलो, तरी मला वाटते, हिंदी लोक सिंह आहेत. परवानाकचेरी, गुलामगिरीचे पट्टे देण्यासाठी, ता. ७ ते १० च्या दरम्यान, पीटर्सबर्गला जाणार आहे. हे कळताच तेथील पुढारी तत्काळ प्रिटोरियाला गेले. अत्यंत जागरूक व उत्साही चिटणीस श्री. हाजी हबीब हे जोहान्सबर्गला धंद्याच्या कामासाठी आले होते. ते ताबडतोब प्रिटोरियाला परत गेले. पीटर्सबर्गच्या पुढाऱ्यांचा आत्मविश्वास कायम ठेवावा हा त्यांचा हेतु. त्या पुढाऱ्यांनी (सरकारचे) आव्हान स्वीकारले आहे, आणि पीटर्सबर्ग येथील परवाना-कचेरीवर संपूर्ण बहिष्कार घालण्याची तयारी केली आहे.

हे संकट पीटर्सबर्गला का गेले? असा प्रश्न सर्वांच्या मनात येईल. याचा दोष पीटर्सबर्गमधील हिंदी लोकांकडे जातो, असे मला दुःखाने म्हटले पाहिजे. ता. ३१ जुलैच्या सुविख्यात सार्वजनिक सभेला ते उपस्थित नव्हते. त्यांची तार मिळमिळीत होती, आणि त्या दिवशी पीटर्सबर्गमधील हिंदी दुकाने उघडी होती. मात्र, त्या वेळी ट्रान्सवॉलमधील सर्व ठिकाणची दुकाने–श्री. खमीसांचे दुकानही–बंद होती. यावरून सरकारने सहजच अनुमान काढले की, पीटर्सबर्गमधील हिंदी लोक गुलामगिरीच्या बेड्या घालून घेण्यास अगदी तयार असतील आणि यमराजाची चिठ्ठी असणारे नोंदणी-पत्र सहज स्वीकारतील. शिवाय, पीटर्सबर्ग येथील हिंदी समाजाच्या बहुसंख्य असणाऱ्या मेमन लोकांच्या नावाला श्री. खमीसा व हाजी इब्राहिम यांनी काळीमा फासला होता. त्यामुळे सरकारला असे वाटले की, पीटर्सबर्गवरील आपला हल्ला यशस्वी होईल आणि हिंदी स्वातंत्र्याचा किल्ला तेथे आपल्या हाती पडेल.

पण पीटर्सबर्गमधील मेमन समाज श्री. खमीसा व हाजी इब्राहिम यांचा कित्ता गिरवील असे मानण्यात सरकारची चूक झाली. हे दोघेही हिंदी गृहस्थ आता पश्चात्ताप करीत आहेत असे मला वाटते. त्यांची नवी नोंदणीपत्रे त्यांना डोईजड झाली आहेत. या सद्गृहस्थांना कोणीही हिंदी माणूस टाळत नसला, किंवा अपाय करीत नसला, तरी ते वाळीत पडल्यासारखे झाले आहेत, आणि त्यांना जनतेची कटु टीका सहन

करावी लागत आहे. म्हणून ते जसे वागले, तसे वागण्याचे धार्ष्ट्य कोणताही हिंदी माणूस करणार नाही. शिवाय, निदान जाहीरपणे तरी ते असे सांगत आहेत की, आमचे हात बरबटले असले आणि तोंड काळवंडली असली, तरी दुसऱ्या कोणी हिंदी माणसाने आमच्यासारखे वागू नये.

प्रिटोरियाला सवलत

सरकारने पीटर्सबर्गहून एक नोटीस काढून असे जाहीर केले आहे की, प्रिटोरिया-तील हिंदी लोकांना नवे परवाने पीटर्सबर्ग येथे घेण्याचे स्वातंत्र्य आहे. माझ्या दृष्टीने तर हे एक बंधनच आहे. मोह ही वाईट गोष्ट आहे. नवी नोंदणी-पत्रे घेणे हा मी गुन्हा समजतो. तो गुन्हा करण्याला त्यांना मोह पाडण्यासाठी सरकारने प्रिटोरियातील हिंदी लोकांकरिता दुसरा दरवाजा उघडला आहे. ही सवलत आहे असे मानणे चूक आहे. हे फक्त जाळे आहे. या मोहाला प्रिटोरियातील कोणताही हिंदी माणूस बळी पडणार नाही अशी माझी खात्री आहे.

करीम जमालचा खटला

करीम जमालच्या खटल्यामुळे[१] नव्या कायद्याला विरोध करण्याचा हिंदी लोकांचा निर्धार अधिक बळकट झाला. त्या कायद्याला मान्यता देणे म्हणजे भिकार सौदा करणे होय[२] हे त्यांना कळून आले आहे. करीम जमाल यांच्यावरील खटला काढून घेण्यात आला आहे. तो खटला भरण्यात चूक झाल्याचे सरकारी वकिलाने कबूल केले आहे. त्यामुळे श्री. करीम जमाल यांना काय फायदा होणार ? त्यांची गैरसोय व्हावयाची ती झाली आणि त्यांना आर्थिक हानीही सोसावी लागली. त्या भारी हानीमुळे व त्रासामुळे वैतागून, त्यांनी नोंदणीचा आपला अर्ज परत घेतला आहे. (त्यांनी यासंबंधी रजिस्ट्रारला पाठविलेले पत्र अन्यत्र छापले आहे, ते पाहावे.)[३] या कायद्याने गरीब लोकांची कशी दुर्दशा होईल याची कल्पना या पत्रावरुन सर्व हिंदी लोकांना येण्यासारखी आहे.

बोटांच्या ठशाला एका गोऱ्याचा विरोध

एका गोऱ्या माणसाला चोरीच्या आरोपावरून पकडण्यात आले आहे. तुरुंगाच्या नियमाप्रमाणे; तुरुंगात पाठविलेल्या माणसाच्या बोटांचे ठसे घेण्याचा अधिकार पोलिसांना आहे. त्या अधिकारान्वये, पोलिसांनी तुरुंगात या माणसाच्या बोटांचे ठसे मागितले. त्याने ते नाकारले. त्याला मॅजिस्ट्रेटपुढे उभे करण्यात आले. तरी त्याने ठसे देण्याचे

१. पाहा : "जोहान्सबर्गचे बातमीपत्र, लेख ९७.

२. मूळ गुजराती वाक्प्रचाराचा अर्थ "झोप देऊन जाग्रण घेणे."

३. हे पत्र येथे घेतलेले नाही.

जोराने नाकारले. ठसे सक्तीने घेण्याचा अधिकार कायद्याने दिलेला नाही. म्हणून मॅजिस्ट्रेटने त्या गोऱ्या इसमाला तीन दिवस एकांतवासाची शिक्षा दिली. त्याने ती शिक्षा हिंमतीने सोसली. पण बोटांचे ठसे दिले नाहीत.

लढ्याला आर्थिक मदत

बॉशबॅंकहून श्री. भट्ट यांनी असोसिएशनला लिहिले आहे की, येथील हिंदी लोक अत्यंत उत्साही आहेत आणि ते निधी गोळा करीत आहेत. हिंदी माणसे तुरुंगात गेल्यानंतर जरूर असणारी सर्व मदत त्यांनी देऊ केली आहे- ही फार चांगली बातमी आहे. या बाबतीत मला हे सांगावयाचे आहे. की, नाताळमध्ये जो पैसा गोळा होईल तो सर्व कॉंग्रेसच्या चिटणिसाकडे पाठवावा. तसेच, अन्यत्र जो पैसा गोळा होईल तो तेथील असोसिएशनकडे द्यावा. एखाद्याने असा पैसा आपल्याजवळ ठेवला किंवा स्थानिक पुढाऱ्याजवळ तो राहिला, तर जरूरीच्या प्रसंगी तो पाठविणे कठीण जाईल. ट्रान्सवॉलहून पैशाच्या ज्या मागण्या येतील, त्या एकाच माणसाकडे याव्यात अशी व्यवस्था व्हावी. आपल्या मोठेपणाचा विचार करण्याची ही वेळ नाही. सर्वांनी फक्त आपले कर्तव्य करावयाचे आहे.

जाहीर सभा

प्रिटोरिया येथील जाहीर सभा अत्यंत यशस्वी झाली. तिच्याशी तुलना केली असता, एम्पायर थिएटर व गेएटी थिएटर यांतील सार्वजनिक सभा काहीच नव्हत. शिवाय मशिदीसारख्या पवित्र इमारतीच्या परिसरात ही सभा भरली, हा आपल्या अंतिम विजयाला शुभ शकुनच होय. " प्रिटोरिया न्यूज "चे संपादक सभेला जातीने उपस्थित होते. इतर सभांना केवळ वार्ताहर उपस्थित होते. त्यापूर्वीच्या दोन सार्वजनिक सभांना पार्लमेंटचे स्थानिक सदस्य उपस्थित नव्हते.

हॉस्केनची उपस्थिती

पार्लमेंटचे एक प्रमुख सभासद श्री. हॉस्केन हे या सभेला उपस्थित होते. त्यांच्या भाषणाने आमचे सामर्थ्य वाढेल. त्यांनी दिला त्याहून निराळा सल्ला ते देऊ शकत नाहीत, हे उघड आहे. जनरल बोथा, जनरल स्मट्स् व श्री. हल यांच्या सूचनेवरून ते सभेला आले होते. यावरून हे दिसते की, जुलै महिन्यातील आपल्या कामाचा प्रभाव सरकारवर पडलेला आहे. जेव्हा दोन पक्षांत लढा सुरू होतो, तेव्हा प्रत्येक पक्ष आपली आत्यंतिक भूमिका अखेरपर्यंत टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतो. त्यांतील जो पक्ष न्यायाचा असेल आणि अखेरपर्यंत टिकाव धरू शकेल तोच विजयी होतो. म्हणून ' काही झाले तरी या कायद्यात दुरुस्ती होणार नाही आणि खुषीची नोंदणी स्वीकारली जाणार नाही ', अशा आशयाचा संदेश सरकारने पाठवावा, यात काही नवल नाही.

आतापर्यंत आमचे म्हणणे कोणी ऐकले नाही. पण आता आम्हांला काय पाहिजे आहे हे जाणून घेण्यास सरकार उत्सुक आहे. आपल्या यशाचे हे पहिले पाऊल आहे असे आपण मानू या.

दुसरे शुभशकून

मशिदीमध्ये सभा भरणे आणि तिला श्री. हॉस्केन यांनी उपस्थित राहणे हा जसा मी एक शुकशकून मानतो, तसाच त्या सभेला श्री. हाजी कासीम यांनी आणलेली बातमी मी मानतो. सध्या तरी सरकार कोणालाही तुरुंगात पाठविणार नाही, ही बातमी काही लोकांना शुभशकून वाटेल. वस्तुतः ही अशुभ बातमी आहे. कारण सरकार जितक्या लवकर आमच्यावर आक्रमण करील, तितक्या लवकर हा प्रश्न सुटेल. पण हा संदेश सभेच्या दिवशीच आला ही मी एक अनुकूल घटना मानतो. सर्वांत शुभशकून म्हणजे ता. ३१ जुलै रोजी आलेली इंग्लंडची तार. दक्षिण आफ्रिका–ब्रिटिश (भारतीय) समितीही सर हेन्री कॅम्बेल–बॅनरमन यांच्या मुलाखतीसाठी प्रयत्न करीत आहे असे त्या तारेत म्हटले होते. या तारेमुळे सर्वांची अंतःकरणे प्रफुल्लित झाली. आपल्याला कमिटीने सोडलेले नाही, हे कळल्याने सर्वांना संतोष झाला.

रूटरला तार

सभा संपल्यावर प्रिटोरियाच्या कमिटीने रूटरला एक लांबलचक तार पाठविली आणि दुसरी तार थेट कमिटीला पाठविली. त्यासाठी सात पौंड खर्च आला. कमिटीने या तारेला उत्तर दिले की, तुमच्या प्रश्नाची चर्चा कॉमन्स सभेत होईल. ट्रान्सवालने मागणी केलेल्या ५०,००००० (पन्नास लक्ष) पौंडांच्या कर्जाच्या वेळी हा प्रश्न उपस्थित होईल. तसे घडले, तर आपला काही लाभ होण्याची आशा आहे. पण अशा आधारावर कोणी फारसे विसंबून राहू नये. यात आपली निराशा झाली तरी आम्हांला त्याचे आश्चर्य वाटणार नाही. महत्त्वाची गोष्ट ही आहे की, सर्व काही स्वतःच्या शक्तीवर अवलंबून आहे. आपण तुरुंगाच्या दारातून बाहेर येईपर्यंत आपली सुटका नाही हे निश्चित समजून असावे.

अधिक मदत

ट्रान्सवालमधील हिंदी लोकांच्या सेवेसाठी मी वैयक्तिक त्याग करण्यास तयार आहे, अशा आशयाचे पत्र श्री. मोतीलाल दिवाण यांनी लिहिले आहे. कोणताही हिंदी माणूस तुरुंगात गेला तर त्याच्या बायका–मुलांची काळजी करण्यास ते सिद्ध आहेत. आणि त्यांचे स्वागत करण्यास चार्लस टाउनला जाण्याची त्यांची तयारी आहे. अशा उदाहरणापासून आपल्याला मोठी मदत मिळेल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १०–८–१९०७

१०४. सी. बर्ड यांना तार

मर्क्युरी लेन
[दर्बान]
ता. ८ ऑगस्ट, १९०७

सी. बर्ड सी. एम्. जी.[1]
पीटरमारित्सबर्ग

बादशहांनी आपल्याला अर्पण केलेल्या सन्मानाबद्दल अभिनंदन.

गांधी

हस्तलिखित कार्यालय-प्रतीवरून
एस्. एन्. ३८७७

१०५. जनरल स्मट्सच्या खासगी चिटणिसास पत्र

जोहान्सबर्ग,
८ ऑगस्ट, १९०७

जनरल स्मट्सचे खासगी चिटणीस,
प्रिटोरिया, यांस .

महाशय,

आशियावासीयांच्या कायद्याच्या दुरुस्ती विधेयकाविरुद्ध चाललेल्या चळवळीला मी जबाबदार आहे असे जनरल स्मट्स यांचे मत आहे, आणि माझ्या या कृतीबद्दल त्यांना तीव्र नापसंती वाटत आहे असे मी अनेक ठिकाणांहून ऐकले आहे. या आरोपाचा अर्थ जर असा असेल की, माझ्या देशबांधवांना या कायद्यामुळे मुळीच संताप आलेला नाही, पण मी त्यांना उगाचच भडकवीत आहे; तर त्या आरोपाचा मी पुरेपूर इन्कार करण्याचे धाडस करतो. उलटपक्षी, त्याचा अर्थ जर असा असेल की,

१. ट्रान्सवालमधील वासाहतिक सचिवाचे खासगी चिटणीस.

मी माझ्या देशबांधवांच्या भावनांना वाचा फोडली आहे आणि या कायद्याचा अर्थ काय आहे हे मी त्यांना शक्य तितक्या अचूकपणे सांगण्याचा प्रयत्न केला आहे, तर त्याची संपूर्ण जबाबदारी मी स्वीकारतो. याहून मी जर कमी काम केले असते तर मी स्वतःशी व स्वदेशाशी बेइमान ठरलो असतो. कारण माझ्या आईवडिलांनी मला उदार शिक्षण दिले आहे आणि (मी स्वतः) आधुनिक इतिहासाचा थोडाफार अभ्यास केलेला आहे.

श्री. डी. विलियर्स यांच्याशी माझा व्यावसायिक स्वरूपाचा संबंध आहे, म्हणून मी त्यांची खासगी मुलाखत घेतली आणि हा बिकट प्रश्न सोडविण्यासाठी बिनसरकारी प्रयत्न करण्याची विनंती त्यांना केली. त्यांनी जनरल स्मट्स यांची भेट घेण्याचे अभिवचन दिले व नंतर त्यासंबंधी मला कळविले; परंतु मी त्यांना समक्ष भेटू शकलो नाही. त्यांनी आपल्या चिटणिसाजवळ मला असा निरोप ठेवला होता की, तुम्ही सुचविल्याप्रमाणे काही सवलत मिळण्याचा संभव फारच कमी असला, तरी तुम्ही जनरल स्मट्स यांना समक्ष भेटावे.

माझ्या देशबांधवांची सेवा करण्यास मी जितका उत्सुक आहे, तितकाच सरकारचीही सेवा करण्यास उत्सुक आहे, असे मला वाटते. सध्याचा प्रश्न अत्यंत गंभीर असून साम्राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे असे माझे मत आहे. म्हणून प्रवेश–निर्बंध बिलात दुरुस्त्या सुचविण्यासाठी मी घाईघाईने ज्या काही सूचना लिहून काढल्या आहेत, त्या सोबत जोडीत आहे. त्यामुळे सरकारचा हेतु पूर्णपणे साध्य होतो आणि आशियावासी कायदा-दुरुस्ती–विधेयकाला मान्यता दिल्यामुळे आपल्याला जो कलंक लागतो असे बरोबर वा चुकीने, माझ्या देशबांधवांना वाटते, तो कलंकही याने पुसला जातो असे माझे नम्र मत आहे.

दक्षिण आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमिटीला जनरल स्मट्स यांनी दिलेल्या उत्तराचा जो सारांश तारेने आला आहे, तो मी पाहिला आहे. त्यात त्यांनी असे विधान केले आहे की, हिंदी लोकांच्या पुढाऱ्यांनी बेपर्वाईचे धोरण स्वीकारलेले असल्यामुळे त्यांच्याशी सहकार्य करणे अशक्य आहे. मी आदरपूर्वक असे सांगतो की, आमच्या धोरणात बेपर्वाई अणुमात्र नाही, तर त्या सर्वशक्तिमान प्रभूच्या इच्छेला पूर्ण शरणागती आहे. नोंदणी–कायद्याने आपल्या पौरुषावर व स्वाभिमानावर जोराचा आघात होतो असे हिंदी लोकांना वाटल्यामुळे त्या कायद्याला मान्यता न देण्याची शपथ त्यांनी ईश्वराला साक्षी ठेवून घेतली आहे.

सोबत जी योजना ज्या भावनेने सादर केली आहे, त्याच भावनेने तिचा स्वीकार होईल अशी मला आशा आहे.

आपला

मो. क. गांधी

[सोबत — योजना]

आशियावासियांच्या-नोंदणी कायद्यासंबंधीच्या अडचणी दूर करण्यासाठी योजना

प्रवेश-प्रतिबंधक बिल अजून परत घेता येईल व दुरुस्त करता येईल आणि मग सर्व अडचणींचा परिहार ते पुढीलप्रमाणे करू शकेल असे आमचे नम्र निवेदन आहे—

(१) बिलाच्या १ ल्या कलमातील "प्रोव्हायडेड" पासून "ॲक्ट"-पर्यंतचे शब्द वगळावेत.

(२) कलम नं. २ मध्ये पुढील शब्द घालावे– 'प्रतिबंधित प्रवेशक' (प्रोहिबिटेड इमिग्रंट्स) यामध्ये, या बिलाच्या अ, ब, क, ड या कलमांखाली येणाऱ्या पुरुष आशियावासियांचा अंतर्भाव होणार नाही. पोटकलम १ यातील अटी पूर्ण होत नसल्या तरीही त्यात आशियायी पुरुषांचा अंतर्भाव होणार नाही.

(अ) १९०२ च्या शांतता संरक्षक वटहुकुमाप्रमाणे किंवा त्याच्या एखाद्या दुरुस्तीप्रमाणे अथवा ता. १ सप्टेंबर १९०० पासून तो वटहुकूम मंजूर होईपर्यंतच्या काळात मिळालेल्या परवान्याआधारे– मात्र तो परवाना लबाडीने मिळालेला नसावा — कोणाही आशियावासी माणसाला या वसाहतीत प्रवेश करण्याचा व राहण्याचा हक्क आहे. मात्र विशिष्ट कालमर्यादेतच येथे राहण्याचा हक्क देणारा परवाना हा या पोट-कलमाच्या दुरुस्तीखाली येणार नाही.

(ब) ता. ३१ मे १९०२ रोजी या वसाहतीत प्रत्यक्ष वास्तव्य करणारा कोणताही आशियावासी.

(क) ता. ३१ मे १९०२ नंतर या वसाहतीत जन्मलेला कोणताही आशिया-वासी-मात्र १९०४ च्या मजूर-आयात-वटहुकुमाप्रमाणे या वसाहतीत आणलेल्या मजुराचे ते मूल असता कामा नये.

(ड) १८८६ साली दुरुस्त झालेल्या १८८५ च्या तिसऱ्या कायद्याप्रमाणे ज्याने ता. ११ ऑक्टोबर १८९९ च्या आधी, ३ पौंड भरले असतील असा कोणीही आशियावासी.

वासाहतिक सचिवाने मुक्रर केलेल्या तारखेआधी, निबंध-विहित तक्त्यामध्ये वास्तव्याचे प्रमाणपत्र अशा आशियावासीयाने मिळविले पाहिजे. या कलमाचा अंमल सोळा वर्षांखालील मुलांवर होणार नाही. १६ वर्षांनंतर त्यांना वास्तव्याचे प्रमाणपत्र घ्यावे लागेल; म्हणजे वर सांगितलेली माफी त्यांना मिळविता येईल.

(३) " आशियावासी " या संज्ञेचा अर्थ १९०४ च्या मजूर–आयात–वट-हुकुमाप्रमाणे, या वसाहतीत आणलेला माणूस नसून १८८५ च्या ३ऱ्या कायद्याच्या पहिल्या कलमात सांगितलेली कोणीही पुरुष व्यक्ती.

(४) फोक्सराड ठरावाने दुरुस्त केलेल्या १८८५ च्या ३ ऱ्या कायद्याच्या क पोटविभागाचे २ रे कलम, १२ ऑगस्ट १८८६ चे १४१९ कलम, १० मे १८९० चे १२८ वे कलम आणि आशियावासीयांच्या कायद्याचे दुरुस्ती विधेयक या कायद्याने रद्द करण्यात येत आहे.

(५) १५ व्या पोटकलमात पुढील शब्द घालावेत– पोटकलमानुसार वास्तव्याच्या प्रमाणपत्राचा नमुना आणि त्यासाठी करावयाच्या अर्जाची पद्धत, तसेच १६ वर्षांखालील मुलांनी वास्तव्याच्या प्रमाणपत्रासाठी करावयाच्या अर्जाची मुदत नोंदली जावी.[1]

इंडियन ओपिनियन, २४–८–१९०७

१. ता. २४–८–१९०७ च्या " इंडियन ओपिनियन 'च्या गुजराती मजकुराच्या स्तंभामध्ये या पत्रव्यवहाराचे भाषान्तर " पत्रांची देवघेव " या नावाने प्रसिद्ध झाले आहे. त्याबरोबरच आपल्या योजनेचा पुढील सारांशही दिलेला आहे :–

प्रवेश-निर्बंध-बिलामध्ये पुढील दुरुस्त्या केल्यास साऱ्या अडचणींचा परिहार होईल असे आमचे निवेदन आहे.

(१) नवा कायदा रद्द करावा.

(२) " प्रतिबंधित प्रवेशक " या संज्ञेमध्ये खरे परवाने धारण करणाऱ्या व तसे परवाने, सांगितलेल्या मुदतीत बदलून घेतलेल्या, इसमांचा समावेश होणार नाही.

(३) ज्या आशियावासी माणसाजवळ परवाना नाही, पण ता. ११ ऑक्टोबर १८९९ पूर्वी डच सरकारला ज्याने ३ पौंड भरले आहेत व वासाहतिक सचिवाने दिलेल्या मुदतीत नेमून दिलेल्या नमुन्याप्रमाणे वास्तव्याचे प्रमाणपत्र घेतले आहे, असा कोणीही आशियायी माणूस.

(४) १६ वर्षांखालील मुलांना परवाने बदलून घेणे भाग पडू नये. १६ वे वर्ष लागल्यावर त्यांनी वास्तव्याचे प्रमाणपत्र घेतले पाहिजे.

(५) " आशियावासी " या शब्दात सर्व आशियावासीयांचा अंतर्भाव व्हावा.

(६) ३ पौंड भरण्यासंबंधीचे कलम गाळावे.

(७) वास्तव्याच्या प्रमाणपत्राचा नमुना आणि त्यासाठी करावयाच्या अर्जाची पद्धत निश्चित करण्याचा अधिकार सरकारला असावा.

१०६. प्रिटोरियाच्या समितीला तार[1]

जोहान्सबर्ग,
[ता. १० ऑगस्ट १९०७ पूर्वी]

[प्रिटोरिया कमिटी,
ब्रिटिश इंडियन असोसिएशन,
प्रिटोरिया]

समितीच्या सभेने तसेच हाइडेलबर्ग, फ्रेनीखन, मिडलबर्ग, क्रूगर्सडॉर्प, व इतर शहरे यांच्या प्रतिनिधींनी गुलामगिरीच्या पट्टयासाठी अर्ज करण्याविषयी तिरस्कार व्यक्त करीत आहो आणि प्रिटोरियातील हिंदी लोकांनी अखेरपर्यंत खंबीर व निष्ठावंत राहावे अशी आग्रहाची विनंती करीत आहो. नाहीतर भेकडपणा व स्वार्थीपणा यामुळे आपल्या बांधवांचा व देशाचा द्रोह होईल. आपण सर्व खंबीर राहिलो तर आपली फत्ते होईलच. प्रिटोरियाने सर्व हिंदी लोकांना स्फूर्तिदायक उदाहरण घालून द्यावे.

ब्रिटिश भारतीय संघ

इंडियन ओपिनियन, १०–८–१९०७

१०७. श्री. हॉस्केन यांचा " अटळपणा "

श्री. हॉस्केन हे गौरेतर वंशांचे मित्र आहेत, अशी त्यांची ख्याती सर्व दक्षिण आफ्रिकेत आहे. द. आफ्रिकेत ज्या थोड्या लोकांजवळ नीतिधैर्य आहे, त्यांपैकी ते एक आहेत. म्हणून प्रिटोरिया येथील हिंदी लोकांच्या इतिहासप्रसिद्ध सार्वजनिक सभेला त्यांनी जो उपदेश केला त्याचा अत्यंत काळजीपूर्वक विचार करणे अवश्य आहे.

१. ही तार ब्रिटिश इंडियन असोसिएशनने पाठविली. ती बहुधा गांधीजींनी लिहिलेली असावी.

जे " अटळ " आहे ते ओळखून, त्याला मान तुकविण्याचे धोरण पौरस्त्य या नात्याने येथील हिंदी लोकांनी स्वीकारावे, असा जो सिद्धान्त श्री. हॉस्केन यांनी मांडला आहे, त्याची आता आपण छाननी करू. श्री. हॉस्केन यांच्या म्हणण्याचा अर्थ असा की, या कायद्याची मागणी ट्रान्सवॉलमधील गोऱ्या लोकांनी केली व येथील पार्लमेंटने त्याला एकमताने मंजुरी दिलेली आहे. म्हणून तो दैवी कायद्याच्या स्वरूपाचा आहे. श्री. हॉस्केन यांच्या या सिद्धांतावर आक्षेप घेणे आम्हांला भाग पडत आहे. या सन्मान्य सद्‌गृहस्थांनी हे कबूल केले आहे की, मला स्वतःला हा कायदा आवडत नाही आणि मला शक्य असते तर मी हिंदी लोकांची मागणी पूर्ण केली असती. तसेच आपल्याला जाचणारी अडचण दूर करण्यासाठी " सविनय प्रतिकार " हा रास्त मार्ग आहे हेही त्यांना कबूल आहे. म्हणून त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे हा कायदा दैवी कायद्यासारखा आहे हे श्री. हॉस्केन यांचे मत धुळीस मिळते. परंतु आम्ही आणखी एक पाऊल पुढे जातो. पौरस्त्य लोकांच्या दृष्टीने, मानवाची कोणतीही कृती, मूलतः न्याय्य असल्याविना, दैवी योजना आहे, असे मानले जात नाही. आणि जेव्हा एखादी पौरस्त्य व्यक्ती वरवर अटळ दिसणाऱ्या गोष्टीला शरण जाते, तेव्हा त्या शरणागतीच्या पाठीमागे नीच स्वार्थीपणाच आढळून येतो, दैवी इच्छा नव्हे. याचा अर्थ असा की, आत्मशक्ती समर्थ असली तरी देहशक्ती दुर्बळ ठरते.

ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनी काय करावे अशी श्री. हॉस्केन यांची अपेक्षा आहे ? त्या देशात जिवंत राहायला मिळावे म्हणून गुलामगिरीच्या कायद्याचा स्वीकार करावा. त्याचा अर्थ असा की, ईश्वराचे भक्त असणारे श्री. हॉस्केन हे हिंदी लोकांना, भौतिक कल्याणासाठी, ईश्वरासमक्ष घेतलेली गंभीर शपथ मोडण्यास व आपला स्वाभिमान गमावण्यास, सांगत आहेत. त्यांच्या प्रभूच्या शब्दात आम्ही उत्तर देतो की, " तुम्ही प्रथम ईश्वराचे राज्य व त्याचा सन्मार्ग यांची कास धरा म्हणजे तुम्हांला सर्व काही मिळेल. " या निंद्य कायद्याला विरोध करण्याने हिंदी लोक " ईश्वरी राज्याची " कास धरीत आहेत, असा आम्हांला विश्वास वाटतो.

श्री. हॉस्केन म्हणतात की, ती शपथ बंधनकारक नाही. कारण ती चुकीने घेतलेली होती. पण हिंदी लोकांनी पूर्ण विचारांती ती गंभीर घोषणा केलेली होती. कायद्याला विरोध करून तुरुंगाला किंवा त्याहून मोठ्या संकटाला तोंड देण्याचा निर्धार त्यांनी केला, तो केवळ स्वतःच्या स्वाभिमानासाठी नव्हे, तर आपल्या प्रियजनांसाठी व आपल्या राष्ट्रासाठी.

श्री. हॉस्केन यांना उपेक्षित कार्याबद्दल जी तळमळ वाटते, तिच्या योगाने ते आशियावासियांच्या प्रश्नाचा अभ्यास करतील, असा आम्हांस विश्वास वाटतो. आणि तसे झाले म्हणजे, ते हिंदी समाजाची सर्व भूमिका मान्य करतील अशी आम्हांस

खात्री वाटते. सरकारचे शांति-दूत या नात्याने ते सभेला गेले. त्यांनी हिंदी लोकांची भूमिका काळजीपूर्वक समजावून घेतली तर, खऱ्या मध्यस्थाचे कर्तव्य ते पार पाडतील याविषयी आम्हांस शंका नाही.

इंडियन ओपिनियन, १०-८-१९०७

१०८. श्री. अली यांचा विरोध[१]

श्री. अली यांनी वृत्तपत्राकडे जे पत्र पाठविले आहे, त्याकडे ट्रान्सवॉल सरकारचे लक्ष आम्ही वेधतो. आशियावासियांच्या वटहुकुमाबाबत लॉर्ड एल्जिन यांच्याकडे गेलेल्या शिष्टमंडळाचे श्री. अली हे सभासद होते हे लक्षात घेतले पाहिजे. त्यांचा विरोध कडवा आहे असे "रँड डेली मेल" म्हणते—आणि तो तसा आहेही. श्री. अली यांची भूमिका कदाचित् आत्यंतिक असेल; पण त्यामुळे, दुसऱ्या कशानेही होणार नाही इतक्या ठसठशीतपणे; या कायद्याने हिंदी समाजाला भोगाव्या लागणाऱ्या यातनांचे दर्शन घडते. हिंदी समाजाचा विरोध हा केवळ भावनात्मक आहे असे म्हटले जाते. श्री. डंकन यांना या कायद्याचा भावार्थ नीट कळला नसल्यामुळे त्यांनी आशियावासियांचा विरोध लक्षात घेऊ नये असे मत व्यक्त केले; पण आम्ही विचारतो की, श्री. अली यांनी स्वीकारलेला मार्ग भावनेतूनच निघालेला आहे काय! श्री. अली एका मूर्ख भावनेच्या आहारी जाऊन उपासमार सहन करीत आहेत असे हिंदी समाजाला तुम्ही सांगणार काय? का, जेथे जेथे ब्रिटिशांचे निशाण फडकते तेथे प्रत्येक ब्रिटिश प्रजाजनाला—मग तो हिंदी असला तरी—व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क आहे, या ज्ञानाचा उदय लॉर्ड एल्जिन यांच्या चित्तावर होईल काय?

इंडियन ओपिनियन, १०-८-१९०७

१. पाहा "श्री. अलि यांचे पत्र" प्रकरण ११३

१०९. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक

सरकारने जाहीर केलेली पीटर्सबर्गसंबंधीची नोटीस ही लोकमत चाचपून पाहण्यासाठी आहे, हे खचित. आशियावासी कायद्याविषयीची संतापाची भावना सार्वत्रिक असून बहुजनसमाजामध्ये पसरलेली आहे, का ती केवळ मूठभर "चळवळ्यांमध्ये" मर्यादित आहे यासंबंधी सरकारची अद्याप खात्री झालेली नसावी असे दिसते. त्या दृष्टीने पाहिले तर, पीटर्सबर्गची नोटीस समर्थनीय आहे. पीटर्सबर्गमधील हिंदी लोकांनी दिलेल्या उत्तरामुळे, जनरल स्मट्सच्या मनात रेंगाळणारे सारे संशय दूर होतील. नोंदणी–कचेरी आपल्या शहरात आली ही आपल्यावर आपत्ती आहे व ती आपण टाळली पाहिजे असे पीटर्सबर्गमधील हिंदी लोकांचे मत आहे. त्यांनी सरकारकडे अर्ज पाठविण्यात जे धैर्य दाखविले त्याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो. पण त्याबरोबरच त्यांना व ट्रान्सवॉलमधील इतर सर्व हिंदी लोकांना आम्ही असा इशारा देतो की, सरकारने तुमच्यासमोर द्वेषाची जी अभेद्य तटबंदी उभी केली आहे तिला खिंडार पाडण्यासाठी तुम्हांला निकराचा लढा दीर्घकाल द्यावा लागेल. स्वतःचे रक्त सांडल्याशिवाय पापाची निष्कृती होत नाही. याचा हिंदी लोकांनी असा अर्थ घ्यावा की, तुरुंगवास, किंबहुना हद्दपारी, सोसल्याशिवाय हिंदी लोकांना स्वातंत्र्य मिळणार नाही. ज्या हक्कासाठी ते लढत आहेत, त्याला आपण पात्र आहोत असे त्यांनी सिद्ध केल्याशिवाय त्यांना ते हक्क मिळणार नाहीत.

इंडियन ओपिनियन, १०–८–१९०७

११०. पुढे काय ?

सार्वजनिक सभा[1] चांगल्या रीतीने पार पडली. प्रिटोरियाने बहादुरी दाखविली. ऑगस्टचे पुष्कळ दिवस निघून गेले. अजून कोणालाही अटक झाली नाही. पुढे काय

१. पाहा : "प्रिटोरियातील भाषण" प्रकरण ९८.

होणार ? असा प्रश्न लोक वारंवार विचारीत असल्याचे आम्ही ऐकतो. प्रिटोरियाच्या नोटिशीच्या आधारे काही कृती करण्याचा इरादा सरकारचा नाही असे दिसते. गुलामगिरीचे पट्टे घेण्याची संधी ट्रान्सवॉलमधील साऱ्या हिंदी लोकांना मिळाल्यानंतरच धरपकडीला सुरुवात करण्याचा सरकारचा इरादा दिसतो. आता पीटर्सबर्ग येथील बहिष्कार यशस्वी होण्याचा संभव आहे. म्हणून आता जर कचेरी उघडावयाची असेल तर ती बहुधा जोहान्सबर्गमध्ये उघडली जाईल आणि नोटिशीची मुदत संपल्यानंतर धरपकडीस सुरुवात होईल. हाती आलेल्या बातम्यांवरून असे दिसते की, सरकारच्या मनात प्रथम पुढाऱ्यांना पकडावयाचे आहे. असा निर्णय खरोखर वास्तववादी होईल. नव्या कायद्याला लोकांचा जो विरोध आहे तो केवळ पुढाऱ्यांच्या चिथावणीने आहे, असा जर सरकारला संशय असेल तर, पुढाऱ्यांना अटक झाल्यानंतरही, हिंदी समाज खंबीर राहिल्यास, तो संशय निराधार ठरेल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १०–८–१९०७

१११. समितीचा लढा

द. आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमिटीने आपला सनदशीर लढा पुन: सुरू केला आहे. सार्वजनिक सभेचा तो परिणाम आहे हे नि:संशय. श्री. रॉबर्टसन् यांच्या प्रश्नाला उत्तर देताना श्री. चर्चिल यांनी सांगितले की, परिस्थिती अत्यंत गंभीर झाली आहे असे साम्राज्य सरकारला वाटते आणि लॉर्ड सेल्बोर्न यांना आपल्याला तारेने सतत माहिती देण्याची सूचना त्यांनी केली आहे. स्वायत्त वसाहतीच्या हक्कांवर आक्रमण करण्याचे सोडून बाकी आमच्या अधिकारातील साऱ्या गोष्टी आम्ही करू, असेही त्यांनी सूचित केले आहे.

शिवाय, हिंदी लोकांच्या हक्कांचे योग्य संरक्षण झाल्याविना ५०००००० (पन्नास लक्ष) पौंडांचे कर्ज ट्रान्सवॉलला देऊ नये अशी सूचना मांडण्याचा आपला हेतु असल्याचे मि. कॉक्स[1] यांनी कळविले आहे.

१. ब्रिटिश पार्लमेंटचे सदस्य. पाहा : खंड ६, लेख ७ खालील तळटीप.

या घटनांवरून असे दिसते की, ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना साम्राज्य सरकार तोंडघशी पाडणार नाही. मात्र त्या हिंदी लोकांनी स्वतःलाच तोंडघशी न पाडले पाहिजे. तुरुंगात जाऊन ते जे सामर्थ्य प्रगट करतील, त्यावरच सारे काही अवलंबून आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १०-८-१९०७

११२. जनरल स्मटस् यांचे उत्तर

द. आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीने जनरल बोथा यांना एक पत्र लिहिले होते. त्याला जनरल स्मटस् यांनी उत्तर पाठविले आहे. त्याचा तारेने आलेला सारांश "स्टार" मध्ये व इतर पत्रांमध्ये आलेला आहे. हे उत्तर एका महिन्यापूर्वीचे आहे आणि म्हणून त्याला फारसे महत्त्व देण्याचे कारण नाही. त्यानंतर पुष्कळच गोष्टी घडल्या आहेत. त्यांच्या परिणामांची कल्पना इतक्यातच येणार नाही. पण एका महिन्यापूर्वी जनरल स्मट्स यांनी पाठविलेल्या उत्तरावरून असे दिसते की, त्यांना शक्य झाले तर ते एकाही हिंदी माणसाला येथे राहू देणार नाहीत, जमिनीच्या मालकीसंबंधीचे हक्क दिले जाणार नाहीत, बोटांचे ठसे जरूर घेतले जातीलच आणि ट्रामचे निर्बंध हिंदी लोकांच्या कल्याणाचेच आहेत! तेच रेल्वेसंबंधी. मग काय राहिले? आणि तरी ते म्हणतात, कायद्याला मान्यता देण्यास हिंदी पुढारी तयार नाहीत म्हणून मी त्यांचा सल्ला घेणार नाही. याचाच अर्थ असा की, हिंदी समाजाला गुलामगिरीत लोटण्यासाठी काय करावयास हवे याचे त्यांना पुरेपूर ज्ञान आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १०-८-१९०७

११३. अलींचे पत्र

श्री. अली यांनी वर्तमानपत्रांना एक पत्र लिहून योग्य कृती केली असे आम्हास वाटते. अली यांची बाजू बळकट आहे. त्या पत्राचा काही ना काही परिणाम इंग्लंड व

दक्षिण आफ्रिका यांमध्ये झाल्याशिवाय राहणार नाही. त्यांनी समितीला पत्र[१] पाठविल्यामुळे जी हानी झाली होती, ती या पत्राने अंशतः दूर झाली आहे. श्री. अली केपटाऊनला जाणार आहेत. ते तेथे, इच्छा असल्यास, देशसेवेचे कार्य करू शकतील. केपटाऊनमधील हिंदी लोकांनी ट्रान्सवॉलमधील लढ्यात भाग घेण्यास सुरुवात केली आहे. या चळवळीत श्री. अली चैतन्य ओतू शकतील. केपटाऊनमध्ये ते चांगला लढा देतील व आमचे तेथील बांधव त्यांची मदत घेतील अशी आम्हांला मनापासून आशा वाटते. या बाबतीत आम्हांला असे सांगावयाचे आहे की, मदत करण्याची इच्छा ज्यांना आहे, त्यांनी तुरुंगाच्या ठरावाला पाठिंबा दिला पाहिजे. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांचे मनोधैर्य बळकट करावे, आणि जे शिक्षा भोगतील त्यांना आर्थिक साहाय्य करावे. यापेक्षा निराळे काही कोणी केले, तर त्याने उपायाऐवजी अपायच होईल.

[गुजरातीवरून]

इंडियन ओपिनियन, १०-८-१९०७

११४. आमचे कर्तव्य

ता. ३१ जुलै रोजी ज्यांनी आपली दुकाने बंद केली नाहीत त्यांची नावे देणारी दोन पत्रे आम्ही या अंकी प्रसिद्ध करीत आहोत. तसेच गुलामगिरीच्या पट्ट्यासाठी ज्यांनी अर्ज केले अशा प्रिटोरियातील लोकांची आमचेकडे आलेली नावेही आम्ही प्रसिद्ध करीत आहोत. ही नावे प्रसिद्ध करताना आम्हांस परमावधीचे दुःख होत आहे; पण जेव्हा मोठा लढा चालू असतो तेव्हा कचखाऊ लोकांची नावे लपविणे योग्य नाही, असे आमचे मत आहे. त्यांच्यापैकी कोणाविषयीही आमच्या मनात क्रोधाची वा द्वेषाची भावना नाही. तथापि, याप्रकारे ती नावे प्रसिद्ध केल्याने आम्ही देशसेवा करीत आहो, असे आम्हांस वाटते. ही वेळ अशी आहे की, जेव्हा हिंदी लोकांनी पराकाष्ठेचे सामर्थ्य आपल्या अंगी आणले पाहिजे आणि स्वार्थाचा समूळ त्याग केला पाहिजे. अशी स्थिती असल्यामुळे, कचखाऊ लोकांची नावे आम्ही प्रसिद्ध करीत आहो, आणि त्यामुळे इतरांना सामर्थ्य मिळेल अशी आशा धरीत आहो. त्या लोकांना काही खुलासा करावयाचा असल्यास व तो संक्षिप्त असल्यास आम्ही तो प्रसिद्ध करू.

१. पाहा "अलींची चूक" (प्रकरण ९०)

ज्यांना आपली चूक कळून आली असेल, त्यांनी पश्चात्तापाचे पत्र पाठविल्यास तेही आम्ही प्रसिद्ध करू. तेही आमचे देशबांधव आहेत आणि म्हणून आम्ही त्यांचे कल्याणच चिंतितो. आमच्या वाचकांचीही त्यांच्याविषयीची भावना अशीच राहील अशी आमची अपेक्षा आहे. आपल्या या लढ्यात क्रोध, द्वेष, अहंकार, स्वार्थ, हिंसा-हे सर्व निरुपयोगी आहेत, एवढेच नव्हे तर, हानिकारकही आहेत.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १०-८-१९०७

११५. केपमधील हिंदी लोक

केपमधील हिंदी लोकांनी कोणत्या मागण्या मांडाव्या याचा विचार आम्ही पुढे करू, असे आम्ही ता. २७ जुलैच्या अंकात म्हटले होते.[1] आता तो विचार करीत आहो.

केपमध्ये ज्या अडचणी सोसाव्या लागत आहेत, त्यांतील एक, प्रवेशकायद्यासंबंधी आहे. एखाद्या हिंदी माणसाला केपबाहेर जावयाचे असेल, तर एक वर्ष चालणारा तात्पुरता पास घ्यावा लागतो. तसा पास कोणी घेतला नाही आणि त्याला इंग्रजी भाषा येत नसेल तर त्याला परत येता येणार नाही. आमच्या मते, असा कायदा हा अत्यंत कठोर आहे. असे "अनुमति-पत्र" घेणे स्वतंत्र व्यक्तीला शोभत नाही. केपमध्ये राहण्याचा हक्क ज्यांनी संपादन केला आहे, त्यांनी एकदा पास घेतला म्हणजे तो कायम चालावयास पाहिजे. एखादा हिंदी व्यापारी एक वर्षाहून अधिक काळ दूर राहिला, तर त्याला आपला धंदा संभाळण्यासाठी केपमध्ये परत येणे अशक्य व्हावे काय ? अशी कालमर्यादा घालणारे कलम रद्द झाले पाहिजे.

शिवाय, तात्पुरता पास घेणाऱ्या माणसाला फोटो द्यावा लागतो. आमच्या मते, बोटांचे ठसे देण्यापेक्षाही फोटो देणे अधिक लांछनास्पद आहे. असे निर्बंध रद्द झाले पाहिजेत.

दुसरा कायदा व्यापाऱ्याच्या परवान्यासंबंधी आहे. परवाना-अधिकाऱ्याच्या निर्णयावर वरिष्ठ न्यायमंडळाकडे अपील करण्याचा हक्क कोणालाही असला पाहिजे.

१. पाहा : "केपमधील हिंदी लोक" (लेख ९१)

तसेच, फेरीवाल्यांनी प्रत्येक वस्तीसाठी वेगळा परवाना घेतला पाहिजे, ही सक्ती नाहीशी झाली पाहिजे. .

पूर्व लंडनमध्ये जारी असलेले पायवाटा व वस्त्या यासंबंधीचे खास निर्बंध दुरुस्त केले पाहिजेत. तसेच हिंदी समाजासाठी पुरेशा शैक्षणिक सवलती मिळाव्यात यासाठीही खटपट केली पाहिजे.

वरील प्रश्नासंबंधी जे कोणी समाधानकारक उत्तर देतील अशाच उमेदवारांना मते द्यावीत, आणि तसा कोणी उमेदवार नसल्यास, हिंदी लोकांनी आपला मतांचा अधिकार मुळीच न बजवणे, हे त्यांचे गौरवास्पद कर्तव्य आहे, असे आमचे मत आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १०-८-१९०७

११६. एस्टकोर्टचे अपील

नगरपालिकेच्या मताधिकाराबाबत केलेले अपील जिंकल्याबद्दल एस्टकोर्ट येथील हिंदी लोकांचे आम्ही अभिनंदन करतो. एस्टकोर्ट येथील स्थानिक संस्थांच्या निवडणुकात मत देण्याचा अधिकार हिंदी लोकांना आहे, असा निर्णय या अपिलाने दिला आहे. एकच प्रश्न बाकी आहे व तो म्हणजे विशिष्ट किंमतीची मालमत्ता अर्जदाराजवळ आहे की नाही. या यशाचा मोठा गाजावाजा करण्याचे कारण नाही. कारण अद्याप नगरपालिकांच्या बिलाचा विचार इंग्लंडमध्ये चालू आहे; पण त्या बिलाला तेथील सरकारची संमती मिळणार नाही असे दिसते. त्यासाठी समितीच्या प्रयत्नांना आपण धन्यवाद दिले पाहिजेत. तरीसुद्धा ज्यांनी अर्ज केले आहेत त्यांनी आपली नावे मतदारांच्या यादीत नोंदून घ्यावीत. याहून अधिक काही करणे इष्ट होईल असे आम्हांस वाटत नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १०-८-१९०७

११७. रॉस यांचे पत्र

नाताळ रेल्वेचे जनरल मॅनेजर श्री. रॉस यांनी हिंदी समाजाला खडखडीत नकाराचे पत्र पाठविले आहे. असे पत्र मिळाल्याबद्दल त्या समाजाचे आम्ही अभिनंदन करतो. कारण, आपल्या धर्माचा अपमान ते जितका अधिक करतील आणि आपल्या कातडीच्या रंगाची तुच्छता ते जितकी अधिक दाखवतील, तितका आपला लढा अधिक जोराचा होईल. मात्र आपली बाजू रास्त पाहिजे. रॉस यांच्या पत्रावरून, दक्षिण आफ्रिकेत आपण किती शोचनीय अवस्थेस पोहोचलो आहो, हे स्पष्ट होते. आपले सयुक्तिक हक्क आपल्याला मिळाले नाहीत, तर आपण आपल्याच संपत्तीखाली चिरडले जाऊ. समंजस माणसाला सन्मानाविना संपत्ती शल्यवत् भासते. सहारा वाळवंटामध्ये एखादा माणूस खिशात सोन्याच्या लगडी घालू लागला, पण त्याला कोठे पाण्याचा थेंब मिळाला नाही, तर ते सोने त्याला विषवत् वाटेल; त्याचप्रमाणे या देशात स्वाभिमानाशिवाय संपत्ती बाळगणे हे खरोखर विषच आहे. श्री. रॉस यांच्या पत्रासंबंधी आपण आताच काही कृती करण्याची गरज आहे, असे आम्हांस वाटत नाही. आमच्या मताप्रमाणे, ट्रान्सवॉल-मधील लढ्याच्या परिणामावर असे प्रश्न सुटणे अवलंबून आहे. आपले मौलवी व ख्रिस्ती आणि हिंदु धर्मोपदेशक यांच्यासाठी पुनःपुनः विनंती केली तर त्यांना अर्ध्या दराने सवलतीची तिकीटे मिळण्याचा संभव आहे. पण सवलतीची तिकिटे मिळतात की नाही हा महत्त्वाचा प्रश्न नाही. खरा प्रश्न हा आहे की, गोऱ्या लोकांच्या दृष्टीने आपण कःपदार्थ आहोत. साऱ्या कटकटींचे मूळ आहे ते हे. (त्यांच्या दृष्टीने) आपल्याला काही महत्त्व यावे म्हणून ट्रान्सवॉलमधील लोकांना एकच मार्ग मोकळा आहे. आणि तो म्हणजे अखेरपर्यंत निकराचा लढा देणे — त्यासाठी मृत्युही पत्करणे — आणि प्रतिष्ठा प्राप्त करून घेणे. तसे झाले म्हणजे आपल्याला प्रत्यक्ष मताधिकार मिळाला नाही, तरीसुद्धा मताधिकार असलेल्या लोकांची बरोबरी आपण करू शकू.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १०–८–१९०७

११८. दर्बानच्या कृषि–समितीचा क्षुद्रपणा

दर्बान येथील प्रदर्शनामध्ये भाग घेण्यास प्रदर्शन–समितीने हिंदी लोकांना मनाई केली आहे, असे आमच्या इंग्रजी विभागामध्ये एका हिंदी व्यापाऱ्याने लिहिले आहे. ही मनाई अत्यंत वाईट आहे. हिंदी लोकांच्या उद्योगाची भीती गोऱ्यांना वाटते हे आम्हांस माहीत आहे. हिंदी लोकांच्या कौशल्याचेही त्यांना भय वाटते असे दिसते. म्हणून ते गवाणीतील कुत्र्यासारखे वागत आहेत. ते स्वतः गवत खात नाहीत आणि दुसऱ्याला खाऊ देत नाहीत. कमिटीच्या या वर्तनावरून हे स्पष्ट होते की, आपण सन्मान व प्रतिष्ठा संपादन करणे हेच आपले आता एकमेव कर्तव्य होय. आणि ते पार पाडणे सध्या तरी ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या हातात आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १०–८–१९०७

११९. उमर हाजी आमद झवेरी

ता. १८ जूनच्या "अखबारे सौदागर[१]" वरून असे कळते की, श्री. उमर झवेरी[२] यांनी मुंबईत उत्तरताक्षणी हिंदी लोकांच्या कार्यासाठी प्रयत्न सुरू केला. श्री. झवेरी यांच्या सन्मानार्थ श्री. जगमोहनदास सामळदास यांनी आपल्या बंगल्यावर मेजवानी दिली. त्यावेळी दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या परिस्थितीचा स्पष्ट वृत्तांत श्री. झवेरी यांनी निवेदन केला. त्या पत्राच्या वातमीदाराला त्यांनी दिलेली मुलाखत त्या पत्राने तीन स्तंभांत छापली आहे. तिच्यामध्ये, आपल्याला येथे भोगाव्या लागणाऱ्या साऱ्या अडचणींचे स्वच्छ प्रतिबिंब उमटलेले आहे. आणि त्या अडचणींचा परिहार होण्यासाठी दक्षिण अफ्रिकेतील हिंदी लोक हिंदुस्थानातील ३० कोटी हिंदी

१. मुंबईत प्रसिद्ध होणारे एक गुजराती वर्तमानपत्र.
२. नाताळ इंडियन कॉंग्रेसचे पूर्वीचे सन्मान्य संयुक्त चिटणीस. पाहा : खंड ६, प्रकरण ४६०.

लोकांवर अवलंबून आहेत हे त्यांनी निदर्शनास आणले आहे. श्री. उमर झवेरी यांनी आपल्या भाषणात आपला मनोदय असा सांगितला की, माझ्या देशाची सेवा करण्यासाठी मी बॅरिस्टर होणार आहे.

या सर्वांवर टीका करताना, " अखबारे सौदागर "च्या संपादकांनी, श्री. उमर झवेरी यांच्या मागणीला पाठिंबा दिला आहे आणि हिंदुस्थानातील लोकांनी मदतीचा हात पुढे करावा म्हणून विनंती केली आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १०–८–१९०७

१२०. एका पारशी स्त्रीचे धैर्य

श्रीमती भिकाईजी रुस्तुमजी के. आर. कामा यांनी " सोशियालॅजिस्ट " मध्ये एक पत्र लिहिले आहे व ते " जामे जमशेद "ने उद्धृत केले आहे. त्यातून घेतलेल्या पुढील ओजस्वी शब्दांकडे आम्ही ट्रान्सवॉलमधील आमच्या वाचकांचे लक्ष वेधतो :

हिंदुस्थानातील स्त्री-पुरुषांनो ! मी काय म्हणत आहे त्याकडे लक्ष द्या आणि या दुष्ट कायद्याला विरोध करा. " ज्यांनी आपले स्वातंत्र्य गमावले, त्यांनी आपले अर्धे गुण गमावले " अशा अर्थाची एक जुनी म्हण आहे. म्हणून स्वातंत्र्यासाठी, न्यायासाठी व सत्यासाठी झुंजण्यास पुढे या. हिंदुस्थानातील लोकांनो! अशा गुलामगिरीत जिणे कंठण्यापेक्षा सर्व राष्ट्र नामशेष होणे फार चांगले, अशी खूणगाठ तुम्ही आपल्या मनाशी बांधा. रजपूत, शीख, पठाण व गुरखा हे नेडर लोक, मराठे व बंगाली यांच्यासारखे देशाभिमानी लोक, उत्साही पारशी व शूर मुसलमान, तसेच नम्र जैन व सहिष्णु हिंदू–हे सारे एका महान राष्ट्राचे संतान आहेत. तुम्ही आपल्या प्राचीन इतिहासाला साजेल अशा पद्धतीने का राहात नाही ? गुलामगिरीत का राहाता ? आगे बढो !

श्रीमती भिकाईजी कामा यांना राजकीय जीवनाचा अनुभव वीस वर्षांहून अधिक आहे. सध्या त्या पॅरिसमध्ये राहातात. देशभक्तीचा उत्साह त्यांच्यामध्ये ओतप्रोत भरलेला आहे. त्यांचे वरील शब्द हिंदुस्थानला उद्देशून असले, तरी सांप्रत ते ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनाही लागू आहेत.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १०–८–१९०७

१२१. हमीदिया इस्लामिक सोसायटीमधील भाषण[1]

जोहान्सबर्ग,

ता. ११ ऑगस्ट, १९०७

हमीदिया इस्लामिक सोसायटी ही संस्था गेले सुमारे दोन महिने दर आठवड्याला सभा भरवून जनतेमध्ये धैर्य व उत्साह उत्पन्न करीत आहे. प्रिटोरियातील सार्वजनिक सभेच्या वेळी तेथील नागरिकांना मदत करण्यासाठी या संस्थेने खास गाडीने ६०० (सहाशे) लोक पाठविले होते. त्यामुळे या संस्थेने हिंदी समाजावर मोठे ऋण करून ठेवले आहे. ही संस्था आपले उपयुक्त कार्य चालू ठेवील अशी आम्हांस आशा आहे. प्रिटोरियातील काही लोकांनी आपली नावे नोंदविली असली तरी त्यांना त्याचा आता पश्चात्ताप होत आहे. त्यामुळे आमच्या योजना ढासळल्या नाहीत. प्रिटोरियातील लोकांनी आमचा लौकिक कायम ठेवला आहे. आणि पीटर्सबर्गच्या लोकांनी तर त्याहून चांगली कामगिरी बजावली आहे. तेथील एकाही माणसाने आपले नाव नोंदवले नाही हे अभिनंदनीय आहे. सरकारला जेथे कच्ची जागा आढळते, तेथे ते नोंदणी-कचेरी[2] उघडते. पीटर्सबर्ग येथील लोक कच्चे आहेत आणि ते सार्वजनिक सभेला हजरही राहिले नाहीत, असेही श्री. चॅमनी यांना सांगण्यात आले असावे, असे मला वाटते. म्हणून सरकारने तेथे कचेरी उघडली. पण सुदैवाने श्री. जुसब हाजी वली आणि इतर मंडळी एकत्र आली आणि त्यांनी नोंदणीस जोराने नकार दिला. आम्ही फक्त खुषीने नोंदणी करू असे त्यांनी सांगितले. सरकारने आम्हांला हद्दपार केले किंवा तुरुंगात टाकले तरी या विषारी कायद्याला आम्ही मान्यता देणार नाही असे त्यांनी सांगितले. आता सरकार ढिले पडू लागल्याची चिन्हे दिसत आहेत. कारण, पीटर्सबर्गच्या तुरुंगात असलेल्या दोन माणसांना कोणत्या तरी मार्गाने आपल्या बोटांचे ठसे देण्यास सरकारने वळविले आहे. हेही लांच्छनास्पद आहे.

"जूट वॉसबर्ग रिव्ह्यू"ने लिहिले आहे की, हिंदी समाज चतुर व समर्थ आहे. त्याच्याशी काळजीने वागले पाहिजे. आमची लंडनमधील समितीही अलिकडे जोराने

१. हमीदिया इस्लामिक सोसायटीच्या एका सभेत गांधीजींनी नोंदणी-कायद्याविरुद्ध चाललेल्या लढ्याचा वृत्तांत सांगितला. त्या भाषणाचा हा सारांश आहे.

२. 'परवाना-कचेरी' असाही याचा उल्लेख आढळतो.

कार्य करीत आहे. हा सर्व त्या सार्वजनिक सभेचा परिणाम आहे. सर्व बाजूंनी आता आम्हांस मदत मिळत आहे. तरीसुद्धा आपल्यापैकी काही लोकांना तुरुंगात जावे लागेल हे आपण ध्यानात धरले पाहिजे. तसे झाल्यास बहुधा मीच प्रथम पकडला जाईन. हेच इतर पुढाऱ्यांच्या बाबतीत होईल. पण सरकारने माझ्यावर व इतर पुढाऱ्यांवर हात टाकला, तरीसुद्धा तुम्ही आतापर्यंत दाखविले तेच धैर्य पुढेही टिकवून धरले तर आपण विजयी खचित होऊ. सरकार आपल्याला परवान्याची भीती घालत आहे. पण ते चूक करीत आहे. आपण विनापरवाना व्यापार चालवू शकतो. त्यामुळे ते आपल्याला दंड करतील, आणि तो न दिल्यास तुरुंगात टाकतील. पण आपल्याला हद्दपार करण्याचा हक्क परवाना-कायद्याने सरकारला दिलेला नाही म्हणून त्याची भीती बाळगण्याचे कारण नाही. आता नोंदणी-कचेरी पॉचेफस्ट्रूम व क्लार्क्सडॉर्प येथे जाईल. तेथील हिंदी लोकांनी बोलावले तर आम्ही तिकडे जाऊ, नाही तर जाण्याची गरज नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १७–८–१९०७

१२२. पीटर्सबर्गमधील हिंदी लोकांना तार[१]

[जोहान्सबर्ग
ता. ११ ऑगस्ट, १९०७]

पीटर्सबर्गमधील हिंदी लोकांचे उज्ज्वल व निर्मल कार्य आणि शौर्यशाली भूमिका याबद्दल अभिनंदन. अखेरपर्यंत आपण खंबीर राहिलो तर ईश्वर आपल्याला यश देईल.

[हमीदिया इस्लामिक सोसायटी]

इंडियन ओपिनियन, १७–८–१९०७

१ ता. ११ ऑगस्ट रोजी गांधीजींनी हमीदिया इस्लामिक सोसायटीच्या सभेत एक भाषण केले. त्या सभेत असे ठरले की, पीटर्सबर्ग व पॉचेफस्ट्रूम येथील हिंदी लोकांना तारा पाठवाव्यात. या तारा बहुधा त्यांनीच लिहिल्या असाव्यात.

१२३. पॉचेफस्ट्रूम मधील हिंदी लोकांना तार[1]

[जोहान्सबर्ग
ता. ११ ऑगस्ट, १९०७]

परवाना–कचेरीच्या प्लेगपासून तेथील हिंदी लोक दूर राहतील अशी आशा आहे. त्या कचेरीच्या स्पर्शाने आपली राष्ट्रीयता भ्रष्ट होईल आणि आपल्या धर्मावर आघात होईल.

[हमीदिया इस्लामिक सोसायटी]

इंडियन ओपिनियन १७–८–१९०७

१२४. "रँड डेली मेल"ला पत्र

जोहान्सबर्ग
ता. १२ ऑगस्ट, १९०७

संपादक,
[रँड डेली मेल] यांस

महाशय,

"हिंदी लोक आपले ऋण फेडणार नाहीत." या भडक मथळ्याने आपण आशियावासियांच्या कायद्यावरील आपल्या खास लेखाचा प्रारंभ केला आहे. लेखातील संयमपूर्ण भाषेवरून असे दिसते की, तो वाईट हेतूने लिहिलेला नाही. त्याच-

१. ता. ११ ऑगस्ट रोजी गांधीजींनी हमीदिया इस्लामिक सोसायटीत एक भाषण केले, त्या सभेत असे ठरले की, पीटर्सबर्ग व पॉचेफस्ट्रूम येथील हिंदी लोकांना तारा पाठवाव्यात. या तारा गांधींनीच बहुधा लिहिल्या असाव्यात.

बरोबर, जी केवळ दंतकथा आहे असे दिसते, ती प्रसिद्ध करण्यापूर्वी आपण हिंदी समाजाच्या पुढाऱ्यांची भेट घेतली असती तर तें अधिक चांगले झाले असते, आणि आपल्या वाचकांना अधिक उपयुक्त ठरले असते हे खास. कारण, त्या पुढाऱ्यांची मते तुम्हांला माहीत नव्हती हे उघडच आहे.

"ज्या हिंदी माणसाला सविनय प्रतिकाराबद्दल तुरुंगात टाकले जाईल किंवा त्याचा व्यापाराचा अथवा फेरीवाल्याचा परवाना काढून घेतला जाईल, तो आपले कर्ज देण्याचे नाकारील," अशा आशयाचे विधान एकाही प्रतिष्ठित हिंदी माणसाने केल्याचे मला माहीत नाही, हे मी आपल्याला सांगू इच्छितो. असे विधान आमच्या लढ्यातील तत्त्वाशी पूर्ण विरोधी होईल. हा लढा आम्ही हाती घेतला आहे तो केवळ ईश्वरावर सर्व भार टाकून—स्वतः क्लेश भोगण्याच्या दृष्टीने. म्हणून आमचे न्याय्य ऋण झुगारून देण्याचा विचार मनात आणणे हे दुष्टपणाचे ठरेल. मुसलमान असोत वा हिंदु असोत, त्यांची अशी श्रद्धा आहे की, या जन्मी न फेडलेली ऋणे पुढील जन्मी कठोर शिक्षेसह फेडावी लागतील. त्या महान "निर्णय–दिनी," आम्हांला आमच्या पापांचा जाब द्यावा लागेल—आणि त्यामध्ये कर्ज न फेडणे हे काही लहान-सहान पाप नाही.

सर्व बाजूंनी जोर करण्याची आमची इच्छा खास आहे. आम्हांला वसाहत-वाल्यांची आणि सरकारचीसुद्धा सहानुभूती हवी आहे, आणि साम्राज्य सरकारचे संरक्षण पण हवे आहे हे खचित. पण त्यासाठी स्वच्छ व प्रामाणिक अशी जी साधने काटेकोरपणे मानली जाणार नाहीत, ती वापरण्याची आम्हांला मुळीच इच्छा नाही. आमच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर व प्रतिष्ठेवर जो अकारण आघात करण्यात आला आहे, त्याच्यापासून आपला बचाव करण्याचे आमचे एकमेव शस्त्र म्हणजे द. आफ्रिकेतील जनता व महान् साम्राज्याचे नागरिक (त्यांचे घटक गोऱ्याइतकेच आम्हीही आहोत असा आमचा दावा आहे.) यांना असे दाखवून द्यावयाचे की, आम्हांला मनापासून जो महान् अन्याय वाटतो तो दूर करण्यासाठी स्वतः क्लेश भोगणारी माणसे आम्ही आहोत.

चाईचाईने मला जितक्या व्यापारी बंधूंची भेट घेता आली तितक्यांची मी घेतली. ते म्हणजे, श्री. एम्. सी. कमरुद्दीन अँड कंपनी, एम. एस्. कुवाडिया, एम. ए. करोडिया, ए. एफ. कमे अँड कंपनी, आमद मूसाजी अँड कंपनी, एम. पी. फॅन्सी, महंमद हुसेन अँड कंपनी व जुसब इब्राहीम. आणि आम्ही लोकांनी गेल्या महिन्या-पासून आतापर्यंत जवळजवळ १८००० (अठरा हजार) पौंड येथील व लंडनच्या ठोक व्यापारी पेढ्यांना पोचते केले आहेत. आकस्मिक अडचणींचा विचार करून आमच्या-पैकी काहीजणांनी तर आपली कर्जे पूर्ण होण्याच्या आधीच भरली. या लढ्यामुळे आमच्यापैकी पुष्कळांनी आपल्या मालाच्या मागण्या रद्द केल्या हे खरे, आणि तसे

करणे त्या घाऊक व्यापाऱ्यांना व आम्हांलाही न्यायाचेच आहे. त्यामुळे त्या घाऊक व्यापाऱ्यांना आमच्याबरोबर काही हानी सोसावी लागली, याबद्दल आम्हांला खेद वाटतो, पण ते अपरिहार्य आहे.

आपला,
ईसॉप इस्माईल मियाँ
सुलेमान इस्माईलमियाँ अँड कंपनीचे कार्यकारी भागीदार
व
ब्रिटिश इंडियन असोसिएशनचे हंगामी अध्यक्ष.

"रँड डेली मेल", १३-८-१९०७

१२५. जनरल स्मट्स् यांच्या खासगी चिटणिसाला पत्र

जोहान्सबर्ग,
ता. १५ ऑगस्ट, १९०७

जनरल स्मटस् यांचे खाजगी चिटणीस,
प्रिटोरिया, यांस,
महाशय,

आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाबाबत मी आपल्याला या महिन्याच्या ८ तारखेस लिहिलेल्या पत्राचे आपण ता. १४ रोजी पाठविलेले उत्तर मला मिळाले, संबंधित कायद्यासंबंधीचे आपले विचार जनरल स्मट्स यांनी मोकळेपणाने मांडले याबद्दल मी त्यांना धन्यवाद देत आहे.[१]

१. जनरल स्मटसच्या खासगी चिटणिसाने आपल्या पत्रात इतर मजकुराबरोबर लिहिले होते की, "...प्रवेश निर्बंध बिलाला तुम्ही ज्या दुरुस्त्या सुचविल्या आहेत त्या श्री. स्मट्स स्वीकारू शकत नाहीत, असे आपल्याला कळविण्याचा आदेश मला मिळालेला आहे. त्या दुरुस्त्या स्वीकारणे शक्य झाले असते तर त्यामुळे १९०७ च्या आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाच्या तरतुदी पूर्णपणे रद्दबातल झाल्या असत्या. शिवाय बिलाच्या त्या अवस्थेत त्या दुरुस्त्या स्वीकारणे अशक्य आहे......आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाच्या योजना वसाहतिक सचिव पूर्णपणे अंमलात आणील. या देशात राहाणाऱ्या हिंदी लोकांच्या प्रतिकाराचे परिणाम आज त्यांना गंभीरपणे दिसत नसले तरी यापुढे ते त्यांना भोगावे लागतील आणि त्याचा दोष ते स्वतः व त्यांचे पुढारी यांच्याकडेच जाईल."

माझे नम्र मत असे आहे की, मी सुचविलेल्या दुरुस्त्यांमुळे आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाचे मूळ तत्त्व अमलात येईल. ते तत्त्व म्हणजे या वसाहतीत राहाण्याचा हक्क असलेल्या प्रत्येक आशियावासीयाची ओळख पटविणे.

या कायद्यासंबंधी हिंदी लोकांनी जी गंभीर घोषणा केली आहे, तिच्याकडे मी जनरलसाहेबांचे लक्ष वेधतो. माझ्या देशबांधवांना सल्ला देण्याच्या स्थितीत मी जोपर्यंत आहे तोपर्यंत, त्यांनी बुद्धिपुरस्सर केलेल्या घोषणेपासून च्युत होण्यास मी त्यांना कदापि सांगणे शक्य नाही—मग त्याचे परिणाम काहीही होवोत. जर ऐन वेळी जनरल स्मटस् यांना कायद्याच्या मर्यादेवर अतिक्रमण न करता या घोषणेचा मान राखणे शक्य झाले, तर मी त्यांची सहानुभूती व सहाय्य यांची याचना करतो. या वसाहतीच्या कायदे-बुकात प्रवेश-निर्बंध बिल दाखल झाले, तर प्रत्येक हिंदी माणूस तुरुंगात जाण्याला पात्र ठरेल आणि व्यापारी व फेरीवाले हे व्यापाराचे परवाने गमावण्यास पात्र ठरतील व पुढारी हद्दपार होण्यास पात्र ठरतील असा सल्ला मी माझ्या देशबांधवांना दिला आहे. त्याचे संभाव्य परिणाम काय होतील याकडे मी कधीच डोळेझाक केलेली नाही. पण मी माझे मत आदरपूर्वक व्यक्त करतो की, या कायद्याला मान्यता न दिल्याने जे काही घडेल त्यापेक्षा अत्यंत वाईट स्थिती या कायद्याला मान्यता दिल्याने होईल.

माझ्या दृष्टीने हा पत्रव्यवहार म्हणजे जनरल स्मट्स यांना केलेली वैयक्तिक विनंती आहे आणि म्हणून खासगी आहे. पण, सरकारचे हेतु माझ्या देशबांधवांपुढे शक्य तितक्या अचूकपणे व विस्तृतपणे मांडण्यास मी उत्सुक असल्याने, जनरल स्मट्स यांची हरकत नसेल तर, हा पत्रव्यवहार मी प्रसिद्ध करू इच्छितो.[1]

आपला,

मो. क. गांधी.

इंडियन ओपिनियन, २४-८-१९०७

१. हा पत्रव्यवहार २४-८-१९०७ च्या "इंडियन ओपिनियन" मध्ये "इंडियन ओपिनियनला पत्र" (लेख १३५) या नावाने प्रसिद्ध झाला आहे.

१२६. हिंदी लोकांच्या ठरावाचा भावार्थ

परवाना–कचेरी ट्रान्सवॉलमध्ये गावोगाव भटकत आहे, अधिकारी लोक दलाला-प्रमाणे घरोघर फिरत आहेत आणि नव्या कायद्याप्रमाणे नोंदणी करून घेण्यास लोकांना भुलवीत व वळवीत आहेत. शिवाय, आमच्या मागण्या काय आहेत हे जाणण्यासाठी ते लोकांना छेडीत आहेत. म्हणून खुशीची नोंदणी म्हणजे काय हे प्रत्येक हिंदी माणसाला समजणे अवश्य आहे. सर्वसामान्य माणसांची अशी परीक्षा होत आहे हे पाहून आम्हांस आनंद वाटतो. नवा कायदा असा आहे की, त्याचा अर्थ प्रत्येक हिंदी माणसाला स्वच्छपणे कळला पाहिजे आणि त्यासंबंधी त्याने स्वतंत्रपणे निर्णय केला पाहिजे. लोकांची परीक्षा घेतली जात आहे यात काही आश्चर्याचे नाही. पण योग्य उत्तर देण्यास आपण चुकलो तर ते मात्र आश्चर्याचे होईल हे खचित. म्हणून खुशीच्या नोंदणीचा भावार्थ आपण विचारात घेऊ.

केवळ कायद्याचा विचार केला तर, सरकार नवी नोंदणी करण्यास लोकांवर सक्ती करू शकेल, एवढेच नव्हे तर ती नोंदणी-पत्रे वारंवार बदलून घेण्याचाही आग्रह धरू शकेल. खेरीज, केव्हाही बोटांचे ठसे देणे लोकांना भाग पडेल. मुलांच्या बोटांचे ठसेही द्यावे लागतील. परवाना घेण्याच्या वेळी बोटांचे ठसे द्यावे लागतील. थोडक्यात म्हणजे, या नव्या कायद्याच्या आक्षेपार्ह योजना आणि त्यांस धरून केलेले निर्बंध यांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार सरकारला दिलेले आहेत. पण आम्हांला हे मान्य होण्यासारखे नाही. त्याऐवजी, सरकारचा संशय दूर करण्यासाठी आम्ही असे म्हणतो की, आमच्या सध्याच्या परवान्याऐवजी नवे परवाने घेण्यास आम्ही राजी आहोत. या रीतीने जे लोक आपले परवाने खुशीने बदलून घेतील त्यांना नवा कायदा लागू होऊ नये—त्यातील एकही कलम आम्हांला लागू नसावे. म्हणजे आम्हांला केव्हाही बोटांचे ठसे द्यावे लागू नयेत. याप्रकारे प्रत्येक हिंदी माणसाने स्वेच्छेने नवी नोंदणी केली, तर हा आक्षेपार्ह कायदा पूर्णपणे निरर्थक होईल. मग तो, फक्त जो हिंदी माणूस अनवधानाने किंवा मुद्दाम आपला परवाना बदलून घेणार नाही, त्यालाच लागू होईल. अशा प्रकारे आमची मागणी आणि सरकारी कायदा यामध्ये फार तफावत आहे. सरकारी कायद्याला मान्यता देणे म्हणजे गाढवावर बसणे होय. ते हिंदी समाजाने केले तर त्याची जगात नाचक्की होईल. आमची मागणी म्हणजे हत्तीवर बसणे होय. त्यामुळे आपल्याला सन्मान व राजेशाही वैभव प्राप्त होईल.

या मागणीशिवाय, प्रिटोरियातील काही सज्जनांनी श्री. स्मट्स यांना वकिला-मार्फत एक पत्र पाठविले आहे. त्याचा विचार आता आपण करू. या कायद्याला काही दुरुस्ती करण्याची मागणी त्यांनी श्री. स्मट्स यांच्यापुढे ठेवली आहे. एकंदर प्रश्नाच्या मानाने ती कःपदार्थ आहे असे आम्हांस वाटते. एखाद्या माणसाला भगंदर झाले असताना ते साधे करट मानून बाह्य उपचार केले तर तात्पुरते बरे वाटेल आणि त्या रोग्यालाही आपला रोग समूळ गेल्यासारखे भासेल, पण खरोखर तो रोग जिवंतच असतो. आणि थोड्याच दिवसांत दुसरीकडे नवे करट उद्भवल्यास त्या भ्रांत रोग्याला धक्का बसतो. जोपर्यंत तो भगंदरावर उपचार करीत नाही, तोपर्यंत करटे उगवत राहातील व मावळत राहातील. वरील पत्राची स्थिती अशीच आहे असे आम्हांस वाटते. नवा कायदा भगंदरासारखा आहे. त्यातील २–३ गोष्टी गाळण्याची मागणी या पत्राने केली आहे. त्याने तो रोग नाहीसा होणार नाही, त्याने फक्त तात्पुरते बरे वाटेल, पण एकंदरीत अपायच होईल. शस्त्रवैद्याच्या मोठ्या शस्त्रक्रियेशिवाय भगंदरासारखा हा कायदा पूर्णपणे बरा होणार नाही, हे प्रत्येक हिंदी माणसाने जाणले पाहिजे. म्हणून, जेव्हा जेव्हा नव्या कायद्यासंबंधी प्रश्न विचारले जातात, तेव्हा आम्हांला असे निक्षून सांगावे लागते की, हा सर्व कायदा रद्द झाला पाहिजे हीच आमची मागणी आहे— त्याहून कमी नाही. तो कायदा रद्द झाला तर, लबाडांना लपविण्याचा आमचा इरादा नाही हे दाखविण्यासाठी आम्ही खुषीने नोंदणी करून घेऊ, पण ती घेतल्यानंतर आम्हांला या कायद्याची सतत भुणभुण लागता कामा नये.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १७–८–१९०७

१२७. पीटर्सबर्गला धन्यवाद

प्रिटोरियाने चांगली कामगिरी बजावली, पण पीटर्सबर्गने कमालच केली. तेथे एकही बेइमान माणूस निघाला नाही. परवाना कचेरीवरील बहिष्कार शंभर टक्के यशस्वी झाला. ती कचेरी आली तशी मुकेलीच (हात हलवीत) गेली. शिवाय ती ब्याद पीटर्स-बर्गमध्ये पुनः येऊ नये म्हणून, त्यांनी सरकारकडे आधीच एक अर्ज असा पाठविला की, आम्हांला ही कचेरी येथे नको. याहून अधिक काही कोणतेही शहर करू शकणार नाही. याहून कमी कोणत्याही शहराने करू नये.

दोन कैद्यांवर परवाने लादले गेले, यामुळे पीटर्सबर्गच्या प्रतिष्ठेला अणुमात्र उणेपणा येत नाही. जेव्हा देशात दुष्काळ पसरतो तेव्हा उपाशी माणसे आपली भूक भागविण्यासाठी वाटेल ते खातात. उपाशी कुत्रा विष्ठाही भक्षण करतो. त्याच रीतीने या खुनी कायद्याच्या अधिकाऱ्यांनी, आपले सावज हातांतून सुटल्यामुळे, उपाशी माणसा-प्रमाणे, त्या कैद्यांवर परवाने लादले. यावरून हे दिसून येते की, या नव्या परवान्यामध्ये स्वाभिमानाला मुळीच स्थान नाही–केवळ अपमान आहे. आम्ही पीटर्सबर्गचे अभिनंदन करतो. जुलैच्या शेवटच्या दिवशी आपली दुकाने बंद न केल्यामुळे पीटर्सबर्गच्या लोकांनी मोठा अपराध केला होता. आता त्याचे प्रायश्चित्त त्यांनी घेतले आहे. आणि इतर शूर हिंदी लोकांच्या पथकात येऊन ते उभे राहिले आहेत. या यशाच्या क्षणी, त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, खरा लढा अजून व्हावयाचाच आहे. तुरुंगात जाण्याचा काळ जवळ येत आहे. तेव्हा हिंदी लोकांनी आपल्याला संपत्ती व प्रतिष्ठा यांच्यापेक्षा स्वदेश अधिक प्रिय आहे हे दाखवून दिले पाहिजे. त्या वेळीही पीटर्सबर्ग धडाडीने बहादुरी दाखवील असा आम्हांला विश्वास वाटतो.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १७–८–१९०७

१२८. मारुतीचे शेपूट

जेव्हा मारुती लंका जाळण्यास निघाला, तेव्हा तो जसजसा पुढे जाऊ लागला तसतसे त्याचे शेपूट वजनाने अधिक जड होऊ लागले असे म्हणतात.[1] त्याचप्रमाणे, नव्या नोंदणीची कचेरी जसजशी पुढे जात आहे तसतसा तिच्यावरील बोजा वाढत आहे. जेव्हा प्रिटोरियासंबंधीची नोटीस निघाली, तेव्हा प्रिटोरियातील सर्व हिंदी लोकांनी नावे नोंदविणे सरकारने आवश्यक केले होते. ती कचेरी पीटर्सबर्गला गेली, तेव्हा तेथे नोंदणी करण्याचा हक्क प्रिटोरियाच्या नागरिकांनाही मिळाला. पॉचेफस्ट्रूम येथे, स्थानिक हिंदी लोकांशिवाय, प्रिटोरिया व पीटर्सबर्ग येथील हिंदी लोकांनाही तेथे नोंदणी करण्यास मुभा मिळाली. क्लार्क्सडॉर्पमध्ये वरील तिन्ही ठिकाणच्या हिंदी लोकांना गुलामगिरीचे पट्टे घेण्याची संधी मिळेल. याप्रकारे, परवाना-कचेरीचे शेपूट

१. त्याचे शेपूट लांब लांब होत गेले, असे रामायणात आहे.

लांब लांब वाढत आहे. प्रिटोरिया येथील आमच्या हिंदी बांधवांशी आम्ही सहानुभूती दाखवितो. कारण, ही कचेरी शेवटच्या गावी जाईपर्यंत त्यांची सुटका होणार नाही. प्रिटोरिया येथे बेइमान लोक जास्त निघाले म्हणून तर त्या शहराला ही शिक्षा नव्हे ना? पण मारुती व ही कचेरी यामध्ये एक मोठा फरक आहे. मारुतीच्या शेपटाला जितक्या चिंध्या जास्ती गुंडाळल्या गेल्या आणि त्यांवर जितके जास्त तेल ओतले गेले, तितकी लंका शहराला अधिक आग लागली, मात्र तिची धग मारुतीला लागली नाही, परंतु, परवाना-कचेरीचे काम या तिरस्करणीय कायद्याची अंमलबजावणी करण्याचे आहे, आणि म्हणून त्या कचेरीच्या स्थलांतरामुळे ती कचेरी आणि तो कायदा ही दोन्हीही भस्मसात् होतील. कारण, हिंदी समाजरूपी लंकेचे दहन करणे शक्य नाही. तो समाज निरपराध आहे. अपराधी आहे तो आगलाव्या कायदाच.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १७-८-१९०७

१२९. नाताळच्या व्यापाऱ्यांना इशारा

नाताळ सरकारच्या गॅझेटमध्ये एक बिल प्रसिद्ध झाले आहे. ते मंजूर झाल्यास, ज्या व्यापाऱ्याला आपला धंदा किंवा दुकान विकावयाचे असेल त्याने गॅझेटमध्ये व एका स्थानिक वृत्तपत्रामध्ये पंधरा दिवस आधी नोटीस दिली पाहिजे. नवा परवाना घेऊ इच्छिणाऱ्यानेही अशीच नोटीस दिली पाहिजे. या दोन्ही योजना कठोर आहेत; पण, त्या सर्वांना लागू होणार असल्यामुळे त्यांना हिंदी समाज विरोध करू शकणार नाही. त्याच बिलात आणखी एक योजना अशी आहे की, जे कर्ज मुदतीबाहेर गेले असेल त्यावर, खास निराळा करार झालेला नसेल तर, शेकडा आठ टक्क्याहून अधिक व्याज कोर्ट देऊ शकणार नाही. एखाद्या व्यापाऱ्याने एखाद्या वस्तूची भरमसाट किंमत घेतली असली तरी त्यामुळे करार रद्द होणार नाही. हे बिल सरकारी आहे आणि ते बहुधा मंजूर होईल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १७-८-१९०७

१३०. विश्वासघात ?

या अंकाचे लेखन आम्ही जवळजवळ संपविले होते, तोच आमच्या कानी आले की, प्रिटोरियातील बेइमान लोकांची यादी पुरी झाली नाही. गेल्या अंकी आम्ही काही मेमन व एक हिंदू यांची नावे प्रसिद्ध केली होती.[1] त्यामध्ये काही कोकणी लोकही आहेत असे आता आम्हांस कळते. त्यांची नावे पुढीलप्रमाणे[2] :—

आम्ही असेही ऐकले आहे की, पीटर्सबर्ग येथे केवळ दोन कैद्यांनीच आपली नावे नोंदविली असे नव्हे— त्यांच्यासारखे आणखी चौवेजण आहेत. हे खरे असेल, तर ते अत्यंत शोचनीय आहे.. असे दिसते की, समाजात काही माणसे चुकीच्या मार्गाने धैर्य दाखवितात आणि आपले तोंड काळे करून घेतात. प्रिटोरियातील कोकणी लोकांनी असे निक्षून जाहीर केले होते की, आमच्यापैकी कोणीही नव्या परवान्यासाठी अर्ज केलेले नाहीत. उलट, पीटर्सबर्गमधील वरील चार लोकांनी वासाहतिक सचिवाकडे केलेल्या अर्जावरही सह्या केलेल्या आहेत. विश्वासघाताची ही दोन्ही कृत्ये अत्यंत भयप्रद आहेत. असे विश्वासघातकी थोडे आहेत ही अभिनंदनीय गोष्ट होय. पण समाजात असे लोक आहेत यावरून सज्जनांनी गंभीर इशारा घेतला पाहिजे. या सर्वांवरून कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ या गोष्टीची आठवण होते. या दुष्ट कायद्या-मुळे किंवा सरकारमुळे जी हानी झालेली आहे ती अशा लोकांनी केलेल्या हानीपेक्षा कमीच आहे. जो माणूस उघडपणे नवे नोंदणीपत्र घेतो, त्याला काही तरी धैर्य असल्याचे श्रेय देता येईल; पण जो ते नोंदणी-पत्र चोरून घेतो आणि प्रतिष्ठित म्हणून मिरवितो, त्याला कोणती उपमा द्यावी ?

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १७–८–१९०७.

१. पाहा " आपले कर्तव्य " (लेख ११४)

२. मुळात दिलेली ९ नावे येथे घेतलेली नाहीत.

१३१. मोरोक्कोमधील अग्निप्रलय

सध्या मोरोक्को येथे भयंकर आग पसरली आहे. रसूलीने तेथे भय उत्पन्न केले आहे. टँजीयरमध्ये लुटालूट व पुंडाई चाललेली आहे. पुष्कळ माणसे ठार झाली आहेत. २०० (दोनशे) स्त्रियांना अटक झाली आहे. बलात्कारही चालू आहेत, यहुदी लोकांचे सर्वांत जास्त नुकसान झाले आहे. कॅसाब्लँकामध्ये तर अराजकच माजले आहे अशी "रूटर"ची बातमी आहे. त्याने पुढे असे म्हटले आहे की, जर युरोपियन सेना तेथे गेली तर ज्या थोड्या टोळ्या माझ्या काबूत आहेत, त्या मोकाट सुटतील असे मोरोक्कोच्या सुलतानाने जाहीर केले आहे. यात सत्य किती आहे हे आम्ही सांगू शकत नाही. रसूलीने सर हॅरी मॅक्लीन यांना मुक्त केल्याचे कळते. रसूलीसंबंधी लिहिताना एका जर्मनाने, तो शूर व देखणा सैनिक असल्याचे वर्णन केले आहे. लहानपणापासून त्याला गुरे चोरण्याची सवय होती. काही काळ त्याची नेमणूक टँजीयरचा गव्हर्नर म्हणून झाली होती. पण गेली काही वर्षे तो लुटारू किंवा दरोडेखोर म्हणून राहात आहे. त्याने पुष्कळ गोऱ्यांना पकडले आहे. तो तळहातावर शिर घेऊन जगतो. कोणाच्या तरी अत्याचाराला आपण बळी पडणार अशी त्याला खात्री वाटते. रसूलीला ठार मारण्याचे प्रयत्न अनेकांनी केले. पण तो इतका दक्ष व चपळ आहे की, तो सर्वांना चुकवू शकतो. मोरोक्कोमध्ये असा गोंधळ का माजला आहे याची कारणे आम्ही पुढे देऊ, म्हणजे तेथे काय घडत आहे याचा अंदाज आमच्या वाचकांना बांधता येईल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १७-८-१९०७

१३२. हॅगरचे नवे कृत्य

श्री. हॅगर हिंदी लोकांच्या पाठीशी हात धुऊन लागले आहेत. त्यांच्या डोक्यात नेहमी एखादीदुसरी कल्पना असते. इंजिनमध्ये काम करून पोट भरणाऱ्या गरीब हिंदी लोकांना बेकारीत लोटण्याचा आता त्यांचा विचार आहे. युरोपियन अधिकाऱ्याची देखरेख

असल्याशिवाय कोणाही हिंदी माणसाला काम करण्यास प्रतिबंध करणारे बिल पार्लमेंट-मध्ये आणण्याची त्यांची नवी क्लृप्ती आहे. असा कायदा अमलात आला तर काही हिंदी लोकांना आपल्या रोजगारांना मुकावे लागेल. पण हे बिल मंजूर होणार नाही अशी आशा आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १८–८–१९०७

१३३. तरुणांच्या धूम्रपानास बंदी करणारा कायदा

हा कायदा नाताळच्या पार्लमेंटने नुकताच मंजूर केला आहे. त्याच्या प्रत्येक कलमाचा आशय आम्ही पुढे देत आहोत.

(१) १६ वर्षांखालील कोणाही माणसाने तंबाखू, सिगार किंवा सिगारेट ओढणे बेकायदा ठरेल. (अशा माणसाजवळ) तंबाखू, चिलीम, सिगार, सिगारेट किंवा सिगारेट–होल्डर सापडल्यास गोरा पोलीस अधिकारी ते जप्त करून सरकारला देईल.

(२) शाळेत जाणाऱ्या मुलाजवळ सिगारेट किंवा वर उल्लेखिलेल्या वस्तूंपैकी एखादी वस्तू सापडल्यास त्या शिक्षक हिरावून घेईल आणि मुलाच्या पालकाकडे पोचत्या करील. धूम्रपान करीत असताना जे विद्यार्थी आढळतील, त्यांनी शाळेची शिस्त मोडली असे मानून त्यांना योग्य ती शिक्षा करण्यात येईल.

(३) १६ वर्षांखालील मुलाने आपल्या आई-बापांची, पालकांची चिठ्ठी आणली नसल्यास त्याला कोणीही तंबाखू, सिगार किंवा सिगारेट देऊ नये–विकतही देऊ नये. त्याने आणलेल्या चिठ्ठीत किंवा मागणीत असे नमूद केलेले असले पाहिजे की, ती सिगारेट किंवा इतर वस्तू १६ वर्षांवरील माणसाच्या वापरण्यासाठी पाहिजे आहेत आणि त्या वस्तू सही करणाऱ्याच्या हाती जाऊन पडतील. अशी चिठ्ठी नसताना १६ वर्षांखालील माणसाला सिगारेट इत्यादी देणे किंवा विकणे बेकायदा आहे. या कलमांचे उल्लंघन करणारा माणूस, प्रत्येक गुन्ह्यासाठी, ५ पौंड दंड किंवा एक महिना कैद येथपर्यंतच्या शिक्षेस पात्र होईल.

(४) आई-बाप, पालक किंवा मालक यांपैकी कोणीही नसलेल्या माणसाने १६ वर्षांखालील इसमाला सिगारेट वगैरे खरेदी करण्यास पाठविले तर तो ५ पौंड दंड किंवा १ महिना कैद येथपर्यंतच्या शिक्षेस पात्र होईल.

(५) या कायद्याच्या बाबतीत एखाद्या माणसाच्या वयाविषयी शंका आली तर कोर्टाने सकृद्दर्शनी दिसणारे जे वय ठरविले असेल तर ते, अन्यथा समाधानकारक पुरावा नसल्यास, बरोबर मानले जाईल.

(६) हा कायदा "१९०७ चा धूम्रपान-प्रतिबंधक कायदा" म्हणून ओळखला जाईल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १७-८-१९०७

१३४. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

पीटर्सबर्गचे पूर्ण वैभव

पीटर्सबर्गच्या शौर्याची प्रशंसा सर्वत्र होत आहे. आता पॉचेफस्ट्रूम व क्लार्क्सडॉर्प यांवर हल्ले चढविले जातील. ही दोन्ही शहरे पीटर्सबर्गवर मात करू शकणार नाहीत, पण त्याच्यापेक्षा त्यांनी कमी कामगिरी करता कामा नये. पीटर्सबर्गने दाखविलेल्या धडाडीमुळे जनता व वृत्तपत्रे ही दोन्हीही थरारून गेली आहेत. हिंदी लोकांच्या उत्साहाचा पारा वर चढला आहे हे खचित. पीटर्सबर्गने आपला विजय थोडा जवळ आणला आहे. प्रिटोरियाप्रमाणे पीटर्सबर्ग येथे स्वयंसेवक नोंदले गेले होते, त्यांची नावे पुढीलप्रमाणे:- श्री. हंसराज, श्री. ए. गॉकेल, श्री. डी. एच. जुमा, श्री. तैयब एन महंमद, श्री. कासिम सुलेमान, श्री. ए. देसाई, श्री. गुलाब आणि मुख्य स्वयंसेवक श्री. हासिम महंमद काला.

हे वीर प्रशंसेस पात्र आहेत.

"उपाशीपोटीच"

पुष्कळ हिंदी लोकांना उत्साहवर्धक तारा येत आहेत. त्यांपैकी एका हिंदी माणसाने ताबडतोब असे उत्तर पाठविले की, परवाना कचेरीला "उपाशी पोटीच"

पीटर्सबर्ग सोडावे लागेल. याचा अर्थ असा की, हिंदी लोक हे त्या कचेरीचे भक्ष्य आहेत. कोणाही हिंदी माणसाने आपले नाव नोंदविले नाही तर त्या कचेरीची उपासमार होईल. त्या कचेरीचा उपास मोडला न गेला तर तिला "उपाशी पोटीच" रामराम ठोकावा लागेल. कैद्यांनी नोंदणीकरता केलेले अर्ज अर्थातच विचारात घेण्याचे कारण नाही.

पीटर्सबर्गला तार

असोसिएशन व हमीदिया अंजुमन यांनी अभिनंदनाची तार पाठविली आहे. तीत अंजुमनने म्हटले आहे, "आपण अखेरपर्यंत तग धरली, तर ईश्वर आपल्याला जय मिळवून देईल.[1]"

पॉचेफस्ट्रूम व क्लार्क्सडॉर्प

या दोन शहरांकडे या आठवड्याच्या अखेरीस कचेरी कूच करील. म्हणून हमीदिया अंजुमनने तिला पुढील तार पाठविली आहे.[2] या दोन्ही शहरांकडून तत्काळ उत्तरे आली की, आम्ही पुरे खंबीर आहो, नवी नोंदणी बहुधा कोणीच करणार नाही. तेथील जनता म्हणते, "आम्हांला जोहान्सबर्गकडून काहीही मदत नको. एम्पायर थिएटरमध्ये आम्ही घेतलेल्या शपथेशी आम्ही एकनिष्ठ राहू." साऱ्या हिंदी लोकांनी अखेरपर्यंत असेच धैर्य दाखवावे अशी माझी इच्छा आहे.

आपल्या लढ्याचा परिणाम

आतापर्यंत आपल्या लढ्याचा परिणाम चांगला झाला आहे असे म्हणता येईल. "रँड डेली मेल"मध्ये असे म्हटले आहे की, हिंदी लोकांना गोऱ्यांचे कर्ज आहे आणि हिंदी लोक जर तुरुंगात गेले किंवा त्यांनी परवाने मिळविले नाहीत, तर ते कर्ज फेडणार नाहीत. अशी भूमिका हाती धरून "मेल" मधील लेखक पुढे म्हणतो, हिंदी पुढाऱ्यांच्या मनाचा थांग लागत नाही. अशा बातम्यांनी गोरे व्यापारी घाबरलेले दिसतात. हा परिणाम शुभ म्हटला पाहिजे. आता ते आपली चेष्टा करीत नाहीत तर परिस्थिति नाजूक आहे हे ते ओळखतात. शिवाय, "मेल" मधील लेखक पुढे लिहितो की, हिंदी लोकांना इंग्लंडातील अत्यंत वजनदार माणसांकडून मदत मिळत आहे. तो लेखक म्हणतो, "हिंदी लोकांच्या बाजूने मि. रिच खटपट करीत आहेत आणि हिंदी लोकांची गाऱ्हाणी दूर झाली नाहीत तर ट्रान्सवॉलला ५०००००० (पन्नास लाख) पौंडांचे कर्ज देण्यास आपण विरोध करू, असे पार्लमेंटच्या १०० सदस्यांनी जाहीर केलेले आहे."

१. पाहा : "पीटर्सबर्गच्या हिंदी लोकांना तार" (प्रकरण १२२)
२. पाहा : "पॉचेफस्ट्रूमच्या हिंदी लोकांना तार" (प्रकरण १२३)

ईसापमियाँ यांचे उत्तर

वरील लेखाला मि. ईसापमियाँ यांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे.[१]

"स्टार"ची टीका

"डेली मेल" मधील लेखावर "स्टार"ने ताबडतोब एक मोठे स्फुट लिहिले आहे. ते पुढे दिले आहे :[२]

ब्रिटिश इंडियन असोसिएशनने सुरू केलेली सविनय प्रतिकाराची चळवळ आतापर्यंत प्रभावी झाली आहे. हिंदी पुढाऱ्यांना अशी आशा वाटते की, या कायद्याची अंमलबजावणी अंतिम मर्यादेपर्यंत केली जाणार नाही. ती मर्यादा म्हणजे सक्तीची नोंदणी मान्य न करणाऱ्या लोकांना कैद करणे किंवा हद्दपार करणे. नव्या कायद्याला मान्यता देण्यासाठी हिंदी लोकांचा अनुनय करण्याकरिता राजधानीत जे उपाय योजले गेले, त्यांचे फल म्हणजे फक्त सुमारे सत्तर लोकांनी नावे नोंदविली. पीटर्सबर्ग व जूटपान्सबर्ग येथील हिंदी लोकांनी नोंदणीला नकार दिला. पॉचेफस्ट्रूम व क्लार्क्स-डॉर्प येथील त्यांच्या बांधवांनी त्यांचाच कित्ता गिरवण्याचा आपला इरादा जाहीर केला. जोहान्सबर्गमध्ये भारतीयांची संख्या मोठी आहे आणि त्यांतील बरेचसे लोक मातबर आहेत. त्यांनी कायद्याला विरोध करण्याचा निर्धार केलेला आहे. सरकार या कायद्याचा अंमल जोहान्सबर्गमध्ये चालू करील की नाही, याविषयी हिंदी लोकांमध्ये पुष्कळ तर्कवितर्क चालू आहेत. सरकार हळूहळू चालले आहे. हिंदी नोंदणी कचेरीचे श्री. चॉमनी यांचे निवेदन आल्यानंतर, सरकार निश्चित धोरण आखील. जोहान्सबर्ग-मध्ये सरकार हिंदी लोकांना नोंदणी करावयास भाग पाडणार नाही, अशी काहीच चिन्हे आतापर्यंत दिसत नाहीत.

देश सोडण्याचा प्रसंग आला, तर त्याला तोंड देण्यासाठी हिंदी व्यापारी हळूहळू तयारी करीत आहेत. चॉमनी अँड को. चे एक जुने भागीदार श्री. चॉमनी या पारशी धाऊक व्यापाऱ्याने "स्टार"च्या प्रतिनिधीला आज असे सांगितले की, आम्ही आमच्या परदेशातील मागण्या रद्द केल्या आहेत, आणि आमचा माल आम्ही इतका कमी केला आहे की, तो सहज दुसरीकडे नेता यावा. त्यांचा कित्ता बहुतेक सर्वत्र गिरविला जात आहे. हिंदी व्यापारी कर्ज देण्याचे नाकारतात किंवा तसे करण्याचा त्यांचा विचार आहे असे विधान एका वृत्तपत्राने प्रसिद्ध केले आहे. पण हिंदी व्यापाऱ्यांनी त्याचा खडखडीत इन्कार केला आहे. एका व्यापाऱ्याने आज ४३७ (चारशे सदतीस) पौंडाचे बिल चुकते केले. आणि गल्या आठवड्यात त्याने ६८१

१. यापुढे "रद्द केला गेलला पत्र" दिलेले आहे. (पाहा लेख १२४)
२. 'इंडियन ओपिनियन'च्या इंग्लिश विभागातून ते येथे घेतले आहे.

(सहाशे एक्याऐंशी) पौंडांचा हिशेब चुकता केला. दुसऱ्या व्यापाऱ्याने आज सकाळी ७०० (सातशे) पौंड दिले. कर्ज न देण्याचा सल्ला असोसिएशनने कोणाही हिंदी माणसास दिलेला नाही. वरील बातमी प्रसिद्ध झाल्याचे पाहून असोसिएशनला आश्चर्य वाटले.

सविनय प्रतिकाराच्या चळवळीचे नेते सुविख्यात हिंदी बॅरिस्टर श्री. मो. क. गांधी हे आहेत. त्यांनी आपल्या सैन्याला चांगली शिस्त लावली आहे हे खचित आणि हिंदी लोक अखेरपर्यंत त्यांना साथ देतील हे निःसंशय.

या सर्वांवरून असे सिद्ध होते की, हिंदी लोकांनी प्रगट केलेल्या सामर्थ्याला आता फळ येत आहे.

फ्रीडडॉर्पचा वटहुकूम

या वटहुकुमाचा प्रश्न आता संपला आहे. मूळचे (बिल) गाळण्यात आले आहे व नवे बिल मंजूर झाले आहे. त्याअन्वये, हिंदी लोकांना हुसकून लावणे चार वर्षे शक्य होणार नाही. आणि चार वर्षांनंतर हिंदी लोकांचे जे नुकसान होईल त्याची भरपाई करण्यात येईल. चार वर्षांची नोटीस दिली आहे, यावरून व्यापाराचे नुकसान किंवा वसुली यांचा समावेश नुकसान-भरपाईत होणार नाही, तर बांधलेल्या इमारतींची किंमत धरली जाईल. तेव्हा फ्रीडडॉर्पमधील हिंदी व्यापाऱ्यांनी असे समजावे की, आपल्याला चार वर्षांचा अवधी मिळालेला आहे. या यशाचे श्रेय श्री. रिच यांना दिले पाहिजे. त्यांनी इंग्लंडमध्ये नेटाने जे कार्य केले, त्याचे हे फल आहे. चार वर्षांनंतर कोणाही गौरेतर माणसाला नोकराशिवाय दुसऱ्या कोणत्याही दर्जाने येथे राहाता येणार नाही हे कलम कायम ठेवण्यात आले आहे. ते काढून टाकले जाणार नाही. श्री. स्मट्स यांच्या उत्तरावरून हे स्पष्ट होते. पण चार वर्षे ही मोठी मुदत आहे. "हिंदी योद्धे तुरुंगाच्या राजवाड्यात जातील तर"[1] हिंदी लोक फ्रीडडॉर्प येथे पुढेही राहू शकतील. तो एक अर्थात् विशेष लाभ होईल. मोत्याच्या ताटात नव्या रत्नाची भर.

एम्. एस्. कुवाडिया

असोसिएशनचे खजिनदार श्री. एम्. एस्. कुवाडिया यांच्या पत्नीचे निधन झाल्याची बातमी हिंदुस्थानहून आली आहे. ही बातमी देताना मला दुःख होते. श्री. कुवाडिया यांच्या हानीबद्दल मी सहानुभूती प्रकट करतो.

१. हे शब्द बक्षिसाच्या स्पर्धेसाठी आलेल्या काव्यातून घेतलेले दिसतात. पाहा "नव्या कायद्यावरील बक्षिसाची कविता." (लेख ३०)

महंमद ईसॉप शहरी

श्री. महंमद ईसॉप शहरी हे हमीदिया ईस्लामिया अंजुमनचे सदस्य आहेत. ते या महिनाअखेर मक्केच्या यात्रेस जात आहेत. त्यांच्या कार्यात मी त्यांना यश चिंतितो.

हमीदियाची बैठक

हमीदिया इस्लामिया अंजुमन नव्या कायद्याबाबत पूर्ण उत्साहाने काम करीत आहे. ती संस्था दर आठवड्याला सभा भरवीत आहे. त्या सभांना सर्व जातींचे हिंदी लोक हजर असतात. गेल्या रविवारी भरलेल्या सभेचे अध्यक्षस्थान इमाम अब्दुल कादिर यांनी स्वीकारले होते. श्री. गांधींनी परिस्थिती समजावून सांगितली. नंतर श्री. ईसाप-मियाँ बोलले. ते म्हणाले, " या वेळी श्री. गांधींना तुरुंगात टाकले किंवा हद्दपार केले तरी लोकांनी आपले धैर्य टिकविले पाहिजे. पैशाचीही गरज आहे. तो ज्यांच्याजवळ असेल त्यांनी तो दिला पाहिजे. " त्यानंतर मौलवी अहंमद मुख्त्यार आणि महाराज रामसुंदर पंडित यांची भाषणे झाली. श्री. पोलक यांच्या प्रयत्नांची प्रशंसा करणारे छोटेसे भाषण श्री. आमद कुवाडिया यांनी केल्यावर अध्यक्षांनी सभा बरखास्त झाल्याचे जाहीर केले.

तुरुंगात जाणाऱ्यांच्या नातेवाइकांचे काय ?

या प्रश्नाचे उत्तर या पत्रात अनेक वेळा दिलेले आहे. तरी तो प्रश्न पुनः विचारला जातो आणि म्हणून मी पुनः उत्तर देतो. मला जी परिस्थिती माहीत आहे, त्यावरून, जे लोक तुरुंगात जाण्यास तयार आहेत, त्यांनी शक्य ती सर्व व्यवस्था केलेली आहे. म्हणून समाजावरील जबाबदारी मर्यादित आहे. एखाद्या वस्तीतील किंवा दुकानातील सारे लोक एकाच वेळी पकडले जातील असे होणार नाही. हा तर्क जर खरा असेल तर पकडलेल्या लोकांच्या कुटुंबांची व मालमत्तेची काळजी त्यांचे आप्तेष्ट घेतील. दुसऱ्या एखाद्या कायद्यानुसार कोणी माणूस पकडला गेला तर असेच घडते हे आपल्याला माहीत आहे. पण तेवढ्याने भागणार नाही. नवा कायदा झिडकारल्याबद्दल ज्याला पकडण्यात येईल त्याच्या प्रपंचाकडे असोसिएशन लक्ष पुरवील हे निश्चित. त्याचे कुटुंब कोठे आहे, त्याची स्थिती काय आहे आणि त्याची काळजी घेणारे कोणी आहे की नाही—या सर्व गोष्टींची चौकशी असोसिएशन करील. कुटुंब गरीब असेल, तर त्याच्या चरितार्थाची व्यवस्था केली जाईल. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर, नव्या कायद्याप्रमाणे पकडल्या गेलेल्या माणसाला दुहेरी मदत मिळण्याचा संभव आहे—त्याचे दुकान व त्याचे कुटुंब याची काळजी त्याला समाधानकारक वाटेल अशा रीतीने घेतली जाईल आणि प्रसंग पडला तर, श्री. पारशी रुस्तुमजी यांच्या-सारख्या वीर पुरुषांनी दिलेल्या देणग्यांचा लाभ त्याला मिळेल.

या लढ्यात आपण सत्यासाठी बलिदान करावयाचे आहे. म्हणून प्रत्येक अवस्थेत आपल्याला दैवी साहाय्य मिळेल. हे साहाय्य देण्यासाठी ईश्वर या जगात प्रत्यक्ष मानवी रूपाने अवतरत नाही. तो माणसांच्या हृदयामध्ये वास करीत असतो आणि त्यांना परोपकाराची प्रेरणा देतो. वरच्यासारखे प्रश्न विचारले जातात यावरून हे दिसते की, एवढ्या महत्त्वाचे सार्वजनिक कार्य आपण आपल्या शिरावर प्रथमच घेत आहो. म्हणून भय वाटणे सकारण आहे. पण थोडा विचार केला तर असे कळून येईल की, हातपाय गाळण्याचे काही कारण नाही.

असाही प्रश्न विचारला जातो की, सर्वच्या सर्व १३००० (तेरा हजार) हिंदी लोकांना एकाच वेळी तुरुंगात पाठविले तर काय होईल? त्यांच्या मुलाबाळांची काळजी कोण घेईल? हा प्रश्न केवळ भित्रेपणातून निघालेला आहे. परमेश्वरावर ज्याची अणुमात्र श्रद्धा आहे त्याच्या डोक्यात असा प्रश्न कधीच येणार नाही. मग नेहमी ईश्वराला भिऊन वागणाऱ्या हिंदी माणसाने तो का उत्पन्न करावा? १३००० (तेरा हजार) हिंदी लोक एकदम पकडले जाण्याचे सौभाग्य आपल्याला लाभणार नाही. पण तसे घडले तर आपण हे लक्षात ठेवले पाहिजे-की, जे मागे राहातील त्यांचा योगक्षेम वाहणारा सर्वशक्तिमान ईश्वर आहे. असा जर प्रश्न विचारला जातो तर दुसरा असाही प्रश्न विचारता येईल की, एखादा धरणीकंप होऊन त्यात सारेच्या सारे १३००० (तेरा हजार) हिंदी लोक गडप झाले तर त्यांच्या नातलगांची काळजी कोण घेईल? पकडलेल्या माणसांनी असा कोणता मोठा गुन्हा केला आहे की, त्यामुळे त्यांच्या मुलाबाळांची किंवा त्यांच्या मालमत्तेची काळजी कोणीच घेणार नाही! आणि समजा, तेही दुःख सोसावे लागले तर आपण तितकी देशसेवा का करू नये! ती न केली तर आपल्याला सन्मान, प्रतिष्ठा कशी मिळेल? आपल्याला देशभक्त कोण मानील? म्हणून

प्रगटे जो दिलमा प्रेम प्राण शुं प्यारो।
हितमनी मददे खुदा सदा छे यारो ॥
(प्राणाहुनि प्रिय प्रेम असे ॥ त्या प्रेमाचे जर तेज लसे ॥
वीरापाठी देव सदा ॥ मित्रा! मंत्रा या स्मर उमदा ॥)

एक हिंदी बहादूर

कलकत्ता येथून आलेल्या बख्तावर नावाच्या हिंदी माणसाला परवाना कचेरीत बोटांचे ठसे मागितले असता ते देण्याचे त्याने नाकारले. मग नव्या कायद्याप्रमाणे अर्ज करण्यास त्याला सांगण्यात आले, तेही त्याने नाकारले. प्रत्येक हिंदी माणसाने असे धैर्य दाखविले पाहिजे.

लंडनमधील प्रयत्न

या तिरस्करणीय कायद्याविरुद्ध लंडनमध्ये जोराची चळवळ चालू आहे. (पार्लमेंटमध्ये) पुष्कळ सभासद एकसारखे प्रश्न विचारीत आहेत. एका प्रश्नाला उत्तर देताना श्री. चर्चिल म्हणाले, या कायद्याच्या अंमलबजावणीत साम्राज्य सरकार ढवळाढवळ करू शकत नाही. अशा उत्तराने हिंदी लोक काहीसे घाबरले आहेत असे मला दिसते. पण घाबरण्याचे काहीच कारण नाही. कारण, एक तर हा लढा चालविताना आपण आपल्या धैर्यावरच विसंबून आहोत. साम्राज्य सरकार हस्तक्षेप करो वा न करो, आपल्याला जे पाप वाटते ते आपण करणार नाही. दुसरी गोष्ट अशी की, ते सरकार कायद्याच्या अंमलबजावणीत हस्तक्षेप करणार नसले तरी त्या कायद्यामुळे दडपशाही सुरू झाल्यास त्याला हस्तक्षेप करावाच लागेल. तो ते न करील तर त्याची इभ्रत धुळीस मिळेल आणि अखेरीस ब्रिटिश साम्राज्य अंत पावेल. श्री. चर्चिल यांच्या उत्तराचा अर्थ मला एकच वाटतो आणि तो हा की, ते जाहीर रीतीने काहीही बोलले तरी, योग्य वेळी हस्तक्षेप करणे त्यांना टाळता येणार नाही. ती योग्य वेळ आपण तुरुंगांत गेल्यानंतर येईल.

सावधगिरीची गरज

क्रूगर्सडॉर्प येथील श्री. सुलेमान बाडी यांच्यावरील काफिराला दारू विकल्याबद्दलचा खटला बुधवारी सुरू झाला. दोन गोरे व दोन काफिर गुप्त पोलीस यांनी असे सांगितले की, त्यांनी अर्धी बाटली दारू विकली. त्यांच्या बाजूने श्री. स्टेगमन व श्री. गांधी हे वकील होते. त्यांनी खूप प्रयत्न केला. पुराव्यादाखल असे सांगितले गेले की, दारूची विक्री धर्मबाह्य आहे. बँकेचे हिशेबनीस व इतर गोरे लोक यांनी आपल्या साक्षीत सांगितले की, श्री बाडी हे अत्यंत सन्मान्य गृहस्थ आहेत. श्री. बाडी यांजवरील खटला बनावट आहे आणि ते निरपराध आहेत अशी वस्तुस्थिती दिसते. तरीही, मॅजिस्ट्रेटने त्यांना दोषी ठरवून सहा महिन्यांच्या कैदेची शिक्षा सुनावली. श्री. बाडी यांनी अपील केले आहे. त्याच्या निकालाचा अंदाज करता येत नाही. पण प्रत्येक हिंदी माणसाने सावध असले पाहिजे. गोरे व काफिर स्वार्थासाठी दुसऱ्या लोकांना जाळ्यात पकडण्यास कचरणार नाहीत. श्री. बाडी हे निरपराध असल्यामुळे त्यांना लाज वाटण्याचे काहीच कारण नाही. लाज तुरुंगात जाण्यात नसते-- गुन्हा करण्यात असते. त्यांना निष्कारण खर्च करावा लागला आणि ज्यांना खरी स्थिती माहीत नाही त्यांचे मत त्यांच्याविषयी वाईट होईल हे खरे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १७–८–१९०७

१३५. "इंडियन ओपिनियन"ला पत्र

जोहान्सबर्ग,
ता. १७ ऑगस्ट, १९०७

संपादक,
इंडियन ओपिनियन यांस,

महाशय,

आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाच्या बाबतीत जनरल स्मट्स व मी यांच्यामध्ये जो पत्रव्यवहार[1] झाला, त्याची प्रत प्रसिद्धीसाठी मी सोबत पाठवीत आहे. या प्रश्नाला स्थानिक स्वरूपापेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे, असे माझे नम्र मत आहे. वसाहतवाल्यांची मानवता आपल्या द्वेष–भावनेवर विजय मिळवील आणि माझे देशबांधव आपल्या निर्धाराप्रमाणे क्लेश सहन करतील, तर त्यांची मागणी न्यायाची मानली जाईल, असा विश्वास मला माझ्या आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत वाटत राहील. पण हे घडो वा न घडो, मी एकच सल्ला देऊ शकतो आणि तो म्हणजे स्वार्थापेक्षा स्वतःच्या पवित्र घोषणेची परिपूर्ती निर्भयपणे करणे हेच श्रेयस्कर.

म्हणून, जनरल स्मट्स यांनी आपल्या पत्रात जो जोरदार इशारा[2] दिला आहे, तो माझ्या देशबांधवांनी ध्यानी घेणे अवश्य आहे. ज्या जनतेच्या नावाने हा कायदा मंजूर व जारी करण्यात आला आहे, तिला हे कळणे अवश्य आहे की, त्याच्याऐवजी मी जी योजना नम्रपणे मांडली आहे, तिच्यामुळे सर्व अडचण दूर होण्यासारखी आहे. माझ्या योजनेमुळे या वसाहतीत राहणाऱ्या प्रत्येक आशियावासीयाची खूण पटण्यासारखी आहे आणि आशियावासी कायद्यात नसलेली तरतूद माझ्या योजनेत आहे. ती अशी की, या वसाहतीत राहण्याचा हक्क असणाऱ्या आशियावासीयांची संख्या एकदा कायमची निश्चित होईल. प्रवेशविषयक बिलातील शैक्षणिक पात्रतेचा फायदा जे घेऊ शकतील असे थोडे हिंदी लोक तेवढे या मर्यादित संख्येशिवाय असू शकतील. माझ्या दृष्टीने मुख्य प्रश्न बोटांच्या ठशांचा किंवा इतर तपशिलाचा नसून मुख्यतः हिंदी लोकांना निवडणुकीचा मताधिकार नाही. हे लक्षात घेऊन सरकार त्यांच्या

१. पाहा : जनरल स्मट्स यांच्या खाजगी सचिवाला पत्रे (लेख १०५, १२५.)

२. पाहा : "जनरल स्मट्स यांच्या खाजगी सचिवास पत्र" तळटीप (लेख १२५)

भावनांची कदर करणार की नाही ? आणि जर करणार नसेल तर हिंदी लोक, स्वतःशी व ईश्वराशी प्रामाणिक राहून, सर्वस्वाचा होम करतील की नाही ? हाच मुख्य प्रश्न आहे.

आपला,
मो. क. गांधी

इंडियन ओपिनियन, २४–८–१९०७

१३६. "स्टार"ला पत्र[1]

जोहान्सबर्ग,
ता. १९ ऑगस्ट, १९०७

संपादक,
स्टार
[जोहान्सबर्ग], यांस

महाशय,

आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाच्या बाबतीत तुम्ही माझ्या "योजनेचा"[2] गौरव एक उपाग्र-लेख लिहून केला आहे. पण तसे करताना आपण माझ्या सूचनेचा अभ्यास बरबर केल्याने त्या सूचनेला व मला अन्याय केला आहे. माझ्या सूचनेतील कलमे प्रवेशविषयक बिलात दाखल केल्यास सरकारला प्रत्येक परवाना परत घेण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त होतो. आणि त्याच्या जागी ट्रान्सवॉलमधील कायदेशीर आशियावासी रहिवाश्याला वास्तव्याचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार मिळतो. अशा प्रमाणपत्राचा नमुना कसा असावा याचे नियम बनविण्याचे काम सरकारवर सोपविले आहे, हे आपण माझी सूचना पुन्हा वाचल्यास आपल्या ध्यानी येईल. म्हणजे आंगठ्याच्या ठशाचा प्रश्न हा वादाचा विषय मी मुळीच केलेला नाही. आणि तसा तो तत्त्वाचा प्रश्न मी तरी कधीच मानलेला नाही. मुख्य आक्षेप आहे तो, त्या कायद्यातील सक्ती व

१ ता. २४–८–१९०७ च्या "इंडियन ओपिनियन"मध्ये हे उद्धृत केलेले आहे.

२. "जनरल स्मट्स यांच्या खासगी चिटणिसास पत्र" (लेख १०५) याबरोबर पाठविलेल्या सूचनेस उद्देशून हे आहे.

गुन्हेगारीचा वास यावर. मी सादर केलेल्या मसुद्यावरून, सरकारला या वसाहतीत वास्तव्याचा हक्क सांगणाऱ्या आशियावासीयांचा नक्की आकडा कळेल आणि त्या आशियावासियांची ओळखही पुरेपूर पटविता येईल. माझ्या मसुद्यात नाही काय? तर आशियावासी नोंदणी-कायद्यातील गुंतागुंतीची यंत्रणा व शिक्षेची योजना. तसेच माझ्या मसुद्याने सोळा वर्षांखालील मुलांचा उपद्रव टाळला आहे व नोंदणी-कायद्याने योजलेल्या व पदोपदी घेतल्या जाणाऱ्या ओळखीच्या खाणाखुणा. पण मी असे सांगतो की मुलांच्या बाबतीत चोरटा प्रवेश होण्याला पूर्ण प्रतिबंध करण्यासाठी मी अशी योजना सुचविली आहे की, १६ वे वर्ष लागल्यानंतर त्या मुलांनीही वास्तव्याचे प्रमाणपत्र घेतले पाहिजे. आणि १६ वर्षांखालील मुलांच्या संख्येची नोंद वास्तव्याच्या प्रमाणपत्रावर केली पाहिजे. पण जर माझी योजना सदोष वाटत असेल आणि प्रवेशविषयक बिलात ओळखीच्या खाणाखुणासंबंधीचे तत्त्व अंतर्भूत करणे सदोष वाटत नसेल तर, मी दुर्लक्षिलेले दोष दूर करता येणे शक्य आहे. म्हणून प्रश्न हा राहतो की, बादशहांच्या हिंदी प्रजाजनांच्या कल्याणाकडे लक्ष पुरवून मी सुचविलेल्या पर्यायी योजनेचा अभ्यास जनता गंभीरपणे करील की नाही?

आपल्या उपाग्रलेखातील दुसऱ्या भागासंबंधी[1] मी एवढेच म्हणतो की, माझे देशबांधव कितीही हलक्या प्रतीचे असले तरी त्यांना मानाचा दर्जा दिला गेला (नाही,)[2] तर तुरुंगवास, हद्दपारी आणि असेच दुसरे कोणतेही संकट हे, स्वाभिमान गमावण्यापेक्षा, तुलनेने वरदानच ठरेल. एका गोष्टीबाबत मी ठाम आश्वासन देऊ शकतो आणि ती म्हणजे या कायद्याचा तिटकारा मनापासून ज्याला वाटत नाही असा एकही हिंदी माणूस नाही. प्रिटोरियामध्ये या कायद्याप्रमाणे ज्यांनी नोंदणी करून घेतली, त्यांतील बहुतेक लोकांना मी ओळखतो, आणि आपण राष्ट्र व ईश्वर यांच्या दृष्टीने गुन्हा केला आहे, अशी कबुली ते देतात हेही मला माहीत आहे. ते तसे वागले याचे कारण त्यांच्याच शब्दांत द्यावयाचे तर, त्यांनी स्वाभिमानापेक्षा धनाला अधिक किंमत दिली.

आपला,

मो. क. गांधी

स्टार, २०-८-१९०७

१. हा उतारा असा आहे— "...इंग्लिश रॅडिकल नॉनकन्फर्मिस्ट लोक यांच्याकडून उसन्या घेतलेल्या डावपेचांना इंग्रज उदारमतवादी लोक कोणत्याही मर्यादेपर्यंत पाठिंबा देतील असे मानण्यात श्री. गांधी व त्यांचे सहकारी पुढारी यांनी भयंकर प्रमाद केला आहे. आता श्री. गांधी यांना आपली चूक कळून आली आहे. तेव्हा आपल्या न टिकणाऱ्या भूमिकेवरून ते माघार घेतील किंवा निदान आपल्या असंस्कृत देशबांधवांना स्वतःच्या व्यवहारज्ञानानुसार स्वतःचा भावी कार्यक्रम ठरविण्यास मोकळे सोडतील अशी आम्ही आशा करतो. त्यांच्यातील बहुसंख्य लोकांनी हा कायदा झुगारून देण्याचे ठरविले आणि त्याचे परिणाम—आपले व्यापाराचे हक्क सोडणे वगैरे—भोगण्याचे ठरविले, तर ट्रॅन्सवॉल सरकार, कायद्याच्या व नीतीच्या दृष्टीने, निरपराध ठरेल.

२. "नाही" हा शब्द येथे गळला आहे, पण तो "इंडियन ओपिनियन"च्या प्रतीमध्ये आहे.

१३७. हिंदी मुसलमानांना विनंती[1]

जोहान्सबर्ग

ता. १९ ऑगस्ट, १९०७

आम्ही, खाली सह्या करणारे मुसलमान व्यापारी ट्रान्सवॉलमधील हमीदिया इस्लामिया अंजुमनचे अध्यक्ष, चिटणीस व सभासद आहोत. आशियावासी कायद दुरुस्ती विधेयकामुळे हिंदी मुसलमानांची दुर्दशा काय होईल हे आपल्या नजरेस आम्ही आणू इच्छितो. या कायद्यावरील प्रमुख आक्षेप आपल्याला परिचित आहेत असे आम्ही गृहीत धरतो. पण मुसलमान म्हणून ज्याचा आमच्यावर विशेष परिणाम होणार आहे, त्या एका आक्षेपार्ह बाबीकडे आम्ही आपले लक्ष वेधतो. ती बाब म्हणजे हा कायदा तुर्कस्तानातील ख्रिस्ती व यहुदी यांना लागू होणार नसताना तुर्कस्तानातील मुसलमानांना लागू होणार आहे.

खरोखर, हा कायदा साऱ्या हिंदी लोकांना लागू आहे, म्हणून त्याचा संबंध अखिल हिंदी जनतेशी आहे. पण मुसलमानांना तो दुप्पट कठोरपणे लागू होणार आहे. कारण त्यांच्या धर्माचा त्याने मुद्दाम अपमान केला आहे, आणि इतरांपेक्षा हिंदी मुसलमानांचा स्वाभिमान अधिक दुखावला आहे. कारण हिंदी समाजात मुसलमान लोक अधिक श्रीमंत व अधिक सन्माननीय आहेत.

आम्ही असे सांगतो की, सुदैवाने दक्षिण आफ्रिकेत, हिंदू-मुसलमानांमध्ये वैमनस्य नाही. हिंदी म्हणून आम्ही सर्वजण शांततेने व स्नेहभावाने एकत्र राहातो आणि मोकळेपणाने एकत्र येतो. तसेच आमच्याविरुद्ध असलेल्या द्वेष–भावाशी व जुलमाशी आम्ही एकजुटीने मुकाबला करतो. आम्हांला टोचणाऱ्या अडचणींवर आम्ही भर देत आहो, याचे कारण इतकेच की सर्व हिंदुस्थानातील मुसलमानांचे लक्ष आपल्या दुर्दशेकडे वेधावे आणि आमच्या लढ्यात आपले सक्रिय सहाय्य मिळवावे. हिंदी म्हणून व मुसलमान म्हणून आम्ही आपल्या सहानुभूतीची याचना करतो. आमची बाजू सरकारकडे मांडून व आपल्याला वाटणाऱ्या इष्ट मार्गांनी आपण आम्हांस साहाय्य करावे. आम्हांला इंग्लंडहून पुष्कळ मदत मिळत आहे, तरी आमच्याशी

१. हा मजकूर बहुधा गांधीजींनी लिहिला असावा, त्यांना हे विनंतीपत्र हिंदुस्थानात प्रसृत करावयाचे होते. पाहा : "वाचकांना सूचना" (लेख १४४), "हमीदिया इस्लामिया अंजुमनचे पत्र" (लेख १५०).

सहानुभूती बाळगणारे येथील गोरे वसाहतवाले आम्हांला विचारतात की, तुमची मातृभूमी, भारतभूमी, तुमच्यासाठी काय करीत आहे?

आपले,
इमाम अब्दुल कादिर सालिम बावजीर (अध्यक्ष)
एम्. पी. फॅन्सी (मंत्री)
इब्राहीम सालेजी कुवाडिया (कोषाध्यक्ष)
ईसाप इस्माइल मियाँ (आश्रयदाते)
अब्दुल गनी, एम. सी. कमरुद्दीन आणि कं. (आश्रयदाते)
(आणि इतर ३३)

इंडियन ओपिनियन ३१-८-१९०७

१३८. "स्टार"ला पत्र[1]

जोहान्सबर्ग,
ता. २० ऑगस्ट, १९०७

संपादक,
स्टार
[जोहान्सबर्ग] यांस

महाशय,

आपल्या सौजन्यावर पुनः एकदा नाइलाजाने आक्रमण करणे मला भाग पडत आहे. आपण अद्याप माझा मसुदा[2] पुरा वाचला नाही असे मला वाटते. मी जी सूचना मांडली आहे तिचा अर्थ असा नाही की, आशियावासी कायद्याची काही कलमे रद्द करावी आणि त्या कायद्याचा थोडा भाग व प्रवेश-विषयक कायद्याचा पुष्कळ भाग एकत्र करून त्याचा नवा कायदा बनवावा. परंतु मला आशियावासी कायदा पूर्णपणे रद्द व्हावयास हवा. कारण, मला असे वाटते की, माझ्या योजनेमुळे वसाहतवाल्यांना पाहिजे

१. ता. २४-८-१९०७ च्या "इंडियन ओपिनियन"मध्ये हे उद्धृत केले आहे.
२. पाहा : "जनरल स्मट्स् यांच्या खाजगी चिटणिसास पत्र" लेख १०५.

ते सर्व मिळत आहे आणि माझ्या देश-बांधवांचा काही उपमर्द होत नाही. बोटांच्या ठशांचा प्रश्न हा त्या अत्यंत आक्षेपार्ह कायद्यातील अतिशय भयप्रद भाग असला, तरी तो सक्तीचा होईपर्यंत आम्ही त्याला परमोच्च स्थान दिलेले नव्हते, हे दाखविण्यासाठी माझ्या व माझ्या सहकाऱ्यांच्या लेखांतून प्रदीर्घ उतारे काढून ते तुमच्यावर मी लादीत नाही. लॉर्ड मिल्नर यांच्या सूचनेप्रमाणे[1] जे परवाने दिले गेले, त्यावर आम्ही खुषीने बोटांचे ठसे उठविले या घटनेचे स्मरण आपल्याला सहजच होईल. त्यावेळचा प्रश्न खुषीचा होता आणि तोही फक्त एका आंगठ्याचा (ठसा) देण्याचा होता, आशिया-वासी कायद्यामध्ये दहा बोटांचे ठसे देण्याचा प्रश्न आहे– आणि तेही एकदा देण्याचा नव्हे तर अधिकाऱ्यांच्या इच्छेस येईल तितक्या वेळा. दहा बोटांचे ठसे खुशीने देण्याचा उपदेश मी माझ्या देशबांधवांना केला, तरी ते तो उपदेश झटकन् झिडकारून टाकतील असे मला वाटते. पण याहून अधिक मी काही लिहीत नाही. या प्रश्नातील हिंदी लोकांच्या बाजूचा विचार गंभीरपणे व निर्विकारपणे अद्याप होऊ शकत नाही, याचा मला खेद वाटतो. माझे देशबांधव एवढेच म्हणतील की, सारा गोरा ट्रान्सवॉल आमच्याविरुद्ध उभा राहिला तरी ईश्वर आमचा सांगाती आहे.

आपला
मो. क. गांधी

स्टार, २१-८–१९०७

१३९. " रँड डेली मेल " ला पत्र

जोहान्सबर्ग,
ता. २० ऑगस्ट, १९०७

संपादक,
रँड डेली मेल
[जोहान्सबर्ग] यांस,

महाशय,

जनरल स्मट्स यांना सादर केलेल्या माझ्या योजनेचा गौरव आपण आपल्या अग्रलेखात केला आहे. त्यात आपण आशियावासी जनतेला असा सल्ला दिला

1. पाहा खंड : ३, लेख २३३

आहे की, "उत्साहाच्या भरात केलेल्या निर्धाराचा पुनः विचार करा, कारण ज्या देशात अर्धरानटी आदिवासी समाज मोठ्या प्रमाणावर आहे त्यातील कायद्याला संघटित प्रतिकार करणे ही किती गंभीर गोष्ट आहे, हे कदाचित तुम्हांला पुरे कळले नसेल." गेले दहा महिने जो निर्धार दृढपणे पाळला गेला, त्याला "उत्साहाच्या भरात केलेला" असे आपण मानावे हे चमत्कारिक आहे.

परंतु मी या चार ओळी लिहीत आहे याचे कारण इतकेच की, "अर्धरानटी आदिवासी समाज आणि संघटित प्रतिकाराचा गंभीरपणा" यामध्ये काय नाते आहे हे आपण जनतेला कळवू शकाल काय? याची मला जिज्ञासा आहे. नामर्द बनविणाऱ्या कायद्याला हिंदी लोक मान्यता देत नाहीत, म्हणून त्यांच्यावर त्या आदिवासी लोकांचा हल्ला घडवून आणावयाचा आहे की काय, हे मला कळत नाही.

आपला,
मो. क. गांधी

रँड डेली मेल २२–८–१९०७

१४०. वसाहतमंत्र्याला अर्ज[१]

टपालपेटी क्र. ६५२२
जोहान्सबर्ग,
ता. २३ ऑगस्ट, १९०७

नेकनामदार, वसाहतमंत्री,
लंडन यांस,

ट्रान्सवॉलमधील ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या अध्यक्षाचा अर्ज

नम्रपणे दर्शवितो की, ट्रान्सवॉलच्या पार्लमेंटने मंजूर केलेल्या प्रवेशनियंत्रक बिलाविषयी आपले विचार मांडण्यासाठी ट्रान्सवॉलच्या ब्रिटिश इंडियन असोसिएशनची समिती बादशाही सरकारकडे सादर निवेदन करीत आहे.

१. ता. ३१-८-१९०७ च्या "इंडियन ओपिनियन" मध्ये हे प्रसिद्ध झाले आहे आणि त्याचा गुजराती अनुवाद ता. २४-८-१९०७ च्या अंकात आला आहे.

या बिलाच्या बाबतीत सदरील समितीने वरील पार्लमेंटच्या सभागृहाकडे दाद मागितली होती. त्याचा पूर्ण वृत्तांत त्या सभागृहांना सादर केलेल्या अर्जाच्या[1] प्रतीवरून कळून येईल. ते अर्ज अ व ब परिशिष्टात जोडलेले आहेत.

सदरील समिती आदरपूर्वक निवेदन करीत आहे की, वरील बिल पुढील कारणासाठी आक्षेपार्ह आहे--

(१) आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाला त्याने शाश्वती मिळते.

(२) युद्धापूर्वी जे हिंदी लोक ट्रान्सवॉलमध्ये स्थायिक झाले आणि त्यांच्यापैकी ज्या बऱ्याच लोकांनी १८८५ च्या तिसऱ्या कायद्याप्रमाणे वास्तव्याची किंमत म्हणून ३ पौंडही भरले, पण अर्ज केल्यानंतर परतीचे परवाने मिळाले नाहीत म्हणून, किंवा शांतता-संरक्षक वटहुकुमाप्रमाणे अशा परवान्यासाठी अद्याप अर्ज केले नाहीत म्हणून, जे ट्रान्सवॉलला परत येऊ शकले नाहीत, त्यांचा वास्तव्याचा हक्क या बिलाने अवमानला आहे.

(३) या बिलाने घालून दिलेल्या शैक्षणिक अटीसाठी कोणत्याही हिंदी भाषेला मान्यता दिलेली नाही.

(४) बिलाच्या २ ऱ्या कलमाच्या ४ थ्या पोटकलमाप्रमाणे,[2] बिलातील शैक्षणिक कसोटीस उतरणारे हिंदी लोकही आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाला पात्र होतील.

(५) ट्रान्सवॉलमध्ये पूर्वीच स्थायिक झालेल्या हिंदी व्यापाऱ्यांना आपले विश्वासू कारकून किंवा साहाय्यक अथवा घरकामाचे गडी यांना येथे तात्पुरते आणण्यासाठीही या बिलाने काही सोय केलेली नाही.

(६) या बिलाच्या ६ व्या कलमाच्या " क " पोटकलमाप्रमाणे, आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयक लागू असणाऱ्या लोकांना सक्तीने हद्दपार करण्याचा हक्क दिलेला आहे.

आक्षेपांचे विवेचन

आक्षेपांच्या उपर्युक्त कारणांची चर्चा क्रमशः करण्यासाठी समिती आता आपली परवानगी मागत आहे.

१. पाहा : " ट्रान्सवॉल विधिमंडळास अर्ज " (लेख ६२) व " ट्रान्सवॉल विधान परिषदेस अर्ज " (लेख ८१)

२. पाहा : या अर्जासोबतचे परिशिष्ट " क "

पहिले कारण

बादशाही सरकारला हे माहीत आहेच की, आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयक हे, ट्रान्सवॉलमध्ये राहणाऱ्या हिंदी लोकांमध्ये सतत पराकाष्ठेचा क्षोभ उत्पन्न करीत आहे. त्या समाजाच्या स्वाभिमानाला विधेयकातील योजना इतकी अपमानकारक व अपायकारक आहे की, त्या समाजातील पुष्कळ लोक विधेयकानुसार नोंदणी करून घेण्यापेक्षा नोंदणी न केल्यामुळे होणारी शिक्षा–आपल्या सर्व भौतिक उत्कर्षाची हानी सुद्धा–पत्करण्यास नम्रतेने सिद्ध आहेत. हे बिल प्रथम दाखल करण्यात आले, तेव्हा ते तात्पुरत्या स्वरूपाचे होते. आशियावासियांच्या प्रवासासंबंधी या बिलासारखा दुसरा कायदा अस्तित्वात नसल्याने आणि लोकनियुक्त मंडळाचा निर्णय पुढे व्हावयाचा असल्याने हे बिल मांडण्यात आले होते. या बिलाच्या पहिल्याच कलमाने आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाला कायमचे स्वरूप दिले आहे आणि आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाच्या अंमलबजावणीसाठी अवश्य असणाऱ्या, शांतता–संरक्षक वटहुकुमातील योजनाही कायम केल्या आहेत.

दुसरे कारण

हे सर्वांना माहीत आहे की, युद्ध सुरू होताच पुष्कळ हिंदी लोक ट्रान्सवॉल सोडून गेले; पण ते अद्याप आपल्या मानलेल्या स्वदेशाला (दक्षिण आफ्रिकेला) परतले नाहीत. या देशातील वास्तव्यासाठी त्यांच्यापैकी पुष्कळांनी जुन्या डच सरकारला ३ पौंड भरलेले आहेत. शांतता-संरक्षक वटहुकुमाप्रमाणे परवाने मिळविण्याच्या मार्गात भयंकर अडचणी असल्यामुळे, ते ट्रान्सवॉलला परत येऊ शकले नाहीत. परक्या युरोपियनांना असे परवाने मागणी करताच मिळतात. काही हिंदी लोकांनी अजून परवान्यासाठी अर्जही केलेले नाहीत. या निर्वासितांना कोणतीही युरोपियन भाषा येत नसल्यामुळे या बिलाप्रमाणे, ते प्रतिबंधित प्रवेशक ठरतील. येथे ज्यांचे हितसंबंध आहेत अशा सत्पात्र ब्रिटिश प्रजाजनांना या निषेधाचा तडाखा जोराने बसेल. अशा प्रकारे वास्तव्याचा अधिकार रद्द करून या बिलाने केप कॉलनीमधील तशाच बिलापुढेही फार मोठी मजल मारली आहे.

तिसरे कारण

हिंदी भाषांना मान्यता नाकारणारे हे बिल अनुचित व अन्याय्य भेदभाव निर्माण करीत आहे.

चौथे कारण

कलम २ चे पोट कलम ४ अतिशय मोघम असून त्याचा अर्थ लावणे कठीण आहे; असे समितीचे नम्र मत आहे. त्या पोटकलमाचा रोख इतर बाबींबरोबरच,

सुशिक्षित भारतीयांविरुद्ध आहे हे स्पष्ट आहे. आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाच्या अटींना मान देण्यास त्या भारतीयांना भाग पाडून, त्या पोटकलमाने एका हाताने जे दिले, ते दुसऱ्या हाताने काढून घेतले आहे. कारण, उच्च शिक्षण घेतलेला कोणताही भारतीय या कायद्याच्या अटी मान्य करील अशी कल्पनाही करवत नाही. अशा भारतीयांना या कायद्याच्या कक्षेत आणण्याचे काही कारणही दिसत नाही. या कायद्याचा उद्देश ट्रान्सवॉलमध्ये राहणाऱ्या हिंदी लोकांची ओळख पटावी हा आहे, आणि अशा हिंदी लोकांना युरोपियन भाषा येत असल्यामुळे त्यांच्या-बरोबर ओळखीच्या खुणा आपोआप असतात. या वसाहतीत राहणारे बहुसंख्य आशियावासी निरक्षर असल्यामुळे आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयक अवश्य आहे असे समजले जाते. सुशिक्षित हिंदी लोकांना हा कायदा लागू करणे हा त्यांचा अकारण अपमान आहे आणि या बिलातील शैक्षणिक कलमाचा लाभ त्यांना मिळू न देण्याचा हा अप्रत्यक्ष प्रयत्न आहे असे या समितीचे नम्र मत आहे.

पाचवे कारण

ट्रान्सवॉलमध्ये राहण्याचा हक्क असलेल्या हिंदी लोकांना तात्पुरते मदतनीस आणण्याची तरतूद नसणे ही मोठी तक्रार आहे हे नाकारता येणार नाही.

सहावे कारण

मूळच्या मसुद्यात ६ व्या कलमातील पोट कलम "क" नव्हते. वर वर्णिल्याप्रमाणे, ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाच्या बाबतीत जीवन-मरणाचा लढा लढत आहेत. या कायद्याला मान्यता देण्यापेक्षा तुरुंगातील यातना सहन करण्यास हजारो हिंदी तयार आहेत असे अनुमान निघते. पुष्कळ हिंदी लोकांचे ट्रान्सवॉल हे घर आहे. तेथे ते प्रामाणिकपणे रोजगार चालवितात. अशा लोकांना या देशातून हाकलून लावणे म्हणजे प्रायः उपासमारीत ढकलणे होय. निदान त्यांच्या आयुष्यातील उत्कर्षाचा विध्वंस करणे तरी खचित होय. नोंदणी-पत्र घेण्यास जो चुकेल त्याला या वसाहतीतून हुसकावण्याची सूचना देण्याची तरतूद आशियावासी कायदा दुरुस्तीविधे-यकात केलेली असली, तरी ही सूचना न मानणाऱ्या अपराध्याला तुरुंगवास ठेवलेला आहे. वर सांगितलेल्या (क) पोट कलमाने स्थानिक सरकारला असा अधिकार दिला आहे की, आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकातील देशातून जाण्याची सूचना फेटाळणाऱ्या माणसाला शरीर-बळाने व सक्तीने, त्यांच्या खर्चाने हद्दपार करावे. म्हणून, हे पोट कलम केवळ क्रूरपणाचेच आहे असे नव्हे, तर ते पराकाष्ठेच्या अन्यायाचे आहे. कारण, त्यामुळे आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकात अप्रत्यक्षरीत्या अशा दुरुस्त्या होणार आहेत की, त्या कायद्याखाली येणाऱ्या लोकांचे त्यामुळे फार नुकसान व्हावे. अशी दुरुस्ती प्रत्यक्ष कायद्यात केली असती, तर त्या कायद्याला बादशहांची संमती

मिळाली नसती, अशी खात्री आमच्या समितीला वाटते. म्हणून आमच्या समितीला असा विश्वास वाटतो की, या पोट कलमाने अमर्याद सत्ता घेण्याचा जो मार्ग स्वीकारला आहे तो बादशाही सरकारला अत्यंत आक्षेपार्ह वाटेल. याशिवाय सक्तीने हद्दपार केलेल्या माणसाची मालमत्ता जप्त होईल. आणि त्या माणसांना कोठे पाठवावयाचे याची तरतूद केलेली नाही. अशा लोकांना केप व नाताळ हे आत येऊ देणार नाहीत. म्हणून त्यांना सक्तीने हिंदुस्थानात परत पाठविले जाईल–आणि तेथे त्यांना उपासमार सोसावी लागेल. ही हद्दपारी ज्यासाठी होणार तो अपराध असलाच तर क्षम्य आहे, पण एखाद्या घोर अपराधासाठी होणाऱ्या हद्दपारीपेक्षाही अधिक वाईट आहे. कारण घोर अपराधासाठी शिक्षा होणाऱ्या माणसांच्या राहण्या–जेवण्याची सोय केली जाते.

सर्वसामान्य सूचना

सदरील समितीचे असे नम्र मत आहे की, या देशाचा ताबा ब्रिटिशांनी घेतल्या वेळेपासून, हितसंबंधी लोकांच्या आरडाओरडीकडे लक्ष देऊन दुर्बल असलेल्या हिंदी लोकांच्या हितसंबंधाची उपेक्षा किंवा अवहेलना करण्यात आली. कारण, ती आरडाओरड करणारे लोक सामर्थ्यवान होते. हिंदी लोकांना पुनःपुन्हा दिलेली अभिवचने व आश्वासने मोडूनही त्यांच्या हितसंबंधाची हयगय करण्यात आली. शिवाय, सदर समिती बादशाही सरकारचे लक्ष या गोष्टीकडे आदरपूर्वक वेधते की, विधिमंडळात हिंदी लोकांना मुळीच प्रतिनिधित्व नाही, त्या सभागृहाला सादर केलेल्या निवेदनातर्फे एकाही सभासदाने एकही शब्द उच्चारला नाही आणि विधानपरिषदेला सादर केलेल्या तशाच निवेदनाची विल्हेवाट तशीच लावली. खालच्या लोकनियुक्त सभागृहात ज्यांना प्रतिनिधित्व नाही त्यांच्या हितसंबंधाचे संरक्षण करणे हे, त्या विधानपरिषदेचे, अनेक कार्यांपैकी एक कार्य आहे. अशा परिस्थितीत सदर समिती सादर कळवीत आहे की, साम्राज्याची केंद्र-सत्ता असलेल्या बादशाही सरकारकडून खास संरक्षण मिळविण्याचा हक्क हिंदी लोकांना आहे.

प्रार्थना

यामुळे, सदर समिती सादर प्रार्थना करीत आहे की, वरील बिलाला परवानगी देण्यात येऊ नये. आशियावासी कायदा दुरुस्तीविधेयकामुळे बादशहांच्या हिंदी प्रजाजनावर जो अनिष्ट परिणाम होणार आहे, तो दूर करणारी दुरुस्ती या बिलात बादशाही सरकारने करावी.

तथापि, सदर समितीने ज्यांची बाजू मांडली आहे त्या हिंदी समाजाचे दुःख दूर करणे बादशाही सरकारला अशक्य वाटत असेल तर, ट्रान्सवालमधून बादशहांच्या या हिंदी प्रजाजनांना हालविण्यात यावे आणि त्यांच्या स्थायी व प्राप्त हक्कांच्या नुकसानीची भरपाई, स्थानिक किंवा साम्राज्य सरकारच्या खजिन्यातून, करणे हे हिंदी

लोकांच्या व साम्राज्यातील शांततेच्या दृष्टीने चांगले होईल, असे आमच्या समितीचे नम्र मत आहे.

हे न्यायाचे व दयेचे कृत्य केल्यास त्याबद्दल, अर्जदार कर्तव्यबुद्धीने सदैव कृतज्ञ राहतील.

आपला,
ईसाप ईस्माइल मियाँ
अध्यक्ष
ब्रिटिश इंडियन असोसिएशन

परिशिष्ट "क"

वरील निवेदन-पत्रामध्ये (अर्जात) बिलांतील ज्या उताऱ्यांची चर्चा केली आहे ते पुढीलप्रमाणे :

कलम–१. १९०३ चा शांतता-संरक्षक वटहुकूम या कायद्याने रद्द केला जात आहे, मात्र १९०७ च्या आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाची अंमलबजावणी करण्यासाठी असलेले अधिकार किंवा अधिकार–क्षेत्र रद्द किंवा मर्यादित होणार नाही. त्या विधेयकाच्या बाबतीत वरील वटहुकूम पूर्णपणे अमलात राहील.

कलम–२. पोट-कलमे १ व ४. प्रतिबंधित प्रवेशक म्हणजे या कायद्याचा अंमल सुरू झाल्या दिवसानंतर या वसाहतीत प्रवेश करणारी किंवा प्रवेश करण्याची इच्छा धरणारी खालील प्रकारची माणसे—

(१) या वसाहतीत किंवा तिच्या बाहेर एखाद्या अधिकृत नोकराने सांगितले असता जो माणूस युरोपियन भाषेच्या एखाद्या लिपीत, अज्ञानामुळे, काही लिहू शकत नाही व सही करू शकत नाही. या वसाहतीत प्रवेश करण्यासाठी परवानगी मागणारा अर्ज किंवा अधिकाऱ्याने मागितलेला दुसरा तसा काही लेख युरोपियन लिपीत लिहू न शकणारा माणूस. या पोटकलमापुरती, यिडिश ही भाषा युरोपियन भाषा मानली जाईल.

(२) या वसाहतीत अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली शिक्षा झालेला कोणीही इसम त्या वसाहतीत प्रवेश करील किंवा प्रवेश करण्याचा प्रयत्न करील तर, त्याला या वसाहतीतून बाहेर जाण्याचा हुकूम करण्यात येईल अथवा हद्दपार करण्यात येईल; मात्र अशा तऱ्हेची शिक्षा त्याला या वसाहतीबाहेर अन्यत्र कोठे झाली असेल आणि त्याला त्याबद्दल पूर्ण माफी मिळाली असेल तर, त्याला मात्र हा निर्बंध लागणार नाही.

कलम ६–जो माणूस

(अ) हा कायदा अमलात आल्यानंतर, १९०३ च्या अनीतिविषयक वट-हुकुमाच्या तिसऱ्या; तेराव्या अथवा एकविसाव्या कलमांचा किंवा त्यातील दुरुस्त्यांचा भंग केल्याबद्दल शिक्षा पावलेला असेल,

(ब) या वसाहतीत त्याने वास्तव्य केल्याने येथील शांतता, सुव्यवस्था व सुराज्य यांना धोका येईल असे मंत्र्याला सयुक्तिक कारणामुळे वाटेल तो, किंवा,

(क) या वसाहतीबाहेर जाण्याचा हुकूम कोणत्याही कायद्याप्रमाणे दिलेला असताना तो न मानणारा, मंत्र्याच्या सहीच्या वारंटाने त्याला पकडण्यात येईल व या वसाहतीतून बाहेर घालवण्यात येईल, आणि ती हकालपट्टी होईपर्यंत नियमाप्रमाणे कैदेत ठेवण्यात येईल. वरील ब परिच्छेदात सांगितलेला माणूस या वसाहतीतून हाकलला जाणार नाही. मात्र त्याला गव्हर्नरच्या हुकुमाप्रमाणे बाहेर घालविण्यात येईल. गव्हर्नरने अटकेनंतर दहा दिवसांच्या आत त्याला या वसाहतीतून हालविण्याचा हुकूम केला नसल्यास अशा प्रत्येक पकडलेल्या माणसाची कैदेतून सुटका होईल.

कलम ११–या कायद्याप्रमाणे या वसाहतीतून हलविण्याचा हुकूम ज्या माणसाला झाला असेल आणि या कायद्याचे उल्लंघन करून या वसाहतीत येण्याला किंवा राहण्याला मदत किंवा उत्तेजन दिल्यामुळे सातव्या कलमानुसार शिक्षा झालेला दुसरा कोणताही इसम या वसाहतीतून किंवा दक्षिण आफ्रिकेतून त्यांची हकालपट्टी करण्यासाठी अथवा ती करण्यापूर्वी या वसाहतीत किंवा अन्यत्र त्यांना अटकेत ठेवण्यासाठी जो खर्च येईल तो त्याने दिला पाहिजे; अशा खर्चाचा तपशील व वट्ट आकडा यांचे प्रमाणपत्र अधिकाऱ्याने शेरीफला दाखल केल्यानंतर, वरिष्ठ न्यायमंडळाच्या निकालाप्रमाणे ज्या पद्धतीने दंड वसूल केला जातो त्या पद्धतीने या वसाहतीत त्या माणसाच्या माल-मत्तेतून हा खर्च वसूल केला जाईल. खर्चाची ही वसूल केलेली रक्कम शेरीफ खजिन-दाराकडे पोहोचती करील, आणि तो खजिनदार, वरील खर्च व वसुलीचा खर्च वजा करून जी रक्कम उरेल ती त्या मालमत्तेच्या मालकाला किंवा त्याने नेमलेल्या माणसाला दिली जाईल.

कलोनियल ऑफिस रेकॉर्डस्
सी. ओ. २९१ । १२२

१४१. दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीला तार[1]

[जोहान्सबर्ग,
ता. २३ ऑगस्ट, १९०७ पूर्वी

दक्षिण आफ्रिका,
ब्रिटिश भारतीय समिती

[लंडन] यांस,

प्रवेश-विषयक बिल बादशहांच्या मंजुरीसाठी पाठविले आहे. अर्ज[2] रवाना झाला आहे. स्थायिक हिंदी लोकांना हे बिल अपायकारक आहे. सत्याग्रहींना सक्तीने हद्दपारी करण्याची तरतूद बिलात मुद्दाम घातलेली आहे. बिलाला परवानगी नाकारावी किंवा साम्राज्य सरकारच्या खजिन्यातून सर्व नुकसानभरपाई द्यावी अशी प्रार्थना.

कलोनियल ऑफिस रेकॉर्डस्
[ब्रिटिश इंडियन असोसिएशन]
सी. ओ. २९१।१२२

१४२. सुचविलेली तडजोड

ट्रान्सवॉल्चे वासाहतिक सचिव व श्री. गांधी यांच्यामध्ये झालेला पत्रव्यवहार आम्ही अन्यत्र प्रसिद्ध करीत आहो.[3] श्री. गांधी यांनी केलेली सूचना जनरल स्मट्स यांनी मान्य केलेली नाही, ही अत्यंत कीव करण्यासारखी गोष्ट होय. ती सूचना हिंदी समाजाच्या वतीने करण्यात आलेली नसली तरी, बिकट परिस्थितीतून सुरक्षित मार्ग

१. ही तार एल. डब्ल्यू. रिच यांनी ३१ ऑगस्ट रोजी कलोनियल ऑफिसला पाठविली.
२. पाहा : लेख १४०.
३. पाहा : जनरल स्मट्स यांच्या खासगी चिटणिसाला पत्रे (लेख १०५) व (लेख १२५).

काढण्याची दिशा दोन्ही पक्षांना त्यात दाखविलेली होती. कायद्याची अंमलबजावणी पुरेपूर करण्याच्या आपल्या ताकदीवर जनरल स्मट्स विसंबून आहेत आणि म्हणून त्यांनी श्री. गांधींची सूचना फेटाळली. इतक्या समंजस सूचनेचा अव्हेर करण्यात आला, त्यावरून ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना जनरल स्मट्स किती क्षुद्र लेखतात हे स्पष्ट होते, असे म्हटल्याशिवाय आम्हांला राहावत नाही. त्यामुळे, आम्हांला असे वाटते की, या कायद्याचा अव्हेर करण्याची आपली मोहीम अखेरपर्यंत चालविण्याचे कर्तव्य ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना पूर्वीपेक्षा आता बलवत्तर झाले आहे. ट्रान्सवॉल सरकारच्या या ठाम निश्चयामुळे, कितीही महान स्वार्थत्याग करावा लागला तरी, तो करण्यास पूर्वीपासूनच सिद्ध असलेल्या हिंदी लोकांची काहीच हानी होणार नाही. कोणत्याही गोष्टीपेक्षा आपल्या प्रतिष्ठेला अधिक किंमत देणाऱ्या हिंदी लोकांच्या चित्तात तुरुंगवास किंवा हद्दपारी यामुळे अणुमात्र भय उत्पन्न होण्याचे कारण नाही.

श्री. गांधींनी आपली योजना मांडताना एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. तो हा की, ट्रान्सवॉलमध्ये वास्तव्य करण्याचा हक्क असलेल्या हिंदी लोकांची ओळख पटविण्याचा आपला उद्देश तडीस नेताना, स्थानिक सरकार हिंदी समाजाच्या इच्छांचा व भावनांचा विचार करण्याची कृपा करील की नाही ? "नाही" असे जनरल स्मट्स यांचे उत्तर आहे. आता हिंदी लोकांनी आपले उत्तर द्यावयाचे आहे. ट्रान्सवॉलमध्ये अत्यंत अपमानाचे जिणे जगणे किंवा ब्रिटिश साम्राज्याचे नागरिक व मानवी जीव म्हणून आपली गणना व्हावी यासाठी पराकाष्ठेचा प्रयत्न करणे, हे दोनच मार्ग त्यांना मोकळे आहेत.

इंडियन ओपिनियन, २४-८-१९०७

१४३. मनमोकळी सहानुभूती

आमच्या ट्रान्सवॉलमधील बांधवांनी आपल्या स्वाभिमानाला बाधक असणाऱ्या बिलाबद्दलचा तिटकारा ज्या मार्गाने व्यक्त केला, त्याबद्दल आपली मनःपूर्वक मान्यता ब्लूमफॉन्टीन येथील "दि फ्रेंड" या वृत्तपत्राने व्यक्त केली आहे, आणि त्यायोगे सार्वजनिक सेवा बजावली आहे व हिंदी लोकांची हार्दिक कृतज्ञता संपादन केली आहे. या विषयाचे विवेचन करण्यासाठी 'फ्रेंड' या पत्राने अग्रलेखांची एक माला गुंफून आपली धडाडीची वृत्ती व सार्वजनिक सेवेची भावना प्रकट केली आहे. या लेख-

मालेच्या शेवटी त्या पत्राने असा निष्कर्ष काढला आहे की, अपमानास्पद कायद्याला "सविनय प्रतिकार" करून त्या कायद्याचा जो निषेध हिंदी लोकांनी केला आहे, तो पूर्णपणे समर्थनीय आहे. 'फ्रेंड' चे उद्‌गार[1] आम्ही अन्यत्र प्रसिद्ध केले आहेत, त्याकडे ट्रान्सवॉलमधील वृत्तपत्रांनी लक्ष द्यावे, अशी आमची इच्छा आहे.

इंडियन ओपिनियन, २४–८–१९०७

१४४. वाचकांना सूचना

"इंडियन ओपिनियन"चा गुजराती विभाग सध्या अमूल्य सेवा करीत आहे, असे आमचे मत आहे. हे मत कदाचित् कोणाला अतिशयोक्तीचे वाटेल; पण ते न्यायाचे आहे. सध्या ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक धडाडीचा लढा चालवीत आहेत आणि तो लढा शक्य त्या सर्व प्रकारांनी पुढे नेण्याच्या बाबतीत हे पत्र व्यग्र आहे. म्हणून आम्हांला असे वाटते की, या पत्रातील लढ्यासंबंधीची प्रत्येक ओळ प्रत्येक हिंदी माणसाने वाचणे हे त्याचे कर्तव्य आहे. जे वाचले असेल ते पुढे आचरणात आणावयाचे आहे. वाचून झाल्यानंतर अंक जतन करून ठेवावयाचा आहे–फेकावयाचा नाही. काही लेख व भाषांतरे पुनःपुनः वाचावीत अशी आमची शिफारस आहे. शिवाय, हिंदुस्थानातील प्रत्येक घरात आमच्या कार्याची चर्चा झाली पाहिजे. हे घडवून आणण्यासाठी आमचे वाचक पुष्कळ मदत करू शकतील. ते आपल्या मित्रांना "इंडियन ओपिनियन" च्या जरूर तितक्या प्रती पाठवू शकतील; आणि त्या वाचण्याची विनंती त्यांना करून त्यांच्याकडून शक्य ती मदत मिळवतील. हिंदी मुस्लिमांना हमीदिया इस्लामिया अंजुमनने पाठविलेले पत्र[2] या अंकात छापलेले आहे. या अंकाच्या शेकडो प्रती हिंदुस्थानला पाठवणे अवश्य आहे, असे आम्हांस वाटते.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २४–८–१९०७

१. हे येथे दिलेले नाहीत. पाहा. "खरा मित्र" (लेख १४९)
२. पाहा : "हिंदी मुस्लिमांना विनंती." (लेख १३७)

१४५. दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समिती

ही समिती जोराने काम करीत आहे. या समितीच्या प्रयत्नामुळेच फ्रीडडॉर्प-मधील हिंदी लोक सत्यानाशापासून वाचले. समितीने आपले उपयुक्त कार्य अद्याप चालू ठेवले आहे. श्री. रिच यांचे श्रम अपार आहेत. समितीला आपल्या कामासाठी अधिक पैशाची जरूरी आहे. ट्रान्सवॉलहून बरीचशी आर्थिक मदत पाठविण्यात आली आहे. तेथून अधिक मदतीची अपेक्षा तूर्त करू नये. ट्रान्सवॉलचा लढा हा साऱ्या द. आफ्रिकेचा लढा आहे. म्हणून आम्ही नाताळ इंडियन काँग्रेसला अधिक पैसे पाठविण्याचा आग्रह करतो. या बाबतीत केपमधील आमच्या बांधवांनी आपले कर्तव्य मुळीच पार पाडलेले नाही. त्यांनी व डेलागोआ- बे यामधील हिंदी लोकांनी वर्गण्या गोळा करून काही पैसे पाठविले, तर ते अनुचित होणार नाही. त्यामुळे हे सिद्ध होईल की, तेही लढ्यास हातभार लावण्यास तयार आहेत.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २४–८–१९०७

१४६. श्री. गांधींची सूचना

श्री. गांधी यांनी जनरल स्मट्स यांना पाठविलेले पत्र, त्याचे उत्तर आणि त्याचे प्रतिउत्तर[1] यावर "लीडर" "स्टार" व "(रँड)डेली मेल" यांनी टीका केली आहे. जनरल स्मट्स् यांचे पत्र म्हणजे उघड उघड धमकी आहे. त्यावरून हे सिद्ध होते की, या कायद्याचा अंमल करणे अगदी कठीण आहे. पाच–पन्नास माणसांना तुम्ही तुरुंगात पाठवू शकाल, पण हजारो लोकांना शिक्षा करण्याचे धाडस जनरल स्मटस् यांना, ते कितीही शूर असले तरी, होणार नाही. म्हणून ते म्हणतात, हा कायदा पूर्णपणे अंमलात येईल. असे जर आहे तर इतके दिवस ते स्वस्थ का बसले? प्रवेशविषयक

१. पाहा : 'जनरल स्मट्स यांच्या खाजगी चिटणिसास पत्रे' (लेख १०५) व (लेख १२५)

कायद्यात फेरबदल का करण्यात येत आहेत? नवी नोंदणी-पत्रे देण्याला त्यांचे अधिकारी इतके उत्सुक का आहेत? त्यांची धैर्याची बढाई व त्यांची प्रत्यक्ष कृती यामध्ये महदंतर आहे. त्यांनी जे उत्तर दिले, त्याहून दुसरे उत्तर ते देऊ शकले नसते. कारण, सध्या युद्ध चालू आहे. तेव्हा काही काळ तरी त्यांना आपला आब राखावयाचा आहे. आणीबाणीच्या क्षणी हिंदी समाज अचल राहिला, तर ते प्रत्यक्ष काय करतील हे आता पाहावयाचे.

वृत्तपत्रातील टीकेवरूनही असे दिसते की, शिवीगाळ व उपहास यां भूमिकांवरून धाकदपटशा देण्याचे डावपेच त्यांनी सुरू केले आहेत. जनरल स्मट्स आपले म्हणणे सोडणार नाहीत, म्हणून हिंदी समाजाने ईश्वराला सोडून जनरल स्मट्सच्या गुलामगिरीच्या कायद्याला कवटाळणे चांगले, असा उपदेश ही पत्रे आता करीत आहेत. "डेली मेल"ने तर पुढे जाऊन हिंदी लोकांना अशी धमकी दिली आहे की, ट्रान्सवॉलमध्ये रानटी काफिरांची मोठी वस्ती आहे.[1] याला आम्ही "साठी बुद्धी नाठी" असे म्हणतो. या कायद्याची अंमलबजावणी करताकरता गोऱ्यांचे काळ्याचे पांढरे झाले व ते म्हातारे झाले असे म्हणता येईल, परंतु त्यांची आशा पूर्ण झाली नाही. म्हणून ते बरळू लागले आहेत. नाही तर आमचा लढा व काफिर यांच्यामध्ये कोणते नाते आहे? त्यांनी आमच्यावर हल्ला करावा म्हणून ही चिथावणी आहे काय? रुग्णशय्येवर पडलेला माणूसच असे शब्द उच्चारील.

मात्र, जनरल स्मट्स यांच्या उत्तरावरून आपण एक गोष्ट स्वच्छपणे लक्षात ठेवली पाहिजे की, ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक, आपल्या संपत्तीचा मोह सोडून, तुरुंगातील यातना सोसून व हद्दपार होण्यात आपली प्रतिष्ठा आहे असे समजून, या लढ्यात खंबीर राहतील तरच त्यांना यश मिळेल. ईश्वरावर जीवंत श्रद्धा असेल तरच हा सारा स्वार्थत्याग करणे शक्य होईल तुम्ही मुसलमान असा किंवा हिंदू असा, पण प्रत्येक हिंदी माणसाच्या श्रद्धेवरच शेवटी सर्व गोष्टी अवलंबून आहेत. श्रद्धेच्या शस्त्राने कोणत्याही संकटावर मात करता येते. ती श्रद्धा कृतीने सिद्ध झाली पाहिजे– शब्दांनी नव्हे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २४–८–१९०७

१. पाहा : "रँड डेली मेलला पत्र" लेख १३९

१४७. प्रिव्ही कौन्सिलकडे आपण दाद मागू शकतो काय ?

सर रेमंड वेस्ट यांनी श्री. रिच यांना एक पत्र लिहिले आहे. ते वाचण्यासारखे आहे. सर रेमंड हे मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ती होते. ते सुप्रसिद्ध वकील आहेत त्यांचे मत असे आहे की, हा नवा कायदा ब्रिटिश तत्त्वांच्या विरुद्ध असल्यामुळे रद्दबातल आहे, असा प्रश्न (प्रिव्ही कौन्सिलमध्ये) हिंदी समाज उपस्थित करू शकेल. हे जर शक्य असेल तर तसे करणे खचित योग्य ठरेल. पण त्यातून काही निष्पन्न होणार नाही असे आम्ही खेदपूर्वक सांगतो. ट्रान्सवॉलमधील प्रख्यात कायदेपंडित या विचाराविरुद्ध आहेत. म्हणून सर रेमंड यांच्या मतावर आपल्याला आशेचे मनोरे बांधता येत नाहीत. हिंदी लोकांचे खरे प्रिव्ही कौन्सिल म्हणजे त्या समाजाचे धैर्य. आपली दुःखे निवारण करणारा ईश्वर हाच एक न्यायाधीश आहे. त्याच्यावरील श्रद्धा हा आपला मोठा वकील आहे. त्याचा युक्तिवाद केव्हाही वाया जाणार नाही. तथापि हिंदी समाजाच्या समाधानासाठी समितीला अशी सूचना केलेली आहे की, इंग्लंडमधील काही प्रमुख वकिलांचा सल्ला या बाबतीत घ्यावा. त्यासाठी पैसे पाहिजेत. म्हणून समितीला आमच्या मागणीप्रमाणे पैसे पाठविले गेले, तर कसोटीचा खटला चालविता येईल की नाही हे ठरविणे शक्य होईल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २४-८-१९०७

१४८. नाताळमध्ये दुष्ट कायदा जारी करता येईल काय ?

श्री. हॅगर यांना उत्तर देताना श्री. मूर यांनी असे सांगितले की, ट्रान्सवॉल-सारखा कायदा नाताळमध्ये आणण्याचा विचार नाताळ सरकार करील. या दुष्ट कायद्याची मौज हीच आहे. त्याची दुर्गंधी केवळ ट्रान्सवॉलमध्येच पसरत नाही, तर एखाद्या सडलेल्या मुडद्याप्रमाणे त्याची दुर्गंधी दाही दिशा पसरते. या उत्तरावरून पुढील गोष्टी स्पष्ट होतात--

(१) ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांवर फार मोठी जबाबदारी आहे.

(२) ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक डळमळले, तर हा कायदा इतरत्रही अमलात आणला जाईल आणि

(३) ट्रान्सवॉलचा प्रश्न हा साऱ्या द. आफ्रिकेचा प्रश्न आहे.

म्हणून ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनी, कितीही संकटे आली तरी, खंबीर हिले पाहिजे. इतर हिंदी लोकांनी, हा प्रश्न आपला आहे असे समजून, जास्तीत जास्त मदत केली पाहिजे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २४-८-१९०७

१४९. खरा मित्र[१]

ब्लूम फॉन्टीन येथील ' दि फ्रेंड 'मधील एका लेखाचे भाषांतर आम्ही दिले आहे. ते प्रत्येकाने काळजीपूर्वक वाचावे अशी आमची शिफारस आहे. या वृत्तपत्राचे नाव " दी फ्रेंड " आहे आणि ते हिंदी समाजाचे " फ्रेंड " (मित्र) म्हणून वागत आहे. या लेखापासून काही विशेष लाभ होईल असे नाही. पण त्या पत्राचा प्रभाव मोठा आहे. त्याच्या संपादकाच्या मनावर जी छाप पडलेली आहे, तीच हजारो गोऱ्या लोकांच्या मनावर आहे. पण ते इतक्यात बोलणार नाहीत. आपण जेव्हा आपले खरे रूप प्रगट करू, तेव्हा ते बोलतील. " फ्रेंड " मधील लेखावरून आपण हे ध्यानी घेतले पाहिजे की, आपण आता थोडीही माघार घेतली तरी साऱ्या हिंदी राष्ट्राची बदनामी होईल आणि त्यातील तीस कोटी भारतीयांची पारख, येथील १३००० (तेरा हजार) काय करतात, यावरून होईल. नुकसान-भरपाई देण्याचा प्रश्न ' फ्रेंड 'ने उभा केला आहे, तो याहून अधिक जोराने यापुढे मांडला जाईल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २४-८-१९०७

१. पाहा : " मनमोकळी सहानुभूती " लेख १४३.

१५०. हमीदिया इस्लामिया अंजुमनचे पत्र

ट्रान्सवॉलमधील हमीदिया इस्लामिया अंजुमनने हिंदुस्थानातील मुसलमान व्यक्ती व संस्था यांना एक अत्यंत महत्त्वाचे पत्र पाठविले आहे;[१] त्या पत्राकडे हिंदुस्थानातील वृत्तपत्रांचे व पुढाऱ्यांचे लक्ष आम्ही वेधतो. सध्या ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक इतक्या गंभीर लढ्यात गुंतलेले आहेत की, त्यांना हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यातून मदत मिळणे जरूर आहे. आतापर्यंत मिळालेली मदत पुरेशी नाही असे आमचे मत आहे. आमचे देशबांधव स्वदेशातील समस्यांनी इतके ग्रासलेले आहेत की, त्यांना दुसऱ्या गोष्टीकडे लक्ष देण्यास वेळ नाही; तथापि ते आमच्या कार्यासाठी थोडासा तरी वेळ देतील अशी आम्हांस आशा आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २४–८–१९०७

१५१. एस्टकोर्टचे अपील[२]

प्रिव्ही कौन्सिलला अपील करण्याचा विचार एस्टकोर्टच्या लोकल बोर्डाने केला होता. पण त्यावर सुप्रीम कोर्टाने विरजण घातले आहे. अपीलासाठी जरूर ती परवानगी सुप्रीम कोर्टाने नाकारली असल्याने लोकल बोर्डाची निराशा झाली आहे. एस्टकोर्टच्या हिंदी लोकांचे आम्ही अभिनंदन करतो.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २४–८–१९०७

१. पाहा : " हिंदी मुस्लीमांना विनंती " लेख १३७.
२. पाहा : " एस्टकोर्टचे अपील " लेख ११६.

१५२. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

पॉचेफ्स्ट्रूम व क्लार्क्सडॉर्प

या दोन शहरांहून नोंदणीचा एकही अर्ज न मिळविता परवाना-कचेरी परत आली. पॉचेफस्ट्रूमची पत्रे म्हणतात की, नोंदणी करणारे अधिकारी सारा वेळ धूम्रपान करीत होते; त्यांना नोंदणी करण्यासाठी एखादा कैदीही मिळाला नाही. पॉचेफ्स्ट्रूम येथील स्वयंसेवक आपले काम करीत होते. पीटर्सबर्गने प्रिटोरियापेक्षा, पॉचेफ्स्ट्रूमने पीटर्सबर्गपेक्षा व क्लार्क्सडॉर्पने पॉचेफस्ट्रूमपेक्षा अधिक कामगिरी केली. पण क्लार्क्सडॉर्प, या शहराने त्या सर्वांवर ताण केली. कारण क्लार्क्सडॉर्प येथील हिंदी लोकांनी स्वयंसेवकही ठेवले नाहीत. त्यांनी बाहेरची मदत मागितली नाही. मिळत असलेली मदत त्यांनी घेतली नाही. तेथील प्रत्येक हिंदी माणसाने आपण होऊन परवाना-कचेरीवर बहिष्कार टाकला. क्लर्क्सडॉर्पने सर्वांवर ताण केली. आता कोणते शहर इतरांवर ताण करील? आणि कशी? या दोन्ही शहरांना तारा[1] गेल्या होत्या. त्यांना त्यांनी उत्तरे दिलीं. पॉचेफ्स्ट्रूम येथील एक जुने रहिवाशी श्री. ई. एन्. पटेल त्या दोन्ही शहरी गेले होते.

स्मट्स यांना लिहिलेल्या पत्रावर टीका

जनरल स्मट्स यांना श्री. गांधींनी लिहिलेले पत्र प्रसिद्ध झालेले आहे. त्यावर "लीडर" व "स्टार" यांनी टीका केली आहे. ही दोन्ही पत्रे म्हणतात की, जनरल स्मट्स यांचे उत्तर अंतिम स्वरूपाचे असल्याने श्री. गांधींनी हिंदी समाजाला, कायद्याला मान्यता देण्याचा सल्ला द्यावा; नाही तर हिंदी समाजाला दुःख भोगावे लागेल. हा उपदेश ठीक आहे. पण तो देणाऱ्यांना हे माहीत नाही की, हिंदी समाज जनरल स्मट्सवर अवलंबून नाही, तो ईश्वराच्या कृपाछत्राखाली आहे––ना जनरल स्मट्सच्या, ना ट्रान्सवॉलमधील गोऱ्यांच्या. आम्ही कायद्याला मान्यता द्यावी, म्हणून त्यांनी जी उत्सुकता दाखविली आहे, त्यावरून असे दिसते की, हिंदी समाजाने केलेल्या प्रतिकाराचे भय त्यांना मनातून वाटत आहे.

जनरल स्मट्सचे उत्तर

जनरल स्मट्स यांचे उत्तर म्हणजे एक प्रकारची धमकीच आहे. त्याची भीती हिंदी लोकांनी बाळगण्याचे काहीच कारण नाही. काही झाले तरी आपण हा कायदा

१. पाहा : पीटर्सबर्ग व पॉचेफस्ट्रूम येथील हिंदी लोकांना तारा, लेख १२२, १२३.

मानावा असा त्यांचा उपदेश आहे. म्हणूनच ते आपल्याला नाना रीतींनी धमकावीत आहेत. कायदा पुरेपूर जारी केला जाईल असे ते म्हणतात. याचा अर्थ काय? तो पुरेपूर जारी केला जाणार नाही असे कोणीच मानीत नाही. त्या कायद्यातील एकही कलम गाळले जाणार नाही, हे प्रत्येकाला माहीत आहे. पण प्रश्न हा आहे की, त्या कायद्याला मान्यता न देणाऱ्या लोकांवर त्या कायद्याची अंमलबजावणी कशी करता येईल? त्यांना शिक्षा करून? तसे असेल तर हिंदी लोक सांगतात, आम्हांला तुरुंगाची किंवा हद्दपारीची डर नाही. अर्थात् जे भित्रे आहेत, त्यांच्यावर त्या कायद्याची बजावणी करणे शक्य होईल. ते लोक आम्हांला मुकले असे मानले पाहिजे. त्यांच्यावर कायदा लादला जाईल हे आम्हांला माहीत आहे. आणि म्हणूनच हिंदी लोकांनी त्याला मान्यता देऊ नये, असे आम्ही म्हणत आहो. पण एक गोष्ट मी खात्रीने सांगतो की, १३,००० (तेरा हजार) हिंदी लोकांना तुरुंगांत टाकणे किंवा हद्दपार करणे जनरल स्मट्सना किंवा दुसऱ्या कोणालाही शक्य नाही. हा सर्वसामान्य नियम आहे की, ज्या कायद्याला बहुसंख्य लोकांची मान्यता आहे तेथेच तो अमलात आणता येतो. जेथे सारेच चोर आहेत तेथे चोरीविरुद्ध केलेला कायदा अमलात येणार नाही, हे मी सांगतो. उदाहरणार्थ, हिंदुस्थानच्या काही भागात, ज्यांना ‘ठग’ म्हणतात, असे लोक ठगगिरी किंवा फसवेगिरी करतात. त्यांना कोणत्याही कायद्याने वश करणे शक्य झाले नाही. अशा प्रकारे जर गुन्हेगार लोक मोकळे राहू शकतात, तर हिंदी लोकांसारख्या निरपराधी लोकांना कोण काय करू शकेल?

व्यापाऱ्यांची परिस्थिती

काही हिंदी व्यापारी चिंताग्रस्त आहेत. ते शेवटपर्यंत टिकाव धरतील की नाही, याविषयी पुष्कळ लोकांना शंका वाटते. हा प्रसंग असा आहे की, ज्याच्याजवळ अधिक संपत्ती, तो अधिक चिंतातुर. प्रश्न हा आहे की, संपत्तीचे जोखड कसे फेकून द्यावयाचे? दुसरे संकट हे की, गोऱ्या व्यापाऱ्यांनी (उधारीने) माल देण्याचे थांबविले आहे. ही स्वागतार्ह गोष्ट होय असे मला वाटते. आतापर्यंत गोरे लोक आपल्याला तुच्छतेने लेखत होते आणि हिंदी लोक तुरुंगात जाणार नाहीत असे मानीत होते. पण आता त्यांना कळू लागले आहे की, आपण जे बोलतो त्यात काही अर्थ असतो. पण या बाबतीत हिंदी व्यापाऱ्यांना काय वाटते याचा विचार आपण केला पाहिजे. गोऱ्या व्यापाऱ्यांनी माल देण्याचे बंद केले तर काय होईल? हा एक प्रश्न. याला साधे उत्तर असे की, आपण कायद्याला मान्यता दिल्यानंतरही त्यांनी आपल्याला माल दिला नाही तर आपण काय करू? तेव्हा असा प्रश्न कोणी विचारणार नाही. असे जर असेल, तर तो आताही उद्भवू नये. त्यांनी माल पुरविला नाही आणि आपल्याला आपला धंदा बंद किंवा कमी करावा लागला तर त्याचे आश्चर्य वाटावयास नको.

समाजासाठी आपण क्लेश भोगल्याशिवाय हा कायदा रद्द होईल किंवा आपला काही फायदा होईल, अशी जर कोणा हिंदी माणसाची समजूत असेल, तर ती त्याची मोठी चूक होईल. दुःखे भोगण्यास आपण आता तयार झालो आहोत. ती आपण खुषीने सोसली नाहीत तर कायद्यामुळे होणारा अपमान आपल्याला सोसावा लागेल, आणि त्यामुळे आपल्याला जो कमीपणा येईल तो सहन करावा लागेल. या बाबतीत ज्याला चिंता वाटते त्याला अद्याप शपथेचे महत्त्व कळले नाही असे दिसते. तुरुंगात जाण्यास जे तयार झाले, त्यांना माल मिळाला नाही म्हणून चिंता का वाटावी ? त्यांनी स्वेच्छेने आजपासूनच माल खरेदी करण्याचे थांबविणे हीच त्यांच्या दृष्टीने योग्य गोष्ट होय. तसे झाले म्हणजे त्यांना पुढे काही अडचण येणार नाही आणि आपल्या धनकोला देण्यासाठी पैशाची वाण पडणार नाही. द्रव्याची हानी सोसल्याशिवाय आपल्याला प्रतिष्ठा मिळणार नाही आणि असे कष्ट सहन केल्याशिवाय यापुढे आपल्याला सुख लाभणार नाही. जसजसा काळ लोटेल तसतसे आपल्याला मजेशीर अनुभव येतील. आपल्याला पुष्कळ धमक्या मिळतील. आपली भारी हानीसुद्धा होईल. मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही अशी म्हणच आहे. तसेच द्रव्यहानी, कारागृहातील यातना, हद्दपारीसुद्धा–हे सर्व सहन केल्याशिवाय नवा कायदा रद्द होणे शक्य नाही.

मनिक यांचे निवेदन

हिंदी व्यापाऱ्यांना ‘ वस्त्यां ’मध्ये हालवावे आणि त्यांच्या व्यापाराला मर्यादा घालावी, म्हणून एक कायदा तयार करण्याची विनंती श्री. मनिक यांनी श्री. स्मट्स यांना केली. तिला श्री. स्मट्स यांनी उत्तर दिले की, नव्या कायद्याचा परिणाम कळेपर्यंत दुसरे कोणते कायदे करावेत हे सांगणे शक्य नाही. पण मी स्वतः एक उत्तर देतो. समजा, सारे हिंदी लोक ट्रान्सवॉल सोडून गेले आणि फक्त थोडे बेइमान लोक पाठीमागे राहिले. तसे झाले तर पाठीमागे राहिलेल्या लोकांना काहीही मान न देता कसे तरी जगू दिले जाईल. त्यांना आपल्याबरोबर राहण्यासाठी दुसरी माणसे आणण्याची परवानगी मिळणार नाही हे खचित. म्हणजे त्यांना येथे कुत्र्याचे जिणे जगावे लागेल आणि थोड्याच वर्षांत त्यांचे येथील स्थान आपोआप नष्ट होईल. आता असे समजा की, बऱ्याच हिंदी लोकांनी संपत्तीच्या मोहाने कायद्याला मान्यता दिली, तर त्यांना ‘ वस्त्यां ’मध्ये डांबून ठेवले जाईल हे खास. हिंदी लोकांना ‘ वस्त्यां ’मध्ये पाठविणाऱ्या कायद्याला विरोध मग कोण करील ? कोणी केलाच तर त्याच्या तुणतुण्याचा आवाज कोण ऐकणार ? जर पुष्कळ हिंदी लोकांनी या कायद्याला विरोध केला, तर त्यांना आपल्या इच्छेप्रमाणे कोठेही व्यापार करता येईल हे निःसंशय आणि गोरे वा गौरेतर, सर्व व्यापाऱ्यांना सारखेच लागू होणारे समंजस कायदे अमलात येतील. मग हिंदी व्यापाऱ्यांना येथे मोठ्या मानाने व प्रतिष्ठेने राहाता येईल.

हद्दपारीचा कायदा

पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांनी प्रवेश-विषयक बिल मंजूर केले. ते बहुधा शुक्रवारी गॅझेटमध्ये प्रसिद्ध होईल. ते तत्काळ अमलात येणार नाही. कारण ते इंग्लंडला मंजुरीसाठी पाठवावे लागेल. नव्या कायद्याप्रमाणे ज्यांना ट्रान्सवॉल सोडून जाण्याची शिक्षा होईल, त्यांना सरकार सक्तीने हद्दपार करू शकेल, असे एक कलम त्यामध्ये आम्हांला आढळले. हे कलम नवे आहे. त्यामुळे सरकार कोणाही हिंदी माणसाला नोटीस देऊन सक्तीने हद्दपार करू शकेल. हे नवे संकट आहे. या कायद्याला इंग्लंडमध्ये मान्यता मिळेल की नाही हे खात्रीने सांगता येत नाही. पण जर मान्यता मिळाली तर हद्दपारीचे कलम सर्वांना लागू होईल. पण त्यात काही अर्थ नाही. हिंदी लोकांना तुरुंगांत टाकण्याचे धाडस ट्रान्सवॉल सरकार जर करते, तर त्यांना सक्तीने हद्दपार करण्याचे धाडसही ते करील. परिस्थितीचे वास्तव स्वरूप ध्यानी घेतले तर, असे गृहीत धरले पाहिजे की, हे कलम फक्त पुढाऱ्यांना लागू होईल. या कायद्याविरुद्ध एक अर्ज ब्रिटिश इंडियन असोसिएशन इंग्लंडला पाठवीत आहे[1]– कदाचित, हे बातमीपत्र प्रसिद्ध होण्यापूर्वी तो पाठविला गेलाही असेल.

रस्टनबर्गची तार

रस्टनबर्गहून अशी तार आली आहे की, ईश्वराच्या कृपेने सर्व हिंदी लोकांचा नोंदणीला विरोध पक्का आहे.

"स्टार"ला पत्र

"स्टार"च्या टीकेला उत्तर म्हणून श्री. गांधी यांनी पुढील पत्र लिहिले आहे.[2]

"दी स्टार"

श्री. गांधींच्या या पत्रावर "स्टार"ने खरमरीत टीका केली आहे आणि असा प्रश्न विचारला आहे की, बोटांचे ठसे देण्याला विरोध हा जर मुख्य नव्हता, तर आतापर्यंत त्यावर इतका भर का देण्यात आला? ते पत्र पुढे म्हणते, श्री. गांधींची योजना व्यवहार्य नाही; कारण जर मुलांची नोंदणी केली नाही आणि पोलिसांना आपल्या इच्छेप्रमाणे चौकशी करण्याचा व बोटांचे ठसे घेण्याचा अधिकार दिला नाही, तर, हिंदी लोकांचा लोंढा मोठ्या प्रमाणावर येथे येईल. याला श्री. गांधींनी पुनः प्रत्युत्तर[3] पाठविलेले आहे आणि त्यात असे म्हटले आहे की, बोटांचे ठसे हा

१. पाहा : "वसाहत-मंत्र्याला अर्ज" लेख १४०.
२. पाहा : "स्टार"ला पत्र, लेख १३६.
३. पाहा : "स्टारला पत्र" लेख १३८.

जरी मुख्य मुद्दा नसला, तरी आक्षेपार्ह गोष्टींपैकी तो एक आहे. शिवाय, बोटांचे ठसे देण्याची सक्ती असता कामा नये. लॉर्ड मिल्नर यांच्या वेळी हिंदी समाजाने आंगठ्याचे ठसे खुषीने देण्याचे मान्य केले होते. खुषीनेसुद्धा पण दहा बोटांचे ठसे हिंदी लोक देणार नाहीत. "स्टार"ने श्री. गांधींची योजना काळजीपूर्वक वाचली नाही, पण सारे गोरे हिंदी लोकांविरुद्ध उलटले तरी ईश्वर त्यांच्या पाठीशी आहे--आणि तेवढे पुरेसे आहे.

असोसिएशनची बैठक

असोसिएशनची बैठक बुधवारी भरली. तिला पुढील लोक हजर होते--श्री. इसापमियाँ, श्री. अब्दुल गनी, श्री. नायडू, श्री. शहाबुद्दीन, श्री. अस्वात, श्री. मालिम महंमद, श्री. इमाम अब्दुल कादिर, श्री. उमरजी साले, श्री. गुलाम महंमद, श्री. एम्. पी. फॅन्सी, श्री. करोडिया, श्री. मूसा इसाकजी, श्री. आय. ए. काझी, श्री. अमीरुद्दीन, श्री. वल्लभ राम, श्री. अम्बादास इत्यादि. प्रवेशविषयक बिलासंबंधीचा अर्ज श्री. गांधींनी वाचून दाखविला आणि तो पाठविण्याला व त्यासंबंधी तारा[१] पाठविण्याला परवानगी मागितली. श्री. शहाबुद्दीन यांनी सूचना मांडल्यावर व तिला श्री. फॅन्सी यांनी दुजोरा दिल्यावर सभेने परवानगी दिली. श्री. महंमद शहाबुद्दीन यांच्या सूचनेप्रमाणे व तिला श्री. कुवाडिया यांनी दुजोरा दिल्यानंतर श्री. इसापमियाँ यांची अध्यक्ष म्हणून नेमणूक कायम करण्यात आली. श्री. इमाम अब्दुल कादिर यांच्या सूचनेला श्री. नायडू यांनी पाठिंबा दिल्यानंतर श्री. पोलक साहाय्यक सन्मान्य चिटणीस म्हणून निवडले गेले.

असोसिएशनचे हिशेब "इंडियन ओपिनियन" मध्ये दरमहा प्रसिद्ध करावेत अशी सूचना श्री. फॅन्सी यांनी केली. तिला श्री. उमरजी साले यांनी पाठिंबा दिला आणि ती मंजूर झाली.

ताज्या तारा

ट्रान्सवालला कर्ज देण्याचा ठराव कॉमन्ससभेत मंजूर झाला. पण त्यावर टीका करताना सर चार्ल्स् डिल्क, श्री. लिटल्टन, श्री. कॉक्स इत्यादी सभासदांनी हिंदी लोकांना सोसाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांचे सविस्तर वर्णन केले. माजी चिटणीस श्री. लिटल्टन म्हणाले, हे कर्ज मंजूर करण्यापूर्वी हिंदी लोकांच्या हक्कांचे संरक्षण करणे हे साम्राज्य सरकारचे कर्तव्य आहे. पण ते कर्तव्य करण्यास सरकार चुकले आहे. श्री. कॉक्स यांनी सुचविले की, ५०००००० (पन्नास लाख) पौंडांच्या कर्जातून, ट्रान्सवालमधून हद्दपार होणाऱ्या हिंदी लोकांना नुकसान-भरपाई देण्याची शिफारस साम्राज्य

१. पाहा : "दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीला तार" लेख १४१.

सरकारने उच्च सरकारला करणे अवश्य आहे. या हालचालीवरून असे दिसते की, येथें हिंदी लोक जितके सामर्थ्य प्रगट करतील, तितका त्यांच्या कार्याला इंग्लंडमध्ये पाठिंबा मिळेल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २४–८–१९०७

१५३. जोहान्सबर्ग नगरपालिकेला पत्र

[जोहान्सबर्ग
ता. २८ ऑगस्ट, १९०७]

[टाऊन क्लार्क,
जोहान्सबर्ग

महाशय,]

पहिल्या दर्जाच्या बगीमधून इतरांबरोबर हिंदी लोकांना जाण्यास बंदी करणारी दुरुस्ती वाहतुकीच्या पोटनियमांत करावी, अशी सूचना "सर्वसाधारण कार्यसमितीने" केली असल्याचे माझ्या असोसिएशनच्या समितीला वर्तमानपत्रावरून कळले आहे. माझी समिति आपल्या नजरेस हे आणू इच्छिते की, अशा पोटकायद्यामुळे हिंदी लोकांविरुद्ध द्वेषपूर्ण भेदभाव उत्पन्न होईल, आणि ज्या समाजाचे प्रतिनिधित्व माझी असोसिएशन करीत आहे, त्याचा अकारण उपमर्द होईल. म्हणून "सर्वसाधारण कार्यसमितीची" शिफारस टाऊन कौन्सिल स्वीकारणार नाही असा मला विश्वास वाटतो.

[आपला
इसाप इस्माईल मियाँ]
अध्यक्ष, ब्रिटिश इंडियन असोसिएशन

इंडियन ओपिनियन, ३१–८–१९०७

१५४. प्रवेशासंबंधी अर्ज

ट्रान्सवॉलच्या प्रवेशनियंत्रण बिलासंबंधी लॉर्ड एल्जिन यांना अर्ज करण्याच्या कामी ट्रान्सवॉलच्या ब्रिटिश इंडियन असोसिएशनने एक क्षणही वाया दवडला नाही.[1] हे बिल या महिन्याच्या २६ तारखेच्या गॅझेटमध्ये कायदा म्हणून प्रसिद्ध झाले आहे. त्याबरोबरच असेही जाहीर झाले आहे की, "या कायद्याला बादशहांनी परवानगी नाकारली नाही, असे गव्हर्नरने गॅझेटमध्ये प्रसिद्ध करीपर्यंत हा कायदा अंमलात येणार नाही." म्हणून बादशहांचे मत कळेपर्यंत या कायद्याला काही सामर्थ्य नाही, तेव्हा आशियावासी नोंदणीच्या कायद्याला बादशहाने मंजुरी देण्याचा सल्ला देण्यात लॉर्ड एल्जिन यांनी साम्राज्याच्या दृष्टीने जी घोडचूक केली असे आम्हांस वाटते, ती दुरुस्त करण्याची संधी आता आलेली आहे. या कायद्यामुळे उपस्थित होणाऱ्या प्रत्येक मुद्द्याचा विचार श्री. इसाप ईस्माइलमियाँ यांनी आपल्या अर्जात केला आहे. परंतु तूर्त आम्ही, ट्रान्सवॉलमध्ये स्थायिक बनलेल्या हिंदी लोकांवर या कायद्याचा परिणाम काय होईल, याचाच विचार करण्याचे योजिले आहे.

प्रवेशविषयक वटहुकूम यावेळी जारी नाही, म्हणून आशियावासी नोंदणीकायदा अवश्य आहे आणि तो केवळ तात्पुरता आहे, असे ठाम विधान श्री. डंकन यांनी केल्याचे आम्हांस आठवते. त्यावेळी नामदार श्री. कर्टिस यांनी सांगितले होते की, दरमहा निदान २०० (दोनशे) या प्रमाणात आशियावासी लोकांची आवक येथे चालू आहे. त्या तथाकथित लोंढ्याला थोपविण्यासाठी भीतीने केलेला हा कायदा होता, हे खास. परंतु त्यावेळच्या वासाहतिक सचिवाच्या प्रास्ताविक भाषणानंतर एक वर्ष होऊन गेले तरी अद्याप नोंदणी सुरू झाली नाही आणि आशियावासी नोंदणी कायदा व्यवहारात बेकार ठरलेला आहे. फक्त नोंदणी अधिकारी या वसाहतीमध्ये आशियावासी अर्जदारांच्या शोधात भटकत आहेत. या नोंदणी-कायद्याने त्या आशियावासियांना जे लाभ होतील असे लॉर्ड सेल्बोर्न यांनी सांगितले, ते त्यांना मिळवून देण्यासाठी अधिकाऱ्यांची ही भ्रमंती आहे. ही वस्तुस्थिती म्हणजे श्री. डंकन व श्री. कर्टिस या दोघांच्याही विधानावर[2] चमत्कारिक टीका आहे. सध्या विचाराधीन असलेल्या बिलामुळे हाच कायदा कायम स्वरूपाचा होणार आहे. त्यामुळे ट्रान्सवॉलमधील गोरे रहिवासी

१. पाहा : वसाहत-मंत्र्याला अर्ज (लेख १४०).

२. पाहा : खंड ५, लेख ४०५.

शांतता-संरक्षक बंदुकुनाच्या कचाट्यातून सुटतील; पण आशियावासीयांच्या गळ्याला लागलेला फास अधिक घट्ट होईल.

यामुळे आशियावासीयांना वाटते की, गोऱ्या ब्रिटिश प्रजाजनांना अधिक स्वातंत्र्य मिळणे म्हणजे आशियावासी ब्रिटिश प्रजाजनांवर अधिक निर्बंध येणे. इतर जुन्या स्वायत्त वसाहतीत नसलेला निर्बंध साम्राज्याच्या या नव्या लाडक्या मुलाच्या बाबतीत अमलात येणार आहे. ट्रान्सवॉलमध्ये पूर्वीच स्थायिक झालेल्या आणि पूर्वीच्या डच सरकारला ३ पौंड भरलेल्या हिंदी लोकांचे हक्क येथे बाजूस सारले जातील. कारण ब्रिटिश इंडियन असोसिएशनने दाखविले त्याप्रमाणे, प्रवेशविषयक कायद्यामुळे, आशियावासी कायद्यानुसार नोंदलेल्या आशियावासीयांनाच येथे राहता येईल.

आम्ही वर उल्लेखिलेल्या दोन मुद्द्यांपेक्षा, असोसिएशनने मांडलेला शेवटचा मुद्दा भयानकपणात त्यांच्यावर ताण करणारा आहे. या नव्या कायद्यानुसार नोंदणीपत्र घेण्यास जे हिंदी लोक चुकतील, त्यांना सक्तीने हद्दपार करण्याची योजना आहे. नोंदणी-पत्र घेण्याच्या विधीमध्ये गुलामगिरीची किती तरी बीजे साठविलेली आहेत. नोंदणी-पत्र घेण्यास जे चुकतील ते ट्रान्सवॉलचे रहिवासी नाहीत, असे नाही. खरोखर, आशियावासी कायद्याविरुद्ध निकराचा लढा देणारे बहुतेक सर्व हिंदी लोक या वसाहतीतील जुने प्रतिष्ठित रहिवासी आहेत. खुद्द अध्यक्षाप्रमाणे त्यांच्यापैकी काही-जण तर येथे २०।२० वर्षे राहिलेले आहेत. त्यांची सर्व भौतिक मालमत्ता या वसाहतींमध्ये आहे. त्यांची कुटुंबे, त्यांची पूजास्थाने आणि या जगात त्यांना जे जे म्हणून प्रिय आहे, ते सर्व काही येथे आहे. अशा माणसांनी अवमानास्पद नोंदणी-पत्र घेण्याचे नाकारले म्हणून त्यांना त्यांच्या घरांतून जबरदस्तीने हुसकण्यात येणार आहे आणि या हद्दपारीचा खर्च त्यांच्याकडून घेतला जाणार आहे. आणि त्यांच्या राहण्याजेवण्याचीसुद्धा व्यवस्था करणे हे ट्रान्सवॉल सरकारचे कर्तव्य मानलेले नाही. घृणास्पद गुन्ह्यासाठी केल्या जाणाऱ्या हद्दपारीपेक्षा ही हद्दपारी अधिक वाईट आहे, असे श्री. मियाँ यांनी जाहीर केले हे योग्यच आहे.

लॉर्ड एल्जिन यांनी आमच्याविषयी सहानुभूती असल्याची घोषणा केली आहे. हिंदुस्थानचे व्हाइसरॉय म्हणून त्यांची कारकीर्द झालेली आहे, ती लक्षात घेता, त्यांनी जर वर वर्णिलेल्या कायद्याला मंजुरी देण्याचा सल्ला बादशहांना दिला, तर आम्हांला सखेदाश्चर्य वाटेल. आपल्याला आशियावासी कायदा पसंत नाही, असे त्यांनी अनेकवार सांगितले आहे, आता ट्रान्सवॉल सरकारशी वागण्याची सुवर्णसंधी त्यांना प्राप्त झाली आहे. ती घेऊन त्यांनी आशियावासी कायदा रद्द करावा आणि फेर-नोंदणीचे तत्त्व प्रवेशविषयक कायद्यात सौम्य स्वरूपामध्ये अंतर्भूत करावे.

इंडियन ओपिनियन, ३१-८-१९०७

१५५. केपमधील हिंदी लोक[1]

प्रवेशविषयक कायदा आणि व्यापाऱ्यांच्या परवान्याचा कायदा याच्या अंमलबजावणीसंबंधी केपटाऊनच्या ब्रिटिश इंडियन लीगने तेथील पार्लमेंटला जे सयुक्तिक निवेदन सादर केले, त्याबद्दल त्या लीगचे अभिनंदन केले पाहिजे. त्या निवेदनात जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत, ते घाईने केलेले नाहीत. आणि निवेदनकर्त्याने म्हटल्याप्रमाणे त्यांची मागणी समंजसपणाची व न्यायाची आहे, असे केपमधील पुष्कळ प्रमुख मुत्सद्यांचे मत आहे. उदाहरणार्थ, या द्वीपकल्पाच्या बाहेर ज्या हिंदी लोकांना जावे लागते, त्यांना तात्पुरते परवाने देणे कोणत्याही दृष्टीने समर्थनीय नाही. कारण परवानापत्रात घालून दिलेल्या मुदतीत ते परत न आले, तर त्यांचा वास्तव्याचा हक्क बुडतो. या योजनेमुळे पॅरोलवर सुटणाऱ्या कैद्यासारखी त्यांची स्थिती होते आणि त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर पूर्णपणे असमर्थनीय व अयोग्य अशी बंधने पडतात. तसेच जुन्या हिंदी फेरीवाल्यांचे परवाने कारणाशिवाय हिरावून घेतले जातात, याचे समर्थन कोणत्याही प्रकारे करता येण्यासारखे नाही. हिंदी लोकांनी सादर केलेल्या निवेदनाचा विचार केप-सरकार कळकळीने करील असा आम्हांस विश्वास वाटतो.

इंडियन ओपिनियन, ३१–८–१९०७

१५६. लेडीस्मिथमधील व्यापारी[2]

लेडीस्मिथ व्यापारी बोर्डाने ज्या हिंदी लोकांचे क्लिपरिव्हर जिल्ह्यामध्ये व्यापार करण्याचे परवाने अन्यायाने काढून घेतले आणि तरीही परवान्याविना व्यापार करून आपले पोट भरण्याचे धाडस ज्यांनी दाखविले, त्या हिंदी लोकांच्या पाठीमागे लेडीस्मिथ-येथील व्यापारी संघ पुनः लागला आहे. गरीब बिचाऱ्या हिंदी लोकांच्या मागे लेडी-

१. पाहा : "केपटाऊनमधील हिंदी लोक" लेख १६१
२. पाहा : "लेडीस्मिथमधील परवाने" लेख १५९.

स्मिथचा व्यापारीवर्ग लागलेला आहे असे जेव्हा आम्ही म्हणतो, तेव्हा त्याचा अर्थ इतकाच की, व्यापारातील स्पर्धेमुळे युरोपियन व्यापारी हिंदी व्यापाऱ्यांना त्या जिल्ह्यातून पिटाळून लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. लेडीस्मिथ व्यापारी बोर्डाच्या वर्तनाबद्दल नापसंती व्यक्त करण्यासाठी सरकारने निरपराधी माणसावर खटले भरण्यास मंजुरी देण्याचे नाकारले आहे. पण व्यापारी संघाने सरकारला तशी कृती करण्यास भाग पाडले असल्याचे स्पष्ट दिसते. कारण परवान्याशिवाय व्यापार करणाऱ्या लोकांवर खटले भरण्याचा अधिकार सरकारी वकिलांना ॲटर्नी जनरलने दिला आहे असे दिसते. नाताळमधील व्यापाऱ्यांच्या परवान्यांच्या कायद्याचा अंमल अशा प्रकारे होत आहे,[1] त्यातून काही सवलत देण्यास आपण व्यवहारतः असमर्थ आहो, असे साम्राज्य सरकारने सिद्ध केले आहे. हिंदुस्थान सरकार सर्वशक्तिमान आहे हे खचित. पण ते आपल्या हातात असलेले एकमेव व परिणामकारक शस्त्र उपयोगात आणीत नाही. ते शस्त्र म्हणजे नाताळमधील स्वतंत्र हिंदी लोकांना साधा न्याय मिळत नसेल, तर मुदतबंद हिंदी मजूर न पाठविणे.

इंडियन ओपिनियन, ३१–८–१९०७

१५७. दादाभाईंचा वाढदिवस

भारताचे पितामह दादाभाई नौरोजी यांचा वाढदिवस ता. ४ सप्टेंबर रोजी येतो. इहलोकातील आपल्या आयुष्याची अखेर ते गाठीत चालले आहेत. जसजसे दिवस जात आहेत, तसतसे पितामहांचे तेज वाढत आहे. त्यांना लंडन हे अरण्यासारखे आहे; पण त्या अरण्यात, देशासाठी, एखाद्या फकिराप्रमाणे, ते राहिलेले आहेत. इंग्लंडमधील त्यांची कचेरी ज्यांनी पाहिली आहे, त्यांना हे माहीत आहे की, ती कचेरी एखाद्या झोपडीहून वेगळी नाही. नीत दोन माणसे कशीबशी बसू शकतात. तेथे बसून हिंदुस्थानातील कोट्यवधी लोकांचा भार ते आपल्या शिरावर वाहतात. त्यांचे आता उतारवय झाले असले, तरी कोणत्याही हिंदी तरुणापेक्षा ते अधिक काम करू शकतात. आम्ही त्यांना दीर्घायुष्य चिंतितो, आणि ईश्वरापाशी प्रार्थना करतो की, त्यांच्याइतके शुद्ध अंतःकरण आम्हांला आणि या पत्राशी संबंधित असलेल्या सर्वांना

१. पाहा : खंड २, लेख ५३ वा, परिशिष्ट क.

प्राप्त व्हावे, त्यांच्या देशभक्तीचे अनुकरण आमच्या वाचकांनी करावे; कारण जो खरोखर पितामह आहे, अशा या वृद्ध देशभक्ताचे स्मरण करण्याचा तोच एक खरा मार्ग आहे. अमर दादाभाई आपणासाठी आपल्या निष्ठेशी जसे दृढ राहिले आहेत, तसेच आपणही राहिले पाहिजे, हे ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनी ध्यानी धरावे. त्या दिवशी हिंदी लोकांच्या सर्व संस्था सभा भरवून अभिनंदनाच्या तारा पाठवतील असा आम्हांस विश्वास वाटतो. त्या पितामहाचे छायाचित्र त्यांच्या प्रत्येक वाढदिवशी देण्याचा आमचा हेतु आहे, त्याप्रमाणे या वाढदिवसानंतर लगेच, म्हणजे पुढील आठवड्यात, आम्ही त्यांचे छायाचित्र प्रसिद्ध करू. ते चौकटीत बसवून प्रत्येकाने जतन करावे अशी आमची शिफारस आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ३१-८-१९०७

१५८. अधिक सावधगिरीची आवश्यकता

सर्वांचे डोळे सध्या ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांकडे वळले आहेत. अशा ऐन वेळी हिंदी समाजामध्ये काही दौर्बल्य आल्याची बातमी आमच्याकडे आली आहे. अशा प्रसंगी समाजातील दोष प्रगट करणे अवश्य असते, ते दडपून टाकणे योग्य नव्हे, तसे करणे म्हणजे देशद्रोह आहे असे आम्ही मानतो.

हिंदी समाजामध्ये मुख्यतः सुरती, मेमन, कोकणी, मुस्लिम, पारशी व हिंदू हे लोक आहेत. मेमन व कोकणी यांमधील पुष्कळ लोक कायद्याविरुद्ध चाललेल्या झगड्यात हातपाय गाळू लागले आहेत असे आम्ही ऐकतो. शरण जाण्याच्या तयारीत ते आहेत. पण आपण शरण जाण्यापूर्वी सरकारने काही फेरबदल करावेत अशी त्यांची इच्छा आहे असे ते म्हणतात. अशा फेरबदलासाठी करावयाच्या अर्जाचा मसुदा आम्ही पाहिला आहे. तो वाचणेही आम्हांस अपमानाचे वाटते. आमच्या मताने, तो मसुदा म्हणजे स्वतःसाठी गुलामगिरीची मागणी करणारे पत्र होय. त्यात मागितलेल्या सवलती या सवलती नाहीत. त्यातील विनंतीची भाषा इतकी हांजीखोर आहे की, त्यावरून असे वाटते, हिंदी समाजाचे बहुतेक सर्व पुढारी या नव्या कायद्याच्या विरुद्ध कधीच नव्हते. बोटांचे ठसे देण्याचे त्यांनी मान्य केलेले आहे. [illegible] आक्षेप घेतलेला नाही. प्रतिष्ठित हिंदी लोकांचे

परवाने तपासण्यासाठी आणि त्यांच्या बोटांचे ठसे खाजगी रीतीने घेण्यासाठी खास अधिकारी नेमावेत अशी एकच मागणी त्यांनी केलेली आहे. शिवाय, जुने परवाने धारण करणाऱ्यांना सही करता येत असेल, तर परवाना अधिकाऱ्याने बोटांचे ठसे मागू नयेत. तात्पुरते परवाने आताप्रमाणेच दिले जावेत आणि १६ वे वर्ष लागल्यानंतर मुलांच्या बोटांचे ठसे घ्यावेत.

या मागण्यांमध्ये अशी एकही मागणी नाही की, जी पूर्ण करण्यासाठी नियमामध्ये काही फेरबदल करावा लागेल—मग कायद्याची गोष्ट तर सोडाच. अशा पत्राला जनरल स्मट्स उत्तर देतील "बहोत अच्छा." असे झाले तर, त्या पत्रावर संतुष्ट असणाऱ्या लोकांनी गुलामगिरीचा पट्टा–म्हणजे नोंदणीपत्र–ताबडतोब घ्यावे. त्या मसुद्यात असे लिहिले आहे की, कायद्यापुढे हिंदी लोक मेणासारखे आहेत. असे विधान, ईश्वराच्या अस्तित्वावर श्रद्धा ठेवणाऱ्या कोणाही माणसाच्या तोंडी शोभत नाही, असे आम्हांस वाटते. कारण, मानव मेणासारखा आहे तो फक्त ईश्वराच्या दृष्टीने.

वर उल्लेखिलेले पत्र जनरल स्मट्स यांना पाठविले गेले नाही, हे कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो. तसेच, ते पत्र मेमन, कोकणी किंवा इतर दुसरे कोणी यांना पसंत होते असेही आम्हांस वाटत नाही. ही गोष्ट आम्ही जाहीर करण्याचे कारण एकच आहे. आणि ते म्हणजे आघात वेळीच परतविला गेला असला, तरी तसा प्रयत्न पुनः केला जाणार नाही अशी खात्री नाही. भित्रा माणूस काडीचाही आधार घेतो. एखाद्या टेकडीच्या उतरणीवरून घसरणारा माणूस वाळल्या गवताचाही आधार घेत नाही काय ? ट्रान्सवॉलमधील काही हिंदी लोक तशाच स्थितीत आहेत. अशा लोकांनी कायद्याच्या प्रश्नात ढवळाढवळ न करता कायद्याला तत्काळ मान्यता द्यावी आणि नोंदणीपत्रे घ्यावी असा आमचा सल्ला आहे. त्यामुळे त्यांना फारसा दोष लागणार नाही. पण आपल्या समाजाच्या नावाला काळीमा फासणारी अशी पत्रे ते लिहितील, तर श्री. हाजी इब्राहीम व श्री. खमीसा यांनी केलेल्या नुकसानीपेक्षा त्यांच्या हातून अधिक नुकसान झाले असे मानले जाईल. किंबहुना प्रत्यक्षात अधिक नुकसान होईलही. श्री. हाजी इब्राहीम आणि त्यांचे दोस्त हे भयामुळे–धैर्य न टिकविता आल्यामुळे–स्वतःला लज्जास्पद करून घेत आहेत. पण वरच्यासारखी पत्रे लिहिणारे लोक आपल्या तोंडाला तर काळीमा फासतातच, पण शिवाय आपल्या समाजालाही कलंक लावतात. हिंदी लोकांचा लढा मूलतः या कायद्याविरुद्ध असा नाही, तर त्यातील काही किरकोळ फेरबदलासाठी आहे असे या पत्र-लेखकाच्या कृतीवरून स्पष्ट होईल. वरील अर्जाच्या मसुद्यात असेही लिहिले आहे की, काही खोडसाळ लोक सोडल्यास, हिंदी लोक स्वतःची नोंदणी करून घेण्यास उत्सुक आहेत. किती हास्यास्पद आहे हे !

शिवाय, असा अर्ज हिंदी लोकांच्या वतीने जनरल स्मट्स यांच्याकडे पाठविला, तर प्रवेशविषयक बिलाच्या बाबतीत केलेल्या अर्जालाही धक्का बसेल. दक्षिण आफ्रिका

ब्रिटिश इंडियन कमिटीने जो लढा चालविला आहे, तो फोल ठरेल आणि दिवसा-ढवळ्या हिंदी समाजाची लूट होईल. म्हणून आमची खास विनंती अशी आहे की, कोणाही व्यक्तीला वा गटाला नोंदणी–पत्र घेण्याची इच्छा असेल तर, तसे करण्यास ते मोकळे आहेत. फक्त त्यांनी आपल्याबरोबर दुसऱ्यांना खाली ओढू नये. काही मेमन किंवा काही कोकणी अथवा काही हिंदु अगर सुरती वा पारशी तसे करतात, म्हणून सारे मेमन अथवा सारे कोकणी किंवा सारे हिंदू या सर्वांच्या तोंडाला काळोखी का फासावी ? “ दुसरे मेमन गेले तर जाऊ द्या, पण मी कदापि जाणार नाही ” असे धैर्याने जाहीर करणारा एकही शूर माणूस मेमन लोकांमध्ये नसेल काय ? असेच उद्गार काढणारा एकही कोकणी सापडणार नाही काय ? वाईट गोष्ट करण्यास हिंदी लोकांनी दुसऱ्यांचे अनुकरण का करावे ? मेंढ्याप्रमाणे एकामागोमाग जाऊन खड्ड्यात पडण्याची आपली तयारी असेल, तर हा दुष्ट कायदा आपल्या मानगुटीवर कायमचा बसेल हे खास समजा.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ३१–८–१९०७

१५९. लेडीस्मिथमधील परवाने

लेडीस्मिथमधील ज्या हिंदी लोकांना परवाने मिळालेले नाहीत, त्यांच्या डोक्यावर काळे ढग जमू लागले आहेत. ते विनापरवाना व्यापार चालवीत आहेत, म्हणून त्यांच्यावर खटले भरण्यात यावेत, अशी सूचना व्यापारी संघाने केली आहे श्री. लॅबिस्टर यांनी उत्तर दिले आहे की, ते अजून व्यापार करीत राहिले तर त्यांच्या-वर खटला भरण्यात येईल. विनापरवाना व्यापार करणाऱ्यांचा छळ केला जाणार नाही, असे आश्वासन काँग्रेसच्या पुढाऱ्यांना दिलेले होते. हे आश्वासन न्यायबुद्धीने दिले होते. आता युरोपियन लोक दडपण आणीत असल्यामुळे ही न्यायबुद्धी ढासळली आहे. या दडपणामुळे सरकारला ती दुकाने बंद करावयाची आहेत, यावरून हिंदी लोकांवर येणाऱ्या अनर्थाचे चित्र स्पष्ट होते. या काळ्या ढगांची पांगापांग करण्याचे तीन मार्ग आहेत—

(१) प्रिव्ही कौन्सिलला अपील करणे.

(२) असे अपील करावयाचे नसेल तर काँग्रेसच्या अध्यक्षांनी साम्राज्य सरकारची भेट घेणे. पहिल्या मार्गाबरोबरच हा दुसरा मार्गही चोखाळता येईल.

(३) धैर्य धरून दुकाने उघडी ठेवणे, खटले भरल्यास दंड न देता मालाचा लिलाव होऊ देणे.

कॉंग्रेसजवळ १००० (एक हजार) पौंडांचा निधी असेल, तरच पहिला मार्ग स्वीकारता येईल. दुसरा मार्ग केव्हाही स्वीकारलाच पाहिजे. पण त्याने अडचणी कायमच्या मिटणार नाहीत. तिसरा मार्ग हा सर्वांत सोपा व उत्कृष्ट आहे. पण तो फक्त शूरांचाच आहे. तो कोणाच्या सल्लामसलतीवर अवलंबून नाही. स्वतः निर्भय असले म्हणजे झाले. ती निर्भयता असली म्हणजे काहीही करता येईल. तुरुंगाच्या शिक्षेची तरतूद या कायद्यात नाही, फक्त दंड भरता येतो. तो न दिला तर मालाचा लिलाव करून वसूल केला जाईल. हा मार्ग स्वीकारण्याचा आग्रह आम्ही हिंदी लोकांना करतो. डॉ. रुदरफोर्ड यांच्यासारख्या माणसांनी तो मार्ग अवलंबिला आहे. आणि आम्हीही तसेच केले पाहिजे. पण अशा बाबतीत दुसऱ्याची प्रेरणा व्यर्थ असते. अवश्य ती प्रेरणा अंतःकरणातूनच यावी लागते.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ३१-८-१९०७

१६०. " हजरत महंमद पैगंबरचा जीवन-वृत्तांत बंद का झाला ? "

या प्रश्नाला उत्तर देताना आम्हांस खेद वाटत आहे. हिंदी समाज-त्यातही मुस्लीम बांधव-यांची सेवा करण्यासाठी पूर्ण श्रद्धेने आणि (इस्लामविषयीच्या) मोठ्या आदरभावाने, आम्ही (आयर्विंगच्या पुस्तकाचे) भाषान्तर प्रसिद्ध करण्यास सुरवात केली. गोऱ्या माणसांनी लिहिलेल्या चरित्रांमध्ये वॉशिंग्टन आयर्विंगचे चरित्र उत्कृष्ट मानले जाते. एकंदरीत त्याने पैगंबराचा विस्मयकारक मोठेपणा प्रकट केला आहे, आणि इस्लामची उत्तम शिकवण चांगल्या तऱ्हेने मांडली आहे. हे खरे असो वा नसो; गोरे लोक इस्लाम व त्याचा संस्थापक यांच्याविषयी काय लिहितात, हे समजावून घेणे प्रत्येक मुसलमानाचे कर्तव्य आहे, असे आम्ही मानतो. हे कर्तव्य पार पाडण्याच्या कामी त्यांना सहाय्य करणे हा, ते पुस्तक भाषान्तरित करण्यामध्ये, आमचा उद्देश होता. ते भाषान्तर दिले जात असताना पाचव्या प्रकरणातील पैगंबरांच्या विवाहाचा वृत्तांत वाचून आमच्या काही वाचकांना दुःख झाले, आणि त्यांनी हे चरित्र थांबविण्याची सूचना आम्हांस केली. हे वृत्तपत्र अखिल हिंदी समाजाचे आहे,

हे शक्य तितके दाखविणे हा आमचा हेतु आहे. कोणाच्याही भावना कोणत्याही रीतीने अकारण दुखविण्याची आम्हांला इच्छा नाही, म्हणून आम्ही हे "चरित्र"[1] प्रसिद्ध करण्याचे थांबविले आहे. आम्हांला असे करावे लागत आहे, याचे दुःख वाटते. कारण, या भाषान्तराच्या कामी आम्ही फार परिश्रम केले होते. आता आयर्विंगच्या उत्कृष्ट पुस्तकाचे गुण-ग्रहण करण्याची संधी आमच्या वाचकांना मिळणार नाही. आम्ही हे "चरित्र" खंडित केले म्हणून पुष्कळ वाचक नाराज आहेत, असे आम्ही ऐकतो. त्यांना आम्ही एवढेच म्हणतो की, ज्यांना चरित्राचे भाषान्तर पाहिजे असेल, त्यांनी आम्हांस लिहावे. पुष्कळ वाचकांनी तशी इच्छा व्यक्त केली, तर छापखान्याच्या सोयीने, स्वतंत्र पुस्तकाच्या स्वरूपात ते चरित्र प्रसिद्ध करून आम्ही अशा भाविकांची इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करू.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ३१-८-१९०७

१६१. केपटाउनमधील हिंदी लोक

ब्रिटिश इंडियन लीगने केलेले निवेदन आम्ही गेल्या आठवड्यात प्रसिद्ध केले. त्यामध्ये बहुतेक साऱ्या महत्त्वाच्या मागण्या आल्या आहेत. लीगचे आम्ही अभिनंदन करतो. या प्रकरणाचा पिच्छा पुरविण्यासाठी लीग सर्व प्रयत्न करील आणि शेवट गोड

१. गांधीजींचे चिटणीस, महादेव देसाई, आपल्या २९ जुलै १९३२ च्या डायरीत लिहितात, "बापूंना...... द. आफ्रिकेतील आपला अनुभव वर्णिला आहे. वॉशिंग्टन आयर्विंगचे (पैगंबराचे चरित्र) त्यांनी वाचले आणि आपल्या मुसलमान वाचकांच्या लाभासाठी त्याचे सरळ भाषान्तर "इंडियन ओपिनियन"मध्ये प्रसिद्ध करण्याचे आरंभिले. एकदोन प्रकरणे छापून झाली असतील तोच त्या प्रसिद्धीकरणाचा तीव्र निषेध मुसलमानांनी केला. या निषिद्ध प्रकरणांत, पैगंबरांच्या जन्मापूर्वी अरबस्तानात रूढ असलेली मूर्ति-पूजा, लोकभ्रम व दुष्ट चालीरीती यांचे वर्णन आले होते. पण तेही त्यांना खपले नाही. बापूंनी खुलासा केला की, हे केवळ प्रास्ताविक आहे आणि त्यावरून पैगंबरांना किती प्रचंड संकटांशी झगडा करून त्यांच्यावर जय मिळवावयाचा होता हे दिसून येते. पण बापूंचे कोणी ऐकेना. मुसलमान म्हणाले, "आम्हांला पैगंबराचे असले चरित्र नको." पुढील प्रकरणे लिहिलेली कंपोज झालेली होती, पण ती रद्द करावी लागली." (महादेव देसाईंची डायरी खंड १, पृ. २७०, नवजीवन पब्लिशिंग हाउस, अहमदाबाद, १९५३) शिवाय, पाहा "पैगंबर महंमद आणि त्यांचे खलीफा," लेख ३६.

होईल अशी आम्ही आशा धरतो. इतर ठिकाणांपेक्षा केपटाउनमधील हिंदी लोकांना (आपले) हक्क मिळवून घेण्यास व कायम राखण्यास अधिक संधी आहे. मॅफीकिंग व ईस्ट लंडन यांतील हिंदी लोक लीग व असोसिएशन यांच्याशी सहकार्य करून मोठा निधी उभारतील अशी आम्हांस आशा आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ३१-८-१९०७

१६२. शौर्य कशास म्हणावे ?

कॅसाब्लँका येथे मूर लोकांनी (ते मुसलमान आहेत) मोठी बहादुरी दाखविली, असे वृत्त वर्तमानपत्रांत आले आहे.

मूर भालेवाल्यांनी फ्रेंच गोलंदाजांवर रणगर्जना करीत जोराचा हल्ला केला. आपल्यावर बंदुकीच्या गोळ्यांचा आणि बॉंबच्या तुकड्यांचा पाऊस पडत असताना त्यांनी त्याकडे लक्ष दिले नाही. पुष्कळ लोक जखमी होऊन पडले. जे जिवंत राहिले ते तोफांच्या थेट तोंडापर्यंत जाऊन भिडले. नंतर ते परतले.

तोफांच्या तोंडापासून माणूस परत कसा येतो, असा प्रश्न वाचक विचारतील, पण बहाद्दुरीची गोष्ट अशीच अजब असते.

मूर लोकांनी इतका अलोट उत्साह दाखविला की, त्यामुळे त्या शूर वीरांवर गोळी चालविण्यास फ्रेंच गोलंदाजांना हिम्मत झाली नाही. त्यांनी त्यांचे "शाबास!" म्हणून स्वागत केले आणि त्यांच्या कौतुकासाठी टाळ्या वाजविल्या, तेव्हा त्या शूर योद्धयांनी सलाम केले आणि मग ते परतले.

अशा वीर पुरुषांचे अनुकरण सर्व जगाने केले पाहिजे. सर्वांनी त्यांचे पोवाडे गायिले पाहिजेत. विशेषतः आमच्या मुसलमान वाचकांनी त्यांच्यापासून धडा घेतला पाहिजे. असंस्कृत मानलेल्या या मूर लोकांच्या शौर्याचा शतांश जरी ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांमध्ये असेल, तरी त्यांची फत्ते होईल, हे निःसंशय. येथे कोणी मरावयाचे नाही वा मारावयाचे नाही, फक्त द्रव्याचा त्याग करावयाचा आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ३१-८-१९०७

१६३. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

नाइलस्ट्रूम व रस्टनबर्ग

या दोन्ही ठिकाणांहून परवाना-कचेरी, गेली तशी, हात हालवीत परत आली ! नाइलस्ट्रूमच्या हिंदी लोकांनी तर एक दिवस आपली दुकाने बंदही ठेवली. एकाही माणसाने स्वतःची नोंदणी करून घेतली नाही. ब्रिटिश इंडियन असोसिएशन आणि हमीदिया इस्लामिया अंजुमन या संस्थांनी या दोन्ही शहरांना अभिनंदनाच्या तारा पाठविल्या. हे सर्व अत्यंत चांगले झाले आहे. पण याने आपण फुगून जाता कामा नये. परवानाकचेरीवरील बहिष्कार ही सोपी गोष्ट झाली आहे. ज्यांना स्वतःची नोंदणी करून घ्यावयाची आहे, त्यांना ती कोठेही करून घेता येते, त्यामुळे बहिष्कारात काही धोका नाही. पण जेव्हा शेवटची जागा व शेवटची तारीख निश्चित होईल, तेव्हा हे लोक भीतीने घाबरून धावत सुटणार नाहीत ना, हे पाहावयाचे आहे. आताच अशा शंका घेतल्या जात आहेत की, त्या वेळी हिंदी लोक आपले धैर्य टिकवतील का ? आणि ते टिकविले तरी, तुरुंगात जाण्याची वेळ आली तर ते कायम राहील का ?

रेल्वेवरील अडचणी

श्री. अब्दुल गनी व श्री. गुलाम महंमद यांना प्रिटोरियास जावयाचे असताना जोहान्सबर्ग येथे संध्याकाळी ४-४० च्या गाडीत बसू दिले नाही. त्या प्रश्नासंबंधी असोसिएशनने केलेला पत्रव्यवहार समाप्त झाला आहे. चीफ ट्रॅफिक मॅनेजरने खेद प्रदर्शित केला आहे आणि म्हटले आहे, गार्डाच्या डब्यातसुद्धा जागा नव्हती, आणि म्हणून त्यांना प्रवास करू दिला नाही. या सर्व अडचणी हिंदी लोकांच्या कल्याणासाठी आहेत असे जनरल स्मट्स म्हणतात. हा लढा या वेळी पुढे चालविता येत नाही. कारण, सध्या हिंदी समाज ऐरणीवर ठेवलेला आहे. त्यावर हातोड्याचे घाव बसून तो खरे सोने असल्याचे ठरले, तर रेल्वे वगैरे बाबतीतील अडचणी आपोआप नाहीशा होतील. पण तो समाज हिणकस धातू निघाला, तर कोणाला रेल्वे-तिकिटाचा हक्क आहे की नाही या प्रश्नाचे महत्त्व काय ?

अली यांना निरोप

गेल्या शनिवारी श्री. हाजी वजीर अली केपला जाण्यासाठी सहकुटुंब निघाले. त्यांना श्री अब्दुल गनी, श्री. शहाबुद्दीन हसन, श्री. अमीरुद्दीन, श्री. गुलाम महंमद,

श्री महंमद शहाबुद्दीन, श्री. चापमन्, श्री. पोलक, श्री. गांधी, इत्यादींनी निरोप दिला. श्री. अली आणि श्रीमती अली या दोघांच्या डोळ्यांत अश्रू आले. निरोप घेताना श्री. अली यांनी काढलेले उद्‌गार संस्मरणीय आहेत. ते म्हणाले, "माझ्या चुका झाल्या की नाही हा प्रश्न बाजूस ठेवा. कारण मनुष्यमात्र चुकीस पात्र आहे. पण, मी जितके काम करतो, तितके इतर हिंदी लोक करतील तरी पुष्कळ आहे." खरोखर हे शब्द लक्षात ठेवण्यासारखे आहेत. या कायद्याला मान्यता देण्यापेक्षा त्यांनी ट्रान्सवॉलचा त्याग केला. ही कृती अशी आहे की, त्याबद्दल, त्यांची चूक माफ करून, आपण त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. इतके काम करण्यालाही पुष्कळ हिंदी लोक पुढे आले तरी आपल्याला यश मिळेल.

दिवाळखोरीतील लबाडीबद्दल शिक्षा

इस्माइल इसा हा दिवाळखोर कर्जदार आहे. त्याच्यावर लबाडीचा आरोप होता. त्याचा खटला प्रिटोरिया येथे श्री. डी. विलीयर्स यांच्यापुढे चालला. त्याच्यावर आरोप असा होता की, दिवाळे काढण्याचे त्याने ठरविले असतानाही अर्नेस्ट एबर्ड यांच्या पेढीतून त्याने तंबाखू खरेदी केली. त्याचा गुन्हा सिद्ध झाल्यामुळे त्याला तीन महिने कैदेची शिक्षा झाली. हा खटला हिंदी समाजाला लज्जास्पद आहे. आपल्यामध्ये दिवाळखोरीचा एकही प्रकार होता कामा नये. तितकी आपल्याला प्रतिष्ठेची जाणीव असली पाहिजे, पण येथे दिवाळखोरी व लबाडी ही दोन्ही पाहावयास सापडतात, अशा कृत्यापासून हिंदी लोकांनी खचित दूर राहिले पाहिजे.

रस्टनबर्गचे पत्र

रस्टनबर्ग येथील हिंदी समाजाने जो विजय संपादन केला, त्याबद्दल तेथून असोसिएशनला एक पत्र आले आहे. त्यात असे म्हटले आहे की, कॅप्टन चॉमनी यांनी हिंदी लोकांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला, पण प्रत्येकाने ठाम उत्तर दिले की, मी नोंदणी करणार नाही. त्यांच्याकडे श्री. चॉमनीही गेले होते, पण त्यांनाही तेच उत्तर मिळाले. तेथे श्री बापू देसाई, श्री. रहीमभाई श्री. वखारिया, श्री. मढी आणि श्री. एम. ई. काझी हे स्वयंसेवक होते. दुकाने अर्धा दिवस बंद होती, श्री. कोर्डी हे श्री. डिसोझा या पोर्तुगीज हिंदी माणसाकडे गेले, पण त्यानेही नोंदणीला खडखडीत नकार दिला.

फोक्सरस्ट व वॉकरस्ट्रूम येथील पत्रे

फोक्सरस्ट व वॉकरस्ट्रूम येथून पत्रे आली आहेत. त्यांमध्ये तेथील पुढाऱ्यांनी लिहिले आहे, एकही हिंदी माणूस परवाना घेणार नाही. सर्वांचा निश्चय ठाम आहे.

आणखी एक अपमान

जोहान्सबर्गच्या नगरपालिकेमध्ये अशी चळवळ चालू आहे की, पहिल्या दर्जाच्या बगीमधून फिरण्यास हिंदी, चिनी व इतर काळे लोक यांना बंदी करावी. या योजनेला विरोध करणारे पत्र असोसिएशनने पाठविले आहे.[१] पण सध्या त्या पत्राला महत्त्व दिले जाण्याची शक्यता फारच थोडी आहे. सध्या नगारा वाजत आहे तो फक्त नोंदणीच्या कायद्याचा. त्यातून शेवटी कोणता आवाज निघेल यावर सर्व काही अवलंबून आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ३१–८–१९०७

१६४. जोहान्सबर्ग नगरपालिकेला पत्र

[जोहान्सबर्ग,
ता. १. सप्टेंबर १९०७ चे पूर्वी[२]]

टाऊन क्लार्क
जोहान्सबर्ग

महाशय,

पहिल्या वर्गाच्या बग्गीसंबंधी वाहतुकीच्या पोट नियमात सुचविलेल्या दुरुस्ती-बाबत मी लिहिलेल्या या महिन्याच्या २८ तारखेच्या पत्राचा पुढील भाग लिहीत आहे.[३] व्यवसाय करणारे लोक गौरेतर असले तरीही त्यांना पहिल्या वर्गाच्या बग्या वापरण्याबाबतच्या नालायकीतून मुक्त करण्याचा कौन्सिलचा इरादा आहे, असे माझ्या निदर्शनास आले आहे.

माझ्या असोसिएशनचे आदरपूर्वक निवेदन असे आहे की, अशा माफीचा गौरव होण्याऐवजी तिने जखमेवर मीठ चोळल्यासारखे होईल. कोणाही व्यक्तीचा

१. पाहा : " जोहान्सबर्ग नगरपालिकेला पत्र " (लेख १५३)

२. : " या महिन्याच्या २८ तारखेचे पत्र " असा उल्लेख असल्यामुळे हे पत्र ऑगस्टमध्ये लिहिले असावे असे दिसते.

३. पाहा. : " जोहान्सबर्ग नगरपालिकेला पत्र " (लेख १५३)

पोषाख आणि सर्वसामान्य वागणूक सोडली, तर व्यावसायिक माणसे व इतर लोक यांच्यामध्ये फरक करणे बगीवाल्याला कठीण जाईल, शिवाय आपल्याइतकेच प्रतिष्ठित असलेल्या देशबांधवांना जो हक्क वापरता येत नाही, त्याचा लाभ स्वाभिमानी माणूस बहुधा घेणार नाही, असे माझ्या असोसिएशनला वाटते. म्हणून माझ्या पत्रव्यवहारात उल्लेखिलेल्या दुरुस्तीबाबत टाऊनकौन्सिल कृपा करून पुढे काही करणार नाही, अशी आशा माझ्या असोसिएशनला वाटत आहे.

आपला,
इसाप ईस्माईल मियाँ,
अध्यक्ष
ब्रिटिश इंडियन असोसिएशन

इंडियन ओपिनियन, ७-९-१९०७

१६५. दादाभाई नौरोजी यांना तार[१]

[दर्बान,
ता. ४ सप्टेंबर, १९०७]

भारताच्या पितामहांना नाताळ इंडियन काँग्रेसच्या शुभ कामना. असा दिवस वारंवार येवो. भारताच्या नेत्याला दीर्घायुष्य लाभो अशी ईश्वरापाशी प्रार्थना.

इंडियन ओपिनियन, ७-९-१९०७

१. दादाभाई नौरोजींच्या ८३ व्या जन्मदिनानिमित्त ही तार पाठविली. पाहा "काँग्रेसच्या सभेत भाषण" (लेख १६७)

१६६. दर्बान येथील भाषण[1]

[दर्बान,
ता. ४ सप्टें., १९०७

...ट्रान्सवॉलमध्ये कोणतीही आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली, तर त्यासाठी निधी गोळा करून व धारण करून सर्व दक्षिण आफ्रिका व ट्रान्सवॉलबाहेरील प्रदेश यांतील हिंदी लोकांना भरीव मदत करता येईल असे श्री. गांधींनी सुचविले.

...हिंदी समाजाने खुषीने नोंदणी करण्याचा जो ठराव केला त्याचा अर्थ वक्त्यांनी स्पष्ट केला तसेच, आपण जनरल स्मट्सना जे पत्र लिहिले, त्याचाही अर्थ त्यांनी विशद केला.[2]

इंडियन ओपिनियन, ७–९–१९०७

१६७. कॉंग्रेसच्या सभेतील भाषण[3]

[दर्बान,
ता. ४ सप्टें., १९०७]

आपण सुरू केलेला लढा महत्त्वाचा आहे आणि म्हणून त्याचे परिणामही तितकेच महत्त्वाचे होतील. आपला जय झाला तर ट्रान्सवॉलमध्ये खात्रीने आणि त्याशिवाय नाताळमध्ये, केपमध्ये आणि हिंदुस्थानमध्येही हिंदी लोकांची स्थिती पुष्कळ अंशाने सुधारेल. पण आपण माघार घेतली, तर त्याचे परिणाम तितकेच भयंकर होतील.

१. गांधीजी दर्बानला गेले असताना, नाताळ इंडियन कॉंग्रेसची सभा मुद्दाम बोलावण्यात आली. अध्यक्ष श्री. दाऊद महंमद यांनी विनंती केल्यावरून गांधीजींनी ट्रान्सवॉलच्या लढ्यातील ताजी परिस्थिती निवेदन केली. त्या सभेच्या वृत्तांतील हे उतारे आहेत.

२. पुढील लेखात गुजरातीतील सविस्तर वृत्तांत पाहा.

३. "आणखी स्पष्टीकरण" या नावाने हा लेख प्रसिद्ध झाला.

ट्रान्सवॉल नोंदणी-कायद्यासारखा कायदा नाताळच्या पार्लमेंटमध्ये आणण्याचा प्रश्न श्री. हॅगर नावाच्या माणसाने उपस्थित केला आहे. केपमध्ये परवाने-वाल्या फेरीवाल्यांना व दुकानदारांना पुष्कळ अडचणी सोसाव्या लागत आहेत. डेलागोआबेमध्ये नवे कायदे व नवे निर्बंध मंजूर होत आहेत. र्‍होडेशियातही हिंदी लोकांविरुद्ध खास कायदा जारी होत आहे, आणि जर्मन (ईस्ट) आफ्रिकेतही हिंदी लोकांना अपमानास्पद अशा योजनांचा प्रचार चालू आहे. आपण जर आपले सत्त्व प्रगट केले, तर या सार्‍या गोष्टी थांबतील. ट्रान्सवॉलमध्ये प्रस्तुत क्षणी जे काही करावयास हवे होते, ते यापूर्वीच केलेले आहे. लंडनमधील कमिटीही अत्यंत उत्साहाने काम करीत आहे. नाताळनेही काही मदत केली आहे. ता. ३१ जुलै रोजी प्रिटोरियाला पाठविलेल्या तारांचा आणि इतर ठिकाणच्या विविध संस्थांना व व्यापार्‍यांना वेळोवेळी पाठविलेल्या तारांचा फार चांगला परिणाम झाला आहे. त्याबद्दल ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक आणि मी आपले आभारी आहोत. याशिवाय येथून इंग्लंडमधील कमिटीला १०० (शंभर) पौंड पाठविलेले आहेत, हेही मला माहीत आहे. हे सारे ठीक आहे. पण याहून अधिक कार्य नाताळला करावयाचे आहे. येथे अधिक पैसा गोळा करता येईल. याचा अर्थ असा नाही की, दुसर्‍या गावांतून द्रव्य गोळा करून तुम्ही ट्रान्सवॉलला पाठवावे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, ठिक-ठिकाणी गोळा केलेला पैसा येथे एकत्र करावा, म्हणजे जरूरीच्या वेळी त्याचा उपयोग करता येईल. ट्रान्सवॉलमधील लोकही एक निधी उभारीत आहेत, आणि त्यासाठी आपला योग्य वाटा देत आहेत. आतापर्यंत या लढ्यात सुमारे १५०० (पंधराशे) पौंड ब्रिटिश इंडियन असोसिएशनने खर्च केले आहेत. पण अजून अधिक खर्च करण्याची गरज आहे. त्यांच्याजवळ फक्त १०० (शंभर) पौंड शिल्लक आहेत.

*

मला नेहमी असा प्रश्न विचारला जातो की, असोसिएशन इतकी दरिद्री असताना तुरुंगात जाणार्‍यांच्या कुटुंबांचा संभाळ कसा करू शकेल? आणखीही काही प्रश्न विचारले जातात. अशा सार्‍या प्रश्नांना मी एकच उत्तर देतो.–आपली जर ईश्वरावर श्रद्धा आहे, तर आपल्या कुटुंबाचे काय होईल असा प्रश्न आपण कसा करू शकतो? तथापि, या बाबतीतील आमचे कर्तव्य आम्ही पार पाडले पाहिजे, वर्गण्या गोळा करण्यासाठी प्रत्येक खेड्यात आपण घरोघर हिंडले पाहिजे, सद्यःस्थितीची ओळख आपण लोकांना करून दिली पाहिजे, म्हणजे ते खुषीने वर्गणी देतील आणि नव्या कायद्यामुळे आपली काय दुर्दशा होईल याचीही जाणीव त्यांना होईल. याचा अर्थ असा की, आपल्याला शक्य ते आपण सर्व केले पाहिजे. मग आपण ईश्वरावर पुरा भरंवसा ठेवू शकतो. जरूर ते सर्व काही आपण करीत आहो. त्याबरोबर आपण ईश्वराची अंतःकरणपूर्वक अशी प्रार्थनाही केली पाहिजे की, "हे ईश्वरा, इहलोकी आमची गार्‍हाणी कोणी ऐकली नाहीत, तर निदान तुझ्यावर आमचा पूर्ण भरंवसा

आहे. आणि तुझ्या दरबारात कोणताही अन्याय सहन केला जाणार नाही, असा आमचा विश्वास आहे."

गेल्या रविवारी भरलेल्या हमीदिया अंजुमनच्या (बैठकीत), मौलवी अहंमद मुख्त्यार यांनीही असाच उपदेश केला की, आता आपल्याला केवळ ईश्वराच्या दरबारात शिष्टमंडळ पाठवावयाचे आहे. गेल्या रविवारी जर्मिस्टनमध्ये भगवान श्रीकृष्णाच्या जन्माष्टमीच्या उत्सवात सर्व हिंदूंनी असेच विचार व्यक्त केले. आपण सर्वजण अशीच प्रार्थना करू शकतो.

एका प्रश्नाला उत्तर देताना श्री. गांधी म्हणाले, लेडीस्मिथमध्ये आपल्याला आता जी संधी मिळालेली आहे, त्यासंबंधी 'इंडियन ओपिनियन'च्या गेल्या अंकात तीन मार्ग सुचविलेले आहेत.[1] त्यांपैकी कोणताही मार्ग अनुसरावा. आम्ही प्रिव्ही-कौन्सिलला ज्यासाठी अर्ज केला होता, त्याहून हा खटला निराळा आहे. प्रस्तुत खटल्यात आम्ही बोर्डावर फिर्याद करू शकतो. तिचा निकाल आमच्याविरुद्ध झाला तर मग आपण प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करू शकू. पण त्यासाठी खूप पैसा लागेल. दुकाने बेधडक उघडी ठेवणे चांगले, असे मला वाटते. हा लढा एकदा सुरू झाला की अखेरपर्यंत चालविला पाहिजे. दुकानदारांनी दंड भरू नये, तर आपल्या मालाचा लिलाव पुनःपुनः होऊ द्यावा. चालू वर्षासाठी ज्या व्यापाऱ्यांना परवाने मिळालेले आहेत, त्यांनी सरकारला कळवावे की, आमच्या व्यापारी बंधूंच्या बाबतीत होणाऱ्या अन्यायामुळे, आम्हीही पुढील वर्षी परवाना न घेता आमची दुकाने उघडी ठेवू. अशा प्रकारे जर आपण धैर्याने व निश्चयाने संपत्तीचा मोठा त्याग केला, तर आपला जय खचित होईल. आपण आतापर्यंत जी संपत्ती कमावली, किंवा यापुढे जी कमावू, तिला किंमत आपल्याला जय मिळाला तरच आहे; नाही तर आपल्याला येथे कुत्र्याचे जिणे कंठावे लागेल.

बंदरावर प्रवेशकचेरीमध्ये आंगठ्याचे ठसे घेणे कायद्याविरुद्ध आहे. आंगठ्याचे ठसे मागण्याचा अधिकार प्रवेश-कचेरीला कायद्याने खात्रीने दिलेला नाही. आपण जर धिमेपणाने व खंबीरपणाने लढलो, तर आंगठ्यांचे ठसे घेणे बंद होईल. नुकतीच सुरू झालेली ही प्रथा अंकुरावस्थेतच नष्ट करणे अवश्य आहे.

तडजोड करून आपण आपली नावे नोंदवावीत अशी इच्छा बाळगणाऱ्या ट्रान्सवॉलमधील काही लोकांसंबंधी विचारले असताना श्री. गांधी म्हणाले,

"प्रिटोरियातील काही मेमन लोकांची इच्छा सरकारशी समेट होऊन, आपली नावे नोंदवावयाची आहे. असा समेट आम्हांला लाभदायक नाही–उलट हानिकारक

१. पाहा : 'लेडीस्मिथमधील परवाने', लेख १५९.

आहे. आमच्या लढ्याचे सत्यस्वरूप ज्यांना समजले आहे, ते अशा समेटाने कधीच संतुष्ट होणार नाहीत. ज्या समेटाचा मसुदा असोसिएशनने पाठविला आहे, तोच समेट योग्य आहे. नावापुरता समेट केला तरी ज्यांना संतोष होणार आहे, त्यांनी आताच नोंदणी-पत्रे घेणे चांगले. त्याने समाजाच्या लढ्याला खो बसणार नाही. ”

नगरपालिकेच्या मताधिकार-कायद्याला संमती देण्यास लॉर्ड एल्जिन यांनी नकार दिल्याची वार्ता त्या दिवशीच्या वृत्तपत्रात आलेली होती. तिचा खुलासा करताना श्री. गांधी म्हणाले,

“ या यशाचे श्रेय लंडनमधील कमिटीस आहे. हा कायदा बादशहांच्या संमतीसाठी साम्राज्य सरकारकडे फार पूर्वी पाठविलेला होता. तेव्हापासून तो विचाराधीनच होता. म्हणून हा कायदा फेटाळला जाण्याची शक्यता होती. तथापि कमिटीने जर त्याचा निषेध केला नसता आणि त्याला विरोध करण्याचा जितका प्रयत्न केला तितका केला नसता, तर आज आपल्याला जे फळ दिसत आहे ते कदाचित दिसले नसते. आता आपल्याला जो मताधिकार प्राप्त झाला आहे, त्याचा उपयोग प्रत्येकजण करील अशी मला आशा वाटते. ”

श्री. हाफिजींच्या खटल्यात सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निकालाविरुद्ध प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करण्यासाठी एस्टकोर्ट-बोर्ड प्रयत्न करीत असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. त्याविषयी खुलासा करताना श्री. गांधी म्हणाले,

“ अपील करण्याची परवानगी बोर्ड मागेल हे संभवनीय नाही. कारण त्यात पुष्कळ खर्च होईल आणि लाभ काहीच होणार नाही. तथापि, प्रिव्ही कौन्सिलला अपील करण्याची परवानगी मिळविण्याच्या त्यांच्या प्रयत्नाला आपण विरोध करू नये. ”

हे खुलासे केल्यानंतर, त्या दिवशी साजरा होणाऱ्या दादाभाई नौरोजी यांच्या वाढदिवसानिमित्त त्या दिवशी सकाळी जी तार[1] पाठविली तिची माहिती श्री. गांधींनी सभेला दिली.

भारताच्या पितामहांना दीर्घायुष्य लाभावे म्हणून, टोंगाटच्या हिंदी लोकांनी यावेळी तार पाठविली. नंतर सर्वजण उठून उभे राहिले आणि दादाभाईंना दीर्घायुष्य लाभावे म्हणून त्यांनी त्रिवार जयजयकार केला. रात्री १० वाजता सभा समाप्त झाली.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ७-९-१९०७

१. पाहा : “ दादाभाई नौरोजी यांना तार ” लेख १६५

१६८. वासाहतिक सचिवाला पत्र

[जोहान्सबर्ग,
ता. ७ सप्टें. १९०७ पूर्वी]

[वासाहतिक सचिव
प्रिटोरिया,

महाशय,]

माझ्या असोसिएशनला असे खात्रीपूर्वक कळते की, आशियावासी नोंदणी कायद्याप्रमाणे नोंदणीचे जे अर्ज उशिरा येत आहेत, ते स्वीकारण्यापूर्वी सरकार त्या अर्जदाराकडून असे प्रतिज्ञापत्रक घेत आहे की, असोसिएशनच्या काही सभासदांच्या अयोग्य दडपणामुळे आम्ही आतापर्यंत अर्ज केले नाहीत.

असोसिएशनला मिळालेली ही माहिती जर बरोबर असेल, तर मी हे आदरपूर्वक सांगू इच्छितो की, माझ्या माहितीप्रमाणे, असोसिएशनच्या एकाही सभासदाने असे दडपण कधीही टाकलेले नाही. आणि जर एखाद्या व्यक्तीवर असा आरोप केला गेला, तर त्याची माहिती त्या व्यक्तीला योग्य तऱ्हेने दिली जावी, अशी माझ्या असोसिएशनची नम्र विनंती आहे.

आपला,
इसाप इस्माइल मियाँ
अध्यक्ष,
ब्रिटिश इंडियन असोसिएशन

इंडियन ओपिनियन, ७-९-१९०७

१६९. सविनय प्रतिकाराच्या कर्तव्याविषयी[१]

मृत पत्नीच्या बहिणीशी विवाह करणे कायदेशीर ठरविणारे बिल पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांनी मंजूर केले. या घटनेमुळे प्रस्थापित धर्मसंस्थेचा (चर्चचा) धर्मोपदेशक एक प्रकारचा सत्याग्रही बनेल, असे दिसते. कँटरबरीच्या आर्चबिशपने आज असा एक संदेश पाठविला आहे की, मृत पत्नीच्या बहिणीशी केलेला विवाह हा या देशाच्या कायद्याने आता कायदेशीर मानलेला असला, तरी धर्मोपदेशकांनी तसा विवाह साजरा करू नये. — डेली प्रेस

मृत पत्नीच्या बहिणीशी विवाह करणे, ही सुधारणा योग्य आहे की नाही, या वादात आम्ही शिरू इच्छीत नाही. वर उद्धृत केलेली तार आम्ही प्रसिद्ध करीत आहो, यात एवढाच हेतु आहे की, प्राप्त परिस्थितीत आपले दुःख निवारण करून घेण्यासाठी सविनय प्रतिकार हा एक सर्वमान्य उपाय आहे आणि कायदा पाळणाऱ्या शांतताप्रेमी लोकांना, स्वतःच्या विवेकबुद्धीशी प्रतारणा न करता, अवलंबिण्यासारखा तोच एक मार्ग आहे. खरोखर ज्यांना ज्यांना विवेकबुद्धी आहे आणि एखाद्या विशिष्ट कायद्याविरुद्ध ती बुद्धी बंड करून उठत आहे, त्यांनी खरोखर याच मार्गाचा अवलंब केला पाहिजे. यावर कोणी असा आक्षेप घेईल की, ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनी चालविलेला सविनय प्रतिकार आणि कँटरबरीच्या आर्चबिशपाने उपदेशिलेला प्रतिकार यांमध्ये काहीच साम्य नाही. आम्ही याचा इन्कार करतो. आणि म्हणतो की, मृत पत्नीच्या बहिणीच्या दुःख-निवारणाच्या कायदा कँटरबरीच्या आर्चबिशपने अवमानणे हे जर कायदेशीर असेल, तर आशियावासी नोंदणी कायद्याला हिंदी लोकांनी मान्यता न देणे, हे त्याहून अधिक कायदेशीर आहे. विवाह-विधी करण्याचे नाकारून जो धर्मगुरु कायद्याला मान्यता देत नाही, त्याला शासन करण्यासाठी कायद्यात जर काही शिक्षा नाही, तर तशा कायद्याला मान्यता देणे, हे त्याचे दुष्ट कर्तव्य आहे. पण आर्चबिशपने याच्या उलट उपदेश मुद्दाम देऊन एका उच्च कायद्याचा अवलंब केला आहे–आणि तो कायदा म्हणजे

१. हा व या विषयावरील पुढील लेख लिहिताना गांधीजींनी "सविनय प्रतिकाराच्या कर्तव्याविषयी" [On the Duty of Civil Disobedience] या निबंधाचा आधार घेतला आहे. हा निबंध अमेरिकेचे तत्त्वज्ञ, निसर्गवादी व ग्रंथकार हेन्री डेव्हिड थोरो (१८१७–६२) यांनी लिहिलेला असून तो "नागरी शासनाला प्रतिकार" या नावाने १८४९ मध्ये प्रथम प्रसिद्ध झाला.

स्वत:च्या विवेकबुद्धीचा कायदा. बरोबर असो वा चूक असो, त्या धर्मगुरूंना असा विश्वास आहे की, अशा विवाहांना बायबलमध्ये काही आधार नाही, आणि म्हणून या कायद्याने ईश्वरी कायद्याचा भंग केला आहे, तेव्हा तो धर्मगुरूंनी मानणे, हे अधर्म्य होईल. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर थोरोचे मत त्यांनी मान्य केले आहे. ते मत असे की, आपण प्रजाजन होण्याआधी माणूस असले पाहिजे. आणि कोणत्याही कायद्याला–मग त्याच्या पाठीशी कोणतीही शक्ती किंवा कितीही बहुमत असो-आंधळेपणाने मान्यता देण्याचे बंधन आपल्या विवेक-बुद्धीने आपल्यावर घातलेले नाही.

ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांची भूमिकाही अशीच आहे. ते कायदा पाळणारे आहेत. आता त्यानी आशियावासी कायद्याप्रमाणे नोंदणी करून घेण्याचे नाकारले म्हणून, कायदे पाळण्यासंबंधीचा त्यांचा आतापर्यंतचा लौकिक काही कमी होणार नाही. कारण हा कायदा पाळणे आपल्या पुरुषार्थाला अपमानास्पद आहे, आणि आपल्या धर्माचा उपमर्द करणारे आहे, असे त्यांची विवेकबुद्धी त्यांना सांगते. सविनय प्रतिकाराच्या तत्त्वाचा अतिरेक होणे शक्य आहे, पण तसा तो कायदे पाळण्याच्या तत्त्वाचाही होऊ शकेल. यातील सीमारेषा स्पष्ट करण्यासाठी थोरोच्या शब्दांहून अधिक समर्पक शब्द आमच्याजवळ नाहीत. अमेरिकन सरकारबद्दल बोलताना थोरो म्हणतात,

"हे सरकार आपल्या बंदरांत येणाऱ्या काही विदेशी वस्तूंवर कर बसविते, म्हणून ते वाईट आहे, असे जर कोणी मला सांगू लागला, तर त्याचा गवगवा मी करणार नाही, कारण त्या वस्तूशिवाय माझे चालू शकेल. सर्व यंत्रांमध्ये घर्षण असते (तसेच ते शासन-यंत्रातही असते) आणि त्यामुळे त्यातील दोष कमी होण्याची शक्यता आहे. ते काही असले तरी त्या घर्षणाविरुद्ध खळबळ माजविणे अनिष्ट आहे. पण जेव्हा ते घर्षण त्या यंत्रावर मात करते आणि जुलूम व लूटमार यांचे वर्चस्व सुरू होते, तेव्हा मी म्हणतो, आता आपल्याला अशा शासनयंत्राची गरज नाही."

आशियावासी नोंदणी–कायदा म्हणजे हिंदी लोकांच्या दृष्टीने, काही अनिष्ट गोष्टी असलेला कायदा–थोरोच्या शब्दांत सांगावयाचे तर काही घर्षण असलेले यंत्र नव्हे, तर पापालाच कायद्याचे स्वरूप दिलेले आहे, किंवा त्या घर्षणाला स्वतंत्र यंत्राची जोड दिलेली आहे. अशा दुष्टत्वाला प्रतिकार करणे, हे दैवी कर्तव्य आहे. त्याची उपेक्षा कोणीही मानव निर्भयपणे करू शकणार नाही. जसे कँटरबरीच्या आर्चबिशपच्या बाबतीत, तसेच येथील हिंदी लोकांच्या बाबतीत. आशियावासी कायद्याला मान्यता द्यावी की नाही याचा निर्णय त्यांच्या विवेकबुद्धीनेच द्यावयाचा आहे. आणि तसा तो यापूर्वीच दिलेला आहे—मग त्यासाठी कोणतीही किंमत द्यावी लागली तरी बेहत्तर !

इंडियन ओपिनियन, ७–९–१९०७

१७०. " इंडियन ओपिनियनची " पुरवणी

गेल्या अंकी आम्ही असे म्हटले होते की, ना. दादाभाई नौरोजी यांच्या वाढदिवसाच्या सत्कारानिमित्त त्यांचे एक छायाचित्र आम्ही या अंकात देऊ. त्याप्रमाणे या अंकात छायाचित्र दिल्याचे वाचकांना आढळून येईल. भारताचे पितामह गेल्या वर्षी भारताला भेट देण्यास गेले असताना काढलेले त्यांचे हे छायाचित्र आहे आणि ते " इंडिया " पत्रामध्ये छापलेले आहे. हे छायाचित्र चौकटीत बसवावे अशी आम्ही आमच्या सर्व वाचकांना विनंती करतो. पण आमच्या मते त्याची खरी चौकट म्हणजे ते चित्र आपल्या अंतःकरणावर कोरणे. कागदाचा एखादा तुकडा शोभिवंत करून जतन करावयाचा, पण तो कशासाठी आहे याचा काडीमात्र विचार करावयाचा नाही. मूर्तिपूजेचा हाच नेमका अर्थ आहे, असे म्हणता येईल. खोलीत छायाचित्र ठेवण्याचा हेतु इतकाच असतो की, त्याच्या दर्शनाने आपल्याला आपल्या कर्तव्याचे स्मरण दररोज होत राहावे. द. आफ्रिकेतील आणि हिंदुस्थानातील सध्याची परिस्थिती अशी आहे की, दादाभाईसारखे शेकडो वीर पुढे आले तरी ते फार अपुरे पडतील. आणि अशी माणसे पुढे आल्याशिवाय आपल्या राजकीय परिस्थितीत किंवा आपल्या ऐहिक जीवनाच्या इतर क्षेत्रांत काहीही सुधारणा होणार नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ७-९-१९०७

१७१. सुस्वागतम्

नाताळचे नवे गव्हर्नर, सर मॅथ्यू नाथन् हे येऊन पोहोचले आहेत. ते ४५ वर्षांचे असून अविवाहित आहेत. ते यहुदी आहेत. द. आफ्रिकेत गव्हर्नर म्हणून नेमले जाणारे ते पहिले यहुदी होत. नामदारसाहेब हे अत्यंत दयाळू व कष्टाळू असून त्यांचा अनुभव विशाल आहे, असे म्हणतात. हाँगकाँग येथे त्यांनी सर्व जमातींची अंतःकरणे जिंकली होती. आज नाताळची परिस्थिती वाईट आहे. अशा वेळी, स्वायत्त

वसाहतीच्या कारभारात ते प्रत्यक्ष ढवळाढवळ करू शकत नसले तरी, एक सज्जन म्हणून उपदेश करून आणि स्वतःच्या उदाहरणाने ते पुष्कळ साहाय्य करू शकतील. त्यांच्याकडून ज्या अपेक्षा बाळगलेल्या आहेत त्या पूर्ण होतील, अशी आम्ही आशा करतो. त्यांच्याबरोबर त्यांच्या भगिनी, मिस नाथन् या आलेल्या आहेत. नामदार-साहेबांच्या सामाजिक जीवनाशी संबंधित अशा कार्याकडे त्या लक्ष देतात आणि सामाजिक समारंभामध्ये त्या यजमानणीचे काम करतात.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ७–९–१९०७

१७२. सविनय प्रतिकाराचे फायदे

एक संस्मरणीय उदाहरण

सांप्रत आयर्लंडचे लोक आपल्या हक्कासाठी निकराचे प्रयत्न करीत आहेत. काही आयरिश पुढाऱ्यांना असे खात्रीपूर्वक वाटते की, आयर्लंडचे लोक विशिष्ट देशात राहात आहेत, म्हणून त्यांना हाल भोगावे लागत आहेत. हिंदी लोकांना आपल्या त्वचेच्या रंगामुळे हाल भोगावे लागतात, तसेच हे आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर, हिंदुस्थानात व हिंदुस्थानाबाहेर हिंदी लोकांना पुष्कळ अडचणी सोसाव्या लागतात, आणि इंग्रजांपेक्षा त्यांना कमी लेखले जाते. आयरिश लोकांना स्वतःच्या देशात काडीची किंमत नाही आणि इंग्रज राज्यकर्ते त्यांच्यावर जुलूम करीत आहेत. पण ते आयर्लंडच्या बाहेर गेले की, तंतोतंत इंग्रजांइतके हक्क ते पुरेपूर उपभोगू शकतात. आयर्लंडचे प्रतिनिधित्व करणारे कॉमन्स सभेत ८६ सभासद आहेत. पण आयरिश लोकांच्या प्रयत्नांना यश येण्याला कॉमन्स सभेतील स्वार्थांध ब्रिटिश सभासद सर्वतोपरी विरोध करतात. यामुळे काही आयरिश पुढाऱ्यांना, आपली गाऱ्हाणी दूर करून घेण्यासाठी, आपल्या कार्याची नवी दिशा आखावी, असे आता वाटू लागले आहे. त्या चळवळीचे नाव "सिन्फेन[1]" असे आहे. त्याचा गुजरातीत शब्दशः अर्थ केला तर तो नेमका

१. "आमचे आम्हीच" अशा अर्थाचा आयरिश शब्द. ही आयरिश राष्ट्रीय चळवळ १९०५ मध्ये चालू झाली. तिची परिणती सामुदायिक प्रजातंत्रीय पक्षात झाली आणि आयरिश लोकांनी स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचे यश तिला मिळाले.

" स्वदेशी " चळवळ असा होतो. सिन्फेन पक्ष दिवसेदिवस बलिष्ठ होत आहे. सविनय प्रतिकार हे त्यांच्या लढ्यातील एक शस्त्र आहे. आतापर्यंत आयरिश लोक अत्याचाराच्या बाजूचे होते. आयरिश लोक " कूळ " आहेत आणि ब्रिटिश लोक " जमीनदार " आहेत. ते तेथे परके आहेत. आपल्या परक्या जमीनदारावर आयरिश कुळे वारंवार अत्याचार करीत. आता असे ठरविण्यात आले आहे की, ब्रिटिश पार्लमेंटातून आयरिश सभासदांनी हळूहळू बाहेर पडावे, आयरिश लोकांची भांडणे आयर्लंडमध्ये स्थापन झालेल्या न्यायमंदिराकडे नेऊ नयेत आणि स्वतःला क्लेश झाले तरी ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकावा, अशी शिकवण आयरिश लोकांना देण्यात यावी. अशा मार्गांनी ते स्वदेशीची म्हणजे " सिनफेनची " घोषणा दशदिशा दुमदुमून सोडतील. त्यामुळे आयर्लंडने हिंसक लढा न करता, आयर्लंडला स्वराज्य देणे ब्रिटिशांना अखेरीस भाग पडेल, किंवा ते राजीखुषीने देतील, आणि आयर्लंड सोडून जातील. मग आयरिश लोकांना पूर्णपणे स्वतंत्र असे सरकार प्राप्त होईल.

या चळवळीचे मूळ युरोपच्या दक्षिणेस असलेल्या ऑस्ट्रिया–हंगेरीमध्ये आहे. ऑस्ट्रिया व हंगेरी हे दोन स्वतंत्र देश होते, पण हंगेरी हा ऑस्ट्रियाच्या अमलाखाली होता आणि त्याच्याकडून तो नेहमी लुटला जात होता. ऑस्ट्रियाला अडविण्यासाठी, डिक् नावाच्या एका हंगेरियन माणसाने आपल्या लोकांना सांगितले की, तुम्ही ऑस्ट्रियाला कोणतेही कर देऊ नका, कोणत्याही ऑस्ट्रियन अधिकाऱ्याची नोकरी करू नका, फार काय, ऑस्ट्रियाचे नावसुद्धा विसरून जा. हंगेरियन लोक अत्यंत दुबळे होते, पण त्यांच्यामध्ये हे जे नवे चैतन्य निर्माण झाले, त्यामुळे अखेरीस ते आपला हक्क शाबीत करू शकले. आता हंगेरी ऑस्ट्रियाचा अंकित राहिला नाही. तो त्याच्याशी बरोबरीच्या नात्याने वागत आहे.

ही उदाहरणे ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना अनुकरणीय आहेत. त्यावरून हे स्पष्टपणे सिद्ध होते की, इतिहासात पूर्वी ज्या गोष्टी घडल्याचे आपल्याला माहीत आहे, त्या ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या बाबतीतही घडून येतील. याचा अर्थ असा की, हजारो लोकांना कोणीही तुरुंगात टाकू शकणार नाही किंवा हद्दपार करू शकणार नाही. मात्र, प्रत्येक हिंदी माणसाने तुरुंगात जाण्याची किंवा हद्दपार होण्याची तयारी ठेवली पाहिजे. आणि हिंदी लोकांची तशी तयारी आहे हे सिद्ध करण्यासाठी काही लोकांना खरोखरच तुरुंगात जावे लागेल किंवा हद्दपारही व्हावे लागेल. ज्या हिंदी माणसाला हद्दपारी किंवा तुरुंगवास सोसावा लागेल, तोच खरे जीवन जगला आणि जीवनाची लढाई त्यानेच जिंकली असे म्हटले पाहिजे. त्याचे नाव अजरामर होईल आणि त्याने आपले मातृभूमीविषयीचे कर्तव्य पूर्णपणे पार पाडले असे मानले जाईल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ७–९–१९०७

१७३. प्रधान मंत्र्याचे विचार

सर हेन्री कॅम्पबेल–बॅनरमन यांनी श्री. रिच यांना असे उत्तर दिले आहे की, दक्षिण आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमिटीच्या शिष्टमंडळाची भेट मी घेणार नाही. त्यांच्या उत्तराचा सारांश रूटरने तारेने कळविला आहे. त्या तारेत असे म्हटले आहे की, 'नवा कायदा वाईट आहे असे मी ट्रान्सवॉलच्या सरकारला कळविले असल्याबद्दल प्रधान मंत्र्यांनी सांगितले. पण आता ट्रान्सवॉलला स्वराज्य आहे, म्हणून या कायद्याच्या अंमलबजावणीत ते ढवळाढवळ करू शकत नाहीत. तसेच ट्रान्सवॉलवर काही दडपण ते इतक्यातच आणू शकत नाहीत.' हे उत्तर पाठविण्यास सर हेन्री यांनी सुमारे वीस दिवस घेतले असे दिसते. यावरून आम्ही असे अनुमान करतो की, हिंदी लोक शेवटी सक्तीशिवाय नोंदणी करून घेतील अशी माहिती ट्रान्सवॉलहून साम्राज्य सरकारला मिळाली असावी. काही लोकांनी नोंदणीपत्रे घेतली आहेत, आणि काही जण ती घेण्याच्या तयारीत आहेत, अशा वस्तुस्थितीमुळे जनरल स्मट्स यांना असे विधान करण्यास जोर चढला असावा, असे आम्हांस वाटते. हा तर्क खरा असेल, तर सर हेन्रींच्या उत्तराने निराश होण्याचे कारण नाही. सर हेन्री यांनी हस्तक्षेप करण्याची वेळ तेव्हाच येईल की, जेव्हा खरा लढा सुरू होईल आणि हिंदी लोकांना तुरुंगात पाठविले किंवा हद्दपार केले तरी ते दृढ राहातील आणि कायद्याला मान्यता देणार नाहीत. तशा वेळीही ते जर हस्तक्षेप न करतील, तर ब्रिटिश साम्राज्याचा सूर्य अस्तंगत होऊ लागला आहे असे आम्ही मानू. कारण साम्राज्य सरकारच्या निष्पाप प्रजाजनांवर जुल्म होत असताना ते सरकार जर त्यांचे संरक्षण करणार नाही, तर परमेश्वर त्यांची सत्ता काढून घेईल, असे सर्वसाधारण विचारावरून आम्हांस वाटते. रक्षण करीत नाही तो राजा कसला ?

पण सर हेन्री मध्यस्थी करतात की नाही याच्याशी हिंदी लढ्याचा फारसा संबंध नाही. या वेळचा लढा म्हणजे आपल्या शक्तीची कसोटी आहे. साम्राज्य सरकार दुर्बल असल्याचे आपल्याला आढळून आले. याच कारणासाठी आपण धिक्कारलेल्या कायद्याला आपण मान्यता देणार नाही. आपला सत्यानाश होत असताना साम्राज्य सरकार जर केवळ हात जोडून पाहात बसले तर वसाहतीत राहण्यासाठी हिंदी लोकांना आपल्या स्वतःच्याच शक्तीवर विसंबून राहावे लागेल, आणि ते जर तुरुंगवासाचे कष्ट सोसण्यास तयार नसतील तर वसाहतीमध्ये त्यांचा सर्वनाश होईल; व त्यांचा शोचनीय अंत होईल. कुत्र्याचे जिणे जगणे हे मृत्यूपेक्षाही वाईट आहे असे आम्ही मानतो.

सर हेन्री यांच्या पत्रावर टीका करताना "पाल माल गॅझेट" या वजनदार ब्रिटिश पत्राने असे म्हटले आहे की, हिंदी लोकांचे हक्क पायदळी तुडविण्यास मुभा देऊन सर हेन्री यांनी स्वतःचा भेकडपणा व कमीपणा प्रकट केला आहे आणि या भेकडपणाची किंमत साम्राज्य सरकारला द्यावी लागेल. या आशयाची तार जोहान्सबर्गच्या 'संडे टाइम्स 'मध्ये प्रसिद्ध झाली आहे. यावरून आम्ही असे मानतो की, इंग्लंड-मधील लढा संपलेला नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ७–९–१९०७

१७४. नाताळ नगरपालिकेचा मताधिकाराचा कायदा

नाताळमधील हिंदी लोकांना नगरपालिकेचा मताधिकार असावा की नाही याविषयी पुष्कळ वाद चालू आहे; पण त्याचा निर्णय काय होईल हे सांगणे आतापर्यंत कठीण होते. आता वृत्तपत्रांतील बातम्यांवरून असे दिसते की, लॉर्ड एल्जिन यांनी ते बिल नामंजूर केले आहे. त्याचे कारण असे दिलेले आहे की, परवान्यांच्या बाबतीत साम्राज्य सरकारची खात्री नाताळ सरकार पटवू शकले नाही. अर्थात् हे सर्व फल दक्षिण आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमिटीच्या अस्तित्वाचे व तिने केलेल्या जोरदार लढ्याचेच होय. आमच्या वाचकांना आठवत असेल की, या बिलाबाबत या कमिटीच्या वतीने श्री. रिच यांनी लॉर्ड एल्जिन यांना अनेक प्रसंगी लिहिले होते. मात्र या विजयाने आपण फुगून जाता कामा नये. आम्ही स्वतः नगरपालिकेच्या हक्कांना फारसे महत्त्व देत नाही. त्यांचा वापर करण्याचे ज्ञान व सामर्थ्य अंगी नसेल, तर पुष्कळ वेळा त्यांचे ओझे होते. कायद्याच्या दृष्टीने गोरे व काळे लोक यांना समान हक्क असले तरी, अमेरिकेमध्ये सध्या तेच लोक पुढे येतात की, ज्यांच्या अंगी अधिक उत्साह आहे, आणि जे अधिक शिकलेले व शहाणे असून सार्वजनिक वृत्तीचे आहेत. केप वसाहतीमध्येही असेच आहे. तेथे हिंदी, काफिर व गोरे या तिघांनाही मताचा समान हक्क आहे, तरी हिंदी समाजाचे वजन निश्चितपणे कमी होत आहे, मताधिकाराचे शस्त्र गंजून जात आहे आणि गोऱ्या व्यापाऱ्यांच्या लढ्याला येतील तसल्या व्यापाऱ्यांच्या परवान्याबाबत नवे कायदे जारी होत आहेत. या बाबतीत आमच्या दृष्टीने पहिला धडा हा आहे की, हिंदी माणूस, मग तो गरीब असो वा श्रीमंत असो, स्वतःच्या पुरुषार्था-

विषयी तीव्र भावना बाळगणारा असला पाहिजे. आपल्या समाजाच्या हक्कासाठी लढण्याचे किंवा अन्य मार्गांनी स्वार्थत्याग करण्याचे बळ त्याच्या अंगी आले पाहिजे. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक जो लढा खेळत आहेत त्यावरून, वरील गुण आपल्या अंगी येण्याची ही वेळ आहे की, त्यासाठी आपल्याला अजून पुष्कळ वर्षे थांबावे लागणार आहे, हे सिद्ध होईल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ७–९–१९०७

१७५. डॉ. नंदी यांची पुस्तिका

नव्या कायद्याविषयी डॉ. नंदी[1] यांनी एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. तिची किंमत १ शिलिंग आहे. त्या पुस्तिकेत त्यांनी लॉर्ड सेल्बोर्न, श्री. कर्टिस, चॉमनी, श्री. कोडी इत्यादींची निंदा केली आहे आणि श्री. गांधींवरही तशीच टीका केली आहे. त्या सर्व टीकांचा मथितार्थ आम्ही उद्धृत करण्याची गरज आहे, असे वाटत नाही. त्यांनी त्या पुस्तिकेत अशी सूचना केली आहे की, नवा कायदा रद्द करावा व हिंदी लोकांचे हक्क काय आहेत, हे ठरविण्यासाठी एक कमिशन नेमावे आणि नंतर त्यांना नोंदणीचे दाखले द्यावेत. ही सूचना आणि खुषीच्या नोंदणीची सूचना यांमध्ये काही अंतर नाही, एवढ्यापुरते डॉ. नंदींचे पुस्तक आपल्याला उपयुक्त ठरेल. पण त्या पुस्तिकेचा अर्थ, हा कायदा जारी राहावा आणि फक्त नोंदणी-पत्रे दुरुस्त व्हावीत असा आहे की काय हे स्पष्ट नाही. तथापि या चोपड्याला काही महत्त्व दिले जाईल असे आम्हांस वाटत नाही. कारण त्यात नवे असे काही नाही. तसेच श्री. चॉमनी व श्री. कोडी यांच्यावर त्यात केलेल्या हल्ल्यामुळे त्यांचे काही नुकसान होईल, असेही मला वाटत नाही. डॉ. नंदींनी आपल्या पुस्तिकेत हे कबूल केले आहे की, हिंदी समाजाचे कल्याण कशाने होणार असेल तर ते तुरुंगात जाण्याच्या ठरावानेच. "रँड डेली मेल" वर विसंबून, त्यांनी असे विधान केले आहे की, सुशिक्षित लोकांना बोटांच्या ठशापासून माफी मिळावी, अशी सूचना करण्यात आली होती. पण अशी

१. पाहा : खंड ५, लेख ४६१ व ४६३

सूचना कधीही केली गेली नाही, आणि जरी केली गेली असली तरी या कायद्याविरुद्ध चाललेला हा लढा संपणार नाही.

याशिवाय आणखीही काही (सूचना)[1] केलेल्या आढळतात.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ७-९-१९०७

१७६. कायदेभंगाचे कर्तव्य[2]—(१)

पुष्कळ वर्षांपूर्वी अमेरिकेत हेन्री डेव्हिड थोरो नावाचा एक थोर माणूस होऊन गेला. त्याच्या लेखांचे वाचन व चिंतन लाखो लोक करीत असतात. त्यांपैकी काही लोक याचे विचार कृतीत उतरवितात. त्याच्या लेखांना फार महत्त्व दिले जाते. याचे कारण तो "बोले तैसा चाले" या कोटीतील होता. कर्तव्यबुद्धीने प्रेरित झाल्यामुळे त्याने स्वदेशाविरुद्ध–अमेरिकेविरुद्ध–पुष्कळ लिहिले आहे. अमेरिकन लोक असंख्य माणसांना गुलामगिरीमध्ये डांबून ठेवतात, हे महापातक आहे, असे तो मानी. हे केवळ बोलून तो थांबला नाही, तर गुलामांचा व्यापार थांबविण्यासाठी जरूर ते सर्व उपाय त्याने योजले. त्यातील एक उपाय म्हणजे ज्या राज्यात गुलामांचा व्यापार चालतो, त्याच्या सरकारला कर न देणे. अवश्य ते कर देण्याचे त्याने नाकारल्यामुळे त्याला तुरुंगात जावे लागले. या तुरुंगवासात त्याच्या मनामध्ये जे विचार आले ते स्वतंत्र वृत्तीचे व धैर्याचे होते. ते एका पुस्तकाच्या रूपात छापलेले आहेत. त्या पुस्तकाचे नाव या लेखाच्या शीर्षभागी दिलेले आहे. इतिहासकारांचे म्हणणे असे आहे की, अमेरिकेतील गुलामगिरी रद्द होण्याचे प्रमुख कारण म्हणजे थोरोचा तुरुंगवास आणि त्यातून मुक्त झाल्यानंतर त्याने प्रसिद्ध केलेले वरील पुस्तक. त्याची कृती व लेखन हे दोन्हीही ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना सध्या तंतोतंत लागू पडण्यासारखे आहेत. म्हणून आम्ही त्या [लेखांचा] सारांश पुढे देत आहो. जे सरकार

१. येथे गांधीजींनी जो शब्द योजला आहे, तो "इंडियन ओपिनियन"च्या प्रतांत स्पष्ट दिसत नाही.

२. या लेखात व ता. १४-९-१९०७ च्या दुसऱ्या लेखात गांधीजींनी थोरोचे विचार सोप्या भाषेत मांडले आहेत. चौकोनी कंसातील शब्द थोरोच्या निबंधातील आहेत.

कमीत कमी शासन करते, ते जास्तीत जास्त चांगले असते, हे मला मान्य आहे. याचा अर्थ असा की, सरकार हा एक रोग आहे, आणि त्याच्यापासून जनतेला जितकी अधिक मुक्तता मिळेल, तितके ते सरकार अधिक प्रशंसनीय.

पुष्कळ माणसे असे म्हणतात की, अमेरिकेजवळ [खडी] फौज मुळीच नसली, किंवा फार थोडी असली, तर चांगले होईल. [काही मर्यादेपर्यंत] हे म्हणणे अगदी योग्य आहे. पण ज्यांचे असे मत असते, ते चुकीच्या प्रमेयावर ते आधारीत असतात. ते म्हणतात, शासन-संस्था उपयुक्त आहे—अपायकारक आहे ते फक्त सैन्य. या विद्वान् लोकांना हे कळत नाही की, सैन्य हा सरकारचा केवळ एक अवयव आहे आणि त्याच्याशिवाय सरकार क्षणभरही टिकणार नाही. आणि हे आपल्या लक्षात येत नाही. कारण सरकारी सत्तेचा कैफ आपल्याला चढलेला असतो. खरे बोलावयाचे तर, सरकार व सैन्य या दोहोंच्या अस्तित्वाला जबाबदार आपण—म्हणजे प्रजाजन—आहोत.

अशा प्रकारे आपण आपल्यालाच फसवीत आहो, असे दिसते. जनतेला स्वतंत्र ठेवण्याचे किंवा शिक्षण देण्याचे कार्य कोणी करीत असेल तर ते अमेरिकेचे सरकार नव्हे, सरकारचे जे [यश] आपल्याला दिसते, ते थोड्याफार प्रमाणात, अमेरिकन लोकांच्या उपजत स्वभावाचे फल होय. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, आपण आज सुशिक्षित व बुद्धिमान असलो, तरी सरकारमुळे आमच्या विकासात न्यूनता आलेली आहे.

तथापि, सरकार अजिबात नसावे असे मी आताच म्हणत नाही, तर चांगले सरकार असावे एवढीच माझी तूर्त मागणी आहे. आणि अशी अपेक्षा धरणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. ज्या देशातील प्रत्येक गोष्टीचा निर्णय बहुमताने होत असतो, तेथे शुद्ध न्याय असतो, असे मानणे ही मोठी चूक आहे. ही चूक लक्षात न आल्याने पुष्कळसा अन्याय चालू राहातो. समुदाय जे जे करील, ते ते योग्यच असेल, असे समजणे हा भ्रम आहे. असे सरकार असू शकणार नाही का की, ज्यात बऱ्यावाइटाचा निर्णय, बहुमताने न होता, विवेकाने होतो. नागरिकाने आपला विवेक शासनकर्त्यांकडे कायमचा गहाण टाकला पाहिजे काय ? आपण प्रथम 'मानव' आहोत आणि मग 'प्रजाजन' आहोत, असे मी म्हणतो. न्याय्य गोष्टीसाठी आदरभाव निर्माण करण्याची जितकी आवश्यकता; तितकी कायद्याविषयी आदरभाव निर्माण करण्याची नाही. मी माझ्यावर एकच बंधन मानतो आणि ते म्हणजे सदासर्वदा न्यायाने वागणे. कायद्याने माणसाला रतिमात्रही अधिक न्यायी बनविले नाही. पण मी असे पाहिले आहे आणि पाहात आहे की, साधेभोळे सज्जन लोक, आपल्या भोळेपणामुळे, अन्यायाचा प्रसार करणारे दूत बनतात. कायद्याविषयी अवास्तव आदर बाळगल्याचा एक परिणाम असा होतो की, लोक सैनिक बनतात आणि, माकडाप्रमाणे, आपल्या वरिष्ठांच्या आज्ञा डोळे मिटून यंत्राप्रमाणे पार पाडीत असतात. अशा प्रकारे

पुष्कळ लोक [सैनिकाचा] व्यवसाय पत्करतात. तो व्यवसाय निंद्य आहे, याविषयी त्यांना काडीमात्र शंका नसते, तरी त्यात शिरण्यासाठी ते धावत सुटतात. ती माणसे असतात का खाटकाच्या हातातील सुरे असतात? दगड, धोंडे, लाकडे यांच्या पातळीवरील ही माणसे होत. अशा प्रकारच्या माणसांबद्दल कोणाला किती आदर वाटणार? कुत्र्यामांजरापेक्षा त्यांचे मोल अधिक कोणाला वाटणार? दुसरे काही लोक कायदेपंडित बनतात, राजदूत बनतात, वकील बनतात, आपण आपल्या बुद्धीने राज्याचे रक्षण करतो, असा त्यांना अभिमान वाटतो. पण मला वाटते, तेसुद्धा अजाणता व अहेतुपूर्वक सैतानाचीच सेवा करतात. राज्याची सूत्रे आपल्या हाती असताना जे लोक स्वतःच्या न्यायबुद्धीचे पालन करतात, त्यांचा सरकारशी नेहमी खटका उडत असलेला आपल्याला आढळतो.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ७-९-१९०७

१७७. दर्बानमध्ये बोटांच्या ठशांचे संकट

जो हिंदी माणूस दर्बान-मार्गे स्वदेशाला जावयास निघाला असेल, त्याला वास्तव्याचे प्रमाणपत्र देताना, प्रवेश-अधिकारी त्याच्या आंगठ्याचे ठसे घेतो, अशी वदंता लोकांमध्ये गेले काही दिवस पसरलेली आहे. या बाबतीत कॉंग्रेसने लढा द्यावा, असेही काही लोक म्हणतात. असे आंगठ्याचे ठसे घेण्याचा कायदा अद्याप झालेला नाही. पण अशा कायद्याचे पहिले पाऊल म्हणजे ही कृती होय, असे आम्हांस वाटते. अशा प्रकरणी, कॉंग्रेसकडून मिळणाऱ्या मदतीपेक्षा व्यक्तींनीच पुष्कळ काम करावयाचे असते. जे लोक वैयक्तिक लाभासाठी आंगठ्याचे ठसे मागितल्याबरोबर देतात त्यांच्या बाबतीत कॉंग्रेस काही करू शकत नाही. वास्तव्याचे प्रमाणपत्र देण्यासाठी कोणता पुरावा पुरेसा आहे, हे ठरविण्याचा अधिकार, प्रवेश-अधिकाऱ्याला दिलेला आहे. तो अधिकारी बोटांच्या ठशांची मागणी न करताही प्रमाणपत्र देण्याचे नाकारू शकेल. आणि जेव्हा एखादा माणूस अशा प्रमाणपत्राची मागणी आर्जवाने करील, तेव्हा तो अधिकारी त्याच्या नडीचा फायदा घेऊन, त्याला आंगठ्याचा ठसा देण्यास भाग पाडील. ही पद्धत योग्य किंवा न्याय्य आहे, असे आम्ही सूचित करीत नाही. विशिष्ट प्रसंगी याला कायद्याने विरोध करणे शक्य होईल, हेही आम्ही नाकारीत नाही. अशा

प्रतिकारामध्ये आपल्याला अखेरीस जय मिळेलही, पण आपला पराभव होण्याचाही संभव आहे. जोपर्यंत हिंदी लोक खोटी प्रतिज्ञा–पत्रे देऊन वाममार्गाने वास्तव्याची प्रमाणपत्रे मिळवू पाहातात, तोपर्यंत असे हाल होणारच. पण याकडे लक्ष वेधण्याची सध्या गरज आहे असे आम्हांस वाटत नाही. आम्हांला अशी खात्री वाटते की, त्या दुष्ट कायद्याचा स्वीकार न करता हिंदी समाज जर आपल्या प्रतिज्ञेशी एकनिष्ठ राहिला आणि सर्वतऱ्हेचे कष्ट सोसून त्याने जर ट्रान्सवॉलचा लढा जिंकला, तर आपल्या समाजावर होणाऱ्या आक्रमणाचा ट्रान्सवॉलमधील हा वृक्ष वाढू शकणार नाही. आणि मग अशा तऱ्हेचा कायदा करण्यास कोणतीही वसाहत समर्थ होणार नाही, असे आम्हांस वाटते. सांप्रत साम्राज्य सरकार बिकट परिस्थितीत[1] सापडलेले आहे. म्हणून ट्रान्सवॉलमध्ये आपण जर अखेरपर्यंत लढा दिला, तर अशा कायद्याला संमती देण्याचा सल्ला लॉर्ड एल्जिन हे बादशहांना कदापि देणार नाहीत.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ७–९–१९०७

१७८. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

परवाना–कचेरीचा प्लेग एका खेड्यात गेला पण एकाही माणसाला लागण न करता गुप्त झाला. एखादा हिंदी कैदीही त्या प्लेगला बळी पडला नाही. प्लेगप्रतिबंधक वैद्यराजांचे–स्वयंसेवकांचे–पथक सज्ज होते. पण जेथे लोकांचे शरीर-सामर्थ्य बळकट होते, तेथे या वैद्यराजांची गरज नव्हती.

असे वृत्त आता नित्याचे होऊन बसले आहे. म्हणून मी स्टँडर्टन, हेडेलबर्ग व फोक्रस्ट या गावांचे अभिनंदन करण्यासाठी विस्ताराने लिहीत नाही. आता हा प्लेग आपल्या अंगवळणी पडला आहे. त्यावरील तोडगाही सापडला आहे. दर्बानहून तो तोडगा सर्वांना पुरविला जातो. औषधाने किंवा औषधाविरहित, सर्वांचेच आरोग्य चांगले राहिले आहे, तर मग कोणा एकाचेच अभिनंदन करावे ! जेव्हा सारेच लोक सारखेच काम करतात, तेव्हा कोणाची प्रशंसा करावी ! म्हणून मी आता केवळ

१. बेडूक गिळणाऱ्या सापाला तो पुरा पचविता येत नाही व बाहेरही टाकता येत नाही. अशा अर्थाची गुजराती म्हण गांधीजींनी मूळ गुजराती लेखात वापरली आहे.

ईश्वराचीच प्रशंसा करतो. त्याने सर्व ठिकाणच्या लोकांना योग्य प्रेरणा सतत दिली आहे. त्याचा परिणाम म्हणजे सर्वजण एकजुटीने व धैर्याने कर्तव्यनिष्ठ राहिले आहेत. पण मला हे पुनःपुनः सांगणे भाग आहे की, वरील काम अवश्य असले तरी त्याहून अधिक महत्त्वाचे कार्य अद्याप पुढेच आहे. केवळ परवाना कचेरीवर बहिष्कार घातल्याने– आणि कोणतेही हाल न भोगता, तुरुंगात न जाता, किंवा हद्दपार न होता—आपण यश मिळवू असे कोणास वाटत असेल, तर ती मोठी चूक होय. "टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही." (दुःख भोगे सुख होय) हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. शिवाय कष्ट सोसल्याखेरीज सुखाची खरी किंमत कळत नाही. ज्याने थंडी सोसली नाही, त्याला सूर्यप्रकाशाचे महत्त्व कसे कळणार? प्रत्येक शिंपल्यात मोती सापडू लागले, तर मग त्या मोत्यांना हात कोण लावील?

हमीदिया अंजुमन

ही संस्था अलौकिक धैर्याने कार्य करीत आहे. आपण चालविलेला लढा हे एक धर्मयुद्ध आहे, असे मला दिसते. आपल्या श्रद्धेचा प्रश्न आपल्यापुढे उभा आहे. "हे अल्ला! आम्ही बरोबर असू तर आम्हांस मदत कर" अशा प्रार्थना मशिदीमध्ये म्हटल्या जात आहेत. कायदा की श्रद्धा?– यांपैकी एकाची निवड करण्याचे कार्य आता लोकांपुढे आहे. याच सुरात एक आवेशपूर्ण भाषण गेल्या रविवारी मौलवीसाहेब अहमद मुख्तियार यांनी केले. कुराणातील वचने उद्धृत करून त्यांनी असे सिद्ध केले की, "मुसलमानांचे एकच कर्तव्य आहे—आणि ते म्हणजे फक्त खुदाकडे आता आपला अर्ज पाठविणे. खरे शिष्टमंडळ त्याच्याच भेटीला जाईल. त्या महान न्यायी प्रभूवर कोणाचेही दडपण पडणार नाही–कोणाच्याही दडपणाला तो वश होणार नाही. त्वचेचा वर्ण तो विचारात घेत नाही. फक्त आपल्या अंतःकरणाचा वर्ण तो पाहतो. आपल्या पाठीशी तो असला म्हणजे आपला पराभव होणे अशक्य." मौलवीसाहेबांचे हे शब्द माझ्या सर्व हिंदी बांधवांनी आपल्या चित्तावर कोरून ठेवावेत, असे मी सुचवितो.

जर्मिस्टन येथील सभा

भगवान श्रीकृष्णाच्या जन्मोत्सवानिमित्त एक सभा सनातन वेदधर्म सभेने भरविली होती. तेथेही असाच सूर ऐकू आला. सभेस पुष्कळ हिंदू जमले होते. श्री. गांधी, श्री. पोलक व श्री. मॅकिंटायर हेही उपस्थित होते. ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्या हिंदु माणसाने आशियावासी कायद्याला केव्हाही मान्यता देऊ नये, असे महाराज रामसुंदर पंडित यांनी सांगितले. खत्री, बाबू तालेवंतसिंह व श्री. खंडेरिया यांच्याकडून सभेत देणग्या मिळाल्या.

काही भित्रे हिंदी

काही भित्र्या हिंदी लोकांनी प्रिटोरियातील एका वकिलामार्फत जनरल स्मट्स यांना एक पत्र पाठविले आहे.[१] त्यात असे लिहिले आहे की, सरकारने थोडीशी सवलत दिली तरी आम्ही शरण येण्यास तयार आहो. अशा पत्रामुळे आपला लढा कमजोर होतो, हे मी सांगितले पाहिजे. पण एकंदरीत त्याने काही हानी होईल असे नाही. कारण बहुसंख्य हिंदी लोकांनी आपल्या प्रतिज्ञेचे पालन केले तर आपल्याला अखेरीस यश मिळेल हे नक्की. पण अशा भित्र्या पत्रांमुळे आपल्याला अधिक हाल भोगावे लागतील, हे मी सांगू इच्छितो. शिवाय अशा बारीकसारीक मागण्या केल्याने असे स्पष्ट होते की, आपल्याला आपल्या लढ्याचे खरे स्वरूप कळलेले नाही. हा लढा हिंदी समाजाची प्रतिष्ठा टिकविण्यासाठी–आपला मान कायम राखण्यासाठी–चाललेला आहे. ती आपली भाकरी आहे. पण तिच्याऐवजी माती खाऊन आपले पोट भरेल असा अर्थ वर लिहिलेल्या भित्र्या पत्राचा होतो. पोलिसांनी आपले परवाने जाहीरपणे तपासले नाहीत, किंवा त्यांनी दहा बोटांच्या ठशाऐवजी आपली सही मागितली, तर त्यामुळे आपल्याला मान मिळाला किंवा आपल्या मानाचे रक्षण झाले असे होत नाही. कारण तशा परिस्थितीतही हा अपमानास्पद कायदा शिल्लक राहणारच. त्याचा अर्थ इतकाच होईल की, लोखंडी बेड्याऐवजी हलक्या धातूंच्या बेड्या ते आपल्याला घालतील. पण त्या बेड्या मोडून त्यांचे तुकडे तुकडे करण्यासाठी आपला लढा चालू आहे,

माझी विनंती

प्रस्तुत पत्र आधीच पाठविले गेले आहे. ते ज्यांनी पाठविले त्या सज्जनांना— आणि इतर हिंदी लोकांनाही– माझी विनंती आहे की, त्यांना जर धीर धरवत नसेल आणि द्रव्याची तृष्णा आवरता येत नसेल, तर त्यांनी कृपा करून काही अर्ज न करता कायद्याचा स्वीकार करावा. तसे त्यांनी केले तर समाजाची हानी कमी होईल आणि त्यांना कमी भित्रे मानले जाईल. दैवयोगाने साऱ्याच हिंदी लोकांनी सुविचार सोडला आणि भित्रेपणा स्वीकारला तरी त्यांना माझा हाच सल्ला राहील.

पत्राचा परिणाम कमी कसा करता येईल ?

या पत्राने जी हानी झाली आहे, ती कमी कशी करता येईल किंवा तिला तोंड कसे देता येईल याचा आपण विचार करू. ब्रिटिश इंडियन असोसिएशनने चालविलेल्या लढ्यामध्ये सारे हिंदी लोक नाहीत, असे त्या पत्राने सूचित होते. वस्तुस्थितीही तशीच आहे. म्हणून आपल्या मताचे हिंदी लोक किती आहेत, हे प्रगट करणे हे असो-

१. श्री. स्टेगमन्, इसेलेन व रूस यांना पाठविलेले पत्र पाहा : "राक्षसी अर्ज" लेख १८९.

सिएशनचे कर्तव्य आहे. अर्थात् योग्य वेळ आली म्हणजे मातीचे भांडे व धातूचे भांडे यातील फरक स्पष्ट होईल. पण सच्च्या माणसाने आपला सच्चेपणा कधीच झाकून ठेवू नये. अशा प्रकारे विचार करून श्री. गांधींनी हमिदिया इस्लामिया अंजुमान या संस्थेला असे सुचविले की, या कायद्याला जोराचा विरोध करणारे व तो कायदा न स्वीकारणारे—अशा हिंदी लोकांच्या सह्यांनी एक छोटासा अर्ज निरनिराळ्या भाषेत तयार करावा आणि त्यावर साऱ्या हिंदी लोकांच्या सह्या घ्याव्यात. त्यामुळे आपल्या लढ्याला मोठी बळकटी येईल यांत शंका नाही. ही सूचना मौलवीसाहेब, श्री. उमरजी साले इत्यादी सज्जनांनी मान्य केली. पण श्री. एम. एस्. कुवाडिया यांनी तिच्याविरुद्ध आपले मत प्रगट केल्याने, त्या सूचनेचा विचार पुढील रविवारपर्यंत लांबणीवर टाकण्यात आला. त्यावेळी ती सूचना एकमताने मंजूर होईल, अशी माझी अपेक्षा आहे. त्या आधारावर मी पुढील सूचना सर्वांना करतो, ती सूचना मान्य झाली तर——

(१) अर्जाच्या प्रती प्रत्येक शहराला पाठविल्या जातील.

(२) सह्या दोन प्रतींवर घ्याव्यात आणि त्याबरोबर सही करणाऱ्याचे नाव, धंदा व पत्ता लिहावा.

(३) सह्या गोळा करणाऱ्या माणसाने आपले नाव अर्जाच्या कोपऱ्यात ठराविक ठिकाणी लिहावे, म्हणजे तो साक्षीदार ठरेल.

(४) अर्ज नीट वाचण्यापूर्वी कोणाही माणसाची सही घेऊ नये.

(५) अर्जाच्या प्रती स्वच्छ ठेवाव्या. दोन प्रतींवर सह्या घेतल्या असल्यामुळे अर्जाच्या प्रती असोसिएशनकडे पाठवाव्या.

(६) दहा दिवसांच्या आत अर्जावर सह्या घ्याव्यात.

(७) सह्या घेण्यासाठी स्वयंसेवक नेमणे अवश्य आहे, म्हणजे वेळ वाया जाणार नाही.

(८) जो माणूस खंबीर असेल व अखेरपर्यंत लढ्यास तयार असेल, त्यानेच सही करावी.

(९) सह्या जर फारच थोड्या मिळाल्या, तर अर्ज सरकारकडे खासच पाठविला जाणार नाही.

(१०) हे वाचल्यानंतर प्रत्येक शहरातील हिंदी लोकांनी असोसिएशनला तार करून किंवा पत्र पाठवून आपल्या गावची हिंदी लोकांची संख्या कळविली तर चांगले होईल. त्यामुळे वेळ वाचेल.

असा अर्ज सरकारकडे पाठविला गेला नाही, तरी मिळालेल्या सह्यांवरून, जनतेमध्ये सत्य व धैर्य किती प्रमाणात आहे, हे आपल्याला कळून येईल. आपल्या-

पैकी बहुतेक सर्व लोक सच्चे व सचोटीचे नसतील तर आपल्याला जय खचित मिळणार नाही. पण याच वेळी मला हे कबूल केले पाहिजे की, अशा अर्जाची कल्पना एकदा मान्य केल्यावर तो जर आपण पाठवू शकलो नाही, तर आपला तितका कमीपणा उघडकीस येईल. पण कमीपणा उघडकीस आला तर ईश्वरनिष्ठ लोक भयभीत होत नाहीत–आनंदित होतात. खऱ्या-खोट्या नाण्यांच्या राशीतून खोटी नाणी निवडून काढणे हे शहाणपणाचे असते. म्हणजे आपल्या डोक्यावरील भार तितका कमी झाला. हे सारे विचार सहज समजण्याइतके साधे आहेत.

आपल्यातील दोष

हमिदिया अंजुमनच्या गेल्या बैठकीत मला जे दिसले त्यावरून मला असे वाटते की, आपल्यामध्ये जे काही दोष असतील ते सर्व मित्रेपणाबरोबर वाहून जातील. नव्या कायद्याच्या बाबत आपण ईश्वरावर श्रद्धा ठेवल्यानंतर आपण लबाड व कपटी राहू हे शक्य नाही. आपला चालू लढा तितका पवित्रच आहे! असे म्हणतात की, प्रिटोरियातील एका हिंदूने दारूच्या कैफात दुसऱ्या हिंदी माणसाला क्रूरपणे बडविले. हिंदी माणूस बेशुद्ध पडला. त्याच्या मारेकऱ्यावर अद्याप खटला भरलेला नाही. शेवट काय होईल हे मला माहीत नाही. पण त्याने हल्ला केला हे पुष्कळांना माहीत आहे. जोहान्सबर्गमधील काही हिंदी लोकांवर एका गरीब हिंदी माणसाची चोरी केल्याचा आरोप आहे. त्या हिंदी माणसाची चोरी झाली यात शंका नाही. आरोपी निर्दोष आहेत असे ठामपणे सांगितले जाते. आणखी एका हिंदी माणसावर खोटी नाणी पाडल्याचा आरोप आहे आणि त्यासाठी त्याला पकडण्यात आले आहे. या सर्व प्रकरणांवरून असे दिसते की, आपल्यापैकी काही लोकांमध्ये दोष आहेत. अंजुमनच्या बैठकीत बोलताना श्री. इमाप मियाँ म्हणाले की, अशा गोष्टी मुळीच घडता कामा नयेत. आणि जर असे दिवाणी तंटे किंवा खटले उद्भवले तर वकिलांच्या व सरकारच्या तिजोऱ्या न भरता ते खाजगी रीतीने मिटविले पाहिजेत. या सूचनेचा आस्थेने विचार व्हावा व आचारही व्हावा असे मला वाटते. आपल्या सध्याच्या लढ्याचा परिणाम म्हणून जर आपण हिंदु-मुसलमानांतील भेदभाव विसरलो आणि अंतर्गत भांडणे सोडून दिली—ती झालीच तर खाजगी रीतीने मिटविली—व आपल्या इतर दोषांचाही त्याग केला, तर तेरा हजार हिंदी लोकांना अखिल जगताची प्रशंसा प्राप्त होईल आणि ईश्वराच्या पुस्तकात त्यांची नावे चिरंतन लिहिली जातील. एका हिंदी माणसाने द्वेषामुळे दुसऱ्यावर खोटेनाटे आरोप करावे किंवा त्याला धाकदपटशा दाखवावा, हे कृत्य काही कमी नीचपणाचे नाही. एकाने दुसऱ्यावर हल्ला करणे ही काही केवळ मामुली क्रूरपणाची गोष्ट नव्हे. थोड्याशा प्रयत्नाने या दुष्ट सवयी नाहीशा करता येतील. नव्या कायद्याचा विध्वंस करण्यासाठी हे दोष उखडून टाकणे अवश्य आहे असे मला वाटते.

पहिल्या वर्गाच्या बग्या

पहिल्या वर्गाच्या बग्या वापरण्यास हिंदी लोकांना मनाई करणारा निर्बंध जारी करण्याचा विचार जोहान्सबर्गच्या नगरपालिकेच्या मनात आहे. त्याचा तीव्र निषेध करणारे एक पत्र मि. ईसाप मियाँ यांनी पाठविले आहे.[1] आता अशा बगीचा वापर करण्यास हिंदी वकील किंवा डॉक्टर यांना मुभा देणारी दुरुस्ती त्या निर्बंधात करण्याची योजना पुढे आलेली आहे. अशा बगीतून जाण्याची इच्छा करणारा हिंदी वकील किंवा डॉक्टर याने आपल्या शरीरावर खुणेचा फलक लावावा अशी इच्छा आहे काय! नाही तर बगीवाल्याला डॉक्टर किंवा वकील ओळखता कसा येईल? फाटके कपडे घातलेला वकील पहिल्या वर्गाची बगी भाड्याने घेऊ शकेल, पण वकील किंवा डॉक्टर नसलेला हिंदी माणूस चांगला पोषाख केलेला असला तरी त्याला तसे करता येणार नाही! या मूर्खपणाच्या दुरुस्तीचा निषेध करणारे दुसरे पत्र[2] श्री. इसाप मियाँ यांनी पाठविले आहे. त्यात असे म्हटले आहे की, या दुरुस्तीने जखमेवर मीठ चोळल्यासारखे होईल, म्हणून हिंदी समाजाला ही दुरुस्ती नको. नगरपालिकेच्या या योजनेमुळे नवी नोंदणीपत्रे घेणाऱ्या लोकांना धक्का बसेल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ७–९–१९०७

१७९. आशियावासीयांच्या नोंदणी–अधिकाऱ्याला पत्र[3]

[जोहान्सबर्ग,
ता. ११ सप्टेंबर, १९०७]

आशियावासीयांचे नोंदणी-अधिकारी
प्रिटोरिया

महाशय,

श्री. महंमद इब्राहीम, बूसा–कारा, करावली व ईसा इस्माईल यांपैकी प्रत्येकाला, शांतता संरक्षक वटहुकमाखाली ही वसाहत सोडून जाण्याची १४ दिवसांची नोटीस,

१. पाहा : “जोहान्सबर्ग नगरपालिकेला पत्र,” लेख १५३.

२. पाहा : “जोहान्सबर्ग नगरपालिकेला पत्र,” लेख १६४.

३. हे पत्र ता. १४–९–१९०७ च्या “इंडियन ओपिनियन” मध्ये प्रसिद्ध झाले होते. या पत्राची एक प्रत ता. ७ ऑक्टोबर रोजी एल. डब्ल्यू. रिच् यांना उपभारतमंत्र्याला पाठविली होती.

गेल्या महिन्याच्या २७ तारखेला मिळाली. त्याप्रमाणे माझ्या अशिलांनी या महिन्याच्या २ तारखेस डेलागोआ-वेची तिसऱ्या वर्गाची तिकिटे काढली आणि नोटिशींच्या अटी मान्य करण्याची तयारी दाखविली. तथापि, कोमाटीपूर्ट येथे त्यांना अडविण्यात आले व पोर्तुगीजांच्या प्रदेशात शिरण्यास मनाई करण्यात आली. ट्रान्सवॉलच्या सार्जंटने त्यांना डेलागोआ-वे मध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी खटपट केली, पण व्यर्थ. त्यानंतर माझ्या अशिलांना कोमाटीपूर्ट येथील तुरुंगात त्यांच्या म्हणण्याप्रमाणे पाच दिवस डांबून ठेवण्यात आले. नंतर त्या सार्जंटने त्यांच्यासाठी दर्बानची तिकिटे खरेदी केली. दर्बानमधून जाण्यासाठी लागणाऱ्या पासाकरता त्यांनी अर्ज केले असता, त्यांना ११ पौंड डिपाझिट ठेवावे लागतात आणि जोहान्सबर्गहूनही बाहेर जाण्यासाठी हा पैसा खर्चावा लागणार होता. तसे करण्याला माझे अशील गरीब असल्यामुळे असमर्थ आहेत असे त्यांनी मला कळविले आहे. त्यांची रेल्वे-तिकिटे माझ्या ताब्यात आहेत. आता माझ्या अशिलांनी काय करावे, हे आपण कृपया कळविल्यास मी आपला आभारी होईन. त्यांची सोय केल्यास ते हा देश सोडण्यास अगदी तयार आहेत. कोमाटीपूर्ट येथील तुरुंगात माझ्या अशिलांना का डांबण्यात आले हेही मी आदरपूर्वक विचारीत आहे[1].

आपला,
मो. क. गांधी

कलोनियल ऑफिस रेकॉर्ड्स,
सी. ओ. २९१।१२१

१८०. 'गडसास्वडयोः'

आशियावासियांच्या नोंदणी-अधिकाऱ्याला पाठविलेले एक पत्र[2] आम्ही दुसऱ्या स्तंभात प्रसिद्ध करीत आहो. काही हिंदी लोकांना ट्रान्सवॉल सोडण्याची नोटीस

१. याला नोंदणी-अधिकाऱ्याने असे उत्तर दिले की, "कोठे राहावे याची कल्पना त्या माणसांना नसल्यामुळे पोलिस कोठडीत राहण्यास त्यांना परवानगी दिली होती, आणि केवळ हिंदी लोकांच्या हितासाठीच पोलिस तसे वागले. जरूर ती राहण्याची सोय झाल्यानंतर, लोक पुढे दर्बानकडे निघाले. पाहा : "जोहान्सबर्गचे बातमीपत्र" लेख २१९.

२. मागील लेख पाहा.

मिळाल्याने त्यांनी डेलागोआ-बेला जाण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना परतविण्यात आले, त्यासंबंधीचे हे पत्र होते. हे लोक ट्रान्सवॉलमध्ये राहात असल्याने निदान एक महिना तुरुंगात जाण्याचे भय त्यांना आहे. नाताळला जाण्यासाठी लागणाऱ्या परवान्याकरिता जरूर तो पैसा अनामत ठेवण्याइतकी त्यांची सांपत्तिक स्थिती नाही. मग त्यांनी काय करावे ? या वस्तुस्थितीवर टीका करण्यापूर्वी आम्ही सरकारच्या उत्तराची वाट पाहात आहो. तोपर्यंत आशियावासी नोंदणी-कायद्याचा अर्थ हिंदी लोकांच्या बाबतीत काय आहे, हे अशा घटनांवरून स्पष्ट होते.

इंडियन ओपिनियन, १४-९-१९०७,

१८१. किती दारुण क्लेश !

या आठवड्यात श्री. रिच यांच्याकडून जो पत्रव्यवहार आलेला आहे त्यावरून प्रत्येकाला हे दिसून येईल की, हिंदी लोकांच्या कर्णधारांनी, निकराचा लढा दिल्यानंतर खवळलेल्या लाटा पाहून, तुरुंगात जाण्याच्या या लढ्याचे जहाज सोडून दिले तर किती दारुण क्लेश भोगावे लागतील. ते काहीही असले तरी, तसे का होईल, याचा आपण विचार करू.

'दक्षिण आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमिटी' आपल्यावर आता विश्वास ठेवीत आहे, म्हणून ती उघडपणे सहानुभूती प्रकट करीत आहे. कमिटीच्या वतीने श्री. रिच यांनी वसाहतमंत्र्यांना एक पत्र[1] लिहिले आहे. त्या पत्रात त्यांनी आपल्याला काय पाहिजे याचा अचूक अंदाज दिलेला आहे. थातुरमातुर सवलती मिळविण्यासाठी हा लढा नाही, आपल्या लोखंडी बेड्यांना सोन्याचा मुलामा चढावा, यासाठी काही आपण आपली शक्ती अशी अमाप खर्च करीत नाही. कायदाच रद्द झाला पाहिजे, अशी मूलभूत मागणी श्री. रिच यांनी केली आहे. त्याशिवाय आणखी कोणत्या मागण्या केल्या आहेत, हे पाहण्यासाठी वाचकांनी सर्व पत्र काळजीपूर्वक वाचावे. किनाऱ्याला लागत असलेले जहाज हिंदी कर्णधार आता सोडून देतील, तर त्यांच्या माथ्यावर किती खापर फुटेल ? भारताच्या लौकिकाचे-- हिंदी लोकांच्या प्रतिष्ठेचे-- रखवालदार

१. पाहा परिशिष्ट ५.

ते आता आहेत. ते आगीशी झुंज घेत आहेत. त्यांना काही चटके बसले, तर भिण्याचे काहीच कारण नाही. जो भय मानील, तो नाश पावेल.

"सॅटर्डे रिव्ह्यू" चा संपादक काय म्हणतो याचा विचार करा. ते एक प्रतिष्ठित व बरेच वजनदार पत्र आहे. ते हुजूरपक्षाचे असले तरी ते निक्षून सांगते की, 'कायद्याला शरण न जाता तुरुंगात जाण्याचा जो निर्धार हिंदी समाजाने केला आहे, तो रास्त आहे. ब्रिटिश सरकारने हिंदी लोकांना मध्येच सोडले तर लांच्छनास्पद होईल.' इतके यश संपादन केल्यानंतर हिंदी पुढारी, आपला लढा पोकळ होता, असे आता दाखवून देणार काय? आपल्या द्रव्यलोभामुळे आंधळे बनून ते सहस्रावधी बांधवांच्या काळजात भाले भोसकणार काय? आपले सर्व राष्ट्र भेकड व हलकट आहे, असे ते सिद्ध करणार काय?

"नेशन" हे पत्र अत्यंत स्वतंत्र वृत्तीचे आहे असे म्हणतात. त्याचे उदार मतवादी पक्षावर मोठे वजन आहे. त्या पक्षात सुप्रसिद्ध आद्याक्षरांच्या नावाने एका इंग्रजाने असे लिहिले आहे की, 'ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांवर सध्या जो जुलूम होत आहे, त्यामुळे हिंदुस्थानात इतकी खळबळ व असंतोष माजला आहे की, दुसऱ्या कोणत्याही घटनेने तसे घडले नाही.' यावरून हे स्पष्ट होते की, प्रस्तुत लढ्यात जर हिंदी लोक हातपाय गाळतील, तर त्यामुळे हिंदुस्थानची मोठी हानी होईल. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनी जो निर्धार केला आणि जो इतका प्रसिद्धी पावला, त्याला हिंदुस्थानातही तोड नाही. म्हणून हिंदी पुढाऱ्यांनी आपली जबाबदारी ओळखणे अगत्याचे आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १४-९-१९०७

१८२. "कायद्याच्या हातातील मेणाची बाहुली"

प्रिटोरियासारख्या शहरातून "प्रमुख हिंदी लोकांनी" जो अर्ज[१] केला आहे, तो या अंकात आम्ही अत्यंत शरमेने व दुःखाने प्रसिद्ध करीत आहोत. ही नीचपणाची कृती आहे, असे आम्ही मानतो, आणि तिचा दोष मुख्यतः श्री. हाजी कासीम यांना देतो. त्यांचे नाव हिंदी लोकांच्या प्रत्येक सभेत उच्चारले जाते, आणि म्हणून ते प्रसिद्ध

१. तो येथे दिलेला नाही.

करण्यात आम्हांला संकोच वाटत नाही. तसे करणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. श्री. हाजी कासीम यांना आम्ही दोष देत असलो तरी, त्यांच्या जागी असणाऱ्या दुसऱ्या हिंदी लोकांनी त्यांच्यासारखी कृती केली नसती असे आम्ही म्हणू शकत नाही, याची जाणीव आम्हांस आहे. म्हणून त्यांचा कमीपणा हा आम्हा सर्वांचा कमीपणा आहे, असे आम्ही मानतो.

अर्जाची भाषा हीन स्वरूपाची आहे-- एखाद्या गुलामाला शोभण्यासारखी आहे. "कायद्याच्या हातात आम्ही मेणाची बाहुली आहो" असे शब्द वापरून त्यांनी ईश्वराशी द्रोह केला आहे. आमच्यावर सत्ता केवळ ईश्वराचीच आहे. त्याच्याच बाबतीत योग्य ठरणारी भाषा आम्ही जुलमी राज्यकर्त्यांच्या बाबतीत का वापरावी?

पत्रातील मागण्या निरर्थक आहेत. लढ्याचे खरे महत्त्व त्यांना मुळीच कळले नाही असे त्यावरून दिसते, हे आम्ही पूर्वीही सांगितले आहे.[1]

आता आम्ही श्री. हाजी कासीम व त्यांचे पाठीराखे यांना एकच प्रश्न विचारतो-आपल्या अपमानास्पद अर्जाने हिंदी लोकांची इभ्रत कमी झाली आहे आणि आपल्या अंगीकृत कार्याची हानी झाली आहे, याची जाणीव तुम्हांला नाही काय? ती नसेल, तर, अशा मार्गांनी मिळविलेल्या संपत्तीचा काय उपयोग? म्हणून, अजून वेळ गेलेली नसेल तर, त्यांनी समाजाच्या कल्याणार्थ स्वार्थत्याग करावा, अशी आम्ही त्यांना विनंती करतो. हिंदी लोकांच्या अर्जाकडे सरकार जसे काडीमात्र लक्ष देत नाही, तसेच श्री. हाजी कासीमचे "सरकार" वागणार काय?

तसे झाले तर, आम्ही श्री. हाजी कासीमच्या "प्रजाजनांना"--यांच्या शब्दावर विसंबून असणाऱ्या हिंदी लोकांना--असे सांगतो की, दुसऱ्या कोणावर विसंबून राहण्याऐवजी तुम्ही केवळ स्वतःच्या हिंमतीवर व ईश्वरावर यावेळी अवलंबून राहा. आपणा सर्वांनी ईश्वराच्या बाजूने असले पाहिजे-कोणाही हिंदी माणसाच्या बाजूने नव्हे. आपला लौकिक ईश्वराच्या चरणी वाहून त्यांनी या लढ्यात उडी घ्यावी. प्रत्येक हिंदी माणूस स्वतंत्रपणे विचार करील, अशी आम्हांस आशा आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १४-९-१९०७

१. पाहा : "जोहान्सबर्गचे बातमीपत्र" लेख १७८.

१८३. रिच् यांचे श्रम

श्री. रिच् यांनी अपेक्षेपलीकडे काम केले आहे. त्यांचा उत्साह अदम्य आहे. त्यांनी लंडनच्या 'टाइम्स'ला जे पत्र पाठविले, त्याचा तारेने सारांश आला आहे. त्याचे भाषांतर[1] आम्ही अन्यत्र प्रसिद्ध करीत आहो. त्याचे वाचन काळजीने करणे अवश्य आहे.

एका बाजूला, काही हिंदी लोक लढा सोडून देत आहेत आणि दौर्बल्याची लक्षणे दाखवीत आहेत. दुसऱ्या बाजूला, श्री. रिच् व कमिटी आमच्यासाठी फार परिश्रम करीत आहे. श्री. रिच् यांच्या पत्रावर टीका करताना 'लंडन टाइम्सने' ट्रान्सवॉल सरकारवर कोरडे ओढले आहेत. त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. इंग्लंडमध्ये असा सुरेख लढा चालू असताना हिंदी लोकांनी ऐक्य राखले पाहिजे आणि ईश्वरावर विश्वास ठेवून आपल्या निर्धाराप्रमाणे धैर्याने वागले पाहिजे, हे धोरण बुद्धीला पटणारे आहे. त्याची उपेक्षा कोणाही हिंदी माणसाने करू नये, असे आम्हांस वाटते.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १४-९-१९०७

१८४. हिंदी लोकांचा छळ

चार हिंदी लोकांना ट्रान्सवॉल सोडून जाण्याचा हुकम मिळाला. डेलागोआ-बेला ते जात असताना, ट्रान्सवॉलच्या सीमेवर त्यांना अडविण्यात आले. कोठडीत डांबण्यात आले आणि खूप छळण्यात आले. या बाबतीत श्री. गांधींनी नोंदणी-अधिकाऱ्याला एक पत्र[2] लिहिले आहे, ते आम्ही अन्यत्र प्रसिद्ध करीत आहो. हे लोक ट्रान्सवॉल

१. हे येथे घेतलेले नाही.

२. पाहा : "आशियावासीयांच्या नोंदणी-अधिकाऱ्याला पत्र" लेख १७९.

सोडण्याला राजी असले, तरी ते तसे करू शकत नाहीत. ते ट्रान्सवॉलमध्ये राहिले तर एक महिन्याच्या कैदेस ते पात्र होतील. मग त्यांनी काय करावे? हिंदी लोक निरुपद्रवी आहेत तेव्हा त्यांना खुशाल छळावे असे सरकारला वाटते, याहून याचा दुसरा काय अर्थ आहे? या प्रकरणावरून आशियावासी नोंदणी कायदा जारी करण्यात सरकारचे हेतु काय आहेत, हे अगदी स्पष्ट होते. या सर्वाला हिंदी लोक निमूटपणे मान वाकविणार काय?

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १४-९-१९०७

१८५. कायदेभंगाचे कर्तव्य [२]

या विषयावरील थोरोच्या निबंधातील काही भाग आम्ही पूर्वीच दिला आहे.[१] बाकीचा भाग पुढे देत आहो.[२]

शहाणा माणूस, माणूस म्हणूनच उपयुक्त ठरेल आणि माती म्हणून आपला उपयोग तो होऊ देणार नाही. आजच्या अमेरिकेशी जो सहकार्य करील तो मित्र मानावा लागेल. जे सरकार गुलामांचेही आहे, ते माझे सरकार आहे, असे मी मानणार नाही. जेव्हा सरकारचा जुलूम असह्य होतो तेव्हा त्या सरकारशी निष्ठा ठेवण्याचे नाकारण्याचा व त्याला विरोध करण्याचा हक्क मानव-जातीला आहे. तशी स्थिती आता नाही, असे काही लोक म्हणतात. याचा अर्थ, दुसऱ्यावर आघात झाला तर तो आपल्यावर झाला असे त्यांना वाटत नाही. म्हणून त्यांना त्याची क्षिती वाटत नाही.

सर्व यंत्रांमध्ये घर्षण असते. प्रत्येक शासन-संस्थेबाबतही हे खरे आहे. त्या यंत्राला अशा घर्षणापासून मुक्त करण्यासाठी त्याला विरोध करण्याची गरज कदाचित नसेल; पण जेव्हा घर्षणाला यंत्राचे साहाय्य मिळते-जुलुमालाच कायद्याचे रूप देण्यात येते, तेव्हा तसे सरकार सच्ची माणसे सहन करू शकत नाहीत.

१. पाहा : "कायदेभंगाचे कर्तव्य [१]" लेख १७६.
२. येथील भाषान्तर मूळ इंग्रजीशी ताडून पाहिलेले आहे.

प्रत्येकाने न्यायाने वागले पाहिजे आणि सत्य टिकविले पाहिजे–मग त्यासाठी कितीही किंमत द्यावी लागो. एखाद्या बुडत्या माणसाची लाकडी फळी मी जर अन्यायाने हिसकून घेतली तर मी ती त्याला परत केली पाहिजे–मग त्यामुळे मी बुडालो तरी चालेल. त्याचप्रमाणे आपण गुलाम बाळगणे बंद केले पाहिजे–त्यामुळे अमेरिकन सरकारचे अस्तित्व संपुष्टात आले तरी चालेल.

जनता इतक्या उंच दृष्टीने वागण्याइतकी अद्याप तयार नाही, असे म्हणण्याची सवय आपल्याला लागली आहे. पण सुधारणा ही हळूहळूच होत असते. कारण ती व्हावी असे ज्यांना वाटते, त्यांच्या अंगीं पुरेसे धैर्य नसते. तुमच्याइतके चांगले लोक पुष्कळ असणे हे महत्त्वाचे नाही, तर निर्भेळ चांगुलपणा कोठेतरी थोडा फार असावयास हवा. त्यामुळे सर्वच जड जनतेत नवचैतन्य निर्माण होईल. मताच्या दृष्टीने गुलामगिरीला विरोध करणारे हजारो लोक आहेत. पण त्यांचे वर्तन त्या मताच्या विरुद्ध होत असते. आपण वॉशिंग्टनचे वंशज आहोत असे मानून ते आपल्या खिशात हात घालून स्वस्थ बसतात आणि म्हणतात, " काय करावे हे आम्हांला कळत नाही. " आणि ते काहीच करीत नाहीत. फार झाले तर, ते व्याख्याने देतात व अर्ज पाठवितात

एक सद्‌गुणी माणूस असेल तर, ९९९ माणसे सद्‌गुणांची जाहिरात करणारी असतात. तो एकटा सद्‌गुणांचे आचरण करीत असतो आणि त्याचे मोल त्या जाहिरात करणाऱ्यांपेक्षा अधिक असते. खजिन्याचे रखवालदार कैक असतात, पण त्यातून एक पै देण्याची सत्ता त्यांना नसते. त्या खजिन्याचा मालक एकच असेल; पण तो त्यातील सर्व पैसा देऊ शकेल.

न्यायासाठी मत देणे म्हणजे न्याय्य वर्तन करणे नव्हे. जेव्हा गुलामगिरीचा अल्पांश नष्ट करण्याचा शिल्लक राहील तेव्हाच बहुसंख्य समाज गुलामगिरी बंद करण्याला मत देईल. याचाच अर्थ असा की, ज्यांनी गुलामगिरी आपल्या आचरणातून काढून टाकली, त्यांनीच कायद्याने गुलामगिरी बंद करण्याच्या तत्त्वाचा पाया घातला.

माझे म्हणणे असे नाही की, जेथे जेथे अन्याय दिसेल तेथे तो खणून काढणे, हे प्रत्येक माणसाचे स्वाभाविक कर्तव्य आहे, पण त्याला सक्रिय पाठिंबा न देणे, हे तरी त्याचे किमान कर्तव्य खास आहे. केवळ मत धारण करून कोणा माणसाचे समाधान कसे होईल? आणि त्यात त्याला आनंद कसा वाटेल?

एखाद्याने माझा माल चोरला तर " माझी चोरी झाली, ही चांगली गोष्ट झाली नाही, " असे म्हणून मी संतोष मानून स्वस्थ बसत नाही, तर चोरलेला माल परत मिळविण्यासाठी परिणामकारक उपाय मी योजतो, आणि पुन्हा माझी चोरी होणार नाही, अशी दक्षता घेतो. स्वतःच्याच तत्त्वाप्रमाणे वागणाऱ्या माणसाची

कोटीच निराळी असते. असा माणूस आपल्या देशाची किंवा आपल्या आप्तांची अथवा आपल्या मित्रांची पर्वा करीत नाही. पण सत्याची सेवा करून तो त्या सर्वांची सेवा करतो.

अन्याय्य कायदे अस्तित्वात आहेत हे आपण कबूल करतो, पण त्यांचे उल्लंघन आपण ताबडतोब करतो काय ! माणसे सामान्यतः असे म्हणतात, जेव्हा बहुसंख्य लोक असे कायदे नापसंत करतील तेव्हा ते रद्द होतील. त्यांना वाटते, आपण विरोध केला तर रोगापेक्षा तोडगा घातक ठरेल. तसे झाले तर तो दोष सरकारचा आहे. विरोधकांचा नव्हे.

मॅसाच्युसेट्स्‌मध्ये गुलामगिरीला विरोध करणारा एकच माणूस निघाला तरी त्याने, आपल्या बाजूस बहुसंख्य लोक येण्याची वाट न पाहता, सरकारला आपण देत असलेला पाठिंबा, व्यक्तीच्या व मालमत्तेच्या दृष्टीने, प्रभावीपणे काढून घेतला पाहिजे. कारण तो एकटा नसतो. ईश्वर त्याच्या बाजूस निरंतर असतो. आपल्या शेजाऱ्यापेक्षा जो माणूस अधिक न्यायी असेल तो एका माणसाचे बहुमत स्थापन करतो. वर्षातून एकदा अमेरिकन सरकारची व माझी भेट समोरासमोर होते—आणि ती म्हणजे कर वसूल करणाऱ्याच्या रूपाने. त्या वेळी मी कर देण्याचे निश्चयाने नाकारले पाहिजे.

मला हे पक्के माहीत आहे की, मॅसाच्युसेट्स् संस्थानातील एका प्रामाणिक माणसानेही गुलामगिरीला विरोध करण्यासाठी कर देण्याचे नाकारले, आणि त्यासाठी त्याला तुरुंगात डांबण्यात आले, तरी त्यामुळे अमेरिकेतील गुलामगिरीचा नायनाट होईल. एकदा जे सत्कृत्य केले जाते, ते कायमचे होते. पण त्यासंबंधी बोलण्याचीच आवड आपल्याला जास्त—ते आपले जीवित-कार्य आहे, असे आपण म्हणतो. गुलामगिरीच्या विनाशाच्या आंदोलनात भाग घेणारी पुष्कळ वर्तमानपत्रे आहेत, पण एकही माणूस नाही.

एकाही माणसाला जे सरकार अन्यायाने तुरुंगात टाकते, त्याच्या अमलाखाली न्यायी माणसाचे खरे निवासस्थान तुरुंग हेच असते. म्हणून मॅसाच्युसेटस्‌मधील सज्जनांचे आजचे योग्य स्थान तुरुंग हेच आहे. गुलाम बाळगणाऱ्या राज्यात, स्वतंत्र माणसाला सन्मानाने राहण्याचे ठिकाण म्हणजे तुरुंग. तसे झाले तर आपले वजन नाहीसे होईल व अन्यायाशी मुकाबला करण्यास कोणी शिल्लक राहणार नाही, असे जर त्यांना वाटत असेल, तर अन्यायाशी कसे लढावे, हे त्यांना माहीतच नाही. अन्यायापेक्षा सत्य किती पटींनी सामर्थ्यवान असते हे त्यांना माहीत नसते. अन्यायाचा जुलूम सोशीत जे लोक तुरुंगात पडलेले असतात, ते अन्यायाशी, बाहेर मोकळे राहण्यापेक्षा, तुरुंगातून अधिक परिणामकारक लढा देऊ शकतात. जोपर्यंत अल्पमत हे बहुमताशी जुळते घेते, तोपर्यंत ते अल्पमतही नसते. अल्पमतवाल्यांनी आपले सारे वजन विरुद्ध दिशेने टाकले पाहिजे.

मी जेव्हा माझ्या शेजाऱ्याशी बोलतो, तेव्हा मला असे आढळून येते की, सरकारची अवज्ञा केल्याने आपल्या मालमत्तेवर व कुटुंबावर जे परिणाम होतील, त्यांचे भय त्यांना वाटते. माझ्यापुरते म्हणाल तर, सरकारच्या संरक्षणावर मी कधी विसंबून राहिलो आहे, असे मानणे मला उद्वेगकारक वाटते.

जुलुमी सरकारला मान्यता देणे, हे मी अपमानाचे समजतो. त्याला विरोध करणे, हे सोपे व चांगले आहे. मी सहा वर्षे डोईपट्टी (पोल टॅक्स) दिलेली नाही. त्यासाठी मला एक रात्र तुरुंगात ठेवण्यात आले होते. तुरुंगाच्या भिंती आणि त्याचे लोखंडी दरवाजे यांचा विचार मी जेव्हा करू लागलो, तेव्हा मला सरकारच्या मूर्खपणाची जाणीव झाल्याशिवाय राहिली नाही, कारण ज्यांनी मला तुरुंगात टाकले, त्यांना वाटले असेल की, मी फक्त हाडामांसाचाच प्राणी आहे. त्या मूर्खांना हे कळले नाही की, त्या चार भिंतींच्या आत मला कोंडले असले तरी, मी इतरांपेक्षा अधिक स्वतंत्र होतो. मी तुरुंगात आहे, असे मला वाटले नाही. त्यापेक्षा, जे बाहेर होते तेच खरे कैदी आहेत, असे मला वाटले. ते माझ्यापर्यंत येऊ शकत नव्हते म्हणून त्यांनी माझ्या शरीराला शिक्षा केली, परिणामी मी अधिकच स्वतंत्र झालो आणि सरकारासंबंधीचे माझे विचार अधिक भयप्रद झाले. जेव्हा लहान मुले एखाद्या माणसाला काही करू शकत नाहीत, तेव्हा ती त्याच्या कुत्र्याला शिवीगाळ करतात, असे मी पाहिले आहे. त्याचप्रमाणे सरकार माझे काही करू शकत नाही, म्हणून माझ्या शरीराला अपाय करीत आहे.

माझ्या शरीराला अपाय करण्यासही सरकार भीत आहे, असे मला आढळून आले. म्हणून सरकारसंबंधी असलेला उरलासुरला माझा सारा आदरभाव नाहीसा झाला.[1]

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १४-९-१९०७

१. यावर संपादकीय टिपणी अशी दिलेली आहे की, "गेल्या व चालू अंकात प्रसिद्ध केलेला हा लेख पुढाल आठवड्यात एका पुस्तिकेच्या रूपाने प्रसिद्ध होईल. त्याची किंमत ६ पेन्स आणि टपालखर्च ७ पेन्स."

१८६. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

अभागी हिंदुस्थान

हिंदी माणूस सर्वत्र दुर्दशा भोगीत आहे. आता अमेरिकेहून अशी बातमी आली आहे की, वॉशिंग्टनमधील हिंदी मजुरांना भेकड गोऱ्यांनी मार दिला आणि त्यांच्यापैकी चौत्रेजण जखमी झाले. बाकीचे मजूर भयभीत होऊन पळू लागले. या गोऱ्या हल्लेखोरांना मी भेकड म्हणतो. कारण, निष्पाप मजुरावर हजारों लोकांनी हल्ला करणे, हे काही शौर्याचे लक्षण नव्हे. आपल्यापेक्षा दुर्बल असणाऱ्यावर जुलूम करणारे लोक भित्रे होत. गुजरातीमध्ये अशी म्हण आहे की, "रागावला कुंभार गाढवाचे कान धरी[1]" त्याचप्रमाणे हे गोरे भित्रे लोक मजुरांना मारतात. कारण हिंदी लोकांना नोकरीवर ठेवणाऱ्या गोऱ्यांना ते काही करू शकत नाहीत. आपल्यापेक्षा सबळ असणाऱ्या माणसावर जे आपल्या शक्तीचा प्रयोग करतात, ते खरे शूर.

वॉशिंग्टनच्या महापौराने हिंदी मजुरांना असे आश्वासन दिले आहे की, "मी तुमचे संरक्षण करीन, तेव्हा तुम्ही आपापल्या कामावर खुशाल जा." त्यांच्या रक्षणासाठी त्याने खास पोलिसदल ठेवले आहे, हे त्या महापौराला भूषणावह आहे. इंग्लंडमधील परराष्ट्रखातेही त्या मजुरांकडे लक्ष देत आहे, अशी बातमी वृत्तपत्रांत आली आहे.

या हल्ल्यावरून घ्यावयाचा धडा असा की, परदेशातील हिंदी लोक आपल्या अंगी धैर्य बाणवितील तरच त्यांचा इथे टिकाव लागेल. जर गोरे आपल्याला दररोज लाथा मारू लागले, तर साम्राज्य सरकार किंवा दुसरे कोणतेही सरकार आपले रक्षण करू शकणार नाही. जे भित्रेपणाने वागतात, त्यांच्या सहाय्यास देवही जात नाही. लांडग्या-वाघांच्या सहवासात आपण राहात असलो, तर आपल्याला दोनच गोष्टी करता येतील. वन्यपशूंचे भय न बाळगणे, हे खरे धैर्य. लांडगे-वाघसुद्धा ईश्वराने निर्मिलेले आहेत आणि म्हणून आपण त्यांच्याकडे वैरभावाने पाहू नये. ईश्वराची दीर्घकाळ उपासना ज्या खऱ्या भक्तांनी किंवा संतांनी केली असेल, त्यांनाच हे शक्य आहे. धैर्याचा दुसरा एक प्रकार आहे. तो म्हणजे वाघ-लांडग्यांना शस्त्रांनी तोंड देणे. यांतही स्वतःला धोका आहे. गोऱ्या लोकांमध्ये राहणाऱ्यांची गत अशी आहे.

१. मूळ म्हणीचा अर्थ असा आहे, "कुंभार आपल्या बायकोला शासन करू शकत नाही, म्हणून आपल्या गाढवाचे कान पिळतो."

संत हा काही पोट भरण्यासाठी दूर देशी जात नाही, म्हणून सर्वसामान्यपणे आपल्याला दुसऱ्या प्रकारचे धैर्य पाहिजे. ते धैर्य येण्यासाठी शारीरिक संकट सोसण्याची आणि शरीराला शिस्त लावण्याची गरज आहे. श्रीमती बेझंट[1] यांच्या मते, उच्च-नीच अशा सर्व हिंदी लोकांनी आपल्या शरीराच्या सर्व अवयवांना वळण लागावे, म्हणून कुस्ती शिकावी आणि इतर शारीरिक व्यायाम करावे. आपल्याला स्वाभिमानाची निकड भासली आणि आपण पुरुषार्थाची वृत्ती जागविली, तरच हे सारे शक्य आहे.

पोलक यांचे पत्र

"स्टार"मध्ये एका इंग्रजाने असे लिहिले आहे की, एकंदरीत पाहता आणि तुलनेने बोलावयाचे तर, हिंदी व्यापारी प्रामाणिक असतात, त्यामुळे गोरे व्यापारी त्यांना उधारीने माल देतात. तथापि तो लेखक पुढे लिहितो की, हिंदी व्यापाऱ्यांनी कमावलेला पैसा ट्रान्सवॉलमध्ये वापरला जात नाही, म्हणून त्यांना तेथून हाकून लावावे. याला उत्तर म्हणून श्री. पोलक यांनी एक लांबलचक पत्र लिहिले आहे आणि त्यात म्हटले आहे की, हिंदी लोकांचा पैसा ट्रान्सवॉलमध्ये फारसा वापरात नसतो, याचे कारण त्यांना जमिनी घेण्याचा किंवा दुसरा कसलाही हक्क नाही. पॉचेफ्स्ट्रूम येथील अग्निप्रलयाच्या वेळी मदतीदाखल वर्गण्या गोळा केल्या गेल्या, तेव्हा हिंदी लोकांनी मदत केली होती, हे उदाहरण पोलक यांनी दिले आहे आणि हिंदी लोकांचा साराच प्रश्न उत्तम रीतीने विवेचिला आहे.

परवाना-कचेरी

परवाना-कचेरीची यात्रा चालू आहे. उरलेल्या गावांचे अभिनंदन करण्याचे आता कारण नाही. प्रत्येक ठिकाणी एकच गोष्ट घडत आहे. सर्वजण परवानाकचेरीवर बहिष्कार घालीत आहेत. हा मार्ग सोपा आहे. त्याला मोठ्या हिंमतीची गरज नाही. योग्य वेळी जे लोक कसोटीस उतरतील, तेच धन्यवादास पात्र होत.

अफवा

दररोज विलक्षण अफवा पसरत आहेत. कोणी म्हणतात, मेमनांनी नोंदणी-पत्रे घेतली, तर कोणी म्हणतात, कोकणी लोक ढेपाळले, आणि दुसरे काही म्हणतात की, प्रिटोरियातील सुरती[2] व हिंदू यांच्यामध्ये या अपमानास्पद कायद्याला शरण जाण्याची

१. (१८४७–१९३३) थिऑसफिस्ट पुढारी, १९१७ च्या हिंदी राष्ट्रीय सभेच्या अध्यक्ष; "रिलिजस् प्रॉब्लेम इन् इंडिया" (१९०२) याच्या व इतर ग्रंथांच्या लेखिका.

२. गुजरातमधील सुरत शहराचे रहिवासी.

चळवळ सुरू आहे. जसजसा कसोटीचा क्षण जवळ येत आहे, तसतशा अशा अफवा पसरत जाणारच. भित्रे लोक आपल्या भित्रेपणाच्या संसर्गाने इतरांनाही दूषित करतात.

मूर्खपणाची धमकी

असे आढळले आहे की, आपल्या दोस्ताने एखादी गोष्ट केली नाही तर काही "शूर" हिंदी लोक त्याला बजावतात, "तू माझे ऐकले नाहीस तर मी माझे नाव नोंदवून घेईन." या धमकीची गंमत वाटते व दुःखही होते. "तू जर हे केले नाहीस तर मी खड्डयात उडी घेईन." यामुळे दुसऱ्या माणसाचे काय नुकसान होईल, हे कळत नाही. म्हणून ज्यांना अशा धमक्या मिळतील त्यांनी त्या शूरांना असे साफ उत्तर द्यावे की, "गुलामगिरीच्या कचेरीचे दरवाजे नेहमी उघडे आहेत. ज्यांनी आपला मर्दपणा सोडला असेल, त्यांनी आपले नाव नोंदवून घ्यावे, असे मला वाटते." यामुळे जे सच्चे आहेत त्यांचे मोल शेकडा १००% ठरेल. "ट्रान्सवॉलमधील विषारी कायदा शूर वीरांना तळहातावर शिर घेऊन पुढे यावयास लावील आणि भागूबाई मागे राहातील." असे ब्लूम फॉंटीनच्या "फ्रेंड" पत्राने जे म्हटले होते, ते चूक नव्हते. कारावासावरील बक्षीस मिळालेल्या कवितेत असे म्हटले आहे की, "चोर, ठग, बदमाश आणि चुगलखोर बनून आम्ही जिवंत राहावे काय?" तशी वेळ आता झपाट्याने येत आहे. कायद्याला शरण जाणारे लोक त्या दर्जालाच पोचतील, असे मला दुःखाने म्हणावे लागत आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १४–९–१९०७

१८७. डब्ल्यू. व्हा. हल्स्टेन यांना पत्र

[जोहान्सबर्ग]
ता. १७ सप्टेंबर, १९०७

सर विल्यम व्हॅन हल्स्टेन, विधिमंडळाचे सदस्य,
टपाल पेटी क्र. ४६
जोहान्सबर्ग, यांस—

महाशय,

ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या सन्मान्य सहाय्यक चिटणिसाने गेल्या १४ तारखेस आपल्याला जे पत्र पाठविले, त्यासंबंधी आपण गेल्या १६ तारखेस पाठविलेले पत्र पोचल्याचे मी कळवीत आहे.

या वसाहतीतील कायद्यांच्या अमलबजावणीत सहाय्य करण्याचा उपदेश असोसिएशनच्या समाजाला आपण कृपावन्त होऊन केला आहे. मी आपले लक्ष सत्यस्थितीकडे वेधू इच्छितो. ती स्थिती म्हणजे आतापर्यंत हा समाज तसेच वागत आला आहे. आणि जेव्हा असे कायदे या समाजाचा अकारण उपमर्द करणार नाहीत व यांच्या धार्मिक भावना दुखविणार नाहीत, तेव्हा तो समाज यापुढेही तसेच वागेल. माझ्या असोसिएशनने हिंदी लोकांना असा सल्ला निःसंशयपणे दिला आहे की, आशियावासी नोंदणी कायद्याला मान्यता देऊ नका. कारण माझे असे नम्र मत आहे की, मानव-जातीला स्वाभिमानाची जाणीव करून देणारा आणि गंभीरपणे व प्रामाणिकपणे केलेल्या घोषणांचा आदरभाव निर्माण करणारा जो उच्च कायदा आहे, त्याला मान्यता देणे हे तुमचे प्रथम कर्तव्य होय. नोंदणी-कायदा स्वीकारल्याने हिंदी लोकांच्या पौरुषाचे पूर्ण अपहरण होईल आणि ते नास्तिक बनतील. या मूळ प्रश्नाकडे आपले लक्ष वेधण्यासाठीच गेल्या चौदा तारखेचे पत्र आपल्याला पाठविले होते. केवळ बोटांचे ठसे टाळण्यासाठी जीवन-मरणाचा लढा सुरू करण्याचा आणि त्यासाठी सर्वस्वाचा होम करण्यास तयार राहण्याचा सल्ला कोणत्याही जबाबदार हिंदी माणसाने आपल्या समाजाला देणे बालिशपणाचे ठरेल.

आपण आपल्या भाषणामध्ये जी धमकी दिली आहे, तिची पुरी जाणीव माझ्या असोसिएशनला आहे. या पत्रव्यवहाराचा विषय तोच आहे. आणि आपल्या ताज्या पत्रातही आपण त्या धमकीचा पुनरुच्चार केला आहे. पण त्याचा आम्हांला काहीच

परिणाम होणार नाही, असे मी म्हटले तर मला क्षमा असावी. कोणताही कायदा अमलात आणण्यास एकटे सरकार समर्थ असत नाही. ते फक्त तसे करण्याचा आपला इरादा जाहीर करते, असे आम्ही मानतो. कायद्याची अमलबजावणी करणे हे त्यांना श्रेयस्कर होईल की माझे देशबांधव खंबीर राहिले तर अकारण कष्ट सहन केल्याबद्दल सारे श्रेय त्यांना मिळेल ? या प्रश्नाचे उत्तर देण्याचे काम भावी पिढ्यांवर सोपविणे चांगले.

आपला,
मो. क. गांधी
सन्मान्य चिटणीस,
ब्रिटिश इंडियन असोसिएशन

" इंडियन ओपिनियन ", २८–९–१९०७

१८८. ना. गो. कृ. गोखले यांना तार

[जोहान्सबर्ग
ता. २१ सप्टेंबर १९०७ पूर्वी]

गो. कृ. गोखले[1]
कलकत्ता

तारेसाठी[2] ब्रिटिश इंडियन असोसिएशनचे धन्यवाद. अत्यंत उत्साहित. प्रतिष्ठा, धर्म व पवित्र प्रतिज्ञा यासाठी अखेरपर्यंत लढू. आम्हांला मिळेल तितकी सर्व सहानुभूती हवी. सर्व पक्षांची एकमुखी संमती व पाठिंबा मागतो. अनियंत्रित प्रवेशासाठी लढा नाही, तर प्रवेश करण्याचा आणि वास्तव्य करण्याचा हक्क असणाऱ्यांच्या स्वाभिमानासाठी हा लढा आहे.

इंडियन ओपिनियन, २१–९–१९०७

१. (१८६६-१९१५). विख्यात हिंदी मुत्सद्दी. पाहा : मराठी खंड २, पृ. ३५९.
२. पाहा : " हिंदुस्थानहून मदत " लेख १९५.

१८९. विराट निवेदन[1] (अर्ज)

[जोहान्सबर्ग,
ता. २१ सप्टेंबर १९०७ पूर्वी]

ना. वासाहतिक सचिव,
प्रिटोरिया, यांस,

महाशय,

या वसाहतीत वास्तव्य करणारे व खाली सह्या करणारे आम्ही हिंदी लोक आपल्याकडे आलेल्या पत्राशी पूर्णपणे असहयोग प्रगट करीत आहोत. ते पत्र आपल्याला प्रिटोरिया, पीटर्सबर्ग, स्टँडर्टन व मिडलबर्ग यातील काही प्रमुख हिंदी लोकांच्या वतीने मेसर्स स्टेगमन, एसेलेन आणि रूज या पेढीने ता. ३० ऑगस्ट १९०७ रोजी आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयक, १९०७ चा क्रमांक २ यासंबंधी लिहिलेले आहे.

सध्या उद्भवलेली बिकट परिस्थिती हा कायदा पूर्णपणे रद्द केल्याशिवाय निवळणार नाही, असे आम्ही आदरपूर्वक निवेदन करतो. आमचे असे नम्र मत आहे की, हा कायदा आमच्या स्वाभिमानाला कमीपणा आणणारा व आमच्या धर्माचा उपमर्द करणारा आहे. भयंकर गुन्हेगारांच्याच बाबतीत अशा कायद्याची कल्पना करता येते. शिवाय आम्ही जी गंभीर प्रतिज्ञा केली आहे, त्यामुळे साम्राज्याचे सच्चे नागरिक व ईश्वरनिष्ठ मानव या नात्यांनी, या कायद्यातील तरतुदींना मान्यता न देणे आमचे आवश्यक कर्तव्य ठरते--मग त्या पायी आम्हांला कोणतेही परिणाम भोगावे लागोत. हे परिणाम म्हणजे तुरुंगवास, हद्दपारी अगर आमच्या मालमत्तेची जप्ती किंवा नाश हे असल्याचे आम्हास माहीत आहे.

वरील विधान करताना आम्ही पुढील दोन गोष्टी टाळू इच्छीत नाही--(१) मोठ्या प्रमाणावर हिंदी लोकांचा चोरटा प्रवेश चालू असल्याचा जो आरोप आहे त्याची चौकशी करणे (२) आमची पुरेशी ओळख पटण्यासाठी सरकारच्या दृष्टीने अवश्य असणारे कागदपत्र जवळ बाळगण्याचे नाकारणे.

१. हे निवेदन सह्यांसाठी हिंदी, गुजराती, तामिळ व इंग्रजी या भाषांमध्ये प्रसृत करण्यात आले होते असे दिसते, त्यावर ४५२२ हिंदी लोकांच्या सह्या मिळाल्यानंतर हे निवेदन-पत्र ता. १ नोव्हेंबर रोजी सादर करण्यात आले. “ वासाहतिक सचिवाला पत्र ” लेख २५२ पाहा.

ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक माणसे आहेत, आणि या स्वतंत्र व स्वायत्त वसाहतीचे सत्पात्र नागरिक आहेत याची जाणीव सरकारने कृपेने ठेवावी, अशी आमची सादर प्रार्थना आहे.

आपले नम्र,

वरील अर्जावर सह्या घेण्यासाठी केलेल्या सूचना :—

(१) सार्‍या सह्या शाईत असाव्यात.

(२) प्रत्येक पानावर ५० सह्या होतील. म्हणून प्रत्येक पानावर ५० हून अधिक सह्या घेऊ नयेत.

(३) सह्या दोन प्रतींवर घ्याव्यात.

(४) पत्त्याच्या रकान्यात रस्त्याचा क्रमांक द्यावा व शक्य तेथे बाजारपेठ (स्टँड) द्यावी. ज्या शहरात सह्या घेतल्या असतील त्याचे नाव एकदाच द्यावे.

(५) कागद खराब होणार नाहीत याची काळजी घ्यावी.

(६) सह्या शक्य तितक्या सुवाच्य असाव्यात. जेव्हा त्या इंग्रजीत नसतील तेव्हा त्या घेणार्‍याने त्याचा पर्याय इंग्रजीत द्यावा. जेव्हा सही करणारा मनुष्य फक्त फुली (अंगठा करतो त्याप्रमाणे) करील, तेव्हा सही घेणार्‍याने आपली साक्ष घालावी.

(७) कोणाही माणसाने अर्ज वाचल्याशिवाय सही करू नये. कोणत्याही भाषेतील अर्ज जर एखाद्याला वाचता येत नसेल तर तो त्याला वाचून दाखवावा.

(८) सही घेणार्‍याने कागदावर सहीसाठी तळाशी राखून ठेवलेल्या रेघेवर आपली सही करावी.

(९) दोन्ही प्रती ब्रिटिश इंडियन असोसिएशन टपाल पेटी ६५२२, जोहान्सबर्ग, येथे चिटणिसाकडे शक्य तितक्या लवकर पाठवाव्या.

(१०) सार्‍या सह्या जास्तीत जास्त ३० सप्टेंबरपर्यंत परत याव्या.

(११) लोकांवर कोणतेही दडपण टाकू नये. कायद्याला मान्यता न देण्याचा निर्धार अखेरपर्यंत टिकविण्यास जे सिद्ध नसतील त्यांनी सही करू नये.

(१२) कागदाची घडी करू नये तर ते गुंडाळावेत आणि गुंडाळून पाठवावेत.

इंडियन ओपिनियन, २१-९-१९०७.

१९०. विराट निवेदन (अर्ज)

ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनी सरकारकडे पाठविण्यासाठी एक विराट निवेदन तयार केले याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. गेल्या आठवड्यात जे पत्र[1] छापण्याचे दुर्भाग्य आमच्या कपाळी आले होते, त्याला हे निवेदन म्हणजे संपूर्ण उत्तर होय. या निवेदनकारांनी आपला मुख्य मुद्दा शक्य तितक्या संक्षिप्त शब्दांत कागदावर कायमचा लिहून ठेवला आहे. सध्याची आणीबाणीची परिस्थिती नाहीशी होण्यासाठी आशियावासी नोंदणी-कायदा पूर्णपणे रद्द केल्याशिवाय दुसऱ्या कशाचाही उपयोग होणार नाही, असे अर्जदारांनी स्थानिक सरकारला, स्पष्ट पण सादर भाषेत, कळविले आहे. या विधानाबरोबरच त्यांनी दुसरे असे विधान जोडले आहे की, कायदा रद्द करण्याची ही मागणी करीत असतानाही, आशियावासीयांच्या तथाकथित चोरट्या प्रवेशाची चौकशी करणे किंवा हिंदी लोकांजवळील सध्याचे परवाने बदलून घेणे या दोहीला ते नकार देत नाहीत किंवा टाळाटाळ करीत नाहीत. म्हणून मूलभूत प्रश्न हा आहे की, हिंदी लोकांना साम्राज्यातील स्वाभिमानी नागरिक म्हणून मान्यता मिळणार आहे की नाही? आमचे व्यवसायबन्धु, "स्टार", यांनी परवा हिंदी लोकांना असा चिमटा घेतला होता की, लढ्याच्या खऱ्या कारणांबाबत तुम्ही इंग्लंडातील आपल्या दोस्तांची दिशाभूल केली आहे. हिंदी लोक फक्त दहा बोटांच्या ठशांविरुद्ध झगडत आहेत, असे श्रेय त्या पत्राने दिले आहे. जेव्हां "स्टार" ने असे लिहिले, बहुधा त्याच वेळी, दक्षिण आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमिटीचे अदम्य चिटणीस मि. रिच् "लँकेशायर डेली पोस्ट" ला एक लेख लिहीत होते. त्यांतून आम्ही पुढील उतारा घेत आहो.

आशियावासी नोंदणी-कायद्यामुळे हिंदी लोकांना तसेच परक्या आशियावासीयांना, "ओळखीसाठी नोंदणी करून घेण्यास संमती" द्यावी लागते आणि या कायद्याच्या कार्यवाहीसाठी करण्यात आलेल्या नियमामुळे दहा बोटांचे ठसे द्यावे लागतात. ही योजना प्रायः फक्त गुन्हेगारांच्या बाबतीत केलेली असते. हे सारे खरे आहे. पण ट्रान्सवॉलमधील आपल्या हिंदी बांधवांना वैगुण्याचे केवढे ओझे सहन करावे लागते, याचे ज्ञान बरोबर होण्यासाठी हे समजून घेतले पाहिजे की, दहा बोटांचे ठसे देणे ही बाब अपमानाची असली तरी ती एक मामुली गोष्ट आहे. ट्रान्सवॉलमधील

१. मेसर्स स्टेगमन, एसलेन व रूज यांच्या पत्राला उद्देशून हे आहे. मागील लेख १८९ पाहा.

ब्रिटिश हिंदी समाजाला साम्राज्यातील सुसंस्कृत प्रजाजनांप्रमाणे वागविले जाण्याचा हक्क आहे की नाही आणि त्या अत्यंत प्राथमिक हक्कावर कोणी आक्रमण केल्यास किंवा त्याचे अपहरण केल्यास त्यापासून त्यांचे संरक्षण महाप्रभु साम्राज्य सरकारकडून होईल की नाही या महत्तर तत्त्वाशी तुलना केली असता, दहा बोटांचे ठसे घेण्याचा अपमान ही एक तुलनेने गौण बाब आहे.

हिंदी लोकांची बाजू याहून अधिक स्पष्टपणे मांडता येणार नाही.

इंडियन ओपिनियन, २१-९-१९०७

१९१. व्हीनेन परवान्याचे अपील

व्यापाराचे परवाने देणारे अधिकारी व संस्था यांच्या निर्णयाशी आम्ही बहुधा कधी सहमत होत नाही; पण श्री. भायात यांचा [१]खटला बिकट असतानाही परवाना अधिकारी व परवाना–बोर्ड यांनी दिलेला निर्णय तत्त्वतः निर्दोष होता; हे आम्हांला कबूल केले पाहिजे. परवाना–अधिकारी श्री. इन्ग्राम यांनी आपल्या निर्णयाची पुरी व स्पष्ट कारणे दिली आहेत. आणि असे म्हटले आहे की, वंशाच्या दृष्टीने दोन्ही पक्षांच्या भूमिका बदलल्या असत्या तरी माझा निर्णय असाच राहिला असता. या त्यांच्या विधानावर आमचा विश्वास आहे.

या वसाहतीत असलेल्या द्वेषभावामुळे, दक्षिण आफ्रिकेत नसले तरी नाताळमध्ये आपल्याला अनिर्बंध व्यापार करणे अशक्य आहे, याची खूणगाठ आमच्या देशबांधवांनी आपल्या मनाशी बांधली पाहिजे. सध्याचे परवाने पवित्र वस्तूप्रमाणे संभाळलेच पाहिजेत अशी किमान हमी मिळाली पाहिजे आणि त्यासाठी आपण, कोणतीही किंमत देऊन, आग्रह धरला पाहिजे असे आमचे मत आहे. मात्र भायातच्या प्रकरणाप्रमाणे नवे अर्ज येतील तेव्हा स्थानिक लोकमत, परवान्यांचे वाटप आणि मागणीपुरवठ्याची गरज या सर्वांचा विचार परवाना–अधिकाऱ्यांना करावा लागेल. खरोखर कायदा नसतानाही, कोणत्याही समाजाला, कोणत्याही वर्गावर किंवा कितीही व्यापाऱ्यांवर अगर आपल्याला नको असणाऱ्या इतर माणसांवर बहिष्कार टाकण्यास मोकळीक आहे. फक्त जेव्हा द्वेषाग्नी भडकविण्यासाठी कायद्याची मदत मागितली

१. पाहा : खंड पाच, लेख ३८४, ३९० आणि ३९७.

जाते, तेव्हाच तो बहिष्कार असह्य होतो व त्याचे अनिष्ट परिणाम टाळण्यासाठी बलवानांची गरज असते. त्याबरोबरच श्री. भायातांच्या प्रकरणामुळे सहानुभूती उत्पन्न झाल्याशिवाय राहात नाही. हा माणूस सर्व वर्गांना आदरणीय वाटत आहे आणि तो दीर्घकाळ लौकिक मिळविलेला व्यापारी आहे आणि ज्या विभागात व्यापार करण्याचा परवाना त्याला पाहिजे आहे, तेथेच त्याने ब्रिटिश सरकारला मदत केलेली आहे. त्याचा अर्ज नाकारण्यास कोणतेही नैतिक किंवा आर्थिक कारण नाही. पण जेथे परस्परविरोधी हितसंबंध उत्पन्न होतात आणि स्वार्थाच्या दडपणामुळे विशिष्ट धोरण आखले जाते, तेथे अशी बिकट प्रकरणे नेहमी उद्‌भवणारच. म्हणून त्यांची शिकार बनलेल्या लोकांनी वस्तुस्थिती समजावून घेणे शहाणपणाचे ठरेल. तरच त्यांना आपले बळ एकवटून, आपले विद्यमान हक्क व आपला स्वाभिमान यांच्या अपहरणाला विरोध करता येईल.

इंडियन ओपिनियन, २१–९–१९०७

१९२. ट्रान्सवॉलचा लढा

श्री. रिच् यांनी जे कागद पाठविले आहेत त्यांचे भाषांतर आम्ही या अंकी अन्यत्र प्रसिद्ध करीत आहोत. ते प्रत्येक वाचकाने अत्यंत काळजीपूर्वक वाचावे. या नव्या कायद्यावर इंग्लंडमध्ये मोठी लढाई चालू आहे. या लढाईचा आधार हिंदी लोकांचे धैर्य हाच पूर्णपणे आहे. हिंदी लोक बोलतील तसे वागतील, अशी खात्री इंग्लंड-मधील प्रमुख पुढाऱ्यांची होत चालली आहे. कर्जाच्या बिलाच्या वेळी जसा वादविवाद झाला, तसा कोणत्याही हिंदी प्रश्नाबाबत यापूर्वी कधी झाला नाही. दोन्ही बाजूंनी इतकी आवेशाची भाषणे झाली की, तशी गेल्या ५० वर्षांत कधीच झाली नव्हती, असे आम्ही म्हटले, तर त्यात अतिशयोक्ती नाही. श्री. लिटलटन् हे हुजूर पक्षाचे नेते आहेत. ते एकदा वासाहतिक सचिव होते. त्यांनी आमच्या हक्कांचे समर्थन मोठ्या जोराने केले. सर चार्ल्स् डिल्क हे एक सुविख्यात उदारमतवादी सभासद आहेत, आणि एकदा ते पंतप्रधान होण्याची शक्यता होती. साम्राज्य सरकारने हस्तक्षेप करणे हे त्याचे कर्तव्य आहे असे त्यांनी निक्षून सांगितले. याशिवाय श्री. बोनली, श्री. कॉक्स् व श्री. ओग्रेडी इत्यादी सभासदांनीही आपल्याला उत्तेजन देणारी भाषणे केली.

वर्तमानपत्रांचा विचार केला तर लंडनचा 'टाइम्स', यॉर्कशॉयर पोस्ट, ऑब्झर्व्हर व पाल माल गॅझेट अशा वृत्तपत्रांनी आपल्या बाजूने जोराने लिहिले आहे. सर्वांपेक्षा सर चार्ल्स् ब्रूस यांनी तर कमाल केली आहे. त्यांनी साम्राज्य-सरकारला एक झणझणीत चपराक दिली आहे.

हिंदी समाजाने नोंदणी--कचेरीवर घातलेल्या केवळ बहिष्काराचे जर हे फळ आहे, तर जेव्हा हिंदी लोकांना कठोरपणे तुरुंगात टाकले जाईल, तेव्हा सर्वच्या सर्व इंग्लंड देश खडबडून उठेल हे संभवनीय नाही काय? शिवाय, सर हेन्रींच्या उत्तराचा विचार आपण केला तर असे स्पष्ट दिसते की, हस्तक्षेप करण्याचे त्यांनी पूर्णपणे नाकारलेले नाही. त्यांनी एवढेच म्हटले आहे की, तसे करण्याला ही योग्य वेळ नाही. याचा अर्थ असा की, हिंदी समाज शेवटपर्यंत खंबीर राहिला आणि तुरुंगवास किंवा हद्दपारी सहन करू लागला, तर साम्राज्य सरकार स्वस्थ बसणार नाही. काळाच्या या खुणा कोणालाही सहज वाचता येतील. त्यामुळे जर आपले डोळे उघडले नाहीत आणि आपण हिंमत राखली नाही, तर आपली जितकी बेइज्जत होईल तितकी थोडीच. त्याच-बरोबर आपण हेही लक्षात ठेवले पाहिजे की, आता जर आपण लढा सोडून दिला तर, आपल्या बाजूने ज्या शक्ती कार्य करीत आहेत त्या आपल्यावर उलटतील. यामध्ये आम्हांला ईश्वराचा हात दिसतो. ईश्वर नेहमी मनुष्य किंवा अन्य साधने यांच्या द्वारा साहाय्य करतो. म्हणून, भारतीयांनो, जागे व्हा!

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १९-९-१९०७

१९३. नाताळमधील परवान्याचा कायदा

वीनेनमध्ये श्री. भायात यांनी परवाना बोर्डाकडे परवान्यासाठी जे अपील[1] केले होते ते फेटाळले गेले, याबद्दल आम्हांला दुःख वाटते. श्री. भायात यांची बाजू अत्यंत बळकट होती. ते एक वजनदार व्यापारी आहेत, त्यांनी सरकारला युद्धात मदत केली आहे आणि ते श्रीमंत आहेत. अशा माणसाला नीतीवर आधारलेल्या कोणत्याही कायद्याप्रमाणे परवाना नाकारला जाईल हे शक्य नाही.

१. पाहा, "वीनेनमधील परवान्याचे अपील" लेख १९१.

तथापि, आपल्याला हे कबूल केले पाहिजे की, बोर्डाचा निर्णय सध्याच्या परिस्थितीत अन्यायाचा मानता येत नाही. नाताळमध्ये किंवा द. आफ्रिकेमध्ये हिंदी समाजाला व्यापार करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळणे अशक्य आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. स्थानिक लोकांच्या भावना आणि त्या विभागातली व्यापाऱ्यांची संख्या यांचा विचार करून परवाना-अधिकारी परवाना देईल वा न देईल, त्याच्या निकालाचा निषेध करणे सध्याच्या परिस्थितीत व्यर्थ होय. आपल्याभोवती काय घडत आहे याकडे लक्ष देऊन व परिस्थितीचा योग्य विचार करून पाऊल टाकणे हेच समंजस माणसाला शोभते. हिंदी समाजावर अनंत संकटे येत आहेत. त्यांपैकी कोणाला सर्वात अधिक महत्त्व द्यावयाचे हे आपण आपल्या मनाशी आगाऊच ठरविले पाहिजे. आपली सध्याची सर्वात मोठी गरज आहे ती आपली प्रतिष्ठा व स्वाभिमान यांचे रक्षण करण्याची. ते दोन गुण आपल्याला लाभले, तर बाकी सर्व काही आपोआप मिळेल. स्वाभिमान राखून जेवढे हक्क आपल्याला उपभोगता येतील त्यांचे रक्षण केले पाहिजे. याचा अर्थ असा की, जे परवाने परत घेतले जात आहेत ते आपण घट्ट धरून ठेवले पाहिजेत आणि तुरुंगात जाऊनही आपल्याजवळील परवाने जतन केले पाहिजेत. हिंदी समाज एवढें करू शकला तर नव्या परवान्यांचा प्रश्न आपोआप सुटेल अशी खात्री आम्हांस वाटते. जोपर्यंत आपल्याला भेकड मानण्यात येते, तोपर्यंत आपल्या प्रयत्नांना फळ येणार नाही हे खचित. काही झाले तरी नवे परवाने दिले जाणार नाहीत, असा आमच्या म्हणण्याचा अर्थ नाही. जेथे परवाना-अधिकारी दयाळू असेल किंवा जेथे युरोपिअनांचा विरोध नसेल, तेथे नवे परवाने खात्रीने मिळत राहातील. जेथे एक पक्ष दुसऱ्याला नीच समजतो तेथे मैत्री वा प्रेम असूच शकणार नाही, एवढाच याचा अर्थ. म्हणून आपले पहिले ध्येय स्वाभिमानाचे रक्षण करणे आणि आपल्या शौर्याविषयी आदरभाव संपादन करणे हे असले पाहिजे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २१–९–१९०७

१९४. भारतीय सार्वजनिक पुस्तकालय

श्री. रोल्ट यांनी पुस्तकालयाचे काम, थोडा वेळ का होईना, मोठ्या हुषारीने केले आणि आता दुसरीकडे नोकरी करण्यासाठी त्यांनी राजीनामा दिला आहे. त्यांच्या

जागी श्री. तारमहंमद सुमार यांची नेमणूक झाली आहे. श्री. जूसफ उस्मान यांनी त्यांना मदत करण्याचे कबूल केले आहे. त्या दोघांचेही आम्ही अभिनंदन करतो. समाजातील घटकांनी मोठ्या संख्येने सार्वजनिक कार्यासाठी पुढे येणे अत्यंत अगत्याचे आहे. एखादा माणूस निघून गेला की, त्याची जागा कशी भरून येणार ? असा प्रश्न विचारणे हे आपल्या दौर्बल्याचे लक्षण आहे. कष्टाळूपणा व नियमितपणा या गुणांच्या बाबतीत श्री. शेलाट यांची जागा भरून काढणे कोणालाही कठीण जाईल, पण श्री. तारमहंमद व श्री. जूसफ उस्मान हे अत्यंत परिश्रमाने काम करून आपले अंगीकृत कार्य तडीस नेतील असा आम्हांस विश्वास वाटतो.

पुस्तकालय हे शिक्षणाचे एक गमक होय. त्यापासून पुष्कळ लाभ होतात, हे सिद्ध करण्याची गरज नाही. म्हणून हे पुस्तकालय चालू राहण्याला मदत करणे हे प्रत्येक हिंदी माणसाचे कर्तव्य होय.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २१–९–१९०७

१९५. हिंदुस्थानचे साहाय्य

ना. प्रो. गोखले यांची तार

ना. प्रो. गोखले यांच्याकडून जोहान्सबर्गच्या ब्रिटिश इंडियन असोसिएशनला पुढील तार [1] आली आहे. ती आमच्याकडे प्रसिद्धीसाठी पाठविली आहे.

लढा बारकाईने पाहात आहे. तीव्र उत्कंठा, संपूर्ण सहानुभूती, गौरव. ईश्वरी इच्छेवर दृढ श्रद्धा ठेवा.

ना. प्रो. गोखले हे प्रत्येक देशाभिमानी हिंदी माणसाला माहीत आहेत. ते मध्यवर्ती हिंदी विधि–मंडळाचे सदस्य आहेत. त्यांच्या तारेमुळे प्रत्येक हिंदी माणसाची वृत्ती पराकोटीच्या धैर्याने भरून येईल. प्रो. गोखले यांनी तार पाठविली याचा अर्थ, अखिल भारत आता जागृत होईल आणि आपल्या मदतीस धावेल.

१ पाहा : “ गो. कृ. गोखले यांना तार ” लेख १८८.

तारेस उत्तर

वरील तार मिळताक्षणीच ब्रिटिश असोसिएशनची सभा भरविण्यात आली. तिला श्री. इसाप मियाँ, श्री. कुवाडिया, श्री. अहंमद मूसाजी, श्री. फॅन्सी, श्री. उमरजी साले, श्री. इमाम अब्दुर कादिर, श्री. मुहंमद आदमजी, श्री. अली उमर, श्री. अहमद हलीम, श्री. कासीम मूसा, श्री. अलीभाई आकुजी, श्री. शाह, श्री. मूसाजी अहमद, श्री. दाऊद इस्माईल, श्री. अहमद ईसे, श्री. ईस्माईल सुलेमान, श्री. डाह्या रामा, श्री. कामा व श्री. मोमणियात हजर होते. प्रो. गोखले यांना पुढील तार[1] पाठविण्याचा ठराव एकमताने मंजूर झाला.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २१-९-१९०७

१९६. अंगठ्याच्या ठशाचा कायदा

हा कायदा व ट्रान्सवॉलचा कायदा यामध्ये, घोडा व हत्ती यांच्या इतके, अंतर आहे.[2]

संपादक
इंडियन ओपिनियन

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २१-९-१९०७

१. येथे "गोखले यांना तार" याचे भाषांतर दिलेले आहे. पाहा : लेख १८८.

२. "मुंबई समाचार" या मुंबईतील गुजराती सायंदैनिकावरून पुढील उतारा उद्धृत करताना गांधीजींनी वरील वाक्य लिहिले.

मुंबईमध्ये अंगठ्याचे ठसे

"बॉम्बे गॅझेट"च्या "वाचकांच्या पत्रव्यवहारात" एक तक्रार आलेली होती. आणि ती आम्ही या पत्रात उद्धृत केली होती. ती तक्रार अशी होती की, युरोपियनांशिवाय बाकीच्या सर्व लोकांना हायकोर्टाच्या नोंदणी-खात्याच्या बाबतीत अंगठ्याचे ठसे दिले पाहिजेत. अशा आशयाचा एक नवा कायदा अस्तित्वात आला आहे. ही तक्रार निराधार आहे असे दिसते. श्री. ओ. पी.

(पुढील पान पाहा)

१९७. जोहान्सबर्गचे बातमी-पत्र

नवा कायदा

क्रूगर्सडॉर्प व जीरस्ट यांनी इतर शहरासारखेच कार्य केले आहे. त्यांनी तितकेच धैर्य दाखविले असे मी म्हणणार होतो. पण सध्याच्या बहिष्काराला जर आपण धैर्यशाली कृत्य म्हणू लागलो, तर जेव्हा खरा बहिष्कार टाकण्याची वेळ येईल, तेव्हा आपण त्याला कोणते विशेषण लावू ? जर एखाद्या माणसावर गुलामगिरीचा शिक्का एखाद्या ठिकाणी पडला नाही तर तसा तो दुसऱ्या ठिकाणी पडू शकेल हे आपणाला ठाऊक आहे, त्या लज्जास्पद कृष्णकलंकाचा मोह कोणास पडेल असा संभव नाही. म्हणून सर्वजण, जोहान्सबर्ग काय करीत आहे, यांकडे लक्ष देऊन स्वस्थ बसले आहेत. बहुसंख्य लोक अशा रीतीने वाट पाहात बसले तर आपल्या पापाचा घडा खचित फुटेल आणि आपण त्याच्याखाली चिरडून जाऊ.[1] जोहान्सबर्ग काय करते याचा विचार न करता, जे लोक अखेरपर्यंत आपले धैर्य टिकवितील, त्यांच्याचबद्दल आपल्याला समाधान वाटले पाहिजे. म्हणून, क्रूगर्सडॉर्प व जीरस्ट यांच्या खंबीरपणाबद्दल ते

(मागील पानावरून)

दीक्षित यांनी विधिमंडळात विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर म्हणून सरकारने या नव्या कायद्याची प्रत टेबलावर ठेवलेली आहे, तीवरून हे स्पष्ट होते. त्या कायद्याप्रमाणे, एखाद्या माणसाला त्या खात्यात नोंदलेला एखादा दस्त-ऐवज पाहिजे असेल, तर त्यावर त्याने आपल्या उजव्या हाताच्या आंगठ्याचा ठसा उमटविला पाहिजे आणि आंगठ्याचे ठसे घेणाऱ्या सरकारी नोंदणी-पत्रावरही तसा ठसा दिला पाहिजे. त्या बाबतीत पुढील नियम तयार करण्यात आले आहेत—

(१) जेव्हा दस्तऐवज नोंदविणारा माणूस सुशिक्षित असेल आणि रजिस्ट्रारच्या परिचयाचा असेल, तेव्हा त्याने आपल्या आंगठ्याचा ठसा देण्याची गरज नाही.

(२) जर दस्तऐवज नोंदवणारा माणूस युरोपिअन स्त्री किंवा सभ्य गृहस्थ किंवा ज्याच्या ओळखीविषयी शंका नाही असा प्रतिष्ठित गृहस्थ असेल, तर त्याने आंगठ्याचा ठसा देण्याची गरज नाही.

(३) कोणत्याही कारणाने ज्यांच्या उजव्या हाताच्या आंगठ्याचा उपयोग होऊ शकत नसेल, त्यांनी आपल्या डाव्या हाताच्या आंगठ्याचा ठसा द्यावा. आणि तेही शक्य नसेल तर दुसऱ्या कोणत्याही बोटाचा ठसा द्यावा.

(४) हा ठसा रजिस्ट्रारच्या समोर घेतला जाईल.

१. येथे वापरलेल्या गुजराती म्हणीचा शब्दार्थ असा आहे- पाप मर्यादेबाहेर गेले म्हणजे ईश्वर शिक्षा करतो हे निश्चित.

अभिनंदनास पात्र असले, तरी त्यांच्या व आपणा सर्वांच्या खऱ्या कसोटीची वेळ अद्याप यावयाची आहे.

कोणती गावे शिल्लक राहिली ?

बॉक्सबर्ग येथे १७, १८, १९, २० तारखांना, जर्मिस्टन येथे २४, २५, २६, २७ तारखांना आणि वेनीनी येथे १७, १८, १९, २० तारखांना परवाना कचेरी जाणार आहे. या गावांवर सरकारची विशेष मेहेरनजर दिसते. कारण, यांपैकी प्रत्येक ठिकाणच्या हिंदी लोकांना (गुलामगिरीचे) दस्तऐवज घेण्यास ४ दिवसांची मुदत दिलेली आहे. पण तेथील हिंदी लोक खबरदार आहेत. (गुलामगिरीचे) निंद्य पट्टे घेण्यास कोणीही जाणार नाही, असे दिसते. बॉक्सबर्ग व जर्मिस्टन येथे पूर्वीच सभा भरल्या आहेत आणि आपले हात काळे करण्याला सर्वांनी विरोध दाखविला आहे. म्हणून " अधिकाऱ्यांच्या सुट्टी "मध्ये खंड पडण्याचा अजून संभव नाही.

वारे बदलले काय ?

आतापर्यंत श्री. चॅमनी, श्री. जेम्सकोडी, श्री. रिचर्ड कोडी व श्री. स्वीट हे ताजी हवा खात फिरत होते. आता हीच तुकडी राहणार नाही. ब्लूमहॉफ्, वुलमरन-स्टाड, लिखतनबर्ग, पीट रिटिफ्, अरमिलो, कॅरोलीना व बेथल या गावी ही मंडळी जाणार नाहीत. त्यासाठी दुसऱ्या अधिकाऱ्यांची नेमणूक झालेली आहे. त्यातील प्रत्येक गावी, १७, १८ व १९ तारखेस नवे अधिकारी हजर राहतील. ब्लूमहॉफ्मध्ये श्री. हल्, वुलमरनस्टॅडमध्ये श्री. हॅग, लिखतनबर्गमध्ये श्री. ज्यूटा, पीट रिटीफमध्ये श्री. लेवी, अरमिलोमध्ये श्री. केरसवील, कॅरोलिनामध्ये श्री. जॉन् व बेथलमध्ये बॅगले नेमलेले आहेत. असा बदल का करण्यात आला याचा तर्क मी करीत नाही. वरवर पाहता, त्याचे कारण असे दिसते की, वरील ठिकाणी हिंदी लोकांची संख्या मोठी नाही. आणि ही ठिकाणे दूर दूर पसरलेली आहेत आणि पहिल्या अधिकाऱ्यांना या गावी फिरविले तर जोहॅन्सबर्गवर ऑक्टोबरमध्ये हल्ला चढविता येणार नाही.

जोहान्सबर्गवर घट्ट पकड

जोहान्सबर्गवरील हल्ला १ ऑक्टोबर रोजी सुरू होईल. त्यासाठी तेथे एका त्रिकूटाची नेमणूक झालेली आहे.— दोन कोडी व एक श्री. स्वीट. आतापर्यंत जोहान्सबर्ग जी नेहमी बढाई मारीत आले आहे, त्याची कसोटी लागण्याची वेळ जवळ येत आहे. प्रिटोरिया येथे श्री. गांधींनी अशी बढाई मारली की, ही कचेरी प्रथम जोहान्सबर्गवर गेली असती तर चांगले झाले असते.[1] त्याच सुरात श्री.

१. पाहा, " प्रिटोरियातील भाषण " लेख ९८

इसॉप मियाँ व श्री. कुवाडिया हेही बोलले. शिवाय, श्री. इसॉप मियाँ यांनी श्री. रूज यांना असे एक खरमरीत पत्र पाठवले आहे की, "पुढाऱ्यां"च्या वतीने तुम्ही जो मूर्खपणाचा मसुदा तयार केला आहे, त्याच्याशी आमच्या असोसिएशनला– विशेषतः जोहान्सबर्गला — काहीच कर्तव्य नाही. जोहान्सबर्ग हे असोसिएशनचे मुख्य कार्यालय आहे, तेथील हिंदी लोक या कायद्याविरुद्ध[1] खणखणीतपणे बोलले आहेत. तेथेच दोन सभा भरल्या. एक एम्पायर थिएटरमध्ये व दुसरी गेएटी थिएटरमध्ये. असे असूनही जोहान्सबर्ग शरण जाईल काय? पण अजून वेळ आहे. या गोष्टीला अद्याप पूर्ण एक महिना आहे. प्रिटोरिया येथे अगदी अखेरच्या दिवसांत लोकांनी आपले हात काळे करून घेतले, म्हणून ऑक्टोबरचे पहिले तीन आठवडे जोहान्सबर्गमध्ये चांगले जातील असा संभव आहे, पण जर चौथ्या आठवड्यातही जोहान्सबर्गमधील एकाही हिंदी माणसाने परवानाकचेरीकडे ढुंकूनही पाहिले नाही, तर काय? या प्रश्नाचे उत्तर देणे थोडेसे कठीण आहे. "पाण्यात आहे म्हैस, कशाला सौद्याचा कीस!" तथापि मला एका गोष्टीची कल्पना करता येते. ती ही की, जोहान्सबर्गने संपूर्ण बहिष्कार घालून दाखविला तर आपला प्राणपणाने लढण्याचा निर्धार आहे अशी सरकारची खात्री होईल. आपण जसे बोलतो तसे वागतो, असे दाखविण्यासाठी हा लढा आहे, हे पक्के ध्यानी धरावे. लढ्याचे खरे धैर्य आपल्या अंगी आहे, अशी खात्री सरकारची किंवा दुसऱ्या कोणाची अद्याप पटलेली नाही. आणि जोपर्यंत आपल्यामध्ये आपली बाजू बदलणारे श्री. शेख महंमद[2] इसाक यांच्यासारखे लोक आहेत, तोपर्यंत तशी खात्री कशी पटेल?

पीटर्सबर्गचे "वीर"

आताच मी श्री. शेख महंमद इसाक यांचे नाव घेतले, तर मी वाचकांना दुसरी बातमी देतो. पीटर्सबर्ग येथे चार हिंदी 'वीर' गुलामगिरीचे पट्टे घेण्यासाठी गेले होते.[3] या सज्जनांनी, पीटर्सबर्गहून ८६ हिंदी लोकांच्या सह्यांनी गेलेल्या अर्जावर, सह्या केल्या होत्या, असे मला सांगण्यात आले आहे. अशा गोष्टी जोपर्यंत घडत आहेत, तोपर्यंत सरकार एका तरी हिंदी माणसावर विश्वास कसा ठेवील? आपण आपल्या अर्जात जे म्हणतो ते खरे आहे, यावर कोणाचा विश्वास बसेल? या सज्जनांकडून काही प्रतिज्ञापत्रे घेतली आहेत, असेही म्हणतात. सर्व तऱ्हेच्या अफवा फैलावलेल्या आहेत. "आम्ही आतापर्यंत गुलामगिरीच्या पट्ट्यासाठी अर्ज केला नाही याचे कारण तसे करण्याला श्री. गांधींनी आम्हांला प्रतिबंध केला होता." असे

१. पाहा : खंड ६ लेख ४१८

२. मूळ गुजरातीत म्हण—"दोन्ही बाजूंना ढोल वाजविणारे लोक."

३. येथे मुळात चार नावे दिलेली आहेत.

त्यांनी लिहून दिल्याचे कळते. आपल्या समाजाच्या दृष्टीने आपण बदनाम होऊ अशा भीतीमुळे त्यांनी अर्ज केले नाहीत असेही कोणी म्हणतात. या गोष्टी जर खऱ्या असतील, तर ती प्रतिज्ञा-पत्रे लिहून देणाऱ्यांनी स्वतःला असा प्रश्न करावा की, ती भीती व ती लज्जा आपल्याला आता वाटत नाही काय? काही असले तरी, भित्रे लोक विरोधी पक्षात गेले तरी काही बिघडत नाही. हा लढाच असा आहे की, त्यामुळे भित्रे हे शूरांपासून निराळे काढले जातील. मग आपल्याला भोगाव्या लागणाऱ्या रोगाचे खरे स्वरूप आपल्याला कळेल. आपला ताप किती अंशांपर्यंत आहे, हे आपण आतापर्यंत वापरलेल्या तपमान यंत्रावरून बरोबर कळून आलेले नाही. तुरुंगाचे तपमान-यंत्र लावले म्हणजे प्रत्येकाचे तपमान अचूकपणे कळेल.

ही सारी नावे देताना आणि त्यावर टीका करताना मला फार दुःख होते. कारण माझ्या बांधवांच्या लज्जेत मी भागीदार आहे. माझ्या बांधवांनी जर चोरी केली तर माझ्या लौकिकाला कमीपणा येतो. आपल्याच लोकांच्या दोषांमुळे साऱ्या दक्षिण आफ्रिकेत आपल्याला हाल भोगावे लागत आहेत. काही हिंदी लोक घाणेरडे आहेत, म्हणून सर्व हिंदी लोकांना हाल सोसावे लागत आहेत. काहीजण कंजूष आहेत, म्हणून सर्वांनाच तो ठपका येतो. काही लोकांनी चोरटा प्रवेश केला म्हणून हा नव कायदा आला आणि त्याचे परिणाम सर्वांना भोगावे लागत आहेत. सध्याचा काळ इतका गंभीर आहे की, या वेळी आपण आपले दोष लपविणे हे पाप होईल. आपल्या-मध्ये जे सडलेले आहे, ते वर आले तरच आपले प्रश्न सुटतील. सध्या आपण शिजणाऱ्या काकवीसारखे आहोत. या वेळी तिच्यातील घाण वर येणारच. ती घाण आपण झाकून ठेवली तर त्या शिजण्याचा काय उपयोग? म्हणून ज्यांची नावे मी देत आहे आणि त्यामुळे जे माझ्यावर रागावतील, त्यांची मी क्षमा मागतो. मला माझे कर्तव्य केलेच पाहिजे.

पीटर्सबर्ग येथील त्या चार सज्जनांनी गुलामगिरीचे पट्टे घेऊन जणू काही एखादा किल्लाच सर केला, असे पाहून मेफेकिंगचे श्री. कासीम हाजी तार यांना वाटले, आपण मागे राहिलो; म्हणून तेही ढेपाळले. मग दर्बानचे लॅझरस (तामीळ) व जोसेफ (तामीळ) याच्याविषयी काय बोलावे? या दोन तामिळी सद्गृहस्थांनीसुद्धा नोंदणीचा कलंक लावून घेतला.

परवाना-कचेरीतील अस्वस्थता

गुलामगिरीचा शिक्का उठवून घेण्यास फारच थोडे हिंदी लोक जात असल्यामुळे परवाना-कचेरी बेचैन झाली आहे. बारबर्टन येथील एका हिंदी माणसाजवळ पूर्वीच्या अधिकाऱ्याने चुकीने दिलेला परवाना राहिला होता. म्हणून त्याला पकडण्यात आले. आता तो सहा महिने कैदेची शिक्षा भोगत आहे. बारबर्टन येथून रिक्त हस्ताने परत

जावयाचे नाही, म्हणून अधिकाऱ्यांनी त्या कैद्यापासून अर्ज घेतला आहे. अशा माणसापासून अर्ज घेण्याचा काय फायदा? असे आम्ही विचारतो. ज्यांच्याजवळ परवाना नाही आणि ज्यांना येथे राहण्याचा हक्क नाही, अशा लोकांचे अर्ज घेऊन नोंदणी–पत्रे देण्याचा हेतु आहे काय? अथवा ब्लूम् फॉंटीनचे "फ्रेंड" पत्र म्हणते त्याप्रमाणे, तुरुंगात असलेल्या हिंदी लोकांना ट्रान्सवॉलमध्ये ठेवून जुन्या हक्कदार नागरिकांना सरकार हुसकून लावणार काय? कायदेशीर नागरिकांचे हक्क ट्रान्सवॉल सरकार कसे हिरावून घेते, हे आपल्याला पाहावयाचे आहे.

बोटांच्या ठशाचा नवा नियम

ताज्या गॅझेटमध्ये असा एक नियम प्रसिद्ध झाला आहे की, तुरुंगातील कोणाही माणसाचे (तो अडकवून ठेवलेला साक्षीदार किंवा दिवाणी कर्जदार नसल्यास छाया–चित्र, बोटांचे ठसे, शारीरिक मोजमापे इत्यादी आपल्या मर्जीप्रमाणे घेण्याचा अधिकार अधिकाऱ्यांना दिलेला आहे. स्थानिक कोर्टामध्ये एक खटला चालला होता. त्याचा परिणाम म्हणजे हा नियम. असले नियम केवळ हिंदी लोकांसाठीच नाहीत. पण फौजदारी गुन्हे करणाऱ्या लोकांनाही ते लागू होतील असे दिसते.

स्त्रियांना बोटांचे ठसे द्यावे लागतील काय?

फोक्सरस्टहून श्री. मूसा इब्राहीम मन्सूर यांनी असे लिहिले आहे की, पोलिसांनी एका हिंदी स्त्रीला परवाना मागितला. तिने तो दाखविला. मग त्यांनी तिला आंगठ्याचा ठसा देण्यास सांगितले. तोही तिने आपल्या मालकाच्या हुकुमावरून दिला. तिने परवाना कसा दाखविला हे समजत नाही. आंगठ्याचा ठसा मागण्याचा काडीमात्र अधिकार पोलिसांना नव्हता. पूनियाच्या खटल्यात[1] असा निर्णय दिला गेला होता की, स्त्रियांना परवान्याचीही गरज नाही. या बाबतीत दुसरे काही करण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. पण जेथे अशा गोष्टी घडतील, तेथे इशारा देणे अवश्य आहे.

"आम्ही नुकसान कसे सोसावे?"

या नव्या कायद्याशी चाललेल्या लढ्यांत जे नुकसान होण्याचा संभव आहे, ते लोकांनी कसे सोसावे, असा प्रश्न मला विचारला जातो. पहिली गोष्ट ही की, आपल्याला जे नुकसान वाटते, ते नुकसान नसून लाभ आहे. आपण शंभर रुपयांना एक गाडी घेतली तर आपले आर्थिक नुकसान झाले असे आपण मानत नाही, तर आपल्या पैशांचा योग्य मोबदला मिळाला असे मानतो; त्याच प्रकारे, आपल्याला द्रव्यावर पाणी सोडून

१. पाहा : खंड ५ लेख ४६५ व खंड ६ लेख १३०.

आपले हक्क विकत घ्यावयाचे आहेत. आपले हक्क खात्रीने मिळतील असा विश्वास ज्याला वाटतो, त्याला द्रव्यहानीचे भय वाटणार नाही. कारण त्याचा मोबदला मिळण्याची त्याला खात्री असते. आपले हक्क आपल्याला मिळतील अशी खात्री काही लोकांना वाटणार नाही, हे खरे आहे. ते लोकसुद्धा (पुढे) आपल्याला हक्क मिळतील या आशेने द्रव्यावर पाणी सोडतील. व्यापारात असे धोके आपण नेहमी स्वीकारतो. एखाद्या वायद्याच्या व्यवहारात आपण पैसे गमावले म्हणून काही आपण आपला व्यापार बंद करीत नाही. या तत्त्वाकडे लक्ष देऊन आपण जर लढत राहिलो तर आपण नुकसानीची भाषा बोलणार नाही. महत्त्वाची गोष्ट ही आहे की, आपल्या हक्कांचा हा लढा साऱ्या समाजाचा लढा आहे. पण आपले मन कोते असल्यामुळे, समाजाचा लाभ हा आपला लाभ, असे आपल्याला वाटत नाही. या गोष्टीचा आपण काळजीपूर्वक विचार केला तर आपल्याला कळून येईल की, जेमिसन हल्ल्याच्या[1] वेळी हिंदी लोकांचा पैसा बुडाला आणि युद्धातही[2] तसेच घडले. पण त्यावेळी त्याचा विचार आपण केला नाही. कारण आपण अगतिक होतो. आपल्या काही द्रव्याची हानी कदाचित् होईल, या भीतीने आपण सर्व समाजाच्या कल्याणार्थ चाललेला लढा सोडून द्यावा काय ?

हे वृत्तपत्र वाचल्यानंतर त्याचे काय करावे ?

या प्रश्नाचेही उत्तर मला मागितले आहे. माझा सल्ला असा आहे की, "ओपिनियन" वृत्तपत्र हे महत्त्वाचे असल्यामुळे त्याच्या प्रतींची फाइल प्रत्येकाने ठेवावी पण फाइल ठेवण्याइतकी दक्षता ज्यांच्या अंगी नाही किंवा तसे न करण्याइतका आळस ज्यांच्या अंगी आहे, त्यांनी हे वृत्तपत्र वाचून होताच हिंदुस्थानातील आपल्या मित्राला ते पोस्टाने पाठवावे. असे करणे अवश्य आहे. कारण आपल्या येथील लढ्याच्या हकीकती हिंदुस्थानात प्रसिद्ध करण्याचा तो सर्वांत सोपा व स्वस्त मार्ग आहे.

प्रतिज्ञा-पत्रांचा आशय

प्रिटोरिआ येथे जे 'वीर' परवाना-कचेरीत जाऊन "वीणा वाजवीत आहेत" (बोटांचे ठसे देत आहेत), त्यांच्यापासून प्रतिज्ञा-पत्रे घेतली जात आहेत. त्या प्रतिज्ञा-पत्रांचा आशय माझ्याकडे आला आहे. त्यात पुढील शब्द आहेत,–"श्री. मो. क. गांधी यांनी चिथावणी दिल्यामुळे आशियावासियांनी जे धोरण पत्करले आहे, त्यामुळे भयभीत झाल्याने मी जुलै महिन्यात प्रिटोरिआ येथील परवाना कचेरीत दाखल झालो नाही. म्हणून आता माझे नाव नोंदावे अशी माझी विनंती आहे."

१. डिसेंबर १८९५ मध्ये. पाहा : खंड १, पान ३६०
२. बोअर युद्ध, १८९९—१९०२. पाहा : खंड १, पान ३२५

अशा प्रकारच्या कागदावर सही करण्याची हिंमत कोणा हिंदी माणसास कशी होते हेच समजत नाही. यामुळे परवाना कचेरीचा काय फायदा होतो हेही मला समजत नाही. ते काहीही असो, त्या माणसाचे भय आता तरी गेले ना? श्री. गांधींचा सल्ला आजही तोच आहे–आणि त्यांच्या मृत्यूपर्यंत तो तसाच राहील असे त्यांचे म्हणणे आहे. हिंदी समाजाचाही निर्धार अढळ आहे, पण गुलामगिरीचा पट्टा गळ्यात अडकवून घेणाऱ्या माणसाशी युक्तिवाद कशाला करा?

विराट निवेदन[1] (अर्ज)

यासोबत विराट निवेदनाची एक प्रत आणि सूचनांची एक यादी पाठविली आहे. हे निवेदन ताबडतोब पाठविले पाहिजे, म्हणजे प्रस्तुत प्रतिज्ञा-पत्रांचा जोर नाहीसा होईल. ज्यांना या निवेदनाच्या प्रती सह्यांसाठी मिळाल्या नसतील, त्यांनी त्या चिटणिसांकडून मिळवाव्यात. यावेळी मला पूर्वीचे एक उदाहरण आठवते, ते मी सांगतो. नाताळमध्ये १८९४ साली जेव्हा मताधिकाराचे बिल मांडण्यात आले, तेव्हा १०,००० (दहा हजार) हिंदी लोकांच्या सह्यांचा अर्ज लॉर्ड रिपन्[2] यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्याचा परिणाम म्हणजे ते बिल गाळण्यात झाले. ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. दुसरी गोष्ट अशी की, त्यावेळी सह्या गोळा करण्यासाठी पुढारी मंडळी पुढे आली होती आणि १५ दिवसांत सह्या गोळा झाल्या होत्या. सह्या दोन प्रतींवर घेण्याची गरज आहे, असे नंतर आढळून आले, म्हणून तीस स्वयंसेवक रात्रभर काम करीत राहिले आणि त्यांनी एक नक्कल तयार केली. सध्याच्या लढ्याच्या मानाने नाताळचा लढा म्हणजे काहीच नाही, या निवेदनावर सह्या मिळवण्यासाठी पुढारी व स्वयंसेवक यांचा उत्साहपूर्ण पाठिंबा आपल्याला मिळाला पाहिजे. सह्यांसह अर्जाच्या प्रती येथे ३० तारखेच्या आत मिळाल्या, तर ते हिताचे होईल असे मला वाटते. निदान १०,००० (दहा हजार) हिंदी लोक या निवेदनावर सह्या करतील अशी मला दाट आशा आहे.

ना. प्रो. गोखले यांच्या तारेचा विचार करण्यासाठी असोसिएशनची सभा बोलावण्यात आली होती. तीत असे ठरले की, हे विराट निवेदन सह्यांसाठी साऱ्या शहरांना पाठवावे. अध्यक्षांशिवाय श्री. कुवाडिया, श्री. कामा, श्री. फॅन्सी, श्री. इमाम अब्दुल कादीर व श्री. शहा यांनी सभेत भाषणे केली.

१. पाहा : "विराट-निवेदन" लेख १८९.
२. पाहा : खंड १, लेख ३५.

एका प्रसिद्ध इंग्रज स्त्रीचे पत्र

इंग्लंडातील "नीति–मंडळा"ची एक सुप्रसिद्ध महिला[1] लिहिते की,—

२७ जुलैचा "इंडियन ओपिनियन"चा अंक मी आताच वाचीत होते. आपल्याला सहानुभूतीचे पत्र पाठविल्याशिवाय मला राहवेना. आपले पत्र वाचताना मला पुनःपुनः सहानुभूती वाटत आली आहे. आपल्या लढ्यातील बिकट परिस्थिती, आपल्या कार्याचे पवित्र स्वरूप आणि आपल्या लिहिण्यातील, बोलण्यातील, वागण्यातील सदासर्वदा दिसून येणारी वृत्ती—– या सर्वांविषयी मला सहानुभूती वाटत आली आहे. आपण इतक्या निकराने हा लढा चालवीत आहात म्हणूनही मी आपल्याला धन्यवाद देते.

विस्मृत स्वयंसेवक

श्री. महम्मद इस्माईल कानमियाँ असे कळवितात की, मी माझे नाव हमीदिया अंजुमनला दिले असूनही ते "इंडियन ओपिनियन"मध्ये आले नाही, याचे मला दुःख वाटते. त्यांचे नाव कसे गळले हे संपादक किंवा वार्ताहर सांगू शकतील. प्रत्येकजण अत्यंत घाईने काम करीत आहे. म्हणून अशा चुकांची क्षमा केली पाहिजे. तथापि श्री. महम्मद इस्माईल यांच्या दक्षतेबद्दल प्रशंसा केली पाहिजे. इतरही लोक असाच उत्साह दाखवतील अशी आशा आहे. सर्व हिंदी माणसांनी हे ध्यानी धरावे की, आपल्या उत्साहाची कसोटी, कृतीची वेळ येईल तेव्हा, लागणार आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २१–९–१९०७

१९८. पंतप्रधानांच्या सचिवास पत्र

जोहान्सबर्ग,
ता. २१ सप्टेंबर, १९०७

नेक नामदार पंतप्रधान
यांचे सचिवास,
प्रिटोरिआ.

महाशय,

वृत्तपत्रातील पुढील वार्तेकडे पंतप्रधानांचे लक्ष वेधण्याची इच्छा माझ्या असोसिएशनच्या कमिटीची आहे.

१. फ्लॉरेन्स विंटरबॉटम.

बोटांचे ठसे घेण्याच्या पोकळ सबबीवर आशियावासी लोक नोंदणीला विरोध करीत आहेत याचे मला दुःख वाटते. हा नियम गोऱ्या लोकांना लागू केला होता आणि त्यामुळे कोणाचे हाल होतील असे मला वाटत नाही.

हे वृत्त खरे असेल, तर मी नेक नामदारसाहेबांचे लक्ष या गोष्टीकडे वेधू इच्छितो की, बोटांचे ठसे हे नोंदणी कायद्याच्या विरोधाचे प्रधान कारण कधीच नव्हते. इतर अनेक मुद्द्यांपैकी तो एक महत्त्वाचा मुद्दा होता हे निःसंशय, पण केवळ त्यामुळे सध्या उद्भवलेला अत्यंत मोठा व तीव्र क्षोभ योग्य ठरेल, असे माझ्या असोसिएशनला वाटत नाही. त्या कायद्यावरील आक्षेपांचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत—

(१) बादशहांच्या प्रतिनिधींनी पूर्वी केलेल्या घोषणांशी हा कायदा उघडच विसंगत आहे.

(२) ब्रिटिश प्रजाजन आणि परके आशियावासी यांमध्ये तो काहीच भेद करीत नाही.

(३) या कायद्यामध्ये हिंदी प्रजाजनांना दक्षिण आफ्रिकेतील आदिवासी लोकांच्या व गौरेतर लोकांच्या खालच्या दर्जास पोचविले जात आहे.

(४) १८८५ च्या ३ ऱ्या कायद्याखाली, आणि म्हणून डच राजवटीमध्ये ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांची जी स्थिती होती, त्यापेक्षा या कायद्याने अधिक वाईट स्थिती होणार आहे.

(५) दुसऱ्या कोणत्याही ब्रिटिश वसाहतीत नसलेली परवान्याची व हेरगिरीची पद्धत यामुळे निर्माण होणार आहे.

(६) ज्यांना हा कायदा लागू होणार, त्या जनातीवर गुन्हेगार किंवा संशयित असल्याचा शिक्का बसणार.

(७) अनधिकृत हिंदी लोकांचा लोंढा या देशात येत असल्याचा आरोप नाकारण्यात आला आहे.

(८) वरील आरोप खोटा असल्याचे मान्य नसेल तर, असा अनावश्यक व क्रांतिकारक कायदा अंमलात आणण्यापूर्वी न्यायालयीन, खुली व ब्रिटिश पद्धतीची चौकशी केली जावी.

(९) हा कायदा ब्रिटिशांना न शोभणारा आहे, निरपराध ब्रिटिश प्रजाजनांच्या स्वातंत्र्यावर निष्कारण बंधन घालणारा आहे आणि ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना सक्तीने देशत्याग करण्याचे आवाहन करणारा आहे.

यावरून हे दिसून येईल की, गेल्या वर्षी जेव्हा हा कायदा प्रथम मांडण्यात आला, तेव्हा त्यावर घेतलेल्या प्रमुख आक्षेपांमध्ये बोटांच्या ठशांचा उल्लेखसुद्धा

आलेला नव्हता, माझे नम्र मत असे आहे की, या कायद्याला सर्वत्र गुन्हेगारीचा दुर्गंध येत आहे आणि त्याचा स्वीकार केल्याने ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांचे जीवन असह्य होणार आहे.

आपला नम्र,
इसॉप इस्माईल मियाँ
अध्यक्ष,
ब्रिटिश इंडियन असोसिएशन

इंडियन ओपिनियन, २८–९–१९०७

१९९. जे. ए. नेसर यांना पत्र

[जोहान्सबर्ग,
ता. २४ सप्टेंबर, १९०७]

[श्री. जे. ए. नेसर, विधिमंडळाचे सदस्य,
टपाल पेटी क्र. २२,
क्लार्क्सडॉर्प]

प्रिय महाशय,

आशियावासी कायद्यासंबंधी आपण पुढील अभिप्राय व्यक्त केल्याचे वृत्त प्रसिद्ध झालेले आहे–

श्री. नेसर म्हणाले, "आशियावासीयांसंबंधीचा कायदा अत्यंत आवश्यक आहे. बोटांचे ठसे घेण्यात अपमानास्पद असे काहीच नाही आणि म्हणून त्याला हिंदी लोकांनी विरोध का करावा हे मला कळत नाही. विरोधाचे एकच कारण मला दिसते आणि ते हे की, ट्रान्सवालमध्ये आपले जे बांधव बेकायदा आले आहेत किंवा अद्याप येत आहेत, त्यांचे रक्षण करण्याचा हिंदी लोकांचा हा प्रयत्न असावा."

आशियावासी कायद्यावर हिंदी समाजाचे जे आक्षेप आहेत ते समजून घेण्याची तसदी आपण घेतली नाही, याचे माझ्या असोसिएशनला दुःख वाटत आहे. माझ्या

असोसिएशनने जनरल बोथा[1] यांना जे पत्र पाठविले त्याकडे मी आपले लक्ष वेधतो आणि असे सांगतो की, या कायद्यामुळे हिंदी लोकांच्या पौरुषाच्या भावना दुखविल्या जातात; एवढेच नव्हे तर हिंदुस्थानातील महान धर्मांचा उपमर्दही केला जातो.

या वसाहतीत बेकायदा आलेल्या लोकांचे संरक्षण करण्याची इच्छा हिंदी समाजाची आहे, असा आरोप करणे आपल्याला योग्य वाटले, याचे माझ्या असोसिएशनला आश्चर्य वाटत आहे. अपराधी माणसाचा बचाव करण्यासाठी हिंदी लोक आपल्याला प्रिय असणाऱ्या सर्व गोष्टींचा त्याग करावयास सिद्ध होतील असे आपण मानणार नाही, अशी मला खात्री वाटते. शिवाय, खुशीने नोंदणी करण्याचे तत्त्व हिंदी लोकांनी मान्य केले आहे. यावरून गुन्हेगारांना संरक्षण देण्याचा हिंदी समाजाचा हेतू नाही, हे सिद्ध होते.

[आपला
इसाप इस्माईल मियाँ,
अध्यक्ष,
ब्रिटिश इंडियन असोसिएशन]

इंडियन ओपिनिअन, २८-९-१९०७

२००. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

ता. २५ सप्टेंबर, १९०७

"प्लेग कचेरीचा दौरा"

परवाना-कचेरी—छे, छे, "प्लेग-कचेरी" असे म्हटले पाहिजे—बॉक्सबर्ग-मोवर्नी फिरून आली. पण एका हिंदी कैयाम्बेराज दुसरे कोणतेही सावज तिला गवसले नाही. "लीडर" व "रॅन्ड डेली मेल" यांचे बातमीदार कळवितात की, तेथील हिंदी लोकांचे नीति-धैर्य अत्यंत उच्च प्रतीचे होते. तेथील निरोधक खंबीर होते आणि परवाना-कचेरीकडे जाऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक हिंदी माणसाचे मन वळवीत होते. काही हिंदी लोक कचेरीपर्यंत जाऊन पोहोचले होते. पण जेव्हा त्यांना आपले

१. मागील लेख पाहा.

भवितव्य कळून चुकले, तेव्हा ते आपली अब्रू न गमावता परतले. हे पत्र प्रसिद्ध होईपर्यंत ती कचेरी जर्मिस्टनला गेलेली असेल. तेथे परवान्यासाठी एकही हिंदी माणूस अर्ज करण्याचा अणुमात्र संभव नाही.

हमीदियाची सभा

जसजसे दिवस जात आहेत, तसतसे जोहान्सबर्गला "प्लेगने" भेट देण्याचा काळ समीप येत आहे. म्हणून हमीदिया इस्लामिया अंजुमनने एक प्रचंड सभा गेल्या रविवारी भरविली होती. सर्व सभागृह तुडुंब भरले होते. अध्यक्षस्थानी श्री. इमाम अब्दुल कादिर होते. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी[1] यांनी पाठवलेली तार[2] श्री. गांधींनी वाचून दाखविली आणि परिस्थिती समजावून सांगितली. (ते म्हणाले) "विराट निवेदनावर अत्यंत त्वरेने सह्या घ्याव्यात, त्यासाठी स्वयंसेवक जमवावेत. परवाना-कचेरीवर निरोधन करण्यासाठी नेमलेल्या स्वयंसेवकांनी आपले काम अत्यंत काळजीने व सोशिकपणाने करावे. कोणावर खेकसणे किंवा हात टाकणे हे त्यांना शोभणार नाही." नंतर श्री. इसाप मिया यांनी श्री. गिप्सन यांच्याशी झालेल्या आपल्या मुलाखतीचा वृत्तांत सांगितला, आणि ते म्हणाले, "त्यांच्या किंवा दुसऱ्या कोणा गोऱ्यांच्या सल्ल्यावर आपण विसंबून राहता कामा नये." मौलवीसाहेब अहम्मद मुख्तियार यांनी मोठे आवेशपूर्ण भाषण केले आणि कुराणातील वचने म्हणून दाखविली. त्यांचा अर्थ असा की, ईश्वराचे शत्रु किंवा आपले शत्रु यांच्यावर श्रद्धाळू माणसाने विश्वास ठेवू नये. ते म्हणाले, "सध्या गोरे लोक शत्रूचे काम करीत आहेत. म्हणून नांव नोंदविण्याच्या त्यांच्या सल्ल्यावर आपण विश्वास ठेवू नये. हजरत मूसा-सारख्या पैगंबरांना एक लाख माणसांसह १२ वर्षे कष्ट सोसावे लागले. त्यानंतरच त्यांना सुख मिळाले. तसेच, हिंदी समाजाला कष्ट भोगल्यानंतरच सुख मिळेल. शिवाय, पैगंबर मूसा यांनी केवळ ईश्वरावर श्रद्धा ठेवून फीरोजवर हल्ला केला. तसेच हिंदी समाजाने ईश्वरावर श्रद्धा ठेवून आपल्या प्रतिज्ञेचे पालन केले पाहिजे. आपला नांव-लौकिक व आपली श्रद्धा यासाठी कोणी आपले संपत्ति-सर्वस्व गमावले म्हणून काय झाले?"

नंतर अध्यक्ष आपल्या भाषणात म्हणाले, "सध्या आपल्याला प्रो. गोखले व बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्यासारख्या हिंदुस्थानातील थोर गृहस्थांकडून उत्तेजनपर तारा येत आहेत. पण आणीबाणीच्या वेळी आपण जर कच खाल्ली तर साऱ्या हिंदुस्थानच्या क्रोधाला आपल्याला तोंड द्यावे लागेल." सभेत असे जाहीर करण्यात

१. (१८४८—१९२५) वक्ते व मुत्सद्दी, हिंदी राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष (१८९५ व १९०२), पाहा : खंड १, पृ. ३३३.

२. "सुरेंद्रनाथ बानर्जींना तार" लेख २०१ पाहा.

आले की, ट्रान्सवॉलमध्ये राहणारे तुर्कस्तानचे मुसलमान प्रजाजन एक अर्ज पाठविण्याचा विचार करीत आहेत, श्री. नवाबखाँ[1] यांनी स्वयंसेवकांसंबंधी भाषण केले. क्लार्क-डॉर्प्सचे श्री. पटेल सभेस आले होते. त्यांनी असे आश्वासन दिले की, आमच्या शहरातून योग्य वेळी सह्या मिळतील. श्री. अस्वात यांनी सांगितले की, "रमझानचा महिना आणि परवाने घेण्याचा महिना एकाच वेळी येत आहेत–म्हणून एका बाजूला मुस्लीम लोक पवित्र उपोषण करीत आहेत आणि दुसरीकडे आपल्या हाता–तोंडाला काळे फासून आपली श्रद्धा गमावीत आहेत—असे होऊ देता कामा नये."

सरकारची उत्कंठा

हिंदी समाजाने नोंदणी करून घ्यावी अशी सरकारला तीव्र उत्कंठा लागल्याचे दिसते. यामुळे आपल्याला चिंता वाटेल, पण त्याबरोबरच आपल्याला धैर्यही प्राप्त होईल. आपण हे करावे अशी उत्कंठा सरकारला इतकी लागली आहे म्हणून आपल्याला चिंता वाटेल, तर सरकारच्या उत्कंठेतून त्यांची भीती प्रकट होत असल्याने आपल्याला धीर येईल. सरकारचे हृदय कितीही कठीण असले, तरी साऱ्या हिंदी लोकांना हद्पार करणे किंवा त्यांचे परवाने हिरावून घेणे सरकारला अशक्य आहे. बेलफास्टच्या मॅजिस्ट्रेटला सरकारने जे पत्र पाठवले, त्याची प्रत श्री. सालेजी यांनी पाठविली आहे. त्या पत्रावरून असे दिसते की, ज्यांनी आतापर्यंत आपले नाव नोंदवले नसेल, अशा हिंदी लोकांनी ऑक्टोबरमध्ये जोहान्सबर्गला जाऊन तेथे गुलाम-गिरीचे पट्टे घ्यावेत, असे हिंदी लोकांना कळविण्याविषयी मॅजिस्ट्रेटना हुकूम सुटले आहेत. भीतीचे दुसरे कोणते चिन्ह असू शकेल ?

जनरल बोथा यांचा गैरसमज

बोटांच्या ठशांविरुद्ध इतकी चळवळ करणे हिंदी समाजाच्या दृष्टीने सयुक्तिक नाही, असे ज. बोथा म्हणतात. यावरूनही असे दिसते की, हिंदी लोक खंबीर राहिले तर आपण काय करू याची कल्पना खुद्द सरकारला नाही. तथापि, तो गैरसमज दूर करण्यासाठी, श्री. इसाप मियाँ यांनी असोसिएशनच्या वतीने पुढील पत्र पाठविले आहे.[2]

बाबू सुरेंद्रनाथांची तार

कलकत्त्याहून बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी पाठविलेली तार पुढीलप्रमाणे आहे :

आपले कष्ट, लढे, याविषयी बंगालला कळकळीची सहानुभूती वाटते. यश चिंतितो.

१. "नवाबदाख" असे मुळात आहे.

२. "पंतप्रधानांच्या सचिवास पत्र" याचे भाषांतर मुळात यापुढे दिलेले आहे. पाहा लेख १९८.

या तारेमुळे मोठा हर्ष उत्पन्न झाला आहे. बाबू सुरेंद्रनाथ बंगाली विद्यार्थ्यांचे दैवत आहे. गेली २५ वर्षे ते हिंदी लोकांचा लढा खेळत आहेत. आय्. सी. एस्च्या नोकरीत जाणारे ते बहुधा पहिले गृहस्थ होत. रिपन कॉलेजचे ते प्रमुख आहेत आणि "बंगाली" या सुप्रसिद्ध वृत्तपत्राचे मालक आहेत. कलकत्ता येथील ब्रिटिश इंडियन असोसिएशनचे ते कैक वर्षे चिटणीस आहेत. हिंदी राष्ट्रीय काँग्रेसच्या पुणे व अहमदाबाद येथील अधिवेशनांचे ते अध्यक्ष होते. त्यांच्याइतके प्रभावी वक्ते हिंदुस्थानात फारच थोडे आहेत. त्यांचा आवाज इतका शक्तिमान आहे की १०,००० लोकांच्या सभेतही शेवटच्या टोकापर्यंतही तो ऐकू जातो. स्वदेशी चळवळीत त्यांनी मोठा भाग घेतला आहे. हिंदुस्थानातून अशा तारा येत आहेत हा एक मोठा शुभशकुन मानला पाहिजे.

बेइमानांचा कळप

बेइमान लोकांची संख्या हळूहळू वाढत आहे. श्री....[1] यांनी दीक्षा घेतली आहे. या लोकांनी बांगड्या भरणेच योग्य होईल असे मला वाटते.

स्टॉकेन्स्ट्रूम

हायडेलबर्ग येथे भाषण करताना श्री. स्टॉकेन्स्ट्रूम म्हणाले, "हिंदी लोकांनी आपली नावे नोंदली नाहीत तर त्यांना परवाने देऊ नयेत. आता बुरखा निघून गेला आहे. प्रथम ते तुरुंगाची भाषा बोलत होते. तुरुंगाच्या जागी हद्दपारी आली. आता ते परवान्याची भाषा बोलत आहेत. परवाने गमावण्याची भीती हिंदी लोकांनी सोडून दिली तर श्री. बोथा काय करणार!"

नेसर

क्रार्क्सडॉर्प येथे श्री. नेसर हे श्री. स्टॉकेन्स्ट्रूम यांच्याच सुरात बोलले. बोटांच्या ठशांविरुद्ध चाललेल्या लढ्याचा धिक्कार करून ते म्हणाले, 'येथे चोरून आलेल्या लोकांचे रक्षण करण्यासाठी हिंदी समाज लढत आहे. त्या समाजाने आपला लढा असाच चालू ठेवला तर सरकार व्यापारी परवाने देण्याचे थांबवील.' या धमकीचे आम्हांला काही वाटत नाही. कारण भुंकणारी कुत्री क्वचितच चावतात, हे हिंदी समाजाला माहीत आहे. म्हणून तो अशा धमक्या जसजशा जास्त येतील, तसतसा अधिक निर्भय बनत आहे. पण श्री. नेसरसारख्या लोकांच्या अज्ञानाचा आपण थोडा विचार केला पाहिजे. कारण आपण केवळ बोटांच्या ठशांसाठीच लढत आहोत असा गैरसमज, कशाने का होईना, अद्याप कायम आहे. म्हणून श्री. इसोपमियाँ यांनी

१. यानंतर मुळात ५ नावे दिली आहेत.

पुढील उत्तर पाठविले आहे. श्री. नेसर यांचे भाषण उद्‌धृत करून श्री. इसापमियाँ म्हणतात[1] :

विल्यम् वान हलस्टेन

सर विल्यम वान हलस्टेन यांनी आपल्या एका भाषणात असे म्हटले होते की, हिंदी लोक केवळ बोटांच्या ठशांकरिता लढत आहेत. त्यांचे लक्ष वेधण्यासाठी, ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या चिटणिसांनी पुढील आशयाचे पत्र[2] लिहिले आहे.

हिंदी लोकांचा लढा समग्र कायद्याशी आहे— केवळ बोटांच्या ठशांशी नाही. सक्तीने हा कायदा स्वीकारणे म्हणजे गुलामगिरी पत्करणे होय, असे हिंदी लोकांना वाटते. म्हणून ते गुलामगिरी पत्करण्यापेक्षा आपले सर्वस्व गमावण्यास तयार आहेत. हा काही बोटांचे ठसे देण्याचा प्रश्न नाही. सरकार आम्हांला ज्या शिक्षांची भीती घालीत आहे, त्याची आम्हांला पूर्ण जाणीव आहे. या कायद्याची कडक रीतीने अमलबजावणी करण्याने सरकाराची कीर्ती वाढेल की अकारण कष्ट सोसल्याने हिंदी लोकांचा लौकिक वाढेल हे आता पाहावयाचे आहे.

चुकीची दुरुस्ती

पीटर्सबर्ग येथील " शूर लोकांवर " मी जी टीका केली, त्यासंबंधी तेथील एक प्रमुख गृहस्थ लिहितात की, पीटर्सबर्गच्या त्या सुप्रसिद्ध अर्जावर तुम्ही उल्लेखिलेल्या माणसांच्या सह्या नाहीत. कारण ते तेव्हा बाहेर गेले होते. माझ्या चुकीबद्दल मला दुःख होते. तथापि, ज्यांनी आपले हात काळे करून घेतले, त्या गृहस्थांना क्षमा करणे शक्य नाही. फक्त त्यांचा अपराध जितका मोठा वाटला तितका नाही. वरील पत्रावरून मी असे अनुमान काढतो की, त्या अर्जावर ज्यांनी सह्या केल्या ते लोक गुलामगिरीच्या पट्ट्याला स्पर्शही करणार नाहीत.

जर्मिस्टन येथील लढाई

परवाना-कचेरीने जर्मिस्टन येथे तळ दिला आहे. त्यामुळे तेथील हिंदी लोकांत खळबळ उडाली आहे. आतापर्यंत (बुधवारपर्यंत) त्यांनी आपला उद्योगधंदा सोडून स्वयंसेवकाचे काम करण्यास सुरुवात केली आहे. जर्मिस्टनच्या एकाही माणसाने अर्ज केला नाही. हॉटेलांतील नोकरांनीही अर्ज करण्याचे नाकारले. प्रिटोरियातील कासीम नावाच्या एका मद्राशाने स्वयंसेवकांचा उपदेश झिडकारून आपले नाव नोंदविले. पांच मेमन तेथे गेले, पण स्वयंसेवकांचा उपदेश मानून त्यांनी " वीणा वाजविण्याची "

१. " जे. ए. नेसर यांना पत्र " याचे भाषांतर मुळात यापुढे दिले आहे. पाहा, लेख १९९.
२. पाहा : " डब्ल्यू. व्ही. हलस्टेन यांना पत्र " लेख १८७.

(स्वतःचे नांव नोंदविण्याची) कल्पना सोडून दिली. जर्मिस्टन येथील स्वयंसेवकांचा उत्साह अपूर्व असल्याने त्यांना आवरणे अवश्य होते. आता जरूर तितकेच स्वयंसेवक तेथे काम करीत आहेत, आणि तेही नम्रतेने व शांततेने.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २८-९-१९०७

२०१. सुरेंद्रनाथ बानर्जी यांना तार[१]

[जोहान्सबर्ग,
ता. २५ सप्टेंबर, १९०७ नंतर]

हिंदी लोकांचे धन्यवाद, कर्तव्य बजावू.

(ब्रिटिश भारतीय संघ)

इंडियन ओपिनियन, २८-९-१९०७

२०२. हिंदुस्थानचे साहाय्य

ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या जीवनमरणाच्या लढ्याशी सहानुभूती दाखविण्यात ना. प्रो. गोखले यांचे अनुकरण ना. सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी तत्काळ केले. हिंदी लोकांच्या विश्वसनीय प्रतिनिधींच्या तारा येणे ही काही लहानसान गोष्ट नाही. त्या दोघांनी हिंदुस्थानच्या कार्यासाठी आपली जीविते समर्पित केली आहेत आणि हिंदुस्थानावर त्यांचा प्रभाव अतुल्य आहे, म्हणून ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांचा प्रश्न हा लवकरच हिंदी राजकारणामध्ये प्रमुख स्थान संपादन करील असे मानणे योग्य आहे.

१. सुरेंद्रनाथ बानर्जींच्या तारेला (लेख २००) हे उत्तर आहे.

लॉर्ड अॅम्पथिल यांनी परवा जे सांगितले ते सत्य आहे. ते म्हणाले, दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या दुःखाइतक्या दुसऱ्या कशानेही हिंदी लोकांच्या भावना तीव्रतेने दुखविल्या गेल्या नाहीत. हिंदुस्थानहून येणाऱ्या प्रोत्साहनाची आपल्याला गरज आहे. या प्रश्नासंबंधी हिंदुस्थानात पक्षभेद नाहीत, मतभेद नाहीत. हिंदू, मुसलमान, पार्शी आणि ख्रिश्चन या सर्वांना ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या अत्यंत दुःखदायक व अपमानास्पद परिस्थितीची जाणीव सारखीच आहे. हिंदी लोकांसारखेच अँग्लो इंडियन लोकांचे मत आहे, कलकत्त्याचा 'इंग्लिशमन्' आणि मुंबईचा 'टाइम्स ऑफ इंडिया' यांच्याइतके कडक दुसऱ्या कोणीच लिहिले नाही. म्हणून हिंदुस्थानातील विविध संस्था आणि नानाविध मतांची पत्रे या सर्वांची शक्ती एकत्रित करून त्या सर्वांचे भरीव वजन लाड मिंटो यांच्यावर पाडणे, याचीच आता गरज आहे. तसे झाले म्हणजे हिंदी लोकांचा प्रश्न, न्याय व मानवता यांना धरून, सुटल्याशिवाय राहणार नाही.

इंडियन ओपिनियन, २८-९-१९०७

२०३. स्वयंसेवकांचे कर्तव्य

जोहान्सबर्गमधील हिंदी लोकांची कसोटी लवकरच लागणार आहे. तेथील आशियावासीयांची नोंदणी करण्याच्या नोंदणी-कचेरीच्या प्रयत्नास किती फळ येते यावरून आशियावासी कायद्याच्या बाबतीत अखेरची कृती काय घडणार हे ठरेल, या-विषयी मुळीच शंका नाही. ट्रान्सवॉलमधील आशियावासी लोकांपैकी सुमारे निम्मे लोक जोहान्सबर्गमध्ये आहेत. नानाविध अशा सर्व आशियावासी जमाती तेथे बहुसंख्येने दिसून येतात. जर ते लोक आशियावासी कायद्याला विरोध करण्यात खंबीर राहिले तर त्यामुळे स्थानिक सरकारला त्या परिस्थितीचा गंभीर विचार करावा लागेल. नाणे-बाजार इतका तंग असताना प्रस्तुत काळी तुरुंग बांधणे ही काही चेष्टा नव्हे. मग सरकार कितीही धमक्या देवो, हजारो निरपराध माणसांना हद्दपार करणे व्यवहार्य राजकारणात बसत नाही. कारण, त्यामुळे ज. बोथा व स्मट्स यांच्याही विवेक-बुद्धीला धक्का बसेल. म्हणून आता आपल्याला आशियावासीयांचे परवाने दिले जाणार नाहीत अशी धमकी मिळालेली आहे. पण अशी गोष्ट शक्य झाली तर सरकार स्वतःलाच मूर्ख ठरवील. कारण, त्यामुळे बहुसंख्य आशियावासी लोकांना स्पर्श होणार नाही. म्हणून जोहान्सबर्गमधील आशियावासी लोक जी कृती करतील,

तीवरून या प्रश्नाचा निकाल मुख्यतः होईल. यामुळे जोहान्सबर्ग येथील प्रमुख हिंदी लोक आणि इतर प्रमुख आशियावासी लोक यांच्या शिरावर अत्यंत गंभीर व अत्यंत मोठी जबाबदारी येऊन पडली आहे.

हिंदी स्वयंसेवकांच्या व कार्यकर्त्यांच्या कार्यामुळे नोंदणी–कचेरीवरील बहिष्कार आतापर्यंत अत्यंत यशस्वी झाला आहे, हे कोणीच नाकारू शकणार नाही. त्यांनी आपले कार्य शांतपणे, समंजसपणे व गाजावाजा न करता केले. जोहान्सबर्गमध्ये उपद्रव बरेच आहेत. सेवेचे कार्य करण्यासाठी जे स्वेच्छेने पुढे आले, त्यांच्यापैकी काहीजण म्हणजे नुसते आगीचे लोळ आहेत. जोहान्सबर्गमधील हिंदी लोकांमध्ये सर्व वर्गांची माणसे आहेत. म्हणून आम्ही हिंदी स्वयंसेवकांना असा इशारा देतो की, कोणतीही घाई करू नका आणि क्रोधाचे प्रदर्शन करू नका. शारीरिक हिंसा तर पूर्णपणे निपटली पाहिजे— आणि तशीच कडक भाषाही. आशियावासी कायद्याचे जोखड फेकून देण्यास जे लोक उत्सुक आहेत, ते अज्ञानाने धमकी किंवा दमदाटी देण्याचे अधिक भयंकर जोखड न लादण्यास तितकेच उत्सुक असले पाहिजेत. हा कायदा आपल्याला अपमानास्पद आहे आणि आपल्या पौरुषाचे अपहरण करणारा आहे, अशी खात्री जर हिंदी लोकांना पटली असेल, तर ज्यांना ते माहीत नाही त्यांना ते समजावून देणे एवढेच कार्य त्यांनी करावयाचे आहे. ते त्यांनी पार पाडले की त्यांचे कर्तव्य संपले. मग नोंदणीसाठी अर्ज करू पाहणाऱ्या माणसाला निवड करण्याचे स्वातंत्र्य त्यांनी द्यावे. या कायद्यातील गुलामगिरीच्या अटी पत्करण्याचे त्याने ठरवले, तर त्यामुळे हानी त्याचीच होईल-- समाजाची नव्हे.

इंडियन ओपिनियन, २८–९–१९०७

२०४. जनरल बोथा व आशियायी कायदा

ट्रान्सवॉलचे पंतप्रधान यांच्या लंडनच्या संस्मरणीय भेटीमध्ये सेसिल हॉटेलात (हिंदी लोकांचे) शिष्टमंडळ त्यांना भेटले, तेव्हा ते त्याच्याशी गोड व नम्रपणे पण निःसंकोचपणे बोलले. पण आशियावासीयांचा खरा लढा कशासाठी आहे हे आपल्याला माहीत नाही, असे आत ही ते म्हणत आहेत. यामुळे मन अस्वस्थ होते. त्यांचे मत असे की, केवळ बोटांच्या ठशांच्या प्रश्नासाठी ट्रान्सवॉलमधील आशियावासी लोकांनी प्रचंड प्रमाणावर चळवळ करायला काही कारण नाही. हे त्यांचे मत बरोबर आहे. पण

ही चळवळ बोटांच्या ठशाला असलेल्या विरोधातून निघालेली आहे, हा जनरल बोथा यांचा समज चुकीचा आहे. त्यावरून हिंदी लोकांच्या भूमिकेबद्दल त्यांचे किती गाढ अज्ञान आहे, हे दिसून येते. १९०६ साली हा कायदा प्रथम पुढे आला तेव्हा ब्रिटिश इंडियन असोसिएशनने त्यावर आक्षेप[१] घेतले. त्यांतील काही आक्षेप त्या संस्थेने जनरल बोथा यांच्याकडे ताबडतोब पाठवले. हे आक्षेप जर केवळ बोटांचे ठसे देण्याबद्दलच असते, तर ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना सर्व जगाची सहानुभूती मिळणे शक्य होते काय, याचा विचार करण्याची तसदीही या शूर जनरलने घेतली नाही. आपल्या धार्मिक भावना, आपला दर्जा आणि अपमानास्पद असा वर्गीय कायदा यासंबंधी हिंदी समाजाने जे अत्यंत महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले, त्यांकडे कानाडोळा करणे ट्रान्सवॉलमधील मुत्सद्द्यांना सोयीचे असेल; पण तसा कानाडोळा सतत केल्याने तीव्र असंतोष निर्माण होईल आणि आशियावासींचा विरोध अधिक कडवा बनेल. आतांचे त्यांचे धैर्य निराशेतून निघालेले आहे. आपले सर्वस्व हिरावून घेतले जाईल, ही कल्पना आता त्यांच्या अंगवळणी पडली आहे. म्हणून ट्रान्सवॉल सरकारने किमान पक्षी हिंदी लोकांच्या विरोधाची वास्तव रीतीने छाननी करणे शहाणपणाचे व समंजसपणाचे होईल. त्या बाबतीत त्यांनी आपले डोळे झाकून घेणे योग्य नाही.

इंडियन ओपिनिअन, २८–९–१९०७

२०५. हिंदी फेरीवाल्यांविरुद्ध मोहीम

फेरीवाल्यांनी द्यावयाची परवाना-फी वाढविण्याच्या सूचनेवर नाताळच्या विधिमंडळात जो वाद झाला, तो अत्यंत उद्‌बोधक आहे. नाताळमधील फेरीवाल्यांनी द्यावयाच्या फीमध्ये भरमसाट वाढ होण्याच्या प्रश्नाकडे कोणीच लक्ष दिलेले नाही. कारण, फेरीवाल्याचा धंदा हा मुख्यतः आशियावासीयांचा आहे. न्यायमंत्री तर म्हणाले, "या देशात फेरीवाल्याचा धंदा गोऱ्या लोकांना योग्य व्यवसाय नाही." बिगर-गोऱ्या लोकांच्या प्रश्नाकडे पाहण्याच्या या वृत्तीनेच, कट्टे आशियावासी-विरोधक श्री. हॅगर यांनी असा ठराव मांडला की, "नाताळ सरकारच्या रेल्वेतील ज्या जागांवर बहुधा गोरे लोक नेमले जातात, तेथे आशियावासीयांना नेमणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने

१. पाहा, "पंतप्रधानांच्या सचिवास पत्र" लेख १९८.

तीवरून या प्रश्नाचा निकाल मुख्यतः होईल. यामुळे जोहान्सबर्ग येथील प्रमुख हिंदी लोक आणि इतर प्रमुख आशियावासी लोक यांच्या शिरावर अत्यंत गंभीर व अत्यंत मोठी जबाबदारी येऊन पडली आहे.

हिंदी स्वयंसेवकांच्या व कार्यकर्त्यांच्या कार्यामुळे नोंदणी-कचेरीवरील बहिष्कार आतापर्यंत अत्यंत यशस्वी झाला आहे, हे कोणीच नाकारू शकणार नाही. त्यांनी आपले कार्य शांतपणे, समंजसपणे व गाजावाजा न करता केले. जोहान्सबर्गमध्ये उपद्रव बरेच आहेत. सेवेचे कार्य करण्यासाठी जे स्वेच्छेने पुढे आले, त्यांच्यापैकी काहीजण म्हणजे नुसते आगीचे लोळ आहेत. जोहान्सबर्गमधील हिंदी लोकांमध्ये सर्व वर्गांची माणसे आहेत. म्हणून आम्ही हिंदी स्वयंसेवकांना असा इशारा देतो की, कोणतीही घाई करू नका आणि क्रोधाचे प्रदर्शन करू नका. शारीरिक हिंसा तर पूर्णपणे निपटली पाहिजे— आणि तशीच कडक भाषाही. आशियावासी कायद्याचे जोखड फेकून देण्यास जे लोक उत्सुक आहेत, ते अज्ञानाने धमकी किंवा दमदाटी देण्याचे अधिक भयंकर जोखड न लादण्यास तितकेच उत्सुक असले पाहिजेत. हा कायदा आपल्याला अपमानास्पद आहे आणि आपल्या पौरुषाचे अपहरण करणारा आहे, अशी खात्री जर हिंदी लोकांना पटली असेल, तर ज्यांना ते माहीत नाही त्यांना ते समजावून देणे एवढेच कार्य त्यांनी करावयाचे आहे. ते त्यांनी पार पाडले की त्यांचे कर्तव्य संपले. मग नोंदणीसाठी अर्ज करू पाहणाऱ्या माणसाला निवड करण्याचे स्वातंत्र्य त्यांनी द्यावे. या कायद्यातील गुलामगिरीच्या अटी पत्करण्याचे त्याने ठरवले, तर त्यामुळे हानी त्याचीच होईल— समाजाची नव्हे.

इंडियन ओपिनियन, २८-९-१९०७

२०४. जनरल बोथा व आशियायी कायदा

ट्रान्सवॉलचे पंतप्रधान यांच्या लंडनच्या संस्मरणीय भेटीमध्ये सेसिल हॉटेलात (हिंदी लोकांचे) शिष्टमंडळ त्यांना भेटले, तेव्हा ते त्याच्याशी गोड व नम्रपणे पण निःसंकोचपणे बोलले. पण आशियावासीयांचा खरा लढा कशासाठी आहे हे आपल्याला माहीत नाही, असे आत ही ते म्हणत आहेत. यामुळे मन अस्वस्थ होते. त्यांचे मत असे की, केवळ बोटांच्या ठशांच्या प्रश्नासाठी ट्रान्सवॉलमधील आशियावासी लोकांनी प्रचंड प्रमाणावर चळवळ करायला काही कारण नाही. हे त्यांचे मत बरोबर आहे. पण

ही चळवळ बोटांच्या ठशाला असलेल्या विरोधातून निघालेली आहे, हा जनरल बोथा यांचा समज चुकीचा आहे. त्यावरून हिंदी लोकांच्या भूमिकेबद्दल त्यांचे किती गाढ अज्ञान आहे, हे दिसून येते. १९०६ साली हा कायदा प्रथम पुढे आला तेव्हा ब्रिटिश इंडियन असोसिएशनने त्यावर आक्षेप[1] घेतले. त्यांतील काही आक्षेप त्या संस्थेने जनरल बोथा यांच्याकडे ताबडतोब पाठवले. हे आक्षेप जर केवळ बोटांचे ठसे देण्याबद्दलच असते, तर ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना सर्व जगाची सहानुभूती मिळणे शक्य होते काय, याचा विचार करण्याची तसदीही या शूर जनरलने घेतली नाही. आपल्या धार्मिक भावना, आपला दर्जा आणि अपमानास्पद असा वर्गीय कायदा यासंबंधी हिंदी समाजाने जे अत्यंत महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले, त्यांकडे कानाडोळा करणे ट्रान्सवॉलमधील मुत्सद्द्यांना सोयीचे असेल; पण तसा कानाडोळा सतत केल्याने तीव्र असंतोष निर्माण होईल आणि आशियावासींचा विरोध अधिक कडवा बनेल. आतांचे त्यांचे धैर्य निराशेतून निघालेले आहे. आपले सर्वस्व हिरावून घेतले जाईल, ही कल्पना आता त्यांच्या अंगवळणी पडली आहे. म्हणून ट्रान्सवॉल सरकारने किमान पक्षी हिंदी लोकांच्या विरोधाची वास्तव रीतीने छाननी करणे शहाणपणाचे व समंजसपणाचे होईल. त्या बाबतीत त्यांनी आपले डोळे झाकून घेणे योग्य नाही.

इंडियन ओपिनिअन, २८–९–१९०७

२०५. हिंदी फेरीवाल्यांविरुद्ध मोहीम

फेरीवाल्यांनी द्यावयाची परवाना—फी वाढविण्याच्या सूचनेवर नाताळच्या विधिमंडळात जो वाद झाला, तो अत्यंत उद्बोधक आहे. नाताळमधील फेरीवाल्यांनी द्यावयाच्या फीमध्ये भरमसाट वाढ होण्याच्या प्रश्नाकडे कोणीच लक्ष दिलेले नाही. कारण, फेरीवाल्याचा धंदा हा मुख्यतः आशियावासीयांचा आहे. न्यायमंत्री तर म्हणाले, " या देशात फेरीवाल्याचा धंदा गोऱ्या लोकांना योग्य व्यवसाय नाही. " बिगर-गोऱ्या लोकांच्या प्रश्नाकडे पाहण्याच्या या वृत्तीनेच, कट्टे आशियावासी-विरोधक श्री. हॅगर यांनी असा ठराव मांडला की, " नाताळ सरकारच्या रेल्वेतील ज्या जागांवर बहुधा गोरे लोक नेमले जातात, तेथे आशियावासीयांना नेमणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने

१. पाहा, " पंतप्रधानांच्या सचिवास पत्र " लेख १९८.

तीवरून या प्रश्नाचा निकाल मुख्यतः होईल. यामुळे जोहान्सबर्ग येथील प्रमुख हिंदी लोक आणि इतर प्रमुख आशियावासी लोक यांच्या शिरावर अत्यंत गंभीर व अत्यंत मोठी जबाबदारी येऊन पडली आहे.

हिंदी स्वयंसेवकांच्या व कार्यकर्त्यांच्या कार्यामुळे नोंदणी-कचेरीवरील बहिष्कार आतापर्यंत अत्यंत यशस्वी झाला आहे, हे कोणीच नाकारू शकणार नाही. त्यांनी आपले कार्य शांतपणे, समंजसपणे व गाजावाजा न करता केले. जोहान्सबर्गमध्ये उपद्रव बरेच आहेत. सेवेचे कार्य करण्यासाठी जे स्वेच्छेने पुढे आले, त्यांच्यापैकी काहीजण म्हणजे नुसते आगीचे लोळ आहेत. जोहान्सबर्गमधील हिंदी लोकांमध्ये सर्व वर्गांची माणसे आहेत. म्हणून आम्ही हिंदी स्वयंसेवकांना असा इशारा देतो की, कोणतीही घाई करू नका आणि क्रोधाचे प्रदर्शन करू नका. शारीरिक हिंसा तर पूर्णपणे निपटली पाहिजे— आणि तशीच कडक भाषाही. आशियावासी कायद्याचे जोखड फेकून देण्यास जे लोक उत्सुक आहेत, ते अज्ञानाने धमकी किंवा दमदाटी देण्याचे अधिक भयंकर जोखड न लादण्यास तितकेच उत्सुक असले पाहिजेत. हा कायदा आपल्याला अपमानास्पद आहे आणि आपल्या पौरुषाचे अपहरण करणारा आहे, अशी खात्री जर हिंदी लोकांना पटली असेल, तर ज्यांना ते माहीत नाही त्यांना ते समजावून देणे एवढेच कार्य त्यांनी करावयाचे आहे. ते त्यांनी पार पाडले की त्यांचे कर्तव्य संपले. मग नोंदणीसाठी अर्ज करू पाहणाऱ्या माणसाला निवड करण्याचे स्वातंत्र्य त्यांनी द्यावे. या कायद्यातील गुलामगिरीच्या अटी पत्करण्याचे त्याने ठरवले, तर त्यामुळे हानी त्याचीच होईल-- समाजाची नव्हे.

इंडियन ओपिनियन, २८-९-१९०७

२०४. जनरल बोथा व आशियायी कायदा

ट्रान्सवॉलच्या पंतप्रधान यांच्या लंडनच्या संस्मरणीय भेटीमध्ये सेसिल हॉटेलात (हिंदी लोकांचे) शिष्टमंडळ त्यांना भेटले, तेव्हा ते त्यांच्याशी गोड व नम्रपणे पण निःसंकोचपणे बोलले. पण आशियावासीयांचा खरा लढा कशासाठी आहे हे आपल्याला माहीत नाही, असे आतही ते म्हणत आहेत. यामुळे मन अस्वस्थ होते. त्यांचे मत असे की, केवळ बोटांच्या ठशांच्या प्रश्नासाठी ट्रान्सवॉलमधील आशियावासी लोकांनी प्रचंड प्रमाणावर चळवळ करायला काही कारण नाही. हे त्यांचे मत बरोबर आहे. पण

ही चळवळ बोटांच्या ठशाला असलेल्या विरोधातून निघालेली आहे, हा जनरल बोथा यांचा समज चुकीचा आहे. त्यावरून हिंदी लोकांच्या भूमिकेबद्दल त्यांचे किती गाढ अज्ञान आहे, हे दिसून येते. १९०६ साली हा कायदा प्रथम पुढे आला तेव्हा ब्रिटिश इंडियन असोसिएशनने त्यावर आक्षेप[1] घेतले. त्यांतील काही आक्षेप त्या संस्थेने जनरल बोथा यांच्याकडे ताबडतोब पाठवले. हे आक्षेप जर केवळ बोटांचे ठसे देण्याबद्दलच असते, तर ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना सर्व जगाची सहानुभूती मिळणे शक्य होते काय, याचा विचार करण्याची तसदीही या शूर जनरलने घेतली नाही. आपल्या धार्मिक भावना, आपला दर्जा आणि अपमानास्पद असा वर्गीय कायदा यासंबंधी हिंदी समाजाने जे अत्यंत महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले, त्यांकडे कानाडोळा करणे ट्रान्सवॉलमधील मुत्सद्द्यांना सोयीचे असेल; पण तसा कानाडोळा सतत केल्याने तीव्र असंतोष निर्माण होईल आणि आशियावासींचा विरोध अधिक कडवा बनेल. आतांचे त्यांचे धैर्य निराशेतून निघालेले आहे. आपले सर्वस्व हिरावून घेतले जाईल, ही कल्पना आता त्यांच्या अंगवळणी पडली आहे. म्हणून ट्रान्सवॉल सरकारने किमान पक्षी हिंदी लोकांच्या विरोधाची वास्तव रीतीने छाननी करणे शहाणपणाचे व समंजसपणाचे होईल. त्या बाबतीत त्यांनी आपले डोळे झाकून घेणे योग्य नाही.

इंडियन ओपिनिअन, २८–९–१९०७

२०५. हिंदी फेरीवाल्यांविरुद्ध मोहीम

फेरीवाल्यांनी द्यावयाची परवाना—फी वाढविण्याच्या सूचनेवर नाताळच्या विधिमंडळात जो वाद झाला, तो अत्यंत उद्बोधक आहे. नाताळमधील फेरीवाल्यांनी द्यावयाच्या फीमध्ये भरमसाट वाढ होण्याच्या प्रश्नाकडे कोणीच लक्ष दिलेले नाही. कारण, फेरीवाल्यांचा धंदा हा मुख्यतः आशियावासीयांचा आहे. न्यायमंत्री तर म्हणाले, "या देशात फेरीवाल्याचा धंदा गोऱ्या लोकांना योग्य व्यवसाय नाही." बिगर-गोऱ्या लोकांच्या प्रश्नाकडे पाहण्याच्या या वृत्तीनेच, कट्टे आशियावासी-विरोधक श्री. हॅगर यांनी असा ठराव मांडला की, "नाताळ सरकारच्या रेल्वेतील ज्या जागांवर बहुधा गोरे लोक नेमले जातात, तेथे आशियावासीयांना नेमणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने

१. पाहा, "पंतप्रधानांच्या सचिवास पत्र" लेख १९८.

तीवरून या प्रश्नाचा निकाल मुख्यतः होईल. यामुळे जोहान्सबर्ग येथील प्रमुख हिंदी लोक आणि इतर प्रमुख आशियावासी लोक यांच्या शिरावर अत्यंत गंभीर व अत्यंत मोठी जबाबदारी येऊन पडली आहे.

हिंदी स्वयंसेवकांच्या व कार्यकर्त्यांच्या कार्यामुळे नोंदणी-कचेरीवरील बहिष्कार आतापर्यंत अत्यंत यशस्वी झाला आहे, हे कोणीच नाकारू शकणार नाही. त्यांनी आपले कार्य शांतपणे, समंजसपणे व गाजावाजा न करता केले. जोहान्सबर्गमध्ये उपद्रव बरेच आहेत. सेवेचे कार्य करण्यासाठी जे स्वेच्छेने पुढे आले, त्यांच्यापैकी काहीजण म्हणजे नुसते आगीचे लोळ आहेत. जोहान्सबर्गमधील हिंदी लोकांमध्ये सर्व वर्गांची माणसे आहेत. म्हणून आम्ही हिंदी स्वयंसेवकांना असा इशारा देतो की, कोणतीही घाई करू नका आणि क्रोधाचे प्रदर्शन करू नका. शारीरिक हिंसा तर पूर्णपणे निपटली पाहिजे— आणि तशीच कडक भाषाही. आशियावासी कायद्याचे जोखड फेकून देण्यास जे लोक उत्सुक आहेत, ते अज्ञानाने धमकी किंवा दमदाटी देण्याचे अधिक भयंकर जोखड न लादण्यास तितकेच उत्सुक असले पाहिजेत. हा कायदा आपल्याला अपमानास्पद आहे आणि आपल्या पौरुषाचे अपहरण करणारा आहे, अशी खात्री जर हिंदी लोकांना पटली असेल, तर ज्यांना ते माहीत नाही त्यांना ते समजावून देणे एवढेच कार्य त्यांनी करावयाचे आहे. ते त्यांनी पार पाडले की त्यांचे कर्तव्य संपले. मग नोंदणीसाठी अर्ज करू पाहणाऱ्या माणसाला निवड करण्याचे स्वातंत्र्य त्यांनी द्यावे. या कायद्यातील गुलामगिरीच्या अटी पत्करण्याचे त्याने ठरवले, तर त्यामुळे हानी त्याचीच होईल-- समाजाची नव्हे.

इंडियन ओपिनियन, २८-९-१९०७

२०४. जनरल बोथा व आशियायी कायदा

ट्रान्सवॉलचे पंतप्रधान यांच्या लंडनच्या संस्मरणीय भेटीमध्ये सेसिल हॉटेलात (हिंदी लोकांचे) शिष्टमंडळ त्यांना भेटले, तेव्हा ते त्याच्याशी गोड व नम्रपणे पण निःसंकोचपणे बोलले. पण आशियावासीयांचा खरा लढा कशासाठी आहे हे आपल्याला माहीत नाही, असे आतही ते म्हणत आहेत. यामुळे मन अस्वस्थ होते. त्यांचे मत असे की, केवळ बोटांच्या ठशांच्या प्रश्नासाठी ट्रान्सवॉलमधील आशियावासी लोकांनी प्रचंड प्रमाणावर चळवळ करायला काही कारण नाही. हे त्यांचे मत बरोबर आहे. पण

ही चळवळ बोटांच्या ठशाला असलेल्या विरोधातून निघालेली आहे, हा जनरल बोथा यांचा समज चुकीचा आहे. त्यावरून हिंदी लोकांच्या भूमिकेबद्दल त्यांचे किती गाढ अज्ञान आहे, हे दिसून येते. १९०६ साली हा कायदा प्रथम पुढे आला तेव्हा ब्रिटिश इंडियन असोसिएशनने त्यावर आक्षेप[1] घेतले. त्यांतील काही आक्षेप त्या संस्थेने जनरल बोथा यांच्याकडे ताबडतोब पाठवले. हे आक्षेप जर केवळ बोटांचे ठसे देण्या-बद्दलच असते, तर ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना सर्व जगाची सहानुभूती मिळणे शक्य होते काय, याचा विचार करण्याची तसदीही या शूर जनरलने घेतली नाही. आपल्या धार्मिक भावना, आपला दर्जा आणि अपमानास्पद असा वर्गीय कायदा या-संबंधी हिंदी समाजाने जे अत्यंत महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले, त्यांकडे कानाडोळा करणे ट्रान्सवॉलमधील मुत्सद्द्यांना सोयीचे असेल; पण तसा कानाडोळा सतत केल्याने तीव्र असंतोष निर्माण होईल आणि आशियावासींचा विरोध अधिक कडवा बनेल. आतांचे त्यांचे धैर्य निराशेतून निघालेले आहे. आपले सर्वस्व हिरावून घेतले जाईल, ही कल्पना आता त्यांच्या अंगवळणी पडली आहे. म्हणून ट्रान्सवॉल सरकारने किमान पक्षी हिंदी लोकांच्या विरोधाची वास्तव रीतीने छाननी करणे शहाणपणाचे व समंजस-पणाचे होईल. त्या बाबतीत त्यांनी आपले डोळे झाकून घेणे योग्य नाही.

इंडियन ओपिनिअन, २८–९–१९०७

२०५. हिंदी फेरीवाल्यांविरुद्ध मोहीम

फेरीवाल्यांनी द्यावयाची परवाना—फी वाढविण्याच्या सूचनेवर नाताळच्या विधिमंडळात जो वाद झाला, तो अत्यंत उद्बोधक आहे. नाताळमधील फेरीवाल्यांनी द्यावयाच्या फीमध्ये भरमसाट वाढ होण्याच्या प्रश्नाकडे कोणीच लक्ष दिलेले नाही. कारण, फेरीवाल्यांचा धंदा हा मुख्यतः आशियावासीयांचा आहे. न्यायमंत्री तर म्हणाले, "या देशात फेरीवाल्याचा धंदा गोऱ्या लोकांना योग्य व्यवसाय नाही." बिगर-गोऱ्या लोकांच्या प्रश्नाकडे पाहण्याच्या या वृत्तीनेच, कट्टे आशियावासी-विरोधक श्री. हॅगर यांनी असा ठराव मांडला की, "नाताळ सरकारच्या रेल्वेतील ज्या जागांवर बहुधा गोरे लोक नेमले जातात, तेथे आशियावासीयांना नेमणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने

१. पाहा, "पंतप्रधानांच्या सचिवास पत्र" लेख १९८.

तीवरून या प्रश्नाचा निकाल मुख्यतः होईल. यामुळे जोहान्सबर्ग येथील प्रमुख हिंदी लोक आणि इतर प्रमुख आशियावासी लोक यांच्या शिरावर अत्यंत गंभीर व अत्यंत मोठी जबाबदारी येऊन पडली आहे.

हिंदी स्वयंसेवकांच्या व कार्यकर्त्यांच्या कार्यामुळे नोंदणी–कचेरीवरील बहिष्कार आतापर्यंत अत्यंत यशस्वी झाला आहे, हे कोणीच नाकारू शकणार नाही. त्यांनी आपले कार्य शांतपणे, समंजसपणे व गाजावाजा न करता केले. जोहान्सबर्गमध्ये उपद्रव बरेच आहेत. सेवेचे कार्य करण्यासाठी जे स्वेच्छेने पुढे आले, त्यांच्यापैकी काहीजण म्हणजे नुसते आगीचे लोळ आहेत. जोहान्सबर्गमधील हिंदी लोकांमध्ये सर्व वर्गांची माणसे आहेत. म्हणून आम्ही हिंदी स्वयंसेवकांना असा इशारा देतो की, कोणतीही घाई करू नका आणि क्रोधाचे प्रदर्शन करू नका. शारीरिक हिंसा तर पूर्णपणे निपटली पाहिजे— आणि तशीच कडक भाषाही. आशियावासी कायद्याचे जोखड फेकून देण्यास जे लोक उत्सुक आहेत, ते अज्ञानाने धमकी किंवा दमदाटी देण्याचे अधिक भयंकर जोखड न लादण्यास तितकेच उत्सुक असले पाहिजेत. हा कायदा आपल्याला अपमानास्पद आहे आणि आपल्या पौरुषाचे अपहरण करणारा आहे, अशी खात्री जर हिंदी लोकांना पटली असेल, तर ज्यांना ते माहीत नाही त्यांना ते समजावून देणे एवढेच कार्य त्यांनी करावयाचे आहे. ते त्यांनी पार पाडले की त्यांचे कर्तव्य संपले. मग नोंदणीसाठी अर्ज करू पाहणाऱ्या माणसाला निवड करण्याचे स्वातंत्र्य त्यांनी द्यावे. या कायद्यातील गुलामगिरीच्या अटी पत्करण्याचे त्याने ठरवले, तर त्यामुळे हानी त्याचीच होईल— समाजाची नव्हे.

इंडियन ओपिनियन, २८–९–१९०७

२०४. जनरल बोथा व आशियायी कायदा

ट्रान्सवॉलचे पंतप्रधान यांच्या लंडनच्या संस्मरणीय भेटीमध्ये सेसिल हॉटेलात (हिंदी लोकांचे) शिष्टमंडळ त्यांना भेटले, तेव्हा ते त्याच्याशी गोड व नम्रपणे पण निःसंकोचपणे बोलले. पण आशियावासीयांचा खरा लढा कशासाठी आहे हे आपल्याला माहीत नाही, असे आत ही ते म्हणत आहेत. यामुळे मन अस्वस्थ होते. त्यांचे मत असे की, केवळ बोटांच्या ठशांच्या प्रश्नासाठी ट्रान्सवॉलमधील आशियावासी लोकांनी प्रचंड प्रमाणावर चळवळ करायला काही कारण नाही. हे त्यांचे मत बरोबर आहे. पण

ही चळवळ बोटांच्या ठशाला असलेल्या विरोधातून निघालेली आहे, हा जनरल बोथा यांचा समज चुकीचा आहे. त्यावरून हिंदी लोकांच्या भूमिकेबद्दल त्यांचे किती गाढ अज्ञान आहे, हे दिसून येते. १९०६ साली हा कायदा प्रथम पुढे आला तेव्हा ब्रिटिश इंडियन असोसिएशनने त्यावर आक्षेप[१] घेतले. त्यांतील काही आक्षेप त्या संस्थेने जनरल बोथा यांच्याकडे ताबडतोब पाठवले. हे आक्षेप जर केवळ बोटांचे ठसे देण्याबद्दलच असते, तर ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना सर्व जगाची सहानुभूती मिळणे शक्य होते काय, याचा विचार करण्याची तसदीही या शूर जनरलने घेतली नाही. आपल्या धार्मिक भावना, आपला दर्जा आणि अपमानास्पद असा वर्गीय कायदा यासंबंधी हिंदी समाजाने जे अत्यंत महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले, त्यांकडे कानाडोळा करणे ट्रान्सवॉलमधील मुत्सद्द्यांना सोयीचे असेल; पण तसा कानाडोळा सतत केल्याने तीव्र असंतोष निर्माण होईल आणि आशियावासींचा विरोध अधिक कडवा बनेल. आतांचे त्यांचे धैर्य निराशेतून निघालेले आहे. आपले सर्वस्व हिरावून घेतले जाईल, ही कल्पना आता त्यांच्या अंगवळणी पडली आहे. म्हणून ट्रान्सवॉल सरकारने किमान पक्षी हिंदी लोकांच्या विरोधाची वास्तव रीतीने छाननी करणे शहाणपणाचे व समंजसपणाचे होईल. त्या बाबतीत त्यांनी आपले डोळे झाकून घेणे योग्य नाही.

इंडियन ओपिनिअन, २८–९–१९०७

२०५. हिंदी फेरीवाल्यांविरुद्ध मोहीम

फेरीवाल्यांनी द्यावयाची परवाना—फी वाढविण्याच्या सूचनेवर नाताळच्या विधिमंडळात जो वाद झाला, तो अत्यंत उद्बोधक आहे. नाताळमधील फेरीवाल्यांनी द्यावयाच्या फीमध्ये भरमसाट वाढ होण्याच्या प्रश्नाकडे कोणीच लक्ष दिलेले नाही. कारण, फेरीवाल्याचा धंदा हा मुख्यतः आशियावासीयांचा आहे. न्यायमंत्री तर म्हणाले, " या देशात फेरीवाल्याचा धंदा गोऱ्या लोकांना योग्य व्यवसाय नाही. " बिगर-गोऱ्या लोकांच्या प्रश्नाकडे पाहण्याच्या या वृत्तीनेच, कट्टे आशियावासी-विरोधक श्री. हॅगर यांनी असा ठराव मांडला की, " नाताळ सरकारच्या रेल्वेतील ज्या जागांवर बहुधा गोरे लोक नेमले जातात, तेथे आशियावासीयांना नेमणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने

१. पाहा, " पंतप्रधानांच्या सचिवास पत्र " लेख १९८.

तीवरून या प्रश्नाचा निकाल मुख्यतः होईल. यामुळे जोहान्सबर्ग येथील प्रमुख हिंदी लोक आणि इतर प्रमुख आशियावासी लोक यांच्या शिरावर अत्यंत गंभीर व अत्यंत मोठी जबाबदारी येऊन पडली आहे.

हिंदी स्वयंसेवकांच्या व कार्यकर्त्यांच्या कार्यामुळे नोंदणी–कचेरीवरील बहिष्कार आतापर्यंत अत्यंत यशस्वी झाला आहे, हे कोणीच नाकारू शकणार नाही. त्यांनी आपले कार्य शांतपणे, समंजसपणे व गाजावाजा न करता केले. जोहान्सबर्गमध्ये उपद्रव बरेच आहेत. सेवेचे कार्य करण्यासाठी जे स्वेच्छेने पुढे आले, त्यांच्यापैकी काहीजण म्हणजे नुसते आगीचे लोळ आहेत. जोहान्सबर्गमधील हिंदी लोकांमध्ये सर्व वर्गांची माणसे आहेत. म्हणून आम्ही हिंदी स्वयंसेवकांना असा इशारा देतो की, कोणतीही घाई करू नका आणि क्रोधाचे प्रदर्शन करू नका. शारीरिक हिंसा तर पूर्णपणे निपटली पाहिजे— आणि तशीच कडक भाषाही. आशियावासी कायद्याचे जोखड फेकून देण्यास जे लोक उत्सुक आहेत, ते अज्ञानाने धमकी किंवा दमदाटी देण्याचे अधिक भयंकर जोखड न लादण्यास तितकेच उत्सुक असले पाहिजेत. हा कायदा आपल्याला अपमानास्पद आहे आणि आपल्या पौरुषाचे अपहरण करणारा आहे, अशी खात्री जर हिंदी लोकांना पटली असेल, तर ज्यांना ते माहीत नाही त्यांना ते समजावून देणे एवढेच कार्य त्यांनी करावयाचे आहे. ते त्यांनी पार पाडले की त्यांचे कर्तव्य संपले. मग नोंदणीसाठी अर्ज करू पाहणाऱ्या माणसाला निवड करण्याचे स्वातंत्र्य त्यांनी द्यावे. या कायद्यातील गुलामगिरीच्या अटी पत्करण्याचे त्याने ठरवले, तर त्यामुळे हानी त्याचीच होईल-- समाजाची नव्हे.

इंडियन ओपिनियन, २८–९–१९०७

२०४. जनरल बोथा व आशियायी कायदा

ट्रान्सवॉलचे पंतप्रधान यांच्या लंडनच्या संस्मरणीय भेटीमध्ये सेसिल हॉटेलात (हिंदी लोकांचे) शिष्टमंडळ त्यांना भेटले, तेव्हा ते त्याच्याशी गोड व नम्रपणे पण निःसंकोचपणे बोलले. पण आशियावासीयांचा खरा लढा कशासाठी आहे हे आपल्याला माहीत नाही, असे आतही ते म्हणत आहेत. यामुळे मन अस्वस्थ होते. त्यांचे मत असे की, केवळ बोटाच्या ठशांच्या प्रश्नासाठी ट्रान्सवालमधील आशियावासी लोकांनी प्रचंड प्रमाणावर चळवळ करायला काही कारण नाही. हे त्यांचे मत बरोबर आहे. पण

ही चळवळ बोटांच्या ठशाला असलेल्या विरोधातून निघालेली आहे, हा जनरल बोथा यांचा समज चुकीचा आहे. त्यावरून हिंदी लोकांच्या भूमिकेबद्दल त्यांचे किती गाढ अज्ञान आहे, हे दिसून येते. १९०६ साली हा कायदा प्रथम पुढे आला तेव्हा ब्रिटिश इंडियन असोसिएशनने त्यावर आक्षेप[1] घेतले. त्यांतील काही आक्षेप त्या संस्थेने जनरल बोथा यांच्याकडे ताबडतोब पाठवले. हे आक्षेप जर केवळ बोटांचे ठसे देण्याबद्दलच असते, तर ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना सर्व जगाची सहानुभूती मिळणे शक्य होते काय, याचा विचार करण्याची तसदीही या शूर जनरलने घेतली नाही. आपल्या धार्मिक भावना, आपला दर्जा आणि अपमानास्पद असा वर्गीय कायदा यासंबंधी हिंदी समाजाने जे अत्यंत महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले, त्यांकडे कानाडोळा करणे ट्रान्सवॉलमधील मुत्सद्द्यांना सोयीचे असेल; पण तसा कानाडोळा सतत केल्याने तीव्र असंतोष निर्माण होईल आणि आशियावासींचा विरोध अधिक कडवा बनेल. आतांचे त्यांचे धैर्य निराशेतून निघालेले आहे. आपले सर्वस्व हिरावून घेतले जाईल, ही कल्पना आता त्यांच्या अंगवळणी पडली आहे. म्हणून ट्रान्सवॉल सरकारने किमान पक्षी हिंदी लोकांच्या विरोधाची वास्तव रीतीने छाननी करणे शहाणपणाचे व समंजसपणाचे होईल. त्या बाबतीत त्यांनी आपले डोळे झाकून घेणे योग्य नाही.

इंडियन ओपिनिअन, २८–९–१९०७

२०५. हिंदी फेरीवाल्यांविरुद्ध मोहीम

फेरीवाल्यांनी घ्यावयाची परवाना—फी वाढविण्याच्या सूचनेवर नाताळच्या विधिमंडळात जो वाद झाला, तो अत्यंत उद्बोधक आहे. नाताळमधील फेरीवाल्यांनी घ्यावयाच्या फीमध्ये भरमसाट वाढ होण्याच्या प्रश्नाकडे कोणीच लक्ष दिलेले नाही. कारण, फेरीवाल्याचा धंदा हा मुख्यतः आशियावासीयांचा आहे. न्यायमंत्री तर म्हणाले, "या देशात फेरीवाल्याचा धंदा गोऱ्या लोकांना योग्य व्यवसाय नाही." बिगर-गोऱ्या लोकांच्या प्रश्नाकडे पाहण्याच्या या वृत्तीनेच, कट्टे आशियावासी-विरोधक श्री. हॅगर यांनी असा ठराव मांडला की, "नाताळ सरकारच्या रेल्वेतील ज्या जागांवर बहुधा गोरे लोक नेमले जातात, तेथे आशियावासीयांना नेमणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने

१. पाहा, "पंतप्रधानांच्या सचिवास पत्र" लेख १९८.

तीवरून या प्रश्नाचा निकाल मुख्यतः होईल. यामुळे जोहान्सबर्ग येथील प्रमुख हिंदी लोक आणि इतर प्रमुख आशियावासी लोक यांच्या शिरावर अत्यंत गंभीर व अत्यंत मोठी जबाबदारी येऊन पडली आहे.

हिंदी स्वयंसेवकांच्या व कार्यकर्त्यांच्या कार्यामुळे नोंदणी-कचेरीवरील बहिष्कार आतापर्यंत अत्यंत यशस्वी झाला आहे, हे कोणीच नाकारू शकणार नाही. त्यांनी आपले कार्य शांतपणे, समंजसपणे व गाजावाजा न करता केले. जोहान्सबर्गमध्ये उपद्रव बरेच आहेत. सेवेचे कार्य करण्यासाठी जे स्वेच्छेने पुढे आले, त्यांच्यापैकी काहीजण म्हणजे नुसते आगीचे लोळ आहेत. जोहान्सबर्गमधील हिंदी लोकांमध्ये सर्व वर्गांची माणसे आहेत. म्हणून आम्ही हिंदी स्वयंसेवकांना असा इशारा देतो की, कोणतीही घाई करू नका आणि क्रोधाचे प्रदर्शन करू नका. शारीरिक हिंसा तर पूर्णपणे निपटली पाहिजे— आणि तशीच कडक भाषाही. आशियावासी कायद्याचे जोखड फेकून देण्यास जे लोक उत्सुक आहेत, ते अज्ञानाने धमकी किंवा दमदाटी देण्याचे अधिक भयंकर जोखड न लादण्यास, तितकेच उत्सुक असले पाहिजेत. हा कायदा आपल्याला अपमानास्पद आहे आणि आपल्या पौरुषाचे अपहरण करणारा आहे, अशी खात्री जर हिंदी लोकांना पटली असेल, तर ज्यांना ते माहीत नाही त्यांना ते समजावून देणे एवढेच कार्य त्यांनी करावयाचे आहे. ते त्यांनी पार पाडले की त्यांचे कर्तव्य संपले. मग नोंदणीसाठी अर्ज करू पाहणाऱ्या माणसाला निवड करण्याचे स्वातंत्र्य त्यांनी द्यावे. या कायद्यातील गुलामगिरीच्या अटी पत्करण्याचे त्याने ठरवले, तर त्यामुळे हानी त्याचीच होईल-- समाजाची नव्हे.

इंडियन ओपिनियन, २८-९-१९०७

२०४. जनरल बोथा व आशियायी कायदा

ट्रान्सवॉलचे पंतप्रधान यांच्या लंडनच्या संस्मरणीय भेटीमध्ये सेसिल हॉटेलात (हिंदी लोकांचे) शिष्टमंडळ त्यांना भेटले, तेव्हा ते त्यांच्याशी गोड व नम्रपणे पण निःसंकोचपणे बोलले. पण आशियावासीयांचा खरा लढा कशासाठी आहे हे आपल्याला माहीत नाही, असे आत ही ते म्हणत आहेत. यामुळे मन अस्वस्थ होते. त्यांचे मत असे की, केवळ बोथांच्या ठशांच्या प्रश्नासाठी ट्रान्सवालमधील आशियावासी लोकांनी प्रचंड प्रमाणावर चळवळ करायला काही कारण नाही. हे त्यांचे मत बरोबर आहे. पण

ही चळवळ बोटांच्या ठशाला असलेल्या विरोधातून निघालेली आहे, हा जनरल बोथा यांचा समज चुकीचा आहे. त्यावरून हिंदी लोकांच्या भूमिकेबद्दल त्यांचे किती गाढ अज्ञान आहे, हे दिसून येते. १९०६ साली हा कायदा प्रथम पुढे आला तेव्हा ब्रिटिश इंडियन असोसिएशनने त्यावर आक्षेप[1] घेतले. त्यांतील काही आक्षेप त्या संस्थेने जनरल बोथा यांच्याकडे ताबडतोब पाठवले. हे आक्षेप जर केवळ बोटांचे ठसे देण्याबद्दलच असते, तर ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना सर्व जगाची सहानुभूती मिळणे शक्य होते काय, याचा विचार करण्याची तसदीही या शूर जनरलने घेतली नाही. आपल्या धार्मिक भावना, आपला दर्जा आणि अपमानास्पद असा वर्गीय कायदा यासंबंधी हिंदी समाजाने जे अत्यंत महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले, त्यांकडे कानाडोळा करणे ट्रान्सवॉलमधील मुत्सद्द्यांना सोयीचे असेल; पण तसा कानाडोळा सतत केल्याने तीव्र असंतोष निर्माण होईल आणि आशियावासींचा विरोध अधिक कडवा बनेल. आतांचे त्यांचे धैर्य निराशेतून निघालेले आहे. आपले सर्वस्व हिरावून घेतले जाईल, ही कल्पना आता त्यांच्या अंगवळणी पडली आहे. म्हणून ट्रान्सवॉल सरकारने किमान पक्षी हिंदी लोकांच्या विरोधाची वास्तव रीतीने छाननी करणे शहाणपणाचे व समंजसपणाचे होईल. त्या बाबतीत त्यांनी आपले डोळे झाकून घेणे योग्य नाही.

इंडियन ओपिनिअन, २८–९–१९०७

२०५. हिंदी फेरीवाल्यांविरुद्ध मोहीम

फेरीवाल्यांनी द्यावयाची परवाना—फी वाढविण्याच्या सूचनेवर नाताळच्या विधिमंडळात जो वाद झाला, तो अत्यंत उद्‌बोधक आहे. नाताळमधील फेरीवाल्यांनी द्यावयाच्या फीमध्ये भरमसाट वाढ होण्याच्या प्रश्नाकडे कोणीच लक्ष दिलेले नाही. कारण, फेरीवाल्याचा धंदा हा मुख्यतः आशियावासीयांचा आहे. न्यायमंत्री तर म्हणाले, "या देशात फेरीवाल्याचा धंदा गोऱ्या लोकांना योग्य व्यवसाय नाही." बिगर-गोऱ्या लोकांच्या प्रश्नाकडे पाहण्याच्या या वृत्तीनेच, कट्टे आशियावासी-विरोधक श्री. हॅगर यांनी असा ठराव मांडला की, "नाताळ सरकारच्या रेल्वेतील ज्या जागांवर बहुधा गोरे लोक नेमले जातात, तेथे आशियावासीयांना नेमणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने

१. पाहा, "पंतप्रधानांच्या सचिवास पत्र" लेख १९८.

अनिष्ट आहे." अचूकपणे बोलावयाचे तर त्या बड्या आमदाराने "सार्वजनिक हिताच्या दृष्टीने" असे न म्हणता "गोऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने" असे म्हणावयास हवे होते. ती सूचना रेल्वे-बंदर-मंत्र्यांनी स्वीकारली हे सांगितले पाहिजे, आणि ते म्हणाले, "या 'कूलींना' हिंदी चौकीदारांना मी लाथ मारून हाकून देत नाही याचे कारण या सभागृहाच्या सदस्यांनी मला नोकरांची कपात करण्याचा आदेश दिला आहे." म्हणून या दोन्ही बाबतीत, हिंदी फेरीवाले व हिंदी चौकीदार यांचे जे हक्क कदाचित असतील, त्यांची चौकशीही केली गेली नाही. जोपर्यंत वसाहतींचा प्रश्न आहे, तोपर्यंतच "ब्रिटिश प्रजाजनांचा" सिद्धांत घोषित केला जातो हे उघडच आहे. ब्रिटिशांच्या पुरातन ध्वजाशी संबंधित असणारे सारे फायदे त्यांना प्राप्त होतील, पण तो ध्वज हाती धरणाऱ्या लोकांच्या शिरावर जे कष्ट किंवा जी जबाबदारी येते, ती स्वीकारण्यास ते तयार नाहीत.

इंडियन ओपिनियन, २८-९-१९०७

२०६. आमची पुरवणी

प्रिटोरियातील बहाद्दर स्वयंसेवकांचे एक छायाचित्र या अंकाबरोबर आम्ही प्रसिद्ध करीत आहोत. काही सज्जनांच्या मताला मान देण्यासाठी आम्ही आतापर्यंत पुरवणी काढलेली नाही. पण तसे केल्याने प्रिटोरियातील निरोधकांवर (स्वयंसेवकांवर) आमच्या हातून थोडाफार अन्याय झाला असे वाटते. हे स्वयंसेवक जर पुढे आले नसते आणि त्यांनी कित्ता घालून दिला नसता, तर या लढ्याची इतकी प्रगती झाली नसती, असे आमचे निश्चित मत आहे.

आता जोहान्सबर्गची पाळी आली आहे. या वेळी पुरवणी काढणे हे आम्ही आमचे कर्तव्य मानतो. जोहान्सबर्गने या शूर वीरांचा कित्ता गिरविला आणि लोकांशी धीराचे व नम्रतेचे वर्तन ठेवले, तर आपल्या लढ्याचा शेवट जवळ आला आहे, असे आम्हांस वाटते.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २८-९-१९०७

२०७. स्वयंसेवकांची कर्तव्ये

" स्वयंसेवक " किंवा " निरोधक " अथवा " सेवाव्रती " किंवा " पहारेकरी "– कोणत्याही नावाने संबोधिले तरी, त्यांनी ट्रान्सवॉलच्या लढ्यात उत्कृष्ट कामगिरी केली हे आम्ही पाहिलेले आहे. त्यांच्या मदतीशिवाय काहीही साध्य झाले नसते. या लढ्याचे खरे श्रेय प्रिटोरियातील " निरोधकां "कडे जाते. त्यांनी धिमेपणाचा, नम्रपणाचा व शूरपणाचा जो कित्ता घालून दिला, तो सर्वत्र गिरविला जात आहे.

फक्त जोहान्सबर्गमध्ये प्रश्न राहिला आहे. या शहरात प्रत्येक प्रकारचे हिंदी लोक आहेत. त्यांमध्ये असेही काही लोक असतील की, ज्यांना लज्जेची भावनाच नाही. असे लोक नोंदणीसाठी अर्ज करण्यास तयार झाले तर त्यात आश्चर्य नाही. शिवाय बाहेरचे लोक तशाच निंद्य हेतूने त्या कचेरीकडे जातील. अशा सर्व माणसांशी " निरोधकाने " कसे वागावे ? सामान्यतः जो हिंदी माणूस आपले हात काळे करून घेण्यास जाईल त्याच्याबद्दल आपल्याला तुच्छता वाटेल, पण तुच्छतेऐवजी कींव दाखविणे चांगले.

पहारेकऱ्याचे काम पहारा करण्याचे–– हल्ला करण्याचे नव्हे. जोहान्सबर्गमधील एखादा माणूस नोंदणीसाठी निघाला असताना त्याच्यावर जर हल्ला झाला, तर बंदराजवळ आलेले जहाज बुडावे त्याप्रमाणे, आपले यश शेवटच्या क्षणी अपयश ठरेल, याविषयी आम्हांला काडीमात्र शंका वाटत नाही. आपल्या या साऱ्या लढ्याचे अधिष्ठान स्वतः क्लेश भोगणे हे आहे— हिंदी किंवा युरोपिअन अशा दुसऱ्या कोणाही माणसाला क्लेश देणे, हे नाही. प्रत्येक " पहारेकऱ्याने " हा मुद्दा अत्यंत काळजीपूर्वक ध्यानात ठेवला पाहिजे. जे वाममार्गाने जात आहेत, त्यांच्याशी युक्तिवाद करणे, त्यांची आर्जवे करणे, त्यांची करुणा भाकणे, हे आपले कर्तव्य आहे. इतके करूनही त्यांना गुलामगिरीची ओढ असेल, तर तसे करण्याचे त्यांना स्वातंत्र्य असले पाहिजे. कारण कायद्याच्या जोखडाखालून त्यांना मुक्त करताना आपल्या स्वतःच्या जोखडाखाली त्यांना आणणे यात काही लाभ आहे, असे आम्हांस वाटत नाही. जे स्वातंत्र्य आपल्याला हवे असते, तेच दुसऱ्याला देणे हे आपले कर्तव्य होय.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २८–९–१९०७

२०८. हिंदुस्थान जागा झाला काय?[१]

ना. प्रो. गोखले व ना. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या तारा आम्हांला अत्यंत प्रोत्साहनकारक ठरल्या. हे सज्जन केवळ सहानुभूतीच्या तारा पाठवून संतुष्ट राहणार नाहीत. त्यांच्या तारांवरून हे सूचित होते की, आपल्याला हिंदुस्थानचा पूर्ण पाठिंबा मिळेल. याचा अर्थ फार मोठा आहे. ट्रान्सवॉलचा प्रश्न क्षुद्र मानला जाणार नाही. त्याला सर्व जगात प्रसिद्धी मिळेल. हिंदुस्थानात सभा भरतील आणि तातडीची शिष्ट-मंडळे पाठविली जातील असे मानण्यास आपल्याला आता आधार आहे. तसे झाले म्हणजे साम्राज्य सरकार बेपर्वा राहू शकणार नाही. लॉर्ड ॲम्पथिल यांनी पूर्वीच म्हटले आहे की, ट्रान्सवॉलच्या प्रश्नाइतक्या दुसऱ्या प्रश्नाने हिंदी लोकांच्या भावना दुखावलेल्या नाहीत. सर्वत्र उपद्रव वाढत आहेत, अशा वेळी [साम्राज्य सरकार] हिंदुस्थानातील असंतोषाला असे प्रभावी कारण कसे मिळवून देईल?

आपल्याला असा पाठिंबा आपण मिळवू शकलो याचे कारण एकच—आणि ते म्हणजे आपले धैर्य. ऐक्य राखून आपण जे सामर्थ्य प्रकट केले, त्याचा प्रभावी परिणाम घडून आला. आपल्याला मोठा मान मिळाला. त्याचे रक्षण करणे हे ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या हातांत आहे आणि ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांचे डोळे जोहान्सबर्गवर खिळलेले आहेत.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २८–९–१९०७

२०९. " अजा–पुत्रम् बलिम् दद्यात् । "

" लड़ें लोह–पान दोऊ, बीच रुई जीर जाय " अशी एक गुजराती म्हण आहे. तिचा अर्थ, " जेव्हा बलाढ्य बैल झुंजतात तेव्हा त्यांच्या टकरीत झाडे कोलमडून

१. पाहा, " हिंदुस्थानाचे साहाय्य ", लेख २०२.

पडतात." नाताळमधील गोऱ्या लोकांच्या दोन पक्षांची भांडणे चालू आहेत. पण गरीब हिंदी मजुरांना त्याचे परिणाम सोसावे लागत आहेत. श्री. हॅगर व त्यांचे दोस्त म्हणतात की, रेल्वेच्या क्रॉसिंगवर जेथे हिंदी चौकीदार आहेत, तेथे गोऱ्यांना नेमावे आणि हिंदीना बडतर्फ करावे. अशी सूचना करण्यात श्री. हॅगर यांचा काहीही परोपकारी हेतु आहे असे मानण्याचे कारण नाही. काही तरी करून लोकांचे लक्ष आपल्याकडे वेधावे एवढाच त्यांचा हेतु आहे. भारी पगाराचे गोरे लोक नेमणे आणि हिंदी लोकांना लाथ मारून हाकलून देणे अयोग्य असल्याची जाणीव नाताळ सरकारला आहे. पण हा प्रामाणिकपणा जाहीर रीतीने प्रगट करण्यास ते सरकार बुजत आहे. म्हणून ते म्हणत आहे की, शक्य तेथे हिंदी कामगारांना मुक्त केले जाईल. या धोरणाचा परिणाम काय होत राहील, याची पर्वा कोणताही पक्ष करीत नाही. याला ते "सुधारणा" म्हणतात. शिक्षण व संस्कृती यांचा हाच जर अर्थ असेल, तर त्या अनर्थापासून हिंदी लोकांचा बचाव व्हावा अशी आमची इच्छा आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २८–९–१९०७

२१०. इजिप्तमध्ये स्वराज्याची चळवळ

इजिप्तमध्ये स्वराज्याची चळवळ एकदम मोठ्या स्वरूपात सुरू झाली आहे, असे "रॅन्ड डेली मेल" मधील पत्रावरून दिसते. हा मुस्तफा केमाल पाशाच्या[1] कार्याचा प्रभाव आहे असे म्हणतात. इजिप्तच्या संसदेमध्ये जे उमराव सभासद आहेत त्यांतील सुमारे ११६ सभासदांनी स्वराज्याची मागणी करण्याचे ठरविले आहे, असे कळते. इंग्रजांची मदत घेण्याचे आम्ही नाकारीत नाही, असे ते म्हणतात. पण सरकारची सूत्रे आपल्या हातात घेण्याची त्यांना इच्छा आहे. शिक्षणाचे खाते लोकांच्या हातात पूर्णपणे असावे असे त्यांना वाटते. मुस्तफा केमाल पाशा म्हणतात, "ब्रिटिश सरकारने ही मागणी शांततेने व मित्रत्वाच्या भावनेने पूर्ण केली नाही, तर इजिप्तचे लोक लढाई करून ती मिळवतील. पण इजिप्त हा परतंत्र राहणार नाही."

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनिअन, २८–९–१९०७

१. (१८७४–१९०८). इजिप्तमधील 'राष्ट्रीय पक्षाची' स्थापना १९०७ च्या डिसेंबरात यांनी केली.

२११. जे. ए. नेसर यांना पत्र

[जोहान्सबर्ग]
ता. २८ सप्टेंबर, १९०७

श्री. जे. ए. नेसर, विधिमंडळाचे सदस्य,
टपाल पेटी क्रमांक २२,
क्लार्क्सडॉर्प्.

महाशय,

आपले ता. २७-९ चे पत्र मला मिळाले. आपल्या अत्यंत सभ्य, स्पष्ट आणि परिपूर्ण अशा पत्राबद्दल मी माझ्या असोसिएशनतर्फे आपल्याला धन्यवाद देत आहे. हिंदी प्रश्नांची योग्य सोडवणूक होण्याच्या कामी सर्वांत मोठी धोंड कोणती असेल तर ती म्हणजे सार्वजनिक पुढाऱ्यांची बरीचशी उपेक्षा आणि त्यामुळे त्या प्रश्नाच्या ज्ञानाचा अभाव हे निःसंशय.

या देशात ज्यांचे हितसंबंध आहेत, अशा माझ्या देशबांधवांविषयी आपण जी सहानुभूती प्रकट केली आहे, त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. त्य हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठीच हा लढा चाललेला आहे. आणि म्हणून मला आपल्या भूमिकेमध्ये आपणा उभयतांमधील समान भूमिका दिसते.

हिंदुस्थानातून मजुरांची सामूहिक आवक होण्यास आपला जो विरोध आहे, त्याच्याशी माझ्या असोसिएशनची सहानुभूती आहे; एवढेच नव्हे तर, अशा आवके-विरुद्ध सर्वसाधारण लोकांमध्ये जी तीव्र द्वेष-भावना आहे, ती लक्षात घेता आपल्या विरोधात तथ्य आहे, याची जाणीव माझ्या असोसिएशनला आहे. हा उद्देश साध्य करण्याच्या कामी सरकारशी सहकार्य करण्याची तयारी माझ्या असोसिएशनने नेहमीच दाखविली आहे.

आता आशियावासी कायद्याची छाननी त्याच्या अंगभूत गुणांवरून करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. १९०६ च्या सप्टेंबरमध्ये हा कायदा वटहुकुमाच्या मसुद्याच्या स्वरूपात होता. तेव्हा त्यावरील आक्षेप तयार करण्यात आले होते. त्यावेळी सरकार बोटांच्या ठशांना आग्रह धरणार असल्याची कल्पना असतानाही आम्ही आमच्या आक्षेपांमध्ये बोटांच्या ठशांना नुसता उल्लेखही केला नव्हता, या गोष्टीकडे मी आपले

लक्ष वेधू इच्छितो. म्हणून, बोटांच्या ठशांऐवजी सह्या घेण्याचे ठरले असते, तरी माझ्या असोसिएशनचे धोरण मुळीच बदलले नसते. या कायद्यामध्ये सक्तीचे जे विष नखशिखान्त भरलेले आहे, तेच आम्हांला खटकते आणि हिंदी समाजाला तेच भारभूत झाले आहे. बोटांचे ठसे हे कोणाच्याही धार्मिक भावना दुखावीत नाहीत, पण तुर्कस्तानातील ख्रिस्ती व यहुदी यांना कायद्याने जो पक्षपात केला आहे त्यामुळे धार्मिक भावना तीव्रपणे दुखावल्या जातात.

कायद्यातील विविध अटींचा भंग करणाऱ्याला कडक शिक्षा ठेवलेल्या आहेत. पण त्या शिक्षा किंवा त्यांचा कडकपणा यांचा संताप कोणाला येत नाही; तर त्याच्या बुडाशी तोतयेगिरी, परवान्यांची लबाडीने अदलाबदल आणि अनधिकृत प्रवाशांना या देशात चोरून आणणे, हे अपराध हिंदी समाज करीत असल्याचे गृहीत धरले आहे, त्यालाच आमचा जोराचा विरोध आहे; तो योग्य आहे, असे मला वाटते. जेव्हा एखाद्या देशात विशिष्ट गुन्ह्यासाठी असाधारण शिक्षा ठेवली जाते, तेव्हा तो गुन्हा त्या देशात सर्वसामान्यपणे रूढ झाला आहे, असे मानले जाते, हे आपण कबूल कराल. वर उल्लेखिलेले गुन्हे हिंदी लोकांचा सर्वच समाज करीत नाही. पण या कायद्याने पर्यायाने आणि या कायद्याच्या निर्मात्यांनी जाहीरपणे, तसे गुन्हे हिंदी लोक करीत असल्याची आपली खात्री आहे असे प्रसिद्ध केले आहे. ही समजूत नष्ट करण्यासाठी हिंदी लोकानी आपला लढा शौर्याने चालविलेला आहे. शिवाय, हे लक्षात घेतले पाहिजे की, हा कायदा म्हणजे सर्व समाजावर उगारलेले एक विषारी हत्यार आहे. त्यामुळे मलायी लोकांच्या दृष्टीने हिंदी बदनाम होतील. मलायी लोकांशी पुष्कळ हिंदी लोकांचे निकटचे नाते आहे. तसेच केपमधील गौरेतर लोकांशी हिंदी लोकांचा निकट संबंध येतो. आणि काफिर लोकांना हिंदी लोक नोकर म्हणून मोठ्या प्रमाणावर नोकरीवर ठेवतात. त्या दोघांच्याही दृष्टीने हिंदी लोकांची योग्यता कमी होईल. या वसाहतीतील इतर नागरिकांप्रमाणेच वरील तीन प्रकारचे लोक वैयक्तिक स्वातंत्र्यावरील या निर्बंधापासून मुक्त असताना फक्त आशियावासी लोक वेगळे काढण्यात आले आहेत.

शेवटच्या आक्षेपाला सरळ उत्तर असे आहे की, अशियावासीयांच्या स्पर्धेचे गोऱ्यांना भय वाटते–– गौरेतर लोकांच्या स्पर्धेचे नाही, याची जाणीव माझ्या असोसिएशनला असल्यामुळेच तिने असे सुचविले आहे की, या सक्तीच्या कायद्याऐवजी खुषीची ओळख किंवा नोंदणी ठेवावी. अशा खुषीच्या नोंदणीमुळे हिंदी लोकांना इतर समाजापासून वेगळे काढून अपमानित केल्यासारखे होणार नाही, युरोपिअनांच्या आक्षेपांचे पूर्ण निराकरण होईल आणि विशिष्ट हक्कांचे संरक्षणही होईल. काही लबाड हिंदी लोक येथे आहेत, हे मी नाकारीत नाही. पण खुषीच्या नोंदणीमुळे ते मोकळे सुटतील, अशी आपली जी समजूत आहे ती चुकीची आहे, हे मी नम्रपणे सांगतो.

खुषीच्या नोंदणीसाठी, सरकारने दोन्ही पक्षांच्या संमतीने एक ल्हानसे बिल मंजूर करून, स्वेच्छेने नोंदणी न करणाऱ्यांना, हा कायदा लागू करावा. खरोखर, एखाद्या विशिष्ट समयी, साऱ्या हिंदी किंवा आशियावासी लोकांची तपासणी एकदम करावी आणि ज्यांच्याजवळ ओळखीची नवी प्रमाणपत्रे नसल्याचे आढळेल त्यांना या वसाहतीतून भिरकावून द्यावे. शांतता-संरक्षक वटहुकुमाने, किंवा त्याच्या जागी जो सर्व-सामान्य प्रवेशविषयक एक कायदा होईल त्याने, हे घडवून आणता येईल.

मी आपला अधिक वेळ घेऊ इच्छीत नाही. पण शेवटी हे सांगतो की, युरोपिअनांच्या समंजस आक्षेपांचा विचार करून त्यांचे निराकरण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न माझ्या देशबांधवांनी केला आहे. पण युरोपिअनांनी त्याला प्रतिसाद मुळीच दिला नाही; एवढेच नव्हे तर हिंदी लोकांचा प्रश्न काय आहे, याची छाननी न करता द्वेष-भावाने विरोध करण्याचे धोरण त्यांनी हट्टाने चालू ठेवले आहे. आपल्या व्यवसायाच्या निमित्ताने आपला संबंध हिंदी लोकांशी पुष्कळच आलेला आहे. म्हणून आपण आमच्या जागी उभे राहून आमच्या दृष्टिकोनातून सर्व परिस्थितीचा विचार करावा आणि थोडासा धिमेपणा, थोडीशी सहकार्य-वृत्ती यांचा उपयोग करून समंजसपणाने समेट घडवून आणता येईल काय हे पाहावे, अशी विनंती मी आपल्याला केली तर ती चुकीची होणार नाही.

आपला
इसाप इस्माईल मियाँ
अध्यक्ष,
ब्रिटिश इंडियन असोसिएशन

इंडियन ओपिनियन, ५–१०–१९०७

२१२. "रॅन्ड डेली मेल"ला पत्र[1]

[जर्मिस्टन]
ता. २८ सप्टेंबर, [१९०७]

श्री. संपादक,
["रॅन्ड डेली मेल,"
जोहान्सबर्ग] यांस.

महाशय,

जर्मिस्टन येथील पुष्कळ हिंदी लोकांनी जर्मिस्टन येथे आपली नांवे नोंदवली नाहीत, याचे कारण हिंदी निरोधकांनी त्यांना दमदाटी केली, असे आपल्या वार्ताहराने जनतेला कळविले आहे. प्रमुख निरोधक या नात्याने मी आपल्याला कळवितो की, आपल्याला दिलेली ही बातमी पूर्णपणे चुकीची आहे. वस्तुस्थिती अशी होती की, जर्मिस्टनमधील सर्व हिंदी लोकांनी आपली कामे दोन दिवस बंद ठेवली होती आणि निरोधनाचे काम सुरू केले होते, ही माहिती मी आपल्याला देतो. या कायद्याला त्यांचा इतका विरोध होता आणि त्यासाठी त्यांचा इतका उत्साह पण होता. नियुक्त केलेल्या निरोधकांनी विनंती केल्यानंतरच इतर हिंदी लोकांनी आपले धंदे पुनः सुरू केले.

पण हे अगदी खरे आहे की, इतर निरनिराळ्या ठिकाणांहून काही हिंदी लोक नोंदणी करून घेण्यासाठी जर्मिस्टनला आले, आणि तेथील निरोधकांचे युक्तिवाद व कानउघाडणी ऐकून ते नोंदणी न करता परत गेले व स्वतःचा किंवा आपल्या समाजाचा मान त्यांनी गमावला नाही. तथापि जेथे हे समंजस युक्तिवाद फोल ठरले, आणि या कायद्याने लादलेली गुलामगिरी स्वीकारण्यास जे सिद्ध झाले, त्यांना निरोधकांनी व्यक्तिशः संरक्षण द्यावे असे कडक आदेश देण्यात आले होते. बॉक्सबर्गहून आलेल्या जोसेफ बहादूर नावाच्या हिंदी माणसाच्या बाबतीत असे प्रत्यक्ष घडलेसुद्धा.

आमच्या लढ्यात दमदाटी करण्याची आम्हांला गरज नाही. ज्यांना हा कायदा आणि त्याचे परिणाम कळतात, ते त्याचे जोखड आपल्या मानेवर घेण्याचे स्वेच्छेने नाकारतात. स्वार्थामुळे स्वतःच्या प्रतिष्ठेकडे जे लोक कानाडोळा करतात, ते याला अपवाद

१. हे पत्र बहुधा गांधीजींनी लिहिले असावे.

समजावेत. आपल्या असंख्य वाचकांच्या माहितीसाठी मी आपल्याला असे कळवतो की, दवाखान्यातील नोकर व मजूर यांनी नोंदणी न केल्यास नोकरी गमवावी लागेल अशी भीती घालण्यात आली असतानाही, त्यांनी आपली नावे नोंदविण्याचे नाकारले. त्यांच्या या उदात्त वर्तनाचा स्पष्ट परिणाम त्यांच्या मालकावर असा दिसून आला की, त्यांनी आपली धमकी परत घेतली.

आपला
रामसुंदर पंडित
जर्मिस्टनच्या निरोधकांचा प्रमुख

रँड डेली मेल, ३-१०-१९०७

२१३. हमीदिया इस्लामिया अंजुमनमध्ये भाषण

जोहान्सबर्ग,
[ता. २९ सप्टेंबर, १९०७]

मी आज या संस्थेच्या सभेस हजर राहात आहे. पण मला काही विशेष सांगावयाचे नाही. श्री. बेग यांच्याकडून एक पत्र आले आहे. त्यांनी, जरूर तर, निरोधक म्हणून काम करण्याची तयारी दाखविली आहे. जोहान्सबर्गमधील हिंदी लोकांनी जर्मिस्टनमधील आपल्या बांधवांनी दाखविलेल्या धैर्यापासून आपण धडा घेतला पाहिजे. त्याविषयी श्री. रामसुंदर पंडित आपल्याला सांगतील. येथील निरोधकांना आपले कर्तव्य काळजीने पार पाडावयाचे आहे. आपण लोकांशी शक्य तितके युक्तिवाद केले पाहिजेत. कोणावरही जबरदस्ती करता कामा नये. कोणीही बाहेरून आले असले तरी त्यांच्याशी आपण शांतपणे वागावे.

प्रिटोरियाहून गेलेल्या अर्जाच्या बाबतीत मला असे कळते की, परवाने तपासण्यासाठी सरकार इन्स्पेक्टर नेमणार आहे. श्री. कोडी यांनी अशी धमकी दिली आहे की, [हिंदी] लोकांना ट्रान्सवाल सोडावे लागेल. पण श्री. पंडित हे अगदी खंबीर आहेत. खुद्द श्री पंडित यांना सरकारने जर पकडले तर चांगले होईल. जोहान्सबर्गमध्ये सह्या घेण्याचे काम त्वरेने होणे अवश्य आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन ५-१०-१९०७

२१४. तुर्कस्तानच्या व्यापारी वकिलाला विनंती[1]

[जोहान्सबर्ग
ता. ५ ऑक्टोबर १९०७ पूर्वी]

महाशय,

आम्ही, खाली सह्या करणारे, जोहान्सबर्गचे रहिवासी आणि तुर्कस्तानच्या सुल्तानांचे एकनिष्ठ मुसलमान प्रजाजन, आशियावासी नोंदणी कायद्याकडे आपले लक्ष नम्रतेने वेधू इच्छितो. या कायद्यामुळे तुर्की साम्राज्यातील मुसलमान प्रजाजनांना आपली नावे नोंदवावी लागतील. हा कायदा अपमानकारक आहे आणि तुर्की साम्राज्यातील मुसलमान व विराट मुसल्मान प्रजाजनांमध्ये भेदभाव करून मुसल्मानांची हानी करणारा आहे व त्यामुळे तुर्कस्तानातून येथे येणाऱ्या मुसलमानांचा उपमर्द करणारा आहे, असे आमचे नम्र मत आहे. म्हणून आमची आपल्याला विनंती आहे की, आपण स्थानिक सरकारला अवश्य ते निवेदन करावे आणि आमच्या या विनंति-पत्राची एक प्रत बादशहांच्या चरणी सादर करावी.

आपले आज्ञाधारक सेवक
सय्यद मुस्तफा अहंमद जेल
[आणि इतर १९ तुर्की मुसल्मान]

इंडियन ओपिनियन, ५–१०–१९०७

२१५. श्री. जॉर्ज गॉडफ्रे

श्री. सुभान गॉडफ्रे व सौ. गॉडफ्रे यांचे अभिनंदन करण्यास आणखी एक निमित्त आहे. ते म्हणजे त्यांचा तिसरा मुलगा उदार शिक्षण घेऊन इंग्लंडहून परत आला आहे. आपल्या मुलांपैकी दोघेजण बॅरिस्टर आहेत व एकजण डॉक्टर आहे

१. हे बहुधा गांधीजींनी लिहिले असावे, पाहा, "जोहान्सबर्गचे बातमीपत्र." लेख २१९.

आणि बाकीचे शाळेत जात आहेत, याचा अभिमान कोणाही पालकाला वाटेल. श्री. जॉर्ज गॉडफ्रे[1] अखंड अभ्यास करून सुरक्षितपणे परत आले आणि त्यांच्या मित्रांनी व देशबांधवांनी त्यांचे स्वागत केले म्हणून त्यांनी आपले अभिनंदन स्वतः करून घ्यावे, पण शैक्षणिक योग्यता प्राप्त झाल्याबद्दल मोठा उदो उदो करण्याची आमची वृत्ती नाही. जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, हे सारे गुणवैभव स्वतःच्या गौरवासाठी आणि द्रव्य–प्राप्तीसाठी वापरले जाणार की राष्ट्राच्या उपयोगासाठी येणार ? या नेमक्या प्रश्नाचे उत्तर श्री. गॉडफ्रे यांच्या अभिवचनात सापडणार नसून त्यांच्या पुढील आयुष्यक्रमात सापडणार आहे. ते पाहण्यासाठी आम्ही वाट पाहातो.

इंडियन ओपिनियन, ५–१०–१९०७

२१६. गरीब पण शूर हिंदी लोक

या दुष्ट कायद्याला मान्यता देण्यापेक्षा आपण आपल्या नोकऱ्या सोडाव्यात व भिकारी बनावे अशी तयारी काही गरीब हिंदी लोकांनी केली होती. या गोष्टीचा उल्लेख आम्ही आमच्या जर्मिस्टनच्या वृत्तांतात केला आहे. कायदा झिडकारून टाकणारे हे लोक केवळ गरीब आहेत म्हणूनच लोक त्यांचा गौरव करण्यास धाव घेत नाहीत. पण आम्ही या गरीब बंधूंना ' नर–वीर ' मानतो. कारण या कायद्याच्या बाबतीत आपल्याला जय मिळाला तर त्याचे पुष्कळसे श्रेय अशा गरीब लोकांकडेच जाईल. व्यापारी वर्गापैकी जे लोक घाबरत आहेत, त्यांनी हे लक्षात ठेवावे की, सध्या सर्व हिंदी जमातीला जे हाल सोसावे लागत आहेत, त्याचे कारण व्यापारातील असूया हे होय. या कायद्याने व्यापाऱ्यांनाच अधिक अपमान झाल्यासारखे वाटले पाहिजे. म्हणून त्यांनी स्वतःच्या इभ्रतीसाठी नसले तरी स्वदेशासाठी आपल्या प्रतिज्ञेचे पालन करणे जरूर आहे.

परवाने नसताना व्यापाऱ्यांनी काय करावे ? असा प्रश्न वारंवार विचारला जातो. पण ज्यांच्या नोकऱ्या गेल्या त्या हिंदी लोकांचे काय होणार ? या प्रश्नाचा विचार करणे अधिक भयप्रद आहे. त्यांचा बचाव करणे महत्त्वाचे आहे असे आमचे मत आहे. तरीसुद्धा आम्हांला असे वाटते की, नोकर-पेशाच्या लोकांनी या कायद्याला शरण जाण्यापेक्षा आपल्या नोकऱ्या सोडणे व उपासमार पत्करणे हे फार चांगले.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ५–१०–१९०७

१. पाहा, " खंड ३ " लेख ४.

२१७. हिंदी मतदार

"मतदार" या नावाने सही केलेल्या एका हिंदी लेखकाचे पत्र आम्ही अन्यत्र छापलेले आहे. "मतदाराने" निर्माण केलेला प्रश्न, बरवर पाहता, सयुक्तिक दिसतो. लेडी स्मिथ किंवा दर्बान येथील हिंदी लोकांना मत असते, तर नगरपालिकेच्या सभासदांनी हिंदी लोकांचे परवाने हिरावून घेतले नसते, हा युक्तिवाद एकाच परिस्थितीत यथार्थ ठरतो. ती परिस्थिती म्हणजे, मताचा अधिकार वापरताना हिंदी लोकांनी गोऱ्यांसारखे वागले पाहिजे. तसे करण्याला ते असमर्थ आहेत. कारण त्यांच्या ठायी स्वातंत्र्याची ऊर्मी नाही असे आम्ही म्हणतो. केपमध्ये पुष्कळ हिंदी मतदार आहेत, पण त्यांनी आपला अधिकार नीट रीतीने वापरला नाही. आमच्या वाचकांना आठवत असेल की, मुंबईसारख्या शहरातही पक्षाची गटबाजी होते, तर मग नाताळकडून आपण काय अपेक्षा करावी ? जोपर्यंत हिंदी लोकांनी खरे पाश्चात्त्य शिक्षण आत्मसात् केले नाही, तोपर्यंत त्यांच्या अंगी स्वातंत्र्याची ऊर्मी येणार नाही आणि तोपर्यंत मताधिकाराचे शस्त्र त्यांना उपयोगी पडणार नाही अशी खात्री आम्हांस वाटते. याचा अर्थ असा नव्हे की, आपला मताचा अधिकार आपण हिरावला जाऊ द्यावा. आपला मताचा अधिकार हिरावून घेण्याच्या प्रयत्नाशी आपण जोराने लढा दिला आहे आणि पुढेही देऊ. पण आम्हांला हेही माहीत आहे की, मताधिकाराचा उपयोग करण्यात काही धोका आहे. तथापि तो अधिकार शाबूत राहिला तर योग्य वेळी आपण त्याचा उपयोग करू शकू. हे शस्त्र तूर्त म्यानात ठेवणेच चांगले. पण लेडीस्मिथमधील परवान्याच्या संकटावर सोपा व उत्तम उपाय म्हणजे बिगरपरवाना व्यापार चालविणे. लोकांमध्ये तितका जोर येईपर्यंत मताधिकाराची भाषा बोलणे व्यर्थ आहे असे आम्हांस वाटते.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ५–१०–१९०७

२१८. केपमधील असोसिएशन

श्री. नुरुद्दीन यांच्या अध्यक्षतेखाली असोसिएशनची शक्ती वाढत आहे असे दिसते. तिच्या सभेचा अन्यत्र प्रसिद्ध केलेला वृत्तांत[1] वाचण्याजोगा आहे. ही असोसिएशन ज्या वृत्तीने चालविली जात आहे त्याच वृत्तीने सार्वजनिक कार्य चालू राहिले तर त्यामुळे चमत्कार घडून येतील. ही वेळ सत्ता उपभोगण्याची नाही, तर सार्वजनिक सेवा करण्याची आहे. याकडे पुढाऱ्यांनी कधीही कानाडोळा करू नये. तरच आपल्याभोवती पेटलेला वणवा विझेल.

केपमध्ये एकाच स्थानी दोन संस्था आहेत—लीग व असोसिएशन. त्या दोहों-मध्ये अप्रशस्त स्पर्धा चालू आहे असे आम्हांस दिसते. त्या दोन्ही संस्थांनी एकत्र कार्य करावे असा आमचा त्यांना सल्ला आहे.

असोसिएशनने लंडनच्या कमिटीबाबत आपले कर्तव्य अद्याप पार पाडले नाही, याची आठवण आम्ही तिला देतो. केपने ५० पौंड द्यावेत अशी अपेक्षा होती. पण ती रक्कम अद्याप मिळाली नाही. कमिटीचे कार्य उत्कृष्टपणे चालले आहे. पण कोणत्याही कामाला त्याच्या प्रमाणात खर्च हा येणारच. तो खर्च भागविण्यास मदत करणे हे दक्षिण आफ्रिकेतील सर्व हिंदी लोकांचे कर्तव्य आहे. हे कार्य असोसिएशन हाती घेईल अशी आम्हांला आशा आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ५-१०-१९०७

१. तो येथे दिलेला नाही.

२१९. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

जनरल बोथा यांचा वाढदिवस

गेल्या शुक्रवारी जनरल बोथा यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी असोसिएशनने व हमीदिया इस्लामिया अंजुमनने त्यांना अभिनंदनाच्या तारा पाठविल्या. गोऱ्यांनी त्यांना भारी किंमतीच्या भेटी दिल्या. तारा पाठविणे हे हिंदी समाजाच्या दृष्टीने सौजन्याचे चिन्ह होते. त्यावरून हे सिद्ध होते की, जनरल बोथा आमच्या निवेदना-कडे लक्ष देवोत वा न देवोत, आम्ही आमचा शिष्टाचार विसरत नाही.

हमीदिया अंजुमनची सभा

गेल्या रविवारी या संस्थेची एक सभा नेहमीप्रमाणे भरली. सभागृह पूर्णपणे भरले होते. या कायद्याशी आपला जो लढा चालला आहे, तो जर यशस्वी झाला, तर त्याचे श्रेय बहुतांशी या संस्थेला मिळेल. " जर " हा शब्द मी योजला म्हणून कोणी घाबरण्याचे कारण नाही. मी तो शब्द वापरतो याचे कारण हे की, हिंदी समाज अखेर-पर्यंत ऐक्य टिकवून या कायद्याचा भंग करण्याचा हा मोठा लढा चालवील की नाही याविषयी शंका प्रदर्शित केली जाते. कारण, सध्याच्या युगात आपल्या दृष्टीने हा एक नवा मार्ग आहे. कायद्याचा भंग अशक्य आहे, असा भ्रम दृढमूल झालेला आहे. तो खणून काढला गेला, तर आपल्या समाजाने मोठीच मजल मारली असे होईल. कायद्याला अखेरपर्यंत आपण विरोध करीत राहिलो तर आपल्याला छोटे ' थोरो ' मानले जाईल. थोरो कोण होते हे ' ओपिनियन 'च्या वाचकांना आता माहीत झाले असेल.

आता आपण त्या सभेकडे वळू. श्री. इमाम अब्दुल कादिर अध्यक्षस्थानी होते, मौलवीसाहेब अहमद मुख्तियार यांनी आवेशपूर्ण भाषण केले आणि सर्व हिंदी लोकांना लागू पडतील अशा स्फूर्तिदायक कविता म्हटल्या. नंतर श्री. रामसुंदर पंडित बोलले. त्यांनी जर्मिस्टनमधील लढ्याचा वृत्तांत सांगितला. ते म्हणाले, " माझ्या परवान्याची मुदत ३० तारखेला संपणार आहे. तरीही लोकांच्या इच्छेप्रमाणे मी येथेच राहण्याचे ठरविले आहे. सरकारने माझ्या परवान्याची मुदत वाढविली नाही तरीसुद्धा मी येथे राहीन आणि तुरुंगात जाईन. मी माझ्या कर्तव्यापासून च्युत होणार नाही. जर्मिस्टनमधील निरोधक, जोहान्सबर्गला मदत करण्यास तयार आहेत. " श्री. गांधींनी सांगितले की, निरोधकांची मदत असल्याबद्दल प्रिटोरियाचे श्री. वेग यांचे एक पत्र

आले आहे. श्री. उमरजी साले यांनी असे आवेशपूर्ण विधान केले की, नव्या कायद्याला कोणी शरण जाता कामा नये–मग त्यासाठी कितीही किंमत द्यावी लागली तरी बेहेत्तर. श्री. इब्राहिम कुवाडीया यांनी नव्या कायद्यासंबंधी "गुजराती[1]" पत्रात आलेला एक लेख वाचून दाखविला. श्री. वल्लभभाई म्हणाले, कुणब्यांपैकी[2] कोणताही हिंदू मागे राहणार नाही आणि निवेदनावर बहुतेक सर्व हिंदूंनी सह्या केल्या आहेत. श्री. नबाबखानही बोलले. श्री. वेग व रामसुंदर पंडित यांनी दाखविलेल्या तयारीबद्दल आणि पंडित यांनी दाखविलेल्या उत्साहाबद्दल अध्यक्षांनी त्यांचे आभार मानले. [विराट] निवेदनावर सह्या मिळविण्याचे काम पूर्ण करण्याची विनंती पुढाऱ्यांना करण्यात आली. नंतर सभा संपली.

चिनी लोकांची सभा

त्याच रविवारी चिनी असोसिएशनचीही सभा भरली. तेथील सभागृहही पूर्ण भरले होते. श्री. क्विन अध्यक्ष होते. कायद्याच्या बाबतीत आजतागायत काय स्थिती आहे, हे श्री. गांधींनी समजावून सांगितले. कायद्याला मान्यता न देण्याचा दृढ निर्धार चिनी लोकांनी व्यक्त केला.

नव्या कायद्याखालील खटला

नव्या कायद्याप्रमाणे गुलामगिरीच्या पट्ट्यासाठी ईलू मुथू नावाच्या एका मद्रासी माणसाने अर्ज केला होता. तो अर्ज व्यवस्थित नसल्याकारणाने रजिस्ट्रारने, कायद्यात सांगितल्याप्रमाणे, प्रिटोरिया येथील मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात अशी नोटीस लावली की, अर्जदाराला नवे नोंदणीपत्र देण्यात येणार नाही, आणि त्याने मॅजिस्ट्रेटपुढे आपला जबाब देण्यासाठी यावे. नव्या नोंदणीसाठी अर्ज करणाऱ्यांची काय दशा होते, हे आमच्यातील भित्र्या लोकांनी ध्यानी घ्यावे.

" हिंदी लोकांवर बहिष्कार टाका "

अशी घोषणा प्रिटोरियामधील महिला मंडळाने केली आहे. या महिलांनी असा ठराव केला आहे की, " हिंदी व्यापाऱ्यांपासून गोऱ्या व्यापाऱ्यांचे संरक्षण करण्याची आपल्या सभासदांना प्रतिनिधींनी पुनः एकदा विनंती करावी. " खरोखर नव्या कायद्यापेक्षा अशा चळवळींचीच भीती आपल्याला अधिक वाटली पाहिजे. हिंदी लोकांशी व्यवहार करण्याचे गोऱ्यांनी बंद केले तर कायदा न होताही हिंदी लोकांना येथून जावे लागेल. असे न घडण्याला एकच उपाय आहे आणि तो म्हणजे

१. मुंबई येथे प्रसिद्ध होणारे साप्ताहिक.
२. गुजरातींतील एक जात—मुख्यतः शेतकरी.

हिंदी लोकांनी उद्योगी बनले पाहिजे आणि पूर्ण प्रामाणिक राहिले पाहिजे. आपण सध्या दाखवीत असलेल्या धैर्यावर संतुष्ट झालेल्या महिला [आपल्यापासून] माल खरेदी करीत राहतील असे म्हणण्यापर्यंतही मी मजल मारतो. पण जर आपण भित्रे ठरलो, तर त्यासुद्धा आपल्याकडे तुच्छतेने पाहतील आणि आपली हकालपट्टी करतील. ज्या फेरीवाल्यांना याचा अनुभव आहे ते माझ्या विधानाला पुष्टी देतील.

कोमार्टीपूर्टहून परत आलेले हिंदी लोक

या चार हिंदी लोकांच्या बाबत श्री. चॅमनी यांना पाठवलेल्या पत्राचे[1] उत्तर त्यांनी पुढीलप्रमाणे पाठविले आहे—

महंमद इब्राहिम, मूसा कारा, कारावली व ईसा इस्माईल या चार हिंदी लोकांना मनाई करण्यात आली, याचे कारण ते पोर्तुगीज हद्दीतून [ट्रान्सवॉलमध्ये] आले होते. त्यांना डेलागोवा बे येथे जाऊ दिले नाही; कारण त्यांच्याजवळ आगबोटीचे तिकिट नव्हते. त्यांच्या खटल्याची चौकशी चालू असताना कोठे राहावे हे त्यांना माहीत नव्हते. म्हणून त्यांना एका पोलीस कोठडीचा उपयोग करू दिला. केवळ त्यांच्याच कल्याणासाठी ही व्यवस्था केली होती. त्या माणसांना ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश करण्याचा हक्क नव्हता. म्हणून त्यांनी तेथून बाहेर गेले पाहिजे. नाही तर त्यांच्यावर खटले होतील.

या चार "वीरांनी" दर्बानची तिकिटे विकत घेतली आहेत आणि म्हणून आता त्यांचा उपद्रव श्री. चॅमनी यांना होण्याचा संभव नाही. यावर अधिक भाष्य करण्याची गरज नाही.

तुर्की प्रजा

जोहान्सबर्गमध्ये राहणाऱ्या काही तुर्की मुसलमानांनी मौलवीसाहेब अहंमद मुख्तियार यांच्या मदतीने तुर्की वकिलाकडे एक अर्ज पाठविला आहे. त्या अर्जाचे भाषांतर[2] पुढे दिले आहे. या अर्जावर २० तुर्की मुसलमानांनी आपल्या सह्या केल्या आहेत.

नेसरचे पत्र

श्री. इसॉप मियाँ यांनी पाठविलेल्या पत्रास श्री. नेसर यांनी दिलेले उत्तर पुढे दिले आहे.

१. लेख १७९ पाहा.
२. अर्जाच्या मजकुरासाठी पाहा : "तुर्की वकिलाला विनंती" लेख २१४.

माझ्या भाषणाचा जो वृत्तांत आपण उल्लेखिलेला आहे तो [बहुतांशी[१]] बरोबर आहे. त्या विषयावर मी जे बोललो त्यातील प्रत्येक शब्दाला मी चिकटून आहे. या देशांत ज्यांनी कायदेशीरपणे आपले हितसंबंध निर्माण केले आहेत अशा आशियावासी लोकांबद्दल मला पुष्कळ सहानुभूती वाटते. येथील कोर्टात मी त्यांच्या बाजूने पूर्वी लढलो आहे आणि यापुढेही जरूर त्या प्रत्येक प्रसंगी लढण्यास मी तयार आहे. पण [ट्रान्सवॉलमध्ये] आशियावासीयांची अधिक आवक होण्याला [मी जर प्रतिबंध करू शकेन तर] मी प्रतिबंध करीन. अशा प्रवाश्यांच्या आगमनाला शक्य त्या सर्व मार्गांनी विरोध करून तो प्रवेश अशक्य करून टाकण्याच्या कामी साहाय्य करण्याचा माझा दृढ निर्धार आहे. हा सर्व आत्म-संरक्षणाचा प्रश्न आहे, दुसरे काही नाही. बोटांच्या ठशाला कोणा माणसाने का विरोध करावा हे [खरोखर] मला कळत नाही. [कोणाचीही ओळख पटविण्याचा तो सर्वात बिनधोक मार्ग आहे हे खास] माझी अशी ओळख पटविण्यास मी तरी विरोध केला नसता. बोटांच्या ठशामुळे कोणाच्या धार्मिक भावना कशा दुखवतात हे मला कळूच शकत नाही. खुषीच्या नोंदणीचा तुम्ही गाजावाजा केला आहे. पण खुषीची नोंदणी व सक्तीची नोंदणी यात फरक तो काय ? तो समजावून सांगण्याची आपण कृपा कराल काय ? खुषीची नोंदणी म्हणजे कालाचा व्यर्थ अपव्यय होय असे माझे मत आहे. प्रामाणिक माणसे त्याला संमती देतील. [किंवा कदाचित् त्यामुळे हाल भोगतील.] पण अप्रामाणिक माणसे शिरसलामत सुटतील. आणि मला वाटते, युरोपियन, किंवा युरोपियन वंशाचे सर्व लोक पूर्ण प्रामाणिक आहेत असे म्हणण्याचे ढोंग मी जसे करणार नाही, तसेच आपले सर्व धर्मबांधव पूर्ण प्रामाणिक आहेत असे आपण म्हणणार नाही.

इसाप मियाँ यांचे उत्तर

यावर श्री. इसाप मियाँ यांनी पुढील उत्तर पाठवले[२]—

खोट्या साक्षी देणाऱ्या साक्षीदारांना इशारा

जोहान्सबर्ग येथे श्री. वेंडरबर्ग यांच्यापुढे ५ हिंदी लोकांवर दरोड्याचा खटला चालू होता. न्यायाधीशांना वाटले, फिर्यादी व इतर काही हिंदी लोक यांनी दिलेला पुरावा खोटा आहे. त्यांनी साक्षीदारांवर ताशेरे झाडले. त्यांची तपासणी न करताच, पुरावा कच्चा आहे असे पाहून न्यायाधिशांनी आरोपीला सोडून दिले. कोर्टात जमलेल्या पुष्कळ हिंदी लोकांना त्यांनी सांगितले की, अलिकडे तुम्हा लोकांमध्ये खोटे खटले

१. चौकोनी कंसातील मजकूर, ५-१०-१९०७ च्या "इंडियन ओपिनियन"मध्ये असलेल्या मूळ इंग्रजी लेखातून घेतलेला आहे.

२. हे भाषांतर मूळ इंग्रजीशी पडताळून पाहिले आहे. पाहा : "जे. ए. नेसर यांना पत्र." लेख २११.

फार होतात आणि जर ते तसे यापुढेही झाले तर खोटी साक्ष दिल्याबद्दल साक्षीदारावर खटले भरले जातील. या गोष्टीला प्रसिद्धी देताना मला दुःख वाटते, पण ती गोष्ट सर्वांच्या नजरेस आणणे मला अवश्य वाटते. अशा खटल्यांमुळे हिंदी समाजाचे नांव बद्दू होते आणि आपल्याला अपमान सोसावा लागतो. ते साक्षीदार दुसऱ्या काही कारस्थानी माणसाच्या हातातील केवळ बाहुली होते आणि खरे गुन्हेगार ते केवळ कारस्थानी होते असे मला कळले. त्या लोकांनी स्वतःच्या अल्पशा स्वार्थासाठी गरीब लोकांचा सत्यानाश करणे आणि स्वतःला व समाजाला बदनाम करणे हे योग्य नाही हे मी त्यांना सांगू इच्छितो. खोटे खटले उभारून पैसा कमावण्यापेक्षा द्रव्यार्जनाचे दुसरे पुष्कळ मार्ग आहेत.

परवाना हरवला तर काय करावे ?

असा प्रश्न एका लेखकाने केला आहे. उपाय सोपा आहे. विनापरवाना फिरा. तुरुंगाची भीती नाहीशी झालेली आहे. म्हणून जरूर तेव्हा मॅजिस्ट्रेटपुढे छातीठोकपणे उभे राहावे. चौकशी झाली म्हणजे अशा माणसाला सोडून देण्यात येईल. शेवटची नोटीस निघाल्यावर सध्याचे परवानेसुद्धा नष्टप्राय होतील. कारण जुने परवाने दाखविल्यावर कोणालाही मुक्त करण्यात येणार नाही. म्हणून जे लोक नव्या कायद्याला झिडकारण्यास तयार आहेत, त्यांनी परवाने हरवल्याबद्दल भीती बाळगण्याचे कारण नाही.

नवे संकट

"सुवर्ण कायद्याप्रमाणे" [गोल्ड लॉ] व्यापारी परवाने दिले जाणार नाहीत. अशा आशयाचा एक खटला सध्या चालू आहे. असा खटला उभारण्यात सरकारने चूक केली आहे, असे मला वाटते. वरिष्ठ न्यायमंदिराकडे हे प्रकरण जाण्याचा संभव आहे. आणि म्हणून त्यावर अधिक टीका करण्याची गरज नाही. "सुवर्णकायदा" लागू करण्यातील सरकारचा हेतु असा दिसतो की, नव्या कायद्याला मान्यता देणाऱ्यांना शांती किंवा विश्रांती मिळू द्यावयाची नाही. पण जर हा दुष्ट कायदा रद्द झाला तर "सुवर्ण कायदा" आपोआपच धुळीस मिळेल असे माझे मत आहे.

स्मट्स्चे उत्तर

प्रिटोरियाच्या काही सज्जनांनी गुलामगिरीसाठी केलेल्या अर्जाला, गुलामांना शोभेल असेच उत्तर[1] श्री. स्मट्स यांनी पाठविले आहे. ते म्हणतात, "आशियावासी

१. पाहा, "जोहान्सबर्गचे वातमीपत्र" लेख २२९.

कायद्याच्या तरतुदींना लोकांनी संमती दिली तर त्यांच्या शृंखलांची तपासणी गोरे लोक करतील–काफिर नव्हे. बाकीच्या मागण्या पूर्ण करता येणार नाहीत." या उत्तराचे संपूर्ण भाषांतर, शक्य तर पुढील आठवड्यात मी देईन. ते वाचण्याजोगे आहे. त्याबरोबरच, जोहान्सबर्गमधील लढ्याची काही महत्त्वाची बातमी मला देता येईल अशी आशा वाटते.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ५–१०–१९०७

२२०. मगनलाल गांधी यांना पत्र

[जोहान्सबर्ग
ता. ६ ऑक्टोबर, १९०७

प्रिय मगनलाल,

श्री. बद्री[१] यांचे कागदपत्र मला सापडले नाहीत. त्यांनी श्री. लोगन यांच्याकडून जी मालमत्ता विकत घेतली ती नोंदलेली आहे आणि खरेदीखताचा कागद मजजवळ आहे. त्यांना हेच पाहिजे आहे काय ? चौकशी करून मला कळवा.

आपला

टंकलिखित कचेरी प्रतीवरून
एस्. एन्. ४७६७

१. गांधीजींचे एक अशील. खंड ६, लेख ४४० पाहा.

२२१. वासाहतिक सचिवाला पत्र

जोहान्सबर्ग,
ता. ७ ऑक्टोबर, १९०७

ना. वासाहतिक सचिव,
प्रिटोरिया

महाशय,

आपण आपल्या मतदार-संघापुढे जे भाषण केले, त्यात आशियावासी कायदा-दुरुस्ती विधेयकासंबंधी उल्लेख आलेला आहे. त्यासंबंधी मी काही विचार आपल्याला नम्रपणे कळवावेत, असा आदेश माझ्या असोसिएशनच्या कमिटीकडून मला मिळालेला आहे. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेला आपल्या भाषणाचा वृत्तांत बरोबर असेल, तर त्यांत पुष्कळ चुकीची विधाने आहेत असे माझे नम्र मत आहे.

मंदीच्या कारणासंबंधी लोकांमध्ये जे चुकीचे मत आहे, त्याचा प्रसार आपल्या-सारख्या जबाबदार स्थानावरील माणसाने करावा, याचे माझ्या असोसिएशनला तीव्र दुःख वाटते. उद्योगधंद्यात गुंतलेल्या लोकांनी असे निक्षून सांगितले आहे की, या भयंकर मंदीचे कारण अन्यत्र शोधले पाहिजे. ते कसेही असले तरी, त्या मंदीचा परिणाम युरोपियनांइतकाच हिंदी लोकांना भोगावा लागत आहे.

या वसाहतीत सध्या १५,००० (पंधरा हजार) हिंदी लोक आहेत, या विधानाचा माझी असोसिएशन पूर्ण इन्कार करते. माझ्या असोसिएशनकडे जे आकडे आलेले आहेत त्यांची छाननी करून ते मी आपल्याकडे लवकरच पाठवीन. त्यावरून, ट्रान्सवॉलमध्ये सध्या ७,००० (सात हजार) पेक्षा अधिक हिंदी लोक नाहीत हे दिसून येईल.

आपण कृपावंत होऊन असे विधान केले आहे की, जुन्या कायद्याप्रमाणे दिलेल्या प्रमाण-पत्रांच्या नकला चोरून काढल्या जातात आणि विकल्या जातात. तसेच, मुंबई, जोहान्सबर्ग व दर्बान येथे ही बनावट प्रमाणपत्रे हिंदी लोकांना किती किंमतीला मिळतात आणि कोठे मिळतात हे प्रसिद्ध आहे. या विधानाचा इन्कार माझी असोसिएशन पूर्णतः करीत आहे, आणि या बाबतीत जाहीर चौकशी करण्याची आदरपूर्वक मागणी करीत

आहे. मात्र माझ्या असोसिएशनला अशी माहिती आहे की, नोंदणी-कार्यालयातील एक कारकून खोट्या परवान्यांचा व्यापार करीत होता आणि ज्यांना आपल्या राष्ट्रीयत्वाची किंवा सन्मानाची काहीच कल्पना नाही अशा हिंदी लोकांना हाताशी धरीत होता हे निःसंशय. पण आपण लोकांपुढे जे मत मांडले त्याहून हे अगदी भिन्न आहे.

शिवाय, आपण असेही विधान केले आहे की, हिंदी लोक या कायद्याला विरोध करीत आहेत ते बोटांच्या ठशांमुळे. माझ्या असोसिएशनने सरकारला हे वारंवार सांगितले आहे की, बोटांचे ठसे हे हिंदी लोकांच्या विरोधाचे मूळ कारण नव्हे, तर सक्तीचे तत्त्व आणि सर्व हिंदी लोकांवर गुन्हेगारीचा शिक्का मारण्याचा कायद्याचा मुख्य हेतु. त्याला विरोध आहे. या कायद्यावरील आक्षेप जेव्हा प्रथम तयार करण्यात आले, तेव्हा त्यात बोटांच्या ठशांचा उल्लेखसुद्धा नव्हता, याचबरोबर मी असेही आपल्या निदर्शनास आणतो की, ट्रान्सवॉलमध्ये जे हिंदी लोक आले, त्यांना हिंदुस्थानात बोटांचे ठसे किंवा आंगठ्याचेही ठसे कधी मागितलेले नव्हते. हिंदुस्थानात गुन्हेगारीशी संबंध नसलेल्या बाबतीत आंगठ्यांचे ठसे घेतले जातात हे खचित, पण बोटांचे ठसे फक्त गुन्हेगाराकडून किंवा गुन्ह्याशी कोठून तरी संबंध असलेल्या लोकांकडून घेतले जातात. जेव्हा आंगठ्याचे ठसे घेतले जातात, तेव्हाही ते फक्त निरक्षर लोकांकडून घेतले जातात.

या कायद्याची अंमलबजावणी सक्त रीतीने व कडकपणे करण्याचा सरकारचा इरादा आहे, याची जाणीव माझ्या असोसिएशनला सदैव आहे. पण आपण परवानगी द्याल तर मी पुनः एकदा सांगतो की, या कायद्याची अंमलबजावणी कितीही कडक केली तरी त्याला मान्यता देण्यामध्ये जी अधोगती आहे, आणि या कायद्याचा स्वीकार न करण्याच्या हिंदी-समाजाने जाणूनबुजून केलेल्या पवित्र प्रतिज्ञेचा जो अवमान आहे, त्याच्या तुलनेने तो कडकपणा काहीच नव्हे. या बाबतीतील हिंदी लोकांच्या दृष्टिकोनाचा आपण विशेष काळजीपूर्वक अभ्यास केल्याचे आपण जाहीर केले आहे. तथापि माझ्या असोसिएशनचे मत असे आहे की, विरोधाचे मुख्य तत्त्व व माझ्या असोसिएशनने उपस्थित केलेले महत्त्वाचे मुद्दे आपल्या ध्यानात मुळीच आलेले नाहीत.

शेवटी, मी पुनः एकदा सांगतो की, हिंदी लोकांची घाऊक आवक होण्याला आणि व्यापारात अनिर्बंध स्पर्धा चालण्याला जो विरोध आहे, तो माझ्या असोसिएशनला मान्य आहे. आमच्या समाजाचा सच्चेपणा स्पष्ट करण्यासाठी माझ्या असोसिएशनने अशा नम्र सूचना केल्या आहेत की, त्यामुळे वरील दोन्ही आक्षेपांचा पूर्ण परिहार व्हावा. सत्य स्थितीचे ज्ञान नसताना योजलेला हा कायदा परिणामाच्या बाबतीत जुलमी आहे. आणि ज्या समाजाचे प्रतिनिधित्व माझी असोसिएशन करते, त्याच्या

धार्मिक भावना दुखविणारा आहे. अशा कायद्याला मान्यता देऊन हिंदी समाज आपला उरलासुरला स्वाभिमान गमावील हे अशक्य आहे.

आपला
इसाप ईस्माईल मियाँ
अध्यक्ष
ब्रिटिश इंडियन असोसिएशन

इंडियन ओपिनियन, १२–१०–१९०७

२२२. "रॅन्ड डेली मेलला पत्र"

जोहान्सबर्ग,
ता. ९ ऑक्टोबर, [१९०७]

संपादक,
रॅन्ड डेली मेल,
जोहान्सबर्ग, यांस

महाशय,

श्री. सुलेमान मंगा[1] व पूनिया[2] नावाची एक हिंदी स्त्री यांना अत्यंत वाईट रीतीने वागविले गेले. त्यांची बाजू आपण उत्साहाने घेण्याचे सौजन्य दाखविले म्हणून मी माझ्या नजरेस आलेल्या तिसऱ्या प्रकरणाकडे आपले लक्ष वेधतो. निष्कारण मान-हानी होण्याच्या बाबतीत ही घटना पूर्वीच्या दोन घटनांपेक्षा अधिक नसली तरी बरोबरीची आहे.

श्री. ॲन्थनी पीटर्स हा जन्माने हिंदी ख्रिश्चन. तो पूर्वी नाताळमध्ये सरकारी नोकर होता आणि आता पीटर मॅरित्सबर्ग येथील चीफ मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात दुभाष्याचे काम करीत आहे. तो रविवारी जोहान्सबर्गला जाण्यासाठी निघाला. शनिवारी पीटर

१. पाहा : खंड ५, लेख २१४ व लेख ३००.
२. खंड ५, लेख ४६५.

मॅरित्सबर्ग येथून निघालेल्या " जोहान्सबर्ग मेल " मध्ये तो उतारू होता. त्याच्याजवळ सवलतीचे तिकीट होते आणि त्याच्या अधिकाराचे वर्णन असलेले रेल्वेचे प्रमाणपत्र होते. फोक्‌रस्ट येथे तपासणी करणाऱ्या पोलिसाने त्याची कसून तपासणी केली. श्री. पीटर्स याने आपला परवाना दाखविला. हिंदी समाजाने आंगठ्याचे ठसे खुषीने दिले नव्हते, अशा वेळी तो परवाना त्याला मिळालेला होता. तो पाहून पोलिसाचे समाधान झाले नाही, तेव्हा श्री. पीटर्स याने, वर मी उल्लेखिलेले, सवलतीचे तिकीट दाखविले आणि आपली सही देण्याची तयारी दाखविली, पण व्यर्थ. हे सवलतीचे तिकीट दुसऱ्या कोणाचे असेल असे म्हणून पोलिसांनी त्याचा अपमान केला, तेव्हा आपले नांव असलेली आपली हातातील काठी व अंगातील शर्ट श्री. पीटर्स याने दाखविला, पण त्यानेही त्याचे समाधान झाले नाही. तीन दिवसांनी आपण परत येणार याची खात्री पटविण्यासाठी त्याने अनामत रक्कम ठेवण्याची तयारी दर्शविली. पण त्या पोलिसाने श्री. पीटर्स याला डब्यातून अक्षरशः ओढून काढण्याचा एका काफिर शिपायाला हुकूम केला. श्री. पीटर्स याला " सार्जंट मॅन्सफील्ड " यांच्यापुढे उभे करण्यात आले. त्यांच्या लक्षात ही झालेली भयंकर चूक आली. त्यांनी श्री. पीटर्स यांची माफी मागितली व त्याला सोडून दिले. पण हे समाधान काय कामाचे ! त्याचा अपमान तर झालाच, पण शिवाय जेथे त्याची ओळखदेख नव्हती, अशा फोकरस्ट-मध्ये थांबण्याचा त्रास सोसावा लागला आणि तीन दिवसांच्या तुटपुंज्या सुटीचा मोठा भाग कापला गेला. श्री. पीटर्स आज रात्री आपल्या कामावर रुजू होत आहे. या प्रकरणावर अधिक काही टीका न करता मी एवढेच म्हणतो की, या देशाला नुसती भेट देणाऱ्या कैक प्रतिष्ठित हिंदी लोकांच्या वाट्याला कोणते हाल येतात याचा हा नमुना आहे. येथे सर्वसामान्य कायद्याचा किंवा आशियावासियांच्या लोंढ्याचा प्रश्न नाही, तर माणसामाणसामधील साध्या सौजन्याचा व न्यायाचा हा प्रश्न आहे. अथवा श्रीमती वॉगल यांनी " ग्लासगो हेरल्ड " मध्ये परवा लिहिल्याप्रमाणे, काळी कातडी असणे हा ट्रान्सवॉलमधील लोकांच्या दृष्टीने गुन्हा आहे काय !

आपला,
मो. क. गांधी

रॅन्ड डेली मेल, १०-१०-१९०७

२२३. केपमधील हिंदी लोक

प्रवेशविषयक कायद्यातून उद्‌भवलेल्या आणि केपच्या वरिष्ठ न्यायालयात चाललेल्या एका महत्त्वपूर्ण कसोटीच्या खटल्याचा वृत्तांत[1] 'केप टाईम्स' मध्ये प्रसिद्ध झालेला आहे. तो, उशिरा का होईना पण, आम्ही या अंकी अन्यत्र उद्‌धृत करीत आहोत. केपच्या संसदेमध्ये प्रवेशविषयक बिल जेव्हा मंजूर होत होते, तेव्हा केप-मधील प्रमुख हिंदी लोकांनी जी उदासीनता दाखवली, तिच्याबद्दल आम्ही यापूर्वीच तीव्र खेद प्रकट केला आहे. जर [हिंदी लोकांनी] शिष्टमंडळे पाठविली असती, तर त्या प्रकारच्या कायद्यात पुष्कळच सुधारणा खात्रीने झाली असती, असे आम्हांला निश्चितपणे वाटते. त्या खटल्याच्या गोष्टी त्या वृत्तांतात पूर्णपणे आलेल्या असल्या, तरी त्यांची पुनरुक्ती येथे करणे योग्य ठरेल. केपमध्ये स्थायिक झालेल्या एका हिंदी माणसाजवळ जमीन-जुमला होता. १८९७ सालापासून तो सर्वसामान्य विक्रेता म्हणून धंदा करीत होता. हिंदुस्थानला भेट देण्याचे त्याने मनात आणले. परत येताना आपली काही गैरसोय होऊ नये म्हणून, त्या वसाहतीतून, त्याने दिलेल्या अवधीपर्यंत गैरहजर राहण्याचा परवाना त्याला हवा होता. पण प्रवेश–अधिकाऱ्याने तसा परवाना देण्याचे नाकारले. मी देईन त्या मुदतीचा परवाना घेतला पाहिजे असे त्याचे म्हणणे. ते योग्य होते की नाही हा प्रश्न नाही. एका बाजूने हक्क मागितला जात होता, तर दुसऱ्या बाजूने तो डावलण्याचा प्रयत्न होत होता. प्रवेशअधिकाऱ्याचे म्हणणे असे की, आशियावासी माणसाला गैरहजर राहण्याचा परवाना देणे ही सवलत आहे. आशियावासीयांचे म्हणणे असे की, तो माझा हक्क आहे. आता वरिष्ठ न्याय–मंदिराने असा निकाल दिला आहे की, गैरहजेरीचा परवाना मिळण्याचा उपजत हक्क आशिया-वासियाला कायद्याप्रमाणे मुळीच नाही. सारांश, ही गोष्ट अगदी हास्यास्पद आहे. त्यामुळे आशियावासियांना गुलामगिरीच्या अवस्थेस पोचविले जाते, पण त्याचा दोष प्रमुख हिंदी लोकांशिवाय दुसऱ्या कोणाकडेही नाही. खटला चालू असताना सर्वांत मनोरंजक असा एक मुद्दा उपस्थित झाला, पण त्याचा काही निकाल लागला नाही. प्रस्तुतच्या प्रवेशविषयक कायद्याने १९०२ चा प्रवेश–विषयक कायदा रद्द होतो, पण झालेल्या कायद्यातील हक्क या नव्या कायद्याच्या पहिल्या कलमाने सुरक्षित ठेवलेले आहेत असे दिसते. ते कलम असे—

१. तो येथे दिलेला नाही.

जुना कायदा रद्द झाला म्हणून, प्रस्तुत कायद्याच्या सुरुवातीस घडलेल्या किंवा सुरू झालेल्या घटना, कोणतेही मिळालेले हक्क, सोयी किंवा संरक्षण, कोणत्याही मिळालेल्या शिक्षा किंवा स्वीकारलेल्या आर्थिक जबाबदाऱ्या, चालू असलेली कोणतीही वैगुण्ये किंवा अपात्रता, घडलेले कोणतेही गुन्हे अगर सुरू झालेली कोणतीही कार्यवाही यांवर परिणाम होणार नाही.

आता १९०२ च्या ४७ व्या कायद्याने, दक्षिण आफ्रिकेत स्थायिक झालेल्या इतर माणसांबरोबरच आशियावासियांच्या हक्कांचे संरक्षण केले आहे. यावरून हे दिसून येईल की, केपमध्ये किंवा दक्षिण आफ्रिकेमध्ये सुद्धा १९०२ पूर्वी स्थायिक झालेल्या हिंदी माणसांच्या हक्कांवर १९०६ च्या कायद्याने काहीही घातुक परिणाम झालेला नाही. न्या. मॅसॉडॉर्प् यांनी असे स्वच्छ सांगितले आहे की, १९०२ पूर्वी केपमध्ये स्थायिक झालेल्या हिंदी माणसाने वसाहतीतून बाहेर जाऊन गैर-हजेरीचा परवाना न घेता तो परत आला तरच त्याच्या बाबतीत हा मुद्दा उपस्थित होईल. हे अत्यंत सरळ आहे. केपमधील हिंदी लोक आपला हक्क कसोटीला लावण्याच्या कामी वेळ दवडणार नाहीत असा आम्हांस विश्वास वाटतो. गैरहजेरीचे परवाने देण्याची पद्धत पराकाष्ठेची जुनी आहे. आणि प्रत्येक स्वतंत्र माणसाला जे संचार-स्वातंत्र्य हवे, त्याच्यावर आक्रमण करणारी आहे, हे खचित.

इंडियन ओपिनियन, १२-१०-१९०७

२२४. "इंडियन ओपिनियन" विषयी

आरंभी आम्ही गुजराती विभागाची चार पाने देत होतो. नंतर तो आकडा आठापर्यंत वाढविला आणि पुनः बारापर्यंत वाढविला, हे आमच्या वाचकांच्या लक्षात आले असेल. गेले काही आठवडे ही पृष्ठ-संख्या १३, १४ व १५ सुद्धा झालेली आहे. आता प्रत्येक वेळी १६ पाने देण्याचा आमचा विचार आहे. काही वेळा आम्ही इतकी पाने निरनिराळ्या अडचणींमुळे देऊ शकणार नाही. पृष्ठसंख्या अशी वाढविल्यामुळे आम्हांला जादा खर्च येईल. पण त्यामुळे आम्ही मागे सरणार नाही. कारण आमचे ध्येय सार्वजनिक सेवा करून चरितार्थ चालविण्याचे आहे. सेवा हा प्रधान हेतु, चरितार्थ चालविणे हा गौण हेतु. 'इंडियन ओपिनियन'[१] ची स्थापना

१. जून १९०३ मध्ये. पाहा खंड : ३, लेख २३९

झाली, तेव्हापासून आतापर्यंत त्यातून पैसा मिळवावा असे कोणाच्याही मनात आलेले नाही आणि यापुढेही येणार नाही. म्हणून, आमचे उत्पन्न जसे वाढेल त्या प्रमाणात वाचकांना अधिक फायदा देण्याचा आमचा विचार आहे. या वृत्तपत्राशी संबंध असलेल्या लोकांचे पगार दिल्यानंतर जर व जेव्हा विशिष्ट प्रमाणात शिल्लक उरेल, तर व तेव्हा ती सर्व सार्वजनिक कार्यासाठी खर्च केली जाईल.

"इंडियन ओपिनियन"चा प्रसार वाढल्याने आमच्यामधील शिक्षण व देशभक्ती वाढीस लागेल अशी आम्हांस खात्री वाटते. सध्या या पत्राला फक्त ११०० वर्गणीदार आहेत. अर्थात् वाचकांची संख्या त्याहून पुष्कळच मोठी आहे. साऱ्या वाचकांनी आपल्या प्रती विकत घेतल्या, तर "इंडियन ओपिनियन" आज जी सेवा करीत आहे, तिच्या तिप्पट सेवा ते करू शकेल. त्याच्या पानांच्या संख्येत झालेल्या वाढीच्या प्रमाणात आम्हांला वाढता पाठिंबा मिळावा अशी अपेक्षा धरण्यात काही चूक नाही, असे आम्हांस वाटते. या पत्रामुळे होणाऱ्या सेवेचे मोल जे बरोबर जाणतात, त्यांनी प्रत्येकी फक्त एक नवा वर्गणीदार मिळवून दिला, तरी त्यामुळे आम्हांला उत्साह येईल, आणि पृष्ठसंख्येच्या वाढीमुळे होणारा वाढता खर्च थोडा फार तरी भागेल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १२–१०–१९०७

२२५. दक्षिण आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमिटी

आता ही कमिटी सुमारे एक वर्षाची झाली.[1] ती आणखी एक वर्ष चालू राहावी की नाही, हे द. आफ्रिकेतील हिंदी लोकांवर अवलंबून आहे. हा प्रश्न श्री. रिच् यांनी काढला आहे. त्यांच्या पत्राकडे आम्ही प्रत्येक हिंदी माणसाचे लक्ष वेधतो.

कमिटीने प्रचंड कार्य केलेले आहे. आणि त्याला उत्कृष्ट फळ आलेले आहे, हे प्रत्येक हिंदी माणसाला दिसू शकेल. आता आपले जहाज समुद्राच्या मध्यभागी

१. तिची स्थापना १९०६ च्या नोव्हेंबरमध्ये झाली. पाहा : खंड ६, लेख २५० नंतर जोडलेला मजकूर.

आहे. अशा वेळी कमिटीचे विसर्जन करणे म्हणजे ते जहाज बुडविण्यासारखे आहे, असे आम्हांस वाटते.

या कमिटीच्या सेवेमुळे केवळ ट्रान्सवॉलचाच नव्हे तर सर्व दक्षिण आफ्रिकेचा फायदा होत आहे. "फ्रीडडॉर्प" वटहुकुमाच्या बाबतीत केवळ जोहान्सबर्गचा फायदा झाला असे नव्हे. त्या वटहुकुमात दुरुस्ती झाली याचा फायदा सर्वांना आहे, आणि त्याचा सर्व लोकांवर प्रभाव पडला आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. नव्या कायद्याविरुद्ध चाललेला हा लढा यशस्वी झाला तर प्रत्येक हिंदी माणसाचा लाभच होईल. कमिटीचे यश एवढेच काही नाही. नाताळमधील नगरपालिकेचा कायदा जवळजवळ रद्द झाला. याचे श्रेय फक्त कमिटीलाच दिले पाहिजे. परवान्याच्या प्रश्नासाठी कमिटी अजून लढत आहे. "डेलागोआ बे" च्या प्रश्नाबाबत कमिटीच्या पत्रव्यवहाराचाच परिणाम झाला असे आम्हांस वाटते. केपमधील हिंदी लोक जागे झाले तर इंग्लंड-मधील कमिटीसुद्धा त्यांच्यासंबंधीच्या कायद्याच्या बाबतीत लढा करू शकेल.

कमिटीमध्ये पुष्कळ सुप्रसिद्ध लोक आहेत. पण श्री. रिच् यांच्या सेवेविना कमिटी काही काम करू शकली नसती. सर मंचरजी भावनगरी यांनी पुष्कळ परिश्रम केले. पण त्यांच्या अनेक कामांपैकी हे फक्त एक काम आहे. श्री. रिच् यांचा सारा वेळ कमिटीच्या कामातच जातो. म्हणून सध्या तरी त्यांच्याशिवाय कमिटी काम करू शकत नाही. श्री. रिच् आता दक्षिण आफ्रिकेत यावयाचे आहेत. पण तेथेच राहण्यास ते राजी आहेत असे कळते.

आता आपण खर्चाचा विचार करू. जेव्हा कमिटीची स्थापना झाली तेव्हा दरसाल ३०० पौंड किमान खर्च येईल असा अंदाज धरला होता. पण काम इतके वाढले की, कमिटीला यापूर्वीच पाठविलेली ५०० पौंडांची रक्कम अपुरी असल्याचे आढळले. इतक्या थोड्या खर्चात कमिटीचे काम चालू राहिले याचा अर्थ श्री. रिच् यांचे वेतन केवळ नाममात्र होते. तेही त्यांनी घेतले नसते. पण ते न घेता तेथे राहणे त्यांना अशक्य होते. अतःपर श्री. रिच् यांचा सारा खर्च आपण सोसावा. त्यांच्या अंदाजाप्रमाणे एका वर्षाचा सर्व खर्च १००० पौंडांपर्यंत जाईल. कमिटीने आपले काम वर्षभर पूर्ण जोसात केले, तर तिला ५०० पौंडांची गरज लागेल आणि श्री. रिच् यांना ५०० पौंड द्यावे लागतील. एकूण १००० पौंड लागतील. किरकोळ खर्चात आपण काही काटकसर करू. पण श्री. रिच् यांच्या खर्चात ती मुळीच करता कामा नये. कारण त्यांना इंग्लंडमध्ये इतका खर्च सहजच येईल.

हा प्रश्न असा आहे की, त्याचा विचार प्रत्येक हिंदी माणसाने काळजीपूर्वक केला पाहिजे आणि प्रत्येक संस्थेने तिकडे लक्ष दिले पाहिजे. दक्षिण आफ्रिकेच्या प्रत्येक विभागाने कमिटीच्या खर्चासाठी वर्गणी दिली पाहिजे.

हा खर्च सोसणे केप, ऱ्होडेशिया, डेलागोआ बे, नाताळ व ट्रान्सवॉल या सर्वांना मिळून काही अवघड नाही. एवढ्या खर्चात अशी कमिटी चालविणे आणि तिच्याकडून इतके काम मिळविणे हे सामान्यतः अशक्य आहे. पण श्री. रिच् हे पगारी नोकर नाहीत आणि ते कमिटीचे काम हे स्वतःचेच काम मानतात, म्हणूनच वरील रकमेत ते भागवू शकतात.

आमच्या वाचकांनी या विषयावर आपली मते छोट्या पत्रांनी कळविली तर आम्ही ती प्रसिद्ध करू. कोणाला वर्गणी देण्याची इच्छा असेल तर तिचाही आम्ही स्वीकार करू आणि त्यांना असोसिएशनकडून योग्य वेळी पावतीही मिळेल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १२-१०-१९०७

२२६. स्मट्स यांचे भाषण

प्रिटोरिया येथे श्री. स्मट्स यांनी केलेल्या भाषणाचे संपूर्ण भाषांतर आमच्या जोहान्सबर्गच्या बातमीपत्रात आलेले आहे. त्याचे काळजीपूर्वक वाचन करणे व विचार करणे अवश्य आहे. श्री. स्मट्स हे गर्वाने बोलले आहेत. पण ईश्वर कोणाचाही गर्व टिकू देत नाही. श्री. स्मट्स यांच्या गर्वाचे घरही बहुधा खाली होईल. या गृहस्थाचा गर्व त्याच्या अज्ञानाइतकाच आहे. या सज्जनाला श्री. इसॉप् मियाँ यांनी योग्य उत्तर पूर्वीच पाठविलेले आहे, हे पाहून आम्हांस आनंद वाटतो.

श्री. स्मट्स अशा तोऱ्यात बोलले आहेत की, ब्रिटिश सरकार हे आपल्या खिजगणतीत नाही. अशा भाषणामुळे उदारमतवादी पक्ष त्यांच्या विरुद्ध जाण्याचा संभव आहे. तो पक्ष त्यांना विरोध करतो की नाही याचे आपल्याला काहीच महत्त्व नाही.

श्री. स्मट्स यांच्या अज्ञानाची काही उदाहरणे आपण घेऊ. आपण फक्त बोटांच्या ठशांसाठी लढत आहोत असे ते म्हणतात; हे अगदी मूर्खपणाचे आहे. बोटांचे ठसे (देणे) हा जरी आपला एक मुद्दा असला, तरी त्यावर आपला लढा उभारलेला नाही. आपल्या लढ्याचे मुख्य कारण हे आहे की, हा कायदा आपल्याला लबाड व गुन्हेगार ठरवितो आणि आपल्या समाजावर आघात करतो व गोरे आणि

गौरेतर लोक यांच्या दृष्टीने आपल्याला तुच्छ लेखतो, आणि आपण अगदी कःपदार्थ आहोत असे मानून आपल्याला पायदळी तुडवू पाहतो. या सर्व गोष्टींचा विचार न करता, श्री. स्मट्स हे केवळ बोटांच्या ठशांच्या प्रश्नावर भर देत आहेत आणि आपली चेष्टा करून गोऱ्या लोकांना खेळवीत आहेत. त्यांच्या या खोट्या विधानांना आणि इतर आरोपांना श्री. इसॉप् मिया यांनी तिखट उत्तर दिले आहे. जोहान्सबर्ग, मुंबई व दर्बान अशा शहरांत खोटे परवाने विकले जातात, असे जे श्री. स्मट्स यांनी म्हटले आहे, तो गंभीर आरोप आहे.

पण श्री. स्मट्स यांच्या खोट्या विधानापेक्षा त्यांच्या मताकडे अधिक लक्ष देणे जरूर आहे. श्री. स्मट्स जे काही बोलले त्यावरून असे दिसते की, त्यांचा मुख्य रोख व्यापारी वर्गावर आहे. हिंदी व्यापाऱ्यांचा त्यांना विशेष तिटकारा आहे. "त्या व्यापाऱ्यांना 'वस्त्यां' मध्ये मी डांबून ठेवीन" असे ते उघडपणे म्हणतात. काहीही झाले तरी त्यांना ट्रान्सवॉल हा खास गोऱ्यांसाठीच राखून ठेवावयाचा आहे. सध्याच्या व्यापारी मंदीचा दोषही त्यांनी हिंदी व्यापाऱ्यावर टाकलेला आहे. त्यांना निपटून काढल्याशिवाय श्री. स्मट्सचे समाधान होणार नाही. त्यांना असे वाटते की, आपण (हिंदी लोकांनी) हा कायदा स्वीकारला म्हणजे आपल्याला हवे ते करता येईल. आपण मोठा लढा सुरू केल्यावर आणि शपथा घेतल्यावर जर झोपी जाऊ, तर आपल्याला लाथा मारणे (श्री. स्मट्स यांना) अगदी सोपे जाईल. यावरून हिंदी व्यापाऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, आपण जर आपली नावे नोंदविली, तर आपले दुहेरी नुकसान होईल. त्यांची प्रतिष्ठा जाईल, हिंदी लोक त्यांचा धिक्कार करतील आणि आपल्या हाताला व तोंडाला काळिमा लावून घेतल्यानंतर त्यांना 'वस्त्या' मध्ये जाऊन राहावे लागेल व स्वतःचा सत्यानाश करून घ्यावा लागेल. उलट, ते खंबीरपणे लढत राहिले तर त्यांची प्रतिष्ठा कायम राहील. प्रतिष्ठा हीच खरी संपत्ती. एवढेच नव्हे तर आपण खंबीर राहिलो तर आपल्याला यश मिळण्याचा पूर्ण संभव आहे. त्याचा अर्थ, त्यांचा व्यापार अबाधित राहील. आपला बचाव करण्याचा एकच मार्ग आहे— आणि तो म्हणजे कायद्याविरुद्ध लढा देणे. नाही तर आपण या क्षणापासून मेल्यासारखे आहोत.

शिवाय, श्री. स्मट्स यांचे भाषण म्हणजे केवळ एक धमकी आहे असे आम्ही मानतो. ज्याला कार्य करावयाचे आहे तो बडबड करीत नाही. भुंकणारी कुत्री फारशी चावत नाहीत. फणा काढणारा नाग दंश करीत नाही, फक्त फूत्कार करतो. एका बाजूला, श्री. स्मट्स म्हणतात, प्रत्येक हिंदी माणसाला डिसेंबरमध्ये हद्दपार केले जाईल. तर दुसरीकडे ते म्हणतात, जानेवारीमध्ये परवाने रद्द केले जातील आणि दुकाने बंद केली जातील. यात सत्य कोणते ? डिसेंबरात जर सर्वांची हकालपट्टी होणार, तर दुकाने कोणाची बंद होणार ! असे उद्‌गार फक्त क्रोधाने वेडे झालेल्या माणसाच्या तोंडून निघतात. शिवाय, हद्दपार करण्याचा अधिकार अद्याप त्यांना दिलेला नाही. त्याच्या

आधीच ते हद्दपारीच्या धमक्या देत सुटले आहेत. हा केवळ पोरांचा खेळ आहे असे आम्ही मानतो. शेवटी, ज्याला आपली अब्रू प्रिय आहे तो हद्दपारी किंवा तुरुंगवास याला कसा भिईल ? हिंदी समाजाची श्रद्धा ईश्वरावर आहे, तो हजारो स्मट्सना भीक घालणार नाही.

श्री. स्मट्स तेच तेच सांगत सुटले आहेत; पण इंग्लंडमध्ये आपले सामर्थ्य वाढत आहे. मंगळवारी आलेल्या तारांवरून असे कळते की, 'आदिवासी संरक्षण संघ' व नैतिक समितींचा संघ यांनी संयुक्तपणे असा ठराव केला आहे की, आशियावासी कायदा वाईट आहे आणि म्हणून हिंदुस्थान सरकार, वसाहत कचेरी व ट्रान्सवॉल सरकार यांनी विवेकाने वागले पाहिजे. वरील सार्‍या संस्था आणि जगातील वृत्तपत्रे आपल्या बाजूची आहेत. असे असताना, श्री. स्मट्स यांची शक्ती व गर्व कितीही असला तरी ते काय करू शकतील ? "देव तारी त्याला कोण मारी ?"

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १२-१०-१९०७

२२७. वायबर्ग यांचे भाषण

ब्लूम् फॉटीन येथे श्री. वायबर्ग यांनी केलेल्या भाषणाचा सारांश आम्ही अन्यत्र दिलेला आहे.[१] श्री. वायबर्ग यांनी असे दाखविले आहे की, गोर्‍यांना आपली प्रगती हवी असेल तर काळ्यांना पूर्णपणे अलग ठेवले पाहिजे म्हणजे त्यांच्याशी गोर्‍यांचा काडीमात्र संबंध येणार नाही. काळ्या लोकांना अलिप्त ठेवण्यात आशियावासीयांचा अंतर्भाव होईल हे सांगण्याची गरज नाही. श्री. वायबर्ग यांच्या शब्दांचा सूचितार्थ हा असा आहे. हिंदी लोक गोर्‍यांपेक्षा कमी सुसंस्कृत नाहीत. उलट, गोर्‍यांपेक्षा आपली संस्कृती अधिक प्राचीन असल्याचा त्यांचा दावा आहे. श्री. वायबर्ग यांना स्वार्थामुळे याची काहीच कल्पना नाही. स्पष्ट शब्दांत याचा अर्थ असा की, श्री. वायबर्ग यांना मोकळे रान मिळाले तर ते हिंदी लोकांना अलग राहण्यासाठी दुसर्‍याच दिवशी हाकलून देतील. असे करणे त्यांना किंवा त्यांच्या सहकार्‍यांना शक्य आहे किंवा नाही हे, हिंदी लोक आता जे सामर्थ्य प्रकट करतील त्यावर पुष्कळसे आहे. सध्याच्या लढ्यात

१. तो येथे दिलेला नाही.

हिंदी लोकांनी माघार घेतली, तर गोरे लोक त्यांना कःपदार्थ मानतील आणि अलग राहण्यासाठी पिटाळून लावतील, अशा इशाऱ्याची कुजबूज आमच्या कानी यापूर्वीच आलेली आहे. याची जाणीव होऊन हिंदी लोक दक्ष राहणार नाहीत काय ? एकीकडे श्री. स्मट्स यांनी, आपण हा कायदा मानला नाही तर आपण काय करू याची धमकी दिली आहे, दुसरीकडे श्री. वायबर्ग यांनी आपल्याला पर्यायाने पण असे सांगितले आहे की, तुम्ही एकदा का या कायद्याला मान्यता दिली, (आपण निर्माल्य आहोत अशी त्यांची खात्री पटली) म्हणजे तुम्हांला अलग राहण्यासाठी पिटाळून लावण्यास उशीर होणार नाही. श्री. स्मट्स यांच्या धमक्यांनी जर कोणी घाबरून गेला असेल, तर त्याने श्री. वायबर्ग यांच्या शब्दांकडे कमी लक्ष देणे योग्य होणार नाही. या बाबतीत उपाय एकच आहे– आणि तो म्हणजे हिंदी लोकांनी चालू लढ्यात खंबीर राहून आपले पाणी काय आहे हे सिद्ध केले पाहिजे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १२–१०–१९०७

२२८. केपमधील हिंदी लोक

केपच्या प्रवेश कायद्यासंबंधी आम्ही जसजसे अधिक वाचतो तसतसा हिंदी पुढाऱ्यांना अधिक दोष देतो. हायबर्गच्या श्री. धारशींच्या वतीने जो खटला लढला गेला, तो महत्त्वपूर्ण होता असे आम्हांस वाटते. त्याचा वृत्तांत आम्ही इंग्रजीमध्ये सविस्तर दिला असून त्यावर आम्ही टीकाही केली आहे.[1] त्या खटल्यातील सहज समजणाऱ्या गोष्टी आम्ही येथे देत आहोत.

श्री. धारशी १८९७ पासून केपमध्ये व्यापार करीत आहेत. हिंदुस्थानला जाण्यासाठी १८ महिन्यांचा तात्पुरता परवाना त्यांनी मागितला. तो देण्याचे अधिकाऱ्यांनी नाकारले व एक वर्षाचा परवाना देण्याची तयारी दाखवली. श्री. धारशी यांनी आपला हक्क म्हणून परवाना मागितला. "तसा हक्क तुम्हांला मुळीच नाही, परवाना देणे न देणे अधिकाऱ्यांच्या मर्जीवर आहे." असे अधिकाऱ्याने उत्तर दिले. तेव्हा श्री. धारशी यांनी हे प्रकरण कोर्टाकडे नेले. वरिष्ठ न्यायमंदिराने त्यांचा अर्ज

१. पाहा : "केपमधील हिंदी लोक", लेख २२३

फेटाळला आणि असा निर्णय दिला की, अधिकाऱ्याने (आपल्याला) परवाना द्यावा, अशी सक्ती हिंदी माणूस करू शकत नाही.

या निर्णयाचा अर्थ असा आहे की, एखादा हिंदी माणूस परवानगीशिवाय केपबाहेर गेला तर तो परत येऊ शकत नाही. परवाना देण्याचा अधिकार अधिकाऱ्याच्या हातात असल्यामुळे हिंदी लोक केपमध्ये कायमचे बंदिवान झाले आहेत. सध्या परवाने सर्वांना दिले जातात, या म्हणण्याला काहीच अर्थ नाही. परवान्याची मागणी करावी लागते हाच जुल्म आहे. असा कायदा अन्यत्र कोठेही नाही. नाताळमध्ये एकदा प्रमाणपत्र दिले की, ते कायमचे चालू राहते. ट्रान्सवॉलमध्येदेखील जे प्रमाणपत्र दिले जाणार आहे, ते कायमचे असेल. केपमध्ये, जेव्हा एखाद्या हिंदी माणसाला बाहेर जावयाचे असेल, तेव्हा त्याने " रजेचे तिकिट " घेतले पाहिजे. ते त्याने न घेतले व त्याला इंग्रजी भाषा येत नसेल, तर त्याला परत येता येणार नाही. हा कायदा, आमच्या मते, अत्यंत जुलुमी आहे. शिवाय, अशा " रजेच्या तिकिटासाठी " १ पौंडाची फी द्यावी लागते. ही स्थिती व गुलामगिरी यात फारसा फरक नाही. " रजेच्या तिकिटा-शिवाय " कोणाला केपबाहेर का जाता येऊ नये !

यावर आणखी काही उपाय आहेत. एक म्हणजे केपमधील पुढाऱ्यांनी मोठा लढा देऊन कायदा दुरुस्त करून घ्यावा. दुसरा म्हणजे, केपमधील निवडणुकीच्या वेळी त्यांनी आपले सामर्थ्य दाखवावे. या कायद्यात आणखी एक गोम आहे, ती लक्षात घेतली पाहिजे. प्रत्येक हिंदी माणसाने आपले छायाचित्र दिले पाहिजे. तशी सक्ती आहे. काही लोकांना छायाचित्र दाखवावे लागत नाही, म्हणून कोणी फुशारून जाऊ नये. वजनदार लोकांना ही अट लागू होत नसली, तरी त्यामुळे हिंदी समाजाचा काय फायदा होतो ? त्यामुळे आपली प्रतिष्ठा मुळीच राखली जात नाही.

तिसरा एक मार्ग आहे. त्याचा आपण विचार करू. वर उल्लेखिलेल्या खटल्यात असा एक मुद्दा उपस्थित झाला होता की, जे हिंदी लोक १९०२ पासून केपमध्ये राहात आहेत, त्यांना १९०६ चा कायदा लागू नाही. हा मुद्दा त्या खटल्यात निर्णयासाठी पुढे आलेला नसल्याने न्यायमूर्तींनी काही निकाल दिला नाही. जेव्हा असा खटला उपस्थित होईल, तेव्हा त्याचा विचार आम्ही करू, असे त्यांनी म्हटले, १९०२ च्या कायद्याप्रमाणे, दक्षिण आफ्रिकेत राहणाऱ्या कोणाही हिंदी माणसाला केपमध्ये प्रवेश करण्याचा हक्क होता. यावरून असे मानले जाते की, १९०२ पूर्वी तेथे राहणाऱ्या हिंदी लोकांना १९०६ चा कायदा लावता येणार नाही. हा युक्तिवाद बरोबर असेल तर अशा हिंदी लोकांना " रजेची तिकिटे " घेण्याची गरज नाही. असा खटला कोर्टामध्ये उत्पन्न करण्यासाठी तेथे १९०२ पूर्वी राहणाऱ्या एखाद्या माणसाने केपच्या बाहेर जावे व परत येण्याचा प्रयत्न करावा. त्याला जर प्रवेश-अधिकाऱ्याने प्रतिबंध केला, तर त्याचा प्रश्न वरिष्ठ न्याय-मंदिरात काढता येईल. हा प्रश्न उपस्थित करण्यासारखा आहे.

यात काडीमात्र शंका नाही. केपमधील हिंदी लोकांनी योजावेत असे हे तीन उपाय आहेत-- आणि ते तिन्ही योजले जातील अशी आम्हांस आशा आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १२–१०–१९०७

२२९. जोहान्सबर्गचे वातमीपत्र

लांच्छनास्पद पत्राला स्मट्सचे उत्तर

काही हिंदी पुढाऱ्यांच्या वतीने श्री. रूज यांनी जो अर्ज पाठविला, त्याला श्री. स्मट्स यांनी उत्तर दिल्याचे मी पूर्वी कळविले आहे. त्या उत्तराचे भाषांतर असे आहे.[1]

आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयक (१९०७ चा क्रमांक २) प्रमाणे तयार केलेल्या निर्बंधाच्या बाबतीत आपण ता. ३० ऑगस्ट रोजी जे पत्र पाठविले, ते मला मिळाले. त्या बाबतीत मी असे कळवू इच्छितो की,—

१. ट्रान्सवॉलमध्ये राहणाऱ्या आशियावासी लोकांनी प्रस्तुत कायद्याला मान्यता दिली तर सरकार आपली विनंती मान्य करण्यास तयार आहे. ती विनंती म्हणजे हिंदी लोकांकडून (ते संशयित किंवा गुन्हेगार नसतील तर) प्रमाणपत्रे मागण्याचा अधिकार काही निवडक गोऱ्या अधिकाऱ्यांना देणे.

२. व्यापारी परवाने देणाऱ्या कारकुनांना अर्जदारांच्या शहाजोगपणाची चौकशी करण्याचा अधिकार असणार नाही. नोंदणी-पत्र कायदेशीरपणे धारण करणाऱ्या माणसाने ते दाखविताच असा परवाना दिला जाईल आणि त्याने आपल्या उजव्या हाताच्या आंगठ्याचा ठसा दिला म्हणजे त्याला अधिक काही करावे लागणार नाही. हा ठसा तपासणीसाठी प्रिटोरिया येथील आशियावासियांच्या रजिस्ट्रारकडे पाठविला जाईल. तो

१. येथे दिलेले भाषांतर ५–१०–१९०७ च्या "इंडियन ओपिनियन"मधील मूळ इंग्रजी लेखाशी ताडून पाहिले आहे.

बरोबर असल्याचे आढळले तर अधिक काही चौकशी किंवा कृती करण्याची गरज राहणार नाही.

३. तात्पुरते परवाने देऊन आशियावासी कारकुनांची आवक येथे करण्याच्या योजनेसंबंधीचा पूर्वीचा निर्णय बदलता येणार नाही.

४. मुलांना आपल्या आई-बापांच्या किंवा पालकांच्या रक्षण छत्रातून दूर करण्याचा प्रश्नच नाही. १६ वर्षांखालील आशियावासी माणसाला ती वसाहत सोडण्याचा हुकूम देण्यात येणार नाही.

आई-बापांनी व पालकांनी नोंदणीसाठी अर्ज करताना आपल्या पुत्रांचा व पाल्यांचा तपशील दिला पाहिजे, ही अट कायम राहील.

५. चिनी वकील वगैरे ज्या लोकांकडून बोटांचे ठसे घेण्याची परंपरा नाही, त्यांच्याशिवाय इतर आशियावासी लोकांना बोटांचे ठसे देण्याची माफी देणे अशक्य आहे.

जशी मजुरी, तशी धुलाई[१]

याप्रमाणे, ज्या गृहस्थांनी तो अर्ज पाठविला होता, त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे उत्तर मिळाले. त्यावरून हे दिसते की, श्री. स्मट्स यांनी एकही मागणी पूर्ण केली नाही. परवान्यांची तपासणी गोऱ्या अधिकाऱ्यांनी करावी ही मागणी पूर्ण होण्यासाठी, केवळ अर्जदारांनी मुद्दाम नोंदणी केली तरी भागणार नाही, तर त्यासाठी सर्व हिंदी लोकांनी या कायद्याला मान्यता दिली पाहिजे. मला माझे हात काळे करून घ्यायचे असले तर मी असे म्हणेन की, माझे नोंदणी-पत्र गोऱ्याने तपासले काय किंवा काळ्याने तपासले काय, त्यात काहीच फरक नाही. काळ्याने तपासले तर तो कदाचित कमी सभ्यतेने वागेल. गोरा अधिकारी गुलामाशी कधी सभ्यतेने वागला असल्याचे उदाहरण वाचकांनी मला कळवावे. मग मी त्या गोऱ्या अधिकाऱ्याचे नाव या पत्रात छापून अजरामर करण्याचा शक्य तो सर्व प्रयत्न करीन.

बाकीच्या मागण्यांसंबंधी श्री. स्मट्स यांनी खडखडीत नकार दिला आहे आणि त्या नकाराची भाषा, स्वतःला गुलामगिरीत लोटणाऱ्या लोकांना, साजेशीच आहे. काही मागण्या निरर्थक कशा होत्या हेही त्यांनी दाखविले आहे. उदाहरणार्थ, मुलांसंबंधीची मागणी. श्री. स्मट्स यांच्या मनांत असते तरीही, १६ वर्षांखालील मुलांवर त्यांना, नवा कायदा दुरुस्त केल्याशिवाय, हात टाकता आला नसता. एखाद्या बालकाने बोटांचे ठसे दिले नाहीत तर त्याला शिक्षा करता येत नाही. पण त्या

१. गुजराती म्हणीचा अर्थ—प्रत्येकाला आपल्या योग्यतेप्रमाणे फळ मिळते.

बालकाला जो बाप गुलामगिरीची भाषा शिकविणार नाही, त्याला शिक्षा होईल. गुलामांची मुले स्वातंत्र्याच्या वृत्तीने वाढतील अशी आशा सरकारला कशी करता येईल? इंग्रजांच्या मुलांना ८ व्या वर्षांपासून कवायत शिकवतात आणि बंदूक कशी धरावी हे शिकवतात. पण आपल्यावर शिक्का बसला आहे गुलामगिरीचा. म्हणून आपल्या मुलांना फक्त गुलामगिरीचे शिक्षण मिळेल. "बाप तसा बेटा" हे नित्य घडत असते. त्या उत्तरावर मी आणखी काय टीका करू? एवढे म्हटले म्हणजे पुरे की, या पत्राने जो कठोर आघात केला आहे त्यामुळे प्रिटोरियातील आमच्या बांधवांचे धैर्य थोडे फार तरी उसळून यावे, त्यांनी द्रव्याविषयीची आपली आसक्ती सोडून द्यावी आणि श्री. स्मट्स यांना योग्य जबाब देण्याचे धाडस करावे व आपली चूक सुधारून हिंदी समाजाने चालवलेल्या लढ्यात मनापासून भाग घ्यावा. खरोखर श्री. स्मट्स याच्या पत्राने प्रत्येक हिंदी माणूस प्रक्षुब्ध झाला पाहिजे. त्यामुळे प्रत्येक "हिंदी सिंहाने" असा निश्चय केला पाहिजे की, "श्री. स्मटस यांनी आपल्या पत्रात उल्लेखिलेल्या अटीवरच मला येथे राहता येणार असेल तर ट्रान्सवॉलशी मला काही कर्तव्य नाही. आपल्या सर्वांची काळजी घेणारा तो महान परमेश्वर आहे. दुसऱ्या कोणत्याही ठिकाणी तो आपल्याला भाकरीचा तुकडा देईल." अशा वृत्तीने आपली मने एकदा का भारली गेली, म्हणजे आपला लढा किती भव्य होईल हे लोकांना दिसून येईल. शूर थोरोप्रमाणे अशा लोकांना "कारागृह हे राजगृह वाटेल." आणि कारागृहातील हिंदी लोकांच्या आव्हानाची घोषणा श्री. स्मट्स यांच्या अंतःकरणाला भेदून जाईल.

हाजी कासीम यांचा खुलासा

श्री. रूज यांच्या पत्राची जबाबदारी श्री. हाजी कासीम यांच्यावर टाकण्यात आली आहे. म्हणून त्यांना वाटते, आपल्यावर हा अन्याय झाला आहे. त्यांनी पुढील खुलासा दिला आहे. तो मी समाजापुढे ठेवीत आहे. श्री. हाजी कासीम लिहितात–

वासाहतिक सचिवाला जो अर्ज दाखल करण्यात आला, तो काही गृहस्थांनी संयुक्तपणे केलेला होता. शिवाय, त्या अर्जाची भाषा नम्रतेची होती, ती माझ्यामुळे नव्हे तर वकिलांच्या सल्ल्यामुळे. आम्हालाही असे वाटले की, सरकारकडे अर्ज करावयाचा, तो नम्र भाषेत असणे योग्य. तो अर्ज करण्याच्या कामी लोक एकत्र आले त्याचे कारण, नम्रपणाने केलेल्या अर्जाने सरकारचे मन आपल्या मागण्या पूर्ण करण्याकडे वळेल अशी आशा. सर्वांनी संमती दिली होती. मीच तो अर्ज करावयास लावला, हे खोटे आहे. "इंडियन ओपिनियनने" माझ्या माथ्यावर दोषाचे खापर फोडले आहे, ते चुकीचे आहे. ते अगदी अयोग्य आहे. नोंदणी करणे न करणे हे कोणाच्याही इच्छेवर अवलंबून आहे. आपल्याला कोणीतरी खोटी माहिती पुरवली

असे दिसते. तिच्यावर विसंबून वृत्तपत्रात माझ्या नावाचा उल्लेख चुकीने करणे योग्य नव्हे. मी प्रथमपासूनच ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या पुढाऱ्यांना जाहीरपणे सांगत आलो आहे की, जोपर्यंत ईश्वराच्या कृपेने माझ्या अंगी धैर्य राहील, तोपर्यंत मी बांधवांबरोबर काम करीन. पण शेवटी, माझे धैर्य खचले तरी, जरूर ती गोष्ट करतानाही मी त्यांचा सल्ला व सहाय्य घेईन.

तो अर्ज पाठविण्याच्या कामी इतर गृहस्थांशी मी हातमिळवणी केली, असा जर माझ्यावर आरोप असेल, तर ती गोष्ट अगदी निराळी. मी सदैव सौम्य प्रकृतीचा माणूस आहे. मला वाटले, सरकारशी समेट करू पाहणारे लोक शहाणपणाने वागत आहेत आणि म्हणून मी (त्यांच्यांत) मिसळलो. कारण, इतरांप्रमाणेच मलाही वाटले की, हा कायदा रद्द होणार नाही, म्हणून सरकारशी समेट करून त्यात दुरुस्ती करून घेणे हाच चांगला मार्ग. या परिस्थितीत तडजोडीच्या वृत्तीने वागणे श्रेयस्कर. ब्रिटिश इंडियन असोसिएशनने चालविलेला लढा न्यायाचा आहे. त्याच्याशी माझी पूर्णपणे सहानुभूती आहे आणि त्याला यश मिळावे अशी माझी इच्छा आहे.

स्मट्स यांचे भाषण

स्मट्स यांनी आपल्या मतदारसंघातील सभेत एक भाषण[1] केले. त्यांत त्यांनी नव्या कायद्याच्या प्रश्नालाही स्पर्श केला. त्यांच्या भाषणाचे भाषांतर मी पुढे देतो[2] :

आशियावासीयांचा आणखी एक प्रश्न आहे-- या देशात राहणाऱ्या हिंदी व चिनी लोकांचा तो आहे. हे लोक दक्षिण आफ्रिकेच्या शाश्वतच्या उत्कर्षाला घातक आहेत. जुन्या कायद्याप्रमाणे, हिंदी लोकांनी आपली नावे नोंदविल्याशिवाय व काही रक्कम भरल्याशिवाय त्यांना या देशात राहता येत नसे. त्या कायद्याखाली हिंदी लोकांची नोंदणी केली जात असे. तथापि हिंदी व्यापाऱ्यांची स्पर्धा तीव्र झाल्यामुळे डच संसदेने असा कायदा केला की, हिंदी लोकांनी फक्त "बाजारामध्ये" व्यापार करावा. पण ब्रिटिश सरकार मध्ये पडले आणि म्हणाले, हे लोक आमचे प्रजाजन आहेत आणि लंडनच्या परिषदेनुसार, साऱ्या प्रजाजनांना सारखे वागवले पाहिजे. त्यामुळे तो कायदा व्यवहारात आणणे अशक्य झाले आहे. परिणामी हिंदी लोक सर्व देशभर व्यापार करू लागले. ते विगर-परवाना व्यापार करू लागले. गोऱ्या व्यापाऱ्यांपेक्षा त्यांची स्थिती चांगली झाली. ही परिस्थिती कितीही असह्य असली, तरी ब्रिटिश

१. पहा, "स्मट्स यांचे भाषण," लेख २२६.

२. १२-१०-१९०७ च्या "इंडियन ओपिनियन"मध्ये आलेल्या इंग्रजी वृत्तांतावरून पुढील मजकूर दिला आहे. गुजराती वृत्तांताशी साम्य दाखवण्यासाठी काही फेरफार केले आहेत.

सरकारने, युद्ध सुरू होईपर्यंत चालू ठेवली. याचा परिणाम प्रिन्स्ले स्ट्रीट, प्रिटोरिया, पीटर्सबर्ग, पॉचेफस्ट्रूम, वगैरे ठिकाणी बहुतेक सारा उद्योगधंदा हिंदी लोकांच्या हातात आहे. आणि तरीही लोक एकसारखे विचारतात, " ही व्यापार-मंदी कोठून आली ! ही गरीबी कशामुळे आली ! "

त्याचे एक कारण म्हणजे हिंदी लोकांचा व्यापार. त्यांनी जसा नाताळमध्ये व्यापार आपल्या ताब्यात घेतला, तसा तो येथेही घेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यांना सारा व्यापार आपल्या हातात यावयास हवा. सरकारने या प्रश्नाचा विचार केला. आम्ही एक कायदा एकमताने मंजूर केला. त्यामुळे हिंदी लोकांनी नाव नोंदणे अवश्य झाले. या कायद्यामुळे काही कटकटी निर्माण होतील असे मला वाटते, म्हणून त्याचे नक्की स्वरूप जनतेने समजावून घेणे अत्यंत इष्ट आहे असे मला वाटते. या वसाहतीत १५००० (पंधरा हजार) हिंदी व १२०० (बाराशे) चिनी दुकानदार आहेत, कमी नाहीत; एवढ्या मोठ्या संख्येचा संबंध असल्यामुळे हा कायदा कडक करावा लागला. जुन्या कायद्याप्रमाणे दिलेल्या प्रमाणपत्रांच्या नकला चोरून तयार केल्या जातात आणि विकल्या जातात. मुंबई, जोहान्सबर्ग व दर्बान येथे अशी काही ठिकाणे आहेत की, जेथे ही बनावट प्रमाणपत्रे हिंदी लोकांना विशिष्ट किंमतीला विकत मिळतात. एका हिंदी माणसापासून दुसरा स्वतंत्रपणे ओळखता येत नसल्यामुळे सरकारने बोटांच्या ठशांची पद्धत सुरू करण्याचे ठरविले. ही पद्धत अत्यंत अपमानास्पद आहे, या कारणासाठी हिंदी लोक तिला विरोध करीत आहेत. (हंशा). हिंदी लोकांचे एक शिष्टमंडळ इंग्लंडला गेले व त्याने सरकारची मुलाखत घेतली. पण सरकारने कायद्याला मंजुरी दिली. हिंदी लोकांच्या बाजूची मी जातीने चौकशी केली. तेव्हा मला काय आढळले ? याच लोकांना हिंदुस्थान सोडण्यापूर्वी बोटांचे ठसे द्यावे लागतात आणि हिंदुस्थानात ही पद्धत अनेक कारणांमुळे प्रचलित आहे. हिंदुस्थानातील कोणाही माजी सैनिकाला पेन्शनचा हक्क असेल तर, बोटांचे ठसे दिल्याशिवाय त्याला आपले पेन्शन मिळत नाही. हिंदी लोकांनी आपले शिष्टमंडळ इंग्लंडला पाठविले, तेव्हा या साऱ्या गोष्टी उजेडात आल्या. सध्याच्या सरकारला आपण बनवू शकू असे हिंदी लोकांना वाटते, पण त्यांना आपली चूक लवकरच कळून येईल.

हिंदी लोकांना नाव नोंदण्याला अवधी दिला आहे. नोंदणी-कचेरीजवळ या कूलींचे निरोधक ठेवलेले आहेत, असे सरकारला आढळून आलेले आहे. त्यामुळे फारच थोड्या नोंदणी झाल्या आहेत. पण सर्व गोष्टींना अंत असतो, या तत्त्वाची मी त्यांना फक्त आठवण करून देतो. या कायद्याची अंमलबजावणी सक्त रीतीने केली जाईल. नोंदणीची मुदत संपल्यावर जो हिंदी माणूस नोंदणीशिवाय राहील, त्याला सीमेबाहेर घालविले जाईल. नोंदणी झालेली असल्याशिवाय कोणाही व्यापाऱ्याला ३१ डिसेंबर रोजी परवाना मिळणार नाही, अशी नवी नोटीस काढलेली आहे. हिंदी

लोकांनी आताच नावे नोंदवली पाहिजेत. ही त्यांना शेवटची संधी आहे. दिलेल्या तारखेनंतर नोंदणी करू दिली जाणार नाही. त्याचा परिणाम म्हणजे कोणताही परवाना दिला जाणार नाही आणि सारी हिंदी दुकाने बंद करावी लागतील. (टाळ्यांचा कडकडाट). सरकार शरण येईल, असे हिंदी लोकांना वाटते हे उघड आहे. पण सरकारचा तसा विचार नाही हे मी तुम्हांला खात्रीपूर्वक सांगतो. मी हिंदी लोकांना इशारा देतो की, सरकार हा कायदा अंमलात आणण्याचा सक्त प्रयत्न करील. ता. ३१ डिसेंबर रोजी नोंदणीचे दरवाजे त्यांना कायमचे बंद होतील, हे वर्तमानपत्रांनी त्यांना समजावून सांगावे. हिंदी लोकांशी माझे भांडण नाही. त्यांना छळण्याचा माझा हेतु नाही, पण हिंदी लोकांचा लोंढा थांबविणे हा या कायद्याचा हेतु आहे. हा देश गोऱ्या लोकांचा व्हावा असा निश्चय आम्ही केलेला आहे. हे कार्य कितीही कठीण असले तरी आम्ही आमचे पाऊल टाकलेले आहे आणि ते तेथेंच कायम राहणार आहे. (टाळ्यांचा कडकडाट).

इसॉप् मियाँ यांचे उत्तर

श्री. इसाप् मियाँ यांनी या भाषणाला उत्तर पाठविले आहे. त्याचे भाषांतर मी खाली देत आहे :[१]

संस्थेची सभा

हमीदिया इस्लामिया अंजुमनच्या संमतीने, असोसिएशनची सभा गेल्या रविवारी अंजुमनच्या सभागृहात भरली. श्री. इसॉप मियाँ अध्यक्षस्थानी होते. सभागृह पूर्ण भरले होते. चिनी असोसिएशनचे अध्यक्ष श्री. क्विन्न आणि इतर चिनी लोकही हजर होते. श्री. इसाप मियाँ यांच्या भाषणानंतर श्री. गांधी म्हणाले, “निरोधकांनी पराकाष्ठेचे सौजन्य पाळणे अवश्य आहे. त्यांनी एका ठिकाणी घोळका करून उभे राहू नये. ते सैनिकांसारखे आहेत. सैनिकाने आज्ञा पाळावयाच्या असतात, शिस्त संभाळावयाची असते आणि आपले कर्तव्याचे स्थान सोडावयाचे नसते. सैनिकावर एक पुढारी असतो, त्याची आज्ञा त्याने मानावयाची असते. निरोधकांची नावे माझ्या, जवळ आहेत. त्यांच्यापैकी कोणाला आपले कर्तव्य करीत असताना पकडण्यात आले, तर मी त्यांचा बचाव करीन. पण जर त्यांना दंडाची शिक्षा झाली, तर त्यांनी, दंड न भरता त्याऐवजी तुरुंगात गेले पाहिजे. गैरवर्तन करणाऱ्या किंवा मारहाण करणाऱ्या निरोधकांचा बचाव मुळीच केला जाणार नाही. दक्षिण आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमिटी चालू ठेवणे अगत्याचे आहे.” नंतर श्री. गांधींनी श्री. रिच् यांच्या-पत्राचा सविस्तर परामर्श घेतला. त्यानंतर श्री. इमाम अब्दुल कादिर, टी. नायडू

१. पाहा, “वासाहतिक सचिवाला पत्र” लेख २२१.

(पॉचेफस्ट्रूमचे), अब्दुल रेहमान, नवाबखान, कुवाडिया, अलि महंमद, जोसेफ, उमरजी साले, इत्यादी वक्त्यांनी भाषणे केली. त्यांनी सांगितले की, कमिटी कायम ठेवली पाहिजे. ज्यांच्या नोकऱ्या जातील त्यांच्यासाठी काय करावे असा प्रश्न श्री. जोसेफ यांनी केला. उत्तरादाखल, श्री. गांधींनी सांगितले की, "जे जे संकट येईल ते ते — तुरुंगात जाण्याचेही — आपण सर्वांनी सोसले पाहिजे. नोकरी करणाऱ्या लोकांना आपल्या अब्रूची चाड असेल, तर त्यांनी नोकऱ्यांची पर्वा करता कामा नये. एक नोकरी गेली तर दुसरी मिळू शकेल, पण एकदा गेलेली प्रतिष्ठा पुनः कधीही परत मिळणार नाही. देशासाठी नोकरी गेली तर त्यात काय बिघडेल ?" श्री. कुवाडिया यांनी परवान्याच्या नोटिशीबद्दल प्रश्न विचारला असता, श्री. गांधींनी उत्तर दिले की, "परवाना मिळाला नाही तर तुरुंगात जाणे हाच प्रशस्त मार्ग. पण बिगरपरवाना व्यापार करण्यात काही अडचण नाही. तथापि हिंदी समाजाला भीती वाटत असेल तर कसोटीचा खटला उत्पन्न करता येईल. पण त्याला पैसा लागेल."

निरोधकांची सभा

वरील सभेच्या आधी निरोधकांची एक स्वतंत्र सभा भरविण्यात आली होती. प्रत्येक प्रश्नाचा विचार मोठ्या धैर्याने झाला. प्रत्येक जागा आणि वॉन ब्रँडिस चौक यांची चौकशी करण्यासाठी माणसे नेमली गेली. प्रत्येक निरोधकासाठी फीत तयार करण्यात आली. त्यामुळे निरोधक सहज ओळखता येईल. निरोधकांच्या यादीत काही बदल करण्यात आला. पण ती नावे आताच मी देऊ इच्छीत नाही. कारण आणखी काही बदल होण्याचा संभव आहे, या महिन्याच्या अखेरीस, ज्या लोकांनी निरोधक म्हणून काम केले असेल, त्यांची नावे मी देईन. गेल्या अंकी दिलेल्या नावांत दोन नावे सारखीच आहेत. ती पुढीलप्रमाणे वाचावी. नरोत्तम अमथाभाई पटेल (बाझचे) व नाराणजी करसनजी देसाई (छीनाचे).

क्रूगर्सडॉर्प येथील हिंदी लोकांना सूचना

क्रूगर्सडॉर्प येथील हिंदी लोक अजून "रॅन्ड डेली मेल" च्या बातमीदारावर अवलंबून आहेत असे मला दिसते. त्यांनी बोटांच्या ठशावर विलक्षण भर दिलेला आहे. पण हे लक्षात ठेवणे अवश्य आहे की, आपण या कायद्याला मान्यता देण्याचे नाकारतो; याचे कारण तो कायदा फक्त आपल्यालाच लागू होणार असून आपल्यावर गुन्हेगारीचा शिक्का उठवीत आहे, अशा हिंदी लोकांनी "इंडियन ओपिनियन"चे मागील अंक चाळावे आणि सत्य स्थितीची जाणीव करून घ्यावी.

फेरीवाल्यांवरील खटले

फेरीवाल्यांवरील काही खटले बोक्सबर्ग येथे चालू होते. एखाद्या खाजगी घरात फेरीवाल्याने २० मिनिटांहून अधिक काळ थांबणे हा गुन्हा आहे काय ? या प्रश्नाचा

निर्णय मॅजिस्ट्रेटने द्यावयाचा आहे. एका फेरीवाल्याविषयी सहानुभूती वाटत असल्यामुळे त्याला मॅजिस्ट्रेटने मुक्त केले. नव्या कायद्याच्या बाबतीतही असेच होण्याचा संभव आहे.

निरोधकाला अटक

श्री. भाणा छनिया नावाच्या एका निरोधकाला पोलिसांनी पकडले होते. पायवाटेवर उभे राहून पादचारी लोकांना अडथळा केल्याचा आरोप त्याच्यावर होता. त्याचा खटला श्री. क्रॉस यांच्यापुढे चालला. त्याचा बचाव श्री. गांधींनी विनामूल्य केला. मॅजिस्ट्रेटने त्याला निर्दोषी म्हणून सोडले. त्याला दंड झाला असता तर त्याने तुरुंगात जावे असे ठरले होते. याचा अर्थ असा नाही की, कोणत्याही पायवाटेवर कोणी उभा राहू शकेल. श्री. भाणा यांच्या सुटकेचे कारण हे की, ते तेथे उभे राहिल्याने कोणाही पादचारी माणसाला अडथळा होण्याचा संभव नव्हता. जेव्हा पोलिस कोणाला विशिष्ट जागी उभे राहण्यास हरकत घेतात, तेव्हा तेथून दुसरीकडे जाणे हा उत्तम मार्ग.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १२–१०–१९०७

२३०. दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीला पत्र[1]

[जोहान्सबर्ग,
ता. १४ ऑक्टोबर १९०७ पूर्वी]

आपण अधिकृत रीत्या असे सांगू शकाल की, सर् हेन्री कॅम्बेल–बॅनर्मन याला लिहिलेल्या पत्रात येथील हिंदी समाजाची मतें अचूकपणे व्यक्त झाली आहेत. आणि

१. दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीचे चिटणीस एल. डब्ल्यू. रिच् यांनी आशियावासी–नोंदणी–कायद्याच्या बाबतीत ब्रिटिश पंतप्रधान सर् हेन्री कॅम्बेल–बॅनर्मन यांना तारीख १४ ऑगस्ट रोजी एक पत्र पाठविले. पाहा, "परिशिष्ट ५" त्याला आलेल्या सरकारी उत्तरात, इतर गोष्टींबरोबर, असे लिहिले होते की, "ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांची स्वतःची जी भूमिका आहे,

[पुढील पान पहा]

या समाजाने जी परवानगी मागतली आहे ती मिळाली तर, आपल्याला साम्राज्याचे अंग म्हणून वागविले जात आहे, अशी खात्री हिंदी लोकांना पटेल. आज त्यांना निःसंशयपणे असे वाटत आहे की, आपण सावत्र मुले आहोत.

मो. क. गांधी

[श्री. एल्. डब्ल्यू. रिच्,
२८ क्वीन ॲनेस् चेंबर्स,
ब्रॉडवे, वेस्टमिन्स्टर,
लंडन एस्. डब्ल्यू]
कलोनियल ऑफिस रेकॉर्डस,
सी. ओ. २९१।१२२

२३१. मगनलाल गांधी यांना पत्र

[जोहान्सबर्ग,]
१४ ऑक्टोबर, १९०७

प्रिय मगनलाल,

तुमचे पत्र मिळाले. श्री. बद्री यांना सांगावे की, मी आपल्या फीच्या सर्व रकमा अत्यंत काळजीने मांडलेल्या आहेत. ते गैरहजर असल्यामुळे मी लिहिलेल्या पुष्कळ पत्रांना खर्च त्यांच्यावर टाकलेला नाही. तरीही मी आकारलेल्या फीपैकी कोणतीही रक्कम तुम्ही खोडू शकता आणि तुमचा निर्णय मला मान्य आहे, असे त्यांना सांगावे. त्यांच्या कागद-पत्रांच्या बाबतीत मी चौकशी करीत आहे. माझ्या बिलाच्या बाबतीत तुम्ही त्यांच्याशी अत्यंत स्पष्टपणे बोलावे. त्यांनी मजवर जो विश्वास टाकला, त्याचा घात करून, मी मन मानेल तशी फी आकारली, असे जर त्यांना वाटले,

[मागील पानावरून]

ती या ठरावावरून बरोबर व्यक्त होते की नाही, हे पंतप्रधानांना समजत नाही." साहाजिकच, हे गांधींना कळविण्यात आले. वर उल्लेखिलेले ता. १४ ऑक्टोबर रोजी पंतप्रधानांना पाठविलेले रिच यांचे पत्र "ट्रान्सवाल ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या सन्मान्य चिटणिसांचे पत्र", असा त्याचा उल्लेख करते. मूळ पत्र उपलब्ध नाही."

तर मला दुःख वाटेल. त्यांनी प्रत्येक कलमाचा विचार करावा, आणि जो अयोग्य वाटेल तो खर्च खोडावा, म्हणजे मला बरे वाटेल.

श्रीमती डोमन यांनी वाटपाचा जो हिशेब पाठविला तो पोचला.

आपला

टंकलिखित ऑफिस प्रतीवरून,
एस्. एन्. ४७६९

२३२. पोलिस कमिशनरला पत्र

[जोहान्सबर्ग,]
ता. १५ ऑक्टोबर, १९०७

पोलिस कमिशनर,
जोहान्सबर्ग,

महाशय,

दोन हिंदी अशीलांच्या वतीने श्री. अलेक्झांडर यांनी कोर्टात असे सांगितले की, वॉर्न ब्रॅडीस चौकात माझ्या अशिलांना निरोधकांचे भय वाटले आणि म्हणून त्यांनी नोंदणी-पत्रासाठी अर्ज केले नाहीत. त्यावेळी मी कोर्टात होतो. आणि तेव्हाच मी त्या विधानाचा इन्कार केला—आणि आताही करीत आहे. नोंदणी- कचेरीकडे जाणाऱ्या लोकांवर काही हिंदी लक्ष ठेवीत आहेत हे खरे. त्यांचा हेतु इतकाच की, आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाला मान्यता दिल्याने त्यांची काय अवस्था होईल हे त्यांना समजावून सांगावे आणि नोंदणीकचेरीकडे जाण्याला प्रतिबंध करण्यासाठी आपले वजन खर्च करावे. पण अशा मनधरणीकडे दुर्लक्ष करून जर एखाद्याला त्या कचेरीकडे जावेसे वाटले, तर त्याला कोणताही त्रास न देता तसे करण्यास मोकळे सोडले जाते. अशी गोष्ट, श्री. अलेक्झांडर मॅजिस्ट्रेटपुढे भाषण करीत होते, तेव्हाच घडली. एका हिंदी तरुण मुलाला आपले नाव नोंदवावयाचे होते. त्याच्या बरोबर

१. हे १६-१०-१९०७ च्या "स्टार" मध्ये प्रथम प्रसिद्ध झाले.

त्याची मालकीण होती. त्याला कोणी अडथळा केला नाही. दुसराही एक हिंदी माणूस, काही दिवसांपूर्वी, वॉर्न ब्रँडीस चौकातील नोंदणी कचेरीकडे असाच गेला, या गोष्टी मी आपल्या नजरेस आणीत आहे, याचे कारण असे की, आपल्या अर्शीलाला पोलिसांचे संरक्षण मिळावे अशी सूचना श्री. अलेक्झांडर यांनी केली आहे आणि प्रत्यक्षात तसे पोलिस-संरक्षण त्यांना मिळाले आहे, असे मला आता कळते !

माझ्या असोसिएशनच्या वतीने मी आपल्याला असे आश्वासन देतो की, ब्रिटिश इंडियन असोसिएशन कोणत्याही दमदाटीचे समर्थन करणार नाही. आणि ज्या कोणाला नोंदणी-कचेरीत जाण्याची इच्छा असेल, त्याला असोसिएशनच्या कोणाही माणसाकडून उपद्रव न व्हावा म्हणून माझी असोसिएशन सर्व तऱ्हेचे प्रयत्न करील. मला जी माहिती आहे, त्यावरून श्री. अलेक्झांडर यांना त्यांच्या अशिलांनी चुकीची माहिती दिली अशी मला खात्री वाटते, त्या अशिलांना आपल्याला शारीरिक इजा होईल, अशी भीती वाटण्यापेक्षा हिंदी लोकमताचीच भीती अधिक वाटली.

आपला आज्ञाधारक
मो. क. गांधी
सन्मान्य चिटणीस
ब्रिटिश इंडियन असोसिएशन,

इंडियन ओपिनियन, १९–१०–१९०७

२३३. "स्टार" ला पत्र[1]

जोहान्सबर्ग,
ता. १८ ऑक्टोबर, १९०७

श्री. संपादक,
"स्टार"
[जोहान्सबर्ग]

महाशय,

नोंदणी-पत्रक घेण्याची इच्छा ज्यांना आहे त्यांना दमदाटी दिल्याचा आरोप कोणताही पुरावा नसताना, पूर्णपणे निरपराधी असणाऱ्या हिंदी निरोधकांवर केला जात आहे. अशा वेळी त्या आरोपाचा पोकळपणा आणि वस्तुतः जी उलट दमदाटी होत आहे ती, आपल्या नजरेस जाहीर रीतीने आणून देण्याची मुभा आपण मला कृपेने द्यावी.

पीटर्सबर्गहून आलेल्या तीन हिंदी लोकांना निरोधकांनी संरक्षण देण्याची प्रत्यक्ष तयारी दाखविली, पण त्यांनी ते संरक्षण घेतले नाही, अशी गोष्ट काल घडली. खोटी भीती दाखवून व पोलिसांचे संरक्षण मागवून निरोधकांना बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे, ही सत्यस्थिती आहे. आमच्यामध्येही "राष्ट्रीय स्काऊट" आहेत. त्यांना आपली संख्या खचित वाढवावयाची आहे आणि त्यासाठी दमदाटीचा आरोप करणे हा एक मार्ग आहे. त्या आरोपात काही सत्य असते तर कोणावर खटला का भरला नसता. तो आरोप सिद्ध करणे फार सोपी गोष्ट होती. कारण, ही दमदाटी दिवसाढवळ्या, वॉन ब्रँडीस चौकात, शेकडो वाटसरूंच्या उपस्थितीत, केली जाते असा आरोप आहे?

उलट प्रकारच्या दमदाटीसंबंधी पुष्कळ हिंदी लोकांना असे वाटते की, कॅ. हॅमिल्टन, फौल किंवा चॉमनी यांनी दिलेले परवाने ज्यांच्याजवळ आहेत अशा हिंदी लोकांनी नोंदणी कायद्याला मान्यता दिली नाही, म्हणून निम-सरकारी दडपणाने त्यांना कामावरून बडतर्फ केले जात आहे. असे दडपण असो वा नसो, जर्मिस्टन येथील प्रमुख मुकादमाचे एक पत्र माझ्यापुढे आहे, त्यावरून अशी माहिती नक्की मिळते की, नव्या

1. २६-१०-१९०७ च्या "इंडियन ओपिनियन"मध्ये हे उद्धृत केले होते.

कायद्याप्रमाणे नोंदणीचा अर्ज न करणाऱ्या ९ हिंदी लोकांना बडतर्फ केलेले आहे. या बाबतीत जनरल स्मट्स यांनी पुढाकार घेतला असल्यामुळे फारसे आश्चर्य वाटावयास नको. त्यांनी सर्व प्रकारच्या शिक्षांची धमकी दिली आहे. ज्यांना हद्दपारीची धमकी आहे, त्यांनाही त्याच वेळी परवाने काढून घेण्याची धमकी दिली आहे. दोन्ही शिक्षा अमलात कशा येतील हे मला माहीत नाही. प्रवेशविषयक बिलाला अद्याप बादशहांची मंजुरी मिळावयाची आहे, तोपर्यंत हद्दपार करणे शक्यच नाही. धर्मयुद्धाला हिंदी लोक भीत नाहीत, आणि (गोऱ्या लोकांच्या) अन्याय्य युद्धालाही ते तयार आहेत. पण ते ब्रिटिशांना पूर्णपणे साजेसे होणार नाही, असे मला वाटते. गुलामगिरीची प्रमाण-पत्रे घेण्यास हिंदी लोकांना भाग पाडावे म्हणून युरोपियन मालकांची मदत का घ्यावी ? आतापर्यंत पुष्कळ मालकांनी अशा दडपणाला विरोध केलेला आहे आणि आपल्या हिंदी नोकरांना बडतर्फ करण्याचे साफ नाकारले आहे. हे त्या दोघांनाही भूषणावह आहे. मालकांना भूषणावह अशासाठी की, अन्याय्य युद्धात भाग घेण्याचे त्यांनी नाकारले आणि हिंदी लोकांना भूषणावह अशासाठी की, बडतर्फ न होण्याइतके उपयोगी व प्रामाणिक असे ते नोकर आहेत.

मला आताच असे कळले आहे की, ज्या चार हिंदी लोकांना दमदाटी दिल्याचे सांगितलेले होते आणि ज्यांच्याजवळ परवाने खचित नव्हते, त्यांना आज दोषमुक्त ठरवून सोडण्यात आले आहे. त्यांना नोंदणी-पत्रे मिळतील असे खुल्या न्याय-मंदिरात आश्वासन देण्यात आले. गुलामांना आपले पत्रेही मिळणे अवश्य आहे, हे खास. माझे मत असे आहे की, जुने डच परवाने ज्यांच्याजवळ आहेत, (वरील चार माणसांजवळ ते होते असे म्हणतात.) त्यांना शांतता-संरक्षक वटहुकुमान्वये परवाने मिळालेल्या लोकांप्रमाणेच वागविले जावे. पण अशा सर्व लोकांना या वसाहतीतून बाहेर जाण्याची नोटीस देण्याचे दुःखद कर्तव्य श्री. जॉर्डन् यांना पार पाडावे लागत आहे, हे सर्व लोकांना माहीत आहे. वरील चार माणसांनी आपण नव्या नोंदणी-पत्रासाठी अर्ज करणार असे ज्या दिवशी सांगितले, त्याच दिवशी अशा एका माणसाला ही नोटीस मिळाली. खरोखर, अशा प्रकारे जनरल स्मट्स हे बेकायदा नागरिकांपासून कायदेशीर नागरिकांना वेगळे काढीत आहेत. बेकायदा नागरिकांनी नोंदणी-कायद्याप्रमाणे अर्ज केल्यास ते लाडके प्रजाजन होतील आणि भौतिक संपत्तीपेक्षा आपल्या पुरुषार्थाचे मोल अधिक मानणारे कायदेशीर नागरिक हे बेकायदा नागरिक ठरतील.

आपला

मो. क. गांधी

"स्टार," १९–१०–१९०७

२३४. श्री. रिच् यांची सेवा

श्री. रिच् यांच्याविषयी दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीचे एक सभासद पुढील सुरात लिहितात—

या समर्थ, कर्तृत्व संपन्न व स्वार्थत्यागी माणसाच्या भगीरथ प्रयत्नांचे व भक्तीचे यथार्थ गुणग्रहण हिंदी समाजाला कधीच करता येणार नाही आणि त्यांच्याविषयी पूर्ण कृतज्ञताही दाखविता येणार नाही. वर योजलेल्या प्रत्येक विशेषणाला दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांची संमती आहे, एवढेच नव्हे तर आताइतके दुसऱ्या कोणत्याही वेळी त्यांच्या सेवेचे महत्त्व असणार नाही, याची जाणीव त्यांना आहे. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक असा लढा खेळत आहेत की, तसा या पिढीत पुनः कधी होणार नाही. म्हणून ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या दुःखविमोचनार्थ लॉर्ड ॲम्पथिल जे प्रयत्न करीत आहेत, त्यात त्यांना सतत जागरूक असणारे व अदम्य उत्साहाचे श्री. रिच् यांचे सहाय्य मिळणे अवश्य आहे.

इंडियन ओपिनियन, १९-१०-१९०७

२३५. जनरल बोथा यांचे उदाहरण

ट्रान्सवॉलमध्ये हिंदी लोक शौर्याने लढत असले तरी, अखेरीस काय घडेल याविषयी मनातून चिंता वाटत आहे. अशी चिंता ज्यांना वाटते त्यांची सत्यावर व ईश्वरावर फारच थोडी निष्ठा असली पाहिजे. या किंवा त्या कारणाने ज्यांना अशी चिंता वाटते, त्यांच्यापुढे आम्ही ट्रान्सवॉलच्या विद्यमान राज्यकर्त्यांचे उदाहरण ठेवतो. वाचकांनी हे ध्यानात ठेवावे की, ट्रान्सवॉलमधील गोऱ्या लोकांना स्वराज्य मिळण्यापूर्वी, श्री. लिट्लटन यांनी, लॉर्ड मिल्नर यांच्या उपदेशाप्रमाणे, त्यांना अर्धवट स्वराज्य देऊ केले होते. त्यामध्ये जनरल बोथा, जनरल स्मट्स वगैरे काम करू शकले असते. पण ते हक्क अपुरे आहेत असे पाहून, जनरल बोथा यांनी लॉर्ड मिल्नर यांना असे लिहिले

की, आम्ही आपल्या सरकारात सामील होणार नाही आणि आम्हांला देऊ केलेल्या राज्यघटनेवर आम्ही संतुष्ट नाही. त्यामुळे लॉर्ड मिल्नर चिडले. वॉंडरर सभागृहात प्रचंड सभा भरली. तीत भाषण करताना लॉर्ड मिल्नर यांनी जनरल बोथा यांना अशी धमकी दिली की, सरकार चालविण्यात डच लोक सामील झाले नाहीत, तर त्यांच्याशिवाय सरकारचा कारभार चालेल. या धमकीने जनरल बोथा डगमगले नाहीत. त्याचा परिणाम म्हणजे आता डच लोकांना पूर्ण स्वराज्य मिळाले आहे. विराट बहिष्काराचे हे एक उदाहरण आहे. बोथांनी बहिष्कार सिद्धीस नेला आणि विजय संपादन केला.

या बाबतीत हे लक्षात ठेवले पाहिजे की, डच लोकांनी मागितलेले अधिक अधिकार मिळाले नाहीत म्हणून ते बहिष्कारास सिद्ध झाले. आपण अधिक अधिकार मागत नाही, तर आपल्या मानेवर गुलामगिरीचे जे जोखड टाकले जात आहे, त्याला आपण विरोध करीत आहोत. असे करतांना आपण कशाचे भय बाळगायचे? बोथांचा बहिष्कार यशस्वी झाला याचे कारण, त्यांच्या अंगी पूर्ण विश्वास होता. सरकारात सामील न होण्याची जी धमकी त्यांनी दिली होती, ती पोकळ नव्हती. आणि ते बोलेल तसे वागणारे आहेत, अशी लॉर्ड मिल्नर यांची खात्री बोथांनी पटविली. आपल्या लढ्यात आपण खरोखर पुरेसे सामर्थ्यशाली आहोत, अशी श्री. स्मट्स यांची खात्री अद्याप पटलेली नाही. हिंदी समाज जनरल बोथांच्या उदाहरणावरून धडा घेईल आणि अखेरपर्यंत टिकाव धरील अशी आम्हांला आशा आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १९–१०–१९०७

२३६. पीटर्सच्या खटल्याचा बोध

फोक्सरस्टमध्ये श्री. पीटर्स यांना हाल का सोसावे लागले? हा प्रश्न प्रत्येक हिंदी माणसाच्या मनात आला पाहिजे. जर उत्तम पोशाख केलेला एखादा युरोपियन पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करील, तर तो एक सन्माननीय माणूस गणला जाईल. खरोखर तो एखादा अट्टल गुन्हेगारही असेल. पण काळ्या कातडीच्या माणसाच्या बाबतीत तो सन्माननीय माणूस असला तरी, तो बदमाष मानला जाईल. श्री. पीटर्सच्या बाबतीत हेच घडले. श्री. पीटर्स यांच्याजवळ खोटा परवाना आहे, असे तपासणी

करणाऱ्या शिपायांनी गृहीत धरले. त्याबद्दल त्या अधिकाऱ्याला फारसा दोष देता येत नाही. दोष सरकारचा आहे. हिंदी लोक लबाड आहेत असे गृहीत धरून सरकारने हा दुष्ट कायदा मंजूर केला आणि त्याप्रमाणे तो तपासणारा पोलिस वागला. अशा प्रकारे, सध्या हिंदी माणसाला मान मिळत नाही. आता या दुष्ट कायद्याला हिंदी समाजाने मान्यता दिली, तर गोरे लोक हिंदी लोकांना मान तर देणार नाहीतच, पण त्यांना आधी एक लाथ लगावल्याशिवाय ते त्यांच्याशी बोलणारही नाहीत, यात नवल काय ? अशा सबळ कारणामुळेच हिंदी समाज या कायद्याला विरोध करीत आहे. त्यातील एखाददुसऱ्या कलमासाठी नव्हे किंवा बोटांच्या ठशासाठी नव्हे. कायद्याचे मूळच खराब आहे. मग त्याच्या शाखांशी भांडण करून काय उपयोग ? त्या मुळावरच कुऱ्हाड घातली पाहिजे. ही कुऱ्हाड म्हणजे हिंदी लोकांचे धैर्य व पराक्रम.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १९–१०–१९०७

२३७. रिच् यांची सेवा

श्री. रिच् यांनी हिंदी समाजाची केलेली सेवा स्तुतीच्या पलीकडे आहे. समितीचे एक सभासद लिहितात :

जेव्हा मी लंडनच्या कमिटीविषयी बोलतो तेव्हा त्याचा अर्थ मि. रिच् असा आपण घ्यावा. या समर्थ, कर्तृत्वसंपन्न व स्वार्थत्यागी माणसाच्या भगीरथ प्रयत्नाचे व भक्तीचे यथार्थ गुणग्रहण हिंदी समाजाला कधीच करता येणार नाही. आणि त्यांच्याविषयी पूर्ण कृतज्ञता दाखविता येणार नाही. आपण यापुढेही कमिटी कायम ठेवली आणि श्री. रिच् यांना लंडनमध्ये नूर्त ठेवले तर आपल्याला त्यांचा फार उपयोग होईल असे मला वाटते. या कमिटीच्या अस्तित्वामुळे ट्रान्सवॉलच्या सरकारचा आत्मविश्वास ढळला आहे, अशी माझी पूर्ण खात्री आहे. कमिटीला अधिक खर्च करण्याची मुभा मिळाली, तर ती पुष्कळच जास्त काम करून दाखवील.

वरील उद्गारात काही अतिशयोक्ती आहे असे आम्हांस वाटत नाही. पैशाच्या टंचाईमुळे अशा अमोल सेवेला आपण न मुकण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १९–१०–१९०७

२३८. ट्रान्सवॉलमधील दुकाने बंद करण्याच्या वेळेविषयी निर्बंध

दुकाने बंद करण्याची वेळ ठरविणारा कायदा नाताळप्रमाणे ट्रान्सवॉलमध्ये मंजूर केला जाणार आहे, हे प्रत्येकाला माहीत आहे. त्याचे निर्बंध आता मंजूर झाले असून प्रसिद्ध झाले आहेत. त्यांतील महत्त्वाच्या योजनांचे भाषांतर आम्ही अन्यत्र दिले आहे ते ट्रान्सवॉलमधील हिंदी व्यापाऱ्यांनी व फेरीवाल्यांनी अत्यंत काळजीपूर्वक वाचावे असा आमचा सल्ला आहे. या निर्बंधामुळे हिंदी लोकांच्या उद्योग–धंद्यांचे थोडेसे नुकसान होईल, पण ते सोसले पाहिजे. प्रत्येक व्यापाऱ्याने व फेरीवाल्याने त्या निर्बंधांना पूर्ण मान द्यावा, असे आम्ही सुचवितो. अशा कायद्यांचा भंग हिंदी लोक करतात म्हणून ते लोकांच्या डोळ्यांवर येतात. आणि आपल्या शत्रूच्या हातात आपल्यावर उगारण्यासाठी शस्त्रे देतात. जेव्हा सर्वांना आपली दुकाने एकाच वेळी बंद करणे भाग पडते, तेव्हा कोणी आपले दुकान अधिक वेळ उघडे ठेवू नये.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १९–१०–१९०७

२३९. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

हमीदिया अंजुमनची सभा

या संस्थेचे सामर्थ्य वाढत आहे. लोकांचे धैर्यही वाढत आहे. हिंदू व मुसलमान दोघेही एकाच सुरात आरोळी देत आहेत की, या कायद्याचा विध्वंस केला पाहिजे. रविवारच्या सभेचे अध्यक्षस्थान श्री. इमाम अब्दुल कादीर यांनी स्वीकारले होते. मौलवीसाहेब व दरवेशसाहेब यांनी सविस्तर भाषणे केली. श्री. कुवाडिया, उमरजी साले वगैरे लोक बोलले. श्री. एन्. ए. कुवाडिया आणि इतर वक्ते यांनी असा युक्तिवाद केला की, श्री. एस्. हेल्द यांनी आपले हात व तोंड काळे करून, नोंदणीसाठी अर्ज केला असल्यामुळे त्यांच्यावर बहिष्कार घालावा. या सूचनेचे स्वागत सर्व सभेने

केले. अंजुमनने अशी शिफारस केली आहे की, श्री. हेलू यांच्याबरोबरचे सारे व्यवहार बंद करावे, त्यांच्या नोकरांनी नोटीस देऊन नोकऱ्या सोडाव्या आणि इतर हिंदी लोकांनी त्यांच्याबरोबर देवघेव करू नये. नंतर क्लार्क्सडॉर्प अंजुमनचे एक सदस्य श्री. दावजी पटेल हिंदुस्थानला चालले होते. त्यांनी आपली वर्गणीची सारी बाकी चुकती केली आणि आपण हिंदुस्थानात असताना आपले अंजुमनचे सदस्यत्व चालू राहावे म्हणून आणखी १० शिलिंग दिले. अंजुमनने त्यांना एक चांदीचे पदक भेट म्हणून दिले. काही गृहस्थांनी त्यांना धन्यवाद देणारी भाषणे केली. श्री. दावजी पटेल हिंदुस्थानकडे जाण्यास निघाले आहेत.

दुसऱ्या दिवशी (सोमवारी) श्री. हेलू स्वतः श्री. गांधींच्या कचेरीत गेले. नोंदणीसाठी आपण अर्ज केल्याबद्दल खेद प्रदर्शित करण्यासाठी ते गेले होते, हे निरोधकांना तत्काळ कळले. आणि त्यांनी श्री. गांधींना अशी सूचना दिली की, "श्री. हेलू आपल्या कचेरीत पुनः आले तर आपल्यावरही बहिष्कार पडेल. हे कृपया लक्षात घ्यावे."

या सूचनेला उत्तर देताना, श्री. गांधींनी निरोधकांचे आभार मानले आणि आपले कर्तव्य बजावल्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले. असाच ज्वलंत उत्साह हिंदी लोकांमध्ये सदैव असावा, अशी माझी इच्छा आहे. श्री. हेलू यांनी अंजुमनची माफी मागितली आणि खेद प्रदर्शित केला, तर त्यांची माफी स्वीकारावी की नाही, या प्रश्नाशी वरील उत्साहाचा काहीही संबंध नाही. एकदा केलेली प्रतिज्ञा पाळली पाहिजे आणि नेमून दिलेले कार्य आपण पार पाडले पाहिजे, हे लक्षात घेतले पाहिजे आणि तसे वागले पाहिजे. जोपर्यंत श्री. हेलू यांच्या कृत्याला माफी दिलेली नाही, तोपर्यंत निरोधक जसे वागले, तसे वागणे हेच त्यांचे कर्तव्य होते.

रामसुंदर पंडित यांचा खटला

श्री. रामसुंदर पंडित यांच्याकडे सर्व ठिकाणांहून त्यांनी दाखविलेल्या धैर्याबद्दल अभिनंदनाच्या तारा येत आहेत. त्यांचा आत्मविश्वास परिपूर्ण आहे. जर्मिस्टन येथील हिंदी लोक त्यांना हिंमत देत आहेत. त्यांना अद्याप पकडण्यात आले नाही. अब्दुल कादिर कोकाटी यांच्याप्रमाणेच त्यांनाही पकडण्यात आले नाही, तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. या बाबतीत काय घडते ते कळविण्यासाठी मी शुक्रवारच्या आधी एक तार पाठवीन.

पीटर्स यांचा खटला

श्री. अँथनी पीटर्स यांचा जो छळ झाला त्याची चर्चा अजून चालू आहे. त्याला कारणीभूत झालेल्या पोलिसाने आपले विधान परत घेतले आहे आणि आपण श्री. पीटर्स यांना काही त्रास दिल्याचे नाकारले आहे. आता श्री. पीटर्स यांचे प्रतिज्ञापत्र मागितलेले आहे. खटला चालू आहे.

ईलूमुथु यांचा खटला

ईलूमुथु यांचा खटला अभ्यास करण्यासारखा आहे. त्याविषयीचे श्री. व्यास यांचे खात्री पटविणारे पत्र मी पुढे देत आहे :

ईलूमुथु यांना हा देश दोन दिवसांत सोडून जाण्याचा हुकूम मॅजिस्ट्रेटने दिला. १८९७ मध्ये ईलूमुथु बुलवायो येथे गेले होते. युद्धापूर्वी जोहान्सबर्ग येथे ते कुक् यांच्या शेतीवर काम करीत होते. एक महिना त्यांनी रॉबिनसन् खाणीमध्ये काम केले. बुलवायो येथे त्यांना काही काळ वेड्याच्या इस्पितळात ठेवले होते. डॉक्टराने त्यांना येथील एका दवाखान्यात हवा पालटण्यासाठी पाठविले. दवाखान्याच्या शिपायाने, रजिस्ट्रारच्या हुकुमाप्रमाणे, त्यांना रजिस्ट्रारच्या कचेरीत नेले. तेथे त्यांना तपशिलवार माहिती विचारण्यात आली. ती त्यांनी वरीलप्रमाणे दिली. शेवटी, रजिस्ट्रारने त्यांना या देशाबाहेर जाण्याची नोटीस दिली. त्याचा परिणाम वर दिला आहे. ईलूमुथु यांचे डोके अद्यापही बिघडलेले आहे. त्यांच्याजवळ तीन लुंग्यांशिवाय काही नाही. रजिस्ट्रारने त्यांना प्रवास–खर्चासाठी एक पैही दिली नाही. ते माझे काम नाही असे मॅजिस्ट्रेट म्हणतो. वेड्यांच्या दवाखान्यातूनही त्यांना सुटकेचे पत्र दिलेले आहे.

हा एक भयानक खटला आहे. ईलूमुथु गरीब आहे. तो येथील जुना रहिवासी आहे. त्याने जर नोंदणीसाठी अर्ज केला नसता, तर त्याच्याकडे कोणी लक्ष दिले नसते. पण त्याला अर्ज करावयास लावले आणि आता हा देश सोडून जाण्याची नोटीस त्याला मिळाली. त्याने कोठे जावे ? पैसे कोठून आणावे ? त्याने का जावे ? अशा जुलमी कायद्याला जो हिंदी माणूस मान्यता देईल त्याला हिंदी समाज व परमेश्वर जाब विचारील. ज्यांच्याजवळ परवाने नाहीत म्हणून जे लोक नोंदणीसाठी अर्ज करतील, त्यांची अवस्था ईलूमुथुसारखी होईल. आणि तसे होणे योग्यच आहे. बोटे घासण्याने (बोटांचे ठसे देण्याने) ते सुरक्षित राहणार नाहीत. तर ट्रान्सवॉल सोडण्याने त्यांना सुरक्षितता लाभेल. त्यांची बाजू खंबीर असल्यास त्यांनी तुरुंगात जावे. सध्या तुरुंग हाच सच्चा व प्रामाणिक माणसांना आश्रय-स्थान आहे.

चिनी लोकांचे ऐक्य

येथील एक मोठी व्यापारी पेढी हार्विन् व पेटर्सन् यांचा चिनी लोकांशी पुष्कळ व्यापार आहे. ते दरमहा सुमारे ५००० (पाच हजार) पौंडांच्या किमतीचा माल त्यांना उधार देतात. या व्यापारी पेढीने चिनी लोकांना अशी सूचना दिलेली आहे की, तुम्ही नवी नोंदणी-पत्रे घेतली नाहीत, तर तुम्हांला उधार माल देणे बंद केले जाईल. याने दबून न जाता, चिनी लोक अधिकच धीट बनले. उत्तरादाखल त्यांनी लिहिलें, पेढीच्या वह्यात आमच्या उधारीचा जो आकडा असेल तो कळवा, आम्ही आमचे पैसे तत्काळ देऊ. यापुढे आपल्या पेढीशी आम्हांला काही व्यवहार करावयाचा नाही.

या उत्तराने श्री. हार्विन चूप बसले. त्यांनी चिनी लोकांची माफी मागितली आणि नोंदणीपत्र किंवा हिशेब यांच्यासंबंधी काहीही उल्लेख न करण्याचे कबूल केले. आमच्या व्यापाऱ्यांना गोऱ्या व्यापाऱ्यांनी धमकी दिली की, ते घाबरून जातात, आणि जणू काही आपण गुलाम आहोत, अशा भावनेने नोंदणीपत्रे घेण्यास तयार होतात. या कायद्याला मान्यता न देण्याची आपण घेतलेली शपथ ते विसरतात.

निरोधकांचे कार्य

निरोधक खूप काम करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नामुळे कच्च्या दिलाची पुष्कळ हिंदी माणसे नोंदणी कचेरीकडे जाण्यापासून परावृत्त झाली यात शंका नाही. पार्क, फोर्डस्बर्ग, व्राम्फॉंटीन, डॉर्न्फॉंटीन् व जेपी या ठिकाणी निरोधक ठेवलेले आहेत; आणि तसेच परवाना-कचेरीच्या भोवतीही. या व्यवस्थेमुळे रूडीपूर्ट येथून आलेली तीन हिंदी माणसे मध्येच अडकली गेली. त्यांच्या मालकाने त्यांना नोंदणीसाठी जाणे भाग पाडले होते. योगायोगाने त्यांची निरोधकांशी भेट झाली. निरोधकांनी त्यांच्याशी युक्तिवाद केला. त्याचा परिणाम म्हणजे ते परत गेले. आणि जाताना त्यांनी असे अभिवचन दिले की, नवे परवाने घेण्यापेक्षा आम्ही आपल्या नोकऱ्यांवर पाणी सोडू.

श्री. इमाम कमाली लोकांची दिशाभूल करीत आहेत. आणि (त्यांच्या कामात) ढवळाढवळ करीत आहेत, म्हणून हिंदी समाज बराचसा क्षुब्ध व संतप्त झाला आहे. इमाम कमाली हा हिंदी नाही—मलायी आहे. मलायी असल्यामुळे त्याने हिंदी लोकांच्या कामात ढवळाढवळ करू नये असे सर्वांना वाटते.

विराट निवेदन[1]

हे निवेदन अद्याप सरकारकडे पाठविलेले नाही. एक दोन ठिकाणांहून पुरे भरलेले तक्ते यावयाचे आहेत. म्हणून ते थोपवून धरले आहे. बहुतेक सर्व प्रमुख हिंदी लोकांच्या सह्या पूर्वीच मिळाल्या आहेत. सह्या करणाऱ्यांमध्ये श्री. अब्दुल गनी, हाजी हबीब, इसापमियाँ, दादाभाई, कुवाडिया इत्यादी सज्जन आहेत. याविषयी अधिक माहिती पुढील आठवड्यात मी देईन अशी आशा वाटते.

देशाबाहेर जाण्यास मुदत मिळेल काय?

असा प्रश्न विचारला जातो की, "डिसेंबरमध्ये (सरकारचा) हल्ला सुरू झाला आणि (हिंदी) लोकांना मॅजिस्ट्रेटपुढे उभे करण्यात आले, तर (हा देश सोडून जाण्यास) त्यांना मुदत मिळेल काय? नवे नोंदणीपत्र न घेतल्यामुळे एखाद्या माणसाला मॅजिस्ट्रेटपुढे उभे केले तर तो मुदत मागू शकतो. ती मुदत किती द्यावयाची

१. पाहा : "विराट निवेदन" लेख : १८९.

हे मॅजिस्ट्रेटने ठरवावयाचे असते. एक तास व एक वर्ष यांच्यामधील कितीही काळाची मुदत तो देऊ शकेल. दीर्घ काळाची मुदत दिली जाईलच असे मी म्हणत नाही. पण मॅजिस्ट्रेटला योग्य वाटेल तितकी मुदत देण्याचा अधिकार आहे हे निःसंशय. मुदत मागणे हे अपमानास्पद आहे, असे मी मानतो. म्हणून, तसे करण्याचा सल्ला मी कोणास देणार नाही. पण ज्यांना तुरुंगाची भीती वाटते आणि येथील गाशा गुंडाळण्याची ज्यांना इच्छा आहे, त्यांना मुदत मागता येईल. ती देण्यास, पूर्ण नकार मॅजिस्ट्रेट देईल, असे मला वाटत नाही. प्रत्येक खटला त्याच्या गुणावगुणावर, मॅजिस्ट्रेट व परिस्थिती यावर ते सारे अवलंबून राहील.

इसाप मियाँ यांची हानी

गेल्या शुक्रवारी श्री. इसाप मियाँ यांच्या पत्नीचा प्रसूति-काळात अंत झाला. त्यामुळे सर्वांना फार शोक वाटला. श्री. इसाप् मियाँ यांना आपल्या पत्नीसह मक्केच्या यात्रेस जावयाचे होते. पण या दुष्ट कायद्याशी चाललेल्या लढ्यामुळे ते येथे थांबले होते. तोच ही दुःखदायक घटना घडली. तिचा त्यांच्या मनावर विशेष परिणाम झाला. श्री. इसाप मियाँ यांना परमेश्वराने मनोधैर्य द्यावे अशी मी प्रार्थना करतो.

बेग यांचे पत्र

श्री. बेग वर्तमानपत्रात कडक लेख लिहीत आहेत. श्री. स्मट्स यांच्या भाषणाला उत्तर म्हणून त्यांनी "प्रिटोरिया न्यूज" मध्ये एक विस्तृत पत्र लिहिले आहे. आणि त्यात श्री. स्मट्स यांचा अविवेक दाखवून दिला आहे. श्री. किटलबँक यांनीही त्याच पत्रात एक पत्र लिहिले आहे आणि ट्रान्सवाल सरकारचा धिक्कार केला आहे. श्री. बेग यांचे आणखी एक पत्र "लीडर" मध्ये आलेले आहे.

"संडे टाइम्स"

सविनय प्रतिकाराची चळवळ सुरू झाल्यापासून "संडे टाइम्स" दर आठवड्यास व्यंगचित्रे प्रसिद्ध करीत आहे. या आठवड्याच्या व्यंगचित्रात असे दाखविले आहे की, नोंदणी अधिकारी पगार घेतात, पण काम करीत नाहीत. संपादकाने आपल्या टिप्पणीत असे लिहिले आहे की, सरकारने "कूलींना" हाकलून लावले पाहिजे हे खास.

हाजी हबीब

श्री. हाजी हबीब डर्बानहून प्रिटोरियाला आले.

सारा नोव्हेंबर महिना रिकामा का ठेवला ?

मला काही लोकांनी असे विचारले आहे की, सारा नोव्हेंबर महिना गट्ट करण्याइतकी भूक सरकारला आहे काय ? हिंदी लोकांवर खटले करावयाचे असतील तर

नोव्हेंबरच्या पहिल्या तारखेपासून त्याची सुरुवात का करीत नाहीत? असा प्रश्न जे लोक करतात, ते "इंडियन ओपिनियन" काळजीपूर्वक वाचीत नाहीत. नाहीतर, नोटिशीचा मी जो खुलासा केला, त्यात हा मुद्दा आलेला आहे. यापुढे वाचकाने 'इंडियन ओपिनियन' मोठ्या काळजीने वाचावे अशी माझी विनंती आहे. तसे करण्याला फार दिवस लागणार नाहीत. किंबहुना जाणण्यासारखे पुष्कळच ज्ञान वाचकाला त्यात मिळेल अशी मला खात्री आहे. हे सांगितल्यानंतर मी त्या प्रश्नाचे उत्तर देतो. नोटिशीत असे म्हटले आहे की, ता. १ डिसेंबर रोजी किंवा त्यानंतर ज्या लोकांजवळ नवी नोंदणीपत्रे असणार नाहीत त्यांच्यावर खटले भरले जातील. नोंदणीचे अर्ज घेण्यामध्ये सारा ऑक्टोबर महिना जाईल. अर्ज मिळताच, तत्काळ रजिस्ट्रार आपला निकाल देत नाही. तो मिळाल्यावर अधिक चौकशी करण्याचा हुकूम देण्याची सत्ता त्याला आहे. अशा चौकशीसाठी त्याला काही वेळ लागणारच. अर्जांच्या छाननीसाठी सरकारने श्री. चामनी यांना नोव्हेंबर दिलेला आहे. त्या काळात, गुलामगिरीचे बक्षीस द्यावे की नाही याचा निकाल लागेल. म्हणून प्रत्येकाला डिसेंबरमध्ये नोंदणीपत्र मिळू शकेल. हिंदी समाजाने बहिष्कार घातला असताना यासाठी एक पूर्ण महिना का दिला आहे? असे कोणी विचारील. त्याचे उत्तर हे की, सरकार बहिष्काराची दखल घेत नाही. ता. ३१ ऑक्टोबर रोजी अर्जदारांचे लोंढे वाहू लागले, आणि नोंदणी-कचेरीवर अर्जांचा वर्षाव झाला, तर त्यांचा निकाल करण्यासाठी रजिस्ट्रारला पुरेसा वेळ द्यावयास हवा. यामुळे दुर्दैवाने नोव्हेंबरमध्ये खंड पडला आहे.

निरोधकांवर हल्ला

मंगळवारी श्री. अलेक्झांडर व श्री. डी. व्हिलियर्स या दोन वकिलांकडे प्रत्येकी दोन कोकणी अशील गेले होते. विगरपरवाना वास्तव्य केल्याचा आरोप त्या कोकणी लोकांवर होता. दोन्ही वकिलांनी श्री. जॉर्डन यांना सांगितले की, या कोकणी लोकांना निरोधकांनी दमदाटी दिली आणि म्हणून ते नोंदणी कचेरीकडे जाऊ शकले नाहीत, पण ते जाण्यास तयार होते. कोर्टाने निरोधकांना हलविण्याचा हुकूम द्यावा अशी सूचना श्री. अलेक्झांडर यांनी केली. तेव्हा, तेथे हजर असलेले श्री. गांधी म्हणाले, निरोधकांनी दमदाटी केलेली नाही. आणि कोकणी लोकांची इच्छा असेल तर मी स्वतः त्यांना नोंदणी अधिकाऱ्याकडे घेऊन जातो. आता हे प्रकरण पोलिस कमिशनरकडे जाण्याचा संभव आहे. म्हणून असोसिएशनच्या चिटणिसाने त्याला पुढील पत्र लिहिले आहे.[1]

१. पाहा : "पोलिस–कमिशनरला पत्र" लेख २३२.

या उदाहरणावरून निरोधकांनी फार दक्षतेने वागण्याचे शिकावे आणि आपले कार्य पराकाष्ठेच्या शांततेने पार पाडावे. लोकांची समजूत घालण्यापलीकडे त्यांनी काही करावयाचे नाही. जेव्हा कोणा माणसाबरोबर पोलीस असतील, तेव्हा निरोधकांनी हस्तक्षेप मुळीच करावयाचा नाही. ज्यांना गुलाम व्हावयाचे आहे, त्यांना कोणीही अडथळा करण्याची गरज नाही. निरोधक दमदाटी करतात, असा आरोप करणारे काही हिंदी लोक आहेत याची मला शरम वाटते. हे आपले दुर्भाग्य होय असे मी मानतो. जर एखाद्याला आपल्या बोटांचे ठसे देण्याची इच्छा असेल, तर खुद्द निरोधक त्याला (कचेरीकडे) नेऊन पोचवतील, हे प्रत्येक हिंदी माणसाला स्पष्टपणे सांगितलेले आहे. हे पत्र छापून येईपर्यंत ऑक्टोबरचे १२ दिवस शिल्लक राहतात. या काळात पुष्कळ गमतीदार गोष्टी घडतील. जोहान्सबर्ग येथील प्रत्येक हिंदी माणसाने आणि प्रत्येक निरोधकाने धैर्य, धिमेपणा, नम्रता व गोडवेपणा दाखविला पाहिजे. लोकांनी काय करावयाचे तर नोंदणीकचेरी टाळणे, पुढाऱ्यांनी लोकांचे धैर्य टिकवून धरण्यासाठी सर्व गोष्टी समजावून सांगणे आणि आर्थिक हानी सोसणे व निरोधकांनी आपले कर्तव्य शांततेने पार पाडणे. निरोधकांनी दडपण टाकण्याची गरज नाही. गरज आहे ती त्यांच्या उपस्थितीची. कचेरीकडे हिंदी माणूस जेथून जाऊ शकेल अशा प्रत्येक जागेवर व प्रत्येक केंद्रावर एकेक निरोधक असणे अवश्य आहे. त्यांच्यावर सरकारने हल्ला केला, तर त्यांना भय वाटता कामा नये. निरोधन करीत असताना कोणाला अटक झाली तर त्याने जामीन द्यावयाचा नाही. आणि त्याला शिक्षा झाली तर त्याने दंड न भरता तुरुंगात जावयाचे, हे लक्षात ठेवले पाहिजे.

नोकरी सोडली, पण हात काळे करून घेतले नाहीत

श्री. मुरुगन, अरमूगम, हॅरी, व्यंकटापन, मुथु हे मातीच्या भांड्यांच्या कारखान्यात काम करीत होते. नोंदणी केली नाही तर नोकऱ्या सोडा, असे त्यांना सांगण्यात आले. त्यांनी नोकऱ्या सोडल्या; पण आपले हात मळवून घेतले नाहीत. अशी वृत्ती प्रत्येक हिंदी माणसाने प्रकट केली पाहिजे. हे लोक शूर पुरुष आहेत असे मी मानतो.

बुरख्यातील भेकड

चार नामर्द लोक कोठून तरी आले. पडदे सोडलेल्या गाडीतून, कोणाच्या लक्षात न येता ते नोंदणी–कचेरीत गेले, आणि त्यांनी आपल्या बोटांचे ठसे दिले. अशा प्रकारे बुधवारी जोहान्सबर्गच्या कचेरीचा सन्मान त्या चार लोकांनी केला आणि गुलामगिरीच्या पट्ट्यासाठी अर्ज केला.

लक्षात ठेवा ! लक्षात ठेवा ! लक्षात ठेवा !

हिंदी लोकांनी नोंदणी करावी म्हणून नोंदणी-कचेरी शक्य त्या सर्व मार्गांनी प्रयत्न का करीत आहे, हे सर्व हिंदी लोकांना कळले असेल अशी मला आशा वाटते.

हिंदी लोक खंबीर राहिले तर त्यांना तुरुंगात पाठवून नोंदणी करावयास भाग पाडणे अशक्य आहे हे श्री. स्मट्स जाणतात. परवान्यासाठी हजारो हिंदी लोकांचा छळ करणे त्यांना शक्य नाही. अखेरीस त्यांना हा कायदा रद्द करावा लागेल हे खचित. प्रत्येक हिंदी माणसाने हे लक्षात घ्यावे आणि आपले धैर्य कायम ठेवावे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १९-१०-१९०७

२४०. "स्टार"ला पत्र[1]

जोहान्सबर्ग,
ता. २४ ऑक्टोबर, १९०७

संपादक,
"स्टार",
[जोहान्सबर्ग] यांस,

महाशय,

आशियावासी नोंदणी-कायद्याच्या बाबतीत पुनः आपल्या सौजन्याचा फायदा घेताना मला खेद वाटतो. वॉर्न ब्रँडिस चौकातील आजच्या घडामोडीचा जो वृत्तांत आपण प्रसिद्ध केला आहे तो केवळ कोणाच्या तरी प्रेरणेने लिहिला असल्याचे उघड दिसते.

निरोधकांना "कुलींचे निरोधक" असे म्हणून जे वर्णन आपण केलेले आहे, ते निष्पाप व सन्मान्य माणसांचे केवळ अज्ञानामुळे केलेले वर्णन आहे, असे म्हणून मी ते सोडून देतो.

नोंदणीपासून परावृत्त करण्यासाठी नैतिक अनुनयाच्या मर्यादा निरोधकांनी किंवा दुसऱ्या कोणी हिंदी लोकांनी उल्लंघिलेल्या नाहीत, असे माझे अद्यापि मत आहे. आपल्या बातमीदाराने वर उल्लेखिलेल्या हिंदी माणसाने आज (कोर्टात) साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभे राहून असे ठामपणे सांगितले की, मला कोणाकडूनही त्रास

१. २-११-१९०७ च्या "इंडियन ओपिनियन"मध्ये हे छापलेले आहे.

झाला नाही. त्याचा हात पकडला गेला होता. पण मला नोंदणी-कचेरीकडे जावयाचे आहे, असे जेव्हा तो म्हणाला, तेव्हा त्याला जाऊ दिले. ही त्याची स्वतःची साक्ष आहे आणि तिला नोंदणी करणाऱ्या त्याच्या सोबत्याची व आरोपीची पुष्टी आहे. "कचेरीबाहेर आडदांडपणे धक्काबुक्की केली" असे या प्रकाराचे वर्णन, कल्पनाशक्ती कितीही ताणली तरी, करता येणार नाही, असे मला वाटते. ज्या हिंदी आरोपीला दोन हिंदी माणसे भेटली, तो निरोधक नव्हता आणि त्या दोन माणसांना कायदा काय आहे हे माहीत नव्हते, हे मी जाता जाता सांगतो. त्या दोघांना एवढेच माहीत होते की, आपल्या मालकाचे एक पत्र आहे आणि त्यात जोहान्सबर्गमधील कोणत्या तरी कचेरीत जाऊन सही करण्याबद्दल लिहिले आहे. अशा लोकांना, ते कोणत्या जाळ्यात सापडणार आहेत, ही नुसती माहिती देणाऱ्या लोकांवर आक्षेप घेण्यात का यावेत? डॉ. मेथे यांचा अशील नोंदणी करण्यासाठी आला नाही, यावरून त्याला दमदाटी करण्यात आली असली पाहिजे असे नोंदणी-अधिकाऱ्याचे मत आहे. पण त्याला त्याहून अधिक समर्पकपणे उत्तर देता येईल आणि ते हे की, त्या अशिलाने आपल्या मित्रांचे म्हणणे ऐकले! त्याला दमदाटी कोणी दिली नाही. निरोधक नसते तर पुष्कळ हिंदी लोकांनी आपली नावे नोंदवली असती हे मी मोकळ्या मनाने कबूल करतो. त्यांना खरे भय वाटते ते दमदाटीचे नव्हे, तर हिंदी लोकमताचे. या लोकांना, कायदा वाईट आहे हे कळते. पण आपल्या ऐहिक महत्त्वाकांक्षेवर ते मात करू शकत नाहीत. आणि म्हणून, निरोधक नसते तर, त्यांनी आपली नावे खचित नोंदवली असती. या प्रकरणी मुल्लाच्या खटल्याचा उल्लेख करणे म्हणजे तुमच्या बातमीदाराने गाढ अज्ञान प्रकट करणे किंवा तितकाच द्वेषभाव दर्शविणे होय. कारण तो खटला केवळ धार्मिक भांडणाचा होता. आणि ज्या मुल्लावर हल्ला झाला त्याने "आपण प्रतिज्ञा-पत्र दिल्याबद्दल" साक्ष देताना खेद प्रकट केला. हल्ला करणाऱ्या फकिराचा बचाव मी करू इच्छीत नाही. पण साऱ्या जमातींमध्ये असे लोक असतात आणि त्यांचा त्यांना अभिमान वाटतो असे मी समजतो. ते राष्ट्रीयत्वासाठी जगत नाहीत — तत्त्वासाठी जगतात.

आपला

मो. क. गांधी

"स्टार", २५-१०-१९०७

२४१. "ट्रान्सवॉल लीडर"ला पत्र

[जोहान्सबर्ग,
ता. २६ ऑक्टोबर १९०७ पूर्वी]

[संपादक,
"ट्रान्सवॉल लीडर",
जोहान्सबर्ग]

महाशय,

सविनय प्रतिकार करणाऱ्या आशियावासियांच्या तथाकथित दमदाटीबाबत आपण जो संयमपूर्ण उपाग्रलेख लिहिला आहे, त्याबद्दल माझी असोसिएशन आपली आभारी आहे. हिंदी लोकांच्या चळवळीत होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या हिंसेविरुद्ध आपण जे लिहिले आहे, त्यातील प्रत्येक शब्दाला आम्ही निःसंकोचपणे पाठिंबा देत आहोत. आशियावासी कायद्याच्या बाबतीत आमचे ध्येय सदैव हेच आहे की, आपले दुःखनिवारण आपल्या क्लेशाने करून घ्यावयाचे; इतरांना क्लेश देऊन नव्हे.

आपल्या अंकामध्ये एक परिच्छेद असा आहे की, जो उघडपणे दुसऱ्या कुणाच्या तरी प्रेरणेने लिहिलेला असावा. भीतीचे साम्राज्य येथे पसरलेले आहे, हे मत मी बिनदिक्कतपणे नाकारतो. या कायद्याविरुद्ध ट्रान्सवॉलमधील सर्व हिंदी जनसमूहामध्ये जी तीव्र भावना पसरलेली आहे, तीच त्या समाजापासून दूर जाणाऱ्या लोकांना भीतिप्रद वाटत असेल. असे लोक या कायद्याप्रमाणे नोंदणीपत्रे घेतात. पण तीही त्या कायद्याची प्रणाली मान्य आहे म्हणून नव्हे, तर त्यांना आपल्या मानापेक्षा धनाची मातब्बरी विशेष वाटते म्हणून. कैक आशियावासी लोक आपल्या नोकरीची स्थाने सोडून खास नोंदणी करून घेण्यासाठी निघालेले असताना जागरूक निरोधकांची गाठ पडताच त्यांनी नोंदणी न करण्याचे ठरविले. ही सत्य स्थिती मी कबूल करतो. पण त्या निरोधकांनी त्या नोंदणी करू पाहणाऱ्या लोकांची फक्त समजूत घातली आणि कायद्याचे सत्य स्वरूप त्यांना समजावून सांगितले. नोंदणीचे बक्षीस त्यांना जे दाखविण्यात आले होते त्याचा सूक्ष्म मोह निरोधकांनी त्यांच्या मनातून निपटून काढला. हिंदी समाजाने नोंदणी करावी म्हणून सरकार किती भगीरथ प्रयत्न करीत आहे,

याची जनतेला काहीच कल्पना असणार नाही. निरीक्षकांनी दमदाटी कधीच दिलेली नाही. त्यांच्या वर्तनावर समाजातील प्रतिष्ठित लोकांचे सदैव लक्ष असते.

एका मुल्लावर हल्ला झाला हे वृत्त दुर्दैवाने सत्य आहे. पण त्यावर काही हिंदी लोकांनी जुटीने हल्ला केला हे खरे नाही. सत्य स्थिती अशी आहे की, प्रस्तुत मुल्ला हा हिंदी नाही.— मलायी आहे. आमच्यामध्ये एक फकीर पैगंबराचा परम भक्त आहे, तिन्हींपैकी एका मशिदीत तो सारा वेळ राहतो आणि त्याला वाटेल तेव्हां एखाद्या खाणीवर खडी फोडण्याचे काम करून आपले पोट भरतो, तो कोणाचे ऐकत नाही. दक्षिण आफ्रिकेमधील साऱ्या लोकांमध्ये त्याच्या इतका स्वतंत्र वृत्तीचा माणूस दुसरा बहुधा सापडणार नाही. ज्याने ज्याने त्याला पाहिले आहे आणि त्याची साधी राहणी पाहिली आहे ते सारे त्याला मान देतात, जेव्हा त्याच्या कानी असे आले की, आपली पवित्र शपथ मोडून या कायद्याला संमती देण्यास एक मलायी मुल्ला हिंदी लोकांना—विशेषतः हिंदी मुसलमानांना— चिथावणी देत आहे, तेव्हा तो खवळला. तो मुद्दाम मलायी मशिदीत चालत गेला. त्या मुल्लाला भेटला आणि त्याच्याशी वादविवाद करू लागला. कुराणातील एक आयत म्हणून त्याने त्या मुल्लाच्या मनावर असे ठसविले की, तू हिंदी नाहीस, म्हणून हिंदी लोकांच्या भानगडीत पडण्याचे तुला कारण नाही. तसेच कुराणाच्या आज्ञा उल्लंघिण्यास लोकांना तू प्रवृत्त करता कामा नये. त्यानंतर शाब्दिक चकमक उडाली. तिचा परिणाम म्हणजे तो "दुर्दैवी हल्ला." या प्रकरणाची जबाबदारी हिंदी लोकांवर टाकणे हे अगदी अयोग्य होईल, हे आपण कबूल कराल. आमच्यापैकी पुष्कळांनी त्या फकिराशी युक्तिवाद केला, आणि संयम राखण्याची त्याला विनंती केली. पण खुदा व आपण यांच्यामध्ये कोणी आलेले त्याला खपत नाही. त्याच्या दृष्टीने, घर काय आणि तुरुंग काय, दोन्ही सारखेच आहेत, हे सांगावयास नको. मी कोर्टात येण्याला आणि माझ्या कृत्याचे समर्थन करण्याला तयार आहे, असे तो म्हणाला.

कुत्र्याला विष घालण्याचा आरोप दुष्टपणाचा आहे. मी अत्यंत काळजीपूर्वक चौकशी केली आहे. कुत्र्याच्या मालकाने नोंदणी करणे आणि कुत्र्याला विष घालणे या दोहोंमध्ये काहीही संबंध असल्याचे मला आढळून आलेले नाही. हिंदी लोकांच्या पुष्कळ कुत्र्यांना अलिकडे विषबाधा झालेली आहे. हे चोरांचे कृत्य असावे अशी सर्वसामान्य समजूत आहे. कुत्र्यांच्या भुंकण्याने आपण ओळखले जाऊ नये, म्हणून चोर तसे करीत असावेत. प्रत्येक बेइमानी हिंदी माणसावर जी जी दुर्घटना कोसळेल, तिचे खापर हिंदी सविनय प्रतिकारकांवर फोडणे, हे भयंकर आहे, अल्पसंख्य हिंदी लोकांनी बहुसंख्य हिंदी लोकांच्या इच्छेस मान द्यावा, म्हणून संशयास्पद साधन आम्ही कधीच वापरणार नाही, ही खात्री असू द्या आपल्याला संचारस्वातंत्र्य असावे, या भावनेने आम्ही आशियावासी कायद्याला

मान्यता देण्याचे नाकारतो. तेच आम्ही आमच्यासारखी मते नसणाऱ्या माणसावर निर्बंध कसे घालू ? स्वतःला स्वातंत्र्य व स्वाभिमान पाहिजे असे म्हणणारे आम्ही इतरांना तसेच स्वातंत्र्य नाकारू लागलो, तर आम्ही आमच्या ध्येयाशी प्रतारणा केल्यासारखे होईल. आपल्या बातमीदाराने, समुद्र-किनाऱ्यावरील शहरात राहणाऱ्या हिंदू पुजाऱ्याचा उल्लेख केला आहे. पण जर्मिस्टनमध्ये दंगा मुळीच झाला नाही. सर्व हिंदी समाजाच्या कल्याणाशी निगडित असलेल्या प्रश्नाकडे, या वसाहतीतील अन्य हिंदू वा मुस्लिम धर्मोपदेशकांप्रमाणे, या पुजाऱ्याने लक्ष घातले आहे हे अगदी खरे आहे. स्वधर्माला मान देणारा कोणताही हिंदी माणूस अन्यथा वागणार नाही, पैसा व परमेश्वर यांपैकी एकाची निवड करण्याचा प्रसंग आला असताना पैशापेक्षा परमेश्वराकडे अधिक लक्ष द्या, असे कोणता धर्मोपदेशक आपल्या श्रोतृवृंदाला सांगणार नाही ?

आपला,
इसाप् इस्माईल मियाँ,
अध्यक्ष,
ब्रिटिश इंडियन असोसिएशन

इंडियन ओपिनियन, २६–१०–१९०७

२४२. मरहूम श्री. अलेक्झांडर

दर्बानचे माजी पोलीस–प्रमुख[1] यांच्या निधनाच्या वार्तेने दर्बानमधील सर्व समाजावर दुःखद आघात झाला आहे. जर्सीला जाते वेळी श्री. अलेक्झांडर यांची प्रकृती उत्तम होती, आणि ते पुष्कळ वर्षे जिवंत राहून सुसंपादित विश्रांतीचा उपभोग घेतील अशी आशा वाटत होती. दर्बान शहराच्या या माजी पोलिस सुपरिंटेंडंटला आपल्या गावी जाण्यासाठी योग्य वेळी थैली अर्पण करण्यात आली, याचे स्मरण अत्यंत दुःखदायक आहे. दर्बान येथील संमिश्र लोकवस्तीमध्ये ते इतके प्रिय होते की, त्यांची स्मृती त्या लोकांना दीर्घ काल राहील. त्यांच्या विधवा पत्नीला आम्ही हार्दिक सहानुभूती दाखवितो. त्यांची हानी ही सर्व समाजाचीही हानी आहे.

इंडियन ओपिनियन, २६–१०–१९०७

१. पाहा : खंड ६, लेख ३०४ व लेख ४२६.

२४३. सविनय प्रतिकार करणाऱ्यांसाठी[1]

"ऐहिक लाभासाठी जे लोक अमान्य तत्त्व, मान्य करण्याचा प्रयत्न करतात, त्यांनाच राज्यसत्तेच्या आवश्यकतेच्या सिद्धांतासाठी ईश्वरी कायद्याचे उल्लंघन करणे अवश्य वाटेल. पण येशूच्या उपदेशाप्रमाणे वागण्यानेच आपल्याला मुक्ती मिळेल, अशी ज्याची प्रामाणिक श्रद्धा आहे, असा कोणीही ख्रिस्ती माणूस वरील सिद्धांताला काडीचीही किंमत देणार नाही."—**टॉल्स्टॉय्**

डेव्हिड थोरो हा एक मोठा लेखक, तत्त्वज्ञ, कवी आणि त्याबरोबरच अत्यंत व्यावहारिक माणूस होता--म्हणजे स्वतः ज्याचे आचरण करण्याची त्याची तयारी नसेल असे तत्त्व तो सांगत नसे. अमेरिकेत निर्माण झालेल्या अत्यंत मोठ्या व नीतिमान माणसांपैकी तो एक होता. गुलामगिरीच्या विनाशाच्या चळवळीच्या वेळी त्याने "सविनय कायदेभंगाचे कर्तव्य" हा आपला सुप्रसिद्ध निबंध लिहिला. आपल्या तत्त्वासाठी व दुःखी मानवजातीसाठी तो तुरुंगात गेला. यामुळे त्याच्या निबंधाला तपाचे पावित्र्य लाभले आहे. शिवाय, तो निबंध सर्वकाळी लागू पडण्यासारखा आहे. त्यातील तीक्ष्ण तर्कशास्त्र निरुत्तर करणारे आहे. ऑक्टोबर महिना म्हणजे आशियावासी सविनय प्रतिकारकांना अत्यंत मोहाचा आहे. या प्रतिकारकांनी मूकपणे सोसलेल्या हालांची वार्ता आता समस्त सुसंस्कृत जगाला पोचलेली आहे. (अशा वेळी) चालू ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आम्ही थोरोच्या निबंधातील काही उतारे पुढे देत आहोत. मूळ निबंध सुमारे ३० पानांच्या लहान पुस्तकासारखा आहे. आणि ते पुस्तक लंडन येथील श्री. ऑर्थर सी. फिफील्ड, ४४ फ्लीट्स्ट्रीट, यांनी "साधी राहणी" नावाच्या आपल्या सुंदर पुस्तकमालेमध्ये प्रसिद्ध केले आहे व त्याची किंमत ३ पेन्स आहे.

उतारे

"सर्वांत कमी शासन करते, ती शासनसंस्था उत्तम." हे ब्रीदवाक्य मला अंतःकरणापासून मान्य आहे. त्याप्रमाणे सत्वर व

१. या विषयावर निबंध मागविण्याची घोषणा 'इंडियन ओपिनियन'च्या पुढील अंकात केलेली आहे, त्यावरून सविनय प्रतिकाराच्या सिद्धांताची गोडी गांधीजींना किती लागली होती हे स्पष्ट होते. पाहा, परिशिष्ट ६.

सुयंत्रपणे आचरण व्हावे अशी माझी इच्छा आहे. त्याचाच अंतिम निर्णय असा की, " जी शासनसंस्था मुळीच शासन करीत नाही ती सर्वोत्तम. " त्यासाठी जेव्हा लोक तयार होतील, तेव्हा त्यांना तशा स्वरूपाचे सरकार मिळेल. सरकार फार तर एक साधन आहे, पण बहुतेक सरकारे नेहमी, व सर्व सरकारे केव्हा केव्हा, कार्यसाधक राहात नाहीत.

जेव्हा लोकांच्या हातात सत्ता येते, तेव्हा बहुमतवाल्या लोकांना शासन करण्यास आणि ते दीर्घ-काळ चालविण्यास मुभा मिळते. याचे कारण त्यांची बाजू न्यायाची असते, किंवा अल्पमतवाल्या लोकांना ती न्यायाची वाटते, हे नव्हे, तर बहुमतवाले लोक अधिक बलवान असतात. पण लोकांच्या कल्पनेप्रमाणे असणाऱ्या न्यायावर जेथे बहुमतवाल्यांची सत्ता आधारलेली नाही, ते सरकार सरकारच नव्हे.

इंडियन ओपिनियन, २६-१०-१९०७

२४४. राष्ट्र-पितामह

श्री. दादाभाई नवरोजी यांना निरोप देण्यासाठी जी मोठी मेजवानी देण्यात आली, तिला ते, आपल्या आकस्मिक आजारामुळे हजर राहू शकले नाहीत, हे ऐकून आमच्या वाचकांना मोठे दुःख वाटेल. आताच आलेल्या " इंडिया " पत्रातील सविस्तर वृत्तांतावरून, या मेजवानीला सर्व मतांचे राजकीय प्रतिनिधी हजर होते. त्यानंतर पुनः काही तार आली नाही, यावरून पितामहांची प्रकृती सुधारली असावी. सर मंचरजी यांनी वक्तृत्वपूर्ण वाणीने वर्णन केलेली त्यांची संयमी, तपस्वी व निग्रही जीवनपद्धती त्यांच्या उपयोगी पडली असावी. त्यांच्या प्रिय राष्ट्रासाठी त्यांना दीर्घायुष्य लाभेल अशी आशा आहे.

इंडियन ओपिनियन, २६-१०-१९०७

२४५. मेमन लोकांची विपरीत बुद्धी

" विनाशकाले विपरीत बुद्धिः " अशी एक आमच्यात म्हण आहे. ट्रान्सवॉलमधील मेमन लोकांची स्थिती तशी झाली आहे. यांच्यापैकी फारच थोडे लोक गुलामगिरीचा पट्टा न घेता राहिले आहेत. जे राहिले आहेत, ते सिंह आहेत असे आम्ही मानतो. ज्यांची निवड चुकली त्यांना दुःख देण्यासाठी आम्ही हे लिहीत नाही, तर त्यांच्या पापी कृत्यापासून इतर हिंदी लोकांनी धडा घ्यावा म्हणून हे लिहीत आहोत.

मेमनांनी नोंदणी-पत्रे घेतली, म्हणून इतर जमातींनी घाबरण्याचे काहीच कारण नाही. घाबरणे हे भित्रेपणाचे लक्षण आहे. या दुष्ट कायद्याप्रमाणे मेमनांनी परवाने घेतले म्हणून ते ट्रान्सवॉलमध्ये आपला धंदा बिनखटका चालवू शकतील आणि पैशाचा पाऊस पाडतील व इतर हिंदी लोकांना पळून जावे लागेल अशी कल्पना कोणी करू नये. खरोखर, काही मेमन गुलाम बनले असले, तरी शेकडो हिंदी लोक स्वतंत्र राहिले आहेत आणि त्यासाठी आम्ही ईश्वराची प्रार्थना करीत आहोत. मेमनांनी गुलामगिरीचे पट्टे घेतले असले, तरी त्यांना आपला धंदा शांततेने करता येईल अशी अपेक्षा अडाणी माणूसच करील, असे आम्हांस वाटते. इतर हिंदी लोक खरोखरच ट्रान्सवॉलमधून निघून गेले, तरी मेमन लोक ज्या लाथा खातील त्या पाहाण्यास निदान गोरे तरी येथे असतील. मेमनांचे भवितव्य काय आहे याचा विचार करताना आमच्या अंगावर काटा उभा राहातो.

तथापि, आम्हांला असा विश्वास वाटतो की, बाकीच्या हिंदी लोकांपैकी बहुतेक सर्व जण दृढ राहिले आणि तुरुंगात जाण्यास तयार झाले, तर ट्रान्सवॉल सोडण्याची पाळी कोणावरही येणार नाही. ट्रान्सवॉलमध्ये राहण्याचा हक्क आहे, असे सर्व हिंदी लोक येथे शांततेने राहू शकतील आणि नव्या कायद्याचा विध्वंस होईल. त्या कायद्याचा विध्वंस होणार नाही असे ज्यांना वाटते, त्यांची ईश्वराच्या सत्यावर व परम पवित्र न्यायावर श्रद्धा नाही; असे आम्ही समजतो. म्हणून आम्ही इतर हिंदी लोकांना अशी विनंती करतो की, नव्या कायद्याला मान्यता देण्यापेक्षा तुम्ही सर्व तऱ्हेचे हाल सोसावे आणि हिंदुस्थानची प्रतिष्ठा उच्च राखावी. पवित्र कुराणाच्या शेवटच्या सुन्यात जे म्हटले आहे, त्याचे भाषांतर आम्ही पुढे देत आहोत :

" अखिल विश्वाचा राजा असणाऱ्या ईश्वराला मी शरण जातो. सैतानाच्या, दुष्टांच्या व माणसांच्या पकडीतून तो माझे संरक्षण करील असे म्हणा. "

हे शब्द प्रत्येक हिंदी माणसाने आपल्या अंतःकरणावर कोरून ठेवावेत. भित्र्या माणसाच्या पकडीतून आपले संरक्षण करण्याचा हा काळ आहे. वरील वचन सर्वांना लागू आहे.— मग ते हिंदू, मुसलमान, पारशी किंवा ख्रिस्ती असोत. कारण सत्य हे एकच असते, तसेच ईश्वर हा सर्वत्र एकच आहे. "सोन्याचे दागिने बनविल्यावर निरनिराळी नावे प्राप्त होत असली, तरी सोने हे सोनेच राहते."[१]

[गुजरातीवरून,]
इंडियन ओपिनियन, २६–१०–१९०७

२४६. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांचे कर्तव्य

या मथळ्याखाली आम्ही पुष्कळ वेळा लिहिले आहे आणि पुनः पुष्कळ वेळा लिहावे लागेल. श्री. रिच् यांचे पत्र आणि त्याबरोबरील कागदपत्रे यांचे जे भाषांतर आम्ही दिले आहे, ते ट्रान्सवॉलमधील प्रत्येक हिंदी माणसाने वाचावे, असा आमचा सल्ला आहे. कमिटीच्या प्रत्येक सभासदाचा श्री. रिच् यांना पाठिंबा आहे. हमीदिया इस्लामिया अंजुमनचे पत्र श्री. मोर्ले यांच्याही नजरेस आणले गेले. त्याची इंग्लंडमध्ये चर्चा चालू आहे. सर जॉर्ज बर्डवुड,हे एक असाधारण कर्तृत्वाचे जुने व प्रमुख हिंदी मनदी अधिकारी आहेत. त्यांनी सांगितले की, हिंदी लोकांचा लढा न्यायाचा आहे, आपल्यापैकी काही हिंदी लोक कायद्याला शरण जात आहेत, हे पाहून श्री. रिच् यांना कोडे वाटते. याचा अर्थ आपण अखेरपर्यंत लढावे, अशी कमिटीची इच्छा आहे. आपल्या लढ्याला इतकी प्रसिद्धी मिळाल्यानंतर, जर एखादा हिंदी माणूस भयाने, स्वार्थाने किंवा द्रव्याच्या लोभाने या दुष्ट कायद्याला शरण गेला, तर तो स्वतःचा आणि राष्ट्राचा शत्रू आहे असे आपण मानू.

[गुजरातीवरून],
इंडियन ओपिनियन, २६–१०–१९०७

१. गुजरातीतील मध्य युगीन कवी नरसी मेहता यांच्या एका कवितेतून घेतलेले वचन. यांचे "वैष्णवजन तो" हे पद गांधीजींना प्रिय होते. त्यामध्ये ईश्वराच्या खऱ्या भक्ताचे वर्णन केलेले आहे.

२४७. "लेडीस्मिथ्" मधील हिंदी व्यापारी

लेडीस्मिथ् विभागातील हिंदी लोकांची १२ दुकाने बंद झाली आहेत. खरोखर ही अत्यंत वाईट बातमी आहे असे आम्हांस वाटते. त्या व्यापाऱ्यांनी परवान्यासाठी पुनः अर्ज केला होता. त्यांना परवाने दिले गेले नाहीत. पण त्यांना अशी नोटीस देण्यात आली की, तुम्ही दुकाने बंद केली नाहीत तर तुमच्यावर खटले करू. या नोटिशीने घाबरून जाऊन त्या व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद केली. त्यांनी धीट बनावे आणि दुकाने उघडून धंदा सुरू करावा, असा आग्रह आम्ही त्यांना करू इच्छितो. बिगरपरवाना व्यापार केल्याबद्दल त्यांच्यावर सरकार, इच्छा असेल तर, खुशाल खटला भरो. खटला भरल्यावर त्यांना दंड होईल. तो त्यांनी भरला नाही, म्हणजे त्यांच्या मालाचा लिलाव होईल. अशा रीतीने आपला माल त्यांनी विकला जाऊ द्यावा, असा आमचा खास सल्ला आहे. त्यासाठी धैर्य हवे. तसे धैर्य शूर लोकांनी दाखवावयाचे नाही, तर कोणी ? मालाचा लिलाव झाला तर त्या लोकांचा सत्यानाश होईल, असे कोणी म्हणतील, पण दुकाने बंद ठेवल्याने त्यांचा सत्यानाश होणार नाही काय ? सरकार मालाचा लिलाव एकदाच करील. प्रत्येक वेळी ते करू शकेल काय ? ते एका व्यापाऱ्यावर खटला भरील, १२ जणांवर भरील काय ? आणि भरला तर साम्राज्य सरकार हस्तक्षेप करणार नाही काय ? तसे केल्यावाचून साम्राज्य सरकारला गत्यंतर नाही. पण, खरोखर, त्याने तो केला नाही, तर त्याचाही अनुभव घ्यायला पाहिजे. लढा देण्यासाठी सर्व हिंदी जमात एक झाली तर नाताळमधील व्यापाऱ्यांच्या परवान्याचा कायदा उद्ध्वस्त होईल अशी आम्हांला खात्री वाटते. दर्बानच्या पुढाऱ्यांनी लेडीस्मिथमधील व्यापाऱ्यांशी हातमिळवणी करून संयुक्त लढा द्यावा असा आमचा सल्ला आहे. त्यासाठी पैशापेक्षा धैर्याची गरज अधिक आहे. असे आम्हांला निश्चित वाटते. असा लढा देण्याचे धैर्य ज्याच्या अंगी आहे त्याने हे लक्षात ठेविले पाहिजे की,

(१) हा लढा जुन्या दुकानांसाठी आहे.
(२) दुकाने स्वच्छ असली पाहिजेत.
आणि (३) दुकानदाराची दानत निष्कलंक असली पाहिजे.

अशा दुकानदारांनी एकजुटीने लढा दिला तर, अखेरीस फत्ते त्यांची झाल्याशिवाय राहणार नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २६–१०–१९०७

२४८. “ भारताचे पितामह ”

पूज्य दादाभाई नौरोजी हे सध्या इंग्लंडमध्यें आहेत. ते अत्यंत वृद्ध आहेत आणि ते आजारी आहेत. म्हणून आपल्या आयुष्याचा उरलेला भाग स्वदेशात घालवावा अशी त्यांची इच्छा आहे. तेव्हा, त्यांच्या सन्मानार्थ लंडन येथे एक अत्यंत मोठा निरोप समारंभ साजरा करण्यात आला. दुर्दैवाने, त्याच दिवशी ते आजारी पडले, ते त्या समारंभाला जाऊ शकले नाहीत. स्वदेशी जाण्याचा त्यांचा बेतही सोडून द्यावा लागला. ही बातमी इंग्लंडहून मागील टपालाने आली. त्यानंतर आता जवळ जवळ एक महिना झाला. आतापर्यंत काही तार आली नाही, त्यावरून भारताचे पितामह अद्याप कुशल आहेत असे मानण्यास जागा आहे. त्यांची प्रकृती बहुधा चांगली असावी. पुढील टपालाने अधिक बातमी येईल. तोपर्यंत आपण सर्वांनी ईश्वराची प्रार्थना करावी की, “ पितामहांना दीर्घायुष्य लाभो. ”

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २६–१०–१९०७

२४९. मरहूम सुपरिंटेंडेंट अलेक्झांडर

सुपरिंटेंडेंट अलेक्झांडरच्या मृत्यूची बातमी देणारी तार वृत्तपत्रात आली आहे. त्यामुळे आम्हांस अत्यंत दुःख वाटते. तसेच दुःख प्रत्येक हिंदी माणसाला वाटेल, असे आम्ही समजतो. सुपरिंटेंडेंट अलेक्झांडर यांची हिंदी लोकांकडे पाहण्याची दृष्टी नेहमी दयाळूपणाची होती. यावेळी आम्हांला अशी आठवण होत आहे की, हिंदी समाजाकडून त्यांना मिळालेली थैली त्यांना इंग्लंडला जाण्याच्या कामी फार उपयोगी पडली. त्यांच्यामागे त्यांची विधवा पत्नी आहे. आम्ही तिला सहानुभूती व्यक्त करतो.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २६–१०–१९०७

२५० जोहान्सबर्गचे बातमीपत्र

हमीदिया अंजुमनची सभा

नेहमीप्रमाणे, गेल्या रविवारी, हमीदिया इस्लामिया अंजुमनची सभा भरली. सभागृह पूर्ण भरले होते. लोकांचा उत्साह मोठा होता. श्री. इमाम अब्दुल कादिर अध्यक्ष होते. श्री. रामसुंदर पंडित यांनी वक्तृत्वपूर्ण भाषण केले, आणि रेल्वेच्या अधिकारी वर्गाबरोबर झालेल्या मुलाखतीचा वृत्तांत त्यांनी निवेदन केला. पवित्र कुराणातील आयत उद्धृत करून मौलवीसाहेब अहंमद मुखतियार यांनी असे दाखवून दिले की, ईश्वराच्या नावाने एकदा शपथ घेतल्यावर मुसलमान लोक कायद्याला कधीही मान्यता देऊ शकणार नाहीत.. जर श्री. हेलूच्या नोकरांनी त्यांना प्रोत्साहन दिले असेल तर त्यांच्यावरही बहिष्कार घालावा, असे त्यांनी सांगितले. समाजातील कोणत्याही माणसाने आपल्या समाजाला कोणत्याही प्रकारे पतित करता कामा नये.

प्रिटोरियाहून आलेले श्री. हाजी हबीब यांचे पत्र आणि क्लार्कस्डॉर्पहून आलेले पत्र—ही दोन्ही श्री. गांधींनी वाचून दाखविली. ते म्हणाले, "बहिष्काराची भाषा कोणी बोलू नये. पण बहिष्कार घालण्याचे एकदा ठरले म्हणजे तो अमलात आला पाहिजे."

श्री. अलीभाई आकूजी यांनी सांगितले की, साऱ्या बेइमान लोकांवर बहिष्कार घालण्याचे ठरले तर श्री. हेलूच्या कानमिया नोकरांना काढून घेण्याची व्यवस्था मी करीन. श्री. एम्. एस. कुवाडिया म्हणाले, "जोहान्सबर्गमधील काही पुढाऱ्यांनी आपली नावे चोरून नोंदविली असल्याचे श्री. हाजी हबीब यांनी आपल्या पत्रात लिहिले आहे" हे खरे नसेल अशी श्री. कुवाडिया यांना बालंबाल खात्री आहे. त्यांचे मत या लढ्याशी द्रोह करणाऱ्या सर्वांवर बहिष्कार घालावा, असे आहे. त्यांनी असे सांगितले की, "मी नोंदणी केली तरच मला आटा मिळेल; अशी सूचना श्री. एस्. बूचर यांनी मला केली होती. तेव्हा मी त्यांच्यापासून आटा खरेदी करण्याचे साफ नाकारले. त्यामुळे माझे ५० पौंडांचे नुकसान झाले." श्री. कुवाडिया यांनी अशा प्रकारे नुकसान सहन करण्याचे पत्करले.

श्री. उमरजी साले यांनी बहिष्काराला पाठिंबा दिला. "अल इस्लाम" या पत्रात आलेली "परमिट पियानो" ही कविता व एक लेख श्री. इब्राहिम कुवाडिया यांनी वाचून दाखविला. मौलवीसाहेब यांनी पुनः भाषण केले व सुचविले, "हमीदिया

इस्लामिया अंजुमनने हिंदी राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाला या कायद्याविरुद्ध चाललेल्या प्रस्तुत लढ्याविषयी पत्र लिहावे. युरोपला जाणाऱ्या लोकांना जर्मन लाईनच्या जहाजाचे पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या दर्जाचे तिकीट मिळत नाही. त्यासंबंधी समाजाने काही प्रयत्न करणे अवश्य आहे. बहिष्काराचा मार्ग सरळ आहे."

श्री. इब्राहिम कुवाडिया यांनी काँग्रेसला पत्र लिहिण्याच्या मौलवी साहेबांच्या सूचनेला पाठिंबा दिला. त्यानंतर आणखी काही वक्ते बोलले. आणि अध्यक्षांनी समारोपाचे भाषण केल्यावर सभा समाप्त झाली.

मद्रासी लोकांची सभा

मद्रासी लोकांची सभा मार्केट स्ट्रीटमध्ये भरली. सुमारे १०० लोक हजर होते. त्यांना श्री. गांधींनी सारी परिस्थिती समजावून सांगितली. त्या सर्वांनी या कायद्याला अखेरपर्यंत खंबीरपणे विरोध करण्याचे ठरविले.

"ट्रान्सवॉल लीडर" मधील वृत्तांत

गेल्या शनिवारच्या 'ट्रान्सवॉल लीडर'मध्ये असे वृत्त आले आहे की, हिंदी समाजाचे सामर्थ्य कमी होत आहे. कारण एका इसमाने एका हिंदी माणसाला संरक्षण देऊन परवाना कचेरीकडे नेले, म्हणून त्या इसमाला काही हिंदी माणसांनी बडविले. तसेच, परवाना घेणाऱ्या एका हिंदी माणसाच्या कुत्र्याला त्यांनी विष घातले आणि जर्मिस्टनमध्ये एका हिंदू पुरोहिताने भांडण सुरू केले. या वृत्तावर टीका करताना "लीडर" म्हणतो, कोणाही हिंदी पुढाऱ्याचा वरील हल्ला वगैरे प्रकाराशी संबंध असणार नाही. तथापि एखाद्या हिंदी माणसाने हिंसेचा आश्रय केला तर हिंदी समाजाला कोणाची सहानुभूती उरणार नाही. आणि त्याला अपाय होईल.

इसाप मियाँ यांचे पत्र

याला उत्तर म्हणून, श्री. इसाप् मियाँ यांनी पुढील पत्र पाठविले आहे.[1]

या घटनेवरील टीका

या घटनेचा विचार गंभीरपणे व्हावयास हवा. इमाम कमाली व श्री. हेलू यांनी नोंदणी अधिकाऱ्यापुढे अतिशयोक्तीची खोटी विधाने केली आहेत, यात शंका नाही. श्री. इसाप मियाँ म्हणतात की, पुष्कळ हिंदी लोकांनी मारहाण केली हे विधान खोटे आहे. एका फकिराच्या मारहाणीची जबाबदारी साऱ्या हिंदी समाजावर लादणे

१. लेख क्रमांक २४१ पाहा.

अयोग्य आहे हे उघड आहे. श्री. हेलू यांच्या कुत्र्याला हिंदी माणसाने विष घातले असेल हे अगदी असंभवनीय आहे. या उदाहरणावरून आपण हे ध्यानी घेतले पाहिजे की, आपल्या लढ्यात हिंसेला केव्हाही स्थान असता कामा नये. मारहाण करून आपल्याला कधीही यश मिळणार नाही. ईश्वरावर श्रद्धा ठेवून जे लढतात त्यांना हिंसेचा किंवा तशाच मार्गाचा आश्रय करण्याची गरज नसते. सत्याचा पराभव होईल असे मला तरी कधी वाटत नाही. हिंदी लोकांची बाजू पूर्ण न्यायाची आहे आणि म्हणून या लढ्याच्या परिणामाविषयी आपण भीती बाळगण्याचे कारण नाही. या दुष्ट कायद्याला जे लोक मान्यता देत आहेत, त्यांना हिंदी लोकांच्या शरीरावर हे नवे परवाने, कच्च्या पाऱ्याप्रमाणे फुटत असल्याचे आढळून येईल. आणि मग त्यांचे हात काळे होतील, हे खचित.

निरोधकांबाबत पोलिस कमिशनरचे पत्र

निरोधकांनी मारहाण केली नाही अशा आशयाचे एक पत्र पोलिस कमिशनरला लिहिले होते हे वाचकांना आठवत असेल. त्यांच्याकडून पुढील उत्तर आले आहे[1] :

"वॉन् ब्रँडिस चौकातील परवाना कचेरीभोवती ठेवलेल्या निरोधकांबाबत आपण या महिन्याच्या १५ तारखेस जे पत्र लिहिले, ते मला मिळाले. अर्ज करू इच्छिणाऱ्या लोकांना कोणी दमदाटी दिल्यास ते आपली असोसिएशन सहन करणार नाही, असे आपले आश्वासन मिळाल्यामुळे मला संतोष वाटत आहे. कोणाला उपद्रव दिला जात नाही ना ? हे आपण यापुढेही पाहात राहाल असा मला विश्वास वाटतो."

या पत्रावरून हे स्पष्ट होते की, निरोधक ठेवण्यात काही चूक नाही. त्यांनी मारहाण करणे किंवा धमकी देणे हे चुकीचे आहे.

जानेवारीमध्ये परवाने बंद होणार ?

ज्यांनी नवे परवाने घेतले नाहीत त्यांना जानेवारीत परवाने दिले जाणार नाहीत, अशी सूचना गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाली आहे. तरीही, प्रत्येक शहरातील प्रमुख हिंदी लोकांपैकी प्रत्येक जणाला अशी लेखी सूचना देण्यात येत आहे की, ता. ३१ ऑक्टोबरपूर्वी नोंदणीसाठी अर्ज तुम्ही न केल्यास पुढे तो तुम्हाला करता येणार नाही आणि तुम्हाला जानेवारीत परवाने मिळणार नाहीत. अशी सूचना दिल्यानंतर तिची लेखी पावतीही घेतलेली आहे. याचा अर्थ काय ? तो अर्थ उघडच असा आहे की, हिंदी समाजाने या कायद्याला मान्यता दिली नाही तर त्याला काही शासन करता येणार नाही, असे भय सरकारला पडले आहे, म्हणून आता ते बेचैन झाले आहे. आणि

१. २६-१०-१९०७ च्या "इंडियन ओपिनियन"च्या इंग्रजी विभागात जे मूळ पत्र छापले आहे ते पुढे दिले आहे.

धमकावणीने व लालुचीने ते लोकांना गुलामगिरीच्या पट्ट्यासाठी अर्ज करण्यास लावीत आहे. अशी चिन्हे दिसत असतानाही, काही हिंदी लोक योग्य तो बोध न घेता, द्रव्यलोभाने, दडपणाने या कायद्यावर, ज्योतीवर उडी घेणाऱ्या पतंगाप्रमाणे, झेप घेत आहेत– आणि जळून खाक होत आहेत, इतर हिंदी लोक काळाची ही चिन्हे ओळखून अखेरपर्यंत दृढ राहतील अशी मला आशा आहे.

जर्मन पूर्व-आफ्रिका लाईन[1]

हमीदियाच्या सभेत मौलवी साहेबांनी अशी माहिती दिली की, युरोपच्या मार्गावर चालणाऱ्या जहाजावर हिंदी लोकांना डेकच्या तिकिटाशिवाय दुसरी कोणतीही तिकिटे दिली जात नाहीत. ही साधी गोष्ट नाही. या बाबतीत काही काळ वाद चालू आहे. मुख्यतः मक्केला जाणाऱ्या या यात्रेकरूंना यामुळे फार त्रास होतो. असे मौलवी-साहेबांनी दाखवून दिले आहे. यावर उपाय अत्यंत साधा व सरळ आहे. एक म्हणजे या लाईनवर भिन्न भिन्न स्थानी जे हिंदी एजंट आहेत, त्यांनी योग्य व्यवस्था राखावी. दुसरा उपाय म्हणजे, सरळ बहिष्काराचा. या लाईनला हिंदी लोकांकडून फार मोठी प्राप्ती होते. हिंदी उतारूंना जनावरांसारखे वागविले जात असेल, तर हे उत्पन्न थांबवता येईल. त्यासाठी हिंदी लोकांनी मोठा प्रयत्न केला पाहिजे. ब्रिटिश इंडिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनी आणि दुसऱ्या काही कंपन्या यांच्याशी व्यवस्था करणे शक्य आहे. शिवाय, पूर्वीप्रमाणे मोगल लाईनला या मार्गावर आपली जहाजे चालू करण्या-साठी त्यांचे मन वळवता येईल. असे उपाय पुष्कळ आहेत.

"स्टार"ला पत्र

हिंदी निरोधकांनी धमकी दिल्याचा आरोप खोटा आहे, हे उघड आहे. पण सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रेरणेने, काही गोरे लोक हिंदी लोकांना उपद्रव देत आहेत आणि त्यांनी गुलामगिरीचे पट्टे घ्यावेत म्हणून धमक्या देत आहेत हे सत्य आहे. या बाबतीत, श्री. गांधींनी 'स्टार'ला पुढील पत्र लिहिले आहे. (लेख क्रमांक २३३ पाहा)

चिंदेची मदत

चिंदे येथील हिंदी लोकांनी सहानुभूतीची तार पाठविली आहे, एवढेच नव्हे तर त्याबरोबर काही पैसेही पाठविले आहेत. चिंदे येथील श्री. इब्राहिम हाजी सुलेमान यांनी असोसिएशनला पुढील पत्र लिहिले आहे :[2]

१. पाहा : "जर्मन पूर्व-आफ्रिका लाईन" लेख ३२४

२. मूळ पत्र ता. २६–१०–१९०७ च्या "इंडियन ओपिनियन"च्या इंग्रजी विभागात प्रसिद्ध केलेले आहे. गुजराती अनुवादाशी पडताळून काही फेरबदल करून ते येथे उद्धृत केले आहे.

"ता. २२ ऑगस्ट १९०७ ची आमची तार मिळाली असेल. त्या तारेने आम्ही ट्रान्सवॉलमधील आमच्या देशबांधवांच्या संकटकाळी आमची हार्दिक सहानुभूती प्रकट केली आहे आणि त्यांना आपल्या प्रतिकाराचे धोरण खंबीरपणे चालविण्याची जोराने शिफारस केली आहे. तेच धोरण अखेरपर्यंत कायम ठेवणे अत्यंत अवश्य आहे, हे आम्ही या पत्राने त्यांच्या चित्तावर ठसवू इच्छितो.

"ता. २१ ऑगस्ट रोजी भरलेल्या आमच्या सभेच्या वृत्तांताचा तपशील न देता, मी आमच्या तेथील मित्रांना थोडक्यात इतकेच सांगतो की, सभेला लोकांची गर्दी चांगली होती आणि सभेच्या कार्यक्रमात उत्साह होता.

"वर्गणीची यादी तयार करण्याची विनंती जेव्हा करण्यात आली, तेव्हा सर्वांनी, निरपवादपणे, आपापल्या शक्तीनुसार वर्गणी दिली. वर्गणीची रक्कम ३३ पौंड १५ शि. ९ पेन्स झाली. ही रक्कम लहान असली तरी आम्ही ती आपल्याकडे पाठवीत आहो त्याची पोच द्यावी अशी विनंती आहे.

"वर्गणीदारांची यादी सोबत आहे. ती 'इंडियन ओपिनियन'मध्ये प्रसिद्ध व्हावी अशी पुष्कळांची इच्छा आहे. वर्तमानपत्रात आपली नावे छापलेली पाहण्याचा त्यांचा हेतू नाही, तर प्रसिद्ध झालेली नावे पाहून दुसऱ्या लोकांना सहाय्य करण्यासाठी पुढे येण्याची प्रेरणा होईल अशी आशा आहे."

ही विनंती नाकारणे अशक्य आहे. म्हणून मी ती यादी प्रसिद्धीसाठी पाठवीत आहे. देणगीदारांची नावे पुढीलप्रमाणे आहेत[१] :

चिंदे असोसिएशनला आभाराचे पत्र पाठवलेले आहे.

एका कुत्र्याचे शौर्य

एका सुप्रसिद्ध चित्रकाराने काढलेले चित्र येथील निरोधकांनी विकत घेतले. ते अत्यंत प्रभावी आहे आणि प्रत्येक हिंदी माणसाला स्फूर्ती देणारे आहे. त्यात एक कुत्रा व २ मुली दाखविलेल्या आहेत. त्या दोन मुलींनी आपले बूट बाजूस ठेवलेले आहेत. आणि त्यांच्यापैकी एकजण त्या कुत्र्याच्या गळ्याला दोरी बांधून ओढीत आहेत व दुसरी मुलगी त्याला पाठीमागून ढकलीत आहे. पण तो शूर पशू आपल्या जागेवरून तिळमात्र हलत नाही. हा सविनय प्रतिकार. चित्रकारानेही आपल्या चित्राला "सविनय प्रतिकारक" असे नाव दिले आहे. कुत्र्याने मनात आणले तर तो त्या मुलींना चावू शकण्याइतका बळकट चित्रात दाखविला आहे. मुली हट्टी आहेत, पण पोरसवदा आहेत. तरी तो कुत्रा आपल्या जागेवरून हलण्यास तयार नाही. तो जणू काही म्हणत

१ मुळांत ४६ नावे दिलेली आहेत.

आहे, " मी तुमचा गुलाम कधीही होणार नाही. तुम्ही दोरीने मला ओढले किंवा मागून ढकलले म्हणून मी हलणार नाही. मी माझ्या इच्छेने तुमच्याबरोबर आलो तर ती गोष्ट निराळी. पण सक्ती करून तुम्हांला यश येणार नाही. तसेच मीही तुमच्यावर काही सक्ती करणार नाही." हिंदी लढ्याचे स्वरूप असेच आहे. आपल्याला कोणावर सक्ती करावयाची नाही, पण आपण केलेली प्रतिज्ञा आपल्याला मोडावयाची नाही.

बे-इमानांची यादी

बेइमान, किंवा काळतोंडे, किंवा " वीणा वाजविणारे "—त्यांना तुम्ही कोणत्याही नावाने संबोधा, त्यांची अद्ययावत् यादी माझ्या हाती आली आहे, ती मी पुढे देत आहे[1] :

ही यादी देताना मला लाज वाटते. पण ती लज्जेची भावना दाबून कर्तव्यबुद्धीने मी ती देत आहे. श्री. हासिम महंमद हे पीटर्सबर्ग येथे प्रमुख निरोधक होते. त्यांनी आपल्या कपाळावर कृष्णकलंक लावून घेतला आणि गुलामगिरी स्वीकारली याचे अत्यंत दुःख वाटते. श्री. आबू अय्यबजी यांनी त्यांना चेतवणी दिली असे म्हणतात. पण ते श्री. खमिसांच्या बुद्धिबळाच्या डावातील फक्त एक प्यादे होते. त्यांना दोष का द्यावा ? हे गृहस्थ इतके लज्जित झाले की एक नंबरची नोंदणी घेण्यास ते नाराज होते. तेव्हा रजिस्ट्रारने पहिल्याला १३७ नंबर दिला. अशा मूर्खपणाच्या गोष्टी घडत असतानाही हिंदी लोकांना भीती वाटते. हेच आपल्या अधःपतनाचे एक चिन्ह आहे. यादीवरून असे दिसेल की त्यातील बहुसंख्य लोक मेमन आहेत, काही कोकणी आहेत आणि बाकीचे—एक गुजराती, हिंदू आणि २ । ३ मद्रासी आहेत. या यादीत, जोहान्सबर्ग येथे अर्ज केलेले ४ । ५ कोकणी व श्री. हेलू यांचा समावेश नाही. आता फार दिवस राहिलेले नाहीत. योग्य वेळी साऱ्या गोष्टी उघडकीस येतील.[2] ही यादी मोठ्या प्रयासाने मिळविलेली आहे. ती प्रिटोरियातील व्यापारी संघाला मेहेरबानीने देण्यात आली होती. पण एखादी गुप्त गोष्ट एकदा एकाकडून दुसऱ्याला कळली म्हणजे ती सर्वत्र फैलावते. मग व्यापारी संघाला दिलेली लेखी यादी दुसऱ्यांच्या हाती गेली यात नवल काय ? आणि जर ती दुसऱ्यांच्या हाती गेली तर बिचाऱ्या " इंडियन ओपिनियन "ला का वगळावे ? यावरून ही नावे त्या संघाकडून मला मिळाली असे जर कोणी अनुमान काढले तर ते चूक ठरेल. (ही नावे) मी कशी मिळविली, हे जाणण्याची ज्यांना इच्छा असेल त्यांना काही काळ तरी असंतुष्ट राहावे लागेल.[3]

१. मुळात ७४ नावे दिली आहेत.
२. वरात वाजत-गाजत मंडपामध्ये लवकरच येईल.—अशा अर्थाची मूळ गुजराती म्हण आहे.
३. " हवा खात बसावे लागेल " असे मूळ गुजरातीत आहे.

क्लार्कस्‌डॉर्प येथील वृत्तपत्र

या वृत्तपत्राने या कायद्यावर गमतीदार टीका केली आहे. श्री गांधींसारख्या उपद्रवी माणसाचा याच्याशी काय संबंध आहे? असा प्रश्न त्या पत्राने केला आहे. गांधींपुरते बोलायचे तर ते आपले दप्तर घेऊन दुसरीकडे जातील. पण ज्यांच्याजवळ मालमत्ता आहे, ते गुलाम खचित बनतील. कारण सरकारने पूर्वीच असे जाहीर केले आहे की, हिंदी लोकांना हद्दपार केले जाईल, आणि कोणाला परवाने दिले जाणार नाहीत. क्लार्कस्‌डॉर्पच्या पत्राच्या संपादकाने हा उपदेश "तटस्थ प्रेक्षक" या नात्याने दिला आहे. पण लोक संपत्ती मिळवतात, ती स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी–गुलाम होण्यासाठी नव्हे, हे तो संपादक विसरला आहे. कमरेला लटकावलेली तलवार हे एक भूषण असते, पण ती दुसऱ्याच्या छातीत खुपसली म्हणजे मृत्यू घडवून आणते. तसेच संपत्ती ही लौकिक व प्रतिष्ठा असणाऱ्या लोकांना सन्मान मिळवून देते, पण गुलामांच्या बाबतीत ती छातीत खुपसलेल्या तलवारीसारखी असते. ज्यांनी संपत्ती कमावली आहे, त्यांना ती सोडण्याचा हक्क आहे. आणि तोच हक्क हिंदी समाज बजावीत आहे, असा पोक्त सल्ला देणाऱ्या गोऱ्या लोकांनीच कैक वेळा स्वदेशासाठी व स्वाभिमानासाठी आपल्या सर्वस्वाचा होम केला आहे. आणि ती संपत्ती लीलेने पुनः मिळविली आहे. मग हिंदी समाजाने स्वतःच्या मानासाठी व धर्मासाठी संपत्ती लाथाडून द्यावी यात नवल काय?

अत्यंत महत्त्वाचा खटला

श्री. दुर्लभ वीरा यांच्या परवान्यासंबंधी रूडीपूर्टमध्ये जो खटला चालू आहे त्यासंबंधी मी पूर्वी लिहिले आहे. मॅजिस्ट्रेटने श्री. दुर्लभवीराला सहानुभूती दाखविली; पण आपला निकाल त्याच्याविरुद्ध दिला. खटला दोन माणसांवर होता. एक त्याच्यावर व दुसरा त्याच्या नोकरावर. श्री. दुर्लभ वीरा यांच्याजवळ परवाना नव्हता. नोकराने माल विकला म्हणून त्याच्यावर खटला भरला गेला. मॅजिस्ट्रेटने असा निकाल दिला की, श्री. दुर्लभ वीरा यांना परवाना मिळण्याचा हक्क जरी होता, तरी अधिकाऱ्याने त्यांना परवाना दिला नव्हता. म्हणून दुकान चालू ठेवण्याचा त्यांना हक्क नव्हता. नोकरालाही दोषी धरले याचे कारण त्याने माल विकला– म्हणजे दुकान चालविले असे समजले गेले. त्याला शिक्षा झाली नाही. श्री. दुर्लभ वीरा यांना एक शिलिंग दंड झाला.

वरिष्ठ न्याय–मंदिराकडे केलेल्या अपीलात पुढील मुद्दे मांडण्यात आले—

१. माल विकून नोकराने काही गुन्हा केला नाही. कायद्याप्रमाणे फक्त दुकानदारच दोषी धरता येतो.

२. श्री. दुर्लभ वीरा यांनी परवान्यासाठी अर्ज केला होता आणि परवाना मिळण्याचा त्यांना हक्क होता. असे असताना अधिकाऱ्याने परवाना दिला

नाही, हा काही वीरा यांचा दोष नाही. म्हणून त्यांना काही शिक्षा देण्याचे कारण नव्हते.

२. अपीलाचा निकाल सांगताना न्यायमंदिराने असे मत दिले की, बिगरपरवाना दुकान चालविल्याबद्दल कायद्याप्रमाणे मालकाला शिक्षा होते– नोकराला नव्हे. म्हणून नोकर निर्दोषी आहे. आणि त्याला काही करता येणार नाही. [न्यायमंदिराच्या मताने] श्री. दुर्लभ वीरा यांना बिगरपरवाना दुकान चालविण्याचा हक्क नव्हता. त्यांनी अधिकाऱ्याकडे पुनः अर्ज करावा. अधिकाऱ्याने त्यांना परवाना देण्याचे मुद्दाम नाकारले तर न्यायमंदिर त्या अधिकाऱ्याला कोर्टाचा खर्च व नुकसानभरपाई अर्जदाराला देण्यास लावील.

हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय आहे. त्यातून पुष्कळ मार्ग निघण्यासारखे आहेत. ट्रान्सवालच्या लढ्यात गुंतलेल्या लोकांना या निर्णयाने उत्साह प्राप्त होईल. पुष्कळ हिंदी लोकांना अशी भीती वाटत होती की, जानेवारीत परवाने न घेतलेल्या लोकांची दुकाने बंद करावी लागतील. पण आता ती भीती गेली आहे. फक्त दुकानाचा मालक शिक्षेस पात्र आहे. दुकान सक्तीने बंद करण्याची योजना कायद्यात नाही. आणि नोकर लोक दुकानात काम करू शकतील. म्हणजे दुकान बंद करण्याचा प्रश्नच येत नाही. फक्त दुकान-मालकाला तुरुंगात जाण्याचे कष्ट–माझ्या दृष्टीने भाग्य–भोगावे लागतील. हा अत्यंत मौल्यवान निर्णय आहे असे मला वाटते.

अधिकाऱ्याला खर्च व नुकसान-भरपाई द्यावी लागेल हे अत्यंत उत्साहजनक आहे.

या निर्णयानंतर एकाही हिंदी व्यापाऱ्याने शरणागती पत्करली, तर आपण या दुष्ट कायद्याला पात्र आहोत असे म्हटले पाहिजे.

शाहजी साहेब यांना दंड

इमाम कमाली यांनी शाहजी साहेबाविरुद्ध मारहाण केल्याबद्दल फिर्याद केली आहे. तो खटला बुधवारी चालला. साक्ष देताना इमाम कमाली यांनी असे सांगितले की, " मी जे प्रतिज्ञापत्रक लिहून दिले, त्याबद्दल मला दुःख वाटते. कायद्यासंबंधी आम्हा दोघांमध्ये धार्मिक बुद्धीने वाद चालू होता, तेव्हा शाहजी साहेबांनी मला लाठी मारली. शाहजी साहेबांना काही शिक्षा व्हावी अशी माझी इच्छा नाही." शाहजी साहेबांनी आपल्या जबाबात काठी मारल्याचे कबूल केले. न्यायमंदिर पूर्ण भरले होते. मॅजिस्ट्रेटने शाहजी साहेबांना ५ पौंड दंड किंवा ७ दिवस कैद अशी शिक्षा दिली. शाहजी साहेबांनी दंड देण्याचे साफ नाकारले. पण त्यांच्या इच्छेविरुद्ध श्री. गुलाम महंमद कडोदिया यांनी त्यांच्यासाठी स्वतः त्यांचा दंड भरला.

ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या कमिटीची सभा

बुधवारी दुपारी १२ वाजता असोसिएशनची व हिंदी–कायदा–विरोधी निधीची सभा भरली. श्री. इसाप मियाँ अध्यक्ष होते. श्री. गांधी म्हणाले, "श्री. दुर्लभ वीरा यांचा खटला हिंदी समाजाने आता आपल्या हाती घ्यावा. दक्षिण आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमिटी चालू ठेवण्याची व्यवस्था करावी आणि समाजापुढील परिस्थिती अनिश्चित असल्यामुळे हिंदी–कायदा–विरोधी–निधीचा पैसा माझ्या ताब्यात असावा." श्री. उमरजी, नायडू, अहंमद मूसाजी आणि फॅन्सी हे या विषयावर बोलले. नंतर एकमताने असे ठराव झाले की,—

(१) दक्षिण आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमिटी एक वर्षभर चालवावी. आणि पहिल्या ६ महिन्यांचा खर्च भागविण्यासाठी मदत करण्याची विनंती नाताळला करावी.

(२) श्री. दुर्लभ वीरांचा खटला असोसिएशनने घ्यावा, आणि त्यासाठी २० पौंडांपर्यंत खर्च करावा.

हिंदी कायदा विरोधी-निधीचे हिशेब बंद करून तो निधी श्री. गांधी यांच्या ताब्यात द्यावा.

आणखी काही बे–इमानी

......[1] यांनी व इतरांनी नोंदणीसाठी अर्ज केलेले आहेत. ही बातमी देताना मला दुःख होते.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २६–१०–१९०७

१. मुळात येथे चार नावे दिलेली आहेत.

२५१. सर विल्यम वेडर्बर्न यांना पत्र

[जोहान्सबर्ग,
ता. ३१ ऑक्टोबर, १९०७ पूर्वी]

श्री. विल्यम वेडर्बर्न,
अध्यक्ष,
हिंदी राष्ट्रीय सभेची ब्रिटिश कमेटी
लंडन.

[महाशय,]

आशियावासी नोंदणी कायद्याच्या बाबतीत येथे जी आणीबाणीची परिस्थिती निर्माण होत आहे. त्याकडे मी आपले लक्ष नम्रपणे वेधतो. नोंदणीचा शेवटचा दिवस ता. ३१ ऑक्टोबर हा आहे. त्या तारखेनंतर, विशिष्ट अपवाद वगळल्यास, सरकार या कायद्याप्रमाणे नोंदणीपत्रासाठी केलेले अर्ज स्वीकारणार नाही. मेमन जमात सोडल्यास, सर्व हिंदी लोकांनी, निरपवादपणे, नोंदणी कचेरीकडे जाण्याचे नाकारले. १३,००० (तेरा हजार) परवानेवाल्यांपैकी फक्त २५० (अडीचशे) लोकांनी या कायद्याला संमती देऊन अर्ज केले आहेत. यावरून लोकांच्या भावनेची तीव्रता कळून येते. आपले दुःख निवारण करण्याचा आमचा मार्ग म्हणजे कायदे-भंगाचे सारे परिणाम स्वतः सोसणे. काही लोक फार मोठे व्यापारी आहेत, त्यांचे सर्वस्व जाण्याची वेळ आलेली आहे. काही लोकांना आताच चिमटा बसू लागलेला आहे. कारण, हिंदी व्यापाऱ्यांनी नोंदणीपत्रे दाखविल्याशिवाय युरोपियन घाऊक व्यापारी उधार माल देण्याचे नाकारीत आहेत. गरीब हिंदी लोकांच्या नोकऱ्या गेल्या. तरीही या कायद्याला पूर्वीइतक्याच खंबीरपणाने विरोध होत आहे.

माझ्या असोसिएशनचे मत असे आहे की, हा प्रश्न साम्राज्याच्या दृष्टीने व हिंदुस्थानच्या राष्ट्रीय दृष्टीने पहिल्या दर्जाचा आहे. म्हणून, हा प्रश्न काँग्रेसच्या पुढील बैठकीत अगत्याने घेतला जाईल आणि हिंदुस्थानात त्याकडे योग्य ते लक्ष पुरवले जाईल अशी माझ्या असोसिएशनला आशा वाटते. म्हणून माझी असोसिएशन आपल्याला सक्रिय सहानुभूती व प्रोत्साहन देण्याची विनंती करीत आहे. आपले अधिकाराचे स्थान लक्षात घेतले नाही, तरीही हिंदुस्थानचे सर्वात मोठे असे एक हित-चिंतक म्हणून आपल्याकडे प्रत्येक हिंदी माणूस आशेने पाहात आहे, अशी माझ्या

असोसिएशनची समजूत आहे. प्रस्तुत लढ्यातही, आपल्याला इष्ट वाटेल त्या दिशेने आपण हिंदुस्थानातील लोकमताला वळण द्याल, अशी मला आशा आहे,

[आपला
इसाप इस्माईल मियाँ,
अध्यक्ष, ब्रिटिश इंडियन असोसिएशन]

इंडियन ओपिनियन, २-११-१९०७

२५२. वासाहतिक सचिवास पत्र[1]

जोहान्सबर्ग,
ता. १ नोव्हेंबर, १९०७

वासाहतिक सचिव
प्रिटोरिया, यांस.

महाशय,

आशियावासी नोंदणी-कायद्याबाबत अखिल ट्रान्सवॉलमधील, हिंदी लोकांनी केलेले निवेदन, आपल्याला पार्सल पोस्टाने मी पाठवीत आहे. त्याचबरोबर सह्या गोळ करणाऱ्या प्रचारकांना दिलेल्या सूचनांची[2] एक प्रतही आहे.

जेव्हा सह्यांचे तक्ते सर्व वसाहतींमध्ये वाटण्यात आले, तेव्हा कायद्यातील निर्बंधांमध्ये सुधारणा करण्याविषयी काही हिंदी लोकांनी सरकारला पाठविलेल्या पत्राचे उत्तर मिळालेले नव्हते, आणि ते पत्र परत घेतलेले नव्हते. पण त्यानंतर, सर्वश्री स्टेगमन्, एसेलेन् व रूज यांच्या अशीलांनी, समाधानकारक उत्तर मिळाले नसताही, आपले पत्र परत घेतले. तथापि माझ्या असोसिएशनच्या कमिटीची इच्छा मी हे निवेदन आपल्याकडे पाठवावे अशी आहे. कारण त्या निवेदनावर ज्यांनी सह्या केल्या त्यांच्या भावना त्यात प्रतिबिंबित झालेल्या आहेत. माझ्या असोसिएशनचे नम्र मत आहे की, हे निवेदन म्हणजे आपण आखलेल्या धोरणाची यथार्थता पूर्णपणे सिद्ध करणारे आहे;

१. त्याचा सारांश ता. २-११-१९०७ च्या 'इंडियन ओपिनियन'मध्ये दिलेला आहे.
२. " विराट-निवेदन " लेख १८९ पाहा.

आणि या वसाहतीतील बहुसंख्य हिंदी लोकांचे मत मांडणारे आहे. हे निवेदन तयार होऊन काही काळ लोटला; पण ते सादर करण्यास माझ्या असोसिएशनने विलंब लावला, याचा हेतू असा की, जोहान्सबर्गमध्ये नोंदणी-कचेरी उघडी असेपर्यंत हिंदी समाज कसा वागतो हे पाहावे.

या निवेदनावर ४५२२ (चार हजार पाचशे बावीस) लोकांच्या सह्या आहेत. आणि त्या ट्रान्सवॉलमधील २९ (एकोणतीस) शहरे, खेडी व विभाग यांतील आहेत. त्यांची गाववार वाटणी अशी—जोहान्सबर्ग २०८५, न्यूक्लेयर १०८, रूडीपूर्ट १३६, क्रूगर्सडॉर्प १७९, जर्मिन्स्टन ३००, बॉक्सबर्ग १२९, बिनोनी ९१, मॉडरफॉटीन ५१, प्रिटोरिया ५७७, पीटर्सबर्ग व स्पेलोनकेन ९०, वेरीनिगिंग ७३, हाईडलबर्ग ६६, बेलफर १४, स्टँडर्टन १२३, फोक्सरस्ट ३६, वॉक्स्ट्रूम १२, पीट रिटीफ् ३, वेथाल १८, मिडलबर्ग २९, वेलफास्ट, मेकाडोडॉर्प व वाटरवाल २१, बार्बटन ६८, पॉचेफ्स्ट्रूम ११४, वेंटर्सडार्प १२, क्लार्क्सडॉर्प ४१, क्रिश्चियाना २४, लिखतनबर्ग ७, जीरस्ट ५९, रस्टनबर्ग ५४, अरमीलो २.

ट्रान्सवॉलमध्ये, हिंदुस्थानातून आलेले हिंदू, मुसलमान, खिस्ती व पारशी आहेत. मुसलमानांत तीन भाग आहेत— सूरती, कोकणी व मेमन. हिंदूंमध्ये गुजराती, मद्रासी व उत्तर हिंदुस्थानी (कलकत्तावाले असे सामान्यतः म्हटले जाते). शीख व पठाण यांचा निराळा वर्ग न पाडता त्यांचा समावेश हिंदू असल्यास उत्तर हिंदुस्थानी-मध्ये केला आहे आणि मुसलमान असल्यास सूरतीमध्ये केला आहे. खिस्ती लोकांचा निराळा वर्ग पाडलेला नाही. कारण, ते बहुतेक सर्व मद्रासी आहेत. आणि सारे मिळून ते २०० (दोनशे) हून अधिक नाहीत. धार्मिक व प्रांतिक वर्गीकरण असे आहे— सूरती १४७६, कोंकणी १४१, मेमन १४०, गुजराती हिंदू १६००, मद्रासी ९९१, उत्तर हिंदुस्थानी १५७, पारशी १७.

मेमन सोडल्यास, ज्यांनी सह्या दिल्या नाहीत असे फारसे कोणी नाहीत हे मला सांगावेसे वाटते. ट्रान्सवॉलमधील शेतासारख्या अलग वस्तीतील प्रत्येक हिंदी माणसा-कडे सह्या गोळा करण्यासाठी दिलेल्या मुदतीत जाणे, हे काम माझ्या असोसिएशनच्या आटोक्याबाहेरचे होते. हिंदी समाज जो लढा चालवीत आहे, त्यामुळे पुष्कळ हिंदी लोक ट्रान्सवॉल सोडून केव्हाच निघून गेले आहेत, असे आमच्या प्रचारकाने कळविले आहे. हे सर्व प्रचारक जबाबदार व प्रातिनिधिक आहेत. शांतता-संरक्षक वटहुकुमा-प्रमाणे, सुमारे १३००० (तेरा हजार) परवाने हिंदी लोकांना दिलेले आहेत. आणि गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये दुर्दैवाने हा लढा सुरू झाला त्यावेळी जवळ जवळ तितकेच हिंदी लोक ट्रान्सवॉलचे रहिवासी होते हे सर्वांना माहीत आहे. आता माझ्या असोसि-एशनच्या हाती असलेल्या माहितीप्रमाणे, ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांची संख्या

८००० (आठ हजार) हून अधिक नाही. ती ८००० पेक्षा ७००० च बहुधा असेल. घाऊक व्यापाऱ्यांच्या दडपणामुळे किंवा तशाच अन्य कारणामुळे काही मेमन व इतर (३० हून अधिक नाही) यांनी आपल्या सह्या परत घेऊन कायद्याप्रमाणे नोंदणीसाठी अर्ज केले आहेत, अशी माहिती माझ्या असोसिएशनला आहे. शिवाय, माझ्या असोसिएशनकडे आलेल्या माहितीवरून सर्व ट्रान्सवॉलमधून, नोंदणीचे काम चालू असताना (म्हणजे १ जुलै ते ३१ ऑक्टोबर) ३५० (साडेतीनशे) हून अधिक हिंदी लोकांनी नोंदणीसाठी अर्ज केले नाहीत. या अर्जदारांपैकी सुं. ९५ लोक मेमन जातीचे आहेत.

शेवटी, आशियावासी कायदा-दुरुस्ती-विधेयकाविरुद्ध हिंदी समाजाची भावना किती तीव्र आहे यांकडे माझी असोसिएशन सरकारचे लक्ष नम्रपणे वेधीत आहे. या समाजाला जे धोरण आखणे अवश्य वाटले, ते स्वीकारण्यात सरकारचा किंवा या देशातील कायद्याचा अवमान करावा असा हेतू नाही. तर या कायद्याने समाजावर अन्याय होतो या भावनेने हिंदी लोक, सविनय-प्रतिकारामुळे येणाऱ्या सर्व आपत्ती. सहन करण्यास सिद्ध झाले आहेत.

[आपला
इसाप इस्माईल मियाँ
अध्यक्ष,
ब्रिटिश इंडियन असोसिएशन]

ट्रान्सवॉल लीडर, २-११-१९०७

२५३. "ट्रान्सवॉल लीडर"ला पत्र

[जोहान्सबर्ग
ता. १ नोव्हेंबर, १९०७]

[संपादक,
ट्रान्सवॉल लीडर
जोहान्सबर्ग]

महाशय,

आशियावासी-नोंदणी-कायद्यावर आपल्या आजच्या अंकात जो अग्रलेख आलेला आहे, त्यात आपण ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या तोंडी असे विधान

घातले आहे की, नोंदणी झालेल्या सर्व ४०० (चारशे) माणसांना ट्रान्सवॉलमध्ये राहण्याचा हक्क नाही. असे विधान असोसिएशनच्या कोणा अधिकारी माणसाने केल्याचे मला माहीत नाही. आमच्या काही निरोधकांनी असे काहीसे विधान केल्याचे मला माहीत आहे, पण ते केवळ फुशारकीसारखे होते, आणि निरोधकांचे प्रमुख श्री. नायडू यानी ते तत्काळ दुरुस्त केले. पण तुमच्या वृत्तांतात ती दुरुस्ती आली नाही. असोसिएशनने अधिकृत वक्तव्य जे प्रसिद्ध केले आहे, ते इतकेच की, सरकारने लावलेल्या या कायद्याच्या अर्थाप्रमाणे ज्या निदान चार माणसांना या देशात राहण्याचा हक्क नाही, त्यांनी नोंदणी–पत्रासाठी अर्ज केले आहेत. आणि त्यांना ती नोंदणीपत्रे बहुधा मिळाली असावीत.

अर्ज स्वीकारण्यासाठी सरकार जर कचेरी उघडी ठेवणार असेल तर सरकारच्या दौर्बल्याचाच तो पुरावा होईल, असे बहुसंख्य हिंदी लोकांना वाटेल. आणि म्हणून सरकारचे ते कृत्य म्हणजे सन्मानाची सवलत आहे, असे मानण्याचे मी आदरपूर्वक नाकारतो. अत्यंत नम्रपणाने आणि उच्च आदेशानुसार, ब्रिटिश इंडियन असोसिएशनने सरकारला जास्तीत जास्त कडक शासन करण्याचे आव्हान दिले आहे. नोंदणीचे चिमटे आम्हांला नको आहेत. जागरूक निरोधकांनी आपल्याला प्लेगचे ठाणे वाटणाऱ्या स्थानापासून (नोंदणी कचेरीपासून) हिंदी लोकांना जसे दूर ठेवले आहे, तसेच प्रिटोरियामध्येही घडेल.

जनरल स्मट्स यांची धमकी व साम्राज्य सरकारचा हस्तक्षेप करण्यास नकार, असताना हिंदी लोकांच्या विरोधामुळे काय फायदा होणार आहे असे तुम्ही विचारता. पण, माझ्या माहितीप्रमाणे, हिंदी लोकांनी डाउनिंग स्ट्रीटच्या (साम्राज्य सरकारच्या) हस्तक्षेपावर किंवा माणुसकीच्या तत्त्वाला जनरल स्मट्सनी दिलेल्या मान्यतेवर, विश्वास ठेवलेला नाही. सध्या हिंदी समाजाने जो प्रयत्न चालविलेला आहे, तो यशस्वी झाल्यास त्यामुळे त्या समाजाला या वसाहतीत प्रतिष्ठा प्राप्त होईल यात शंका नाही. पण या लढ्यात आपण आपले सर्वस्व गमावून बसू, याची जाणीव त्यांना आहे. आणि तसे झाले तर (तसे होणार नाही अशी मला खात्री वाटते) त्यांनी आपल्या आत्म्याचे संरक्षण केले असे होईल. हा लाभ एका पारड्यात टाका, आणि जनरल स्मट्स व त्यांचा कायदा यामुळे हिंदी समाजाचा होणारा सारा फायदा दुसऱ्या पारड्यात टाका. म्हणजे दुसऱ्या पारड्यातील लाभ, काहीही झाले तरी, भिरकावून देण्यास, मी माझ्या देशबांधवांना विनदिक्कत सांगेन. यावरून आपल्या ध्यानी हे येईल की, कायद्यापासून मिळणारे सर्व लाभ आम्ही घेणार असलो, तरी प्रवेश-नियंत्रक बिल, किंवा त्याहून अधिक कडक असे दुसरे बिल मंजूर झाले, तरी हिंदी समाज आपल्या सरळ व निरुंद मार्गापासून चळणार नाही. पण जर तो चळला

(तो चळणार नाही असे मी म्हणत नाही) तर दोन्ही बाजूंस कडे तुटलेले आहेत. याची जाणीव प्रत्येक हिंदी माणसाला आहे.

आपला
मो. क. गांधी

" ट्रान्सवॉल लीडर, " २-११-१९०७

२५४. सर विल्यम वेडर्बर्न यांना पत्र

[जोहान्सबर्ग,
ता. २ नोव्हेंबर, १९०७ पूर्वी]

श्री विल्यम वेडर्बर्न,
अध्यक्ष
ब्रिटिश – हिंदी राष्ट्रीय सभा
लंडन.

महाशय,

आशियावासी नोंदणी कायद्याच्या बाबतीत माझी संस्था अत्यंत झपाट्याने काम करीत आहे. दक्षिण आफ्रिकेत आमच्यामध्ये वांशिक भेद नाहीत हे मी सांगण्याची फारशी गरज नाही. निरनिराळ्या प्रांतांत राहणारे हिंदू, मुसल्मान, पारशी, खिस्ती हे एकत्र येतात आणि सर्वांच्या कल्याणासाठी झटतात. काही बाबतीत आशियावासी नोंदणी कायदा हिंदी मुसलमानांना विशेष प्रकारे बाधक आहे. आम्ही सर्व पक्ष व सर्व पंथ यांना विनंती केली आहे. म्हणून हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेसचे इंग्लंडमधील आपण प्रतिनिधी असल्याने आपल्यालाही माझी संस्था विनंती करीत आहे. ट्रान्सवॉलमधील नोंदणी कायद्याचा प्रश्न कॉंग्रेसपुढील विषयांमध्ये अग्रस्थानी मांडला जाईल, असा मला विश्वास वाटतो. द. आफ्रिकेतील सर्वसाधारण प्रश्नांपेक्षा हा प्रश्न निराळा आहे. ट्रान्सवॉलमधील विशिष्ट संकटांशी मुकाबला करण्याकरिता ज्याला " पराक्रमाची कृत्ये " कदाचित् म्हणता येईल, ती करण्याचा आमचा प्रयत्न चालू असल्याचे आपल्याला माहीत आहेच. दक्षिण आफ्रिकेतील दुसरे कायदे सहन केले जातील आणि आतापर्यंत ते सहन केले गेलेही, पण ट्रान्सवॉल कायदा असह्य आहे. दक्षिण आफ्रिकेतील

इतर कायद्यांमुळे हिंदी लोकांना असे वाटले नाही की, याला मान्यता देण्यापेक्षा आपण सर्वस्व गमावलेले चांगले. पण ट्रान्सवॉलच्या कायद्याच्या बाबतीत तसे करणे अत्यंत अवश्य आहे असे वाटले, आणि तसे कृत्य सुरूही झाले. दक्षिण अफ्रिकेतील इतर कायद्यांमुळे आमचे द्रव्याचे मार्ग एकजात बंद होतात; पण ट्रान्सवॉल नोंदणी कायद्याने आमचे पौरुषत्व हिरावून घेतले जाते, आणि जवळ जवळ गुलामगिरीच्या दशेस आम्हांस पोचविले जाते. आणि या कायद्याचा मुसलमानावर जो विशेष परिणाम होणार आहे, तो लक्षात घेता, ट्रान्सवॉलच्या घटनेला काँग्रेसने विशेष प्रमुख स्थान देणे गौरवाचे होईल. बहुधा डिसेंबरच्या अखेरीस, पुष्कळ हिंदी लोक तत्त्वासाठी तुरुंगात गेलेले असतील, काँग्रेस जेव्हा भरेल, तेव्हा अत्यंत आणीबाणीची अवस्था येथे निर्माण झालेली असेल.

[आपला
इमाम् अब्दुल कादीर सालेम बवाजीर
हंगामी अध्यक्ष
हमीदिया इस्लामिया अंजुमन]

इंडियन ओपिनियन, २-११-१९०७

२५५. स्मट्स यांची बहाद्दुरी (?)

जनरल स्मट्स् हा माणूस बोलेल तसे करील, असा आहे, या विचाराने पुष्कळ हिंदी लोक बायकांसारखे घाबरून गेले आहेत. गेल्या आठवड्यात आम्ही असे लिहिले होते की, दुकाने बंद करण्यासंबंधीचे निर्बंध प्रसिद्ध होताच याच सद्गृहस्थाने ते रद्द केले. ते निर्बंध गॅझेटमध्ये ज्या आठवड्यामध्ये आले होते, त्या वेळी पुष्कळ गोऱ्या दुकानदारांनी त्यांच्याशी लढा दिला. जनरल स्मट्स् थंड पडले आणि त्या निर्बंधांच्या प्रकाशनानंतर १० दिवसांच्या आत त्याने ते परत घेतले. त्याचप्रमाणे बीयरबिल व काफिर कायदा हेही त्यानेच परत घेतले. दुकानांचे निर्बंध ट्रान्सवॉलमधील गोऱ्यांच्या भीतीने परत घेतले तर दुसरे दोन कायदे इंग्लंडातील विरोधी लोकमतामुळे परत घेतले.

ही तीन उदाहरणे आमच्या हिंदी मित्रांनी काळजीपूर्वक लक्षात ठेवावीत. त्या उदाहरणावरून असे दिसते की, जनरल स्मट्स हे शूर लोकांना खात्रीने भितात. पण काही भागूबाई नवरे आपल्या बायकोच्या नथीतून तीर मारण्यातच शूर असतात,

त्याप्रमाणे, जे लोक बायकांप्रमाणे आपल्यापुढे भयभीत होतील, त्यांच्यापुढे जनरल स्मट्स हे आपली बहाद्दुरी दाखवितात. त्यांना गोऱ्या व्यापाऱ्यांचे भय वाटते. याचे कारण त्यांची सत्ता त्यांच्यावर अवलंबून आहे. ते हिंदी लोकांना का भितील? स्त्रिया जशा दिवसातून दहा वेळा पोषाख बदलतात, तसे हिंदी लोक आपले धोरण बदलतात. एकच हिंदी माणूस निरोधन करतो, निरोधनेही करतो आणि तोच गुलामगिरीचा पट्टाही घेतो. कायद्याला विरोध करणाऱ्या सभेचे अध्यक्षस्थान जो घेतो, तोच हिंदी माणूस प्रतिज्ञापत्रावर सही करून गुलामगिरीचा बुरखा घेतो. एकच हिंदी माणूस या कायद्याला मान्यता न देण्यासाठी ईश्वराच्या नावाने शपथ घेऊन एका लेखणीने सही करतो आणि दुसऱ्या लेखणीने म्हणतो, मला गुलामगिरी हवी. मग जनरल स्मट्सने त्यांना का भ्यावे? एकाच परिस्थितीत ते शक्य आहे. आणि ती परिस्थिती म्हणजे जे लोक दुसरीकडे अडकलेले नाहीत, त्यांनी जनरल स्मट्स यांच्याशी अखेरपर्यंत लढा द्यावा. स्वतःचा सत्यानाश झाला तरीही. मग या दुष्ट कायद्याची वासलात त्या बीयर बिलाप्रमाणे होते की नाही, हे आपण पाहू! या जगात कोणतेही भव्य यश झगड्याविना केव्हाही व कोठेही प्राप्त झालेले नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २-११-१९०७

२५६. खरी मैत्री

ब्लूम फाँटीन येथील "फ्रेंड" हे पत्र आपल्याशी खऱ्या मैत्रीने वागत आहे हे निःसंशय. या[1] महिन्याच्या २४ ता. च्या "फ्रेंड" च्या अंकात संपादकाने आशियावासी कायद्यावर कडक टीका केली आहे. आणि म्हटले आहे की, त्या कायद्याला विरोध करणारे हिंदी लोक अभिनंदनास पात्र आहेत. काही हिंदी लोक भीतीमुळे नावे नोंदवीत असले, तरी त्याला काही अर्थ नाही. पण जे लोक कायद्याला विरोध करतात किंवा देशाचा त्याग करतात, ते हा कायदा वाईट आहे, असे दाखवून देतात.

१. हा लेख ऑक्टोबरमध्ये लिहिला असावा असे दिसते.

ट्रान्सवॉल सरकारने योग्य विचारांनीच कृती करावी, असा सल्ला 'फ्रेंड'च्या संपादकांनी दिला आहे. जर आशियावासीयांना देशत्याग करावा लागणार असेल, तर त्यांना नुकसान-भरपाई देणे अगदी योग्य आहे. हा सर्व लेख आमच्या वाचकांनी वाचावा अशी आमची त्यांना विनंती आहे.[1]

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २-११-१९०७.

२५७. ब्लूमफाँटीन येथील "फ्रेंड" ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या सहाय्यास पुनः धावून आला !

"हा कायदा असमंजस व अन्यायी आहे."

या महिन्याच्या ता. २४ च्या ब्लूमफाँटीन येथील "फ्रेंड"च्या अंकात, ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना पाठिंबा देणारा अग्रलेख आलेला आहे. तो पुढीलप्रमाणे[2] :

प्रिटोरियाहून अशी बातमी आली आहे की, नोंदणी कायद्याला हिंदी लोकांनी चालविलेला विरोध ढासळत आहे असे अधिकाऱ्यांना वाटते. तसे त्यांना वाटण्याला कारण हे की, सुमारे आठ्ठेचाळीस हिंदी लोकांनी प्रिटोरियामध्ये नोंदणीअर्ज केले आहेत आणि त्यांतील काहीजण त्या समाजातील प्रमुख आहेत. तथापि जेथे हिंदी लोकांचा बहुजनसमाज राहतो, त्या जोहान्सबर्गमध्ये फक्त १६ लोकांनी अर्ज केले आहेत. त्यांतील फक्त एकच अर्ज स्थानिक हिंदी माणसाचा आहे, बाकीचे सारे अर्ज बाहेरच्या विभागातून आलेल्या लोकांचे आहेत. त्या बातमीत पुढे असे म्हटले आहे की, बहुधा ट्रान्सवॉलमधून आलेले शंभर हिंदी लोक दर्बानहून हिंदुस्थानला उद्या जाणार होते. वरील आंकड्यापेक्षा ही बातमी, आमच्या मते, अधिक महत्त्वाची आहे. काळ्या किंवा गोऱ्या, दुसऱ्या कोणत्याही जमातीप्रमाणे दक्षिण आफ्रिकेतील

१. पाहा पुढील लेख.
२. गुजरातीमध्ये अधोरेखित केलेले शब्द येथे जाड ठशात छापले आहेत.

हिंदी लोकांमध्येही छळाच्या भयाने काही भित्रे लोक निघणारच. आपल्याला अपमानास्पद व अन्यायाचा वाटणाऱ्या कायद्याला ४०।५० लोक दुबळेपणाने शरण गेले, या गोष्टीपेक्षा बहुसंख्य लोक स्वाभिमान राखण्यासाठी देशत्यागाची किंमत देण्यास तयार आहेत, ही गोष्ट आमचे लक्ष वेधून घेणारी आहे. या प्रकरणी ट्रान्सवॉल सरकारचे कृत्य नैतिक दृष्ट्या चुकीचे व राजनैतिक दृष्ट्या अविवेकाचे आहे. नोंदणी–वटहुकुमाचा निषेध ज्या हिंदी लोकांनी केला, ते येथे दीर्घकाल वास्तव्य करून राहिले असल्यामुळे, त्यांना ट्रान्सवॉलमध्ये राहण्याचा पूर्ण व कायदेशीर हक्क आहे. त्यांना गुलाम किंवा गुन्हेगार ठरविणाऱ्या कायद्याला मान्यता दिली तरच वास्तव्याचा हक्क यापुढे त्यांना उपभोगता येईल, असे सरकारने ठरविले आहे. पण ते अजिबात समर्थनीय नाही, असे आमचे मत आहे. आतापर्यंत ट्रान्सवॉलमध्ये फक्त गुन्हेगार व मुदतबंद चिनी मजूर यांच्याच बोटांचे ठसे घेऊन नोंदणी केली जात असे, ही अगदी सत्य गोष्ट आहे. त्याच तऱ्हेने हिंदी लोकांना वागविणे, त्यांच्या वांशिक हीनतेमुळे, क्षम्य आहे असे काही लोकांस वाटेल. जर हिंदी लोक वंशदृष्ट्या खरोखर हीन असतील, तर आमचे वरिष्ठपण दुसऱ्यावर जुलमाने लादण्याचा आम्हांला मुळीच हक्क नाही. पण हिंदी लोक खरोखरच हीन आहेत काय ? आपल्या गोऱ्या सैन्यातील उत्तमातील उत्तम अशा सैनिकाशी क्षात्र गुणांत बरोबरी करणाऱ्या हिंदी पलटणी आहेत. आपल्या विद्यापीठातील श्रेष्ठ पारितोषिके पुष्कळ वेळा हिंदी विद्यार्थी पटकावून बसतात. तत्त्वज्ञान आणि गूढविद्याचिकित्सा यांच्या बाबतीत तर पाश्चात्त्य लोक लहान मुलाप्रमाणे पौरस्त्यांच्या पायाशी अजूनही बसत आहेत. व्यापार व उद्योगधंदा यातील कौशल्याची कसोटी लावली तर, सर्वसामान्य आशियावासीयांशी सर्वसामान्य गोरा माणूस स्पर्धा करू शकत नाही, हे सर्वमान्य आहे. या शेवटच्या वस्तुस्थितीमुळेच ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना आज अशा रीतीने वागविले जात आहे. युद्धविद्येमध्ये गोरे लोक आशियावासियांपेक्षा श्रेष्ठ आहेत यात शंका नाही. पण ती श्रेष्ठता किती काल टिकून राहील ? या प्रश्नाने युरोपियन मुत्सद्द्यांची मने क्षुब्ध व चिंतातुर झालेली आहेत. थोड्याच वर्षांत आशियातील लक्षावधी लोक आपल्या युगानुयुगीच्या निद्रेतून जागे होऊन पाश्चात्त्यांवर कदाचित् मात करतील. त्यांनी पूर्वी अनेकदा केले तसे त्यांनी केले नाही, तर त्याचे कारण, ट्रान्सवॉल सरकार त्यांना जागे करण्यास हातभार लावीत नाही हे असणार नाही. ट्रान्सवॉल सरकारच्या अन्यायामुळे जो जो हिंदी माणूस स्वदेशी जाईल तो आपल्याबरोबर कधीही पुसली न जाणारी अन्यायाची भावना घेऊन जाईल. एवढेच नव्हे तर तो तेथे गोऱ्या लोकांच्या राजवटीविरुद्ध चळवळ करू लागेल आणि अप्रीती फैलावू लागेल. साम्राज्यसरकारच्या चिंतांमध्ये भर घालावी अशी ट्रान्सवॉल सरकारला मुळीच इच्छा नाही हे आम्हांस माहीत आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की, ते सरकार आशियावासियांच्या प्रश्नातून स्वतःस अशा रीतीने सोडवून घेत आहे की, त्यामुळे साम्राज्य सरकारच्या शिरावरील भार वाढत आहे व गुंतागुंतीचा होत आहे. यामुळे

आम्ही नोंदणी-कायदा **असमंजस व अन्यायाचा** आहे असे मानतो. हिंदुस्थानच्या दडपणामुळे ब्रिटिश सरकार ट्रान्सवॉल सरकारवर दडपण आणील आणि तेथील आशियावासी कायद्यात सुधारणा करावयास लावील अथवा (काही लोकांना भीती वाटते त्याप्रमाणे) कदाचित् हिंदी लोकांच्या प्रवेशाला मुक्तद्वार मिळवून देईल, असे आम्हास वाटत नाही. इंग्लंडसारखा जुना देश आपल्या वसाहतीच्या वर्तनाच्या बाबतीत अत्यंत सहनशील आहे. तो त्यांना स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागू देतो– मग त्यामुळे आपल्या हितसंबंधांना अपाय झाला तरी चालेल. स्वतःच्या खर्चाने व स्वतःच्या आरमाराने वसाहतीचे संरक्षण करण्याची जबाबदारी इंग्लंड झुगारून देत नाही. हे सर्व ट्रान्सवॉल सरकारला माहीत आहे. जनरल बोथा यांच्या मंत्रिमंडळाचे संबंध साम्राज्य सरकारशी व्यक्तिशः मित्रत्वाचे आहेत. तरीही त्यांच्या आशियावासी बिलामुळे ते आपल्या मित्रांना संकटात लोटीत आहेत.

याहून दुसरा अधिक चांगला मार्ग नव्हता काय ?

इतके लिहिल्यानंतर आम्ही दुसरा चांगला मार्ग सुचवतो. प्रथम, कोणत्याही स्वरूपाने येथे येणाऱ्या आशियावासियांना यापुढे प्रतिबंध करणारा कायदा मंजूर करून घ्यावयास हवा. दुसरी गोष्ट म्हणजे ज्या आशियावासियांना या वसाहतीत यापुढे वास्तव्य करावयाचे असेल त्या सर्वांनी मान्य करावेत असे काही नियम घालून द्यावेत. हे नियम मान्य करण्यापेक्षा देशाचा त्याग करणे चांगले, असे जर काही आशियावासियांना वाटले, आणि देश-त्याग करताना आपले काही नुकसान झाल्याचे त्यांनी सिद्ध केले, तर त्या नुकसानीची भरपाई उदारपणे केली जावी. समजा, ट्रान्सवॉल-मधील सर्व हिंदी लोक देश सोडून जाण्यास तयार झाले, तर त्यांना जी नुकसान-भरपाई द्यावी लागेल ती हिंदी लोकांच्या बंडापेक्षा कमी किंमतीची असेल— आणि त्या नुकसानभरपाईचा काही वाटा उचलण्यास साम्राज्य सरकारने बहुधा संमती दिली असती. कारण हा बिकट प्रश्न न्यायाने सोडविण्याची त्यांची इच्छा आहे. काही प्रमाणात साम्राज्य सरकारावरील ती जबाबदारी आहे. कारण ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांची स्थिती हे त्यांनी गेल्या युद्धाचे एक निमित्त बनविले होते. खरोखर, आशिया-वासियांची समस्या हा दक्षिण आफ्रिकेच्या संघराज्याने सामुदायिक रीतीने सोडविण्या-सारखा प्रश्न आहे. ट्रान्सवॉलपेक्षा नाताळचा संबंध या प्रश्नाशी अधिक निगडित आहे. कारण हिंदी मजुराशिवाय नाताळचे चालणारच नाही. नाताळने आपला प्रश्न सोडविण्याचा एक मार्ग आम्ही वारंवार सुचविला आहे, तो असा की, आपल्या प्रदेशाचा काही भाग खास हिंदी लोकांसाठी ठेवावा आणि त्यामध्ये सर्व आशियावासियांना युरोपियनांच्या बरोबरीचे हक्क मिळावेत. पण त्या विभागाबाहेर दक्षिण आफ्रिकेत त्यांना कोठे राहण्याची मुभा नसावी. आपला देश आपल्यासाठीच ठेवण्याचा आणि परक्या वंशा-कडून आपली हकालपट्टी होऊ न देण्याचा आपल्याला पुरेपूर हक्क आहे. पण त्या

परक्या वंशातील लोकांचा अपमान किंवा हानी करण्याचा आपल्याला मुळीच हक्क नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २-११-१९०७

२५८. लंडनमधील मुसलमानांची सभा

नव्या कायद्याचा निषेध करणारा ठराव मंजूर करण्यासाठी लंडनमधील मुसल्मान लोकांची सभा भरत आहे, अशी लक्ष वेधणारी बातमी वृत्तपत्रांत आली आहे. त्या मुसलमानांमध्ये नाना जमाती आहेत आणि ते नाना देशांचे आहेत. त्यांत युरोपियनही आहेत. त्यांच्या सभेचा प्रभाव पडल्याशिवाय राहणार नाही. यावरून आमच्या मुस्लीम बांधवांनी हे ओळखावे की, आपण अधिक जागरूक राहिले पाहिजे आणि अधिक धैर्याने ट्रान्सवॉलचा लढा चालंविला पाहिजे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २-११-१९०७

२५९. जोहान्सबर्गचे बातमी-पत्र

शेवटचा आठवडा

ऑक्टोबरचे थोडेच दिवस राहिले आहेत. हे बातमीपत्र छापून येईपर्यंत, येथून "प्लेग-कचेरी" हलली असेल. हे पत्र लिहीपर्यंत तरी हिंदी लोक खंबीर राहिले आहेत. मेमन व काही कोकणी यांच्याशिवाय सर्वांनी आपले धैर्य टिकविले आहे. "मेमन" असे मी म्हटले, पण पीटर्सबर्ग येथील ५-६ मेमन आणि पिट् रिटीफ येथील २-३ मेमन हे आपल्या जमातीचा अंशतः मान राखतील अशी आशा धरण्यास जागा आहे. इतर ठिकाणी १-२ माणसेच पाठीमागे राहिली. पण बाकीचे मेमन बेहोषपणे धावले. आपल्या जमातीची काहीही काळजी न करता आणि स्वतःच्या मानाची

किंवा प्रतिज्ञेची काडीमात्र पर्वा न करता त्यांनी, खरी–खोटी, प्रतिज्ञा-पत्रे भरून दिली. आणि गुलामगिरीचा झगा घालून राजपुत्राप्रमाणे ते मिरवू लागले व स्वतःला सुरक्षित मानू लागले. "आकाशच फाटले, तर त्याला ठिगळ कोण लावणार?" अशी एक म्हण आमच्यामध्ये आहे. पीटर्सबर्गचा अध्यक्षच गुलाम होण्याचे पसंत करतो आणि तसे होण्यास इतरांना सांगतो तेव्हा, मेमनांपैकी कोणाला आम्ही बोल लावावा?

श्री. हाजी कासीम यांनी नवाच मार्ग आखला आहे. मी भीतीमुळे अर्ज केला नाही, असे प्रतिज्ञा-पत्र लिहून देणे महापातक होईल, असे त्यांना वाटले. म्हणून त्यांनी जनरल स्मट्स यांना लिहिले की, "कायद्यात काही सुधारणा आपण कराल अशी आम्हांला आशा वाटत होती. पण काहीही सुधारणा झाल्या नाहीत. म्हणून आम्ही आता नोंदणी करू इच्छितो. त्यासाठी आपण परवानगी द्यावी." जनरल स्मट्सजवळ अद्याप पुरेसे गुलाम नाहीत आणि म्हणून यांच्याशिवाय त्यांचे चालणार नाही. त्यामुळे कृपावंत होऊन त्यांनी असा हुकूम काढला की, श्री. हाजी कासीम व त्यांचे दोस्त यांनी प्रतिज्ञापत्र न भरता नोंदणी केली तरी चालेल. येथे मेमनांचे प्रकरण पुरे झाले; आता इतर हिंदी लोकांच्या बाबतीत काय घडते हे पाहावयाचे.

हमीदिया इस्लामिया अंजुमन

या संस्थेची सभा नेहमीप्रमाणे झाली. मौलवीसाहेब अहंमद मुखतियार यांनी जे भाषण केले, त्यामुळे काही लोकांच्या डोळ्यांस पाणी आले. कुराणातील पुष्कळ उदाहरणे देऊन त्यांनी असे दाखविले की, या कायद्याला संमती देणे म्हणजे आपल्या निष्ठेशी द्रोह करणे होय. श्री. गांधी यांनी पोलीस कमिशनरबरोबर झालेल्या आपल्या मुलाखतीचा संक्षिप्त वृत्तांत निवेदन केला आणि अशी सूचना केली की, एक दिवस आपण आपले निरोधक काढून घ्यावेत. म्हणजे (दमदाटी होत नाही अशी) सरकारची खात्री पटेल. मौलवीसाहेब यांनी पुनः भाषण करून सुचविले की, एका माणसाने हिंदुस्थानला मुद्दाम जावे आणि तेथे जागृती करावी. श्री. कुवाडिया यांनी सांगितले की, पोलिसांनी श्री. सालेजी यांच्या मलायी पत्नीच्या आणि दोन वर्षांच्या त्यांच्या मुलाच्या बोटांचे ठसे घेतले व दर्बान येथे श्री. बर्जेस यांनी काही हिंदी लोकांचे परवाने फाडून टाकले. श्री. उमरजी यांनी सांगितले की, नोव्हेंबर महिन्यात पुढाऱ्यांनी प्रत्येक खेड्यात दौरा काढावा आणि जनतेला सारी परिस्थिती समजावून सांगावी.

आशियावासियांची भोजनगृहे

हिंदी व काफिर यांच्या भोजनगृहांसंबंधी नगर-पालिकेने निर्बंध बनवले आहेत. त्यांमध्ये असे एक कलम आहे की, मालक गैरहजर असेल तर व्यवस्थापक म्हणून

युरोपियन माणसाचीच नेमणूक करावी. याचा निषेध करून ब्रिटिश इंडियन असोसिएशनने सरकारला पुढील पत्र पाठविले आहे[१]:

"आशियावासियांच्या भोजन-गृहासंबंधी नगरपालिकेने केलेल्या उपनियमात असे एक कलम असल्याचे माझ्या असोसिएशनला आढळले आहे की, या आशियावासियांच्या भोजनगृहांच्या मालकांनी आपले व्यवस्थापक म्हणून गोऱ्या लोकांनाच नेमावे. अशा भोजन-गृहाच्या मालकांना नगरपालिकेने असे एक सर्वसाधारण पत्रक पाठविले आहे की, "व्यवस्थापकांच्या नावाची जरूरी नगरपालिकेला भासण्याचा संभव आहे. म्हणून भोजन-गृहाच्या मालकाने अर्ज करताना आपल्या व्यवस्थापकाचे नाव खाली सही करणाऱ्याकडे ताबडतोब कळवावे." या सूचनेवरून हे स्पष्ट होते की, प्रत्येक भोजन-गृहात गोरा व्यवस्थापक नेमण्याचा नगरपालिकेचा आग्रह आहे."

आशियावासियांची भोजनगृहे थोडी आहेत. त्यांच्या अन्य व्यवहाराशी युरोपियन व्यवस्थापकाचा काही संबंध असण्याला मुसलमान व हिंदू या दोघांचाही धार्मिक विरोध राहील. शिवाय, या भोजन-गृहात सरासरीने दररोज १० पेक्षा अधिक गिऱ्हाइके नसतात. म्हणून युरोपियन किंवा दुसरा कोणी व्यवस्थापक याचा खर्च त्यांना झेपणार नाही.

भोजन-गृहाच्या अल्पसंख्य मालकांवर या संकल्पित उपनियमाने अत्यंत मोठी आपत्ती येईल, असे माझ्या असोसिएशनचे नम्र मत आहे. म्हणून या पोटनियमाला मंजुरी सरकार देणार नाही, अशी तिला आशा वाटत आहे.

हा कायदा मंजूर होईल, अशी भीती बाळगण्यास कारण आहे. त्याचा अर्थ असा की, हिंदु व मुसलमान यांना गोरे लोक अन्न पुरविणार ही जुलमाची हद्द झाली. नव्या कायद्याशी आपण जी लढत देत आहोत, त्यात आपला पराभव झाला, तर हिंदी लोकांना आपला धर्म, आपली प्रतिष्ठा किंबहुना आपले सर्वस्व गमवावे लागेल. असे मला म्हटल्याशिवाय राहवत नाही.

काही अफवा

अशी एक अफवा पसरली आहे की, जोहान्सबर्गमधील काही पुढाऱ्यांची नावे गांधींनी चोरून नोंदविली, आणि स्वतःचेही नाव नोंदविले. या अफवेला काय किंमत द्यावयाची हे वाचकांनीच ठरवावे. असे करण्याला जनरल स्मट्स यांनी प्रोत्साहन दिले असेही काही लोक बोलतात. तसे असेल तर, जनरल स्मट्स भेदरले आहेत आणि ते गवताच्या काडीचा आधार घेत आहेत असे आम्ही म्हणू.

१. ता. २-११-१९०७ च्या "इंडियन ओपीनियन"मध्ये आलेली मूळ इंग्रजी.

दुसरी अफवा अशी की, डिसेंबरमध्ये जे लोक नोंदणीशिवाय राहतील त्या सर्वांची उचलबांगडी जनरल स्मट्स रेल्वेने करतील हे निश्चित. नाताळच्या मंत्र्याबरोबर त्यांनी अशी व्यवस्था ठरविली आहे की, अशा लोकांना रेल्वेने बंदरापर्यंत पोचविले जाईल आणि तेथून त्यांना जहाजात सक्तीने बसवून हिंदुस्थानला हद्दपार केले जाईल. ही बातमी निराधार आहे-- असत्य आहे. सक्तीने हद्दपार करणारा कायदा अद्याप मंजूर झालेला नाही. श्री. लेनर्ड यांनी असे मत दिले आहे की, नोंदणीपत्र न घेणाऱ्या आशियावासी माणसाला सक्तीने हद्दपार करण्याचा कायदा ट्रान्सवॉलमध्ये नाही. शिवाय, हे लक्षात ठेवले पाहिजे की, त्या दुष्ट कायद्यात जर असा अधिकार दिलेला असता, तर सरकारने प्रवेशविषयक बिलामध्ये तशी तरतूद करण्यासाठी धावाधाव केली नसती. सक्तीने हद्दपार करण्याचा अधिकार सरकारला नाही हे खास. खेरीज, नाताळमध्ये राहण्याचा हक्क ज्याला आहे, त्याला जहाजात कोण कोंबू शकेल?

तिसरी अफवा अशी की, जोहान्सबर्गमधील बहुसंख्य हिंदी लोकांनी आपली नावे नोंदवलेली आहेत. आर्मिलो, क्लार्क्सडॉर्प व पॉचेफस्ट्रूम येथील पुढारी, यात सत्य किती आहे, हे पाहण्यासाठी येथे आले आहेत. सत्यस्थिती अत्यंत उत्साहवर्धक आहे, असे त्यांना आढळले. श्री. हेलू, श्री. महंमद शहाबुद्दीन, श्री. अब्दुल गफूर आणि दुसरे दोवे–तिवे, यांच्याशिवाय जोहान्सबर्गमधील एकाही माणसाने आपले नांव नोंदविले नाही. बाहेरच्या लोकांपैकीसुद्धा फक्त पंधरा माणसांनी आपल्या तोंडाला काळीमा फासून घेतला, हे कळल्याने त्या पुढाऱ्यांचा विश्वास द्विगुणित झाला.

प्रिटोरियाचे दौर्बल्य

प्रिटोरिया सर्वांत दुर्बळ आहे अशी भीती प्रथमपासून वाटत होती, ती खरी ठरली. तेथेच सर्वांत जास्त लोकांनी नावे नोंदविली. बहुतेक साऱ्या मेमनांनी नोंदणी केल्यामुळे इतर जमातीही अस्वस्थ झाल्या. उरलेल्या लोकांनी काय करावे याचा विचार ते करीत आहेत. पण विचार कशाचा करावयाचा, हे आम्हांस कळत नाही. हा कायदा वाईट आहे आणि त्याला विरोध करण्याची शपथ आपण घेतली आहे, एवढे प्रत्येकाला कळले म्हणजे पुरे.

एक शोचनीय घटना

इमाम कमालीवर शाहजी साहेबाने हल्ला केल्याचे उदाहरण आपल्या स्मृती-मध्ये अजून ताजे आहे आणि आता त्याने श्री. महंमद शहाबुद्दीन यांच्यावर हल्ला केला आहे. सोमवारी सकाळी १० वा श्री. महंमद शहाबुद्दीन मार्केट चौकात होते. तेव्हा शाहजीसाहेब त्यांच्याजवळ गेला आणि त्याने नांव नोंदविल्याबद्दल त्यांची निर्भर्त्सना करून त्यांच्यावर हल्ला केला. त्यांच्या एका बोटाला मोठी दुखापत झाली. तेथे हजर असलेले काही यहुदी लोक मध्ये पडले, नाही तर ती दुखापत मोठी झाली

असती. यामुळे लोकांमध्ये हाहाःकार उडाला. प्रत्येकाला दुःख वाटले. श्री. इसाप मियाँ व श्री. गांधी यांनी श्री. शहाबुद्दीन यांच्याकडे जाऊन खेद प्रदर्शित केला. शाहजीसाहेबावर खटला भरण्याचा इरादा श्री. महंमद शाहबुद्दीन यांचा नाही. तथापि पोलीस कमिशनरच्या कानी ही बातमी जाताच त्यांनी चौकशी केली. त्याने श्री. शाहबुद्दीन यांना जबाब देण्यास सांगितले. पण त्यांनी नकार दिला. पुढारी लोक शाहजीसाहेबांची कानउघाडणी करीत आहेत. या प्रकरणामुळे प्रत्येकजण व्यथित झाला आहे.

या पत्रात मी अनेकवार लिहिले आहे की, या लढ्यात हिंदी समाजाने हिंसा केली तर आपल्याला जय मिळणे कठीण जाईल, या लढ्यात शक्तीचा उपयोग करावयाचा नाही. जे लोक "वीणा वाजवितात[१]" त्यांचे समर्थन करता येणार नाही. ते देशद्रोही आहेत यात शंका नाही. पण त्यांना अनुनयाने व युक्तिवादाने जिंकावयाचे आहे. त्यांनी आपला हट्ट चालूच ठेवला तरी त्यांच्यावर आपण दंड-प्रयोग करावयाचा नाही. केला तर आपली हानी होईल. शाहजीसाहेबाशी कोणी युक्तिवाद करू शकणार नाही. तो एक विलक्षण गृहस्थ आहे. आपण धैर्याने वागले पाहिजे, हिंसेने नव्हे; तरच आपले साध्य हस्तगत होईल. हे सर्व हिंदी लोकांनी समजून घेतले पाहिजे. ज्या लोकांना या कायद्यामुळे अपमान झाला असे वाटत नाही, त्यांनी आपली नावे नोंदविली म्हणून काय झाले? निदान माझे मत असे आहे की, जोपर्यंत बहुसंख्य हिंदी दृढ राहतील तोपर्यंत काहीही नुकसान होणार नाही.

काही प्रश्न

मालक गैरहजर असताना व्यवस्थापकाला परवाना मिळू शकेल की नाही, असा प्रश्न विचारला जातो. त्याचे उत्तर वरिष्ठ न्यायमंदिराने राम मकन याच्या खटल्यात दिले आहे. त्याला परवाना मिळेल असे उत्तर आहे. दुसरा प्रश्न असा की, येथील हिंदी लोकांनी मुखत्यारनाम्यावर अंगठ्याचा ठसा देण्याची जरुरी आहे काय? अंगठ्याचा ठसा या बाबतीत दिला पाहिजे हे उघड आहे. कायद्याला मान्यता देण्याची ज्यांना इच्छा आहे, त्यांना त्या प्रश्नांचा उपयोग आहे. जे लोक या कायद्याला मान्यता देत नाहीत, ते बिगरपरवाना व्यापार चालवून कायद्याशी झगडत आहेत. शेवटी कायदा रद्द होईल.

आणखी काही बेइमान

गेल्या खेपेस मी दिलेल्या यादीमध्ये आणखी काही भर पडलेली आहे. ती नावे मी दुःखाने प्रसिद्ध करीत आहे.—

१ म्हणजे गोऱ्यांचे ठसे देतात. उपहासाने हे वर्णन केले आहे.

प्रिटोरियाहून [२७] नावे, पीटर्सबर्गहून [२१], पॉचेफस्ट्रूमहून [१२], मिडलबर्गहून [४], जोहान्सबर्गहून [५], लुई ट्रीचार्ट, जीरस्ट, मेफिकिंग आणि खिश्चियाना यांतून प्रत्येकी १.

हिंदी कॉंग्रेसच्या लंडनमधील कमिटीला पत्र

कॉंग्रेसच्या ब्रिटिश कमिटीचे अध्यक्ष सर विल्यम वेडरबर्न आहेत. श्री. इसॉप मियॉं व इमाम कादीर यांनी त्यांना अशी विनंती केली आहे की,[1] नव्या कायद्याचा प्रश्न कॉंग्रेसच्या पुढील अधिवेशनात गांभीर्याने घेतला जावा.

शूर मुलतानी व्यापारी

" स्टार "मध्ये पुढील जाहिरात प्रसिद्ध झाली आहे.--

सविनय प्रतिकारक (नोंदणी करणार नाही). माल्टीलेस, टेनेरीफ् माल, जपानी व हिंदी रेशीम इत्यादींची अनिर्बंध विक्री.

ही जाहिरात एका शूर मुलतानी व्यापाऱ्याने दिलेली आहे. नोंदणीपेक्षा तुरुंगवास बरा असे त्याला वाटते. आपला धंदा आवरण्यासाठी त्याने हे पाऊल टाकले आहे आणि सरकारने काही केले तरी त्याला तोंड देण्यास तो तयार झाला आहे.

अधिकाऱ्यांचे निर्वाणीचे प्रयत्न

अर्ज मिळविण्यासाठी अधिकारी वर्ग सध्या निर्वाणीचे असे काही प्रयत्न करीत आहे की, त्यामुळे त्यांचे वर्तन हास्यास्पद ठरते. त्याचे एक उदाहरण म्हणजे, गेल्या आठवड्यात पकडलेल्या दोन चिनी निरोधकांचा खटला. कोर्टात पुराव्यादाखल असे सांगण्यात आले की, (नोंदणी-अधिकाऱ्याच्या हातातील खेळणे बनलेल्या) एका पोलिसाने एका चिनी निरोधकाला दोनदा शिवीगाळ केली आणि त्याला धक्काबुक्की करण्याचाही प्रयत्न केला. मॅजिस्ट्रेटने आरोपीला निर्दोषी ठरवून सोडून दिले. या खटल्यात गोऱ्या लोकांचे जे वर्तन दिसले आणि चिनी लोकांचे जे धैर्य प्रकट झाले, त्याचा परिणाम म्हणजे कित्येक गोऱ्या लोकांची अंतःकरणे सविनय प्रतिकारकांच्या बाजूस वळली.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २-११-१९०७

१. पाहा, सर विल्यम वेडरबर्न यांना पत्रे, लेख २५१ व लेख २५४

२६०. हिंदी राष्ट्रीय सभेला पत्र

जोहान्सबर्ग,
ता. ४ नोव्हेंबर, १९०७

[श्री. राशबिहारी घोष,
नियोजित अध्यक्ष[1],
हिंदी राष्ट्रीय (काँग्रेस,) सभा

महाशय,]

आशियावासी नोंदणी–कायद्याच्या बाबतीत ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांची स्थिती सांप्रत आणीबाणीची झाली आहे, याकडे मी आपले व काँग्रेसचे लक्ष नम्रपणे वेधू इच्छितो. या तिरस्कारार्ह कायद्याप्रमाणे नोंदणीचे अर्ज स्वीकारण्याचा शेवटचा दिवस या महिन्याची ३० तारीख हा आहे आणि त्यानंतर, विशिष्ट अपवाद वगळल्यास, कोणाचेही नोंदणी-अर्ज सरकार स्वीकारणार नाही, असे हिंदी लोकांना कळविण्यात आले आहे. समाजातील अत्यंत थोड्या लोकांशिवाय बाकीच्या सर्व हिंदी लोकांनी नव्या कायद्याप्रमाणे नोंदणी करण्यास नकार दिला आहे, हे आपल्याला यापूर्वीच बहुधा कळले असेल. एकूण १३,००० (तेरा हजार) परवाने बाळगणाऱ्या लोकांपैकी नोंदणी-साठी ३५० (तीनशे पन्नास) हून अधिक अर्ज आतापर्यंत गेलेले नाहीत असा माझ्या असोसिएशनचा दावा आहे. यावरून, या प्रकरणी लोकांच्या भावना किती तीव्र आहेत, याचा अंदाज आपण बांधू शकाल.

आमच्यावर झालेल्या अन्यायाचे निवारण करण्याचा आमचा मार्ग सविनय प्रतिकाराचा आहे, हे आपल्याला कळले असेल. कायदेभंगाचे सारे परिणाम सोसण्याचा निर्धार आम्ही केला आहे. आतापर्यंत पुष्कळांची भारी हानी झाली आहे आणि पुष्कळांचे सर्वस्व जाण्याची वेळ आली आहे. नव्या कायद्याप्रमाणे मिळालेली नोंदणी-पत्रे दाखल केल्याशिवाय हिंदी व्यापाऱ्यांना उधारीने माल देण्याचे कैक युरोपियन घाऊक व्यापाऱ्यांनी बंद केले आहे. नोकर किंवा मजूर म्हणून काम करणाऱ्या पुष्कळ हिंदी लोकांनी स्वतःची नोंदणी करण्यापेक्षा मालकाकडून बडतर्फी स्वीकारली आहे.

आपल्याला हे माहीतच असेल की, ट्रान्सवॉलमधील हिंदी समाजात मुसलमान, हिंदु, ख्रिस्ती व पारशी; मद्रासी, गुजराती, शीख, पठाण, हिंदी-भाषी व कलकत्त्याचे

१. १९०७ साली सुरत येथे भरलेल्या हिंदी राष्ट्रीय काँग्रेसच्या २३ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष.

लोक-अशी माणसे आहेत. या सर्वांनी या अन्यायी कायद्याला प्रतिकार करण्याच्या महत्कार्यात एकजूट केली आहे. कारण, या कायद्यामुळे प्रत्येक हिंदी माणसाची धनदौलत छिनावली जाण्याचे भय आहे, एवढेच नव्हे तर, पूर्वीच्या जुलमी कायद्यामुळे सर्वस्वाचा नाश होण्याचे भय असताना त्याने आपला जो स्वाभिमान वाचविला होता, तोही या कायद्याने नष्ट होणार आहे.

अशा क्षणी, माझी असोसिएशन कॉंग्रेसकडे दाद मागत आहे. तिला अशी आशा आहे की, कॉंग्रेसपुढे विचारार्थ जे विषय येतील, त्यांमध्ये ट्रान्सवाल नोंदणी-कायदा अग्रस्थानी ठेवला जाईल, आणि दक्षिण आफ्रिकेच्या सर्वसामान्य प्रश्नांहून त्याला निराळे महत्त्व दिले जाईल. सध्या ट्रान्सवालमधील हिंदी लोकांच्या भयानक परिस्थितीशिवाय दक्षिण आफ्रिकेचा दुसरा कोणताही प्रश्न नाही. आज आमचे जे काही होईल, तेच दक्षिण आफ्रिकेतील इतर ठिकाणच्या आमच्या बांधवांना उद्या भोगावे लागेल. एवढेच नव्हे तर साम्राज्याच्या दृष्टीने आमचा प्रश्न पहिल्या दर्जाचा आहे, आणि हिंदुस्थानच्या दृष्टीने राष्ट्रीय महत्त्वाचा आहे, असे आम्ही समजतो. कारण, दक्षिण आफ्रिकेतील वसाहतीत येथे आमच्यावर जे अन्याय लादण्यात यशस्वी होतील, ते साम्राज्याच्या इतर वसाहतीत दुसऱ्या ठिकाणच्या आमच्या बांधवांवर तसेच अन्याय लादतील. ट्रान्सवालमधील विलक्षण आपत्तीला तोंड देण्यासाठी आम्ही शौर्याचे उपाय योजीत आहोत असे कोणी म्हणेल. पण आम्ही स्वतःला आमच्या मायभूमीचे या देशातील प्रतिनिधी समजतो, आणि देशाभिमानी हिंदी लोक या नात्याने, आमच्या वंशावर व राष्ट्रीय प्रतिष्ठेवर जो अपमानपूर्वक आघात केला जात आहे, तो निमूटपणे सहन करणे आम्हांला अशक्य आहे. दक्षिण आफ्रिकेतील दुसऱ्या कोणत्याही कायद्याने आमच्यावर इतका क्रूर आघात केलेला नाही; परंतु ट्रान्सवाल आशियावासी नोंदणी-कायदा असह्य आहे. दक्षिण आफ्रिकेतील इतर कायद्यांमुळे द्रव्यार्जनाचे आमचे मार्ग एकजात बंद होतात, पण ट्रान्सवॉलच्या नोंदणी कायद्यामुळे आमचे पौरुष हिरावले जाते आणि आम्हांला गुलामगिरीच्या दशेस पोचविले जाते.

डिसेंबर–अखेरपर्यंत, बहुधा पुष्कळ हिंदी लोक तत्त्वासाठी तुरुंगात गेलेले असतील. नव्या कायद्याप्रमाणे ज्यांनी नोंदणी केली नाही त्या हिंदी लोकांना १ जानेवारी रोजी व्यापाराचे परवाने सरसकट नाकारले जातील. त्यामुळे कॉंग्रेस जेव्हा भरेल, तेव्हा अत्यंत आणीबाणीची अवस्था येथे निर्माण झालेली असेल. आमच्या सविनय प्रतिकाराच्या आंदोलनाला सर्व धार्मिक माणसांची, सर्व खऱ्या देशभक्तांची, सर्व व्यवहारचतुर व प्रामाणिक माणसांची मान्यता मिळेल, असे आम्ही धरून चालतो. आमच्या केवळ अ-प्रतिकाराच्या गुणामुळे, स्वतः क्लेश भोगण्याच्या आमच्या तयारीमुळे, आमचे प्रति-पक्षीही आदरभाव दाखवतील, असे सामर्थ्य या चळवळीचे आहे. हा प्रतिकार करण्याच्या कामी आमचा निर्धार अधिकच दृढ आहे. कारण

आमचे असे मत आहे की, या वसाहतीत अलग्शा प्रमाणावर आम्ही जो मार्ग घालून देऊ, तो यशस्वी होवो वा न होवो, तो प्रत्येक दलित समाजाला, प्रत्येक पीडित व्यक्तीला अनुकरणीय वाटेल. अन्यायाचे निवारण करण्यासाठी आतापर्यंत जे उपाय योजले जात होते, त्या सर्वांपेक्षा अधिक खात्रीचा व अधिक सन्मानाचा हा मार्ग आहे, असे आम्हांस वाटते.

[आपला,
इसाप इस्माईल मियाँ,
अध्यक्ष,
ब्रिटिश इंडियन असोसिएशन]

इंडियन ओपिनियन, ९-११-१९०७

२६१. वृत्तपत्रांना पत्र[1]

[जोहान्सबर्ग,
ता. ६ नोव्हेंबर, १९०७]

महाशय,

आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाच्या अंमलबजावणीबाबत सरकारची भूमिका सध्या काय आहे, यासंबंधी आपल्या प्रिटोरिया येथील वार्ताहराला अधिकृत खुलासा देण्यात आला आणि त्याचा सारांश आपण आपल्या पत्राच्या आजच्या अंकांत प्रसिद्ध केला. पण त्या सारांशामध्ये इतकी चुकीची विलक्षण विधाने आहेत की, वासाहतिक सचिवाच्या कचेरीतून दिलेल्या खुलाशाचा तपशील समजून घेण्यास आपला वार्ताहर चुकला की काय, अशी शंका माझ्या असोसिएशनला दुःखाने येत आहे. त्या वृत्तांतात दिलेल्या काही घटनांची छाननी, मी माझ्या असोसिएशनच्या वतीने व आपल्या परवानगीने, पुढे करीत आहे.

प्रथमतः, असे सांगितले आहे की कायद्याच्या निर्बंधात काही फेरबदल व्हावेत म्हणून हिंदी समाजाने वासाहतिक सचिवाकडे निवेदने पाठविली. या विधानाचा पूर्ण

१. हे पत्र "ट्रान्सवाल लीडर" व "स्टार" यांना पाठविले होते.

इन्कार माझी असोसिएशन करीत आहे. सत्य-स्थिती अशी आहे की, ता. ३० ऑगस्ट रोजी, निर्बंधात काही फेरबदल व्हावेत म्हणून "प्रिटोरिया, स्टॅन्डर्टन, पीटर्सबर्ग व मिडलबर्ग, यातील काही प्रमुख हिंदी लोकांच्या वतीने" सर्वश्री स्टेगमन्, एसेलेन व रूज यांनी एक अर्ज माननीय वासाहतिक सचीव यांच्याकडे पाठविला. सर्वश्री स्टेगमन, एसेलेन व रूज यांच्या अशीलाचा हेतु असा आहे की, आपण पुष्कळ हिंदी प्रतिनिधींच्या वतीने बोलत आहोत, असे दाखवावे. ही गोष्ट माझ्या असोसिएशनला कळताच तिने प्रिटोरियातील सॉलिसिटरांना एक पत्र लिहून कळविले की, हिंदी समाजाच्या वतीने बोलण्याचा काहीही हक्क या लोकांना नाही. मी वर उल्लेखिलेल्या पत्राची शब्दरचना असे दाखविते की, सरकारपुढे मांडलेली बाजू काही व्यक्तींनी आपल्या खाजगी नात्याने मांडलेली होती. आणि त्यांच्यापैकी बहुतेकांनी आपली नावे नोंदविली आहेत. या अर्जाला उत्तर म्हणून माननीय वासाहतिक सचिवाने आपल्या अर्जदारांना असे कळविले की, आपली विनंती मान्य करणे मला शक्य नाही. पण त्याने व्यवहारात कुचकामी ठरणाऱ्या अशा काही क्षुद्र सुधारणा केल्या. या उत्तराने ते अर्जदार इतके असंतुष्ट झाले की, त्यांनी सर्वश्री स्टेगमन, एसेलेन् व रूज यांच्यामार्फत पुढील आशयाचे उत्तर पाठविले : "तारीख ३० ऑगस्टच्या पत्रात आम्ही जी विनंती केली होती, ती आम्ही परत घेत आहोत. माननीय वासाहतिक सचिवाने ज्या सवलती दिल्या आहेत, त्या परत घेण्याचे स्वातंत्र्य त्यांना आहे" यावरून हे दिसून येईल की, निर्बंधाच्या बाबतीत हिंदी समाजाने माननीय वासाहतिक सचिवाकडे कोणतेही निवेदन धाडलेले नाही. जे काही अर्ज गेले असतील ते काही विशिष्ट व्यक्तींचे होते. आणि त्यांनीही नंतर आपली मागणी परत घेतली आहे व तशा आशयाचे पत्र गेल्या महिन्याच्या १२ तारखेस त्यांनी पाठविले आहे.

चळवळीच्या प्रारंभीच्या काळात जी भूमिका घेण्याचे धाडस हिंदी समाजाला नव्हते, ती त्या समाजाने आताच घेतली आहे, असे म्हणणे सर्वथैव खोटे आहे, असे मी माझ्या असोसिएशनच्या वतीने सांगू इच्छितो. या कायद्याला सविनय प्रतिकार १९०६ च्या सप्टेंबरपासून सुरू आहे. ही सत्यस्थिती वासाहतिक सचिवाला माहीत नसेल तर त्या खात्याचे अज्ञान विलक्षण आहे असे म्हटले पाहिजे. त्या महिन्यात जोहान्सबर्गमध्ये भरलेल्या सार्वजनिक सभेत सविनय प्रतिकाराची शपथ घेतली गेली, आणि त्या सभेस आशियावासियांचे नोंदणी-अधिकारी स्वतः उपस्थित होते. या कायद्याप्रमाणे तयार झालेल्या निर्बंधांच्या बाबतीत काही चर्चा करण्यास माझ्या असोसिएशनने सतत पूर्ण नकार दिला आहे. खुद्द या कायद्याचा कायदेशीरपणा मान्य करण्यास माझ्या असोसिएशनने प्रथमपासून नकार दिलेला असल्याने, त्याच्या किरकोळ तपशिलात तिने शिरणे हे अत्यंत अप्रशस्त झाले असते. या निर्बंधांचे अस्तित्वच माझ्या असोसिएशनने लक्षात घेतले नाही. म्हणून हिंदी समाजाने केलेल्या विनंतीप्रमाणे माननीय वासाहतिक सचिवाने हिंदी लोकांसाठी त्या

निर्बंधात ज्या सुधारणा केल्या असे म्हटले जाते, त्यांचा धिक्कार केल्याचा आरोप माझ्या असोसिएशनवर कोणीही, आपली कल्पना-शक्ती कितीही ताणली तरी, करू शकणार नाही. गेल्या जुलैमध्ये नोंदणीची घोषणा झाल्यावर माझ्या असोसिएशनने व हिंदी समाजाने सविनय प्रतिकाराचे आंदोलन सुरू केले असे समजणे, ही साफ चूक आहे. गेल्या वर्षी या लढ्याला सुरुवात झाली तेव्हाच, हा कायदा पूर्णपणे रद्द व्हावा अशी मागणी करण्यात आली.

माझ्या असोसिएशनने माननीय वासाहतिक सचिवाला नुकताच जो अर्ज पाठविला आहे, त्यासंबंधी एक गौण प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. या अर्जात इतर गोष्टींबरोबर हे सांगितलेले आहे की, सर्वश्री स्टेगमन, एसेलेन व रूज यांनी आपल्या अशीलातर्फे जे पत्र माननीय वासाहतिक सचिवाला पाठविले आहे, त्यापासून आम्ही अर्जदार पूर्णपणे अलिप्त आहोत आणि आता निर्माण झालेली बिकट परिस्थिती, हा कायदा पूर्णपणे रद्द झाल्याशिवाय सुधारणार नाही, असे या अर्जदारांनी आदरपूर्वक कळविले होते. यात नवीन असे काहीच नव्हते पण आपल्या वार्ताहराला भेटलेला सरकारी प्रवक्ता असे भासवीत आहे की, गेल्या सप्टेंबरच्या अखेरीस किरकोळ सुधारणा केल्याचे पत्र माननीय वासाहतिक सचिवाने पाठविले. त्या तथाकथित औदार्याचा हिंदी समाजाने फायदा घेऊन अधिक फायदा मिळविण्यासाठी सह्या घेण्याकरिता अर्ज प्रसृत केला. वस्तुस्थिती अशी आहे की, सर्वश्री स्टेगमन, एसेलेन व रूज यांचे ता. ३० ऑगस्टचे पत्र वासाहतिक सचिवाकडे गेल्याचे कळताच माझ्या असोसिएशनने तत्काळ पाच भिन्न भाषांतील अर्जाचे नमुने सर्व वसाहतभर पाठवून दिले. ही गोष्ट सप्टेंबरच्या आरंभी घडली आणि माननीय वासाहतिक सचिवाचे उत्तर प्रिटोरियातील सॉलिसिटरांना सप्टेंबरच्या अखेरीस मिळाले. तोपर्यंत माझ्या असोसिएशनकडे बहुतेक सारे अर्ज सह्या होऊन परत आलेले होते. तथापि, जोहान्सबर्गमध्ये शेवटची नोंदणी व्हावयाची होती आणि त्यासाठी ऑक्टोबर हा शेवटचा महिना होता, म्हणून त्या महिन्याच्या अखेरपर्यंत माझ्या असोसिएशनने तो अर्ज थोपवून धरला. हेतु असा की, आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाला हिंदी समाजाचा विरोध किती बळकट आहे, हे सरकारला दाखवावे. सर्वश्री स्टेगमन्, एसेलेन व रूज यांच्या अशिलांनी आपले पत्र ता. १२ ऑक्टोबरला परत घेतले, तरी माझ्या असोसिएशनने हेच धोरण कायम ठेवले.

नोंदणीची मुदत नोव्हेंबर अखेरपर्यंत वाढविण्याच्या प्रश्नाचा मी आता संक्षेपाने विचार करतो. माझ्या असोसिएशनचे असे निश्चित मत आहे की, हा निर्णय शेवटच्या घटकेस ठरविलेला आहे. किमान ३ मंत्र्यांची विधाने माझ्या असोसिएशनच्या मताला पुष्टी देणारी आहेत. त्याहून अधिक पुष्टी पाहिजे असेल तर गेल्या महिन्याच्या ६ तारखेस वासाहतिक सचिवालयाच्या कचेरीतून आशियावासियांच्या रजिस्ट्रारच्या सहीने

जे परिपत्रक निघाले आणि सर्व वसाहतीतील रेसिडेंट मॅजिस्ट्रेटकडे पाठविले गेले, त्यात ती पुष्टी सापडेल. त्या परिपत्रकात असे म्हटले होते की, "नोंदणीच्या अर्जाची मुदत या महिन्याच्या ३१ तारखेस संपते. ती त्यापुढे न वाढविण्याचे निश्चित ठरले आहे" अशी माहिती रेसिडेंट मॅजिस्ट्रेटांनी आशियावासियांना द्यावी. तसेच निरनिराळ्या विभागात राहणाऱ्या सर्व आशियावासियांनी त्या दिवशी किंवा त्या दिवसापूर्वी ओल्ड डच चर्च व्हॉन ब्रॅडीस स्क्वेअर, जोहान्सबर्ग, येथे नोंदणीसाठी अर्ज करावेत, अशी सूचना त्यांना देण्याविषयी परिपत्रकात लिहिले होते. या सूचना निश्चित स्वरूपाच्या होत्या, याविषयी शंका नाही. जोहान्सबर्ग येथे सर्व ट्रान्सवॉलमधून जे अर्ज आले त्यांची संख्या २५ हून अधिक नाही, हे पाहून माननीय वासाहतिक सचिवाने अखेरच्या घटकेस, एक महिन्याने मुदत वाढविण्याचा निर्णय केला, हे अगदी उघड आहे. गेल्या महिन्याच्या ४ तारखेच्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध झालेल्या सरकारी नोटीस नं. १९०७ मध्ये, या नव्या कायद्याप्रमाणे ज्यांनी पूर्वी नोंदणी केली नसेल त्यांनी नोंदणी करावी म्हणून मुदत वाढविण्याची काहीही तरतूद केलेली नव्हती, हे स्पष्ट आहे.

आणखी एका शेवटच्या गोष्टीकडे माझी असोसिएशन आपले लक्ष वेधीत आहे. ती म्हणजे प्रत्येक शहरातील आशियावासियांनीच अर्ज करण्याची मुदत मुक्रर केलेली होती. तरीसुद्धा असे जाहीर करण्यात आले की, नोंदणी-अधिकाऱ्यांनी पूर्वी भेट दिलेल्या शहरातील सर्व आशियावासियांना, (त्यांनी पूर्वी अर्ज केले नसल्यास) नवीन जाहीर केलेल्या शहरात अर्ज करता येतील आणि सर्व ट्रान्सवॉलमधील आशियावासियांनी अर्ज करण्याचे शेवटचे ठिकाण जोहान्सबर्ग हे जाहीर झाले होते. आणि अन्यत्र नोंदणी करावयाची नव्हती. असे असताना प्रिटोरिया येथे नोंदणी-कचेरीतल्या अधिकाऱ्यांनी काही अर्ज चोरून घेतले असा आरोप माझी असोसिएशन करीत आहे. हे अर्जदार भित्रे होते. त्यांनी लबाडीने व खोटेपणाने असे प्रतिज्ञापत्र लिहून दिले की, काही अज्ञात इसमांच्या दमदाटीमुळे आम्हांला पूर्वी अर्ज करता आले नाहीत. या लढ्यात हिंदी लोक उघडपणे लढत आहेत, हे पुनः एकदा माझी असोसिएशन जाहीर करू इच्छिते. हिंदी लोकांना पळवाट काढण्याची किंवा लबाडी करण्याची काहीच गरज नाही. इतर सर्व पौरस्त्य लोकांप्रमाणे हिंदी लोक दुटप्पी आहेत आणि दुटप्पीपणा हा "प्राच्य" आहे, असे कोणी आग्रहाने म्हणतात. आपल्या वार्ताहराच्या तारेत सत्यस्थितीचा जो विलक्षण विपर्यास करण्यात आला आहे, त्याचे वर्णन करणे कठीण आहे.

[आपला
इसाप इस्माईल मियाँ,
अध्यक्ष
ब्रिटिश इंडियन असोसिएशन]

इंडियन ओपिनियन, ९-११-१९०७

२६२. श्री. लॅबिस्टर

श्री. लॅबिस्टर यांच्या शोचनीय निधनाने नाताळ अधिकच दरिद्री झाला आहे. नाताळच्या वकील-वर्गातील एक हुषार व मनमोकळा सभासद गेला. सरकारचा एक इमानी सेवक आणि हिंदी लोकांचा एक सच्चा मित्र नाहीसा झाला. वकील-वर्गाने वाहिलेली आदरांजली योग्य होती. श्री. लॅबिस्टर जेव्हा नगरपालिकेचे सभासद होते[1] तेव्हा त्यांनी व्यापाऱ्यांच्या परवाना-कायद्यासंबंधी जी धडाडीची भूमिका घेतली, तिचे स्मरण होताच हिंदी लोकाना त्यांच्याविषयी कृतज्ञता वाटल्याशिवाय राहणार नाही. हिंदी लोकांच्या आवकेवर निर्बंध असावेत, हे त्यांचे धोरण ठाम असले तरी, ज्या जुन्या व्यापाऱ्यांचे परवाने व्यावसायिक स्पर्धेमुळे काढून घेतले होते, त्या हिंदी लोकांवर खटले भरण्यास श्री. लॅबिस्टर यांनी खुबीने नकार दिला आणि पुष्कळ हिंदी व्यापाऱ्यांचा सत्यानाशापासून बचाव केला, हे जनतेला माहीत नाही, म्हणून मुद्दाम सांगितले पाहिजे.

इंडियन ओपिनियन, ९-११-१९०७

२६३. ईद मुबारक

आम्ही आमच्या मुसलमान वाचकांना ईद मुबारक म्हणतो. मनुष्य अनंत गोष्टींची आशा करतो, पण त्याला पाहिजे ती प्रत्येक गोष्ट मिळत नाही. त्याच रीतीने, आम्ही आमच्या मुस्लीम बांधवांना ईद सुखाची जावो असे इच्छीत असलो तरी, आमच्या कल्पनेप्रमाणे, ज्यांनी रमझान महिना योग्य तऱ्हेने पाळला, त्यांनाच ईद वैभव मिळवून देईल, असा दैवी कायदा आहे. केवळ उपवास केल्याने रमझान योग्य रीतीने पाळला असे होत नाही, असे आम्ही समजतो. उपवास म्हणजे शारीरिक व मानसिक शिस्त. तिचा अर्थ हा की, सर्व वर्षभर नसले तरी निदान रमझान महिन्यात,

१. पाहा : खंड ३ लेख २१ व लेख ३३६.

सर्व नीति-नियमांचे पूर्ण पालन करावे, सत्याचे आचरण करावे आणि क्रोधाच्या अंशाचाही त्याग करावा. हे सर्व ज्यांनी केले असेल त्यांच्या बाबतीत आमच्या सदिच्छा सफल होतील असे आम्ही समजतो.

[गुजरातीवरून],
इंडियन ओपिनियन, ९–११–१९०७

२६४. नवे वर्ष सुखाचे जावो

आम्ही आमच्या मुसल्मान बांधवांना जशी ईद मुबारक इच्छिली, तसेच नवे वर्ष आमच्या हिंदु वाचकांना उत्कर्षाचे जावो, अशी आम्ही इच्छा करतो. नव्या वर्षाच्या प्रारंभानंतरचा हा आमचा पहिलाच अंक. ट्रान्सवॉलमध्ये, वस्तुतः सर्व दक्षिण आफ्रिकेमध्ये, हिंदी लोकांना नाना यातना भोगाव्या लागत आहेत, हे आम्ही पाहात आहोत. या यातनांमुळे त्यांची देशाभिमानाची वृत्ती दृढतर झाली आहे आणि ते स्वदेशाकडे अधिक लक्ष पुरवू लागले आहेत. तसेच त्यांचे विचार धार्मिक दृष्टीने काही प्रमाणात सुरू झाले आहेत.

हिंदु लोक हिंदु धर्मामध्ये तसेच मुसल्मान लोक इस्लाम धर्मामध्ये आणि इतर हिंदी लोक आपापल्या धर्मामध्ये अधिकाधिक लक्ष घालीत आहेत, हे योग्यच आहे. हिंदुस्थानचा जर उत्कर्ष व्हावयाचा असेल, तर तो याच मार्गाने होईल, अशी आमची दृढ श्रद्धा आहे. भिन्न भिन्न धर्मांचे लोक स्वधर्मातील खरे तत्त्व जर ओळखतील, तर ते अन्य-धर्मीय लोकांचा द्वेष कधीच करणार नाहीत. जलालुद्दीन रूमी याने म्हटल्याप्रमाणे किंवा श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितल्याप्रमाणे, नद्या पुष्कळ असतात आणि त्या एकमेकींपासून भिन्न असतात, पण त्या साऱ्या समुद्रास मिळतात; त्याचप्रमाणे धर्म अनेक असतात पण सर्वांचे खरे ध्येय एकच असते आणि ते म्हणजे ईश्वराचे किंवा खुदाचे दर्शन घडण्यास साह्य करणे. म्हणून आपण जर ध्येयाकडे पाहिले, तर आपल्याला धर्माधर्मामध्ये भेदभाव दिसणार नाही. नवे वर्ष हिंदु लोकांचा उत्कर्ष करो, असे आम्ही वर म्हटले. पण ज्याप्रमाणे काही अटींचे पालन केले तरच ईद वैभव

देते हे उघड आहे, त्याचप्रमाणे काही विशिष्ट अटी पाळल्या तरच नवे वर्ष मानवाला लाभदायक होते. इतके सांगितल्यानंतर त्या अटी कोणत्या हे सांगण्याची गरज नाही.

[गुजरातीवरून],
इंडियन ओपिनियन, ९–११–१९०७

२६५. शहाण्याला शब्दाचा मार

"शहाण्याला शब्दाचा मार पुरे" अशी आमच्यामध्ये एक म्हण आहे. चोहोबाजूंनी आम्हांला जी चिन्हे दिसत आहेत, त्यावरून असे वाटते की, आम्ही अखेरपर्यंत लढत राहिलो तर यशस्वी होऊ. आजही आम्ही यशस्वी झाल्यासारखेच आहोत. पण ट्रान्सवॉलमध्ये सन्मानाने वास्तव्य करता आले म्हणजे आमचे यश पूर्ण होईल. "फ्रेंड"ची टीका आम्ही पाहिली.[1] नोव्हेंबरपर्यंत मुदत वाढविल्याचे आम्हांस माहीत आहे. त्यावरून सरकारचे दौर्बल्य दिसून येते. पूर्वी जे गोरे लोक हिंदी प्रश्नाकडे क्वचितच लक्ष देत, ते आता त्याच विषयासंबंधी बोलत असतात. 'लीडर' सारख्या पत्राने सरकारला असा इशारा दिला की, धिमेपणा ठेवा, ब्रिटिशांचे तत्त्वज्ञान आठवा, अपली जबाबदारी ओळखा आणि हिंदी लोकांना न्याय द्या.

एका बाजूला अशी आशादायक चिन्हे दिसत असताना दुसऱ्या बाजूला हिंदी लोकांच्या खऱ्या कसोटीची वेळ जवळ येत आहे. आपण केवळ वाचिवीर आहोत असे म्हटले जाते, तसेच आपण आरंभ-शूर आहोत असाही आरोप आपल्यावर केला जातो. कसोटीच्या क्षणी आपण कसे वागतो हे आता पाहावयाचे. अखेरच्या क्षणी आपण जर पराकाष्ठेचे प्रयत्न केले नाहीत, तर आतापर्यंत आपण केलेले सर्व यत्न फोल ठरतील. हा लढा हिंदी लोकांनी काही मागून घेतलेला नव्हता, तो आपोआप आलेला आहे. तसा पुनः येणार नाही. अशा दुर्मिळ संधीचा लाभ घेण्यास आपण जर चुकलो,[2] तर भविष्य काळात तशी संधी पुनः येणार नाही. या लढ्यात धोका

१. पाहा "ब्लूम फॉंटेनचा 'फ्रेंड' पुनः ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या साहाय्यास" लेख २५७.

२. मूळ गुजराती म्हणीचा अर्थ असा—लक्ष्मी कोणाच्या कपाळा तिलक लावण्यास आली असताना तो गृहस्थ तोंड धुण्यासाठी बाहेर जातो हा त्याचा केवढा मूर्खपणा बरे !

आहेही व नाहीही. जे पैशाला हापापलेले आहेत त्यांना धोका वाटणे साहजिक आहे. पण जे देशाचे सेवक आहेत आणि आपला शब्द पाळणारे आहेत, त्यांना काडीमात्र धोका वाटणार नाही. त्यांच्यासाठी कायदा नाही. त्यांनी लढा दिला, तरी कायदा रद्द झाला नाही, म्हणून त्यांचा पराभव झाला असे होणार नाही. ते आपली योग्यता शेकडा शंभर टक्के सिद्ध करतील. ते कोठेही गेले तरी त्यांचा तसाच आदर होईल. अशी वृत्ती आपण ठेवल्याशिवाय यश मिळणार नाही. सर्वस्वाची पैज लावून जे लढण्यास जातात तेच विजयी होऊन येतात. या लढ्यात, खरे सामर्थ्य म्हणजे ईश्वर–खुदा. त्याच्याशी कोणतीही अट घालता येत नाही. (ईश्वरावरील) श्रद्धा सशर्त असू शकत नाही. हिंदी समाजाने ही पुरी जाणीव ठेवावी, आणि अखेरपर्यंत आपला शब्द पाळावा अशी आम्ही ईश्वराची प्रार्थना करतो.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ९–११–१९०७

२६६. मुदत–वाढ

"वीणा वाजविण्याची" मुदत ट्रान्सवॉल सरकारने का वाढविली आहे ? या प्रश्नाचे उत्तर सरकारी गॅझेटमध्येच आहे. "भयामुळे किंवा इतर कारणामुळे हिंदी लोक नोंदणीसाठी अर्ज करू शकले नाहीत" असे सरकारला कळविण्यात आले आहे, म्हणून मुदत वाढविण्यात आली आहे. असा अर्ज सरकारला करणाऱ्या हिंदी माणसाला आम्ही काय म्हणावे ? त्याला हिंदी माणूस म्हणता येईल काय ? त्याला माणूस म्हणता येईल काय ? ज्यांनी तो अर्ज केला त्यांना माहीत आहे की, आपण त्यात महान असत्य लिहिले आहे. धमकी कोणीही दिली नाही. पूर्वी जर धमक्या दिल्या होत्या, तर आता त्या थांबल्या आहेत काय ? निरोधक आपले कार्य करीत राहतील. लोकांची समजूत जे घालीत होते, ते पुढेही घालतील. जर ऑक्टोबरमध्ये भयामुळे कोणी जाण्याचे थांबले असेल, तर तो नोव्हेंबरमध्ये (परवाना–कचेरीकडे) कसा जाऊ शकेल ? मुदत-वाढ हवी होती, तर ती सरळपणे मागावयाची. ती मिळाली नसती, तरी ज्यांना आपल्या तोंडाला काळीमा लावायचा आहे, त्यांना तो लावता आला असता. पण याची चर्चा करणे व्यर्थ आहे. एका अपराधातून दुसरा अपराध निघतो. सरोवराचा बांध एकदा फुटला म्हणजे ते खिंडार वाढतच जाते. नोंदणीसाठी ज्यांनी अर्ज केला त्यांपैकी

प्रत्येकाला हे माहीत होते की, असे करणे हा अपराध आहे. म्हणून दुसरे अपराव करण्यास त्याला लज्जा किंवा भीती वाटली नाही. या दुष्ट कायद्याला मान्यता देणाऱ्यांचे अधःपतन एवढे होत आहे.

[गुजरातीवरून],
इंडियन ओपिनियन, ९-११-१९०७

२६७. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

हमीदिया इस्लामिया अंजुमन

हमीदिया इस्लामिया अंजुमनची सभा नेहमीप्रमाणे रविवारी भरली. तिला पुष्कळ लोक हजर होते. श्री. इमाम अब्दुल कादीर अध्यक्षस्थानी होते. श्री. हाजी हबीब यांचे पत्र श्री. महंमदखान यांनी वाचून दाखविले. प्रिटोरिया येथील अंजुमनच्या वतीने ते पत्र आलेले होते, आणि या संस्थेने केलेल्या कार्याबद्दल व निरोधकांनी दाखविलेल्या धैर्याबद्दल त्यात अभिनंदन केलेले होते. नंतर सर्वश्री गांधी, उमरजी साले व एम्. एस्. कुवाडिया, यांनी काही मुद्द्यांचे स्पष्टीकरण केले. त्यानंतर सभेपुढे अशी सूचना आली की, नोव्हेंबरमध्ये कोणीही प्रिटोरियास जाऊ नये, आणि व्यापारासाठी जाणे भाग पडलेच तर कोणीही परवाना कचेरीकडे जाऊ नये, असे आपल्यापैकी प्रत्येकाने सर्व वसाहतीत असणाऱ्या आपल्या मित्रांना लिहावे. ही सूचना सर्वांनी मान्य केली.

चिनी लोकांची सभा

चिनी लोक प्रत्येक रविवारी आपली सभा भरवितात. या वेळी चिनी वकील हजर होता. श्री. गांधींना खास निमंत्रण होते. त्यांनी नोव्हेंबरमध्ये काय घडेल हे खुलासेवार सांगितले. प्रिटोरियामध्ये चिनी निरोधक ठेवण्याचे सभेने ठरविले.

नोव्हेंबरमधील "प्लेग"

परवाना कचेरीच्या रूपातील प्लेग नोव्हेंबरमध्ये चालू राहील, अशी जी भीती लोकांना वाटत होती, ती यथार्थ होती, असे गेल्या आठवड्याच्या "इंडियन ओपिनियन" वरून दिसते. सरकारने ती कचेरी उघडी ठेवून आपले दौर्बल्य बिनचूकपणे

कबूल केले आहे. हिंदी लोकांना हद्दपार करण्याचे सामर्थ्य जनरल स्मट्सजवळ असते, तर त्यांनी नोव्हेंबरमध्ये नोंदणीचे अर्ज करण्यासाठी मुदत कधीच वाढविली नसती. ऑक्टोबरच्या ३१ तारखेनंतर कोणाचेही नाव नोंदविले जाणार नाही, अशा आशयाच्या त्या महिन्यातील नोटिशीचे काय झाले ? अर्ज करण्याची शेवटची संधी ऑक्टोबरमध्ये आहे, अशी जी सूचना सर्वत्र पाठविलेली होती, तिचे काय झाले ? जनरल स्मट्स कधीच नमते घेत नाहीत, असे मानण्यास आम्हांला सांगण्यात येते किंवा आमचे मन वळविले जाते; पण जनरल स्मट्स यांनी तीन मुद्द्यांवर दडपणामुळे नमते घेतले, असे (इंडियन ओपिनियनच्या) संपादकाने आम्हांला सिद्ध करून दाखविले आहे. ऑक्टोबर-नंतरची मुदत-वाढ हा त्यांनी नमते घेण्याचा चौथा प्रसंग आहे. या प्रसंगी जनरल स्मट्स यांना भीती वाटण्यासारखे काय होते, असे कोणी विचारील. या प्रश्नाचे उत्तर अगदी सरळ आहे. साम्राज्य सरकारने त्यांच्या मनावर खासगी रीतीने असे ठसविले असले पाहिजे की, त्यांना एकाही हिंदी माणसावर काहीही परिणाम करता येणार नाही. हे अनुमान बरोबर नसेल तर जनरल स्मट्स यांना आपली इभ्रत जाईल अशी भीती वाटली असेल. मुंगीवर पाय देण्यापूर्वी हत्तीने शंभर वेळा विचार करावयास हवा. जनरल स्मट्सना वाटते, आपण हत्ती आहोत आणि हिंदी लोक मुंग्या आहेत. मुंग्यांवर पाय देण्यास त्यांना लाज वाटते.

दौर्बल्याचे दुसरे चिन्ह

श्री. गांधींवर पहिला हल्ला होईल आणि प्रत्येकाला हद्दपार करण्याची तयारी चालू आहे, अशी अफवा सर्वत्र पसरली आहे, याचा उल्लेख मी गेल्या आठवड्यात केला होता. या प्रश्नासंबंधीचे एक पत्र आता माझ्याजवळ आहे.

कचालिया यांचे रूजबरोबर संभाषण

श्री. कचालिया असे लिहितात की,—

"श्री. रूज यांच्याशी माझे संभाषण झाले. त्यात त्यांनी मला असे सांगितले की, ट्रान्सवॉलहून हद्दपार झालेल्या लोकांना बंदरावर आगगाडीतून जहाजावर एकदम ठेवले जावे, या ट्रान्सवॉल सरकारच्या योजनेला नाताळ सरकारने संमती दिली आहे. काही झाले तरी श्री. गांधींना हद्दपार करण्याचा निश्चय सरकारने पूर्वीच केलेला आहे, हे त्यांनी आग्रहाने सांगितले."

श्री. गांधींना प्रथम हद्दपार केले तर त्यांच्याहून अधिक भाग्यवान दुसरा कोण ! तसे घडले तर हिंदी समाजाचे धैर्य कमी न होता वृद्धिंगतच होईल. परंतु कोणालाही हद्दपार करण्याचा असा अधिकार ट्रान्सवॉलला मिळालेला नाही आणि तो मिळण्यास काही काळ जावा लागेल. श्री. रूज यांच्या उद्गारावरून सरकारची फक्त निराशा व्यक्त होते, हे उघड आहे.

कैदी व गुलामगिरीचा पट्टा घेणारा माणूस यात फरक काय ?

अठरा बोटांच्या ठशांचे कागद नोंदणीकचेरीत नसून पोलिसांकडे दिलेले आहेत, अशी बातमी आहे. ज्या वहीत गुन्हेगारांची नोंद केलेली असते, तीतच या ' बहादूर ' हिंदी लोकांची नोंद होईल. म्हणजे, कायद्याला जे संमती देतील त्यांना सर्व तऱ्हेने गुन्हेगारांसारखे वागविले जाईल. फरक इतकाच की, चोराला काही वस्तू चोरल्याबद्दल गुन्हेगार समजून वागविण्यात येते, तर गुलामगिरीचा पट्टा घेणाऱ्या हिंदी माणसाला केवळ भयामुळे गुन्हेगार बनलेला समजण्यात येईल. या दोघांत अधिक वाईट कोण ? हे वाचकांनी स्वतःच ठरवावे. अठरा बोटांच्या ठशांचा विचार करीत असताना आम्हांला लहानपणी शिकलेल्या एका कवितेची आठवण होते. उंटाचे सारे अठरा अवयव वक्र आहेत. मग ते लपवून कसे ठेवता येतील ?[1] अठरा बोटांचे ठसे देणारे हिंदी लोक त्याच अवस्थेस पोचतील.

चौकशीविना परवाने

हिंदुस्थानात जेव्हा पाऊस खूप पडतो तेव्हा भाजीपाल्याच्या किंमती घसरतात; त्याचप्रमाणे नोंदणी-कचेरीवर जोराचा पाऊस पडत असल्याने नोंदणी-अधिकाऱ्याची किंमत घसरली आहे. काहीही चौकशी न करता रजिस्ट्रार अज्ञान मुलांना नोंदणीपत्रे देतो, असे म्हणतात. यात मला चुकीचे काही दिसत नाही. गुलाम होण्यात कोठेही अडचण नसते. पण आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, सावज पकडण्यासाठी ते जाळे पसरलेले आहे. आपण त्यापासून दूर राहिले पाहिजे. त्यावर अशी टीका करण्याचेही कारण नाही. पण माझ्या कानी कधी कधी असे येते की, श्री. अमुकतमुक यांनी आपले नाव नोंदवून भले केले. ज्याला हा कायदा कळत नाही आणि त्याच्याशी चाललेला आपला लढा समजत नाही अशाच माणसाच्या मनात वरील विचार येईल. या कायद्याप्रमाणे आपली नावे नोंदविणे लाभदायक असेल तर आपला लढा अकारण ठरेल आणि नोंदणीपत्रे घेणे हे आपले कर्तव्य ठरेल. पण आपले नाव नोंदविणे हे हानिकारक आहे–ते पाप आहे–आपल्या शपथेनुसार ते आपल्याला वर्ज्य आहे, म्हणून आपण आपली नावे नोंदवीत नाही. मग कोणी आपले नाव नोंदवून स्वतःचे कल्याण केले, असे कसे म्हणता येईल ? माणूस बनण्यासाठी आणि माणसाप्रमाणे जगण्यासाठी आपण लढत आहोत. एखादा माणूस बायकासारखा वागू लागला तर त्याने " आपले भले केले " असे कसे मानता येईल ? ज्यांनी नोंदणी केली नाही, ते स्वतंत्र आहेत व स्वतंत्र राहतील, ही कल्पना आपण दृढपणे मनात ठेवली पाहिजे. ट्रान्सवॉलमध्ये राहावयाचे तर आपण सन्मानानेच राहू, असा निर्धार केला पाहिजे. उलट, ज्यांनी आपली नावे नोंदविली त्यांनी ही कायमची गुलामगिरी स्वीकारली.

१. अढारे वक्या ऊंटना अंग वांका; कहो ढांकिये तो रहे केम ढांक्या ?

" ट्रान्सवॉल लीडर "चे आपल्याला साहाय्य

ब्लूमफाँटीन येथील " फ्रेंड "प्रमाणे ट्रान्सवॉलमधील वृत्तपत्रे आपल्या साहाय्यास येतील, अशी चिन्हे दिसत आहेत. पुष्कळ गोरे लोक तर सहानुभूती दाखवीत आहेत. वृत्तपत्रे आपल्या साहाय्यास येवोत वा न येवोत, " लीडर "ने आपल्या सोमवारच्या अंकात जे विचार मांडले आहेत, त्यामुळे आपल्याला धीर येईल. त्या विचारांचा सारांश[1] पुढे दिला आहे—

कसे ?

काही आशियावासियांच्या विनंतीला मान देऊन सरकारने नोंदणीची मुदत एक महिन्याने वाढविली आहे. त्या मुदतीनंतर सरकार काय करणार ? हे माहीत नाही. मुदत-वाढीचा निर्णय अखेरच्या क्षणी घेतलेला असेल. कारण, त्याच्या आदल्याच दिवशी श्री. सॉलोमन यांनी तशी मुदत-वाढ होणार नाही, अशी घोषणा केली होती. शेवटच्या क्षणापर्यंत मुदतवाढीच्या विनंतीची काहीच कल्पना सरकारला नव्हती काय ? सान्या विनंत्या शुक्रवारी एकदमच एकत्रितपणे दिल्या गेल्या काय ? सरकारच्या या मुदत-वाढीच्या कृतीचे कौतुक कोणा आशियावासी पुढाऱ्यांनी केले असेल, तर त्यांची नावे प्रसिद्ध करणे शहाणपणाचे ठरेल. कारण, त्यामुळे इतरांवर त्याचा परिणाम होईल. पण जनतेच्या माहितीप्रमाणे, असे कौतुक कोणीही केलेले नाही. आणि पुढाऱ्यांच्या वृत्तीत काडीमात्र बदल झालेला नाही. उलट, ते म्हणतात, आम्हांला हद्दपार करण्याचा कोणताही अधिकार सरकारला नाही. या आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ ते श्री. लिओनार्ड यांचे मत उद्धृत करतात.

हा कायदा ब्रिटिश तत्त्वांच्या विरुद्ध आहे, असे मत सर रेमंड वेस्ट यांच्यासारख्या विद्वान माणसाचेही आहे. पण प्रवेश-कायद्याने सरकारला अधिकार दिलेले आहेत. त्या कायद्याप्रमाणे केलेल्या कृत्यांची दाद वरिष्ठ न्याय-मंदिराकडे हिंदी लोक मागणार नाहीत असे कशावरून ? जर सरकारला हद्दपारीचा अधिकार असेल आणि तो बजावण्याचे त्याने ठरविले असेल, तर त्यांनी हिंदी लोकांना स्वदेशी हद्दपार केले पाहिजे. तसे झाले तर हिंदुस्थान सरकार मध्ये पडणार नाही काय ? श्री. हॉस्केन यांच्याशिवाय बाकी सारे प्रमुख गोरे लोक हिंदी लोकांविरुद्ध आहेत, असे दिसते. पण बारकाईने विचार केला तर असे आढळते की, आशियावासियांना आश्रय न देऊन बाहेर घालविण्याचा सरळ मार्ग गोऱ्यांना पसंत नाही. त्यांनी हिंदी लोकांशी व्यवहार करण्याचे बंद केले तर हिंदी लोक येथे कसे राहतील ? हिंदी लोकांनी नोंदणीपत्र घेण्याची सक्ती मालक-वर्ग करीत नाही. तसेच, सर्वसामान्य गोरी जनता हिंदी लोकांना विरोध करीत असल्याची चिन्हे

१. येथे दिलेले भाषांतर इंग्रजी मुळाशी पडताळून पाहिले आहे.

दिसत नाहीत. यामुळे या सर्व घटनांचा आणि विधानांचा मेळ तटस्थ प्रेक्षकाला एकदम घालता येत नाही. परिस्थिती अत्यंत अडचणीची आहे–आणि म्हणून तिचा पुनः विचार करणे अवश्य आहे. पक्षातीत भूमिकेवरून या प्रश्नाचा विचार करणे हे सर्व नेत्यांचे कर्तव्य आहे, हे सांगण्याची गरज नाही. जनरल स्मट्स व श्री. गांधी यांना एक अत्यंत बिकट समस्या सोडवावयाची आहे. प्रवासाच्या सुखसोयी आणि संस्कृतीची इतर अंगे यांमुळे पूर्व व पश्चिम यातील संबंध पुष्कळच बदलले आहेत. पूर्वी परदेशी जाण्याचे आशियावासियांच्या स्वप्नात येत नसे. पण आता तो परदेशी जाऊ लागला आहे. तो कंजूष आहे, नम्र आहे आणि काटकसरी आहे. तसे युरोपियन बहुधा नाहीत. आपण त्यांच्या देशात जातो, पण हाताच्या बोटावर मोजण्याइतके. उलट, ते हजारोंनी इकडे येतात. जेथे शक्य असेल तेथे आशियावासी लोक मूठभर गोऱ्यांनाही मज्जाव करतात. ट्रान्सवॉलने आशियावासियांची अनिर्बंध आवक चालू ठेवावी असे खुद्द आशियावासीही म्हणत नाहीत. जे आशियावासी पूर्वीच येथे आलेले आहेत, त्यांच्याशी आपण न्यायाने वागावे, अशी गोऱ्या जनतेची इच्छा आहे, असे म्हणतात. प्रश्न आहे तो पद्धतीचा. त्यासाठी सरकारने योजलेली पद्धत अन्यायाची व अपमानाची आहे असे म्हणून आशियावासी लोक तिचा निषेध करीत आहेत. त्याच्या पर्यायी मार्गाचा सरकारने विचार केला आहे काय? छाया-चित्रे, सह्या, इत्यादींचा काही उपयोग होणार नाही काय? हिंदी लोकांचा स्वभाव ज्यांना माहीत आहे, त्यांचा सल्ला सरकारने घेतला आहे काय? सरकारला केव्हाही मदतीची गरज लागली तर कैक माणसे ती देतील अशी आम्हांला खात्री वाटते. सरकारने आपले धोरण मागे घेणे अवश्य असेल, तर कोणत्याही भलत्या विचाराने सरकार त्यापासून परावृत्त होणार नाही अशी आम्हांस आशा वाटते. या वसाहतीतील युरोपियनांना आशियावासियांची नवीन आवक थांबवावयाची आहे, हे खरे; पण साम्राज्यातील एक ‘ सरकार ’ म्हणून असलेली जबाबदारी पार पाडावयाचीही त्यांना इच्छा आहे. आणि या सर्वांपेक्षा आपल्या सर्व राष्ट्रांना समान अशा काही परंपरा आहेत. म्हणून, ज्या धोरणात दुर्बल, निष्पाप लोकांना न्याय किंवा सौजन्यही दाखविलेले नाही, ते धोरण आपल्या परंपरांमुळे अत्यंत तिरस्कारार्ह वाटेल आणि त्यात शेवटी आपल्याला हार खावी लागेल.

या उत्कृष्ट लेखात फक्त एकच चूक आहे. ती म्हणजे, आमचा लढा फक्त बोटांच्या ठशासाठी आहे, असे लेखकाने गृहीत धरले आहे. ही चूक फारशी महत्त्वाची नाही. सरकारने आपले पाऊल मागे घ्यावे आणि न्यायाने वागावे असा उपदेश “ लीडर ”सारखे पत्र करते, याचा अर्थ असा की जहाजाची दिशा बदलणार आहे. प्रश्न इतकाच आहे की, हिंदी लोकांनी या वेळी जितका जोर दाखवावयास हवा, तितका ते दाखवितील काय?

नापितांना इषारा

जोहान्सबर्गच्या नगर-पालिकेने नापितांसाठी निर्बंध बनविण्याचे ठरविले आहे. ते मंजूर होण्याचा संभव असल्यामुळे त्यांचा सारांश मी पुढे देत आहे.

(१) नापिताने आपले कर्तनालय पूर्ण स्वच्छ राखावे आणि त्यामध्ये हवा चांगली खेळावी.

(२) क्लिपर, कात्र्या, वस्तरे, कंगवे, ब्रश इत्यादी नेहमी स्वच्छ ठेवावे.

(३) दाढी करताना किंवा केस कापताना नापिताने गळ्यापर्यंत झगा घालावा. त्याने आपले हात स्वच्छ धुवावे.

(४) नापिताला किंवा त्याच्या मदतनिसाला त्वचेचा किंवा दुसरा एखादा सांसर्गिक रोग झाला असल्यास त्याने दाढी करू नये किंवा केस कापू नयेत.

(५) १ जानेवारीनंतर प्रत्येक नापिताच्या दुकानाची नोंदणी व्हावी. नगरपालिका ही नोंदणी विनामूल्य करील.

(६) सफाई-निरीक्षक किंवा डॉक्टर यांना कोणत्याही कर्तनालयात जाण्याचा अधिकार आहे.

या निर्बंधांची एक प्रत प्रत्येक दुकानात लावली पाहिजे. कौन्सिलने पुढील शिफारशी केल्या आहेत—

(१) प्रत्येक टेबलावर काच, संगमरवर, स्लेट किंवा पत्रा घातलेला असावा.

(२) प्रत्येक गिऱ्हाइकासाठी नवा टॉवेल वापरावा आणि मान ठेवावयाच्या जागेवर प्रत्येक वेळी नवा रुमाल किंवा कागद ठेवला जावा.

(३) हजामत करण्यासाठी दोन ब्रश ठेवावेत. ते निर्जंतुक पाण्यात ठेवावेत. आणि आळीपाळीने ते वापरावेत.

(४) साबणाचे पाणी, साबणाची पूड, किंवा साबणाची कांडी वापरावी.

(५) वस्तरा स्वच्छ कागदाने पुसावा. वापरानंतर वस्तरा व इतर हत्यारे निर्जंतुक पाण्यात ४।५ मिनिटे ठेवावी. २ चमचे सीलिव[१] किंवा कॅरोल[१] एक क्वार्ट पाण्यात अथवा तीन चमचे इजॉल[१] तितक्याच पाण्यात टाकून निर्जंतुक पाणी तयार करावे.

१. निर्जंतुक औषधांची ही व्यापारी नावे दिसतात.

(६) दाढी झाल्यावर तुरटीची कांडी न फिरवता पाण्याचा फवारा किंवा पाण्यात बुडवलेला स्वच्छ कापूस यांचा उपयोग करावा.

(७) स्पंजचा उपयोग मुळीच करू नये त्याऐवजी कापसाचा किंवा तशाच वस्तूचा उपयोग करावा.

(८) पावडर लावण्यासाठी चिंधी न वापरता कापूस वापरावा.

(९) ब्रशाचे केस पांढरे असावेत आणि तो ब्रश प्रत्येक दिवशी एकदा पाणी, साबण व सोडा यांमध्ये धुवावा.

(१०) केस बारीक कापले तर मानेवर पडतात. ते तोंडाने फुंकून उडवू नयेत, तर ते झाडावेत.

(११) जमिनीवर पडलेले केसांचे तुकडे झाकलेल्या भांड्यात गोळा करावेत. ते झाडून कोपऱ्यात टाकलू नयेत.

वरील निर्बंध व सूचना प्रत्येक नापिताने ध्यानी धराव्यात. त्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्याला दंड होईल. एवढेच नव्हे तर अशी स्वच्छता पाळणे हे प्रत्येक नापिताचे कर्तव्य आहे अशी जाणीव झाली पाहिजे. हिंदुस्थानात, नापितांच्या निष्काळजीपणामुळे किंवा स्वच्छतेच्या अभावामुळे लोकांना इसबासारखे रोग संसर्गाने होतात. वरील निर्बंध पाळणे नापित-वर्गाला फायदेशीर होईल. तसे झाले म्हणजे त्यांना खरे व उपयुक्त शिक्षण मिळाले, असे समजले जाईल. याला खर्च काहीच लागत नाही, प्रत्येकाने त्याकडे फक्त लक्ष द्यावयाचे आहे.

सरकारी खुलासा

नोव्हेंबरपर्यंत मुदत का वाढविली याचा खुलासा सरकारने केला आहे. त्या खुलाशानेच सरकारचा दोष सिद्ध होतो. सरकारला जर भीती नव्हती, तर नोव्हेंबर-पर्यंत मुदत वाढविण्याची गरज काय होती ? सरकारने असे कारण दिले आहे की, नोव्हेंबरमध्ये दुसरे काही काम नव्हते. म्हणून (मुदत-वाढ करून) आशियावासियांवर मेहेरबानी केलेली आहे. हे कारण निरर्थक आहे. कारण नोव्हेंबरमध्ये धरपकड होणार नाही, हे सरकारला माहीत होते. शिवाय, सरकारचे म्हणणे खरे असते तर, प्रत्येक घरी पोलीस का पाठविले गेले असते ? आता सरकार हिंदी लोकांच्या अर्जा-संबंधी काही बोलत नाही, हेही लक्षात घेतले पाहिजे. सरकारचा हा मूर्खपणाचा खुलासा "लीडर"च्या टीकेला उत्तर देण्यासाठी आहे. अर्ज करणाऱ्या प्रमुख माणसांची नावे "लीडर"ने मागितली होती. पण अशी नावेच नाहीत, मग ती सरकार कोठून देणार ? सरकारने आपल्या खुलाशाच्या शेवटी असे म्हटले आहे की, डिसेंबरनंतर या कायद्याची अंमलबजावणी होईल हे निश्चित. हा इशारा सरकार किती

वेळा देणार ? (दंतकथेतील) गुराख्याप्रमाणे, "लांडगा आला रे आला" या नेहमीच्या आरोळीप्रमाणे सरकारच्या या इशाऱ्याची भीती हिंदी समाजाला वाटेनाशी झाली आहे. लांडगा प्रत्यक्ष आला तरी कोणाचा त्यावर विश्वास बसेना, हे खरे आहे. पण सरकारचा लांडगा प्रत्यक्ष आला तरी कोणी भीती बाळगण्याचे कारण नाही. कारण, तुरुंगवास किंवा हद्दपारी यांच्या रूपातील लांडग्याला हिंदी समाजाने केव्हाच फाडून खाल्ले आहे. आता सरकारी लांडगा वाटेल तितक्या वेळा खुशाल येवो.

गोरे लोक नमते घेत आहेत

"रँड डेली मेल"मध्ये असे वृत्त आले आहे की, प्रिटोरिया येथे भरलेल्या प्रचंड सभेत श्री. गांधी व इतर हिंदी पुढारी यांनी असे निग्रहपूर्वक सांगितले की, हिंदी समाज बोटांचे ठसे देण्यास कधीही कबूल होणार नाही. यामुळे हिंदी लोकांचे धैर्य वाढेल. कारण आता सरकार व गोरे लोक हे दोघेही, हा जटिल प्रश्न कसा सोडवावा याच गंभीरपणे विचार करीत आहेत. आणि म्हणून आपल्याला काय पाहिजे आहे समजून घेण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. बोटांचे ठसे देण्याविरुद्ध आपण आपला तीव्र संताप व्यक्त केला आहे. आणि त्या ठशांच्या सक्तीमुळे आपल्या लढ्याला जोर चढला आहे; हे खरे, पण कोणाशीही बोलताना आपण हे आग्रहाने सांगितले पाहिजे की, बोटांचे ठसे देणे वा न देणे यासाठी हा लढा नाही, तर हिंदी समाजाचा मान व प्रतिष्ठा यासाठी हा लढा आहे. सरकारच्या मनात आपल्याला जमिनीवर लोळवावयाचे आहे. पण आपल्याला तसे होऊ द्यावयाचे नाही. आपल्याला गुलाम बनविणारा कायदा सरकारने मंजूर केला आहे. पण आपल्या जिवात जीव आहे तोपर्यंत आपण त्या कायद्याला मान्यता देणार नाही. या लढ्याचा अर्थ हा आहे.

पीटर्सबर्ग येथील पश्चात्ताप

श्री. गनी इस्माईल व श्री. हासिम महंमद काला हे पीटर्सबर्गहून लिहितात की, आम्ही जोहान्सबर्ग येथे नव्या नोंदणीपत्रासाठी अर्ज केले, याबद्दल आम्हांला पराकाष्ठेचे दुःख वाटत आहे आणि आम्हांला निस्सीम पश्चात्ताप होत आहे. कायदा अमलात आल्यावर आमची अवस्था काय होईल याचा विचार केला म्हणजे आमचे अंतःकरण फाटून जाते. हेच शब्द त्या हिंदी लोकांनी वापरले आहेत. शिवाय ते म्हणतात, आम्हांला फक्त पावती मिळाली आहे, पण गुलामगिरीचा पट्टा नाही. आमचा अर्ज परत घेण्याचा काही मार्ग असल्यास कळवा. त्यांची जर खरोखर तशी इच्छा असेल तर मी त्या दोघांनाही असे सांगतो की, मार्ग अगदी सोपा आहे. श्री. चेन टांग (नोंदणी केलेला चिनी) याने जसे आपले नोंदणी-पत्र फेकून दिले, तसेच, यांनी आपण केलेले अर्ज परत घ्यावेत. ही घातुक नोंदणी जर कोणाला नको असेल, तर (ती धिक्कारण्याचा) अगदी सोपा मार्ग आहे. नोंदणी-पत्र घेण्यासाठी त्यांना पुनः

प्रिटोरियास जावे लागेल आणि त्या नोंदणी-पत्रावर अंगठ्याचा ठसा द्यावा लागेल. वरील दोन्ही सद्गृहस्थांना या गोष्टी करण्याचे नाकारता येईल. मग ते स्वतंत्र राहतील. नोंदणी-पत्र घेण्यासाठी त्यांनी गेलेच पाहिजे असे नाही. ते जर न गेले, तर आपोआपच ते गुलामगिरीच्या पट्ट्याशिवाय राहतील. त्यांचा पश्चात्ताप खरा आहे— वरवरचा फेस नाही, अशी मला मोठी आशा वाटते. तो खरा असेल तर त्यापासून इतर हिंदी लोकांनाही धडा घेता येईल. श्री. शेखमहंमद इसाक[1] यांचे उदाहरण त्या दोघांनी लक्षात घ्यावे असे मी सांगतो.

भेकडाची दोस्ती अपायकारक असते

मला अशी बातमी मिळाली आहे की, श्री. इस्माईल हाजी आमद कोडथा यांनी जुलैमध्ये मेफेकिंगहून मेमन लोकांना तारा पाठविल्या. आणि खंबीर राहून अपमानास्पद कायद्याला शिर तुकवू नका, असा उपदेश केला व त्यांना धैर्य धरण्यास प्रोत्साहन दिले. याच सद्गृहस्थाने प्रिटोरिया येथे जाऊन गुलामगिरीचा पट्टा घेतला आणि आपले नाव या पत्रात "अमर" केले. असा बढाईखोर माणूस शौर्याच्या तारा पाठवू लागला, तर त्यापासून कोणाला स्फूर्ती मिळेल! आणि कशी मिळेल! खेड्यातील प्रत्येक हिंदी माणसाने हे उदाहरण लक्षात ठेवावे. श्री. अली खमीसा हे गुलाम बनण्यापूर्वी काय बोलत होते हे प्रत्येकाने सदैव ध्यानी धरावे. जेव्हा प्रिटोरिया-बाहेरचा कोणी माणूस आम्हांला धैर्य धरण्याबद्दल सांगेल, तेव्हा श्री. खमीसा म्हणत, "या लढ्यात जे लोक सामील नाहीत ते मातीमोल आहेत." दर्बानहून तारा पाठविणाऱ्या लोकांनी हे वाक्य पाठ करावे की, शूराची माती होऊ नये.[2]

इसाप मियाँ यांचा खडखडीत जबाब

जनरल स्मट्स यांच्या खुलाशाच्या बाबतीत श्री. इसाप मियाँ यांनी "लीडर" व "स्टार" यांना एक खरमरीत पत्र लिहिले आहे. त्याचे भाषांतर मी पुढील आठवड्यात देईन. त्यात त्यांनी असे सिद्ध केले आहे की, सरकारच्या असत्य विधानाला काही सीमा राहिलेली नाही.

योग्य संभावना!

जोहान्सबर्ग येथे गुलामगिरीच्या पट्ट्यासाठी ज्यांनी अर्ज केले, त्यांच्यापैकी एक कोकणी व एक मद्रासी यांना हा देश सोडून जाण्याच्या नोटिसा मिळाल्या.

१. पाहा : "जोहान्सबर्गचे बातमी-पत्र" लेख १९७.

२. मूळ गुजरातीमध्ये "माटी" असा शब्द आहे, त्याचा अर्थ माती व शूर असा दुहेरी होतो. त्यामुळे वरील दोन वाक्यांचा अर्थ असा होऊ शकतो, "लढ्यात सामील न होणारा माणूस स्वतःला शूर समजतो. वेळ आली म्हणजे त्याच्या शौर्याचे दिवाळे न निघावे."

दयाळजींना कैदेची शिक्षा व त्यावर अपील

दयाळजी व प्रागजी देसाई यांच्यावर गोविंदावर हल्ला केल्याबद्दल खटला चालू होता. त्याचा निकाल प्रिटोरिया येथील कोर्टाच्या मॅजिस्ट्रेटने आता दिला आहे. श्री. देसाई यांना चार महिने सक्तमजुरीची शिक्षा देण्यात आली आहे. त्यांनी त्यावर अपील केले आहे.

बेइमान

गेल्या शनिवारपर्यंत नोंदणी केलेल्या लोकांची नावे—प्रिटोरियाहून [३०], पीटर्सबर्गहून [१६], लुई ट्रिचर्डटहून [३], मिडेलबर्गहून [३], पॉचेफस्ट्रूमहून [४], स्टॅंडर्टनहून [५] व जोहान्सबर्गहून [१].

एक अनुकंपनीय घटना

मिरांडा नावाच्या एका पोर्तुगीज हिंदी माणसाजवळ परवाना नव्हता म्हणून ता. १० ऑक्टोबरपूर्वी ट्रान्सवाल सोडून जाण्याचा हुकूम त्याच्यावर बजावण्यात आला. नोटिशीची मुदत संपल्यावर त्याला कोर्टात गेल्या शनिवारी पुनः उभे करण्यात आले. आरोपीने सांगितले, ट्रान्सवाल सोडून जाण्यास माझ्याजवळ पैसे नाहीत आणि म्हणून मी गेलो नाही. मॅजिस्ट्रेटने त्याला दोषी ठरवून एक महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली आणि त्याला बजावले, तुरुंगातून बाहेर आल्यानंतर ७ दिवसांच्या आत ट्रान्सवाल सोडून गेले पाहिजे, नाही तर आणखी सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा होईल. खरोखर ही घटना अनुकंपनीय आहे. आता त्याने सरकारची आज्ञा झिडकारून तुरुंगात पुनः पुनः जावे, म्हणजेच सरकार शुद्धीवर येईल. या लढ्यात आपण अखेरपर्यंत खंबीर राहून सरकारचा पराभव केला नाही, तर ट्रान्सवालमधील हिंदी लोकांच्या कपाळी अशाच यातना कायमच्या येतील, हे सांगण्याची गरज नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ९-११-१९०७.

२६८. " ट्रान्सवॉल लीडर "ला पत्र

जोहान्सबर्गच्या " लीडर " या वृत्तपत्राने श्री. गांधींचे पुढील पत्र प्रसिद्ध केले आहे.[१]

ता. १ नोव्हेंबरच्या ' लीडर 'मधील लेखाचा सारांश पुढीलप्रमाणे आहे--

ऑक्टोबर महिना संपला तरी ८,००० (आठ हजार) पैकी फक्त सुमारे ४०० (चारशे) लोकांनी नोंदणी केली. ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या मताप्रमाणे, हे बहुतेक सारे ४०० (चारशे) लोक असे होते की, ज्यांना ट्रान्सवॉलमध्ये राहण्याचा हक्क नाही. ट्रान्सवॉलमध्ये ११०० (अकराशे) चिनी आहेत. त्यांच्यापैकी फक्त दोघांनीच नावे नोंदवली. आणि ते दोघेही मिश्र जातीचे आहेत. नोंदणीला इतक्या मोठ्या लोकसंख्येने विरोध केला, तरी सरकार पूर्ण खंबीर आहे. निरोधकांनी दमदाटी केल्यामुळे किंवा इतर कारणांमुळे नोंदणी करण्यात अडचणी आल्या असतील म्हणून मुदतवाढ करणे शहाणपणाचे व दयाळुपणाचे होते. बरोबर असो वा चूक असो, आता हा कायदा काय दे-बुकात आलेला आहे. म्हणून त्याला हिंदी लोक मान्यता देतील तर चांगले होईल असे आम्हांस वाटते. या प्रकरणात हस्तक्षेप करण्याचे पंतप्रधानाने पार्लमेंटमध्ये नाकारले आहे आणि या बाबतीतील जनरल स्मट्स यांचे धोरण प्रसिद्धच आहे. मग हिंदी समाजाने आपला प्रतिकार चालू ठेवल्यास त्याला काय लाभ होणार ?

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन ९-११-१९०७

२६९. जनरल स्मट्स यांना पत्र

सह्यांच्या अर्जासह विराट निवेदन वासाहतिक सचिवाकडे पाठविले आहे. त्याला जोडून ब्रिटिश इंडियन असोसिएशनचे अध्यक्ष श्री. इसाप मियाँ यांनी एक

१. मूळ इंग्रजी पत्रासाठी पाहा, " ट्रान्सवॉल लीडरला पत्र " लेख २५३. त्याच्याशी हे भाषांतर ताडून पाहिले आहे.

पत्र पाठविले आहे. त्याचा सारांश गेल्या अंकी "ताज्या बातम्या" या सदराखाली दिलेला होता. आता आम्ही ते संपूर्ण पत्र देत आहोतः—[1]

[गुजरातीवरून],
इंडियन ओपिनियन ९-११-१९०७

२७०. रामसुंदर पंडित याचा खटला

[जर्मिस्टन
ता. ११ नोव्हेंबर, १९०७]

श्री. गांधींनी सांगितले की, "रिमांड मागण्याच्या अर्जाला विरोध करण्याची माझी इच्छा नाही. पण श्री. पंडितापुरते मी कोर्टाला असे सांगू इच्छितो की, केवळ सत्यघटना कोर्टाच्या नजरेस आणण्याशिवाय कोणताही बचाव आम्हांस करावयाचा नाही. या वसाहतीत आपण बिगर-परवाना राहात होतो हे पंडित कबूल करतील. हा खटला लवकर संपावा अशी माझ्या अशिलाची इच्छा आहे. त्याला आतापर्यंत चार दिवस कच्च्या कैदेत काढावे लागले. जामीन देऊन त्याची सुटका करण्यास पाच पंचवीस हिंदी लोक पुढे आले. पण जामिनावर सुटण्यास पंडितांनी नकार दिला. म्हणून पोलिसांना मुदत दिल्यास पंडित यांना त्यांच्या अभिवचनावर सोडावे." कोर्टाने हे मान्य केले.[2]

इंडियन ओपिनियन, १६-११-१९०७.

१. मूळ इंग्रजी पत्रासाठी पाहा. "वासाहतिक सचिवाला पत्र" लेख २५२. गुजराती अनुवादाशी हे, ताडून—सुधारून घेतलेले आहे.

२. आशियावासी कायद्याप्रमाणे खटला भरलेला रामसुंदर पंडित हा पहिला हिंदी माणूस होय. त्याला ८ नोव्हेंबर रोजी, आपल्या तात्पुरत्या परवान्याची मुदत संपल्यावर "ट्रान्सवालमध्ये बेकायदा शिरल्याबद्दल व राहिल्याबद्दल" पकडण्यात आले. त्याच्या अटकेचा हिंदी लोकांवर चांगला परिणाम होईल, असे आशियावासी खात्याला सांगण्यात आले. हा खटला असिस्टंट रेसिडेंट मॅजिस्ट्रेटपुढे चालला. पब्लिक प्रॉसिक्यूटरने आशियावासियांच्या रजिस्ट्रारला बोलावण्यासाठी रिमांड मागितला. तेव्हा गांधीजींनी वरील मागणी केली. पाहा. "दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह" लेख १८, ट्रान्सवाल लीडर (१२-११-१९०७) म्हणतो. "रामसुंदर पंडित स्वतःला निर्दोषी समजतो. हा खटला लढविण्यास तो तयार आहे. आणि म्हणून जरूर तेव्हा मी कोर्टात दाखल होईन." असे गांधीजींनी सांगितले.

२७१. " ट्रान्सवॉल लीडर "ला मुलाखत[1]

[जर्मिस्टन,
ता. ११ नोव्हेंबर, १९०७]

श्री. गांधींनी मला सांगितले की, ही नोंदणी हिंदी लोकांच्या, विशेषतः मुसलमानांच्या, धर्माविरुद्ध आहे. कारण या कायद्याखाली येणाऱ्या प्रत्येक आशियावासियाचे व्यक्तिस्वातंत्र्य या नोंदणीने हिरावून घेतलेले आहे. त्याचा परिणाम असा झाला की, प्रत्येक माणूस केवळ ईश्वराचा दास असण्याऐवजी या कायद्याने नेमलेल्या कोणाही अधिकाऱ्याचा दास बनतो. आपल्याला खरोखर गुलाम बनविणाऱ्या कायद्याला, ईश्वरावर श्रद्धा ठेवणारा माणूस, कधीही मान्यता देणार नाही.

आता, धर्म पुढे येत आहे, याचे कारण नोंदणी-कायदा धर्माविरुद्ध असल्यामुळे त्याचा स्वीकार न करण्याची शपथ साऱ्या हिंदी लोकांनी घेतलेली आहे. आता जर एखाद्या हिंदी माणसाने भौतिक लाभासाठी या कायद्याला मान्यता दिली तर त्याने आपल्या अंतरात्म्याची हत्या केली असे होईल. यामुळे वरील पुरोहिताने, लोकांनी नोंदणी करून न घ्यावी याकडे सक्रिय लक्ष पुरविले व इहलोकीपेक्षा परलोकीच्या गोष्टीकडे पाहण्यास शिकविले. यामुळे, रामसुंदर पंडितांनी जर्मिस्टनमध्ये आशियावासी नोंदणी-कचेरी उघडली असताना प्रमुख निरोधकासारखे काम केले, असे म्हटले पाहिजे. कारण निरोधन हे केवळ अनुनयाचे कृत्य होय.

[ट्रान्सवॉल लीडर,] १२-११-१९०७

१. या खटल्याची पहिली सुनावणी संपल्यावर रामसुंदर पंडित यांची सुटका झाली. त्यानंतर ' ट्रान्सवॉल लीडर ' च्या वार्ताहराने गांधीजींची मुलाखत घेतली.

२७२. रामसुंदर पंडित यांचा खटला[1]

[जर्मिस्टन
ता. १४ नोव्हेंबर, १९०७]

श्री. गांधींच्या उलट-तपासणीत साक्षीदाराने[2] सांगितले, आरोपी २८ ऑगस्ट १९०६ पर्यंत राहील असे ठरले होते. त्यानंतर त्याच्या परवान्याची मुदतवाढ अनेक वेळा केली. कारण या वसाहतीत ज्या कामासाठी राहण्याची परवानगी त्याला देण्यात आली होती, तेच काम करण्यासाठी मी येथे राहणार आहे, असे आरोपीने मला खात्रीपूर्वक सांगितले होते, आणि त्यावर मी विश्वास ठेवला.

[गांधीजी]: आरोपी पुरोहित होता व आहे, याविषयी शंका घेण्यास तुमच्यापाशी काही कारण आहे काय ?

[साक्षीदार]: पुरोहिता–पुरोहितांमध्ये फरक असतो. ते धर्माचा उपदेश करतात. एखादा पुरोहित ख्रिस्ती, मुसलमान, हिंदु किंवा अन्यधर्मीय असला, तरी जोपर्यंत आपल्या धर्माचा तो प्रचार करीत आहे, तोपर्यंत मी त्याला इष्ट मानतो. पण जेव्हा तो इतर तत्त्वांचा उपदेश करू लागतो–राजद्रोहाचा असे मी म्हणत नाही–आणि लोकांना हिंसेची चिथावणी देतो, तेव्हा मी ज्याला या वसाहतीत येण्याची मुभा दिली, त्याहून तो निराळा माणूस होतो.

त्याने कोणता प्रचार केला ?

त्याने आपल्या धर्मतत्त्वापेक्षा निराळा प्रचार केल्याचा काही पुरावा तुमच्या-जवळ आहे काय ?

त्याने तसा प्रचार केला असा मला विश्वास वाटतो आणि म्हणूनच मी त्याचा परवाना नवा करून देण्याचे नाकारले.

धर्मोपदेशकाच्या कर्तव्याहून भिन्न कार्य त्याने केले असे तुम्हास वाटते काय ?

मी तसे म्हणालो नाही.

१. पाहा, "रामसुंदर पंडितांचा खटला" लेख २७०

२. मॉंटफर्ड चामनी, आशियावासीयांचा रजिस्ट्रार.

तुम्ही आताच असे म्हणाला की, धर्म-तत्त्वाहून निराळ्या गोष्टींचा प्रचार त्याने केला असे मानण्यास आपल्याला जागा आहे. तसे मानण्याला तुमच्याजवळ पुरेशी कारणे आहेत काय ?

गोरे लोक व गौरेतर लोक या दोघांकडून मजकडे तक्रारी आल्या होत्या.

या तक्रारींच्या बाबतींत तुम्ही त्याला कधी सूचना दिली होती काय ?

मुळीच नाही.

तुम्हांला तक्रारी केव्हा मिळाल्या ?

नक्की तारीखा आठवत नाहीत, पण आशियावासियांच्या नोंदणीबाबत त्या होत्या.

त्या तक्रारी तुम्ही दाखल करू शकाल काय ?

मुळीच नाही.

म्हणजे, श्री. चामनी, तक्रारी दाखल करण्याला तुम्ही स्पष्ट नकारच देत आहा काय ?

ज्यांनी तक्रारी केल्या त्या माणसांची नावे तुम्हाला सांगण्यास माझा स्पष्ट नकार आहे.

श्री. गांधींनी विनंती केल्याप्रमाणे, साक्षीदाराने गेल्या सप्टेंबरच्या २८ तारखेचा एक अर्ज दाखल केला. जर्मिस्टन येथील हिंदी लोकांचा तो अर्ज होता. त्यांत साक्षीदाराला अशी विनंती करण्यात आली होती की, आरोपीच्या परवान्याची मुदत संपत आलेली आहे, म्हणून ती वाढविण्यात यावी. आरोपी हा केवळ देवळाचे काम व आपली धार्मिक कर्तव्ये करीत असतो.

या अर्जामुळे परवान्याची मुदत वाढवावी असे तुम्हांला वाटले नाही काय ?

नाही. कारण माझ्याजवळ निराळे रिपोर्ट आलेले होते.

जर्मिस्टन येथील हिंदु मंदिर आरोपीने विकत घेतले हे तुम्हांस मान्य आहे काय ?

त्याची मला मुळीच माहिती नाही. थोड्या आठवड्यांसाठी परवाना घेऊन तो येथे आला आणि त्याच्या परवान्याची मुदत आम्ही एक वर्षभर वाढविली. त्याने काय केले हे आम्हास माहीत नाही.

हा नवा कायदा नसता तर तुम्ही ती मुदत अनंत कालपर्यंत वाढविली असती ना ?

बहुधा होय.

"राजद्रोह" असे तुम्ही म्हणता, तेव्हा तुम्ही त्याचा काय अर्थ करता ?

राजद्रोहाचा उल्लेख केला नाही, एवढेच मी म्हटले.

मग, आरोपी आपल्या धार्मिक कर्तव्यापासून चळला, असे जे तुम्ही म्हणालात त्याचा अर्थ काय ? नोंदणीकायद्याला मान्यता देऊ नका, असा त्याने लोकांना उपदेश केला, असे तुम्हांस म्हणावयाचे आहे काय ?

अशा संकेतार्थी प्रश्नांची उत्तरे मी देऊ शकत नाही.

आशियावासी कायद्याला मान्यता देण्याविरुद्ध त्याने प्रचार केला हे तुम्हांला माहीत आहे. हा त्याचा एक भाग होता काय ?

होय, असे माझे त्याला उत्तर आहे, पण ते सशर्त आहे.

मुल्लांच्या परवान्यांची मुदत वाढविण्यात आली आहे काय ?

होय, शिवाय ख्रिस्ती वगैरे धर्मोपदेशकांचीही.

म्हणजे आशियावासियांची ?

अहो गांधीजी, मी ज्या वेळी ख्रिश्चनास असे म्हणतो त्या वेळी त्या शब्दाचा माझा अर्थ असीरिअन्स असा असतो, असे तुम्ही (गांधी) समजले पाहिजे.

श्री. गांधींनी काय समजले पाहिजे, हा प्रश्न नसून कोर्टाने काय समजले पाहिजे, हा प्रश्न आहे, असे मॅजिस्ट्रेट म्हणाले.

श्री. चामनी यांचे मार्ग

साक्षीदाराने असा खुलासा केला की, जेव्हा एखादा धर्मोपदेशक आपल्या धर्माचा प्रचार करण्यासाठी ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश करण्याकरिता परवाना मिळावा म्हणून अर्ज करतो, तेव्हा मी त्याला विरोध करीत नाही. पण असेरियन व मुसलमान हे इतक्या मोठ्या संख्येने इकडे आले की, त्यांना परवाने देण्यावर नियंत्रण घालावे अशी मला विनंती करण्यात आली. अशा धर्मोपदेशकांना तात्पुरते परवाने देण्याला सरकारचा काहीच विरोध नाही. मात्र ते परवाने ज्या अटींवर दिले जातात, त्या पाळल्या गेल्या पाहिजेत.

जर्मिस्टनच्या हिंदी लोकांकडून त्यांच्याविषयी तुमच्याकडे तक्रारी आल्या आहेत काय ?

" जर्मिस्टनचे हिंदी लोक " म्हणजे जर्मिस्टन येथे राहणारे हिंदी लोक असे आपल्याला म्हणावयाचे आहे असे मी समजतो.

बरोबर.

मग माझेकडे तक्रारी आलेल्या आहेत.

तक्रारींची चौकशी तुम्ही केली काय ?

अर्थात्.

या तक्रारींना उत्तर म्हणून आरोपींचे उत्तर काय आहे, हे आपण कधी ऐकून घेतले आहे काय ?

मुळीच नाही.

म्हणजे, तुम्ही त्यांचे म्हणणे ऐकून न घेताच त्याला दोषी ठरविलेत ?

मला त्यांचे पत्र आले आहे, हे विसरू नका !

मग ते दाखल करा.

मी ते केव्हाच दाखल केले आहे.

पण ते पत्र कोणत्याही तक्रारीला उत्तर म्हणून नाही, होय ना ?

मी तसे कधी म्हटले ?

म्हणजे, मी म्हटल्याप्रमाणे, तुम्ही त्यांना त्यांची बाजू न ऐकता दोषी ठरविले, असेच ना ?

मी त्यांना काही अटीवर ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश करण्यास परवानगी दिली, पण त्या अटी त्यांनी पाळल्या नाहीत.

हे तुम्ही त्यांना कधी कळविले काय ?

आता कळवीत आहे.

त्याला फाशी दिल्यावर ?

छेः, त्याला फाशी दिल्यावर नव्हे. मला हे विधान पसंत नाही.

नंतर साक्षीदाराने गेल्या ९ ऑक्टोबरचे एक पत्र वाचून दाखविले. ते त्यांनी आरोपीला लिहिलेले होते. त्यांत अशी सूचना होती की, तुम्ही या वसाहतीतून ताबडतोब निघून जावे.

श्री. गांधी — याने माझ्या प्रश्नाचे उत्तर मुळीच मिळत नाही.

माझे उत्तर हेच आहे.

येथे फिर्यादीची बाजू पूर्ण झाली.

बचाव

...सरकारी वकील :— आरोपीचा निरोधकाशी काहीही संबंध नव्हता काय ?

श्री. गांधी :—तो प्रमुख निरोधक होता, हे मला मान्य आहे.

...श्री. गांधींनी नंतर कोर्टाला उद्देशून भाषण केले. ते म्हणाले, "आज कायदा जसा आहे, त्याप्रमाणे शिक्षा अवश्य होणार, हे मला मान्य आहे. पण हा खटला असा आहे की, त्यामध्ये कोर्टाने आपले मत व्यक्त करणे जरूर आहे. "रेक्स विरुद्ध भामा" हा खटला पाहावा. त्यात वरिष्ठ न्यायमंदिराने, शांतता-संरक्षक वटहुकुमाच्या अंमलबजावणीच्या पद्धतीवर कडक टीका केली आहे. माझ्या अशीलावर खटला झाला आहे तो, त्याच्याजवळ परवाना नाही, म्हणून नव्हे, तर आशियावासी कायद्यासंबंधी त्याची ठाम मते आहेत आणि ती तो आपल्या देशबांधवांपुढे बिनदिक्कतपणे मांडतो, यामुळे हा खटला भरण्यात आला आहे, हे अगदी उघड आहे. तसे करणे हा जर गुन्हा असेल, तर आरोपीबरोबर बहुसंख्य हिंदी लोक दोषी ठरतील. रामसुंदर पंडिताला असे वाटले की, एक धर्मोपदेशक म्हणून या कायद्याचे

सत्यस्वरूप आपल्या देशबांधवांना सांगणे हे आपले एक कर्तव्य आहे. हे त्याचे वाटणे बरोबर असेल वा चूक असेल. बोटांचे ठसे देणे व पत्नीचे नाव देणे याच्यापलिकडे धार्मिक आक्षेप आहे. या कायद्याला मान्यता दिली तर आपल्या पौरुषाची हानी होईल, असे प्रत्येक स्वाभिमानी हिंदी माणसाचे मत आहे. तसेच मत पंडिताचे असल्यामुळे त्यांनी तसा प्रचार केला. त्यांनी जे कार्य केले ते लक्षात घेता ते प्रशंसेस पात्र आहेत—निंदेस नव्हे, असे मला वाटते. ज्या तक्रारी कधी उजेडात आल्या नाहीत आणि ज्यांची दाद आरोपीला खटल्याच्या दिवसापर्यंतही दिली नाही, त्या तक्रारीत काही तथ्य नाही, या आरोपीच्या म्हणण्यावर कोर्टाने विश्वास ठेवावा. रजिस्ट्रारच्या हुकुमाचा भंग केल्यास काय परिणाम होतील याची आरोपीला कल्पना होती. परंतु, त्यानेच म्हटल्याप्रमाणे, उच्चतर कर्तव्याची हाक त्याला ऐकू आली, तिला ‘ओ’ दिल्यामुळे तो आज कोर्टापुढे तुरुंगवासाची किंवा त्याहून अधिक खडतर शिक्षा भोगण्यास उभा आहे.[1]

इंडियन ओपिनियन, २३-११-१९०७

२७३. सार्वजनिक सभेतील ठराव[2]

[जर्मिस्टन
ता. १४ नोव्हेंबर, १९०७]

रामसुंदर पंडित, एकमेव हिंदु पुरोहित, यांना आशियावासी नोंदणी-कायद्याप्रमाणे शिक्षा झाली. जर्मिस्टन येथे हिंदी लोकांची स्वयंस्फूर्त सभा. निष्पाप हिंदी लोक जुलमाने विव्हळत आहेत. त्यांना संरक्षण देण्यासाठी बादशहांकडे दाद मागावी असा ठराव झाला. पंडितांनी तत्त्वच्युतीपेक्षा तुरुंगवास पत्करला. त्यांच्या अनुकरणास सहस्रावधी लोक सिद्ध.

इंडियन ओपिनियन, २३-११-१९०७

१. रामसुंदर पंडितांना एक महिना कैदेची शिक्षा झाली.

२. रामसुंदर पंडितांचा खटला संपल्यावर गांधीजींनी एका सार्वजनिक सभेत भाषण केले. ठराव बहुधा गांधीजींनी लिहिलेला असावा. तो तारेच्या स्वरूपात होता व द. आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीकडे पाठवावयाचा होता. पंडितांच्या कुटुंबाला अभिनंदनाची तार पाठवावी व दुसऱ्या दिवशी दुकाने व सर्व व्यवहार बंद ठेवावे असाही ठराव झाला.

२७४. ना. गो. कृ. गोखले यांना पत्र

जोहान्सबर्ग
ता. १४ नोव्हेंबर, १९०७

प्रिय प्रोफेसर गोखले,

राष्ट्रीय काँग्रेसच्या आगामी अधिवेशनात ट्रान्सवालमधील हिंदी लोकांची बाजू मांडण्यासाठी इतर चार लोकांबरोबर, श्री. अमीरऊद्दीन महंमद हुसेन फजन्दार,[1] यांची नेमणूक झालेली आहे. त्यांचा परिचय करून देण्यासाठी मी हे पत्र लिहीत आहे. श्री. फजन्दार हे ट्रान्सवालमधील एक सुप्रसिद्ध व मोठ्या प्रतिष्ठेचे व्यापारी आहेत. काँग्रेसपुढे आमची बाजू मांडण्यासाठी आपण त्यांना सर्व सोयी करून द्याल आणि आपल्या उपदेशाचा व मार्गदर्शनाचा लाभ द्याल असा मला विश्वास वाटतो.

आपला
मो. क. गांधी

गांधीजींची सही असलेल्या
टंकलिखिताच्या छायाचित्रावरून
जी. एन्. ४१०८

२७५. निरोधकांवरील खटला

[प्रिटोरिया
ता. १५ नोव्हेंबर, १९०७]

गौरीशंकर व्यास, शरफुद्दीन, गोविंद प्राग व फ्रॅन्क लछीमन यांच्यावर या महिन्याच्या १५ तारखेस असा आरोप ठेवण्यात आला की, त्यांनी मारहाण केली

१. फजिन्दार असे मुळात आहे.

किंवा तसा गुन्हा करण्यास प्रोत्साहन दिले. तारीख १३ नोव्हेंबर १९०७ रोजी (किंवा त्या सुमारास), प्रिटोरिया येथे (किंवा त्याच्या जवळपास) त्या विभागात प्रत्येकाने आणि सर्वांनी मिळून किंवा त्यापैकी, कोणी ना कोणी, अन्यायाने व बेकायदेशीरपणे लछमन नावाच्या माणसावर हल्ला केला. तो तेथे राहणारा एक हिंदी माणूस आहे. नंतर हे सारेजण त्याच्या भोवती गोळा झाले आणि स्वतःच्या (किंवा दुसऱ्याच्या) इच्छेनुसार, त्याला हिंदी लोकांच्या नोंदणी-कचेरीकडे जाण्यास प्रतिबंध केला. त्याच वेळी व त्याच ठिकाणी, वरील आरोपींनी, व्यक्तिशः किंवा समूहशः, अन्यायाने व बेकायदेशीरपणे, लछमनला अशी धमकी दिली की, तूं जर नोंदणी केलीस तर तुला मारहाण होईल, आणि तुझ्या तोंडाला काळोखी फासली जाईल. १९०७ चा कायदा क्रमांक २[1] याच्या १, २, व ८ कलमाप्रमाणे नोंदणीसाठी अर्ज करण्यापासून आरोपींनी लछमनला परावृत्त केले. आरोपींनी आपण निर्दोषी असल्याचे सांगितले. त्यांचा बचाव श्री. गांधींनी केला. श्री. ग्रॅहॅम यानी सरकारची बाजू मांडली. कोर्टात हिंदी लोकांची गर्दी होती आणि पुष्कळांना प्रवेश मिळाला नाही.

फिर्यादीने सांगितले की, नोंदणी-कचेरीच्या बाहेर आरोपी मला म्हणाले, आमचे लोक परवाने घेत नाहीत. तूही आपल्यापेक्षा शहाणे असणाऱ्या लोकांचा सल्ला घे. आरोपींनी मला कधी मारहाण केली नाही.

श्री. ग्रॅहॅम म्हणाले, साक्षीदार (लछमन) हा विरोधी साक्षीदार मानावा. त्याला श्री. गांधींनी हरकत घेतली. ती हरकत नोंदण्यात आली. साक्षीदाराने सांगितले, मला चार्जऑफिसमध्ये नेण्यात आले. तेथे श्री. कोडी यांनी मला विचारले, आरोपींनी तुला मारहाण केली काय? मी म्हणालो, 'नाही,' श्री. कोडी म्हणाले, "मी आरोपीला पकडले आहे." "कशासाठी"? असे साक्षीदाराने विचारले. तेव्हा, "तुझ्या इच्छेप्रमाणे." असे उत्तर मिळाले. 'माझी अशी इच्छा नाही' असे साक्षीदाराने सांगितले. तो म्हणाला, "हे लोक माझ्या राष्ट्रातील आहेत. त्यांना पकडता कामा नये. मी पासासाठी आलो. तो मला मिळाला म्हणजे मी जाईन, त्यांनी मला मारहाण केली नाही."

श्री. गांधी— तो प्रिटोरियाला पास घेण्यासाठी आला. कारण एका गोऱ्या माणसाने त्याला सांगितले होते, तूं पास घेतला नाहीस तर तुझी हकालपट्टी होईल, त्याचे कागदपत्र घेऊन ते त्या गोऱ्या माणसाने श्री. कोडी यांच्याकडे पाठविले. तो विट्बँक येथील धोबी आहे. त्याच्या मनात सरकारविषयीं भीती असल्यामुळे तो येथे आला. स्टेशनावर त्याला भेटलेल्या दोन गोऱ्या माणसांनी त्याला नोंदणी-कचेरीकडे नेले

१. १९०७ चा "कायदा क्रमांक २०" असे मुळात आहे.

श्री. गांधींच्या उलट तपासणींत, साक्षीदार[1] म्हणाला, "लछमन याला स्टेशनावर भेटून त्याला नोंदणी-कचेरीत सुरक्षितपणे आणावे व त्याच्यावर (लछमनवर) हल्ला झाल्यास त्याची वर्दी द्यावी, असा हुकूम सुपरिंटेंडंट वेट्स यांनी मला दिला." साक्षीदाराला हिंदुस्थानी चांगले येते. कोठे मारहाण झाल्याचे त्याला दिसले नाही.

श्री. ग्रॅहॅम यांनी आपली बाजू पुरी केली. तेव्हा श्री. गांधींनी आरोपींना बंधमुक्त करण्याची मागणी तत्काळ केली. श्री. ग्रॅहॅम म्हणाले होते की, मारहाणीच्या आरोपाला मी पाठिंबा देऊ शकत नाही पण चिथावणी दिल्याचा आरोप कायम आहे. श्री. गांधी म्हणाले, मी उत्तर द्यावे असा प्रश्नच नाही.

श्री. मेलर[2]–(सस्मित), श्री. ग्रॅहॅम आपण या आरोपाला पाठिंबा द्याल काय?

श्री. ग्रॅहॅम--खरोखर कोर्टाने हा आरोप मान्य करावा असा आग्रह मी धरीत नाही. या खटल्यात काही तथ्यांश आहे असे मला वाटत नाही.

श्री. मेलर--तुम्हांला डिस्चार्ज करून सोडून देण्यात येत आहे असे आरोपींना सांगा.[3]

इंडियन ओपिनियन, २३-११-१९०७

१. आल्फ्रेड अंडरसन, केंद्रीय कारागृहाचा वॉर्डर. याने आपल्या साक्षीत सांगितले की, तुरुंगाच्या गव्हर्नराच्या हुकुमावरून मी रेल्वे स्टेशनवर गेलो होतो. तेथे मी फिर्यादीला भेटलो. फिर्यादी मला म्हणाला, मी नोंदणी करण्यासाठी आलो आहे परंतु आरोपींनी मला मारण्याची धमकी दिली आहे.

२. असिस्टंट रेसिडेंट मॅजिस्ट्रेट.

३. नंतर या निरोधकांना पुष्पहार घालण्यात आले, आणि त्यांमांच्या घरी मिरवणुकीने नेण्यात आले तेथे ए. एम्. कचालिया, प्रमुख निरोधक एम्. एल. देसाई, गांधीजी आणि इतर लोक यांना निरोधकांच्या धडाडीच्या गुणवर्णनपर भाषणे केली

२७६. इंडियन ओपिनियनला पत्र[1]

जोहान्सबर्ग,
दि. १५ नोव्हेंबर, १९०७

संपादक,

इंडियन ओपिनियन, यांस

महाशय,

गुरुवारी चाललेल्या रामसुंदर पंडिताच्या खटल्यात[2] ज्या अत्यंत दुःखदायक गोष्टी उघडकीस आल्या, त्या जनतेच्या नजरेस आणण्याची परवानगी आपण मला द्यावी.

आशियावासियांच्या रजिस्ट्रारने हे मान्य केले की, धर्मोपदेशकांना तात्पुरते परवाने देण्याचा आमच्या कचेरीचा नियमच आहे. मात्र अशा प्रसंगी एक गोष्ट गृहीत धरली जाते ती ही की, त्या धर्मोपदेशकांनी आपल्या धर्मोपदेशकाच्या व्यवसायाचेच कार्य करीत राहावे. रजिस्ट्रारने म्हटल्याप्रमाणे, तसे ते जोपर्यंत करतील तोपर्यंत त्या परवान्याची मुदत "अनंत कालपर्यंत" वाढविली जाईल. नंतर रजिस्ट्रारने सांगितले की, या हिंदु पुरोहिताने आपल्या धर्मोपदेशाच्या कार्याव्यतिरिक्त नवे काम केले, म्हणून परवान्याची मुदतवाढ करण्यास माझ्या मते तो अपात्र ठरला. "नवे काम" यामध्ये पुरोहिताने आशियावासियांच्या कायद्याविरुद्ध पुरोहिताने केलेला प्रचार येतो, हे मला मोठ्या कष्टाने कळले. त्याच्या इतर गैरवर्तणुकीचा उल्लेख कुटिलपणे सूचित केला गेला. पण रजिस्ट्रारने तक्रारींचे स्वरूप किंवा त्या करणाऱ्यांची नावे सांगण्यास साफ नकार दिला. आपल्या अज्ञात निंदकांना तोंड देण्याची किंवा तक्रारींना उत्तर देण्याची संधी पुरोहिताला कधीही देण्यात आली नाही हे त्यांनी मान्य केले. याचा अर्थ, त्यांची बाजू न ऐकताच, त्यांनाच दोषी धरण्यात आले. युद्धकाळाशिवाय इतर कोणत्याही वेळी असे अरेरावीचे, अन्यायाचे व जुलमाचे कृत्य पूर्वी घडल्याचे मला माहीत नाही. ज्या माणसाने साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभे राहून असे कबूल केले की, मला कायद्याचे काडीमात्र ज्ञान नाही आणि पुराव्याचे महत्त्व ओळखण्यास मी पूर्ण

१. याचे गुजराती भाषांतर ता. २३-११-१९०७ च्या 'इंडियन ओपिनियन'मध्ये आलेले आहे.

२. पाहा : लेख २७२.

असमर्थ आहे, तसेच व्यक्तिस्वातंत्र्यावर आघात करणाऱ्या विशिष्ट कायद्याला शौर्याने केलेला प्रतिकार आणि राजद्रोह यांमधील अंतर मला ओळखता येत नाही, अशा माणसाला, स्वतंत्र व निरपराधी ब्रिटिश प्रजाजनावर गाजविण्यासाठी वेसुमार सत्ता या कायद्याने दिलेली आहे. या देशात धर्मोपदेशकांनी कोणत्या अटीवर राहावे हे तो ठरवितो, आणि त्याची मर्जी खप्पा झाली तर, तो तत्काळ देवळे बंद करू शकतो आणि लोकांना मिळणारे धार्मिक समाधान हिरावून घेऊ शकतो.

आणि तरीही, आशियावासियांना असा प्रश्न वारंवार विचारला जातो की, या वसाहतीत राहणाऱ्या लोकांची खूण पटावी याच हेतूने केलेल्या अत्यंत साध्या कायद्याला तुम्ही विरोध का करता?

श्री. लिअंग क्विन यांनी एका शोचनीय घटनेकडे जनतेचे लक्ष वेधले आहे. गुरुवारीं जर्मिस्टन येथे जी घटना घडली ती इतकी मोठी होती की, आरोपीशी सहानुभूती दाखविल्याशिवाय मला राहावत नाही असे विधान मॅजिस्ट्रेटने केले; परंतु न्यायासन असमर्थ होते. आणि म्हणून पूर्वग्रह, अज्ञान, अयोग्यता, आणि अधिकाराचा उन्मत्तपणा – या ब्रिटिशांना न शोभणाऱ्या दुर्गुणांच्या वेदीवर एका निष्पाप व्यक्तीचे बलिदान झाले.

मो. क. गांधी

इंडियन ओपिनियन, २३-११-१९०७

२७७. कॅक्स्टन् हॉलमधील सभा

श्री. अमीर अली आणि इंग्लंडातील मुसलमान रहिवासी यांनी आमच्या कार्याचा पुढाकार घेतल्याबद्दल ते ट्रान्सवॉलमधील हिंदी समाजाच्या कृतज्ञतेस पात्र आहेत. हिंदुस्थानातील मुसलमानांना एक सर्वसाधारण पत्र[1] पाठविण्याचा हमिदिया इस्लामिया अंजुमनचा विचार प्रशंसनीय होता. आलेल्या तारावरून असे दिसते की, सभेतील कार्यक्रम उत्साहाने पार पडले आणि सभेस पुष्कळ प्रमुख युरोपियन हजर होते. ही सभा ता. ९ नोव्हेंबर रोजी, बादशहांच्या जन्मदिवशी, भरविली जावी हा एक

१. पाहा : "हिंदी-मुसल्मानांना विनंती" लेख १३७.

विचित्र योगायोग आहे. जेव्हा आपण ट्रान्सवॉलमधील पददलित हिंदी लोकांच्या वतीने न्याय व माणुसकी यांची मागणी करीत आहोत, तेव्हाच एका धर्मोपदेशकावर सरकारने क्रूर आघात केला आहे. हे जर श्री. अमीरअली व त्यांचे श्रोते यांना कळले असते, तर त्यांना काय वाटले असते ? आशियावासी कायद्याच्या धिक्काराची जी भाषणे झाली त्यांत मधून मधून श्रोत्यांनी " शेम, शेम " आणि " लांच्छनास्पद " अशा आरोळ्या ठोकल्या असे रूटरच्या तारांवरून आपल्याला कळते. या महत्त्वाच्या सभेचा काही विचार न करता तिची बोळवण करण्याचा एक मार्ग म्हणजे, स्थानिक परिस्थितीची काहीच कल्पना नसलेल्या अडाणी लोकांचे हे मत आहे, असे समजून त्याला तुच्छ लेखणे. दुसरा मार्ग म्हणजे, सभेतील लोकमत हे हजारो हजार हिंदी लोकांच्या मनात धुमसणाऱ्या प्रचंड असंतोषाचे प्रतीक आहे असे मानणे. हा दुसरा अर्थ घेतला तर सभेने मंजूर केलेल्या ठरावाकडे ट्रान्सवॉल सरकारने कळकळीने व सहानुभूतीने लक्ष दिले पाहिजे. आणि तरीही आम्हाला असे वाटते की, साम्राज्य सरकारने परिणामकारक उपाय योजल्याशिवाय, ट्रान्सवॉलमधील अधिकारी हिंदी लोकांच्या म्हणण्याकडे काडीमात्र लक्ष देणार नाहीत– मग ते हिंदी लोक कितीही वजनदार व सुजाण असोत. ते कसेही असो, या सभेने एक गोष्ट निश्चित केली आहे आणि ती ही की, जगाच्या कानाकोपऱ्यातील मुसलमानांना केवळ आपल्या धर्मबंधूनाच सहानुभूती दाखवावी व त्याच्यासाठीच काम करावे असे वाटत नाही तर, हिंदूंसाठीही आपण आपल्या कर्तव्याचे क्षेत्र वाढविले पाहिजे असेही त्यांना वाटते. हे एक सुचिन्ह आहे. त्यावरून असे दिसते की, राष्ट्र किंवा धर्म यांचा भेद लक्षात न घेता मानव हा मानवासाठी काम करीत आहे, असा काळ त्वरेने समीप येत आहे.

इंडियन ओपिनियन, १६–११–१९०७

२७८. लजपतरायांची मुक्तता, ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना धडा

लाला लजपतराय व त्यांचे सहकारी अजितसिंह यांची सुटका झाली. त्यांना हद्दपारी भोगावी लागली हे खरे आहे, पण [पंजाबमधील जमिनीचा] कायदा रद्द करून घेण्याच्या बाबतीत ते यशस्वी झाले. हे यश म्हणजे सविनय प्रतिकाराच्या प्रभावीपणाचा भक्कम पुरावा होय. या ताज्या उदाहरणानंतर ट्रान्सवॉलमधील कोणा हिंदी माणसाला साशंक होण्यास काही कारण आहे काय ? नाही असे आम्ही मानतो.

उलट ज्यांनी अर्ज केले आहेत, त्यांनाही लजपतरायांच्या यशाचे मर्म कळू शकले तर, अजून संधी गेली नसल्यास ते आपले अर्ज परत घेतील, म्हणजे नोंदणीपत्र घेण्यासाठी जाणार नाहीत. कारण, आशियावासी कायदा वाईट आहे, हे प्रत्येकजण कबूल करतो. ज्यांनी नोंदणी केली आहे ते केवळ आंधळ्या स्वार्थाने व तुरुंगाच्या भीतीने गुलाम-गिरीच्या पिंजऱ्यात अडकवले आहेत. लजपतरायांच्या यशामुळे हे सिद्ध होते की, ज्यांच्या चित्तात भीती आहे, ते भित्रे होत आणि पराभूत झाल्यासारखे असतात; पण जे लढतात ते वीर होत, आणि विजयी झाल्यासारखे असतात. जे लढतात तेच बहुधा जिंकतात, हाच निष्कर्ष सध्या दिसणाऱ्या चिन्हांवरून प्रतीत होतो. मात्र त्याला एकच अट आहे. ती म्हणजे, लढा अखेरपर्यंत चालविला पाहिजे. मग त्यासाठी तुरुंगवास किंवा हद्दपारी यांची किंमत द्यावी लागली तरी चालेल. हाच धडा लजपतरायांच्या उदाहरणावरून घेण्यासारखा आहे. म्हणून, हिंदुस्थानच्या लालाजींच्या हद्दपारीपासून ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनी जर हा धडा घेतला आणि त्याप्रमाणे वागण्याचे धैर्य दाखविले, तर त्यांना यश खचित मिळेल, असे सांगण्यात आम्हांला काडीमात्र संकोच वाटत नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १६–११–१९०७

२७९. बादशहांचा वाढदिवस

बादशहा एडवर्ड यांना वाढदिवसानिमित्त अभिनंदनाच्या तारा पाठविल्या गेल्या हे योग्य झाले असे आम्हांस वाटते. आपण प्राचीन राष्ट्र आहोत. सौजन्य आपल्या रक्तातच आहे. तारा पाठविल्या नसत्या तर आपण सौजन्यात उणे ठरलो असतो. मुद्दाम खुशामत करण्यासाठी किंवा [नव्या] कायद्याच्या बाबतीत काही लाभ मिळविण्याच्या आशेने आपण हे अभिनंदन केलेले नाही. ते आपण केले याचे कारण, तसे करणे हे आपले कर्तव्य आहे, असे आपल्याला वाटले.

तरीही अशी तार का पाठवावी ? वाढदिवसाच्या प्रसंगी आपल्याला तीन देणग्या मिळाल्या. रामसुंदर पंडित यांना अकारण अटक झाली. हा धर्मावर आघात होता. ते हिंदु असले तरी सर्वच समाजाला धक्का बसला. हाजच्या यात्रेकरूंना परवाने नाकारण्यात आले. जोहान्सबर्ग वगैरे ठिकाणी परवाने नाकारण्यात आले. याचा अर्थ

असा की, इतर लोक मौज मारीत असताना हिंदी समाजाने शोक करावा. तरीही आपण अभिनंदनाच्या तारा पाठवाव्या काय ?

हा प्रश्न नाताळ इंडियन कॉंग्रेसच्या तीन माजी अध्यक्षांपुढे उभा राहिला–आणि तो योग्यच होता. त्यांचे मत असे की, आपल्याला जर तार पाठवावयाचीच होती, तर आपण आपल्या गाऱ्हाण्यांचाही उल्लेख करावयास हवा होता. त्यांचा आक्षेप सहजासहजी दूर सारता येणार नाही. आपल्या भावना किती दुखावलेल्या आहेत हे यावरून दिसून येते. तरीही, हे क्रोधाचे लक्षण आहे. आपण हाल भोगीत आहोत हा काही बादशहाचा दोष नव्हे. त्यावरील तोडगा आपल्याच हाती आहे. आपल्याला चिमटा बसत आहे, तेव्हा त्यावर उपाय सापडेल. तो उपाय ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या हातात आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १६–११–१९०७

२८०. लंडनमधील मुसलमानांची सभा

वृत्तपत्रांच्या बातम्यावरून, ता. ९ नोव्हेंबर रोजी लंडनमध्ये ही सभा भरली. ती काही सामान्य घटना नव्हे. न्यायमूर्ती अमीर अली अध्यक्षस्थानी होते. पुष्कळ गोरे हजर होते. नव्या कायद्याने दुसरा काही लाभ झाला नाही, तरी हिंदु व मुसलमान एकमेकांच्याजवळ खचित येत आहेत, अशी चिन्हे दिसत आहेत. त्या सभेत असे निक्षून सांगण्यात आले की, हिंदूंच्या हक्कासाठीही मुसलमान आग्रह धरतील. सभेस आलेले सारे मुसलमान हिंदी नव्हते. हिंदुस्थानातील मुसलमानांनी हिंदूंच्या हक्कांची मागणी केली, तर ते त्यांचे कर्तव्यच ठरते. कारण, ते दोघेही हिंदुस्थानचेच पुत्र होत. पण इतर देशांतील जे मुसलमान इंग्लंडमधील सभेस हजर होते, त्यांनीही हिंदूंच्या हक्कांसाठी मागणी करावी, ही आनंदाची गोष्ट होय.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १६–११–१९०७

२८१. हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेसला देणग्या

दर वर्षी आपण कॉंग्रेससाठी देणग्या गोळा करतो, हे काम यंदाही करावयाचे आहे. आता आपली बाजू मांडण्यासाठी आपण प्रतिनिधी पाठवीत आहोत, तेव्हा पुष्कळ हिंदी लोक कॉंग्रेसच्या निधीला देणग्या देतील अशी आमची अपेक्षा आहे. त्यांची पावती आम्ही देऊ. जोहान्सबर्ग येथे २५ पौंडांची रक्कम यापूर्वीच गोळा झाली आहे. नावांची यादी आम्ही पुढील आठवड्यात छापू.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १६–११–१९०७

२८२. बचावलेले मेमन

सुमारे शंभर मेमन (अपकीर्तीपासून) बचावले आहेत. त्यात प्रिटोरियाचे ४०, पीटर्सबर्गचे २७, पॉचिफस्ट्रूमचे २०, व पीट्रिफूचे ३, होते. त्यांना आम्ही मोठे वीर मानतो. त्यांनी आता धैर्य न सोडता मेमन व हिंदी लोक यांचा मान राखावा अशी विनंती आम्ही त्यांना थोडक्यात करतो.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १६–११–१९०७

२८३. रामसुंदर पंडित यांचे जीवन-चित्र

एवढे वादळ उठविणाऱ्या हिंदी माणसाचा इतिहास जाणण्यास सारे हिंदी लोक उत्सुक असतील. त्यांचे छायाचित्र आम्ही या अंकी प्रसिद्ध करीत आहोत. रामसुंदर पंडित ३० वर्षांचे आहेत. त्यांच्या वडिलांचे नाव कालिकाप्रसाद असे आहे. त्यांचा

व्यवसाय पुरोहिताचा. पंडितजींचा जन्म काशी येथे झाला. बनारस संस्कृत पाठशाळेत त्यांनी हिंदी व संस्कृत यांचा अभ्यास केला. गेली नऊ वर्षे ते दक्षिण आफ्रिकेत पुरोहित म्हणून काम करीत आहेत. त्यांनी नाताळमध्ये लग्न केले. त्यांना दोन मुले आहेत :—अडीच वर्षांचा एक मुलगा आणि एक वर्षाची एक मुलगी, त्यांचे कुटुंब ग्रे-टाऊनमध्ये राहते. पंडितजी १९०५ मध्ये ट्रान्सवालला आले. त्यांच्या प्रयत्नाने जर्मिस्टन येथे एक देऊळ बांधण्यात आले. 'सनातन-धर्म-सभा' स्थापन करण्यात आली. आशियावासी कायद्याच्या बाबतीत त्यांनी केलेली कामगिरी सर्वांना माहीत आहे. शेवटी, आम्ही अशी इच्छा करतो की, पंडितजींना दीर्घायुष्य लाभावे आणि समाजाची अखंड सेवा त्यांना करता यावी.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १६–११–१९०७

२८४. भारताच्या लालाजींनी काय केले ?

लाला लजपतराय हद्दपारी भोगीत असताना जणु काही वनभोजनासच गेले होते, असे आम्हास वाटते. कारण, त्यांची इच्छा सफल झाली आहे. पंजाब जमीन कायद्याशी त्यांनी लढा दिला-- केवळ आपल्या मौजेसाठी नव्हे. तो कायदा उद्ध्वस्त झाला, मग आपण मंडालेत राहिलो काय किंवा लाहोरमध्ये राहिलो काय, दोन्ही लालाजींना सारखेच. पुष्कळ लोकांना बोलण्यात शहाणपणा व विवेक कसा ठेवावा, हे कळते. पण ते काय म्हणतात याकडे लोकांचे लक्ष असते. परंतु जो माणूस आपल्या शब्दांना कृतीची जोड देतो, आपल्या वचनाचे पालन करतो, त्याच्या बोलण्याकडे सर्व-जण लक्ष देतील—मग त्याचे बोलणे वेड्या माणसासारखे असले तरी चालेल. यासाठी लाला लजपतरायांच्या भाषणाचा सारांश आम्ही पुढे देत आहोत. त्यात काही नवीन विचार आहेत असे नाही. पण हद्दपारी भोगणाऱ्या देशभक्तांचे ते विचार आहेत, म्हणून त्याकडे लक्ष देणे अवश्य आहे.

"बंधूंनो, सरकार म्हणते की, [पंजाबमधील] ही जमीन आम्ही तुम्हांला दिलेली आहे. म्हणून तुम्ही आमचे हक्क मानले पाहिजेत. प्रश्न असा आहे की, सर-कारने ही जमीन आणली कोठून ? (काळाच्या) आरंभापासून ही जमीन आणि ते आकाश येथे आहे. त्याचे पहिले स्वामी हिंदु होते, नंतर मुसलमान आले आणि येथे

स्थायिक झाले. आपण हिंदु व मुसलमान हे या दोहोंचे वारस आहोत. असे असताना सरकार ही जमीन कशी घेऊ शकते, हे त्यांनी दाखवावे. ही जमीन ईश्वराची आहे. ती त्याने आम्हांस दिली. त्यावर (राज्य करणारा) एखादा सम्राट असेल. पण ही जमीन त्या सम्राटाच्या नोकराची खचित होत नाही. लठ्ठ पगार घेणारे अधिकारी हे आमचे सेवक होत--राजे नव्हत. त्यांना पगार आम्ही देतो.

निद्रिस्त सिंहासारखे आपण आहोत. आपल्याला निजलेले पाहून, काही लोक आपली शेपटी ओढतील, काही आपल्या तोंडावर थुंकतील, पण जर आपल्याला आपली योग्यता कळेल, तर आपल्याला कोणीच उपद्रव देऊ शकणार नाही. हिंदु-मुसलमानांमध्ये वैमनस्य निर्माण करण्याची आपल्या शत्रूंना इच्छा आहे. त्यांना हिंदु व शीख यांच्यातही भेद निर्माण करण्याची इच्छा आहे. आपल्यामध्ये भेदभाव निर्माण करणे हे त्यांचे मोठे शस्त्र आहे. प्रत्येकाचे काही विशिष्ट गुणधर्म असतात. पाणी थंड असते, अग्नी जाळणारा असतो, त्याप्रमाणे परक्या राज्यकर्त्यांचा गुण म्हणजे आपल्यात दुफळी पाडून आपल्यावर स्वतःची सत्ता कायम ठेवणे. या त्यांच्या उद्देशाचा प्रतिकार करणे हा आपला स्वभाव-गुण असला पाहिजे. आपले पहिले कर्तव्य हे की, आपल्यामध्ये जर कोणी देशद्रोही असेल, तर त्याला वाळीत टाकावे. आपण व्हॉईसरॉयकडे जावे. इंग्लंडला जाणेही इष्ट आहे. आपल्या हक्कासाठी लढत असताना जीवन आणि मरण हे सारखेच आहेत, असे जर आपल्याला प्रामाणिकपणे वाटत असेल, तर अधिकारी आपल्याला ताबडतोब म्हणतील, "पाहा, ती जमीन तुमचीच आहे."

या रोगावर दुसरा उपाय नाही. आपण एकी केली पाहिजे आणि एकत्र राहिले पाहिजे, म्हणजे झाले. जर सरकारने एखाद्याची जमीन घेतली आणि नव्या शेती-कायद्याला मान्यता देण्यास तयार असलेल्या माणसाला ती देऊ केली आणि ती घेण्याला आपल्यापैकी कोणी पुढे आला, तर आपण त्याला देशाचा शत्रु, देशद्रोही असे मानले पाहिजे. सरकारने जर कोणाची जमीन आपल्या ताब्यात घेतली, तर ती जमीन विकत न घेण्याची शपथ आपण घेतली पाहिजे. आपण मर्दासारखे वागले पाहिजे— बायकांसारखे नव्हे. तुम्ही आपल्या शपथांशी एकनिष्ठ राहिलात, तर तुम्हांला अर्ज करावे लागणार नाहीत. जर तुम्ही आपल्या शास्त्राची किंवा कुराणाची शपथ घेऊन एकमेकाशी प्रामाणिक राहिलात, तर तुमचा अपमान करण्यास या जगात कोणीही धजणार नाही.

भारत-भूमी हे हिंदूंचे नंदनवन आहे— मुसलमानांचा स्वर्ग आहे. आपण क्रोडो मण धान्य पैदा करतो. तरीही भारताचे सात कोटी कन्या व पुत्र दररोज उपाशी राहतात.

या रोगावर उत्तम उपाय म्हणजे आपण आपला स्वाभिमान व प्रतिष्ठा यांचे रक्षण केले पाहिजे. प्लेगने दररोज हजारो माणसे मरतात. पण दुसऱ्यासाठी जो आपले

प्राण वेचतो— मग तुरुंगात असो वा तुरुंगाबाहेर असो— त्याचाच मृत्यु खरा म्हणावयाचा.

लाला लजपतरायजींनी मंडालेहून पाठविलेले एक पत्र आम्ही पुढील आठवड्यात प्रसिद्ध करू. ते वाचण्यासारखे आहे. वरील लेखाचे आमच्या वाचकांनी वारंवार पारायण करावे आणि दक्षिण आफ्रिकेतील परिस्थितीला त्यांतील तत्त्व लागू करावे, अशी आमची विनंती आहे.

[गुजरातीवरून],
इंडियन ओपिनियन, १६-११-१९०७

२८५. रामसुंदर पंडित यांचा कोर्टात चाललेला खटला

जर्मिस्टन येथील प्रचंड सभा

ट्रान्सवॉलमध्ये बिगर-परवाना राहिल्याबद्दल शुक्रवार ता. ८ रोजी रामसुंदर पंडित यांना अटक झाल्याचे वृत्त गेल्या आठवड्याच्या "ताज्या बातम्या"मध्ये आम्ही प्रसिद्ध केलेच आहे. त्या दिवशी सकाळी ते जर्मिस्टन येथील कोर्टाजवळ उभे होते. तेव्हा एका गुप्त पोलिसाने त्यांना त्यांचे नाव विचारले आणि त्यांचा परवाना मागितला. ते म्हणाले, माझ्याजवळ परवाना नाही. तेव्हा त्या गुप्त पोलिसाने त्यांना तेथेच पकडले. ही बातमी कानी येताच श्री. पोलक जर्मिस्टनला गेले. त्यांनी श्री. पंडित यांची भेट तुरुंगात घेतली. त्यांना विचारले असता, त्यांनी उत्तर दिले की, "जामिनावर सुटण्याची मला मुळीच इच्छा नाही. तुरुंगात राहणेच मला पसंत आहे."

तुरुंगात तुरुंगाच्या अधिकाऱ्यानेही पंडितजींना जामीन देण्याचा आग्रह केला, पण त्यांनी तसे करण्याचे नाकारले. ते म्हणाले, माझा समाज व माझा धर्म यांच्यासाठी मी तुरुंगातच राहीन.

तुरुंगातील परिस्थिती

तुरुंगात ते अगदी सुखात आहेत. राहण्यासाठी, स्नानासाठी खोल्या वगैरे सुखसोयी त्यांना मिळाल्या आहेत. ते तुरुंगात गेले तेव्हा त्यांना ताप आला होता,

असे तेच म्हणतात. आता त्यांची प्रकृती ठीक आहे. त्यांच्या भोजनाची व्यवस्था हिंदी समाजाने केलेली आहे. त्यांना दूध व फळे दररोज पाठविली जातात. दुसरे काहीही ते घेत नाहीत.

तारांचा वर्षाव

अभिनंदनाच्या व धैर्याने वागण्याच्या अनेक तारा त्यांना तुरुंगात मिळाल्या. नाताळ इंडियन काँग्रेस, दर्बान इस्लामियाँ अंजुमन, दर्बान मेमन समिती, हिंदु-धर्म-सभा (दर्बान), पारसी समिती (दर्बान) श्री. व्यास (प्रिटोरिया). सूरत हिंदूसंघ (दर्बान) यांच्याकडून तारा आलेल्या होत्या. त्या सर्व तारांमध्ये, धर्मासाठी व हिंदी समाजाच्या लढ्यासाठी तुरुंगात गेल्याबद्दल, पंडितजींचे अभिनंदन केलेले होते.

सोमवारी चाललेला खटला

खटला सोमवारी चालेल, अशा अपेक्षेने नाना ठिकाणांहून पुढारी मंडळी आलेली होती. त्यामध्ये, जोहान्सबर्गहून मौलवी साहेब अहंमद मुखतियार, सर्वश्री ईसाप मियाँ, इमाम अब्दुल कादिर, उमरजी साले, एम्. एस्. कुवाडिया, जुसब इब्राहीम, अहंमद मूसाजी, थंबी नायडू, पोलक, महंमदखान, गुलाब भाई, भट्ट, नारायणजी, नबाबखान, आणि अलीभाई अकुजी वगैरे होते. प्रिटोरियाहून सर्वश्री काचालिया, पिल्ले, व्यास व मणीभाई; क्रूगर्सडॉर्पहून श्री. वाजा आणि वेरीनिजीमहून श्री. अस्वात हे आले होते. खटला सुरू होण्यापूर्वी कोर्टाच्या प्रवेशद्वारापाशी सुमारे १५० हिंदी लोक जमले होते. त्यांच्यापैकी पुष्कळांनी आपल्याबरोबर पुष्पहार व पुष्पगुच्छ आणले होते. श्री. गांधींनी साडेदहा वाजता अशी बातमी आणली की, खटला लांबणीवर पडेल आणि श्री. रामसुंदर पंडित यांची जामिनाशिवाय सुटका होण्याचा संभव आहे. हे कळल्यामुळे पंडितजींचे स्वागत करण्यासाठी लोक रस्त्यावर उत्सुकतेने वाट पाहात होते.

बरोबर अकरा वाजता पंडितजींना कोर्टात आणण्यात आले. ते येताच कोर्टात हिंदी लोकांची गर्दी झाली. श्री. चामनी यांना प्रिटोरियाहून येता यावे म्हणून सरकारी वकिलांनी मुदत मागितली. श्री. गांधी म्हणाले--

माझे अशील चार दिवस कच्च्या कैदेत आहे. त्याला जामिनावर सुटण्याची इच्छा नाही. या वसाहतीतून तो बाहेर निघून जाणार नाही, उलट, कायद्याने सांगितलेली शिक्षा तो भोगील, म्हणून आजही खटला चालू शकेल. प्रिटोरियाच्या साक्षीदाराची काही गरज नाही. तथापि खटला लांबणीवर टाकण्याची इच्छा असेल, तर मी हरकत घेणार नाही. मात्र माझ्या अशीलाला त्याच्या शब्दावर विसंबून सोडण्यात यावे.

सरकारी वकिलाने सांगितले की, या खटल्यातील साऱ्या गोष्टी मला माहीत नाहीत. म्हणून आरोपीला जामिनाशिवाय सोडण्याच्या सूचनेला मी संमती देऊ

शकत नाही. श्री. गांधींनी उत्तर दिले, श्री. पंडित हे असे गृहस्थ नाहीत की, जे फरारी होतील. त्यांनी फरारी व्हावे अशी इच्छा सरकारची आहे. जो माणूस समाजासाठी ट्रान्सवॉलचा त्याग करीत नाही, तेथे राहण्याचा त्याचा हक्क आहे; म्हणून त्याची हकालपट्टी करण्याचा सरकारचा इरादा असला, तरी जो येथेच राहणारा आहे, अशा माणसासाठी कोणता जामीन द्यावा ?

हा युक्तिवाद मॅजिस्ट्रेटला मान्य झाला आणि पंडितजींना त्यांच्या जबाबदारीवर सोडण्यात आले.

"शाब्बास"च्या घोषणा

पंडितजी बाहेर येताच शेकडो लोकांनी "शाब्बास" अशा घोषणा करून त्यांचे स्वागत केले. त्यांच्यावर फुलांचा वर्षाव झाला. सर्वांनी (त्यांच्याशी) हस्तांदोलन केले. नंतर "वस्ती"मध्ये सभा भरविण्याचे ठरले. म्हणून सर्वजण 'सनातन धर्म-सभे'च्या इमारतीकडे गेले.

सभा

श्री. लालबहाद्दूर सिंह यांच्या सूचनेप्रमाणे मौलवीसाहेब अहमद मुखतियार यांनी अध्यक्षपद स्वीकारले. जर्मिस्टनचे रहिवाशी, पाहुण्यांची सभागृहात सोय व्हावी म्हणून, बाहेर उभे राहिले. मौलवीसाहेब आपल्या भाषणात म्हणाले, "पंडितजी अभिनंदनास पात्र आहेत. त्यांनी समस्त हिंदी समाजाची सेवा केली आहे. कारागृह हे राजगृह आहे, हे त्यांनी सिद्ध केले आहे. वेळ येईल तेव्हा तुरुंगात जाण्यास मीही तयार आहे. अशा बिकट प्रसंगी पुढाकार घेणे हे मौलवी व पुरोहित यांचे कर्तव्य आहे."

श्री. इमाम अब्दुल कादिर— "रामसुंदर पंडितांच्या उदाहरणाने प्रत्येकाच्या अंतःकरणात धैर्य उत्पन्न होईल."

श्री. इसाप मियाँ—"कोणीही सरकारची अणुमात्र भीती बाळगता कामा नये."

श्री. गांधी—"लढ्याचा हा केवळ प्रारंभ आहे; पण सार्वजनिक कार्यासाठी हिंदु-मुसलमान एकत्र येऊन लढत आहेत, हा महान लाभ होय."

श्री. अहमद मूसाजी—"पंडितजींना धन्यवाद. माझ्या जिवात जीव आहे तोपर्यंत मी माझे नाव नोंदविणार नाही."

प्रिटोरिया येथील हिंदू-धर्म-सभेच्या वतीने श्री. मणीभाई यांनी आभार मानले.

श्री. थंबी नायडू—"पंडितजी जेव्हा तुरुंगात जातील तेव्हा आपला लढा चांगला रंगेल."

श्री. कुवाडिया--" मला कमलीच डर नाही. सरकार पंडितजींना काही करील असे वाटत नाही. "

श्री. महंमदखान--" मी स्वतः एक निरोधक आहे आणि म्हणून ज्यांनी निरोधन केले, त्यांच्याविषयी मला अभिमान वाटत आहे. "

श्री. उमरजी यांनी पुढील गुजराती पद म्हटले,

" जननी जणजे त्रण जजन, दाता भक्त कां शूर ।
नहिं तर रहे जे वांझणी, रखे गुमावे नूर ।

(माते, तूं दाता, भक्त किंवा शूर यांनाच जन्म दे, नाही तर वंध्या राहा. आपले तेज उगाच का गमावतेस !)

या कवनाप्रमाणे, पंडितजी हे शूर पुत्र असल्यामुळे त्यांच्या मातेला हे भूषणावह आहे. "

श्री. अस्वात--" पंडितजींच्या उदाहरणावरून प्रत्येकाने हे ओळखले पाहिजे की, नोंदणी-कचेरी म्हणजे एक भडकती आग आहे. तिला कोणी स्पर्श करू नये. "

श्री. कचालिया यांनी पंडितजींचे आभार मानले आणि ते म्हणाले, " प्रिटोरिया येथील ज्या लोकांनी आपली नावे अद्याप नोंदली नाहीत, त्यांनी ती कधीच नोंदवू नयेत. "

श्री. अलिभाई--" कानमिया निरोधक प्रिटोरियाला जाण्यास तयार नसतील, तर मी मुद्दाम तेथे जाईन. "

श्री. व्यास--" कोणत्याही प्रसंगाला तोंड देण्याचे धैर्य पंडितजींच्या अंगी आहे. प्रिटोरियाला वास्तव्य करण्याचे त्यांनी मान्य केले आहे. "

श्री. लालबहाद्दुर सिंह यांनी सर्वांचे आभार मानले.

श्री. पंडित यांच्यानंतर मौलवीसाहेबांची पाळी येईल अशी आशा श्री. पोलक यांनी व्यक्त केली.

नंतर मौलवीसाहेबांनी चार शब्द सांगून सभा संपवली.

शेवटी, सर्वांना केळी, संत्री, चहा व लेमोनेड यांचा अल्पाहार देण्यात आला.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १६-११-१९०७

२८६. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

शूर शिंपी व गोरा व्यापारी

येथील शिंप्यांच्या काही अडचणी या पत्रात यापूर्वीच प्रसिद्ध केलेल्या आहेत; पण प्रस्तुतचे प्रकरण इतके महत्त्वाचे आहे की, त्याचा सविस्तर वृत्तांत मी आज देत आहे. श्री. टी. आल्ब्रेट यांनी पुढील पत्र शिंप्यांना पाठविले आहे :

" वासाहतिक सचिवाच्या ताज्या भाषणावरून असे दिसते की, हिंदी लोकांसाठी ट्रान्सवॉल सरकारने बनविलेल्या नव्या कायद्यातील तरतुदी ज्या हिंदी लोकांना मान्य नाहीत, त्यांना परवाने मिळणार नाहीत, आणि कायद्यात सांगितल्याप्रमाणे, त्यांना अटक केली जाईल व तुरुंगात टाकले जाईल. तुम्ही लोकांनी कायद्याला मान्यता न देण्याची प्रतिज्ञा केली आहे, म्हणून तुमच्या मदतीने आम्ही संकटापासून आमचे संरक्षण करू इच्छितो. आम्ही आपल्याला खेदपूर्वक विनंती करितो की, आपल्याला आमच्या दुकानातील मालाची जरूरी पडल्यास यापुढे रोख किंमत द्यावी आणि येणे असलेली बाकी डिसेंबरपूर्वी चुकती करावी.

" यावरून, या बाबतीत आमचा काही निराळा उद्देश आहे, असे आपण मानणार नाही अशी आशा आहे. ईश्वराच्या कृपेने, तुमची सध्याची अस्थिर परिस्थिती संपुष्टात आली आणि तुमचा विजय झाला, तर आपल्यामधील नित्याचे व्यवहार पुनः चालू करण्यास आम्हांला फार आनंद वाटेल.

" आतापर्यंत तुम्ही आपल्या व्यवहारात आणि आर्थिक देवघेवीत जे समाधान आम्हास दिले, त्याबद्दल आम्ही आपले आभार मानतो. "

हे पत्र अगदी नम्रतेचे आहे; त्यामध्ये कठोरपणा नाही; पण त्याचा अर्थ हा स्पष्ट आहे की, जे लोक नोंदणी करून घेणार नाहीत, त्यांना उधार माल मिळणार नाही. यामुळे शिंपी लोक चिडले आहेत. ते भित्रे असते, तर भयामुळे नोंदणी करण्यास प्रवृत्त झाले असते. पण ते शूर आहेत. त्यामुळे त्यांनी आल्ब्रेटच्या मालाचे सारे नमुने त्याच्याकडे परत फेकून दिले आणि २१ लोकांच्या सह्यांचे पुढील पत्र पाठविले :

" आपली गुजराती भाषेतील नोटीस पोहोचली. आज, म्हणजे ता. ७ नोव्हेंबर १९०७ पासून, आपल्याशी आम्ही काहीही आर्थिक व्यवहार ठेवू इच्छित नाही हे

आम्ही अत्यंत खेदपूर्वक आपल्याला कळवितो. शिवाय, आम्ही आपल्यापासून एका पैचाही माल खरेदी करणार नाही. कारण, नोंदणी न करण्याची शपथ आम्ही घेतलेली आहे आणि कोणत्याही परिस्थितीत कितीही हानी झाली तरी, ती शपथ मोडण्याची आमची इच्छा नाही. आपले आमच्याकडे जे देणे असेल, ते आम्ही लौकरात लौकर आपल्याला देऊन टाकू."

यामुळे श्री. आल्ब्रेट घाबरून गेले. त्यांच्यावर पूर्ण बहिष्कार पडला. त्यांच्या दुकानावर एक निरोधक उभा राहून, तेथून कोणी कापड खरेदी करीत आहे काय, हे पाहू लागला. कारण तेथून आणलेले कापड शिवण्याचे शिंपी नाकारणार आहेत. त्यानंतर श्री. आल्ब्रेट यांनी शिंपी लोकांची आर्जवे करून पुढील शब्दांत माफी मागितली :

"आम्ही इंग्रजी व गुजराती या भाषांतून आमच्या गिऱ्हाइकांना जी सूचना दिली, तिचा अर्थ असा लावण्यात आला आहे की, त्यांनी आपली नावे नोंदवावीत आणि ती न नोंदविली तर आम्ही उधारी देणार नाही. त्यामुळे त्यांना आपला अपमान झाला असे वाटले, आणि त्यांनी आमच्यावर बहिष्कार घालण्याचे ठरविले.

"आमच्या ग्राहकांच्या भावना दुखविण्याचे आमच्या स्वप्नातही नव्हते, हे सांगण्याची गरज नाही. या वसाहतीच्या कायद्याला मान्यता देणे वा न देणे, या बाबतीत कोणावर दडपण आणल्यास त्याला संताप येईल, हे आम्ही सहज समजू शकतो. आमच्या राज्यघटनेप्रमाणे, प्रत्येकाला, आपल्या मताप्रमाणे चालण्याचा हक्क आहे, असे आम्ही समजतो. म्हणून आम्ही आमचे मागील पत्र बिनशर्त परत घेत आहोत. सध्याच्या भयानक संघर्षातून हिंदी लोक यशस्वीपणे पार पडतील आणि येथील सरकार त्यांना सरळपणाने व न्यायाने वागवील अशी आशा आम्ही पुनः प्रकट करतो. आमच्या सद्भावाची खूण म्हणून आणि आतापर्यंत ज्यांच्याशी आमचे संबंध चांगले होते याचे चिन्ह म्हणून, हिंदी लोकांच्या चळवळीला मदतीसाठी आम्ही २५ पौंडांचा चेक सोबत पाठवीत आहोत.

"हा बहिष्कार थांबविला जाईल असा विश्वास आम्हांला वाटतो. पण आमच्याशी व्यवहार करावयाचा की नाही, हे आमच्या ग्राहकांच्या इच्छेवरच पूर्णपणे अवलंबून आहे. तसे त्यांनी केले तर, नेहमीच्या शर्तीवर त्यांना माल विकण्यास आम्हांला आनंद वाटेल. पण आमच्या पत्राचा त्या बहिष्काराशी काडीमात्र संबंध नाही, हे आम्हांला सांगावयाचे आहे. आमच्या हातून झालेली चूक सुधारण्याचाच आमचा हेतु आहे. पूर्वीचे पत्र लिहिण्यात आमचा हेतु कोणाला दुखविण्याचा नव्हता हे आम्हांला दाखवावयाचे आहे."

एखाद्या गोऱ्या माणसाने लिहिलेले असे माफीचे पत्र आम्ही यापूर्वी कधी ऐकले नव्हते. ते पूर्णपणे नम्रतेचे आहे, असे मला वाटते. या प्रकरणामुळे शिंप्यांची प्रतिष्ठा

वाटेल, त्यापासून इतरांनी धडा घ्यावा. आणि जर गोऱ्यांना भ्याळो नाही, तर ते आपल्याला उधार देण्याचे नाकारणार नाहीत. ते कसे नाकारतील? त्यांना पैसे मिळवायाचे नाहीत काय? गेल्या पाच वर्षांत या दुकानाने हिंदी लोकांशी ६०,००० पौंडांचा व्यवहार केला आणि त्यात फक्त २३ पौंड वसूल होण्याचे राहिले असेही मी ऐकले आहे. हिंदी लोक प्रामाणिक असतील, तर त्यांना उधारी, न मागताही, मिळेल.

मूसा इस्माइल मियाँ

श्री. मूसा इस्माइल मियाँ मक्केच्या यात्रेला गेले आहेत. मी त्यांना धन्यवाद देतो. त्यांचे वडील बंधु, श्री. इसाप मिया, हे समाजसेवेच्या पवित्र कार्यात गुंतलेले आहेत. माझ्या दृष्टीने हे दोन्हेही बंधू इहलोक व परलोक यांची साधना करीत आहेत. ते सदैव धर्मनिष्ठ राहोत आणि समाजसेवा करोत. लाखो रुपये कमावण्यापेक्षा हे त्यांचे कार्य अधिक मौल्यवान आहे.

आणखी फितुरी?

श्री. खमीसाच्या दुकानात नोंदणी–पत्रे चोरून दिली जातात असे आम्ही ऐकतो. अशी ९ नोंदणी-पत्रे दिली आहेत. आता अर्ज घेतले जात नाहीत, परंतु ज्यांनी अर्ज केले आहेत त्यांना नोंदणी–पत्रे दिली जातात.

कायद्यामुळे घडलेली हत्या

एका चिनी माणसाने, नोंदणीपत्र घेतल्यावर, शरमेमुळे आत्महत्या केली. यामुळे विरोधी भावना निर्माण झाली. चिनी संघाचे अध्यक्ष, श्री. क्विन्न, यांनी वृत्तपत्राकडे पुढील पत्र पाठविले :

"एका चिनी माणसाच्या आत्महत्येची बातमी वृत्तपत्रांत आली आहे. ती बातमी सकाळच्या वृत्तपत्रात वाचण्यापूर्वी माझ्या सेवकाने एक पत्र माझ्या हाती दिले. ते चिनी भाषेत लिहिलेले होते आणि त्यावर त्या मृत माणसाची सही होती. त्या पत्राचे भाषांतर मी पुढे देत आहे[1] :

चाऊ काईकडून चिनी संघाच्या अध्यक्षास पत्र

ता. १० नोव्हेंबर १९०७

"मी या जगाचा निरोप घेत आहे. मी आत्महत्या का करीत आहे, याचा जाहीर खुलासा करणे मला अवश्य वाटते. दक्षिण आफ्रिकेत आल्यापासून मी फक्त घरगुती

१. गुजराती भाषांतर मूळ इंग्रजी पत्राशी ताडून पाहिलेले आहे.

गड्याचे काम करीत आलो आहे. माझी भाषा माझ्या इतर देशबांधवांपेक्षा निराळी आहे. मी त्यांच्यामध्ये फारच थोडा मिसळलो आहे. माझ्या मालकाने मला पुनः नोंदणी करण्यास सांगितले. प्रथम मीं नकार दिला, तेव्हा मला असे सांगण्यात आले की, तुला नोकरीवरून काढून टाकण्यात येईल. माझी नोकरी जाईल अशी मला भीती वाटली. म्हणून मला पुनः नोंदणी करणे भाग पडले. त्यामुळे माझी काय दुर्दशा होईल हे मला माहीत नव्हते. पण माझ्या एका मित्राने या नोंदणीची सारी माहिती मला दिली आणि कायद्याचे भाषांतर दाखविले. तेव्हा मला कळले की, मला गुलामासारखे वागविले जाईल. तसे होणे हे मला व माझ्या राष्ट्राला लांछनास्पद आहे. ही जाणीव मला पूर्वी नव्हती. आता पश्चात्ताप करूनही उपयोग नाही. मी आता माझ्या देशबांधवांना माझे तोंड कसे दाखवू ? माझ्या चुकीपासून माझे सारे देशबांधव योग्य तो धडा घेतील अशी मला आशा आहे. ”

या पत्रावर श्री. क्विन यांनी पुढीलप्रमाणे भाष्य केले आहे :

“ हे पत्र वाचल्याने माझ्या मनात कोणत्या भावना आल्या असतील याची कल्पना आपण सहज करू शकाल. मी तत्काळ वृत्तपत्रे वाचावयास सुरुवात केली. त्याने धमकी खरी केली असे मला दिसून आले. त्याच्या प्रेताची मागणी माझ्या संघाने तत्काळ केली. त्याचा अंत्यविधी करून मी आताच परत आलो आहे. त्याच्या प्रेतयात्रेस चिनी संघाचे सुमारे ७० सभासद हजर होते.

“ माझ्या समाजातील त्या मृत व्यक्तीला कोणी दमदाटी केली होती हा आरोप मी धिक्कारपूर्वक फेकून देतो. पण या महाभयंकर घटनेचा बोध आपण काय घ्यावयाचा ? सापाला साप म्हटलेच पाहिजे. सौम्य शब्द वापरण्याचा हा प्रसंग नाही. एका निष्पाप माणसाची हत्या ट्रान्सवाल सरकारने केली—आणि तीही केवळ तो आशियावासी होता म्हणून केली, असा आरोप मी जाणूनबुजून करतो. आशियावासी कायद्याने आम्हांला बिकट परिस्थितीत टाकले आहे. आता त्या कायद्याने बळी घेतला आहे. वर वर्णन केलेली शोचनीय घटना ज्या कायद्यामुळे घडून आली तो कायदा ट्रान्सवालमधील गोऱ्या लोकांच्या मानवतेला सहन होईल काय ? आशियावासी कायदा फार सुखाचा आहे आणि ट्रान्सवालमधील गोऱ्या लोकांच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे, असे गोरा समाज अजून मानणार काय ? आणि म्हणून आशियावासी लोकांनी आपल्या मताच्या मूर्खपणामुळे, या कायद्याने केलेला अपमान जिव्हारी लावून घेतला, तर त्याच्याशी आपला काही संबंध नाही असे गोरे लोक मानणार काय ? पाश्चात्त्य संस्कृतीकडून असा धडा आपण शिकावा असे आम्हांला वाटत नाही.”

शाहजीसाहेब

शाहजीसाहेबांचा खटला बुधवारी सुरू झाला. शेकडो हिंदी लोक हजर होते. श्री. महंमद शहाऊद्दीन यांनी खटला परत घेण्याचा खूप प्रयत्न केला. पण तसे घडले

नाही. आपल्या जबाबात त्यांनी सांगितले की, मला फिर्याद करावयाची नाही. शाहजी-साहेबांनी माझ्यावर धर्माचे उल्लंघन केल्याबद्दल हल्ला केला. पण तो हल्ला म्हणजे बापाने मुलाला केलेली शिक्षा, असे मी मानतो. तेव्हा कोर्टाने शाहजीसाहेबांना ताकीद देऊन सोडून दिले.

व्यास व इतर निरोधक यांना अटक

श्री. गौरीशंकर व्यास, श्री. लछमन व श्री. शरफुद्दीन हे निरोधन करीत असताना पकडले गेले. त्या सर्वांची जामिनाशिवाय सुटका झाली. जामीन देण्याचे त्यांनी नाकारले होते. खटला पंधरा तारखेस पुनः चालेल. प्रिटोरियामध्ये मोठी खळबळ माजली आहे. सर्वजण उत्साही आहेत. त्यांना अभिनंदनाच्या तारा पाठविल्या आहेत.

गोऱ्यांमधील खळबळ

आता गोरे लोक चिंतातुर झाले आहेत. सरकारकडे शिष्टमंडळ नेण्याचा काही-जणांचा विचार आहे. यासंबंधीची अधिक माहिती आम्ही पुढे देऊ अशी आशा आहे.

काँग्रेसचे प्रतिनिधी

ब्रिटिश इंडियन असोसिएशनची सभा श्री. इसाप मियाँ यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी भरली. पुष्कळ सभासद हजर होते. श्री. फॅन्सी, कुवाडिया, कचालिया, अहमद मुसाजी, मौलवीसाहेब, अहमद मुखत्यार, इमाम अब्दुल कादिर व श्री. गांधी इत्यादींची भाषणे झाली. नंतर श्री. उमर हाजी, आमद झवेरी, अमरुद्दीन मुहम्मद हुसेन फजंदार, श्री. हाजी इब्राहिम अहमद दीनदार, श्री. अहमद सालेजी कुवाडिया, सुलेमान मुदर्जी कासिम त्याचप्रमाणे श्री. पीरन मुहम्मद यांना सुरत काँग्रेसचे प्रतिनिधी निवडण्यात आले. त्याच वेळी काँग्रेसला वर्गणी गोळा करण्यात आली. श्री. अमिरुद्दीन यांनी भाषण करून जोराने प्रयत्न करण्याचा आग्रह केला.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १६–११–१९०७,

२८७. दर्बान येथील दिवाळी-उत्सव

दिवाळीचा[1] सण साजरा करण्यासाठी ग्रे स्ट्रीटवरील श्री. अब्दुल लतिफ यांच्या इमारतीत हिंदू लोकांचे एक संमेलन भरले होते. रोषणाई वगैरे करून इमारत सुंदर रीतीने सुशोभित केली होती. संगीताचीही सोय केलेली होती. मंगल मुहूर्तावर सरस्वतीची पूजा करण्यात आली आणि नंतर दिवाळीच्या महात्म्यावर श्री. केशवलाल महाराज यांचे प्रवचन झाले. अंबारामजींनी आशीर्वादपर मंत्र म्हटले. त्यानंतर त्या संमेलनाच्या वतीने एक शिष्टमंडळ श्री. गांधींचे स्वागत करण्यासाठी स्टेशनावर गेले. गांधी संध्याकाळी सुमारे ७-३० वाजता येऊन पोहोचले. त्यांच्याबरोबर शेठ अब्दुल करीम, रुस्तुमजी शेठ, शेठ दादा उस्मान, इत्यादी लोक होते. श्रीयुत अंबारामजींनी देशसेवेवर एक प्रभावी भाषण केले. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या परिस्थितीची माहिती सांगून श्रीयुत गांधी म्हणाले, "आज ट्रान्सवॉलमध्ये हिंदी लोकांची होळी[2] होत आहे. ते आपल्या लढ्यात विजयी झाले तरच त्यांना दिवाळीचा सण साजरा करता येईल." ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या परिस्थितीचा सविस्तर वृत्तांत श्री. गांधींनी निवेदन केला, त्याचा प्रभाव श्रोतृवर्गावर फारच पडला. नंतर शेठ अब्दुल करीम, श्री. पारशी रुस्तुमजी व इतर लोकांची भाषणे झाली. ट्रान्सवॉलच्या लढ्यासाठी पैसा गोळा करण्याकरिता एक थाळी फिरविण्यात आली, तेव्हा ५ पौंडांहून अधिक रक्कम जमली. प्रसाद वाटल्यानंतर थोडे गायन झाले, आणि मग संमेलन समाप्त झाले.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १६–११–१९०७

१. या दीपावली-उत्सवात लक्ष्मीचे पूजन केले जाते, आणि हिंदुस्थानच्या काही भागात सरस्वतीचेही पूजन केले जाते.

२. हिरण्यकश्यपूपासून प्रल्हादाचा बचाव झाला म्हणून हिंदू लोक होळी करतात, पण 'आपल्या इतर वस्तूंचा नाश' या अर्थानेही होळी शब्द वापरतात.

२८८. हमीदिया इस्लामिया अंजुमनमध्ये भाषण

[जोहान्सबर्ग]
१७ नोव्हेंबर, १९०७

दर्बान येथून आलेले श्री. हाजी हबीब यांचे पत्र नंतर वाचून दाखविण्यात आले. त्यांत त्यांनी, लोकांनी धैर्याने वागावे, असा उपदेश केला होता. त्यानंतर, तुरुंगात जाणे, वृत्तपत्र-विक्रेत्यांचा संप आणि प्रिटोरियातील निरोधकावरील खटल्यात अडकलेला लछमन—यासंबंधी श्री. गांधींनी काही माहिती दिली आणि ते म्हणाले, "श्री. हॉस्केन हे प्रिटोरिया येथील सभेत हजर राहून आपली समजूत घालण्याचा प्रयत्न करीत होते. आता ते सरकारचे मन वळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. नाताळमधील जनता आपल्याला मदत करीत आहे आणि ती तशी मदत करीत राहील. दर्बानचे शेठ पीरन महम्मद हेही भारताला जाऊ शकणार नाहीत. श्री. रिच् इंग्लंडमध्ये अतोनात परिश्रम करीत आहेत. त्यांच्या व्यक्तिगत खर्चासाठी मंजुरी दिली पाहिजे. हिंदी राष्ट्रीय सभेसाठी श्री. फॅन्सी जो निधी उभारीत आहेत, त्याला प्रत्येकाने वर्गणी द्यावी. पंडितजींच्या खटल्याची फेरतपासणी जनरल स्मट्स करीत आहेत त्यावरून सरकार किती घाबरले आहे हे दिसून येते.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २३-११-१९०७

२८९. भारताच्या व्हॉइसरॉयांना पत्र

दर्बान
ता. १८ नोव्हेंबर, १९०७

नेक नामदार व्हॉइसरॉय,

यांस,

नाताळमधील दर्बान येथे पाइनस्ट्रीटवरील कॉंग्रेस हॉलमध्ये भरलेल्या सार्वजनिक सभेत जे ठराव व जी तार एकमताने मंजूर झाली व स्वीकृत केली गेली, त्यांच्या प्रती

आम्ही आपल्याला नम्रपणे यासोबत पाठवीत आहोत. नव्या आशियावासी कायद्या-प्रमाणे, ट्रान्सवॉलमधील जर्मिस्टन येथे, एक हिंदू पुरोहित रामसुंदर पंडित यांना एक महिन्याची साध्या कैदेची शिक्षा झाली आहे. त्यांच्याविषयी या ठरावात सहानुभूती व्यक्त केलेली आहे.

या खटल्यातील अन्याय नामदारसाहेबांना उघड दिसून येईल. नामदारसाहेबांची वैयक्तिक सहानुभूती मिळण्याची खात्री असल्यामुळे, दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांना जो अपमान व तिरस्कार सोसावा लागत आहे, त्यापासून भारत सरकारने त्यांचे रक्षण करावे आणि त्यांना आधार द्यावा, अशी आदरपूर्वक विनंती आम्ही करीत आहोत. आमच्या या निवेदनाकडे लक्ष दिले जाईल, असा विश्वास आम्हांस वाटत आहे.

आपले
दादा उस्मान
एम्. आंगलिया
संयुक्त सन्मान्य चिटणीस,
नाताळ इंडियन काँग्रेस[१]

या पत्रासोबतचे ठराव

नाताळ इंडियन काँग्रेसच्या वतीने गुरुवार ता. १४ नोव्हेंबर १९०७ रोजी सायंकाळी हिंदी लोकांची जी सार्वजनिक सभा भरली, तिच्यामध्ये पुढील ठराव मंजूर झाले.

खाली दिलेली तारही मंजूर व स्वीकृत झाली. त्यांच्या प्रती बादशहाचे व ट्रान्स-वॉलचे वासाहतिक सचिव या दोघांकडे पाठवाव्या असे सभेने ठरविले.

ठराव क्र. १—नाताळमधील हिंदी समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या हिंदी लोकांच्या या सभेला, ट्रान्सवॉलच्या कायद्यामुळे राजनिष्ठ हिंदी लोकाना अन्याय व हाल भोगावे लागत आहेत हे ऐकून अत्यंत खेद वाटतो.

ठराव क्र. २—रामसुंदर पंडित व त्यांचे कुटुंब यांना सहानुभूतीची पत्रे व तारा पाठवाव्यात आणि आपल्या समाजाच्या आध्यात्मिक गरजा भागविण्यासाठी पौरो-हित्याचा हक्क संपादन करण्यासाठी त्यांनी जी भूमिका धारण केली आहे, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे असे ही सभा ठरवीत आहे. तसेच, सर्व नाताळमध्ये एक दिवस हरताळ पाळावा. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या अडचणी अधिक प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी शनिवार ता. १६ रोजी हिंदी लोकांची सर्व दुकाने व पेढ्या बंद

१. या सह्या मुळात सोबतच्या ठरावाखाली आहेत.

ठेवाव्यात. आध्यात्मिक नेता व गुरु याला अंतरल्याबद्दल हिंदु समाजाविषयी ही सभा हार्दिक सहानुभूती प्रकट करीत आहे. हिंदु लोकांच्या धार्मिक गुरूला दूर सारून कोणत्याही सरकारने धार्मिक विधी व समारंभ करणे पर्यायाने कठीण करून ठेवावे, हा या सरकारचा अविवेक पाहून या सभेला दुःख होते. या ठरावांच्या प्रती वासाहतिक सचिव, ट्रान्सवॉल सरकार आणि इंग्रजी व हिंदी वृत्तपत्रे यांना पाठवाव्या.

तार—रामसुंदर पंडित यांच्या अटकेमुळे व शिक्षेमुळे, एका ब्रिटिश वसाहतीतील हिंदी प्रजाजनांच्या वैयक्तिक स्वातंत्र्यामध्ये व धर्मामध्ये, जो अकारण हस्तक्षेप झाला त्याचा निषेध नाताळमधील हिंदी लोक आदरपूर्वक करीत आहेत. साम्राज्यासाठी साम्राज्य सरकारने यांत लक्ष घालावे अशी प्रार्थना.

इंडिया ऑफिस रेकॉर्डस् : जे. अ‍ॅण्ड पी. ५९८।०८

२९०. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना सूचना

जोहान्सबर्ग, पत्रपेटी क्र. ६५२२
नोव्हेंबर १९, १९०७

असोसिएशनच्या वृत्तांतावरून[1] प्रत्येक हिंदी माणसाला कळून आले असेल की, तिच्याजवळ आता फारच थोडा पैसा आहे. हा मोठा लढा आहे. त्यातील पुष्कळसे काम पैशाशिवाय केले जात असले तरी काही खर्च करावाच लागतो—आणि प्रत्यक्षात तसा तो केलाही आहे. तारा पाठविल्या आहेत, शेकडो पत्रे लिहिली आहेत. टंकलेखनही पुष्कळ झाले आहे. काही छपाई केली आहे आणि वृत्तपत्रासाठीही खर्च होतो. या साऱ्या खर्चाच्या बाबी किरकोळ आहेत. पण त्यांची बट्ट बेरीज केली म्हणजे मोठा आकडा तयार होतो.

पुष्कळ ठिकाणी काही देणग्या गोळा केल्या जातात. पण त्या असोसिएशनकडे आल्या नाहीत. ज्यांनी देणग्या गोळा केल्या असतील त्यांनी, आणि इतर हिंदी लोकांनीही, असोसिएशनकडे पैशाचा भरणा शक्य तितक्या लवकर केला पाहिजे. योग्य

१. पाहा : परिशिष्ट ७.

ती पावती प्रत्येकाकडे पाठविली जाईल. या बाबतीत कोणाकडून दिरंगाईचे वर्तन होणार नाही अशी आशा आम्ही बाळगतो. व्यक्तीने पाठविलेल्या देणग्याही स्वीकारल्या जातील.

इसाप इस्माईल मियाँ
अध्यक्ष
कुवाडिया, खजिनदार
मो. क. गांधी, चिटणीस

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २३-११-१९०७

२९१. मणिलाल गांधी यांना पत्र

जोहान्सबर्ग,
ता. २१ नोव्हेंबर, १९०७

प्रिय मणिलाल,

यापूर्वी मी तुला इंग्रजीत कधी लिहिले आहे असे वाटत नाही. आज गुजरातीऐवजी मला इंग्रजीतून लिहावे लागत आहे. रामायण व गीता आज मी पाठवीत आहे. रामायणाचे पुस्तक चांगले बांधून घे. नंतर ते पुस्तक खराब होणार नाही याची काळजी घे. पुस्तके कशी वापरावीत, तसेच प्रत्येक वस्तु काळजीपूर्वक वापरावी, हे तू शिकावेस. पुढील खेपेस मी तेथे येईन आणि तुझी परीक्षा घेईन. तेव्हा मला समाधान होईल अशी आशा आहे. तुरुंगाविषयीची बहुतेक काव्ये[१] तू पाठ करावीत. मगनलालने खरोखर एक भजनी मंडळ स्थापन करावे. अशा कामाला अधूनमधून थोडा वेळ देण्यास काही अडचण नसावी. तू त्याला तसे सुचव. त्याला हे पत्र वाचून दाखव. रामायणाचा उपयोग तुम्ही काय करीत आहात हे आम्हाला कळवा. त्याचा अर्थ कोण सांगणार ? का अर्थ समजल्याशिवाय श्लोक वाचण्याचे तुम्ही योजले आहे ?

आपला
मोहनदास

गांधीजींनी सही केलेल्या मूळ टंकलिखितावरून
सी. डब्ल्यू. ८२
सुशीलाबेन गांधी यांच्या सौजन्याने

१. ' जेलना काव्यो ' या नावाने गुजरातीत छापलेली.

२९२. ना. गो. कृ. गोखले यांना पत्र

जोहान्सबर्ग,
२२ नोव्हेंबर, १९०७

प्रिय प्रो. गोखले,

सुरत येथील काँग्रेसला हजर राहणाऱ्या ट्रान्सवॉलमधील प्रतिनिधींपैकी एक श्री. अमीरुद्दीन फजंदार यांच्यामार्फत एक पत्र[१] मी आपल्याला पाठविले आहे. येथे आम्ही जो लढा चालवीत आहोत, त्याचा परिणाम असा झाला आहे की, आपण प्रथम हिंदी आहोत आणि मग हिंदु, मुसलमान, तामीळ, पारसी इत्यादी आहोत अशी भावना निर्माण झाली आहे, हे मी आपल्या नजरेस आणू इच्छितो. आमचे सर्व प्रतिनिधी मुसलमान आहेत; हेही आपल्या ध्यानी येईल. मला स्वतःला या गोष्टीचा आनंद वाटतो. दक्षिण आफ्रिकेशी संबंध असलेले पुष्कळ मुसलमान या काँग्रेसला हजर राहतील असा संभव आहे. त्यांच्याकडे अधिक लक्ष पुरवावे आणि त्यांची चांगली व्यवस्था ठेवावी अशी मी विनंती करितो. हिंदु–मुसलमानांचे ऐक्य हे या काँग्रेसचे खास वैशिष्ट्य ठरेल. लढ्याचा बाकीचा भाग आपल्याला वृत्तपत्रावरून कळलाच आहे.

आपला
मो. क. गांधी

गांधीजींनी सही केलेल्या टंकलिखिताच्या छायाचित्रावरून,
जी. एन्. ४१०९

१. पाहा : ‘ गो. कृ. गोखले यांना पत्र ’ लेख २७४.

२९३. ' ट्रान्सवॉल लीडर 'ला पत्र

जोहान्सबर्ग,
२३ नोव्हेंबर १९०७ पूर्वी

[संपादक
दी ट्रान्सवॉल लीडर
महाशय]

माझे सहकारी पुरोहित रामसुंदर पंडित यांच्या खटल्याच्या वेळी हजर राहण्याचे भाग्य मला लाभले होते. माझ्या मनात असा विचार जोराने चमकून गेला की, ट्रान्सवालच्या कायद्यामध्ये मुळातच काही तरी चूक आहे. प्रत्येकाला हे माहीत आहे की, इमाम कमाली याने कुराणातील शिकवणीचा भंग केला म्हणून त्याला मी रागाच्या भरात मारहाण केली. त्यामुळे मला ५ पौंडांचा दंड झाला, तो न दिल्यास कैदेची शिक्षा होती. माझा शिष्य म्हणविणाऱ्या एका निर्दय मित्राने तो दंड भरला, आणि मी तुरुंगावासातून बचावलो. मी पुनः महम्मद शहाबुद्दीन याला ठोकले. आपण कुराणाची शपथ मोडली, असे त्याने आपल्या साक्षीत कबूल केले आणि म्हटले, यांनी मला मारणे हे बापाने मुलाला मारण्यासारखे आहे, म्हणून कोर्टाने दयाळूपणे मला मोकळे सोडले. फक्त अशी ताकीद दिली की, शिक्षा भोगण्यासाठी तुम्हांला केव्हाही बोलावले जाईल.

रामसुंदर पंडिताची माहिती मला थोडीफार आहे. माझ्या माहितीप्रमाणे त्यांनी कोणालाही कधीही इजा केलेली नाही. त्यांना एक महिना कैदेची शिक्षा झाली. कारण या ब्रिटिश वसाहतीतील आपल्या देशबांधवांच्या धार्मिक गरजा भागविण्यासाठी त्यांच्याजवळ परवानापत्र नव्हते.

मला नेहमी असे वाटत आले आहे की, तुरुंगात जाण्याला जर कोणी पात्र असेल तर तो मी. मला स्वातंत्र्य कोणी तरी मिळवून दिले; पण रामसुंदर पंडित ज्यांना दररोज भेटत असे आणि जे धर्म-कार्य करीत असे, त्यापासून त्यांना तोडण्यात येऊन एक महिनाभर तुरुंगात कोंडण्यात आले आहे. या विचाराने माझ्या सर्वांगाचा थरकाप होतो. मला वाटते, मी तुरुंगात आहे आणि रामसुंदर पंडित स्वतंत्र आहे. परमेश्वर त्यांना शांती व धैर्य देवो.

[आपला]
महम्मद शाह]

इंडियन ओपिनियन, २३-११-१९०७

२९४. पंडितजींची देशसेवा

कारागृहात जाऊन रामसुंदर पंडित यांनी केलेली सेवा अशी आहे की, बाहेर राहणाऱ्या कितीही थोर माणसाने केलेल्या सेवेला तिची सर येणार नाही. पंडितजींनी आपल्या स्वातंत्र्याचे दरवाजे उघडले आहेत. त्या दरवाज्यातून आपण सारे जण जाऊ शकतो. कारागृहात जाऊन पंडितजींनी कारागृहाला पवित्र बनविले आहे, हे काँग्रेसच्या अध्यक्षांचे मत बरोबर आहे. कारागृहात जाणारे सारे निरपराधी लोक त्याला पावन करतात.

पंडितजी आणि त्यांचे कुटुंब भाग्यवान आहे असे आम्ही मानतो. त्यांची कीर्ती सर्व दक्षिण आफ्रिकेत पसरली आहे. ती भारतातही पसरेल. खऱ्या सेवेचे फळ असेच असते. स्वदेशासाठी स्वतःचे बलिदान निःशंकपणे पंडितजींनी केले आहे. ही खरी सेवा होय, असे आम्ही मानतो.

आता समाज काय करणार? या प्रश्नाला एकच उत्तर असू शकते. पंडितजींना तुरुंगात पाठविल्यानंतर जर एखादा हिंदी माणूस या दुष्ट कायद्याला मान्यता देईल तर तो ' माणूस ' या नावाला पात्र आहे असे आम्हांस वाटत नाही. आपण सुरू केलेला लढा हा काही पोरखेळ नाही. त्याच्या विजयाची फळे आपल्याला तत्काळ चाखावयास मिळणार नाहीत. आपले जे साध्य आहे, ते मामुली नाही. त्याला योग्य असा स्वार्थत्याग आपल्याला करावा लागेल. आपण प्रामाणिक आहोत आणि केवळ बाह्य देखावा करीत नाही अशी सरकारला खात्री पटण्यासाठी जरूर तितक्या वेळा आणि जरूर तितक्या संख्येने आपल्याला तुरुंगात जावे लागेल.

हद्दपार करण्याची सरकारची भाषा व्यर्थ आहे, हे या खटल्यावरून सिद्ध झाले आहे. कच्च्या दिलाच्या हिंदी लोकांनी ही गोष्ट ध्यानी घेतली पाहिजे.

पंडितजींच्या प्रकरणाचा सर्वांत मोठा लाभ आम्हांला जो दिसतो, तो म्हणजे हिंदु व मुसलमान यांचे पूर्ण ऐक्य साधले आहे. हे कार्य साऱ्या हिंदी लोकांचे आहे, याची जाणीव दोन्ही जमातींना झालेली आहे. या लढ्यापासून व या खटल्यापासून हा एकच फायदा झाला, असे जरी कोणी म्हटले तरी आम्हांला संतोष आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २३-११-१९०७

२९५. निरोधकांवरील खटले

प्रिटोरिया येथे पकडलेल्या निरोधकांच्या बाबतीत आपल्याला एक अनपेक्षित विजय मिळाला आहे. त्यांची तपासणीही केली जाणार नाही, अशी कोणाची अपेक्षा नव्हती. खटला चालू असतांना, फिर्यादीतर्फेच्या साक्षीदाराने कबूल केले की, लछमनला कुणीही मारहाण केली नाही. या खटल्यावरून हे दिसून येते की, सरकारचे सामर्थ्य संपले आहे, म्हणून ते बेफाम झाले आहेत. त्यांची चेष्टा त्यांची स्वतःचीच पत्रे करीत आहेत.

निरोधकाने दाखविले तसे धैर्य इतरही लोक दाखवितील, अशी आम्हांला उत्कट आशा आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २३–११–१९०७

२९६. काँग्रेसचे प्रतिनिधी

[हिंदी राष्ट्रीय] काँग्रेसला प्रतिनिधी पाठविण्याचा ठराव ट्रान्सवॉल ब्रिटिश इंडियन असोसिएशनने केला, याबद्दल त्या संस्थेचे अभिनंदन केले पाहिजे. येथून जाणारे जे पाच प्रमुख व्यापारी काँग्रेसला हजर राहून जोरदार आवाहन करतील, त्याचा काही ना काही चांगला परिणाम घडून आल्याशिवाय राहणार नाही. ते आवाहन योग्य वेळी होत आहे– म्हणजे त्यावेळी ट्रान्सवॉलमधील पुष्कळ हिंदी लोक तुरुंगाची मौज लुटीत असतील.

या प्रतिनिधींवर मोठी जबाबदारी आहे. त्यांनी सर्व हिंदुस्थानात जोरदार मोहीम चालवावी. श्री अमीरुद्दीन यांनी येथील परिस्थिती समक्ष पाहिली आहे आणि आता ते तिकडे जात आहेत, म्हणून त्यांच्यावर सर्वात मोठी जबाबदारी आहे. काँग्रेस संपल्या नंतरही त्या प्रतिनिधींना पुष्कळ काम करता येण्यासारखे आहे.

श्री. अमीरुद्दीन यांचे छायाचित्र पुढील अंकी प्रसिद्ध करण्याचा आमचा मानस आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २३-११-१९०७

२९७. केपमधील हिंदी लोक जागे केव्हा होणार ?

केपमधील हिंदी लोकांनी जागृत होण्याची तीव्र निकड आहे, असे आम्ही वारंवार म्हटले आहे. हिंदी लोकांना परवाने देण्याला प्रतिबंध करण्यासाठी कोणते प्रयत्न चालू आहेत, याची हकीकत आम्ही गेल्या अंकी दिली होती. त्या दृष्टीने आम्ही केपच्या हिंदी लोकांना पुनश्च विचारतो, तुम्ही किती काळ झोपून राहणार ? थोड्या दिवसांपूर्वी, आम्ही असे दाखवून दिले होते की, केपच्या प्रवेश कायद्यांने जो जुलूम होत आहे, त्याला कारण हिंदी लोकांचा गाफीलपणा हेच आहे. त्यानंतर जागृतीची काही चिन्हे दिसू लागली होती. पण ती जागृती पुनः थंडावली असे दिसते. याचा परिणाम म्हणजे, प्रवाशांच्या अडचणी कायम असतानाच परवान्याचा प्रश्न त्यांना भेडसावीत आहे. वरिष्ठ न्यायमंदिरात अपील करण्याचा हक्क बुडाला, त्याचीही जबाबदारी खुद्द हिंदी लोकांवरच आहे, हे आम्हांला सांगितले पाहिजे. त्या प्रश्नाच्या बाबतीत केपमधील लोकांनी, नाताळातील परिस्थितीपासून बोध घेऊन निकराचा लढा देणे जरूर होते, पण तसे काही घडले नाही, याचा खेद वाटतो. पार्लमेंटपुढे बिल आले असताना, ते लोक अगदी स्वस्थ राहिले. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या कानी-कपाळी ओरडून हे सांगितले पाहिजे की, बाबांनो, तुम्ही या देशात आला आहात, तर सारा वेळ तुम्हाला झोपून काढता येणार नाही. आपल्याभोवती लष्करी छावणी उभारलेली आहे. सारे लोक आपल्या विरुद्ध आहेत. जर आपण आळशी राहिलो आणि समाजाच्या कल्याणाकडे लक्ष दिले नाही तर, भावी काळात आपली आणि आपल्या वंशजांची दशा शोचनीय होण्याचा फार संभव आहे. म्हणून, केपमधील आमच्या बांधवांना आम्ही पुनः सांगतो, आजपासून तुम्ही या प्रश्नाबाबत दक्ष राहा. नाहीतर तुम्हांला अधूनमधून चिमटे काढणारे शत्रु तुमची येथून उचलबांगडी करण्यास कमर कसून उभे आहेत, आणि ते तुम्हांला ट्रान्सवॉलमधील दुर्दशेस नेऊन पोहोचवितील.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २३-११-१९०७

२९८. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

रामसुंदर पंडितांचा खटला

हा खटला जुन्या कायद्याप्रमाणे चालला की नव्या कायद्याप्रमाणे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. पण त्याचा निकाल करणे अगदी सोपे आहे. त्यांना जे समन्स देण्यात आले, त्यामध्ये नव्या कायद्याच्या १७ व्या कलमाचा उल्लेख केलेला आहे. आणि ते कलम जर त्यांना लागू पडले नाही, तर पंडितजींचा बचाव अन्य रीतीने केला असता. शिवाय, या पत्राच्या वाचकांना हे ठाऊक आहे की, नव्या कायद्याप्रमाणे तात्पुरता परवाना घेण्यासही आपण असमर्थ आहोत, असे पंडितजींनी आपल्या पत्रात लिहिले होते. यावरून हा खटला नव्या कायद्याखाली येतो, असे माझे मत आहे. एवढेच नव्हे तर, या खटल्याने आपले हात पुष्कळच बळकट झाले आहेत, कारण त्यात पुष्कळच कायदेशीर मुद्दे आले आहेत. त्यात धर्मावर आघात आहे! शिवाय परवान्याची मुदत न वाढविण्याचे कारण किती मूर्खपणाचे आहे, हे दाखविलेले आहे. आणि, काही झाले तरी, पंडितजी हे एक पुढारी आहेत. याचा अर्थ सरकारने पुढाऱ्यावर हात टाकला आहे. खेरीज, ते पुरोहित आहेत आणि म्हणून कोणाच्या आड येणारे ते नाहीत. या साऱ्या गोष्टी लक्षात घेता, हा खटला अत्यंत खंबीर आहे असे सहजच, मानता येते. गोऱ्यांच्या मनावरही असाच परिणाम झाला आहे.

'प्रिटोरिया न्यूज'ची टीका

यावर टीका करताना, 'प्रिटोरिया न्यूज' म्हणते,[१] हिंदु लोकांना आपले धर्म-विधी करण्यास व त्यापासून शांती मिळविण्यास परवानगी देण्याचे सरकारने अकस्मात नाकारले, याला काही सबळ कारण दिसत नाही. सर्व गोष्टींचा विचार करता श्री. स्मट्स् यांनी कायद्याची अंमलबजावणी करण्याची धमकी खरी केली तर, हिंदु लोकांना बिकट परिस्थितीतून जावे लागेल. आणि त्यासाठी, त्यांना धैर्य प्राप्त व्हावे म्हणून, अशा धार्मिक समाधानाची गरज अधिक आहे. सरकारने घोडचूक केली आहे, असे आम्हांस वाटते. हुतात्मे—त्यातही धार्मिक हुतात्मे—निर्माण करणे ही चूक होय. श्री. पंडित हे आज धार्मिक हुतात्मे बनलेले आहेत. त्यांचे कृत्य बरोबर आहे, अशा

१. तारीख २३-११-१९०७ च्या 'इंडियन ओपिनियन'मध्ये छापलेला मूळ लेख येथे दिला आहे

सकारण विश्वासाने त्यांचे देशबांधव व धर्मबांधव त्यांना पाठिंबा देऊन, त्यांची प्रशंसा व गौरव करीत आहेत. यात सरकारने नक्की काय मिळविले हे समजणे कठीण आहे.

पंडितांच्या खटल्याचा परिणाम आता असा दिसतो की, गोऱ्या लोकांचीही सहानुभूती हिंदी लोकांकडे वळत आहे. हा खटला इतका महत्त्वाचा मानला जात आहे की, त्याला स्थानिक वृत्तपत्रांनी पुष्कळ जागा दिली आहे.

आणखी सहानुभूती

जोहान्सबर्ग येथील एक प्रमुख व्यक्ती आणि स्वतः धर्मगुरु असून, धर्मगुरूंच्या मंडळाचे अध्यक्ष असलेले श्री. फिलिप्स यांचे एक पत्र वर्तमानपत्रांत आलेले आहे, ते लक्षात घेण्यासारखे आहे. हिंदी लोकांनी खुषीने नोंदणी करण्याची तयारी दाखविली, याचे स्वागत करून त्यांनी सरकारला ही योजना मान्य करण्यास सुचविले आहे. त्यांचे पत्र[1] आम्ही अन्यत्र प्रसिद्ध केले आहे. याशिवाय श्री. मॅकिनटायर यांनी 'लीडर'मध्ये असे लिहिले आहे की, तेथे फक्त गुन्हेगारांनाच १० बोटांचे ठसे द्यावेत लागतात आणि सरकारने जर १० बोटांच्या ठशांची कल्पना सोडून दिली, तर त्यांना दरसाल ५०० पौंडांचा लाभ होईल. अशा प्रकारे आपल्याला सर्व बाजूंनी पाठिंबा मिळत आहे. खुषीची नोंदणी मान्य झाली आणि दहा बोटांचे ठसे घेणे बंद झाले, तर आम्हांला पाहिजे ते सारे मिळाले.

प्रिटोरियातील निरोधकांवरील खटला

या खटल्यावर टीका करताना 'प्रिटोरिया न्यूज' पुढीलप्रमाणे लिहीत आहे—

रामसुंदर पंडितांच्या खटल्यात सरकारने काहीच मिळविले नाही आणि गेल्या गुरुवारी प्रिटोरियातील काही निरोधकांना पकडून तर त्याहूनही कमी मिळविले. या खटल्यावरून असे निःशंकपणे सिद्ध झाले आहे की, धमकी निरोधक देत नाहीत, तर लोकांनी नोंदणी करावी म्हणून सरकारच दमदाटी करीत आहे.

अशी चिन्हे दिसत असताना, जर कोणी हिंदी माणूस आपल्या तोंडाला काळोखी लावून घेत असेल तर तो, "हिंदी" या नावास खचित पात्र नाही.

संप

पंडितजींना कैदेची शिक्षा झाली तेव्हा ट्रान्सवॉलमधील सर्व ठिकाणची दुकाने बंद होती. फेरीवाल्यांनी आपली फेरी थांबविली, वृत्तपत्रे विकणाऱ्या मुलांनी, आपल्या नुकसानीची पर्वा न करता, वृत्तपत्रे विकण्याचे थांबविले. दुसऱ्या दिवशी त्यांना वृत्तपत्रे देण्याचे एजंटांनी नाकारले. त्यामुळे ग्राहक वर्ग संतप्त झाला. वृत्तपत्र-विक्रेत्या मुलांना

१. ते येथे दिलेले नाही.

माफी-पत्रे लिहून द्यावी लागली आणि तरीही त्यांच्या आपदा संपल्या नाहीत. एकीकडे, सारा समाज नुकसान सोसण्यास तयार झाला असताना, दुसरीकडे ऑफर्टन येथील कमालखान नावाच्या व्यापाऱ्याने आपले दुकान उघडे ठेविले, तसेच हायडेलबर्ग येथील श्री. खोटा, आबुमिया कमरुद्दीन व आदम मामुजी पटेल यांनी आपापली दुकाने उघडी ठेवली. यामुळे सारा हिंदी समाज प्रक्षुब्ध झाला आहे.

फितुरांना शाबासकी

श्री. खमीसा व त्यांचे दोस्त यांच्याविषयी मला काही कटु गोष्टी लिहाव्या लागल्या. आता त्यांना धन्यवाद देण्याची संधी आली आहे, याचा मला आनंद वाटतो. श्री. खमीसा यांनी आणि इतर ज्या लोकांनी आपली तोंडे व हात काळे करून घेतले, त्यांनी समाजासाठी आपली दुकाने बंद ठेविली होती. पीटर्सबर्गमधील सर्वांनी तसेच केले. यावरून असे सिद्ध होते की, काठीने तोडले तरी पाणी तुटत नाही. एकाच देशाचे लोक एकमेकाविरुद्ध उठतील असे कदापि घडणार नाही. स्वार्थाचे विष नाहीसे झाले म्हणजे समाजाविषयीची सहानुभूती प्रकट झाल्याशिवाय राहणार नाही.

चॅमनींच्या खोड्या

असे काही लोक असतात की, जे काहीही चांगले करू शकत नाहीत. सध्या श्री. चॅमनी तशा मनोवृत्तीत आहेत. या ना त्या सबबीने, आमचा छळ करून, या गृहस्थांना आम्हांला नोंदणीपत्र घ्यावयास लावावयाचे आहे. त्यांचा नवा पराक्रम म्हणजे, जे लोक परवाने घेत नाहीत, त्यांना छळण्याची व्यवस्था त्यांनी आंधळ्या पोर्तुगीज सरकारशी केली आहे. पोर्तुगीज वकिलाच्या कचेरीत अशी सूचना लावलेली आहे की, 'डेलागोवाबे' मार्गाने हिंदुस्थानात जाण्याची ज्या हिंदी माणसाची इच्छा असेल त्याने नवे नोंदणीपत्र दाखल केले तरच त्याला डेलागोवाबे मध्ये प्रवेश करण्याची परवानगी मिळेल, आणि तसे त्याने केले नाही तरी चालेल; पण त्याने असे लिहून दिले पाहिजे की, ट्रान्सवालला परत येण्याचा माझा इरादा नाही. ही शुद्ध छळणूक आहे. सर्व प्रकारची प्रलोभने दाखवून हिंदी लोकांना नवे परवाने घेण्यास प्रवृत्त करावे, असा त्यांचा हेतु आहे. सक्तीच्या दृष्टीने याहून दुसरे काही करता येण्यासारखे नाही. डेलागोवाबेसाठी परवाने मिळाले नाहीत, तरी हिंदी समाज घाबरून जाणार नाही. ज्यांना हिंदुस्थानला जायची इच्छा आहे ते दुसऱ्या मार्गाने जातील. या बाबतीत प्रयत्न चालू आहेत.

'ट्रान्सवॉल लीडर'ची सूचना

'ट्रान्सवॉल लीडर'ची सूचना अशी आहे की, सरकारने हिंदी समाजाच्या पुढाऱ्यांची भेट घ्यावी आणि त्यांच्याशी विचारविनिमय करून या कायद्याच्या बाबतीत काही तडजोड घडवून आणावी. अशी तडजोड घडवून आणली नाही तर, सरकारला

पुढे पश्चात्ताप करावा लागेल. ‘ लीडर ’ हे ट्रान्सवॉलमधील एक अत्यंत वजनदार पत्र आहे, हे वाचकांनी लक्षात घ्यावे.

शाहजीसाहेबांची बहादुरी

शाहजीसाहेब यांना पंडितजींच्या तुरुंगवासामुळे फार दुःख झाले आणि म्हणून त्यांनी वृत्तपत्रांना पुढील[१] पत्र लिहिले.

केप टाऊनची सहानुभूती

केप टाऊन येथील ऑफ्रिकन इंडियन असोसिएशनने [ब्रिटिश इंडियन असोसिएशनला] आस्थापूर्ण व सहानुभूतिपूर्ण अशी तार पाठविली आहे आणि हायकमिशनरलाही अशी तार पाठविली आहे की, आपण मध्यस्थी करून हिंदी लोकांची दुःखे दूर करावीत आणि रामसुंदर पंडिताला मुक्त करावे. अशा तारा अनेक ठिकाणांहून आल्या आहेत. त्यांची ठिकाणे व त्यांतील मजकूर पुढील अंकी देण्याचा माझा विचार आहे.

अमीरुद्दीन यांना तार

श्री. अमीरुद्दीनचे भागीदार श्री. अब्दुल गफुर यांनी त्यांना पुढील तार पाठविली आहे.

तुमची जबाबदारी मोठी आहे. तुम्ही आपले कर्तव्य धैर्याने पार पाडा. आपल्यापासून आम्हांला मोठी आशा आहे. येथील लढ्यावर हिंदुस्थानची प्रतिष्ठा अवलंबून आहे. आम्ही स्वतंत्र होईपर्यंत आणि आमच्या वंशजांची स्वतंत्रता निश्चित होईपर्यंत विश्रांती घेऊ नका.

नोंदणी-कचेरीचे निर्वाणीचे प्रयत्न

निरोधकांविरुद्ध चाललेल्या खटल्यात लछमनने साक्ष दिली होती. खोटी साक्ष दिल्याबद्दल त्याला पकडण्यात आले आहे. खरोखर खटल्यात काही अर्थच नव्हता, म्हणून त्याला सोडून देण्यात आले. पण लछमनच्या खटल्यावरून हे स्पष्ट होते की, जो हिंदी माणूस नोंदणी-पत्र घेण्यास जाईल, तो आपल्या समाजाला काळीमा फासेल व आपल्या देशबांधवांना संकटात लोटेल, आणि तरीही त्याचा बचाव होणार नाही. हा खटला थेट करीम जमालच्या खटल्यासारखा झाला.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २३–११–१९०७

१. मूळ पत्रासाठी लेख २९३ पाहा. त्याच्याशी हे भाषांतर ताडून पाहिले आहे.

२९९. हमीदिया अंजुमनच्या सभेतील भाषण

[जोहान्सबर्ग
ता. २४ नोव्हेंबर, १९०७]

श्री. गांधी प्रतिनिधींच्या[१] पात्रतेविषयी बोलले. ते म्हणाले, " कॉंग्रेसमध्ये भाषण करणारे दुसरे लोक असतील म्हणून अधिक खर्च करण्याची सध्या गरज नाही. पैशाच्या टंचाईमुळे आपल्याला अधिक प्रतिनिधी नेमण्याचा प्रश्न सोडून द्यावा लागत आहे. वेळही थोडा आहे. पंजाबी व पठाण यांच्यासंबंधी लॉर्ड सेल्बोर्न यांना लौकरच पत्र पाठविण्यात येईल. तुर्कांनी खंबीर राहिले पाहिजे. गोऱ्यांची एक सभा भरली होती, तिच्या वृत्तांतावरून असे दिसते की, सरकार दमत चालले आहे. हिंदी समाज दृढ राहिला तर प्रत्येक गोरा माणूस त्यांच्या बाजूला येईल. गोऱ्यांचे शिष्टमंडळ डिसेंबरात जाईल. हिंदी लोक अखेरपर्यंत निश्चितपणे खंबीर राहतील की नाही याची सरकारला शंका वाटत आहे. पण जे लोक धैर्याने व ईश्वरावरील श्रद्धेने कार्य करीत असतात, त्यांना यश लाभते. प्रिटोरियातील निरोधकांचे धैर्य प्रशंसनीय आहे. त्यांना मेजर फ्यूज दररोज भेटत असतात. त्यापासून त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न मेजर कोडी यांनी केला. पण ते कोणाचेच ऐकत नाहीत. इत्यादी इत्यादी.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ३०-११-१९०७

[१] हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेसच्या आगामी अधिवेशनाचे प्रतिनिधी.

३००. गायकवाडांना अर्ज[1]

श्रीमंत गायकवाड सरकार
[बडोदा]
यांस,

[१] आपले अर्जदार आपले प्रजाजन आहेत आणि प्रामाणिकपणे चरितार्थाचे साधन मिळविण्यासाठी ट्रान्सवॉलला आलेले आहेत.

[२] आपल्या बहुतेक सर्व अर्जदारांचे ट्रान्सवॉलमध्ये मोठे हितसंबंध आहेत.

[३] ट्रान्सवॉलच्या पार्लमेंटने मंजूर केलेल्या आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाकडे अर्जदार आपले लक्ष आदरपूर्वक वेधीत आहेत.

[४] संरक्षित ब्रिटिश प्रजाजन म्हणून, ट्रान्सवॉलमधील इतर हिंदी प्रजाजनां-प्रमाणे, आपल्या अर्जदारांनी साम्राज्य सरकारकडे पूर्वीच दाद मागितली आहे हे आपणास कदाचित् माहीत असेल.

[५] या कायद्याच्या बाबतीत, नेक नामदार वासाहतिक सचिवाकडे आम्ही जे निवेदन सादर केले, त्याची प्रत सोबत जोडली आहे. त्यात सर्व आक्षेप नमूद केलेले आहेत.

[६] साम्राज्य सरकारने मध्यस्थी करण्याचे प्रत्यक्ष नाकारले आहे. प्रस्तुत कायदा विशेषच अपमानकारक व उपमर्दकारक आहे. त्याला मान्यता न देण्याची पवित्र शपथ आपल्या अर्जदारांनी घेतली आहे. म्हणून, ज्याला ‘ सविनय प्रतिकार ’ म्हणतात, अशी मोहीम आम्ही सुरू केली आहे आणि सर्वस्वावर तुळशीपत्र ठेवले आहे. स्थानिक सरकारने तुरुंग-वास, हद्दपारी आणि इतर शिक्षा यांची भीती घातली आहे, पण त्या सर्व शिक्षा सुसह्य आहेत. आणि वरील कायद्याने लादलेले जोखड वाहण्यापेक्षा त्या शिक्षा सोसणे चांगले असे आपल्या अर्जदारांस वाटत आहे.

१. ‘ ट्रान्सवॉलमध्ये वास्तव्य करणाऱ्या, गायकवाड सरकारच्या प्रजाजनांकडून ’ हा अर्ज पाठविण्यात आला. तो ता. ३०–११–१९०७ च्या ‘इंडियन ओपिनियन’मध्ये प्रसिद्ध झाला. त्याची एक प्रत वासाहतिक उपसचिवाला एल्. डब्ल्यू. रिच् यांनी २३ डिसेंबर १९०७ रोजी सादर केली.

[७] आपली सहानुभूती व सक्रिय हस्तक्षेप मिळाल्यास आपल्या अर्जदारांना मोठें प्रोत्साहन लाभेल आणि साम्राज्य सरकार व हिंदुस्थान सरकार यांचे हात बळकट होतील.

[८] यास्तव, आपले अर्जदार असा विश्वास आदरपूर्वक बाळगत आहेत की, आपण आपल्याला योग्य वाटेल त्या मार्गाने, आपले संरक्षण आम्हांस द्याल. या आपल्या न्यायपूर्ण व दयापूर्ण कृत्याबद्दल आम्ही आपले निरंतर ऋणी राहू.

कलोनियल ऑफिस रेकॉर्ड्स
सी. ओ. २९१।२२

३०१. हाय कमिशनरला अर्ज[1]

[जोहान्सबर्ग
ता. २६ नोव्हेंबर १९०७ पूर्वी]

नेक नामदार
दक्षिण आफ्रिकेचे हाय कमिशनर,
यांचे सेवेसी,

खाली सह्या करणाऱ्या लोकांचा हा अर्ज असे दाखवीत आहे की,—

[१] आपले अर्जदार जुने हिंदी सैनिक आहेत. त्यांत ४३ पंजाबी मुसलमान, १३ शीख व ५४ पठाण आहेत.

[२] आपले सारे अर्जदार ब्रिटिश प्रजाजन आहेत. गेल्या युद्धाच्या वेळी उभारलेल्या वाहतूक पथकामध्ये त्यांपैकी बहुतेकांना या वसाहतीत आणले गेले. जेव्हा आपले अर्जदार दक्षिण आफ्रिकेस आले, तेव्हा त्यांना त्यांच्या अधिकाऱ्यांनी

१. माजी ११५ हिंदी सैनिकांच्या वतीने, गांधीजींनी हा अर्ज 'हाय कमिशनरला पत्र [लेख ३१२] याबरोबर पाठविला. या अर्जाची एक प्रत एल्. डब्ल्यू. रिच् यांनी वासाहतिक उपसचिवाला २३ डिसेंबर १९०७ रोजी पाठविली.

सांगितले होते की, युद्ध संपल्यावर तुम्हांला दक्षिण आफ्रिकेच्या कोणत्याही भागात वास्तव्य करता येईल व सन्माननीय उद्योग मिळविता येईल.

[३] चित्रळची मोहीम,[1] तीरायुद्ध,[2] व इतर लढाया यांमध्ये आपले काही अर्जदार ब्रिटिश निशाणाखाली लढले आहेत.

[४] शांतता संरक्षक वटहुकूम व १८८५ चा ३ रा कायदा याअन्वये, आपल्या बहुतेक अर्जदारांना, परवाने व नोंदणी-पत्रे मिळाली आहेत. आपले अर्जदार युद्धापूर्वी ट्रान्सवॉलचे रहिवासी नव्हते, पण त्यच्या त्यांच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या सेवा-मुक्ति-पत्राऐवजी त्यांना परवाने देण्यात आले होते.

[५] काही थोडे अपवाद सोडल्यास, आम्ही सर्वजण सध्या बेकार आहोत, आणि त्याचे मुख्य कारण आशियावासी नोंदणी कायद्याविरुद्ध चाललेला लढा हे आहे. काही बाबतीत त्यांनी नोंदणी न केल्याबद्दल त्यांच्या मालकांनी त्यांना बडतर्फ केले आहे. दुसऱ्या काही लोकांनी नोकरीसाठी अर्ज केले असताना, त्यांना असे सांगण्यात आले की, नव्या कायद्याप्रमाणे तुम्ही नोंदणी करून घेतल्यास तुम्हांस नोकरी मिळेल.

[६] आपल्या अर्जदारांचे असे नम्र मत आहे की, हिंदुस्थानात कधीही अनुभवास न आलेला अपमान या आशियावासी कायद्यामुळे होत आहे. आणि सैनिक म्हणून जो स्वाभिमान व जी प्रतिष्ठा आमच्या अंगी आहे, तिला न शोभणाऱ्या अवस्थेस हा कायदा आम्हांस पोचवीत आहे. म्हणून त्याला मान्यता देणे शक्य नाही.

[७] राजनिष्ठ ब्रिटिश प्रजाजन या नात्याने आम्ही साम्राज्याची सेवा केली आहे, याचा पुरावा कोणत्याही नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यापुढे मांडण्यास आपले अर्जदार पूर्ण राजी आहेत.

[८] आपले अर्जदार हिंदुस्थानला परत जाऊ शकत नाहीत, आणि तेथे आपल्या निर्वाहाचे साधन शोधू शकत नाहीत.

[९] हाय कमिशनर व दक्षिण आफ्रिकेतील साम्राज्यविषयक हितसंबंधांचे विश्वस्त या नात्याने आपण आमचे संरक्षण करावे, अशी आपले अर्जदार सादर प्रार्थना करीत आहेत.

१. १८९५ मध्ये.

२. १८९७-९८ मध्ये.

[१०] यास्तव, आपले अर्जदार आपल्याला अशी विनंती करीत आहेत की, प्राप्त परिस्थितीत आपल्याला शक्य असेल ती मदत आपण द्यावी. त्या आपल्या दयापूर्ण व न्यायपूर्ण कृत्याबद्दल आम्ही आपले निरंतर ऋणी राहू.

[आपला,
नवाबखा फजली इलाही]

कलोनियल ऑफिस रेकॉर्ड्स्,
सी. ओ. २९१।२२

३०२. अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या अध्यक्षास पत्र

[जोहान्सबर्ग,
ता. २६ नोव्हेंबर १९०७ पूर्वी]

[अध्यक्ष,
अखिल भारतीय मुस्लीम लीग
कलकत्ता,
महाशय,]

आशियावासी नोंदणी कायद्याच्या बाबतीत, ट्रान्सवॉलमधील अन्य भारतीय संस्थांबरोबर, माझ्या संस्थेने ज्या लढ्यात भाग घेतला आहे, त्यासंबंधात मी आपल्याला काही लिहावे असे माझ्या संस्थेने मला सांगितले आहे.

हमीदिया इस्लामिया अंजुमनने हिंदी मुसलमानांना जे परिपत्रक[1] पाठविले ते आपण खचित पाहिले असेल. स्थानिक राजकारणाकडे लक्ष न देता, सर्व हिंदी संस्थांकडे आम्ही दाद मागितली आहे. आशियावासी कायद्यामुळे ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांची दशा कशी होईल, याविषयी दुमत नाही. आम्हांला सोसाव्या लागणाऱ्या अपमानास्पद वागणुकीचा निषेध जोराने व एकजुटीने व्हावा, असे आम्हांस वाटते.

१. पाहा, ' हिंदी मुसलमानांना आवाहन ' लेख १३७

म्हणून, ट्रान्सवॉल्मधील हिंदी लोकांच्या बाजूने लीगचे मत आपण वळवाल, असा विश्वास माझ्या संस्थेस वाटत आहे.

इंडियन ओपिनियन ३०-११-१९०७

[आपला,
इमाम अब्दुल कादीर सलीम बावजीर
हंगामी अध्यक्ष, हमीदिया इस्लामिया
अंजुमन]

३०३. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

[मंगळवार, ता. २६ नोव्हेंबर १९०७]

संस्थेचे हिशेब

हे हिशेब[१] जाहिरातीसह प्रसिद्ध केलेले आहेत. त्याकडे मी ट्रान्सवॉल्मधील प्रत्येक हिंदी माणसाचे लक्ष वेधतो. त्या हिशेबावरून हे दिसून येईल की, आता संस्थे-जवळ फक्त १४० पौंड १८ शि. १ पेन्स शिल्लक आहे. शिवाय, यातील २५ पौंड श्री. आल्ब्रेट यांना दिलेले आहेत. संस्थेने भगीरथासारखी कामगिरी शिरावर घेतली आहे. कार्याच्या मानाने द्रव्य अत्यंत अल्प आहे. या संस्थेइतकी काटकसरीने काम करणारी दुसरी संस्था आम्हांस माहीत नाही. तिचा चालू खर्च १० पौंडांच्या आत आहे. पण आता तारा वगैरेसाठी खर्च वाढेल. भाड्यासाठी काहीच खर्च होत नाही. खर्चाचा बहुतेक सारा भार जोहान्सबर्गने उचलला आहे. रस्टेनबर्गचा कित्ता इतर शहरांनी गिरविला तर संस्थेला थोडेफार सहाय्य होईल. अगदी अलिकडे रस्टेनबर्ग येथून १५ पौंडांची रक्कम आली. या उदाहरणाचे अनुकरण इतर शहरांनी करावे.

ते आम्हांला कसे वेढतात ?

डेल्यागोवावेला जाणे आपल्याला बिकट करून सोडण्यासाठी श्री. चॅमनी काय करीत आहेत, हे मी पूर्वीच दाखविले आहे. आता, फोक्सरस्टवर संकट आल्याचे

१ पाहा. परिशिष्ट ७

दिसते. नाताळमधून जाऊ इच्छिणाऱ्या हिंदी माणसाचा परवाना फोक्सरस्ट किंवा चार्लसटाऊन येथे तपासला जावा, अशी सूचना आल्याचे आम्हांस कळते. त्याला पुढे जाऊ देण्यापूर्वी त्याच्या अंगठ्याचा ठसा घ्यावा. याचा हेतु असा आहे की, लढा चालू असताना जे लोक हिंदुस्थानला जातील, त्यांची नोंद केली जावी. ते परत येतील तेव्हा त्यांचा छळ करणे शक्य होईल. या बाबतीत मला असा इशारा द्यावासा वाटतो की, ट्रान्सवॉलच्या बाहेर जाताना परवाना दाखविण्याची सक्ती कोणावर नाही. अंगठ्याचा ठसा देण्याचीही गरज नाही. यांतील कोणतीही गोष्ट वस्तुतः आक्षेपार्ह नाही. पण सरकार जर आपल्याला छळू पाहात असेल, तर त्याला तसे करू देता कामा नये. हे सर्व त्रास कोणत्याही लढ्यात आनुषंगिक असतात. त्यामुळे आपण घाबरून जाऊ नये. आता काय होईल, हा प्रश्न आपल्या चित्तात मुळीच येता कामा नये.

बहादुरीचे उदाहरण

श्री. महम्मद मुसा पारेख, न्यूकॅसलहून लिहितात की, हा कायदा मोडण्यासाठीच येत्या डिसेंबरपूर्वी मी वॉकरस्ट्रूममध्ये येऊन राहणार आहे. ते पुढे म्हणतात,

अशी हजारो [नोंदणी] कार्यालये स्थापन केली, तरी त्याने काय होणार ? ईश्वराला साक्षी ठेवून, आणि त्याच्या प्रेषिताच्या वचनावर विश्वास ठेवून, ज्याने एकदा प्रामाणिकपणे शपथ घेतली, तो आपल्या मस्तकावर गुलामगिरीचा भार कदापि घेणार नाही.

श्री. पारेख आणि इतर सर्व हिंदी लोक असेच धैर्य अखेरपर्यंत टिकवितील अशी मला आशा आहे.

आशियावासीयांची भोजनालये

गोऱ्या मुनिमाची नेमणूक करावयास लावणारे निर्बंध नगरपालिकेने तयार केल्याचे वाचकांना आठवत असेल. त्याविरुद्ध, असोसिएशनने एक निवेदन सादर केले होते. आता सरकारने ते निर्बंध दुरुस्त करण्याचा हुकूम दिला आहे आणि तसे करण्यास नगरपालिकेने संमती दिली आहे.

बगीसंबंधीचे नियम

पहिल्या वर्गाच्या बगीतून प्रवास करण्यास काळ्या आदमीला मनाई करणारे नियम तयार करावेत अशी भाषा दीर्घकाळ चाललेली होती. आता नगरपालिकेने नियम केले आहेत. त्यांत अशी तरतूद आहे की, काळा बॅरिस्टर किंवा डॉक्टर अशा बगीचा उपयोग करू शकेल. याचा अर्थ असा की, अंगावर चिंध्या घातलेला किंवा दारू प्यालेला काळा बॅरिस्टर पहिल्या वर्गाच्या बगीतून जाऊ शकेल. पण चांगल्या

वेषातील श्रीमंत व्यापारी जाऊ शकणार नाही. शिवाय, बॅरिस्टर जाऊ शकेल, पण त्याची बायका-मुले जाऊ शकणार नाहीत. असे कायदे करणाऱ्या लोकांच्या मूर्खपणाला सीमा नाही. या नियमांविरुद्ध असोसिएशनने सरकारकडे एक अर्ज पाठविला आहे.

स्टँगरच्या हिंदी लोकांचा ठराव

रामसुंदर पंडिताच्या तुरुंगवासाबाबत पुष्कळ ठिकाणी सभा भरत आहेत व ठराव मंजूर होत आहेत. स्टँगर येथेही असेच घडले. श्री. दाऊद महम्मद सीदत, श्री. अहम्मद मुसा मेतर, श्री. मणिलाल चतुरभाई पटेल, श्री. अहम्मद मीठा यांच्या सह्यांनी पाठविलेल्या सहानुभूतीच्या तारा असोसिएशनकडे आलेल्या आहेत.

ज्यांनी तारा पाठविल्या व ठराव केले, त्या त्या सर्वांना असोसिएशन आभाराची पत्रे पाठवू शकले नाही. कारण, तसे करणे अशक्य होते. शिवाय जेव्हा लोक एखादी गोष्ट कर्तव्य म्हणून देशभक्तीने प्रेरित होऊन करतात, तेव्हा आभाराची गरज नसते. परस्परांना धन्यवाद देण्याची किंवा आभार मानण्याची ही वेळ नव्हे. केलेल्या कर्तव्याचे ज्ञान म्हणजेच आभार.

खोलवाड मद्रेसा (शाळा)

श्री. गुलाम महम्मद आजच्च मुंबईहून लिहितात की, मला ९२१ पौं. १० शि. मिळाले. त्या रकमेतून मद्रेसासाठी इमारत विकत घेण्याचा प्रयत्न ते करीत आहेत. पण चांगली इमारत घेण्याला ही रक्कम थोडी आहे, असे त्यावर आढळून आले. त्यांना विश्वस्त-पत्र व मुखत्यारनामाही मिळाला.

खाणीच्या क्षेत्रातील परवाने

सरकारने जोहान्सबर्ग येथे व इतर ठिकाणी, सुवर्णकायद्याप्रमाणे परवाने देण्याचे नाकारले आहे. त्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली होती की, हे प्रकरण कोर्टात न्यावे. पण आता सरकारकडून दुसरे पत्रक आले आहे. त्यात असे म्हटले आहे की, नव्या कायद्याशी चाललेला लढा विचारात घेता सरकार त्या मुद्द्यांबर लढाई देऊ इच्छित नाही आणि म्हणून जो कोणी, परवान्यासाठी अर्ज करील, त्याला तो मिळेल. हे उत्तर लक्षात ठेवण्यासारखे आहे. असे खटले करून आपली बदनामी करून घेण्यास सरकारला भीती वाटत आहे. मग, ७००० लोकांना तुरुंगात ठेवून आपली बदनामी करून घेण्यास सरकारला भीती वाटणार नाही काय?

कोकणी लोकांची सभा

सारे कोकणी लोक खंबीर आहेत की नाहीत, हे पाहण्यासाठी त्यांची एक सभा गेल्या रविवारी भरली होती. ही सभा हमीदिया हॉलमध्ये झाली. या प्रसंगी श्री. सालिम महम्मद अध्यक्षस्थानी होते. श्री. अब्दुल गनी यांनी आपल्या भाषणात सांगितले की,

" अखेरपर्यंत शरण न जाण्याचा माझा निर्धार आहे. जी शपथ मी इतरांना दिली, ती मी मोडणार नाही." श्री. इस्माइल खाँ, श्री. शाहबुद्दीन हसन, (रुडीपुर्टचे) श्री. हसनमिया, श्री. अब्दुल गफुर इत्यादी लोकांची भाषणे सभेत झाली. आणि त्या सर्वांनी हेच मत व्यक्त केले की, काहीही किंमत द्यावी लागली तरी आपण कायद्याला मान्यता देऊ नये. एखाद्या दुकानात काम करणाऱ्या प्रत्येक माणसाने, स्वतःचे नाव नोंदवावे की नाही, या प्रश्नाबाबतही पूर्वीचा निर्णय कायम करण्यात आला. तो म्हणजे तसे करण्याची मुळीच आवश्यकता नाही.

काँग्रेससाठी निधी गोळा करणे

(हिंदी) राष्ट्रीय काँग्रेससाठी येथे गोळा केलेला निधी ५० पौंडांवर गेला आहे. आणखी काही देणग्या मिळतील. त्यांची यादी मी पुढील आठवड्यात पाठवीन. वरील रकमेपैकी २५ पौंड तूर्त श्री. अमीरुद्दीन यांना पाठविण्यात आले आहेत. जास्तीची गरज लागली तर ५० पौंडांपर्यंत रक्कम पाठविण्याचे ठरले. शिष्टमंडळासंबंधी येथून हिंदुस्थानला केबल पाठविण्यासाठीही काही खर्च करण्यात आला. हे सारे हिशेब प्रसिद्ध केले जातील.

डेलागोवाबेमधील हिंदी लोकांची उदासीनता

येथील वृत्तपत्रावरून मला असे दिसते की, डेलागोवाबेमधील हिंदी समाज जागृत झाला नाही तर त्याची शोचनीय अवस्था होईल. तेथील व्यापार-मंडळाने असा ठराव केला आहे की, यापुढे हिंदी लोकांना मताचा अधिकार मिळणार नाही. हे सर्व अन्याय तेथील हिंदी लोकांनी, निषेध न करता, सहन केले, तर ती मोठी लांछनास्पद गोष्ट होईल. याशिवाय, ट्रान्सवॉल्मधून तेथे जाणाऱ्या हिंदी लोकांच्या मार्गात काटे पसरले जात आहेत. यामुळे, डेलागोवाबेमधील हिंदी लोकांमध्ये थोडे धैर्य उत्पन्न झाले तर चांगले होईल. तेथील श्रीमंत लोकांशी ज्यांचा संबंध आहे, अशा सर्व हिंदी लोकांनी त्यांना सतत लिहीत जावे, असे आम्ही आग्रहाने सांगतो.

गायकवाडांना अर्ज

नव्या कायद्यासंबंधी पुढील अर्ज सुमारे १५० लोकांच्या सह्यांनी गायकवाड-महाराजांकडे पाठविलेला आहे.[१]

डिसेंबरमध्ये काय करावे ?

या प्रश्नाचे उत्तर वाचण्यास आमचे पुष्कळ वाचक उत्सुक असतील, हा प्रश्न मी माझ्या पत्रात शेवटी ठेवला आहे, पण खरोखर तो प्रथम यावयास हवा.

१. पाहा. ' गायकवाडांना अर्ज ' लेख ३००

काय करता येईल ?

काय करावे याचा निकाल करण्यापूर्वी, काय करता येईल याचा विचार आपण केला पाहिजे. शारीरिक बळाने आपल्याला हद्दपार करण्याचा अधिकार सरकारला नाही, हे आपण पाहिले आहे. मग एकच गोष्ट राहिली, व ती म्हणजे आपल्याला तुरुंगात टाकणे. कायद्याच्या ८ व्या कलमाप्रमाणे, पोलीस कोणाही हिंदी माणसाजवळ नवे नोंदणी-पत्र मागू शकतो. ते ज्याच्याजवळ नसेल त्याला मॅजिस्ट्रेटपुढे उभे करता येते. तेथे त्याला ठराविक मुदतीत देश सोडून जाण्याची नोटीस देण्यात येते. तो हुकूम त्याने मानला नाही तर, त्याला पुनः पकडण्यात येईल आणि ६ महिनेपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा त्याला देण्यात येईल. या कलमाप्रमाणे खटला चालला असता, दंड करण्याचा अधिकार मॅजिस्ट्रेटला नाही. आपण जर कायदा वाचला तर आपल्याला कळून येईल की, कोर्ट कोणालाही नोंदणीसाठी अर्ज करण्याचा हुकूम देऊ शकेल. अशा प्रकारे, कोणाचा खटला चालविण्याऐवजी सरकार त्याच्यावर तसा अर्ज न केल्या-बद्दलही खटला भरू शकेल. अर्ज न केल्याच्या गुन्ह्याला १०० पौंड दंड किंवा तुरुंग-वास अशी शिक्षा आहे. सरकार प्रत्येक हिंदी माणसाला या रीतीने वागवू शकेल— म्हणजे प्रत्येक हिंदी माणसाला तुरुंगात टाकू शकेल. पण एखादी गोष्ट करण्यास समर्थ असणे वेगळे आणि ती प्रत्यक्ष करणे वेगळे. सरकार प्रत्येक हिंदी माणसाला पकडून तुरुंगात डांबील, ही कल्पना मला अशक्य वाटते, आणि म्हणून मी ती कल्पना विचारा-तून काढून टाकतो.

काही धरपकडी अवश्य होणार

तथापि काही हिंदी लोकांना पकडण्यात येईल हे निश्चित. धरपकडीच्या पहिल्या फेऱ्यात जास्तीत जास्त शंभर माणसे असतील असे मला वाटते.

आपली सत्त्वपरीक्षा

आपली सत्त्वपरीक्षा करण्यासाठी प्रत्येक ठिकाणच्या थोड्या हिंदी लोकांना पकड-ण्यात येईल, असा संभव आहे. तसे झाले तर आपला लढा लौकर संपेल. सर्व ठिकाणी एकाच वेळीं धरपकडी झाल्या, तरी लोकांनी घाबरून जाऊ नये. अशा धरपकडी झाल्या, तर प्रत्येक ठिकाणी जाणे श्री. गांधींना शक्य होणार नाही. त्यांना तसे करण्याची गरजही नाही. एखाद्या माणसाला पकडण्यात आले की लगेच जोहान्सबर्ग येथील असोसिएशनला तार करण्यात यावी.

जामिनासाठी अर्ज नको

पकडलेल्या माणसाने जामीन देऊ नये, वकीलही देऊ नये. खटला चालण्याच्या दिवशी तो कोर्टात जाईल तेव्हा त्याने असे सांगावे—

माझा कायद्याला विरोध आहे. मी ट्रान्सवॉलचा खराखुरा रहिवासी आहे. माझ्याजवळ खरा परवाना आहे. या कायद्यामुळे आम्ही मानव राहात नाही. आमचा धर्मही नष्ट होतो. म्हणून, मी त्याला मान्यता देणार नाही. आमचा सर्व समाज त्याच्याविरुद्ध आहे. देश सोडून जाण्याची नोटीस सरकारने माझ्यावर बजावली तर ती मी मान्य करणार नाही. म्हणून मला जी काही शिक्षा द्यावयाची असेल ती आताच दिली जावी. नोटीस द्यावयाची असेल तर ती शक्य तितक्या थोड्या वेळाची दिली जावी.

हे त्या माणसाने स्वतः दुभाष्यामार्फत सांगावे.

नोटीस दिली जाईल

त्यानंतर नोटीस दिली जाईल असा संभव आहे. नोटिशीची मुदत संपल्यावरही वकिलाची गरज लागणार नाही. नोटिशीची मुदत संपेपर्यंत तो माणूस स्वतंत्र राहील. त्या मुदतीत त्याला स्वतःच्या खाजगी व्यवहाराची जरूर ती व्यवस्था करता येईल.

नोटिशीची मुदत संपल्यावर

नोटिशीची मुदत संपल्यावर त्याला पुनः पकडण्यात येईल. त्या वेळी नवा जबाब द्यावयाचा नाही. त्याने एवढेच म्हणावे — मी पूर्वी सांगितले, त्यापेक्षा अधिक काही मला सांगावयाचे नाही. नंतर त्याला जी शिक्षा होईल ती त्याने भोगावी. बाहेरच्या लोकांनी या शिक्षेविषयी तत्काळ तार पाठवावी. त्या तारेत, त्या माणसाला कुटुंब आहे काय, ते कोठे राहाते, त्याच्या चरितार्थाची सोय त्याने काही करून ठेविली आहे का समाजाकडे सोपविली आहे ? इ. तपशीलवार माहिती द्यावी.

जेथे जरूर असेल, तेथे [पकडलेल्या माणसाच्या] कुटुंबियांचे पालनपोषण, त्या माणसाची तुरुंगातून सुटका होईपर्यंत, समाजाकडून केले जाईल, हे लक्षात ठेवावे. रामसुंदर पंडिताच्या कुटुंबाची जबाबदारी जर्मिस्टनच्या हिंदी लोकांनी स्वीकारली. त्याचप्रमाणे, प्रत्येक ठिकाणच्या लोकांनी आपल्या कार्यकर्त्याची जबाबदारी स्वीकारणे उत्तम. पण हे शक्य नसेल तर, असोसिएशन काही व्यवस्था खात्रीने करील.

सरकारने जोहान्सबर्गवर आघात केला नाही, तर गांधी तेथे गुंतले जाणार नाहीत. जेथे हिंदी लोकांना पकडण्यात येईल, अशा कोणत्याही ठिकाणी ते जातील आणि [फी न घेता] बचाव करतील. त्यांच्या प्रवासाचा खर्च त्या शहराने सोसणे योग्य होईल. तेही शक्य झाले नाही तर, असोसिएशन तो खर्च देईल आणि श्री. गांधी त्या ठिकाणी उपस्थित राहतील.

तुरुंगात गेलेल्या माणसाच्या उद्योगधंद्यासंबंधी सांगण्याची काही गरज नाही. त्याने त्याची व्यवस्था आगाऊच लावून ठेवलेली असेल. सरकार कोणालाही आपले दुकान बंद ठेवण्यास सक्ती करू शकणार नाही. तसेच ते दंड वसूल करण्यासाठी

त्याच्या मालाचा लिलाव करू शकणार नाहीत. एखाद्या दुकानातील साऱ्या माणसांना एकदम अटक होईल, असे संभवनीय नाही. तुरुंगात राहूनही प्रत्येकाला आपल्या उद्योगधंद्याकडे लक्ष देता येईल. त्याने पत्रे लिहावीत किंवा निरोप पाठवावेत.

बाहेर राहिलेल्या लोकांनी काय करावे ?

एका किंवा अधिक हिंदी लोकांना तुरुंगात टाकले गेले, तर मागे राहिलेल्यांनी (आपल्या पाळीची) वाट पाहात बसावे, हा उत्तम मार्ग. जर एखादा माणूस घाबरून गेला, आणि आपल्यालाही अटक होईल या भीतीने नोंदणी करण्यासाठी धावू लागला, तर तो देशाचा शत्रु ठरेल, आणि हिंदी समाजाला त्याने काळिमा फासला, असे होईल.

खरी परीक्षा

पुढाऱ्यांना अटक झाली म्हणून घाबरून न जाता, जेव्हा जनता कायदा धिक्कारण्यास अधिक धीट बनेल, तेव्हाच खरी परीक्षा होईल. तीत आपण पूर्णपणे यशस्वी झालो म्हणजेच हा कायदा रद्द होईल हे निश्चितपणे समजून असावे.

ता. २ डिसेंबर रोजी

ता. २ डिसेंबर रोजी हिंदी लोकांनी आपल्याला आपल्या घराच्या चार भिंती-मध्ये कोंडून घेऊ नये. फेरीवाल्यांनी भीतीने फेरीवर जाण्याचे थांबवू नये. त्यांनी आपला धंदा धडाडीने चालवावा. त्या दिवशी आणि त्यानंतरही जणु काही, काही घडलेच नाही असे समजून, लोकांनी आपले काम चालू ठेवावे. हा स्वातंत्र्याचा लढा आहे. म्हणून, प्रत्येक वेळी धैर्याची गरज आहे. धैर्याविना यश नाही.

हेलूचा बदल

श्री. हेलू यांनी मशिदीतील एका सभेत, आपल्या तोंडाला काळिमा लावल्या-बद्दल माफी मागितली आणि रजिस्ट्रारकडे पुढील पत्र[1] पाठविले.

महाशय,

“ ता. १२ ऑक्टोबर १९०७ रोजी मला देण्यात आलेले नोंदणी-पत्र मी या-सोबत परत करीत आहे. असे करताना, मला ही जाणीव पूर्णपणे आहे की, कायद्याचे जे जोखड मी माझ्या खांद्यावर घेतले आहे, ते फेकून देणे मला शक्य नाही. पण ज्या परिस्थितीत मी आहे, तीत मला कमीत कमी एवढेच करता येईल. खरे पाहिले

१. ता. ३०-११-१९०७ च्या इंडियन ओपिनियनच्या इंग्रजी विभागातून हे पत्र येथे घेतले आहे.

तर, मी जेव्हा जोहान्सबर्गमधील व्हॉन ब्रँडीस् स्क्वेअरमधील तात्पुरत्या कार्यालयात नोंदणीसाठी गेलो, तेव्हा माझ्या मनात संमिश्र भावना उसळत होत्या—एकीकडे, माझा सावकार मला कायदा मानण्याचा आग्रह करीत होता, नाहीतर माझा माल विकून टाकण्याचा धाक घालीत होता. दुसरीकडे, माझ्या शरणागतीची मला लज्जा वाटत होती. पण त्या वेळीं लज्जेची तीव्रता माझ्या ध्यानी आला नाही. मी धाकाला शरण गेलो.

" आता माझे जीवन असह्य झाले आहे, असे मला दिसते. माझे देशबांधव व माझे धर्मबांधव मला टाळीत आहेत. माझी बहीण व माझे इतर नातलग मला लिहितात की, 'तुमचा आमचा संबंध काही राहिला नाही. कारण गंभीरपणे घेतलेली शपथ तुम्ही मोडली असल्याने कुटुंबात राहाण्यास नालायक ठरला आहात.' माझी मालमत्ता मजजवळ राहिली तरीही ती मला भारभूतच होईल. कारण ज्यांच्याशी मी सहकार्य केले आणि ज्यांनी माझ्याशी सहकार्य केले, ते मला आपल्या कक्षेबाहेर ठेवीत आहेत. ता. ३१ जुलै रोजी प्रिटोरिया येथे भरलेल्या सार्वजनिक सभेत कचखाऊ मेमनांचा निषेध करणाऱ्यांपैकी मी एक होतो. त्या मेमनांनी ऐहिक गोष्टींचा मोह धरून, पवित्र प्रतिज्ञेचा भंग केला होता आणि कायद्याने लादलेली गुलामगिरी पत्करली होती. पण जेव्हा माझ्यापुढेही द्रव्याचा लोभ उभा राहिला, तेव्हा त्या परीक्षेत मी फसलो. त्याचा परिणाम जो झाला, तो मी नाहीसा करू शकत नाही. पण हे प्रमाणपत्र परत करून, मी माझी विवेकशक्ती काही प्रमाणात तरी परत मिळवीत आहे, याचे समाधान मला वाटते.

" माझे उदाहरण माझ्या इतर देशबांधवांना इशारा म्हणून उपयोगी पडेल आणि तुम्ही अमलात आणीत असलेला नोंदणी कायदा अस्तित्वात आहे तोपर्यंत ते माझे देशबांधव तुमच्या कचेरीकडे ढुंकूनही पाहणार नाहीत, असा मला विश्वास वाटतो. "

शिवाय, हे पत्र वृत्तपत्राकडे पाठविताना श्री. हेलू यांनी असेही कळविले आहे की, माझ्या कुत्र्याला विष घातल्याचे जे वृत्तपत्रात आले आहे, ते खोटे आहे.

हमीदिया इस्लामिया अंजुमनचे पत्र

या संस्थेने अखिल भारतीय मुस्लीम लीगच्या अध्यक्षांना पुढील पत्र पाठविले आहे.[1]

" आशियावासी कायद्याकडे माझी संस्था आपले लक्ष वेधीत आहे. हमीदिया इस्लामिया अंजुमनने हिंदी मुसलमानांना पाठविलेले परि-पत्रक आपण पाहिलेच असेल. आम्ही सर्व हिंदी संघटनांकडे, त्यांचा राजकीय स्थानिक रंग लक्षात न घेता, दाद

१. येथे सारांश दिला आहे मूळ पत्रासाठी पाहा 'अखिल भारतीय मुस्लीम लीगच्या अध्यक्षांना पत्र' लेख १०१.

मागितली आहे. या प्रश्नावर दुमत नाही. या बाबतीत जोराने व एकजुटीने निषेध झाला पाहिजे असे वाटते. म्हणून, अखिल भारतीय मुस्लीम लीग या कायद्याचा निषेध करील असा विश्वास माझ्या संस्थेस वाटतो.''

गोऱ्यांच्या शिष्टमंडळाचे काय झाले ?

काही गोरे सरकारकडे शिष्टमंडळ नेण्याच्या विचारात आहेत, असे मी पूर्वीच कळविले आहे. अद्याप ते शिष्टमंडळ गेलेले नाही. त्यामुळे कांही हिंदी लोक अधीर झाले आहेत. ही अधीरता म्हणजे भीतीचे लक्षण आहे, असे मला सांगितले पाहिजे. शिष्टमंडळ गेले काय आणि न गेले काय, त्यामुळे फरक काय पडणार? आपण आपल्या स्वतःच्या सामर्थ्यावर विसंबून आहोत. पण भित्र्या लोकांना धीर यावा म्हणून मी असे सांगतो की, शिष्टमंडळाची तयारी चालू आहे. आपल्या अंगात काय पाणी आहे, हे जाणण्यास फक्त ते उत्सुक आहेत. ते डिसेंबरपूर्वी कळणार नाही, म्हणून शिष्टमंडळ अद्याप गेले नाही. तथापि, जे लोक बाहेरच्या मदतीवरच विसंबून राहतात त्यांची निराशा झाली तर कोणी आश्चर्य मानू नये.

निरोधकावरील खटला

श्री. पी. के. नायडू हे एक निरोधक होते. त्यांचे एका मद्रासी माणसाशी नोंदणी-वरून कडाक्याचे भांडण झाले. मद्राशाने नोंदणी-पत्र घेतले होते, म्हणून त्याला बडविण्यात आले. श्री. नायडूंचा खटला आज [मंगळवारी] कोर्टात चालू झाला. त्यांना १० पौंड दंड झाला. दंड त्यांच्या मित्रांनी भरला. यावर टीका करताना मॅजिस्ट्रेट म्हणाले, 'या खटल्याचा संबंध नोंदणीच्या प्रश्नातही असल्यामुळे मी खरोखर दंडाऐवजी कैदेची शिक्षा द्यावयास हवी होती.'' श्री. नायडूंविषयी मला स्वतःला मुळीच सहानुभूती वाटत नाही. अशा प्रकरणामुळे आपली हानीच होते. या लढ्यात मारहाणीला स्थानच नाही. शिवाय सुटकेसाठी दंड भरणे त्याहून वाईट आहे. दंड मित्रांनी भरला, हेही बदनामीकारक आहे. लोकांना दमदाटी करून नोंदणीपासून जे कोणी परावृत्त करू इच्छितात, त्यांना या भव्य आणि धर्मप्रधान व देशभक्तिप्रधान लढ्याचे स्वरूपच कळले नाही.

पंजाबींचा अर्ज

पंजाबी लोकांनी लॉर्ड सेल्बोर्न यांना एक अर्ज केला आहे. त्याचे भाषांतर आम्ही पुढे देत आहो.[1]

१. मुळासाठी पाहा. 'हायकमिशनरला अर्ज' लेख ३०१ येथे गुजराती मसुद्याशी मिळते घेण्यासाठी काही फेरबदल करण्यात आले आहेत.

चिनी लोकांची संस्मरणीय सभा

[बुधवार]

आत्महत्या करणाऱ्या चिनी माणसाच्या स्मरणार्थ चिनी असोसिएशनने आज [बुधवारी] एक संस्मरणीय सभा भरविली. सभेस हजर असलेल्या कोणाही माणसाला चिनी माणसाविषयी आदर व कौतुक वाटल्याशिवाय राहिले नाही. त्यांचे सुंदर सभागृह काळ्या कापडाने भूषविलेले होते. सभागृहाच्या एका बाजूस, दिवंगत चिनी माणसाचे छायाचित्र होते. निरोधक म्हणून काम केलेले, सारे कार्यकर्ते मध्यभागी उभे होते. त्यांच्याभोवती चारी बाजूंना खुर्च्या ठेवल्या होत्या. त्यावर निमंत्रित बसले होते. सुमारे १००० चिनी माणसे हातात फुले घेऊन, छायाचित्रापुढून शांतपणे निघून गेली. दिवंगत व्यक्तीच्या आत्म्यासाठी प्रार्थना करीत ते समोरच्या दरवाजाने बाहेर पडले. या सर्व माणसांनी व्यवस्थित पोशाख केलेले होते. नंतर त्यांनी चिनी भाषेत शोकगीते म्हटली. त्यानंतर दुसऱ्या सभागृहात सभा भरली. सभागृह पूर्णपणे भरले होते. अध्यक्ष श्री. क्विन्न यांनी चिनी व इंग्रजी भाषांत भाषण केले. त्यांच्या मागून श्री. गांधी व श्री. पोलक हे बोलले. त्यांनी कायद्यावर टीका केली. नंतर सभा संपली. त्यांचे ऐक्य, व्यवस्थितपणा व धैर्य— हे तीनही गुण आपण अनुकरण करण्यासारखे आहेत.

प्रिटोरियातील मारहाण

बनुतखान नावाच्या एका पठाणावर खटला चालू आहे. श्री. हाजी इब्राहीम या बेइमान माणसाला मारहाण केल्याबद्दल हा खटला आहे. त्याचा सविस्तर वृत्तांत अद्याप आला नाही. श्री. इब्राहीम यांनी नोंदणी-पत्रे घेऊन शपथ मोडली म्हणून, बनुतखानाने सोट्याने बडविले असे दिसते. हाजी इब्राहीम यांनी त्याला जमिनीवर फेकून दाबून ठेवले. त्याच्या पकडीतून सुटण्यासाठी बनुतखानाने इब्राहीमच्या गालाचा चावा घेतला. बनुतखानाच्या जामिनाची रक्कम प्रथम १०० पौंड होती. कारण, बनुतखानाने आपल्यालाही दमदाटी केली होती, अशी तक्रार श्री. चॉमनी यांनी केली होती. खटला निम्मा चालल्यानंतर जामिनाची रक्कम ५० पौं. करण्यांत आली. मॅजिस्ट्रेटने बनुतखानाला २० पौं. दंड केला आणि तो त्याने भरला.

मणिलाल देसाईंचे पत्र

प्रिटोरिया येथील मुख्य निरोधक श्री. मणिलाल देसाई यांनी वृत्तपत्राला असे एक पत्र पाठविले आहे की, निरोधक हे लोकांना मुळीच मारहाण करीत नाहीत किंवा दंड-प्रयोग करीत नाहीत. ते फक्त कायद्याचे सूक्ष्म भावार्थ सभ्यपणे व मित्रभावाने समजावून सांगतात आणि या कायद्यामुळे येणाऱ्या आपत्ती दाखवून देतात.

[गुजरातीवरून]

इंडियन ओपिनियन, ३०-११-१९०७

२०४. चिनी असोसिएशनमधील भाषण[1]

[जोहान्सबर्ग,
तारीख २७ नोव्हेंबर १९०७]

अशा प्रसंगी कायद्याची चर्चा करणे अपवित्र आहे, असे वाटते. पण अध्यक्षांनी उदाहरण घालून दिले आहे.[2] त्याचे अनुकरण करणे मला भागच आहे. विशेषतः आता जो समारंभ होत आहे त्याचा या कायद्याशी अत्यंत निकटचा संबंध आहे, म्हणून मी त्यावर काही बोलतो. चिनी लोक जीवनाला इतर लोकांइतके मूल्य देत नाहीत, असे म्हटल्याचे मी पुष्कळ वेळेला ऐकले आहे. त्या बाबतीत माझा जर काही भ्रम असेल, तर आजच्या सभेने तो पार नाहीसा झाला आहे. जनरल स्मट्स यांनी या सभेला हजर राहून तुमचा भव्य धर्मविधी पाहावयास हवा होता, असे मला वाटते. तसे झाले असते तर "आता मी माझा पाय रोवला आहे आणि तो तेथेच मी कायम ठेवणार आहे." असे शब्द उच्चारण्यापूर्वी त्यांनी दहादा विचार केला असता. आशियावासी कायद्याला प्रतिकार करण्याच्या उपदेशाची जबाबदारी मी माझ्यावर घेतली आहे. आणि मला अजून असे वाटत आहे की, मी जे करीत आहे, ते रास्त, योग्य व न्यायाचे आहे. हा सल्ला मी माझ्या देशबांधवांना दिला आहे आणि आशियातील सह-नागरिकांना तो देण्यास मला संकोच वाटत नाही. ब्रिटिश प्रजाजन व अब्रिटिश प्रजाजन यांमध्ये सीमा-रेषा काढण्याचा प्रयत्न मी पुष्कळ वेळा जोराने केला. येथील सरकारशी आणि साम्राज्य सरकारशी मी पुष्कळ युक्तिवाद केला की, ब्रिटिश प्रजाजन आणि इतर आशियावासी लोक यांमध्ये तरी तुम्ही भेद करा. स्थानिक सरकार व साम्राज्य सरकार या दोघांनीही निक्षून नकार दिला. ब्रिटिश प्रजाजनांना जे हक्क रास्त रीतीने मिळावयास हवे, ते सर्व मला व माझ्या देशबांधवांना मिळावेत, असा माझा दावा होता. पण तो तडकाफडकी फेटाळण्यात आला. ब्रिटिश प्रजाजन असणारे हिंदी लोक व इतर आशियावासी लोक यांना एकाच पंक्तीत घालण्यात आले.

१. चाऊ क्वाई या चिनी माणसाला आपण नोंदणी करून घेतल्याबद्दल अपमान वाटला व त्याने आत्महत्या केली. त्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ एक सभा भरली. चिनी असोसिएशनचे अध्यक्ष श्री. क्विन्न यांनी गांधीजींना सभेत भाषण करण्यास बोलाविले होते.

२. आशियावासी कायद्याला प्रतिकार करण्याचा पुरस्कार त्यांनी केला.

या लढ्यात संकटामुळे विचित्र लोक शेजारी शेजारी आले आहेत. हिंदी लोकांना, कोणत्या ना कोणत्या कारणाने, अजून असे वाटते की, आपण ब्रिटिश प्रजाजन आहो. सध्याची परिस्थिती कशीही असली तरी या कल्पनेला ते चिकटून बसले आहेत. आज ना उद्या, आपली कल्पना सफल होईल, असे त्यांना वाटते. तेवढ्यापुरते बोलावयाचे तर, चिनी लोकांचा लढा हा हिंदी लोकांच्यां लढ्यापेक्षा वेगळा आहे. पण या दुष्ट कायद्यापुरते बोलावयाचे तर, चिनी लढा हा हिंदी लढ्याशी एकरूप आहे. या दोघांनाही हा कायदा सारखेच दडपून टाकीत असल्यामुळे हे दोघे त्याच्याशी लढत आहेत. आशियावासी कायदा रद्द करण्याला काही समर्थन पाहिजे असल्यास दोन उदाहरणे देता येतील. त्यांतील महत्त्वाचे उदाहरण म्हणजे, एका चिनी माणसाचा मृत्यु हेच होय. आपल्या प्रमादासाठी त्याने स्वतःचे बलिदान केले. त्याने दुसऱ्या कारणासाठी जीव दिला, असे दाखविण्याचा एक शोचनीय प्रयत्न केला गेला. पण सत्य असे ढळढळीतपणे उभे राहिले की, त्या माणसाने या दुष्ट व शोचनीय आशियावासी कायद्यासाठीच आपला जीव दिला. दुसरे उदाहरण, माझ्या देशबांधवासंबंधी आहे. पूर्ण निरपराधी असा एक माणूस उत्तम रीतीने आपले आयुष्य घालवीत होता आणि आपल्या देशबांधवांच्या आध्यात्मिक गरजा पुरवीत होता. त्याला तुरुंगात टाकण्यात आले आणि सध्या केवळ या कायद्यामुळे जोहान्सबर्ग-मध्ये तो दिवस कंठीत आहे.[1] त्याच्यावर सर्व तऱ्हेचे आरोप लादण्यात आले. राजद्रोहाचा आरोप सिद्ध करण्यास रतिमात्र पुरावा मिळाला नाही. अशी भलती किंमत मागणाऱ्या कायद्याला, चिनी किंवा हिंदी लोक, स्वतःशी व स्वदेशबांधवांशी प्रामाणिक वागत असतील तर, आणि आपल्या अब्रूला ते सर्वाहून अधिक किंमत देत असतील तर, कधीही मान्यता देणार नाहीत. हा लढा नैतिक व धार्मिक आहे. सद्‌गुणाचे बक्षिस सद्‌गुण हेच असते. युरोपियन व आशियावासी यांच्या परस्पर-विरोधी हक्कांचा हा प्रश्न असता, तर सरकारने घेतलेल्या बाजूचा अर्थ मला कळला असता. जनरल स्मट्स हे अत्यंत कडक असल्याचा लौकिक आहे–आणि ते तसे आहेतही. पण आशियावासीयांच्या बाबतीत त्यांचा कडकपणा अद्याप सिद्ध व्हावयाचा आहे. [ट्रान्सवॉलचे सत्ताधिकारी] तेरा हजार हिंदी लोक व तेराशे चिनी लोक यांच्या विवेकशक्तीवर आक्रमण करीत आहेत. जी गोष्ट पूर्वीच चांगल्या पद्धतीने करावयास हवी होती, ती करण्यासाठी त्यांनी अत्यंत कुजका मार्ग शोधला आहे. २ डिसेंबरनंतर तुमची स्वतंत्रता तुमची राहणार नाही. तुम्हांला अटक झाली किंवा न झाली तरी, तुम्ही आपल्या मनापुढे त्या मृत व्यक्तीची भावना जागती ठेवावी, आणि या लढ्यात सद्‌गुण हाच स्वतःचे पारितोषिक आहे, हे लक्षात ठेवावे.

इंडियन ओपिनियन ७–१२–१९०७

१. रामसुंदर पंडित यांना उद्देशून हे आहे. पाहा, लेख २७० व २७२

३०५. आम्ही प्रतिकार का करतो?

गेल्या पंधरा महिन्यांत असा एखादाच आठवडा गेला असेल की जेव्हा आशियावासी कायदा विधेयकाच्या दुरुस्तीविरुद्ध काही ना काही मजकूर या वृत्तपत्रात आला नसेल, आणि तरीही, बहुसंख्य युरोपियन आणि बरेसचे हिंदी लोकही केवळ नोंदणी कायद्याला इतका तीव्र चिकाटीचा विरोध का व्हावा, हे सांगू शकणार नाहीत, ही गोष्ट नाकारता येत नाही. कोणी म्हणतात, हा कायदा आक्षेपार्ह आहे; कारण, त्यामुळे आशियावासी लोक व त्यांची आठ वर्षांवरील मुले यांना बोटांचे ठसे द्यावे लागतात. दुसरे कोणी म्हणतात, आशियावासियांना छळण्याचे अमर्याद अधिकार हा कायदा देतो, म्हणून तो आक्षेपार्ह. या आक्षेपांचे महत्त्व आम्ही कमी करीत नाही, पण ते वस्तुतः क्षुद्र आहेत--निदान, हिंदी लोकांनी स्वार्थत्याग करण्याची प्रतिज्ञा केली आहे, ती करण्याइतके ते महत्त्वाचे नाहीत, हे आम्ही निःसंकोचपणे कबूल करतो.

मग हा निकराचा लढा कशासाठी? त्याचे उत्तर असे की, या कायद्यापूर्वी आणि नंतर ज्या घटना घडल्या त्या लक्षात घेता, तो हिंदी लोकांचे पौरुषच हरण करतो असे म्हटले पाहिजे. जीवनाच्या सर्व महत्त्वाच्या बाबतीत, हा कायदा करणाऱ्या लोकांइतकेच आपण सुसंस्कृत आहोत, असा हिंदी लोकांचा दावा आहे. एका बाजूने हा कायदा म्हणजे, हिंदी लोकांच्या मतांची किंवा भावनांची पर्वा न करता, आपल्या मर्जीप्रमाणे त्यांना वागविण्याचा हक्क ट्रान्सवॉल सरकारला देणे होय. उलटपक्षी, व्यक्तिस्वातंत्र्यावर आक्रमण करणारा किंवा त्याची हानी करणारा कायदा असेल तर, तसा काही स्वयंसिद्ध हक्क सरकारला नाही असे हिंदी लोकांचे म्हणणे आहे.

सरकारचा असा हेतु किंवा विधान कायद्याच्या कोणत्या कलमात आहे, हे दाखवून द्या, असे आम्हांला कोणी म्हटले तर, एखाद्या विशिष्ट कलमावर बोट ठेवणे जड जाईल आणि आमच्यावर भावनाशीलतेचा आरोप येईल. ज्याप्रमाणे, अफूच्या कोणत्या विशिष्ट कणात विष आहे, हे सांगणे शक्य नाही, त्याचप्रमाणे या कायद्यातील-विष दाखवून देणे शक्य नाही. पण तो सर्वच्या सर्व कायदा स्वाभिमानी आशियावासी यांना तीव्र जहर आहे, यात शंका नाही. वर उल्लेखिलेल्या क्षुद्र गोष्टी एकत्र केल्या तर त्या जहराची खात्रीची चिन्हे ठरतील. कायद्याचा सर्वसामान्य परिणाम अनुभवास येतो, पण तो बोलून दाखविता येत नाही, म्हणून सर्वसामान्य लोकांनी, आपल्या अंतःप्रेरणेने कायद्यातील जे घातुक तत्त्व ओळखले आहे, ते त्यांनी प्रतीकाच्या द्वारे

प्रकट केले आहे. ते तत्त्व खरे आहे. करीम जमाल याच्यावरील फसलेला खटला, अर्जदारांची चोरटी तपासणी, हिंदी पुरोहिताच्या[1] खटल्यात उघडकीस आलेल्या आश्चर्यकारक गोष्टी—इत्यादी जे प्रकार या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे उत्पन्न झाले, त्यावरून हिंदी समाजाच्या मताला पक्की दृढता व पूर्ण समर्थन प्राप्त झाले.

आम्ही वर जे काही लिहिले आहे त्यानंतर, धार्मिक आक्षेप कशावर आहे, हे सांगण्याची फारशी गरज नाही. पण सद्‌हेतू असलेल्या मित्रांनींही हा प्रश्न विचारला असल्यामुळे त्याची थोडी बारकाईने तपासणी करणे जरूर आहे. तुर्की मुसल्मान व अन्य तुर्की प्रजाजन यांमध्ये या कायद्याने जो दुष्ट भेदभाव निष्कारण केला आहे, त्याच्या बळावर, अत्यंत उच्च भूमिकेवरून, अतिशय परिणामकारक युक्तिवाद करता येण्यासारखा आहे. पण धार्मिक माणसासाठी आम्ही आमचा युक्तिवाद एका साध्या प्रश्नाच्या रूपाने मांडतो. हा कायदा आपले पौरुष हरण करतो, आपला उपमर्द करतो, किंबहुना व्यवहारात आपल्याला गुलाम बनवितो, असे ज्या हिंदी लोकांना प्रामाणिकपणे वाटते, त्यांना, माणसापेक्षांही हीन झाल्यानंतर, देवाची पूजा कशी करता येईल ? एखाद्या विशिष्ट कायद्याचे घातुक परिणाम माहीत असताना, केवळ स्वार्थी व ऐहिक लाभासाठी जी माणसे त्याला मान्यता देतील, ती देवाची पूजा कधी करू शकतील काय ? या दृष्टीने पाहिले तर, हा लढा अत्यंत महत्त्वाचा आहे हे उघड आहे. सर्वसाधारणपणे जे शूर मानले जात नाहीत असे मूठभर लोक, अमर्याद सत्ता असलेल्या बलाढ्य सरकारशी, दोन हात करीत आहेत. ते विजयी होतील का ? 'होतील' असे आम्ही ठामपणे म्हणतो. मात्र त्यांनी आतापर्यंत केले त्याप्रमाणे, आपल्या ईप्सित ध्येयास अनुरूप असा स्वार्थत्याग करण्यास ते संतोषाने सिद्ध असले पाहिजेत.

इंडियन ओपिनियन, ३०–११–१९०७.

३०६. कायद्याला आम्ही प्रतिकार का करतो ?

या प्रश्नाला, उत्तर म्हणून या पत्रात, आम्ही गेले बारा महिने काही ना काही लिहीत आलो आहोत. तरीसुद्धा, या लढ्याचे कारण, बहुतेक हिंदी लोकांना अज्ञातच

१. पाहा. लेख ९७, १०३ व २७१.

राहिले असावे, अशी शंका आम्हांस वाटते. आता खरा सामना सुरू होईल, अशी आम्हांला आशा आहे. सरकार घाबरलेले असले तरी किमान १०० हिंदी लोकांवर ते खचित हात टाकील, असा आमचा अंदाज आहे. तसे त्याने केले नाही तर, आम्हांला खरोखर दुःख वाटेल. वरवर पाहता, असे बोलणे योग्य दिसणार नाही. पण आम्ही जे म्हटले आहे, ते बरोबर आहे, असे आम्हांस वाटते. कारण, कसोटीचा काळ जवळ आलेला आहे. लोकांचा उत्साह खूप आहे. आमची कसोटी लागण्याची संधी सरकारने आम्हांला मिळू दिली नाही तर ती पुनः येणार नाही. रणांगणावरील वीरांना युद्ध न करताच परत यावे लागले म्हणजे त्यांची जशी तीव्र निराशा होते, तशी ट्रान्सवालमधील हिंदी लोकांची स्थिती सध्या आहे. किमान, शंभर हिंदी लोक तुरुंगात गेले तरच लढा दिला असे म्हणता येईल.

हे पत्र ट्रान्सवॉलमधील वाचकांच्या हातात, अगदी १ किंवा २ डिसेंबर रोजी, पडेल. त्यावेळी शूर लोक रणांगणाच्या आघाडीवर जाण्यास उत्सुक असतील–म्हणजे, काही अपराध केलेला नसताना, पकडले जाण्यास तयार असतील. भित्रे लोक अर्धमेले होऊन, पकडले जाण्याच्या भीतीने गर्भगळित होऊन आपापल्या घरी लपून बसतील. आणि ज्यांनी आपली तोंडे काळी करून घेतली आहेत, त्यांना अशा वेळी देशसेवेचे भाग्य कसे लाभेल? भित्रे वा शूर–दोघांनाही २ डिसेंबर ही नामी संधी आहे, असे आम्ही मानतो. भित्र्यांचेही आम्ही अभिनंदन करतो. कारण, भयभीत झाले असता-नाही, ते देशासाठी नोंदणी करण्यास गेले नाहीत.

आम्ही असे का लिहीत आहोत? हिंदी समाजाला कोणत्या भावी कार्याला तोंड द्यावयाचे आहे? आम्ही कायद्याला विरोध का करीत आहोत? याच्या उत्तराचा आता आपण विचार करू. पुष्कळ लोकांना वाटते, दहा बोटांचे ठसे देण्याला विरोध आहे, म्हणून हा लढा चाललेला आहे. काहींना वाटते आईचे व बायकोचे नाव द्यावे लागते, हीच एक आक्षेपार्ह बाब आहे. पोलीस घराघरांची झडती घेणार, हा विचारच ताप-दायक आहे, असे काही लोक बोलतात. हे सारे प्रकार, थोडेफार अपमानास्पद आहेत, हे खरे. फक्त चोर दहा बोटांचे ठसे देतात. अपमान करण्यासाठी कोणी आईचे पवित्र नाव घेतले तर कमरेच्या तलवारी पुढे सरसावतात. पोलिसाने वहिमी समजून काही लोकांना पास मागितले तर त्या अपमानाने खवळलेल्या लोकांनी पोलिसाना असे ठोसे दिले की, त्यामुळे पोलिस जमिनीवर लोळत पडले. असे असले तरी, एखाद्याने, सक्ती न करता, अदबीने बोटांचे ठसे मागितले आणि आपण ते मान्य केले नाहीत तर, विशेष संताप होणार नाही. हातात जपमाळ घेऊन, प्रार्थनेच्या वेळी आपण ईश्वराचे किंवा खुदाचे जसे नाव घेतो, तसेच, आपण आपल्या आईचे नाव मोठ्या आनंदाने घेतो. याचा अर्थ असा की, वर उल्लेखिलेले प्रकार आक्षेपार्ह आहेत. याचे कारण आपला उपमर्द करण्याच्या हेतूने ते सुरू केलेले आहेत. साऱ्या पिवळ्या लोकांना

कावीळ झालेली नसते. पण, सर्वसाधारणपणे बोलावयाचे तर एखादा माणूस पिवळा दिसत असून त्याचे शरीर क्षीण झालेले असेल, तर त्याला तो रोग आहे, असे आपण धरून चालतो. पिवळा आहे म्हणून डॉक्टर उपचार करणार नाही, तर कावीळ आहे, म्हणून उपचार करील.

म्हणून, या कायद्यातील कावीळ कोठे आहे हे आपण शोधले पाहिजे. ती ही आहे—हा कायदा अंमलात आणून गोरे लोक असे दाखवू इच्छित आहेत की, आशियावासी लोक माणसे नसून पशू आहेत; स्वतंत्र माणसे नसून गुलाम आहेत; आपल्याबरोबरीचे नसून हीन आहेत; आपल्यावर जो जो जुलूम लादला जाईल तो तो सोसण्यासाठीच ते जन्मलेले आहेत; निषेध करण्याचा हक्क त्यांना नाही; ते माणसे नाहीत–भ्याड आहेत. बोटांचे ठसे [घेणे] इत्यादी या परिस्थितीचे, या काविळीचे केवळ एक लक्षण होय. कायदा आपल्याला जे जे करावयास लावतो, ते ते सत्तीने करावयास लावतो. हिंदी माणूस तालेवार असला तरी तो चोर आहे, असे गृहीत धरले जाते. आम्ही चोर आहोत असे मानले तरी, आमची मुले चोर आहेत, असेही ते मानतात आणि त्यांच्यावर अयोग्य आघात करून, त्यांच्यामध्ये भय निर्माण करितात. 'साहेब येत आहे' या शब्दांनी आमच्या देशातील मुलांच्या मनात बालपणापासून भीती निर्माण होते. येथेही तशीच भीती निर्माण करण्याचा या कायद्याचा हेतु आहे. हे सारे कायद्याच्या कोणत्या कलमात आहे, असे जर आम्हांला विचारले, तर त्याचे उत्तर देणे कठीण आहे. धोतऱ्याच्या फुलात विष कोठे आहे, हे कोणालाच दाखविता येणार नाही. त्याची फुले फुलली म्हणजे त्या विषाची प्रचीती येते. तसेच या कायद्याचे आहे. एखाद्या शूर व स्वाभिमानी माणसाने हा कायदा वाचला आणि नीट समजावून घेतला तर, त्याच्या सर्वांगाचा थरकाप उडाल्याशिवाय राहणार नाही. या कायद्यामुळे हिंदी माणसाच्या अंगातील पौरुषाचे पाणीच नाहीसे होते. आणि ज्याप्रमाणे बोथटलेली तलवार कुचकामी ठरते, त्याप्रमाणे या कायद्याला मान्यता देणारा हिंदी माणूस हा माणूसच राहात नाही.

यानंतर धार्मिक दृष्टीने आक्षेपार्ह या कायद्यात काय आहे, असे कोण विचारील? तुर्कस्तानमध्ये हा कायदा मुसलमानांना लागू आहे; पण ख्रिस्ती व यहुदी यांना नाही, हा मुद्दा बाजूस ठेवला तरी, हा कायदा आमचा अपमान करणारा आहे आणि आम्हांला जनावराप्रमाणे वागविणारा आहे. पण जनावरांना ईश्वराची ओळख असते काय? आणि त्यांना धर्म समजतो काय?

वस्तुतः, हा कायदा म्हणजे आशियावासी लोक व गोरे लोक यांच्यातील एक युद्ध आहे. गोरे गरजतात, केवळ आमची चाकरी करण्यासाठी आम्ही आशियावासीयांना यंत्राप्रमाणे ठेवू. ट्रान्सवॉलमधील कायद्याला विरोध करणारे हिंदी लोक म्हणतात, "आम्ही जर येथे राहिलो तर, ते स्वतंत्र माणसे व दैनंदिन व्यवहारात इतरांच्या

बरोबरीचे म्हणून राहू.'' कायद्याचा खरा अर्थ आहे, तो हा. बलाढ्य शत्रूला अशा लढ्याचे आमंत्रण देणे व त्यांत यश मिळविणे हे जितके कठीण, तितकेच सोपे आहे. आपल्याला कष्ट पडतील म्हणून ते कठीण आहे, आणि ते सोपे अशासाठी आहे की, आपल्या राष्ट्राचे कल्याण करण्यासाठी आपल्या समाजाची सेवा करताना काही हानी सोसण्यात माणसाला आनंद वाटतो.

गोरे लोक संपत्ती, शारीरिक बळ व शस्त्रास्त्रे या सर्व बाबतीत बलाढ्य आहेत. त्यांच्यावर मूठभर हिंदी लोक मात कशी करणार ? असा प्रश्न विचारणाऱ्या माणसाला आम्ही निःशंकपणे उत्तर देऊ की, तुझी ईश्वरावर श्रद्धा नसल्यासारखीच आहे. आम्हांला पुढील ओळी आठवतात.

जनम्या जे मरवा माटे हिंमत नहीं हारो
समरथ छे मालिक साथ, रहम करनारो।
[जन्मा आला प्राणी जो, मरणार तो तो खास।
हिंमत सोडू नये कदापी, प्रभू समर्थ सदा साथ॥]

एखादा माणूस बलाढ्य असला तरी तो जर अत्याचार करू लागला, तर त्याचे काय होते हे पुढील कवनात सांगितले आहे.

कहा मनसूर खुदा मैं हूँ यूँ ही कहता था आलमको।
गया सूली पै चढनेको, तेरा दुश्वार जीना है॥

[अहं साक्षात् परब्रह्म सांगे मनसूर जगास।
चढे सुळावर की तोही, जीवन संकट–रास॥]

या लढ्यात, आपल्याला यश मिळण्यास एकच अट आहे, आणि ती म्हणजे आपले धैर्य खरे असले पाहिजे. हाल सोसण्याची शक्ती ही आपली समशेर आहे. ती धार पाजलेल्या पोलादाची असली पाहिजे–लाकडाची नव्हे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ३०–११–१९०७

३०७. आमची पुरवणी

[हिंदी राष्ट्रीय] काँग्रेसला-शिष्ट-मंडळ पाठविण्याचा प्रश्न उत्पन्न झाला, याचे एकच कारण म्हणजे, श्री. अमीरुद्दीन फजंदर हिंदुस्थानला चालले होते. त्यांनी प्रथमपासून या कायद्याला कडवा विरोध दाखविलेला आहे. म्हणून, जेव्हा ते हिंदुस्थानला जाण्यास निघाले, तेव्हा त्यांच्या पुष्कळ मित्रांनी त्याना विचारले, आपण प्रतिनिधी म्हणून जाल का? श्री. अमीरुद्दीन यांनी या हाकेला तत्काळ ओ दिली. "हिंदुस्थानात गेल्यावर मी पहिली गोष्ट ही करीन" असे आश्वासन त्यांनी येथून जाण्यापूर्वी दिले. त्या सद्गृहस्थाचे छायाचित्र आम्ही या अंकी प्रसिद्ध करीत आहो.

श्री. अमीरुद्दीन ३६ वर्षांचे आहेत. त्यांचे वाडवडील जमीनदार घराण्यातील आहेत. म्हणून त्यांचे आडनाव आहे फजंदर. ते प्रसिद्ध झटाम घराण्यातील आहेत. १८८८ साली ते ट्रान्सवॉलमध्ये प्रथम आले आणि शेठ महम्मद कासीम कमरुद्दीन यांच्या सुप्रसिद्ध पेढीमध्ये कारकून म्हणून राहिले. तेथे त्यांनी १८९३ पर्यंत काम केले. नंतर त्यांनी स्वतःचा धंदा सुरू केला. त्यांच्या पेढीचे नाव 'मेसर्स महम्मद हुसेन आणि कंपनी' असे आहे. पुष्कळ गोऱ्या लोकांनी त्यांना नोंदणी करण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला. "नोंदणी न केल्यास तुम्हांला आम्ही उधार माल देणार नाही" अशी धमकीही त्यांनी दिली, पण त्यांचा निर्धार अढळ राहिला.

[गुजरातीवरून]

इंडियन ओपिनियन, ३०-११-१९०७

३०८. तिरस्कृत कायदा आणि तदनुसार केलेले निर्बंध

नवा कायदा आणि तदनुसार केलेले निर्बंध यांचा मूळ इंग्रजी मसुदा गुजराती भाषांतरासह आम्ही या अंकी देत आहो. गुजराती भाषांतर यापूर्वीही आम्ही दिले

आहे.[१] येथे दिलेल्या भाषांतरात काही बदल आहे. शांततासंरक्षक वटहुकुमाची जरूर ती कलमेही दिली आहेत. याशिवाय, दुसरेही महत्त्वाचे विषय या अंकात आहेत. म्हणून, प्रत्येक हिंदी वाचकाने हा अंक काळजीपूर्वक वाचावा व जतन करून ठेवावा, असे आम्ही सुचवितो. नवा कायदा, आणि तदंतर्गत निर्बंध हेच त्यांच्या विरोधी असे प्रभावी युक्तिवाद आहेत. म्हणून, तो कायदा व ते निर्बंध, इंग्रजीतून व गुजरातीतून, पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचा आमचा हेतू आहे. त्याची किंमत सहा पेन्स राहील. हा अंक आणि त्या कायद्यावरील पुस्तिका हिंदुस्थानातील प्रत्येक घरात स्थान पावण्यास योग्य आहेत, अशी आम्हांस खात्री वाटते.

[१] १८८५ चा क्रमांक ३ चा कायदा पुढील दुरुस्त्यासह अंमलात राहील.

[२] आशियावासी या संज्ञेचा अर्थ हिंदी, मजूर व तुर्कस्थानातील मुसलमान प्रजाजन असा राहील. मुदतबंद मजूर म्हणून येथे आलेल्या मलाइ व चिनी लोकांचा अंतर्भाव यात होणार नाही. [रजिस्ट्रार वगैरेंच्या व्याख्या आहेत, पण त्या येथे दिलेल्या नाहीत.]

[३] ट्रान्सवॉलमध्ये कायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या प्रत्येक आशियावासियाने आपले नाव नोंदवले पाहिजे. अशा नोंदणीला फी नाही.

पुढील वर्णनाचे आशियावासी लोक हे ट्रान्सवॉलचे कायदेशीर रहिवासी मानले जातील--

[अ] परवाना कायद्याप्रमाणे, परवाना धारण कारणारा कोणताही आशियावासी,-- मात्र, त्याने तो परवाना लबाडीने मिळविलेला नसावा. [यात तात्पुरते परवाने धरलेले नाहीत.]

[ब] ता. ३१ मे १९०२ रोजी, ट्रान्सवॉलमध्ये प्रत्यक्ष वास्तव्य करीत असलेला, कोणताही आशियावासी.

[क] ता. ३१ मे १९०२ नंतर ट्रान्सवॉलमध्ये जन्मलेला कोणताही आशियावासी.

[४] हा कायदा, अंमलात येण्याच्या दिवशी; ट्रान्सवॉलमध्ये राहणाऱ्या प्रत्येक आशियावासी माणसाने, वसाहतिक सचिवाने, निर्दिष्ट केलेल्या, अधिकाऱ्याकडे, व विशिष्ट स्थानें व विशिष्ट काळांत, नोंदणीसाठी अर्ज केला पाहिजे. हा कायदा अंमलात आल्यानंतर जो आशियावासी माणूस ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश करील, त्याने या कायद्याप्रमाणे पूर्वी नोंदणी केली नसेल तर, प्रवेशानंतर आठ दिवसांच्या आत, नोंदणीसाठी अर्ज केला पाहिजे.

१.-पाहा-‘ नवा दुष्ट कायदा ’ लेख १३ व ‘ दुष्ट कायदा ’ लेख ५५.

[अ] आठ वर्षांखालील मुलाने या कलमाप्रमाणे अर्ज करण्याची गरज नाही.

[ब] आठ वर्षांवरील पण सोळा वर्षांखालील मुलाच्या नोंदणीसाठी त्याच्या पालकाने अर्ज करावा. तसा तो केला नसल्यास, त्या मुलाने १६ वे वर्ष पूर्ण होताच, एका महिन्याच्या आत तसा अर्ज करावा.

[५] कायदेशीर रहिवासी असलेल्या आशियावासीयांच्या अर्जाचा विचार रजिस्ट्रार करील, आणि ज्याचा अर्ज तो मान्य करील, अशा प्रत्येक अर्जदाराचे नाव नोंदविले जाईल.

रजिस्ट्रारने कोणा आशियावासीयाचा अर्ज नाकारला तर, त्या माणसाला, निदान १४ दिवसांच्या आत, मॅजिस्ट्रेटपुढे उभे राहाण्याची नोटीस तो देईल. दिलेल्या मुदतीत, तो दाखल झाला नाही, किंवा दाखल होऊनही, ट्रान्सवॉलमध्ये राहण्याच्या आपल्या हक्काबाबत, तो मॅजिस्ट्रेटचे समाधान करू शकला नाही, तर मॅजिस्ट्रेट त्याला, [तो १६ वर्षांवर असल्यास] ट्रान्सवॉल सोडून जाण्याचा हुकूम देईल. अशा हुकुमाला शांतता संरक्षक वटहुकुम १९०३ ची ६, ७ व ८ ही कलमे लागू होतील.

[६ आठ वर्षांखालील मुलाचा पालक असणाऱ्या आशियावासी माणसाने, नोंदणीसाठी अर्ज केल्यानंतर, निर्बंधात सांगितलेल्या त्या मुलाच्या ओळखीच्या खाणाखुणा व तपशील, त्याने स्वतः रजिस्ट्रारला पुरविला पाहिजे. अर्जदाराचे नाव नोंदविले असेल तर, त्याच्या नोंदणी-पत्रावर हा तपशील लिहिला जाईल. मुलाला ८ वे वर्ष लागल्यापासून एक वर्षाच्या आत, त्याच्या पालकाने, तो राहात असलेल्या विभागातील रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेटच्या कचेरीत, मुलाच्या नोंदणीसाठी अर्ज केला पाहिजे.

ट्रान्सवॉलमध्ये जन्मलेल्या मुलाचा पालक असणाऱ्या आशियावासी माणसाने, ते मूल आठ वर्षाचे झाल्यावर एका वर्षाच्या आत, त्या मुलाच्या नोंदणीसाठी अर्ज करावा.

[अ] वर सांगितल्याप्रमाणे, पालकाने अर्ज न केल्यास रजिस्ट्रारने किंवा रेसिडेंट मॅजिस्ट्रेटने सांगितले तर, तसा अर्ज त्याने पुढे केव्हाही करावा.

[ब] पालकाने अर्ज न केल्यास, किंवा त्याने केलेला अर्ज नामंजूर झाल्यास, त्या मुलाने, १६ वे वर्ष लागल्यापासून एक महिन्याच्या आत, नोंदणीसाठी अर्ज करावा. असा अर्ज, रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेटकडे केला जाईल. तो मॅजिस्ट्रेट तो अर्ज, जरूर त्या कागदपत्रासह, रजिस्ट्रार-

कडे पाठवील. तो अर्ज नियमानुसार असल्याची, त्याची खात्री पटल्यास, तो नोंदणी-पत्र देईल.

[७] आठ वर्षांखालील, मुलाचा तपशील, वर म्हटल्याप्रमाणे पालकाने जर दिला नाही, आणि मुलाला आठवे वर्ष पुरे झाल्यावर त्याच्या नोंदणीसाठी अर्ज केला नाही तर त्या मुलाने १६ वे वर्ष लागल्यानंतर एक महिन्याच्या आत अर्ज केला पाहिजे आणि रजिस्ट्रारने त्याला, आपल्या विवेकानुसार नोंदणी-पत्र द्यावे.

[८] या कायद्याने सांगितल्याप्रमाणे, नोंदणीचा अर्ज करण्यास, जो माणूस चुकेल, त्याला १०० पौंडांपर्यंत दंड होईल, आणि तो न भरल्यास ३ महिनेपर्यंत साधी किंवा सश्रम कैद सोसावी लागेल.

ट्रान्सवॉलमध्ये कायदेशीर रहिवासी नसलेल्या, सोळा वर्षांखालील, आशियावासी माणसाला, जो कोणी ट्रान्सवॉलमध्ये आणील, आणि अशा मुलाला जो कोणी नोकरीवर ठेवील, तो गुन्हेगार ठरेल, आणि वरील शिक्षेस व नोंदणीपत्र रद्द होण्यास पात्र होईल. शिवाय, ट्रान्सवॉल सोडून जाण्याचा हुकूम त्याला देण्यात येईल. तो ट्रान्सवॉल सोडून गेला नाही तर, कायद्यात सांगितल्याप्रमाणे, दंड किंवा तुरुंगवास यांस तो पात्र होईल, शांततासंरक्षक वटहुकुमाची ६, ७ व ८ ही कलमे त्याला लागू होतील.

वासाहतिक सचिवाने, जाहीर केलेल्या तारखेनंतर नोंदणी-पत्राशिवाय सोळा वर्षांवरील जो आशियावासी माणूस ट्रान्सवॉलमध्ये सापडेल, त्याला ट्रान्सवॉल सोडून जाण्याचा हुकूम देण्यात येईल. तो ट्रान्सवॉल सोडून न गेला तर, दंड किंवा कैद यांना पात्र होईल.

नोंदणीसाठी ज्याने अर्ज केला नाही, अशा आशियावासी माणसाने अर्ज न करण्याचे, चांगले व पुरेसे कारण, देऊन, मॅजिस्ट्रेटचे समाधान केले तर मॅजिस्ट्रेट त्याला अर्ज करण्यास मुदत देऊ शकेल. त्या मुदतीत, नोंदणी-पत्र मिळविण्यास तो माणूस चुकला तर त्याला ट्रान्सवॉल सोडून जाण्याचा पुनः हुकूम दिला जाईल, तसे त्याने केले नाही तर, तो नेहमीच्या शिक्षांना पात्र होईल.

[९] पोलिस-दलातील कोणताही माणूस किंवा वासाहतिक सचिवाने अधिकार दिलेला दुसरा कोणताही माणूस, सोळा वर्षांच्या किंवा ह्यावरील वयाच्या आशियावासी माणसाला, नोंदणी-पत्र दाखविण्यास आणि निर्बंधात सांगितलेल्या खाणाखुणा व तपशील देण्यास भाग पाडू शकेल.

१६ वर्षांखालील, आशियावासीयाचे बाबतीत, त्या मुलाचा पालक नोंदणी-पत्र आणि कायद्यात सांगितलेल्या ओळखीच्या खाणाखुणा व तपशील दाखल करील.

[१०] या कायद्याप्रमाणे, नवे नोंदणी-पत्र बाहेरून बदलणाऱ्या माणसाला, ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश व वास्तव्य करण्याचा हक्क प्राप्त होईल. मात्र, त्याला, शांततासंरक्षक वटहुकुमाच्या १० व्या कलमानुसार [या वसाहतीबाहेर जाण्याचा] हुकूम झालेला नसावा.

[११] ज्या माणसाच्या हाती एखादे नोंदणी-पत्र किंवा तात्पुरता परवाना येईल, पण त्याचा तो कायदेशीर धारक नसेल, तर त्याने तो रजिस्ट्रारकडे तत्काळ पोहोचता करावा. असे न केल्यास ५० पौंडांपर्यंत दंड किंवा १ महिन्यापर्यंत साधी व सश्रम कैद अशा शिक्षेस तो पात्र होईल.

[१२] ज्या माणसाचे नोंदणी-पत्र हरवले असेल, त्याने नव्या नोंदणी-पत्रासाठी रजिस्ट्रारकडे अर्ज करावा. नियमात सांगितलेला तपशील त्या अर्जात लिहावा व त्याला ५ शिलिंगाचा स्टॅम्प लावावा.

[१३] गॅझेटमध्ये प्रसिद्ध झालेल्या तारखेनंतर, रेव्हेन्यू परवाना वटहुकुमाप्रमाणे किंवा नगरपालिकेच्या एखाद्या पोट नियमाप्रमाणे, व्यापाराचा परवाना कोणाही आशियावासियाला पाहिजे असेल तर त्याने आपले नोंदणी-पत्र व निर्बंधानुसार तपशील आणि ओळखीच्या खाणाखुणा दाखल केल्या पाहिजेत.

[१४] जेव्हा एखाद्या आशियावासीयाच्या वयाचा प्रश्न उपस्थित होईल, तेव्हा, अन्यथा सिद्ध होईपर्यंत, रजिस्ट्रार त्याचे जे सकृद्दर्शनी वय ठरवील तेच गृहीत धरण्यात येईल.

[१५] या कायद्याप्रमाणे जे कोणते प्रतिज्ञापत्रक लिहावे लागेल त्याला स्टॅम्प-ड्यूटी पडणार नाही.

[१६] नोंदणीसाठी अर्ज करणे, किंवा नोंदणीपत्रक मिळविणे, यासाठी जो कोणी लबाडीचे कृत्य करील अथवा तसे कृत्य वा विधान करण्यास दुसऱ्या कोणास चिथावणी वा मदत देईल, अगर एखादे नोंदणी-पत्र खोटे तयार करील, अथवा असे खोटे नोंदणी-पत्र इतरांना वापरावयास देईल, तो ५०० पौंडांपर्यंत दंड किंवा २ वर्षेपर्यंत, साधी वा सश्रम कैद. या शिक्षेस पात्र होईल.

[१७] वासाहतिक सचिव, केवळ आपल्या मर्जीप्रमाणे, कोणाही आशिया-वासीयाला फक्त मर्यादित मुदतीसाठी परवाना देऊ शकेल. ती मुदत

संपल्यावर, त्या माणसाला या वसाहतीत राहण्याचा हक्क उरणार नाही. तो जर येथे सापडला, तर त्याला वॉरंटाशिवाय पकडले जाईल, आणि त्याला शांततासंरक्षक वटहुकुमाची ७, ८, व ९ ही कलमे लागू होतील. त्या वटहुकुमाप्रमाणे, या वसाहतीबाहेर जाण्याचा हुकूम झालेल्या माणसाप्रमाणेच, तो शिक्षेस पात्र होईल. हा कायदा अंमलात येण्यापूर्वी, दिलेल्या तात्पुरत्या परवान्यांना, हा कायदा लागू असेल. तात्पुरता परवाना धारण करणाऱ्या माणसाला, दारूचे निर्बंध लागू होणार नाहीत. अशी सवलत, या कायद्याखाली न येणाऱ्या आशियावासियालाही, वासाहतिक सचिव देऊ शकेल.

[१८] पुढे दिलेल्या कारणांसाठी, गव्हर्नर वेळोवेळी निर्बंध तयार करील किंवा रद्द करील--

[१] या कायद्याप्रमाणे, ठेवावयाच्या नोंदणी रजिस्टरचा नमुना ठरवणे.

[२] नोंदणीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना व पद्धत ठरविणे. तसेच, तपशील व ओळखीच्या खाणाखुणा ज्या द्यावयाच्या त्याही ठरवणे.

[३] नोंदणी–पत्राचा नमुना ठरविणे.

[४] आठ वर्षांखालील, मुलाच्या पालकाने द्यावयाचा तपशील व ओळखीच्या खाणाखुणा ठरविणे. तसेच ९ व्या कलमाप्रमाणे, कोणाही आशियावासीने नोंदणी–पत्र दाखल करणे. तसेच, ज्याचे नोंदणी–पत्र हरवले आहे किंवा नष्ट झाले आहे, त्याचे नोंदणी–पत्र नवीन करणे, आणि व्यापाराच्या परवान्यासाठी अर्ज करणे. यासाठी द्यावयाचा तपशील ठरविणे.

[५] या कायद्याच्या १७ व्या कलमाप्रमाणे द्यावयाच्या परवान्याचा नमुना ठरविणे.

[१९] या कायद्याच्या अटी पाळण्यास, जो आशियावासी किंवा आशियावासीयाचा जो पालक चुकेल, तो, अन्यथा सांगितलेले नसल्यास, १०० पौंडांपर्यंत दंड; किंवा ३ महिनेपर्यंत साधी वा सश्रम कैद यास पात्र होईल.

[२०] चिनी लोकांसाठी केलेला, मजूर आयात वटहुकूम आशियावासियांना लागू होणार नाही.

[२१] १८८५ चा कायदा अंमलात येण्यापूर्वी जर एखाद्या आशियावासीयाने आपल्या नावाने जमीन घेतली असेल, तर त्याचे वंशज व उत्तराधिकारी यांचा त्या जमिनीवर हक्क राहील.

[२२] बादशहाने संमती देईपर्यंत आणि ती संमती गॅझेटमध्ये प्रसिद्ध होईपर्यंत हा कायदा अंमलात येणार नाही.

नव्या कायद्यात उल्लेखिलेल्या १९३० च्या शांततासंरक्षक वटहुकुमाची काही कलमे

[६] अशा तऱ्हेने, अटक केलेल्या माणसाला, शक्य तितक्या त्वरेने, मॅजिस्ट्रेटपुढे दाखल केले जाईल. या वटहुकुमातील योजनेप्रमाणे, या वसाहतीत प्रवेश किंवा वास्तव्य करण्याचा योग्य अधिकार आपल्याला असल्याची खात्री तो मॅजिस्ट्रेटला पटवू शकला नाही, तर मॅजिस्ट्रेट त्याला लेखी हुकूम देईल की, विशिष्ट मुदतीत तुम्ही या वसाहतीबाहेर जावे. मात्र, जर अशा माणसाने आपल्याला, परवाना पूर्वीच मिळाला आहे, असे शपथेवर सांगितले आणि तो दाखल न करण्याची समाधानकारक कारणे दिली, तसेच, या कायद्याच्या दुसऱ्या कलमाप्रमाणे, परवाना धारण करण्यापासून माफी मिळालेल्या वर्गापैकी आपण एक आहो, असा समाधानकारक पुरावा दाखल करण्याचे, त्याने शपथेवर सांगितले तर, जामीन घेऊन किंवा न घेऊन, मॅजिस्ट्रेटपुढे असा परवाना अथवा पुरावा विशिष्ट मुदतीत देण्याचे लिहून दिल्यास त्याला मुक्त करण्यात येईल. या करारपत्रातील अटी जर त्याने मोडल्या तर ते जप्त होईल.

[७] या वसतीबाहेर जाण्याचा हुकूम ज्याला झाला असेल, पण जो त्या हुकुमात दिलेल्या मुदतीत बाहेर गेला नसेल, तसेच मागील कलमात सांगितलेल्या व्यवस्थेनुसार ज्याचे करार-पत्र रद्द झाले असेल, त्याला वॉरंटाशिवाय पकडले जाईल व मॅजिस्ट्रेटपुढे उभे केले जाईल. त्याला ५०० पौंड दंडासहित वा दंडाविरहित एक महिन्यापेक्षा कमी नसलेली व ६ महिन्यांपेक्षा अधिक नसलेली साधी वा सश्रम कैद, अशी शिक्षा होईल. दंड न भरल्यास आणखी ६ महिन्यांपर्यंत कैदेची शिक्षा होईल.

[८] मागील कलमाप्रमाणे, कैदेत ठेवलेला माणूस, तुरुंगवासाची मुदत संपल्यानंतर, [वासाहतिक सचिवाकडून लेखी परवाना न मिळविता,][1] ७ दिवसांपेक्षा अधिक काळ या वसाहतीत राहील, तर त्याला वॉरंटाशिवाय पकडून मॅजिस्ट्रेटपुढे उभे केले जाईल, आणि ५०० पौंडांपर्यंत दंडासहित वा दंडाविरहित ६ महिन्यांपेक्षा कमी नाही व १२ महिन्यां-

१. कंसातील शब्द इंग्रजी मुळातून घेतले आहेत.

पेक्षा अधिक नाही अशी साधी वा सश्रम कैद दिली जाईल. दंड न भरल्यास ६ महिनेपर्यंत, अधिक कैद त्याला भोगावी लागेल.

[९] जो माणूस,

(१) लबाडीने, खोटेपणाने, खोट्या बहाण्याने, फसवणुकीने किंवा दुसऱ्या अयोग्य मार्गाने परवाना मिळवील, किंवा मिळविण्याचा प्रयत्न करील, अथवा दुसऱ्याला तसे करण्यास चिथावणी वा मदत देईल,

(२) अशा तऱ्हेने मिळविलेला परवाना स्वतः वापरील वा वापरण्याचा प्रयत्न करील अथवा तसे करण्यास दुसऱ्याला चिथावणी किंवा मदत देईल,

(३) अशा परवान्याच्या आधारे, किंवा योग्य अधिकाऱ्याने न दिलेल्या परवान्याच्या आधारे, या वसाहतीत प्रवेश करील, किंवा त्यासाठी प्रयत्न करील,

तो ५०० पौंडांपर्यंत दंड, किंवा २ वर्षेपर्यंत साधी वा सश्रम कैद अथवा असा दंड वा कैद या शिक्षेस पात्र होईल.

[१०] या देशातील शांतता व सुव्यवस्था यांना एखादा माणूस भयप्रद आहे, असे लेफ्टनंट गव्हर्नरला योग्य कारणामुळे जर वाटले, तर विशिष्ट मुदतीत या वसाहतीबाहेर जाण्याचा हुकूम त्याने देणे कायदेशीर आहे. त्या मुदतीनंतर तो माणूस या वसाहतीत आढळल्यास, या वटहुकुमाच्या ७ व ८ कलमांत सांगितलेल्या पद्धतीने त्याच्यावर खटला भरण्यात येईल आणि त्यांत सांगितलेल्या शिक्षांस तो पात्र होईल.

दुष्ट निर्बंध[१]

हा कायदा पुस्तिकेच्या रूपाने प्रसिद्ध केलेला आहे. किंमत सहा पेन्स. टपाल-खर्च अर्धी पेनी.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ३०–११–१९०७

१. या कायद्याप्रमाणे तयार केलेले निर्बंध यापुढे दिलेले आहेत. पाहा, ‘ दुष्ट कायदा ’ लेख ५५ आणि परिशिष्ट ४.

३०९. हायकमिशनरच्या खाजगी चिटणिसास पत्र

२१–२४ कोर्ट चेम्बर्स
कॉर्नर रिसिक व ऍंडर्सन स्ट्रीट
पो. ऑ. बॉक्स ६५२२
जोहान्सबर्ग
३ डिसेंबर १९०७

हायकमिशनर यांचे खाजगी चिटणीस,
जोहान्सबर्ग

महाशय,

आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकासंबंधी जी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे, त्या बाबतीत मी नामदारसाहेबांची भेट घ्यावी, असा श्री. हॉस्केन यांचा संदेश श्री. डेव्हिड पोलक यांनी मला नुकताच दिला आहे. सरकारचा मुख्य उद्देश साधून, आशियावासी जमातींना कोणत्या गोष्टी स्वीकार्य वाटतील, हे मी नामदारसाहेबांना सांगावे, असे त्या संदेशात म्हटलेले आहे.

या संदेशाबाबत मला जे काही म्हणावयाचे आहे त्याला प्रस्तावना जोडण्याची काही गरज नाही. तरी, या बाबतीत मला जी भूमिका घ्यावी लागली आहे, तीवरून मी माझी अशी इच्छा प्रकट करतो की, माझ्या देशबांधवांइतकीच सरकारचीही सेवा माझ्या हातून घडावी. ब्रिटिश साम्राज्याच्या ज्या सुंदर सुंदर गोष्टी मी पाहिल्या आहेत, त्यामुळे मी त्या साम्राज्याचा एक प्रेमी बनलो आहे. चुकीने असो वा रास्तपणाने असो, आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकामध्ये धोक्याची बीजे आहेत, असे मला दिसले. तेव्हा मी माझ्या देशबांधवांना असा सल्ला दिला की, अत्यंत शांततापूर्ण रीतीने-ख्रिश्चन पद्धतीने, असे म्हणू का?—सर्वस्वाची किंमत देऊन, या कायद्याला प्रतिकार करा.

या वसाहतीत प्रवेश व वास्तव्य करणाऱ्या प्रत्येक हिंदी माणसाची ओळख पटावी, हा सरकारचा उद्देश आहे. तो प्रवेश नियंत्रण-कायद्यामध्ये दुरुस्ती करून साधू शकेल असे माझे नम्र मत आहे. त्या कायद्याला अद्याप बादशहाची मंजुरी मिळाली नाही, आणि सध्याच्या स्वरूपात ती त्यांना मिळणारही नाही, असा मला

विश्वास वाटतो. खुषीच्या नोंदणीचाही फारसा उपयोग होईल, असे मला वाटत नाही. कारण शांततासंरक्षक वटहुकुमाशिवाय नोंदणी-पत्रास काही अर्थ राहणार नाही, आणि तो वटहुकूम रद्द होण्याचा संभव आहे, म्हणून मी पुढील सूचना मांडतो—

[अ] या कायद्याप्रमाणे, नोंदणी करण्यासाठी सरकारी गॅझेट-मध्ये ज्या नोटिसा प्रसिद्ध झाल्या आहेत, त्या परत घेणे.

[ब] पार्लमेंटच्या पुढील बैठकीत, प्रवेश-नियंत्रण कायद्यात अशी दुरुस्ती करणे की, शांततासंरक्षक वटहुकुमाप्रमाणे या वसाहतीत प्रवेश वा वास्तव्य करण्याचा ज्यांना हक्क आहे आणि १८८५ च्या ३ ऱ्या कायद्याप्रमाणे, ३ पौंडांची नोंदणी–पत्रे ज्यांच्या जवळ आहेत आणि म्हणून नोंदणी–पत्रावर जे आपला हक्क शाबीत करू शकतात, त्यांना वास्तव्याची प्रमाण-पत्रे देण्यात यावी. ही प्रमाण-पत्रे नोंदणी-पत्राऐवजी राहतील आणि त्यांत ओळखीचा पूर्ण तपशील दिला जाईल. यांमध्ये, रहिवाशी असलेल्या आशियावासीयांच्या अज्ञात मुलांच्या प्रमाण–पत्रांचा अंतर्भाव नाही. पण, लबाडी टाळण्यासाठी, मुलांची नावे व वये वास्तव्य-पत्रात नोंदविली जातील. यामुळे या वसाहतीतील आशियावासी मुलांची संख्या बेकायदा कधीच वाढणार नाही. क्वचित् प्रसंगी, तोतयेगिरी होईल, पण तिचा बंदोबस्त प्रवेश-नियंत्रण कायद्याप्रमाणे कडकपणे करता येईल. शैक्षणिक कसोटीस उतरणाऱ्या आशियावासीयांच्याही वास्तव्य-पत्राचा समावेश या दुरुस्तीमध्ये होत नाही. सध्याच्या नियमाप्रमाणे ही शैक्षणिक कसोटी फार जबरदस्त आहे आणि तिच्यामुळे ओळख पूर्णपणे पटते. या दुरुस्तीमुळे आशियावासी कायदा रद्द होईल.

नोंदणी न होता, पंधरा महिने निघून गेले, हे लक्षात घेता आणखी ३–४ महिने गेल्यास, काही बिघडणार नाही. पण सरकारला जर तसे वाटत नसेल, तर त्यांनी नोटिसा परत घेतल्यानंतर, केवळ हिंदी लोकांच्या सच्चेपणाची पारख करण्यासाठी सध्याच्या प्रमाणपत्राऐवजी, नोंदणी-पत्रे द्यावीत. ही प्रमाण-पत्रे, प्रवेशविषयक कायद्याच्या दुरुस्तीच्या वेळी, वास्तव्य-पत्रे म्हणून मानली जावीत.

आशियावासी कायदा मंजूर करण्याचे मुख्य कारण म्हणजे घाऊक प्रमाणावर चोरटी आवक चालू आहे असा आरोप हे आहे, असे माझे मत आहे. आशियावासी खात्याचा कारभार एकामागून एक अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली कसा चालतो, याची माहिती मला नेहमी बारकाईने मिळत असल्यामुळे हा आरोप मला सदैव खटकत आहे. ज्या आधारावर कॅ. हॅमिल्टन फाऊल यांनी चोरटी आयात फारच थोडी आहे, असे म्हटले, त्याच आधारावर श्री. चॉमनी यांनी त्याविरुद्ध अहवाल केला.

पुराव्याची छाननी करण्याची कायदेविषयक पात्रता श्री. चॅमनी यांच्या अंगी नसल्यामुळे, ते ज्या जागेवर आहेत, तिला ते सर्वथैव अपात्र आहेत, असे मला अजूनही वाटते. त्यांच्याविषयी व्यक्तिशः मला विरुद्ध काहीच म्हणावयाचे नाही. ते सभ्य आहेत आणि संशयातीत आहेत, पण ते ज्या पदावर आहेत, त्याला अवश्य असणारे गुण त्यांच्या अंगी नाहीत व ती उणीव या दोन गुणांनी भरून निघणार नाही. म्हणून, प्रमाण-पत्रांची अदलाबदल करण्याऐवजी मी असे सुचवितो की, वरिष्ठ न्यायमंदिराचे एक न्यायाधीश, किंवा विटवॉटर्स रँड विभागाचे चीफ मॅजिस्ट्रेट अथवा, चोरट्या आवकीच्या आरोपाची तपासणी करण्याचे कायदेशीर ज्ञान असलेला, असाच दुसरा कोणी उच्च अधिकारी याची नेमणूक करावी. आशियावासीयांच्या अधिकाऱ्यांनी जे कागदपत्र त्याच्यापुढे ठेवले असतील, त्यांच्यासंबंधी त्याने आपला अभिप्राय कळवावा. त्याची चौकशी जनतेला खुली असेल आणि साक्षीदारांची तपासणी जाहीर रीतीने होणार असेल तर ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांची चिंता दूर होईल. त्यानंतर जो रिपोर्ट तयार होईल, त्यावर कोणी आक्षेप घेणार नाही. आणि बहुधा त्यामुळे या पत्रात सुचविलेली दुरुस्ती करण्याचा मार्ग मोकळा होईल.

ओळखीच्या पद्धती आणि बोटांच्या ठशांचा प्रश्न यांचा विचार करण्याचे मी मुद्दाम टाळतो. कारण त्या गौण गोष्टी आहेत. आशियावासी कायदा रद्द करण्याची आणि हिंदी समाजाचे सहकार्य मिळविण्याची कल्पना मान्य झाली, तर बाकीच्या अडचणी दूर करता येतील, याविषयी मला शंका नाही.

जरूर तर, प्रवेश-नियंत्रण कायद्याच्या दुरुस्त्या मी कायदेशीर भाषेत सादर करीन. त्यामुळे हिंदी लोकांच्या भावना काडीमात्र न दुखावता, त्यांची ओळख पटविण्याचा आशियावासी कायद्याचा उद्देश पूर्णपणे सफल होईल, असे माझे नम्र मत आहे.

आपला
मो. क. गांधी

ट्रान्सवॉल गव्हर्नरचे पुराण वस्तु खाते,
प्रिटोरिया,
फाईल ५३/ ११।१९०७.

३१०. महम्मद इशाकचा खटला

[फोक्सरस्ट
ता. ६ डिसेंबर, १९०७]

आरोपीचे[1] वकील श्री. गांधी यांचे मत असे की, कायदेखात्याच्या अनिर्णयामुळे आमच्या अशिलाचे नुकसान होऊ नये. अशील कच्च्या कैदेत असून त्याला जामीन नाकारण्यात आला आहे. त्याच्यावर निश्चित आरोप ठेवता येत नसेल, तर त्याला ताबडतोब मुक्त करावे. त्याला पुनः पकडण्यास सरकारला मोकळीक आहे. कारण त्याला या देशाबाहेर जाण्याची इच्छा नाही. उलट येथे राहण्याचा आपला हक्क बजावण्याची त्याला इच्छा आहे.[2]

इंडियन ओपिनियन, १४–१२–१९०७.

१. स्वयंपाक्याचा धंदा करणारा महम्मद इशाक हिंदुस्थानाहून परत आल्यानंतर फोक्सरस्टमध्ये पकडला गेला. बोअर युद्धापूर्वी तो ट्रान्सवालमध्ये ४ वर्षे होता. त्याला शांततासंरक्षक वटहुकुमाप्रमाणे व १८८५ च्या ३ ऱ्या कायद्याप्रमाणे, परवाना व नोंदणी-पत्र देण्यात आले होते. असिस्टंट रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेट श्री. डी. विलीयर्स यांच्यापुढे त्याला उभे करण्यात आले. त्याला जामिनावर सोडले नाही. या आरोपीवर कोणता आरोप ठेवावा, याविषयीच्या सूचनांची सरकारी वकील, श्री. मेंझ हे वाट पाहात होते.

२. आणखी युक्तिवाद केल्यावर, मॅजिस्ट्रेटन खर्च व वेळ वाचेल म्हणून हा खटला जोहान्सबर्गला परत पाठविला. महम्मद इशाकला त्याच्या लेखी जातमुचलक्यावर सोडण्याचा हुकूम मॅजिस्ट्रेटने दिला. ता. ११ डिसेंबर रोजी जोहान्सबर्ग येथे श्री. जॉर्डन याच्यापुढे हा खटला सुरू झाला, तेव्हा, ९ डिसेंबर रोजी ३७ हिंदी लोकांवर ज्या कलमाखाली खटला चालला, त्याच कलमाखाली, इशाकवर आरोप ठेवण्यात आला. पाहा. हिंदी लोकांचा खटला.' लेख ३१८ चा पुरावाही तशाच स्वरूपाचा होता. ता. १४–१२–१९०७ च्या इंडियन ओपिनियनने लिहिले, "श्री. गांधींनी आरोपीसाठी काही पुरावा न मागता, त्याच्या सुटकेची मागणी केली. श्री. जॉर्डन यानी विवेकपूर्ण निकालपत्र दिले. शांततासंरक्षक वटहुकुमाच्या कलमांचा पूर्ण अर्थ त्यांनी विशद केला व आरोपीला मुक्त केले. कोर्टात हिंदी लोकांची गर्दी होती.

३११ वासाहतिक सचिवाला पत्र

[जोहान्सबर्ग
ता. ७ डिसेंबर, १९०७ पूर्वी]

ना.
वासाहतिक सचिव,
[प्रिटोरिया

महाशय,]

जोहान्सबर्ग नगरपालिकेने,[1] पहिल्या वर्गाच्या बगीसंबंधी जी वाहतुकीच्या पोटनियमात दुरुस्ती केली आहे, त्याकडे आपले लक्ष वेधण्यास मला माझ्या असोसिएशनने सांगितले आहे. या दुरुस्तीला सरकारची मान्यता मिळाली तर तीमुळे हिंदी लोकांना पहिल्या वर्गाच्या बग्या वापरण्यास मनाई होईल. हा भेदभाव सर्वथा अनावश्यक व प्रक्षोभक आहे, असे माझ्या असोसिएशनचे मत आहे.

काही विशेष व्यवसायातील आशियावासी लोकांचा जो अपवाद केला आहे, तो हिंदी समाजाला, केवळ अपमानास्पद वाटत आहे. जाता जाता, मला हे सांगितले पाहिजे की, उदार व्यवसायातील लोकांना पहिल्या वर्गाच्या बगीतून जाता आले तरी त्यांच्या बायका-मुलांना जाता येणार नाही, हे उघड आहे.

माझ्या समाजाला न्याय देण्यासाठी म्हणून सरकार ही दुरुस्ती नामंजूर करील, असा विश्वास माझ्या असोसिएशनला वाटत आहे.

[आपला,
इसाप इस्माइल मियाँ
अध्यक्ष
ब्रिटिश इंडियन असोसिएशन]

इंडियन ओपिनियन, ७–१२–१९०७

१. पाहा. ‘जोहान्सबर्ग नगरपालिकेला पत्र’ लेख १६४.

३१२. हाय कमिशनरला पत्र

[जोहान्सबर्ग,
ता. ७ डिसेंबर, १९०७ पूर्वी]

[हाय कमिशनर,
प्रिटोरिया,

महाशय,]

ट्रान्सवॉलमध्ये ब्रिटिश प्रजाजन म्हणून राहणारे पंजाबी, पठाण व शीख यांच्या विनंतीवरून, आपल्या विचारार्थ एक अर्ज सोबत पाठवीत आहे. त्यावर जमादार नवाब खान व फजली इलाही यांनी इतरांचे प्रतिनिधी म्हणून सह्या केल्या आहेत. अर्जाबरोबरच्या यादीत इतरांची नावे दिली आहेत.

हा अर्ज[1] दाखल करताना मला ही जाणीव आहे की, आपण यात हस्तक्षेप करण्याचे मनात आणले, तरी त्यात अडचणी आहेत. पण अर्जदारांच्या दृष्टीने परिस्थिती किती भयानक आहे, हे मी सांगावयास नको. अर्जदार हे जुने सैनिक आहेत. ब्रिटिश निशाणासाठी ते पूर्वी लढले आहेत आणि आजही लढण्यास तयार आहेत, हे खचित. स्थानिक सरकारच्या किंवा साम्राज्य सरकारच्या संरक्षणाने, त्यांची गाऱ्हाणी दूर करण्यासाठी योग्य ते उपाय योजणे अवश्य आहे, असे माझे प्रांजळ मत आहे.

त्यांच्यासाठी हा अर्ज लिहिण्याचे काम हाती घेण्यापूर्वी मी फार साशंक होतो. पण मला असे वाटले की, ज्या साम्राज्याचा मी घटक आहे किंवा ज्यावर मी प्रेम करीत आहे, त्यांतील प्रजाजनांच्या भावनांना योग्य वाचा फोडणे, हे माझे कर्तव्य आहे. आपल्या बादशहाचे दक्षिण आफ्रिकेतील परमश्रेष्ठ प्रतिनिधी जे आहेत, त्यांच्यापुढे आपली गाऱ्हाणी समक्ष मांडण्यास काही अर्जदार उत्सुक होते व अजून आहेत. पण अशी विनंती मान्य होण्याचा फारसा संभव नाही, असे मी त्यांना सांगितले. आपल्या कार्यबाहुल्यामुळेच नव्हे तर अर्जदाराच्या या विनंतीतील अनौचित्यामुळे, मी त्यांना तसा सल्ला दिला.

[आपला,
मो. क. गांधी]

इंडियन ओपिनियन, ७–१२–१९०७

१. हाय कमिशनरला अर्ज, लेख ३०१ पाहा.

३१३. रिच् यांची सेवा

श्री. रिच इंग्लंडमध्ये हिंदी लोकांच्या कल्याणार्थ किती अखंड कष्ट करीत आहेत, याची पुरी कल्पना सर्व हिंदी लोकांना कदाचित् नसेल. अलीकडे त्यांनी एक लहानसे पुस्तक[१] प्रसिद्ध करून, हिंदी लोकांवर आणखी ऋण करून ठेवले आहे. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांच्या हालअपेष्टांचा दळदळीत वृत्तांत त्या पुस्तिकेत दिलेला आहे. श्री. रिच् यांची सेवा अमोल आहे, हे प्रत्येक हिंदी माणसाला माहीत आहे. त्यांनी सारा वृत्तांत तेवीस पानांच्या पुस्तिकेत समाविष्ट केला आहे. त्या संक्षिप्त निवेदनात सारी भूमिका आली आहे आणि १८८५ पासूनचा इतिहास दिलेला आहे. श्री. रिच् यांच्या केवळ प्रयत्नामुळेच आपला फायदा होतो असे नाही, तर त्यांच्या प्रतिष्ठेचाही उपयोग होतो. याचा अर्थ असा की, अठरा वर्षे वसाहतीत राहिलेले अनुभविक गोरे श्री. रिच् हे हिंदी लोकांच्या हक्कासाठी झगडा करीत आहेत, याचा गोऱ्या लोकांवर फार जबरदस्त परिणाम होतो. यासाठीच या घटनेचा उल्लेख त्यांनी आपल्या पुस्तिकेच्या प्रस्तावनेत केला आहे. एवढ्याशा लहानशा पुस्तिकेत इतकी विपुल माहिती त्यांनी ठेचून भरली आहे, यावरून श्री. रिच् यांनी आपल्या पुस्तकासाठी किती आस्थेवाईक प्रयत्न केले, हे स्पष्ट होते.

लॉर्ड मिल्नर यांनी १९०३ साली हिंदी समाजाला जी अभिवचने दिली, त्यांचे स्मरण श्री. रिच् यांनी करून दिले हे योग्यच आहे. त्या वेळी लॉर्ड मिल्नर म्हणाले होते,

"रजिस्टरवर एकदा नाव आले, म्हणजे त्यांचे स्थान कायम झाले. मग पुनः नोंदणी करण्याची किंवा नवा परवाना घेण्याची गरज राहणार नाही. ह्या नोंदणीमुळे तुम्हांला येथे राहण्याचा आणि जाण्यायेण्याचा हक्क प्राप्त होतो."[२] सक्तीची नोंदणी व खुषीची नोंदणी यांची तुलना करून श्री. रिच् यांनी त्या दोषांतील फरक दाखविला आहे. खुषीच्या नोंदणीत, सक्तीचा दोष नाही. गोऱ्या लोकांच्या भावनांना मान देऊन, आशियावासी लोकांनी केलेले, ते एक गौरवशाली कृत्य होईल. पण नोंदणी सक्तीची केली तर, हिंदी लोक व काफीर यांच्यामध्ये काही भेद राहणार नाही.

१. पाहा, परिशिष्ट ८.

२. पाहा, खंड ३, लेख २३४.

शेजारच्या वसाहतींना, हाच मार्ग चोखाळण्याचा मोह होईल. गौरेतर वस्त्यांमध्ये, " हिंदी लोकांना सक्तीने, अलग ठेवण्याची ही प्रस्तावनाच ठरेल. "

श्री. रिच् हे या प्रश्नाबद्दल युक्तिवाद करीत बसले नाहीत. सत्य घटनांवर त्यांनी भर दिला आहे, 'आणि त्या घटना त्यांनी अशा चातुर्याने मांडल्या आहेत की, त्यामुळे हिंदी लोकांची बाजू न्यायाची आहे, असा निर्णय वाचक अचूकपणे देतो. पुस्तिकेच्या शेवटी, श्री. रिच् यांनी असे दाखविले आहे की, युद्धपूर्व आश्वासने आणि युद्धोत्तर कृती यांमधील विसंगतीमुळे सरकारची लबाडी स्पष्ट होते. श्री. रिच् यांचे स्वतःचे शब्द असे आहेत :

" हिंदी समाज अल्पसंख्य आहे आणि त्याला प्रतिनिधित्व मुळीच मिळालेले नाही, अशा समाजाच्या हिताचे रक्षण करणे, हे ट्रान्सवॉल सरकारचे कर्तव्य होतेच, पण त्याशिवाय साम्राज्याच्या व्यापक कल्याणासाठी स्थानिक हितसंबंध गौण लेखणे हेही त्याचे कर्तव्य होते. अडीच लाख गोऱ्यांसाठी, तीस कोटी भारतीय लोकांच्या प्रतिनिधींवर अन्यायामागून अन्याय रचल्याने, साम्राज्य सरकारच्या सत्तेला व प्रतिष्ठेला किती धोका उत्पन्न झाला आहे, याचा नुसता विचार गोऱ्या लोकांनी करावा. "

ट्रान्सवॉलच्या प्रश्नाबाबत, हिंदी लोकांचा दृष्टिकोन काय आहे, हे इंग्लंडातील व इतर ठिकाणच्या गोऱ्या लोकांना कळण्याचे साधन श्री. रिच् यांच्या पुस्तिकेने पुरविले आहे. हिंदी समाजाला हा मोठाच लाभ होय.

अशा प्रकारे, आपण निकराचा लढा देत आहोत, समेटासाठी, वाटाघाटीही चालू झाल्या आहेत, असे दिसते. हे लक्षात घेऊन प्रत्येक हिंदी माणसाने, खंबीर राहिले पाहिजे आणि सरकारने लावून ठेवलेल्या कोणत्याही सापळ्यात न सापडता, तुरुंगवासासाठी, धैर्याने उभे राहिले पाहिजे, हे आम्ही सांगण्याची गरज नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ७-१२-१९०७

३१४. कायद्याला मान्यता देणाऱ्यांचे काय होणार ?

या प्रश्नाचे उत्तर आम्ही वारंवार दिले आहे. आता श्री. हिल यांनी ते दिले आहे. आशियावासियांचे जे विरोधक आहेत, त्यांचे श्री. हिल हे एक म्होरके

आहेत. त्यांनी लिहिलेल्या पत्राचा सारांश[1] आम्ही अन्यत्र देत आहोत. तो प्रत्येकाने वाचला पाहिजे. श्री. हिल म्हणतात, "नवा कायदा हा केवळ आरंभ आहे. शेवटी आशियावासियांची पूर्ण हकालपट्टी करावयाची आहे. दुसरे कायदे यापुढे खात्रीने येतील. म्हणून नव्या कायद्याला हिंदी लोकांनी आपल्या लढ्याच्या रूपाने जे आव्हान दिले आहे, ते सरकारने पुरे मोडून काढले पाहिजे. याचाच अर्थ असा की, कायद्याची अंमलबजावणी पूर्णपणे केली पाहिजे आणि आशियावासियांना चिरडले पाहिजे. तसे झाले म्हणजे गोऱ्या लोकांना आपल्या इच्छेप्रमाणे वागता येईल." अशा पत्रानंतर, नव्या कायद्याला मान्यता देणारा माणूस, शांततेने राहू शकेल, असे कोणी तरी मानील काय ?

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ७-१२-१९०७

३१५. रामसुंदर पंडित

रामसुंदर पंडितजींसंबंधी विचारणा करणारी पत्रे आमच्याकडे आलेली आहेत. ती छापण्याचा आमचा विचार नाही, कारण ती लिहिणाऱ्या लोकांना चुकीची माहिती मिळाली आहे. त्या पत्रात उत्पन्न केलेल्या प्रश्नांपैकी एकाला येथे उत्तर देत आहो.

पंडितजींच्या तात्पुरत्या परवान्याची मुदत संपल्यानंतर ते येथे राहिले, आणि त्यासाठी त्यांना तुरुंगात जावे लागले, तर त्यामुळे हिंदी समाजाचा फायदा कसा होणार ? असा काहीजणांचा प्रश्न आहे. अशी शंका घेणे अगदी चुकीचे आहे. ज्यांच्याजवळ तात्पुरते परवाने आहेत, ते पंडितजींप्रमाणे, लढा देऊ शकणार नाहीत. मुदत संपताच ती माणसे ट्रान्सवॉल सोडून जातील. पण, धर्मगुरूसारखी माणसे, मुदतवाढ न मिळाली तरी, येथेच राहतील. हिंदी समाजाच्या इच्छेप्रमाणे, ते येथे राहिले याचे कारण हे आहे. जर्मिस्टनच्या (हिंदी) रहिवाश्यांनी या विषयावर (अधिकाऱ्यांना) लिहिले आहे. त्यांच्यावरील खटल्यात, नव्या कायद्याच्या १७ व्या कलमाप्रमाणे आरोप ठेवण्यात आला. त्यांच्या खटल्यामुळे, समाजाचे पुष्कळ कल्याण

१. तो येथे दिलेला नाही.

झाले, अशी आमची खात्री आहे. पंडितजी तुरुंगात गेल्यामुळे प्रत्येकजण अधिक धैर्यशाली बनला. सध्यासारख्या वेळी, कायद्याविरुद्ध चाललेल्या झगड्यात कोणताही हिंदी माणूस तुरुंगात गेला तर, त्यापासून भलेच होईल. कारण, हा आपला पहिला अनुभव आहे. पंडितजींसारख्या माणसाच्या बंदिवासाचा परिणाम अत्यंत प्रभावी झाल्याशिवाय राहणार नाही. खरोखर, तसा परिणाम घडूनही आला आहे. त्या परिणामामुळेच, शाहजी साहेब व इतर लोक यांनी त्यांच्या पाठोपाठ तुरुंगात जाण्याचा आटोकाट प्रयत्न केला. तसेच, जर्मिस्टन येथे भरलेल्या सभेस शेकडो हिंदी लोक हजर राहिले. पंडितजींचे, त्यांच्या धैर्याबद्दल, सभेत अभिनंदन करण्यात आले. बोलतो प्रत्येकजण, पण आतापर्यंत कृती केली फक्त पंडितजींनी. समाजाच्या कल्याणार्थ त्यांनी आपली आहुती दिली आणि तुरुंगातून सुटल्यावर आणखी आहुती देण्यास ते तयार आहेत हे आम्हांला पुरेसे आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ता. ७–१२–१९०७

३१६. नाताळसाठी स्वयंसेवक

झुलू लँडमध्ये, काफिरांचे बंड पुनः उद्भवले आहे म्हणून, गोऱ्यांच्या शेकडो पलटणी तिकडे पाठविण्यात आल्या आहेत. अशा वेळी हिंदी समाजाने पुढे आले पाहिजे. या संधीपासून आपल्याला काही हक्क मिळविण्याचा त्यांनी विचारही करता कामा नये. त्यांनी केवळ सामाजिक कर्तव्याचा विचार करावा. आपण आपले कर्तव्य केले, म्हणजे हक्क आपोआप येतात, हा सर्वसामान्य नियम आहे. गेल्या[1] वर्षी दाखविलेली तयारी हिंदी समाजाने पुनः दाखविणे योग्य होईल. युद्धात भरती न होणाऱ्यावर कर बसविण्याचा विचार सध्या चालू आहे. या कराचा बोजा फक्त हिंदी लोकांवर पडेल. आणि तो कर दिला तरी, त्यांना श्रेय काहीच मिळणार नाही. म्हणून, हिंदी लोकांनी सहाय्य करण्याची आपली तयारी पुनः दाखवावी, असे आम्हांला निश्चित वाटते. अशा कार्याचे स्वागत उत्साहाने करणारे पुष्कळ हिंदी लोक असतील, असे आम्हांला वाटते. गेल्या वर्षी जे लोक युद्धाच्या आघाडीवर गेले, ते पुनः जाऊ

१. पाहा. खंड ५. लेख ३०९, ३१० व ३११ आणि ३१२

शकतील. त्यांच्यापैकी पुष्कळजण, कसलेले, कार्यकर्ते आहेत आणि त्यांना कार्याच्या स्वरूपाचे-ज्ञान आहे. हे कार्य तात्काळ हाती घेतले जाईल, अशी आम्हांस फार आशा वाटते.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, ७-१२-१९०७

३१७. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

प्रचंड सार्वजनिक सभा

हिंदी लोकांच्या सार्वजनिक सभांना अंत नाही, आणि प्रत्येक सभा मागल्यापेक्षा चांगली होते. प्रिटोरियामध्ये भरलेली अलिकडची सभा त्यापूर्वीच्या सभेपेक्षा पुष्कळच मोठी होती. जोहान्सबर्ग येथे गेल्या रविवारी भरलेली सभा[1], प्रिटोरियातील सभेवरही ताण करणारी होती. त्यातील लोकांचा उत्साह आणि गर्दीचे प्रमाण प्रभावशाली होते. आता लोक स्वेच्छेने सभेस येतात, आणि प्रत्येकजण उत्साहाने थरारून जातो. कोणतीही किंमत देऊन देशसेवा करण्याची ज्वलंत इच्छा सर्वत्र दृष्टीस पडत आहे.

दोन हजारांहून अधिक श्रोते

या सभेला २००० हून अधिक लोक हजर होते. पुष्कळ शहरांतील प्रतिनिधी आले होते. प्रिटोरियाहून सुमारे ४०, पॉचेफस्ट्रूमहून १६ आणि इतर ठिकाणांहून असेच प्रतिनिधी आले होते.

सूरती मशिदीतील सभा

सूरती मशिदीच्या पटांगणात एक सभा भरली होती. मशिदीचे अंगण, गच्ची, व छप्पर यांवर—चोहोकडे—माणसे बसलेली होती. श्री. इसापमिया यांच्या नव्या घरात, ही सभा भरविण्याचा विचार प्रथम होता. पण सभा सुरू होण्यापूर्वीच प्रचंड लोकसमुदाय जमला होता. त्याला त्या घरात सामावून घेणे अशक्य होते; म्हणून, उघड्यावर सभा घेण्याचे तत्काळ ठरविण्यात आले.

१. जोहान्सबर्गच्या उपनगर फोर्ड्सबर्गमध्ये ही सभा भरली.

इसापमिया

श्री. इसापमिया अध्यक्षस्थानी होते. पण तेथली परिस्थिती पाहून ते आणि जोहान्सबर्गचे बरेचसे लोक सर्व वेळ उभे राहिले. तेथे आलेल्या प्रतिनिधींचे स्वागत त्यांनी केले आणि निरोधकांना त्यांच्या कार्याबद्दल धन्यवाद दिले.

अन्य भाषणांचा सारांश

डिसेंबरमध्ये काय घडण्याचा संभव आहे, याचा खुलासा करून श्री. गांधी म्हणाले, "गोऱ्यांच्या चित्तांतील सहानुभूतीची भावना वाढत आहे. हिंदी लोकांनी स्वातंत्र्य मिळविण्याची हीच वेळ आहे. म्हणून त्यांनी नेहमी पुढाऱ्यांच्या तोंडाकडे पाहात बसू नये. प्रत्येकाने स्वतःला पुढारी मानावे आणि तुरुंगवासादी जी संकटे येतील, ती धैर्याने सोसावी. आता आमचा अर्ज या लोकींच्या राज्यकर्त्यांकडे नाही, तर तो विधात्याकडे आहे."

श्री. इमाम अब्दुल कादीर यांनी सांगितले, "ईश्वरावर ज्याची श्रद्धा आहे, त्याला भीती बाळगण्याचे कारण नाही. मी निरोधक आहे, आणि सरकारने मला प्रथम पकडले, तर मला आनंद वाटेल."

श्री. मणिभाई देसाई (प्रिटोरिया)– "सरकार जर निरोधकांवर प्रथम घसरणार असेल, तर त्या हल्ल्याचा तडाखा मी आनंदाने सोशीन."

एका कानमिया निरोधकाने [त्याचे नाव मला माहीत नाही] जाहीर केले, "मी मुळीच भिणार नाही."

श्री. अब्दुल गानी––"या लढ्यात ईश्वर आपल्या बाजूचा आहे. कारण आपली बाजू न्यायाची आहे. तुरुंगात जाण्याचे भय आम्हांला काडीमात्र वाटत नाही."

श्री. नायडू यांनी तामीळमध्ये भाषण केले आणि सर्व परिस्थिती समजावून सांगितली.

श्री. शाहजी साहेबांनी हाजरत इमाम साहेब यांनी सोसलेल्या हालअपेष्टांचे वर्णन केले व ते म्हणाले, "रामसुंदर पंडिताला जे भोगावे लागले, ते मुसलमान धर्मगुरुलाही भोगावे लागेल. हा विचार मला सहन होत नाही, म्हणून पंडितांप्रमाणे तुरुंगात जाण्याची तयारी मी केली आहे."

श्री. उमरजी साले—"तुरुंगाचे भय मला काहीच नाही."

श्री. कुवाडिया—"सरकारने व्यापारी वर्गावर हल्ला करून; त्यांना दुकाने बंद पाडण्यास भाग पाडले तरी, त्याचा काही परिणाम होणार नाही, त्यामुळे आमचे स्वातंत्र्य जवळच येईल."

श्री. खुरशेदजी देसाई [क्रूगर्सडॉर्प]-- "काफिरांना जे परवाने बाळगावे लागतात, ते मिळण्यात फार अडचणी आहेत."

श्री. अब्दुल रहमान—"पॉचेफस्ट्रूम अगदी बळकट आहे. तेथील सारे लोक तुरुंगात जाण्यास तयार आहेत."

श्री. उस्मान लतिफ--"माझी बायकामुले मागे ठेवून मी तुरुंगात जाण्यास सिद्ध आहे."

श्री. क्विन्न—[चिनी संघाचे अध्यक्ष] इंग्रजीत बोलले व म्हणाले "आशिया-वासियांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी हा लढा आहे. सारे चिनी लोक, प्राणपणाने लढण्यास सिद्ध आहेत."

श्री. इब्राहीम अस्वात—"आता जर हिंदी समाज शरण गेला आणि भीती-मुळे त्यांनी जर नोंदणीपत्रे घेतली, तर आत्महत्या केलेला तो चिनी माणूस त्या समाजाला ईश्वरापुढे झडती देण्यास पाचारण करील. कारण, चिनी लोकांना लढण्याची चेतावणी देणारे हिंदी लोकच आहेत."

श्री. नबाबखान– "समाजाच्या कल्याणासाठी व धर्मासाठी अखेरपर्यंत लढा देणे, हे प्रत्येक हिंदी माणसाचे कर्तव्य आहे."

श्री. हाजी हबीब—"मेमन लोकांनी नोंदणी-पत्रे घेतली, याचा मला खेद होतो. आपण सर्वांनी खंबीर राहिले पाहिजे".

श्री. पोलक--"खऱ्या कसोटीची वेळ, आता जवळ आली आहे. श्री. गांधींना बंदिवास घडल्यानंतर माझ्याकडे जे जे काम येईल, ते ते करण्यास मी चुकणार नाही."

काही प्रश्नांना उत्तर दिल्यानंतर श्री. गांधी म्हणाले, "अटक झाल्यानंतर, तुरुंगात कोणाला बोटांचे ठसे देणे भाग पडले, तर ते त्याने द्यावे. हा लढा गुलाम-गिरीतून मुक्त होण्यासाठी आहे--बोटांच्या ठशाविरुद्ध नाही. तुरुंगात दहा बोटांचे ठसे घेण्याचा नियम सर्वांना लागू असतो. त्याला आपण विरोध करू नये. परंतु तुरुंगात जर तुम्हांला कोणी नोंदणी करण्यास सांगितले, तर ती मात्र करू नका. मला अटक झाली तर तारा पाठविणे वगैरे सारी कामे श्री. पोलक करतील. नवे नोंदणी-पत्र न घेतल्या-मुळे कोणाला पकडण्यात आले तर त्याने वकील देऊ नये."

श्री. मनजी लाखामी [प्रिटोरिया]–"काही लोक 'कोडी'शी खेळत आहेत, तर काही 'चामनी'चा धूर सेवन करीत आहेत.[१] मी भीक मागेन, पण नवे नोंदणी-पत्र घेणार नाही."

श्री. कचालिया---"पुढारी दृढ राहोत वा न राहोत, ज्यांना गुलामगिरी नको आहे, ते लढा चालू ठेवतील."

१. 'कोडी' [कवडी] व चामनी [चिमणी] या शब्दावर वक्त्याने श्लेष साधला.

ट्रान्सवॉल लीडरचे संपादक, श्री. कार्ट राईट हे सभेची बातमी ऐकून एक प्रेक्षक म्हणून सभेस मुद्दाम गेले होते. त्यांना हिंदी लोकांविषयी फार सहानुभूती वाटते. ते एक प्रसिद्ध गृहस्थ आहेत. आपल्या प्रभावी लेखनामुळे ते स्वतः तुरुंगात गेलेले आहेत. ते अत्यंत कर्तृत्ववान् आहेत. सत्याचे समर्थन करण्यास ते कचरत नाहीत.

रामसुंदर पंडितांचा संदेश

सोमवारी श्री. गांधींनी, खास परवानगी काढून, रामसुंदर पंडितांची भेट घेतली. त्या दोघांचे भाषण इंग्रजीत व्हावे, असा गव्हर्नरचा हुकूम असल्यामुळे, मुख्य वॉर्डराच्या समक्ष, सारी मुलाखत इंग्रजीत झाली. पंडितजी पुष्कळ गोष्टींवर बोलले. त्यांतील सार मी पुढे देतो :

" मी येथे सुखात आहे, असे सर्वांना कृपा करून सांगा. सरकारने मला सक्त मजुरी दिली असती, तर अधिक चांगले झाले असते. येथून सुटल्यावर समाजासाठी पुनः तुरुंगात जाण्यास मी तयार आहे. येथे आल्यावर मी तुरुंगात जाण्यावरील साऱ्या कविता वाचल्या. त्यामुळे, माझे हृदय फार हलले. विशेषतः श्री. मेहता यांच्या काव्यांचा परिणाम फार झाला. मी जेव्हा बाहेर येईन, तेव्हा जर्मिस्टनमधील प्रत्येक हिंदी माणसाच्या हातात या कवितांची प्रत असलेली पाहीन अशी मला आशा आहे. आता डिसेंबर सुरू झाला असूनही इतर हिंदी लोकांना पकडण्यात आले नाही, हे कसे ? तसे घडल्यावरच आपल्याला स्वातंत्र्य मिळेल. तुरुंगात काही हाल नाहीत, असे सर्वांना कृपया सांगा. येथे स्त्रियाही दिसतात. माझी काही चिंता करू नका. मला राजवाड्यात असल्यासारखे वाटते. कोणाही हिंदी माणसाने कायद्याला मान्यता देऊ नये, एवढीच माझी इच्छा आहे. गव्हर्नर आणि मुख्य वॉर्डर माझी फार चांगली काळजी घेतात. "

तुरुंगवासाच्या काव्यासंबंधी पंडितजी जे बोलले, ते येथे देण्यास मला फार संकोच वाटला. पण कर्तव्य म्हणून मी त्यांचा संदेश दिला. कारण तो देण्यावर त्यांचा फार भर होता. यांमध्ये 'इंडियन ओपिनियन' मधील सेवकांचा काही आर्थिक लाभ आहे, अशी कल्पना कोणी करून घेऊ नये. हे वृत्तपत्र मोठ्या कष्टाने प्रसिद्ध केले जात आहे. त्यात काम करणाऱ्या लोकांना म्हणण्यासारखा लाभ अजूनही होत नाही.

पंजाबी लोकांचा अर्ज

पंजाबी लोकांनी केलेल्या अर्जाचे भाषांतर मी गेल्या आठवड्यात दिले. त्या अर्जाबरोबर श्री. गांधींनी लॉर्ड सेलबोर्न यांना पुढील पत्र[1] दिले आहे.

१. पत्राच्या मसुद्यासाठी पाहा. 'हायकमिशनरला पत्र' लेख ३१२. यातील पहिला परिच्छेद गुजराती भाषांतरात वगळला आहे.

नोव्हेंबरातील बेइमानदार

नोव्हेंबर महिन्यात निरोधकांनी जोहान्सबर्गप्रमाणे प्रिटोरिया येथेही उत्तम काम केले. त्यांच्या दक्षतेमुळे फारच थोड्या हिंदी लोकांनी नावे नोंदविली. त्यामध्ये खुद्द प्रिटोरियाचा एकही माणूस नव्हता, हे सांगितले पाहिजे. वसाहतीतील काही तुरळक माणसे होती. हायडेलबर्ग आघाडीवर होते. श्री. रतिलाल यांना सुशिक्षित मानले जाते. ते पहिले होते. त्यांच्यानंतर श्री. अबुमिया कमरुद्दीन यांचे लोक गेले आणि शेवटी गेले श्री. खोटाचे लोक. श्री. खोटाच्या लोकांनी अर्ज केले, याचे सर्वांना दुःख वाटले. या लोकांच्या कृत्यामुळे सूरती समाजाला आपला पाणउतारा झाला, असे वाटले. श्री. रतिलालांच्या अर्जाने गुजराती हिंदूंमध्ये फार खळबळ माजली. आतापर्यंत गुजराती हिंदू निर्मळ होते, असे म्हटले जाते. श्री. लक्ष्मीचंद याच्याशिवाय दुसरा कोणीही अर्ज करणार नाही, असा सर्वसामान्य समज होता. तो श्री. रतिलालांनी खोटा पाडला. श्री. खोटा यांच्या नोकरांसंबंधी, त्यांनी लिहिले आहे की, हा त्या नोकरांचा दोष नाही– मी त्यांच्यावर दडपण आणले, म्हणून ते गेले. ते जाण्याला अगदी नाराज होते. पण माझ्या दबावामुळे गेले. आता श्री. खोटा यांना दुःख वाटते आणि शरमही वाटते. त्यांचे म्हणणे असे की, माझी चार दुकाने आहेत, म्हणून मी फार घाबरलो होतो. मी स्वतः कोणत्याही परिस्थितीत अर्ज करणार नाही, त्यामुळे तुरुंगात जावे लागले तरी जाईन. श्री. खोटा आपल्या वर्तनाचे समर्थन करीत नाहीत, म्हणून त्यांच्यावर टीका करण्याची गरज नाही. पण ते भयाने ग्रासले गेले, ही गोष्ट प्रत्येकाला शोचनीय वाटेल. ते कर्तव्यापासून चळले नसते, तर किती नामी झाले असते ! श्री. खोटांचा कित्ता कोणी गिरवणार नाही, अशी आशा आहे.

दुसरे फितूर म्हणजे, मद्रास व कलकत्ता येथील काही कंगाल लोक. त्यांना काही महत्त्व देऊ नये. कारण येथे त्यांची माहिती कोणाला नाही. जवळ जवळ गुलामासारखे ते वागत होते. नोव्हेंबरमध्ये नोंदणीचे काम चालू राहावे, असे काही पुढाऱ्यांना वाटत होते, हे बोलणे अशा रीतीने निराधार ठरले आहे.

संडे टाईम्स

संडे टाईम्सने असे म्हटले आहे की, पूर्वीचे परवाना–अधिकारी भ्रष्ट नसते, तर नव्या कायद्याची गरज लागली नसती. याचा अर्थ असा की, सरकार आपल्या अधिकाऱ्यांच्या चुकीसाठी हिंदी समाजाला शिक्षा करीत आहे.

इतर वृत्तपत्रे

इतर वृत्तपत्रातील टीका मजेशीर आहे. सरकार कोणाला तुरुंगात पाठवील, असे कोणत्याच पत्राला वाटत नाही. स्टारने तर असे म्हटले आहे की, कोणाला तुरुंगात

पाठविण्याची गरजच नाही. केवळ परवाने नाकारून सरकार हळू हळू वाढते दडपण आणू शकेल, लोकांना परवाने घ्यावयास भाग पाडील. आणि त्या पत्राने अशी उघड सूचना केली आहे की, जेव्हा एखाद्या हिंदी माणसाला मॅजिस्ट्रेटपुढे उभे केले जाईल, तेव्हा मॅजिस्ट्रेटने त्याला तुरुंगात पाठविण्याऐवजी, नोंदणीसाठी अर्ज करण्याला आणखी मुदत द्यावी.

दक्ष राहा

'स्टार 'मधील पत्रक सरकारच्या प्रेरणेने निघालेले दिसते आणि म्हणून प्रत्येक हिंदी माणसाने दक्ष राहिले पाहिजे. मॅजिस्ट्रेट पुढे उभे केलेला एखादा हिंदी माणूस भित्रा निघाला, तर त्याचा परिणाम चांगला होणार नाही. त्या हिंदी माणसाला देश सोडून जाण्याची नोटीस न देता, मॅजिस्ट्रेट त्याला फक्त नोंदणीचा अर्ज करण्यास सांगेल. अशा रीतीने सरकारला जर सापळा ठेवावयाचा असेल, तर हिंदी माणसांनी जागरूक राहाणे जरूर आहे. खडखडीत नकार दिल्याने, साऱ्या अडचणी नाहीशा होतील. प्रत्येकाने उतरादाखल फक्त ' नाही ' असे निक्षून सांगावे. आता सरकारच्या दुबळे-पणाला सीमा नाही. ते जुलमी बनले आहे आणि म्हणूनच ते भयभीत झाले आहे. जनरल स्मट्सची धमकी कोठे गेली ? हद्दपारीच्या त्यांच्या भाषेचे काय झाले ? सरकार जरी असा दुबळेपणा दाखवीत असले, तरी असे काही हिंदी लोक आहेत की, ज्यांच्या चित्तात अजून भीतीने ठाणे दिले आहे.

दुसरी सूचना

एखाद्या हिंदी माणसाच्या घरासमोर एखादा माणूस उभा राहिला आणि आपण साध्या पोशाखातील गुप्त पोलिस आहो, असे म्हणून परवाना मागू लागला किंवा दुकान बंद करण्यास सांगू लागला, तर त्याच्याकडे कोणी लक्ष देऊ नये. आपण गुप्त पोलीस असल्याचा बहाणा काही लोक करण्याचा संभव आहे.

समेटाची हालचाल

पुष्कळ प्रसिद्ध गोऱ्या लोकांनी समेटासाठी हालचाल सुरू केली आहे. सर पर्सी फीट्स पैट्रीक आणि इतर लोक यांच्यामध्ये मुलाखती चालू आहेत. सरकार कोणालाही पकडणार नाही आणि समेट शांततेने घडून येईल, अशी चिन्हे आता दिसत आहेत. तसे झाले तर, त्याचे श्रेय रामसुंदर पंडित व आत्महत्या करणारा चिनी माणूस यांना मिळेल. त्या घटनांमुळे सर्वत्र उलट प्रतिक्रिया झाली आणि आशियावासियांची बाजू बळकट झाली. समेटच्या हालचालीविषयी सर्व गोष्टी जाहीर करण्याची वेळ अद्याप आली नाही. म्हणून मला येथेच थांबणे भाग आहे. सर्व वृत्तपत्रे आता असे सांगतात की, सध्याचा कायदा सरकार जारी करणार नाही. जानेवारीत काही तरी घडेल. या

मार्गाने सरकार एकेक पायरी खाली येत आहे. सार्‍या लोकांना तुरुंगात डांबले जाईल, अशी भाषासुद्धा आता, काळ्या किंवा गोर्‍या, कोणाच्याच तोंडून निघत नाही.

छान झाले !

कलकत्ता व मद्रास येथील काही लोकांनी दडपणामुळे किंवा आपल्या नोकर्‍या जातील या भयामुळे आपली नावे नोंदविली होती. आता त्यांच्या नोकर्‍या गेल्या आहेत. त्याचे कारण माहीत नाही. त्यांनी प्लेगची लस टोचून घेतली, तरी त्यापासून त्यांची सुटका झाली नाही, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. आता त्यांना फार दुःख वाटत आहे. व्यवसाय व प्रतिष्ठा हे दोन्ही त्यांनी गमावले. दुसरेही उदाहरण मला कळले आहे. उधारी मिळेल या आशेने एक दोन हिंदी लोकांनी आपली नावे नोंदवली. आता त्यांनी (आपल्याला उधारी देणार्‍या) व्यापार्‍यांकडे आपल्या हिशेबाच्या वह्या टाकल्या आहेत ! ईश्वराची लीला अगाध आहे.

सविनय प्रतिकार करणारा कोकणी

महम्मद इशाक नावाच्या कोकणी माणसाजवळ जुने नोंदणीपत्र व परवाना आहे. तरीसुद्धा नाताळहून फोक्सरस्ट येथे जात असताना, त्याला नव्या कायद्या-प्रमाणे अटक झाली. जामीन देण्याचे त्याने नाकारले. त्या माणसाला अटक करण्याचा अधिकार तुम्हांला नाही अशी तार श्री. गांधींनी सरकारी वकिलाला पाठविली आहे. "आणि जर त्याला खटल्याशिवाय अडकवून ठेविले, तर मी स्वतः त्याचा खटला लढवीन." या माणसावर खटला होऊ शकत नाही, कारण तो नाताळहून ट्रान्सवॉल-मध्ये नुकताच आलेला आहे. आठ दिवस होईपर्यंत, त्याला पकडण्याचा अधिकार नाही. या मार्गाने हा खटला लढविला पाहिजे. कारण बाहेरून येणार्‍या लोकांना येथे आठ दिवस स्वतंत्रपणे राहण्याची संधी मिळणे, अवश्य आहे. अशा स्थितीत खटला जोहान्सबर्ग येथेच चालू शकेल आणि त्यामुळे सविनय प्रतिकाराचे बळ वाढेल. हा सविनय प्रतिकारक कोकणी आहे, म्हणून मी सर्व कोकणी लोकांचे अभिनंदन करतो. हा खटला शुक्रवारी चालेल. मॅजिस्ट्रेटने १० पौंडांचा जामीन ठरविला आहे पण तो कोणी दिला नाही. श्री. महम्मद इशाक शूर व निर्भय राहिला आहे, अशी तार फोक्सरस्टहून आलेली आहे.

समेटाविषयी काही

समेटाविषयी वाटाघाटी चालू आहेत. लोकांमध्ये इतका उत्साह आहे की, खुषीची नोंदणी आता ते मागे घेऊ इच्छितात आणि ते म्हणतात, "सरकारबरोबर समेट मुळीच होता कामा नये. लढा पुढे चालला पाहिजे. आपल्याजवळ जे कागदपत्र असतील ते आपण आपल्याजवळ ठेवून पुढे काय काय होते ते पाहात राहावे." हा

उत्साह अत्यंत प्रशंसनीय आहे (पण) आता वेळ अशी आली आहे की, जेव्हा समाजाने विवेक दाखवावा. गेले बारा महिने समेटासाठी, ज्या योजना आपण पुढे केल्या; त्या आता परत घेता येणार नाहीत, हमीदिया सभागृहात बुधवारी सभा भरली होती. पण त्या सभेत पुष्कळ लोकांनी असे निक्षून सांगितले की, आपण जुन्या नोंदणी-पत्रांनाच चिकटून असावे. त्यांच्या बदली नवी नोंदणी-पत्रे स्वेच्छेने आपण घेऊ नयेत. हा उत्साह ओसरेल, आणि लोक शांत होऊन समंजस मागण्या पुढे मांडतील, अशी मला आशा आहे. कायदा पराभूत झाला, हा मी मोठा विजय समजतो, आणि लोकांची वृत्ती खंबीर राहिली तर, कायद्याचा पूर्ण पराभव नक्कीच होईल. पण त्याबरोबरच आपण समंजस आहो, आणि आपला शब्द आपण पाळतो, असे सिद्ध होणेही अवश्य आहे. शपथ मोडणे, हा जसा आपण अपराध मानतो, तसेच खुषीच्या नोंदणीचे आपण दिलेले अभिवचन मोडणे, हे आपल्याला लांछनास्पद आहे.

रविवारची सभा

या प्रकरणाचा अधिक विचार करण्यासाठी रविवारी एक सभा भरणार आहे. शेवटी समाज विवेकाने वागलाच, तर उत्साहाच्या सध्याच्या लाटेचे स्वागतच होईल.

पंडित

श्री. रामसुंदर पंडित यांची सुटका जोहान्सबर्गच्या तुरुंगातून ता. १३ रोजी सकाळी ९ वाजता होईल. त्यावेळी त्यांचे स्वागत करण्यासाठी जोहान्सबर्गमधील पुष्कळसे हिंदी लोक तेथे जमतील, अशी अपेक्षा आहे. त्यांचे स्वागत झाल्यानंतर येथे एक सभा भरविण्याचा विचार आहे.[1] बाहेरच्या लोकांनी अभिनंदनाच्या तारा पाठवून त्यांना "जरूर तर पुनः तुरुंगात जाण्याचे धैर्य दाखवा," असे म्हटले तर योग्य होईल.

पंजाबी

झुलू युद्धात पंजाबी व इतर लोक यांची भरती करावी, अशी शिफारस करणारे एक पत्र एका युरोपियनाने लॉर्ड सेलबोर्न यांना पाठविले आहे. लॉर्ड सेलबोर्न यांनी पंजाबी लोकांच्या अर्जाला असे उत्तर पाठविले आहे की, तुमचा अर्ज स्थानिक सरकारकडे पाठविला आहे.

चुकीची दुरुस्ती

गेल्या आठवड्यात मी जेव्हा बातमीपत्र लिहिले, तेव्हा (हिंदी राष्ट्रीय) काँग्रेसच्या आपल्या प्रतिनिधींना २५ पौंड पाठविण्याचा विचार चालू होता. पुढे ३५

१. पाहा. 'रामसुंदर पंडित लेख' ३३४.

पौंड पाठविण्याचे ठरले, त्याप्रमाणे ३५ पौंडांचा चेक श्री. अमीरुद्दीन यांना पाठविला आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन ७–१२–१९०७.

३१८. हिंदी लोकांचा खटला[1]

[फोक्सरस्ट
ता. ९ डिसेंबर, १९०७]

उलट तपासणीत साक्षीदाराने कबूल केले की, या लोकांनी जे परवाने दाखल केले, ते आतापर्यंत, आशियावासियांना येथे येण्याला किंवा पुनः प्रवेश करण्याला, योग्य तो अधिकार कायद्याप्रमाणे देणारे आहेत. पुनःप्रवेश परवान्याप्रमाणे, योग्य आहे की शांततासंरक्षक वटहुकुमाप्रमाणे आहे, हे मला माहीत नाही. मला मिळालेल्या सूचनांप्रमाणे मी आशियावासियांना पुनः प्रवेश दिला.

[गांधीजी–आता तुम्हांला सूचना काय आहेत ?]

[साक्षीदार–आशियावासी कायद्याप्रमाणे जे लोक नोंदणी–पत्रे दाखल करणार नाहीत, किंवा या वसाहतीत पुनः प्रवेश करण्याचा तात्पुरता अधिकार देणारे पत्र दाखविणार नाहीत, अशा १६ वर्षांवरील वयाच्या साऱ्या आशियावासी पुरुषांना थांबविणे व अटक करणे, अशा सूचना आहेत.]

१. ता. ६ डिसेंबर रोजी, फोक्सरस्ट येथे येताच, वीस हिंदी लोकांना, आणि त्यानंतरच्या दोन दिवसांत, आणखी १७ लोकांना, पकडण्यात आले. असिस्टंट रेसिडेंट मॅजिस्ट्रेट, श्री. डी. विलीयर्स यांच्या कोर्टात, त्यांचे खटले चालले. २० हिंदी लोकांचा खटला प्रथम घेण्यात आला. सरकारी वकील श्री. मेंज, यांच्या तपासणीत, सार्जंट मॅन्स्फील्ड यांनी सांगितले की, “सर्व आरोपींजवळ शांततासंरक्षक वटहुकुमाप्रमाणे परवाने व नोंदणी–पत्रे आहेत, त्यांचे आंगठ्याचे ठसे नीट घेतलेले आहेत आणि त्यांच्या परवान्यामुळे त्यांना या वसाहतींत येण्याचा हक्क आहे–पुनः येण्याचा मात्र नाही. आम्ही आशियावासी कायद्याला मान्यता देणार नाही, असे आरोपींनी मला सांगितले आहे.” श्री. गांधींनी त्यांची उलट तपासणी केली.

(श्री. गांधीजी)--जे लोक जुने रहिवासी असल्याचे तुम्हाला माहीत आहेत, ज्यांनी परवाने दाखविले असतील, व जे या वसाहतीतून अगदी अलीकडे बाहेर गेले असतील--अशा आशियावासी लोकांनाही या सूचना लागू आहेत काय ?

[साक्षीदार-होय; कारण सूचनांप्रमाणे ते माझे कर्तव्य आहे, नव्या कायद्याप्रमाणे अधिकारपत्रे जे दाखवू शकणार नाहीत, त्या सर्व आशियावासीयांना निरपवादपणे मी थांबविले पाहिजे.]

आणखी काही प्रश्नांना उत्तरे देताना सार्जंट मॅनस्फील्ड यांनी परवाने व नोंदणीपत्रे दाखल करून सांगितले की, १८८५ च्या ३ ऱ्या कायद्याप्रमाणे ती घेतलेली आहेत. यानंतर सरकारी पक्षाची बाजू संपली.

सरकारी वकिलाने माझ्या अशिलांची बाजू सिद्ध केली आहे, असे श्री. गांधींनी आग्रहाने सांगितले. कोर्टापुढे एकच प्रश्न आहे व तो म्हणजे माझ्या अशिलाजवळ शांततासंरक्षक वटहुकुमाप्रमाणे परवाने आहेत की नाहीत. हे परवाने सार्जंट मॅन्स्फील्ड यांनी दाखल केले आहेत आणि ते बरोबर असल्याचे त्यांनी कबूल केले आहे.

श्री. डी विलीयर्स : म्हणजे तुमच्या मताने, हा प्रश्न केवळ कायद्याच्या युक्तिवादाचा आहे !

श्री. गांधी : अगदी असेच, महाराज.

नंतर श्री. मेंज यांनी असा युक्तिवाद केला की, या लोकांजवळ असलेल्या परवान्यामुळे या वसाहतीत केवळ प्रवेश व वास्तव्य करण्याचा हक्क प्राप्त होतो. पण ह्या वसाहतीतून बाहेर जाण्याचा व पुनः प्रवेश करण्याचा हक्क मिळत नाही. एकदा माणसे वसाहतीतून बाहेर गेली, की त्यांचे परवाने रद्द होतात असे सांगण्यात आले.

उत्तरादाखल श्री. गांधी म्हणाले, " केवळ पुनःप्रवेशाचा हा प्रश्न नाही. न्यायाधीशांनी आरोप-पत्राच्या मर्यादेतच राहिले पाहिजे. आरोप असा आहे की, शांततासंरक्षक हुकुमाच्या नव्या कलमाप्रमाणे परवाने न घेता, माझ्या अशिलांनी या वसाहतीत प्रवेश केला. कोर्टापुढील पुराव्याने असे निर्णायकपणे सिद्ध केले आहे की, माझ्या अशिलांजवळ प्रवेश करतेवेळी, प्रत्यक्ष परवाने होते. शिवाय, त्या सर्वांनी १८८५ च्या ३ ऱ्या कायद्याप्रमाणे ३ पौंड भरलेले आहेत. तसेच सरकारी वकिलाचेही म्हणणे योग्य नाही. भाभा विरुद्ध रेक्स यांच्या खटल्यात, सुप्रीम कोर्टाने असा निकाल दिला आहे की, वसाहतीत प्रवेश करण्याच्या परवान्यात, वसाहत सोडण्याचा व तीत पुनः प्रवेश करण्याचा हक्क अंतर्भूत होतो. न्यायमूर्ती ब्रिस्टोव यांनी त्या खटल्यात योजलेले शब्द जवळजवळ असेच होते. म्हणून कोणत्याही बाजूने पाहिले तरी, माझे अशील बंधमुक्त होणे अवश्य आहे. कायदेखात्याच्या सूचना काय आहेत, किंवा त्या

खात्याने शांततासंरक्षक वटहुकुमाच्या ५ व्या कलमाचा अर्थ काय लावला आहे, याच्याशी कोर्टाला काही कर्तव्य नाही. नव्या कायद्याचा भंग माझ्या अशिलांनी केलेला असेल, तर त्या कायद्याप्रमाणे आशियावासी कचेरीने आरोप ठेवणे योग्य झाले असते, असे मला वाटते.[1]

इंडियन ओपिनियन १४–१२–१९०७.

३१९. इंडियन ओपिनियनला पत्र

जोहान्सबर्ग,
ता. १२ डिसेंबर, १९०७

संपादक
इंडियन ओपिनियन यांस,

महाशय

३८ हिंदी लोकांवरील खटल्यापासून[2] मिळणाऱ्या बोधाकडे जनतेचे लक्ष वेधण्यासाठी मी आपल्या पत्रात, पुढील मजकूर आपल्या सौजन्याने प्रसिद्ध करू इच्छितो. हे खटले, सकृद्दर्शनी शांततासंरक्षक वटहुकुमाप्रमाणे भरलेले असले तरी, वस्तुतः ते आशियावासी नोंदणी कायद्याप्रमाणेच होते.

बोध हा की, आशियावासी कचेरीचा कारभार पूर्ण गुप्त असतो. पूनियाच्या अटकेमुळे हे कळून आले की, या वसाहतीत प्रवेश करण्याचा योग्य अधिकार असलेल्या हिंदी माणसांच्या धर्मपत्नीजवळ स्वतःचे परवाने नसतील तर, त्यांना पकडण्याचे बेकायदा हुकूम देण्यात आलेले होते.

बारा वर्षांच्या एका छोकऱ्याच्या खटल्यावरून हे कळून आले की, निष्पाप बालकांनीही स्वतंत्र परवाने घेतले पाहिजेत अशा गुप्त व बेकायदा सूचना दिलेल्या होत्या.

१. गांधीजींचे म्हणणे कोर्टाने मान्य केले आणि आरोपींना सोडले. नंतर दुसऱ्या १७ माणसांना कोर्टापुढे आणण्यात आले. पण त्यांच्यावरील आरोप काढून घेतला गेला.

२. पाहा. ‘ महम्मद इशाक यांचा खटला ’ लेख ३१० व त्यामागील लेख ३०९.

रामसुंदर पंडितांच्या[1] बंदिवासामुळे हे कळून आले की, आशियावासियावरील आरोपांची चौकशी करण्यासाठी आशियावासी कचेरी नेहमीचे ज्ञात नियम पाळीत नाही.

शेवटी, अडतीस हिंदी लोकांची अटक आणि त्यांना दोन ते चार दिवस स्थानबद्धता यावरून हे कळून आले की, शांततासंरक्षक वटहुकुमाप्रमाणे दिलेल्या परवान्यात या वसाहतीतून तात्पुरते बाहेर जाणे व परत येणे, यांचा अंतर्भाव होत नाही, असा शोध आशियावासी कचेरीला अकस्मात लागला. मात्र, पाच वर्षे याच्या विरुद्ध वहिवाट होती. कायद्याचा नवा अर्थ लावण्याच्या सूचना गुप्तपणे दिलेल्या होत्या, आणि त्याची दाद हिंदी लोकांना आधी दिलेली नव्हती. दर्बान येथे नेमलेल्या ट्रान्सवॉलच्या आशियावासी अधिकाऱ्याने प्रत्यक्ष तपासणी करून मान्य केलेले हेच लोक होते हे जनतेला माहीत नाही. त्यापैकी छत्तीस माणसे 'सुल्तान' बोटीने परत आलेले उतारू होते. या माणसांची तपासणी करण्यास आशियावासी कचेरीने तीन दिवस घेतले असे मला कळते.

श्री. लिंडसे वकील असल्यामुळे त्यांना अधिक माहिती असली पाहिजे. तरी, या प्रश्नाला हिंदी लोकांच्या दृष्टीने दुसरी बाजू असू शकेल, असा विचारही करण्याची तसदी न घेता त्यांनी स्वैरपणे असे विधान ठोकून दिले आहे की, या देशात हिंदी लोकांची चोरटी आवक होते.

सविनय प्रतिकारकांचा भर लोकमत तयार करण्यावर असतो. पण ते आपल्याला अनुकूल झाले नाही तरी, ते आपल्या शुद्ध संकल्पापासून च्युत होत नाहीत. त्यांच्या हालअपेष्टांमुळे या वसाहतीतील काही सार्वजनिक बुद्धीच्या माणसांना तरी विचार करावयास लावले हे नाकारता येणार नाही. त्यांना, आणि हिंदी लोकांच्या भूमिकेकडे अजूनही दुर्लक्ष करणाऱ्या लोकांना, मी असा प्रश्न विचारतो की, जो माणूस गुप्तपणाने चौकशी करतो, गुप्तपणाने हुकूम देतो, आणि लोकांची बाजू न ऐकताच त्यांना शिक्षा देतो, अशा एकट्या माणसाच्या हातात सुलतानी सत्ता देणाऱ्या कायद्याला मान्यता देण्याचे नाकारणे हे हिंदी माणसांचे पवित्र कर्तव्य नाही काय! झुलूलँडमध्ये लष्करी कायदा पुकारलेला असल्याने कर्नल मॅकेंझी[2] यांना संपूर्ण अधिकार मिळालेले असतानाही बंडखोरांचा वहीम असलेल्या दीनू झुलू[3] यालाही केवळ संशयावरून आणि त्याची बाजू न ऐकता शिक्षा देण्यात आली नाही. संघटितपणे व लबाडीने

१. पाहा. 'इंडियन ओपिनियनला पत्र' लेख २७६

२. एक मिशनरी—'बेचुआनालँड'मध्ये १८८४ साली, कमिशनर म्हणून नेमणूक झाली.

३. झुलूंचा पुढारी—डोईपट्टीमुळे उद्भवलेल्या बंडात सामील असल्याच्या आरोपावरून याच्यावर खटला चालला.

येथे प्रवेश केल्याचा दुष्ट आरोप आपल्यावर असताना हिंदी लोकांनी कुरकूर न करता मजुरी करीत येथे राहावे, आणि या देशात राहण्याच्या आपल्या हक्काची तपासणी आशियावासी कायद्याप्रमाणे बिगर न्यायालयीन पद्धतीने, होत असताना ती मान्य करावी, अशी अपेक्षा कोणी का धरावी ? आपल्यावरील आरोपांचे हिंदी लोकांनी केलेले खंडन पोकळ आहे, असे जर सरकारला वाटत असेल तर, सारे प्रकरण दाबून टाकण्यापेक्षा, हिंदी लोकांनी वारंवार मागणी केल्याप्रमाणे, त्याची चौकशी सरकारने खुल्या व न्यायालयीन रीतीने करणे चांगले नाही का ?

आपला,
मो. क. गांधी

इंडियन ओपिनियन, २१–१२–१९०७

३२०. दिवंगत श्री. आराथून

गेल्या आठवड्यातील टपालातून श्री. आराथून यांच्या मृत्यूची दुःखदायक बातमी आली आहे. ईस्ट इंडिया असोसिएशनचे सन्मान्य कार्यवाह या नात्याने श्री. आराथून यांनी त्या संस्थेची सेवा चांगल्या प्रकारे व प्रामाणिकपणे पुष्कळ वर्षे केली. ' एशियाटिक क्वार्टर्ली रिव्ह्यू ' चे संपादक म्हणून त्यांनी केलेले कार्य हिंदुस्थानशी संबंध असलेल्या सर्वांना माहीत आहे. पण दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांना ते परिचित होते ते त्यांच्याविषयी त्यांना वाटणाऱ्या अपार सहानुभूतीमुळे आणि ज्या असोसिएशनशी ते एकरूप झाले होते, तिच्या कार्याच्या रूपाने त्यांनी हिंदी लोकांकडे सतत पुरविलेल्या लक्षामुळे. हिंदी लोकांचा प्रश्न असोसिएशनच्या आणि त्याद्वारे अधिकाऱ्यांच्या नजरेस आणण्याची एकही संधी त्यांनी गमावली नाही. गेल्या वर्षी शिष्टमंडळाशी हार्दिक सहकार्य करून त्यांनी अत्यंत मोलाचे साहाय्य केले. श्री. आराथून यांच्या कुटुंबाला आम्ही आमची सहानुभूती प्रकट करतो.

इंडियन ओपिनियन, १४–१२–१९०७.

३२१. फोक्सरस्टचे खटले

श्री. महम्मद इशाक आणि इतर हिंदी लोक यांच्यावर फोक्सरस्ट येथे भरलेल्या खटल्याकडे लक्ष देणे योग्य आहे. नव्या कायद्याप्रमाणे आरोप तयार करण्याचा सरकारचा प्रथम इरादा होता; पण शेवटच्या क्षणी त्यांचे धैर्य गळाले आणि शांतता-संरक्षक वटहुकुमाप्रमाणे खटला चालू झाला. श्री. महम्मद इशाक पुढे असून बाकीचे लोक त्यांचे अनुकरण करीत आहेत. श्री. इशाक यांनी कोकणी लोकांची अब्रू राखली. आता कोकणी लोकांना कोणी दोष देणे, न्यायाचे होणार नाही. श्री. महम्मद इशाक यांना आपल्या परवान्याप्रमाणे या वसाहतीत राहण्याचा हक्क आहे, असे म्हणून मॅजिस्ट्रेटने त्यांना सोडून दिले.

या खटल्यामुळे लोकांचे धैर्य प्रकट झाले. जामीन दिला नाही, हे चांगले झाले. पकडलेल्या लोकांत साऱ्या जमातींची माणसे होती, हेही चांगले झाले.

या प्रकरणावरून, सरकारचा परमावधीचा दुर्बळपणा व्यक्त होतो. सरकारची हिंमत खचली आहे. काय करावे, हे त्यांना कळत नाही. संतापाने बडबडत सुटलेल्या माणसासारखी त्यांची स्थिती झाली आहे. असे खटले आणखी झाले, तर ते आपल्याला फायदेशीर आहेत.

सरकार जर खरोखर खंबीर असते, तर या कायद्याला विरोध करणाऱ्या ट्रान्सवॉलमधील लोकांना त्यांनी पकडले असते. ते करण्यास ते समर्थ नाही. म्हणून, बाहेरून येणाऱ्या लोकांना बंदी घालण्यासाठी ते व्यर्थ प्रयत्न करीत आहेत. अशा प्रयत्नांत सरकारचा पराभव होणार हे निश्चित. कारण या नव्या कायद्यात एक फार मोठी पळवाट आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १४-१२-१९०७

३२२. नाताळचा परवाना कायदा

या कायद्याप्रमाणे सरकारने नवे निर्बंध केले आहेत. त्यांमध्ये तीन विशेष कलमे आहेत. पहिले, यापुढे परवान्यासाठी केलेला अर्ज वृत्तपत्रात प्रसिद्ध करावा लागेल. अर्ज केल्यावर आंगठ्याचा ठसा घेण्याचा हक्क अधिकाऱ्यांना राहील. शेवटी, अपील करताना १२ पौंड १० शिलिंग भरावे लागतील. हे सारे वाईट आहे. पण त्यातून कोणत्या बाबतीत, सुटका करून घेता येईल, याचा विचार केला पाहिजे. वृत्तपत्रात अर्ज प्रसिद्ध करण्याची अट रद्द होण्याचा संभव नाही. केपमध्ये तसा कायदा आहे. आंगठ्याचा ठसा घेणे, हे अधिकाऱ्याच्या मर्जीवर सोपविलेले आहे. याचा अर्थ असा लावता येईल की, ज्यांना सही करता येते, त्यांना आंगठ्याचा ठसा द्यावा लागणार नाही. या दोन मुद्द्यांच्या बाबतीत, सरकारला अर्ज करण्याचा सल्ला आम्ही देऊ शकत नाही. कारण तसे करणे व्यर्थ आहे. १२ पौंड १० शिलिंग भरण्याचे बंधन नवीन नाही. त्यावर एकच तोडगा आहे. तो म्हणजे जेव्हा कोणाला अपील करावयाचे असेल, तेव्हा त्याने ती रक्कम भरण्याचे नाकारावे आणि त्या मुद्द्यावर लढा द्यावा. ही फी बे-कायदा आहे असे आमचे मत आहे, आणि कोर्टाचाही निर्णय तसाच होण्याचा संभव आहे. उत्तम मार्ग म्हणजे कायद्याकडे दुर्लक्ष करून त्याचे उल्लंघन करणे हा होय. जेव्हा जेव्हा मोठ्या प्रमाणात परवाने नाकारले जातात, तेव्हा लोकांनी आपला माल विकण्याचा विचार न करता, बिगर परवाना व्यापार चालवावा. अशा सर्व रोगांवर सविनय प्रतिकार हाच उत्तम इलाज आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १४-१२-१९०७

३२३. मरहूम नबाब मोहसीन-उल-मुल्क

या सद्गृहस्थांच्या निधनाची वार्ता आम्ही पूर्वीच प्रसिद्ध केली आहे.[1] या अंकात त्यांचे संक्षिप्त जीवन-चरित्र आम्ही देत आहो. शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी

१. येथे ती बातमी घेतलेली नाही.

केलेल्या सेवेपासून प्रत्येक हिंदी माणसाने--विशेषतः प्रत्येक मुसलमानाने-धडा घेतला पाहिजे. त्यांनी शिक्षणाला राजकारणाच्या वरचे स्थान दिले होते. एकंदरीत, हा वास्तववादी दृष्टिकोन होता--विशेषतः त्यांच्या काळात होता. शिक्षणाबरोबर सत्यनिष्ठ वर्तन व नीतिमान जीवन लाभले तर समाजाला फार मोठा फायदा होतो. परंतु उच्च राहणी व नीतिमत्ता यांच्या अभावी शिक्षण भयप्रद ठरते. मांडवाशिवाय वेल जसा चढू शकत नाही, तशी शिक्षणाची स्थिती आहे. नीतिशिक्षणाने युक्त असेच शिक्षण प्रत्येकाला मिळाले पाहिजे—हाच धडा मरहूम नबाबांच्या जीवनापासून आपल्याला शिकता येईल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १४-१२-१९०७

३२४. जर्मन-पूर्व आफ्रिका लाईन

अलीकडे हिंदी लोकांमध्ये स्वाभिमान व प्रतिष्ठा यांचे नवे वारे संचारले आहे. अशा वेळी, श्री. पीरन महम्मद यांच्यावरील एक प्रसंग लक्ष देण्यासारखा आहे. [जर्मन ईस्ट आफ्रिका] लाईनच्या युरोपला जाणाऱ्या जहाजावरील पहिल्या वर्गाचे तिकीट त्यांनी मागितले. ते त्यांना नाकारण्यात आले. ही अत्यंत अपमानकारक गोष्ट होय असे आम्हास वाटते. जर्मन कंपनीला हे शोभत नाही. त्या कंपनीला हिंदी उतारूंकडून खूप कमाई होते हे काहीच लक्षात न घेता, तिने एका हिंदी उतारूला पहिल्या वर्गाचे तिकीट नाकारले. ही आम्हाला लज्जास्पद गोष्ट होय. त्यांना आमची जीवन-पद्धती माहिती आहे. ते आमचा अपमान करतात, कारण आम्ही, काही करू शकत नाही. गोऱ्या उतारूशी, असे वर्तन करण्यास ते धजत नाहीत. यावर तीन उपाय आहेत आणि ते एकदम योजण्यासारखे आहेत--

[१] कंपनीकडे कडक निषेध करावा.

[२] कंपनीचे एजंट श्री. उस्मान अहम्मद यांनी, कंपनीला किती नुकसानी सोसावी लागेल, याची कल्पना, तिला द्यावी.

[३] या लाईनच्या जहाजातून प्रवास न करण्यास, उतारूंचे मन वळवावे.

तिसरा उपाय सर्वोत्कृष्ट आहे. तो योजला तरच बाकीच्या दोन उपायांचा काही परिणाम होईल. आपल्याला नवे बळ आलेले आहे. त्याचा उपयोग प्रत्येक वेळी केला

पाहिजे. फक्त ट्रान्सवॉलच्या कायद्याला विरोध करणे पुरेसे नाही. तो केवळ प्रारंभ मानला पाहिजे.

जपानचे उदाहरण पाहा. ते राष्ट्र जागृत होताच, त्याने आपले शिक्षण, आपला व्यापार आणि आपली प्रतिष्ठा यांच्याकडे लक्ष दिले. आपणही प्रत्येक क्षेत्रातील प्रगतीसाठी झटले पाहिजे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन १४-१२-१९०७.

३२५ हिंदी लोकावर हल्ला[१]

सर्वत्र नव्या कायद्यांमुळे प्रक्षोभ पसरलेला आहे. आता लोक आपल्या अटकेची उत्कटतेने वाट पाहात आहेत, यात शंका नाही. दर्बानहून गेल्या शुक्रवारी सकाळी नऊ हिंदी लोक आले. त्याच दिवशी संध्याकाळी आणखी अकरा आले व शनिवारी रविवारी मिळून ३७ आले. त्या सर्वांजवळ परवाने किंवा नोंदणी-पत्रे होती. त्यांच्यापैकी पसतीस जण ‘ सुलतान ’ बोटीने आले. उरलेल्या दोघांपैकी, एकजण मद्रासी होता, आणि तो जोहान्सबर्गला व्यापारासाठी चालला होता. आणि दुसरा गुजराती होता व तो ऑक्टोबरमध्ये दर्बानला गेलेला असून जोहान्सबर्गला परत येत होता. नव्या कायद्याप्रमाणे परवाने नसल्याबद्दल या सर्व लोकांना अटक झाल्याची बातमी प्रथम आली होती. श्री. गांधी शुक्रवारी कोर्टात दाखल झाले. पण त्या लोकांना कोर्टात उभे करण्यात आले नाही. कारण, प्रिटोरियाहून येणाऱ्या हुकुमाची पोलीस वाट पाहात होते. त्यांना शनिवारी उभे करण्यात आले आणि त्यांचा खटला सोमवारपर्यंत तहकूब झाला. सोमवारी श्री. गांधी जोहान्सबर्गला पुनः गेले. पोलिसांना हा खटला नव्या कायद्याप्रमाणे भरावयाचा होता. पण तो शांततासंरक्षक वटहुकुमाप्रमाणे चालवावा, असा प्रिटोरियाचा हुकूम होता. म्हणून परवाने नसण्याच्या आरोपावरून, शांततासंरक्षक वटहुकुमाच्या ५ व्या कलमाप्रमाणे, त्यांच्यावर खटला चालला.

१ या लेखाखाली, अशी उपशीर्षके दिलेली होती. ‘ नाताळहून ट्रान्सवॉलमध्ये जाणाऱ्या सदतीस माणसांना अटक—कोर्टाकडून मुक्तता ’

सार्जंट मॅन्सफील्ड यांचा जबाब[1]

प्रिटोरियाच्या आदेशानुसार मी या हिंदी लोकांना पकडले. त्या सर्वांजवळ कायदेशीर परवाने होते. पण त्यामुळे त्यांना परत येण्याचा हक्क नव्हता. नव्या कायद्याप्रमाणे त्यांच्याजवळ परवाने नव्हते. म्हणून, त्यांना अटक झाली.

उलटतपासणी

प्र.— या लोकांचे परवाने तुम्ही तपासले काय?

उ.— होय. तपासणीअंती मला असे आढळले की, त्यांवर आंगठ्यांचे ठसे आहेत.

प्र.—१८८५ च्या कायद्याप्रमाणे त्यांच्याजवळ नोंदणी-पत्रेही आहेत काय?

उ.— त्या सर्वांजवळ तशी पत्रे आहेत.

प्र.— प्रिटोरियाहून तुम्हांला हुकूम कोणते मिळाले?

उ.— बाहेरून येणाऱ्या कोणत्याही हिंदी माणसाजवळ नव्या कायद्याप्रमाणे परवाना नसेल किंवा दुसरे काही अधिकार-पत्र नसेल, तर त्याला पकडण्याचा हुकूम मला आहे.

प्र.— हे हुकूम, तुम्ही ज्या हिंदी लोकांना प्रत्यक्ष ओळखता, त्यांनाही लागू आहेत काय?

उ.— होय. प्रत्येकाला पकडणे, हे माझे कर्तव्य आहे.

प्र.— आरोपीजवळ तुम्ही जे परवाने पाहिले, त्यांच्या आधारावर त्यांना आतापर्यंत संचार करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळाले होते, हे खरे आहे काय?

उ.— होय. ते परवाने त्यांना तसा पुरेसा अधिकार देतात, अशा मला सूचना होत्या.

यानंतर सरकारी वकिलांनी खटला थांबविला. पुराव्याच्या अभावी आरोपींना सोडून देण्यात यावे अशी मागणी श्री. गांधींनी केली.

आपली बाजू कच्ची असल्याचे सरकारी वकिलाने कबूल केले. पण सरकारी हुकुमाप्रमाणे आपण समन्स लिहिल्याचे त्यांनी सांगितले. कोर्टापुढे दाखल केलेल्या

१. खटल्याच्या इंग्रजी वृत्तांताशी भाषांतर ताडून पाहिलेले आहे. पाहा. 'हिंदी लोकांचा खटला' लेख ३१८

परवान्यामुळे, लोकांना [ट्रान्सवॉलमध्ये] प्रवेश व वास्तव्य करण्याचा हक्क आहे पण बाहेर जाण्याचा व परत येण्याचा नाही, असे ते म्हणाले.

श्री. गांधींनी सांगितले, सरकारी साक्षीदारानेच माझ्या अशिलाची बाजू सिद्ध केली आहे. सरकारी साक्षीदाराने कोर्टात दाखल केलेला परवाना हाच माझ्या अशिलांना [ट्रान्सवॉलमध्ये] प्रवेश करण्यास अधिकार देतो. त्यांनी बिगरपरवाना प्रवेश केला, असा आरोप समन्समध्ये केलेला आहे. तो आरोप सिद्ध झालेला नाही. 'भाभा'च्या खटल्यात कोर्टाने असे मान्य केले आहे की, या वसाहतीत प्रवेश करण्याच्या परवान्यात येथून बाहेर जाण्याची व परत येण्याची परवानगी अंतर्भूत आहे. म्हणून माझ्या अशिलांना मुक्त करावे, त्यांच्यापैकी पुष्कळ लोकांनी आतापर्यंत चार दिवस कष्ट भोगले आहेत.

हा युक्तिवाद मॅजिस्ट्रेटने ग्राह्य मानला आणि त्या सर्वांना सोडून दिले. ज्यांच्यावर खटले भरले होते, त्यांची नावे पुढीलप्रमाणे--

उमर यूसुफ, नाथु गोविन्द, माधा गलाल, लाला माधव, गोविन्द दादी [दाजी ?], रतनजी महाराज, कुवंरजी मनोर, काला पेमा, नागर भवान, मोरार भीखा, समंदरखाँ, काना गोपाल, नाना वल्लभ, बाबू सुखा, परभु नारण, जसमत फकीर, फकीर लाखा, हरि दाजी, प्रेमा भाणा, परभु छना, लल्लू खुशाल, रामसामी चोकलिंग पिल्ले, मणि डाह्या, भीमा वसन, झीणा कीडिया, डाह्या पाँचा, वल्लभ गोविंद, धना हीरा, हरि भीखा, दयाल वल्लभ, मकन मोरार, माधव जीवण, गोविंद डाह्या, बुधिया लाला, दाजी भाणा, रणछोड गोपाल आणि भीखा रतनजी.

यांमध्ये साऱ्या जमातींचे लोक--एक पठाण, एक कोकणी, एक मद्रासी, आणि बाकीचे गुजराती हिंदु--आहेत, हे पाहून मला आनंद वाटतो.

महम्मद इशाकचा खटला

हा खटला फोक्सरस्ट येथे शुक्रवारी चालला. श्री. इशाक यांच्यावर खटला कोणत्या आरोपावर चालवावयाचा, हे मला माहीत नाही, असे सरकारी वकिलांनी सांगितले. सरकारकडून सूचना आल्यानंतरच मी ते सांगू शकेन. युक्तिवाद ऐकल्यानंतर मॅजिस्ट्रेटने खटला जोहान्सबर्गला वर्ग करण्याचे कबूल केले. खटला बुधवारी चालावा, असा त्यांनी हुकूम दिला.

श्री. महम्मद इशाक व इतर हिंदी लोक यांनी जामीन देण्याचे नाकारले, म्हणून त्यांना बिनशर्त सोडण्यात आले. या खटल्यामुळे कोर्टात सरकारचे हसे झाले.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १४-१२-१९०७

३२६. नाताळमधील परवान्यासाठी करावयाच्या अर्जांचे निर्बंध

परवाने मिळण्याबद्दल किंवा नवे करण्याबद्दल अथवा बदलण्याबद्दल, जे अर्ज करावयाचे अगर त्यांच्या बाबतीत जी अपिले करावयाची, त्यांना लागू होणारे निर्बंध, नाताळच्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध झालेले आहेत. त्यातील महत्त्वाच्या कलमांचा सारांश आम्ही पुढे देत आहो—

कलम २--नियोजित तक्त्याप्रमाणे लिहिलेला अर्ज, या कार्यासाठी अधिकार दिलेल्या मॅजिस्ट्रेटला किंवा टाऊन ऑफिसमध्ये देण्यात यावा. या अर्जाची नक्कल अर्जदाराने एका स्थानिक वृत्तपत्रात प्रत्येक आठवड्यातून निदान एकदा, याप्रमाणे निदान दोन आठवडे प्रसिद्ध केली पाहिजे.

४. अर्ज मिळाल्यावर, परवाना–अधिकाऱ्याला आरोग्य-अधिकारी किंवा सॅनिटरी इन्स्पेक्टर यांच्याकडून, परवाना मागितलेल्या जागेच्या स्वच्छतेबद्दल अभिप्राय मागता येईल.

५. जरूर तर, अर्जदाराने परवाना–अधिकाऱ्याकडे समक्ष जाऊन, त्याला आपल्या जमाखर्चाच्या वह्या किंवा जरूर तर दुसरी कागद-पत्रे सादर करावीत. इंग्रजी भाषेत जमाखर्चाच्या वह्या लिहिण्यासंबंधी ७ व्या कलमात ज्या अटी घालून दिलेल्या आहेत, त्या पूर्ण करण्यास अर्जदार समर्थ असल्याची परवाना–अधिकाऱ्याची खात्री पटली पाहिजे.

६. प्रत्येक अर्जावर, परवाना देण्यासंबंधीचा किंवा नाकारण्यासंबंधीचा निर्णय, परवाना–अधिकारी याने लिहून ठेवला पाहिजे.

८. जरूर ते स्टॅम्प लावल्याशिवाय किंवा पैसे भरल्याशिवाय, परवाना दिला जाणार नाही.

९. अर्जदाराला परवाना देताना, त्याची सही किंवा आंगठ्याचे अथवा बोटांचे ठसे, परवाना–अधिकारी मागू शकेल.

अपीलासंबंधीचे निर्बंध

१०. परवाना–अधिकाऱ्याच्या निर्णयवार अपील करण्याचा आपला इरादा अर्जदाराने, निर्णयानंतर २ आठवड्यांच्या आत, बोर्डाच्या किंवा कौन्सिलच्या कारकुनाला

कळवावा. बोर्डाच्या सभासदांच्या खर्चासाठी १२ पौंड १० शि. एवढी रक्कम, अपीलाच्या नोटिशीबरोबर ठेवली पाहिजे. अर्जदार एकाहून अधिक असल्यास, अपील बोर्डाचा खर्च, त्यांच्यामध्ये समानतेने वाटला जाईल.

११. अपील ऐकण्याचा दिवस आणि अपिलांची यादी, मुक्रर केलेल्या दिवसाच्या आधी किमान पाच दिवस कोर्ट हाउस किंवा टाउन ऑफिस यांच्या दारावर चिकटवली जाईल.

१३. बोर्डाचे कामकाज जनतेला खुले राहील.

१६. अपील करणारा आणि दुसरा कोणताही हितसंबंधी माणूस यांना, अपिलाविषयी स्वतः किंवा आपल्या लेखी पत्राने अधिकार दिलेल्या माणसाकडून, आपली बाजू व तिच्या पुष्ट्यर्थ पुरावाही मांडता येईल. अपिलाला विरोध करणाऱ्या माणसालाही हेच हक्क राहतील.

[गुजरातीवरून]
डियन ओपिनियन, १४-१२-१९०७.

३२७. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

पंजाबी लोकांचा अर्ज

या अर्जाचे उत्तर अद्यापि सरकारच्या विचाराधीन आहे, पण जगाने केव्हाच उत्तर देऊन टाकले आहे. त्यामुळे पुष्कळ इंग्रजांची सहानुभूती पंजाबी लोकांकडे वळली आहे. त्यांना न्याय मिळाला पाहिजे, असे प्रत्येकजण म्हणतो. अर्जाची चर्चा अजून चालू आहे. इंग्लंडच्या 'डेली ग्रेफिक' पत्रात जी कडक टीका आली आहे, तिचा उल्लेख आम्ही पूर्वीच केला आहे.

मी माझे शब्द परत घेतो

श्री. पारेख यांच्या उत्साहाविषयी मी लिहिले होते.[1] ते मी घाईने लिहिले होते, असे मला आठवून आले. म्हणून मी माझी विधाने परत घेत आहे. मी हे

१ पाहा. 'जोहान्सबर्गचे बातमीपत्र' लेख ३०३.

लिहीत असताना, श्री. पारेख अद्याप न्यूकॅसलमध्ये आहेत. हे प्रसिद्ध झाल्यावर ते तेथे असतील किंवा नसतील, हे मला सांगता येणार नाही. पण त्यांना विशेष शूर म्हणण्यात व इतरांनी त्यांचे अनुकरण करावे, असे सांगण्यात माझी चूक झाली. शूर माणूस युद्धात आघाडीवर असतो. श्री. पारेख हे अद्याप ट्रान्सवॉलबाहेर आहेत. म्हणून आपणा सर्वांपेक्षा ते अधिक शूर आहेत. माझ्या विधानातील सूचितार्थ योग्य ठरत नाही.

असत्य

श्री. हसन महम्मद काला यांनी असे जाहीर विधान केले आहे की, नोंदणी-साठी अर्ज केल्याबद्दल मला पश्चात्ताप होत आहे आणि मी तो अर्ज परत घेत आहे. अर्ज परत घेण्याची आपली इच्छा जाहीर करणारे हे पत्र, त्यांनी ज्या दिवशी लिहिले, त्याच दिवशी, त्यांनी एका मित्राला असे खाजगी पत्र लिहिल्याचे मला आढळले आहे की, गुलामगिरीचा पट्टा मला तात्काळ मिळाला, तर मला आनंद वाटेल, विलंबाबद्दल मला चिंता वाटते. हा दुटप्पीपणा, मी केवळ कर्तव्यबुद्धीने प्रकट करतो. त्याचा हेतु असा की, आपल्यामध्ये अशी उदाहरणे पुनः घडू नयेत. 'निरोधकांनीही नोंदणीसाठी अर्ज केले.' असे विधान श्री. चॉमनी यांनी केले. त्यांना पीटर्सबर्गमध्ये निरोधन करणारे श्री. काला यांनी संधी दिली याचे मला फार दुःख वाटते.

खुषीच्या नोंदणीचा अर्थ काय ?

या प्रश्नाची चर्चा या पत्रात वारंवार केलेली आहे. तरीही पुष्कळ हिंदी लोकांना खुषीच्या नोंदणीचा अर्थ काय आहे, हे अजून कळत नाही, असे मला आढळून आले आहे. नवा कायदा म्हणजे काय आहे, हे [त्याच्या अंमलबजावणीची] वेळ येईपर्यंत, गोऱ्या लोकांना कळत नव्हते. तशाच अवस्थेत आपण आहो. खुषीची नोंदणी व कायद्याप्रमाणे केलेली नोंदणी, यामध्ये मुख्य फरक हा आहे की, कायदा आपल्याला गुलामगिरीच्या दर्जाला पोहोचवितो, तर खुषीच्या नोंदणीमुळे आपल्याला मानवी प्रतिष्ठा प्राप्त होते. सरकारी दडपणामुळे नोंदणीला मान्यता देणे, हे गाढवावर बसण्यासारखे आहे, पण खुषीने नोंदणी करणे, हे हत्तीवर बसण्यासारखे आहे. सक्तीच्या नोंदणीत द्यावा लागणारा तपशीलच खुषीच्या नोंदणीत आपल्याला द्यावा लागत असला, तरी खुषीची नोंदणी आपण मान्य केली पाहिजे. उलट, सक्तीच्या नोंदणीतील गुलामगिरीच्या काही खुणा पुसून टाकल्या तरी ती गुलामगिरीच राहील. हा अत्यंत कठोर कायदा आहे. म्हणून, स्थानिक सरकार त्याला जळूप्रमाणे चिकटून बसले आहे. आणि म्हणूनच आपण गेले पंधरा महिने त्याच्या प्रतिकारार्थ झगडत आहो. याचाच अर्थ असा की, गोऱ्यांशी समान भूमिकेवर आपण वागू इच्छितो, पण गोऱ्यांना आपल्याला तुच्छ लेखावयाचे आहे. या कायद्यामुळे आपल्या शपथे

भंग होईल आणि आपल्याला कायमची काळोखी लागेल. यावर कोणी असे विचारील
की, खुषीने का होईना, पण आपण आपली नोंदणी-पत्रे का बदलावीत ? या प्रश्नाचे
उत्तर सोपे व सरळ आहे. ते असे की,—

[१] या कायद्याविरुद्ध आपण जशी शपथ घेतली आहे, तशीच आपली नोंदणी-पत्रे खुषीने बदलण्याची तयारीही दाखविली आहे. आता आपण तसे करण्याचे नाकारले तर, आपण आपले शब्द फिरविले आणि आपण लबाड आहो, असे ठरेल.

[२] [ट्रान्सवॉलमध्ये] खोट्या परवान्याने किंवा बिगरपरवाना हिंदी लोक प्रवेश करतात, असा पुष्कळ लोकांचा आरोप आहे. तो आपण खुषीच्या नोंदणीने नाशाबीत करू शकू. तसे करणे आपले कर्तव्य आहे. ते करण्याला आपण तयार आहोत, असे दाखविल्यामुळेच सर्व ठिकाणच्या लोकांची सहानुभूती आपल्याला मिळू शकली.

[३] खुषीच्या नोंदणीला विरोध करणे म्हणजे आमची बाजू चुकीची होती असे कबूल करणे होय.

[४] आपल्याला आतापर्यंत जी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे, ती खुषीच्या नोंदणीने वाढेल. जेव्हा लोक एखादे काम स्वेच्छेने करीत नाहीत आणि आपले दौर्बल्य प्रकट करतात, तेव्हा कायदा मध्ये येतो आणि काम करावयास लावतो, असा सर्वसाधारण नियम आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. पुष्कळ काफीर असे आहेत की, जे स्वेच्छेने मद्यपान थांबवीत नाहीत, म्हणून जरूर तेव्हा त्यांचे मद्यपान थांबविण्यासाठी कायदेशीर उपायांची सक्ती करावी लागते. कायद्याच्या सक्तीमुळे —कर्तव्यबुद्धीने नव्हे — जो मनुष्य दारू सोडतो, त्याला सद्गुणी म्हणता येत नाही. जो माणूस आपल्या मनाने मद्यपान सोडतो, तोच खरा सद्गुणी. हाच फरक सक्तीची व खुषीची नोंदणी यांमध्ये आहे.

[५] खुषीच्या नोंदणीमुळे आपण सदैव स्वतंत्र राहू. कारण, त्यामुळे आपण आपल्यावर जितकी बंधने घालू, तेवढीच राहतील. एखादा स्वयंसेवक आपल्या इच्छेस येईल तेव्हाच, युद्धासाठी आपले नाव नोंदवितो. त्याला हुकूम येईल तेव्हा लढावेच लागते.

खुषीच्या नोंदणीचे असे अनेक फायदे आम्ही सांगू शकू. तूर्त एवढे पुरे आहे. बोटांचे ठसे वगैरे गोष्टींचा उल्लेख येथे केला नाही. कारण, ती आपल्या इच्छेची गो
आहे. पण दहा बोटांचे ठसे आणि दोन आंगठ्यांचे ठसे यात काय फरक आहे याच

विचार शास्त्रीय दृष्टीने आम्ही पुढील आठवड्यात करू. तूर्त खुषीच्या नोंदणीचा नक्की अर्थ समजावून घेणे एवढेच जरूर आहे.

एक आक्षेप

आता कोणत्याही क्षणी समेट होण्याचा संभव आहे. म्हणून, खुषीच्या नोंदणीच्या प्रश्नाकडे, असोसिएशनने लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. याला काही गृहस्थांनी आक्षेप घेतला आहे. सर्व लोकांचा विचार का घेत नाही असे ते म्हणतात. या आक्षेपात काही तथ्य नाही. खुषीच्या नोंदणीचा प्रश्न ही एक नवी योजना असती, तर सर्व ठिकाणांहून प्रतिनिधी बोलावणे निःसंशय अवश्य ठरले असते. पण सर्व ठिकाणांहून आलेल्या प्रतिनिधींनी एम्पायर थिएटरमध्ये भरलेल्या सार्वजनिक सभेत खुषीच्या नोंदणीसंबंधीचा ठराव मंजूर केलेला आहे, आणि त्यांना खुषीच्या नोंदणी-संबंधीच्या सर्व गोष्टी माहीत आहेत. म्हणून सर्व ठिकाणच्या प्रतिनिधींचा पुनः विचार घेण्याचे कारण नाही. शिवाय, तसे करण्याला आता वेळही नाही. तथापि प्रत्येक हिंदी माणूस कोणत्याही वेळी आपले मत प्रकट करू शकतो. या लढ्यामुळे आपल्याला राजकीय गोष्टींचे ज्ञान अधिक व्हावे, अशी आमची इच्छा आहे. सभा कशा चालविल्या जातात, दुसऱ्या संस्थांचा कारभार कसा चालतो आणि सार्वजनिक कार्य संघटित कसे करावे लागते याही गोष्टी आपण शिकल्या पाहिजेत. आपण खरोखरी सुसंस्कृत लोक आहोत. म्हणून नवा कायदा रद्द करून घेण्यासाठी, आपण निकराचा लढा देत आहो. असे जर आहे तर, वर उल्लेखिलेल्या गोष्टींचे योग्य ज्ञान असणे, हे खऱ्या सुसंस्कृतपणाचे लक्षण होय.

कसोटीचा खटला का लढवू नये ?

या नव्या कायद्याविरुद्ध, आपण कसोटीचा खटला का लढवू नये ? असा प्रश्न काही भले लोक विचारीत असतात. माझे मत त्याविरुद्ध आहे, ते पुढील दोन कारणांसाठी--

एक, कसोटीचा खटला लढविण्यासाठी आपण झगडत नाही, तर तुरुंगात जाऊन आपले सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी आपण झगडत आहो. स्वतःच्या सामर्थ्याइतके दुसरे काहीही प्रभावी नाही. आपण कसोटीचा खटला चालू केला तर, आपला लढा बिघडेल आणि आपले हसे होईल. गोरे लोक तात्काळ म्हणतील, "तुरुंगात जाणाऱ्या लोकांचे काय झाले ?" म्हणून, कसोटीचा खटला चालविणे म्हणजे आपल्या दौर्बल्याची कबुली देणे होय.

दुसरे, या वसाहतीचा नवा कायदा, किंवा दुसरे कोणतेही कायदे, प्रिव्ही कौन्सिल रद्द करू शकणार नाही. श्री. लेवर्ड, श्री. एसेलेन, श्री. ग्रेगरोवस्की, श्री.

डक्सबरी, श्री. वार्ड व श्री. डी. विलीयर्स यांनी आपल्याविरुद्ध मत पूर्वीच प्रकट केले आहे. सुप्रीम कोर्टानेही आपल्याविरुद्ध पुष्कळ निकाल दिले आहेत. प्रिव्ही कौन्सिलने नवा कायदा रद्द ठरविला तर, काफिराविरुद्ध केलेले कायदेही रद्द होतील. असे कधीच घडणार नाही. पण, दैवयोगाने असे घडलेच तर, साऱ्या गोष्टी व्यवस्थित करण्यासाठी नवे कायदे तत्काळ मंजूर केले जातील. अखेरीस, आपण जेथून निघालो तेथेच राहू. इंग्लंडहून [कायदेशीर] मत आम्ही मागविले आहे. पण अद्याप श्री. रिच् ते पाठवू शकले नाहीत. कारण, सर रेमंड वेस्ट यांच्याशिवाय दुसरे कोणीही मत देण्यास तयार नाही. सर रेमंड वेस्ट यांनी आपल्याला, कायद्याला विरोध करण्याऐवजी कसोटीचा खटला लढविण्याचा सल्ला दिला आहे, हेही आपण लक्षात ठेवले पाहिजे. आता ते गृहस्थ सविनय प्रतिकाराच्या बाजूस आले आहेत. मग कसोटीचा खटला कसा करता येईल? शिवाय, कसोटीचा खटला म्हणजे, १००० पौंडांचा खर्च आहे, हे कोणी विसरू नये. एवढी रक्कम कोण उभी करणार? त्याचबरोबर, आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, कसोटीचा खटला चालू असेपर्यंत सरकार लोकांना सतावणार नाही, असे नाही. मध्यंतरीच्या काळात कायदा तहकूब होणार नाही.

हमीदिया अंजुमनची सभा

रविवारी पुनः एक मोठी सभा भरली. लोक इतके जमले की, सभागृहात त्यांची सोय करणे अशक्य झाले. म्हणून, बाहेरच्या मोकळ्या जागेत सभा भरली. सर्वश्री कचालिया, सुज, मणिभाई देसाई, पिल्ले, गोपाल, बेग व व्यास हे प्रिटोरियाहून खास या सभेसाठी आले होते. श्री. इमाम अब्दुल कादिर हे अध्यक्षस्थानी होते. त्यांचे भाषण झाल्यावर सर्वश्री बेग, सुज, कचालिया, नायडू, हजुरासिंह, महम्मद खाँ, अलीभाई आकूजी, इत्यादी माणसांनी भाषणे केली. श्री. गांधींनी परिस्थिती समजावून सांगितली. मौलवी अहमद मुखत्यार हे डेलागोवा बेला काही कामानिमित्त गेले होते, ते परत आले आणि त्यांनी लोकांना [परिस्थिती] समजावून सांगितली. शेवटी, असे ठरले की, खुषीची नोंदणी मान्य करावी. तथापि, आंगठ्याचे ठसे देण्याविरुद्ध दोन पंजाबी गृहस्थ होते. तसे ठसे स्वखुषीने देण्याला काही हरकत नाही, असे दुसऱ्या लोकांनी सांगितले. लोकांचा उत्साह अभिनंदनीय होता. आपली मते सांगण्यास लोक कचरत नाहीत—ते छातीठोकपणे बोलतात, असे दिसून आले. सहा महिन्यांपूर्वी ज्यांना या कायद्याचे काहीच कळत नव्हते, त्यांना आता थोडे थोडे कळू लागले आहे. आपण आपल्या सामर्थ्यावर अवलंबून राहण्याचा प्रयत्न करतो: त्याचे हे सारे फळ आहे. शेवटी सर्वांची समजूत पटेल, असे मला वाटते. कारण दोन आंगठ्यांचे ठसे देण्यात काही अपमान नाही. सक्तीने तसे करणे, हे अपमानास्पद आहे. एकदा का कायदा रद्द झाला, म्हणजे आपण स्वतंत्र आहो, असे म्हणता येईल.

डेलागोवा बेची दीन स्थिती

मौलवीसाहेब डेलागोवा बेसंबंधी असे कळवितात की, सर्व दक्षिण आफ्रिकेतील हिंदी समाज जागृत होऊन आपल्या प्रतिष्ठेसाठी सध्या लढत आहे, अशा वेळी येथील नेते झोपलेले आहेत. त्यांना सरकार जितक्या कठोरपणे वागवीत आहे, तितके ते सारे निमूटपणे सहन करीत आहेत. लोकांना आपल्या प्रतिष्ठेची पर्वा नाही. पैशाला ते परमेश्वर मानतात; आणि सरकारशी 'जी-हुजूर' असे ते वागतात, अशा दीन परिस्थितीतून 'डेलागोवा बेचे हिंदी लोक स्वतःच जागे होणार नाहीत काय ?

हिंदी लोकांचा जोर

नव्या कायद्याच्या प्रश्नावर सरकार दररोज अधिकाधिक दौर्बल्याची चिन्हे दाखवीत आहे, गोऱ्यांनाही ती दिसत आहेत. "रँड डेलीमेल" व "संडे टाईम्स," यांमध्ये दोन मजेशीर व्यंग्यचित्रे छापली आहेत. एकामध्ये, जनरल स्मट्स हे हिंदी लोकांवर नव्या कायद्याचे पिस्तुल उडवीत आहेत, असे दाखविले आहे. त्यांतील हिंदी माणूस म्हणतो, "करा, काय हवे ते करा; आम्ही या कायद्याला मान्यता कधीच देणार नाही." मग जनरल स्मट्स सांगतात, "बाबा रे, असे म्हणू नको. माझे भरलेले पिस्तुल नादुरुस्त आहे रे." दुसऱ्या व्यंग्यचित्रात, जनरल स्मट्स व काही सरकारी अधिकारी, हिंदी नेत्यांची मस्तके भाल्याने उडवू पाहात आहेत. पण त्यांची घोडी फार थकलेली आहेत आणि घोडेस्वार धापा टाकीत आहेत, तरी हिंदी नेत्यांची मस्तके शाबूत आहेत. या दोन्ही, व्यंग्यचित्रांवरून, गोऱ्या लोकांची मनःस्थिती प्रकट होते. या पत्राचे संपादक, 'इंडियन ओपिनियनच्या' वाचकांसाठी, ती दोन व्यंग्यचित्रे मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत, म्हणून त्यासंबंधी मी अधिक काही लिहीत नाही.

असोसिएशनचे यश

पहिल्या वर्गाच्या बगीतून प्रवास करण्यास हिंदी लोकांना मनाई करणारा निर्बंध नगरपालिकेने मंजूर केला आहे. त्याविरुद्ध श्री. इसाप मिया यांनी जे पत्र[1] लिहिले, ते वाचकांना आठवत असेल. जनरल स्मट्स यांनी लिहिले आहे की, या कायद्याल सरकार मंजुरी देणार नाही. याचा अर्थ, जनरल स्मट्स थोडे बदलले आहेत असा आहे काय ? यावरून हे सिद्ध होते की, हिंदी समाजाने जोर दाखविला तर त्याचा फायदा झाल्याशिवाय राहणार नाही.

पासपोर्ट मिळणार नाहीत

श्री. मुसा इस्माइल आणि श्री. दावजी यांना पासपोर्ट देण्यास नकार मिळाला म्हणून लॉर्ड सेल्बोर्न यांना अर्ज केला होता. त्याच्या उत्तरात लॉर्ड सेल्बोर्न

१. पाहा. 'वासाहतिक सचिवाला पत्र' लेख ३११.

म्हणतात, "याचा अर्थ हिंदी लोकांनी नोंदणी केली नाही तरी त्यांना परत येण्याचा हक्क आहे हे सरकारने कबूल केल्यासारखे आहे." हा प्रश्न येथे बहुधा थांबणार नाही. या प्रश्नासंबंधी दुसरे पत्र[१] श्री. गांधींनी लॉर्ड सेलबोर्न यांना लिहिले आहे. हाच निर्णय कायम राहिला तर, हिंदी लोक ब्रिटिश प्रजाजन नाहीत, असे ठरेल. ठीक आहे. तसे होऊ द्या. आमच्या लढ्याला अधिक बळ प्राप्त होईल.

नव्या कायद्याचे एक कलम

नव्या कायद्याचे एक कलम, मरहूम श्री. अबु बकर यांच्या वारसाला अनुकूल आहे, असे मानण्यात येत होते. लॉर्ड सेलबोर्न, लॉर्ड एल्जिन इत्यादींनी त्यावर फाजील भर दिला होता. पण आता तेही गेले. त्या कलमाप्रमाणे वारसाला जमीन देण्याला, जनरल स्मट्स यांनी आक्षेप घेतला होता. ते म्हणतात, हे कलम या प्रकरणाला लागू नाही, कारण ती जमीन एका गोऱ्या माणसाच्या नावावर पूर्वीच चढविलेली आहे. कोर्टाने [वारसाबद्दल] सहानुभूती दाखविली असली तरी तो आक्षेप मान्य केला आहे. पण अशा सहानुभूतीचा काय उपयोग? याचा अर्थ प्रस्तुत प्रकरणी, या कायद्याचे ते कलमसुद्धा व्यर्थ आहे. हे प्रकरणही येथे थांबणार नाही. ते वारस न्याय मिळविण्यासाठी प्रयत्न करण्याच्या विचारात आहेत, तोपर्यंत या बाबतीत प्रतिकूल निर्णयामुळे, या कायद्यावर एक नवा आक्षेप निर्माण झाला. या विषयावरील पत्रव्यवहार चालू आहे.

कायद्याचा बळी

हा नवा कायदा, यमराजाप्रमाणे, नवे नवे बळी, गिळंकृत करीत चालला आहे. या राक्षसाला हिंदी रक्ताची चटक लागली आहे. कैक वाढप्यांच्या नोकऱ्या गेल्या आहेत, आणि कित्येक मजूर बेकार झाले आहेत. सैनिकांनी निषेध केल्याचे आम्हांस कळते. आता श्री. मोहनलाल जोशी संकटात सापडले आहेत. प्रिटोरिया येथील कोर्टात चांगल्या पगारावर दुभाष्याची नोकरी त्यांना होती. त्यांनी नोंदणी-पत्रे घेतली नाहीत म्हणून सरकारने त्यांना नोकरीतून मुक्त केले आहे. हा पराकाष्ठेचा जुलूम होय. श्री. जोशी यांच्यावर कुटुंबाचा भार आहे. तरी त्यांनी देशासाठी, आपल्या नोकरीचा त्याग केला आणि समाजाची प्रतिष्ठा संभाळली, याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. अशा प्रकारे व्यवसायातून उठविलेल्या लोकांना उद्योग मिळवून देणे हे हिंदी लोकांचे कर्तव्य आहे. एखाद्या हिंदी माणसाला कारकुनाची गरज असेल तर, त्याने श्री. जोशी किंवा त्यांच्याप्रमाणे बेकार झालेले दुसरे कोणी यांना नोकरीवर ठेवावे, असे मी आग्रहाने सांगतो.

१. हे उपलब्ध नाही.

दुःखप्रदर्शन

येथील सुप्रसिद्ध व्यापारी श्री. दादाभाई यांना स्वदेशाहून अशी बातमी आली आहे की, त्यांचा वडील मुलगा प्लेगने वारला. या बातमीने ते अगदी खचले आहेत. त्यांना ज्यांनी सांत्वनपर संदेश धाडले, त्यांत मीही एक सहभागी आहे.

इशाकचा खटला

हा खटला श्री. जॉर्डन यांच्यापुढे बुधवारी चालू झाला.[1] इतर सदतीस हिंदी लोकांवर होता, तोच आरोप श्री. महम्मद इशाकवर होता. श्री. चॉमनीही हजर होते. इशाकविरुद्ध साक्ष देणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याने इतर सदतीस माणसांच्या खटल्यात जे सांगितले, त्याचीच पुनरुक्ती केली. श्री. गांधींनी आरोपीतर्फे काहीही पुरावा न देता त्याच्या सुटकेची मागणी केली. श्री. जॉर्डन यांनी लांबलचक निकाल-पत्र लिहून असे मान्य केले की श्री. महम्मद इशाक यांना, आपल्या [जुन्या] परवान्यामुळे [ट्रान्सवॉलमध्ये] राहण्याचा, पूर्ण हक्क होता, आणि शांततासंरक्षक वटहुकुमाप्रमाणे, त्याला हद्दपार मुळीच करता येत नव्हते. म्हणून, त्याला मुक्त करण्यात आले.

लिंडसे यांचे भाषण

श्री. लिंडसे प्रागतिक पक्षाचे एक पुढारी आहेत. त्यांनी एका भाषणात असे म्हटले, " सरकार हिंदी लोकांच्या बाबतीत कठोर होणार नाही. प्रवेशविषयक कायदा त्यांच्याविरुद्ध वापरण्यासाठी केलेला नाही. हिंदी लोकांची हकालपट्टी करण्याचा एकच मार्ग आहे, आणि तो म्हणजे, त्यांना परवाने देण्याचे थांबविणे. तसे जानेवारी महिन्यापासून करण्यात येईल. " ही सारी पोकळ बडबड आहे, असे मी मानतो. प्रथम तुरुंगाची भाषा होती. नंतर ते हद्दपारीच्या गोष्टी बोलू लागले. आता ते परवान्यावर आले आहेत. अशा रीतीने, हिंदी समाजाने आपले धैर्य टिकविले आणि अखेरपर्यंत ऐक्य राखले, तर हा कायदा हळूहळू पूर्णपणे लोप पावेल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, १४-१२-१९०७

१ पाहा : ' महम्मद इशाक यांचा खटला ' लेख ३१०.

३२८. वासाहतिक सचिवाला पत्र

[जोहान्सबर्ग,
ता. १४ डिसेंबर, १९०७]

[ना.
वासाहतिक सचिव,
प्रिटोरिया,

महाशय,]

जोहान्सबर्गच्या तुरुंगातून काल माझी सुटका झाली, असे मी आपल्याला नम्रपणे निवेदन करतो. माझा परवाना ता. ३० सप्टेंबर रोजी खलास झाल्यामुळे, या वसाहतीत बिगर परवाना राहिल्याबद्दल, शांततासंरक्षक वटहुकूम व आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयक याअन्वये, मला एक महिना कैदेची शिक्षा झालेली होती. मी या वसाहतीतून निघून जावे, असा हुकूम आशियावासीयांच्या रजिस्ट्रारने दिलेला होता. तो मोडण्याची माझी कारणे मी त्यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केलेली आहेत. जर्मिस्टन येथील हिंदूंचे देवालय सध्याच्या स्थितीत अस्तित्वात येण्यास मी कारणीभूत आहे. त्या मंदिराचा मी एकमात्र पुरोहित होतो—आणि अजून आहे. काल त्या मंदिरात गेल्यावर मात्र त्याची स्थिती उजाड भासली. ते मंदिर सर्व महिनाभर बंद होते. त्याची परिस्थिती काल पाहिल्यानंतर, माझ्या मनाची अवस्था काय झाली, याचे वर्णन मी येथे यथार्थपणे करू शकत नाही.

आता, या वसाहतीच्या कायद्याप्रमाणे, मला जर तुरुंगवास टाळावयाचा असेल, तर मी येथून ७ दिवसांत बाहेर गेले पाहिजे, याची जाणीव मला आहे. पण या वसाहतीच्या कायद्यापेक्षा, उच्चतर कायदा मला दुसरा मार्ग दाखवीत आहे. तो म्हणजे एक ब्रिटिश प्रजाजन म्हणून, आणि जर्मिस्टन येथील देवालयाचा पुरोहित म्हणून, मी माझे कर्तव्य एकनिष्ठेने करीत राहिले पाहिजे —मग त्याचे परिणाम काहीही होवोत. म्हणून, अत्यंत विनयाने व आदराने, तसेच साम्राज्य सरकार व स्थानिक सरकार यांच्याविषयीच्या कर्तव्यबुद्धीने, मी आपल्याला कळवीत आहे की, या वसाहतीतून बाहेर जाण्याचा माझा इरादा नाही. माझे मंदिर व मंदिरात येणारे भक्तगण यांच्याविषयीचे, माझे कर्तव्य पार पाडण्यासाठी सरकारने मला परवाना द्यावा, अशी विनंती

मी या अर्जाने करीत आहे. ती सरकारने मान्य केल्यास, जर्मिस्टन येथील हिंदु भक्त-गण व मी स्वतः सरकारच्या सामर्थ्याची तारीफ करू.

या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, माझ्या परवान्याची मुदत-वाढ नाकारण्याचे जे कारण आशियावासीयांच्या रजिस्ट्रारने सूचित केले आहे, ते निराधार आहे, असा माझा तर्क आहे. माझ्यावर आरोप कोणते होते, याचा मला अद्याप पत्ता नाही. जर माझ्यावर काही आरोप खरोखर असतील, तर ते दाखल करून माझा खटला चालवावा. मी मला माहीत असलेल्या धर्मापासून किंवा माझ्या पुरोहिताच्या व्यवसायापासून च्युत होणारी काही कृती केली असेल, तर मी स्वेच्छेने व अविलंबाने या वसाहतीला राम राम ठोकीन. माझ्यावरील आरोप कायदेशीरपणे दाखल करता येत नसतील तरीही सरकारने मुद्दाम नेमलेल्या व कायद्याचे ज्ञान असलेल्या कोणाही निःपक्षपाती माणसापुढे मी त्या आरोपाचे खंडन करीन. सुसंस्कृत व ख्रिश्चन सरकार-कडून मी कमीतकमी इतकी अपेक्षा करतो.

[आपला,
रामसुंदर पंडित]

इंडियन ओपिनियन, २१-१२-१९०७

३२९. वासाहतिक सचिवाला पत्र

[जोहान्सबर्ग,
ता. १८ डिसेंबर, १९०७]

ना. वासाहतिक सचिव,
[प्रिटोरिया],

महाशय,

विषय—मरहूम अबू बकर आमद [यांची] मालमत्ता.

सरकारला हे माहीतच आहे की, १८८५चा तिसरा कायदा मंजूर होण्यापूर्वी मरहूम अबू बकर आमद—यांनी खरेदी केलेली, नं. ३७३, चर्च स्ट्रीट, प्रिटोरिया, ही मालमत्ता, त्यांच्या वारसाला मिळावी म्हणून, आशियावासी कायदा दुरुस्ती

विधेयकामध्ये सतरावे कलम घालण्यात आले. हे कलम गेल्या वर्षी लिहिले जाण्यापूर्वी ही मालमत्ता कोणत्या परिस्थितीत श्री. पोलक यांच्या नावे करण्यात आली, हे सरकारी वकिलाला कळविण्यात आले होते. आणि हा प्रश्न मिटविण्यासाठी ते कलम तयार केले गेले, असे आम्ही समजलो. या मालमत्तेचे हस्तांतर करण्याचे करार-पत्र बनविण्यात आले आणि रजिस्ट्रारला सादर करण्यात आले. त्यामुळे ही मालमत्ता ब्रिटिश प्रजाजन असलेल्या वारसाच्या नावाने नोंदली जाईल, अशी अपेक्षा होती. पण रजिस्ट्रारने हे हस्तांतर अमान्य केले. कारण त्यांच्या मते, हे प्रकरण प्रस्तुत कलमाखाली येत नाही. नंतर हे प्रकरण न्या. वेसेल्स यांच्या न्यायासनापुढे गेले. त्यांनी रजिस्ट्रारचे मत ग्राह्य धरले. यामुळे हे कलम त्या वारसाचे अन्यायनिवारण करण्यास असमर्थ ठरले. त्यांच्यावरील अन्यायाचे निवारण सरकार करील, असा विश्वास मी धरावा काय ? हे करण्याचा त्वरित उपाय म्हणजे रस्त्याचा तो विभाग हिंदी लोकांनी धारण करण्यास पात्र ठरविणे, हा आहे, असे माझे नम्र मत आहे.[1]

आपला
मो. क. गांधी

इंडियन ओपिनियन, १-२-१९०८

३३०. मध्य दक्षिण आफ्रिका रेल्वेच्या जनरल मॅनेजरला पत्र

[जोहान्सबर्ग]
ता. २० डिसेंबर, १९०७

जनरल मॅनेजर,
मध्य दक्षिण आफ्रिका रेल्वे,
जोहान्सबर्ग,

महाशय,

मध्य दक्षिण आफ्रिका रेल्वेमध्ये, नोकरी करणाऱ्या, स्टॅण्डर्डटनच्या हिंदी लोकां-संबंधी मी आपल्याशी टेलिफोनवर बोललो आहे. त्या प्रकरणाचा मी जो जो अधिक

१. पण ही सूचना अधिकाऱ्याने फेटाळून लावली.

विचार करीत आहे, तो तो, ते फार महत्त्वाचे आहे, असे दिसते. म्हणून, सार्वजनिक नीतिमत्ता आणि जरूर तर कायदा, यांचा एक प्रश्न म्हणून. त्याची तड लावणे, हे माझ्या असोसिएशनचे कर्तव्य ठरेल. तथापि कायदेशीर लढा देण्यास माझी असोसिएशन उत्सुक नाही. म्हणून, आपण त्या नोकरांना, नोटिशीऐवजी एक महिन्याचा पगार देता येईल का हे पाहावे. त्या लोकांच्या बाबतीत कमीत कमी एवढे तरी केले पाहिजे, असे मला नम्रपणे वाटते. मी स्टॅण्डर्डटनच्या कमिटीला तारेने असे कळविले आहे की, एक महिन्याच्या नोटिशीऐवजी पगार मागण्याचा हक्क शाबूत ठेवून तुम्हांला जे काही दिले जाईल, त्याचा स्वीकार करा.

आपला
मो. क. गांधी
सन्मान्य कार्यवाह
ब्रिटिश इंडियन असोसिएशन

इंडियन ओपिनियन, २८–१२–१९०७

३३१. अधीरता

लढ्याचा शेवट पाहण्यास, ट्रान्सवॉलमधील काही हिंदी लोक अधीर होत चाललेले आहेत, असे आम्हांस दिसते. पण, तो शेवट अद्यापि दृष्टीच्या टप्प्यात नाही. मोठमोठी कामे एका दिवसात सिद्धीस जात नाहीत. हा लढा हिंदी लोकांच्या प्रतिष्ठेसाठी आहे, हे दक्षिण आफ्रिकेतील प्रत्येक माणसास माहीत आहे. आपण एक राष्ट्र आहो, आपल्याला आपले हक्क मिळाले पाहिजेत, आपण स्वतंत्र आहोत, हे सिद्ध करण्यासाठी हा लढा आहे. अशा मोठ्या कार्यासाठी लढा चालू असताना घाई करून काय उपयोग? पुष्कळ लोक तुरुंगात जाण्यास सरावले आणि बाकीचे लोक खंबीर राहिले, तरच लढ्याचा शेवट होईल.

या आठवड्यातील जोहान्सबर्गच्या बातमीपत्रावरून हे दिसून येईल की, जनरल स्मट्स हे नमते घेण्याला मुळीच तयार नाहीत. यावरून असे दिसते की, शेवटी हिंदी लोक शरण येतील, असे त्यांना खाजगी रीतीने कळले असावे. अजून त्यांच्या हातात, परवान्यांचे शस्त्र आहे. त्याचा उपयोग ते करू शकतील. सारे उपाय योजल्याशिवाय ते हिंदी लोकांवरील जुलूम का थांबवितील? रणांगणावरील सैनिक शरण जातात, ते अगदी

शेवटचा मार्ग म्हणून. या लढ्यात रक्तपात नाही किंवा खऱ्या दारुगोळ्याचा वापर नाही. म्हणून तो लढाही नाही, असे कोणीही समजू नये. आमचीहि ही लढाईच आहे. फरक इतकाच की, न्याय आमच्या बाजूचा असल्यामुळे, लढाईचा परिणाम एकच होणार. आपण उतावीळ झालो तर त्याचा अर्थ, तितक्या प्रमाणात आपली बाजू कमी न्यायाची आहे. सत्याचा विजय होतो, पण तो पूर्ण वेळ भरल्यानंतरच. वस्तुतः तो विजय होतो लवकरच, पण आपण वरवर पाहत असल्यामुळे आपल्याला फार उशीर झाल्यासारखे वाटते. स्वतःच्या प्राणाप्रमाणेच स्वतःची प्रतिज्ञा व प्रतिष्ठा यांचे रक्षण सर्वस्वाने करण्यास जे सिद्ध आहेत, त्यांची हानी, निर्णय उशीरा झाल्यास, काहीही होणार नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २१–१२–१९०७.

३३२. रामसुंदर पंडित

पंडितजी बंधमुक्त झाले आहेत. हा अंक आमच्या वाचकांच्या हाती पडेपर्यंत त्यांना पुनः अटक झाली असेल. त्यांचे आयुष्य आता त्यांचे राहिलेले नाही— ते सार्वजनिक आहे. त्यांनी स्वतःला समाजाच्या सेवेसाठी वाहिले आहे. आता माघार घेणे त्यांना शक्य नाही. त्यांचे धैर्य प्रशंसनीय आहे. त्यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. ते पुरोहित आहेत आणि प्रचारकही आहेत. त्यांच्यामध्ये वैराग्य प्रकट होईल, अशी आम्हांस आशा आहे. अशी माणसे अनासक्त असली पाहिजेत आणि म्हणून ती नम्र, शांत, सत्यवादी व निर्लोभी असतात. अशी माणसे मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्याशिवाय हिंदुस्थान स्वतंत्र होणे शक्य नाही. पंडितजींनी मोठी उडी मारली आहे. त्यांना जो मान मिळाला आहे, तो ते कायम ठेवतील अशी आमची आशा आहे आणि त्यासाठी प्रभूपाशी प्रार्थनाही आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २१–१२–१९०७

३३३. हाजी हबीब

दर्बान येथे स्थायिक होण्यासाठी, श्री. हाजी हबीब यांनी आता ट्रान्सवॉल सोडला आहे. म्हणून, त्यांच्या सन्मानार्थ प्रिटोरिया येथे एक निरोप-समारंभ झाला. त्याचा वृत्तांत आम्ही या अंकी दिला आहे. सध्या हिंदी समाज अशा बिकट परिस्थितीतून जात आहे की, कोणाच्या सन्मानाच्या समारंभाची व्यवस्था करण्याकडे आपल्याला लक्ष देता येत नाही. नाही तर, केवळ एका मेजवानीवर श्री. हाजी हबीब यांनी प्रिटोरिया सोडले नसते. त्यांची [समाज-] सेवा दीर्घकालीन आहे. शेकडो माणसांसाठी त्यांना जे काही केले, त्याची योग्य फेड करणे अशक्य आहे. अशी सेवा करताना, श्री. हाजी हबीब यांनी स्वार्थाचा विचार लवमात्रही केला नाही. सार्वजनिक कार्यासाठी ते सदा तत्पर असत. कार्यासाठी ते जितके आतुर, तितकेच समर्थ होते. गोऱ्या अधिकाऱ्यांना त्यांच्याशी वाद करणे कठीण जाई. श्री. हाजी हबीब यांनी ट्रान्सवॉलमध्ये केली तशीच सेवा ते दर्बानमध्येही करतील, आणि सार्वजनिक कार्यात पूर्ण भाग घेतील, अशी आम्हांस आशा आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २१-१२-१९०७.

३३४. रामसुंदर पंडित[१]

श्री. रामसुंदर पंडित तुरुंगातून ता. १३ रोजी मुक्त झाले. त्यांचे योग्य ते स्वागत करण्यासाठी पुष्कळ हिंदी लोक हजर होते. त्यांत, श्री. इसाप मियाँ, मौलवीसाहेब, श्री. फैन्सी, श्री. थंबी नायडू, श्री. गांधी इत्यादी लोक होते. प्रिटोरियाहून श्री. कचालिया, श्री. पिळे व श्री. गोपाळ आले होते. बरोबर ८॥ वाजता ते तुरुंगा-

१. 'खास वृत्तांत' या नावाने हा लेख प्रसिद्ध झाला.

बाहेर आले. चिनी संघाचे अध्यक्ष श्री. क्विन वगैरे होते. पंडितजींचे स्वागत पुष्पहार व पुष्पगुच्छ घालून उत्साहाने करण्यात आले.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २१–१२–१९०७.

३३५. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

फितुरांत भर

फक्त आता एकदाच आशियावासी कचेरीचे म्हणणे खरे ठरले आहे. ते असे की, सर्व मिळून ५११ हिंदी लोकांनी, गुलाम म्हणून, नोंदणी करण्यासाठी अर्ज केले आहेत. हिंदी लोकांच्या अंदाजाप्रमाणे फक्त ३९९ लोकांनी अर्ज केले आहेत. पण, मला मिळालेल्या विश्वसनीय माहितीवरून, ५११ हा खरा आकडा दिसतो. याशिवाय, अधिक दुःखदायक माहिती अशी की, शेठ एम्. सी. कमरुद्दीन पेढीचे श्री. हसनमिया कमरुद्दीन झटाम, भारतीयविरोधी कानून–निधीचे खजिनदार श्री. गुलाम महम्मद हुरजूग, श्री. हाजी कासीम, प्रिटोरियाचे श्री. हाजी जुसब, तसेच श्री. अल्ली हबीब– अशा सद्‌गृहस्थांनी आपल्या तोंडाला काळे फासले. श्री. हसनमिया यांच्याविषयी मी काही म्हणणार नाही. या कायद्याच्या बाबतीत त्यांच्या मनाचा तोल गेला आहे, असे मी समजतो. श्री. गुलाम महम्मद यांची गोष्ट फार खेदजनक आहे. त्यांनी ते कृष्ण–कृत्य अत्यंत गुप्त रीतीने केले असे दिसते. त्या दोघांच्या बाबतीत बराच काळ काही अफवा पसरल्या होत्या. पण, आतापर्यंत मी त्यांना महत्त्व दिले नाही. ती अफवा खरी निघाली, हे पाहून मी लज्जित झालो आहे. श्री. हाजी कासीम व श्री. अल्ली यांनीही अगदी चोरटेपणाने, आपली नावे नोंदविली असे दिसते. हे लिहीत असतानाही त्यांच्या शब्दाची आठवण मला होते. ते येथे उद्‌धृत करण्यात काही अर्थ नाही. तथापि, श्री. हाजी कासीम व श्री. अल्ली यांना आपली नावे नोंदवावयाची होती तर, धैर्याने खुल्या मैदानात येऊन त्यानी तसे करावयास हवे होते, हे सांगणे मी माझे कर्तव्य समजतो. त्यांची नावे यादीच्या शेवटी आहेत, असे मला दिसते. याचा अर्थ, अगदी अखेरच्या क्षणी, त्यांनी आपले हात बरबटून घेतले. मी जे लिहीन, त्यामुळे त्यांना दुःख होईल. पण मी खात्रीपूर्वक सांगतो की, ज्यांच्या भेकडपणाची बातमी

जेव्हा मी ऐकली, तेव्हा मला जितके दुःख झाले, त्याहून त्यांना अधिक दुःख होणे शक्य नाही, ती नावे प्रसिद्ध करणे मला भाग पडत आहे, कारण त्यामुळे समाजातील खोटी लज्जा, खोटी भीती आणि भ्रष्टाचार नाहीसे होतील, अशी आशा वाटते याशिवाय, खोजा वेलजी केशवजी व खोजा मनजी केशवजी यांचीही नावे दिसतात. माझ्याजवळ आणखीही नावे आहेत, पण ती मी पुढे प्रसिद्ध करीन, यावेळी मी फक्त प्रमुख लोकांची नावे दिली आहेत.

फितुरांना विनंती व सूचना

समाजाची स्मृती अल्पकालीन असते. त्यामुळे कृष्ण-मुखांची, कृष्ण-कृत्ये कालांतराने आपण विसरून जाऊ असे मी मानतो. समाजाशी त्यांनी द्रोह केला असला तरी, ते हिंदी आहेत याचीच स्मृती राहील. त्यांना जर खरोखर लज्जा वाटत असेल आणि समाज-हिताची चाड असेल, तर जानेवारीत सुरू होणाऱ्या लढ्यात ते भाग घेऊ शकतील. परवान्यासाठी अर्ज करताना, त्यांना गुलामगिरीचे पट्टे दाखवावे लागतील. ते त्यांनी दाखविले नाहीत, तर गुलामगिरी न स्वीकारणाऱ्या हिंदी लोकांना भोगाव्या लागणाऱ्या साऱ्या आपत्ती सोसण्याचे भाग्य त्यांना लाभेल. आपल्या कृत्या बद्दल ज्याला पश्चात्ताप झाला आहे, असा कोणताही फितूर याप्रकारे वागू शकेल. असे धैर्य दाखविणारे थोडे तरी निघतील, अशी मला अशा आहे.

जानेवारीत काय घडेल ?

वरील सूचनेमुळे जानेवारीचा प्रश्न तत्काळ उत्पन्न होतो. आपण जसा डिसेंबरच विचार केला, तसा जानेवारीचा केला पाहिजे. सरकारने डिसेंबरात आपली शक्ती प्रकट केली नाही, ते करू शकले नाहीत, तसेच जानेवारीत घडेल, असे मला वाटते. पण, डिसेंबरात कोणाला अटक होणार नाही, असे आधी कोणास वाटले नव्हते. त्याचप्रमाणे, जानेवारीत कोणाला छळण्यात येणार नाही, असे मला वाटत नाही. गुलामगिरीचे पट्टे दाखल न करणाऱ्या लोकांना परवाने मिळणार नाहीत, हे ठामपणे लक्षात ठेवले पाहिजे. त्याबाबतीत सरकार नमते घेणार नाही. दशा आशयाची नोटिस निघालेली असल्याने, तशी कार्यवाही होईल हे निश्चित. मग काय करावे ? याचे उत्तर यापूर्वी पुष्कळ वेळेला दिलेले आहे. ते असे की, आपण बिगर–परवाना व्यापार करावा. आपल्याला पकडण्यात आले व दंड ठोठावण्यात आला तर आपण दंड देऊ नये, त्याऐवजी तुरुंगात जावे. तुरुंगात जाणे हाच रामबाण उपाय आहे. निरनिराळ्या प्रकारचे परवाने सरकार देत नाही. काफिरांची भोजनालये, आणि फेरीवाले यांना परवाने नगरपालिका देतात. अशा परवान्याशीच ज्यांचा संबंध आहे, अशा लोकांना पकडण्याचा अधिकार सरकारला नाही. त्यात काय करावे, हे नगरपालिका ठरवतील. म्हणून त्यांपैकी काही हल्ला करतील, असा संभव आहे.

उदाहरणार्थ, बॉक्सबर्ग नगरपालिका. त्यामुळे घाबरून जाण्याचे कारण नाही, उलट आनंद वाटला पाहिजे. सरकारने हल्ला सुरू केला नाही, हे बरे झाले, असे मला वाटत नाही. आपले स्वातंत्र्य आपण हिसकावून घेतले पाहिजे—असा हा प्रस्तुतचा लढा आहे. असे असल्यामुळे, आपल्यापैकी पुष्कळजण तुरुंगवासाच्या हालअपेष्टा भोगून आल्याशिवाय आपल्यामध्ये खरे धैर्य निर्माण होणार नाही. या लढ्याच्या बाबतीत ज्यांना अटक होईल, त्यांच्या बचावासाठी श्री. गांधी धावत जातील हे पूर्वीच जाहीर केलेले आहे. ‘ बचाव करणे ’ याचा अर्थ येथे, ‘ तुरुंगात जाणाऱ्या बहाद्दरांना निरोप देणे. ’ परवान्याच्या बाबतीत दंडाची शिक्षा आहे आणि तो न भरल्यास तुरुंगवासाची शिक्षा आहे, याचे मला दुःख वाटते. मोह ही वाईट गोष्ट आहे. मोहाला कोणी बळी पडले आणि दंड भरला तर मोठी हानी होईल. म्हणून प्रत्येक हिंदी माणसाने या बाबतीत स्वतःसाठी किंवा दुसऱ्या कोणासाठी कधीही दंड न भरण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे.

समेटाचे काय ?

जानेवारीचा विचार आला म्हणून सहजच असा प्रश्न उत्पन्न होतो की, समेट कोठे गेला ? उत्तर म्हणून मी सांगतो की, मी साऱ्या प्रसंगाचा विचार करून ठेवलेला आहे. समेटाचे प्रयत्न चालू आहेत. पण मला वाटते, जानेवारीमध्ये सरकारला जे शस्त्र उपलब्ध होईल ते वापरून पाहिल्याशिवाय सरकार समेट करणार नाही. तोपर्यंत हिंदी लोकांचे सामर्थ्य खूपच वाढलेले आहे, असे प्रत्येकाला दिसून येईल. गोऱ्यांच्या मालकीच्या अधिकाधिक वृत्तपत्रांतून सरकारचा धिक्कार व हिंदी लोकांना यशचिंतन येत आहे. तीन महिन्यांपूर्वी आमच्या बाजूने एखाद्या वृत्तपत्राने लिहिले असते तर त्याची चेष्टा झाली असती. पण गोऱ्यांच्या मालकीची वृत्तपत्रे आता आमच्या बाजूने लिहू लागली आहेत. तसेच, जानेवारीमध्ये गोऱ्यांना जेव्हा पुष्कळ हिंदी लोक तुरुंगात गेल्याचे आढळेल तेव्हा त्यांच्या सुटकेची मागणी ते सरकारकडे करतील. ‘ समेट ’ ही केवळ बोलण्याची भाषा झाली. त्याचे धागेदोरे आपल्या हातात आहेत. आपण आपली योग्यता, आपले पौरुष, सिद्ध केले म्हणजे, लोक आपोआप आपल्याकडे समेटासाठी येतील. पौरुष व सत्य यांचा महिमा असा आहे.

‘ क्रिटिक ’मधील व्यंग्यचित्रे

क्रिटिकने यावेळी एक गंमतीचे व्यंग्यचित्र प्रसिद्ध केले आहे. त्यात, एक हिंदी माणूस ‘ हद्दपारीचा अधिकार नाही ’ अशा शब्दांचा फलक हातात नाचवीत आहे, आणि जनरल बोथा व त्याचे मंत्री त्याच्यापासून पळून जात आहेत. ‘ सविनय प्रतिकारावर ’ आतापर्यंत याप्रकट तीन व्यंगचित्रे आली आहेत.

सरकारचा हेकेखोरपणा

समेटासाठी प्रयत्न करणाऱ्या लोकांना जनरल स्मट्स यानी खडखडीत नकार दिला आहे, असे दिसते. कायदा रद्द करण्याचा किंवा नोटीस परत घेण्याचा माझा मुळीच विचार नाही, असे त्यांनी जाहीर केले आहे. ज. स्मटस्च्या या धमक्यामुळे कोणीही असे घाबरून जाण्याचे कारण नाही. मनास येईल ते बोलण्याची सवय त्यांना आहे. आपल्या धमक्याप्रमाणे वागण्यास ते जेव्हा सुरुवात करतील, तेव्हा त्यांना शहाणपणं येईल.

जूटनिकची मदत

जूटनिकच्या हिंदी लोकांनी या लढ्याला मदत व्हावी म्हणून वर्गण्या पाठविल्या आहेत. त्यासाठी असोसिएशनने आभार मानले आहेत. इतर लोकही त्यांचे अनुकरण करतील अशी मला आशा आहे. पोर्ट एलिझाबेथ येथील हिंदी लोकांनी निधी गोळा केला असल्यास, तो त्यांनी [असोसिएशनकडे] पाठवावा.

दक्षिण आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमिटीला मदत

पॉचेफस्ट्रूमचे श्री. रतनजी लखमीदास यांच्यामार्फत, तेथील हिंदूंकडून १६ पौं. ८ शि. ६ पे. आणि श्री. नामजी घेला यांच्याकडून ५ पौं. कमिटीकडे आलेले आहेत. इतर हिंदी लोकांकडून अशाच वर्गण्या आल्या तर, कमिटीच्या साऱ्या चिंता प्रायः नाहीशा होतील. सौ. रिच् यांच्या भयंकर आजारीपणामुळे श्री. रिच यांना जो खर्च करावा लागत आहे, तो कमिटीच्या निधीतून दिला जातो, हे लक्षात ठेवले पाहिजे.

भीखा नारण

या व्यक्तीची काही माहिती पूर्वी दिलेली आहे. तो श्री. डेल लेस यांच्याकडे नोकर होता. आता त्याला फार खेद वाटत आहे. आपल्या अर्जाची पोच त्याने असोसिएशनकडे दिली आहे. गुलामगिरीचा पट्टा न घेताच, तो हिंदुस्थानला गेला आहे. त्याने स्वतःला कलंक लावून घेतला म्हणून, त्याचे नातलग फार त्रस्त झाले होते व त्याला वाळीत टाकण्याचा विचार करीत होते. पण तो हिंदुस्थानला गेल्यामुळे ते आत शांत झालेले दिसतात. गुलामाला स्वप्नातही सुख लाभत नाही, हे सिद्ध करणारे हे उदाहरण आहे. गोऱ्याचे नोकर झाल्याने, माणूस बहुधा भित्रा बनतो. भीखा नारण श्री. लेसकडे धोब्याचे काम करीत होता.

प्रिटोरियाच्या मशिदीत पोलिस

बनूतखान व हाजी इब्राहीम यांच्या प्रकरणानंतर प्रत्येक शुक्रवारी, शांतताभंग होऊ नये म्हणून, प्रिटोरियाच्या मशिदीत पोलिस ठेवलेले आहेत. पोलिसांच्या

अस्तित्वामुळे समाजाला कमीपणा येतो. त्याचा अर्थ मशिदीचे विश्वस्त कमजोर आहेत. त्यांनी आतापर्यंत पोलिस पहारा बंद केला नसल्यास, तो यापुढे ते करतील, अशी मला आशा आहे.

नवीन हिंदी वकील

श्री. जॉर्ज गॉडफ्रे यांचे नाव सुप्रीम कोर्टाचे वकील म्हणून ता. १३ रोजी नोंदले गेले. बहुधा ते जोहान्सबर्ग येथे वकिली सुरू करतील. मी त्यांचे अभिनंदन करतो. इंग्लंडमध्ये शिक्षण घेणारे श्री. सुभान गॉडफ्रे यांचे श्री. जॉर्ज गॉडफ्रे हे तिसरे पुत्र होत. आता ते चवथ्या मुलाला वैद्यकीय अभ्यासासाठी विलायतला पाठविण्याची तयारी करीत आहेत.

आशियावासी कचेरी

श्री. बर्जेस यांना आपल्या सेवेची ता. ३१ जानेवारी [१९०८] नंतर गरज नाही, असे कळविण्यात आले आहे, त्याचप्रमाणे प्रिटोरियातील तीन कारकुनांना मुक्त करण्यात आले आहे. [त्यांची नावे मी पुढे कळवीन.]

काँग्रेसचे प्रतिनिधी

श्री. अमीरुद्दीन फजंदर यांची अशी तार आली आहे की, ' मी ता. १७ रोजी मुंबईस पोहोचलो.'

जोहान्सबर्ग येथील ' गोरा व्यापारी संघ '

या आठवड्यात या संघाची एक सभा भरली होती. नवा कायदा सरकार अंमलात आणील, अशी आशा प्रकट करणारा ठराव त्या सभेत मंजूर झाला. एका प्रवक्त्याने सांगितले की, या प्रश्नाबाबत साम्राज्य सरकारकडून मोठे दडपण आले आहे; म्हणून सरकारला पाठिंबा देणे, हे जोहान्सबर्गच्या लोकांचे कर्तव्य आहे.

आशियावासी कचेरी

श्री. बर्जेस यांच्याशिवाय आशियावासी कचेरीतील जे कारकून मुक्त करण्यात आले त्यांची नावे—श्री. डाब्सन, श्री. बार्कर, श्री. वालकस व स्वीट.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २१-१२-१९०७

२३६. मध्य दक्षिण आफ्रिका रेल्वेच्या जनरल मॅनेजरला पत्र

[जोहान्सबर्ग]
२१ डिसेंबर, १९०७

जनरल मॅनेजर,
मध्य दक्षिण आफ्रिका रेल्वे,
जोहान्सबर्ग
महाशय,

स्टँडर्टन येथील स्थानिक हिंदी कमिटीने पाठविलेले पत्र आज सकाळी मला मिळाले. त्याचा मुक्त अनुवाद पुढे दिला आहे.

रेल्वेच्या नोकरांना महिन्याच्या सुरुवातीस जे धान्य दिले होते, त्यातील शिल्लक राहिलेले सारे धान्य काल (ता. १९) त्यांच्याकडून घेण्यात आले, आणि ज्या खोल्यांत ते राहत होते, त्यांच्यावरील छप्पर काढण्यात आले. म्हणून सारे लोक येथे आले आहेत. त्यांची सोय कमिटीने लावली आहे. काल दुपारपर्यंत त्यांनी काम केले. पण त्याची मजुरी काही त्यांना देण्यात आली नाही. शहरात जागा शोधण्यासाठी व नंतर बायकामुलांना तेथे नेण्यासाठी परवानगी द्यावी, अशी प्रार्थना त्यांनी केली. पण मुलांनासुद्धा घराबाहेर हुसकून लावण्यात आले.

आपण मला एक अभिवचन दिले होते आणि ते वृत्तपत्रातील आपल्या पत्रव्यवहारात प्रसिद्धही झाले होते. ते हे की, 'कठोरपणे वागण्याची किंवा आपल्या अधिकारांचा फायदा घेण्याची' माझ्या खात्याची मुळीच इच्छा नाही. या अभिवचनाला काही अर्थ असेल तर, आपल्या हुकुमाची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांची भयंकर कर्तव्यच्युती झाली, असे स्पष्ट होते. या कामी आपण जरूर ती चौकशी करावी आणि तिचा निष्कर्ष मला कृपया कळवावा, अशी विनंती आहे.

आपला,
मो. क. गांधी
सन्मान्य कार्यवाह,
ब्रिटिश इंडियन असोसिएशन

इंडियन ओपिनियन, २८-१२-१९०७

३३७. हमीदिया इस्लामिया अंजुमनमधील भाषण

[जोहान्सबर्ग
ता. २२ डिसेंबर, १९०७]

या विजयाने[1] आपण फुगून जाता कामा नये. बोअर युद्धात डच लोकांनी माघार घेण्याचे सोंग प्रथम केले आणि नंतर ब्रिटिशावर हल्ला चढविला. त्याचप्रमाणे सरकार प्रथम पराभव झाल्याचे सोंग करील आणि मग तडाखा देईल, असा संभव आहे. म्हणून आपण असेच मानले पाहिजे की, आपला लढा नुकताच सुरू झाला आहे. त्यांनी परवाने नाकारले, तर आपण बिगर-परवाना व्यापार चालविला पाहिजे—आणि अटक झाली तर, दंड भरण्याऐवजी तुरुंगात गेले पाहिजे. शिवाय, आपण ऐक्याचे मंदिर उभारले पाहिजे. त्याला खर्च थोडा येईल. त्यामुळे बेकार हिंदी लोकांना काम देऊ शकू. परवान्याबाबतची परिस्थिती लोकांना समजावून सांगण्यासाठी, आपण एक सार्वजनिक सभा पुनः बोलावली पाहिजे.

श्री. मौलवी मुखत्यार साहेबांच्या परवान्याची मुदत संपत आलेली आहे. म्हणून, श्री. गांधींनी त्यांच्याशी त्यासंबंधी व लढ्यासंबंधी चर्चा केली.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २८-१२-१९०७.

३३८. हमीदिया इस्लामिया अंजुमनमधील भाषण[1]

श्री. गांधी म्हणाले, "प्रवेश नियंत्रण कायद्याविषयीची घोषणा आज सकाळी मी जेव्हा वाचली, तेव्हा माझ्या मनात पहिली कल्पना जी आपोआप आली, ती अशी

१. रामसुंदर पंडितांच्या मुक्ततेने. पाहा : 'रामसुंदर पंडित' लेख ३३४.

१. हमीदिया इस्लामिया अंजुमनच्या सभागृहात संध्याकाळी भरलेल्या प्रचंड सभेत गांधीजींनी भाषण केले. त्या दिवशी सकाळी, त्यांना ट्रान्सवॉलचे हंगामी पोलिस कमिशनर श्री.

[पुढील पान पाहा]

की, लॉर्ड एल्जिन यांनी हिंदी लोकांच्या राजनिष्ठेवर फार भार टाकला आहे. लॉर्ड एल्जिन हे हिंदुस्थानचे माजी व्हॉईसरॉय असून, ते हिंदुस्थानच्या परंपरा पार विसरले आहेत. या कायद्याला मंजुरी देण्यासाठी त्यांनी बादशहांना जेव्हा सल्ला दिला, तेव्हा त्यांना, आपण हिंदुस्थानातील क्रोडो लोकांचे विश्वस्त आहोत, याचा विसर पडला. हिंदुस्थानच्या इतिहासात अज्ञात असलेल्या एका नव्या मार्गावर तो आज पाऊल ठेवीत आहे, हे ते पार विसरले. हिंदुस्थान कधीही क्रांतिकारक नव्हता. पण, आताशा काही हिंदी लोकांच्या मनात क्रांतीचे वारे शिरलेले आहे, असे आम्हांस दिसते. त्या क्रांतिकारी वृत्तीला जर स्थिर अधिष्ठान मिळाले, तर, हिंदुस्थानच्या दृष्टीने, तो दुर्दिन ठरेल. पण त्याचे बीज, लॉर्ड एल्जिन यांनी पेरले आहे, असे म्हटल्याशिवाय मला राहवत नाही. हे विद्यार्थी-वर्गापुरतेच मर्यादित असते तर, हिंदुस्थानच्या भूमीत ते कदाचित् वाढीस लागले नसते. पण मला असे दिसते की, ज्याला इंग्रजीचा गंध नाही, असा व्यापारी वर्गही, हा कायदा व त्याचे अनिष्ट परिणाम, या बाबतीत एका नव्याच वृत्तीने भारलेला आहे. या बाबतीत मी इतका भाग घेतला, याचा मला अभिमान वाटतो. पण त्याबरोबरच मी हे सांगतो की, माझे विचार हे लोकांचे विचार आहेत आणि ते व्यक्त करताना, मी ते सौम्य स्वरूपात मांडले आहेत. यामुळे, मला असे वाटते की, लॉर्ड एल्जिन यांनी प्रवेश-नियंत्रण कायद्याला मंजुरी देऊन हिंदी लोकांच्या राजनिष्ठेला भलता ताण दिला आहे. माझ्या मते, हा कायदा म्हणजे एक रानटी कायदा आहे. स्वतःला ख्रिश्चन म्हणविणाऱ्या, सुसंस्कृत सरकारचा, हा जंगली कायदा आहे. जर येशू ख्रिस्त जोहान्सबर्ग व प्रिटोरिया येथे आला, आणि जनरल बोथा, जनरल स्मट्स आणि इतर राज्यकर्ते यांची अंतःकरणे तपासू लागला, तर त्याला, काही तरी विलक्षण— ख्रिस्ती वृत्तीशी पूर्ण

[मागील पानावरून]

एच्. एफ्. डी पेपेनफस यांचा असा टेलिफोन आला होता की, आपण मला भेटावे. गांधीजी तेथे गल्यानंतर, त्यांना सांगण्यात आले की, आपण स्वतः, थंबी नायडू [जोहान्सबर्ग येथील मुख्य निरोधक], पी. के. नायडू [जोहान्सबर्ग येथील निरोधक], सी. एम् . पिले, जमादार नवाब खाँ [जोहान्सबर्ग येथील निरोधक], करवा [जोहान्सबर्गचा माजी सैनिक], ल्यूंग क्विन [अध्यक्ष, चिनी संघ, जोहान्सबर्ग], जॉन फोर्टोइन [चिनी निरोधक,], मार्टिन इस्टन [जोहान्सबर्ग], रामसुंदर पंडित [जर्मिस्टन], जी. पी. व्यास [प्रिटोरिया], ए. एफ. सी. बेग [प्रिटोरिया], एम्. आय. देसाई [मुख्य निरोधक, प्रिटोरिया], ए. एम्. कचालिया [प्रिटोरिया], इस्माइल सुलेमान सूज [प्रिटोरिया], गुलाब महंमद अब्दुल रशीद [प्रिटोरिया], बी. गंगाराम [प्रिटोरिया], व्ही. यू. शेठ [प्रिटोरिया], इस्माईल जूमा (प्रिटोरिया], रहमत खाँ [प्रिटोरिया], एम्. एम्. खंडेरिया [पीटर्सबर्ग], अमरशी गोकुळ [पीटर्सबर्ग] व अंबालाल [पीटर्सबर्ग] यांना अटक करण्याचे हुकूम दिलेले आहेत. गांधीजींनी त्यांना वचन दिले की, दुसरे दिवशी, शनिवारी ता. २८ डिसेंबर रोजी, सकाळी १० वाजता सर्वजण आपापल्या न्यायाधीशासमोर उभे राहतील. ही हमी श्री. पेपेनफस यांनी स्वीकारली. पाहा. 'इंडियन ओपिनियन' ४-१-१९०८.

विसंगत,— सापडेल, असे मला वाटते. या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी, जनरल स्मट्स यांनी जे लोक निवडले आहेत, ते लोकांना परिचित आहेत आणि त्यांनी गरीब लोकांवर हात टाकलेला नाही. मॅजिस्ट्रेटपुढे दाखल केले जाणाऱ्या लोकांना तुरुंगात टाकले किंवा हद्दपार केले, तर त्यांच्यामागे राहणारे लोक, नोंदणीकायद्याला निकराने विरोध करतील, याविषयी मला काडीमात्र शंका नाही. परंतु या नोंदणी-कायद्याने असे अधिकार दिलेले आहेत की, त्यामुळे गरीब बिचाऱ्या नवऱ्यांवर मोठे संकट येणार आहे. त्यांना आपल्या कुटुंबातून बाहेर नेले जाईल. या लढ्यात तेजस्वी-पणाने चमकणारे श्री. नायडू यांचे उदाहरण घ्या. त्यांना बायको, पाच मुले आहेत आणि ते या वसाहतीत पाच वर्षे राहिलेले आहेत. त्यांना हद्दपार केले तर, त्यांच्या बायकामुलांची काळजी कोण घेणार? हद्दपार केलेल्या माणसाच्या कुटुंबाचे संरक्षण करणारे एकही कलम मला कायद्यात आढळले नाही. सरकार काय करू इच्छिते? आम्हांला या देशात हिंदी लोक नकोत, असे ते प्रामाणिकपणे का सांगत नाही? आपल्या अधिकाराची अंमलबजावणी अशा अप्रत्यक्ष रीतीने ते का करते? या कायद्याच्या काही कलमांना मी रानटी म्हणतो. फक्त असंस्कृत सरकारलाच ती शोभणारी आहेत. या अधिकारांचा उपयोग असा केला व सर्वांना हद्दपार केले किंवा तुरुंगात टाकले, तर तो त्यांचा सन्मान होईल. 'चार तुकड्यांसाठी' ते आपल्या गंभीर प्रतिज्ञेचा भंग करणार नाहीत आणि आपल्या पौरुषाला व स्वाभिमानाला रामराम ठोकणार नाहीत. त्यांना मी जो सल्ला दिला, त्याबद्दल मला कधीही खेद वाटणार नाही. गेल्या पंधरा महिन्यांतील लढा[१] उत्तम रीतीने चालला आहे. हा कायदा असा आहे की, कोणतेही स्वाभिमानी राष्ट्र आणि कोणताही स्वाभिमानी माणूस त्याचा स्वीकार करणार नाही, आणि त्याचे कारण त्यांतील निर्बंध नव्हेत, तर दुष्ट स्वरूपाचा हा वर्गविग्रही कायदाच आहे. आणि त्याचा आधार, आधाराशिवाय सबंध समाजावर केलेले आरोप व त्यावर ठेवलेला अविश्वास, हा आहे. हे आरोप, निःपक्षपाती पंचायतीपुढे सिद्ध करा, असे आवाहन आम्ही लॉर्ड सेल्बोर्न व जनरल स्मट्स यांना केले होते. द्वेषाने अंध झालेल्या आणि न्यायान्याय कळू न शकणाऱ्या माणसाने ते आरोप केलेले होते. निःपक्षपाती चौकशी करण्याचे किमान काम सरकार का करीत नाही? हिंदी लोकांना प्रतिनिधित्व नाही, याचे मी फारसे विवेचन करत नाही. पण, ज्या लोकांना प्रतिनिधित्व नाही, अशा लोकांच्या भावनांच्या बाबतीत सरकार इतके निगरगट्ट का आहे, हे मला कळत नाही. आता त्यांचे– आपले मार्ग भिन्न होण्याची वेळ आली आहे, असे दिसते. साम्राज्य सरकारला, हिंदुस्थाना-तील लोकांवर, बंदुकीने नव्हे तर प्रेमाने, अधिराज्य करावयाचे असेल, तर त्याने दहादा विचार केला पाहिजे. हिंदुस्थान की वसाहती? यांपैकी एकाची निवड इंग्लंडला करावी लागेल. ती आज किंवा उद्या करावी लागणार नाही; पण तिची बीजे, लॉर्ड एल्जिन

१. लढा सप्टेंबर १९०६ मध्ये सुरू झाला. पाहा खंड ५, लेख ४३९, ४४० व ४४१.

यांच्या कृतीने पेरली आहेत, हे खास. आशियावासी कायद्याला प्रवेशविषयक कायद्याची जोड दिलेली मी जेव्हा पाहिली, तेव्हा सौम्य शब्द वापरणे, किंवा टीकेत संयम राखणे, मला अशक्य झाले. एकदा महम्मद व त्याचे दोन[1] अनुयायी यांचा पाठलाग प्रचंड शत्रु-सैन्याने केल्यामुळे ते एका गुहेत आश्रयासाठी गेले. त्यांच्या अनुयायांनी निराश होऊन त्यांना विचारले, " एवढ्या मोठ्या सैन्याशी आपण तिघेजण सामना कसा देऊ शकू ? " महमंदाने उत्तर दिले, " 'आपण तिघे' असे तुम्ही म्हणता, पण मी म्हणतो, 'आपण चौघे.' कारण ईश्वर आपल्या सांगाती आहे.तो आपल्या बाजूचा असल्यावर आपला जय होणारच. " ईश्वर आपला साथी आहे. जोपर्यंत आपले कार्य चांगले आहे, तोपर्यंत सरकारला कोणते अधिकार दिलेले आहेत आणि त्यांचा उपयोग ते किती रानटीपणाने करते, याचा मी अणुमात्र विचार करीत नाही. गेले १५ महिने मी तुम्हाला जो सल्ला देत आलो आहे, तोच आताही देत आहे. [2]

इंडियन ओपिनियन, ४-१-१९०८.

३३९. डेलागोवा बेमधील हिंदी लोक

आशियावासीयांच्या प्रवेशावर निर्बंध घालण्यासाठी डेलागोवा बेच्या स्थानिक सरकारने जे विचित्र निर्बंध[3] केले आहेत, ते संपूर्णपणे आम्ही दुसऱ्या स्तंभात प्रसिद्ध केले आहेत. या निर्बंधांनी प्रवाश्यांचे--किंवा आशियावासी प्रवाश्यांचे--तीन वर्ग पाडले आहेत—(१) डेलागोवा बे सोडून बाहेर जाणारे. (२) बाहेरच्या विभागातून डेलागोवा बेमध्ये प्रवेश करणारे. (३) आशियातील पोर्तुगीज वसाहतीतून येणारे आशियावासी. ह्या निर्बंधांना ट्रान्सवॉलचा वास येतो हे खचित. डेलागोवा बेमधील आशियावासी लोक गव्हर्नर जनरलला भेटले, तेव्हा त्यांना असे सांगण्यात आले की, या निर्बंधांची आवश्यकता वाटण्याचे कारण म्हणजे, ' शेजारच्या वसाहतीतून, आशियावासी प्रवाश्यांचा प्रचंड लोंढा येण्याची भीती या

१. ' तीन ' असे मुळात आहे.

२. सभेमध्ये प्रवेशनियंत्रण कायद्याचा निषेध करणारा ठराव एकमताने मंजूर झाला. त्याची एक प्रत हायकमिशनर मार्फत साम्राज्य सरकारला पाठवावयाची होती.

३. ते येथे दिले नाहीत, पाहा. " डेलागोवा बेमधील हिंदी लोक. " लेख ३४२.

प्रांताला आहे, आणि हे निर्बंध तात्पुरत्या स्वरूपाचे आहेत. गव्हर्नर जनरलने केलेल्या या खुलाशामुळे डेलागोवा बे मधील हिंदी लोकांचे समाधान होईल, असे आम्हांस वाटत नाही. वस्तुतः ट्रान्सवॉलहून पोर्तुगीज प्रदेशात प्रवाश्यांची आवक मुळीच नाही आणि जरी ती असती, तरी त्या प्रांतात स्थायिक झालेल्या हिंदी लोकांना सतावून सोडण्याला काहीच कारण नाही. उदाहरणार्थ, बाहेर जाण्यासाठी खास परवाना त्यांनी का बाळगावा? त्यांना कायमचे कागदपत्र पूर्वीच दिलेले आहेत, असे आम्हांस कळते. आपण गुन्हेगार किंवा दिवाळखोर नाही, असे सिद्ध केल्याशिवाय व परवाना असल्याशिवाय हिंदी लोकांना डेलागोवा बेमधून बाहेर का जाता येऊ नये? विशिष्ट परिस्थितीत, सार्वजनिक न्यायाच्या दृष्टीने, अशी सावधगिरी ठेवणे कदाचित् जरूर असेल; पण गुन्हेगारी व दिवाळखोरी यांचा मक्ता आशियावासीयांनी घेतलेला नाही. आपण गुन्हे करून देशाचे कायदे मोडले नाहीत किंवा दिवाळखोर बनलो नाही, असे सिद्ध न करता, डेलागोवा बेमधील युरोपियन लोक हव्या तितक्या वेळा बाहेर जाऊ शकतात. या कठोर निर्बंधामध्ये एकच चांगला भाग आहे, आणि तो हा की, पोर्तुगीज सरकारने आपले प्रजाजन असलेले आशियावासी आणि नसलेले आशियावासी यांच्यामध्ये एक विभाजक रेषा काढली आहे. इतर वसाहतीतील ब्रिटिश सरकारांनी असा भेद केला नाही. डेलागोवा बे हे विदेशी राज्य असल्याने, या त्रासदायक निर्बंधाला काही सवलत मिळविण्याचा प्रयत्न लॉर्ड एल्जिन करतील, असा आम्हांस विश्वास वाटतो.

इंडियन ओपिनियन २८-१२-१९०७.

३४०. बेकारांसाठी काय करावे?

या दुष्ट कायद्याला मान्यता देण्याचे नाकारल्याबद्दल स्टँडर्टन व हॅडेलबर्ग येथील हिंदी रेल्वे-नोकरांना आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागल्या, हे वाचकांना या अंकावरून कळून येईल. याप्रमाणे पुष्कळ लोक बेकार झाले तर काय करावे? या प्रश्नाकडे प्रत्येक हिंदी माणसाने लक्ष दिले पाहिजे. एखाद्या माणसाला तुरुंगात जाण्यापूर्वी आर्थिक तोटा सोसावा लागला, तर तो त्याने स्वतः सोसावा, असे आम्ही अनेक वेळा लिहिले आहे. अशा बाबतीत समाज काही मदत करू शकणार नाही. पण जेव्हा शेकडो लोक उपासमारीच्या काठावर उभे असतील, तेव्हा आपण स्वस्थ

राहणे, हे क्रौर्याचे कृत्य होईल. शिवाय, " पेट करावे बेगार, पेट बाजा बजवाये "। [पोटासाठी माणूस कोणताही हलका धंदा करतो.] हिंदुस्थानात दुष्काळातील लोक आपली भूक भागविण्यासाठी आपली मुले विकतात. तेव्हा, अशा पापी पोटासाठी लोक नोंदणी-पत्रे घेण्यास गेले तर आश्चर्य वाटावयास नको. म्हणून पुष्कळ माणसे बेकारीत लोटली गेली तर, त्यांना मदत करणे अवश्य आहे. या प्रश्नाचा विचार करून प्रत्येक हिंदी माणसाने शक्य ते साहाय्य जोहान्सबर्गमधील असोसिएशनकडे पाठवावे. विचार करण्यासारखा दुसरा प्रश्न असा की, पैसा गोळा झाल्यानंतर त्याचे काय करावे ? लोकांकडून काही काम करून न घेता, त्यांना भिक्षा किंवा भत्ता सतत देत राहाणे, म्हणजे त्यांच्या पापाला प्रोत्साहन देऊन त्यांचे नुकसान करणे होय. म्हणून, अशा लोकांची सेवा काही ना काही सार्वजनिक कार्यासाठी उपयोगात आणावी, असे आमचे मत आहे. मोठे सभागृह बांधावे, असे श्री. गांधींनी सुचविले आहे. हे काम अवघड आहे, पण करण्यासारखे आहे. पुष्कळ हिंदी लोक मदतीला आले तर ते सिद्धीस नेणे फार सोपे होईल. त्यामुळे तीन गोष्टी साधतील. ट्रान्सवॉल-मध्ये राजकीय कार्यासाठी समाजाला एक मोठी इमारत मिळेल, बेकार हिंदी लोकांना चरितार्थाचे साधन लाभेल, आणि अशी प्रचंड इमारत बांधल्याने हिंदी लढ्याला मोठी प्रसिद्धी मिळेल. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनी इमारत बांधली, तर तिचा फायदा फक्त त्यांनाच मिळेल, असे मानून ट्रान्सवॉलबाहेरील हिंदी लोकांनी आपल्या मुठी आवळू नयेत. इमारत बांधा वा न बांधा, बेकारांना मदत ही दिलीच पाहिजे. प्रत्येक हिंदी माणसाने लक्ष द्यावे, असा हा प्रश्न आहे. जर सभागृह बांधले, तर त्याचा बहुतेक सारा खर्च ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनाच सोसावा लागेल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २८-१२-१९०७.

३४१. शूर स्त्रिया[1]

इंग्लंडातील स्त्रियांनी, कल्पनातीत कार्य केले आहे. ट्रान्सवॉलमधील दुष्ट कायद्याशी हिंदी समाजाने जेव्हा झगडा सुरू केला, तेव्हा इंग्लंडमधील मताधिकाराची

१. पाहा. " इंग्लंडमधील शूर स्त्रिया " लेख ४३.

चळवळ सुरू होऊन पुष्कळ महिने लोटले होते. ती चळवळ अद्याप निर्भयतेने चालू आहे. त्या स्त्रियांचे धैर्य व चिकाटी पाहता, ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांचा झगडा काहीच नाही. शिवाय, त्यांना पुष्कळ विरोध सहन करावा लागत आहे. स्त्रियांना मताधिकार मिळावा या बाजूने असणाऱ्या स्त्रियांपेक्षा, विरुद्ध बाजूला असलेल्या स्त्रियांची संख्या फार मोठी आहे. चळवळ्या स्त्रिया केवळ मूठभर असल्या तरी त्यांना पराभव माहीत नाही. त्यांच्यावर जितका अधिक जुलूम होतो, तितका अधिक प्रतिकार त्या करतात. त्यांच्यापैकी पुष्कळजणी तुरुंगात जाऊन आलेल्या आहेत. हलकट व भेदरट पुरुषांनी लाथा मारल्या किंवा दगड मारले तरी त्यांनी ते सहन केले आहेत. याहून आपला लढा अधिक उत्कट करण्याचा चंग त्यांनी बांधला आहे, अशी तार गेल्या आठवड्यात आली होती. या स्त्रियांनी किंवा त्यांच्या नवऱ्यांनी सरकारला कर भरावयाचे आहेत. ते त्यांनी भरले नाहीत तर त्यांच्याजवळ असेल नसेल त्याचा लिलाव केला जाईल. त्यांना तुरुंगातही टाकले जाईल. आपले हक्क मिळेपर्यंत कर वगैरे न भरण्याचे त्या स्त्रियांनी ठरविले आहे, मग त्यामुळे आपल्या मालमत्तेचा लिलाव झाला किंवा आपल्याला तुरुंगात जावे लागले तरी बेहत्तर.

हे धैर्य व ही चिकाटी, ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनी– वस्तुतः समस्त हिंदी समाजाने– अनुकरण करण्यासारखी आहे. बिगरपरवाना व्यापार केल्याबद्दल आपल्या मालाचा लिलाव झाला तर नाताळमधील हिंदी लोकांना ती मोठी आपत्ती वाटते. खूप लोकांच्या मालमत्तेचा लिलाव सरकार करू शकत नाही, हे या लोकांच्या लक्षात येत नाही. पण तसा लिलाव झाला तरी काय झाले? मताधिकारासारख्या गोष्टीसाठी स्त्रिया आपल्या मालमत्तेवर जर तुळशीपत्र ठेवू शकतात, तर आपण आपल्या चरितार्थासाठी लढत असताना तशाच संकटाला तोंड का देऊ नये? मताधिकाराची चळवळ दीर्घ काळ चालेल, आणि ती अखंड निश्चयाने चालेल. साध्यावर निष्ठा ठेवून त्या लढत आहेत. आपण या हक्कांचा उपभोग घेण्यास जिवंत न राहिलो तरी पुढील पिढ्यांना ते हक्क मिळतील– म्हणजे ते आपल्यालाच मिळाल्यासारखे आहेत, असा त्यांचा विश्वास आहे. याच वृत्तीने हिंदी लोकांनी लढले पाहिजे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २८–१२–१९०७.

३४२. डेलागोवा बेमधील हिंदी लोक

डेलागोवा बेमधील हिंदी लोकांच्या नोंदणीचे निर्बंध संपूर्णपणे आम्ही या अंकी अन्यत्र प्रसिद्ध केले आहेत. हे निर्बंध अत्यंत कडक आहेत. या बाबतीत हिंदी लोकांनी गव्हर्नरची भेट घेतली आहे. पण त्यांना समाधानकारक उत्तर मिळाले नाही असे दिसते. हे निर्बंध कायम झाले तर अत्यत श्रीमंत हिंदी माणसालाही डेला-गोवा बेला जाताना स्वतःच्या छायाचित्रासह परवान्याची जरूरी लागेल. ट्रान्सवॉलला जाणाऱ्या माणसाने ट्रान्सवॉलला परत जाण्याचा आपला हक्क सिद्ध केला तरच त्याला परवाना मिळेल. ही सारी कटकट प्रिटोरियातून निघाली आहे. डेलागोवा बेतून एखाद्या हिंदी माणसाला कायमचे बाहेर जावयाचे असले, तरी परवान्याविना त्याला तसे करता येणार नाही. आपण कधीही गुन्हा केला नाही आणि दिवाळे काढले नाही, असे त्याने सिद्ध केले, तरच त्याला बाहेर जाता येईल. हा एक नवीन प्रकारचाच जुलूम सुरू झाला आहे. हिंदुस्थानच्या पोर्तुगीज प्रजाजनांना हा कायदा लागू नाही.

डेलागोवा बेमधील हिंदी लोक अशा कायद्याला मान तुकविणार काय? जेव्हा मौलवीसाहेब अहम्मद मुखत्यार डेलागोवा बेहून परत आले, तेव्हा त्यांनी तेथील हिंदी लोकांच्या औदासीन्याचे व गाफीलपणाचे सुरेख वर्णन केले. डेलागोवा बेमधील हिंदी समाज अजूनही आपला आळस झाडून टाकून अवश्य ते कर्तव्य न करील, तर तो सर्व हिंदी लोकांच्या तुच्छतेस पात्र होईल.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २८–१२–१९०७.

३४३. दाउद महम्मद यांचे अभिनंदन

श्री. दाउद महम्मद यांची कन्या आशाबीबी हिचा विवाह, त्यांचे पुतणे श्री. गुलाम हुसेन यांच्याशी झाला. त्याचे संक्षिप्त वृत्त आम्ही गेल्या आठवड्यात दिले आहे.

श्री. दाउद महम्मद, त्यांच्या कन्या व त्यांचे जामात या सर्वांचे आम्ही अभिनंदन करतो. आणि त्या दांपत्याला दीर्घकाळ संसारसौख्य लाभो, अशी इच्छा करतो. पण त्यांचे अभिनंदन खरोखर करावयाचे, ते यासाठी की, श्री. दाउद महम्मद यांनी सारा समारंभ साधेपणाने केला आणि त्या प्रसंगी काही देणग्या दिल्या. सर्वसामान्य धार्मिक विधी केले तर त्यांमुळे लोकांना सुख लागेल, साधेपणा पाळला जाईल आणि वायफळ खर्च वाचेल. पवित्र कुराणातील आज्ञेनुसार श्री. दाउद महम्मद यांनी विवाहसमारंभ साजरा केला. त्यावेळी भपका किंवा अवडंबर मुळीच नव्हते. हे उदाहरण सर्वांनी घेण्यासारखे आहे. योग्य ते धार्मिक विधी करावेत, पण घातुक चालीरीती टाकून द्याव्यात याचा हा कित्ता आहे. विवाहाच्या प्रसंगी श्री. दाउद महमंद यांनी ज्या देणग्या जाहीर केल्या, त्यांचेही महत्त्व आम्ही तितकेच मानतो. त्यांचा कित्ता सर्वांनी गिरविला तर, विविध धार्मिक किंवा राजकीय संस्थांना सध्या पैशाच्या टंचाईला जे तोंड द्यावे लागते, ते द्यावे लागणार नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २८-१२-१९०७

३४४. काही इंग्रजी शब्द

स्वभाषेचा मान राखणे, ती चांगल्या तऱ्हेने बोलणे आणि तिच्यामध्ये शक्य तितके कमी विदेशी शब्द योजणे—हा देशभक्तीचाच एक भाग आहे. काही इंग्रजी शब्द आपण जसेच्या तसे वापरतो, कारण, आपल्याला त्यांचे यथार्थ गुजराती पर्याय माहीत नसतात. असे काही शब्द आम्ही आमच्या वाचकांपुढे ठेवीत आहोत. त्यांना योग्य असे गुजराती पर्याय सुचविणाऱ्या माणसाचे नाव आम्ही या पत्रात प्रसिद्ध करू. शिवाय, या नव्या कायद्यासंबंधी आम्ही जी पुस्तिका प्रसिद्ध केली आहे, तिच्या दहा प्रती आम्ही त्यांना देऊ. त्या त्याने आपल्या मित्रांत वाटाव्या. ही पुस्तिका लालूच म्हणून दिली जात नाही; तर त्या माणसाचा सन्मान करावा आणि या दुष्ट कायद्याची माहिती पसरावी म्हणून. आमचे वाचक, बक्षिसासाठी नव्हे तर देशभक्ती-साठी, योग्य ते पर्याय सुचविण्याची तसदी घेतील, अशी आम्हांस आशा आहे. प्रस्तुत पुढील शब्द विचारार्थ आहेत.

पॅसिव्ह रेझिस्टन्स, पॅसिव्ह रेझिस्टर, कार्टून, सिव्हिल डिस्ओबिडिअन्स.

याशिवाय आणखीही काही शब्द आहेत, पण त्यांचा विचार आम्ही पुनः केव्हा तरी करू. या शब्दांचे भाषांतर आम्हांला नको आहे, तर त्यांचा भावार्थ प्रकट करणारे शब्द हवे आहेत, हे लक्षात घ्यावे. संस्कृत किंवा उर्दू यांपासून निघालेल्या शब्दांना हरकत नाही.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २८–१२–१९०७

३४५. हिंदुस्थानची अवस्था

जोहान्सबर्गचे श्री. दादाभाई यांच्या ज्येष्ठ पुत्राच्या मृत्यूच्या बातमीने आमच्या मनात पुष्कळ विचार येत आहेत. असे मृत्यु हिंदुस्थानात दरसाल शेकडो––हजारो होत असतात. प्लेगमुळे गावेच्या गावे उद्ध्वस्त झालेली आहेत—कुटुंबे नष्ट झाली आहेत. कुटुंबातील आई–वडील, मुले इ. सारेजण नाश पावल्याच्या बातम्या वर्तमानपत्रात आपण वाचतो.

दुसरीकडेही प्लेग येतो; पण हिंदुस्थानातल्याप्रमाणे मनुष्यहानी होत नाही. असे का ? हा प्रश्न विचारल्याशिवाय कोणाही हिंदुस्थानच्या भक्ताला राहवणार नाही, अशी मला खात्री वाटते. या प्रश्नाच्या उत्तरात हिंदुस्थानच्या कल्याणाचे सारे प्रश्न अंतर्भूत आहेत, असे आम्हांस वाटते. प्रश्न विचारणे सोपे आहे, पण त्याचे उत्तर देणे कठीण आहे, आणि ते उत्तर सापडले तरी, ते बरोबर असल्याची खात्री इतरांना पटविणे, हे त्याहून कठीण आहे.

तथापि, या प्रश्नाचे थोडे-फार उत्तर देण्याचा प्रयत्न करणे, योग्य होईल, असे आम्हांस वाटते. पूर्ण विचारांती, आमचा असा निर्णय झाला आहे की, हिंदुस्थानात प्लेग, उपासमार इ. वाढत चालले आहेत, याचे कारण, लोकांचे पाप, हे होय. सरकारचा दुष्टपणा हे कारण आहे, असे जर कोणी म्हणेल, तर त्याच्याशी आम्ही सहमत आहो. राज्यकर्ते दुष्ट असले म्हणजे प्रजेला दुःख होते, हा नित्याचा अनुभव आहे. पण हेही लक्षात ठेवले पाहिजे की, पापी लोकांनाच पापी राज्यकर्ते मिळतात. शिवाय दुसऱ्याला दोष देण्यापेक्षा स्वतःचे दोष तपासणे, हेच नेहमी फायदेशीर असते.

हिंदु-मुसलमानातील बेकी व वैर ही पापे आहेत. पण, मुख्य पापे ती नव्हेत. बेकी नाहीशी होऊन या दोन जमाती शांततेने व गुण्यागोविंदाने नांदू लागतील, तर परके राज्य निघून जाईल किंवा राज्यकर्त्यांचे मार्ग बदलतील. पण तसे झाल्यावर, प्लेग व दुष्काळ आपोआप नाहीसे होतील, असे मानण्यास काही जागा नाही.

मुख्य पाप भारतीय प्रजेचे असत्य हे आहे. प्लेगमध्ये आपण सरकारला फसवितो व स्वतःलाही फसवितो. आपण स्वच्छतेचा आव आणतो, पण खरोखर स्वच्छता करीत नाही. घर स्वच्छ धुवावयाचे असेल, तर तसे केल्याचा आपण फक्त देखावा करतो. आपण निःशंकपणे स्वच्छता करण्याचे टाळू शकत असलो तर तसे करतो आणि त्यासाठी शक्य तर पोलिसाला लाचही देतो. अशी सवय आपल्याला लहानपणापासून जडलेली आहे. शाळेत काही शिकवितात, मुले ते तत्काळ ग्रहण करतात; पण घरी येताच नेमके त्याच्या विरुद्ध वागतात, असे करण्याला आई-बापांची संमती मिळते. स्वच्छता कशी ठेवावी, याचे नियम सांगितले जातात; पण ते पाळण्यासारखे आहेत की नाहीत हा प्रश्न वेगळा. त्या बाबतीत मतभेद असतील. आम्हांला हे दाखवावयाचे आहे की, आपले आचरण असत्यावर आधारलेले आहे. पुष्कळ बाबतीत आपण फक्त बाह्य देखावा करतो. त्यामुळे मज्जातंतू कमजोर होतात आणि आपले रक्त पापामुळे बिघडते. मग कोणत्याही जंतूला ते बळी पडते. काही जातींना किंवा जमातींना प्लेग होत नाही, असे दिसून आले आहे. याचे कारण हे की, स्वच्छतेच्या किंवा दुसऱ्या बाबतीत, ते ढोंग करीत नाहीत. आपण आहो त्यापेक्षा अधिक चांगले असल्याची बतावणी ते करीत नाहीत. तेवढ्यापुरते ते लोक ढोंगी माणसांपेक्षा श्रेष्ठ आहेत. सारी माणसे अशी वागतात, असे आम्हांस म्हणावयाचे नाही. पण सर्वसाधारणपणे घडते, ते असे.

याच पापातून दुसरी एक भयंकर सवय निर्माण झाली आहे आणि ती सर्व वर्गांत पसरली आहे. ती म्हणजे कामकुता—व्यभिचार. या विषयाचा उल्लेख संक्षेपानेच करता येईल. सामान्यतः या प्रश्नाची चर्चा करण्यास लोक बुजतात; आम्हीही थोडे साशंक आहोत. तथापि, या बाबतीत वाचकांपुढे आमची मते मांडणे, हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. व्यभिचार म्हणजे दुसऱ्याच्या बायकोशी लैंगिक संबंध असणे एवढेच नव्हे. स्व-स्त्री-संगातही व्यभिचार होऊ शकतो, अशी सर्व धर्मांची शिकवण आहे. केवळ प्रजोत्पादनासाठी केलेला स्त्री-संगच योग्य ठरतो. सामान्यतः असे दिसून येते की, कामवासनेनेच स्त्रीसंग केला जातो— आणि प्रजोत्पादन हा त्याचा केवळ परिणाम असतो. आमच्या विचारे, सांप्रत हिंदुस्थान अशा अवस्थेत आहे की, तेथे प्रजोत्पादन कमीत कमी व्हावयास पाहिजे. म्हणून, जो जो स्त्रीसंग तेथे सध्या होत आहे, तो बहुधा व्यभिचारासारखाच आहे.

हे मत बरोबर असेल तर विवाह न करणे, हे प्रत्येक विचारी भारतीयाचे कर्तव्य ठरेल. विवाहाच्या बाबतीत त्याचे काही चालत नसेल, तर त्याने आपल्या पत्नीचा

संग टाळला पाहिजे. याचे आचरण करणे फार कठीण आहे. पण त्याशिवाय दुसरा मार्ग नाही.

अन्यथा, पाश्चात्त्य लोकांचे अनुकरण आपल्याला करावे लागेल. संतति–नियमनासाठी ते राक्षसी उपाय योजतात. ते युद्धे सुरू करतात आणि त्यांत असंख्य लोकांना मरू देतात. ईश्वरावरील श्रद्धा टाकून देऊन ते केवळ भौतिक सुखे व चैनबाजी यात स्वतःला गुरफटून टाकतात. त्यांचे अनुकरण करून हिंदी लोकही कालांतराने प्लेग इत्यादीपासून मुक्त होतील. पण पाश्चात्त्यांच्या दुष्ट प्रवृत्तींना हिंदुस्थानात स्थान लाभेल असे आम्हांस वाटत नाही.

याचा अर्थ असा की, हिंदुस्थान ईश्वरावर दृष्टी ठेवून पापमार्गापासून दूर राहील व सुखी होईल किंवा प्लेग वगैरे रोगांमध्ये कुजत, गुलामगिरीत सतत पिचत, मृत्यूचे वृथा भय बाळगीत भेकडपणाने, जिवंतपणीच मृत्यू त्याला भोगावा लागेल.

काही लोकांना या कल्पना विचित्र किंवा हास्यास्पद अथवा अज्ञानजन्य वाटतील, पण प्रत्येक विचारी हिंदी माणसाने त्यांचा संपूर्ण विचार करावा, असे म्हणण्याचे धाडस आम्ही करतो. ते विचार लेखकाने घेतलेल्या जीवनाच्या खोल अनुभवाचे फळ होत. ते आचरणात आणल्याने काही अपाय होणार नाही, हे खचित. सत्य व ब्रह्मचर्य पाळल्याने कोणाचीही काही हानी होणार नाही. दोनचार लोकांनीच त्यांचे पालन केले तर सर्व जनतेचा फायदा काय होईल, असा प्रश्न विचारण्यात अर्थ नाही. असा प्रश्न कोणी विचारला तर त्याला अडाणी म्हटले पाहिजे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २८–१२–१९०७

३४६. अरबांचे ज्ञान

‘प्राच्य विद्या’[१] या मालेतील, काही पुस्तकांवर आम्ही आमचे विचार पूर्वीच्या अंकात व्यक्त केले आहेत. त्याच लेखकानी वर उल्लेखिलेल्या विषयावर एक ग्रंथ प्रसिद्ध केला आहे आणि त्याची एक प्रत आम्हांला अभिप्रायार्थ पाठवली आहे.

१. पाहा. ‘प्राच्य विद्या’ लेख २७ व ‘प्राच्य विद्या ग्रंथमाला’ लेख ६८.

तो ग्रंथ इंग्रजीत आहे हे सांगण्याची गरज नाही. त्याची किंमत फक्त १ शिलिंग आहे. त्यात पवित्र कुराणातील उतारे आहेत आणि भिन्न भिन्न विषयांवरील अरबी विद्वानांचे विचार आहेत. उदाहरणार्थ, कुलीनतेविषयी त्यात असे म्हटले आहे की, "जो मनुष्य स्वतःचा मान संभाळू शकत नाही, त्याला त्याच्या कुलीनतेचा काही उपयोग होत नाही...नीच कुळात, जन्म घेतल्याचा दोष, विद्या व सदाचार यांमुळे दूर होतो."[१] प्रतिष्ठेसाठी चाललेल्या आपल्या लढ्याला लागू होतील, अशी विचार-रत्ने या पुस्तकात भरलेली आहेत. कवी म्हणतो, "जो स्वतःचा मान राखतो, त्याच्यामध्ये लोकांना कोणताच दोष दिसत नाही." आणखी तो म्हणतो, "इतरांच्या दृष्टीला लज्जास्पद वाटणारी कोणतीही गोष्ट तुम्ही आपल्या चित्तात आणू नका." शिवाय "जो स्वतःला मान देत नाही, तो दुसऱ्यांना मान देत नाही आणि अन्यत्र असे म्हटले आहे की, स्वाभिमान गमावणाऱ्या आणि निर्लज्ज जीवन जगणाऱ्या माणसाला काडीची किंमत नाही आणि तिळमात्र सुख त्याला मिळत नाही." शील या विषयासंबंधी असे म्हटले आहे की, "नीतिमान् माणूस हाच खरोखर धार्मिक माणूस होय." ज्ञानाच्या बाबतीत, "विद्याहीन माणूस म्हणजे शस्त्रहीन वीर." "राजा मनुष्यावर राज्य करतो आणि विद्वान राजावर राज्य करतात." "चुकीच्या मार्गांनी जो जात नाही, तोच शहाणा—त्या मार्गावर पाऊल टाकून मग त्यातून बाहेर जाऊ पाहणारा शहाणा नव्हे." सत्याविषयी असे लिहिले आहे की, "ज्या माणसाचे हृदय स्वच्छ नाही, त्याचा धर्म शुद्ध असणार नाही आणि ज्याची वाणी शुद्ध नाही, त्याचे हृदयही स्वच्छ असणार नाही...जो माणूस नमाज पढतो, रोजा करतो, पण खोटे बोलतो, शब्द पाळीत नाही आणि आपले कर्तव्य पार पाडीत नाही, तो ढोंगी समजावा." अशी सोन्यासारखी वचने त्या लहानशा पुस्तकात विखुरलेली आहेत. इंग्रजी वाचता येणाऱ्या प्रत्येक माणसाने हे पुस्तक विकत घ्यावे, असे आम्ही सुचवितो.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २८-१२-१९०७

१. येथे घेतलेले उतारे, 'इंडियन ओपिनियन'मध्ये प्रसिद्ध झालेल्या इंग्रजी अभिप्रायाशी ताडून पाहिले आहेत.

३४७. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

सार्वजनिक सभा

बुधवार ता. १ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता 'सूरती' मशिदीसमोर हिंदी लोकांची सार्वजनिक सभा भरेल. जानेवारीपासून परवाने मिळण्याविषयीच्या लढ्याचा विचार त्या सभेत होईल. ठिकठिकाणचे हिंदी लोक सभेस हजर राहतील, अशी आशा आहे.

परवान्याविषयी काही विचार

गेल्या आठवड्यात या प्रश्नाच्या काही बाजूंचा विचार आम्ही केला. पण त्याहून अधिक विचार करणे अवश्य आहे. या प्रश्नावरच सारा लढा केंद्रित होईल असे मानण्यास जागा आहे. बिगरपरवाना व्यापार करणे अवश्य होऊन बसेल. कोणत्याही व्यापारासंबंधी परवान्यासाठी अर्ज करताना नोंदणीपत्र दाखल करण्याची जरूरी भासणार नाही, असे मला वाटते. कायद्यात योजलेले शब्द, 'व्यापाराचे परवाने' असे आहेत. त्याचा अर्थ उद्योगधंद्यांचे परवाने असा होतो. अशा परवान्यात धोबी किंवा सायकलवाला यांच्या परवान्याचा समावेश होत नाही. म्हणजे नोंदणी-पत्र दाखल न करताच धोब्यांना आपले परवाने मिळतील. व्यापारी व फेरीवाले यांनाच त्यांची फार गरज लागेल. हिंदी लोकांचे हे दोन वर्ग मर्दाप्रमाणे वागले तर, हिंदी समाज लौकरच स्वतंत्र होईल. शिवाय, कायदा पाहता, मला असे दिसते की, जानेवारी महिन्यात हिंदी लोकांना अटक होणे कठीण आहे. एक महिना पुरा झाल्याशिवाय, परवाना न घेतल्याबद्दल कोणालाही अटक होणार नाही. म्हणून, धरपकडी फेब्रुवारी महिन्यात होतील, असे दिसते. एखादा व्यापारी भित्रा असला आणि तो विवाहित असला, तर तो आपल्या बायकोच्या नावाने परवाना घेऊ शकेल. असे केल्याने तो तुरुंगवास टाळू शकेल. पण आपला लढा शूर बनण्यासाठी आणि शौर्य दाखविण्यासाठी आहे, म्हणून या मार्गाने सुटका करून घेण्याचा सल्ला मी देऊ शकत नाही. पूर्वीच्या परंपरेप्रमाणे, परवान्यासाठी प्रत्येक हिंदी माणसाने अर्ज करावा, असे माझे सांगणे आहे. अर्ज करण्यासाठी, वकिलाचा खर्च करण्याची जरूरी नाही. जे काही करावयाचे ते इतकेच की, अर्ज देऊन व फी भरून स्वस्थ बसणे.

मौलवीसाहेब

मौलवीसाहेब अहम्मद मुखत्यार यांच्या तात्पुरता परवान्याची मुदत ३१ डिसेंबर रोजी संपते. ती मुदत वाढविण्यासाठी त्यांनी अर्ज केला आहे. ती मुदतवाढ दिली जाणार नाही आणि मौलवीसाहेबांना कारागृहात ठेवले जाईल अशी मला फार आशा आहे. पण माझी आशा व्यर्थ आहे, असे वाटते. सरकारला तितके धैर्य नाही. परिस्थिती अशी बिकट आहे की, सरकार मुदतवाढ देईलही; नाही तर, त्यांना सरकार स्वतंत्र राहू देईल.

पंडितजींना उत्तर

पंडितजींसंबंधी लिहिलेल्या पत्राला जनरल स्मट्स यांनी उत्तर दिले आहे. पंडितजींना परवाना दिला जाणार नाही, असे त्यांनी लिहिले आहे. अधिक काही त्यांनी लिहिले नाही. यावरून मी असा निष्कर्ष काढतो की, त्यांना परवाना मिळणार नाही आणि अटकही होणार नाही.

स्टँडर्टनचे हिंदी लोक

स्टँडर्टन येथील हिंदी रेल्वे कामगारांनी नोंदणीसाठी अर्ज केले नाहीत म्हणून त्यांना बडतर्फ करण्यात आले आहे. ते सुमारे ४० जण आहेत. त्यांना नोटीस दिलेली नव्हती. ज्या दिवशी त्यांना बडतर्फ केले त्या दिवशीचा पगारही त्यांना दिलेला नाही, असे श्री. पटेल लिहितात. एका महिन्याचे जे धान्य त्यांना दिले होते, त्यातील शिल्लक राहिलेले धान्य परत घेण्यात आले. आपल्या बायका-मुलांसाठी त्या कामगारांनी केलेल्या विनवण्यांकडे पाठ फिरवून अधिकाऱ्यांनी त्यांची हकालपट्टी करण्यासाठी त्याच दिवशी त्यांच्या खोल्यांची छपरे उचकटली. हे प्रकरण जनरल मॅनेजरकडे गेलेले आहे. त्यांनी महिनाअखेरपर्यंतचा पगार देण्याचा हुकूम दिला आहे. नोटिशीऐवजी एक महिन्याचा पगार मिळावा, अशी मागणी केली आहे. या प्रकरणामुळे सारे हिंदी लोक संतप्त होतील. स्वतंत्र व बलवान अशा हिंदी लोकांचे भय सरकाराला वाटते आणि म्हणून ते दुबळ्या लोकांना भयभीत करते. जुलमाची ही हद्द झाली. व्यापारी व इतर हिंदी पुढारी यांच्यावर विसंबून, त्या गरीब बिचाऱ्या मजुरांनी आपल्या नोकऱ्या गमावल्या. आता जर ते व्यापारी व ते पुढारी शेवटच्या क्षणी तुरुंगाच्या किंवा द्रव्यहानीच्या भयाने, गुलामगिरीला कवटाळतील, तर गरीब बिचाऱ्या हिंदी लोकांचे आणि त्यांच्या कुटुंबांचे शिव्याशाप त्यांना घ्यावे लागतील.

हायडेलबर्ग येथील हिंदी मजूर

हायडेलबर्ग येथील हिंदी मजुरांना दमदाटी देऊन मॅजिस्ट्रेटकडे नेण्यात आले. मॅजिस्ट्रेटपुढे त्यांनी नोंदणी-पत्रे घेण्याची तयारी दाखविली; अशी बातमी कानी पडताच

पंडितजी व श्री. नायडू तिकडे धावले. त्यांनी त्या लोकांच्या गाठी-भेटी घेतल्या. त्यांचे पुढारी अब्दुल नावाचे एक पठाण आहेत. त्यांनी त्यांना मोठ्या विश्वासाने असे आश्वासन दिले की, आमच्यापैकी एकहीजण नोंदणी करून घेणार नाही. पंडितजी व श्री. नायडू हे मग फॉरच्यू येथे गेले. तेथे श्री. मोगलिया यांच्या घरी रात्री राहून दुसरे दिवशी सकाळी त्यांनी आपले काम सुरू केले. दिवसभर पायपीट करून त्यांनी कायद्याचे स्वरूप मजुरांना समजावून सांगितले. काही ठिकाणी त्यांना नदीनाले उतरून जावे लागले आणि इतरही हाल सोसावे लागले. त्या मजुरांनाही बडतर्फ केले गेले जाईल. आतापर्यंत केले गेले असेलही. अधिक माहिती पुढील आठवड्यात बहुधा मिळेल. अशा प्रकारे पंडितजींना बंधमुक्त झाल्यापासून एका क्षणाचीही विश्रांती नाही.

‘संडे टाईम्स’मधील व्यंगचित्र

आपल्या लढ्याला ‘संडे टाइम्स’ खूप प्रसिद्धी देत आहे. त्यामध्ये श्री. ‘गांधींचे स्वप्न’ या नावाने एक व्यंगचित्र आले आहे. हा कायदा व श्री. स्मट्स यांची त्यात थोडी चेष्टा केली आहे. त्यातील एक व्यक्ती मि. स्मट्स हे आहेत. दोन्ही कोपर टेबलावर ठेवून आपले डोके हातात धरून ते असा विचार करीत आहेत की,

“रजिस्ट्रेशन” भारी कजा,
“रेजिस्टन्स” है उससे बड़ी;
सी. बी. बुड्ढा तंग किये है,
गांधीने पागल बना दिया।

श्री. स्मट्स स्वतःशी असे गुणगुणत आहेत. सी. बी. म्हणजे श्री. कॅम्पबेल—बॅनर्मन [इंग्लंडचे पंतप्रधान]. दुसऱ्या व्यंग्यचित्रात श्री. गांधीजी चिलखत घातलेले दाखविले आहेत. चिलखतावर सर्वत्र अणकुचीदार खिळे आहेत. चित्राच्या वर अशी सूचना आहे “मला स्पर्श करू नका” आणि खाली सही आहे--आपला नम्र गांधी. यात असे सूचित केले आहे की, माझ्या शरीराच्या कोणत्याही भागाला स्पर्श केला तर अणकुचीदार खिळे टोचतील. मग “आपला नम्र” असे गांधींनी स्वतःला का म्हटले? त्यातील अर्थ असा की, सविनय प्रतिकाराच्या खिळ्यांनी हा कायदा छिन्नभिन्न झाला, म्हणजे त्याचा सारा जोर नाहीसा होईल.

जर्मिस्टनमधील हिंदी लोकांवर आक्रमण

जर्मिस्टनच्या नगरपालिकेची सभा भरली होती व मार्केट चौकात हिंदी लोकांना काही हक्क देऊ नयेत, या ठरावावर चर्चा झाली. त्याला विरोध श्री. रेड्डी यांनी केला. इतरांनी, विशेषतः श्री. व्हाईट यांनी, ठरावाला अनुकूल भाषणे केली.

फितुरांची यादी

गेल्या आठवड्यात सांगितल्याप्रमाणे मी पुढे यादी देत आहे. पूर्वी दिलेली नावे या यादीत पुनः आलेली आहेत. ता. १९ ऑक्टोबरपासून नोंदणी केलेल्या लोकांची ही नावे आहेत. त्यांची पत्रेही माझ्याजवळ आहेत. त्यांची (क्रमवार) संख्या माझ्याजवळ नाही याचा खेद वाटतो. पण त्याची गरज नाही. कारण यादी अधिकृत आहे. मद्रास व कलकत्ता येथील लोकांची नावे या यादीत नाहीत. पण त्यांची संख्या फार थोडी आहे.

प्रिटोरियाचे फितूर [८४ नांवाची यादी], जोहान्सबर्गचे [१०], पीटसबर्गचे [३५], लुई टिचार्टचे [८], हार्टसवॉटरचा [१], क्रिश्चियानाचे [२], पॉचेपफ्ट्रूमचे [११], स्टँडर्टनचे [५], मिडेलबर्गचे [८], एर्मीलोचा [१], लीडेनबर्गचे [२] हाइडेलबर्गचे [८].

बोटांच्या व आंगठ्यांच्या ठश्यांतील फरक

यासंबंधी चर्चा करण्याचे अभिवचन मी पूर्वी दिले होते.[१] त्याप्रमाणे आता मी करीत आहे. हिंदुस्थानात आंगठ्यांचे ठसे दिवाणी कामात पुष्कळ वेळा घेतले जातात. इंग्लंडमध्ये तर त्याचे वेडच आहे. मित्र आंगठ्यांचे ठसे एकमेकांना पाठवितात. पेन्शनर वगैरे लोकांना पैसे मिळाल्यावर, आंगठ्याचे ठसे द्यावे लागतात. प्रॉमिसरी नोटेवर आंगठ्यांचे ठसे घेण्याची पद्धत नाताळमध्ये आहे. अशा प्रकारे, आंगठ्यांचे ठसे घेतले जातात. कारण त्यांमुळे माणसांची ओळख पटणे सोपे जाते. एकाऐवजी दोन आंगठ्यांचे ठसे घेतले जातात. हेतु असा की, एका आंगठ्याचा ठसा स्पष्ट नसला किंवा तो खराब झालेला असला, किवा त्यात दुसरा काही दोष आलेला असला तर दुसऱ्या ठशाने काम भागावे. याशिवाय ओळखीसाठी बोटांचे ठसे द्यावे लागत नाहीत. बोटांचे ठसे गुन्हेगाराकडून घेतले जातात. कारण गुन्हेगाराला आपली ओळख टाळावयाची असते. त्याला नेहमी अज्ञात राहावयाचे असते. ज्या माणसाने आपल्या सर्व बोटांचे व आंगठ्यांचे ठसे दिले असतील, त्याने आपले खरे नाव सांगितले नसले तरी त्या ठशांवरून त्याला ओळखून काढता येते. संशोधकांनी एक कोष्टक तयार केले आहे. त्यामुळे बोटांच्या व आंगठ्यांच्या ठशावरून माणसाचे वर्गीकरण करता येते. त्यामुळे ठशावरून कोष्टक तयार करणे शक्य आहे. एखाद्या माणसाने आपले नाव 'रामजी' असे सांगितले असेल पण ते सरकारी दफ्तरात सापडत नसेल, आणि त्याच्या बोटांचे व आंगठ्यांचे ठसे उपलब्ध असतील, तर त्यावरून त्याचा पत्ता लागू शकेल.

१. पाहा. 'जोहान्सबर्गचे वातर्मापत्र' लेख ३२७.

या रीतीने कैक गुन्ह्यांचा शोध हिंदुस्थानात व इतरत्र लागलेला आहे. सारांश, साऱ्या बोटांचे व आंगठ्यांचे ठसे गुन्हेगाराकडून घेतले जातात.

उलट, हिंदी लोकांना आपली ओळख पटवावयाची आहे. त्यांनी ती ओळख नीट पटविली नाही तर ते या देशात राहू शकत नाहीत. म्हणून आपले नाव वगैरे तपशील अचूकपणे देण्यात त्यांचे कल्याण आहे. त्याचे नाव सरकारदप्तरी नसेल, तर तो येथे राहू शकत नाही. म्हणून त्यांच्यापासून बोटांचे ठसे मागणे व्यर्थ आहे. या बिनतोड युक्तिवादाने सरकारला हे पटविता येईल की, त्यामुळे दहा बोटांचे ठसे घेणे कुचकामाचे आहे. त्यामुळे अनावश्यक खर्च मात्र होईल. या युक्तिवादाला शास्त्रीय आधार आहे. म्हणून नवा कायदा रद्द झाला तरी, दहा बोटांच्या ठशांविरुद्ध हिंदी समाज सरकारशी भांडू शकेल, त्याबद्दल त्याला कोणी ‘ बालिश ’ म्हणणार नाही. दोन आंगठ्यांच्या ठशाविरुद्ध मात्र असा काही युक्तिवाद नाही. प्रत्येक लढ्याला भरभक्कम कारण हवे असते. नाही तर लोकमत विरुद्ध जाते.

एक जपानी सज्जन

श्री. नाकामूरा नावाचा एक जपानी माणूस येथे आला आहे. तो विज्ञानाचा विद्यार्थी आहे. त्याच्याजवळ लॉर्ड एल्जिन यांचे पत्र आहे. तरीही परवाना अधिकाऱ्याने त्याला सतावून सोडले. जगातील खाणींचा अभ्यास तो करीत आहे. त्याने श्री. पोलक यांची मुलाखत घेतली. ती इंग्रजी विभागात दिलेली आहे.[1] या दुष्ट कायद्यासंबंधी जपानी सरकारला मी साऱ्या गोष्टी कळवीन, असे अभिवचन त्याने दिले आहे.

दुरुस्ती

प्रिटोरिया येथील मागील सार्वजनिक सभेला श्री. इसे अली व श्री. बगस अमीर्जी हे हजर होते; पण त्यांची नावे यादीत आलेली नाहीत असे एका पत्रलेखकाने मला कळविले आहे. ती नावे मी आता देत आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन ओपिनियन, २८-१२-१९०७

१. ती येथे दिलेली नाही.

३४८. जोहान्सबर्ग येथील खटला[१]

[जोहान्सबर्ग,
ता. २८ डिसेंबर, १९०७]

गेल्या शनिवारी सकाळी ठीक १० वाजता, जोहान्सबर्गमधील सारी माणसे बी. फौजदारी कोर्टात जमली होती. तेथे श्री. एच्. एच्. जॉर्डन हे मॅजिस्ट्रेट आहेत. सुपरिंटेंडेंट व्हर्नान यांनी त्यांना विचारले, तुमच्याजवळ १९०७ च्या २ ऱ्या कायद्याप्रमाणे दिलेली नोंदणी-पत्रे आहेत काय ? 'काही नाही' असे उत्तर आल्यावर सर्वांना ताबडतोब पकडण्यात आले, आणि १९०७ च्या या कायद्याच्या ८ व्या कलमाच्या २ ऱ्या पोटकलमाप्रमाणे त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला. तो म्हणजे, त्या कायद्याप्रमाणे दिलेली नोंदणी-पत्रे जवळ नसताना ते ट्रान्सवॉलमध्ये राहिले. कोर्ट संपूर्ण भरलेले होते आणि एकदा तर कठडे मोडून पडतील असे वाटले.

श्री. जॉर्ज गॉडफ्रे, डॉ. एम्. ए. परेरा, 'इंडियन ओपिनियन'चे संपादक, आणि आरोपींचे पुष्कळ मित्र व हितचिंतक तेथे हजर होते. श्री. पी. जे. शूरमन हे सरकारी वकील होते.

सर्वांत प्रथम खटला चालला तो इन्नर टेंपलचे बॅरिस्टर व ट्रान्सवॉलच्या ब्रिटिश इंडियन असोसिएशनचे सन्मान्य कार्यवाह, वकील श्री. मो. क. गांधी, यांचा.

टी. टी. पी. विभागाचे सुपरिंटेंडेंट व्हर्नान यांनी अटकेसंबंधी पुरावा दिला. ते म्हणाले : आरोपी हा १६ वर्षांवरील आशियावासी आहे व तो ट्रान्सवॉलमध्ये रहात आहे. आज सकाळी १० वाजता मी श्री. गांधींना आपले नोंदणी-पत्र दाखविण्यास सांगितले. पण त्यांनी ते दाखविले नाही. ते म्हणाले 'ते माझ्याजवळ नाही.'

१. गांधीजींचा हा पहिलाच खटला. त्याचा हा वृत्तांत "श्री. गांधी यांना ट्रान्सवॉल सोडण्याचा हुकूम" या नावाने प्रसिद्ध झाला.

श्री. गांधींनी काही प्रश्न विचारले नाहीत. पण पिंजऱ्यात उभे राहून त्यांनी एक जबाब देण्याची तयारी केली. ते म्हणाले, " मी जे आता सांगणार आहे, तो काही पुरावा नव्हे. पण मी या कोर्टाचा एक घटक असल्याने कोर्टाने मला थोडासा खुलासा करण्याची मुभा द्यावी. मी कायद्याला मान्यता का दिली नाही, यासंबंधी काही सांगू इच्छितो."

श्री. जॉर्डन : त्याची येथे काही गरज आहे असे मला वाटत नाही. कायदा आहे, आणि तुम्ही त्याचा भंग केला आहे. कोणी राजकीय भाषणे येथे करावीत अशी माझी इच्छा नाही.

श्री. गांधी : राजकीय भाषणे करण्याची मला इच्छा नाही.

श्री. जॉर्डन : प्रश्न हा आहे की, तुम्ही नोंदणी केली की नाही ? नोंदणी केली नसेल, तर सारा ग्रंथ आटोपला. आता मी जो निकाल देणार आहे, त्या बाबतीत दया मागण्यासाठी तुम्हांला काही सांगावयाचे असेल, तर ती गोष्ट निराळी. ट्रान्सवॉलच्या कायदेमंडळाने मंजूर केलेला व साम्राज्य सरकारने संमत केलेला कायदा अस्तित्वात आहे. तो जसा आहे तसा अंमलात आणणे, एवढेच काम मला करावयाचे आहे, आणि तेवढेच मी करू शकतो.

श्री. गांधी म्हणाले, दया-याचनेसाठी मी पुरावा देऊ इच्छीत नाही. मी काही पुरावा देणे मुळीच कायदेशीर नाही, हे मला माहीत आहे.

श्री. जॉर्डन : मला फक्त कायदेशीर पुरावा पाहायचा आहे. मला वाटते, तुम्हांला एवढेच म्हणावयाचे आहे की, हा कायदा मला मान्य नाही आणि त्याला मी विवेकबुद्धीने विरोध करीत आहे.

श्री. गांधी : अगदी बरोबर.

श्री. जॉर्डन : आपण विवेकबुद्धीने विरोध करीत आहो, असे तुम्ही म्हणत असाल तर तेवढा पुरावा मी घेईन.

श्री. गांधी आपण ट्रान्सवॉलला केव्हा आलो आणि ब्रिटिश इंडियन असोसिएशनचे कार्यवाह आहो, हे निवेदन करू लागले, तेव्हा श्री. जॉर्डन म्हणाले, " त्याचा या खटल्याशी संबंध कसा पोचतो, हे मला कळत नाही."

श्री. गांधी : ते मी पूर्वीच सांगितले आहे. मी फक्त पाच मिनिटे देण्याविषयी कोर्टाची प्रार्थना केली आहे.

श्री. जॉर्डन : अशी काही सवलत कोर्टाला देता येईल, असा हा खटला नाही, असे मला वाटते. तुम्ही कायद्याचा भंग केला आहे.

श्री. गांधी : ठीक तर, महाराज, मग मला काहीच सांगायचे नाही.

श्री. शूरमन यांनी सांगितले की, आरोपीप्रभृती इतर आशियावासियांना नोंदणीसाठी भरपूर वेळ दिला होता. पण नोंदणी करण्याचा इरादाच आरोपीचा नव्हता, म्हणून या देशातून बाहेर जाण्यासाठी, आणखी काही वेळ कोर्टाने द्यावा असे मला वाटत नाही. ४८ तासांत देशाबाहेर जाण्याचा हुकूम आरोपीला व्हावा अशी माझी विनंती आहे.

...श्री. जॉर्डन यांनी निकाल देताना असे म्हटले की, "सरकारने पराकाष्ठेची उदारता दाखविली, पण या लोकांपैकी कोणीही नोंदणी केली नाही असे दिसते. या वसाहतीचा कायदा त्यांनी धाब्यावर बसविला. म्हणून सरकारने त्यांच्यावर खटला भरला. आशियावासी नोंदणी कायदा, शांततासंरक्षक वटहुकूम व प्रवेशविषयक कायदा यांच्या आधारे, आरोपीला विशिष्ट दिवसांत या वसाहतीबाहेर जाण्याचा हुकूम देण्याचा अधिकार मला आहे. या बाबतीत कठोर होण्याची माझी इच्छा नाही. आणि श्री. शूरमन यांनी केलेली ४८ तासांची सूचना मान्य करण्याचा माझा विचार नाही. मी समंजसपणाने हुकूम दिले पाहिजेत. आपला बाडबिछाना आवरण्यास श्री. गांधींना व इतरांना मी वेळ दिला पाहिजे, त्याचबरोबर कायद्याप्रमाणे काही शिक्षा दिलेल्या असतात, हे मी श्री. गांधींना सांगावयास नको. हुकूम मानला नाही तर, कमीत कमी शिक्षा साधी किंवा सश्रम अशी एक महिन्याची कैद ही आहे. ती शिक्षा संपल्यानंतर सात दिवस गुन्हेगार वसाहतीत आढळल्यास त्याला कमीत कमी सहा महिन्यांची शिक्षा दिली जाईल. या बाबतीत, थोडे तारतम्य चालविले जाईल आणि या वसाहतीतील आशियावासी लोकांना, सरकारशी खेळणे किंवा त्याला धिक्कारणे योग्य नाही, याची जाणीव होईल, अशी मला आशा आहे. अशी जाणीव त्यांना झाली तर त्यांना हे कळून येईल की, जेव्हा एखादी व्यक्ती सरकारच्या इच्छेविरुद्ध उभी राहते, तेव्हा सरकार हे व्यक्तीपेक्षा बलवत्तर असते, आणि व्यक्तींची हानी होते— सरकारची नव्हे."

मॅजिस्ट्रेटच्या भाषणात अडथळा आणून श्री. गांधी म्हणाले, "४८ तासांचा हुकूम द्या. त्याहून कमी मुदतीचा हुकूम मिळाला तर आम्हांला अधिकच संतोष वाटेल."

श्री. जॉर्डन : असे असेल तर तुमची निराशा मी कधीच करणार नाही. ४८ तासांत ही वसाहत सोडा, असा माझा हुकूम आहे.

इंडियन ओपिनियन, ४-१-१९०८

३४९. पी. के. नायडू प्रभृतींचा खटला[1]

[जोहान्सबर्ग,
ता. २८ डिसेंबर, १९०७]

[गांधीजी :] तुम्ही ब्रिटिश प्रजाजन आहात काय ?

[साक्षीदार :] होय.

तुम्ही ट्रान्सवॉलमध्ये युद्धापूर्वी होता काय ?

होय—१८८८ पासून.

डच सरकारला तुम्ही ३ पौंड भरले काय ?

नाही.

या कायद्याप्रमाणे तुम्ही नोंदणीपत्र घेतले नाही ना ?

नाही. कोणत्याही कायद्याप्रमाणे घेतलेले नाही.

का ?

या कायद्याप्रमाणे परवाना घेणे मला योग्य वाटले नाही. ते अत्यंत अपमानास्पद होईल असे......

श्री. जॉर्डन : का ?

माझ्यापुढे कायदा असता तर त्यातील जे भाग ब्रिटिश प्रजाजनाने मान्यता देण्यासारखे नाहीत ते मी दाखविले असते. आम्ही १० बोटांचे ठसे द्यावेत, असे कायदा स्पष्टपणे म्हणतो आणि नंतर, आठ बोटांचे ठसे वेगवेगळे द्यावेत, व आंगठ्यांचे ठसेही द्यावेत असे कायदा सांगतो. नंतर आमच्या आईचे, बापाचे व मुलांची नावे, आम्ही द्यावयाची...

श्री. श्रूरमन यांच्या उलट तपासणीत : तुम्ही येथे किती काळ आहात ?

१८८८ पासून.

ता. १८ ऑक्टोबर १८९९ रोजी मी बाहेर गेलो आणि १९०२ मध्ये परत आलो. मी नाताळमध्ये गेलो, आणि १९०७ च्या जुलैमध्ये परत आलो.

१. पूर्वीच्या लेखात दिलेल्या स्वतःच्या खटल्यानंतर गांधीजींनी इतर आरोपींचा बचाव केला. त्यांत पी. के. नायडू हे पहिले होत.

या कायद्याच्या बाबतीत, तुम्ही सभा भरविल्या काय ?
मी परत आल्यावर काही सभा भरल्या.

नोंदणी न करण्याविषयी तुम्ही हिंदी लोकांचे मन वळविले काय ?
नोंदणी न करण्याची शपथ मी घेतली आहे.

कोठे ?

माझे स्मरण बरोबर असेल तर, ही शपथ बर्गर्सडॉर्पच्या इन्डिपेंडंट स्कूलमधील सभेत घेतली.

नोंदणी करण्याचा तुमचा इरादा नाही काय ?
नाही.

श्री. जॉर्डन : या वसाहतीत येण्याचा परवाना तुमच्याजवळ होता काय ?

नव्हता. आशियावासियांच्या रजिस्ट्रारचे अधिकारपत्र होते.

ते अधिकार-पत्र दाखविण्याची मागणी श्री. शूरमन यांनी केली. ती जॉर्डन यांनी मान्य केली.

नवाब खाँ व समंदर खाँ यांचे खटले २ जानेवारीपर्यंत तहकूब ठेवण्यात आले. कारण कोणी दुभाष्या नव्हता.

नंतर श्री. सी. एम्. पिळे यांचा खटला सुरू झाला. त्यांनी सांगितले, "मी १८८३ साली ट्रान्सवॉलमध्ये आलो. युद्धापूर्वी मी आशियावासीयांचे पास-परवाने तपासणारा इन्स्पेक्टर होतो. युद्धकाळात मी रसद विभागाचा एक अधिकारी व कोर्टाचा दूत होतो."

श्री. गांधी : तुम्ही नोंदणी का करीत नाही ?

कोणताही स्वाभिमानी माणूस या कायद्याच्या योजना मान्य करणार नाही, असे मला वाटते. कारण, आमचे स्वातंत्र्य या कायद्यामुळे आशियावासियांच्या रजिस्ट्रारच्या हाती सोपविले जाते, आणि त्या पदाला हा माणूस योग्य व समर्थ नाही असे माझे नम्र मत आहे.

मॅजिस्ट्रेट मध्येच म्हणाले, असल्या मूर्खपणाच्या गोष्टी मी ऐकणार नाही...एखाद्या माणसाने येथे यावे आणि सरकारी अधिकाऱ्याची अशी नालस्ती करावी हा शुद्ध उद्धटपणा आहे, असे मला वाटते. अशा रीतीने, माझा वेळ वाया घालविण्याला आणि कोर्टाची इभ्रत कमी करण्याला मी तयार नाही. तसे करणे अत्यंत अप्रशस्त आहे.

आरोपीचे विधान अनुचित आहे, या मॅजिस्ट्रेटच्या मताशी आपण सहमत असल्याचे श्री. गांधींनी सांगितले. रजिस्ट्रार आपल्या जागेला योग्य आहे की नाही याविषयीचा पुरावा देण्याचा माझा विचार नाही, असेही ते म्हणाले.

[आरोपीस] : तुमचा विरोध अधिकाऱ्याला आहे की कायद्याला ?

मुख्यतः कायद्याला.

सरकारी वकिलाच्या विनंतीनुसार, तसा हुकूम देण्यात आला.

थंबी नायडू यांनी सांगितले, " माझा या नोंदणीला विरोध आहे, याचे कारण यामुळे माझा दर्जा काफीरापेक्षा हीन होतो. आणि नोंदणी करणे हे माझ्या धर्माच्याविरुद्ध आहे. मी विवाहित आहे. मला पाच मुले आहेत. त्यांतील सर्वांत मोठा १३ वर्षांचा आहे व सर्वांत लहान १८ महिन्यांचा आहे. माल वाहून नेण्याची कंत्राटे घेण्याचा माझा धंदा आहे.

केवळ ४८ तासांची नोटीस द्यावी, आरोपीला तेवढेच पाहिजे आहे, असे श्री. गांधींनी सांगितले.

आरोपीला काय पाहिजे आहे, यापेक्षा मला [मॅजिस्ट्रेटला] काय पाहिजे आहे, हे महत्त्वाचे आहे, असे सांगून श्री. जॉर्डन म्हणाले, " आरोपी हा व्यापारी आहे. त्याला १४ दिवसांची मुदत दिली जाईल."

करवा याने सांगितले की, " मी ट्रान्सवॉलमध्ये १८८८ पासून आहे. युद्धकाळात मी लेडीस्मिथ येथे सर जॉर्ज व्हाईट यांच्याबरोबर राहत होतो व एक लष्करी ठेकेदार म्हणून होतो. हॅरी स्मिथच्या मार्गाने एका लष्करी तुकडीबरोबर मी ट्रान्सवॉलमध्ये आलो. १८८५ च्या ३ ऱ्या कायद्याप्रमाणे नोंदणीपत्रावर मी फक्त आंगठ्याचा ठसा दिलेला आहे. बोटांचे ठसे देण्याला मी नकार दिला, कारण तसे करणे माझ्या धर्माविरुद्ध आहे."

मॅजिस्ट्रेट : " पण तुम्ही एक ठसा दिला आहे ना ? "

आरोपी : [विरोध दाखविण्यासाठी हात हालवीत] " एक ठसा देणे ठीक आहे. पण दहा देणे धर्माविरुद्ध आहे. " [हशा]

मॅजिस्ट्रेट : " पाच की दहा याची तुम्हांला काही पर्वा नाही, असे मला वाटते. तुम्हांला कोणी जसे सांगेल, तसे तुम्ही करता. "

पहिला चिनी आरोपी श्री. ईस्टन याने सांगितले की, "मी हाँगकाँगचा ब्रिटिश प्रजाजन आहे. युद्धापूर्वी मी येथे होतो. माझ्या प्रमाणपत्रासाठी मी डच सरकारला ३ पौं. भरलेले आहेत. मी दुकानातील एक नोकर आहे. नोंदणीला मी विरोध केला याचे कारण नोंदणी करणे अत्यंत अपमानास्पद होते आणि माझ्या धर्माविरुद्ध होते. माझा धर्म—माओने घालून दिलेला धर्म-ठसे देण्याच्या विरुद्ध आहे." ४८ तासांच्या आत देश सोडण्याचा हुकूम त्यांना देण्यात आला.

चिनी संघाचे अध्यक्ष श्री. लिअंग क्विन्न यांनी सांगितले, "मी ब्रिटिश प्रजाजन नाही. पण ट्रान्सवॉलमध्ये १८९६ साली आलो व डच सरकारकडून परवाना मिळविला. १९०१ साली मी बाहेर गेलो व १९०३ मध्ये परत आलो आणि शांतता संरक्षक वटहुकुमाप्रमाणे, परवाना मिळविला. मी एक दुकानदार आहे. मी परवाना घेतला नाही, याचे कारण हा कायदा, मला व माझ्या राष्ट्राला अपमानास्पद आहे. ह्या कायद्याचा अनुवाद मी माझ्या देशबांधवांना करून सांगितला; अशा खटल्याची मी वाटच पाहत होतो. ४८ तासांच्या नोटिशीवर मी संतुष्ट होईन. मी माझी सारी तयारी पुरी केली आहे.

इतर हिंदी दुकानदारांप्रमाणे, क्विन्न यांना १४ दिवसांची नोटीस देण्याचा मॅजिस्ट्रेटने आग्रह धरला.

साक्षीदाराच्या पिंजऱ्यात जाणारा शेवटचा आरोपी जॉन फोर्तोएन हा होता. त्याने सांगितले, "युद्धापूर्वी १३ वर्षे मी ट्रान्सवॉलमध्ये आहे. मी लहान असताना माझ्या चुलत्याबरोबर ट्रान्सवॉलमध्ये आलो. माझा चुलता आता कोठे आहे आणि माझे आईबाप जिवंत आहेत की नाहीत, हे मला माहीत नाही. मी एक विद्यार्थी आहे. केप वसाहतीमधील [.ह्यूमन्सडॉर्प जवळील] हॅंकी संस्थेतून मी आताच आलो आहे. त्या संस्थेत मी १९०४ पासून आहे. मी दक्षिण आफ्रिकेला माझे घर मानतो. चीनमधील कोणाही माणसाशी माझी ओळख नाही. नोंदणी-पत्र मी घेणार नाही. कारण तसे करणे, माझ्या देशाला व माझ्या प्रतिष्ठेला, अपमानास्पद आहे. माझे वय २१ आहे."

श्री. गांधी म्हणाले, या कोर्टाला उद्देशून भाषण करण्याची ही शेवटची संधी आहे. म्हणून मी काही सर्वसामान्य अभिप्राय व्यक्त करतो. मी माझ्या साऱ्या अशिलांना, निर्दोषी म्हणून सांगण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे त्यांना काय म्हणावयाचे आहे, ते त्यांच्या तोंडूनच कोर्टाला

ऐकता येईल. बोटांच्या ठशांच्या पद्धतीविषयी त्यांनी थोडेफार सांगितले आहे. आपण काय करीत आहो, याची जाणीव या लोकांना नाही, या कल्पनेला कोर्टाने आपल्या चित्तात थारा देऊ नये. आता मी जे काही सांगेन, त्यामुळे कोर्टाचा निकाल बदलणार नाही, हे मला माहीत आहे. पण काही खुलासा करणे, हे माझ्या व माझ्या अशिलाच्या दृष्टीने कर्तव्य आहे. जगात अशा काही गोष्टी असतात की, ज्यांचा खुलासा करता येत नाही. या कायद्यामध्ये अशा काही गोष्टी आहेत की, त्या लोकांच्या अनुभवास येतात पण व्यक्त करता येत नाहीत. बोटांच्या ठशांच्या पद्धती-संबंधी, आरोपींच्या भावना काय आहेत, हे ठरविण्याचे काम मी कोर्टावर सोपवितो..."

श्री. जॉर्डन यांनी उत्तरादाखल सांगितले की, "आपल्या पुढील प्रश्नासाठीच, हिंदी लोकांचे एक शिष्टमंडळ साम्राज्य सरकारला निवेदन करण्यासाठी इंग्लंडला गेले होते. पण ते फोल ठरले. असा आक्षेप घेतलेला कायदा ट्रान्सवॉलच्या सध्याच्या विधिमंडळाने मंजूर केला आहे आणि त्याला राजाची संमती मिळाली आहे. साऱ्या भावना बाजूला ठेवून मला कायद्याची अंमलबजावणी करायची आहे. तसे करण्याची मी शपथ घेतलेली आहे. या लोकांनी [आरोपींनी] सरकारचा अवमान मुद्दाम केला आहे आणि अत्यंत भयप्रद अशी भूमिका धारण केली आहे. या देशातील कोणा रहिवाश्याने असे करावे, याचे मला दुःख वाटते. ही एक चूक आहे यात शंका नाही. इंग्लंडमध्ये शैक्षणिक विलाला जो सविनय प्रतिकार झाला, त्याची ही नक्कल आहे. हे धोरण मला केव्हाही, कसेही, मान्य झालेले नाही. देशातील कायद्यांना तेथे राहणाऱ्या लोकांनी मान दिला पाहिजे; तसे त्यांना करता येत नसेल, तर त्यांना एकच मार्ग मोकळा आहे आणि तो म्हणजे, अशा लोकांनी दुसरीकडे जावे. नोंदणी-पत्रावर, आंगठ्याचा ठसा देण्याची पद्धत कैक वर्षे चालू आहे. तो जर दिला जातो, तर त्या नोंदणीपत्रावर प्रत्येक हाताच्या चार बोटांचे ठसे देण्याने, त्याच्या धर्मावर कसा आघात होतो, हे मला मुळीच कळत नाही. शांततासंरक्षक वटहुकुमाच्या कार्यपद्धतीचा उल्लेख करून ते पुढे म्हणाले, " तुम्ही त्याच वेळी अंगठ्याच्या ठशाला विरोध केला असता तर आता तुमची बाजू अधिक बळकट झाली असती. आंगठ्याचा ठसा मागणाऱ्या नोंदणीपत्रामुळेच ओळखीची खूण पटते. मागील सरकारने दिलेल्या जुन्या पिवळ्या पासाच्या वेळीही ठसे होते.

पण नव्या तक्त्यामध्ये नोंदणी करण्याचा प्रसंग येताच आशियावासीयानी एकदम कायदा धाब्यावर बसविला. ट्रान्सवॉलमधील शांततासंरक्षक वट-हुकुमाचा अनुभव दुसऱ्या कोणत्याही मॅजिस्ट्रेटपेक्षा मला अधिक आहे, हे श्री. गांधींना माहीत असेल. तसेच, पिवळ्या पासामुळे त्याच्या मालकाचा पत्ता लावणे कठीण जात असे व त्यामुळे पुष्कळ गोंधळ व खर्च होत असे. ते पास विकण्याचा मोठा व्यापार चालत असे, हे श्री. गांधींना माहीत असेल. कोर्टापुढे आलेल्या तरुणाने ७ दिवसांच्या आत ही वसाहत सोडावी, असा हुकूम मी देत आहे. ”

श्री. गांधींनी छोटेसे उत्तर दिले. ते म्हणाले, “ जुन्या परवान्या-वरील आंगठ्याचा ठसा व नव्या कायद्यातील बोटांचे ठसे, या दोहोमध्ये नेहमी भेदभाव करण्यात आला आहे. एकाच्या बाबतीत सक्ती आहे तर दुसरी खुशीची गोष्ट आहे. आंगठ्याचा ठसा जेव्हा घेतला जातो तेव्हा, त्या माणसाची ओळख पटणे शक्य होते, आणि परवान्याची बेकायदा विक्री अशक्य होते, हे कोर्टाला चांगले माहीत आहे. या सर्व खटल्यात कोर्ट, सरकारी वकील व पोलीस यानी जे सौजन्य दाखविले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. ”

इंडियन ओपिनियन, ४–१–१९०८

३५०. सरकारी चौकातील भाषण[१]

[जोहान्सबर्ग
ता. २८ डिसेंबर १९०७]

मला किंवा दुसऱ्या कोणाला काय होत आहे, याची परवा न करता, लोक आपला लढा चालवीत आहेत. मी माझी मते मुळीच बदलणार नाही. आशियावासी जमातींनी नोंदणी कायद्याविरुद्ध झगडले पाहिजे.

१ खटला संपल्यावर, गांधीजींनी सरकारी चौकात हिंदी, चिनी व युरेपियन यांच्या प्रचंड मेळाव्यापुढे भाषण केले. प्रथम हिंदुस्थानीतून त्यांनी खटल्याचे वेळी काय झाले, हे सांगितले. नंतर युरोपियनांसाठी इंग्रजीमधून ते जे बोलले, त्याचा हा वृत्तांत आहे.

मग त्यामुळे या वसाहतीतून हद्दपार व्हावे लागले तरी चालेल. कदाचित माझा सारा मार्ग चुकीचा असेल, कदाचित तुम्ही पुढे मला शिव्याशाप द्याल, पण सध्या तरी, मी आपल्याला सांगितले त्याहून निराळे विचार माझे नाहीत. मी चुकलो असा ईश्वरी संदेश मला आला तर, माझा दोष मी प्रथम कबूल करीन आणि तुमची क्षमा मागेन. पण असा संदेश कधी येईल, असे मला वाटत नाही. गुलामासारखे राहून, स्वाभिमान व प्रतिष्ठा गमावण्यापेक्षा, वसाहतीतून निघून जाणे चांगले, असे माझे मत आहे. हे एक धर्मयुद्ध आहे. ते तुम्ही शेवटपर्यंत लढा असा उपदेश मी नेहमी देत आलो आहे—आणि आजही तो देत आहे.

इंडियन ओपिनियन, ४-१-१९०८

३५१. 'स्टार'ला पत्र[१]

जोहान्सबर्ग,
ता. ३० डिसेंबर, १९०७

संपादक,
स्टार
[जोहान्सबर्ग]
यांस,

महाशय,

आशियावासी कायद्याविरुद्ध ज्यांनी सविनय प्रतिकाराची चळवळ चालविली, त्यांच्यावरच मुख्यतः खटले भरण्यात सरकारने जे धैर्य व प्रामाणिकपणा दाखविला, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. आशियावासीयांच्या भावना किती सत्य आहेत आणि सार्वत्रिक आहेत, याची कसोटी लावण्याचा तोच एक खरोखर मार्ग आहे. पण अटक झालेल्या लोकांमध्ये असे काही लोक आहेत की, ज्यांनी चळवळीत प्रत्यक्ष भाग कधीच घेतला नाही, त्याचप्रमाणे तसा भाग घेणारे काही महत्त्वाचे लोक वगळलेही

१. 'वृत्तपत्राला पत्र' या नावाने हे ता. ४-१-१९०८ च्या 'इंडियन ओपिनियन'मध्ये प्रसिद्ध झाले आहे.

आहेत. या दोन्ही गोष्टींचा बोध उघड आहे. एक-दोन लोकांना खाजगी द्वेषामुळे पकडले आहे, असेही लोकांचे म्हणणे आहे. पण या प्रश्नाची ही बाजू मांडण्यासाठी तुमच्या सौजन्याचा गैरफायदा घेण्याचा माझा उद्देश नाही.

प्रवेशविषयक कायद्याला संमती मिळाल्याची घोषणा, आणि या धरपकडी एकाच वेळी घडलेल्या आहेत. यावरून असे दिसते की, नव्याने मिळालेली सत्ता वापरण्याचा सरकारचा इरादा आहे. सरकारच्या धनुष्याला तीन दोऱ्या आहेत. त्या म्हणजे तुरुंगवास, व्यापाराचे परवाने थांबविणे व हद्दपारी. ही सारी सत्ता घेण्यात किंवा देण्यात आली आहे, याचा हेतू आशियावासीयांची आवक सरकारने थांबवावी हा नाही. कारण, तशी आवक कोणालाच नको आहे आणि नोंदणी-कायद्याने ती थांबणार नाही. तसेच या सत्तेचा हेतु व्यापारातील स्पर्धा टाळणे, हाही नाही. कारण या कायद्याला मान्यता देणाऱ्या प्रत्येक हिंदी माणसाला पाहिजे तितके व पाहिजे तेथे परवाने मिळतील. सरकारला ही सत्ता देण्यातील हेतू म्हणजे हिंदी लोकांना आपल्या इच्छेपुढे मान वाकवावयास लावणे. स्वतःच्या अंतःकरणाविरुद्ध काम करण्यास लावणे. थोडक्यात म्हणजे त्यांना एक जबरदस्त तडाखा देऊन व त्यांचे सत्त्व हरण करून, त्यांना आपल्या हातातील मेणाची बाहुली बनविणे, हा या अधिकारांचा हेतु आहे.

सर्वसामान्य हद्दपारीपेक्षा प्रवेशविषयक कायद्याप्रमाणे होणारी हद्दपारी अधिक वाईट आहे, हे वसाहतवाल्यांना माहीत आहे काय ? मी जर खून केला आणि जन्मठेपेची शिक्षा मला झाली, तर मला अशा ठिकाणी पाठविले जाते की, जेथे माझ्या राहण्याची, खाण्यापिण्याची व्यवस्था होऊ शकेल. नाताळमधील थोड्या आदिवासी बंडखोरांना सेंट हेलेना येथे पाठविले असता, त्यांचीही तशीच सोय करण्यात आली. पण मी जर आशियावासी कायद्याला संमती देईन, तर मी हद्दपार होईन म्हणजे सीमेबाहेर किंवा हिंदुस्थानला मला पाठविले जाईल, त्यावेळी मला एक पै दिली जाणार नाही. माझ्याजवळ खाजगी मालमत्ता नसेल आणि बाहेर जाण्याची व्यवस्था मी करू शकत नसेन, तरी हद्दपारीचा खर्च माझ्याकडून वसूल केला जाईल, आणि ट्रान्सवॉलमध्ये माझे कुटुंब असेल, तर सरकार त्याला उपासमारीने मरू देईल. आणि लक्षात ठेवा, हे सारे कोणाच्या बाबतीत घडणार ? तर चरितार्थाच्या दृष्टीने ज्या लोकांनी ट्रान्सवॉल हे आपले स्वीकृत घर मानले आणि हिंदुस्थान हा विदेश मानला त्यांच्या. पकडलेल्या हिंदी लोकांमध्ये काहीजण, सुमारे पंधरा वर्षे व्यापार करीत आलेले आहेत. दक्षिण आफ्रिकेत जन्मलेल्या बायकांशी लग्ने करून, ते ट्रान्सवॉलमध्ये राहत होते. एक चिनी माणूस तर अगदी बच्चा असताना दक्षिण आफ्रिकेस आला. त्याला चीनचे फक्त नाव माहीत आहे. पाश्चिमात्य संस्थांमध्ये तो जन्मला, वाढला. पकडलेले सारे आशियावासी कायदेशीर नागरिक आहेत, आणि या देशात राहण्याचा हक्क देणारे कागद-पत्र त्यांच्याजवळ आहेत. हे लोक आपल्या विवेकबुद्धीचे उल्लंघन

करीत नाहीत, परंतु ते आशियावासी कायद्याचे उल्लंघन करतात, त्यामुळे त्यांना वासाहतिक सचिवाच्या सहीने निघालेल्या वॉरंटावरून तुरुंगवास किंवा हद्दपारी भोगावी लागेल. मनोदेवतेच्या आज्ञेमुळे जे कोणी कायदा पाळीत नसतील, त्यांना शिक्षा मुळीच होऊ नये, असे मी म्हणत नाही. पण माझे म्हणणे असे आहे की, जेव्हा शिक्षा ही गुन्ह्याच्या प्रमाणाबाहेर असते, तेव्हा ती रानटीपणाची ठरते. प्रवेशविषयक कायद्याप्रमाणे मिळालेले अधिकार आशियावासी कायद्याच्या बाबतीत वापरले गेले तर ट्रान्सवॉलमधील मतदारांच्या नावाने **रानटीपणाचे** एक कृत्य केले असे होईल. एका सर्व समाजाचा असा सत्यानाश झाला तर या देशातील लोकांना गुदगुल्या होतील काय? येथील स्त्रियांना आपल्या स्वाभाविक संरक्षणकर्त्यापासून दूर ठेवले म्हणून, 'राजभक्त महिला संघ' [गिल्ड ऑफ लॉयल वुईमेन] काय म्हणेल? मी स्वतःला ब्रिटिश साम्राज्याचा एक प्रेमी आणि ट्रान्सवॉलमधील [मताधिकार नसलेला] नागरिक मानतो आणि या देशाच्या सर्वसामान्य उत्कर्षात पूर्ण भाग घेण्यास मी सिद्ध असतो. हा आशियावासी कायदा तुमच्या पराक्रमाला लांछन लावणारा आणि तुमच्या धर्माचा उपमर्द करणारा आहे, म्हणून तुम्ही त्याला मान्यता देऊ नका, असा उपदेश मी माझ्या देशबांधवांना करतो, तो पूर्णपणे सन्मानाचा आहे, आणि वरील भूमिकेशी सुसंगत आहे असा माझा दावा आहे. आणि माझा असाही दावा आहे की, या अन्यायाशी झगडण्यासाठी योजलेला सविनय प्रतिकाराचा उपाय हाच सर्वात शुद्ध व बिनधोक आहे. कारण प्रतिकारकांचा पक्ष न्यायाचा नसेल तर, फक्त त्यांनाच दुःख भोगावे लागेल. या देशात निरनिराळे वंश आहेत, आणि त्यांचा विकास कमी-अधिक झालेला आहे. अशा देशातील कायद्याला प्रतिकार करण्याचा उपदेश करणाऱ्या प्रामाणिक नागरिकापासून सुराज्याला धोका असतो, याची मला पूर्ण जाणीव आहे. पण कायदे करणारे लोक कधी चुकत नाहीत असे मी मानीत नाही. प्रतिनिधित्व नसलेल्या वर्गाशी वागताना ते उदार किंवा न्याय्य भावनांनी प्रेरित झालेले नसतात, अशी माझी समजूत आहे. आपल्या कायदे करणाऱ्या लोकांच्या मूर्खपणाच्या चुकीमुळे येथील मूळचे रहिवासी बेफाम होण्याचा संभव आहे. तसे झाले तर भयंकर रक्तपात, मृत्यू घडविणारा झगडा, सविनय प्रतिकाराचाच स्वीकार केल्यानेच, कायमचा टळेल.

ज्यांना हा कायदा आवडत नाही, त्यांनी देशत्याग करावा, असे म्हटले जाते. आराम-खुर्चीवर बसून असे बोलणे ठीक आहे; पण आपल्याविरुद्ध जारी झालेल्या काही कायद्यांना आपण मान्यता देत नाही, म्हणून घरदार सोडून जाणे, हे शक्य नाही, आणि मानवाला शोभणारे नाही. बोअर लोकांच्या राजवटीत बिगर-डच गोऱ्या लोकांनी कायदे फार कडक असल्याची तक्रार केली होती, तेव्हा त्यांनाही असे सांगण्यात आले की, हे कायदे तुम्हांला आवडत नसतील, तर तुम्ही या देशातून निघून जा. पण त्यांना सुविचार सुचला, आणि ते गेले नाहीत. स्वाभिमानासाठी लढणाऱ्या हिंदी लोकांनी तुरुंगवासाच्या किंवा त्याहून कडक शिक्षेच्या भीतीमुळे या देशातून पळ काढावा काय!

महाशय, असे होणार नाही. पाशवी शक्तीशिवाय कोणाही हिंदी माणसास या देशातून बाहेर घालविता येणार नाही. यासाठी शक्य ते सर्व मी करीन. आपल्यावर लादलेल्या कायद्यांना आंधळेपणाने मान तुकविणे, हे नागरिकाचे कर्तव्य नाही, आणि जर माझ्या देशबांधवांची ईश्वरावर व आत्म्याच्या अस्तित्वावर श्रद्धा असेल, तर त्यांचे देह तुरुंगात टाकले गेले किंवा हद्दपार केले गेले, तरी त्यांची मने, त्यांच्या इच्छा आणि त्यांचे आत्मे, हे सदैव आकाशातील पक्ष्याप्रमाणे स्वतंत्र राहतील. अत्यंत वेगवान् अशा बाणांच्या टप्प्यापलीकडे ते आहेत. एका उपकारी वसाहत–मंत्र्याने मंजूर केलेल्या जुलमी कायद्यावर जनरल स्मट्स यांचा भर आहे. त्यांनी कोणतीही यंत्रणा वापरली तरी, आत्मबलाने लढणारे आशियावासी, कधीही शरण जाणार नाहीत. पण जर पुढाऱ्यांना पकडल्याबरोबर माझे देशबांधव खचले, जर या कायद्याला आम्ही पात्र ठरू. तरीही, "अन्यायाचा प्रतिकार (अन्यायाने) करू नका" या येशूच्या शिकवणुकीवर आधारलेल्या सविनय प्रतिकाराची शुद्धता सिद्धच होईल.

आपला,
मो. क. गांधी

'स्टार', ३०–१२–१९०७.

३५२. चिनी संघातील भाषण[1]

[जोहान्सबर्ग
ता. ३० डिसेंबर, १९०७]

हा धार्मिक लढा नाही, याचे ध्येय धार्मिक नाही, असे जे लोक समजतात, त्यांना धर्माचा अर्थ कळत नाही. बहुतेक सर्व धर्मांचे थोडे फार ज्ञान मला आहे. प्रत्येक धर्माची शिकवण अशी आहे की, आपल्या मानवतेला कलंक लावणारे कृत्य जो माणूस करतो, तो धार्मिक नाही. धर्म म्हणजे ईश्वराशी सुसंवाद, किंवा ईश्वरावर

१. ट्रान्सवॉलमधील आशियावासी जमातींवर जे संकट कोसळले होते, ते निवारण्याच्या कामी गांधीजींनी केलेल्या सेवेबद्दल त्यांना धन्यवाद देण्यासाठी ही सभा बोलावली होती. सभेला इतर लोकांबरोबर ४०० कायमचे चिनी नागरिक हजर होते. चिनी संघाचे हंगामी अध्यक्ष श्री. जे. एल. वेंगली होते.

श्रद्धा असे असेल, तर ट्रान्सवॉलमध्ये थोडीफार द्रव्यप्राप्ती करण्यासाठी आपला अधःपात करवून घेणे, हे पूर्ण अधर्म्य आहे, असे म्हणण्यास मला काहीही संकोच वाटत नाही. तसे करतानाही, ते कृत्य रास्त, योग्य किंवा न्यायाचे नाही, असे त्यांना वाटत असते. या देशातील आशियावासी लोक आपल्या नेत्याच्या मागून आंधळेपणाने चालले असते आणि नेत्यांना पकडताच त्यांनी कायद्याचा स्वीकार केला असता, तर ते त्या कायद्याला पात्र आहेत, असे मी मानले असते. म्हणून, परिस्थितीची किल्ली आपल्या हातात आहे. आपल्या कार्याच्या चांगुलपणावर आपला विश्वास असेल आणि आपण पुढे जात आहो, असे जर आपणाला वाटत असेल, तर काहीही होवो, या वसाहतीत जनरल स्मट्स काहीही करोत–बादशहाच्या नावाने साम्राज्य सरकार कशालाही मंजुरी देवो–आपल्याला आपले पाऊल तिळमात्र मागे घेण्याचे कारण नाही.

स्थायिक झालेल्या आशियावासीयांना तडीपार करण्यास सरकार समर्थ आहे की नाही, याविषयी माझ्या मनात फार शंका होती. पण आता ट्रान्सवॉलमधील एका श्रेष्ठ वकिलाच्या[१] सयुक्तिक मतामुळे माझ्या मताला बळकटी आली आहे.

परंतु श्री. लिओनार्ड किंवा दुसरा कोणी कायदेपंडित यांच्या मतावर तुम्ही भरंवसा ठेवू नका, अशी मी पुनः विनंती करतो. या लढ्यात आपण आपली श्रद्धा केवळ आपली विवेकबुद्धी व ईश्वराची उपासना यावरच ठेवावी. दुसऱ्या कशावर तुम्ही अवलंबून राहिला तर गवताच्या काडीचा आधार घेतल्यासारखे होईल.

इंडियन ओपिनियन, ४–१–१९०८

३५३. रूटरला मुलाखत[१]

[जोहान्सबर्ग,
ता. ३० डिसेंबर, १९०७]

ओळख पटविण्याच्या बाबतीत सरकारला मदत करण्याची तयारी हिंदी लोकांनी नेहमी दाखविलेली आहे. पण सरकारने त्यांच्या मदतीचा हात झिडकारला आहे.

१. जे. डब्ल्यू. लिओनार्ड.

१. सर रेमंड वेस्ट, यांनी लंडनमध्ये केलेल्या विधानावर टीका करणारी ही मुलाखत गांधीजींनी दिली. रेमंड म्हणाले होते, 'दोन्ही पक्ष' फार पुढे गेले आहेत. ट्रान्सवॉल सरकारने

[पुढील पान पहा]

यापुढे येणाऱ्या लोकांची संख्या नियंत्रित करण्याचा हक्क ट्रान्सवॉलला आहे हे हिंदी लोकांनी नेहमी मान्य केलेले आहे. त्यांना मुख्य चिंता होती ती ट्रान्सवॉलमध्ये कायदेशीरपणे आता रहिवासी झालेल्या हिंदी लोकांच्या प्रतिष्ठेची.

सरकारच्या कायद्यावर आक्षेपार्ह अर्थ बसवून हिंदी लोकांनी सरकारचा अपमान केला, या आरोपाचा इनकार श्री. गांधींनी केला. साम्राज्य परिषदेमध्ये, हा प्रश्न, नेला तर, हिंदी लोक, त्याचे उत्साहाने स्वागत करतील. तेथे, दोन्ही पक्षांना मान्य होईल, अशी सुसंस्कृत व समाधानकारक अवस्था निर्माण होईल, अशी खात्री त्यांना वाटते. सविनय प्रतिकारकांना वागविण्यासंबंधी प्रवेश नियंत्रण कायद्याने सरकारला जी अमर्याद सत्ता दिलेली आहे, ती गुन्ह्याच्या प्रमाणाबाहेर आहे, अशी तक्रार गांधींनी केली. ज्यांनी आपली नावे नोंदविली नाहीत, त्यांना १ जानेवारी रोजी व्यापाराचे परवाने नाकारण्यात येतील आणि मग ते विगरपरवाना व्यापार करीत राहतील, असा त्यांचा अंदाज आहे.

सुरत येथे भरलेल्या, हिंदी राष्ट्रीय काँग्रेसकडून, आणि इतर ठिकाणांहून सहानुभूती व पाठिंबा देणाऱ्या तारा येथील हिंदी लोकांकडे आलेल्या आहेत, त्याचा उल्लेख श्री. गांधींनी केला.

इंडिया, ३-१-१९०८

[मागील पानावरून]

हिंदी लोकांच्या भावनांकडे ' तुच्छतेने ' दुर्लक्ष केले आहे आणि हिंदी लोकांना सरकारच्या कायद्याचा अत्यंत कमी नव्हे तर अधिक ' उपमर्दकारक अर्थ ' घेतला आहे. त्यांनी एक तडजोड सुचविली. निर्दोष मार्गांनी, ओळखीचे काम साधण्यासाठी हिंदी लोकांनी मदत करावी आणि देशातील रहिवाश्यांची ' निर्दोष नोंदणी ' करून प्रवाश्यांच्या आवकीवर निर्बंध घालण्याच्या कामी, त्यांनी सहकार्य करावे. एक संयुक्त समिती स्थापन करावी आणि हिंदी पुढाऱ्यांवर जबाबदारी टाकावी. अशी व्यवस्था न झाली तर, ब्रिटिश प्रजाजन म्हणून हिंदी लोकांनी गैर-वर्तणुकीपासून आपले संरक्षण व्हावे, अशी राजाकडे दाद मागावी. असे संरक्षण परदेशात आपल्या प्रजाजनांना देण्यास राजेसाहेब बांधलेले आहेत.

३५४. जोहान्सबर्गचे बातमीपत्र

मंगळवार

[ता. ३१ डिसेंबर १९०७]

एकाच वेळी धरपकडी

सरकारने प्रिटोरिया, पीटर्सबर्ग, जोहान्सबर्ग व जर्मिस्टन यांना डिसेंबर महिना शांततेने घालवू दिला नाही. धरपकडीची वॉरंटे सुटली. प्रिटोरियात बारा, जोहान्सबर्ग-मध्ये नऊ, पीटर्सबर्गमध्ये तीन व जर्मिस्टनमध्ये एक. प्रिटोरियामध्ये पुढील लोकांना समन्से लागू झाली—

श्री. सुलेमान सूज, श्री. ए. एन, कचालिया, श्री. अर्देसर बंग, श्री. गौरीशंकर व्यास, श्री. गुलाम महम्मद रशीद, श्री. इस्माइल जुमा, श्री. रहमतखाँ, श्री. चुनीलाल वाले, श्री. तुलसी, श्री. गंगादीन आणि श्री. माणिकलाल देसाई, जोहान्सबर्गमध्ये, श्री. गांधी, श्री. थंबी नायडू, श्री. सी. एम् पिले, श्री. नवाबखाँ, श्री. समंदरखाँ, श्री. कडवा, श्री. क्विन, श्री. इस्टन, श्री. फोर्तोएन, पीटर्सबर्गमध्ये, श्री. मोहनलाल, खंडेरिया, श्री. अमरशी गोकूल, आणि श्री. अम्बाराला आणि जर्मिस्टनमध्ये रामसुंदर पंडिताच्या नावाने वॉरंट निघाले आहे. यातील, रहमतखाँ शहराबाहेर असल्याकारणाने, त्यांना अटक झाली नाही. श्री. कचालिया यांना ही बातमी कळताच, समन्स घेण्यासाठी ते फोक्सरस्टहून प्रिटोरिया येथे धांवत गेले. पण रामसुंदर फरारी झाले. श्री. चुनीलाल व तुळशी यांचे खटले पुढे ढकलण्यात आले.

रामसुंदरची हकीगत सांगणे जरूर आहे. पोलीस कमिशनरची नोटीस शुक्रवारी आली तेव्हा ते गृहस्थ श्री. गांधींच्या कचेरीत होते. आणि त्यांनी कोर्टात शनिवारी येण्याचे वचन दिले होते. पण जर्मिस्टन येथे गेल्यावर त्यांनी आपल्या एक-दोन शिष्यांना बोलावून त्यांना असे सांगितले की, मी पुनः तुरुंगात जाऊ इच्छीत नाही, म्हणून मी फरारी होणार आहे. शिष्यांनी त्यांची निर्भर्त्सना केली; पण त्यांचे मन भयाने ग्रासलेले होते. त्यांचे काही न ऐकता आणि कोणास काही न कळविता ते नाताळला रेल्वेने गुपचूप गेले. त्यांच्या उत्कर्षाप्रमाणेच त्यांचा अपकर्ष असा आकस्मिक झाला. या पत्रात मी त्यांच्याविषयी खूप विस्ताराने लिहिले आहे. ते सारे चुकीचे ठरले, त्यांच्यावरील काव्ये निरर्थक झाली. खोटे नाणे नेहमी खोटेच नाणे राहाते. हा

लढा असा आहे की, त्यात प्रत्येकाचे खरे स्वरूप प्रकट होते. हिंदी समाजाच्या दृष्टीने अतःपर रामसुंदर मृत आहे. आपण त्यांना विसरले पाहिजे.

बाकीचे सारे खंबीर दिसतात. पकडलेल्या लोकांत सार्‍या जमातींचे लोक आहेत. चार सुरती मुसलमान, एक मेमन, दोन पठाण, एक पारशी, एक ब्राह्मण, तीन बनिये, एक कलकत्त्याचा हिंदू, एक शीख, दोन देसाई, एक लुटाणा, तीन मद्रासी हिंदू आणि तीन चिनी सर्व मिळून २३ आशियावासीयांना पकडण्यात आले. यांपैकी सर्वश्री सुज्ञ, देसाई, व्यास, खंडेरिया, नायडू या सर्वांची कुटुंबे ट्रान्सव्हॉलमध्ये आहेत. त्यांतील काही व्यापारी आहेत आणि काही नोकर आहेत. अशा प्रकारे प्रत्येक जमातीला अभिमान धरता येईल.

अधिक व्यापार्‍यांना का पकडले नाही ?

असा प्रश्न विचारला जातो. मला वाटते, श्री. इसाप मियाँ प्रभृतींना तूर्त हात लावलेला नाही, याचे कारण बहुधा त्यांना परवान्याच्या प्रश्नावर छळावयाचा हेतु असेल. शिवाय, त्यांच्यावर हात टाकला नाही याचे कारण काही व्यापार्‍यांनी सरकारला असे कळविले आहे की, विरोधक व इतर खोडसाळ लोक यांना आमच्या वाटेतून दूर केल्यास, आम्ही कायद्याला मान्यता देण्यास तयार आहो. यामुळे व्यापार्‍यांना पकडले नसावे, असे दिसते. पकडलेल्या लोकांत असे काही लोक आहेत, की ज्यांनी लढ्यात अजिबात भाग घेतला नव्हता. त्यांच्या कारणाचा विचार आज करण्याची गरज नाही.

प्रवेश कायद्याला राजमान्यता का मिळाली ?

आकस्मिक धरपकडीमुळे, प्रवेशकायद्याला (राजाची) संमती मिळण्याची घटना मागे पडली आणि त्या विषयाचे लोकांचे भय नाहीसे झाले. त्या कायद्याला संमती देण्याला आपणच कारण पुरविले, असे मला वाटते. मी पूर्वी म्हटल्याप्रमाणे, काही व्यक्ती दूर झाल्या तर आम्ही कायद्याला संमती देऊ असे निवेदन काही व्यापार्‍यांनी सादर केले होते. दुसर्‍या काही व्यापार्‍यांनी रजिस्ट्रारकडे जाऊन भलभलत्या गोष्टी सांगितल्या. हे सर्व लॉर्ड एल्जिन यांच्या कानी विकृत स्वरूपात गेले असावे. त्यामुळे त्यांना वाटले, प्रवेश-कायदा मंजूर झाला म्हणजे सर्व लोक नोंदणी करतील. लॉर्ड एल्जिन यांना अशी माहिती मिळाल्यानंतर या कायद्याला संमती मिळाली यात आश्चर्य काय ? पण समाधान वाटण्यासारखी गोष्ट ही की, या कायद्यामुळे हिंदी समाजाला काहीच चिंता वाटलेली नाही.

काही भित्रे

तथापि, काही थोडे लोक भित्रे असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यात पीटर्सबर्गचे काही मेमन आहेत. त्यांनी आतापर्यंत अर्ज केले नव्हते. पण आता आपले हात

बरबटून घेण्यास आपण तयार आहो, असा अर्ज त्यांनी केला आहे. पण माझा असा विश्वास कायम आहे की, जो जो दडपण वाढेल तो तो, 'हिणकस' निघून जाईल आणि शुद्ध सोने मागे राहील. खऱ्या योग्यतेचे लोकच आपली नाव बंदराला नेऊन पोहोचवतील. लोकलज्जेस्तव जे धैर्य दाखवितात, पण खरोखर अंतःकरणाने भित्रे असतात, ते अखेरपर्यंत टिकाव धरतील अशी अपेक्षा करू नये.

भीतीचे कारण नाही

पण त्यांचे भय अकारण आहे. हजारो लोकांना हद्दपार करणे शक्य नाही. या कायद्याला मान्यता देणाऱ्या लोकांची स्थिती ट्रान्सवॉलमध्ये पुढे काय होईल, हे गोऱ्या लोकांना माहीत आहे.

प्रवेश-निर्बंध

या कायद्याप्रमाणे केलेले निर्बंध प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचे भाषांतर संपादक अन्यत्र देतील. तूर्त आश्चर्य वाटण्यासारख्या एका गोष्टीकडे मी लक्ष वेधतो. या कायद्याप्रमाणे द्यावयाचे परवाने, पास वगैरेवर १० बोटांचे ठसे देणे आवश्यक केले आहे. हे निर्बंध काळ्या गोऱ्या सर्वांना लागू आहेत. इंग्लंडहून येणाऱ्या गोऱ्या लोकांजवळ असे पास असले तरच त्यांना ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश करता येईल. यावरून हे दिसून येईल की या कायद्याविरुद्ध चाललेला लढा हा बोटांच्या ठश्यांवर उभारलेला नाही. त्या कायद्यात जो उपमर्द अंगभूत आहे, त्याच्याशी हा लढा आहे. आम्ही तक्रार करावी, असे काहीच प्रवेशनिर्बंधात नाही. सध्या या कायद्याचा फायदा आम्हास फारसा नाही. त्याचा फायदा, त्या दुष्ट कायद्याला मान्यता देणाऱ्या लोकांनाच मिळण्यासारखा आहे. आमचा संबंध हद्दपारीच्या कलमापुरता आहे. पण, वरील मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. बोटांचे ठसे घेण्याचे कलम गाळले तरी, हा दुष्ट कायदा आम्हांला मुळीच स्वीकारता येणार नाही. तो स्वभावतःच विषारी कायदा आहे. त्याची तुलना दुसऱ्या कोणत्याही कायद्याशी करता येणार नाही.

श्री. गांधींच्या जागी कोण येणार ?

श्री. गांधींच्या गैरहजेरीत कोण काम करणार ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. श्री. पोलक यांनी आपले आयुष्य हिंदी समाजाला वाहिलेले आहे, हे मला माहीत आहे. त्यांनी या प्रश्नाचा खोल अभ्यास केला आहे. ते एका सुसंस्कृत घराण्यातून आलेले आहेत. त्यांची लेखणी प्रभावी आहे. ते उत्कृष्ट इंग्रजी लिहितात. बहुतेक सर्व गोऱ्या लोकांशी त्यांचा संबंध आलेला आहे आणि त्यांची ओळख प्रत्येक हिंदी माणसाला आहे. त्यांचा उपयोग नाना रीतीने होईल, याविषयी शंकाच नाही. ब्रिटिश

इंडियन असोसिएशनला पाठविलेल्या पत्राकडे ते लक्ष देतील. त्यांना पाठविलेली पत्रे शक्य तितकी इंग्रजीत असावी हे चांगले.

सविनय प्रतिकाराला प्रसिद्धी

हिंदी लोकांवरील खटल्याचे वृत्तांत वर्तमानपत्रांत विस्ताराने येत आहेत. प्रत्येक वृत्तपत्र आपल्यालाच अनुकूल असल्याचे स्पष्ट दिसते. पुष्कळ गोऱ्या लोकांना जनरल स्मट्सची आता लाज वाटते. अलीकडील खटल्यांतील हिंदी लोकांच्या बाजूचा 'ट्रान्सवॉल लीडर'ने सहानुभूतीने विचार केला आहे.

आता काय घडेल ?

लढ्याचा शेवट लौकर होण्याची चिन्हे आहेत. आणखी काही धरपकडी होतील, असे दिसत नाही. परवाने न दिल्याचे आणि श्री. गांधी प्रभृती मोकळे नसल्याचे परिणाम काय होतात, हे सरकार पाहील. अशाही स्थितीत जर हिंदी समाज खंबीर राहिला, तर मार्चमध्ये समेट होण्याचा संभव आहे. आता सारा खेळ आपल्या हाती आहे.

'मुझे पालनेवाला है– गिरिधर गोपाला !'

जनरल स्मटस यांनी हिंदी लोकांसाठी जे जाळे पसरले होते ते त्यांना परत घ्यावे लागले आहे. आज [मंगळवारी] सकाळी सर्वश्री नायडू, पिल्ले, पिस्टन, कारवा व गांधी यांना कारागृहाच्या राजगृहात ठेवण्यात यायचे होते. पण सकाळी १० वाजण्यापूर्वी असा फोन आला की, पुढील सूचना येईपर्यंत, तुम्ही कोर्टात जाऊ नका. म्हणजे या हिंदी वीरांना, तुरुंगवासाचा आनंद सध्या चाखता येणार नाही. ही काही हर्ष वाटण्याजोगी गोष्ट नव्हे. हा लढा निकराचा होणार, हे आता प्रत्येक हिंदी माणसाला कळून चुकले असेल. तुरुंगवासातून सुटका नाही, हे खास. आता ज्यांना पकडले नाही, त्यांना पुढे पकडण्यात येईल, असे धरून चालावे.

आता प्रत्येकाने हाती (सत्याग्रहाचे) शस्त्र धरून सज्ज असावे. जनरल क्रॉंजी, आणि त्यांची सेना एकदा सतत २४ तास युद्धाच्या पवित्र्यात व सशस्त्र स्वरूपात, उभी होती. हे उदाहरण आपण गिरविले पाहिजे. आता, धरपकड होणार नाही, या बातमीने लोकांमध्ये अनंदाची लाट उसळली होती. श्री. गांधींच्या कचेरीभोवती लोकांनी वेढा दिला होता व भाषणे केली होती. सभा रस्त्यावर चालली होती. पण एका शिपायाने त्यांना सांगितले, टाऊन कौन्सिलच्या परवानगीशिवाय तुम्हाला अशी सभा भरविता येणार नाही. तेव्हा सारे लोक पांगले. तूर्त तरी हिंदी लोक मजबूत आहेत, असे दिसते.

हद्दपारीचा प्रश्नच नाही

हद्दपारीसंबंधीच्या प्रवेश कायद्यातील कलमासंबंधी, श्री. लिओनॉर्ड यानी आपले मत दिले आहे. ते आपल्या पूर्ण बाजूचे आहेत. हिंदी लोकांना हद्दपार करणे अगदी अशक्य आहे असे ते म्हणतात. हद्दपार करण्याचा विचार सरकारने केला तर आम्ही लढा देऊ. हिदी लोकांनी, काही न करता, घरी स्वस्थ बसण्याइतका दमदारपणा दाखविला आणि होईल ती हानी सोसली, तर शेवट चांगला होईल.

हॉस्केनची सहानुभूती

मंगळवारी हॉस्केन हे, श्री. गांधींच्या कचेरीत मुद्दाम गेले आणि मोठ्या भावनेने त्यांनी सहानुभूती प्रकट केली. आपला लढा धार्मिक आहे, याची खात्री त्यांना पटली. पुष्कळ प्रमुख गोरे लोक, आपापसात असेच मत मांडतात. आता, गोऱ्यांतील बहुतेक सारे आपले हितचिंतक आपल्याला खंबीर राहण्याचा सल्ला देत आहेत.

दगाबाज हिंदी लोक

डेलागोआ बे येथून अशी बातमी आली आहे की, दोन स्वार्थी हिंदी माणसे ट्रान्सवॉलहून तेथे गेली आहेत. माणशी १२ पौं. १० शि. दिल्यास, परवाने देण्यात येतील आणि त्यासाठी श्री. चामनी डेलागोवा बेला येतील असे ते दोघे सांगतात. हे साफ खोटे आहे, अशी मला खात्री आहे. श्री चामनी कोणाचीही तशी नोंदणी करू शकत नाहीत. अशा लोकांपासून प्रत्येक हिंदी माणसाने सावध राहावे. असे लोक परवाना घेऊ शकत नाहीत, एवढेच नव्हे तर सरकारपेक्षा, समाजाची अधिक हानी करतात.

दर्बानमध्ये सरकारची दगाबाजी

अशी तार आली आहे की, हिंदुस्थानातून येणाऱ्या लोकांना ट्रान्सवॉलमध्ये जाण्यापूर्वी खुद्द दर्बान मध्येच गुलामगिरीचे पट्टे दिले जातात. दर्बानमधील हिंदी लोकांनी पुष्कळ तारा पाठविल्या आहेत. आणि ते पुष्कळ गोष्टी बोलतात. त्यांनी हिंदुस्थानातून येणाऱ्या प्रत्येक माणसाची भेट घेण्यासाठी, व त्याला कायद्यासंबंधीची परिस्थिती समजावून सांगण्यासाठी, कोणाची तरी नेमणूक करावी, असे मी अनेक वेळा सुचविले आहे. पण अशा साऱ्या कामाकडेही कोणी लक्ष देत नाही, असे दिसते. मग, ट्रान्सवॉलला उत्तेजनपर तारा पाठविण्याचा काय उपयोग? दर्बान येथे बोटीवरून उतरणाऱ्या हिंदी लोकांची गाठ घेऊन, [त्याच्या पुढील वेताची] चौकशी करणारा निदान एक तरी हिंदी माणूस दर्बानमध्ये राहील, अशी मला मनापासून आशा वाटते. जरूर तर, अशा लोकांची भेट डेलागोवा बेमध्येही घ्यावी.

एलिझाबेथ संघ

पोर्ट एलिझाबेथ येथील संघाने ब्रिटिश इंडियन असोसिएशनला २५ पौंड पाठविले आहेत. त्यांचा धन्यवादपूर्वक स्वीकार केला आहे.

हिंदी लोकांची सभा

हमीदिया अंजुमनच्या सभागृहात, शुक्रवारी संध्याकाळी मोठी सभा भरली. सुमारे १००० लोक हजर होते. सर्वजण उत्साहपूर्ण होते. प्रवेश-कायद्याचा निषेध करणारा ठराव ' सागरी ' तारेने इंग्लंडला पाठविण्यात आला.

चिनी लोकांची सभा

त्याच दिवशी संध्याकाळी चिनी लोकांची सभा होती. श्री. क्विन हद्दपार होण्याचा संभव असल्याने, त्यांनी असोसिशनचे हंगामी अध्यक्ष म्हणून श्री. पोलक यांचे नाव सुचविले.[1] सूचना मान्य झाली. श्री. पोलक यांनी सभेत भाषण केले. मोठा उत्साह दिसून आला. अखेरपर्यंत लढा चालविण्याचा दृढ निर्धारही, प्रकट झाला.

आणखी सभा

जोहान्सबर्ग, येथे पुष्कळ ठिकाणी सभा भरल्या. सोमवारी संध्याकाळी चिनी लोकांची सभा भरली. नंतर मद्रासी लोकांची सभा झाली. दोन्ही सभांमध्ये मोठा उत्साह व धैर्य दिसून आले. श्री. गांधी हजर होते. सोमवारी संध्याकाळी हिंदी लोकांची प्रचंड सभा झाली. तिला चिनी लोकांचे प्रतिनिधी हजर होते. श्री. इसापमिया यांनी भाषण केले. लोकांनी खंबीर राहावे, आणि [तुरुंगात गेलेल्या किंवा हद्दपार झालेल्या] आपल्या पुढाऱ्यांची जागा घ्यावी, असा उपदेश त्यांनी केला.

प्रिटोरियातील सभा

प्रिटोरियामध्ये सोमवारी सभा भरली. तिला ३०० लोक हजर होते. श्री हाजी हबीब अध्यक्ष होते. श्री. गांधी व ४ चिनी पुढारी सभेला हजर राहण्यासाठी तेथे मुद्दाम गेले होते. सभेत बोलताना, श्री. गांधींनी चिनी लोकांचे ऐक्य अनुकरणीय असल्याचे सांगितले. आपण आपले कर्तव्य करीत राहिलो म्हणजे ट्रान्सवाल सरकार किंवा सर्व साम्राज्य आपल्याविरुद्ध उभे राहिले तरी, आपली काही हानी

१. त्याच दिवशीच्या इंडियन ओपिनियनच्या इंग्रजी विभागात आलेल्या वृत्तांताशी, हे विसंगत आहे. त्या वृत्तांतात असे म्हटले आहे की, श्री. क्विन यांनी आपल्या गैरहजेरीत, हंगामी अध्यक्षाची नेमणूक जाहीर केली, आणि श्री. एच. एस्. एल. पोलक यांना चिनी संघाचे सन्माननीय सल्लागार नेमण्यात आले.

होणार नाही, असे ते म्हणाले. त्यांना यशाची खात्री वाटत होती. खरा लढा आताच सुरू झाला आहे असे त्यांनी सांगितले. श्री. सूज यांनी जाहीर केले की, मी या कायद्याला मान्यता देणार नाही. मग त्याचे परिणाम काहीही होवोत. "मी हद्दपारीचे स्वागत करीन" असे श्री. देसाई म्हणाले. श्री. बेग यांनी इतिहासापासून घ्यावयाचे धडे सांगितले आणि बलिदानानेच यश मिळते, असे ते म्हणाले. श्री. मनजी आणि श्रोत्यांतील इतर काही लोकही बोलले. श्री. हाजी हबीब म्हणाले, "श्री. गांधींचे भाषण ऐकण्याची ही शेवटची वेळ आहे. ते हद्दपार झाल्यानंतर आपण दृढ राहिले, तर आपण त्यांना परत आणू. हद्दपारीचे किंवा परवाना रद्द होण्याचे भय आपण बाळगता कामा नये.

या सभेला फारसे लोक नव्हते, ही गोष्ट गोऱ्या वृत्तपत्रांच्या नजरेस आल्याशिवाय राहिली नाही.

प्रिटोरियातील गाळ्याचा खटला

आशियावासी बाजारातील एक गाळा भाडेपट्ट्याने देण्याबद्दल श्री. रतनजी मकन यांच्या वतीने अर्ज करण्यात आला होता. त्याला उत्तर देताना टाउन क्लार्कने सांगितले, अर्जदाराने नोंदणी केली नाही, म्हणून तो, बेकायदा प्रवेशक मानण्यात येत आहे. आशियावासी कायद्याच्या विरोधकांच्या गळ्यास अशा प्रकारे ते आवळीत चालेले आहेत. आपल्या अधःपाताची ही सारी चिन्हे आहेत. त्यामुळे ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांनी जागे होऊन, आपल्या शृंखला तोडण्याचा अधिक दृढ निर्धार केला पाहिजे.

कॅंडाल यांचे पत्र

श्री. जॉर्डन यांनी आपल्या निकालपत्रात, जी विधाने केली आहेत, त्यांना उत्तर देताना श्री. केंडाल यांनी ट्रान्सवॉल लीडरमध्ये असे लिहिले आहे की, पूर्वी हिंदी लोक, एका आंगठ्याचा ठसा देत असत. आणि तोही स्वेच्छेने. आता, त्यांना १८ ठसे देण्यास, सांगण्यात येत आहेत—आणि तेही सक्तीने. याला, धार्मिक भूमिकेवरून हिंदी लोक विरोध करीत आहेत, हे न्यायाचे आहे. कट्टर मुसलमान आपल्या सर्व बोटांचे ठसे देण्यास कदापि संमती देणार नाही, कारण त्यामुळे, मूर्ती काढल्यासारखे होईल. आणि तसे करण्याला त्याच्या धर्माचा निषेध आहे.

[गुजरातीवरून]
इंडियन, ओपिनियन ४–१–१९०८

३५५. आशियावासीयांच्या रजिस्ट्रारला पत्र

[जोहान्सबर्ग]
ता. ३१ डिसेंबर १९०७

आशियावासीयांचा रजिस्ट्रार,
यांस,
[प्रिटोरिया,

महाशय,]

आताच मला असे एक पत्र डेलागोवा बेहून आले आहे की, ट्रान्सवॉलमधील दोन हिंदी माणसे सध्या डेलागोवा बेमध्ये असून ते लोकांना सांगत आहेत की, ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश करण्यासाठी, ज्यांना परवाने पाहिजे असतील, अशा हिंदी लोकांना डेलागोवा बेमध्ये माणशी १२ पौं. १० शि. दिल्यास, परवाने देण्यास आपण तयार आहोत.

वरील विधान आपल्याला, अपमानकारक आहे, हे मी सांगण्याची गरज नाही. पण, ते दोघे हिंदी लोक, अशा तऱ्हेची विधाने करून, साऱ्या भोळ्या लोकांना लुटू पाहात आहेत, हे खास. म्हणून, माझी आपल्याला अशी विनंती आहे की, डेलागोवा बेमधील हिंदी लोकांना आपल्याला योग्य वाटेल, त्या प्रकारे, आपण असे कळवावे, अशा लोकांच्या विधानावर तुम्ही विश्वास ठेवू नका. परवाने किंवा प्रमाणपत्र, प्रिटोरिया येथील माझ्या कचेरीतच मिळू शकतील. माझ्यापुरतें म्हणाल तर, 'इंडियन ओपिनियनच्या' स्तंभातून आणि अन्य उपायांनी मी लोकांना इशारा दिलेला आहे.

[आपला,
मो. क. गांधी]

इंडियन ओपिनियन, ४-१-१९०८

परिशिष्टे

परिशिष्ट-१

१८८५ च्या क्र. ३ च्या कायद्याची दुरुस्ती

" आशियावासी कायदा " दुरुस्ती कायदा

[ता. २२ मार्च १९०७ रोजी संमत]

ट्रान्सवॉल सरकारने प्रकाशित केलेली संपूर्ण अधिकृत संहिता पुढे दिली आहे:-

ट्रान्सवॉलच्या विधानपरिषदेच्या व विधानसभेच्या सल्ल्याप्रमाणे व संमतीप्रमाणे, राजेसाहेब पुढील कायदा अंमलात आणीत आहेत:—

खालील भाग रद्द करण्यात आले—

१. व्होल्क्सरॅडच्या ठरावाने, दुरुस्त केलेला, १८८५ च्या क्र. ३ च्या, दोन नंबरच्या कलमाचा (क) पोटविभाग, ता. १२ ऑगस्ट १८८६ चे, १४१९ वे कलम आणि ता. १६ मे १८९० चे १२८ वे कलम—ही सर्व रद्द केली जात आहेत.

व्याख्या

२. संदर्भाशी विसंगत नसेल तेव्हा, या कायद्यात—

' आशियावासी ' याचा अर्थ--१८८५ च्या ३ क्रमांकाच्या कायद्याचे पहिल्या कलमांत वर्णन केलेला कोणताही पुरुष मलायात जन्मलेला नसावा आणि दक्षिण आफ्रिकेतील कोणत्याही ब्रिटिश वसाहतीचा किंवा ब्रिटिशांच्या ताब्यातील प्रदेशाचा रहिवासी नसावा, तसेच १९०४ सालच्या ' मजूर आयात वटहुकुमाप्रमाणे ' या वसाहतीत आलेला नसावा, व चिनी वकिलातीच्या सेवेतील अधिकारी नसावा.

' आशियावासियांचे नोंदणी-पुस्तक ' याचा अर्थ—या कायद्याप्रमाणे व निर्बंधाप्रमाणे जे नोंदणी-पुस्तक ठेवावयाचे ते पुस्तक.

' रजिस्ट्रार ' याचा अर्थ--आशियावासियांची नोंदणी करण्यासाठी गव्हर्नरने नेमलेला अधिकारी, किंवा ते कार्य कायद्याप्रमाणे करणारी कोणतीही व्यक्ती.

'रेसिण्डेट मॅजिस्ट्रेट' यामध्ये असिस्टंट रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेटचा अंतर्भाव होईल.

'निर्बंध' याचा अर्थ—या कायद्याच्या १८ व्या कलमानुसार केलेला कोणताही निर्बंध किंवा नियम.

'पालक' याचा अर्थ—सोळा वर्षांच्या आतील आशियावासियाचे आई-बाप किंवा असा आशियावासी माणूस तात्पुरता ज्याच्या संरक्षणाखाली राहात असेल, तो इसम, अथवा असा कोणी नसल्यास, त्या आशियावासियाला कामधंदा देणारा मालक.

'नोंदणीचा अर्ज' याचा अर्थ-- निर्बंधात सांगितलेल्या पद्धतीने व दिलेल्या नमुन्यावरून, आशियावासी यांच्या नोंदणी-पुस्तकात ठेवण्यासाठी केलेला अर्ज. त्याबरोबर, या कायद्याने किंवा निर्बंधाने जरूर असणाऱ्या ओळखीच्या खुणा व तपशील दिला जावा.

'अर्जदार' याचा अर्थ--स्वतःच्या नोंदणीसाठी, अर्ज करणारा माणूस किंवा ज्याच्या वतीने पालकाने, नोंदणीसाठी अर्ज केला असेल तो माणूस.

'नोंदणी-पत्र' याचा अर्थ--निर्बंधाने घालून दिलेल्या नमुन्याप्रमाणे, या कायद्यानुसार, बनविलेले 'नोंदणी-पत्र.

'कायदेशीर धारक' याचा अर्थ-- कोणत्याही नोंदणी-पत्राच्या बाबतीत, या शब्दाचा अर्थ, ज्याची नोंदणी प्रमाणित झाली आहे, असा माणूस.

या वसाहतीत कायदेशीरपणे राहणाऱ्या सर्व आशियावासीयांची नोंदणी घेणे अवश्य

३. (१) यापुढे दिलेले अपवाद वगळून, या वसाहतीत कायदेशीरपणे राहणाऱ्या प्रत्येक आशियावासी माणसाने, आशियावासीयांच्या नोंदणी-पुस्तकात आपले नाव नोंदविले पाहिजे. त्यानंतर त्याला नोंदणी-पत्र मिळण्याचा हक्क प्राप्त होईल. अशा नोंदणीसाठी या कायद्याच्या बाराव्या कलमात सांगितलेल्या रकमेशिवाय कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

(२) या कायद्याच्या कामकाजासाठी, पुढील माणसे या वसाहतीत कायदेशीरपणे राहणारे आशियावासी समजले जातील--

(अ) १९०२ सालच्या नुकसानभरपाई व शांतता-संरक्षक वटहुकुमाप्रमाणे दिलेल्या किंवा त्याच्या दुरुस्तीप्रमाणे, दिलेल्या परवान्यान्वये या वसाहतीत प्रवेश करण्याचा व वास्तव्य करण्याचा योग्य अधिकार मिळालेला कोणताही आशियावासी.

किंवा ता. १ सप्टेंबर १९०० आणि वरील वटहुकूम मंजूर होण्याची तारीख यांच्या दरम्यान, मिळालेल्या परवान्याप्रमाणे, येथे येण्याचा व राहण्याचा अधिकार प्राप्त झालेला आशियावासी, मात्र असा परवाना लबाडीने मिळवलेला नसावा. विशिष्ट काळात, या वसाहतीमध्ये राहण्यासाठी आशियावासीयाला अधिकार देणारा परवाना, या पोटकलमाच्या कक्षेतील परवाना मानला जाणार नाही.

(ब) या वसाहतीत ता. ३१ मे १९०२ रोजी प्रत्यक्ष वास्तव्य केलेला कोणताही आशियावासी रहिवासी.

(क) ता. ३१ मे १९०२ नंतर, जन्मलेला कोणताही आशियावासी–मात्र, १९०४ च्या मजूर–आयात–वटहुकुमाप्रमाणे, या वसाहतीत आलेल्या मजुराचे मूल तो असता कामा नये.

आशियावासीयांनी नोंदणीसाठी ठराविक मुदतीत अर्ज केले पाहिजेत

४. (१) हा कायदा अंमलात येण्याच्या दिवशी, या वसाहतीत राहणाऱ्या प्रत्येक आशियावासीयाने, वासाहतिक सचिवाने, गॅझेटमध्ये नमूद केलेल्या तारखेपूर्वी किंवा तारखांपूर्वी, एका किंवा अनेक ठिकाणी, एका किंवा अनेक माणसांकडे, नोंदणीसाठी अर्ज करावा.

(२) हा कायदा अंमलात आल्यानंतर, या वसाहतीत येणाऱ्या, आणि पूर्वी आपले नाव न नोंदविलेल्या प्रत्येक आशियावासीयाने, वसाहतीत आल्यानंतर आठ दिवसांच्या आत, निर्दिष्ट माणसाकडे व निर्दिष्ट ठिकाणी अर्ज करावा. मात्र, १७ व्या कलमानुसार मिळालेल्या परवान्याप्रमाणे, त्याने येथे प्रवेश केला असल्यास, त्याला हे बंधन लागू नाही.

मात्र—

[अ] ज्या तारखेपर्यंत नोंदणीचा अर्ज द्यावयाचा आहे, तोपर्यंत, जे आशियावासी मूल आठ वर्षांपेक्षा कमी वयाचे असेल, त्याच्यासाठी, या कलमानुसार, अर्ज करण्याची गरज नाही.

(ब) अशी मुदत संपल्यावर जे आशियावासी मूल, आठ वर्षांचे आहे पण सोळा वर्षांखालील वयाचे आहे, त्याच्या वतीने, पालकाने असा अर्ज करावा. तो न केल्यास, त्या मुलाला

सोळावे वर्ष लागल्यानंतर एक महिन्याच्या आत, त्या मुलाने तसा अर्ज करावा.

रजिस्ट्रारने अर्ज मंजूर झाल्यास अर्जदाराचे नाव नोंदणे आणि अर्ज नामंजूर झाल्यास नोटीस देणे

५. (१) मागील, कलमानुसार नोंदणीसाठी केलेल्या प्रत्येक अर्जाचा विचार रजिस्ट्रार करील आणि या वसाहतीत, कायदेशीरपणे राहणाऱ्या किंवा ज्याचा अर्ज आपण मंजूर केला असेल, अशा माणसाचे नाव रजिस्ट्रार नोंदवील, आणि तशा अर्जदाराला किंवा पालकाला नोंदणी-पत्र देईल.

(२) एखादा अर्जदार, या वसाहतीचा कायदेशीर रहिवासी नाही, असे रजिस्ट्रारला वाटले तर त्याचे नाव नोंदण्याचे तो नाकारील. अर्जदार सोळा वर्षांचा किंवा अधिक वयाचा असल्यास, अर्जदाराने आपल्या अर्जात दिलेल्या पत्त्यावर रजिस्ट्रार नकाराची नोटीस पोस्टाने पाठवील. ज्या भागात असा अर्ज केलेला असेल, तेथील मॅजिस्ट्रेटच्या कचेरीच्या मुख्य दरवाजावर त्या नोटिशीची प्रत लावली जाईल. त्या नोटिशीने, रजिस्ट्रार ज्या अर्जदाराला असे कळवील की, या नोटिशीनंतर १४ किंवा अधिक दिवसांच्या आत, त्या भागाच्या रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेटपुढे दाखल व्हावे आणि, या वसाहतीतून बाहेर जाण्याचा हुकूम तुम्हाला देऊ नये, याचे कारण दाखवावे. अशा नोटिशीने दिलेल्या मुदतीत अर्जदार रेसिण्डेट मॅजिस्ट्रेटपुढे दाखल झाला नाही, किंवा दाखल होऊन, आपण या वसाहतीचे कायदेशीर रहिवासी आहोत, अशी त्याची खात्री पटवू शकला नाही, तर, [अर्जदार सोळा वर्षांचा किंवा अधिक वयाचा असल्यास] रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेट त्याला विशिष्ट मुदतीत, वसाहतीबाहेर निघून जाण्याचा लेखी हुकूम देईल. अर्थात्, अर्जदार गैरहजर असताना, असा हुकूम दिला असल्यास, त्या हुकुमातील मुदत, त्याच्यावर तो हुकूम बजावलेल्या दिवसापासून मोजली जाईल. असा हुकूम, १९०३ च्या शांतता संरक्षक वट-हुकुमाच्या सहाव्या कलमानुसार, केलेल्या हुकुमाप्रमाणे मानला जाईल, आणि त्या वटहुकुमाचे, सात व आठ ही कलमे त्याला लागू होतील. अर्जदार हा या वसाहतीतील कायदेशीर रहिवासी आहे, अशी रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेटची खात्री पटली तर, त्याचे नाव नोंदविण्याचा व त्याला नोंदणी-पत्र देण्याचा आदेश तो मॅजिस्ट्रेट रजिस्ट्रारला देईल.

पालकांनी द्यावयाच्या माहितीची व करावयाच्या अर्जाची व्यवस्था

६. (१) आठ वर्षांखालील आशियावासी मुलाचा पालक असणाऱ्या आशियावासी माणसाने, स्वतःच्या नोंदणीसाठी अर्ज केला असताना, निर्बंधात सांगितलेला ओळखीचा तपशील व खाणाखुणा दाखल कराव्या. त्या पालकाचे नाव नोंदविलेले असेल तर, त्याने दिलेला वरील तपशील नोंदणी-वहीवर तात्पुरता नमूद केला जाईल. वरील मुलाला आठवे वर्ष पूर्ण झाल्यानंतर एक वर्षाच्या आत, तो पालक, त्या मुलाच्या वतीने, राहात असलेल्या भागाच्या रेसिण्डेट मॅजिस्ट्रेटच्या कचेरीत, नोंदणीसाठी अर्ज करील.

(२) हा कायदा अमलात आल्यानंतर, या वसाहतीत जन्मलेल्या प्रत्येक आशियावासी मुलाच्या पालकाने, ते मूल आठ वर्षांचे झाल्यानंतर, एक वर्षाच्या आत, त्या मुलाच्या वतीने, तो ज्या भागात राहात असेल, तेथील रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेटच्या कचेरीत नोंदणीसाठी अर्ज करावा.

मात्र,

(अ) एखाद्या पालकाने, आपल्या पाल्य आशियावासी मुलासाठी, येथे सांगितलेल्या मुदतीच्या आत, नोंदणीचा अर्ज केला नाही, आणि रजिस्ट्रारने किंवा कोणा रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेटने मागणी केली तर, तो पालक पुढील तारखेस तसा अर्ज करील.

(ब) या कलमाप्रमाणे, एखाद्या आशियावासी मुलाच्या पालकाने, जो अर्ज करावयास हवा, तो त्या पालकाने केला नाही किंवा तो अर्ज नाकारण्यात आला तर, ते आशियावासी मूल सोळा वर्षांचे झाल्यानंतर एक महिन्याच्या आत त्याने त्या भागाच्या रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेटच्या कचेरीत नोंदणी-अर्ज करावा.

ज्या रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेटच्या कचेरीत, या कलमाप्रमाणे अर्ज आलेला असेल त्याने, त्या अर्जाचे कागदपत्र व संबंधित दस्त-ऐवज रजिस्ट्रारकडे पाठवावेत. तो अर्ज योग्य आहे, असे रजिस्ट्रारला वाटल्यास, तो अर्ज नोंदवून घेईल, आणि त्याला किंवा त्याच्या पालकाला नोंदणी-पत्र देईल.

ज्यांच्या पालकांनी तपशील दिला नाही, अशा आशियावासीयांनी सोळावे वर्ष लागताच नोंदणीसाठी करावयाचा अर्ज

७. मागील कलमात सांगितल्याप्रमाणे आठ वर्षांखालील आशियावासी मुला तपशील, नोंदणी-पत्रात, त्याच्या पालकाने माहिती न दिल्यामुळे नोंदलेला नसे तर त्या मुलाला आठवे वर्ष लागल्यानंतर एक वर्षाच्या आत, त्याच्यासाठी नोंदण अर्ज करण्यात यावा, आणि तसा अर्ज केला गेला नसल्यास, त्या आशियावा मुलाने आपल्याला सोळावे वर्ष लागल्यानंतर एक महिन्याच्या आत, आपण राह असलेल्या भागाच्या रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेटच्या कचेरीत, अर्ज करावा. त्या अर्जाचे कागद व संबंधित दस्तऐवज रजिस्ट्रारकडे पाठविले जातील. त्या अर्जदाराचे नाव नोंद किंवा त्याच्या पालकाला नोंदणी-पत्र देणे हे त्या रजिस्ट्रारच्या मर्जीवर राहील.

अर्ज न दिल्यास दंड

८. (१) या कायद्याप्रमाणे, स्वतःसाठी किंवा आशियावासी मुलाचे पाल म्हणून, नोंदणीसाठी अर्ज करण्यास जो चुकेल, त्याला गुन्हा सि झाल्यावर शंभर पौंडांपर्यंत दंड आणि तो न दिल्यास तीन महि पर्यंत साधी किंवा सश्रम कैद अशी शिक्षा होईल.

(२) या वसाहतीत कायदेशीर रहिवासी नसलेल्या सोळा वर्षांखाली आशियावासी माणसाला जो कोणी या वसाहतीत आणील आ अशा मुलाला कोणत्याही व्यापारात किंवा उद्योगधंद्यात जो नोकरी ठेवील, तो गुन्हेगार मानला जाईल आणि त्याचा गुन्हा शाबी झाल्यावर पुढील शिक्षेस तो पात्र होईल.

(अ) या कलमाच्या क्रमांक १ च्या पोटकलमात सांगितले शिक्षा आणि

(ब) अशा माणसाजवळ नोंदणी-पत्र असेल, तर त्याचे ते नोंदण पत्र रजिस्ट्रार रद्द करील.

आणि त्यानंतर, त्या माणसाला या वसाहतीतून निघ जाण्याचा हुकूम वासाहतिक सचिव देईल. तो हुकूम १९०३ च शांततासंरक्षक वटहुकुमाच्या ६ व्या कलमानुसार दिलेल्या हुकुम सारखा मानला जाईल, आणि त्याला त्या वटहुकुमाची सातवी आठवी कलमे लागू होतील.

(३) वासाहतिक सचिवाने गॅझेटमध्ये, जाहीर केलेल्या मुदतीनंतर, सो वर्षांवरील, आशियावासी या वसाहतीत आढळला, आणि, काय

शीरपणे धारण केलेले नोंदणीपत्र पुढे दिल्याप्रमाणे, मागितले असताना, ते दाखल करू शकला नाही. तर त्याला वॉरंटाशिवाय पकडण्यात येईल, आणि रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेटपुढे उभे करण्यात येईल. आपण कायदेशीर नोंदणी-पत्र धारण करीत आहो, अशी मॅजिस्ट्रेटची खात्री पटविण्यास तो जर चुकला किंवा अशा नोंदणीपत्रासाठी अर्ज करावयाची मुदत टळली नाही, अशी तो त्याची खात्री करू शकला नाही, तर पुढील पोटकलमात सांगितलेले अपवाद वगळून, या वसाहतीतून निघून जाण्याचा लेखी हुकूम तो मॅजिस्ट्रेट त्या आशियावासीयाला देऊ शकेल आणि त्याची मुदत त्या हुकुमात लिहिलेली असेल. असा हुकूम हा शांततासंरक्षक वटहुकुमाच्या सहाव्या कलमाप्रमाणे दिलेल्या हुकुमासारखा मानण्यात येईल, आणि वटहुकुमाची ७ व ८ ही कलमे त्याला लागू होतील.

(४) या कायद्याप्रमाणे दिलेल्या मुदतीत, नोंदणीसाठी अर्ज करावयास चुकलेल्या आशियावासी माणसाला मॅजिस्ट्रेटपुढे, दाखल करण्यात येईल आणि तसा अर्ज न करण्याचे योग्य व पुरेसे कारण, देऊन त्याने मॅजिस्ट्रेटचे समाधान केले तर वर सांगितल्याप्रमाणे, हुकूम न काढता, तो मॅजिस्ट्रेट त्या आशियावासी माणसाला ताबडतोब नोंदणी-अर्ज करण्यास सांगेल. ही त्याची आज्ञा, त्या आशिया-वासीयाने मान्य केली तर, या कायद्याने दिलेल्या मुदतीत केलेल्या अर्जाप्रमाणे त्याच्या अर्जाचा सर्वतोपरी विचार होईल आणि या कायद्यातील साऱ्या तरतुदी त्याला लागू होतील. पण जर, ती आज्ञा त्याने मान्य केली नाही, तर अशा आशियावासी माणसाच्या बाबतीत, त्याच्या हद्दपारीचा हुकूम तो मॅजिस्ट्रेट देईल.

मागणी करताच नोंदणी-पत्र दाखल केले पाहिजे

९. सोळा वर्षांच्या किंवा सोळा वर्षांवरील, प्रत्येक आशियावासी माणसाने या वसाहतीत प्रवेश किंवा वास्तव्य केल्यानंतर, या वसाहतीत कायदेशीरपणे स्थापन झालेल्या पोलिसदलाच्या कोणाही माणसाने, किंवा वासाहतिक सचिवाने अधिकार दिलेल्या कोणत्याही इसमाने मागणी करताच, आपल्याजवळ कायदेशीरपणे असलेले नोंदणी-पत्र दाखवले पाहिजे, आणि निर्बंधात सांगितलेली माहिती व ओळखीच्या खाणाखुणा, मागणी होताच पुरवल्या पाहिजेत.

सोळा वर्षांखालील आशियावासी मुलाच्या प्रत्येक पालकाने वर सांगितल्याप्रमाणे मागणी होताच, त्या मुलाचे कायदेशीर नोंदणी-पत्र दाखविले पाहिजे आणि या

कायद्याप्रमाणे किंवा निर्बंधाप्रमाणे, जरूर ती त्या मुलाची सर्व माहिती व ओळखीच्या खाणाखुणा सांगितल्या पाहिजेत.

नोंदणी-पत्राचा पुरावा

१०. नोंदणी-पत्र कायदेशीरपणे धारण करणाऱ्या माणसाचे नोंदणी-पत्र, त्याला कोणत्याही ठिकाणी, जाण्याचा व राहण्याचा हक्क देणारा निर्णायक पुरावा मानण्यात येईल-- मग १९०३ च्या शांततासंरक्षक वटहुकुमात काही का असेना, मात्र त्या वटहुकुमाच्या दहाव्या कलमाप्रमाणे या वसाहतीबाहेर जाण्याचा हुकूम झालेल्या माणसास हे कलम लागू होणार नाही.

हरवलेले नोंदणी-पत्र ज्याला सापडले असेल त्या माणसाचे कर्तव्य

११. ज्या माणसाच्या हाती, एखादे नोंदणी-पत्र आले असेल किंवा सतराव्या कलमाप्रमाणे दिलेला परवाना, कायदेशीरपणे त्याचा नसताना त्याला मिळाला असेल, तर त्याने तो, प्रिटोरिया येथील आशियावासियांच्या रजिस्ट्रारकडे तत्काळ नेऊन द्यावा अथवा टपालाने शक्य तितक्या लवकर पाठवावा.

या कलमातील, तरतुदीप्रमाणे वागण्यास जो चुकेल. त्याचा अपराध सिद्ध झाल्यास, तो ५० पौंडांपर्यंत दंडास किंवा तो न भरल्यास, एक महिनापर्यंत साधी व सश्रम कैद या शिक्षेस पात्र होईल.

नोंदणी-पत्र हरवले किंवा नष्ट झाले तरची व्यवस्था

१२. जर एखाद्या वेळी नोंदणीपत्र हरवले किंवा नष्ट झाले, तर त्याच्य कायदेशीर धारकाने, ते नवीन मिळण्यासाठी रजिस्ट्रारकडे ताबडतोब अर्ज करावा त्याने नोंदणी-पत्राच्या नूतनीकरणासाठी करावयाच्या अर्जाचे निर्बंध पाळले आणि पाच शिलिंग फी दिली तर रजिस्ट्रारने नवे नोंदणी-पत्र द्यावे. अशा नूतनीकरणासाठ केलेल्या अर्जावर त्या फीच्या रकमेइतकी रेव्हिन्यू तिकीटे लावावीत, आणि तो अर्ज स्वीकारणाऱ्या अधिकाऱ्याने त्या तिकिटावर शिक्का मारावा.

नोंदणी-पत्रे दाखवल्याशिवाय आशियावासीयांना व्यापाराचे परवाने देऊ नयेत

१३. वासाहतिक सचिवाने गॅझेटमध्ये जाहीर केलेल्या तारखेनंतर, १९०५ च्य मुलकी परवाना वटहुकूमाप्रमाणे, किंवा त्याच्या दुरुस्तीप्रमाणे किंवा नगरपालिकेच्य पोटनियमाप्रमाणे. व्यापाराचा परवाना, त्याने, आपले कायदेशीर नोंदणी-पत्र आणि निर्बंधात सांगितलेली माहिती व ओळखीच्या खाणाखुणा दाखल केल्याशिवाय त्याला मिळणार नाही.

आशियावासियाच्या वयाचा पुरावा

१४. जेव्हा जेव्हा या कायद्याप्रमाणे चाललेल्या एखाद्या खटल्यात किंवा कृत्यात आशियावासियाच्या वयाचा प्रश्न येईल, तेव्हा अन्यथा सिद्ध होईपर्यंत, त्याचे वरवर पाहता दिसणारे जे वय रजिस्ट्रार प्रमाण–पत्रात लिहील, तेच खरे मानले जाईल.

निर्बंधाप्रमाणे जरूर असणारी स्टॅम्प ड्यूटी प्रतिज्ञा-पत्राला किंवा शपथपूर्वक केलेल्या घोषणेला लागू न होणे

१५. स्वतःसाठी किंवा दुसऱ्या कोणासाठी, नोंदणीचा अर्ज, ज्या माणसाने केला असेल, त्याने, निर्बंधात सांगितल्याप्रमाणे केलेल्या प्रतिज्ञा-पत्रकाला किंवा शपथपूर्वक घोषणेला स्टॅम्प ड्यूटी लागणार नाही.

नोंदणीसाठी व नोंदणी-पत्रासाठी केलेल्या अर्जाविषयीचे गुन्हे

१६. ज्या माणसाने,

(१) नोंदणीचा अर्ज करण्याच्या बाबतीत किंवा नोंदणी-पत्र मिळविण्याच्या बाबतीत लबाडीचे कृत्य केले असेल, किंवा खोटे विधान केले असेल, किंवा खोटा बहाणा केला असेल, अथवा असे कृत्य, विधान अगर बहाणा करण्यास दुसऱ्या इसमास चिथावणी दिली असेल किंवा मदत केली असेल,

(२) खोटे नोंदणी-पत्र तयार केले असेल,

(३) कायदेशीरपणे आपले नसलेले किंवा खोटे तयार केलेले नोंदणी-पत्र आपले नोंदणी-पत्र म्हणून वापरले किंवा वापरण्याचा प्रयत्न केला असेल,

(४) कायदेशीरपणे आपले नसलेले किंवा खोटे तयार केलेले नोंदणी-पत्र आपले नोंदणी-पत्र म्हणून वापरण्यास दुसऱ्या इसमास उत्तेजन दिले असेल किंवा, मदत व चिथावणी दिली असेल तर,

तो, ५०० पौंडांपर्यंत दंड किंवा तो न दिल्यास दोन वर्षेपर्यंत, साधी वा सश्रम कैद अथवा तो दंड व ती कैद ही दोन्हीही—यांस पात्र होईल.

या वसाहतीत विशिष्ट मुदतीत राहण्याचा परवाना आशियावासियांना देण्याचा अधिकार

१७. (१) १९०३ च्या शांततासंरक्षक वटहुकुमामध्ये कोणतीही तरतूद असली तरीही, या वसाहतीत प्रवेश व वास्तव्य करण्याचा अधिकार देणारा

परवाना, निर्बंधात सांगितलेल्या नमुन्याप्रमाणे, वासाहतिक सचिव केवळ आपल्या मर्जीप्रमाणे एखाद्या आशियावासीयाला, त्य परवान्यावर लिहिलेल्या मुदतीकरिता देऊ शकेल. ती मुदत संपल्या नंतर, तो माणूस या वसाहतीत राहण्याला अधिकारी नाही, अ मानण्यात येईल आणि जर तो या वसाहतीत सापडला, तर त्याल विनावारंट पकडले जाईल, व या वटहुकुमाची सात व आ कलमातील योजना त्याला लागू होईल. या वटहुकुमाच्या सहाव्य कलमान्वये या वसाहतीबाहेर जाण्याचा हुकूम झालेल्या व तो हुकू मोडलेल्या माणसाप्रमाणे, त्याला समजण्यात येईल.

(२) वरील वटहुकुमाच्या नवव्या कलमातील योजना, या कलमान्वये दिलेल्या परवान्यांना सर्वतोपरी लागू होतील.

(३) हा कायदा अंमलात येण्यापूर्वी १९०२ च्या नुकसानभरपाई शांततासंरक्षक वटहुकुमाप्रमाणे अथवा त्याच्या दुरुस्तीप्रमाणे, दिलेल परवाना आशियावासियाला या वसाहतीत विशिष्ट मुदतीत राहण्य साठी अधिकार देणारा असेल, तर तो या कलमान्वये दिलेल परवान्यासारखा मानला जाईल.

(४) या कलमान्वये, या वसाहतीत प्रवेश व वास्तव्य करण्याचा अधिक ज्या माणसास मिळालेला असेल, त्याला, तो परवाना चालू अ पर्यंत, १९०२ च्या दारू-परवाना वटहुकुमाच्या दुरुस्तीतील योजनेपुरत गौरेतर माणूस मानू नये, असा हुकूम वासाहतिक सचिव स्वेच प्रमाणे काढू शकेल, आणि तो हुकूम त्या परवान्यावर नोंदला जाऊ पूर्णपणे अंमलात येईल.

(५) मागील, पोटकलमात सांगितलेला हुकूम वासाहतिक सचिव, कायद्याच्या कक्षेत न येणाऱ्या कोणाही आशियावासी वंशीया बाबतीत काढू शकेल.

निर्बंध (नियम) बनविण्याचा अधिकार

१८. पुढे दिलेल्या उद्देशासाठी, गव्हर्नर इन कौन्सिल हे वेळोवेळी नि बनवतील, बदलतील व रद्द करतील--

(१) या कायद्याप्रमाणे ठेवावयाच्या नोंदणीचा नमुना ठरविणे.

(२) नोंदणीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना व रीत ठरविणे. अर्जाच्या बाबतीत अर्जदाराने किंवा त्याच्या पालकाने द्यावय माहिती व ओळखीच्या खाणाखुणा ठरविणे.

(३) नोंदणी–पत्राचा नमुना ठरविणे.

(४) (अ) या कायद्याच्या सहाव्या कलमाप्रमाणे आठ वर्षांखालील आशियावासी मुलाच्या पालकाने,

(ब) या कायद्याच्या, नवव्या कलमात उल्लेखिलेली व मागणी केलेली माहिती पुरविणे.

(क) हरवलेल्या किंवा नष्ट झालेल्या नोंदणी–पत्राच्या नूतनीकरणासाठी अर्ज केलेल्या आशियावासीयाने,

(ड) व्यापाराच्या परवान्यासाठी अर्ज करणाऱ्या आशियावासीयाने, द्यावयाची माहिती व ओळखीच्या खाणाखुणा ठरविणे.

(५) या कायद्याच्या सतराव्या कलमाप्रमाणे द्यावयाच्या परवान्याचा नमुना ठरविणे.

सर्वसामान्य शिक्षा

१९. या कायद्याची कोणतीही शर्त पाळण्यास, जो आशियावासी किंवा आशियावासियाचा पालक चुकेल, त्याचा गुन्हा शाबीत झाल्यास, अन्यथा सांगितले नसल्यास, तो शंभर पौंडांपर्यंत दंड किंवा तो न भरल्यास तीन महिन्यांपर्यंत साधी किंवा सश्रम कैद यांस पात्र होईल.

नोकरीच्या करारामुळे विशिष्ट आशियावासीयांची व्यवस्था

२०. १९०४ च्या मजूर आयात वटहुकुमामध्ये काहीही तरतूद असली तरीही नोंदणी-पत्र कायदेशीरपणे, धारण करणारा आशियावासी आणि त्या वटहुकुमापूर्वी या वसाहतीत प्रवेश करण्याचा योग्य परवाना मिळविलेला अथवा येथील कायदेशीर रहिवासी असलेला आशियावासी. नोकरीचा करार केलेला आहे, पण, त्या वटहुकुमाच्या ८ व्या कलमाप्रमाणे करार केलेला नाही, म्हणून या वसाहतीत प्रवेश किंवा वास्तव्य करण्यास त्यास प्रतिबंध होणार नाही.

स्थावर मिळकत धारण करण्याची व्यवस्था

२१. ता. १२ ऑगस्ट १८८६ च्या व्होल्क्सराड ठरावाच्या १४१९ व्या, कलमाने दुरुस्त केलेल्या १८८५ च्या क्रमांक ३ च्या कायद्याच्या दुसऱ्या कलमातील, (ब) पोटकलमात कोणतीही तरतूद असली तरीही हा कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी या वसाहतीत आशियावासीयाने, मिळविलेली कोणतीही स्थावर मिळकत, हा कायदा, अस्तित्वात येण्यापूर्वी किंवा नंतर त्या आशियावासीयाच्या नावाने नोंदलेली असल

तर, कोणताही आशियावासी दुसऱ्या आशियावासियास ती मृत्युपत्राने किंवा वारसा हक्काने देऊ शकेल.

कायद्याचे नाव व तो अंमलात येण्याची तारीख

२२. हा कायदा सर्व बाबतीत १९०७ चा आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयक म्हणून संबोधला जाईल. तो नामंजूर करण्याची बादशहांची इच्छा नाही, असे गव्हर्नरने गॅझेटमध्ये जाहीर केल्याशिवाय तो अंमलात येणार नाही. नंतर गव्हर्नर जी तारीख घोषित करील, तेव्हापासून हा कायदा जारी राहील.

शांतता-संरक्षक वटहुकूम

१९०३ च्या क्र. ५ च्या शांतता-संरक्षक वटहुकुमातील पुढील कलमे वरील कायद्यात उल्लेखिलेली आहेत.

पकडलेल्या लोकांची तपासणी मॅजिस्ट्रेटने करावी

६. अशा तऱ्हेने पकडलेला प्रत्येक माणूस, शक्य तितक्या लवकर मॅजिस्ट्रेटपुढे आणला जाईल. या वटहुकुमाच्या योजनेप्रमाणे या वसाहतीत प्रवेश वा वास्तव्य करण्याचा आपल्याला योग्य तो अधिकार आहे, अशी तो मॅजिस्ट्रेटची खात्री पटवू शकला नाही तर, विशिष्ट मुदतीत या वसाहतीबाहेर जाण्याचा लेखी हुकूम मॅजिस्ट्रेट देईल व ती मुदत त्या हुकुमात नोंदली जाईल. मात्र त्यासाठी, त्या माणसाने आपण परवाना पूर्वीच मिळविलेला आहे, पण तो दाखविण्यास योग्य कारणामुळे आपण असमर्थ आहो असे शपथपूर्वक जाहीर केले पाहिजे किंवा, या वटहुकुमाच्या दुसऱ्या कलमाच्या तरतुदीप्रमाणे परवाना मिळविण्यापासून माफी असलेल्या वर्गांपैकी, आपण एक आहो, याचा समाधानकारक पुरावा दाखल करण्याचे, त्याने शपथपूर्वक जाहीर केले पाहिजे. जामीन देऊन किंवा न देता, विशिष्ट मुदतीत, परवाना किंवा पुरावा देण्याचा करार त्याने केल्यास, त्यास मुक्त केले जाईल. त्या करारातील शर्ती पाळण्यास तो चुकेल तर तो करार रद्द होईल.

वसाहतीबाहेर जाण्याचा हुकूम न पाळल्याबद्दल शिक्षा

७. या वसाहतीबाहेर जाण्याचा हुकूम ज्याला झाला असेल त्याने त्या हुकुमात दिलेल्या मुदतीत, तसे केले नाही तर, आणि मागील कलमातील योजनेनुसार ज्याचे करार-पत्र रद्द झाले आहे, अशा माणसाला वारंटाशिवाय पकडण्यात येईल व मॅजिस्ट्रेटपुढे उभे करण्यात येईल. त्याच्यावरील आरोप सिद्ध झाल्यास त्याला एक महिन्यापेक्षा कमी नाही आणि सहा महिन्यांपेक्षा अधिक नाही अशी साधी किंवा सश्रम कैद आणि ५०० पौंडांपर्यंत दंड व तो न दिल्यास सहा महिन्यांपर्यंत आणखी कैद अशी शिक्षा दिली जाईल.

वसाहतीत वास्तव्य केल्याबद्दल अधिक शिक्षा

८. मागील कलमाप्रमाणे, ज्याला तुरुंगाची शिक्षा झाली आहे, तो माणूस तुरुंगवासाची मुदत संपल्यानंतर सात दिवसांपेक्षा अधिक काळ, वासाहतिक सचिवाच्या परवानगीशिवाय येथे राहिल्यास, तशी परवानगी असल्याचे त्याने सिद्ध न केल्यास त्याला वारंटाशिवाय पकडण्यात येईल व मॅजिस्ट्रेटपुढे उभे करण्यात येईल. त्याचा गुन्हा शाबीत झाल्यास, सहा महिन्यांपेक्षा कमी नाही, व बारा महिन्यांपेक्षा अधिक नाही अशी साधी वा सश्रम कैद आणि ५०० पौंडांपर्यंत दंड व तो न दिल्यास सहा महिनेपर्यंत आणखी कैद अशी शिक्षा त्याला होईल.

खोटे परवाने

९. जो माणूस—

(१) लबाडीने, तोतयेगिरीने, खोट्या बहाण्याने, खोटेपणाने, किंवा अन्य अप्रशस्त मार्गाने, परवाना मिळवितो, किंवा मिळविण्याचा प्रयत्न करतो अथवा दुसऱ्या माणसाला तो मिळविण्यास उत्तेजन देतो अगर मदत वा चिथावणी देतो,

(२) अशा तऱ्हेने मिळविलेला परवाना वापरतो किंवा वापरण्याचा प्रयत्न करतो अथवा दुसऱ्या माणसास वापरण्यासाठी उत्तेजन देतो किंवा मदत वा चिथावणी देतो,

(३) अशा तऱ्हेने मिळविलेल्या परवान्यावर अथवा योग्य अधिकाऱ्याने त्याला न दिलेल्या परवान्यावर, या वसाहतीत प्रवेश करतो किंवा प्रवेश करण्याचा प्रयत्न करतो,

त्याला, ५०० पौंडांपर्यंत दंड किंवा दोन वर्षांपर्यंत साधी वा सश्रम कैद अथवा असा दंड वा अशी कैद––या शिक्षेस तो पात्र होईल.

शांतता व सुव्यवस्था यांना धोका देणाऱ्या व्यक्ती

१०. या वसाहतीतील कोणी माणूस, या देशातील शांतता व सुव्यवस्था यांना धोका देणारा आहे, असे मानण्यास योग्य कारणे असल्याची खात्री, लेफ्टनंट गव्हर्नरची झाली, तर वासाहतिक सचिवाच्या हस्ताक्षरात, त्या माणसाला, निर्दिष्ट केलेल्या काळात वसाहतीबाहेर जाण्याचा हुकूम ले. गव्हर्नरने करणे कायदेशीर आहे. ती मुदत संपल्यावर तो माणूस या वसाहतीत आढळल्यास या वटहुकुमाच्या सातव्या व आठव्या कलमाप्रमाणे, त्याच्यावर खटला होईल, आणि त्यात सांगितलेल्या शिक्षांस तो पात्र होईल.

इंडियन ओपिनियन, ३०-११-१९०७.

परिशिष्ट–२

चिनी राजदूताला अर्ज

जोहान्सबर्ग,
ता. १४ ऑक्टोबर, १९०७

चीनच्या बादशहांचे, परमश्रेष्ठ, असाधारण राजप्रतिनिधी,
आणि सर्वाधिकारसंपन्न मंत्री,
लंडन,
यांस,

ट्रान्सवॉलच्या चिनी संघाचे अध्यक्ष या नात्याने लिअंग क्विन्न यांनी केलेला अर्ज

नम्रपणे निवेदन करतो की,—

१. ट्रान्सवॉल येथील स्वतंत्र चिनी जनतेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी, चार वर्षांपूर्वी जोहान्सबर्ग येथे स्थापन झालेल्या चिनी संघाचा अध्यक्ष, आपला अर्जदार आहे.

२. स्वतंत्र चिनी जनतेची संख्या सध्या, ११०० वर आहे व त्यातील बहुसंख्य लोकांनी जोहान्सबर्ग येथे वास्तव्य केलेले आहे.

३. ट्रान्सवॉलमधील बहुसंख्य चिनी लोक, सुप्रतिष्ठित दुकानदार असून या वसाहतीचे जुने रहिवासी आहेत.

४. ट्रान्सवॉलच्या विधिमंडळाने मंजूर केलेल्या आशियावासी–कायदा–दुरुस्ती–कायद्याकडे आपला अर्जदार आपले लक्ष वेधीत आहे. त्या विधेयकाची प्रत सोबत जोडली आहे.

५. त्या कायद्याचे बिल, प्रथम गेल्या वर्षीच्या अखेरीस मंजूर झाले. तेव्हा ट्रान्सवॉलमधील चिनी समाजाने त्याचा इतका तीव्र निषेध केला की, आपल्या आधीच्या राजदूतामार्फत बादशहापुढे चिनी लोकांची बाजू मांडण्यासाठी, लंडन येथे

खास शिष्टमंडळ पाठविणे, योग्य वाटले. ब्रिटिश सरकारपुढे आपली बाजू योग्य तऱ्हेने मांडली जावी, हा त्यात हेतू होता, आणि हे सांगण्यास मला आनंद वाटतो की, आपल्या आधीच्या राजदूतांनी (वकिलांनी) केलेल्या प्रयत्नांचे फल म्हणजे ब्रिटिश सरकारने ते बिल स्थगित ठेवले.

६. ट्रान्सवॉलमध्ये नवीन निवडून आलेल्या संसदेने, नंतर ते बिल अत्यंत घाईने एकमताने पुनः मंजूर केले.

७. या बिलाने आपल्या प्राचीन संस्कृतीची ओळख ठेवलेली नाही आणि चीनही एक स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र आहे, हे सत्य जाणलेले नाही, असे चिनी संघाचे नम्र मत आहे.

८. या बिलामुळे चिनी प्रजाजनांना, हिंदुस्थानातून येणाऱ्या ब्रिटिश प्रजाजनांच्या पंक्तीस बसविले आहे. ब्रिटिश सरकारने आपल्या हिंदी प्रजाजनांना, आपल्या मर्जीप्रमाणे कसेही वागवावे; पण, ज्या साम्राज्याचे घटक असल्याबद्दल आपल्या अर्जदाराला अभिमान वाटतो, त्या साम्राज्याच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणाऱ्या रीतीने, चिनी साम्राज्यातील प्रजाजनांना वागदिण्यात येऊ नये, असे आपल्या अर्जदाराचे सादर निवेदन आहे. विशेषतः, चीनचे, ग्रेट ब्रिटनशी मैत्रीचे संबंध आहेत आणि, ग्रेट ब्रिटनच्या प्रजाजनांना चीनमध्ये अत्यंत सन्मानाची वागणूक दिली जाते.

९. या आशियाविषयी कायद्याने, ट्रान्सवॉलमध्ये राहणाऱ्या प्रत्येक चिनी माणसाला इतरांबरोबर, आपल्याजवळ असलेल्या पूर्वीच्या अधिकारपत्राऐवजी, नवे नोंदणी-पत्र घ्यावे लागते. नाही तर, जबरदस्त व अपमानकारक दंड भरावा लागतो, त्यामुळे चिनी लोकांची तपासणी होते. ती अत्यंत, लांछनास्पद आहे. १६ वर्षांखालील, मुलांचीही नोंदणी त्यांच्या आईबापाने करण्याची जी सक्ती आहे, ती अत्यंत पाणउतारा करणारी आहे. प्रौढ चिनी पुरुष आणि त्यांची मुले, यांनी १८ बोटांचे ठसे देणे, या कायद्यामुळे अवश्य झाले आहे. केवळ निर्ढावलेल्या गुन्हेगारांच्या बाबतीत अशी सक्ती केली जाते. या कायद्याने असे गृहीत धरलेले आहे की, बरेचसे चिनी लोक, खोटी अधिकारपत्रे, धारण करतात. हे मत चिनी संघाला सर्वथैव अमान्य आहे. या कायद्यामुळे चिनी लोकांचा दर्जा, दक्षिण आफ्रिकेतील आदिवासी लोक व इतर गौरेतर लोक यांच्याहून, खालचा ठरतो. थोडक्यात म्हणजे, हा कायदा असा आहे की, ज्याचा स्वीकार फक्त गुलाम करतील,—स्वतंत्र माणसे करणार नाहीत.

१०. वर वर्णन केल्याप्रमाणे, चिनी समाजाची भावना असल्यामुळे, त्याने या कायद्यास मान्यता न देण्याचा निर्धार केला आहे, आणि अशा कायदेभंगामुळे, होणारे सर्व हाल सोसण्याची तयारी केली आहे. कायद्याला सविनय प्रतिकार

केल्यामुळे, आपला संपूर्ण भौतिक विनाश होईल आणि साऱ्या चिनी लोकांना हद्दपार केले जाईल, याची जाणीव चिनी समाजास आहे. हा अपमानास्पद कायदा न स्वीकारण्याची गंभीर घोषणा ९००हून अधिक चिनी लोकांनी केली आहे.

११. ट्रान्सवॉलमध्ये येणाऱ्या लोकांची संख्या नियंत्रित असावी आणि चोरट्या प्रवेशावर परिणामकारक निर्बंध असावा, हे चिनी संघाला मान्य आहे. तसे, करण्याच्या कामी, स्थानिक सरकारला सहाय्य व्हावे म्हणून व चिनी समाजाचा सच्चेपणा, प्रत्ययास यावा म्हणून, खुषीने फेरनोंदणी करण्याची तयारी चिनी संघाने दाखविली आहे. मात्र ह्याचा अर्थ फेरनोंदणी जरूर आहे त्याची ही कबुली आहे, असा नव्हे. या प्रकरणात जी सक्ती आहे, तिचा संताप चिनी संघास येतो.

१२. जर खुषीची नोंदणी स्वीकारली गेली नाही आणि भरीव न्याय दिला गेला नाही, तर प्रत्येक चिनी माणसाला चीनला परत पाठवावे आणि त्याचा व्यापार, निवासस्थान, इत्यादी हक्क बुडाल्यामुळे होणाऱ्या नुकसानीची पुरी भरपाई केली जावी, अशी मागणी ब्रिटिश सरकारकडे जोराने करण्यात यावी.

१३. शेवटी, ट्रान्सवॉलमध्ये राहणाऱ्या चिनी प्रजाजनांच्या हक्कांचे पूर्ण संरक्षण आपण कराल, असा विश्वास, आपल्या अर्जदारांस आदरपूर्वक वाटत आहे. या आपल्या न्यायपूर्ण व दयापूर्ण कृत्याबद्दल आपला अर्जदार निरंतर ऋणी राहील.

[आपला]
लिअंग क्विन
अध्यक्ष,
ट्रान्सवॉल चिनी संघ.

इंडियन ओपिनियन, २६–१०–१९०७.

परिशिष्ट–३

ट्रान्सवॉल प्रवास–निर्बंध बिल

ट्रान्सवॉल सरकारच्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध झालेल्या बिलाची संहिता पुढे दिली आहे. या बिलाचा हेतु " या वसाहतीत येणाऱ्या लोकांवर नियंत्रण घालणे, त्यातून, प्रतिबंधित प्रवाश्यांना व इतरांना घालविण्याची तरतूद करणे, आणि ' प्रवास–खाते ' स्थापन करून चालविणे. " हा आहे.

ट्रान्सवॉलच्या विधान परिषदेच्या व विधान सभेच्या सल्ल्याप्रमाणे व संमती-प्रमाणे, राजेसाहेब असा कायदा करीत आहेत—

१. १९०३ चा शांतता–संरक्षक वटहुकूम यापुढे रद्द होईल. मात्र, १९०७ च्या, आशियावासी कायदादुरुस्ती विधेयकाने, त्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी दिलेले अधिकारक्षेत्र आणि सत्ता यांच्यावर काही परिणाम होणार नाही, किंवा त्यांचा संकोच होणार नाही.

२. संदर्भाशी विसंगत नसेल तेव्हा, या कायद्यामध्ये आणि त्याला धरून केलेल्या निर्बंधामध्ये—

' खाते ' याचा अर्थ--या कायद्याने स्थापिलेले व चालविलेले प्रवेश-खाते.

' गव्हर्नर ' याचा अर्थ—कार्यकारी कौन्सिलच्या सल्ल्याप्रमाणे या वसाहतीचा राज्यकारभार त्या त्या काळी चालविणारा अधिकारी.

' तुरुंगवास ' याचा अर्थ—गुन्हेगारांना न्यायाधीशाने दिलेल्या शिक्षेनुसार साधी वा सक्त कैद.

' मॅजिस्ट्रेट ' याचा अर्थ या वसाहतीतील कोणत्याही विभागाचा रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेट व असिस्टंट रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेट या संज्ञेच्या अर्थात दोन्हींचा समावेश होतो.

' मंत्री ' याचा अर्थ--या कायद्याच्या अंमलबजावणीचे काम ज्याच्याकडे गव्हर्नर वेळोवेळी सोपवील असा वासाहतिक सचिव किंवा तसाच दुसरा मंत्री.

' अज्ञान ' याचा अर्थ--सोळा वर्षांखालील माणूस.

'पोलिस अधिकारी' याचा अर्थ—या वसाहतीत कायदेशीरपणे स्थापन झालेल्या पोलिस-दलाचा घटक.

'प्रतिबंधित प्रवेशक' याचा अर्थ--हा कायदा अंमलात आल्यानंतर, या वसाहतीत प्रवेश करणाऱ्या, किंवा करू इच्छिणाऱ्या, पुढील वर्गातील कोणताही माणूस.

(१) या वसाहतीत किंवा या वसाहतीबाहेर, योग्य अधिकाऱ्याने विचारल्यावर ज्या माणसाला या वसाहतीत प्रवेश करण्यासाठी परवान्याचा अर्ज युरोपियन भाषेच्या लिपीत कमी शिक्षणामुळे लिहिता येत नाही व त्यावर सही करता येत नाही, असा कोणताही माणूस. या पोटकलमापुरती युडिश भाषा युरोपियन मानली जाईल. तसेच,

(अ) एखाद्या देशाच्या सरकारशी, तेथील प्रजाजनांच्या येथे येणाऱ्या संख्येवर, नियंत्रण घालण्याची व्यवस्था झाली असल्यास, ती गॅझेटमध्ये मंत्री प्रसिद्ध करील, आणि मग ती व्यवस्था चालू आहे, तोपर्यंत त्या प्रजाजनांना हे पोटकलम मान्य करावे लागणार नाही.

(ब) तशा व्यवस्थेला, संसदेच्या दोन्ही सभागृहांनी ठराव करून संमती दिल्याशिवाय, मंत्री तशी नोटीस काढणार नाही.

(क) मंत्र्याने गॅझेटमध्ये दुसरी नोटीस काढून पहिली नोटीस रद्द केली तर, अशा नोटिशीचा अंमल चालणार नाही.

(२) या वसाहतीत, योग्य मुदतीत, आपला निर्वाह करण्याचे साधन, ज्याच्याजवळ नाही, किंवा ज्यांना येथे येण्यास परवानगी दिली असता त्याचा खर्च सरकारवर पडेल असा कोणताही माणूस.

(३) वेश्या किंवा वेश्येच्या प्राप्तीवर चरितार्थ चालविणारा माणूस किंवा अनैतिक कामासाठी बायका मिळविणारा माणूस.

(४) या वसाहतीत प्रवेश करण्याच्या वेळी किंवा प्रवेश करण्याचा प्रयत्न करण्याच्या वेळी, जारी असलेल्या कायद्याप्रमाणे, जो माणूस येथे आढळेल त्याला या वसाहतीतून घालविले जाईल, किंवा या वसाहतीबाहेर जाण्याचा हुकूम त्याला दिला जाईल.

अशा कायद्याप्रमाणे, गुन्हा केल्याबद्दल किंवा त्याच्या अटी न पाळल्याबद्दल त्यालाही शिक्षा होईल. मात्र त्याला ज्या गुन्ह्यांबद्दल या वसाहतीबाहेर क्षमा केलेली असेल, तो गुन्हा केल्याबद्दल ही शिक्षा होणार नाही.

(५) १९०२ च्या वेडेपणाच्या कायद्याप्रमाणे किंवा त्याच्या दुरुस्ती-प्रमाणे, जो वेडा आहे असा माणूस.

(६) महारोग असलेला किंवा, नियमाप्रमाणे वेळोवेळी जाहीर केलेला घृणास्पद किंवा भयप्रद असा संसर्गजन्य रोग असलेला माणूस.

(७) राज्यसचिवाने, किंवा (ब्रिटिश अथवा विदेशी) वसाहतीच्या सरकारी अधिकाऱ्याने अथवा दुसऱ्या कोणत्याही देशाच्या राजनैतिक अधिकाऱ्याने अधिकृतपणे दिलेल्या माहितीवरून मंत्र्याला, अनिष्ट वाटणारा माणूस.

(८) या वसाहतीत जो माणूस आल्यामुळे येथील शांततेला, सुव्यवस्थेला व सुशासनाला धोका येईल, असे मंत्र्याला सकारण वाटेल, असा माणूस.

मात्र यात, पुढील माणसांचा अंतर्भाव होणार नाही.

(अ) बादशहांच्या नित्याच्या सेनेचे घटक.

(ब) परराष्ट्रांच्या सरकारी जहाजाचे अधिकारी व नाविक.

(क) बादशहांच्या, किंवा परराष्ट्रीय सरकारच्या अधिकारामुळे, आपली पत्नी, कुटुंब व नोकरी, यांच्यासह ज्याला या वसाहतीत येण्याचे प्रमाण-पत्र मिळाले आहे, असा माणूस.

(ड) दक्षिण आफ्रिकेमध्ये बादशहांच्या स्वयंसेवक-सेनेत ज्याने काम केले आहे, आणि त्यातून इमानाने जो मुक्त झाला आहे व 'प्रतिबंधित प्रवेशकाच्या' व्याख्येतील, (३), (४), (५), (६), (७) किंवा (८) या पोटकलमांखाली जो येत नाही असा माणूस.

(इ) प्रतिबंधित प्रवेशक नसलेल्या माणसाची पत्नी किंवा अज्ञान मूल.

फ) विषुववृत्ताच्या दक्षिणेस असलेल्या आफ्रिकेतील आदिवासी वंशाचे वंशज असून– आणि जे प्रतिबंधित प्रवेशकाच्या व्याख्येतील (३), (४), (६), (७), किंवा (८) या पोटकलमाखाली येत नाहीत ते.

(ग) शेतीवरील किंवा घरगुती नोकर, कुशल कारागीर, मेस्त्री, मजूर, किंवा खाण-कामगार अशा युरोपियन लोकांनी,

इंग्लंडमधील या वसाहतीच्या एजंट जनरलने, किंवा गव्हर्नरने या कामासाठी नेमलेल्या, इंग्लंडमधील किंवा दुसरीकडील अधिकाऱ्याने दिलेले प्रमाण-पत्र दाखविले, तर ते युरोपियन लोक, त्या प्रमाणपत्रात, तो माणूस या वसाहतीत येताक्षणीच येथील प्रतिष्ठित मालकाकडे योग्य वेतनावर व योग्य मुदती-पर्यंत, नोकरीस राहील असे लिहिलेले असावे.

' निर्बंध ' किंवा नियम याचा अर्थ या कायद्याच्या पंधराव्या कलमाप्रमाणे केलेला कोणताही निर्बंध.

३. (१) संसदेने मंजूर केलेल्या रकमेतून गव्हर्नर ' प्रवेश–खाते ' स्थापन करील व चालवील. ते मंत्र्याच्या किंवा गव्हर्नर वेळोवेळी नेमील त्या अधिकाऱ्याच्या अखत्यारात राहील.

(२) या खात्याचे कार्य, या वसाहतीत येणाऱ्या प्रवाश्यांना प्रतिबंध करण्यास आवश्यक किंवा आनुषंगिक असे, या वसाहतीतील किंवा बाहेरील सर्व काम करणे आणि प्रतिबंधित प्रवेशकांना येथून घालवून लावणे व या कायद्याने किंवा निर्बंधाने दिलेले किंवा लादलेले अधिकार अथवा कर्तव्ये पार पाडणे.

(३) गव्हर्नरने, या खात्याच्या कारभारास मदत करण्यासाठी, अवश्य किंवा अयुक्त वाटतील ते अधिकार वेळोवेळी नेमावे किंवा काढावे त्या अधिकाऱ्यांना, या कायद्याने किंवा निर्बंधाने, दिलेले अधिकार किंवा कर्तव्ये, या वसाहतीत किंवा बाहेर पार पाडणे, हे त्या अधिकाऱ्यांचे कर्तव्य राहील.

४. या कायद्याचा उद्देश व हेतू साध्य करण्यासाठी ज्या ज्या गोष्टी किंवा कृत्ये करणे अवश्य किंवा उपयुक्त असेल, त्या करण्यासाठी द. आफ्रिकेतील कोणत्याही वसाहतीशी, किंवा प्रदेशाशी, गव्हर्नर वेळोवेळी करार करील.

५. जो प्रतिबंधित प्रवेशक या वसाहतीत प्रवेश करील किंवा आढळेल तो गुन्हेगार ठरेल, आणि त्याचा गुन्हा सिद्ध झाल्यावर तो पुढील शिक्षेस पात्र होईल—

(१) १०० पौंडांपर्यंत दंड, तो न दिल्यास ६ महिनेपर्यंत कैद किंवा दंड व कैद या दोन्ही शिक्षा.

(२) मंत्र्याच्या सहीच्या वॉरंटाने, या वसाहतीतून केव्हाही घालवून देणे, तशी हकालपट्टी होईपर्यंत, निर्बंधात सांगितलेल्या कच्च्या कैदेत ठेवणे.

मात्र,—

(अ) त्या प्रतिबंधित प्रवेशकाने एक महिन्याच्या आत, ही वसाहत सोडून जाण्याबद्दल, [प्रत्येकी १०० पौंडांचा] या वसाहतीतील दोन सन्मान्य जामीन दिले, तर त्याला कच्च्या कैदेतून सोडण्यात येईल.

(ब) अशा प्रतिबंधित प्रवेशकाला कैदेची शिक्षा झाल्यास, ती शिक्षा तो या वसाहतीतून जाताच समाप्त होईल.

६. हा कायदा अंमलात आल्या दिवसानंतर, १९०३ च्या अनीतिवट-हुकुमाच्या (३), (१३) व (२१) कलमांचे, किंवा त्यांच्या दुरुस्तीचे उल्लंघन ज्याने केले असेल, व त्यासाठी ज्याला शिक्षा झाली असेल, अशा माणसाला अथवा, जो माणूस या वसाहतीत राहिल्याने येथील शांतता, सुव्यवस्था व सुराज्य यांना धोका पोहोचेल असे मंत्र्याला योग्य कारणावरून वाटेल, त्या माणसाला पकडण्यात येईल व मंत्र्याच्या सहीच्या वॉरंटाने, या वसाहतीबाहेर घालविले जाईल, आणि तसे होईपर्यंत निर्बंधात सांगितलेल्या कच्च्या कैदेत त्याला ठेवले जाईल.

७. जो माणूस,

(१) प्रतिबंधित प्रवेशकाला या वसाहतीत येण्याला किंवा राहण्याला जाणूनबुजून चिथावणी देतो किंवा मदत करतो किंवा

(२) सहाव्या कलमाप्रमाणे, येथून घालविण्याचा हुकूम ज्याला झाला आहे, अशा इसमाला येथे राहण्यास जाणूनबुजून चिथावतो किंवा मदत करतो अगर,

(३) या कायद्याच्या योजना टाळण्याच्या हेतूने, जो माणूस या वसाहतीबाहेरील व्यक्तीशी, मालक म्हणून करार करील, किंवा करण्याचा हेतु मनी धरील अथवा त्या कराराप्रमाणे वागण्यास जो असमर्थ आहे, किंवा समर्थ असण्याची सकारण अपेक्षाही धरता येत नाही, अशा इसमाशी मालक म्हणून करार करील,

तो गुन्हेगार ठरेल, व त्याचा गुन्हा सिद्ध झाल्यावर १०० पौंडांपर्यंत दंड किंवा तो न दिल्यास सहा महिनेपर्यंत कैद, अथवा तो दंड व ती कैद या दोन्ही शिक्षांना तो पात्र होईल.

८. कोणत्याही प्रतिबंधित प्रवेशकाला या वसाहतीत, कोणताही उद्योगधंदा चालविण्यास अथवा, खंडाने किंवा विकत जमीन घेण्यास, अगर अन्य काही हितसंबंध

निर्माण करण्यास, परवाना मिळण्याचा हक्क नाही. या कलमाचे उल्लंघन करून, जो कोणी तसा परवाना मिळवील, किंवा तसा हितसंबंध निर्माण करणारे करार-पत्र अगर इतर कागदपत्र करील, त्याचा गुन्हा, या कायद्याच्या, पाचव्या कलमाप्रमाणे, सिद्ध झाल्यावर, त्याचा तो परवाना किंवा ते करार-पत्र रद्द होईल.

९. प्रतिबंधित प्रवेशक असल्याचा सकारण संशय, असलेला जो माणूस या वसाहतीत आढळेल, त्याला मॅजिस्ट्रेटच्या, जे. पी. च्या, पोलिस अधिकाऱ्याच्या किंवा या खात्यातील अधिकाऱ्याच्या वॉरंटाशिवाय पकडले जाईल आणि कायद्याप्रमाणे चौकशी होण्यासाठी, त्याला रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात शक्य तितक्या लवकर दाखल केले जाईल.

१०. ' या वसाहतीत मला प्रवेश करता येणार नाही, असे मला माहीत नव्हते,' या सबबीवर, किंवा नजरचुकीने प्रवेश दिला गेला म्हणून, अथवा हा प्रतिबंधित प्रवेशक आहे हे उघडकीस न आल्यामुळे, कोणाही प्रतिबंधित प्रवेशकाला, या कायद्याच्या योजनेपासून माफी मिळणार नाही किंवा या वसाहतीत, राहण्यास मुभा मिळणार नाही,

११. या कायद्याप्रमाणे, या वसाहतीबाहेर जाण्याचा हुकूम ज्याला झाला आहे, असा माणूस. आणि या कायद्याच्या विरुद्ध इतर माणसाने वरील माणसाला या वसाहतीत येण्यास किंवा राहण्यास, ज्याने मदत किंवा चिथावणी दिली असेल, त्यालाही या वसाहतीतून, किंवा दक्षिण आफ्रिकेतून बाहेर घालविण्यासाठी सरकारला जो खर्च येईल, तो त्याने दिला पाहिजे, आणि तशी हकलपट्टी होईपर्यंत, त्या माणसाला या वसाहतीत किंवा दुसरीकडे कच्च्या कैदेत ठेवले असल्यास, त्याचाही खर्च त्याने दिला पाहिजे. त्या खात्याच्या अधिकाऱ्याने, खर्चाचा तपशील देणारे, जे प्रमाणपत्र दिले असेल, ते शेरिफला दाखविल्यानंतर, या खर्चाची रक्कम, सुप्रीम कोर्टाच्या निकालात सांगितलेल्या पद्धतीने, त्या माणसाच्या या वसाहतीतील मालमत्तेतून वसूल करण्यात येईल. ती रक्कम, वसाहतीच्या खजिनदाराकडे शेरिफ पाठवील. आणि तो खजिनदार, वर सांगितलेली खर्चाची रक्कम व ती वसूल करण्यास झालेला खर्च वजा करून बाकीची रक्कम त्या माणसाला किंवा त्याने नेमलेल्या माणसाला देईल.

१२. (१) उपाहारगृह, भोजनगृह, वसतिगृह किंवा पैसे, अथवा मौल्यवान वस्तू घेऊन निजण्यासाठी जेथे लोकांना जागा मिळते असे स्थान-यांच्या मालकाचे किंवा व्यवस्थापकाचे हे कर्तव्य आहे की, तशी सोय होताच, प्रत्येक माणसाने आपले नाव, कायमचे राहण्याचे ठिकाण, जन्मस्थान, आणि कोठून आला ते स्थान या सर्वांची नोंद करण्यासाठी एक वही ठेवली पाहिजे व आश्रय घेणाऱ्या प्रत्यकाने त्या वहीत वरील नोंद केली पाहिजे.

(२) ही वही, कोणाही पोलिस अधिकाऱ्याला किंवा या खात्याच्या अधिकाऱ्याला योग्य समयी तपासण्यासाठी मोकळी असावी.

(३) या कलमाच्या अटी जो मान्य करणार नाही, किंवा त्यातील अधिकारानुसार वागणाऱ्या कोणाही अधिकाऱ्याला अडथळा आणील अगर प्रतिबंध करील, किंवा त्या वहीत खोटी नोंद करील तो माणूस गुन्हेगार ठरेल, आणि त्याचा गुन्हा सिद्ध झाल्यावर २० पौंडांपर्यंत दंड, किंवा तो न भरल्यास १ महिन्यापर्यंत कैद अथवा तो दंड व ती कैद या दोन्ही शिक्षा—यांना तो पात्र होईल.

१३. या कायद्याचे किंवा निर्बंधाचे उल्लंघन करून, आपण या वसाहतीत आलो नाही किंवा राहिलो नाही, हे सिद्ध करण्याचा बोजा आरोपीवर पडेल.

१४. या कायद्याचे किंवा निर्बंधाचे उल्लंघन करणाऱ्याला दिलेली कमाल शिक्षा सुनावण्याचा अधिकार, रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेटच्या प्रत्येक कोर्टाला आहे.

१५. खाली दिलेल्या सर्व कारणांसाठी, किंवा त्यातील कोणत्याही कारणासाठी, या कायद्याशी विसंगत नसलेले निर्बंध, गव्हर्नर बनवू, बदलू किंवा वेळोवेळी रद्द करू शकेल.

[अ] या खात्यातील अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये निश्चित करणे.

[ब] या वसाहतीत प्रतिबंधित प्रवेशकाच्या प्रवेशाला प्रतिबंध करणे.

[क] या कायद्याप्रमाणे, या वसाहतीबाहेर, ज्या इसमांना घालविण्याचा हुकूम झाला असेल, त्यांना बाहेर घालविणे.

[ड] या कायद्याप्रमाणे, या वसाहतीबाहेर, ज्या इसमांना घालविण्याचा हुकूम झाला असेल, ते जाईपर्यंत, त्यांना कच्च्या कैदेत ठेवणे.

[इ] प्रतिबंधित प्रवेशकाच्या व्याख्येतील ६ व्या पोटकलमातील, संसर्गजन्य रोग निश्चित करणे.

[फ] प्रतिबंधित प्रवेशकाच्या व्याख्येतून, वगळलेल्या लोकांच्या [i] पोटकलमात सांगितलेल्या प्रमाण-पत्राचे नमुने निश्चित करणे (ii) ५ व ६ कलमान्वये, मंत्र्याने द्यावयाच्या वॉरंटाचे नमुने निश्चित करणे, (iii) १२ व्या कलमाप्रमाणे, ठेवावयाच्या वहीचा नमुना निश्चित करणे.

[ग] या वसाहतीबाहेरील स्थानाकडे जाणाऱ्या, प्रतिबंधित प्रवेशकाला, या वसाहतीतून जाण्यासाठी, अटी निश्चित करणे.

[ह] या कायद्याचे उद्देश व हेतु चांगल्या तऱ्हेने अंमलात आणणे.

या निर्बंधांचे उल्लंघन करणाऱ्याला गव्हर्नरने, नियम बनवून शिक्षा निश्चित कराव्या. १०० पौंडांपर्यंत दंड किंवा तो न दिल्यास सहा महिनेपर्यंत कैद अथवा तो दंड व तशी कैद या दोन्ही शिक्षा--गव्हर्नरने निश्चित कराव्या.

(१६) या कायद्याला, सर्व कामकाजासाठी, १९०७ चा, "प्रवेश नियंत्रण कायदा" म्हणून संबोधले जाईल आणि गव्हर्नरने गॅझेटमध्ये जाहीर केलेल्या तारखे-पासून तो अंमलात येईल.

इंडियन ओपिनियन, १३–७–१९०७.

परिशिष्ट–४

१९०७ च्या आशियावासी कायदा दुरुस्ती कायद्याच्या अठराव्या कलमान्वये केलेले

निर्बंध (नियम)

१. संदर्भाशी विसंगत नसेल तेव्हा, या निर्बंधामध्ये,—

'कायदा' याचा अर्थ— १९०७ चा आशियावासी कायदा—दुरुस्ती कायदा.

'प्रौढ' याचा अर्थ— १६ वर्षे किंवा त्यावरील वयाचा आशियावासी पुरुष.

'अर्जदार' याचा अर्थ— स्वतःच्या नोंदणीसाठी अर्ज करणारा माणूस, किंवा ज्याच्या नोंदणीसाठी पालकाने अर्ज केला आहे, असा माणूस.

'नोंदणीसाठी अर्ज' याचा अर्थ—क्रमांक तीनच्या, निर्बंधात सांगितल्याप्रमाणे, तपशील देऊन व ओळखीच्या खाणाखुणा लिहून त्यात सांगितलेल्या पद्धतीने व नमुन्याने, आशियावासियांच्या रजिस्टर-(नोंदबुक)मध्ये दाखल करावयाचा अर्ज.

'क्षेत्र' याचा अर्थ— या कायद्याच्या चवथ्या कलमाच्या १ ल्या पोट-कलमानुसार वासाहतिक सचिवाने, गॅझेटमध्ये, जाहीर केलेला मॅजिस्ट्रेटचा प्रदेश किंवा त्याचा काही भाग.

'आशियावासी' याचा अर्थ— १८८५ च्या क्र. ३ च्या कायद्यातील, १ ल्या कलमात वर्णिलेला कोणीही पुरुष, मलायात न जन्मलेला आणि दक्षिण आफ्रिकेतील कोणत्याही ब्रिटिश वसाहतीत किंवा प्रदेशात न राहिलेला, १९०४ च्या मजूर आयात वटहुकुमाप्रमाणे, या वसाहतीत न आणलेला आणि चिनी राजदूताच्या नोकरीतील अधिकारी नसलेला (असा पुरुष).

'नोंदणी-पत्र' याचा अर्थ--या कायद्याच्या ३ ऱ्या कलमाच्या १ ल्या पोटकलमाप्रमाणे दिलेले नोंदणी-पत्र.

'पालक' याचा अर्थ--सोळा वर्षांखालील, आशियावासीयाचे आईबाप, किंवा विशिष्ट काळी, तो आशियावासी ज्याच्या देखरेखीखाली, किंवा दक्षतेखाली राहत असेल तो माणूस अथवा तसे कोणी नसल्यास, त्या आशियावासीयाला (कामधंदा देणारा) मालक.

'कायदेशीर धारक' याचा नोंदणीपत्राच्या बाबतीतील अर्थ--ज्याची नोंदणी झाली आहे, आणि ज्याला नोंदणी-पत्र दिलेले आहे असा माणूस.

'अज्ञान' याचा अर्थ--आठ वर्षांवरील व सोळा वर्षांखालील आशियावासी पुरुष.

'पोलिस दल' याचा अर्थ—या वसाहतीत कायद्याने स्थापन झालेले पोलिस दल.

'पोलिस अधिकारी' याचा अर्थ--पोलिस दलाचा कोणताही घटक.

'रजिस्ट्रार' याचा अर्थ— आशियावासीयांची नोंदणी करण्यासाठी गव्हर्नरने नेमलेला अधिकारी आणि त्या नात्याने कायदेशीरपणे काम करणारा कोणताही माणूस.

'रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेट' यामध्ये असिस्टंट रेसिडेण्ट मॅजिस्ट्रेटचा अंतर्भाव होईल.

२. आशियावासीयांच्या नोंदणीचा नमुना याला जोडलेल्या 'अ' अनुसूचीत दिलेल्या नमुन्याप्रमाणे राहील.

३. नोंदणीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना पुढीलप्रमाणे राहील—

(१) प्रौढ अर्जदारासाठी 'ब' अनुसूचीत दिलेला नमुना.
(२) अज्ञान अर्जदारासाठी 'क' अनुसूचीतील नमुना.

४. (अ) स्वतःच्या नोंदणीसाठी, अर्ज करणारा, प्रत्येक प्रौढ, वासाहतिक सचिव त्या प्रदेशासाठी गॅझेटमध्ये, जाहीर करील त्या माणसापुढे, हजर होईल, आणि 'ब' अनुसूचीत सांगितलेली माहिती त्याला देईल. तसेच, पुढील कागदपत्रे अधिकाऱ्यापुढे हजर करील.

(१) १९०२ चा नुकसान भरपाई व शांतता संरक्षण वटहुकूम याअन्वये, किंवा त्याच्या दुरुस्तीन्वये, ट्रान्सवॉलमध्ये येण्यासाठी व राहण्यासाठी दिलेला परवाना.

(२) नोंदणी-पत्र किंवा १८८५ च्या, नंतर दुरुस्त केलेल्या, क्र. ३ च्या कायद्यातील योजनेनुसार नोंदणीची फी दिल्याच्या पावत्या.

(३) नोंदणीसाठी केलेल्या अर्जाच्या पुष्ट्यर्थ योग्य वाटतील ते आपल्याजवळील कोणतेही कागद-पत्र.

(ब) अज्ञानाच्या वतीने, नोंदणीसाठी अर्ज करणाऱ्या पालकाने, वर सांगितलेल्या माणसापुढे, त्या अज्ञानासह हजर व्हावे, आणि त्याला 'क' परिशिष्टात सांगितलेली स्वतःसंबंधीची व त्या अज्ञानासंबंधीची माहिती पुरवावी, आणि मागील 'अ' पोटकलमात सांगितलेले त्या अज्ञानासंबंधीचे कागद-पत्र त्या माणसाला द्यावेत.

(क) वासाहतिक सचिव विशिष्ट क्षेत्रासाठी, गॅझेटमध्ये जे स्थान व जो दिवस जाहीर करील, तेथे व तेव्हा नोंदणीसाठी अर्ज केला पाहिजे.

(ड) वर सांगितल्याप्रमाणे, नोंदणीचा अर्ज स्वीकारण्यासाठी, नेमलेल्या अधिकाऱ्याने तो अर्ज पूर्णपणे भरलेला असल्यास, नोंदणी-पत्र, आणि त्याच्या पुष्ट्यर्थ दिलेले कागद-पत्र, मिळाल्याची पावती आपल्या सहीने अर्जदाराला किंवा पालकाला तत्काळ दिली पाहिजे. ही पावती ड अनुसूचीमध्ये सांगितलेल्या नमुन्याप्रमाणे दोन प्रतींची असेल. त्याची दुसरी प्रत तो अधिकारी अर्ज व पोषक कागद-पत्रे यांच्यासह रजिस्ट्रारकडे ताबडतोब पाठवील.

५. या कायद्याच्या पाचव्या कलमाच्या २-या पोटकलमाप्रमाणे, रजिस्ट्रारने एखाद्या प्रौढाची नोंदणी करण्याचे नाकारले, तर ती नकाराची नोटीस, अनुसूची 'इ'-मधील नमुन्याप्रमाणे असेल, आणि ती अर्जदाराला पाठविली जाईल व मॅजिस्ट्रेटच्या कचेरीच्या मुख्य दरवाज्यावर लावण्यासाठी तिची प्रत रेसिडेंट मॅजिस्ट्रेटकडे पाठविली जाईल.

६. नोंदणी-पत्राचा नमुना अनुसूची 'फ' प्रमाणे राहील.

७. पोलिस अधिकाऱ्याने किंवा वासाहतिक सचिवाने नेमलेल्या अधिकृत माणसाने नोंदणी–पत्राची मागणी केल्यास, प्रत्येक प्रौढाने आपले नोंदणी–पत्र दाखल करावे, आणि त्या अधिकाऱ्याने मागणी केल्यास पुढील माहिती द्यावी—

(१) आपले पूर्ण नाव.
(२) आपले सध्याचे निवासस्थान (पत्ता).
(३) नोंदणीसाठी, अर्ज केला, त्या दिवशीचे निवासस्थान.
(४) आपले वय.

याशिवाय त्या पोलिस अधिकाऱ्याच्या किंवा अधिकृत इसमाच्या समक्ष त्याने, पुढील गोष्टींची माहिती द्यावी.

(१) लिहिता येत असेल, तर सहीचा नमुना.
(२) आपल्या आंगठ्यांचे ठसे किंवा आपल्या आंगठ्यांचे व बोटांचे ठसे.

८. पोलीस अधिकाऱ्याने किंवा दुसऱ्या अधिकृत इसमाने नोंदणीपत्र मागितल्यास अज्ञानाच्या पालकाने ते पत्र देऊन शिवाय, पुढील माहिती द्यावी.

(१) आपले पूर्ण नाव.
(२) आपले सध्याचे निवासस्थान (पत्ता).
(३) अज्ञानासाठी, नोंदणीचा अर्ज केला त्या दिवशी त्याचा पालक असणाऱ्या माणसाचे पूर्ण नाव आणि त्या वेळचे त्याचे निवासस्थान.
(४) त्या अज्ञानाचे वय.

तसेच पोलिस अधिकारी किंवा दुसरा अधिकृत इसम यांच्या समक्ष त्या अज्ञानाच्या आंगठ्यांचे ठसे किंवा आंगठ्यांचे व बोटांचे ठसे द्यावेत.

९. आठ वर्षांखालील आशियावासी मुलाच्या प्रत्येक पालकाने, नोंदणी-पत्रासाठी अर्ज करताना त्या सर्व मुलांची पुढील माहिती द्यावी.

(१) त्यांची पूर्ण नावे.
(२) त्यांची वये.
(३) त्यांचे पालकाशी नाते.
(४) प्रत्येकाचे जन्मस्थान.
(५) अन्यत्र जन्मल्यास, ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश केल्याची प्रत्येकाची तारीख.

१०. आपण ज्याचे कायदेशीर धारक आहोत, असे नोंदणी-पत्र हरवल्यास किंवा नष्ट झाल्यास, त्याच्या नूतनीकरणासाठी प्रत्येक आशियावासियाने अर्ज करताना रजिस्ट्रारला पुढील माहिती द्यावी.

(१) अशा नोंदणी-पत्राचा क्रमांक.
(२) आपले पूर्ण नाव.
(३) आपले सध्याचे निवासस्थान (पत्ता).
(४) [अज्ञानाच्या वतीने पालकाने अर्ज केला असल्यास] अज्ञानाचे पूर्ण नाव व वय.

तसेच, रजिस्ट्रार किंवा त्याने नेमलेला अधिकारी यांच्यासमक्ष—

(१) त्याच्या आंगठ्याचे व बोटांचे ठसे किंवा

(२) अज्ञानाच्या वतीने पालकाने अर्ज केला असल्यास त्याच्या स्वतःच्या नोंदणी पत्राचा क्रमांक, त्याच्या उजव्या आंगठ्याचा ठसा आणि त्या अज्ञानाच्या आंगठ्याचे व बोटांचे ठसे.

११. १९०५ च्या मुलकी परवाना वटहुकुमाप्रमाणे किंवा त्याच्या दुरुस्तीप्रमाणे, किंवा नगरपालिकेच्या एखाद्या पोटनियमाप्रमाणे व्यापाराचा परवाना मिळण्यासाठी, स्वतःसाठी अर्ज करणाऱ्या आशियावासियाने आपले नोंदणी-पत्र तसा परवाना देणाऱ्या अधिकाऱ्याला सादर करावे आणि त्याबरोबरच तो अधिकारी मागेल तितक्या आंगठ्यांचे व बोटांचे ठसे द्यावेत.

१२. ट्रान्सवॉलमधून तात्पुरते बाहेर गेलेल्या दुसऱ्या आशियावासी माणसासाठी, व्यापाराचा परवाना मिळावा म्हणून जो आशियावासी माणूस अर्ज करील, त्याने तसा परवाना देण्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्याकडे पुढील गोष्टी द्याव्यात—

(१) आपले स्वतःचे नोंदणी-पत्र.
(२) ज्याच्यासाठी अर्ज केला असेल, त्या आशियावासियाचे पूर्ण नाव.
(३) या आशियावासियाचे सध्याचे निवासस्थान. ज्याच्यासाठी परवाना मिळावा म्हणून अर्ज केला असेल, किंवा ज्याच्या गैरहजेरीत, त्याचा व्यापार चालवावयाचा असेल, त्याचा मुखत्यारनामा किंवा दुसरे अधिकारपत्र अशा मुखत्यारनाम्यावर किंवा दुसऱ्या अधिकारपत्रावर त्या गैरहजर असणाऱ्या माणसाच्या उजव्या आंगठ्याचा स्पष्ट ठसा उमटलेला असला पाहिजे आणि जरूर, तर त्या अधिकृत इसमासमक्ष, त्याने आपल्या स्वतःच्या उजव्या आंगठ्याचा ठसा दिला पाहिजे.

१३. या कायद्याच्या सतराव्या कलमात उल्लेखिलेला, विशिष्ट मुदतीत या वसाहतीमध्ये येण्यासाठी व राहण्यासाठी द्यावयाचा परवाना, अनुसूची 'ग' मध्ये दिलेल्या नमुन्याप्रमाणे असेल.

अनुसूची अ

आशियावासीयांचे नोंदणीबुक

नोंदणी-पत्राचा क्रमांक दिल्याची तारीख	पूर्ण नाव	वंश	जात किंवा पंथ	ट्रान्सवॉलमध्ये राहणाऱ्या कुटुंबाचा तपशील			वर्गीकरण	नोंदणी-पत्राची दुसरी प्रत दिल्याची तारीख	शेरा
				पत्नींची नावे	जो आठ वर्षांहून लहान आहे असा मुलगा किंवा बालक — नाव व वय	पालकाशी नाते			

[कागदाची वरची बाजू]

अनुसूची ब

प्रौढ आशियावासीयाच्या नोंदणीसाठी केलेला अर्ज

पूर्ण नाव..वंश..................................

जात किंवा पंथ......................................वय.................उंची.........

निवासस्थान (पत्ता)..............................धंदा..................................

शरीर-वर्णन ....

....

....

जन्म-ठिकाण..

ट्रान्सवॉल्मध्ये प्रथम प्रवेश केल्याची तारीख.......................................

ता. ३१ मे १९०२ रोजी, कोठे राहिला ? ते ठिकाण..................................

वडिलांचे नाव.............................आईचे नाव.......................................

पत्नीचे नाव.................................राहण्याचे ठिकाण............................

आठ वर्षांखालील, पुत्र किंवा पाल्य पुरुष..

नाव	वय	निवासस्थान	पालकाशी नाते

अर्जदाराची सही..................................

अर्ज घेणाऱ्या व्यक्तीची सही..

तारीख.............कार्यालय.........................

[कागदाची मागील बाजू]

नाव...

उजव्या हाताचे ठसे

आंगठा	तर्जनी	मध्यमा	अनामिका	कनिष्ठिका

डाव्या हाताचे ठसे

आंगठा	तर्जनी	मध्यमा	अनामिका	कनिष्ठिका

एकत्र ठसे

डावा हात	चार बोटे	उजवा हात	चार बोटे

प्रौढाचे ठसे घेणाराचे नाव.........................तारीख.......................

[कागदाची वरची बाजू]

अनुसूची क

अल्पवयीन आशियावासीयाच्या वतीने, केलेला नोंदणी-अर्ज

पालकाचा तपशील

पूर्ण नाव.................................वंश..........................

राहण्याचे ठिकाण...

पालकाचे अज्ञानाशी नाते...

प्रमाण-पत्राचा क्रमांक...

अज्ञानाचा तपशील

पूर्ण नाव..............................वंश..............................

जात किंवा पंथ..........................वय...........................

राहण्याचे ठिकाण.........................धंदा..............................

ता. ३१ मे १९०२ रोजी कोठे राहिला? ते ठिकाण.............................

वडिलांचे नाव...........................आईचे नाव...........................

शरीर वर्णन ....

....

....

जन्म-ठिकाण..

ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश केल्याची तारीख ....

पालकाच्या उजव्या हाताच्या आंगठ्याचा ठसा   पालकाची सही............

अज्ञानाची सही ....

अर्ज स्वीकारणाऱ्या व्यक्तीची सही ....

कार्यालय ....

तारीख ....

[कागदाची मागील बाजू]

नाव..

उजव्या हाताचे ठसे

आंगठा	तर्जनी	मध्यमा	अनामिका	कनिष्ठिका

डाव्या हाताचे ठसे

आंगठा	तर्जनी	मध्यमा	अनामिका	कनिष्ठिका

एकत्र ठसे

डावा हात	चार बोटे	उजवा हात	चार बोटे

अज्ञानाचे ठसे घेणाराचे नाव................ ......तारीख................

अनुसूची ड

अर्ज पावल्याची पोच

..................१९०............

श्री.......................................

....

....यांस,

१९०७ च्या आशियावासी कायदा दुरुस्ती कायद्यान्वये ....वतीने नोंदणीसाठी. तुम्ही केलेला अर्ज व त्याच्या पुष्ट्यर्थ दिलेले, खाली नोंदविलेले कागद-पत्र पोचले.

सही..

कार्यालय......................................

कागदपत्रांचा तपशील..........................

अनुसूची ई

अर्ज नाकारल्याची नोटीस

................१९०..... ....

श्री.................................

....

..................................यांस.

ज्या अर्थी तुम्ही तारीख...........रोजी,...........येथे ट्रान्सवॉलमध्ये, कायदेशीर रहिवासी असल्याबद्दलचा अर्ज आशियावासियांच्या नोंदणी-बुकात नोंदण्यासाठी केला आहे,

आणि ज्या अर्थी त्या अर्जाचा योग्य तो विचार केल्यानंतर तुम्ही ट्रान्सवॉलमधील कायदेशीर रहिवासी नाही असे मला आढळून आले आहे,

त्या अर्थी तुम्हाला ही नोटीस देण्यात येत आहे की, ट्रान्सवॉलमधील कायदेशीर रहिवासी म्हणून तुमची नोंदणी करण्याचे मी नाकारीत आहे आणि १९०७ च्या आशियावासी कायदा दुरुस्ती कायद्याच्या पाचव्या कलमाच्या दुसऱ्या पोट कलमान्वये असे फर्मावतो की, या वसाहतीबाहेर, निघून जाण्याचा हुकूम तुम्हांला का देऊ नये याचे कारण सांगण्यासाठी तुम्ही...........येथे तारीख..........१९०...रोजी सकाळी १० वाजता, रेसिण्डेट मॅजिस्ट्रेटपुढे हजर व्हावे.

सही....................................

आशियावासीयांचा रजिस्ट्रार

अनुसूची फ

नोंदणी-पत्र

पूर्ण नाव...

वंश......................... वय......................... उंची................

तपशीलवार वर्णन...

....

....

सही...................................

आशियावासीयांचा रजिस्ट्रार

उजव्या हाताच्या आंगठ्याचा ठसा

दिल्याची तारीख...............................

धारकाची सही...............................

या प्रमाणपत्राच्या वरच्या बाजूवर आशियावासियांच्या रजिस्ट्रारशिवाय दुसऱ्या कोणी काही फेरबदल किंवा शेरे लिहू नयेत.

अनुसूची ग

तात्पुरता परवाना

…………तारखेपासून………… तारखेपर्यंत ट्रान्सवॉलमध्ये प्रवेश व वास्तव्य करण्याचा परवाना, खाली तपशील दिलेल्या …………………………

यांस देण्यात येत आहे…………………………

तपशीलवार वर्णन

वंश…………………………जात किंवा पंथ…………………………

जन्म ठिकाण…………………वय…………………उंची…………

राहण्याचे ठिकाण…………………………………………………

जेथे जाण्यास निघाला ते ट्रान्सवॉलमधील शहर किंवा स्थान……………………

शरीरवर्णन ……………………………………………………

……………………………………………………………

……………………………………………………………

सही……………………………………………………………

सही…………………………

उजव्या हाताच्या आंगठ्याचा ठसा

आशियावासियांचा रजिस्ट्रार

ठसा घेणारा…………………………

ठिकाण…………………………

तारीख…………………………

परिशिष्ट–५

दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समिती

२८ क्वीन ॲन्स चेंबर्स, ब्रॉडवे,
वेस्ट मिन्स्टर, एस्. डब्ल्यू.
ता. १४ ऑगस्ट, १९०७

नेक नामदार
सर हेन्री, कॅम्पबेल--बॅनर्मन्, जी. सी. बी., पी. सी. ॲन्ड सी.
पंतप्रधान,
यांस,

महाशय,

ट्रान्सवॉलच्या वसाहतीत आपल्या हिंदी बांधवांचा दर्जा काय आहे, व त्यांना कसे वागविले जात आहे याविषयीचे आपले विचार आपणापुढे आदरपूर्वक मांडावे म्हणून, माझ्या समितीचे एक शिष्टमंडळ आपली भेट घेऊ इच्छीत आहे. त्या शिष्टमंडळातील सभासदांची नावे सोबत जोडली आहेत.

प्रास्ताविक स्वरूपात मी पुढील वस्तुस्थिती आपल्याला सादर करावी अशी त्यांची इच्छा आहे--

या वसाहतीतील हिंदी लोकांची संख्या, अलीकडील खानेसुमारीप्रमाणे, सुमारे १०,००० आहे. ही लोकसंख्या बहुधा कायम आहे, असे मी पुढे दाखवीन. त्यांतील बहुसंख्य लोक व्यापारी वर्गाचे आहेत--दुकानदार व फेरीवाले आहेत. बाकीचे लोक माळी, देशी सोनार, शिंपी, इत्यादी नोंदलेले आहेत. हिंदी मजूर, खाणकामगार किंवा कारागीर असा प्रायः कोणीच नाही.

बिगर–आशियावासी परक्या लोकांच्या अडचणीशिवाय 'आशियावासीयांना' [यात हिंदी लोकांचा अंतर्भाव आहे] मागील ट्रान्सवॉल सरकारने विशेष अडचणी भोगावयास लावल्या, हे आपल्याला माहीत असेल. १८८५ च्या ३ ऱ्या कायद्याने, आशियावासियांच्या येथील प्रवेशावर नियंत्रण घातले नसले तरी, ३ पौंडांची नोंदणी फी लादली, नागरिकत्वाचा हक्क प्राप्त करवून घेण्यास मनाई केली. स्थावर मिळकतीची नोंदणी आपल्या नावावर करण्यास बंदी केली आणि विशिष्ट रस्ते, मोहल्ले, व वस्त्या यांच्यामध्येच राहावयास त्यांना भाग पाडले. या अडचणी–त्यांतले त्यांत

नागरिकत्व संपादण्याच्या हक्कांवरील गदा--मुख्यतः वर्णद्वेषामुळे आलेल्या होत्या हे निःसंशय. पूर्वीच्या ग्रॅंडवेट कायद्याप्रमाणे, गोरे व गौरेतर लोक यांच्यामध्ये एक रेषा स्पष्टपणे काढलेली होती. "गोरे व गौरेतर लोक यांच्यामध्ये समानता मुळीच असणार नाही" असे त्या कायद्यात म्हटलेले होते.

या भेदभावाच्या कायद्याविरुद्ध बादशहांच्या मंत्र्यांनी,--विशेषतः लॉर्ड डर्बी व श्री. चेंबरलेन यांनी--ट्रान्सवॉल सरकारकडे, वेळोवेळी असंख्य शिष्टमंडळे नेली होती व निषेधपत्रे पाठविली होती. त्यांचे सार नेक नामदार आल्फ्रेड लिटिलटन यांनी ता. २० जुलै १९०४ रोजी हाय कमिशनरला पाठविलेल्या खलित्यात चांगल्या प्रकारे आले आहे; ते असे—

"युद्ध सुरू होइपर्यंत, ब्रिटिश सरकारने प्रथम एक हक्क म्हणून, व नंतर मुत्सद्देगिरीने मिळविलेल्या १८९५ च्या लवाद निवाड्यानंतर, ट्रान्सवॉलमध्ये राहणाऱ्या हिंदी लोकांचे हितसंबंध सतत सुरक्षित राखले होते. त्या साम्राज्यबंधूंची वागणूक हा मागील दक्षिण आफ्रिकन प्रजासत्ताकाविरुद्ध ब्रिटिश सरकारने चालविलेल्या झगड्याचा एक भाग बनला होता."

युद्धाच्या काळांत दक्षिण आफ्रिकेत स्थायिक झालेल्या हिंदी लोकांनी आपखुषीने रुग्णांची सेवा व इतर प्रकारची जी महत्त्वाची सेवा केली, तिचे स्मरण आपल्याला करून देण्याची गरज नाही. ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना सहजच असा विश्वास वाटला की, ट्रान्सवॉलचा प्रदेश, (ब्रिटिश) साम्राज्यात अंतर्भूत झाल्यामुळे, आपल्या अडचणी तत्काल दूर होतील, आणि इतर प्रजाजनांशी आपल्याला समानता पुनः प्राप्त होईल. पण ट्रान्सवॉल साम्राज्याला जोडल्यानंतर, त्या प्रजासत्ताकाचे कैक जुने कायदे ताबडतोब रद्द झाले तरी, १८८५चा तिसरा कायदा नव्या वसाहतीच्या कायदेबुकात कायम राहिला. त्यामुळे त्या हिंदी लोकांना जी निराशा वाटली, ती शब्दातीत आहे. शिवाय, फक्त युद्धापूर्वीच्या रहिवाश्यांनाच ट्रान्सवॉलमध्ये परत येण्यास मोकळीक ठेवली गेली. नव्या राज्याच्या शत्रूंना दूर ठेवण्यासाठी नव्या सरकारने जो शांतता-संरक्षक वटहुकूम मजूर केला, तो येथे नव्याने येणाऱ्या आशियावासियांना लागू करण्यात आला. येथील स्थायिक आशियावासियांच्या परत येण्यावर देखरेख करण्यासाठी व नियंत्रण घालण्यासाठी एक खास खाते प्रथमच उघडण्यात आले. आपल्या घरी परत येण्यास व उद्योगधंदा चालविण्यास परवाना मिळविण्याच्या कामी, आशियावासियांना पुष्कळ आणि तापदायक विलंब सोसावे लागले. १८८५च्या ३ऱ्या कायद्यातील योजना साम्राज्य सरकारच्या सूचनांमुळे, डच राजवटीत पुष्कळशा प्रमाणात निर्माल्यवत् राहिल्या होत्या. पण त्यांची सक्त अमलबजावणी करण्याचे हाय कमिशनरने १९०३ मध्ये ठरविले. ३ पौंडांची नोंदणी

फी, आपण पूर्वी भरल्याची खात्री जे आशियावासी लोक अधिकाऱ्यांची करून देऊ शकले नाहीत, त्यांना ती फी पुनः द्यावी लागली. पाच हजार सहासष्ट हिंदी लोकांनी व पाचशे पंधरा चिनी लोकांनी एकूण ९०'९ पौंड भरले. नोंदणीचे सारे स्वरूपच बदलले. प्रजासत्ताक असताना जेव्हा केव्हा जरूर पडली तेव्हा, पाच पौंडांची फक्त पावती दिली जाई. आशियावासियांच्या रजिस्ट्रारने १९०४ मध्ये असे जाहीर केले की, मागील डच सरकारने तयार केलेले [तयार केलेले असल्यास] आशियावासियांचे नोंदणी दप्तर कोणत्याही विभागात मिळाले नाही. याला फक्त तीनच अपवाद आहेत. आता फेरनोंदणीला ओळख पटविण्याचे स्वरूप प्रथमच प्राप्त झाले. ३ पौंडाच्या फीच्या केवळ पावतीचे स्वरूप जाऊन, नोंदणी-पत्रात धारकांची नावे, त्यांच्या बायका मुलांची संख्या, धारकांचे वय आणि त्यांच्या विशिष्ट खुणा व आंगठ्यांचे ठसे द्यावे लागले. या योजनेचा निषेध हिंदी जमातीने केला. कारण कायद्याच्या अटी त्यांनी पूर्ण केलेल्या असल्यामुळे फेरनोंदणी करण्याची सक्ती त्यांच्यावर व्हावयास नको होती. पण हाय कमिशनरने त्या निषेधाला उत्तर म्हणून, नव्या योजनेला मान्यता देण्याची शिफारस केली. तसे करताना, त्या लार्डसाहेबांनी त्यांना असे आश्वासन दिले की,

"नोंदणीमुळे तुमचे संरक्षण होईल, असे मला वाटते. त्या नोंदणीला ३ पौंडांचा कर जोडलेला आहे. तो एकदाच घेतला जातो. तो ज्यांनी मागील सरकारला दिला असेल, त्यांनी तसे केल्याचे सिद्ध केले म्हणजे पुरे; मग त्यांना तो पुनः भरावा लागणार नाही. शिवाय, एकदा नोंदणी झाली म्हणजे त्यांचे स्थान पक्के झाले. मग पुनः नोंदणी करण्याची गरज नाही. तसेच नवा परवानाही मिळविण्याची जरुरी नाही. या नोंदणीमुळे तुम्हांला येथे राहण्याचा हक्क मिळतो, आणि येथे येण्याजाण्याचाही हक्क मिळतो."

त्यामुळे, हिंदी समाजाने नव्या फेरनोंदणीला खुषीने संमती दिली आणि कायद्याच्या किंवा दुसऱ्या कसल्या सक्तीशिवाय एकूण एक सर्व माणसांनी जरूर ते परवाने घेतले. पूर्वी वर्णन केलेल्या ओळखीच्या खाणाखुणा त्या परवान्यावर लिहिलेल्या आहेत. असे परवाने प्रत्येक हिंदी माणसाने घेतलेले हिंदी माणसाजवळ आज निरपवादपणे आहेत.

स्थावर मालमत्ता धारण करण्यावरील पूर्वीच्या निर्बंधांत खरोखर काहीही सैलपणा आलेला नाही.

जे बाजार व ज्या वस्त्या आशियावासियांसाठी, [हिंदी लोकांसाठीही] वेगळे राखून ठेवले होते, तेथे त्यांना अलग ठेवण्याच्या प्रश्नावर आणि या वसाहतीत जेथे त्यांना व्यापार करावासा वाटेल तेथे परवाना मागण्याचा हक्क कमी करण्यात आला.

त्यावरही साम्राज्य सरकार व ट्रान्सवॉल वसाहतीचे सरकार यांच्यामध्ये, १९०२ व १९०३ या कालावधीत, पुष्कळ पत्रव्यवहार झाला. प्रिटोरिया व पीटर्सबर्ग येथील हबीब मोटन यांच्या दुकानाचे परवाने नव्याने देण्यास १९०४ मध्ये नकार देण्यात आला. त्याचा परिणाम म्हणजे, वस्त्याबाहेर व्यापार करण्याचा हक्क आशियावासियांना असल्याचे निकालपत्र सुप्रीम कोर्टाने दिले.

ट्रान्सवॉलमधील खाणीमध्ये काम करणाऱ्या मजुरांच्या प्रश्नावर ट्रान्सवॉल सरकार व हिंदुस्थान सरकार यांच्यामध्ये १९०३ साली पत्रव्यवहार झाला तो फोल ठरला. हिंदुस्थान सरकारचा आग्रह असा होता की, या वसाहतीत राहणाऱ्या हिंदी व्यापारी वर्गाच्या अडचणी दूर झाल्या तरच आम्ही [मजूर पाठविण्यास] संमती देऊ. ही अट मान्य करण्यास ट्रान्सवॉल सरकारने मान्यता दिली नाही.

त्याच वर्षी, ट्रान्सवॉल सरकारने साम्राज्य सरकारकडे असे एक संकल्पित बिल पाठविले की, त्यामुळे आशियावासी समाजाला जे हक्क शिल्लक राहिलेले होते, त्यांचीही आणखी काटछाट होण्याचे भय निर्माण झाले. त्याला साम्राज्य सरकारने पुढील शब्दांनी उत्तर दिले—

"त्या देशात सध्या असलेल्या हिंदी लोकांकडून, व्यापारी स्पर्धा निर्माण होईल, या भीतीने नवा कायदा करावा, हे आम्हांस योग्य वाटत नाही. तुलनेने पाहता, हिंदी लोकांची संख्या सध्या लहान आहे, आणि प्रवेशकांवर घालण्यात येणाऱ्या निर्बंधामुळे ती संख्या अधिकच कमी होईल. या भीतीचा आपल्या धोरणावर साम्राज्य सरकारने पूर्वीही कधी प्रभाव पडू दिला नाही. उलट या विषयावरील, मागील दक्षिण आफ्रिकन प्रजासत्ताकाच्या धोरणाविरुद्ध व कायद्याविरुद्ध आमच्या सरकारने सर्व साम्राज्यापुढे व सुसंस्कृत जगापुढे कैक वर्षे पुनःपुनः निषेध केला आहे.

"खरोखर हे कायदे फक्त अंशतःच अंमलात आणले गेले होते. पण आता त्यांची कडक अंमलबजावणी करण्यास साम्राज्य सरकारची मंजूरी मागितली जात आहे. एवढेच नव्हे तर सुप्रीम कोर्टाचे निकाल कायद्याने रद्द करावे अशी मागणी होत आहे. साम्राज्य सरकारने ज्या हक्कांचे निर्धाराने समर्थन केले, ते हक्क सुप्रीम कोर्टाच्या निकालपत्राने हिंदी लोकांना दिलेले आहेत.

"ट्रान्सवॉलमधील काही ब्रिटिश लोक ज्या योजना तुमच्यावर लादू पाहात आहेत, त्यांचे सत्य स्वरूप तेथील ब्रिटिश समाजाला कळत नाही, असे साम्राज्यसरकार मानू शकत नाही. आमच्या इतकेच ते ब्रिटिश लोकही ब्रिटिशांच्या प्रतिष्ठेची काळजी घेणारे आहेत. ती प्रतिष्ठा राखण्यासाठी जरूर तर ते मोठा त्यागही आनंदाने करतील अशी मला खात्री वाटते. ज्या अडचणीविरुद्ध आम्ही पूर्वी तक्रार केली, त्याच अडचणी तेथे राहाणाऱ्या ब्रिटिश प्रजाजनावर आता लादणे, हे साम्राज्य सरकारच्या दृष्टीने राष्ट्रीय

प्रतिष्ठेला हानिकारक आहे. मागील दक्षिण आफ्रिकन प्रजासत्ताकाच्या कायद्याचा योग्य अर्थ घेतल्यास, त्या कायद्यानेही या अडचणी त्यांच्यावर लादल्या नव्हत्या. हे सत्य जेव्हा प्रतीत होईल, तेव्हा त्या वसाहतीतील लोकमत, पुढे आलेल्या मागणीस क्षणभरही पाठिंबा देणार नाही, याविषयी साम्राज्य-सरकारला मुळीच संदेह नाही. ”

सध्याचे सरकार अधिकारावर आल्यामुळे, ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना असा पक्का विश्वास वाटू लागला होता की, सध्याच्या अडचणी दूर झाल्या नाहीत तरी, शिल्लक राहिलेल्या हक्कावरील पुढील आक्रमणापासून तरी आपले खंबीरपणे रक्षण होईल.

आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाला १९०६ साली, परवानगी का नाकारण्यात आली, ती परिस्थिती आपल्या लक्षात असेल. असंख्य विनंत्या व निषेध केले असतानाही ट्रान्सवॉलमधील सध्याच्या जबाबदार सरकारने, साम्राज्य सरकारच्या संमतीने तसाच कायदा मंजूर करून घेतला, याचीही माहिती आपल्याला असेल.

माझ्या समितीने साम्राज्य सरकारकडे व जनरल बोथा यांना व्यक्तिशः जी निवेदने पाठविली, त्यांच्या उत्तरादाखल अशी आश्वासने मिळाली की, प्रस्तुत कायद्याचा अंमल अत्यंत सौम्यपणे व कमीत कमी त्रासदायक रीतीने ट्रान्सवॉल सरकार करील. पण, दुःखाची गोष्ट अशी की, त्या सरकारने, ज्या मूळ वटहुकुमाला मंजूरी नाकारलेली होती, त्याचा कडकपणा कमी करण्याचा काहीही प्रयत्न केला नाही. तसेच त्या कायद्याची बजावणी ज्या निर्बंधांच्या द्वारा व्हावयाची त्यांचा कडकपणाही कमी केला नाही.

या नव्या कायद्याने अखिल हिंदी जमातीमध्ये, कमालीचा संताप उत्पन्न झाला आहे. एरवी, नम्र व कायदा पाळणारे हे लोक आता, पूर्वी कधीही नव्हते, इतके खवळलेले आहेत. ते या कायद्याचा निषेध मुख्यतः पुढील कारणांसाठी करतात—

(१) १९०३ साली, हाय कमिशनरने आम्हांला दिलेल्या आश्वासनांचा भंग याने होतो. त्या आश्वासनामुळे आम्ही खुषीने फेरनोंदणी करण्यास संमती दिली होती.

(२) या देशात राहण्याचा आमचा सध्याचा हक्क या कायद्याने नष्ट होतो. त्याच्या एका फटकाऱ्याने सध्याचे परवाने व नोंदणी–पत्रे रद्द होतात. त्यांच्यावरील आपला हक्क शाबीत करण्याचा बोजा त्याच्या धारकावर पडतो.

(३) गोऱ्या वसाहतवाल्यांच्या द्वेषभावाकडे व संशयी वृत्तीकडे लक्ष देऊन, आम्ही खुषीची नोंदणी पत्करली. त्याऐवजी आता पराकाष्ठेच्या अपमानास्पद परिस्थितीत सक्तीची नोंदणी लादलेली आहे. त्यामुळे संवेदनक्षम हिंदी लोक बंडखोर

होण्याचा संभव आहे. या कायद्यामुळे त्यांच्या सर्व समाजाला दक्षिण आफ्रिकेतील रानटी माणसाच्या दर्शेस पोहोचविले जात आहे. या कायद्यामुळे खालच्या दर्जाची एक अपराधी जात, असा शिक्का त्या लोकांवर बसत आहे.

(४) त्यांना असे भय वाटत आहे की, आपल्या स्वातंत्र्यावर यापुढे येणाऱ्या, नव्या निर्बंधांची आणि असेच कायदे दक्षिण आफ्रिकेतील इतर वसाहतीत अंमलात येण्याची ही केवळ प्रस्तावना आहे.

(५) या देशात आशियावासियांचा लोंढा आणावा म्हणून केलेल्या कटाचे, हे हिंदी लोक एक गुन्हेगार भागीदार आहेत, असे यात गृहीत धरले आहे. या आरोपाचा हिंदी लोकांनी सदैव इन्कार केला आहे, आणि त्यासाठी एक चौकशी-कमिशन नेमण्याची मागणी वारंवार केली आहे.

(६) हा प्रतिगामी कायदा ब्रिटिशांच्या उदात्त परंपरांशी विरोधी आहे.

याप्रमाणे, फेरनोंदणीला या समाजाचा मूलतः विरोध नाही. तशी फेरनोंदणी खुषीने करण्यास त्यांनी खरोखर आपली तयारी दाखविली आहे. अशा भेदनीतीच्या वर्गीय कायद्यांमुळे आपल्या सर्व समाजाचा अपमान व अधःपात होईल, असे त्यांना वाटते.

अलीकडे हिंदी लोकांच्या सार्वजनिक सभा भरल्या होत्या आणि त्यांना २००० पर्यंत हिंदी लोक उपस्थित होते. त्यांत मोठ्या प्रतिष्ठेचे व महत्त्वाचे दुकानदार होते आणि तसेच लहान व्यापारी व फेरीवाले होते. या सर्वांनी अशी प्रतिज्ञा केली की, या नव्या कायद्याप्रमाणे, फेरनोंदणी करावयाची नाही—त्यामुळे कायद्यातील जी मोठ्यातील मोठी शिक्षा मिळेल ती भोगावयाची आणि केवळ आपले वैयक्तिक स्वातंत्र्य, नव्हे तर, या जगातील आपले सर्वस्वही गमावावे लागले तरी चालेल. प्रिटोरियातील आशियावासियांना अशी नोटीस देण्यात आली होती की, चालू महिन्याच्या सुरुवातीपूर्वी नव्या नोंदणी—पत्रासाठी तुम्ही अर्ज केले पाहिजेत. जबरदस्त दंड व हद्दपारी भोगण्याची तयारी करून ते लोक नोंदणीपासून दूर राहिले.

माझ्या समितीच्या निवेदनाखेरीज खुद्द हिंदी लोकांनी ट्रान्सवॉल सरकारला अशी असंख्य विनंती-पत्रे पाठविली की, या प्रकरणाचा आमच्या दृष्टीने विचार करा. पण व्यर्थ.

आता, साम्राज्य सरकारने हस्तक्षेप करण्याची वेळ आली आहे, असे माझ्या समितीचे मत आहे. ट्रान्सवालमधील हिंदी लोकांना साम्राज्यातील सुसंस्कृत नागरिक म्हणून जे हक्क प्राप्त व्हावयास हवेत, ते त्यांना मिळालेले नाहीत; आणि (ट्रान्सवॉल)

खालसा केल्यानंतर नवे निर्बंध येण्यापासून साम्राज्य सरकारकडून जे संरक्षण मिळावयास हवे ते अद्याप मिळालेले नाही, असे आमचे नम्र मत आम्ही आपल्यापुढे आदराने पण आग्रहाने मांडतो.

हिंदी लोकांच्या मागण्या फार सौम्य आहेत.

(१) सक्तीची फेरनोंदणी करावयास लावणारा नवा कायदा रद्द व्हावा. त्याचा पर्याय म्हणून खुषीने फेरनोंदणी करण्याची आमची मागणी मान्य व्हावी. सध्याची नोंदणी-पत्रे परत करावीत आणि उभय पक्षांना मान्य असणारी नवी प्रमाण-पत्रे द्यावीत. खुषीची नोंदणी होणार नाही, असे सहसा घडणार नाही. पण तसे कोठे घडले तर, असा एक लहानसा कायदा करावा की, त्यामुळे नवे नोंदणी–पत्र जवळ न बाळगणाऱ्या आशियावासियाची हकालपट्टी व्हावी.

(२) हिंदी लोकांपुरता १८८५ चा ३ रा कायदा रद्द व्हावा.

परंतु

(अ) आशियावासियांच्या प्रवेशाला मर्यादा घालण्याचा युरोपियन वसाहतवाल्यांचा हक्क कबूल आहे. अशी मर्यादा शांतता-संरक्षक वटहुकुमाने आता घातली जात आहे आणि ती अधिक घालण्यासाठी ' प्रवेश निर्बंध बिल ' गॅझेटमध्ये येऊन चुकलेले आहे.

(ब) परवाना-मंडळाने व्यापाराचे परवाने देण्यावर नियंत्रण असावे आणि त्या मंडळाच्या निर्णयावर सुप्रीम कोर्टाकडे दाद मागण्याचा अधिकार असावा, हेही मान्य आहे.

(क) गोऱ्या वसाहतवाल्यांच्या सध्याच्या द्वेष-भावाला मान देण्यासाठी, नगरपालिकेचे किंवा राजकीय अधिकार मागण्यात येत नाहीत.

ही बाब केवळ वसाहतीतील अंतर्गत प्रश्नांना स्पर्श करणारी नाही, तर साम्राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे आणि तिचे परिणाम दूरगामी होणार आहेत, हे सांगण्याची गरज नाही. साम्राज्य सरकारने प्रस्तुतच्या हिंदी लोकांच्या वतीने, ट्रान्सवॉल सरकारला मित्रभावाने काही सांगितले, तर त्याचा स्पष्ट परिणाम होईल, असा अंदाज आम्हांला विश्वासपूर्वक वाटत आहे.

शिष्टमंडळाची भेट घेण्याची इच्छा आपण कळविली तर कृपा करून आपण वेगवेगळ्या तारखा द्याव्या. कारण माझ्या समितीच्या काही सभासदांची भिन्न भिन्न कामे आहेत आणि ती दूर टाकणे त्याना कठीण जाईल.

आपला
एल्. डब्ल्यू. रिच्
कार्यवाह

इंडिया ऑफिस रेकॉर्ड्स, जे. ॲन्ड. पी. ३।१।२।०७

परिशिष्ट-६

' सविनय प्रतिकाराचे नीतिशास्त्र ' या विषयावरील निबंधासाठी दहा गिनींचे बक्षिस

ज्या अर्थी,आपल्या विवेक-बुद्धीवर आक्रमण करणाऱ्या कायद्याविरुद्ध ट्रान्सवॉल-मधील हिंदी लोकांनी, सविनय प्रतिकाराचा जो लढा आता चालविलेला आहे, त्याचा पुढाकार या वृत्तपत्राने नम्रपणे घेतलेला आहे आणि ज्या अर्थी या वृत्तपत्राच्या धोरणाचे नियामकांना सविनय प्रतिकाराच्या तत्त्वाची सर्वसाधारण उपयुक्तता दाखविण्याची इच्छा आहे, त्या अर्थी या वृत्तपत्राच्या व्यवस्थापकांनी ' सविनय प्रतिकाराच्या नीतिशास्त्रावरील ' उत्कृष्ट निबंधास दहा गिनींचे बक्षीस देण्याचे ठरविले आहे. या तत्त्वाचा अर्थ धार्मिक दृष्टीने लावला तर, 'अन्यायाचा प्रतिकार (अन्यायाने) करू नका ' या येशूच्या सुप्रसिद्ध वचनाची पूर्तता होईल. त्या दृष्टीने हे तत्त्व सदैव व सर्वत्र लागू पडण्यासारखे आहे. त्याचे आचरण मोठ्या प्रमाणावर झाले तर, अन्यायाचे निवारण करण्यासाठी किंवा सुधारणा सुरू करण्यासाठी पाशवी शक्तीसारखी जी साधने वापरली जातात त्यांची जागा पूर्णतः नसली तरी पुष्कळ मोठ्या प्रमाणात हे तत्त्व घेऊ शकेल. म्हणून, व्यवस्थापकांना असा विश्वास वाटतो की, दक्षिण आफ्रिकेतील ज्या थोर लोकांना सवड असेल, ते या बक्षिसाच्या स्पर्धेत भाग घेतील. अर्थात् त्यात त्यांचा हेतु आर्थिक लाभाचा असणार नाही तर एका जीवन-मूल्याचे स्पष्टीकरण करण्याचा असेल. या जीवन-मूल्याला जगातील थोर थोर माणसांनी मान्यता दिली असली तरी अद्याप त्याचे आकलन थोडेच झालेले आहे. आणि त्याचे आचरण तर त्याहूनही थोडे आहे.

स्पर्धेच्या अटी पुढीलप्रमाणे आहेत—

(१) निबंध कागदाच्या एकाच बाजूवर स्वच्छ लिहिलेला असावा—टंकलिखित असल्यास उत्तम. हस्तलिखितावर स्पर्धकाचे नाव असू नये.

(२) त्याचे चार भाग पाडावेत आणि इंडियन ओपिनियनच्या दहा स्तंभांपेक्षा अधिक तो असू नये.

(३) त्यात ' सविनय कायदेभंगाचे कर्तव्य ' हा थोरोचा सुप्रसिद्ध निबंध, ' वैकुंठीचे राज्य तुझ्या अंतरी ' इत्यादी टॉलस्टायचे ग्रंथ यांची छाननी असावी

आणि बायबल वगैरे धर्मग्रंथातील उतारे व दाखले त्यात दिलेले असावेत. ‘ सॉक्रेटिसची माफी ’ याचा या प्रश्नाशी संबंध कसा आहे, हेही दाखवावे. या तत्त्वाच्या पुष्ट्यर्थ अर्वाचीन इतिहासातील उदाहरणे निबंधात द्यावी.

(४) ‘ संपादक, इंडियन ओपिनियन, फीनिक्स, नाताळ, ’ या पत्त्यावर निबंध पाठवावा आणि तो या महिन्याच्या तीस तारखेच्या आत पोचावा.

(५) आलेल्या, निबंधातील कोणताही निबंध प्रसिद्ध करण्याचा आणि त्याचे भाषांतर करण्याचा हक्क व्यवस्थापकांनी आपल्याकडे राखून ठेवला आहे. कोणताच निबंध योग्य न वाटल्यास सारे निबंध नामंजूर करण्याचाही हक्क त्यांच्याकडे आहे.[1]

इंडियन ओपिनियन ९-११-१९०७

१. वरील सूचना ता. ३०-११-१९०७ च्या इंडियन ओपिनियनमध्ये पुनः प्रसिद्ध झाली. त्या वेळी पुढील टीप जोडण्यात आली—“ रेव्हरंड डॉ. जे. लँडो, पीएच्. डी. (व्हिएन्ना) एम्. ए. (केप) यांनी निबंध तपासण्याचे कृपया मान्य केले आहे. निबंधाची मुदत पूर्वी ३० नोव्हेंबर जाहीर केली होती, ती ३१ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. डॉ. लँडो यांनी असा खुलासा केला आहे की, मी हे काम पत्करले याचा अर्थ ‘ सविनय प्रतिकाराचे ’ तत्त्व राजकारणाला लागू करण्याच्या विषयात आपण शिरू इच्छित नाही. माझे कार्य फक्त आलेल्या निबंधाचे वाङ्मयीन व यथार्थ मूल्यमापन करणे एवढेच आहे ”

तथापि, त्यांनी हे काम करण्याचे नाकारले, म्हणून सेंट्रल बॅप्टिस्ट चर्चचे धर्मगुरु रेव्हरंड जे. जे. डोक यांनी निबंध तपासले आणि आपला निकाल ता. १७ जानेवारी १९०८ रोजी दिला. पाहा, ‘ इंडियन ओपिनियन, ’ २५-१-१९०८.

परिशिष्ट–७

ब्रिटिश इंडियन असोसिएशन, जोहान्सबर्ग

मार्च १९०६ ते ऑगस्ट १९०७ पर्यंतच्या जमाखर्चाचा सारांश

	पौं. शि. पे.
रोख नायडूकडून	१८–००–००
,, तामिळ समाजाकडून	२०–००–००
,, हिंदू समाजाकडून	२५–००–००
,, रँडर समितीकडून	२०–००–००
,, हमीदिया इस्लामिया अंजुमनकडून	१४–००–००
,, मध्य दक्षिण आफ्रिका रेल्वेकडून परत आलेली रक्कम	१–०८–०२
,, रायटरकडून परत	१–०२–०६
,, वेस्ट एण्ड हॉलकडून परत	१–१०–००
,, गुजराथ हिंदू समाजाकडून	२२४–१०–०९
,, अलीभाई आकूजींनी जमा केलेले	१७–००–००
,, नायडू आणि कंपनीने जमा केलेले	१–०४–००
,, एम्. इ. गाटूकडून	०–०८–००
,, शिष्टमंडळाच्या हिशेबातून शिल्लक राहिलेले	१६७–०९–०६

	पौं. शि. पे.
रोख लंडन समितीला दिले	२८०–०६–०६
,, तारा	२७–१०–११
,, समुद्री तारा	१९२–०१–०९
,, लिच्टेनस्टिन आणि ब्लेकचा ट्रामसंबंधी खटला इ.	८८–१६–१०
,, कागद, पेन्सिल, पत्र इ.	१–०३-०६
,, लंडन कमिटीला दैनिक ' केप गॅझेट ' व इंडियन ओपिनियन साप्ताहिकाच्या ३० प्रती इत्यादी वृत्तपत्रे पाठविणे	१६–१४–११
,, टंकलेखक	४७–१०–००
,, अर्ज इत्यादींची छपाई	४१–११–०४
,, सभागृहाचे भाडे	२४–१६–०६
,, तिकीटे	४–०७–०४
,, भाडे (रेल्वे, अनेक शिष्टमंडळांसाठी)	२९–०२–०२

	पौं. शि. पे.
रोख सी. एम्. क्लब कडून	३९-१०-००
,, बैठकीत जमा केलेले	३०-१०-००
,, ए. ए. पिल्लेकडून	१-००-००
,, आय्. व्ही. थॉमस कडून	०-१०-००
,, सुलेमान आय्. मियाँ आणि कंपनीकडून	१-१०-००
,, नानजी घेलाकडून	७-००-००
,, स्पेलोनकेनमध्ये वर्गणी	१०-००-००
,, व्यासकडून	०-०२-०४
,, पूर्वी पोच दिलेली रक्कम	१०८-१०-०७
,, पूर्वीची शिल्लक	९४-१७-०५
पौं.	७८१-०२-०९

	पौं. शि. पे.
रोख वृत्तपत्रीय तारा	२-०२-०३
,, अलेक्झँडर	०-१०-०६
,, किरकोळ, जाहिराती इत्यादी	२४-०८-०३
पौं.	७८१-०२-०९

इंडियन ओपिनियन २६-१०-१९०७.

जमाखर्चाचा सारांश

१ सप्टेंबर ते २३ नोव्हेंबर १९०७ पर्यंत

	पौं. शि. पे.
मागील हिशेबातील शिल्लक	९४–१७–०५
कुणब्यांची रोख वर्गणी हस्ते दुलाब भागा	११–००–००
कंडक्टरने न वटविलेले चेक्स	००–१०–००
चिंदेमधील हिंदी लोकांकडून	३३–१५–०९
आल्बर्ट अॅन्ड कंपनी कडून रोख (देणगी)	२५–००–००
प्रिटोरियाचे भाडे जी. पी. व्यासकडून रोख	१–००–००
असोसिएशनच्या खात्यातून काढून घेतलेले रोख	१८–१५–००
हिंदू सोसायटीला विकलेल्या खुर्च्या	१३–०५–०९
रस्टेनबर्ग येथील युनायटेड असेंब्लीकडून	१५–०१–०३
पौंड	२१३–०५–०२

	पौं. शि. पे.
शिष्टमंडळ व असोसिएशनचा हिशेब यासंबंधी जाहिरात	४–१५–००
प्रवेशबिल, दादाभाईचा वाढदिवस, प्रोफेसर गोखले, एस्. बानर्जी आणि राजांचा वाढदिवस या प्रकरणी केलेल्या सागरी तारा	१५–०७–०६
जर्मिस्टन व प्रिटोरिया येथपर्यंतचे भाडे	३–०७–०८
सिंहवाला रंगास्वामीच्या खटल्याबद्दल ग्रेगरोवस्की यांचा वकिली सल्ला घेण्याबद्दल	२–०२–००
वृत्तपत्रे–केप गव्हर्मेंट गॅझेट, लीडर, मेल, इंडियन ओपिनियन साप्ताहिकाच्या ३० प्रती लंडन कमिटीला पाठविणे	१०–०१–००
छपाई-के. डिकिन्सन् अॅन्ड कं. अर्जाची छपाई व बांधणी	१४–०१–०६
तिकीटे	३–०४–०८
किरकोळ	०–१५–०५
तारा–पंडितांचा खटला इत्यादीबद्दल	८–१२–०४
टंकलेखक, सप्टेंबर व नोव्हेंबर	१०–००–००
शिल्लक	१४०–१८–०१
पौं.	२१३–०५–०२

इंडियन ओपिनियन ३०–११–१९०७.

परिशिष्ट–८

हिंदी लोक व ट्रान्सवॉल

एल्. डब्ल्यू. रिच्

प्रस्तावना

ट्रान्सवॉसलमधील हिंदी लोकांच्या गाऱ्हाण्यांचे, संक्षिप्त निवेदन तयार करावे, अशी वारंवार विनंती केली गेल्यामुळे, त्या प्रकरणाचा लहानसा इतिहास लिहिण्याची कल्पना मला आली. या प्रश्नाकडे अधिकाधिक लक्ष देणाऱ्या जनतेपुढे, सत्यस्थिती संक्षेपाने मांडण्याचा हा एक प्रयत्न आहे.

प्रस्तुत लेखक ट्रान्सवॉलमध्ये येण्यापूर्वीच्या वृत्तांतासाठी, सरकारी रिपोर्टांचा (ब्ल्यू–बूक्स) उपयोग लेखकाने केला आहे. गेल्या अठरा वर्षांतील घटना लेखकाच्या स्वानुभवाच्या आहेत.

या लहानशा पुस्तकात वाङ्मयीन गुण असल्याचा दावा नाही. त्यातील भाषा-शैली, वाक्यरचना यांमध्ये जे असंख्य दोष निःसंशय असतील, त्याची लेखकाला पूर्ण जाणीव आहे. केवळ सत्य घटनांकडे वाचकांचे लक्ष सादर वेधलेले आहे.

२८, क्विन ॲन्स चेंबर्स,
एस्. डब्ल्यू. ७–११–१९०७

हिंदी लोक व ट्रान्सवॉल[1]

(डच प्रजासत्ताकाच्या अंमलाखाली)

ट्रान्सवॉलमधील हिंदी लोक ज्या अडचणी सोशीत आहेत, त्यांचा इतिहास १८८५ सालापासून सुरू होतो. त्या वर्षी, साम्राज्य सरकार व ट्रान्सवॉलचे प्रजासत्ताक

१. येथील तळटीपा मुळाप्रमाणे (ब्ल्यू बुकातील) आहेत

सरकार, यांच्यामध्ये वाद सुरू झाला. कारण, त्या सुमारास तथाकथित अरब व्यापाऱ्यां-विरुद्ध कायदा करावा, असा आग्रह त्यांचे प्रतिस्पर्धी असणाऱ्या युरोपियन दुकान-दारांनी ट्रान्सवॉल सरकारला केला. त्या अरब व्यापाऱ्यांपैकी पुष्कळजण खरोखर ब्रिटिश प्रजाजन असलेले हिंदी लोक होते, आणि त्या युरोपियन दुकानदारांपैकी पुष्कळजण ट्रान्सवॉलमधील नागरिक नव्हते की ब्रिटिश प्रजाजनही नव्हते.

लंडनच्या कराराच्या १४ व्या कलमात असे म्हटले आहे की, आदिवासीं-शिवाय (स्थानिक रहिवाश्यांशिवाय) इतर सर्व माणसांनी, दक्षिण आफ्रिकेच्या प्रजात्ताकाच्या कायद्याला मान्यता दिल्यास--

(अ) दक्षिण आफ्रिकी प्रजासत्ताकाच्या कोणत्याही भागात प्रवेश, प्रवास व वास्तव्य आपल्या कुटुंबासह करण्याचे, पूर्ण स्वातंत्र्य त्यांना राहील.

(ब) घरे, कारखाने, गुदामे, दुकाने, आणि बखळी भाड्याने घेणे, किंवा आपल्या ताब्यात ठेवणे, याचा अधिकार त्यांना राहील.

(क) त्यांनी आपला व्यापार स्वतः किंवा आपल्याला योग्य वाटेल, त्या नोकरामार्फत चालवावा.

१८८५ मध्ये, ट्रान्सवॉलच्या राज्य-सचिवाने, लॉर्ड डर्बी (त्या वेळीचे वसाहत-मंत्री) यांना आपल्या सरकारची अशी योजना कळविली की, या प्रजासत्ताकात स्थायिक झालेल्या प्राच्य लोकांचे, (बहुतेक दुकानदार) नियंत्रण करण्यासाठी एक कायदा करावयाचा आहे. तरी वर उल्लेखिलेल्या १४ व्या कलमाप्रमाणे, असा कायदा नियमास धरून होईल ना, याविषयी साम्राज्य सरकारने आपले मत कळवावे.

तेव्हाचे हाय कमिशनर सर हर्क्युलस रॉबिन्सन यांनी, राज्य-सचिवाच्या त्या पत्राला पुष्टि देताना, अशी शिफारस केली की, वरील १४ व्या कलमात दुरुस्ती करून 'आदिवासी'च्या ऐवजी, 'आफ्रिकी आदिवासी किंवा आणलेले चिनी मजूर' असे शब्द घालावे. यातील कल्पना अशी की, पूर्वीच स्थायिक झालेल्या 'अरब' व्यापाऱ्यांचे हितसंरक्षण करावे, आणि येणाऱ्या मजुरांसारख्या हलक्या वर्गातील आशियावासीयां-साठी कायदा करण्यास प्रजासत्ताकाला मुभा द्यावी. याचा परिणाम म्हणजे, दक्षिण आफ्रिकी प्रजासत्ताकाने १८८५ चा तिसरा कायदा मंजूर केला, आणि त्यात १८८६ साली दुरुस्ती करून, तो आशियातील आदिवासी जातींच्या माणसांना लागू करण्यात आला. त्यामुळे, त्यांना

(अ) प्रजासत्ताकामध्ये राहाण्याच्या किंवा व्यापार करण्याच्या हक्कासाठी, ३ पौंड फी द्यावी लागेल.

(ब) नागरिकत्वाच्या हक्कापासून त्यांना वंचित करण्यात आले.

(क) आपल्या नावावर नोंदलेली स्थावर मालमत्ता धारण करण्यास त्यांना मनाई करण्यात आली.

(ड) निर्दिष्ट केलेल्या रस्त्यावर, मोहल्ल्यात व वस्त्यांमध्येच, त्यांना वास्तव्य करता येईल.

लौकरच, हिंदी व्यापारी वर्गाकडून तक्रारी ऐकू येऊ लागल्या. प्रजासत्ताकामधील सर्व आशियावासियांना हा कायदा निरपवादपणे लागू करण्याचा आपला हक्क आहे, असा दक्षिण आफ्रिकी प्रजासत्ताकाने दावा सांगितला. खास ट्रान्सवॉलमध्ये, हिंदी मजूर कधीच आलेले नव्हते, हे निश्चित. त्यामुळे, १८८५ चा तिसरा कायदा 'अरब' व्यापाऱ्यांना डोळ्यांपुढे ठेवूनच, घडविण्यात आला होता. ता. ६ जानेवारीच्या वरील योजनेला मान्यता देताना, साम्राज्य सरकारचा हेतु प्रजासत्ताक सरकारसारखा नव्हता, हे उघड आहे.

यानंतर, साम्राज्य सरकारने असे पुनः पुनः कळविले की, क्र. ३ च्या कायद्याचा अर्थ, त्या कायद्याला संमती देण्याच्या वेळी, साम्राज्य सरकारने केलेल्या कराराचे, आणि लंडन कराराचेही उल्लंघन करणारा आहे. याचा परिणाम म्हणजे, समेट होऊन, 'आरोग्याच्या दृष्टीने' हे शब्द रस्ते, मोहल्ले व वस्त्या यांतील वास्तव्य आणि अशा ठिकाणी, स्थावर मालमत्ता धारण करण्याचे हक्क, यांना लागू करण्यात आले. पण येथे, पुनः "दुरुस्ती केल्यानंतरचा कायदाही आरोग्यविषयक आहे आणि म्हणून; तो व्यापारी व वरिष्ठ राहणीचे इतर लोक यांना लागू होणार नाही, तो फक्त मजुरांना लागू होईल, अशी साम्राज्य सरकारची समजूत आहे."[१] म्हणून, त्यांनी दुरुस्त कायद्याला संमती दिली आणि लंडन कराराच्या १४ व्या कलमाच्या उल्लंघनाचा मुद्दा सोडून दिला.

परंतु प्रजासत्ताक सरकारने असे मानले की, हा कायदा सर्व आशियावासियांना सारखाच लागू व्हावा, आणि म्हणून त्यांनी 'वास्तव्य' या शब्दामध्ये, खाजगी घराबरोबर व्यापाराचाही समावेश केला. नंतर त्या दोन सरकारांमध्ये पत्रव्यवहार झाला. त्याचा परिणाम म्हणजे लवादाकडे हे प्रकरण सोपविण्यात आले. त्यांनी एक निवाडा दिला. त्यात असा निकाल दिलेला होता की, या वादग्रस्त कायद्याची अंमलबजावणी करण्याचा पूर्ण हक्क प्रजासत्ताकला आहे. मात्र, "देशातील न्यायालयांनी केलेली सर्वसामान्य अशी एकमेव व्याख्या मान्य केली पाहिजे." हा निवाडा स्वीकारला गेला, तो एवढ्याचपुरता की, "सरकारामध्ये कायदेशीर व आंतरराष्ट्रीय असा जो वादग्रस्त प्रश्न होता, तो मिटला" पण श्री. चेंबरलेन यांना हिंदी व्यापाऱ्यांच्या

१. श्री. लिटल्टन यांचे व्हायकाउंट मिलनर यांना पत्र, ता. २० जुलै १९०४, चे सां. हां. २२, ३९.

विषयी सहानुभूती वाटत असे. त्यांनी त्यांच्या वतीने प्रजासत्ताक सरकारकडे मैत्रीच्या वाटाघाटी करण्याचे स्वातंत्र्य आपल्याकडे उघडपणे राखून ठेवले, आणि तसेच प्रजासत्ताक सरकारला पुढील कारणासाठी बोलावण्याचेही स्वातंत्र्य ठेवले.

"परिस्थितीचा नव्या दृष्टिकोनातून पुनः विचार करणे आणि आपल्या नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने हिंदी लोकांना अधिक औदार्याने वागविणे, शहाणपणाचें होईल काय? याचा निर्णय करणे, तसेच प्रजासत्ताकाच्या प्रशासक वर्गापुढे व्यापारी स्पर्धा नाही असे मी सकारण मानतो. त्या स्पर्धेला आपण थारा देतो, असा भासही प्रजासत्ताकाच्या बाबतीत होऊ नये म्हणून विचार करणे."[1]

१८९८ मध्ये ट्रान्सवॉलच्या सुप्रीम कोर्टाने 'वास्तव्य' याचा अर्थ करताना, त्यात व्यापाराचा समावेश केला. त्याचा परिणाम म्हणजे तय्यब हाजी महम्मद खान, या हिंदी माणसाला प्रिटोरियातील वास्तव्य व व्यापाराचे क्षेत्र यांचा त्याग करण्याची नोटिस मिळाली. हा निर्णय सर्व हिंदी लोकांना निरपवादपणे लागू झाला.

दोन्ही सरकारांमध्ये आणखी पत्रव्यवहार झाला. ट्रान्सवॉल सरकारचा प्रयत्न उघडच यासाठी होता की, वर्णीय दृष्टीने कायदा करावा, आणि क्र. ३ च्या कायद्याची बजावणी करताना, 'केपमधील वर्णीय लोक व आशियावासी लोक' यांचा समावेश करण्याची सूचना त्यांनी मांडली. साम्राज्य सरकारचा प्रयत्न असा होता की, जे केवळ मजूर नाहीत, अशा लोकांना या कायद्याच्या, अपमानास्पद परिणामापासून वाचवावे. श्री. लिटलटन म्हणाले,—

"म्हणून युद्धाचा उद्रेक होईपर्यंत, ब्रिटिश सरकारने, प्रथम हक्क म्हणून, आणि नंतर, १८९५ च्या निवाड्याप्रमाणे, ट्रान्सवॉलमध्ये राहाणाऱ्या हिंदी लोकांचे हितसंरक्षण सतत केले. शिवाय मागील दक्षिण आफ्रिकी प्रजासत्ताकाशी, झगडा करताना या आपल्या प्रजाजनांची वागणूक, हा एक त्यातील मुद्दा मानला गेला."[2]

ट्रान्सवॉलमध्ये राहणाऱ्या हिंदी समाजाविरुद्ध जो पंक्तिप्रपंचाचा कायदा केला गेला, त्याबद्दल इतर प्रमुख मुत्सद्द्यांना काय वाटत होते, हे लॉर्ड लॅन्स्डाऊन व लॉर्ड सेलबोर्न यांच्या इतिहासप्रसिद्ध उद्गारावरून कळून येण्यासारखे आहे. नव्या ट्रान्सवॉलच्या वसाहतीतील, अलिकडील कायद्यामुळे ते उद्गार पुनः सांगणे, योग्य ठरेल. १८९९ मध्ये शेफील्ड येथे भाषण करताना लॉर्ड लॅंड्सडाऊन म्हणाले—

"ट्रान्सवॉलमध्ये, महाराणीच्या हिंदी प्रजाजनांपैकी पुष्कळ लोक आढळतात. त्यांच्या वागवणुकीमुळे मला जितका संताप येतो त्याहून अधिक संताप दक्षिण आफ्रिकी

१. व २. श्री. लिटल्टन यांचे पूर्वी उल्लेखिलेले व्हाइसरॉय मिल्नर यांना पत्र पाहा.

प्रजासत्ताकाच्या कैक दुष्कृत्यांमुळेही येत नाही. त्या ठिकाणी जे लोक हाल भोगतात, त्यांच्यापुरतीच ही आपत्ती मर्यादित नाही. हे गरीब बिचारे लोक जेव्हा आपल्या मायदेशी परत जातील, आणि आपल्या तेथील मित्रांना असे सांगतील की, 'तीस कोटी लोकसंख्येच्या हिंदुस्थानात एवढे बलाढ्य व अजिंक्य असलेल्या महाराणीचे सरकार, लहानशा दक्षिण आफ्रिकी राज्याकडून अन्यायाचे निवारण करून घेण्यास असमर्थ आहे' तेव्हा त्याचा हिंदुस्थानवर काय परिणाम होईल, याची तुम्हीच कल्पना करा."

लॉर्ड सेलबोर्न यांची मतेही कमी प्रभावी नाहीत. त्यांनी असा प्रश्न विचारला,

"ट्रान्सवॉलमधील आपल्या काळ्या बांधवांना तेथे जाण्याचा पूर्ण हक्क होता. त्यांना ज्या तऱ्हेने वागविले जावे, म्हणून महाराणीने आपल्या नावाने अभिवचन दिले, त्या तऱ्हेने त्यांना वागविले जात आहे की नाही, हे पाहणे आपले कर्तव्य आहे की नाही? आपले मत जर माझ्यासारखेच असेल, आणि आपल्या स्वदेश-बांधवांपुढे व इतिहासापुढे आपल्याला विश्वस्त म्हणून या प्रश्नांचे उत्तर द्यावे लागेल, हे जर आपल्याला मान्य असेल, तर आपण आपल्या कर्तव्याचा मार्ग भावनेने न आखता, सत्य घटनांनी, आखला पाहिजे; हे आपण मान्य कराल...सर्व जगातील आपल्या बांधवांचे आपण विश्वस्त आहोत,—नाना वंशांच्या व नाना वर्णांच्या आपल्या बांधवांचे आपण विश्वस्त आहोत. या सर्वांचे आणि त्यांच्या न जन्मलेल्या मुलांचेही आपण विश्वस्त आहोत. म्हणून, अशा संकटकाली, आपण जी कसोटी लावावयाची ती फक्त कर्तव्याची होय. मी ज्यांचा उच्चार केला, त्यांच्या हक्काचे व भवितव्याचे संरक्षण करणे, हे आपले कर्तव्य आहे की नाही?...ब्रिटिश सरकार आपला नावलौकिक आदरणीय ठेवणार की नाही, आणि आपण दिलेली अभिवचने प्रामाणिकपणे पाळणार की नाही? ब्रिटिश प्रजाजनांना महाराणीने जे हक्क मिळवून दिले आहेत, ते सर्व जगभर कोठेही गेले तरी, सर्वांना—मग तो काळा असो वा गोरा असो—मिळतात की नाही, हे ब्रिटिश सरकार पाहणार आहे ना?"

मात्र, हे लक्षात ठेवले पाहिजे की, प्रजासत्ताक सरकारच्या राजवटीमध्ये, क्र. ३ च्या कायद्याचा अंमल इतक्या सौम्यपणे होत होता की तो कायदा वस्तुतः निकामी वाटत होता. ३ पौंडांची फी दिली की पावती अर्थातच मिळत असे, आणि त्या फीची नोंदणी करणे, हीच 'नोंदणी' होती. पण तिची अंमलबजावणी करण्याचा गंभीर प्रयत्न केला जात नसे. काही झाले तरी, ती फी फक्त व्यापाऱ्यांकडून घेतली जात होती आणि तीही सर्वांकडून नव्हे. पण 'नोंदणीच्या' सध्याच्या वादामुळे महत्त्वाची ठरलेली गोष्ट म्हणजे ३ पौंडांची फी देण्याघेण्याच्या बाबत 'नोंदणी' हा शब्द वापरला जात असला तरी, त्या साऱ्या व्यवहारात वैयक्तिक ओळख देण्याचा काहीही प्रकार पूर्वी नव्हता. हा सारा नवा जमाना आहे, आणि तो ट्रान्सवॉल

खालसा झाल्यानंतरच उत्पन्न झालेला आहे. शिवाय, सैलपणे लादलेल्या या ३ पौंडांच्या फीशिवाय दुसरे कोणतेही बंधन आशियावासियांच्या प्रवेशावर नव्हते. या बाबतीत आशियावासियांचे रजिस्ट्रार कॅप्टन हॅमिल्टन फाइल यांनी १९०३ मध्ये केलेला रिपोर्ट उद्बोधक आहे. त्या रिपोर्टात असे म्हटले आहे,--

" मागील डच सरकारने तयार केलेले आशियावासियांचे नोंदणीबुक किंवा दप्तर [जर तसे ठेवलेले असेल तर] कोणत्याही विभागात सापडलेले नाही. याला फक्त ३ अपवाद होते.

ट्रान्सवॉलमधील बहुसंख्य हिंदी लोकांना युद्धकालात या देशाबाहेर जावे लागले. प्रिटोरियावर ब्रिटिश निशाण फडकू लागताच क्र. ३ चा कायदा रद्द होईल, अशी आशा त्या हिंदी लोकांनी मोठ्या विश्वासाने बाळगली होती, यांत आश्चर्य नाही. डच कायद्याच्या तर्कशुद्ध परिणामापासून या हिंदी लोकांना ब्रिटिश नागरिकत्वाने संरक्षिले होते, हे खरे. पण क्र. ३ चा कायदा त्यांना छळत होता, कारण तो त्यांना हीन मानत होता आणि, जेथून त्यांच्यापैकी बहुतेक लोक आले, त्या केप व नाताळ या शेजारच्या वसाहतीत, त्यांना लाभलेल्या दर्जाहून खालचा दर्जा या कायद्याने तात्त्विक-दृष्टया त्यांना दिला.

हिंदी लोकांना नागरिकत्वाचे हक्क संपादण्याला प्रतिबंध करणारे, १८८५ च्या ३ ऱ्या कायद्याचे कलम, काटेकोरपणे पाळले जात होते हे खरे; पण, निर्दिष्ट केलेल्या, रस्त्यावर, मोहल्ल्यात व वस्त्यात, राहण्याची सक्ती प्रजासत्ताक सरकार कधी करीत नव्हते.

ट्रान्सवॉल खालसा केल्यानंतर

ट्रान्सवॉल खालसा केल्यानंतर हिंदी लोकांवर जे प्रथम परिणाम झाले, ते म्हणजे आपण युद्धापूर्वी येथील कायदेशीर रहिवासी होतो अशी अधिकाऱ्यांची खात्री जे आशियावासी प्रवेशक पटवून देऊ शकत नव्हते, त्यांना मनाई करणे.

" सुव्यवस्था व सुराज्य व सार्वजनिक सुरक्षितता राखण्यासाठी, " नव्या सरकारने १९०२ मध्ये शांततासंरक्षक वटहुकूम [१९०३ च्या ५ व्या कायद्याने दुरुस्त केलेला १९०२ चा ३८ वा कायदा] जारी करण्यात आला. लष्करी कायदा परत घेण्यात आला आणि नवा वटहुकूम राजद्रोह व देशद्रोह यांच्यासाठी अस्तित्वात आला. १९०३ च्या दुरुस्तीमुळे, या वसाहतीत येणाऱ्या सर्वांनी परवाने धारण केले पाहिजेत, असे ठरले. त्या परवान्याची अट अशी होती की, राजनिष्ठेची शपथ न घेणाऱ्या नागरिकांना हे परवाने देऊ नयेत. यावरून त्या वटहुकुमाचा उद्देश स्पष्ट होतो. पण या कायद्याचा अंमल, ' हिंदी प्रवेश निर्बंध कायद्यासारखा ' झाला. या

देशाच्या इतिहासात प्रथमच आशियावासी खाते उघडण्यात आले. परवाना देण्याच्या बाबतीत लाचलुचपत व दुरुपयोग झाला; त्याचा परिणाम म्हणजे दोन मोठ्या अधिकाऱ्यांवर खटले झाले, आणि शेवटी ते आशियावासी खाते रद्द करण्यात आले. त्याचे कामकाज परवान्यांच्या मुख्य चिटणिसाकडे सोपविण्यात आले आणि मग 'आशियावासींचा संरक्षक' नांवाच्या अधिकाऱ्याची नेमणूक झाली. १९०२ मध्ये ट्रान्सवॉल सरकारचे काही ठराव हाय कमिशनरने वसाहतमंत्र्याकडे तारेने पाठविले. त्यांत सर्व आशियावासियांनी नोंदणी-पत्रे घ्यावीत असे होते. त्या वेळी ट्रान्सवॉल-मध्ये राहणाऱ्या किंवा तेथे पुढे येणाऱ्या आशियावासियांनी ते नोंदणी-पत्र घ्यावयाचे होते, दरवर्षी ३ पौंड फी देऊन त्याचे नूतनीकरण करून घ्यावयाचे होते, अशा नोंदलेल्या आशियावासियांनी व्यापार व वास्तव्य यांसाठी आपल्याकरिता वेगळे ठेवलेल्या खास वस्त्यांमध्ये राहावयाचे होते. [युरोपियन मालकाजवळ राहाणारे लोक वगळून], सुशिक्षित व सुसंस्कृत आशियावासियांना नोंदणीतून माफ केलेले होते, शहरामध्ये स्थावर मालमत्ता मिळविण्याचा व ताब्यात ठेवण्याचा आशियावासियांना हक्क असावा. या ठरावांना वसाहतमंत्र्याने उत्तर दिले की,—

"दक्षिण आफ्रिकी प्रजासत्ताकाचा निषेध साम्राज्य सरकारने ज्या पद्धतीविरुद्ध इतक्या जोराने व वारंवार केला, तीच पद्धत पुढे चालू ठेवण्याचे, समर्थन करणे अशक्य आहे."[1]

१९०३ मध्ये ट्रान्सवॉल सरकारने हिंदुस्थानातून १०,००० [दहा हजार] मजूर पाठविण्याची सूचना केली होती, तेव्हा हिंदुस्थान सरकारने तिला ज्या एका अटीवर मान्यता दिली ती म्हणजे, ट्रान्सवॉलमध्ये पूर्वीपासून राहात असलेल्या हिंदी लोकांवरील प्रस्तुतचे अन्याय दूर झाले पाहिजेत.

त्याच वर्षी, हाय कमिशनरने वसाहतमंत्र्याला आणखी एक खलिता पाठविला, त्याबरोबर सरकारची एक नोटिसही पाठविली. तिचा आशय असा की, "१८८५ च्या क्र. ३ च्या ज्या कायद्याच्या कलमाची अंमलबजावणी करण्याचे सरकारने ठरविले आहे. ते कलम म्हणजे, केवळ आशियावासियांच्या वास्तव्यासाठी व व्यापारासाठी, आखून दिलेल्या रस्त्यात, मोहल्ल्यात व वस्त्यांत आशियावासियांनी राहिले पाहिजे. अशा वस्त्यांबाहेर व्यापार करण्याचे परवाने आशियावासियांना नाकारले जातील. युद्धाच्या आरंभी बाजाराबाहेर व्यापार करण्याचे परवाने ज्या आशियावासी लोकांजवळ होते त्यांना या वसाहतीत वास्तव्य असेपर्यंत, त्याच अटीवर त्या परवान्याचे नूतनीकरण करून दिले जाईल. पण, हे परवाने दुसऱ्याला देता येणार नाहीत." अशा सर्व निर्बंधांतून सुशिक्षित व सन्मान्य आशियावासी लोक मुक्त आहेत. सध्याच्या

१ श्री. लिटल्टन यांचे, पूर्वी उल्लेखिलेले, व्हायकाऊंट मिलनर यांना पत्र.

अन्यायाला ही मुरड घालण्यात हिंदुस्थान सरकारला खूष करण्याचा हेतू होता, हे उघड आहे. ट्रान्सवॉलमधील सार्वजनिक कार्यासाठी लागणाऱ्या मजुरांची निर्यात करण्यास हिंदुस्थान सरकारने संमती द्यावी म्हणून त्याची ही मनधरणी करण्यात आली. ट्रान्सवॉल सरकारने आणखी असेही सुचविले की, केप व नाताळ येथे चालू असलेल्या कायद्यासारख्या कायद्याने प्रवेशावर निर्बंध घालावा आणि या कायद्याप्रमाणे द्यावयाच्या शैक्षणिक सोयीमध्ये युरोपियन भाषांप्रमाणे हिंदी भाषाही मान्य करावी ही सूचना मूळ हिंदुस्थान सरकारकडून आली होती. पण अधिक विचारान्ती ट्रान्सवॉल सरकारने शेवटची सूचना परत घेतली–आणि तिला विरोध केला. पर्याय म्हणून त्यानी असे सुचविले की—

[अ] केप व नाताळ यातील कायद्याप्रमाणे प्रवेश-नियंत्रण कायदा करावा. त्यात इतर कलमांबरोबर, येणाऱ्या प्रवेशकासाठी शैक्षणिक कसोटी ठेवावी. त्या कसोटीमध्ये हिंदी भाषा घेऊ नयेत.

[ब] हिंदी लोकांच्या बाबतीत सरकारी नोटिसीवर [१९०३ चा क्र. ३५६] आधारलेला व वर उल्लेखिलेला, एक कायदा बनवावा. त्यांमध्ये पुढील तरतूद असावी–

(१) आपली राहणी युरोपियन कल्पनेप्रमाणे आहे, अशी खात्री या वसाहतीच्या वसाहतमंत्र्याची जे आशियावासी करून देतील, त्यांना वस्त्यांबाहेर आपल्या नोकरांसह राहण्यास मुभा द्यावी. क्र. (२)च्या कलमामध्ये, त्यांचा अंतर्भाव नसेल तर त्यांना वस्त्यांबाहेर व्यापार करण्यास मुभा देऊ नये.

(२) युद्धापूर्वी वस्त्यांबाहेर ज्यांचा व्यापार स्थिर झाला होता अशा आशियावासियांना हात लावू नये.

(३) वरील दोन अपवाद वगळल्यास, सर्व आशियावासियांनी वस्त्यामध्ये राहिले पाहिजे व व्यापार केला पाहिजे. त्याबाहेर जमीन धारण करण्यास त्यांना मनाई असावी ही अट, आता धार्मिक कार्यासाठी काढून ठेवलेल्या व वापरण्यात येणाऱ्या, जमिनींना लागू नाही.

(४) विशेष माफी ज्यांना नसेल अशा सर्व आशियावासीयांनी ३ पौंड भरुन नोंदणी-पत्र घेतले पाहिजे.

(५) वरील, प्रवेशविषयक कायदा मंजूर झाला तर फेरीवाल्यांना द्यावयाच्या परवान्यावर काही निर्बंध राहणार नाहीत.

याला उत्तर देताना, वसाहत मंत्र्याने, ट्रान्सवॉलमध्ये पूर्वीपासून राहात असलेले हिंदी लोक, आणि यापुढे येणारे हिंदी लोक यांमध्ये फरक केला. सार्वजनिक आरोग्य राखण्यासाठी जरूर ती समंजसपणाची खबरदारी घ्यावी याशिवाय इतर सर्व निर्बंधां-विरुद्ध त्याने अभिप्राय प्रकट केला. आणि लिहिले की,—

" सध्या या देशात असलेल्या हिंदी लोकांची संख्या तुलनेने अल्प आहे आणि प्रवेशावर घालण्यात येणारे निर्बंध पाहता, ती संख्या याहूनही कमी होत जाईल. अशा हिंदी लोकांकडून व्यापारांत स्पर्धा होईल, ही भीती संकल्पित कायद्याला पुरेसे कारण मानता येत नाही. या भीतीचा पगडा आपल्या मतावर पडू देण्याचे साम्राज्य सरकारने पूर्वी कटाक्षाने टाळले आहे. उलट, या विषयावरील मागील दक्षिण आफ्रिकी प्रजासत्ताकाच्या धोरणाचा व कायद्यांचा निषेध त्यांनी आपल्या साम्राज्यापुढे व सुसंकृत जनापुढे वारंवार कैक वर्षे केला आहे. खरे पाहता, त्या कायद्याची अंमलबजावणी फक्त अंशतःच होत होती, आता साम्राज्य सरकारची त्यांच्या कडक अंमलबजावणीस मंजुरी मागण्यात येत आहे, एवढेच नव्हे तर सुप्रीम कोर्टाचा निकाल कायदा करून बाजूस सारावा अशी मागणी करण्यात येत आहे. ज्या हक्कासाठी साम्राज्य सरकार निकराने झगडले ते हक्क हिंदी लोकांना, या निकालाने दिलेले आहेत. ज्या अन्यायाविरुद्ध आम्ही तक्रार केली आणि जे अन्याय मागील दक्षिणी आफ्रिकी प्रजासत्ताकाच्या कायद्याने [त्यांचा योग्य अर्थ घेतल्यास] हिंदी लोकांवर लादले नाहीत, ते अन्याय स्थायिक हिंदी लोकांवर लादणे राष्ट्राच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणारे आहे, असे साम्राज्य सरकारला वाटते. हे सत्य एकदा का प्रतीत झाले म्हणजे या वसाहतीतील लोकमत पुढे आलेल्या मागणीस कधीही पाठिंबा देणार नाही, याविषयी आम्हांस मुळीच शंका नाही.

" दुसरा वटहुकूम १८८५ च्या ३ ऱ्या कायद्याची जागा घेण्यासाठी सुचविला आहे. त्याने वस्त्यांबाहेर व्यापार करण्यासाठी परवाने मिळविण्याच्या येथील रहिवाश्यांच्या हक्कात हस्तक्षेप करू नये, जमीन धारण करण्याच्या बाबतीत वस्त्यांबाहेर राहण्याचा हक्क असलेल्या हिंदी लोकांना, व्यापारासाठी, वापरण्यात येणारी मालमत्ता संपादण्याचा तरी हक्क असला पाहिजे. "

त्यांनी दुसऱ्या प्रश्नासंबंधी—म्हणजे भावी प्रवेशकासंबंधी—पुढे असे लिहिले—

" साम्राज्यामध्ये हिंदी लोकांना मुक्त संचार करण्यास प्रतिबंध करणे अवश्य झाले आहे. याबद्दल साम्राज्य सरकारला तीव्र दुःख वाटत आहे. तथापि त्या कायद्याच्या धर्तीवर प्रवेशनियंत्रण बिल ट्रान्सवॉलच्या विधानपरिषदेत ताबडतोब मांडण्यास दिलेली मंजुरी ते सरकार परत घेऊ शकत नाही... संकल्पित प्रवेश नियंत्रण वटहुकुमाखाली फारच थोडे लोक येतील, हे खचित, आणि तेही खालच्या वर्गाचे

आशियावासी असणार नाहीत, म्हणून आरोग्याच्या कारणासाठी वेगळ्या वस्तीत त्यांना ठेवावे अशी ती माणसे असणार नाहीत. जोपर्यंत प्रवेशनिर्बंध वटहुकुमाने अपेक्षेप्रमाणे प्रवेशकांची मर्यादा नियंत्रित केली नाही आणि केप वसाहत किंवा नाताळ यातील कायदा येथे नाही, हे सिद्ध होईपर्यंत सध्याच्या बैठकीत मंजूर होणाऱ्या वटहुकुमाने व्यापारासाठी येथे नव्याने येणाऱ्या लोकांचा हक्क मर्यादित करू नये, असे माझे मत आहे."[1]

'वास्तव्य' या शब्दाच्या अर्थाबाबत, १८८५ च्या ३ ऱ्या कायद्याचा जो अर्थ लावला गेला, त्याबाबत, प्रिटोरिया येथील एक व्यापारी हबीब मोटन याने, कोर्टात १९०३ च्या अखेरीस खटला लढविला आणि तो जिंकला हे येथे सांगणे अवश्य आहे. या नव्या निर्णयाचा परिणाम म्हणजे आशियावासियांना वस्त्यांबाहेर व्यापार करण्याचा –राहण्याचा नव्हे, हक्क प्राप्त झाला.

त्याच वर्षी ट्रान्सवॉल सरकारने असा निश्चय केला की, ३ पौंडांची प्रवेश–फी भरण्याविषयीचे १८८५ च्या ३ ऱ्या कायद्याचे कलम सक्त रीतीने अंमलात आणावयाचे. त्याचे फल म्हणजे ५०६६ हिंदी व ५१५ चिनी यांच्याकडून १६७४३ पौंड वसूल करण्यात आले. आपण प्रजासत्ताक सरकारला ती फी पूर्वी दिल्याची खात्री ते अधिकाऱ्यांना पटवू शकले नाहीत. सर्व आशियावासी समाजाची फेरनोंदणी करण्याचाही निश्चय सरकारने केला होता. पण, त्याचा निषेध हिंदी लोकांनी केला. कायद्याच्या अटी आम्ही पूर्वीच पूर्ण केलेल्या आहेत, असा त्यांचा दावा होता. तथापि, तुम्ही आपला विरोध पुढे मांडू नका, असा सल्ला हाय कमिशनरने दिला. त्यांनी सांगितले की, नोंदणी म्हणजे तुमचे संरक्षण आहे. ते पुढे म्हणाले,

"एकदा तुमचे नाव नोंदणी–वहीवर आले की, तुमचे स्थान कायम झाले. मग तुम्हांला पुनः नोंदणी करावी लागणार नाही की, नवा परवाना घ्यावा लागणार नाही. नोंदणीमुळे, तुम्हांला येथे राहण्याचा आणि जाण्यायेण्याचा हक्क प्राप्त होतो."

हिंदी समाज समेटाला सदैव उत्सुक असतो आणि एवढ्या मोठ्या अधिकाऱ्यावर विश्वास ठेवण्याचा गुण तर त्याच्या ठायी विशेषच आहे. म्हणून हिंदी समाजाने हा सल्ला मान्य केला. नव्या नोंदणी–पत्रावर धारकांची नावे, जन्मस्थान व व्यवसाय, अलीकडील पत्ता व सही, त्यांच्या बायकामुलांची संख्या, धारकांची वये, त्यांच्या विशिष्ट खुणा व आंगठ्याचे ठसे नोंदलेले होते.

अशा प्रकारे 'नोंदणी' ही आशियावासियांच्या [हिंदी लोकांच्याही] ओळखीसाठी केलेली एक योजना होती. पण तरी ती खुषीची नोंदणी होती. भेदमूलक

१. श्री लिटलटन यांचे, पूर्वी उल्लेखिलेले, व्हायकाऊंट मिलनर यांना पत्र.

कायद्याने लादलेली नव्हती. आणि त्यानंतर १९०७ च्या आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाच्या स्वरूपात तशी सक्ती आली.

आशियावासी कायदा दुरुस्ती वटहुकुमाने, [१९०६ च्या क्र. २९ ने] हिंदी लोकांचा दर्जा आणखी खाली नेला. हा वटहुकूम ट्रान्सवॉलच्या जबाबदार सरकारने पुनः जारी केला. त्यामुळे, आशियावासियांच्या नोंदणीविषयीचे, १८८५ च्या बोअर कायदा क्र. ३ च्या क्र. २ च्या कलमाचे, [क] पोटकलम रद्द झाले. त्या कलमाने, फक्त आशियातील मूळ वंशाच्या लोकांना [तथाकथित मजूर, अरब, मलायी, आणि तुर्की प्रदेशातील मुसलमान प्रजाजन यांसह] "व्यापार करण्यासाठी किंवा अन्य कारणासाठी प्रजासत्ताकामध्ये राहावयाचे असेल तर" नाव नोंदणे, अवश्य होते. अशी नोंदणी तेथे आल्यानंतर आठ दिवसांच्या आत केली पाहिजे. हा कायदा अंमलात येण्यापूर्वी, जे लोक प्रजासत्ताकामध्ये स्थायिक झाले होते, त्यांची नोंदणी विनामूल्य व्हावयाची. म्हणजे, आशियावासियांच्या प्रवेशावर काही नियंत्रण नव्हते. पण त्या आशियावासियाने येथे वास्तव्य करण्याचे ठरविले तर, त्याला फक्त ३ पौंड द्यावे लागत आणि आपले नाव 'नोंदवावे' लागे. हे कलम रद्द झाल्याने, फी देऊन, ट्रान्सवॉलमध्ये येण्याचा आशियावासियांचा गर्भित हक्क नष्ट झाला. ब्रिटिशांनी [ट्रान्सवॉलचा] ताबा घेतल्यापासून शांततासंरक्षक वटहुकुमाचा उपयोग आशियावासी प्रवेशकांना अनिष्ट समजून दूर ठेवण्याच्या कामी प्रभावीपणे झाला हे लक्षात घेतले पाहिजे.

१९०७ च्या कायद्याने या वसाहतीत कायदेशीरपणे राहणाऱ्या प्रत्येक आशियावासियाला नव्याने नोंदणी करणे भाग पाडले आहे. त्यासाठी त्याने, या वसाहतीत राहण्याचा आपला हक्क आशियावासियांच्या रजिस्ट्रारला पटवून दिला पाहिजे, आणि तो त्याला पटला तर या कायद्यात सांगितलेल्या नियमाप्रमाणे, स्वतःची तपासणी करून घेतली पाहिजे. ती तपासणी इतकी बारीकसारीक आणि उपमर्दकारक आहे की, त्यामुळे आतापर्यंत नम्रतेने वागणारे हे लोक उघड बंड करण्याकडे वळले. अर्जदाराने आपले पूर्ण नाव, वंश, जात किंवा पंथ, वय, शारीरिक वर्णन, निवासस्थान, व्यवसाय, जन्मस्थान, ट्रान्सवॉलमध्ये प्रथम प्रवेशाची तारीख, ता. ३१मे १९०२ रोजी राहिलेले ठिकाण, आईबापांची नावे, बायकोचे नाव, आठ वर्षाखालील पुत्र व पुरुष पाल्य, त्यांची नावे, वयं आणि पालकाशी नाते, दिले पाहिजे. त्याशिवाय, त्याने आपल्या दोन्ही हातांचे आंगठे, तर्जनी, मध्यमा, अनामिका व कनिष्ठिका यांचे ठसे दिले पाहिजेत, आणि प्रत्येक हाताच्या चार बोटांचे ठसे एकत्र दिले पाहिजेत. याचा अर्थ ट्रान्सवाल सरकारकडून, मिळालेले व लॉर्ड मिल्नर यांनी १९०३ साली कायम केलेले, आशियावासी रहिवाश्यांचे प्रचलित हक्क एकदम रद्द करण्यात आले, आणि ते पुनः सिद्ध करण्याचा बोजा त्यांच्या धारकावर टाकण्यात आला. हाय कमिशनरच्या उपदेशानुसार घेतलेली खुषीची नोंदणी-पत्रे बदलून दुसरी नोंदणी-पत्रे घेतली पाहिजेत

आणि ती, सोळा वर्षांच्या किंवा त्यावरील वयांच्या प्रत्येक आशियावासियाने आपल्या-जवळ सदैव बाळगली पाहिजेत, आणि या वसाहतीत कायद्याने स्थापन झालेल्या पोलिस-दलाच्या कोणत्याही घटकाने किंवा वासाहतिक सचिवाने, अधिकार दिलेल्या कोणत्याही माणसाने मागणी करताच ते नोंदणी-पत्र दाखविले पाहिजे. कायदेशीरपणे येथे रहिवासी असलेल्या व आठ वर्षांवरील वयाच्या साऱ्या आशियावासियांना नोंदणी सक्तीची आहे. सोळा वर्षाखालील अशा मुलाच्या पालकाने, तशी नोंदणी केली नसल्यास तो १०० पौंड दंड किंवा तीन महिने सश्रम कैद, या शिक्षेस पात्र होईल. या वसाहतीतील हिंदी लोकांची तक्रार अशी आहे की, ब्रिटिश वसाहतीमध्ये जारी केलेल्या या कायद्यांमुळे सध्या आमची जी मानखंडना होत आहे, तिच्या मानाने, ट्रान्सवॉलच्या प्रजासत्ताक सरकारने भेदमूलक कायदा करून आमचा जो अपमान केला, तो काहीच नव्हे. त्यांचे म्हणणे असे की, या कायद्यांमुळे आम्हांला निरंतर हीन, अनिष्ट असे मानलेले असून वहिमी किंवा गुन्हेगार लोकांप्रमाणे, ओळख देणे व देखरेख ठेवणे भाग पाडण्याइतके अविश्वासार्ह आम्हांला मानण्यात येते. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, या वसाहतीत कायदेशीरपणे राहणाऱ्या आशिया-वासियांना हा कायदा लागू आहे, आणि [ब्रिटिश साम्राज्याला] जोडण्यापूर्वी ट्रान्सवॉलमध्ये स्थायिक झालेले आशियावासीच 'कायदेशीर रहिवासी' आहेत. हा कायदा घडविणाऱ्यांनी, असा खुलासा केला होता की, या देशात बेकायदा प्रवेश करणाऱ्या हिंदी लोकांचा मोठा लोंढा लोटत असल्याने या कायद्याची जरूरी आहे. अशा मोठ्या लोंढ्याचा समाधानकारक पुरावा अद्याप पुढे आलेला नाही. १९०३ सालच्या अखेरीस, आशियावासीयांचे रजिस्ट्रार कॅप्टन हॅमिल्टन फाऊल यांना या तथाकथित बेकायदा लोंढ्यासंबंधी प्रश्न विचारला असता, त्यांनी उत्तर दिले की, "या वसाहतीत आशियावासी लोक अनधिकृतपणे येत आहेत, असे मानण्याला काही कारण नाही." त्यांनी पुढे असेही सांगितले की, १९०३ च्या प्रारंभी, जरूर ते अधिकारपत्र नसताना, पुष्कळ आशियावासी लोक या वसाहतीत प्रवेश करू शकले, पण त्यांना तत्काळ पकडण्यात आले आणि तडी-पार करण्यात आले. ते पुढे म्हणाले, "या वसाहतीत, आशियावासियाला दीर्घकाल अनधिकृतपणे, चोरून राहता येणे सामान्यतः अशक्य आहे." अलीकडील चामनी निवेदनात, चोरट्या प्रवेशाचा मोघम व पोकळ आरोप केलेला आहे. वटहुकूम सुरू करण्याचे समर्थन करावे, या हेतूनेच तो आरोप केलेला आहे, हे उघड दिसते. थोडक्यात म्हणजे, "ता. ३१ डिसेंबर १९०६ रोजी संपणाऱ्या वर्षात कायदेशीर परवाने नसताना, या वसाहतीत आलेल्या किंवा राहिलेल्या पुरुष आशियावासियांची संख्या ८७६ होती." १९०२ नंतरच्या, चार वर्षांत, केव्हातरी हे 'बेकायदा प्रवेशक' येथे आले असतील, हे आम्ही नाकारीत नाही. यांपैकी, फक्त २१५ लोकांना मॅजिस्ट्रेटपुढे खटला होऊन शिक्षा झाल्या, ही महत्त्वाची गोष्ट आहे.

"खूप लोकांच्या बेकायदा प्रवेशासंबंधीचा" आरडाओरडा आणि येथे राहणारे आशियावासीयांनी या देशात चोरून येऊ पाहणाऱ्या लोकांशी संगनमत केल्याचा आरोप–या दोहोंना उत्तर म्हणून हिंदी समाजाच्या नेत्यांनी चौकशी-कमिशन नेमण्याची व त्यायोगे सारे संशय कायमचे नाहीसे करण्याची विनंती पुनः पुनः केली. या अत्यंत समंजस सूचनेकडे सतत दुर्लक्ष का केले गेले याचा खुलासा झालेला नाही. नव्या नोंदणी कायद्याची गरज व औचित्य समजण्यासाठी हे लक्षात ठेवले पाहिजे की, शांतता संरक्षक वटहुकूम अजून जारी आहे आणि त्याचे उल्लंघन करणाऱ्यास जबरदस्त शिक्षा होत आहेत. या वटहुकुमाच्या साहाय्याने कॅप्टन हॅमिल्टन फाऊल, नव्या आशियावासियांच्या प्रवेशाला परिणामकारकपणे पायबंद घालू शकेल. पुनः प्रवेश मिळण्यासाठी अर्ज करणाऱ्या आशियावासियांना वसाहतीबाहेर डांबून ठेवले जाते आणि तेथे त्यांच्या पुनःप्रवेशाच्या हक्काची कसून तपासणी होते. पण वादासाठी असे आपण गृहीत धरले की, गवगवा केल्याप्रमाणे पुष्कळ लोक येथे चोरून येत आहेत, तरी त्यांना प्रतिबंध करण्याची काही नवी यंत्रणा नव्या नोंदणी-कायद्यात नाही. हा कायदा फक्त कायदेशीर रहिवासी असलेल्या आशियावासियांवर शिक्का मारतो. अनधिकृतपणे येणाऱ्या प्रवेशकांच्या बाबतीत, हा कायदा जास्तीत जास्त एवढेच करू शकतो की, तो या देशात चोरून आल्यानंतर त्याचा शोध लावतो. पण यात हे गृहीत धरले आहे की, ओळखीसाठी बोलावल्यानंतर तो अपराधी दाखल होईल. त्यांनी तसे केले नाही तर, त्याला ओळखून काढण्याच्या कामी नोंदणी कायदा शांतता संरक्षक वटहुकुमापेक्षा अधिक नाही, आणि मग एकच शस्त्र उरते, ते म्हणजे, नवे नोंदणी–पत्र धारण न करणाऱ्या लोकांना व्यापाराचे परवाने नाकारणे. अशा प्रकारे व्यापारी, लहान धंदेवाले, धोबी, इत्यादी या वसाहतीत कायदेशीरपणे दीर्घकाळ सुप्रतिष्ठित असलेल्या हिंदी लोकांच्या समूहावर तुच्छतेचा शिक्का मारला जात आहे आणि मूठभर चोरट्या प्रवेशकांना शोधून काढण्याच्या निमित्ताने, त्यांना पॅरोलवरील गुन्हेगाराच्या दर्जास पोहोचविले जात आहे, असे दिसून येईल. संशयी गुन्हेगारांचा शोध लावण्यासाठी निरपराधी लोकांना हाल भोगावे लागत आहेत.

या कायद्याचे खरे स्वरूप व्यक्त करण्यासाठी त्याच्या शेवटी जे अपमानास्पद निर्बंध जोडलेले आहेत, त्यांना महत्त्व दिले जाते. त्याचा हेतु हिंदी लोकांच्या तक्रारी-वरून इतरांचे लक्ष उडवून लावावे हा आहे. एका कागदाच्या तुकड्यावर बोटांचे ठसे द्यावे लागतात, याची चीड येण्याइतका कमालीचा हळवेपणा हिंदी लोकांमध्ये आहे, याची टर उडविण्यात येते. वकील, डॉक्टर, दीर्घकाळचे सुप्रतिष्ठित व्यापारी आणि सद्गृहस्थ फेरीवालेसुद्धा यांना इतक्या बारीक-सारीक वैयक्तिक ओळखीच्या खाणाखुणा पटविणे हा आपल्या प्रामाणिकपणावर व नावलौकिकावर भयंकर कलंक आहे, असे वाटणे सकारण आहे. तथापि हे निर्बंध कितीही प्रक्षोभक असले तरी ते गौण आहेत, हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे. आणि हिंदी लोकांचा जो मूळ आक्षेप

आहे तो खुद्द त्या कायद्यालाच आहे. त्याच्या अंमलबजावणीच्या तपशिलाला नव्हे. पूर्वी सांगितल्याप्रमाणे, या कायद्याला मान्यता देणे म्हणजे, ब्रिटिश प्रजाजनांपैकी एका विभागावर कायद्याचा सक्तीने शिक्का बसवून आपल्या सर्व समाजाचा अधःपात होणे होय, असे हिंदी लोकांना वाटते. ट्रान्सवॉलच्या ब्रिटिश इंडियन असोसिएशनचे अध्यक्ष श्री. इसाप इस्माइल मियाँ यांनी आपली बाजू संक्षेपाने पुढीलप्रमाणे मांडली आहे :

"बोटांच्या ठशाऐवजी सह्या घेतल्या तरी माझ्या असोसिएशनचे धोरण काडीमात्र बदलणार नाही. या सर्व कायद्यात सक्तीचे जे विष ओतप्रोत भरलेले आहे, ते आक्षेपार्ह आहे आणि हिंदी समाजावर जबरदस्त आघात करणारे आहे...शिक्षा किंवा तिचा कडकपणा यांचा संताप आम्हांस येत नाही, तर हिंदी लोकांचा सर्व समाज हा तोतयेगिरी करून या देशात अनधिकृत प्रवेशकांना चोरून आणणारा आहे, असा समज त्या कायद्याच्या बुडाशी आहे, आणि त्यालाच आमचा तीव्र विरोध आहे व तो योग्य आहे असे मला वाटते...वर वर्णन केलेल्या कृत्यांचा अपराध आपल्याकडून घडत नाही, याची पूर्ण जाणीव असल्यामुळे हिंदी लोक या कायद्याने सूचित केलेल्या अर्थाशी शौर्याने लढत आहेत. हा कायदा घडविणारे लोक त्या अर्थाबद्दल आपल्याला पूर्ण खात्री असल्याचे जाहीरपणे सांगत आहेत."

स्वतःचा व समाजाचा स्वाभिमान राखण्याच्या हेतूनेच बादशहांच्या सुमारे १३,००० राजनिष्ठ प्रजाजनांनी तुरुंगात जाण्याची, भौतिक ऐश्वर्याची हानी सोसण्याची आणि प्रत्यक्ष स्वातंत्र्य गमावण्याची ही प्रतिज्ञा गंभीरपणे केली आहे. "हिंदी लोकांना आपले दुकान व आपला नफा याव्यतिरिक्त आत्मा नाही." असा जो टोमणा वारंवार मारला जातो, त्याला याहून अधिक प्रभावी उत्तर देता येईल काय !

आशियाविरोधी कायद्यांच्या बाबतीत प्रवेश–निर्बंध–बिल हे ट्रान्सवॉलचे नवीन अपत्य आहे. लष्करी कायदा परत घेतल्यानंतर, "सुव्यवस्था व सुराज्य आणि सार्वजनिक सुरक्षितता" यांच्यासाठी, शांततासंरक्षक वटहुकूम कायदेबुकात ठेवणे, आणि अलीकडे आपल्याशी लढत असलेल्या, पण आता राज्य करणाऱ्या मंत्र्यांच्या या वसाहतीत हे घडावे, ही विसंगती आहे. आणि त्यामुळे तो वटहुकूम ताबडतोब रद्द केला जाणे जरूर आहे. हे कार्य प्रवेशनिर्बंध बिलाच्या १ ल्या कलमाने पार पाडलेले आहे. पण त्या कलमाच्या शेवटी पुढील महत्त्वाची अट आहे,

"१९०७ च्या आशियांवासी कायदा दुरुस्ती विधेयकाने दिलेले कोणतेही अधिकार यामुळे रद्द होणार नाहीत. या कायद्यापुरता तो वटहुकूम पूर्ण सामर्थ्याने व प्रभावाने अंमलात राहील."

दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, शांततासंरक्षक वटहुकुमाच्या अटी खास आशियावासीयांना लागू करण्यासाठी राखून ठेवलेल्या आहेत.

या बिलाने नोंदणी-कायदा कायम केला आहे. युद्धापूर्वी ट्रान्सवॉलमध्ये जे राहिले होते, आणि १८८५ च्या ३ ऱ्या कायद्याप्रमाणे, आपल्या वास्तव्याची किंमत म्हणून पुष्कळांनी ३ पौंड भरलेही होते, पण काही ना काही कारणाने जे अद्याप या देशात परत आले नाहीत, त्या हिंदी लोकांचा वास्तव्याचा हक्क याने उडवून लावला आहे.

या देशांत येणाऱ्यांच्या पात्रतेची व्याख्या करून, या बिलाने युरोपियन व यिड्डिश भाषा याशिवाय बाकीच्या भाषांना शैक्षणिक कसोटीतून वगळले आहे.

प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या हिंदी लोकांनी बिलात सांगितलेली परीक्षा उत्तीर्ण केली तरी, आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाप्रमाणे त्यांनी आपले नाव नोंदविले पाहिजे. त्या कायद्यातील नोंदणीविषयीचे निर्बंध बनविलेले होते ते, या वसाहतीत राहणारे बहुसंख्य आशियावासी निरक्षर आहेत, हे गृहीत धरूनच.

या बिलाचे विरोधक असा सकारण युक्तिवाद करतात की, शैक्षणिक कसोटीस उतरण्याइतके एका युरोपियन भाषेचे ज्ञान ज्या हिंदी लोकांना आहे, त्यांनी आपल्या ओळखीच्या खाणाखुणा आपल्याजवळ बाळगाव्या, असे म्हणणे म्हणजे बिलातील शिक्षणविषयक कलमाचा लाभ हिंदी लोकांना अप्रत्यक्षपणे घेऊ न देणे, आणि त्यायोगे त्यांना या देशात प्रवेश करण्यास प्रतिबंध करणे, हे होय; कारण उदार शिक्षण मिळालेला कोणताही हिंदी माणूस त्या बिलातील अटी कधी मान्य करील, हे कोणाच्या कल्पनेतही येणार नाही.

ट्रान्सवॉलमध्ये पूर्वीच स्थायिक झालेल्या हिंदी व्यापाऱ्यांनी आपल्या धंद्यासाठी व व्यापारासाठी कारकून, मुनीम किंवा नोकर आणण्याची काहीच सोय या बिलाने केलेली नाही. ६ व्या कलमाच्या (क) पोट कलमाने आशियावासी कायदा दुरुस्ती अप्रत्यक्षपणे करण्याचा सूक्ष्म प्रयत्न केला आहे. या विधेयकाने बेगुमानपणे आशियावासियांना दंड व कैद अशा शिक्षेची आणि नंतर या वसाहतीतून बाहेर घालविण्याची तरतूद केलेली आहे. तसेच शांततासंरक्षक वटहुकुमाने, बाहेर घालवण्याची अशी नोटीस देण्याचा अधिकार दिलेला आहे. या दोन्ही बाबतीत, या बिलाच्या (क) पोटकलमाने मोठी मजल मारली आहे. त्याने स्थानिक सरकारला असा अधिकार दिला आहे की, आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकानुसार येथून जाण्याची नोटीस दिली असताना, ती न मानणाऱ्या माणसाला त्याच्या खर्चाने, सक्तीने व दंडबळाने हद्दपार करावे. "निषिद्ध प्रवासी" या संज्ञेची बिलात जी व्याख्या केली आहे, तिच्याकडे थोडे लक्ष दिल्याशिवाय या बिलाचे स्वरूप यथार्थपणे आकलन होणे अशक्य आहे.

युरोपियन भाषेत लिहू न शकणारे आशियावासी, यांना निरक्षर, भणंगभिकारी, वेश्या इत्यादिकांच्या पंक्तीत बसविले आहे. तसेच, " एखाद्या गुन्ह्यासाठी, शिक्षा झालेल्या, किंवा या कायद्याची कलमे मोडणाऱ्या माणसाला, या देशाबाहेर जाण्याचा हुकूम झाला असेल, त्या माणसाच्या पंक्तीस बसविले जाईल. शेवटी, या बिलाच्या ६ व्या कलमाने 'निषिद्ध प्रवाश्याला' सक्तीने हद्दपार करण्याची तरतूद केलेली आहे. तसेच, 'जो माणूस या वसाहतीत राहिल्याने येथील शांतता, सुव्यवस्था व सुराज्य यांना धोका पोहोचेल, असे मंत्र्याला सकारण वाटेल,' अशा माणसालाही सक्तीने हद्दपार करण्याची तरतूद आहे.

या शेवटच्या तरतुदी, आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाला सविनय प्रतिकार करणाऱ्या लोकांसाठी व त्यांच्या नेत्यांसाठी आहेत, या विधानावर संयुक्तिकपणे आक्षेप घेतला जातो.

या बिलात, शहाणपणाने अशी तरतूद केलेली आहे की, एखाद्या माणसाला या वसाहतीतून किंवा दक्षिण आफ्रिकेतून बाहेर घालविण्यासाठी अथवा तोपर्यंत या वसाहतीत किंवा अन्यत्र अडकवून ठेवण्यासाठी सरकारला जो खर्च येईल, तो सर्व त्याच्याकडून वसूल केला जाईल. या खात्याच्या अधिकाऱ्याने खर्चाची एकूण रक्कम तपशिलासह लिहिलेले प्रमाणपत्र शेरीफाला दाखविले पाहिजे, म्हणजे सुप्रीम कोर्टाच्या निकालात सांगितलेल्या पद्धतीप्रमाणे, त्याच्या मालमत्तेतून तो खर्च वसूल केला जाईल.

संयुक्तिक कारण

सन्माम्य आशियावासियांशी असे तिरसट वैर ठेवण्यातील हेतू काय ? असा प्रश्न जर कोणी विचारला तर त्याचे उत्तर एकच आहे. १८८५ पासून आजपर्यंत झालेले कायदे आणि या विषयावर केलेली भाषणे व लिहिलेले लेख या सर्वांची पाहणी केली तर हे स्पष्टपणे दिसून येईल की, हा सारा आरडाओरडा मुख्यतः व्यापारी मत्सराचा उद्रेक आहे. प्रथमपासून आतापर्यंत असे दिसून येते की, व्यापारी परवाने हाच हल्ल्याचा मुख्य विषय आहे, व असहाय्य अशा आपल्या प्रतिस्पर्ध्यापासून आपली सुटका व्हावी म्हणून युरोपियन दुकानदाराने प्रजासत्ताकाच्या प्रतिनिधींना १८८५ चा तिसरा कायदा अंमलात आणण्याची प्रेरणा दिली. बाक्सबर्ग, क्रूगर्सडॉर्प, पॉचेफस्ट्रूम वगैरे शहरांतील गोऱ्या लोकांच्या संघांनी, जो आक्रोश केला, त्याच्या शिरोभागी 'मजुरांना परवाने देऊ नका!' ही घोषणा दुमदुमत होती. आशियावासियांना बाजारात कोंबण्याचा १९०३ सालचा प्रयत्न बारगळला, याचे कारण हबीब मोटन विरुद्ध ट्रान्सवॉल सरकार यांच्यातील कसोटीच्या खटल्याने, बाजार व वस्त्या यांच्याबाहेर व्यापार करण्याचा आशियावासियांचा हक्क प्रस्थापित झाला. नव्या नोंदणी

कायद्याच्या योजनांना मान्यता न देणाऱ्या आशियावासियांच्या व्यापारी परवान्यांचे नूतनीकरण न होण्याचे भय आहे.

तथापि, व्यापारी स्पर्धा हे, विधिमंडळाला कृती करण्यास पुरेसे कारण ठरले नसते म्हणून वर्णीय द्वेषाला आवाहन करण्यात आले, आणि ती तर दक्षिण आफ्रिकेतील पैदास आहे; असे दिसते. सध्याच्या वर्णीय लोकसंख्येमध्ये आशियावासियांची भर पडेल आणि त्यामुळे आताची बिकट परिस्थिती आणखी बिघडेल, या कल्पनेमुळे वसाहतवादाची ज्योत भडकली. या युक्तिवादामुळे युद्धपूर्व अभिवचने व बंधने रद्द करण्याला पुरेसे कारण मिळाले, असे दिसले. आणि त्यामुळे अल्पसंख्य हिंदी लोकांचे स्वार्थाच्या वेदीवर बलिदान करणेही समर्थनीय ठरले. ट्रान्सवॉलमधील गोऱ्या लोकांच्या शेकडा ५ टक्क्यांहून कमी, प्रतिनिधित्वाचे अधिकार नसलेले, हिंदी लोक आहेत. ही अल्पसंख्य जमात मुकी आहे. राजकारणात किंवा नगरपालिकेच्या कारभारात तिला प्रतिनिधित्व नाही. " आम्हांला साम्राज्याचे सुसंस्कृत नागरिक म्हणून वागवा " अशी त्यांची सौम्य मागणी कठोरपणे झिडकारण्यात आली. युद्धपूर्व कालांत त्यांना त्यांच्या कार्याच्या प्रसिद्ध पुरस्कर्त्यांनी ज्या आशा दाखविल्या होत्या आणि जी वचने दिली होती, त्यांचे—सर ऑर्थर लॉलि यांच्या मताप्रमाणे—पालन होण्याऐवजी भंगच होत आहे.

हिंदी विरोधी कायद्यांचे स्वरूप सौम्य दिसावे म्हणून असे सांगितले होते की, त्याला अखिल गोऱ्या लोकसंख्येचा एकमुखी पाठिंबा आहे. हे विधान संशयास्पद आहे. उलट असे म्हणतात की, हिंदी व्यापाऱ्यांच्या स्पर्धेतून मुक्त होण्याची ज्यांना स्वार्थामुळे इच्छा आहे त्यांनीच काय ती निश्चित मते प्रकट केली आहेत. खाणी व कारखाने यांच्या मालकांची बहुसंख्या आहे आणि त्यांचा पक्ष विजेता आहे. पण केवळ उदासीनतेमुळे काही गोऱ्या लोकांनी मत प्रदर्शित केले नाही. पण एकमुखी पाठिंबा गृहीत धरला तरी युद्धपूर्व ज्या प्रतिज्ञा व जी वचने स्पष्ट, वा सूचित दिलेली होती आणि ज्यांना हा देश बांधलेला आहे, त्यांना स्वैरपणे धाब्यावर बसवावे, असे कोणी गंभीरपणे म्हणू शकेल काय? तसेच, ट्रान्सवॉलमधील समाजाच्या एका बलिष्ठ विभागाच्या प्रेरणेने दुसऱ्या दुर्बल विभागाला, आपल्या निशाणाचे कृपाछत्र वर असताना, निष्ठुरपणे पायाखाली तुडवावे काय? आणि त्याच्या प्रतिष्ठेचा पदर न् पदर हिरावून घ्यावा काय?

या लहानशा पुस्तकात शक्य असती तर आशियावासीयांच्या हकालपट्टीसाठी ओरड करणाऱ्यांच्या आरोपांची तपशीलवार छाननी करणे मनोरंजक झाले असते. राहणीचा दर्जा कमी होईल. 'अयोग्य स्पर्धा,' "युरोपियन वसाहतवाल्यांशी आशियावासी कधी बरोबरीला येऊ शकत नाहीत आणि म्हणून राष्ट्राच्या संघटनेत, ते एकत्र येणार

नाहीत." इत्यादी आरोप केले जातात. पहिल्या आरोपासंबंधी असे सांगता येईल की, हिंदी लोक ट्रान्सवॉलमधील कामगारवर्गाशी स्पर्धा करीत नाहीत. या वसाहतीत हिंदी मजूर असा नाहीच. आशियावासियांच्या लोकसंख्येपैकी बहुसंख्य लोक दुकानदार व व्यापारी आहेत आणि त्यांपैकी ८८$\frac{9}{2}$ हिंदी लोक आहेत. ते चतुर, चिकाटीचे उद्योगी व धीमे व्यापारी आहेत, हे खरे. पण, त्यांच्या गोऱ्या प्रतिस्पर्ध्यांप्रमाणे, त्यांना भाडे व कर द्यावे लागतात, आपल्या प्राप्तीचा मोठा वाटा ते घाऊक माल आयात करणाऱ्या, [युरोपियनांना] देतात, आणि पुष्कळ वेळेला डॉक्टर, वकील, यंत्रज्ञ वगैरे नोकरीवर ठेवतात. ते मुख्यतः मद्यपानाच्या बाबतीत संयमी आहेत, तुलनेने साधेपणाचे जीवन जगतात आणि आपली संपत्ती उधळीत नाहीत, हे खरे. त्यांचा व्यापार मुख्यतः समाजातील गरीब वर्गाशी चालतो. त्यांच्या स्पर्धेचा परिणाम जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती कमी होण्यात झाला आहे, हे सर्वमान्य आहे.

हिंदी लोकांची राहणी निकृष्ट आहे, हा एक मूर्खपणाचा भ्रम आहे. प्राच्य लोकांच्या आहारातील उत्तम वस्तूंचे आकलन करण्यास सर्वसामान्य पाश्चात्त्य माणूस असमर्थ आहे. विशेषतः अशा बाबतीत तुलना करणे निंद्य असते आणि ती करणाऱ्यांना बहुधा भयप्रद असते. सत्यस्थितीचा परिचय जवळून झाला म्हणजे, हे कळून येईल की, हिंदी लोकांचा आहार खर्चिक नाही. येथे सरळपणाने असा प्रश्न कोणी कदाचित् विचारील की, गरीबातील गरीब अशा हिंदी फेरीवाल्याच्या सुखाच्या कल्पना बिजवोनर, सीरीयन व मामुली रशियन अशा गरीब गोऱ्या लोकांच्या मोठ्या समाजापेक्षा खालच्या प्रतीच्या असतात काय? जुन्या गोऱ्या व्यापाऱ्यांशी चढाओढ करणारे रशियन लोक थोडे नव्हते. हिंदी लोकांची दुकाने आपल्या गोऱ्या शेजाऱ्यांच्या दुकानापेक्षा, कोणत्याही प्रकारे कमी दर्जाची नसतात, हे नाकारता येणार नाही. हिंदी लोक ज्या व्यापाऱ्याशी व्यवहार करतात, त्यांच्याशी ते इतक्या उच्च दर्जाने व सचोटीने वागतात की, त्यावर आक्षेप कोणीच घेऊ शकणार नाही. त्यांच्या सवयी घाणेरड्या असतात अशी टीका केली जाते. या टीकेचा खोटेपणा प्रस्तुत लेखकाने स्वानुभवाने अनेकवार जाणलेला आहे. १९०३–४ मधील प्लेगच्या दिवसात, ही आरोळी विशेष जोराने ठोकली जात होती. तेव्हा स्वतंत्र भिषग्वराकडून निःपक्षपाती तपासणी करून घेणे केवळ स्वसंरक्षणाच्या दृष्टीनेही अवश्य झाले. त्यांच्या प्रमाणपत्रावरून हे निश्चितपणे सिद्ध झाले की, हिंदी लोकांच्या दुकानांची व घरांची बांधणी व सर्वसामान्य व्यवस्था सरासरीपेक्षा पुष्कळच चांगली आहे. जोहान्सबर्गच्या सरहद्दीवरील जुन्या वस्त्यांची आरोग्याच्या दृष्टीने जबाबदार अधिकाऱ्यांनी इतकी निर्लज्जपणे उपेक्षा केली की, ते खरोखर प्लेगचे ठाणे होऊन बसले आणि पुढे ती वस्ती नष्ट करावी लागली हे खरे; पण प्लेगचे जे उच्चाटन झाले ते मुख्यतः तेथे राहणाऱ्या हिंदी लोकांच्या अखंड परिश्रमामुळे, त्यागामुळे व सहकार्यामुळे झाले.

हिंदी माणूस समाजातील इतर वर्गांशी मिसळणारा नाही, हा आरोप म्हणजे, बेडकाला बेडूक म्हणून दगडाने मारणाऱ्या मुलाच्या जुन्या गोष्टीसारखाच नव्हे काय! ट्रान्सवॉलमधील हिंदी माणसाला कायद्याने अस्पृश्य ठरविले आहे आणि त्याला तसेच वागविले जात आहे. शाब्दिक संघातील दोषाकडे लक्ष दिले तर सरसकट सर्व हिंदी लोकांना 'कुली' म्हणून संबोधिले जाते. सरकारी अधिकारीही "कुली वकील," "कुली डॉक्टर," "कुली व्यापारी" असे म्हणत असल्याचे ऐकू येते. त्यांच्या बायकांना "कुली बायका" म्हटले जाते. पूर्वी दाखविल्याप्रमाणे त्याला जीवनामध्ये काही स्थान नाही; जे असेल ते दुसऱ्याच्या मेहेरबानीने. तो स्थावर मालमत्ता गहाण घेऊ शकतो; पण ती विकत घेऊ शकत नाही. आपल्या गोऱ्या वसाहत–बांधवाप्रमाणे तो नगरपालिकेच्या ट्राममधून व सरकारच्या रेल्वेमधून प्रवास करू शकत नाही. त्याच्या मुलांसाठी, शिक्षणाच्या काही सोयी केलेल्या नाहीत. काफीरासाठी ठेवलेल्या शाळात फक्त ती जाऊ शकतात. समाजातील व्यापक जीवनाशी निकटचे साहचर्य जोडण्या-साठी आणि दुसऱ्या वर्गांशी "मिसळण्यासाठी" याहून कमी बाधक परिस्थिती कोणती असू शकेल?

या सर्वांचा निष्कर्ष एकच निघतो व तो हा की, हिंदी लोकांच्या अंगी ज्या विशिष्ट गुणांची लयलूट आहे ते जर त्यांच्या निंदकांच्या अंगी असते तर "प्रशंसनीय व अनुकरणीय सद्गुण" असे ते मानले गेले असते. या गुणांचा समूह हेच हिंदी लोकांवरील रागाचे मुख्य कारण होय. दुर्दैव हे आहे की, दक्षिण आफ्रिकेतील हिंदी माणूस आपली शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी लाकूडतोड्या व पाणक्या होऊन संतुष्ट राहात नाही. परिस्थिती प्रतिकूल असतानाही तो लहानशीच सुरुवात करून, वाढत वाढत समृद्धी संपादितो. पुष्कळ वेळा तो आपल्या मुलांना, आपल्या विद्यापीठा-मध्ये पाठवू शकतो. त्याच्या "गुन्हेगारीची" बीजे खरी येथे आहेत. तो आपल्या स्थानापेक्षा अधिक महत्त्वाकांक्षा धारण करतो. गोऱ्या लोकांसाठी, केवळ साधी मजुरी करण्यावर किंवा लाभांश मिळविण्यावर तो संतुष्ट असता आणि मिळतील ते पैसे खर्चणारा असता तर त्याची मजुरी कायम राहिली असती. एवढेच नव्हे तर त्याच्या वास्तव्याचे स्वागत झाले असते. त्याच्यावर स्तुतिस्तोत्रांचा वर्षाव झाला असता. या-विषयी शंका असेल तर शेजारच्या नाताळ वसाहतीकडे पाहा. तेथे सुस्थितीत असलेल्या हिंदी लोकांविरुद्ध चालणारी ओरड वाढत असली तरी त्या वसाहतीचे सरकार, हिंदी मजुरांची आवक रद्द करण्यास सतत नकार देत आहे.

हिंदी लोकांच्या वतीने, जबाबदार इंग्रज मंत्री ट्रान्सवॉल प्रजासत्ताकाच्या सरकार-विरुद्ध, ज्या तक्रारी करीत होते, त्यांच्याशी तुलना करता, ट्रान्सवॉलमध्ये राहिलेल्या या मूठभर हिंदी लोकांच्या मागण्या अत्यंत सौम्य आहेत. आपल्या गोऱ्या वसाहत-बंधूंच्या भावनांची कदर करून, ते म्युनिसिपल किंवा राजकीय मताधिकाराची मागणी

पुढे रेटीत नाहीत. आदिवासींची प्रचंड लोकसंख्या असलेल्या या देशात अल्पसंख्य गोऱ्यांचे सरकार आहे. त्यामुळे त्या सरकारच्या वाटेत किती अडचणी आहेत, याचा हिंदी लोक औदार्याने विचार करीत असतात हे आपण अधिक सहानुभूतीने लक्षात घेतले पाहिजे. या वसाहतीची सत्ता गोऱ्या लोकांच्या हाती ठेवण्यास ते, तयार आहेत. हिंदी लोकांची मागणी जी काही आहे ती एवढीच की, साम्राज्यातील वर्णीय पण सुसंस्कृत नागरिकाला सभ्य वागणूक मिळण्याचा हक्क आहे. अपमान, उपमर्द व विनाश यांच्यापासून आमचे रक्षण करा या त्यांच्या मागणीचा विचार आपण मानाने व विवेकाने केला पाहिजे. या नव्या वसाहतीचे सारे दरवाजे सर्व आशियावासियांच्या लोंढ्याला उघडे ठेवावेत अशी त्यांची मागणी नाही; पण त्यांचे मत असे की, भावी प्रवेशकांना जी शैक्षणिक कसोटी लावावयाची, ती समंजसपणाची असावी— केवळ हिंदी लोकांविरुद्ध नजर ठेवून बनविलेली नसावी. उदाहरणार्थ, त्यांचे मागणे असे आहे की, हिंदुस्थानी व गुजराती या भाषांना निदान यिद्दिश भाषेच्या पातळीवर ठेवावे.

येथे कायदेशीर रहिवासी असलेल्या हिंदी लोकांचे रक्षण आपल्याला, तुच्छ मानून किंवा गुन्हेगार समजून केलेल्या भेदभावात्मक कायद्यापासून मिळावे— आणि तो आपला प्राथमिक हक्क आहे—अशी हिंदी माणसाची मागणी आहे; व्यापाराचे परवाने देण्यावर नियम व नियंत्रण ठेवण्याचा आणि आरोग्याच्या नियमांची अत्यंत कडक रीतीने अंमलबजावणी करण्याचा नगरपालिकांचा हक्क त्याला मान्य आहे. पण, स्थावर मिळकतीची मालकी मिळविण्यास आपण अपात्र का आहो, असा प्रश्न तो विचारतो. उदा. जेथे तो आपला धंदा चालवितो तेथील जमीन त्याला खरेदी का करता येऊ नये? गोऱ्या लोकांना ज्या गाड्या व डबे वापरता येतात त्यांचा उपयोग करण्यास त्याला बंदी करणारे ट्रामवेचे व रेल्वेचे नियम आणि पायवाटांचा उपयोग करण्यास त्याला हरकत घेणारे पोटनियम— हे खरोखर ब्रिटिश वसाहतीला न शोभणारे आहेत. नोंदणीच्या बाबतीतही समेटप्रिय हिंदी माणसाने तडजोड सुचविली होती. आशियावासी लोकांच्या फेरनोंदणीला ट्रान्सवॉल सरकारने इतके महत्त्व दिले आहे म्हणून आणि आपला सच्चेपणा सिद्ध व्हावा म्हणून हिंदी समाजाने खुषीने फेरनोंदणी करण्याची तयारी दाखविली. आपल्याजवळील अधिकारपत्रे देऊन त्यांच्या बदली दुसरी प्रमाण-पत्रे घेण्यास ते तयार आहेत. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे बोटांचे ठसे देण्यासही ते तयार आहेत. या प्रकारे जी नवी नोंदणीपत्रे दिली जातील, त्यांचा कायदेशीरपणा पारखण्यासाठी, सरकारने पुढे एक लहानसा कायदा मंजूर करावा, असेही त्यांनी सुचविले आहे.

हा त्यांनी सुचविलेला समेट आणि कायद्यातील फेरनोंदणी यातील फरक पूर्णपणे स्पष्ट आहे. खुषीच्या नोंदणीत सक्तीचे विष नाही आणि ते एक गौरवास्पद कृत्य होईल. गोऱ्यांच्या भावनेला मान देऊन आशियावासी लोक तसे वागले म्हणजे कालांतराने, गोऱ्यांचे मतपरिवर्तन होईल. सक्तीच्या नोंदणीमुळे, हिंदी लोकांना काफीरांच्याच दर्जाला पोहोचविले जाते आणि तो दाखला पाहून शेजारच्या वसाहतीत

हिंदीविरोधी कायदे निर्माण होतील एवढेच नव्हे तर, गौरेतर लोकांच्या वस्त्यांमध्ये त्यांना सक्तीने विभक्त ठेवण्याची ही प्रस्तावनाच ठरेल.

डच प्रजासत्ताकाखाली आणि त्यानंतरच्या ब्रिटिश अंमलाखाली हिंदी लोकांची स्थिती कशी होती व कशी आहे, याच्या तुलनेचा एक तक्ता येथे दिला तर तो अस्थानी होणार नाही—उलट—बोधप्रद ठरेल.

ट्रान्सवॉल

डच राजवटीखाली	ब्रिटिशांनी हा मुलूख घेतल्यानंतर
प्रजासत्ताकामध्ये आशियावासियांना मुक्त प्रवेश होता व १८८५ नंतर ३ पौंड देणाऱ्याला वास्तव्य व व्यापार करता येत असे.	युद्धापूर्वी आपले वास्तव्य असल्याचे जे सिद्ध करतील, अशाच आशिया-वासियांना पुनः प्रवेश मिळाला.
१८८५ च्या ३ ऱ्या कायद्याप्रमाणे, [१८८६ च्या दुरुस्तीसह] 'नोंदणी' मध्ये ओळखीचा तपशील द्यावा लागत नसे. फक्त ३ पौंड भरले व त्यांची पावती जवळ असली म्हणजे झाले.	लॉर्ड मिल्नर यांच्या उपदेशाप्रमाणे १९०३ साली, आशियावासियांनी मान्य केलेल्या 'नोंदणी' मध्ये ओळखीचा संपूर्ण तपशील समाविष्ट होता.
	१९०७ च्या कायद्याप्रमाणे फेरनोंदणी सक्तीची आहे, आणि तिचा तपशील अपमानास्पद आहे. ती आठ वर्षांवरील सर्व मुलांना लागू आहे. फेरनोंदणी न करणारास, दंड, कैद व हद्दपारी आहे.
आशियावासियांना नागरिकत्वाचे हक्क नाकारलेले होते.	आशियावासियांना हिंदी लोकांसह म्युनिसिपल व राजकीय हक्क नाकारलेले आहेत.
आशियावासियांना स्थावर मिळकत मालकी हक्कांनी घेता येत नाही.	तीच स्थिती आजही आहे.
आशियावासियांसाठी खास राखून ठेवलेल्या रस्त्यांत, मोहल्ल्यांत व वस्त्यांत त्यांना राहावे लागे.	आशियावासियांना हिंदी लोकांसह अजून तसेच मानले जाते आणि विभक्त ठेवले जाण्याचे भय त्यांना आहे.
क्र. ३ च्या कायद्यात, वरील अन्याय असले तरी, व्यवहारात त्याचा अंमल नसे; कारण हिंदी लोकांचे संरक्षण साम्राज्य सरकार करीत होते.	साम्राज्याला ट्रान्सवॉल जोडल्यानंतर, आणि तेथे जबाबदार राज्यपद्धती सुरू केल्यानंतर, हिंदी लोकांना तसे साम्राज्याचे संरक्षण मिळेनासे झाले.

जबाबदार इंग्रज मंत्र्यांनी, साम्राज्यातील सुसंस्कृत प्रजाजनाइतके हक्क हिंदी लोकांना असावेत, अशी मागणी केली. आणि ब्रिटिश सरकारने ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना त्यांचे न्याय्य हक्क पुनः मिळवून देण्याची प्रतिज्ञा केली.

डचांच्या कायद्याविरुद्ध हिंदी लोकांनी केलेल्या तक्रारींना साम्राज्य सरकारचा पाठिंबा आहे. युद्ध भडकण्याला जी कारणे झाली त्यांपैकी एक प्रमुख कारण म्हणजे त्यांच्या हद्दीतील आशियावासियाविरुद्ध कोणतेही कायदे सर्रहा करण्याचा आमचा हक्क असा डच प्रजासत्ताकाचा आग्रह होता.

सामान्यतः तात्त्विक दृष्टीने हिंदी लोकांवर वरील अन्याय लादलेले असले तरी व्यवहारात त्या कायद्याची अंमलबजावणी कडकपणे केली जात नव्हती.

साम्राज्याला ट्रान्सवॉल जोडण्यापूर्वी तेथे राहणाऱ्या त्याच हिंदी लोकांना, ब्रिटिश सरकारने प्रतिस्पर्धी व्यापाऱ्यांच्या जुलुमाखाली सोडले. आणि १८८५ चा ३ रा डच कायदा ज्यांनी केला. त्यांच्या प्रभुत्वाखाली मुख्यतः चाललेल्या सरकारच्या जुलुमाखाली लोटून दिले.

नव्या नोंदणी कायद्याला हिंदी लोकांनी जो सविनय प्रतिकार चालू केला आहे, त्याचे फल, वासाहतिक सरकारच्या धमकीप्रमाणे त्यांना या वसाहतीतून हद्दपार केले जाईल असे होईल. त्यासाठी प्रवेश निर्बंध कायद्याने जरूर ते अधिकार (त्यांना) मिळतील.

हिंदी लोकांच्या स्वातंत्र्यावरील नियंत्रणाची अंमलबजावणी पराकाष्ठेच्या कडकपणाने केली जात आहे. १८८५ च्या ३ ऱ्या कायद्यात शिक्षेचे कलम नाही, म्हणूनच केवळ हिंदी लोकांना घातक परिणाम भोगावे लागत नाहीत.

शेवटी, युद्ध-पूर्व काळातील वचने व युद्धोत्तर वर्तन यांच्यातील विसंगतीचा विचार करून त्यापासून ‘ तात्पर्य ’ काढण्याचा मोह झाल्यास, तो तत्काळ मान्य व्हावा अशी अपेक्षा आहे. गौरेतर अल्पसंख्याकांना मुळीच प्रतिनिधित्व नसताना, त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करणे, हे प्रभावी बहुमत पाठीशी असलेल्या सरकाराचे कर्तव्य ठरते. शिवाय, साम्राज्याच्या कुटुंबातील प्रत्येक घटकावर, स्थानिक पक्षपात व पूर्वग्रह सोडा, पण स्थानिक हितसंबंधांना साम्राज्याच्या व्यापक कल्याणापेक्षा कमी मानणे, हे बंधन आहे की नाही ? असा मौलिक प्रश्न उत्पन्न होतो. अशा विचारांना ट्रान्सवॉलच्या सरकारच्या राजकीय धोरणात काहीही स्थान नाही. फक्त अडीच लक्ष गोऱ्यांची लोकसंख्या असलेल्या ट्रान्सवॉलने, तीस कोटि हिंदी लोकांच्या प्रतिनिधींवर अन्यायामागून अन्याय रचून, साम्राज्य सरकाराची सत्ता व इभ्रत धोक्यात आणण्यास कमी केले नाही.

इंडिया ऑफिस रेकॉर्डस् :
जे. ॲंड पी. ३९२७।०७

साधन-सामग्री

कलोनियल ऑफिस रेकॉर्डस् : लंडन येथील वासाहतिक कार्यालयाच्या पुस्तकालयातील कागदपत्र पाहा. खंड १, पृष्ठ ३०३.

गांधी स्मारक संग्रहालय, नवी दिल्ली : गांधी साहित्याचे आणि संबंधित कागदपत्रांचे केंद्रीय संग्रहालय व पुस्तकालय. पाहा, खंड १, पृष्ठ ३०३.

इंडिया ऑफिस ज्यूडिशियल आणि पब्लिक रेकॉर्डस् : जे इंडिया ऑफिस म्हणून काम करीत होते, त्याच्या ग्रंथालयात ठेवलेले—भारत-मंत्र्यांशी संबंधित अशा हिंदी घटनाविषयींचे कागदपत्र व दस्तैवज यांचा यात समावेश आहे.

'इंडियन ओपिनियन' (१९०३–६१) : साप्ताहिक पत्र. त्याचे १९१४ पर्यंत वास्तविक संपादक गांधीजी होते. त्या वर्षी त्यांनी दक्षिण आफ्रिका सोडली. या पत्रात इंग्रजी व गुजराती विभाग असत. त्याशिवाय हिंदी व तामीळ विभागही प्रारंभी असत.

नाताळ आर्काइव्हज् : (जुन्या कागदाचे दप्तर). दक्षिण आफ्रिकन सरकारचे पीटर मॅरित्सबर्ग येथील दप्तर.

प्रिटोरिया आर्काइव्हज् : (जुन्या कागदपत्राचे दप्तर). दक्षिण आफ्रिकन सरकारचे प्रिटोरियातील दप्तर-त्यामध्ये, इतर कागदपत्राबरोबर, पंतप्रधानांचे जुने दप्तर व ट्रान्सवॉलच्या गव्हर्नरांचे जुने दप्तर आहे.

रँड डेली मेल : जोहान्सबर्गमधील एक दैनिक वृत्तपत्र.

साबरमती संग्रहालय, अहमदाबाद : गांधीजींचा दक्षिण आफ्रिकेतील काल व हिंदुस्थानातील १९३३ पर्यंतचा काल, यांतील कागदपत्र असणारे ग्रंथालय व दप्तर. पाहा खंड १, पृ. ३०३.

दि स्टार : जोहान्सबर्गमध्ये प्रसिद्ध होणारे एक सायंदैनिक.

ट्रान्सवॉल लीडर : जोहान्सबर्गमधील एक दैनिक वृत्तपत्र.

कालानुक्रम

(जून–डिसेंबर १९०७)

१ जून : ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या सभेस गांधीजी हजर राहिले. पंतप्रधान जनरल बोथा यांकडे, समेटाची योजना मान्य करावयास लावण्यासाठी, शिष्टमंडळ पाठविण्याचे या सभेत ठरले.

४ जून : जनरल बोथा यांनी शिष्टमंडळाची भेट घेण्याचे नाकारले.

६ जून : भारतमंत्री जॉन मोर्ले यांनी कॉमन्स सभेत, हिंदुस्थानाला द्यावयाच्या संकल्पित राजकीय सुधारणांचे स्वरूप सूचित केले.

८ जून : आशियावासी नोंदणी कायद्याला बादशहाची संमती मिळाल्याचे ट्रान्सवॉल सरकाराच्या गॅझेटने जाहीर केले.

१४ जून : ट्रान्सवॉलच्या संसदेचे दुसरे अधिवेशन सुरू.

२८ जून : कायद्याला मान्यता न देण्याचा हिंदी लोकांचा निर्धार असल्याचे गांधीजींनी रँड डेली मेलला दिलेल्या मुलाखतीत जाहीर केले.

२९ जून : फोक्सरस्ट येथे हिंदी लोकांच्या सभेत भाषण करून गांधीजींनी कायद्याचा निषेध केला.

३० जून : कायद्याच्या गर्भितार्थासंबंधी गांधीजींनी प्रिटोरिया येथील सभेत भाषण केले.

१ जुलै : प्रिटोरियात कायदा जारी झाला. पहिली परवाना-कचेरी उघडली. एका महिन्यात नोंदणी करा असे हिंदी लोकांना कळविण्यात आले. नोंदणीविरुद्ध मोहीम सुरू.

गांधीजींनी सार्वजनिक सभेत भाषण केले. "परिणाम काहीही होवोत, पण प्रिटोरियातील हिंदी लोक सक्तीच्या नोंदणीला मान्यता देणार नाहीत," असे गांधीजींनी रँड डेली मेलमध्ये लिहिले.

२ जुलै : फोक्सरस्टच्या सभेत भाषण केले. तुरुंगाच्या ठरावावर दृढ राहण्याचे सभेत ठरले.

३ जुलै : प्रवेश-निर्बंध बिल प्रसिद्ध झाले.

४ जुलै : प्रवेश-बिलाचा धिक्कार करणारा लेख गांधीजींनी 'स्टार' मध्ये लिहिला.

६ जुलै : गांधीजींनी ‘ रँड डेली मेल ’ मध्ये लिहिले, “ हिंदी लोक सर्वस्वाची हानी सोसतील; पण या कायद्याला मान्यता देणार नाहीत. ”

७ जुलै : प्रिटोरियातील सभेत भाषण.

८ जुलै : ट्रान्सवॉल नोंदणी बिल कॉमन्स सभेत परत पाठवले.

९ जुलै : प्रवेश निर्बंध बिलाविषयी ब्रिटिश इंडियन असोसिएशनने ट्रान्सवॉलच्या विधान सभेकडे अर्ज पाठविला.

१४ जुलै : जोहान्सबर्ग येथे हमीदिया इस्लामिया अंजुमनच्या सभेत भाषण करून गांधीजींनी सांगितले, सक्तीच्या नोंदणीला मान्यता देऊ नका.

१५ जुलै : ट्रान्सवॉल फूटबॉल असोसिएशनच्या सभेत भाषण.

१६ जुलै : प्रिटोरिया येथील हिंदी व्यापाऱ्यांच्या सभेत भाषण.

२० जुलै : दर्बान येथे नाताळ इंडियन कॉंग्रेसच्या सभेत ट्रान्सवॉलच्या लढ्या-साठी पैशाची मागणी केली.

२२ जुलै : प्रवेश निर्बंध बिलाबाबत ब्रिटिश इंडियन असोसिएशनने ट्रान्स-वॉलच्या विधान परिषदेला अर्ज सादर केला.

२४ जुलै : गांधीजी प्रिटोरियास गेले. रात्री चोरून जेथे नोंदणीचे अर्ज स्वीकारले जात होते, त्या खमीसाच्या दुकानी ते गेले.

२५ जुलै : आशियावासीयांच्या कायद्याविषयी जनरल बोथा यांनी वसाहत-मंत्र्याला जे आश्वासन दिले, त्यासंबंधी कॉमन्स सभेत असे सांगण्यात आले की, या कायद्याच्या अंमलबजावणीत व हा कायदा लागू करण्याच्या बाबतीत, शक्य तितका कमी त्रास व्हावा यासाठी सर्व प्रयत्न केले जातील आणि बोटांचे ठसे घेण्याची पद्धत चालू राहील.

२७ जुलै : हिंदी लोक दमदाटी करतात या आरोपाचा इन्कार करणारे पत्र ब्रिटिश इंडियन असोसिएशनने वसाहत–सचिवाला लिहिले.

२८ जुलै : जोहान्सबर्ग येथे हमीदिया इस्लामिया अंजुमनच्या सभागृहात हिंदी लोकांची सभा. ट्रान्सवॉलमध्ये हरताळ पाळण्यात आला.

३० जुलै : हिंदुस्थानात, ‘ हिंदुस्तान ’ या वर्तमानपत्राच्या संपादकास पांच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली.

३१ जुलै : सकाळी गांधीजी वुइल्यम् हॉस्केन यांना भेटले. प्रिटोरियातील सार्वजनिक सभेत भाषण. कायद्याला विरोध करण्याचा हिंदी लोकांना सल्ला देण्याची सर्व जबाबदारी स्वतःवर घेतली व सविनय प्रतिकाराचे महत्त्व समजावून सांगितले. कायद्याला मान्यता देण्यात कोणता धोका आहे याचा इशारा दिला.

‘ रँड डेली मेल ’ला मुलाखत.

५ ऑगस्ट पूर्वी : परवाना–कचेरी पीटर्सबर्ग येथे गेली.

७ ऑगस्ट : हिंदुस्थानात स्वदेशीच्या चळवळीचा वर्ष-दिन पाळण्यात आला. बंगालची फाळणी रद्द होईपर्यंत किंवा बदलली जाईपर्यंत बहिष्कार चालू ठेवण्याचा निर्धार २०,००० हिंदी लोकांनी सभेत प्रकट केला.

८ ऑगस्ट : आशियावासी कायद्याला दुरुस्त्या सुचविणारे पत्र गांधीजींनी जनरल स्मटसना लिहिले.

११ ऑगस्ट : हमीदिया इस्लामिया अंजुमनच्या सभेत भाषण.

१४ ऑगस्ट : आदिवासींना दारू विकल्याच्या आरोपावरून चाललेल्या सुलेमान वाडीच्या खटल्यात त्यांच्या तर्फे वकील म्हणून उभे राहिले.

१५ ऑगस्ट : 'कायद्याला संमती न दिल्याने होणाऱ्या परिणामापेक्षा तशी संमती दिल्याने अधिक घोर परिणाम हिंदी लोकांवर होतील' असे जनरल स्मटस् यांना कळविले.

१७ ऑगस्ट : जनरल स्मटस्‌बरोबर झालेला पत्रव्यवहार प्रसिद्धीस दिला.

१९ ऑगस्ट : जनरल स्मट्स यांना पाठविलेल्या योजनेविषयी 'स्टार'मध्ये लिहिले.

२१ ऑगस्ट : हमीदिया इस्लामिया अंजुमनमध्ये भाषण.

२३ ऑगस्ट : ब्रिटिश इंडियन असोसिएशनने वसाहतमंत्र्याकडे अर्ज पाठविला.

२४ ऑगस्ट (पूर्वी) : पॉचेफस्ट्रूम व क्लर्क्सडॉर्प येथे परवाना-कचेरीचे काम सुरू.

३१ ऑगस्ट (पूर्वी) : परवाना कचेरीने नीलस्ट्रूम आणि रस्टेनबर्ग गावांना भेटी दिल्या.

३१ ऑगस्ट : कायद्याला मान्यता द्यावयाची नाही म्हणून ट्रान्सवॉल सोडून जाणारे एच्. ओ. अली व त्यांचे कुटुंब यांना गांधीजीप्रभृतींनी निरोप दिला.

४ सप्टेंबर : दादाभाई नौरोजी यांच्या वाढदिवसानिमित्त नाताळ इंडियन कॉंग्रेसने अभिनंदनाची सागरी तार पाठविली.

दर्बान येथे नाताळ इंडियन कॉंग्रेसच्या सभेत गांधीजी चालू लढ्यावर बोलले.

७ सप्टेंबर (पूर्वी) : जर्मिस्टन येथील 'सनातन वेदधर्म सभे'तर्फे साजऱ्या झालेल्या श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या उत्सवात भाग घेतला.

११ सप्टेंबर : कोमाटीपूर्ट येथे अडकवून ठेवलेल्या हिंदी माणसांविषयी आशियावासियांच्या रजिस्ट्रारला लिहिले.

१७ सप्टेंबर : परवाना-कचेरी बोक्सबर्ग येथे गेली.

२१ सप्टेंबर (पूर्वी) : वसाहत-सचिवाकडे पाठवावयाच्या विराट निवेदनावर सह्या घेण्याचे काम सुरू.

२२ सप्टेंबर : हमीदिया इस्लामिया अंजुमनच्या सभेत गांधीजींचे भाषण.

२४ सप्टेंबर : परवाना-कचेरी जर्मिस्टनला गेली.

२९ सप्टेंबर : हमीदिया इस्लामिया अंजुमन व चिनी संघ यांच्या सभांत गांधीजींची भाषणे.

६ ऑक्टोबर : ब्रिटिश इंडियन असोसिएशनच्या सभेत गांधीजी म्हणाले की, "पकडलेल्या निरोधकांचा बचाव मी करीन."

९ ऑक्टोबर : 'रँड डेली मेल' ला पत्र लिहिले.

१३ ऑक्टोबर : हमीदिया इस्लामिया अंजुमनच्या सभेत भाग घेतला.

१४ ऑक्टोबर : नोंदणीसाठी अर्ज केल्याबद्दल हादू याने गांधीजींची भेट घेऊन खेद प्रकट केला.

१५ ऑक्टोबर : निरोधकावरील दमदाटीच्या आरोपाचे खंडन कोर्टात केले व पोलिस-कमिशनरला पत्र लिहिले.

१७. ऑक्टोबर : हिंदुस्थानात बंगालच्या फाळणीचा वर्ष-दिन सुतकासारखा पाळण्यात आला.

१८ ऑक्टोबर : दमदाटीच्या आरोपाचे खंडन करणारे पत्र गांधीजींनी 'स्टार' ला लिहिले.

२० ऑक्टोबर : हमीदिया इस्लामिया अंजुमन व दक्षिणी हिंदी लोक यांच्या सभेत भाग घेतला.

२३ ऑक्टोबर : ब्रिटिश इंडियन असोसिएशन व हिंदी विरोधी कायदा फंड यांच्या सभेत भाषणे केली.

२४ ऑक्टोबर : आशियावासी नोंदणी कायद्यासंबंधी 'स्टार 'मध्ये लेख लिहिला.

२७ ऑक्टोबर : निरोधनाबाबत, जोहान्सबर्गच्या पोलीस कमिशनरची भेट घेतली.

—या भेटीचा वृत्तांत हमीदिया इस्लामिया अंजुमनच्या सभेत निवेदन केला.

—एका मुल्लाने ज्याच्यावर हल्ला केला होता, त्या महमद शहाबुद्दीन यांची भेट घेतली.

ऑक्टोबर : हिंदुस्थानात, अरविंद घोष यांच्यावरील राजद्रोहाच्या खटल्यात साक्ष देण्याचे नाकारल्याबद्दल बिपिनचंद्र पाल यांना सहा महिने कैदेची शिक्षा झाली.

१ नोव्हेंबर : ४५२२ हिंदी लोकांच्या सह्यांचे विराट निवेदन ब्रिटिश इंडियन असोसिएशनने वसाहत सचिवाकडे पाठविले.

हिंदी लोकांच्या नोंदणीसंबंधी गांधीजींनी 'ट्रान्सवॉल लीडर' मध्ये लेख लिहिला.

९ नोव्हेंबर : लंडन येथील कॅक्स्टन हॉलमध्ये भरलेल्या मुसलमानांच्या सभेने, ट्रान्सवालमधील हिंदी लोकांच्या वागवणुकीचा निषेध केला.

११ नोव्हेंबर : जर्मिस्टन येथे पकडले गेलेले पहिले हिंदी गृहस्थ रामसुंदर पंडित यांच्या बचावासाठी गांधीजी कोर्टात उभे राहिले. पंडितांच्या सुटकेनंतर भरलेल्या सभेत भाषण केले. ट्रान्सवॉल लीडरला मुलाखत दिली.

१३ नोव्हेंबर : हमीदिया इस्लामिया अंजुमनच्या सभेत भाषण.

१४ नोव्हेंबर : रामसुंदर पंडितांच्या खटल्यात जर्मिस्टन येथील कोर्टात गांधीजी उभे राहिले; पंडितांना एका महिन्याची शिक्षा झाली.

ट्रान्सवॉलमध्ये हरताळ पाळण्यात आला.

१५ नोव्हेंबर : प्रिटोरियातील निरोधकांच्या खटल्यात गांधीजी उभे राहिले; रामसुंदर पंडितासंबंधी ' इंडियन ओपिनियन ' मध्ये लिहिले.

१७ नोव्हेंबर : जोहान्सबर्गच्या तुरुंगात रामसुंदर पंडितांची भेट घेतली; हमीदिया इस्लामिया अंजुमनच्या सभेत भाषण केले.

१८ नोव्हेंबर : हिंदुस्थानात लाला लजपतराय यांची सुटका झाली.

१९ नोव्हेंबर : जर्मिस्टन येथे महमद शाह प्रभृतींच्या खटल्यात गांधीजींनी वकिली केली.

२१ नोव्हेंबर : मणिलाल गांधींना रामायण व गीता पाठविली.

२२ नोव्हेंबर : हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेसच्या येत्या बैठकीत ' हिंदु-मुसलमानांचे ऐक्य ' हा खास विषय ठेवावा अशी सूचना ना. गो. कृ. गोखले यांना केली.

२४ नोव्हेंबर : हमीदिया इस्लामिया अंजुमनच्या सभेत भाषण; त्या संस्थेच्या सभागृहात कोकणी लोकांची सभा झाली.

२७ नोव्हेंबर : चिनी संघाच्या सभेत गांधीजींनी भाषण केले.

३० नोव्हेंबर : नोंदणीचा शेवटचा दिवस–१३००० हिंदी लोकांपैकी फक्त ५११ नी नावे नोंदविली.

––लढ्याला ' सत्याग्रह ' हे नाव या महिन्यात प्रथमच मिळाले.

१ डिसेंबर : रामसुंदर पंडितांची भेट गांधीजींनी तुरुंगात घेतली.

३ डिसेंबर : आशियावासी कायदा दुरुस्ती विधेयकाबाबत मी हायकमिशनरची भेट घेईन असा निरोप वुइल्यम् हॉस्केन यांच्याकडून आला. हिंदी लोक चोरटा प्रवेश करतात या आरोपाची चौकशी करण्यासाठी न्यायाधीशाची नेमणूक करावी अशी सूचना हायकमिशनरला केली.

६ डिसेंबर : महमद इसाक यांच्या खटल्यांत वकिली केली.

हिंदुस्थानात, बंगालमधील मिदनापूरजवळ लेफ्टनंट गव्हर्नरच्या गाडीवर बॉंब टाकण्याचा प्रयत्न क्रांतिकारकांनी केला.

७ डिसेंबर (पूर्वी) : पंजाबी, पठाण व शीख लोकांचा अर्ज गांधीजींनी हाय कमिशनरकडे पाठविला.

८ डिसेंबर : हमीदिया इस्लामिया अंजुमनच्या सभेत भाषण.

९ डिसेंबर : फोक्सरस्ट येथील ३७ हिंदी लोकांच्या खटल्यात वकील.

११ डिसेंबर : महमद इसाकचा बचाव केला-तो निर्दोषी म्हणून सुटला.

१२ डिसेंबर : हिंदी लोकांच्या खटल्यासंबंधी इंडियन ओपिनियनमध्ये लेख लिहिला.

१३ डिसेंबर : रामसुंदर पंडितांची तुरुंगातून सुटका–त्यांच्या स्वागतात भाग घेतला–नंतर सभेत भाषण केले.

१५ डिसेंबर : हमीदिया इस्लामिया अंजुमनच्या सभेत भाषण.

२० डिसेंबर : स्टॅंडर्टन येथील हिंदी नोकरांसंबंधी ' मध्य दक्षिण आफ्रिका रेल्वे 'च्या जनरल मॅनेजरला फोन केला.

२२ डिसेंबर : हमीदिया इस्लामिया अंजुमनच्या सभेत भाषण.

२३ डिसेंबर : हिंदुस्थानात, डाक्का येथील माजी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट श्री. ॲलेन यांच्यावर डाक्का व कलकत्ता यांच्या दरम्यान रेल्वे स्टेशनवर गोळी झाडण्यात आली.

२६ डिसेंबर : गांधीजी प्रभृती निरोधकावर खटले भरण्याचा जनरल स्मटस् यांनी निश्चय केला.

सुरत येथे हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेसचे अधिवेशन सुरू झाले. प्रागतिक व राष्ट्रीय यांच्यांत फूट पडली.

२७ डिसेंबर : ट्रान्सवॉल प्रवेश कायद्याला राजेसाहेबांची संमती मिळाल्याचे गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाले. ट्रान्सवॉलच्या हंगामी पोलिस कमिशनरची भेट गांधीजींनी घेतली आणि त्यांना व इतरांना अटक करण्याचे हुकूम आले असल्याचे त्यांना पोलिस कमिशनरने कळविले. नंतर गांधीजींनी जोहान्सबर्गमधील सार्वजनिक सभेत भाषण केले. स्टारला मुलाखत दिली.

२८ डिसेंबर : स्वतःचा खटला चालविला आणि इतर निरोधकांचा बचाव केला. ४८ तासांत ट्रान्सवॉल सोडून जा ' असा हुकूम ' त्यांना देण्यात आला. नंतर, सरकारी चौकातील सभेत भाषण केले.

३० डिसेंबर : जोहान्सबर्ग येथे चिनी संघाच्या सभेत भाषण, रूटरला मुलाखत दिली. प्रिटोरियांतील सार्वजनिक सभेत भाषण केले.

३१ डिसेंबर : ' पुढील सूचना मिळेपर्यंत, तुम्ही कोर्टात येण्याची गरज नाही ' असे कळविण्यात आले.

युरोपियन मित्रांनी त्यांची भेट घेतली व सहानुभूती प्रकट केली.

हिंदी लोकांच्या सार्वजनिक सभेत गांधीजींनी भाषण केले.

शीर्षक-सूचि

अफगाणिस्तानातील मुसलमानांची स्थिती ४५
अलि यांची चूक १६१
अलि यांचा विरोध १९९
अलींचे पत्र २०२
अधिक सावधगिरीची आवश्यकता २६०
'अजापुत्रम् बलिं दद्यात्' ३३६
अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या अध्यक्षास पत्र ४९२
अधीरता ५५९
अरबांचे ज्ञान ५७९
आशियावासीयांच्या नोंदणीचा कायदा–भयानक विषमता २२
आगीत तेल ओतले ९३
आक्षेपार्ह कायदा ९९
मि. आदमजी मियाँखाँ यांचा मृत्यु १५८, १५९
आम्ही प्रतिकार का करतो !
आमचे कर्तव्य २०३
आशियावासीयांच्या नोंदणी-अधिकाऱ्याला पत्र २९१
आमची पुरवणी ३३४, ५१०
आशियावासीयांच्या रजिस्ट्रारला पत्र ६०८
इजिप्तमध्ये स्वराज्याची चळवळ ३३६
ईद मुबारक ४३२
ईस्ट लंडनला इशारा १६७
इंग्लंडमधील वीरांगना ८५
"इंडियन ओपिनियन"विषयी ३५८
इंडियन ओपिनियनची पुरवणी २७७
इंडियन ओपिनियनला पत्र ४५७
एका पौंडाचे बक्षीस
एस्टकोर्टाचे अपील २०५
एका पारशी स्त्रीचे धैर्य २०८
इंडियन ओपिनियनला पत्र २२९, ५३८
अंगद शिष्टाई ८३
अंगठ्याच्या ठशाचा कायदा ३१४
उमर हाजी आमद झवेरी २०७
कायद्याचा जुलूम ५३
कायदेभंगाचे कर्तव्य [१] २८३
,, [२] २९७
कायद्याच्या हातातील मेणाची बाहुली २९४
कायद्याला आम्ही प्रतिकार का करतो ? ५०६
कायद्याला मान्यता देणाऱ्यांचे काय होणार ? ५२५
कोण ही दुर्दशा ? ९७
काही इंग्रजी शब्द ५७६
केपमधील हिंदी लोक १६४, २५८, ३५७, ३६४, २०४
केपचा प्रवेश कायदा २१
केपटाऊनमधील हिंदी लोक ३५, २६४
किती दारुण क्लेश ! २९३

केपमधील असोसिएशन ३४५
केपमधील हिंदी लोक जागे केव्हा होणार ! ४८३
कॅक्स्टन हॉलमधील सभा ४५८
काँग्रेसच्या सभेतील भाषण २७०
काँग्रेसचे प्रतिनिधी ४८२
खरा मित्र २४८
खरी मैत्री ४१६
'गडसास्वडयोः' २९२
गरीब पण शूर हिंदी लोक ३४४
गायकवाडांना अर्ज ४८९
छगनलाल गांधी यांना पत्र ५१, १२५, १२६
जनरल स्मट्स यांचा हट्ट १४३
जनरल स्मट्स यांचे उत्तर २०२
जनरल स्मट्स यांच्या खासगी चिटणिसाला पत्र २१३
जनरल स्मट्स यांना पत्र ४४६
जर्मन-पूर्व आफ्रिका लाइन ५४३
जनरल बोथा यांचे उदाहरण ३७९
जोहान्सबर्गचे बातमीदार– नवा कायदा ३७
जोहान्सबर्गचे बातमीदार ५८,६७,७३
जोहान्सबर्गची ताजी बातमी ९०
जोहान्सबर्गचे नगरपालिकेला पत्र २५५, २६८
जोहान्सबर्गचे बातमीपत्र १२, ११७, १३१, १६९, १८९, २२२, २५०, २६६, २९०, ३०१, ३१५, ३४७, ३६६, ३८२, ४००, ४२०, ४३६, ४६९, ४८४, ४९३, ५२८, ५४८, ५६२, ५८१, ६०१.
जोहान्सबर्ग येथील खटला ५८६
ज्यूरींची कसोटी १
ट्रान्सवॉलच्या विधिमंडळाचा अर्ज १२१
ट्रान्सवॉल प्रवेशाचे नवे बिल १२२
ट्रान्सवॉल प्रवेश बिलावरील वादविवाद १४१
ट्रान्सवॉल विधान परिषदेला अर्ज १५२
ट्रान्सवॉलमधील लढा १८७, ३१०
ट्रान्सवॉलमधील दुकाने बंद करण्याच्या वेळेविषयी निर्बंध ३८२
ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांचे कर्तव्य ३९७
"ट्रान्सवॉल लीडर" ला पत्र ४१२, ४४६, ४८०
ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना सूचना ४७७
तरुणांच्या धूम्रपानास बंदी करणारा कायदा २२१
तिरस्कृत कायदा आणि तदनुसार केलेले निर्बंध ५१०
तैयबला तार १९
दक्षिण आफ्रिकेतील दुष्काळ ८४
दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीचा हल्ला ९६
दर्बानची कसोटी १२८
दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीचे कार्य १४४
दर्बानच्या कृषि–समितीचा क्षुद्रपणा २०७
दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीला तार २४२
दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समिती २४५
दर्बानमध्ये बोटांच्या ठशांचे संकट २८३
दक्षिण आफ्रिका ब्रिटिश इंडियन कमिटी ३५९

दक्षिण आफ्रिका ब्रिटिश भारतीय समितीला पत्र ३७३
दर्बान येथील दिवाळी उत्सव ४७४
दादाभाईचा वाढदिवस २५९
दादाभाई नौरोजी यांना तार २६९
नवा आक्षेपार्ह कायदा २६
नव्या कायद्यावरील बक्षिसाची कविता ६३
नवे वर्ष सुखाचे जावो ४३३
ना. गो. कृ. गोखले यांना तार ३०५
ना. गो. कृ. गोखले यांना पत्र ४५४
नाताळ इंडियन कॉंग्रेस ६५
नाताळमधील तुरुंगाचे नियम ६५
नाताळ, तू जागा आहेस की निद्रिस्त आहेस ? ९८
नाताळ इंडियन कॉंग्रेसमधील भाषण १४९
नाताळ विधानसभेस अर्ज १५३
नाताळच्या हिंदी लोकांतील जागृती १८८
नाताळच्या व्यापाऱ्यांना इशारा २१८
नाताळमध्ये दुष्ट कायदा जारी करता येईल काय ? २४७
नाताळ नगरपालिकेचा मताधिकाराचा कायदा २८१
नाताळसाठी स्वयंसेवक ५२७
नाताळचा परवाना कायदा ५४२
नाताळमधील परवान्यासाठी करावयाच्या अर्जाचे निर्बंध ५४७
डॉ. नंदी यांची पुस्तिका ८२२
परवाने व तिकिटे यासंबंधीचे नाताळमधील बिल १४७
परवाना कचेरीवरील बहिष्काराबाबत भित्तिपत्र १५४
पी. के. नायडू प्रभृतींचा खटला ५८९
पुढे काय ? २००
पीटर्सच्या खटल्याचा शोध ३८०
पीटर्सबर्गला धन्यवाद २१६
पीटर्सबर्गमधील हिंदी लोकांना तार २११
पोलीस कमिशनरला पत्र ३७५
पौर्वात्यांचे शहाणपण ५६
पौर्वात्यांचे शहाणपण, ग्रंथमाला १२८
पंतप्रधानांच्या सचिवांना पत्र १९, ५१, ३२२
पंडितजींची देशसेवा ४८१
प्रामाणिक मत २०
प्रधानमंत्र्यांचे विचार २८०
प्रवेशासंबंधी अर्ज २५६
प्रिटोरियाच्या सभेतील भाषण ८७
प्रिटोरिया येथील प्रचंड सभा १०५
प्रिटोरियातील लढा १५५
प्रिटोरियातील भाषण १८२
प्रिटोरियाच्या सार्वजनिक सभेतील ठराव १८५
प्रिटोरियाच्या समितीला तार १९७
प्रिव्ही कौन्सिलकडे आपण दाद मागू शकतो काय ? २४७
पॉचेफस्ट्रुममधील हिंदी लोकांना तार २११
बादशहांची मंजुरी ५२
ब्लूम फॉंटीन येथील "फ्रेंड" ४१७
ट्रान्सवॉल हिंदी लोकांच्या सहाय्यास पुनः धावून आला ४१७
बादशाहांचा वाढदिवस ६४०
बचावलेले मेमन ४६२
मरहूम मि. कार्ल ब्लाइंड ३५
महंमद पैगंबर आणि त्यांचे खलिफा ७१
मनमोकळी सहानुभूती २४३
मगनलाल गांधी यांना पत्र ३५२, ३७४
मरहूम श्री. अलेक्झांडर ३९३
मरहूम सुपरिंटेंडेंट अलेक्झांडर ३९९
मरहूम नबाब मोहसीन उल-मुल्क ५४२
मध्य दक्षिण आफ्रिका रेल्वेच्या जनरल मॅनेजरला पत्र ५५८, ५६७
मान-बिंदु ९४
मानवजातीला धक्का १५६
मारुतीचे शेपूट २१७
मगनलाल गांधी यांना पत्र ३७४
मणिलाल गांधी यांना पत्र ४७८

महम्मद इशाकचा खटला ५२१
मुदतबंद हिंदी मजूर ५५,१४८
मुलींचे शिक्षण ८७
मुदतबंद मजूर १४३
मोठी बदनामी १३९
मोरोक्कोमधील अग्निप्रलय २२०
युसफअल्ली व स्त्री-शिक्षण ६७
रामसुंदर पंडित यांचा खटला ४४७
रामसुंदर पंडित यांचे जीवन-चित्र ४६२
रामसुंदर पंडित यांचा कोर्टात चाललेला खटला ४६५
रामसुंदर पंडित ५२६,५६०,५६१
रिच् यांची सेवा ३७९,५२४
रिच् यांचे श्रम २९६
ऱ्होडेशिया व ट्रान्सवॉल ५४
'रँड डेली मेल' ला पत्र ८८,११३ २११, ३३९, ३५५
'रँड डेली मेल'ला मुलाखत ७९, १०८, १८६
रँड डेली मेल २३४
रॉस यांचे पत्र २०६
लजपतरायांची मुक्तता : ट्रान्सवॉलमधील हिंदी लोकांना धडा ४५९
लेडीस्मिथमधील व्यापारी २५८
लेडीस्मिथमधील परवाने २६२
लॉर्ड ॲम्प्थिल ८१
लोबिटो बे १४६
लंडनमधील मुसलमानांची सभा ४२०
वसाहत-मंत्र्याला अर्ज २३७
वासाहतिक सचिवाला पत्र ६२, १३८, ३५३, ४१०, ५२२, ५५६, ५५७
वाचकांना सूचना २४४
विश्वासघात २१९
विराट निवेदन (अर्ज) ३०६, ३०७
वीरांनी कसे वागावे ! ३
वीनेन परवान्याचे अपील ३०९
वृत्तपत्रांना पत्र ४२८
शहाण्याला शब्दाचा मार ४३४
शूर स्त्रिया ५७३
शौर्य कशास म्हणावे ? २६५
सर विल्यम वेडर्बर्न यांना पत्र ४०९,४१४
सरकारी चौकातील भाषण ५९८
स्मट्स यांची बहाद्दुरी ४१५
समितीचा लढा २०१
'स्टार'ला पत्र ४७, ९१, ११५, २३०, २३२, ३७७, ३८९, ५९५.
सविनय प्रतिकार करणाऱ्यांसाठी ३९४
सर विल्यम वेडर्बर्न यांना पत्र ४०९
समितीची चूक ३३
हमीदिया इस्लामिया अंजुमनमध्ये भाषण १३०,३४२,५६८
हमीदिया इस्लामिया अंजुमनचे पत्र २५०
हिंदुस्थानातील असंतोष ८
हिंदी संस्थानिक १०
हिंदुस्थान व ट्रान्सवॉल ८६
हिंदी लोकांच्या सामर्थ्याचे मापन १२७
हिंदी लोकांच्या ठरावाचा भावार्थ २१५
हिंदी मुसलमानांना विनंती २३२
हिंदी लोकांचा छळ २९६
हिंदुस्थानचे साहाय्य ३१३, ३३०
हिंदी फेरीवाल्यांविरुद्ध मोहीम ३३३
हिंदी मतदार ३४५
हिंदी राष्ट्रीय सभेला पत्र ४२६
हिंदी राष्ट्रीय कॉंग्रेसला देणग्या ४६२
हिंदी लोकांवर हल्ला ५४४
हिंदुस्थानची अवस्था ५७७
हाजी नबाब ५६१
हायकमिशनरच्या खासगी चिटणीसास पत्र ५१८
हॅगरचे नवे कृत्य २२०

विषय – सूचि

अ

अफगाणिस्तान–४६, ९४
अब्दुर रहमान, अमीर–१०, ४६
अरब–५८०
ॲम्पथिल्, लॉर्ड–३७, ८१, ८५, ३३६
अंगद–८३

आ

आठवले, सौ.–३७
आदमजी मियाँ खाँ–१५९, १६०
आयर्लंड–२७८, २७९
आयर्विंग, वॉशिंग्टन–७२–७३

इ

इसॉप मियाँ–४२, ४९, ५०, ५२, ७०, १०८, १५३, २१३, २२६, २५५, २६९, २७४, ३२४, ३२५, ३२६, ३४०, ३५५, ३७१, ३९३, ४१०, ४१२, ४२८, ४३१, ४४४, ५२२, ५२९
इंग्रजी शब्द–५७६
इंग्लंड, वीरांगना–८५, ५७३–७४
इंडियन ओपिनियन–२२९, २४४, २७७, ३५८, ५९
इंडियन सोशियालॉजिस्ट–१८
इंडिया–२७७, ३९५

ई

ईश्वर–५, ६, ९५, ११६, २४६, २४७, २७१, २८७, ३११

ए

एमटोंगा–१
एल्जिन लॉर्ड–३७, ९४, १४०, २५७

क

कचालिया–१०७
कविता–३, ४, ७, ५३, ६३, ९६, ९८, १६६, २२७, ४६८, ५०९, ५८३
कर्झन लॉर्ड–९४
कर्टिस–७५
कर्वे, प्रा. धों. के.–३६
कादिर इमाम अब्दुर–१०७
कामा–२०८
कासिम, हाजी–१०७, ३६८, ४२१
किमिंग–७७
कुवाडिया, एम्. एस्.–१०७
केप–२१, ३१, ३५, १६४, १६६, २०४, २५८, २६४, ३४६, ३५७, ३६४, ४८३, ६६७
केमालपाशा–३३७
क्रूगर–५, १५६
कॅलेनबॅक–३३, ४०, ६९
कॅबेल, लॉर्ड कॉलिन–६
क्विन–४७२, ५०२, ५३०

ग

गायकवाड–४९०
गीता–५, ९५, १२६
गोखले गो. कृ.–३०५, ३१३, ३२१, ३२६, ३३६, ४५४, ४७९

गांधी, मो. क.–१३, १६, ४१, ४२, ७९, ८०, ८७, १०६, १११, १३०, १४९, १७४, १७७, १८२, २०९, २३०, २३१, २४३, २७०, २७२, २७३, ३०५, ३४२, ३७१, ३७६, ३७८, ३८३, ३९०, ४२१, ४२२, ४४६, ४५५, ४५८, ४७५, ४७६, ४८८, ५०३, ५२०, ५२१, ५२३, ५२९, ५३६–३८, ५४०, ५४४–४६, ५५८, ५५९, ५६६, ५६८–७१, ५८६–८८, ५८९–९५, ६००, ६०७

गांधी, छगनलाल–५१, १२५, १२६

गांधी, मगनलाल–३५२, ३७४

गांधी, मणिलाल- ४७८

गॅरिबाल्डी–३६

गॉडफ्रे जॉर्ज–३४३–४४

च

चर्चिल, विन्स्टन,–७६, २२८

चॉमनी–१७, ७३, २०९, ४८६

ज

जोहान्सबर्ग, बातमीपत्र–१२, ३७, ५८, ६७, ७३, ९०, १०९, ११७, १३१, १६९, १७६, १८९, २२२, २५०, २५५, २६६, २६८, २८६, ३०१, ३१५, ३२५, ३४७, ३६६, ३८२, ४००, ४२०, ४३५, ४६९, ४८४, ४९३, ५२८, ५४८, ५६२, ५८१, ५८६, ६०१

ज्यूरी–१–३

झ

झवेरी–उमर–२०७

ट

टॉल्स्टॉय–३९४

ट्रान्सवॉल–४, ६, २६–८, ३२, ३३, ३५, ३८, ४०, ४३, ४५, ४८, ५२, ५४, ५९, ६५, ६७–६९, ७३, ७६, ७८, ७९, ८१, ८२, ८४, ८६, ९०, ९२, ९५–९८, १०१, १०८, १०९, ११४, ११६, १२१, १२२–२४, १२७–२९, १३७, १४०–४२, १४४, १४९, १५२, १५७, १५८, १६७, १६९, १८३, १८७, १९२, १९८, २००, २०२, २१५, २३०, २३५–३९, २४२–४४, २४८, २५४, २५६, २५७, २६०, २७१, २७९, २९४, २९६, ३०८, ३१०, ३२३, ३२४, ३३०, ३३२, ३३३, ३३६, ३६१, ३६६, ३८३, ३९०, ३९७, ४११, ४१४, ४१७–१९, ४२६, ४३५, ४५९, ४६५, ४७२, ४७७, ५०७, ५११–१४, ५२३, ५७४, ६०९, ६२२–२५, ६३७, ६४१, ६४४, ६४७–५१, ६६०, ६६३–७०

त

तुळशीदास–१७९

थ

थोरो–२८३, ३९४

द

दादाभाई नौरोजी–२५९, २६९, २७३, २७७, ३९५, ३९९

देवधर, सौ. काशीबाई–३७

देशपांडे सौ.–३७

ध

धूम्रपान–२२१, २२२

न

नरसी मेहता–१२८, ३९७
नंदी डॉ.–२८२
नाताळ, इंडियन काँग्रेस ६५, ६६, ९७, ९८, ११२, १२९, १४९, १५३, ४६१
नाताळ मर्क्युरी–१–३
नापित–४४१–४२
नामजोशी, सौ.–३७
नेसर–३२४, ३३८, ३४९

प

पैगंबर–७१, १६१, २६३, ३२६
पंजाबी–८
पंडित रामसुंदर–१३३, ३४२, ३४७, ३८३, ४४७, ४४९–५३, ४५७, ४६२, ४६३, ४६५–६८, ४८१, ४८४–८५, ५०४, ५२६, ५३१, ५३५, ५५७, ५६०–६२
पोलक–१३, १३३, १७९, ३०२
पॅंखर्स्ट, एमेलिन–८५
प्रिटोरिया– ८७, ९१, ९३, १०५, १११, १२८, १३१, १५५, १७४, १८२, १८५, १९७, ३०६, ५०२, ५२८, ५६५, ६०६

फ

फरार, सर जॉर्ज–७१
फर्ग्युसन कॉलेज–३६
फ्रेंड–२४३, २४८, ३०३, ४१६, ४१७

ब

बर्क, एडमंड–३८
बानर्जी, सुरेंद्रनाथ–३२६–२८, ३३०, ३३६
बायबल–१५७
बुद्ध–१६१
बोथा, जनरल–४, ३३, ३९, ६७, ७०, ७१, ९२, ९४, ९५, ३२७, ३३२, ३४७, ३७९, ३८०
बॅनरमन, सर हेन्री कॅम्बेल–९७, २८०
ब्लाइंड, कार्ल–३५–३६

भ

भावनगरी, सर मंचरजी–३४, ९२, १४५, ३६०, ३९५

म

मताधिकार–३४५
महादेव देसाई–२६४
मंचरजी–सर माणिकजी–३४
मॅझिनी–१८, ३६
मारुती–२१७
मीराबाई–६७
मुख्तियार–अहमद–९३, १०६, १०८
मुस्लीम लीग–४९२
मिंटो लॉर्ड–९५
मोर्ले लॉर्ड–९४

य

येशू ख्रिस्त–४९, १५७, १६१, १६५
युसफअल्ली–६७,

र

रशिया–१६८, १६९
रसूली–२२०

रामायण–१२५, १२७, ४७८
रिच्–३४, ६६, ७०, २९३, २९६, ३१०, ३६०, ३७९, ३८१, ३९७, ५२४, ५२५
रिचर्ड तिसरा–१३२
रिपन लॉर्ड–३२१
रुस्तुमजी, पारसी–१५७
रूमी, जलालुद्दीन–५६–५७, ४३३
रँड डेली मेल–७९, ८८, १०८, १११, ११३, १८६, १९९, २११, २२३, २३४, ३४१, ३५५
रॉस–२०६

ल

लॅन्सडाउन, लॉर्ड–३७, ४०
लाला लजपतराय–९, ४५९, ४६०, ४६३–६५
लॉली, सर ऑर्थर–७७
लिओनॉर्ड–७४

व

वंदे मातरम्–८
वायबर्ग–१४१, १४२, ३६३, ३६४
वेडर्बर्न, सर विल्यम्–४०९,४१४
वेस्ट–१२५

स

सविनय प्रतिकार–२७५–७६, २७८–७९, २८३–८५, २९७–३००, ३९४, ३९५, ६५५
सादी–५
साले, उमरजी–१०६
सॉक्रेटिस–६५६
सूफी–५६
सेल्बोर्न, लॉर्ड–८२, १३९
स्त्री-शिक्षण–६७, ८७
स्टार–३९, ४७, ९१, ११२, ११६, २२४, २३०, २३३, २५३, ३७७, ३८९, ५९५
स्टीफन–न्यायमूर्ती–१
स्मटस् जनरल–५, १३६, १४१, १४४, १७५, २०२, २१३, २४६, २५०, ३५१–५२,३६१–६३, ३६६–७१, ४१५, ४१६, ५८२
स्वयंसेवक–३३५

ह

हबीब, हाजी–१०५, १०६, १३१, १७४, १७६, १७८, ५६१
हमीदिया इस्लामिया अंजुमन–२४९, २८७, ३२६, ३४२, ३४७, ३७१, ३८२, ४००, ५००, ५५२
हॅगर–२२०, २७१, ३३३
हिंदी राष्ट्रीय सभा (कॉंग्रेस)–४२६, ४२७, ४६२
हिंदी संस्थानिक–१०
हिंदुस्थान–८, ९, १९, ५७७–७९
हिंदु–मुसलमान–९, ७१, १६३, २३[illegible] ४३२, ४३३, ४६१, ५७८
हिंदु विधवा–३६
हॅम्डन जॉन–६
हॅमिल्टन लॉर्ड जॉर्ज–६
हॉस्केन–१४२, १५१, १८२, १९[illegible] १९७, १९८, ६०५

Ticket No.	Issue Date	Return Date	Ticket No.	Issue Date	Return Date